॥ श्री ॥

# खाडिलकरांचा लेखसंग्रह

## भाग पहिला

( श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या १८[illegible]६ पासून १९१० पर्यंतच्या निवडक लेखांचा संग्रह )

सन १९४९

किंमत ६ रुपये

॥ श्री ॥

# खाडिलकरांचा लेखसंग्रह

## भाग पहिला

( श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या सन १८९६ पासून सन १९१० पर्यंतच्या निवडक लेखांचा संग्रह )

प्रकाशक आणि मुद्रक
श्री. यशवंत कृष्ण खाडिलकर
श्रीदत्तात्रय प्रिंटिंग प्रेस, १२ शेणवीवाडी, कांदेवाडी
मुंबई नं. ४.

आवृत्ति पहिली

सन १९४९

किंमत ६ रुपये

# आभार

'लेखांची निवड मीं करून ठेवली आहे, लेखसंग्रह माझ्या हयातींत प्रसिद्ध न होऊं शकला तर माझ्या मागून प्रसिद्ध होईल,' अशा प्रकारचे उद्गार १९४८ च्या उन्हाळ्यांत तो. काकासाहेब खाडिलकर यानीं काढले होते. या उद्गारांच्या टोंचणीमुळें लेखसंग्रहाचें काम शक्य तितकें झपाट्यानें उरकण्याचा नेट धरला, पण अखेर तो. काकासाहेबांचे शब्द खरे ठरले. गनिमी काव्याची लढाई या लेखमालेच्या शेवटच्या लेखाची प्रूफें त्यांना दाखविण्यासाठीं ज्या रात्रीं त्यांच्या घरीं गेलीं त्याच रात्रीं मृत्यूचा गनिमी कावा यशस्वी झाला. हा लेखसंग्रह त्यांच्या पश्चात् प्रसिद्ध होत आहे याचें मनाला अत्यंत वाईट वाटतें.

या लेखसंग्रहांत 'विविधज्ञान विस्तार'मधील व 'केसरी'मधील तो. काकासाहेबांचे निवडक लेख १८९६ पासून १९१० पर्यंतचे देण्यांत आलेले आहेत. यानंतरचे त्यांचे लेख लेखसंग्रहाच्या दुसऱ्या भागांत समाविष्ट करण्यांत येणार आहेत. या लेखसंग्रहासाठीं जरूर ते 'विविधज्ञान विस्तार'चे दुर्मिळ अंक श्री. वसंतराव राऊत यानीं मोठ्या आस्थेनें दिले. त्याचप्रमाणें 'केसरी' च्या फायली कै. लो. टिळक यांचे नातू श्री. जयंतराव टिळक यानीं व 'केसरी' कचेरीनें आपुलकीनें दिल्या. त्याबद्दल श्री. वसंतराव राऊत, श्री. जयंतराव टिळक व 'केसरी' कचेरी यांचा मनःपूर्वक आभारी आहें. त्याचप्रमाणें या लेखसंग्रहांत आलेल्या लेखांची पार्श्वभूमि सांगणारा '१८९६ ते १९०९ मधील खाडिलकर' हा लेख श्री. न. र. फाटक यानीं या संग्रहासाठीं दिला आहे. संग्रहांतील लेख वाचतांना या लेखाचा उपयोग वाचकांकडून होईलच.

'नवाकाळ' कचेरी<br>
मुंबई,<br>
ता. २४-१-४९

प्रकाशक

# १८९६ ते १९०९ मधील खाडिलकर

या लेखसंग्रहांत काकासाहेब खाडिलकरांनीं विविध-ज्ञानविस्तारांत १८९६ सालीं लिहिलेल्या लेखांचा समावेश केलेला आहे. त्यापूर्वी या मासिकांतून त्यांचे 'सवाई माधवराव यांचा मृत्यु' हें नाटक प्रसिद्ध झालें होतें. नाट्य-सृष्टींतल्या या पदार्पणामुळें पुण्याचे एक तत्कालीन लोकप्रिय नाटककार नारायण बापूजी कानिटकर यांचा व काकासाहेबांचा परिचय झालेला होता तोच पुढें काकासाहेबांचा केसरी कचेरींत प्रवेश होण्याला उपयोगी पडला. वि. ज्ञा. विस्तारांतील 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' या पुस्तकावरील टीकेचे लेख लो. टिळकांना फार आवडले, टिळक यावेळीं त्या पुस्तकावर लिहिण्याचा विचार करीत होते व त्याकरितां इतर ठिकाणीं प्रसिद्ध होणाऱ्या तत्संबंधीच्या टीकालेखांवर त्यांची नजर होती. काकासाहेबांचे लेख पाहिल्यावर ते लेख लिहिणाराची त्यांनीं कानिटकरांपाशीं सहज एकदां चौकशी केली. कानिटकरांना त्या लेखाचे जनक काकासाहेब असल्याचें माहीत होतें व त्यांनीं तसें उत्तर दिल्यावर 'अशा तऱ्हेच्या स्वाभिमानी विचाराचे बुद्धिमान् तरुण केसरीच्या साह्याला निष्ठेच्या चिरस्थायित्वानें येतील तर केसरीच्या चरितार्थाबद्दल काळजी करण्याला नको; पण बुद्धिमान् तरुण देशसेवेच्या मार्गाकडे येण्याला धजत नाहींत, सरकारी नोकरींत किंवा वकिलींत जातात. कारण खात्रीची वाढती व बिनधोक्याची मिळकत हें त्या बाजूचें मोठें आमिष आहे.' वगैरें आशयाचे उद्गार टिळकांनीं काढले. कानिटकरांनीं या उद्गारांतला हेतु ओळखून काकासाहेबांजवळ केसरीच्या कार्यकर्त्यांमध्यें दाखल होण्याची गोष्ट काढली. काकासाहेबांना हा प्रकार अनपेक्षित असला तरी त्याविषयीं आढेवेढे घेण्याचें कारणच

नव्हतें. देशसेवा घडावी या निदिध्यासानें त्यांना 'केसरी'कडे जाण्याची प्रेरणा या काळांत लाभलेली होती. ती प्रेरणा सफल करण्याची संधी अशा रीतीनें अनायासें वाढून आल्यावर काकासाहेबांनीं तिचें अत्यंत तत्परतेनें स्वागत केलें. पुढें केसरीकडे रुजू होतांना त्यांना फारशी उमेदवारी करावी लागली नाहीं. त्यांच्या लेखणीचा कस व तयारी टिळकांना माहीत होतीच. टिळकांच्या सूचनेवरून त्यांनीं 'राष्ट्रीय महोत्सवांची आवश्यकता' या विषयावर लेख लिहिला टिळकांनीं हा लेख लिहिण्याची सूचना देतांना विशेष चर्चाहि केली नाहीं. काकासाहेबांनीं या लेखामध्यें ग्रीस देशांतील 'आलिंपिक' सारख्या महोत्सवांच्या उपयोगाचें विवेचन केलेलें आहे. टिळकांनीं लेख लिहिण्याला सांगितल्यावर काकासाहेबांनीं इकडेतिकडे हिंडून कांहीं पुस्तकें जमविलीं. त्यांतून माहिती काढली व झपाट्यानें लेख लिहून टाकला. टिळकांनीं तो पाहून छापायला दिला. तो दिवस रविवारचा होता. मंगळवारच्या केसरींत तो प्रसिद्ध व्हायचा तर आजच्या आज तयार केला पाहिजे अशा भावनेनें काकासाहेबांनीं त्या दिवशीं जेवणाखाण्याची पर्वा केली नाहीं. सकाळपासून दुपार उलटेपर्यंत त्यांनीं सारा वेळ लेखाच्या कामांत घालविला. तो टिळकांच्या हातीं पडून त्यांनीं तो छापखान्यांत पाठविल्यावर काकासाहेब निश्चित झाले व इतर उद्योगास लागले.

१ सप्टेंबर १८९६ ते १९०९ डिसेंबर अखेरपर्यंतच्या काळांतील म्हणजे उण्यापुऱ्या चौदा वर्षांतील केसरींतील लेख या पहिल्या खंडांत आलेले आहेत. या अवधींत देशामध्यें ज्या घडामोडी झाल्या, त्यांचा थोडक्यांत आढावा दिल्यास या लेखाचा अधिक स्पष्ट बोध होईल १८९६ सालांतील अवघे दोनच लेख प्रस्तुत संग्रहांत आहेत त्यानंतर १८९७ च्या जूनमध्यें काकासाहेबांनीं केसरीकरितां आपली लेखणी उचलली. १८९६

नगर वाचनालय ता.

च्या अखेरीस मुंबईंतील प्लेगच्या साथीनें पुण्यास पछाडण्याला सुरवात केली व १८९७ च्या पहिल्या तिमाहींत तिचा कहर माजून ती ओसरली. या सुमारास केसरींत काम करणाऱ्या एका इसमाच्या आजारी नातेवाइकाबरोबर काकासाहेबांना टिळकांनीं बेळगांवास पाठविलें, आणि 'तेथून सांगलीस जा व पुण्याहून बोलावणें येईतोंवर तेथेंच रहा' असें टिळकांनीं त्यांस जातांना बजावल्यामुळें काकासाहेब जूनपर्यंत सांगलीस होते मे महिन्याच्या अखेरीस टिळकांनीं त्यांस तारेनें बोलावणें केलें. काकासाहेब पुण्यास आले तो दिवस पुन्हां रविवारचाच होता. येतांच त्यांनीं केसरीकचेरींत फेरी टाकली, तों तेथें केसरीची कांहींच तयारी नव्हती. टिळक सिंहगडास गेलेले होते. केळकरांचा 'मराठा' प्रसिद्ध झाल्यामुळें तेहि नव्हते कचेरींत कोणीतरी एक कारकून होता. त्याला विचारलें तर केसरीच्या कामाबद्दल त्यानेंही आपल्या कानावर हात ठेवले. अशा स्थितींत काम चालू करण्यासाठीं काकासाहेबांनीं टपाल पाहून कांहीं मजकूर छापण्यास दिला, आणि अग्रलेखाच्या विषयाचें चिंतन चालविलें. शिवाजी व गणपति यांचे उत्सव या काळीं बाल्यावस्थेंत असल्यामुळें उत्सवाच्या दिवसापूर्वी त्यांची महती गाऊन लोकांना त्यांचा वेध लागावा म्हणून टिळक लेख लिहीत असत, हें लक्षांत घेऊन पुढें थोड्याच दिवसांवर असलेल्या शिवाजी उत्सवानिमित्त काकासाहेबांची कालाईलच्या 'हिरो अॅंड हीरोवर्शिप' या पुस्तकांतील विचारसरणीच्या अनुरोधानें केसरीसाठीं 'विभूतिपूजा' हा अग्रलेख लिहिला. या वर्षीच्या शिवाजी उत्सवांतील वाङ्मयांतून टिळकांवर राजद्रोहाचा आरोप करण्यासारखी केस सरकारानें शोधून काढली व टिळकांना तुरुंगांत पोंचविलें ही गोष्ट प्रसिद्ध आहे. खटल्याच्या वाङ्मयांत विभूतिपूजा हा लेख व 'स्फुट सूचना' या सदरांतला शिवाजी उत्सवाचा काकासाहेबांनीं लिहिलेला अहवाल यांना सरकारनें महत्त्वाचें स्थान दिलेलें होतें. पुढें टिळक तुरुंगांत अडक

त्यावर केसरीची संपादकीय धुरा अधिकृत रीत्या केळकरांच्या नांवावर असली तरी काकासाहेबच १८९९ सालापर्यंत केसरीचे अग्रलेख प्रामुख्याने लिहीत असल्याची साक्ष खुद्द टिळकांनींच 'पुनश्च हरिः ॐ' या लेखांत जाहीरपणें दिलेली असल्यानें त्याबद्दल निराळी चर्चा करण्याचें कारण नाहीं. मात्र एवढें सुचवून ठेवणें अवश्य आहे कीं काकासाहेबांनीं या अवधींतीलहि फारच थोडे लेख छापण्यासाठीं निवडले व तेवढे या संग्रहांत प्रसिद्ध होत आहेत.

१९०० ते १९०२ या तीन वर्षांत काकासाहेबांचे बरेच महिने मुंबईच्या वास्तव्यांत गेले. त्यांची एल् एल्. बीची पहिली परीक्षा उतरलेली होती. ते पूर्ण एल्एल्. बी. नाहींत म्हणून १८९७ सालीं त्यांच्या ऐवजी एल्एल्. बी. म्हणून केळकरांना मराठ्याप्रमाणें केसरीचें संपादकत्व लाभलें. देशसेवेला कायद्याच्या ज्ञानाची जरूरी फार व त्या ज्ञानाला पदवीखेरीज लोकांत मोल नाहीं. या अनुभवानें काकासाहेबांनीं एल्एल्. बीची दुसरी परीक्षा उरकून पदवी मिळवावी असें टिळक वारंवार त्यांना आग्रहानें सुचवीत असत. पुण्यास केसरीच्या कामगिरींत राहून अभ्यास होणार नाहीं म्हणून टिळकांनीं त्यांना मुंबईस पाठवून दिले. केसरी बंद पडला किंवा कांहीं कारणानें सोडावा लागला तर कायद्याच्या पदवीनें पोट भरण्याची व्यवस्था करतां येईल असाहि एक पोटहेतु काकासाहेबांना मुंबईस पाठवितांना टिळकांच्या मनांत होता. काकासाहेब मुंबईला राहूं लागले; पण पुण्यास लागलेली लेखनाची संवय त्यांना मुंबईस स्वस्थपणें अभ्यास करूं देईना. त्यांनीं सुरू झालेल्या दक्षिण आफ्रिकेंतील ब्रिटिश–बोअर युद्धाचा बारकाईनें अभ्यास आरंभला. इंग्रजांच्या वर्चस्वाला जोराचे धक्के देऊन किंवा बारीक चिमटे काढून बेचैन करणारें

परराष्ट्रीय राजकारण काकासाहेब तक्षकाच्या अनिमिष जागृतीनें पहात असत. युद्धभूमीचे नकाशे पुढें ठेवून ब्रिटिश-बोअर फौजांनीं चालविलेल्या डावपेंचांच्या हालचाली व त्यांचे परिणाम यांचा काकासाहेबांनीं चांगला अभ्यास केला. या युद्धाची रोजची माहिती ते पुष्कळदां केसरीसाठीं लिहून पाठवीत असत व त्या कामीं त्यांचा पुष्कळसा वेळ खर्ची पडत असे. युद्ध संपल्यावर १९०२ सालीं त्यांनीं जूनच्या उत्तरार्धापासून आगस्ट अखेर-पर्यंत एकूण ९ लेख 'गनिमी काव्याची लढाई' असें नांव देऊन लिहिले. या लेखांचा समारोप आणखी एका लेखानें करावा अशी टिळकांची इच्छा होती. तसा लेख काकासाहेबांनीं लिहून तयार केला, परंतु टिळकांनीं तो लेख आपले विश्वासू कायदेपंडित स्नेही दाजी आबाजी खरे यांना दाख-विला. त्यांना त्या लेखांत राजद्रोहाच्या छटा सापडल्या म्हणून तो रद्द करावा लागला. टिळकांना छळणारा ताईमहाराजांचा खटला त्या दिवसांत ऐन रंगांत असल्यानें त्याच्या भरीला आणखी राजद्रोहाची घोरपड नको, तरी सुद्धां या लढाईच्या उलटसुलट तपशिलाची तात्त्विक चर्चा झाली पाहिजे, अशी टिळकांच्या चित्ताची उत्कटता असल्यानें त्यांनीं स्वतःच तसा लेख लिहिण्याचें ठरविलें, पण त्यांना इतर कामाच्या रगाड्यांत सवड गवसली नाहीं व त्या लेखाचा संकल्प जो मागें पडला तो उचित काळ निघून गेल्यावर कायमचाच मागें पडला. आज या गोष्टीचें महत्त्व टिळकांना ती लेखमाला किती आवडली होती, या दृष्टीनेंच आहे.

१९०३ पासून १९०५ पर्यंत काकासाहेब नेपाळांत राहिल्यामुळें केस-रींत त्यांचे लेख नसावेत हें सरळ आहे. १९०५ ते १९०७ अखेरपर्य-तच्या काळांतील त्यांचा एकहि लेख या संग्रहांत नाहीं. याचें कारण ते केसरींत लिहीत नव्हते असें नसून त्यांनीं या काळांतील आपल्या लेखांची

निवड केली नाहीं हें आहे. १९०७ सालीं सुरतेची कॉंग्रेस कशी व कोणी मोडली या संबंधाचा विस्तीर्ण लेख या संग्रहांत आहे. कॉंग्रेस मोडतांच टिळकांनीं काकासाहेबांना एकंदर परिस्थिति समजावून देऊन हा लेख लिहिण्यासाठीं पुण्यास रवाना केले व त्यांनीं हा लेख तयार करून छापला. त्या दिवसांचें ज्यांना स्मरण असणारांना या लेखानें महाराष्ट्रांत केवढी खळबळ उडवून दिली होती, हें निराळें सांगायला नको. सर्वत्र हाच लेख आधाराला घेऊन सुरतेबद्दल मवाळ पक्षाची रेवडी उडविणारे वाद चालत असत. पुढें काकासाहेबांनीं लिहिलेले सारे लेख सुरत प्रकरणांतील राष्ट्रीय पक्षाच्या लढाऊ धोरणाचें अनुसंधान राखूनच लिहिलेले आहेत हें वाचकांच्या लक्षांत येण्याला हरकत नाहीं. १९०८ च्या मध्यांत टिळक सरकारच्या रोषाला बळी पडले. त्यांना सहा वर्षांची शिक्षा ठोठावून सरकारानें त्यांची मंडालेस रवानगी केली.

यावेळीं केसरीचें संपादकत्व प्रत्यक्षपणें काकासाहेबांकडे आलें. तें सुमारें दीड वर्षच त्यांनीं मोठ्या खबरदारीच्या धडाडीने चालविलें. १८९७ सालीं टिळकांना शिक्षा झाली तेव्हां लोकांमध्यें राजकीय जागृति व संवेदना अगदींच कमी असल्यानें त्यांचा क्षोभ मनांतल्या मनांतच राहिला. १९०८ सालीं वरील दोन्ही गुण बरेच बळावले असल्यामुळें मुंबई शहरीं टिळकांच्या शिक्षेनिमित्त मजुरांनीं दंगे केले. काकासाहेबांच्या मननशील विचार प्रवृत्तीला हा एक चांगला विषय सांपडला व दंग्याचें वातावरण शांत झाल्यावर 'सर्वांपुढें मुंबईच कां?' या मथळ्याची लेखमाला त्यांनीं लिहिली. या लेखमालेनें 'गनिमी काव्याच्या लढाई' प्रमाणेंच लोकांना सहसा न उमगणाऱ्या विचारांचें दर्शन घडविलें. समाजांतील शेतकरी, कामगार, कारकून, व्यापारी इत्यादि भिन्न भिन्न विभागाच्या जीवनाची मीमांसा करून या

लेखमालेनें देशांतील राजकीय विचाराला नवें ज्ञान पुरविलें. तिकडे युरोपांत मुंबईतल्या दंग्याची बातमी ऐकून रशियांत सोव्हिएट राज्यव्यवस्था अंमलांत आणणाऱ्या लेनिननें टिळकांच्या पुढारीपणाचें कौतुक गाईलें, असें म्हणतात. हे दंगे नुसत्या माथेफिरूपणाचे द्योतक नसून त्यांच्यामागें हिंदी राजकीय जीवनाच्या उत्क्रांतीचें रहस्य आहे याचा ऊहापोह काकासाहेबांनीं केला असून त्यांतील अनेक प्रमेयें आजच्या दिवसांत सुद्धां ताजीं वाटण्यासारखीं आहेत.

ही लेखमाला विशेष गाजल्यामुळें तिचा थोडा विस्तारानें निर्देश केला आहे. या लेखमालेइतकेच वाचनीय लेख १९०८ सालांतील टिळकांच्या खटल्याविषयींचे आहेत. या लेखांत ज्यावरून टिळकांनीं राजद्रोह केल्याचें न्यायाधीशानें ज्यूरीच्या निकालावर मान्य केलें ते लेखहि धरलेले आहेत. त्यांतल्या त्यांत ' टिळक आणि दावर ' हा लेख येथें मुद्दाम वाचकांचें लक्ष वळविण्याजोगा आहे. १८९७ सालीं काकासाहेबांना टिळकांचें चरित्र आणि कर्तृत्व याबद्दल पराकाष्ठेचा आदर असला तरी प्रत्यक्ष साहचर्याचा गाढ परिचय नव्हता. १९०८ मध्यें ही उणीव भरून निघालेली होती. शिवाय आतां सहा वर्षांची हद्दपारीची शिक्षा भोगून टिळक परत येतीलच असा भरंवसा नव्हता. यामुळें टिळकांच्या तपस्वी चरित्र्याचें व देशोद्धाराच्या निस्सीम तळमळीनें अविश्रांत चाललेल्या उग्र तेजस्वी कर्तृत्वाचें काकासाहेबांनीं ' टिळक आणि दावर ' या लेखांत जें विवेचन केलें आहे, तें टिळकांच्या थोरवीचा अभ्यास करूं इच्छिणारांना सदैव मार्गदर्शक होईल, अशा भरीव आणि पल्लेदार विचारांनीं खचलेलें आहे. टिळकांच्या मागें त्यांचीं कार्यें जोमानें चालू रहावींत म्हणून काकासाहेबांनीं ज्यावर आपला पहिला लेख लिहिला तो राष्ट्रीय उत्सवांचा विषयसुद्धां या संपादकीय काळांत महाराष्ट्रीय जनतेसमोर त्यांनीं घोळविला आहे. प्रस्तुत लेखसंग्रहांत

शेवटचा लेख 'एका वर्षांत पारडें फिरलें' हा असून त्याच्या शेवटीं असलेला म. गांधीनीं आत्मबलाधिष्ठित चळवळीसंबंधीं केलेल्या उपदेशाचा पुरस्कार अतिशय सूचक आहे.

१९१० सालच्या प्रारंभीं मुद्रणस्वातंत्र्य हिरावून घेण्याच्या कारवाईचा सरकारी मनसुबा जाहीर होतांच केळकरांनीं आपल्या वडीलकीच्या अधिकारांत काकासाहेबांस न विचारतां त्यांचें संपादकत्व आपल्या हातीं घेतलें. त्यांची जाज्वल्य लेखणी मुस्कटदाबीच्या नव्या युगांत केसरीला केव्हां गोत्यांत आणील याचा नियम नाहीं, असल्या कसल्याशा भावनेनें केळकरांनीं काकासाहेबांना संपादकीय आसनावरून उठविल्यावर पांच हजाराच्या जमानतीचें गण्डान्तर केळकरांच्या कारकीर्दीत केसरीवर येऊन काकासाहेबांना दूर करण्यामागली भावना आपोआपच खोटी ठरली. १९०८ मध्यें टिळकांच्या खटल्यानिमित्त केळकरांनीं मराठयांत लिहिलेल्या लेखावरून केळकरांना कोर्टाची बेअब्रू केल्याच्या गुन्ह्याबद्दल प्रायश्चित्त घ्यावें लागलें ही आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवल्यास, काकासाहेबांना केसरी पारखा व्हावा अशा केळकरांनीं उत्पन्न केलेल्या परिस्थितीमागील भावनेचें बेगड उडून जाण्याला उशीर लागत नाहीं.

काकासाहेबांच्या लेखांचा हा स्थूल आढावा येथें सादर केला आहे. मर्मज्ञ वाचकांना त्यांचा अभ्यास करण्याजोगे अनेक विषय त्यांत आढळतील. काकासाहेबांचा व्यासंग, मार्मिक अवलोकन, त्यांचें राजकीय तत्त्वज्ञान, त्यांची भाषाशैली, काकासाहेब व टिळक यांच्यांतील साम्य व अंतर वगैरे कित्येक गोष्टी एकत्र घेऊन विशद करण्यासारख्या आहेत. परंतु काकासाहेबांच्या लेखांचा दुसरा खंड प्रसिद्ध होईपर्यंत या बाबतींत वाट पहाण्याशिवाय गत्यंतर नाहीं.

—न. र. फाटक

# अनुक्रमणिका


| लेखसंख्या | | | पृष्ठसंख्या |
|---|---|---|---|
| १ | ब्राम्हण आणि त्यांची विद्या | लेखांक १ ला | १ |
| २ | ,, ,, ,, ,, | लेखांक २ रा | १९ |
| ३ | ,, ,, ,, ,, | लेखांक ३ रा | ४० |
| ४ | ,, ,, ,, ,, | लेखांक ४ था | ५६ |
| ५ | गौतम बुद्ध, | लेखांक १ ला | ७३ |
| ६ | ,, ,, | लेखांक २ रा | ९२ |
| ७ | ,, ,, | लेखांक ३ रा | १०७ |
| ८ | केसरींत प्रवेश व लो. टिळकांचें शिष्यत्व | | १२८ |
| ९ | राष्ट्रीय महोत्सवांची आवश्यकता | | १३२ |
| १० | राष्ट्रीय महोत्सवांचे वेळीं सुशिक्षितांनीं काय केलें पाहिजे | | १४० |
| ११ | लोकमान्य टिळकांवरील ९७ सालच्या खटल्यांचे लेख | | १४७ |
| १२ | प्रजापक्षाची सांप्रतची स्थिति | | १५७ |
| १३ | प्रजापक्षानें अधिक जोरानें पुढें पाऊल टाकलें पाहिजे | | १६४ |
| १४ | राष्ट्रीय सभा यशस्वी कशानें होणार | | १७३ |
| १५ | कायदा आणि न्याय | | १७९ |
| १६ | सरहद्दीवरील लष्करी धोरण | | १८५ |
| १७ | विभूति पूजा | | १९४ |
| १८ | श्रीशिवाजी महोत्सव | | २०१ |
| १९ | हिंदुस्थानचे नवीन गव्हर्नर जनरल ना. मि. कर्झन | लेखांक १ ला | २११ |
| २० | ,, ,, ,, ,, | लेखांक २ रा | २१९ |
| २१ | ,, ,, ,, ,, | लेखांक ३ रा | २२९ |

| | | |
|---|---|---|
| २२ | मद्रासची राष्ट्रीय सभा | २३८ |
| २३ | लॉर्ड कर्झन यांचीं भाषणें | २४४ |
| २४ | ज्युबिलीच्या खुनांची पुरवणी: द्रविड बंधूंचे खून | २५२ |
| २५ | बेमालूम सांधा जोडणारे खाडिलकर | २६४ |
| २६ | गनिमी काव्याची लढाई लेखांक १ ला | २६५ |
| २७ | ,, ,, ,, लेखांक २ रा | २७२ |
| २८ | ,, ,, ,, लेखांक ३ रा | २८१ |
| २९ | ,, ,, ,, लेखांक ४ था | २८९ |
| ३० | ,, ,, ,, लेखांक ५ वा | २९८ |
| ३१ | ,, ,, ,, लेखांक ६ वा | ३०७ |
| ३२ | ,, ,, ,, लेखांक ७ वा | ३१५ |
| ३३ | ,, ,, ,, लेखांक ८ वा | ३२३ |
| ३४ | ,, ,, ,, लेखांक ९ वा | ३३२ |
| ३५ | सुरतची राष्ट्रीय सभा | ३४२ |
| ३६ | धुळ्याची प्रांतिक सभा व मवाळांचें क्रीड | ३८२ |
| | लो. टिळकांवरील १९०८ सालच्या खटल्याचे लेख | |
| ३७ | दुहेरी इषारा | ३९० |
| ३८ | बाँब गोळ्याचा खरा अर्थ | ४०० |
| ३९ | बाँब गोळ्याचें रहस्य | ४०९ |
| ४० | हे उपाय टिकाऊ नाहींत | ४१७ |
| ४१ | पत्रकर्त्यांच्या स्फुट सूचना | ४२५ |
| ४२ | रा. टिळक यांजवरील खटला | ४२७ |
| ४३ | टिळक आणि दावर | ४३७ |
| ४४ | श्रीगजानन महोत्सव | ४४७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४५ | सर्वांत पुढें मुंबईच कां | लेखांक १ ला | ४५६ |
| ४६ | ,, ,, ,, ,, | लेखांक २ रा | ४६३ |
| ४७ | ,, ,, ,, ,, | लेखांक ३ रा | ४७२ |
| ४८ | ,, ,, ,, ,, | लेखांक ४ था | ४७८ |
| ४९ | ,, ,, ,, ,, | लेखांक ५ वा | ४८५ |
| ५० | शिष्टाई लाथाडली गेली | | ४९२ |
| ५१ | नागपूरची राष्ट्रीय सभा | | ५०५ |
| ५२ | नागपूर कीं मद्रास | | ५१६ |
| ५३ | सुराराध्य आणि दुराराध्य | | ५२८ |
| ५४ | आम्हाला पार्लमेंट पाहिजे | | ५३८ |
| ५५ | तरी हें भयंकरच | | ५४८ |
| ५६ | निमकहराम सरकारी नोकर | | ५५५ |
| ५७ | श्रीगणपति–महोत्सव | | ५६३ |
| ५८ | तुम्ही काय करणार तें सांगा | | ५७२ |
| ५९ | दे. भ. शिवराम महादेव परांजपे | | ५८२ |
| ६० | मराठी भाषेचा उत्सव | | ५९२ |
| ६१ | वर्षाचे अंत पारडें फिरलें | | ६०० |

नगर वाचनाल
ता. ....
सातारा.

॥ श्री ॥

# खाडिलकरांचा लेखसंग्रह

## * ब्राह्मण आणि त्यांची विद्या (परीक्षण)

अनेकचित्तविभ्रान्ता मोहजालसमावृताः

प्रसक्ताः कामभोगेषु पतंति नरकेऽशुचौ ॥

सर्वारंभाः हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ।—भगवद्गीता

महाराष्ट्राच्या अलीकडील दहा पंधरा वर्षांचा इतिहास पाहिला असतां, विद्वान व बुद्धिमान ह्मणून नांवाजलेले, उद्योगानें व दृढनिश्चयानें प्रसिद्धीस आलेले, स्वार्थत्याग करून देशहितास वाहून घेणारे—अशा लोकांपैकीं पुष्कळ लोक अकालीं मृत्यूस बळी पडले, असें दिसून येईल. "आमचे लोक अकालीं मरतात कां ?" हा प्रश्न पुढारी मंडळीच्या मनांत घोळूं लागून आज पांच सहा वर्षें होऊन गेलीं; पण गेल्या तीन चार वर्षांत मृत्यूनें केलेल्या भयंकर हानीमुळें, गेल्या दोन वर्षांत ह्या प्रश्नाचा जारीनें खल सुरू झाला. रोगाचीं भयंकर चिन्हें दिसून मनुष्य जेव्हां आंथरुणास खिळून रहातो, तेव्हांच त्याच्या मनांत शरीराची एखाद्या वैद्याकडून चांगली तपासणी करून घ्यावी असें येतें, तो आपल्या पूर्वीच्या वर्तनाचें नीट मनन करूं लागतो, व ह्या स्थितीला येऊन पोंचण्यापूर्वींच कांहीं गोष्टींकडे ध्यान पोंचविलें असतें तर

* विविध ज्ञान विस्तार—जानेवारी—फेब्रुवारी १८९६.

बरें झालें असतें; असा त्याला पश्चात्ताप होतो. जी गोष्ट व्यक्तीस लागू पडते तीच गोष्ट समाजास किंवा राष्ट्रास, थोडासा फेरबदल केला असतां, लागू पडते. आमच्यांतील उमदे उमदे लोक आमच्या देखत आमच्यामधून ओढून नेल्यावर, त्यांच्या मृत्यूनें झालेली हानि भरून काढितां येत नाहीं असें स्पष्ट दिसूं लागल्यामुळें मेलेल्यांचा शोक करण्याच्या प्रसंगीं त्यांच्या मरणाच्या कारणांचें विवेचन करण्याचें आम्हांस सुचूं लागलें आहे. डिग्री घेण्यास आलेल्या उमेदवारांस उपदेशपर दोन शब्द सांगण्याचे वेळीं, तेलंगप्रभृति गतलोकांबद्दल शोक प्रदर्शित करून डॉ. भांडारकर यांनीं "हल्लींच्या शारीरिक ऱ्हासाचीं कारणें" ह्या विषयाच्या विवेचनास सुरुवात केली. आमच्याच शेजारचा पार्शी आयुष्यांतील चैन ज्यास्ती भोगतो, त्याची शरीराची यष्टि आमच्याहून बळकट असते, व पूर्व वयांतील कर्तबगारीचीं फळें चाखण्यास तो जास्ती दिवस जगतो–ह्या एका उदाहरणावरून देखील बालविवाहासारख्या चालींचा आमच्यावर केवढा भयंकर उपकार आहे हें त्यांनीं श्रोतृसमाजाच्या मनावर चांगलें ठसविलें. न्यायमूर्ति रानडे यांनीं तोच वाद पुढें चालविला; आणि पुष्कळ आंकडे गोळा करून, मराठी डिग्रीवाला पार्शी किंवा गुजराथी ग्रॅज्युएटपेक्षां कमी जगत नाहीं (सर्व सारखेच अकालीं मरतात!) असें सिद्ध करून ब्राह्मण विद्यार्थ्यांच्या गरिबीचें कींव येईलसें वर्णन त्यांनी केलें, व विद्यार्जनाच्या कामीं ब्राह्मण विद्यार्थी दाखवत असलेल्या हट्टाची व काटकपणाची त्यांनीं तारीफहि केली. ह्या दोन वीरमहावीरांचे ऐन समरंगणांत दोन हात झाल्यावर, ज्या त्या वर्तमानपत्रांत, ज्या त्या व्याख्यानमालेंत, रानडे व डॉ. भांडारकर ह्यांच्या उद्‌गारांचे कमी ज्यास्ती जोराचे प्रतिध्वनि उमटून, चोहोंकडे जरासें सामसूम होण्याचीं चिन्हें दिसत होतीं. इतक्यांत प्रि. गोळे "आम्ही एक नवीनच शक्कल काढली आहे" असें सांगत लोकांपुढें आले; त्यांची नवी कल्पना "ब्राह्मण आणि त्यांची विद्या" ह्या

पुस्तकांत त्यांनीं विस्तारानें वर्णिलेली आहे. ह्या पुस्तकांत वर्णन केलेलीं बहुतेक मतें अत्यंत महत्त्वाचीं असल्यामुळें, या पुस्तकाचें परीक्षण आमच्या नेहमींच्या रीतीपेक्षां विशेष विस्तारानें करण्याचें आम्ही योजिलें आहे.

"हत्ती" "हत्ती" हा शब्द वारंवार ऐकिल्यामुळें "हा कसल्या प्रकारचा प्राणि आहे" हें जाणण्याची कांहीं आंधळयांच्या मनांत साहजिक स्फूर्ति झाली. हत्ती चाचपटून पहाण्यास त्यांना परवानगी मिळाली. पाया-जवळचा आंधळा प्रथमतः ओरडून म्हणाला—"अहो, हत्ती खांबासारखा असतो;" दांताजवळच्यानें पहिल्यास खोडून काढलें व "हत्ती ढोलकें बड-विण्याच्या काठीसारखाच पण तीहून फार मोठा" असें त्यानें सिद्ध केलें. पाठीवर ज्याचा हात पडला त्यानें पहिल्या दोघांची खरपूस निर्भत्सना केली; व ज्ञान कसें मिळवावें, तर्क कसें बांधावे, ह्यावर एक बरेंचसें लांब व्याख्यान झोडलें; अखेरीस तो म्हणाला "मूर्ख बेट्यानों, हत्ती कसा असतो हें ठर-विण्याकरितां मीं पुष्कळ जागीं स्वतः चाचपटून पाहिलें आहे. मीं केलेल्या प्रयोगावरून व अनुभवावरून मी खात्रीनें सांगतो कीं, हत्ती हा प्राणी सपाट आहे." प्रि. गोळे यांचें पुस्तक सबंध वाचून झाल्यावर तिसऱ्या आंधळ्याची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं.

"विद्याव्यासंगी" सर्व जातींच्या शरीराचा ऱ्हास होत चालला आहे, ही गोष्ट सर्व पक्षांस संमत आहे. हल्लींच्या विद्वानांच्या कोमेजलेल्या शरीरांचें वर्णन ग्रंथकारानें आपल्या नेहमींच्या चटकदार रीतीनें केलें असल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करून "ऱ्हासाच्या कारणांचें" ग्रंथकारानें जें पहिल्या भागांत परीक्षण केलें आहे त्याचा विचार करूं.

## "वर वर" दिसणारीं चार कारणें

प्रि. साहेबांच्या मतें ऱ्हासाचीं "वर वर" दिसणारीं एकंदर कारणें चार आहेत. पहिलें कारण "दारिद्र्य." ह्या मताच्या अभिमान्यांत केवळ राज-

कीय हक्काकरितां भांडणाऱ्या लोकांपैकीं पुष्कळांची गणना करितां येईल. विद्याखात्यानेंहि याच मताचा स्वीकार केला आहे. साधारणतः लोकांना प्रिय झालेल्या मतांपैकींच हें एक आहे. दुसरें कारण व्यायामाचा अभाव. ह्या मताचे बोलके अभिमानी डॉक्टर लोक आहेत. तिसरें कारण बालविवाहादि रूढि. सुधारक वर्ग ह्या मतानें व्यापलेला आहे. चौथें कारण—अभ्यास फार वाढला. म्हातारीं कोतारीं अरण्यरुदिताप्रमाणें आज कितीएक दिवस ही गोष्ट सांगत आहेत. प्रि. साहेबांच्या मतें हीं सर्व भ्रामक मतें आहेत व खरें कारण चौथ्या कारणांत लपून राहिलेलें एक गुह्य होय.

( १ ) हल्लींच्या शारीरिक ऱ्हासाचें कारण दारिद्र्य आहे काय ?—आमच्या मतें " दारिद्र्य " महत्वाच्या कारणांपैकीं एक होय. दारिद्र्य हें कारण नव्हे असें प्रतिपादन करतांना प्रिन्सिपालसाहेब म्हणतात कीं " इतर हिंदु जातींत हा ऱ्हास फारसा दिसत नाहीं." सामान्य सुखवस्तु लोकांच्या मुलांपेक्षां मधुकरी मागणारीं व वारानें जेवणारीं मुलें अधिक सशक्त व ज्यास्ती वाढलेली असतात; चांगल्या सुखवस्तु लोकांचीं हीं मुलें खिरटीं व कमी वाढीचीं आहेत.

इतर जातींत शक्तीचा ऱ्हास झाला नाहीं हें म्हणणें साधार नाहीं. पिढयानपिढया ज्यांच्या घरीं सावकारी चालत आली आहे त्यांच्या घरीं शोध घेतला असतां असें समजेल कीं, पांच सात हजारांचे तोडे सहज नेणारे त्यांच्या पेढीवरचे पूर्वीचे नोकर आतां उरले नाहींत, नुसत्या एक ठिकोरण्याच्या जिवावर रात्रीं अपरात्रीं एका गांवाहून दुसऱ्या गांवास हजारो रुपयांच्या थैल्या पोंचविणारे दमदार गडी आतां त्यांच्यापाशीं शिल्लक नाहींत. उसाचीं पेरीं लीलेनें उपटून काढणारे असंख्यात शेतकरी आतां कोठें आहेत ? चावरी मोट सहज ओढणारे मोटकरी आतां कोणीकडे पळून गेले ? ज्यांच्या न्ह्यारीला भाकऱ्यांच्या राशींच्या राशी फन्ना व्हाव्या ते शेतांत खपणारे आतां कां दिसेनातसे झाले ? पोवाडयांत वर्णन केल्याप्रमाणें तीन चार इसमांच्या

टुमल्यावर " एकला "चे हात मारणारे आतां कां दृष्टीस पडत नाहींत ? जे चार भाऊ मळ्यांत खपायला गेले असतां त्यांना खायाला नेण्याच्या दशम्यांचा व लोण्याचा भार सोसण्यास एक स्वतंत्र धष्टपुष्ट माकणीचा रेडा बाळगावा लागे, त्यांचें वर्णन आतांशा कां ऐकूं येईनासें झालें ? साठ साठ सत्तर सत्तर मैलांची मजल करून पत्रें पोंचविणारे आतां कां सांपडतनासे झाले ? पंढरीची वारी ज्यांनीं पूर्वी निव्वळ पायीं करावी त्यांपैकीं कित्येकांना आतां वाहनाची कां आवश्यकता वाटावी ? पहाणारास ह्या सर्व गोष्टी दिसणाऱ्या आहेत.

सैन्याची भरती करणाऱ्या कामगारांना विचारा.—लष्करी पेशाचीं म्हणून नांवाजलेलीं आमच्या इकडील घराणीं कोठच्या कोठें गेलीं ह्याचा पत्ताच नाहीं; इकडील जातींतून लष्करची भरती करण्याची अत्यंत मारामार पडते. ही स्थिति होण्याचीं दोन कारणें पुढें येतात; एक लष्करास लागणाऱ्या मापास उतरणारे लोक कमी कमी होत चालले, व जे आहेत त्यांपैकीं पुष्कळ लष्करांत शिरण्यास नाखुष. पहिल्यावरून शारीरिक ऱ्हास इतर जातींतहि आहे हें सिद्ध होतें; दुसऱ्यावरून, शौर्य, साहस हे गुण नुसत्या शरीराच्या धिप्पाडपणावरच केवळ अवलंबून नसतात असें स्पष्ट होतें. सूक्ष्म अवलोकन केलें असतां असें दिसून येईल कीं, मोलमजुरी करणाऱ्यांमध्यें केवळ शेलकी मंडळी व सुखवस्तु स्वतः शेतांत मळ्यांत खपणारे शेतकरी एवढेच काय ते ब्राह्मणांहून विशेष दांडगे दिसतात. बाकीची मंडळी ब्राह्मणांप्रमाणेंच आखुड उंचीची व आकुंचित विस्ताराची दिसते. आमचें म्हणणें असें आहे कीं, शारीरिक ऱ्हास सर्व राष्ट्रास सारखा लागू आहे, मात्र ब्राह्मणांत तो जरा विशेष दृष्टीस पडतो. तेव्हां ऱ्हासाच्या कारणांपैकीं कांहीं कारणें अशीं असलीं पाहिजेत कीं, तीं सर्वांस सारख्या रीतीनें लागू पडतील; व कांहीं अशीं असलीं पाहिजेत कीं, ज्या विद्याव्यासंगी जातींमध्यें हा प्रकार विशेष दृष्टीस पडतो, त्या जातींनाच तीं केवळ लागू पडण्यासारखीं असावींत.

आम्ही सर्वच शक्तीनें क्षीण क्षीण कां होऊं लागलों आहों ह्याचा प्रथम विचार केला पाहिजे. शरीराची चांगली पुष्टी होण्यास तीन गोष्टींचा योग जुळून आला पाहिजे. ( १ ) मनुष्यास कसलीहि काळजी किंवा "विवंचना" उपयोगाची नाहीं, शरीराला पोसणाऱ्या जिनसांचा विपुल सांठा पाहिजे; ( २ ) योग्य व्यायाम पाहिजे; व ( ३ ) शरीर सुदृढ ठेवणारी मानसिक स्थिति पाहिजे; म्हणजे मनांत कांहीं गोष्टी नकोत, व कांहीं अवश्य असल्या पाहिजेत.

## सुखवस्तु लोकांची विवंचना

सामान्य सुखवस्तु लोकांना काळजी किंवा विवंचना किती असते हें प्रि. साहेबांस अवगत नाहींसें दिसतें. मुलाच्या कॉलेजच्या शिक्षणाकरितां हजार दीड हजार रुपये खर्च करण्याची वेळ आली कीं, ह्या वर्गांतील लोकांच्या सुरळीत चालणाऱ्या संसाराच्या गाड्याला किती ठिकाणीं अडथळे येतात !– किती हालअपेष्टा सोसाव्या लागतात !–किती अपमान निमूटपणें गिळावे लागतात ! मुलगा दुसऱ्या तिसऱ्या इयत्तेंत आला कीं पुढील यातनांच्या वेदना त्यांना होऊं लागतात. आपली विपत्ति व हाल होणार, मुलाची पुढील स्थिति कशी होते कोणाला ठाऊक, बाळ्याच्या नशिबीं आमच्या इतपत तरी अन्नानें दिवस काढण्याचें आहे किंवा नाहीं कोण जाणें–अशा प्रकारचे उद्वेगजनक उद्गार घरोघर निघतांना ऐकूं येतील. मुलगा चवथ्या पांचव्या इयत्तेंत आल्यावर सामान्यपणें त्याला घरच्या माणसांच्या उद्गारांचा अर्थ समजूं लागतो. ही स्थिति विद्यार्थ्यांस प्राप्त झाली म्हणजे, व्यसनाच्या मार्गाला हळू हळू लागणारी मंडळी वगळून, बाकी सर्वांना अभ्यासाची आंच लागूं लागते. जे पालनकर्ते शारीरिक व मानसिक हाल सोसून मुलाच्या भावी सुखाकरितां पैशाचा पुरवठा करण्यास तयार होतात, त्यांना–आपल्या पैशाचें चीज होत आहे, मुलगा अभ्यास करून विद्यार्जन झपाट्यानें करीत आहे–

इतकें कानांनीं ऐकणें व डोळ्यांनीं पाहणें एवढें तरी समाधान नको काय ? अभ्यास करण्यांत आपण बिलकूल कसूर करीत नाहीं एवढें तरी निदान पालकास दाखविण्याचा बोजा विद्यार्थ्यांच्या शिरावर बसत नाहीं काय ? प्रिलिमिनरीच्या वेळीं परीक्षेस जाण्याची परवानगी दिली नाहीं म्हणजे विद्यार्थ्यास डोकें मारल्यासारखें होतें ह्यांतलें बीज तरी हेंच आहे. कॉलेजांतले गुरुजी रागें भरतील ह्याची विशेष फिकीर विद्यार्थ्यास नसते; आपल्या बरोबरीचे पुढें गेले ह्याचेंहि त्याला तितकें वाईट वाटत नाहीं; आपल्या आयुष्यांतील भावी कर्तबगारीच्या व सुखाच्या गोष्टी एक वर्षानें पुढें ढकलल्या गेल्या ह्याचीहि त्याला तितकी पर्वा नसते; त्याच्या जिवाला ज्या एका गोष्टीनें धक्का बसतो, त्याच्या अंतःकरणाला जी एक गोष्ट लागून राहते, जी गोष्ट टळली तर बरी असें त्याला मनापासून वाटत असतें, ती ही कीं— कालेजांतल्या परीक्षेंत माघार घेऊन आल्यावर पालकाची भेट होण्याची वेळ येऊं नये. कालेजांत मुलाला खर्चाला पैसे पाठवून देण्याची ज्यांच्या मनाला दरकार वाटत नाहीं, पुढें पीक मुलाला तरी निदान कापतां यावें म्हणून हें भांडवल आहे अशी कल्पना मनीआर्डर करतांना ज्यांच्या मनाला शिवत देखील नाहीं, मुलानें पंचवीस मागितले काय पन्नास मागितले काय कोण फिकीर करतो अशी ज्यांची सुस्थिति आहे, असे लोक आमच्यांत फार थोडके उरले आहेत. कोणत्या तरी वक्तृत्वसमारंभाचे वेळीं भाषण करून तीस चाळीस रुपये बक्षीस मिळवावें, वीस रुपये फी भरून पंधरा वीस रुपयांत मुंबईचा परीक्षेचा खर्च कसाबसा आटपून घ्यावा, अशा हालअपेष्टेनें विवंचनेच्या व काळजीच्या जाळ्यांत जखडून गेलेल्या विद्यार्थ्यांचीं उदाहरणें पहावयाचीं असल्यास प्रि. साहेबांस फार दूरवर नजर फेंकण्यास नलगे; त्यांच्या सभोंवतालच्या शिक्षकवर्गांत शोध केला असतां सर्व स्पष्ट दिसून येणार आहे.

केवळ विद्येकरितां विद्या शिकणारे विद्यार्थी अत्यन्त विरळा ! नाहींतर सगळेच भांडारकर व रानडे झाले असते. निवळ विद्येकरितांच, दुसरा

कोणचाहि हेतु मनांत न धरतां, विद्या शिकण्यास पाठविणारा पालकहि विरळाच. विद्या पैदा करतांना हाडाचीं काडें इतकीं करावीं लागूनहि पुढें त्याची विशेष चीज नाहीं, मानमरातब नाहीं, द्रव्यप्राप्ति नाहीं, हें पाहून पालकां-बरोबर विद्यार्थ्यांचींहि मनें विरघळून जावींत, त्यांच्या शरीरांतला उल्हास व जोम निर्जीव व्हावा हें साहजिकच आहे. बि. ए. पास झाल्यानंतरच्या स्थितीपेक्षां पास होण्यापूर्वीचीच स्थिति बरी, असें हल्लीं डिग्रीवाल्यांस वाटूं लागलें आहे. विद्यार्थीदशेंत कल्पनातरंगांनीं रेखलेल्या पुढील आयुष्याच्या सुंदर चित्रांपेक्षां संसाराचें खरें स्वरूप अत्यंत हिडिस व ओकारी आणणारें असतें—हें तत्त्व ते विसरतात म्हणून त्यांची अशी स्थिति होते असें म्हणणें वस्तुस्थितीस धरून होणार नाहीं. " पुढें काय करावें " हा प्रश्न त्यांचेपुढें दत्त म्हणून उभा राहतो. ग्रॅज्युएटांना उपदेशाचीं व्याख्यानें झोडणारास सल्ला-मसलत विचारावयास गेलें असतां " हा प्रश्न ज्याचा त्यानेंच सोडविला पाहिजे " असें उत्तर येतें. आणि तेंहि खरेंच; चोहोंकडूनच विपत्ति आली आहे; पाश्चिमात्य सुधारणेंत असें ठरलें आहे कीं, दारिद्र्याइतका लोकांना नाकें मुरडायाला लावणारा दुर्गंधि पदार्थ अवघ्या सृष्टींत मिळायाचा नाहीं.

## पौष्टिक अन्नाचा अभाव

पिकलेल्या केंसाच्या मंडळीला प्रश्न केला असतां ते असें सांगतात कीं, त्यांच्या लहानपणीं दूधदुभतें अत्यंत विपुल होतें. कित्येक खेडयापाडयांत हल्लींच्या दुधाच्या धारणीहून त्या वेळची धारण सोळापट सवंग होती. तेथील म्हाताऱ्या गवळी मंडळीस ह्या स्थित्यंतराचें कारण विचारतां खालील उत्तरें मिळतात. ( १ ) गायरानें असल्यामुळें ज्याच्या घरीं शेतभात नाहीं असाहि मनुष्य एखादी गाय म्हैस बाळगूं शके. ( २ ) शेतकीचा घरीं प्रचंड आटाळा असल्यामुळें शेतकीस अवश्य लागणाऱ्या जनावरांच्या मोठ्या समुदायांत गाई म्हशींचें लहानसें खिल्लार खेडयापाडयांत एका दोघांच्या घरीं तरी असे.

केवळ मोलमजुरी करणारांचीहि येथें सोय होई. आतां दहा पंधरा खेडीं फिरलें असतांहि असा घरंदाज मनुष्य सांपडणें विरळा. ( ३ ) मोठमोठे जमीनदार नाहींतसे झाले. डागांच्या लहान लहान चिरफळ्या पडल्या.चांगल्या पगारवाल्यासहि एखादें दुभतें जनावर बाळगणें जाचूं लागलें. ( ४ ) आगगाडी बघा घरांत शिरली.

शेवटचें कारण योग्य आहे कीं अयोग्य आहे हें अर्थशास्त्र न जाणणाऱ्या गवळयास कोठून माहीत असणार? बाकीचीं त्यानें दिलेलीं कारणें वस्तुस्थितीस धरून आहेत हें कोणासहि कबूल केलेंच पाहिजे.

इंग्रजी तिसऱ्या चौथ्या इयत्तेपर्यंतच्या मुलांना, पुणें मुंबईशिवाय करून, इतर ठिकाणीं अभ्यासाचा इतका बोजा वाटत नाहीं. बोजा अवजड वाटावयाला लावणारी विवंचना शहरांतल्याप्रमाणें इतर ठिकाणीं ह्या मुलांना नसते. शहरांत घरीं बाजारीं, मधल्या सुटींत, स्वप्नांत देखील अभ्यास भरला असल्यामुळें अनुकरणाच्या योगानें खालच्या इयत्तेंतील मुलेंहि विशेष अभ्यासी असतात. इतर ठिकाणीं ही गोष्ट नसते व पुढें वर्णन करावयाच्या पुष्कळ गोष्टी नसतात. एवढयाच कारणामुळें इतर ठिकाणांहून आलेलीं मुलें शहरच्या मुलांपेक्षां ज्यास्ती सशक्त असतात. पुणें, मुंबई व विद्येच्या कामात ह्या शहरांचा पुरा कित्ता उचलूं पहाणारीं दुसरीं एक दोन मोठीं शहरें हीं वजा करून बाकीच्या ठिकाणचीं हायस्कूलें धुंडलीं असतां असें आढळून येईल कीं खालच्या इयत्तेंतील मुलें पुष्कळ खेळतात; उडया मारतात, नाचतात, बागडतात; पण पौष्टिक अन्नाच्या अभावामुळें त्यांचीं शरीरें बरोबर पोसलेलीं नसतात.

हल्लीं मंडळींना दूध पचेनासें झालें आहे; कारण लहानपणापासून दूध पिण्याची सवयच नाहीं. पूर्वी घरच्या गाई म्हशींचें घागरीच्या घागरी दूध कसें निघत असे, सर्वांच्या मध्यें परातभर ठेवलेली साय घरची तरुण मंडळी

तीन प्रहरच्या फराळाच्या वेळीं कशी हां हां म्हणतां संपवीत असे, वगैरे गोष्टींचें उद्विग्न मनानें मातोश्रीच्या तोंडानें वर्णन ऐकत, गतवैभवाचें स्मरण होऊन डोळ्यांत आलेले अश्रु मुलास दिसूं नयेत म्हणून ते चोरून पुसून टाकण्यांत एक हात गुतल्यामुळेंच कीं काय एकाकी दुसऱ्या कांपणाऱ्या हातानें माउलीनें पुढें केलेलें ल्हाईपिठाचें पातळ पेय, सबंध दोन प्रहर उन्हातान्हांत खेळण्यांत घालविल्यावर, पिण्याचें बऱ्याच ब्राह्मण मुलांच्या नशिबीं येतें ! मग, झोंपेची वेळ शिवाय करून बाकी सर्व वेळ चरत सुटणाऱ्या गोऱ्या मुलांच्या शक्तीशीं यांची व्यर्थ तुलना कां करावी ?

पुण्याच्या तालमी पाहूं लागल्यास हीच स्थिति दृष्टीस पडते. तालमींतील पूर्वीचा जोम कमी झाला आहे. बऱ्याच ठिकाणच्या तालमी मोडत आल्या आहेत; ब्राह्मण लोकांचें अंग कमी झालें इतकेंच नव्हे तर बाकीच्याहि जाती मागेंच पाऊल घेऊं लागल्या आहेत. तालीमबाजीचा षोक मिरविण्याकरितां गिवडी महाग करणाऱ्या हिंदु मंडळीपैकीं कितीएकांचीं तरी शरीरें थोंदिल झालेलीं दिसतात व मनें पक्कीं पोंचा आल्यासारखीं दिसतात. पुण्याच्या दंग्याच्या वेळीं एका विशेष अपमानकारक प्रसंगीं पुण्याच्या तालीमबाजांच्या पोकळ कर्तृत्वाची साक्ष सर्व जगाला पोंचली आहे. वाटेनें जाणाऱ्या दुबळ्या मुलाची हे टोपी उडवतील किंवा एखाद्या बाईची थट्टामस्करी करून पैलवानी मिरवतील. पण प्रसंग पार पाडून नेण्याची या लोकांत कर्तबगारी नाहीं व शरीरसामर्थ्यहि उरलें नाहीं.

ज्यांच्या घरीं लक्ष्मी पाणी भरते आहे ती सरदार मंडळी; तो जाहागीरदारांचा समूह; तो इनामदार, देसाई, देशपांडे ह्यांचा जमाव; रुपये हातांत खेळून खेळून काळेकुट्ट हात धुतां धुतां ज्यांची पुरेवाट होते ते सावकार, ते दुकानदार, ते व्यापारी; स्वतःच्या अंगांत शक्ति नाहीं म्हणूनच कीं काय शिपायाकडून पगारांचीं ओझींच्या ओझीं घरीं आणणारे बडे नोकर—ह्या

सर्वांचीहि संतति कमी कमी सामर्थ्याची कां दिसावी ? शरीरऱ्हास, हें कार्य ह्या लोकांत देखील दृष्टीस पडतें; ह्या कार्याचें कारण दारिद्र्य असें म्हणतां येईल काय ? कार्य आहे पण आतांपर्यंत सांगितलेल्या कारणांचा पूर्ण अभाव, तेव्हां शरीरऱ्हासाचें कारण दारिद्र्य म्हणावें तर कार्यकारणाचा अबाधित संबंध राहत नाहीं. खरें कारण शोधून काढतांना वरवर दिसणाऱ्या कारणांचा कार्याशीं असलेला संबंध बाधित आहे असें दिसतांच त्या कारणास फाटा दिला पाहिजे.—भ्रामक कारणें वजा टाकण्याच्या ह्या तर्कशास्त्राच्या रीतीअन्वयें प्रि. साहेबांनीं " दारिद्र्य " ह्या कारणास विचारमालिकेंतून हद्दपार केलें आहे. आणि हें करणें वरवर दृष्टि फेंकणारास चुकीचेंहि वाटणार नाहीं. दारिद्र्य-मित्राचा सहवास आम्हांस बाधला असें श्रीमंतांस म्हणतां तरी कसें येईल ? सर्व विवंचना धुवून टाकण्यास ज्यांच्या घरीं द्रव्य पाण्याप्रमाणें खेळतें आहे, ते लोक चिंतेंत व त्रासांत बुडाले आहेत असें सांगणें शोभेल तरी कसें ? सर्व काम करण्यास दाम एका पायावर तयार असतां साध्य साधून घेण्याच्या भगीरथ प्रयत्नांच्या झिगझिगीनें हे सुकून जातात, ही कल्पना बांधतां येणें शक्य तरी आहे काय ?

## शारीरिक ऱ्हास व मानसिक अवनतीचीं कारणें

सर्व समाजामध्यें शारीरिक ऱ्हास दृष्टीस पडणें व अंशतः मानसिक अवनति असणें हीं कार्यें एकाच कारणानें उद्भवत नसतात. मोठमोठीं राष्ट्रें रसातळास कां पोंचलीं; " अखिल सृष्टीचे मालक " म्हणून ज्या राष्ट्रानें द्वाही फिरविली तें नामशेष कां झालें; पाश्चिमात्य सर्व राष्ट्रांस तत्त्वज्ञान व राजनीति ह्यांचा ज्यानें धडा घालून दिला त्या राष्ट्रानें दोन हजार वर्षांनंतर, पुनरुज्जीवन केल्यानंतर, जिवन्त आहें इतकीहि धुगधुगी दाखवूं नये इतकें तें खचून कां गेलें;—ह्याचा जर आपण विचार करूं लागलों तर एकच कारण सांगतां यावयाचें नाहीं. एखादें कारण प्रबल, बाकीचीं कारणें पोषक असतील.

एकाचा बहुजनसमाजावर कोणावर कमी कोणावर ज्यास्ती असा सार्वत्रिक अंमल असेल; बाकीच्यांचा अधिकार एखाद्या विशेष वर्गावर कडक चालून बाकीच्यावर त्याची सत्ता मोघट असेल; एखाद्या कारणाचा स्थलमहात्म्यामुळें किंवा व्यक्तिमाहात्म्यामुळें साक्षात् प्रभाव दिसत असेल, दुसरीं कारणें अप्रत्यक्ष रीतीनें आपला प्रभाव भासवूं लागत असतील. श्रीमन्त लोकांतहि शरीरसामर्थ्य कमी कमी कां होत आहे ह्याविषयीं विचार करतांना " एको देवः केशवो-वा शिवो वा " ह्या मतांचे भक्त मनास होऊं देतां कामा नये.

सामान्य सुखवस्तु मंडळीस व इतर खालच्या दर्ज्याच्या समाजास दारिद्र्य कसें भोंवत आहे हें सांगितलें. श्रीमन्त घराणीं मोडून तीं खालच्या पायरीस घसरूं लागलीं आहेत, चांगले श्रीमन्त आमच्या घराण्यांत फार थोडके शिल्लक राहिले आहेत, व जे थोडके आहेत त्यांस आपली सुस्थिति कायमची टिकणारी आहे असें वाटण्यास जागाहि नाहीं. श्रीमन्त मंडळीवरहि राष्ट्राच्या सर्व सामान्य दारिद्र्याचा अप्रत्यक्ष परिणाम झाल्यावांचून रहात नाहीं. त्यांना त्यांच्यावरील सामान्य मनुष्यांप्रमाणेंच भावी दारिद्र्यविषयक विवंचना असतातच. उदाहरणार्थ, वीस वर्षांपूर्वी विश्वविद्यालयांतून विजयध्वज फडकावीत बाहेर पडलेला, सध्यां चार पांचशें रुपये पगार मिळविणारा सरकारी नोकर घेऊं. वरील गृहस्थ स्वभावानें चांगला, कृतीनें चोख, व विचारानें पोक्त अशांपैकीं आहे असेंहि पण समजूं. आपल्या दोघां चिरंजीवांनीं आपल्या-प्रमाणेंच चार पांचशें रुपयांच्या नोकऱ्या संपादन करून आपला नांवलौकिक कायम राखावा असें त्यानें मनांत आणिल्यास त्यानें आपल्या मुलांस कोणत्या मार्गाला लावावें बरें ? सरकारी नोकरी न पत्करितां मुलांनीं सात आठशें दर महिना व्यापारांत नफा मिळवावा एवढें भांडवल मुलांचे स्वाधीन करण्यास एवढा मोठा द्रव्यसंचय त्याजपाशीं कोठून येणार ? बरें त्याजपाशीं एवढी मोठी पुंजी असली तरी व्यापारविषयक योग्य शिक्षण मुलांस मिळालें

पाहिजे. ह्याची त्यानें काय तजवीज करावी ? मराठीमंडळ पूर्वीपासून स्वातंत्र्याचा उपभोग घेत असल्यामुळें व कांहीं दिवसांपूर्वी पूर्ण अधिकार ह्या मंडळाच्या हातांत असल्यामुळें–व्यापाराला लागणाऱ्या योग्य संवयी ह्या लोकांत दृष्टीसहि पडावयाच्या नाहींत; व ह्या मंडळाला पारतंत्र्याचे दिवस येण्यापूर्वी त्या संवयींचा अंगिकार करण्याचीहि जरुरी नव्हती. मारवाड्याचें प्रस्तुत ग्रन्थकारानें एका ठिकाणीं दिलेलें उदाहरण आमच्या लोकांस केव्हांहि लागू पडायाचें नाहीं. मारवाड्यांचा मेंदू वृद्धावस्थेंतहि तरुण रहातो; ऊन, वारा, पाऊस, यांच्या लाथाबुक्या सहज सहन करण्याइतकें त्यांचें शरीर लोंचट बनलेलें असतें; व्याजाचा पैसा व पैशाचें व्याज म्हणून दुप्पट फायदा गिळंकृत करण्याइतकें त्याचें हृदय घट्ट व मुरदाड बनलेलें असतें; घाणेरड्या तुपाच्या घागरींत कोंपराइतका हात ढकलून परीक्षेकरितां पसेच्या पसें तूप चाटण्याइतकें त्यांचें मन ओंगळ बनलेलें असतें–वगैरे सर्व गोष्टी ग्रन्थकाराप्रमाणें आम्हालाहि मान्य आहेत. हिंदु लोकांना लहानशा भांडवलानें लक्षाधीश व्हावयाचें असल्यास–हे मारवाडी गुण पैदा केले पाहिजेत हेंहि खरें. मारवाड्यांनीं हे गुण जन्मास येतांनाच आपल्याबरोबर आणलेले. कितीएक पिढ्या हे गुण त्यांच्या अंगांत मुरलेले आहेत. आम्हाला आतां आतां कुठें व्यापारी बनावेंसें वाटत आहे. अशा वेळीं आमच्या कृति नवीन धंद्यास व पेशास अयोग्य सांपडणें साहजिकच आहे.

## दारिद्र्याचें भयानक व उत्साहभंजक चित्र

अशी स्थिति असतांना आपल्या मुलांस दुर्गम वाटणाऱ्या व्यापाराच्या मार्गास लावण्यास कोण धजतो ? आपणाप्रमाणेंच मुलानेंहि नोकरी संपादावी अशी इच्छा त्यानें धरल्यास पोक्त व दूरदृष्टीचा विचार त्यानें केला असें कोण म्हणणार नाहीं ? बापाचा लौकिक व त्याचें महत्त्व संपादण्याची मुलानें हाव धरल्यास विद्यासंपादनाचे शर्यतींत बापानें ज्या ठिकाणीं मुक्काम केला

त्याच्यापुढें अतिशय अंतरावर मुलास दवडत जावें लागतें. कर्मधर्मसंयोगानें ह्या गोष्टी श्रीमन्त तरुणाच्या मनावर एकदां का ठसल्या, मग लागलाच तो विवंचनेच्या भोंवऱ्यांत गरगरा फिरूं लागला असें समजावें. परीक्षेंत पुष्कळसे गुण न मिळाल्यास "बापा"ची उमेद खचेल, त्याला संततीच्या भावी संपत्तीविषयीं निराशा वाटेल, एवढ्या धास्तीनें, पांच सातशें रुपये दरमहा कमविणाऱ्या पाणीदार बापाचे मुलगे बाकीच्या गरीब मुलांबरोबरच शरीराला मनाच्या जाचांत ठेवितांना दृष्टीस पडतात. मुलाच्या मनावर पुष्कळ पगार मिळविण्याची महति केवढी आहे हें ठसविण्याचा कित्येक मोठमोठ्या पगारवाल्यांचा क्रम असतोच. मुलगा नोकरी करण्यास लायक होण्यापूर्वींच मोठ्या पगाराची जागा मुलास मिळावी म्हणून साहेबबहादुरांपुढें ही मंडळी दांत विचकूं लागतात. आम्ही स्वतः ऐकलेला खालील संवाद वाचून वरील विधानाची सत्यता दिसणार आहे.

अ—कायहो, तुमच्या बाबांना हजार रुपये पगार आहे; शिवाय जवळ साठ सत्तर हजारांची एस्टेटही आहे. तुमच्यासारख्या श्रीमन्त व शिकलेल्या मंडळीनें लोकसेवेचीं मोठमोठीं कामें अंगावर घेतलीं असतां देशाचा मोठा फायदा होणार आहे. शिक्षण पुरें झाल्यावर पुढें काय करण्याचा तुमचा विचार आहे ?

ब—छेहो, आज चार पांच पिढ्या आमचें घराणें नोकरीच करीत आलें आहे. आमचें हें ब्रीदच. बाबांनीं साहेबांकडून वचन घेतलें आहे–तुझ्या मुलाला एवढी एवढी नोकरी देतों म्हणून. मला यंदा ही परीक्षा पास झालीच पाहिजे. सर्व नोकऱ्या भरून गेल्यावर साहेब झाला तरी कोठची जागा आणणार ?

वरील श्रीमन्त तरुणास बी. ए. पर्यंतचा अभ्यास संपण्यापूर्वींच दोन तीनशें रुपयांची नोकरी लागली; स्थानिक वर्तमानपत्रकारांनीं त्याचें अभिनंदनही

केलें. ह्या अंशतः खासगी गोष्टी एथें सांगण्याचें कारण इतकेंच कीं, चांगल्या समंजस व आजूबाजूच्या सर्व गोष्टींचा नीट रीतीनें विचार करणाऱ्या बड्या बड्या विद्वान अंमलदारांना आणि त्यांच्या चिरंजिवांना सार्वत्रिक झालेल्या दारिद्र्यानें अप्रत्यक्ष रीतीनें ग्रासल्यावांचून सोडलें नाहीं.

पूर्वींच्यापेक्षां हल्लीं दारिद्र्याचें चित्र अधिक भयानक व उत्साहभंगक झालें आहे. मनुष्य अत्यंत दरिद्री किती होऊं शकतो, दारिद्र्याच्या दंशाच्या वेदना किती असह्य असूं शकतात, ह्याची कल्पना मराठमंडळाला हल्लींइतकी पूर्वी कधींही आली नव्हती. कारण स्वराज्यांत दारिद्र्यानें इतकें भयंकर व अक्राळविक्राळ स्वरूप केव्हांही धारण केलें नव्हतें. दरिद्री होऊं कीं काय ही भीति सुजाण श्रीमंत लोकांस अत्यंत वाटत आहे. आपल्या समक्ष धट्टी-कट्टी मंडळी मृत्युमुखीं पडलेली पाहिल्यावर, शरीराची विशेष जोपासना करण्याची ज्याप्रमाणें इच्छा होते, त्याप्रमाणेंच धनाढ्य घराणीं बेचिराख झालेलीं पाहिल्यावर शिल्लक राहिलेल्या श्रीमंतांना पैशाची लहानशी पुरचुंडी घट्ट उराशीं धरून बसावेसें वाटावें हें साहजिक आहे. सर्व राष्ट्रांत रावाचे रंक होतात, रंकाचे राव होतात; तेव्हां तेथील श्रीमंत मंडळीला दारिद्र्याची भीति वाटून ती वाळूं कां लागली नाहीं? आमच्याच श्रीमंतांना हें विशेष भय कां म्हणून? बाकीच्याही राष्ट्रांत तरुण लोक अकालीं मरतात, पाचोळ्या-सारखीं हलकीं मुलें व पिकून गळून पडलेल्या पानाप्रमाणें शुष्क मुली बाकीच्याही राष्ट्रांत आहेत. मग आम्ही अशक्त कां झालों, ह्या विषयाचा ऊहापोह करण्याचें आज काय कारण? ह्यास उत्तर असें आहे कीं, अशक्त व सशक्त ह्यांच्या संख्येमध्यें जें योग्य प्रमाण असायाला पाहिजे तें आमच्यांत नाहीं. सशक्त कमी कमी होऊं लागले, व साधारणतः सर्वच अशक्त झाले. श्रीमंत घराणीं नाहींतशीं होत आलीं, दारिद्र्यानें सर्वांसच ग्रासलें. तेव्हां दारिद्र्याची भीति वाटावी, त्याचा अप्रत्यक्ष जाच सहन करावा, व त्या

योगानें एक प्रकारचें शारीरिक व मानसिक दौर्बल्य आपणावर ओढून घ्यावें— हें पुष्कळ सुजाण श्रीमंतांच्या नशिबीं आलें आहे.

ज्यांना श्रीमंतांचा चांगला आश्रा आहे, किंवा जे घरचेच चांगले श्रीमंत आहेत, अशा मंडळींमध्येंच पुऱ्या वाढीची, रुंद हाडाची आणि धष्टपुष्ट अशी मंडळी दृष्टीस पडते. पैलवानीचा षोक असलेल्या श्रीमंतांच्या सभोंवती अशी मंडळी बरीच असते व इतर ठिकाणींही तुरळक तुरळक दृष्टीस पडल्यावांचून रहातच नाहीं.

श्रीमंत मंडळी व त्यांतील आजची पिढी विशेषेंकरून हवेमध्यें जरा फेर-बदल झाल्याची बातमी थरमामिटरप्रमाणें आपल्या शरीरावर दाखविण्याइतकी नाजूक कशानें झाली हें पहावयाचें असल्यास, "बरवर" दिसणारीं म्हणून प्रिन्सिपाल साहेबांनीं जीं चार कारणें सांगितलीं त्यांपैकीं दुसऱ्या व तिसऱ्या कारणांचा विशेष बारकाईनें विचार केला पाहिजे. पुढें आम्ही सांगणाऱ्या दोन कारणांचा अंमल सामान्य सुखवस्तु मंडळीवर बराच जोराचा असतो; चांगल्या सुखवस्तु मंडळीवर चांगलाच खरमरीत असतो; व गोरगरीबांकडेही साहचर्यनात्यानें ह्या कारणांची बरीच करडी नजर आहे.

## बालविवाह व व्यायामाचा अभाव—

बालविवाहास नांवें ठेवणाऱ्या मंडळीचें उलटपक्षाशीं सामना करण्याचें जबरदस्त हत्यार म्हटलें म्हणजे "बालविवाहाच्या योगानें स्त्रीपुरुषांचा अकालीं संयोग होतो, त्यायोगें दोघेहि शक्तिहीन होऊन संतति रोगी, निःसत्त्व व अल्पायुषी होते." *रा. वैद्य यांनीं "बालविवाहा" वर लिहिलेला निबंध वाचला असतां त्यामध्यें असें प्रतिपादिलेलें दिसेल कीं, जुन्या चालीचें घराणें घ्या, नव्या चालीचें घराणें घ्या—संसारयात्रेंतील निरनिराळ्या प्रसंगांमुळें

---

* शिंदेशाहींतील प्रसिद्ध जज्ज.

नगर वाचनालय, सातारा.



बालपणीं विवाहित झालेल्या वधुवरांचे मनांत अनर्थपरंपरेनें ओथंबलेल्या यौवनविकाराचा प्रादुर्भाव अकालीं होतो. बालविवाह कांहीं नाहीं तरी निदान पांच सहाशें वर्षें आमच्यामध्यें अव्याहत चालू असतांना अलीकडे अलीकडेच त्याचे भयंकर परिणाम कां दिसूं लागले? ह्या प्रश्नाचें व्यवस्थित रीतीनें दिलेलें उत्तर जज्ञ साहेबांचे लेखांत सांपडत नाहीं. बालविवाह पूर्वी चालू असतांना आम्ही चांगले टणके धट्टे कट्टे होतों, तर आमच्या अशक्तपणाचें कारण बालविवाह नव्हे हें खास. प्रिन्सिपाल साहेबांचें असें मत आहे कीं, सांप्रत आमच्यांत सुरू होऊं पहाणाऱ्या प्रौढविवाहाचे परिणामहि भयंकरच होतात.

पूर्वीप्रमाणें हल्लीं स्त्रियांना व्यायाम करण्याची जरूरी न पडल्यामुळें, नाव्हलें वाचण्यांत, गळपट्टे शिवण्यांत व पत्ते खेळण्यांत त्यांचा काळ निघून जात असल्यामुळें, त्यांचीं शरीरें, कितीहि उशिरां लग्न झालें तरी, खुरट्या वाढीचीं असायाचीं; "बालविवाह किंवा प्रौढविवाह यांचा या स्थितीशीं प्रत्यक्ष किंवा परोक्ष संबंध दिसत नाहीं." व्यायामाचा अभाव हें कारण सांगितल्यावर प्रौढविवाहांतील दुसऱ्या एका भयंकर कारणाचें वर्णन प्रिन्सिपालसाहेब येणेंप्रमाणें देतात.—

"विवाहापूर्वी जो वादविवाद चालतो, तो प्रत्यहीं ऐकून मुलीचा अल्लडपणा नाहींसा होत जातो व तीस अकालीं प्रौढ विचारांची स्फूर्ति होते......(बरींच वाढलेलीं मुलें) तीं बहुधा क्षीण असल्यामुळें किंवा आत्मघातक अशा कांहीं व्यसनास लागल्यामुळें, त्यांस विवाहानंतर मुलीची पुरी वाढ होईपर्यंत ब्रह्मचर्यव्रतानें ठेवणें अशक्य किंवा अपायकारक होतें. या कारणानें विवाहानंतर अल्प काळांतच, विवाहित मुलीच्या सुमारें तेरावे वर्षी घरच्या मूर्ख स्त्रियांचे साहाय्यानें किंवा आग्रहानें स्त्रीपुरुषांचा समागम होऊं लागतो......तेव्हां जोंवर मुलींच्या पुढील वाढीचा, वागणुकीचा, किंवा सुस्थितीचा कांहींच नियम सांगवत नाहीं, तोंवर मुलींचीं लग्नें अल्पवयांतच वयाचें अंतर कमी ठेऊन करून टाकणें हें एकंदरींत अधिक श्रेयस्कर."

रा. रा. वैद्य यांचा या प्रश्नासंबंधानें अभिप्राय पूर्वी दिलाच आहे. सुधारक पक्षाच्या हल्लींच्या कृतींचें मंडन करणारा पुरुष असो, त्यांच्या कृतींतील व्यंगें दाखविणारा कुशल लेखक असो—दोघांनींही इतकी कबुली दिली आहे कीं, हल्लींच्या समाजस्थितींत, ह्या नाहीं तर त्या कोणच्याना कोणच्या तरी कारणानें स्त्रीपुरुषांच्या मनांत अकालीं प्रौढ विकार उत्पन्न होतात. मुलगा सतरा अठरा वर्षांचा होतो न होतो तों आत्मघातक व्यसनांचा त्यावर पगडा बसावा; हा भयंकर प्राणी निपजून दुर्व्यसनी मंडळींचा अग्रणी होतो, कीं दुर्विचारानें भलत्याच व्यसनाच्या नादीं लागून दीपपतंग न्यायानें शरीराची राखरांगोळी करून घेतो, कीं ह्याचें डोकें फिरून जाऊन वेडा बनल्यामुळें समाजांतून उठून जाण्याच्या योग्यतेला हा चढतो,—कीं होतें तरी काय, अशी घरांतल्या माणसांना धास्ती वाटूं लागावी; व अनियंत्रित झालेल्या मनोविकारांस आळा घालण्याच्या पोक्त विचारानें घरच्या " मूर्ख " स्त्रियांच्या प्रत्यक्ष साहाय्यानें, व " शहाण्यासुरत्या " पुरुषांच्या डोळेझांकीनें, समाजविघातक प्रकार घरांत सुरू व्हावे; ह्याचें कारण तरी काय ह्याचा प्रि. साहेबांनीं शान्तपणानें विचार केला आहे काय ? प्रि. साहेबांनीं वर्णिलेल्या शिक्षणपद्धतीनें उत्पन्न केलेल्या अशक्तपणाचेंच केवळ हें फळ आहे काय ? स्त्रियांना मूर्ख म्हणल्यानें ह्या गोष्टींचा चांगलासा उलगडा होतो काय ? घरांत काय काय प्रकार होतात हें पूर्णपणें माहीत असतां कानाडोळ्यावर हात ठेवून अबलांवर दोषभार फेंकून दिला म्हणजे आपली जबाबदारी आपण बजावली असें प्रिन्सिपाल साहेबांस वाटतें काय ? पुरुषांचें अप्रत्यक्ष तरी साह्य असल्यावांचून " मूर्ख " स्त्रिया घरांत मूर्खपणा करूं शकतात, हें सांप्रतच्या कुटुंबरचनेंत संभवनीय तरी आहे काय ? व्यसनी मनुष्यानें आपणास अकालीं येणाऱ्या मृत्यूचें अपयश आपल्या सोबत्यावर लोटावें, आपल्याच अविचारीपणाचें तें फळ आहे इकडे त्याचें लक्ष जाऊं नये, तशांतलाच स्त्रियांच्या गळ्यांत मूर्खपणा बांधण्याचा हा प्रकार आहे.

# * ब्राह्मण आणि त्यांची विद्या—लेखांक दुसरा

## शक्तिहीनतेचें कारण व्यसनाधीनता

श्रीमंत मंडळी देखील अशक्त कां ? उत्तरोत्तर सुधारत चाललेलीं कुटुंबें, भुकीसरशीं पिचणाऱ्या हाडांच्या चोयींच्या चालत्याबोलत्या डोलाऱ्यांनीं कां भरलेलीं ? एका विद्वानानें बालविवाहाचे वाईट परिणाम होतात म्हणून प्रतिपादन करावें, दुसऱ्यानें प्रौढविवाहाचे कांकणभर चढच भयंकर परिणाम होतात असें सांगावें, ह्यांतलें खरें इंगित काय ? खायास पुष्कळ आहे, चोंचले करायाला आप्त इष्ट मंडळी तयार आहे, विद्यामृत पाजण्यास एक स्वतंत्र बड्या पगाराचा मास्तर रात्रंदिवस खपत आहे; पण मुलाची खाण्यापिण्यावरची इच्छाच उडालेली, कोणत्याही गोष्टीची त्याला हौसच वाटत नाहीं, शिक्षकाच्या सहवासाचा त्याला कंटाळाच येतो—अशी स्थिति कशानें उत्पन्न होते ? वर्गाच्या वाटोळ्या मांडणीचेच हे परिणाम काय ? वर्गांत उडणाऱ्या दर मिनिटाच्या शाबासकीच्या फैरींत आमचा सरदार कोठून शिरल्यामुळें त्याला जखम लागली ? मास्तरांच्या शाबासकीचे पोकळ बार ज्यांनीं ऐकिले देखील नाहींत, किंवा परीक्षकांच्या बड्या तोफखान्याच्या माऱ्याखालीं चीत पडण्याचें ज्यांना माहितही नाहीं, त्या मंडळीच्या अंगभर, लढाईच्या तोंडाच्या जागीं मर्दुमकी गाजविणाऱ्या वीराप्रमाणें, नसत्या खुणा कां ? कालेजांत तालीमबाज म्हणून नांवाजलेली मंडळी वकिलींत दोन पैसे मिळतात न मिळतात तों एकदम नाजूक व्हावी—हा नंबर लावण्याच्या पद्धतीचा पुष्कळ वर्षांनीं उमटणारा परिणाम आहे काय ? शिकत असतांना ज्यांना "विडी"चीहि घाण

* विविध ज्ञान विस्तार, मार्च–एप्रिल १८९६

सोसत नसे अशी ज्यांची कीर्ति, त्यांनीं सदासर्वदा खिशांत " ब्रँडी "ची बाटली बाळगावी—हा पूर्वी शाळेंत शिक्षकानें भूगोल घोकून घेतल्याचा परिणाम आहे काय ? चुलत्याच्या हातून अर्धें मुर्धेंच पडलेलें सबंध बाटली रिकामी पाडण्याचें काम पुतण्यानें संपविल्यावर, त्याची कालेजांत तेजस्विता कायम रहात नाहीं; ह्याचें कारण वीज पडतांना " थंडर " " थंडर " म्हणून वर्गांत कडकडणारा शिक्षक नव्हता हें कीं काय ?

आमच्या मतें, दारिद्र्याबरोबरीचें किंबहुना त्याहूनहि ज्यास्ती भयंकर स्वरूपाचें, आमच्या शक्तिहीनतेचें कारण—" व्यसनाधीनता " हें होय. पेशवाईच्या अखेरीस उत्पन्न झालेल्या, इंग्रजीचा पूर्ण अंमल सुरू होईपर्यंत धुमसत राहिलेल्या, व अलीकडे अलीकडे बोकाळत चाललेल्या ह्या व्यसनाधीनतेखालीं आम्ही पूर्ण चुरडून चाललों आहों. गतशतकाच्या सामाजिक स्थितीच्या इतिहासाचें जर पूर्ण मनन केलें, तर हल्लींचे घोंटाळ्यांत घालणारे प्रश्न सहज उलगडतां येण्याजोगे आहेत. ही व्यसनाधीनता आमच्यांत शिरली कशी, ही वाढली कशी व आम्हाला आतांच ती डोईजड कशी झाली, ह्याचा संक्षिप्त इतिहास वाचकांपुढें मांडतों.

## थोरल्या माधवरावांचा आदर्श

डिमास्थेनीससारखे देशभक्त स्वातंत्र्य राखण्यास झटत असतांना त्यांचे भगीरथ प्रयत्न निष्फळ झाले, व मॅसिडोनियाच्या जड जुवाचा भार ग्रीसला सोसावा लागला. त्यावेळीं फिलिपकडून लांच खाऊन डिमास्थेनीसचे उद्योग हाणून पाडणारे आथेन्सच्या मुत्सद्दी मंडळांत कांहीं होते. देशभक्ति व स्वातंत्र्याची हांव ह्या मनोविकारांस वर डोकें न करूं देण्याइतकी फिलिपच्या थाटमाटाची व चैनीची आथेन्सच्या वकिलांवर छाप पडली. आथेन्स शहरचे लोक सुखोपभोगास सोकावल्यासारखे झाले, विषयसुखास बळी पडले, आणि

बखर ग्रंथसंग्रहालय सातारा

म्हणून स्वातंत्र्यास व स्वराज्यास मुकले. रोमची हीच स्थिति झाली. तेथें चैन शिरली, विश्वयोषितांची मिजास वाढली, अंमली पदार्थांना दर आला; तेव्हां रानटी लोकांच्या टोळधाडीपुढें रोमचे सुंदर वाडे जमीनदोस्त झाले, हौशी वनिता धिप्पाड दांडग्या लोकांनीं वाटून घेतल्या आणि सुखोपभोगांत लोळत पडलेल्या सरदार मंडळीस दुःखाच्या डोहांत लोटून दिलें. औरंगझेब वीस लाख सैन्यानिशीं वीस वर्षें दक्षिण जिंकीत होता, पण त्याचा हेतु किंचितहि सिद्धीस गेला नाहीं; कारण त्याच्या सैन्याचा तळ म्हणजे मुसलमानांच्या इश्कबाजीचें, व्यसनाधीनतेचें जंगी प्रदर्शन होतें. ज्याच्या कारकीर्दींत मुसलमानांच्या सत्तेनें अखेर शिखर गांठलें असें मुसलमान इतिहासकार म्हणतात, त्या औरंगझेबाचें कबरींतलें शव कुजण्यापूर्वींच दिल्लीच्या बादशहाची स्थिति हल्लींच्या एखाद्या क्षुल्लक राजेरजवाड्यासारखी झाली. मोठमोठीं राज्यें नामशेष झालीं, त्याच्या मुख्य कारणांपैकीं प्रजेची व्यसनाधीनता हें एक असतेंच, अशी इतिहास साक्ष देतो. औरंगझेबाच्या स्वारींतला थाटमाट पानिपतच्या वेळीं मराठी मंडळींत अल्पस्वल्प प्रमाणानें दिसत होता. पुढें, माधवरावासारखा हुषार, धोरणी, उत्कृष्ट आचरणाचा व कडकडीत न्यायनीतीचा पेशवा जर झाला नसता, तर पानिपतच्या लढाईंत बहुतेक जिवास मुकणाऱ्या दख्खनच्या शवाची आसपासच्या गिधाडांनीं केव्हांच वाटणी करून घेतली असती. थोरले माधवराव आणखी जर वीस पंचवीस वर्षें आम्हां महाराष्ट्रीयांस लाभले असते, तर पानिपतच्यासारख्या आणखी दहा पांच लढायांचें अपयश सहज धुवून टाकतां आलें असतें. राजनीति व सदाचरण ह्यांचा सलोखा असणें शक्य आहे, हें लोकांस समजून देण्याचा प्रयत्न पेशवाईंत प्रथम माधवरावांनींच केला. आमच्या दुर्दैवानें आम्ही तो धडा चांगला गिरविला नाहीं. व्यक्तिव्यक्तींचें हित व राष्ट्रहित हीं पुष्कळ प्रसंगीं निरनिराळीं असून प्रत्येकानें राष्ट्रहिताकरितां स्वहिताचा त्याग करण्यास तयार

असलें पाहिजे, हें शिवाजीनंतर त्यांनींच आचारविचारानें स्पष्ट करून दाखविलें. महाराष्ट्राच्या राष्ट्रीयत्वासंबंधीं ज्या कल्पना आंग्लविद्येनें आमच्यांत आज उत्पन्न केल्या आहेत त्या कल्पनांच्याच धोरणानें माधवरावानें राज्य चालविलें होतें. खालच्या पायरीच्या मनोवृत्तींस किमपि ज्या योगें उत्तेजन मिळणार नाहीं अशाच रीतींचें माधवरावाचें वर्तन होतें. रामशास्त्र्यासारखा हिरा त्यांच्याच कारकीर्दींत झळकला. त्यांच्या पूर्वी किंवा त्यांच्या मागून रामशास्त्र्यांचें तेज पडणें शक्यच नव्हतें. नानासाहेबांच्या कारकीर्दीच्या अखेरीस व्यसनाधीनतेची जी लहानशी लाट मराठमंडळावर उमटली तिचा पूर्ण प्रतिकार करण्यास, आमच्या नशिबीं हल्लींचे पारतंत्र्याचे सोहाळे सोसण्याचें विधीनें लिहिल्यामुळें माधवरावांस ईश्वरानें दीर्घायुष्य दिलें नाहीं; त्यांच्या चोख वर्तणुकीचें व उदात्त विचारांचें महाराष्ट्रास चांगलें वळण लागण्यापूर्वीच त्या विशाल बुद्धीच्या निर्मल तेजास आम्ही अंतरलों. हीनवृत्ति माधवरावांच्या वेळीं दाबांत ठेविल्यासारख्या होत्या. माधवराव मेले, त्यांच्यावरचा दाब नाहींसा झाला, आणि माधवरावांच्या वर्षश्राद्धापूर्वीच नीच मनोवृत्तींची पुण्यांत दंगल उडाली. माधवरावांच्या तालमींतील पुढारी मंडळी जर त्यावेळीं नसती, माधवरावांचें उदाहरण जर ताजें नसतें, तर पुतण्याचा घात करून राजपद मिळविलेल्या पुरुषानें पेशव्यांची गादी बरीच वर्षें बाटविली असती. माधवरावांचे शब्द कानांत घुमावयाचे बंद झाले नव्हते, त्यांच्या कृति विसरण्याइतका काळ लोटला नव्हता, म्हणूनच बारभाईमध्यें पूर्ण जूट राहूं शकली. राघोबादादास हद्दपार करणाऱ्या व इंग्रजांस खडे चारणाऱ्या पुण्याच्या पुढारी मंडळीच्या अंतःकरणाचें जर नीट परीक्षण केलें तर असें दिसून येईल कीं, कांहीं मंडळीनें माधवरावांचें बाणेदार आचरण उचलिलें होतें व कांहींनीं त्यांच्या विशाल बुद्धीचा वाटा आपणाकडे ओढला होता. पहिल्या वर्गांत त्रिंबकराव मामा, हरिपंत फडके व परशरामभाऊ

नगर वाचनालय, सातारा.



पटवर्धन वगैरे मंडळीची योजना केली पाहिजे; दुसऱ्या सदरांत अर्थात् प्रसिद्ध मुत्सद्दी नाना फडणवीस येतात. त्यावेळीं शुद्ध अंतःकरण व कुशाग्रबुद्धि ह्यांचा मिलाफ झाला म्हणूनच डोलावयास लागलेली पेशवाईची इमारत कोसळली नाहीं. त्यावेळचें वावटळ निघून गेलें, व धर्मनीति व राजनीति ह्यांमध्यें हलके हलके फारकत होऊं लागली. नाना फडणवीसांनीं आपल्या बुद्धीचा प्रथम प्रभाव ज्या वेळीं दाखविला त्यावेळीं ह्या फारकतीस विशेष प्रारंभ झाला नव्हता. सवाई माधवरावांस राज्यावर बसविलें तें सरदारांची एकी करून, न्याय व नीति ह्याकरितां भांडण्याची त्यांच्या अंगीं स्फूर्ति उत्पन्न करून, नानांनीं जमवून आणिलें. इंग्रजांच्या लढाईंत दाखविलेल्या बुद्धिकौशल्याची अत्यंत तारीफ प्रत्येकानें केली पाहिजे; ह्याचें कारण असें कीं, राष्ट्राची विपत्ति मनाला अतिशय झोंबल्यामुळें बुद्धीला आलेल्या तीव्रतेचें तें फळ होय. आमच्या दुर्दैवानें म्हणा किंवा कशानेंहि म्हणा, नानासाहेबांच्या दरबारांतील कलुषित प्रकार नानांच्या मनांत बरेच घोळत होते. चोहोंकडे स्थिरस्थावर झाल्यावर पुण्याच्या थाटमाटाला पुन्हां ऊत आला व अनीतीचे प्रकार चोरून लपून शहरांत वावरूं लागले. ह्यातारपणीं कोंकणांत "हरि हरि" म्हणत रहावयास नाना गेले असें नसत्या उठाठेवींत पडलेल्या परशरामभाऊ आदिकरून मंडळीस वाटत असतां, नानांनीं जें अजब कारस्थान उभारलें त्याचें नीट मनन केलें म्हणजे आमच्या म्हणण्याचा प्रत्यय येईल. हें कारस्थान अन्यायाच्या जबर चिडीनें उत्पन्न झालेलें नव्हतें; ह्याची सांगता करणारे धर्मात्मे नव्हते; ह्याला पाठबळ पापभीरु मंडळीचें नव्हतें; विकारी यौवनाच्या तडाक्यांत सांपडलेला एक तरुण सरदार, आपल्या नेत्रकटाक्षानें मोहून टाकणारी एक रूपवती तरुणी, पैशाकरितां मानापमानाकडे न पहाणारा त्या तरुणीचा बाप—हीं काय तीं ह्या कारस्थानांतील प्रधान पात्रें होत. ज्या समाजांत पेशव्यांच्या गादीवर ह्याला बसवावयाचें कीं त्याला बसवावयाचें ह्या प्रश्नाचा

निकाल सुंदर मुलींच्या पित्यांच्या मर्जीवर अवलंबून रहातो, ज्या समाजांत पैशाकरितां अनन्वित कृत्यें करण्यास लोक एका पायावर तयार असतात, ज्या समाजांतले शहाणेसुरते कर्तेसवरते लोक व्यसनाधीन झालेले असतात, त्या समाजाची पुढें दुर्दशा होऊं नये तर व्हावें तरी काय? नानांनीं आपल्या कांहीं कांहीं कृतींनीं चैनी, व्यसनी व मूर्ख बाजीरावाच्या कारकीर्दीचा रस्ता बनवीत आणिला असें इतिहाससत्याबद्दल काळजी बाळगणाऱ्या प्रत्येकाला म्हणावें लागेल. बाजीरावाच्या वेळीं काय काय निंद्य प्रकार घडले, ह्याचें वर्णन करून लेखणीस विटाळण्याचें ह्या ठिकाणीं प्रयोजन नाहीं.

## अपमानाचे सुखसोहाळे

एवढी मात्र गोष्ट खरी कीं, निमूटपणें दुसऱ्याच्या स्वाधीन आपलें आहे नाहीं तें सर्व कांहीं करणारे पुण्यांतल्यासारखे जगाच्या पाठीवर दुसऱ्या ठिकाणीं मानवप्राणि सांपडणार नाहींत. बांधाच्या चरकांत गळा देतांना शेळी एकदां तरी ओरडते, एकदां तरी शेवटचे हातपाय झाडते; पण अठराशें अठरा सालीं पुण्याचे लोक गोगलगाईहून मऊ, शेळीहून शेळपट व मेणाहून लवलवित झाले होते. पारतंत्र्याचें जड जूं एक सेकंदहि मानेवर सोसण्याचें नशिबीं येऊं नये म्हणून नेहमीं वीष जवळ बाळगणारे डिमास्थेनीससारखे ग्रीसच्य ऱ्हासकाळीं आथेन्सांत लोक निपजले; पण आमच्या पुण्यांत व्यभिचारी स्त्रीप्रमाणें नवीन नवऱ्याचे पोवाडे गात तांबडें निशाण आपल्याच डोक्यावर रोंवून घेणारे कीर्तिध्वज जन्मास आले. जनानी पेहरावाविषयीं बरेंच प्रसिद्धीस आलेले ब्रम्ही लोक, त्यांनीं देखील इंग्रज बहादुरानें ठकबाजी करून दगा दिल्यावर पांच चार वर्षें आपल्या तरवारीस म्यानांत स्वस्थ झोंपीं जाऊं दिलें नाहीं; पण आमच्या पुण्यांतील मंडळी राज्य गेलें त्यावेळींहि स्वयंपाक-घरांत बायकोशीं गोड गोष्टी बोलण्यांत गुंगलेली! मणीपूर एवढेंसें संस्थान पण त्यानें देखील अपमानापासून उत्पन्न झालेल्या रागाची ज्वाळा केवढी

प्रचंड असते हें जगांतील बलाढ्य राष्ट्रांस समजावून दिलें,—पण आमच्या पुण्यांतील लोक पारतंत्र्यसुरी उरांत खुपसून घेतानाहि अपमानाचे सुखसोहाळे उपभोगण्यांत निमग्न. "विकत घेणारा मात्र पाहिजे, रोम शहर आहे नाहींसें उद्यां होईल" असें रोम शहराविषयींचें रोमच्या ऐन भरभराटींत आफ्रिकेच्या राजपुत्रानें केलेलें भाकीत पुणें शहरासंबंधानें १८१८ सालीं अक्षरशः खरें झालें. त्या वेळचा बारकाईनें इतिहास वाचला तर, लांच खाऊन राष्ट्रधेनूस कसायांच्या स्वाधीन करणाऱ्या नराधमांस रोकड पैशांचीहि जरुरी नव्हती; पोकळ वचनें कानांना भरपूर ऐकावयास मिळालीं कीं पुढील सर्व पिढ्यांच्या सुखावर निखारे ठेवणारी मंडळी त्या वेळीं कमी नव्हती. मालकम साहेबांनीं महाराष्ट्र भूमीस मागणी घातली, बाजीरावानें देऊं केली; एखादी पांच चार वर्षांची शेंबडी परकरी पोर देखील, बापानें भलत्या सलत्यास वर निश्चित केला असतां, रडून ओरडून आपली नाखुषी दर्शवील; पण आमच्या पुण्यांतले एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीचे लोक इतके अजागळ, इतके कर्तव्यशून्य व इतके व्यसनाधीन झाले होते कीं, त्यांना बाजीराव गेला ह्या समाधानाखालीं राज्य गमावलें ह्याची शुद्धि देखील राहिली नाहीं. बाजीरावाच्या कृतींत कांहीं त्रासलेले, पण सर्वच पूर्ण व्यसनाधीन झालेले होते. "शूर शिपायी" म्हणून नांवाजलेल्या पटवर्धन मंडळानें कोणच्या ठिकाणीं त्यावेळीं काळें तोंड केलें होतें? रास्ते, फडके, पंत वगैरे सरदार मंडळी राज्य गेल्याची दुर्वार्ता ऐकल्यानंतरहि घुबडाप्रमाणें कोणच्या अंधार कोठडींत दडून बसली होती? घोडा व भाला ह्यांना जीवापाड जपणारी बारगीर मंडळी त्यावेळीं कोणच्या माघुकाच्या गांठीकरितां घोडा भरधांव सोडीत होती? लढाईचें शिंग फुंकलेलें ऐकल्याबरोबर ज्यांनीं हातांतली कांदा भाकरी एकीकडे फेंकून भाल्या तलवारीनिशीं मैदानांत हजर व्हावें ती लढवय्यी प्रजा त्यावेळीं कायमची भोजनांत गुंतलेली कां दिसावी? पारतंत्र्यांत पुढ

होणाऱ्या उपासमाराचे डोहाळे होऊन त्यावेळीं मंडळींना खा खा तर झाली नसेलना? एरवीं चटण्या, भाज्या, सव्वा हात केळीचें पान, वगैरे कल्पनातीत तत्त्वासंबंधाचे पुणेरी ठरीव सिद्धांत स्वराज्याच्या वेळींच कसचे उत्पन्न झाले असते?

## राष्ट्रीयत्वानें भारलेला महाराष्ट्राचा इतिहास

व्यसनाधीनतेनें मराठमंडळास जर इतकें ग्रासलें नसतें, तर आमचें राज्य बऱ्याच दिमाख्यानें अद्यापहि हयात असतें. राजकीय ज्ञानांत पाश्चिमात्य राष्ट्रें आमच्यापेक्षा अतिशय पुढें गेलेलीं आहेत, तरी पाश्चिमात्य राजकीय तत्त्वें महाराष्ट्राच्या इतिहासांत जितपत आढळतील तितपत एशियांतील दुसऱ्या कोणच्याहि देशाच्या पूर्व इतिहासांत सांपडावयाचीं नाहींत. ज्यानें आमच्या धर्माला एक प्रकारचें राष्ट्रीय स्वरूप आणिलें व व्यवहार आणि परमार्थ ह्यांची उत्कृष्ट सांगड घालून दिली तो भगवद्गीता ग्रंथ संस्कृत जाणणाऱ्या दुसऱ्या कोणत्याहि देशांत महाराष्ट्राइतका वाचला जात नव्हता, व वाचला जात नाहींहि. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम वगैरे साधु कवींच्या प्रयत्नांचा संबंध राष्ट्राच्या मनावर कायमचा ठसा उमटला होता; व व्यसनाधीनतेनें तो जरी आतां फुसकट दिसतो तरी अद्याप कायम आहे. वंशपरंपरेनें एकाच व्यक्तीच्या ताब्यांत अनियंत्रित राजसत्ता असणें—हें बीज महाराष्ट्रांत उत्कृष्ट रुजलेलें दिसत नाहीं. पहिल्या राजाची सत्ता प्रधानानें, त्या प्रधानाची सत्ता त्याच्या प्रधानानें, हिरावून घेतलेली व प्रजेनें ह्या गोष्टीस पूर्ण संमति दिलेली,—असलीं उदाहरणें महाराष्ट्राच्या इतिहासांत पुष्कळ सांपडतील. महाराष्ट्राचा अधिकार एका व्यक्तीच्या अनियंत्रित इच्छेच्या स्वाधीन केव्हांहि नव्हता. सरदारसमूहास पाहिजे त्यास पेशवा करण्याचें सामर्थ्य होतें; व हें सामर्थ्य ह्या वर्गानें एकदोनदां गाजविलेंहि आहे. राज्यांतील हरएक प्रकारची मोठी उलाढाल सर्व सरदारांच्या साधारण संमतीवांचून होत नसे. इंग्रजांच्या

नगर वाचनालय, सातारा.



पुण्यांतील वकिलांचीं मुंबई सरकारास लिहिलेलीं पत्रें वाचलीं म्हणजे,पाश्चिमात्य राजकीय ज्ञानानें संपन्न झालेल्या मनुष्याला गेल्या शतकांत महाराष्ट्राच्या राज्यव्यवस्थेंत किती पाश्चिमात्य तत्त्वें गोंवलीं गेलेलीं दिसत होतीं हें सहज समजणारें आहे. गॅझेटिअरमध्यें, रामशास्त्र्यांच्या वेळेला खटल्यास प्रथम सुरवात झाल्यापासून अखेर हायकोर्टाचा कायमचा निकाल होईपर्यंत वादी मंडळीस कोणचा व कसा मार्ग आक्रमिला पाहिजे होता ह्याचें बरेंच खुलासे-वार वर्णन दिलें आहे; तें वाचलें म्हणजे आमच्या न्यायपद्धतींत पाश्चिमात्य राजतत्त्वें किती गुंफलेलीं होतीं, हें कोणासहि दिसणारें आहे. "Rome was not built in a day;" "Constitutions are to grow and not to be made;" वगैरे प्रमेयें नीट ध्यानांत ठेवलीं तर प्रत्येक विचारी माणसास म्हणावें लागेल कीं, पाश्चिमात्य राष्ट्रांचा बिलकुल संबंध न घडतां जर एशिया खंडांत पाश्चिमात्य राजतत्त्वांवर राज्यपद्धति उत्पन्न व्हावयाची असती तर ती महाराष्ट्रांतच झाली असती. आमच्यांत एकसत्तात्मक राज्य नव्हतें तर अनेक सत्तात्मक होतें. सरदार मंडळी खरी सत्ताधारी होय. शिवाय बड्या राजक्रांतीच्या पूर्वीच्या फ्रान्स देशाप्रमाणें आमच्या देशांत सरदारांची जात नव्हती; आपल्या गुणांनीं कोणासहि सरदार होतां येत असे. मराठे सरदार आहेत, शूद्र सरदार आहेत, मुसलमान सरदार आहेत, रामोशी सरदार आहेत, धनगर सरदार आहेत, दासीपुत्र सरदार आहेत, ब्राह्मण सरदार आहेत. जातिभेद सरकार कचेरींत नव्हता, दरबारांत त्याचा मागमूस नव्हता, सार्वजनिक कृत्यें करण्याच्या ओसरीवर त्याला थारा मिळत नव्हता, लढाईच्या जागीं हा भेद अभेदाप्रत जाई; दिवाणखान्यांत होता नव्हतासा भासे, माजघरांत जेवायच्या वेळीं फिक्का फिक्का दिसे; त्याचें माहात्म्य कायतें देवघरांत व स्वयंपाकघरांत. गुणांची चहा होणें, सन्माननीयांस मान मिळणें, पूज्यांची पूजा होणें, शूरास सरदारकी मिळणें, शहाण्यानें दिवाणगिरी मिळविणें—ह्या

गोष्टींशीं महाराष्ट्रांत तरी जातिभेदाचा संबंध नव्हता. गुण आहे तेथें सरदारकी आहे. तेव्हां राष्ट्रांतील उत्कृष्ट उत्कृष्ट लोकांच्या ताब्यांत सर्व अधिकार होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिवाजीनें फार पूर्वी पेरलेलें व थोरले माधवरावांनीं पुनरुज्जीवन करून बऱ्याच वाढीस आणलेलें राष्ट्रीयत्व पुढील दोन कारकीर्दींत फोंफावलें असतें तर महाराष्ट्राकडे डोळे वटारून बघण्याची पाश्चिमात्यांची छाती झाली नसती. रावबाजींनीं दक्षणेचें उदक सोडसोडून घटलेल्या हातानें आमच्या सर्वस्वाचें मालकमच्या हातावर पाणी ओतलें, त्यावेळीं देखील व्यसनाधीनता महाराष्ट्राच्या अंगांत पुरी मुरलेली नव्हती. पाश्चिमात्य राजकीय उच्च शिक्षणाच्या काव्याशीं जर आम्हांस सामना करावयाचा नसता, सुखोपभोगाच्या धुंदीनें आंधळे बनल्यामुळें महाराष्ट्रीयांस एशियामधील दुसऱ्या कोणच्याहि एकदोन राष्ट्रांनीं मिळून जरी पादाक्रांत केलें असतें, आमच्याशीं विरुद्ध असणाऱ्या हिंदुस्थानांतील पाश्चिमात्य शिवायकरून दुसऱ्या सर्व राजसत्तांनीं जरी एकवट होऊन आम्हांस जिंकलें असतें, तरी देखील महाराष्ट्र देश, व्यसनाधीनतेनें आलेली सुस्ती झाडून टाकून, तेव्हांच सावध होऊन स्वतंत्र झाला असता; कारण आमची राज्यपद्धतीच अशा जोमाची होती, आमची धर्मनीतीच अशा जोराची होती.

## गोजिरवाणा इंग्रजी अंमल

परंतु आमच्या दुर्दैवानें म्हणा, सुदैवानें म्हणा, इंग्रजांसारखे काबेबाज, हुषार व पाश्चिमात्यांत पक्के मारवाडी लोक आमच्या छातीवर आले; आणि पराधीनतेच्या भयंकर अंजनानें आम्हीं शुद्धीवर न येतां व्यसनाधीनतेचा मद अधिकच वाढला. कर्मधर्मसंयोगानें एल्फिन्स्टन सारख्या हुषार मुत्सद्याच्या हातांत महाराष्ट्राचीं राजसूत्रें पडल्यामुळें आम्हांस इंग्रजी अंमल गर्दभाच्या अर्भकाप्रमाणें फार गोजिरवाणा वाटला; पारतंत्र्याची सुरी " तिखट " न लागतां गुळचटच वाटली. एल्फिन्स्टन साहेबांची आमच्यांतील जुनी बुड्ढी मंडळी

देखील एवढी तारीफ कां करिते? त्यांच्या जमिनी त्यानें तत्पुरत्या तशाच राखल्या, त्यांचे अधिकार तत्पुरते तसेच ठेवले, त्यांचे मानपान तत्पुरते तसेच पाळले, जणूं काय रावबाजी गेले आणि आलफिस्टन फांकडा एकटाच आला; बाकी सर्व पूर्वीप्रमाणें! सरदार, देसाई, देशपांडे, पाटील, कुळकर्णी, सर्वांना, झाडून पूर्वी होते ते आणि नव्हते ते देखील अधिकार व मान दिले. पटवर्धनांना पेशव्यांनीं दिलेले व अंदाधुन्दीच्या वेळीं आडपडदा गट्ट केलेले सर्व प्रांत बहाल केले, कोणाला नाखूष म्हणून केलें नाहीं. कारण इंग्रज लोक त्यावेळीं समजून होते कीं, सरदार व मानकरी मंडळींनें काहूर माजविल्यास पुण्यास पुन्हां भगवा झेंडा फडकेल. वेस्टमेमॉयर्समधील, पटवर्धन व इतर संस्थानिकांसंबंधाचे वरील प्रकारचे उद्गार, एल्फिन्स्टन साहेबांच्या दातृत्वाची शिफारस करितांना अवश्य लक्षांत घेतले पाहिजेत. घटोत्कची मायावी बाजारांला आमची आळशी मंडळी पुरी फसली; नवा सुंदर पाहिजे तेवढ्या मोलाचा जिन्नस घ्यावा, जुना तेवढा किंमतीदाखल द्यावा. इनामें घ्या, संस्थानें घ्या, मान घ्या, किताब घ्या, आणि किंमत काय द्या? कांहीं नाहीं! इनाम जमिनींच्या उत्पन्नावर खुशाल चैन मारा; एकाच्या ठिकाणीं दोन अंगवस्त्रें बाळगा; उपभोग पुढील सर्व पिढीचे एकदम भोगून घ्या; इंग्रज सरकार एका चकार शब्दानेंहि तुम्हांस बोलणार नाहीं, विलासाच्या सुखांत किमपिहि दुखविणार नाहीं; फक्त पूर्वजांचें अस्सल तेज हलके हलके गमावत गेलें पाहिजे. जहागिऱ्या पाहिजे तशा चालवा, पूर्वीप्रमाणें लढाईत मरायला नको, ही कामगिरी उरक, त्या कामगिरीला हात घाल, असली कांहीं रिकामी दगदग करायला नको. सर्व कांहीं सोपें सुख यथेच्छ लुटावें; फक्त पूर्वजांचा पीळ हलके हलके सोडीत गेलें पाहिजे. दुसऱ्या चार्लसच्या वेळच्या इंग्लंडांतील व्यसनाधीनतेहून आमची व्यसनाधीनता त्यावेळीं अधिक भयंकर नव्हती, पण निराळ्या स्वरूपाची होती. प्युरिटन अंमलांत नीतिमत्तेच्या कडक नियमांनीं

गांजलेल्या मनांनीं उलट दिशेला धांव घेतल्यामुळें उत्पन्न झालेली व्यसनाधीनता निराळी, व विलासी मुसलमानांच्या सहवासानें हलके हलके आमच्यांत शिरलेली, रावबाजीच्या अनन्वित कृत्यांनीं बरीच पोसलेली व प्रथमच्या इंग्रजी अंमलदारांनीं जाणून बुजून माजवलेली आमची व्यसनाधीनता निराळी. हलकेच नकळत हृदयांत चोंच खोंचून सर्व रक्त शोषून घेत असतांना सावजास दुःख होऊं नये म्हणून पंखांनीं वारा घालणाऱ्या पक्षाप्रमाणें प्रथमच्या इंग्रजी अंमलाची स्थिति होती. राष्ट्रांतील उत्पन्नदार, इनामदार, जहागीरदार मंडळींना कांहींहि कामगिरी न सांगतां पोळाप्रमाणें वाढविणें म्हणजे त्यांच्यावर पोळाचींच कर्तव्यकर्में पर्यायानें लादण्यासारखेंच आहे.

## कामवासनेचा अतिरेक

पेशवाई बुडाल्यानंतरच्या पहिल्या तीस वर्षांत नांवाजलेल्या आमच्या मंडळीच्या कथा ऐकिल्या कीं राष्ट्राच्या कामवासना किती बळावल्या होत्या ह्याची कल्पना येते. स्वराज्यांतील कवि पोवाडे रचीत, नंतर लागलेच आले त्यांनीं तमाशांस भरती आणली. ज्ञानोबांनीं प्राकृत भाषेस गौरव आणिलें; एकनाथांनीं प्राकृत भाषेची सेवा केली; तुकारामबुवांनीं प्राकृत भाषेंतच विठोबाचीं गीतें गाइलीं; मोरोपंतांनीं प्राकृत भाषेसच नटविली; अठराव्या शतकांतील सर्व साधूंनीं, कवींनीं प्राकृत भाषेसच मानमान्यतेस चढविलें; संस्कृताभिमानी पंडितांस तिच्या चरणीं लवविलें. पण एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या तीन चरणांत प्राकृत भाषा अचकट विचकट तमाशांतील लावण्यांनीं इतकी थपथपली कीं, मराठींत इतर ग्रंथ आहेत कीं नाहींत ह्याची भ्रांत पडून "सभ्य" म्हणून टेंभा मिरविणाऱ्या हरएक जातींत "प्राकृत" शब्दाचा अर्थ छांदिष्ट रंगेल्यासहि लाजविणारी लावणी असा झाला आहे. ह्या मधील काळांत लावण्यांचा भर विशेष असल्याकारणानें पोवाड्यांचा इतका लोप झाला कीं, अजूनहि हायस्कूलचें काम बरींच वर्षें करणारा हेडमास्तर देखील

नगर वाचनालय, सातारा.


पोवाडयांचीं नवीन पुस्तकें बक्षिसाच्या यादींतून काढून टाकतांना "पोवाडयाचीं–लावण्याचीं" पुस्तकें मुलांच्या हातांत पडून काय उपयोग?–असा शेरा निर्धास्तपणें टोकतो! प्रि. गोळयांनीं दिलेल्या अवलोकनशून्यतेच्या पुष्कळ उदाहरणांपैकीं तर हें एक खरेंच; परंतु मर्दानी मनोविकारांची हृदयांतून झालेली पिच्छेहाट व त्या जागीं जनानी विकारांचा पडलेला पगडा–आमच्या ह्या स्थित्यंतराचें वरील उदाहरण चांगलेंच द्योतक आहे.

पुण्यांतील बुद्धी मंडळी पुण्याच्या एका प्रसिद्ध शास्त्र्याच्या विशाल बुद्धिसामर्थ्याविषयीं आज कितीएक वर्षें सांगत असलेली गोष्ट, कान व डोळे नेहमीं उघडे ठेवण्याविषयीं बाणा मिरविणाऱ्या प्रिन्सिपॉल साहेबांस अवगत असेलच. विश्वयोषितांच्या घरीं हे शास्त्री कसे लोळत पडत, वेदपठन करणाऱ्या वेडुकांस कशा शिव्या देत, ह्यांची खोड मोडण्याकरितां पेशवाईच्या ऱ्हासावर गबर झालेल्या घराण्यांतील एका प्रसिद्ध कर्त्या पुरुषानें सात दिवसांच्या यज्ञास आरंभ करून अध्वर्यूची सुपारी आदल्या दिवशीं सायंकाळीं शास्त्रीबुवांचे हातीं कशी दिली, किमपिहि न डगमगतां अर्धरात्र शास्त्रीबुवांनीं नेहमींप्रमाणें मातुकाच्या शय्येवर कशी काढली, उत्तरार्धांत एकदांच नवीन पोथीचीं पानें वाचून वेदमंत्र कसे तयार केले, यजमानांनीं तामनभर देऊं केलेली दक्षणा–"बडबडण्याच्या कामाबद्दल कोण एवढा मोबदला घेतो" म्हणून शास्त्रीबुवांनीं कशी झिडकारली, वगैरे गोष्टी पुण्यास बहुतेकांस माहीत आहेत. प्रसंगविशेषीं सर्वश्रेष्ठ न्यायासनावर बसून धर्मन्याय देण्याची जबाबदारी ज्यांच्या शिरावर, धर्माचरण कोणचें हें समजून देण्याचें ज्यांचें कर्तव्यकर्म –तीं सर्व–श्रेष्ठ विद्वान रत्नें देखील आपल्या अत्युच्च कोंदणांतून निसटून दुर्गंधींत पाडणाऱ्या उतरणीवर कशीं घसरत होतीं– हें वरील विवेचनावरून स्पष्ट दिसणारें आहे. नाना फडणविसासंबंधाच्या असत्य दंतकथा, कारकुनी बाण्याच्या अनीतीचीं प्रमेयें, ज्ञान व शुद्धाचरण ह्यांच्या बेबनावाच्या गोष्टी,

ह्या सर्वांस सांप्रत शतकाच्या दुसऱ्या चरणांत अत्यंत ऊत आला; व अजूनहि "गोष्टी सांगणारे" म्हातारे ह्याच गोष्टी राष्ट्रभर पसरीत आहेत. मुत्सद्यांस शुद्धाचरण व नीति गेल्या शतकाच्या अखेरीपासूनच समजेनाशी झाली. कारस्थान म्हणजे अनीतीचें माहेरघर ही गोष्ट त्याचवेळीं निर्विवाद ठरली. सरदारांनीं प्रथम चरणांत नीतीस कायमची सोडचिठ्ठी दिली व पुढें पुढें समाजस्थिति इतकी बिघडत चालली कीं नीतिशास्त्र व धर्मशास्त्र यांच्या अध्वर्यूंनीं केलेलीं कुकर्में लोक मोठ्या गोडीनें सांगूं लागले व ऐकूंहि लागले.

## शरीरशक्तीच्या ऱ्हासाचा अनुक्रम

अर्धें शतक अखेरचा अनीतीच्या वाढत्या कलेचा हा इतिहास झाला. व्यसनाधीनतेनें शरीरें क्षीण क्षीण होत चाललींच होतीं, चैन अंगांतील धमक व रक्त धुवून नेतच होती, विषयासक्तीनें उदात्त विचारांस ओहोटी लागलीच होती; अशावेळीं ह्या चाळीस वर्षांत शरीरें पुष्ट करणारीं द्रव्यें आम्हांस नकळत हलके हलके सोडून जाऊं लागलीं, शरीरावर उग्र तेज राखणारा व्यायाम आमचीं शरीरें न कळत विसरूं लागलीं, पराधीनतेमुळें उच्च स्फूर्ति जागृत करणारीं कृत्यें पहावयास व ऐकावयास न सांपडल्यामुळें मनें शुष्क व रिक्त झालीं. स्वराज्यांत लष्करी पेशाचे सर्व खेळ प्रत्येकास यावे लागत व म्हातारपणींहि त्यांची चांगली उजळणी ठेवावी लागे. स्वराज्य पाहिलेल्या पिढींत ही व्यायामाची संवय चांगली खिळली होती. दुसऱ्या पिढीची मंडळी घोड्यावर बसणें, दांडपट्टा फिरविणें, निशाण मारणें, शिकारीस जाणें, ह्यापैकीं यौवनदशेंत कांहीं जाणत होती. स्वतःप्रमाणें शिक्षण देण्याच्या हेतूनें त्यांच्या वडिलांनीं त्यांना हें शिक्षण दिलें होतें. व्यायामांत विशेष गोडी उत्पन्न करणारी धमक शरीरांत असे तोंपर्यंतच वरील मंडळी हे खेळ खेळली. उतार वयांत व्यसनाधीनतेनें ह्यांना विशेष शैथिल्य आलें व व्यायामास ह्यांनीं फाटा दिला. तिसरी पिढी लहानपणीं सर्व गोष्टी शिकली इतकेंच. मोठ्या वयाचा

भारदस्तपणा राखण्याचा सदुपाय म्हणजे व्यायामाचा त्याग करणें–हा मागील पिढीचा धडा त्यांनीं यौवन दशेंतच उचलला. प्रसंगविशेषीं घोड्यावर बसावें, व आश्रित वगैरे मंडळींनीं रमविण्याकरितां इतर खेळांत जत्रेच्या ठिकाणीं दाखविलेलें कौशल्य प्रौढपणानें पहाण्यास घटकाभर जावें–ह्याशिवाय व्यायामा-संबंधीं कोणचेंहि कर्तव्यकर्म बजावलें जात नसे. ह्या पिढीची मंडळी देखील आमच्यापेक्षां फार सशक्त दिसे; कारण व्यसनाधीनतेनें शक्तीचा होत जाणारा -हास पुरा दृष्टीस पडावयास आणखी एखादी पिढी जावयास पाहिजे होती; शिवाय धार्मिक बाबतींतही हल्लींच्याप्रमाणें बलबलपुरी माजली नव्हती. त्यांच्या धर्मकल्पना हलक्या सुखोपभोगाच्या विशेष आड येणाऱ्या नसोत; स्वराज्यांतील भयंकर जबाबदारीचीं कृत्यें करण्याची सवय मोडल्यामुळें व तदनुषंगानें उत्पन्न होणाऱ्या सार्वत्रिक उदात्त मनोविकारांच्या अभावामुळें अंतःकरणांत वनत गेलेलें दड्डु रान सोज्वल करण्याइतकी त्यांच्या धर्मकल्पनेंत मगदुरी नसो; मनाला चटका लावून अंतःकरण तल्लीन झाल्यामुळें उच्च मनोवृत्तींस यथेच्छ उचंबळूं देणाऱ्या स्वातंत्र्याभिमानाच्या अभावीं मन आंतल्याआंत घुटमळल्यामुळें नीच विकारांकडे त्यानें घेतलेल्या उलट धांवेस आळा घालण्या-इतका त्यांच्या धर्मकल्पनेंत जोम नसो–ठरीव धर्माचरण, ठरीव धर्मपद्धति म्हणून कांहीं त्यावेळीं होतें व तत्संबंधीं लोकांचीहि श्रद्धा बरीच खरी होती. एकंदरींत, इंग्रजी शिक्षणाच्या अवल अंमलापूर्वीं आमच्यांत इतक्या गोष्टी होत्या.—

( १ ) दारिद्र्याचा नुसता भास होऊं लागला होता, म्हणजे शरीराला पुष्टी आणणाऱ्या साहित्यांची आम्हांस विशेष उणीव नसे.

( २ ) पूर्व वयांत तरी व्यायाम चांगला झाल्यामुळें शरीरें तयार होत.

( ३ ) आपणाकडे मनास पूर्ण ओढून धरल्यामुळें नीच विकारांकडील त्याची ओढ नाहींशी करणारे ऐहिक उदात्त विचार त्यांच्यांत नव्हते; तथापि

लेचेपेचे, विसरतां विसरतां आपण होऊन मुरदाडपणानें शिल्लक राहिलेले पारमार्थिक विचार कायम होते.

आतां ज्यांचीं मुलें अशक्त व जे स्वतः फार दिवस जगत नाहींत म्हणून ओरड आहे त्यांची स्थिती कशा प्रकारची आहे ह्याचा विचार करूं. हल्लीं कर्तीसवरती मंडळी व्यसनाधीन किती आहे ह्याची साक्ष कोणीही देऊं शकेल. दारू व विषयोपभोग ह्यांच्यायोगें ज्यांची शक्ति छिन्नभिन्न झाली आहे ते अल्पायुषी व्हावेत, त्यांचीं मुलें बाल्यावस्थेंत देखील दमेखोर असावींत, यांत नवल तें कसलें ? व्यसनांच्या तडाक्यांतून हल्लीं कोण सुटले आहेत ?—असा जर प्रश्न केला तर निर्मल मंडळींत व्यसनाच्या खर्चाइतका पैसा जवळ नसलेलीच मंडळी पुष्कळ दृष्टीस पडेल. इंग्रजी शिक्षणानें आम्हाला पवित्र बनविण्याऐवजीं आमच्या विषयोपभोगाला वैचित्र्य आणून व्यसनाधीनतेंत अधिक प्रेमा उत्पन्न केला. ज्यांच्या घरांत कित्येक पिढ्या दारू हा शब्दही ठाऊक नव्हता ती मंडळी आज "थोडकी दारू पिणारी मंडळी स्थापूं या" म्हणून सभा भरवीत आहे. शहाण्यासुरत्यांना "बेतानें दारू" प्यावयास लावणाऱ्या मंडळ्यांची आवश्यकता वाटूं लागली आहे. कोणा प्रसिद्ध शिक्षकास दारू पिणें अनावर झाल्यामुळें पेन्शन घेणें भाग पडतें, कोणा प्रोफेसरांस दारू व त्याच्या जोडगोळीच्या दुसऱ्या व्यसनाच्या पायीं अकालीं मृत्युमुखीं पडावें लागतें. चांगला गाणारा असूं द्या, कुशल नट असूं द्या, फरडा लेखक असूं द्या; चलाख वकील घ्या, मोहक बोलका घ्या; तरतरीत वैद्य पहा, हुशार सरकारी नोकर पहा, पैसेवाला सावकार घ्या, विशिकांत खपलेला पेन्शनर न्याहळा,—सर्व एका माळेचे मणी, प्रत्येकाच्या चेहऱ्यावर व्यसनाच्या जोडगोळीपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी गोळीची खूण सांपडावयाचीच. इंग्रजी "शिक्षणानें" उदात्त मनोवृत्ति प्रबल न होतां शारीरिक आरामाच्या नवीन कल्पना मात्र आमच्यांत शिरल्या. खरोखर पहातां हा शिक्षणाचा परिणाम नव्हे; तर चुकीनें घेतलेल्या

इंग्रजांच्या उदाहरणामुळें अधिक नासलेल्या परिस्थितीचा हा परिणाम होय. विषयोपभोगाकडे आमचा पूर्वीपासूनचा कल होताच, त्यांत परकीयांच्या अनुकरणानें बाटली-वयेची विलक्षण भर पडल्यामुळें आगींत तेल ओतल्याप्रमाणें आमची व्यसनाधीनता अत्यंत माजून तिचें अकाळविकाळ स्वरूप आतां सर्वत्र दिसूं लागलें आहे. नवीन विद्वान काय करील ना काय नाहीं, त्याच्या कृतीला ताळ ना तंत्र, अशी स्थिति दहा पंधरा वर्षांपूर्वी होती. प्रिन्सिपाल साहेब ह्या स्थितीचें अभिनन्दन करोत, आमच्या मतें उच्च शिक्षणाचा ह्या मंडळीनें अत्यन्त दुरुपयोग केला. बर्क, बेकन, मिल्ल सारख्या तत्त्ववेत्त्यांचे उदात्त विचार वाचून शिकून, अभ्यास करून, वाईट परिस्थितीमुळें उचंबळणाऱ्या दुर्विकारांच्या लाटा जागच्याजागीं जर जिरवितां येत नाहींत, तर उच्च शिक्षणाचा उपयोग तो काय झाला ? शेक्सपियर, स्कॉट सारख्या कवींचीं उदात्त मनोविकारांच्या सुरस वर्णनांनीं परिप्लुत असलेलीं काव्यें वाचून, हीन वृत्तीस भेटण्याकरितां सैरावैरा धांवणाऱ्या मनास जर आळा घालतां येत नाहीं तर बुद्धीला व शरीराला ह्यांनीं व्यर्थ झिजविलें असें होत नाहीं काय ? संस्कृत व इंग्रजी उत्कृष्ट ग्रंथांतील उत्तमोत्तम विचारांच्या अतिरेकानें भणभणलेलें डोकें विश्वयोषितांच्या मांडीवरच जर विश्रांतिसुख पावूं शकवें, जगांतील उत्कृष्ट कवींनीं वर्णिलेल्या उत्कृष्ट मनोविकारांनीं खवळलेलें हृदय जर मदिरेच्या घुटक्यासरशीं शांत पडतें-तर कवि व तत्त्ववेत्ते ह्यांनीं आपापल्या परी सदाचाराची गाइलेली व सिद्ध केलेली महति आमच्या विद्वानांच्या कानावर निष्फळ घातली असें होत नाहीं काय !

## ' न हिंदुर्न यवनः '

साक्षी खोटें सांगतील, कागदपत्र बनावट करितां येतील, वकिली डावपेंचानें आहे त्याहून भलतेंच स्वरूप भासवितां येईल; पण वस्तुस्थिति जरा देखील बदलतां येत नाहीं. ज्या गोष्टी प्रत्यक्ष आहेत, त्या सिद्ध करीत बसण्याचें काय प्रयोजन ! त्यावर रंग चढवून निराळ्या भासविण्यांत काय हेतु ! आहे तें

आहे; नाहीं तें नाहीं. पांडित्यानें ' आहे ' चें ' नाहीं ' व्हावयाचें नाहीं, किंवा ' नाहीं ' चें ' आहे ' व्हावयाचें नाहीं. आजची कर्तीसवरती पिढी, म्हणजे पंधरा वीस वर्षांपूर्वी शिक्षणक्रमांतून बाहेर पडलेली मंडळी, व त्यांच्या पाठीमागून लगेच आलेली मंडळी कशी व्यसनाधीन आहे ह्याची साक्ष कोणीही देईल. स्वार्थ व शरीरसुख ह्यांच्या भक्कम पायावर इमारत उठविण्याचा यांचा प्रयत्न, म्हणून कांहींच साधत नाहीं. पूर्वीच्या व्यसनाधीनतेस विशेष नक्षीदार व मोहक स्वरूप यांनीं आणिलें, परोपरी उत्पन्न करून तिचे आकर्षक गुण ह्यांनीं वाढविले, परकीयांचे नवीन नवीन प्रकार तिच्यावर लादून सुशिक्षित मनास विशेष चटक लावण्याइतकें तीस त्यांनीं सजविलें.

दारिद्र्याचें विराट स्वरूप ह्याच वेळीं प्रकट होऊं लागलें. स्वराज्य गमावलें त्याच वेळीं आमच्यांत वसण्यास दारिद्र्यास जागा मिळाली. रोगाचीं पूर्व चिन्हें कोणासही कळत नाहींत, रोग बळावल्यावर मनुष्य शुद्धीवर येतो. तद्वतच दारिद्र्याच्या भावना आम्हांस प्रथम उमगल्या नाहींत. आतां सर्व स्वच्छ झालें आहे, सर्व कांहीं समजूं लागलें आहे, चोहोंकडे प्रकाश लख पडला आहे.

इंग्रजी न शिकलेली मंडळी देखील व्यायामापासून कशी कशी पराङ्मुख होत गेली हें मागें सांगितलेंच आहे. दारिद्र्याच्या भरभराटीमुळें व परकीयांच्या कांहीं कांहीं कायद्यांचा अंमल जोराचा झाल्यामुळें पूर्वींच्या व्यायामाच्या पद्धति आम्ही अजीबात विसरलों. स्वाभाविक रीतीनें व उच्च मनोविकाराच्या उल्हासानें होणारा व्यायाम अगदीं बंद पडला. केवळ व्यायामाकरितां व्यायाम करायाचा, पुष्ट शरीर असावें एवढ्यांतच केवळ प्रेम वाटून मेहनत करायाची— असला प्रकार शिल्लक राहिला. व्यसनाधीनतेनें व्यायामाचा कंटाळा आलेला; व्यायाम करायास लावणारे सर्व उच्च हेतु नष्ट झालेले; इंग्रजी ठिकठाकीच्या ऐटीमुळें पूर्वींची तालमीची पद्धत मनांतून उतरलेली; कांहीं अंशीं दारिद्र्यामुळें

नगर वाचनालय, सातारा.



कांहीं अंशीं व्यसनी बनल्यामुळें, मिरवावयास सवड देणारे "घोड्यावर बसण्या" सारखे व्यायाम देखील लुप्त होत चालले; मग हवापाण्यावर अशक्ततेची सर्व जबाबदारी टाकण्याची स्फूर्ति व्हावी हें रास्तच.

"न हिंदुर्न यवनः" "स्वार्थ नाहीं परमार्थ नाहीं" "इहलोक नाहीं परलोक नाहीं" "जडवादी नास्तिकांच्या नीतिमत्तेचा जोरही नाहीं; धर्मश्रद्धेचें पाठबळही नाहीं" अशी कांहीं विलक्षण धर्मसंबंधी आमची स्थिति झाली आहे. इंग्रजी शिक्षणानें धर्मविचारासंबंधानें आम्हांस उदासीन केलें आहे. ह्या योगानें पारमार्थिक उदात्त कल्पना व त्या तपानें होणारें शुद्धाचरण हीं नाहींतशीं झालीं. धर्मकल्पनांनीं जुन्या पिढीच्या मनांतील जो एक भाग व्यापला होता तो भाग इंग्रजी शिक्षणानें मोकळा पाडला; त्या जागीं व्यसनाधीनतेनें आपला पसारा पसरला. मन हें जात्यासारखें आहे. तें नेहमीं गरागर फिरत राहावयाचेंच. त्यांत तुम्हीं गहूं घातल्यास उत्तम रवा मिळेल; पण कांहीं न घातल्यास तें झिजून झिजून पिचून जाईल. उच्च मनोविकार, उच्च विचार नाहींतसे होण्याबरोबर नीच विकार आपली वरूहत जारीनें वाढवूं लागतात. इंग्रजी शिक्षणाच्या पूर्वीच्या पिढींत राजकीय संबंधाचे—ऐहिक गोष्टीविषयींचे—उच्च विकार व विचार कसकसे नाहींतसे होत गेले हें सांगितलेंच. पाश्चिमात्य राष्ट्राची बुद्धि पारमार्थिकपेक्षां ऐहिक विषयांवर अतिशय खर्च झाली असल्यामुळें, निवळ ऐहिक उन्नत विचार त्यांच्यांत अत्यंत पूर्णत्वास आले आहेत. धर्मकल्पनांशीं कोणत्याही रीतीनें संबंध न ठेवतां राष्ट्रीयत्वाची कल्पना त्यांनींच उत्कृष्ट पूर्णत्वास आणली आहे; धर्मास मागें सारून राजकीय कल्पनांची अत्यंत चलती त्यांनींच केली; धर्माच्या पायावरून ओढून काढून नीतिमत्तेस त्यांनींच ऐहिक उदात्त कल्पनांच्या मजबूत किल्ल्यांत सुरक्षित बसविलें; ऐहिक उन्नत विचारांनीं भरलेल्या इंग्रजी शिकणाऱ्यांच्या मनांत पूर्वीच्या मंडळींत नव्हते ते गुण उत्पन्न व्हावयास पाहिजे होते. परंतु गाढ निजलेल्याच्या

डोळ्यांत झणझणीत अंजन एकदम घातलें असतां तो जसा भांबावून जातो तशी स्थिति ह्या पिढीची झाली. इंग्रजी शिक्षणानें ऐहिक उन्नत विचार अंशतः तरी सांप्रत उत्पन्न केले आहेत–ह्याविषयीं पुढें आम्हास लिहावयाचें आहे. सध्यां एवढी गोष्ट सांगणें बस्स आहे कीं, इंग्रजीच्या पहिल्या पिढींत ते गुण तादृश्य नव्हते; त्यांच्यामागून आलेल्या पिढींत जरा रुजले; व आतां कुठें पोसूं लागले आहेत.

## ऱ्हासाचीं कारणें

आज ज्या तरुण मंडळीच्या शरीरऱ्हासाविषयीं एवढा ऊहापोह चालला आहे, त्यांच्या मागची मंडळी–म्हणजे ज्यांच्या हातांत ह्या तरुणांचीं शरीरें व मनें तयार करण्याचें होतें–ती मंडळी एकंदरींत कशा स्वरूपाची होती तें पाहूंयाः–

( १ ) ह्यांना दारिद्र्य छळूं लागलें होतें.

( २ ) धार्मिक कल्पना ह्यांच्यांत नाहींशा झाल्या होत्या. ह्या ओसाड पडलेल्या मनाचा भाग नीच वृत्तींनीं पूर्ण व्यापला होता. ऐहिक विचारां-संबंधाचा पूर्वीपासून ओसाड व पड झालेला मनाचा भाग इंग्रजी शिक्षणानें ह्यांचे वेळीं बिलकूल सोज्वळ झाला नाहीं. सर्व मन नीच वृत्तींच्या ताब्यांत गेलें व त्यामुळें पूर्वीच धष्टपुष्ट झालेली व्यसनाधीनता अनिवार बोकाळली.

( ३ ) व्यायामाचा अत्यंत अभाव झाला इतकेंच नव्हे तर उलट तिटकारा उत्पन्न झाला.

( ४ ) पूर्वीपासून सांचत आलेल्या शरीरऱ्हासाचीं चिन्हें ह्या मंडळीवर चांगलीं दिसूं लागलीं.

अशा प्रकारच्या शारिरिक, मानसिक, नीच स्थितीच्या मंडळीच्या तालमींत तयार झालेलीं तरुण मंडळी मोबट असावी व त्यांच्या मागोमाग येणारी हलीं शिक्षणक्रमांत असलेली मंडळी फिकट दिसावी ह्यांत आश्चर्य तें कोणतें !

...वाचनालय, सातारा.



आमच्या मतें शारीरिक ऱ्हासाचीं कारणें हीं आहेतः-( १ ) दारिद्र्य. ( २ ) उच्च विचार व मनोविकार ह्यांचा अभाव. राष्ट्राचें मन वेधून सोडणारा असा उदात्त विचारही नाहीं, विकारही नाहीं, त्या योगें माजलेली व्यसनाधीनता. ( ३ ) वरील गोष्टींचा नैसर्गिक परिणाम म्हणजे व्यायामाचा तिटकारा.

प्रिन्सिपाल साहेबांनीं प्रधान कारण गणलेली शिक्षणपद्धति गौण कारणापैकीं एक आहे. प्रिन्सिपाल साहेबांनीं हल्लींच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक चळवळींवर प्रदर्शित केलेल्या आगंतुक मंडळीची भेट घेतांना आ पसरून बसलेल्या सांप्रतच्या सर्वस्व हानीच्या तडाक्यांतून सुटण्याचे कोणते मार्ग आहेत ह्याचा विचार करण्याचें योजिलें आहे. टीकाविषयक पुस्तकांतील प्रधानदेवता जी शिक्षणपद्धति तिच्याकडे वळणें आतां जरूर आहे.

# * ब्राह्मण आणि त्यांची विद्या–लेखांक तिसरा

## शिक्षणपद्धति

आमच्या शारीरिक ऱ्हासाचीं सार्वत्रिक कारणें कोणचीं आहेत, हें वर ठरविण्यांत आलेंच आहे. परवशतेमुळें चोहोंकडून कोंडमारा करणारें दारिद्र्य जर नसतें; गाफिलपणानें बेसावध होऊन व्यसनाधीनतेच्या तावडींत सांपडल्यामुळें हीन दशेस पोंचलेल्या मानसिक क्षेत्रास सोज्वल करण्याचा जर आम्हीं प्रयत्न जारीनें केला असता; स्वातंत्र्याच्या काळांत साहजिकपणें ध्यावयास लागणारा व्यायाम जर आम्हीं यत्नेंकरून तसाच पुढें चालू ठेवला असता; तर प्रिन्सिपाल साहेबांस, बसलेल्या गालांत, खोल गेलेल्या डोळ्यांत, बाहेर पडलेल्या छातीच्या हाडांत, व हातापायांच्या काड्यांत, शिक्षणपद्धतीनें उडविलेला भयंकर कहर जो दृष्टीस पडतो तो खात्रीनें दृष्टीस पडला नसता; आम्ही वर नमूद केलेल्या कारणांच्या अभावीं आमचा विद्यार्थीसमूह इतका खचलेला दिसला नसता. गिरणींत ज्याप्रमाणें एकदां कापसाचा गठ्ठा यंत्राच्या तोंडांत दिला असतां तो बारीक सुताच्या रूपानें बाहेर पडतो, त्याप्रमाणें हल्लीं आमची मंडळी मराठी पहिल्या इयत्तेंत एकदां शिक्षणक्रमाच्या दाढेंत सांपडली कीं, पीठ होऊन भरडून बाहेर पडते,–हें प्रिन्सिपालसाहेबांप्रमाणें आम्हालाहि मान्य आहे. ही शिक्षणपद्धति दोषांनीं भरलेली आहे खरी, पण हल्लींच्या ऱ्हासाला तिलाच सर्वथैव जबाबदार धरणें चुकीचें होणार आहे.

युरोप खंडांत व अमेरिकेंत प्रिन्सिपाल साहेबांनीं सुचविलेला शिक्षणक्रम अलीकडेच सुरू झाला आहे. सुधारलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांत कांहीं वर्षांपूर्वीं

---

* विविध ज्ञान विस्तार–मे–जून १८९६.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

आमच्यासारखीच शिक्षणपद्धति सुरू होती; आमची शिक्षणपद्धति तिकडूनच उसनी आणलेली आहे. ही पद्धत सुधारण्याचा क्रम त्यांनीं झपाट्यानें सुरू ठेवला आहे खरा; नवीन शोध करून, निरनिराळा अनुभव पाहून, शिक्षण-क्रमास जास्ती जोमानें स्वरूप येत चाललें आहे हें खरें; परंतु ज्या अवधींत आमच्या इकडील शिक्षणपद्धति युरोप अमेरिकेंत जारीनें सुरू होती, तेवढ्या काळांत विशालबुद्धीच्या मुत्सद्यांची, शोधक तत्त्ववेत्त्यांची, चलाख सेना-नायकांची, अथवा सुदृढ व सुसंपन्न नागरिकांची परंपरा मध्येंच तुटून पडलेली इतिहास दाखवीत नाहीं. ही शिक्षणपद्धति चालू असतां पाश्चिमात्य राष्ट्रांची पिछेहाट झालेली नाहीं; मग आम्हांलाच ही पद्धति रसातळास कां पोंचविते? नवीन शोधांची उपयुक्तता ह्या पद्धतींत नसो, पण ही पद्धति चालू असतां कस-न-कस पिळून न काढण्याइतका तिचा चरक इतर राष्ट्रांत ढिला कां पडला होता? ही पद्धति युरोप खंडांत सुरू होण्याचे पूर्वीपेक्षां सुरू झाल्या-वरची युरोपची स्थिति जर वाईट नव्हती, गौरकायांच्या जीर्णावस्थेच्या कारणांची मीमांसा करण्याचा ज्या अर्थी प्रसंग आला नाहीं,—त्याअर्थी असें सिद्ध होतें कीं, हल्लींच्या अनर्थपरंपरेचीं कारणें शिक्षणपद्धतींत दडून राहिलेलीं नसून सभोंवतालच्या परिस्थितींत त्यांचा शोध केला पाहिजे. शिक्षणपद्धतींतले प्रिन्सिपाल साहेबांनीं दाखविलेले दोष बहुतेक आम्हीं कबूल करितों; आमचा त्यांच्या मताशीं विरोध आहे तो हाच कीं, हे दोष प्रिन्सिपाल साहेबांच्या इच्छेस वाटतात किंवा त्यांच्या भांबावलेल्या मनास भासतात तितक्या अनर्थांचें ओझें आपल्या शिरावर घेण्यास समर्थ नाहींत. ह्या दोषांना दुसऱ्या कारणांचें पाठबळ आहे असें म्हणण्यापेक्षां, दुसरेच मुख्य गुन्हेगार असून साथीदारीचा ह्यांच्या ठिकाणीं भास होतो, हें म्हणणें विशेष सयुक्तिक होय.

## परीक्षेचा 'चक्रव्यूह'

प्रिन्सिपाल साहेबांच्या विचारसरणीवर आमचा दुसरा आक्षेप असा आहे कीं, ही शिक्षणपद्धति आमच्यांत कशी शिरली ह्या विषयींचें त्यांचें वर्णन

भ्रामक आहे. " दहा तास घोक व एक तास शाळेंत येऊन त्याची परीक्षा दे"–हें हल्लींच्या शिक्षणपद्धतीच्या स्वरूपाचें त्यांच्या मतें आदिसूत्र आहे. हा मंत्र प्रथम मराठी शाळेंतील पंतोजींनीं जपला, नन्तर तोच वसा हायस्कूल-मधील गुरुजींनीं उचलला, अखेरीस ह्या व्रताची गोडी सर्वांस इतकी लागली कीं "हल्लीं चालू शिक्षणपद्धतीनें मुलांसच नवीन वळण लावलें आहे असें नाहीं तर कॉलेजांतील विद्वान प्रोफेसरांस तिनें वांकवून टाकिलें आहे." प्रिन्सिपाल साहेब पुढें वर्णन करितात कीं, ह्याच पद्धतीला बळी पडून कोणी "लार्डन"च्या ' Heat" वर "नोटा" छापविल्या, कोणी अमरकोशाचें निःसत्व सार मुलांस घोकावयास दिलें. युनिव्हर्सिटीनें परीक्षेस पुस्तक नेमायाची फुरसत, कीं त्यावर नोटांच्या पुस्तकांच्या जाहिराती फडकल्याच,–परीक्षेस प्रश्नाचीं उत्तरें देण्यांत कवाईत शिकविणारी सर्व सामग्री तयार होऊं लागलीच. प्रिन्सिपाल साहेबांचें वस्तुस्थितीचें वर्णन एथवर ठीक आहे. वस्तुस्थितीच्या वर्णनाचा भाग आला कीं, मतांत द्वैत क्वचितच सांपडेल; परंतु वस्तुस्थितीला सोडून कार्यकारणांच्या विचारांत प्रि. साहेब भ्रमण करूं लागले कीं सत्य जाणण्याची इच्छा करणाऱ्यास त्यांचे बरोबर जाऊन सोय लागत नाहीं. परीक्षेस नेमलेल्या ग्रन्थांतील गहन विषय सुलभ करून देणारीं पुस्तकें छापून काढल्यानें कोठें बिघडतें तें आम्हांस समजत नाहीं, किंवा अवाढव्य विषयांस थोडक्यांत वाचकांपुढें मांडणारें मार्गदर्शक छोटे किताब असल्यानें कोणची हानि होते तीही आम्हांस समजत नाहीं. कोणत्याही ग्रन्थावर अर्थ स्पष्ट करणाऱ्या टीका तयार करणें, किंवा तो विषय फार मोठा असल्यास विषयांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या "बालानां सुखबोधाय" लहानसा संग्रह तयार करणें हा प्रघात फार पूर्वीपासूनचा आहे. थोरल्या कौमुदीच्या पाठीवर 'लघुकौमुदी'चें धाकटें भावंड आहेच; न्यायाच्या मोठ्या ग्रन्थाच्या आधारानें रचलेल्या तर्क-संग्रह, तर्ककौमुदी, वगैरे वह्या आहेतच; मोठमोठ्या काव्यग्रन्थांवर

मल्लीनाथादिकांच्या हजारों टीका आहेत. आमच्या इकडे जी स्थिति तीच युरोपांत आहे. अर्थ विशद करणाऱ्या टीकाही पाहिजेत व विषयाचें एकदम आकलन करण्यास उपयोगीं पडणारे सारग्रन्थही पाहिजेत. ह्या नोटांस व 'एपिटोमां'स इतका दोष देण्याचें कारण प्रिन्सिपाल साहेब असें सांगतात कीं, ह्या नोटांनीं घोकंपट्टीस अत्यंत उत्तेजन येतें. हल्लीं चोहोंकडे छापील नोटा तयार आहेत; परीक्षक नेमलेल्या साहेबांच्या नोटा छापलेल्या नसल्यास हस्तलिखित प्रती मिळविण्याचा उद्योग सुरू आहे; व ह्या सर्व नोटांची घोकंपट्टीही सुरू आहे;–एवढया गोष्टी माधवरावजींप्रमाणें आम्हांलाही कबूल आहेत. परंतु नोटा आहेत म्हणून मुलें त्या घोकतात, किंवा घोकंपट्टीची सवयच म्हणून विद्यार्थ्यांच्या लाडक्या सवयीला बहुमान देऊन नोटा तयार होतात,–असल्या सिद्धांतास आमच्यानें संमति देववत नाहीं. प्रिन्सिपाल साहेबांनीं कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या अभ्यास करण्याच्या रीतीचें फार मार्मिकपणानें निरीक्षण केलें आहेसें त्यांच्या ग्रन्थावरून दिसतें; मग बाकीच्या गोष्टींप्रमाणें ह्याच बाबतींत उघड उघड वस्तुस्थिति लोकांपुढें मांडण्यांत त्यांचें मन कां कचरलें हें त्यांचें त्यांसच माहीत. नोटांची घोकंपट्टी जारीनें सुरू असण्याचें कारण आमच्या मतें असें आहे कीं, घोकलेल्या नोटांना अनुसरूनच बरेचसे प्रश्न येतील अशी विद्यार्थ्यांची समजूत असते. मोठमोठया ऐतिहासिक ग्रन्थांचीं चारपांच हजार पानें मननपूर्वक वाचण्यापेक्षां व प्रोफेसरांच्या त्यावरील प्रगल्भ विचारांचा मनांत खल करीत बसण्यापेक्षां, आठ दहा ताव्रांची वही घोकल्यानें साठसत्तर गुण मिळूं शकतात अशी परीक्षेंत पास होण्याकरितां हापापलेल्या विद्यार्थ्यांची समजूत झाल्यावर, नेमलेल्या ग्रन्थावर योग्य परिश्रम करण्याइतकी त्यांची ज्ञानेच्छा प्रबल नसते, ह्याबद्दल त्यांस दोष देतां येईल काय? बॅरेट किंवा पिटरसनच्या "Idioms" मधून प्रवेशपरीक्षेस जर एक पंधरा मार्कांचा प्रश्न पडतो, तर परीक्षेच्या तडाक्यांतून

पुष्कळ मुलें ओढून काढण्याची हांव धरणाऱ्या प्रधान गुरुजींनीं विद्यार्थ्यां-कडून त्या घोकवाव्या; परीक्षेंतून सुटल्याशिवाय उच्च स्थितीचे दरवाजे खुले होत नाहींत, असें पक्कें माहीत असलेल्या पालकांनीं तोच शिक्षक पसंत करावा; व थोरवीचा गड्डा हरण करण्याकरितां परीक्षेचा "अद्‌भुत चक्रव्यूह" फोडून गेल्याशिवाय गत्यंतर नाहीं, हें समजून असणाऱ्या विद्यार्थ्यांनीं त्या "Idioms" घोकाव्या;—ह्या सर्व ओघानें होणाऱ्या गोष्टी आहेत. ही स्थिति सुधारण्याचा पहिला उपाय म्हणजे परीक्षेंत पास होण्यावरच केवळ आयुष्यांतील सुखःदुख अवलंबून असतां कामा नये;—म्हणजे द्रव्यार्जनाचे विद्येतर दुसरे मार्ग पाहिजेत. वरील वाक्यांत "द्रव्यार्जन" हा शब्द फाजील महत्वाकांक्षा दाखविणारा आहे; आमच्या विश्वविद्यालयांतून निघणाऱ्या लोकांची सरकारांतून व इतर ठिकाणीं होत असलेली पूजा पाहिल्यावर "द्रव्यार्जनाच्या" ऐवजीं "कसेबसे पोटांत कांटे भरण्याचे"—हे शब्द विशेष सत्यदर्शक होतील.

## व्यापारी हमाली व राज्यव्यवस्थेंतील उष्टीं खरकटीं

आतां इतर मार्गांत उत्तम मार्ग म्हटला म्हणजे व्यापार,—हा सर्व परकीयांच्या ताब्यांत आहे. तत्संबंधी हमाली परकीयांचे बगलबच्चे बनलेल्या व पूर्वीपासून ही हमाली करण्यांतच ज्यांच्या पिढ्या गेल्या त्या इतर जातींत आहेत. ही मंडळी महाराष्ट्रीयांपेक्षां सुखी आहे व त्यांना परीक्षेची विशेष पर्वाही नाहीं. त्यांच्या पैकीं ज्यांच्या कपाळावर ह्या पर्वाचे चक्र फिरतें आहे ते अशक्त होण्याच्या कामांत आमच्याशीं चांगला सामना करीत आहेत. ही मंडळी देखील एकदां परीक्षेच्या गिरणींत सांपडली, कीं प्रतिवर्षी ह्यांची पेळ बारीक बारीक होत जाऊन तुटण्याच्या घाईला आलेल्या धाग्याच्याच रूपानें बाहेर पडते;—हें प्रिन्सिपाल साहेबांनीं आपल्या वाचकांस विदित केलेंच आहे. ह्या व्यापारविषयक स्थितीचा व शिक्षणपद्धतीचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. हातांतील हत्यारें काढून घेऊन बांगड्या भरावयास ज्या लोकांना परकीयांनीं

दिल्या त्या लोकांना लष्करी धंद्याची शिफारस करणें म्हणजे दुखावलेल्या अन्तःकरणास अपमानानें डागण्यापैकींच आहे. राहतां राहतां राहिला राज्य-व्यवस्थेच्या किरकोळ बाबींतील उष्टीं खरकटीं काढण्याचा धंदा; तो आह्मी करीत आहोंच. आणि ह्या खर्डेघाश्याच्या धंद्याला परीक्षेशिवाय मोक्षमोक्ष नाहीं. ब्राह्मणांनीं व्यापारविषयक हमाली पतकरावी अशी प्रिन्सिपालसाहेबांची सूचना आहे; मग इतर जातींनीं काय करावें हा प्रश्न उरणारच. "ब्राह्मण समाजाची वृद्धावस्था" आदिकरून लिहिलेल्या कांहीं भागांसंबंधानें लिहितांना ह्या मुद्याचें आह्मांस विशेष विवेचन करायाचें आहे. सध्यां इतकें गृहीत धरून चालण्यास हरकत नाहीं कीं, विद्याव्यासंगी जातींना आणखी तीस चाळीस वर्षें तरी परीक्षेविषयीं बेफिकीर राहून चालावयाचें नाहीं. परीक्षा सोपी करा ह्मणून हाकाटी करणारांस, परीक्षेस उच्च स्थलावरून खालीं ओढून काढण्या-पेक्षां विद्यार्थ्यांनीं वर चढून जाण्याचा प्रयत्न करावा हें रास्त—असें उत्तर देण्यांत येतें; त्याच नमुन्यावर ब्राह्मण विद्यार्थ्यांनीं तेल्यातांबोळ्यांचीं गटारा-जवळ दुकानें घालीत बसण्यापेक्षां व्यापाराचा मूळ गड्डाच आपल्या हातीं येईल ह्या दिशेनें प्रयत्न करणें सर्वोत्कृष्ट—असा उपदेश "विरोध"हीन ब्राह्मणास कां करूं नये? **स्वधर्म अवजड** आहे व **परधर्म सुलभ** ह्मणून आपली जबाबदारी न ओळखतां, **भयावह परधर्म** झट्दिशीं उचलावयास लावणारी विरोधशक्ति उर्फ चंचल वृत्ति काय उपयोगाची? इतर सर्व लोकांना किस्ता घालून देण्याचा ज्यांचा मान, सर्वांस सारख्या प्रमाणानें ग्रासून सोडणाऱ्या ग्रहणांतून पार पाडून नेणारी युक्ति सांगण्याचा ज्यांचा अधिकार, त्या विद्या-व्यासंगी जातींनीं दुसऱ्या जातींच्या तोंडांतील नीच हमाली करून मिळविलेला भाकरीचा तुकडा आपल्या कौशल्यानें काढून घ्यावा, व इतर जाती अन्नान्नानें मरत असतां आपल्या पोटाच्या खाची भराव्या—असें सांगणारी साहेब बहादुरांनीं तारीफ केलेली विरोध शक्ति उर्फ हलकट वृत्ति ब्राह्मणांत नाहीं तोंपर्यंतच त्यांना ब्राह्मण हें नांव शोभेल.

औद्योगिक पथांतील उच्च स्थान संपादन करण्यास आह्मांस अजून बरींच वर्षें घालविलीं पाहिजेत; आणि ती स्थिति प्राप्त होईपर्यंत परीक्षा पास होण्याची उत्कट हाव ब्राह्मणवर्गांत राहणारच. तेव्हां आज अगोदर ही घोकंपट्टीची उर्फ परावलंबनाची शिक्षणपद्धति बन्द पाडल्याशिवाय आह्मांस मोक्ष नाहीं; कारण हिची परिस्थिति लवकर बदलावयाजोगी नाहीं; प्रिन्सिपाल साहेबांनीं सुचवि-लेल्या प्रकारच्या नवीन पद्धतीच्या शाळा चोहोंकडे उभारण्यास मुलांच्या पालकांनीं मदत केली पाहिजे, हें खरेंच;—पण ह्या कामांत पालकांच्या हल-गर्जीपणास व बेफिकिरीस विशेष दोष न लावतां हल्लीं पालक करीत असलेल्या खर्चानेंच कितपत स्थिति सुधारतां येईल हेंहि पाहिलें पाहिजे.

## घोकंपट्टीच्या गाड्यास गति

श्रीमन्त लोकांनीं आपल्या श्रीमन्तीच्या जोरावर विद्याखात्याच्या चाल पद्धतीपासून सुटून जाण्याचा प्रिन्सिपाल साहेबांनीं सुचविल्याप्रमाणें खुशाल खुशाल प्रयत्न करावा; कारण त्यांनीं संपादलेल्या द्रव्यसंचयाचा त्यांना विशेष फायदा मिळावा हें रास्त आहे. ह्या लोकांच्या सोईसाठीं, शाळा किती लांबी-रुंदीच्या पाहिजेत, पाया किती खोल घालावा, हजिरी कशा रीतीनें मांडावी, वगैरे क्षुल्लक गोष्टींपासून तों तहत इतिहास गणितादि विषय कशा प्रकारानें शिकवावेत—एतद्विषयक थोडक्यांत प्रिन्सिपाल साहेबांनीं सुन्दर चित्र रेखिलें आहे. त्याकडे एकवार तरी धनाढ्य लोकांनीं नजर फेंकावी अशी आमची श्रीमन्त वाचकांस शिफारस आहे. पण डोळ्यांत आसवें आणून गळा दाटल्या-मुळें ओल्सर आक्रंदनानें "आपलपोटेपणाची" महति गाण्याचें **अनार्य** कर्म जें प्रिन्सिपाल साहेबांनीं केलें आहे, त्याकडे विशेष लक्ष न पुरविणाऱ्या मंडळींनीं विद्याखात्यांत घोकंपट्टीचा हा प्रकार कसकसा सुरू होत गेला ह्याचा बारकाईनें विचार केला पाहिजे; ह्मणजे 'स्क्रू' कोणच्या ठिकाणीं ढिला पडला आहे हें बरोबर ध्यानांत येईल.

प्रिन्सिपाल साहेबांनीं ध्वनित केल्याप्रमाणें मराठी शाळेंतील पंतोजीनें ह्या घोकंपट्टीच्या गाड्यास गती दिली नसून, युनिव्हर्सिटींतील उच्च अध्यापकांनीं ह्या गाड्यास भरवेगानें वरून खालीं सोडलें आहे. ह्याच्या जबरदस्त वेगास प्रतिबंध करण्याइतका विद्याखात्यांतील " हमाल " पंतोजीस नेणतेपणा नसावा—हें आश्चर्य नव्हे. पंधरा वीस वर्षांपूर्वींच्या मराठी शाळा व हल्लींच्या मराठी शाळा ह्यांत जमीन अस्मानाचें अन्तर आहे. ममतेच्या 'किंडर गारटन' प्रमाणें हल्लींच्या मराठी शाळा गमतीच्या व कोमल नाहींत हें खरें, तरी पूर्वींचे गोल्डस्मिथच्या ' डेझरटेट व्हिलेज'मधील वर्णनास सत्यता आणणारे मारके शिक्षकही आतां विशेष कोठें दृष्टीस पडत नाहींत. पंतोजीस देऊं केलीं, रुप्याची ताटवाटी, ॥ नका लावूं छडी काठी महादू बाळाला "—ही ओंवी ऐकण्याचें लहानपणीं माधवरावजींच्या नशिबीं आलें असेल, पण त्यांच्या चिरंजिवाचे कान बहिणीनें ह्मटलेल्या ह्या ओंवीनें खास विटाळलेले नाहींत. मराठीं शाळेंतील शिक्षकवर्ग पूर्वीप्रमाणेंच अद्याप मारका आहे वगैरे प्रिन्सिपाल साहेबांनीं केलेलीं विधानें बऱ्याच अंशीं खोटीं आहेत. हल्लींचा शिक्षकवर्ग शिक्षणक्रमाच्या ठरीव नियमांच्या कैचींत सांपडलेला आहे. "घोडा ह्मणजे अश्व " असें घोकतांना ऐकून मराठी शाळेंतील शिक्षकाला, तसेंच " गौरी, पार्वती, Feminine " असें स्कॉलरशिप मिळविणारा मुलगा घोकतांना पाहून हायस्कूलमधील हेडमास्तराला खरोखर खेद वाटत असेल; आणि आमचा असा अनुभव आहे कीं, शिक्षकवर्गास ही स्थिति पाहून खेद वाटतोही; पण बऱ्याच बाबतींत शिक्षकांचा नाइलाज आहे. प्रिन्सिपाल साहेब ह्मणतात कीं, त्यांच्या वेळेला त्यांनीं "Idioms" घोकल्या नाहींत; इंग्रजीचें ज्ञान पुष्कळशीं पुस्तकें वाचून संपादावें लागे; घोकंपट्टी उपयोगी पडत नसे. होय, ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत; त्या वेळचे प्रश्नाचे कागद पहावेत म्हणजे ध्यानांत येईल कीं, ते प्रश्न अशा प्रकारचे असत कीं, त्यावेळीं उपलब्ध असलेल्या

पुस्तकांतून अमुक प्रश्नाचें उत्तर अमक्याच ओळी असें दाखवितां यावयाचें नाहीं. हल्लीं परीक्षेहून सुटलेल्या विद्यार्थ्यांचें बोलणें जर कोणास ऐकावयास मिळालें तर "अमक्याच्या नोटांतून दोन प्रश्न पडले,—ह्या प्रश्नाचें उत्तर त्या साहेबांच्या टीपेंत आहे" असा संवाद ऐकूं आल्याशिवाय रहावयाचा नाहीं.

## परीक्षांचे सांपळे व चरक

ह्या सर्वांचें आदिकारण असें आहे कीं आमची युनिव्हर्सिटी परीक्षा घेण्याचें एक यंत्र बनली आहे. आमचें विद्याखातें हेंही युनिव्हर्सिटीच्या नमुन्याबरहुकूम ओतलेलें परीक्षा घेण्याचें दुसरें यंत्र आहे. युनिव्हर्सिटीचें गिरमीट वर्षांतून एकदां वेगांत येतें, त्याचप्रमाणें विद्याखातेंही वर्षांतून एकदां आपल्या भक्ष्यस्थानीं पडलेल्या विद्यार्थ्यांची भेट घेतें. युनिव्हर्सिटी ज्याप्रमाणें, आम्ही इतके सांपळे व इतके चरक मांडले आहेत व त्यांतून पार पडण्यास अशी अशी घोकंपट्टी केली पाहिजे असें जाहीर करिते, त्याचप्रमाणें विद्याखात्यांतून हरएक इयत्तेचा अभ्यासक्रम छापून बाहेर पडतो; युनिव्हर्सिटी जशी कॉलेजाहून अलिप्त आहे त्याचप्रमाणें विद्याखातेंही शाळांपासून अलिप्त आहे. विद्यार्थी व शिक्षक एका बाजूला, व परीक्षक दुसऱ्या बाजूला, असे उभे राहून परस्परांमध्यें एकसारखी लढाई जुम्पते. युनिव्हर्सिटी कॉलेजांचा शत्रु व विद्याखातें शाळांचा शत्रु, अशी स्थिति आहे. प्रिन्सिपाल साहेबांनीं ही अहिनकुलद्वेषाची स्थिति चांगली नाहीं इतकेंच म्हटलें आहे, पण हा द्वेष स्वाभाविक कां बनतो ह्याचें विवरण केलेलें नाहीं. आमच्या मतें ह्या सर्व त्रासाचें, ह्या निष्कारण खटाटोपाचें, ह्या उरस्फोडीचें, ह्या द्वेषाचें कारण हें आहे कीं, पहिल्या इयत्तेपासून तों तहत M. A. पर्यंत परीक्षांचीं लांबच्या लांब माला विद्यार्थ्यांस आक्रमून जावें लागतें. आमचें मत असें आहे कीं, युनिव्हर्सिटीनें इतक्या परीक्षा घेण्याचें कारण नाहीं. युनिव्हर्सिटीनें फक्त कॉलेजांतील अखेरच्या तेवढ्या परीक्षा घ्याव्या. असें केलें असतां अखेरच्या परीक्षांच्या

विषयांचें स्वरूप बदलावें लागेल; पण ती गोष्ट विशेष दुःसाध्य नाहीं. ज्ञान संपादन करण्याचे मार्ग निराळे आहेत, व ज्ञानाचें प्रदर्शन करण्याच्या युक्त्या निराळ्या आहेत. कांहीं प्रसंग असे असतात कीं, ह्या युक्त्या ज्यास माहीत नाहींत त्यास माघारच खावी लागते. लढाई जिंकण्यास अत्यंत उपयोगी पडणारे शौर्यसाहसादि गुण जसे कवायतीवांचून कित्येक वेळां निर्माल्यवत् होतात, त्याप्रमाणें विषयाची केवळ उत्कृष्ट समजूत थोडक्याशा कवायतीशिवाय, युनिव्हर्सिटीच्या परीक्षेंत विद्यार्थ्यास चमकवीत नाहीं. आयुष्यांतील खऱ्या परीक्षेच्या कसास उतरावयाचें असल्यास विषयांची उत्कृष्ट समजूत व ह्या ज्ञानाची योग्य मांडणावळ करावयास शिकविणारी कवाईत ह्यांची चांगली जोडगण असावी लागते—नुसत्या एका गुणानें भागत नाहीं. पांच दहा वर्षें दोन राष्ट्रें झुंजत असतां जें राष्ट्र शौर्यादिगुणांत फार मजबूद व कवायतींतही हार न जाणारें असतें त्याच्याच गळ्यांत विजयश्री माळ घालते; पण घटका दोन घटका चालणाऱ्या गोळीबारांत केवळ कवायतीच्या जोरावर परपक्षाचा पाडाव करितां येणें शक्य आहे. युनिव्हर्सिटीच्या परीक्षा व युनिर्सिटीची कांस धरून चाललेल्या विद्याखात्यांतील इन्स्पेक्टर बहादुरांच्या परीक्षा, कलाक दोन कलाक होणाऱ्या झटापटीपैकींच असतात. ज्याप्रमाणें कमी योग्यतेच्या शत्रूवर निवळ कवायतीचे जोरावर सरशी करितां येते, त्याचप्रमाणें अयोग्य व हीनवृत्ति परीक्षकांच्या तडाक्यांतून निवळ घोकंपट्टीच्या जोरावर निसटून जातां येतें. विद्यार्थ्यांच्या पारंगततेची परीक्षा हल्लींपेक्षां विशेष विस्तृतपणें घेणें सोईचें होणार नाहीं; तेव्हां परीक्षेचें स्वरूप लहानशा झटापटीप्रमाणेंच राहणार. अशी स्थिति असतां दीड दोन तपें एकसारखें प्रतिवर्षी ह्या परीक्षांच्या झटापटीला लायक होऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांत पुष्कळसा भुस्सा व थोडकेसें गव्हाचें सत्व सांपडणार; कवायतीचें महत्त्व जास्ती वाढणार; परीक्षेंतून सुटून जाण्याच्या युक्त्यांकडे विद्यार्थी ज्यास्ती लक्ष देणार; ग्रंथकारानें प्रतिपाद-

लेल्या विषयाची योग्य समजूत करून घेण्यापेक्षां प्रश्नांचीं उत्तरें ज्यांत सांपडतात त्या नोटा घोकण्यांत उमेदवार विशेष काल घालविणार;—हे सर्व परिणाम ओघानें व्हावयाचे तेच होत आहेत.

## विद्याखात्यांत इंग्लंडमधील केरकचरा

अशा स्थितींत हें परीक्षांचें चक्र फिरविण्याचें काम अयोग्य लोकांच्या हातीं पडल्यावर फारच हानि होते. वर्डस्वर्थसारख्या स्वभावानें व विद्येनें अत्यन्त थोर अशा अध्यापकांची परंपरा आमच्या कॉलेजांतून आहे काय? हा प्रोफेसर कलोक्रियल इंग्लिश फार सफाईनें बोलतो, तर दुसरा विद्यार्थ्यांस विचारतां विचारतां डिक्शनरींतून प्रतिशब्द चलाखीनें काढतो. मिल्टन शिकवितांना "रावणास दहा तोंडें होतीं" अशा प्रकारच्या ख्रिस्त पुराणांतील गोष्टी विद्यार्थ्यांस लिहून घेण्यास लावणारी बडबड रगड, पण कवितेंतील स्वारस्य विद्यार्थ्यांच्या मनावर ठसवून देण्याच्या कामीं आवळ्याएवढें पूज्य. बेकनचा पाठ वर्गांत करावा व दुसऱ्या एकाद्या महात्म्या प्रोफेसरनें केलेल्या नोटांकडे बोट दाखवावें, अशी सर्वसाधारण रड आहे. आमचें ह्मणणें असें आहे कीं, ज्याप्रमाणें हरएक खात्यांत इंग्लंडांतील केरकचरा खचून भरलेला आहे त्याच-प्रमाणें विद्याखात्यांतही उच्च जागांचे ठिकाणीं खालच्या नंबरच्या लोकांची गर्दी झालेली आहे. इंग्रजी भाषा अस्सल इंग्रजांच्या तोंडून ऐकल्याशिवाय "ताजें इंग्रजी" नीटसें वठायाचें नाहीं ह्मणूनच ह्या लोकांची विशेष मातबरी. स्वभाषा रखडत बोललेली ऐकविण्याच्या पलीकडे एखाद्या राजकीय, सामा-जिक किंवा धार्मिक प्रश्नावर मत देतांना ह्यांची धांदल कशी उडते—हें सूक्ष्म अवलोकन करणाऱ्यांच्या ध्यानांत येण्याजोगें आहे. शाळेंत विशाल बुद्धीचे, प्रगल्भ विचारांचे, व चोख वर्तणुकीचे शिक्षक मिळत नाहींत म्हणून प्रिन्सिपाल साहेबांस हळहळ वाटते, पण आम्ही असें विचारितों कीं प्रोफेसर मंडळींत तरी माधवरावजींनीं वर्णिलेल्या श्रेष्ठ पदावर नेऊन ठेवण्या-

जोगे कितीसे लोक सांपडतील ? जसा किस्ता, तसें वळण. ह्या मंडळींतून परीक्षक मंडळी नेमली जाते; मग कवायती हालचालीस उत्तेजन मिळावें ह्यांत काय आश्चर्य ? परीक्षा घेण्याच्या पद्धतींत पुष्कळशी सुधारणा पाहिजे आहे, असें युनिव्हर्सिटींतील खऱ्या विद्वान मंडळीस वाटूं लागलें आहे व त्या दिशेनें त्यांचे उद्योग चालूहि अहेत. युनिव्हर्सिटींत व कॉलेजांत दुसऱ्या पायरीवरच्या लोकांस शिरूं न देणें आमच्या हातांत नाहीं; तथापि असल्या लोकांची जितकी चिरफाड करितां येईल तितकी करून ह्यांची विद्वत्ता चव्हाट्यावर आणून सरकारास जागें करण्याचा प्रयत्न ठेवावा; म्हणजे कित्येक चांगल्या गोष्टी वाईट लोकांचे हातीं पडल्यामुळें जशा बाधक होतात तशी स्थिति युनिव्हर्सिटींत व्हावयाची नाहीं.

## घोकण्याच्या चरकांत इंग्रजी शाळा

कांहीं वस्तु मूळच्याच वाईट असतात, आणि तशांतून त्या वाईट लोकांच्या हातीं पडल्या कीं फारच भयंकर होतात. एकावर एक ठेवलेल्या पांच सहा परीक्षांची उतरंडी युनिव्हर्सिटीनें रचावी, हें अपायकारकच; आणि तशांत युनिव्हर्सिटींत चालकमंडळींत चांगल्या लोकांचा असावा तेवढा भरणा नसावा हें दुर्भाग्यच. प्रिन्सिपाल साहेब युनिव्हर्सिटीस दोषमुक्त ठरवोत, आम्ही तर ह्या दूषित शिक्षणपद्धतीचें सर्व पाप युनिव्हर्सिटीच्या माथीं मारतों. पायांत ढासळलेल्या इमारतींत राहणाऱ्या लोकांनीं सर्व हानीबद्दल छपर ठोकणाऱ्याशीं हमरेतुमरेला यावें हें जितपत हास्यास्पद तितपतच मराठी शाळा, हायस्कुलें नासलीं कुजलीं असतां दुर्गंधीबद्दल युनिव्हर्सिटीला जाळणें पोळणें तिरस्कारार्ह होईल—अशा अर्थाचें सूत्रवाक्य "युनिव्हर्सिटी व ब्राम्हण विद्यार्थी" ह्या भागांत प्रिन्सिपाल साहेब नमूद करितात. आम्ही स्पष्ट म्हणतों कीं विद्याखात्यांत रूढ झालेल्या शिक्षणपद्धतीचा उगम, वेदपठण करणाऱ्या वैदिकांच्या घोकपट्टीसांप्रदायांत नाहीं, किंवा परवां परवां बाहेर

पडलेलीं पोतदारांचीं "शालोपयोगीं पुस्तकें" घोकून काढण्यांतही नाहीं. हायस्कूलच्या आवारांत ह्या शिक्षणपद्धतीची स्वयंभु मूर्ति उत्पन्न झाली, असेंही पुराणांतरीं कोठें लिहिलेलें आढळत नाहीं. माधवरावजींच्या लहानपणीं ही पद्धति नव्हती; पण युनिव्हर्सिटींतील डिग्रीवाली मंडळी शाळाखातें जसजशी व्यापूं लागली, तसतशी ही दुष्ट शिक्षणपद्धति म्हणें बळावत चालली, व ब्राह्मणांनीं पुरुषसूक्ताच्या संथा व्याव्याच्या त्याप्रमाणें इंग्रजी विद्येस घोकण्याच्या चरकांत ओढलें! ह्या डिग्रीवाल्या शिक्षकसमुदायानें जो कित्ता गिरविला तो मराठी शाळेंतील तात्या पंतोजींचा खचित नव्हे, किंवा संथा सांगून आरडाओरडा माजविणाऱ्या गुरुजींचाही नव्हे. युनिव्हर्सिटींतील प्रोफेसर नोटा सांगून त्यांतलेच प्रश्न विचारतात, त्याप्रमाणें ह्यानांहि आपल्या नोटा विद्यार्थ्यांनीं घोकाव्या अशी हांव उत्पन्न होणें साहजीकच आहे. सूनपणा संपल्यावर असेल तेवढ्यांतच सासूपणा मिरवावासा वाटतो व सासू कशी जाचत होती ह्याची आठवण करकरून पुढील वर्तणूक बनविण्यांत येते; त्याचप्रमाणें प्रोफेसरांच्या नोटा घोकून राव्याप्रमाणें गोड बोल काढणारी मंडळी शिक्षकांचे कामीं रुजू झाल्यावर ही शिक्षणपद्धति उतूं येऊं नये तर व्हावें तरी काय? ही कवायती तयारी प्रथम कॉलेजांत, परीक्षेच्या बिघडत चाललेल्या स्वरूपामुळें उत्पन्न झाली; सान्निध्यामुळें हायस्कुलांतील वरील वर्गांवर प्रथम हिची दृष्टि गेली; अखेरीस सर्व इंग्रजी शाळा हिनें व्यापल्या. ह्याच संथीला शिकण्याशिवाय दुसरें गत्यंतरच नाहीं असें लोकांस होऊन गेलें. त्यामुळें कसेंही करून परीक्षा पास होण्याच्या खटपटी सुरू झाल्या. ह्या दुष्ट शिक्षणपद्धतीचा प्रारंभ, प्रगति व वाढ हीं अशा प्रकारानें झालेलीं आहेत, आतां मराठी शाळांतून ही पद्धति कशी सुरू झाली तें पाहूं.

## शिशुशाला कीं मराठी हायस्कुलें

आम्ही वर नमूद केलेंच आहे कीं, इन्स्पेक्टर साहेबांची कचेरी म्हणजे युनिव्हर्सिटीची नक्कल आहे. ह्या विद्याखात्याच्या गळ्यांत देशी भाषेचीं

...र ...वाचनालय, सातारा.


पाळेंमुळें, न दुखवतां, तशींच जिवंत राखण्याचें काम सरकारनें बांधलें आहे. हायस्कूलच्या अखेरच्या परीक्षा युनिव्हर्सिटीच्या ताब्यांत आहेत, तेव्हां हायस्कूलमधील अभ्यासाचें धोरण बऱ्याच अंशीं ह्या परीक्षांकडे नजर ठेवून ठरवावें लागतें. परंतु ह्या मराठी शाळा विद्याखात्याच्या पूर्ण कबज्यांत आहेत. आणि ह्या ठिकाणीं विद्याखात्यांतील अधिकारी मंडळीस युनिव्हर्सिटीबरहुकूम हरएक गोष्ट उठविण्याच्या हविस सैरावैरा दवडत सोडण्यास सांपडतें. मराठी सहाव्या इयत्तेच्या परीक्षेस जवळ जवळ प्रवेशपरीक्षेची योग्यता येऊं लागली आहे. आम्ही दोन चार वर्षांचे ह्या परीक्षेचे कागद पाहिले आहेत. गणितविषय प्रवेशपरीक्षेइतका कठिण असतो; कारस्थान, लढाईचे डावपेंच, राज्यपद्धतीचें धोरण, इत्यादि इतिहासशास्त्रज्ञांस सोडवितां येण्याजोगे इतिहासांतील प्रश्नही आहेत; मराठी कवींचीही बरीचशीं ओळख दाखवावी लागते; निबंधलेखनही आहे. इंग्रजी भाषा वगळली असतां प्रवेशपरीक्षेस अवश्य व सहाव्या इयत्तेच्या परीक्षेस मुद्दाम न नेमलेला विषय म्हणजे Science होय. परंतु एक वेळ म्याट्रिकचें Science पुरवेल, पण मराठी सहावें पुस्तक नको. मराठी सहाव्या पुस्तकांत गोळ्यांनीं आपलें शास्त्रीय ज्ञान एका ठिकाणीं गोळा केलें आहेंसें वाटतें. ह्या पुस्तकांत रसायनशास्त्र आहे, यंत्रशास्त्र आहे, ज्योतिष आहे, गति आहे, उष्णता आहे, विद्युत् आहे, सर्व कांहीं आहे; शिवाय "भांडवल" आहे, "वेतन" आहे, "घेणें देणें" आहे. प्रवेशपरीक्षेंत पास झालेल्या विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक दुर्गम आहेच, पण Science घेऊन बी. ए. झालेल्यासही, यांतील कांहीं कांहीं भाग जाचण्याजोगे आहेत. हल्लींच्या मराठी व्याकरणांचा ओघ पाणिनीनें सांगितलेल्या सर्व गोष्टींचा संग्रह करण्याकडेच आहे. एकंदरींत मराठी सहाव्या इयत्तेच्या परीक्षेचीं उत्तरें देण्यास प्रवेशपरीक्षेइतकी निदान विद्यार्थ्यांच्या बुद्धीवर मेहनत झालेली असली पाहिजे. ट्रेनिंग कॉलेजांत निवळ मराठी शिक्षक घडवावयाचे

असतात म्हणून बरें. नाहींतर सहाव्या इयत्तेप्रमाणें ह्याही परीक्षा जर स्वतंत्र दर्जाच्या असत्या, तर युनिव्हर्सिटी कॉलेजांत व ट्रेनिंग कॉलेजांत कांहींचेंही अंतर पडतेंना. आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, सहाव्या इयत्तेस तयार होणारा विद्यार्थी मराठी शाळेंत पांच सहा वर्षांतच तयार व्हावयाचा ना? ह्या परीक्षेस बसण्याइतकी योग्यता विद्यार्थ्यांच्या अंगीं येण्याकरितां मराठी शाळेंतील इयत्ता हायस्कूलमधील नमुन्यावर बसविणें भाग पडतें. हायस्कूलमधील इंग्रजी भाषा तेवढी नाहीं, पण विद्यार्थ्यांची ग्राहक शक्ति मात्र पाहिजे. विद्यार्थ्यास शब्दास प्रतिशब्द देतां आला पाहिजे. समानार्थ अर्थाचीं वाक्यें बनवितां आलीं पाहिजेत, पण ह्या गोष्टी अल्पवयाच्या विद्यार्थ्यास साधत नाहींत. तेव्हां "घोडा म्हणजे अश्व" हें रात्रभर जागत दिव्यापाशीं घोकत बसणें कोंवळ्या विद्यार्थ्यांच्या नशिबीं येतें. सहाव्या इयत्तेची परीक्षा ही प्रवेशपरीक्षा आहे, व मराठी शाळा ह्या परीक्षेस विद्यार्थी तयार करणारी हायस्कूलें आहेत—ह्या गोष्टी ध्यानांत ठेवल्या म्हणजे मराठी शाळेंतील अभ्यासक्रमाच्या अप्रयोजकपणाचा एकदम उलगडा होतो. शिशुशालांची शिक्षणपद्धति, व मराठी सहाव्या इयत्तेच्या धोरणावर बसविलेला अभ्यासक्रम, ह्यांचा मराठी खालच्या इयत्तेंतून सांवळागोंधळ झालेला आहे. चवथी, पांचवी, व सहावी, ह्या इयत्ता परीक्षेच्या धोरणानें चालतात. आह्मांला शिशुशालांसारखीही व्यवस्था पाहिजे; मराठी हायस्कूल, मराठी प्रवेशपरीक्षा ह्यांची ऐटही पाहिजे; आणि इतकेंही करून उदरपोषणार्थ म्याट्रिककडे धांव मारली पाहिजे—अशी स्थिति असली म्हणजे शिक्षणपद्धतीची ओढाताण व्हावयाचीच. मराठी हायस्कूलची कल्पना हें एक विद्याखात्यांतील विद्वान् अधिकाऱ्यांचे मनास झपाटून राहिलेलें भूत आहे. ह्यास अजिबात गाडून टाकलें पाहिजे. युनिव्हर्सिटी व सरकार जोंपर्यंत देशीभाषेस आश्रा देण्यास कबूल नाहीं, तोंपर्यंत असल्या चोरट्या उपायांनीं देशीभाषेचें कांहींएक

कल्याण न होतां विद्यार्थ्यांच्या शारीरिक शक्तींची मात्र निष्कारण राख-रांगोळी होत आहे. आमचा अभ्यासक्रम श्रीगपासून म्याट्रिकच्या धोरणानें तरी चालवा, नाहींतर सहाव्या इयत्तेच्या परीक्षेस इंग्रजीचा कागद जोडून तिला म्याट्रिकचे हक्क तरी द्या; म्हणजे हल्लीं मराठी हायस्कुलांत घालवावा लागणारा बराच काळ शिशुशालेंत शिशूंना योग्य अशाच प्रकारानें घालवावयास सांपडेल. हल्लींचा मराठी व इंग्रजी शाळांतील अभ्यासक्रम दोन परीक्षांच्या मान्याखालीं आहे; त्यामुळें कित्येक विषय एकदां मराठींतून व मध्यंतरीं बरींच वर्षे गेल्यावर पुनरपि इंग्रजींतून तयार करावे लागतात. ही डबल गव्हर्मेंटची स्थिति मोडून टाकली म्हणजे मराठी शाळा शिशुशाला होतील, घोकंपट्टी त्या शाळांतून दिशेनाशी होईल, व इंग्रजी शाळांतील अभ्यासक्रम बोजड झाला आहे तो सरळ व सोपा होईल.

## सर्व घाणींचें मूळ युनिव्हर्सिटी वया

मराठी अभ्यासक्रमांत इतकी सुधारणा झाल्यावर हायस्कूलमधील इन्स्पेक्टर साहेबांच्या सांवत्सरिक परीक्षेचा शिक्षकांस व विद्यार्थ्यांस वाटणारा बाऊ पुष्कळसा कमी झाला पाहिजे. विद्यार्जनाचा खरा हेतु माहीत असणारा इन्स्पेक्टर असल्यास ही गोष्ट सहज साधणारी आहे. पण तसे अधिकारी नसल्यास त्यांच्याविरुद्ध गवगवा करण्यास लोकांनीं काडीचीही कसूर करूं नये.

युनिव्हर्सिटीच्या परीक्षांची संख्या जितकी कमी करवेल तितकी करावी. कॉलेजांतील प्रिन्सिपाल साहेबांस विस्तृत अधिकार द्यावेत आणि शेवटच्या परीक्षेचें नाकें मात्र युनिव्हर्सिटीनें आपल्या ताब्यांत ठेवावें. युनिव्हर्सिटीच्या परीक्षांच्या संख्यांची खच्ची करण्याचा विचार युनिव्हर्सिटींतील मंडळींत घाटत आहे. प्रिन्सिपाल साहेब म्हणतात त्याप्रमाणें युनिव्हर्सिटीस आहे तशीच राहूं देणें योग्य होणार नाहीं; कारण सर्व घाणीचें मूळ ह्या वयेपासून उत्पन्न झालेलें आहे. युनिव्हर्सिटीचें स्वरूप बदला, इंग्रजी मराठी शाळांवरील दोन यजमानांचा ताबा काढून टाका, म्हणजे हल्लींच्याच किंमतींत चोख शिक्षण मिळूं शकेल.

# * ब्राह्मण आणि त्यांची विद्या–लेखांक ४ था

प्रि. गोळे यांच्या पुस्तकांतील मुख्याच्या गोष्टींसंबंधानें आम्ही आमचे विचार गेल्या तीन खेपेस वाचकांपुढें मांडलेलेच आहेत. समाजापुढें असलेल्या हरएक प्रश्नासंबंधानें प्रि. गोळ्यांनीं आपलीं मतें ह्या पुस्तकांत नमूद केलेलीं आहेत; त्यांतील कांहींचें थोडक्यांत परीक्षण करून हा लेख संपविण्याचा आमचा विचार आहे.

## वृद्धावस्थेची कांत टाकण्याचा प्रयत्न

स्वराज्य नाहींसें झालें, त्याच वेळीं महाराष्ट्रांतील श्रेष्ठ जातींच्या निकृष्टावस्थेस प्रारंभ झाला. त्याचवेळीं ब्राम्हण समाजाची पूर्ण "वृद्धावस्था" झाली; तळमळ करावयास लावणारी जिज्ञासा, यौवनावस्थेंतील अवलोकनशक्ति, उत्कट महत्त्वाकांक्षा, "करीन" "करीन" म्हणाविणारी साहसी उमेद–ह्या सर्वांनीं त्याच वेळेस ब्राम्हणसमाजांतून पाय काढण्यास आरंभ केला. इंग्रजी काव्यानें ह्या ओहटीस कशी मदत केली–हें आम्ही पूर्वी सांगितलेंच आहे. वीस वर्षांपूर्वी ब्राम्हणसमाजांत तारुण्याची झांक लकाकत होती व आतां त्याच समाजाच्या अंगावर 'जीर्णजरा' दिसूं लागली–असें प्रतिपादन करणें म्हणजे, राष्ट्रांची उत्पत्ति, स्थिति व लय कशीं होतात ह्याविषयीं पूर्ण अज्ञान प्रगट करणें होय. मानवी आयुष्यांत व राष्ट्राच्या आयुष्यांत जें सादृश्य आहे तें अंशतः आहे–ही गोष्ट प्रिन्सिपाल साहेबांनीं ध्यानांत ठेवली असती, तर वीस वर्षांत आमचें राष्ट्र तरुणाचें म्हातारें झालें असें भासविण्याचें जें त्यांनीं धाडस केलें आहे तें खास केलें नसतें. आमचें राष्ट्र म्हातारें

---

* विविध ज्ञान विस्तार–जुलै–ऑगस्ट १८९६.

होऊन किती तरी वर्षें झालीं; हल्लीं वीस पंचवीस वर्षें जो प्रयत्न चालला आहे तो " कांत टाकण्याचा " होय. " कांत टाकून " पूर्वीप्रमाणें ताजेतवानें होण्याला आमच्या राष्ट्राला अद्याप कितीकतरी वर्षें लागणार—हें कोणच्याही देशाचा इतिहास सांगूं शकेल. राष्ट्रोन्नतीसंबंधाचे निरनिराळे प्रयोग करून पाहण्यांतच आज तीस चाळीस वर्षें गेलीं. आमच्यांतील एका बड्या देश-भक्ताचें चरित्र लिहितांना असें लिहावें लागेल कीं, ह्यांच्या आयुष्यांतील उमदा भाग ह्यांनीं निरनिराळ्या दिशांनीं सैरावैरा पळण्यांत घालविला. आयुष्यभर निरनिराळ्या प्रयोगांचा अनुभव घेत आहेत. " अमका मार्ग धोक्याचा आहे " हें ह्यांच्या चरित्रापासून समजेल; पण " खरा मार्ग कोणचा" हें समजणार नाहीं. आंधळ्याप्रमाणें चाचपडत खरा मार्ग शोधून काढण्याचें ज्या राष्ट्राच्या नशिबीं येतें, त्यांतील पुढाऱ्यांचें चरित्र अशाच स्वरूपाचें असावयाचें. शिवाय स्वतः विशेष खस्त न खातां दुसऱ्यांनीं चालविलेल्या उद्योगांतच " हात धुऊन " घेण्याचा विचार सततचा असला कीं, उत्कृष्ट आयुष्य मासल्यावारी फुकट जात असतें. ज्ञान नेहमीं अनुभवजन्य असल्या-मुळें मानवी प्राण्यास सदा प्रयोग करून पाहिलेच पाहिजेत; परंतु वीस वर्षांपूर्वी वटके घटकेला जे प्रयोगांच्या दिशेला हेलकावे मिळत असत ते राष्ट्राला केव्हांही श्रेयस्कर झाले नसते—हें प्रिन्सिपाल साहेबांवांचून बहुधा दुसरा कोणीही मनुष्य कबूल करील. वीस वर्षांपूर्वी चळवळ करणाऱ्यांची संख्या बोटांनीं मोजतां येण्याजोगी होती. थोड्याशा व्यक्तींनीं केलेल्या गोंगाटा-वरून सर्व राष्ट्र यौवनमदांत झुलतें आहे, अशी कल्पना करणें म्हणजे, अवाढव्य अरण्यांतील टीचभर डबक्यांत राहणाऱ्या दोनचार बेडकांचें डरावणें ऐकून तेथील सर्व पशुपक्षी आपापल्या परी ओरडत आहेत असें समजण्या-सारखेंच आहे. वीस वर्षांपूर्वी प्रिन्सिपाल साहेबांस राष्ट्रांत हालचाल दिसली, आणि आतां सर्व शून्य दिसतें—हें चाळिशीच्या दृष्टिमांद्याचें तर फल नव्हेना?

वीस वर्षांपूर्वी जे समाजाचे पुढारी होऊन गेले, व जे आतां नामशेष झाले आहेत–त्यांनीं एवढी कोणची कामगिरी बजावली तें माधवरावजी सांगतील काय ? तेराव्याच्या पूर्वींच लोक ज्यांचीं नांवें विसरूं लागले–त्यांनीं शरीराचे सोहाळे करण्यापलीकडे इतिकर्तव्यता केली असें प्रि. गोळ्यांस वाटतें काय ? राजकीय उन्नति करणारी राष्ट्रीय सभा नवीच आहे; सामाजिक परिषद् राष्ट्रीय सभेनंतरची; प्रान्तिक सभा कालची परवांची; औद्योगिक परिषदेची कल्पना नुकतीच उत्पन्न झालेली; सनातन धर्ममहापरिषदेला एक वर्षही झालें नाहीं; फर्ग्युसन कॉलेजाला दोन दिवस झाले; महाराष्ट्र कॉलेज कालचें; मराठा कॉलेज उद्यांचें. पुण्यास गांवाबाहेर उभारलेली फर्ग्युसन कॉलेजाची इमारत तरुण मंडळींच्या खटपटीचें फळ आहे कीं नाहीं ? सटासट पैनपै न जुळतां एकदम मोठमोठ्या रकमा हातीं पडल्यामुळें घरच्या संस्थांची प्रिन्सिपाल साहेबांस विस्मृति झाली वाटतें ! संस्कृत नाटकें मराठींत आणण्याचा क्रम अलीकडचाच आहे, व शेक्सपीयरला मराठी पोषाख चढविण्याचा प्रयत्नही ताजाच आहे. अशा स्थितींत विरहाकुल नायिकेस शशिकिरण किंवा हिमकण तापदायक वाटावेत, किंवा वीरसेनानें रंगभूमीवर आंग्लपद्धतीचे अविर्भाव करावेत–ह्यांत समाजाच्या जीर्णावस्थेचा कोणचा भाग आहे, हें आम्हांस समजत नाहीं. प्रिन्सिपाल साहेब म्हणतात, पूर्वींच्या कांहीं उपयुक्त संस्था बुडत आहेत व कांहीं बुडाल्या आहेत. एखाद्याचा व्यापार बुडाला, किंवा एखाद्याचें वर्तमानपत्र बंद पडलें, किंवा एखादी साप्ताहिक सभा ओसाड झाली–अशा क्षुल्लक उदाहरणांनीं राष्ट्राची जीर्णावस्था सिद्ध करावयाची असल्यास खुशाल करावी. वीस वर्षांपूर्वींपेक्षां आज वाचनाची गोडी खचित खचित ज्यास्त वाढली आहे; ज्ञानाचा फैलाव झपाट्यानें होत आहे; व "ब्राह्मण आणि त्यांची विद्या" असल्या पुस्तकाचाही जलद खप होऊन "फारच थोड्या प्रती शिल्लक" राहूं लागल्या आहेत. पूर्वीं मोठ्या कष्टानें

नगर वाचनालय, सातारा.



व अत्यंत दांडगा गलका करून उभारलेली व आतां बऱ्याच अंशीं डुब-घईस आलेली सार्वजनिक संस्था आम्हांस एकच दिसते आहे; ती संस्था "प्रार्थनासमाज" होय. "प्रार्थनासमाज" अगदीं मोडकळीस येत चालला आहे, हें त्या समाजाचे निःसीम भक्तही कबूल करतील. कदाचित् ही गोष्टही राष्ट्रास येत चाललेली जागृतावस्था सिद्ध करण्यास बस्स आहे. यावरून खास समजावें कीं राष्ट्राच्या जीर्णावस्थेंत उत्पन्न झालेले हे असले प्रकार नाहींतसे होऊन राष्ट्र "कांत टाकण्या"स तयार होत चाललें आहे. वीस वर्षांपूर्वीची बुद्धिमत्तेची अखेर पायरी कोणची? तर आम्ही "पापणी-पूजक" आहों म्हणून ढिमकी-चर्डविणें ही होय. ह्या गोष्टीचा प्रिन्सिपाल साहेब एका ठिकाणीं निषेध करितात, व दुसऱ्या ठिकाणीं ह्याच गोष्टीची तरफदारी करितात. वकिलीचा अभ्यास न करितां वकिली डावपेंच करण्याची हांव धरल्यास, माधवरावजींप्रमाणें कोणीही जागजागीं घसरावयाचाच. एक-मेकांस विरुद्ध विधानें टीकाविषयक पुस्तकांत कितीतरी सांपडतील; पण असल्या किरकोळ गोष्टींकडे विस्तारभयास्तव लक्ष न देण्याचा आमचा आरंभापासून संकल्प असल्यामुळें त्या गोष्टी वाचकांपुढें मांडण्याचा आमचा विचार नाहीं. आज ज्या निरनिराळ्या चळवळी चालल्या आहेत त्यांत असावा तितका राम नाहीं, हें आम्हांस मान्य आहे. पण एवढ्यावरून निराश होण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं; उलट आशावंत होण्यास बराच आधार आहे असें आम्हांस वाटतें. "ब्राह्मण आणि त्यांची विद्या"—असलीं कळकळीनें लिहिलेलीं पुस्तकें बाहेर पडतात, हें खात्रीनें दुश्चिन्ह नव्हे.

## नोकरींतले ब्राह्मण व राजकीय चळवळ

आतां प्रिन्सिपाल साहेबांनीं राजकीय, सामाजिक व धार्मिक चळवळीं-संबंधानें जे निरनिराळ्या प्रसंगीं विचार प्रदर्शित केले आहेत, त्यांचें स्थूल-मानानें निरीक्षण करणें जरूर आहे. राजकीय चळवळीचा अखेर कळस जी

राष्ट्रीयसभा, तिजवर प्रिन्सिपाल साहेबांचा असा आक्षेप आहे कीं, राष्ट्रीय सभेसारख्या चळवळीपासून रयतेचें कांहीं हित न होतां सरकारी नोकरींत असलेल्या ब्राह्मणांना असल्या सभेमुळें अत्यंत त्रास होत आहे. राजकीय चळवळीपासून कांहीं फायदा व्हावयाचें बाजूलाच राहिलें, उलट राज्यकर्त्यांना आम्ही अप्रिय होत चाललों आहों. राष्ट्रीय सभेपासून फायदा झाला आहे किंवा नाहीं, ही शंका इतिहासज्ञाच्या मनांत कशी येते ह्याचें आम्हांस आश्चर्य वाटतें. ब्राह्मणांनीं चैनीखातर अगर आढयतेखातर पाहिजे तर राष्ट्रीय सभेसारख्या चळवळी चालवाव्या असें म्हणण्याइतकें सुशिक्षितांचें विस्तृत अन्तःकरण अभिमानशून्य कसें होऊं शकतें हें आम्हांस मोठें गूढ आहे. पार्लमेंट सभा म्हणजे ग्रेटब्रिटन देश नव्हे—हे जसें खरें, त्याचप्रमाणें ग्रेट-ब्रिटनमधील गब्बर मारवाडी व रुंद छातीचे पोलीस म्हणजे प्रजासत्ताक राज्य-व्यवस्था नव्हे—हें न कळण्या इतकें अज्ञान कॉलेजांतील प्रोफेसर कसे पांघरूं शकतात, ह्याचा आम्हांस अचंबा वाटतो. इंग्लंडची प्रजा विद्वान्, श्रीमंत व बळकट आहे म्हणूनच पार्लमेंटसारखी संस्था त्या देशांत आहे,—ह्या म्हणण्यांत जितकें सत्य आहे तितकेंच सत्य सदरील कार्यकारणांच्या विपर्यासांत सांपडेल. पार्लमेंट सारख्या संस्था पाश्चिमात्य राष्ट्रांत उत्पन्न झाल्या म्हणूनच पाश्चिमात्य प्रजाजन हुषार, सधन व सदृढ आहेत, असें कोणचा इतिहास सांगणार नाहीं ? लोक चांगले असले म्हणजे चांगल्या संस्था उत्पन्न होतात; त्याचप्रमाणें चांगल्या संस्था असल्या म्हणजे लोक सुधारत जातात. हा अन्योन्य संबंध नीट ध्यानांत ठेविला पाहिजे. जें पूर्वी कार्य असतें तेंच पुढें कारण होऊन बसतें. "कुमारसंभवांत" कालिदासानें पार्वतीच्या ग्रीवेच्या अप्रतिम लावण्याचें वर्णन केलें आहे. पार्वतीच्या गळ्यांत मोत्याचा पेंडा होता. त्या ठिकाणीं कवि म्हणतो कीं, मौक्तिकहारानें ग्रीवेस शोभा आली कीं ग्रीवेमुळें मौक्तिकहारास सौंदर्य प्राप्त झालें—हे कोणासही सांगतां आलें नसतें.

नगर वाचनालय, सातारा
नगर वाचनालय, सातारा



त्याचप्रमाणें आम्ही म्हणतों कीं, इंग्लंडांत श्रीमंत व लढवय्यी प्रजा आहे म्हणून ग्लॅडस्टन, सॅलिसबरी सारख्या मुत्सद्यांचा नांवलौकीक, कीं पार्लमेंट सभा दक्ष आहे म्हणून इंग्लंडची प्रजा सुखवस्तु व शूर आहे—ह्या जोडीपैकीं एकच गोष्ट खरी असें प्रतिपादण्याची कोणाही विचारशील लेखकाची छाती व्हावयाची नाहीं. औद्योगिक शिक्षण झपाट्यानें सुरू झालें पाहिजे; आधिभौतिक उन्नतींत मुरलेल्या लोकांशीं सामना करावयाचा असल्यास त्यांच्याच विद्येनें त्यांना हाणून पाडिलें पाहिजे; शरीरसंपत्ति पैदा केल्याशिवाय राजकीय बाबतींत "जशास तसें व दोन हात वर" अशी फलप्राप्ति व्हावयाची नाहीं;—वगैरे गोष्टी प्रिन्सिपाल साहेबांप्रमाणें आम्हालाही मान्य आहेत. परंतु एक गोष्ट पाहिजे एवढ्यावरून दुसरी गोष्ट नको म्हणण्यास आम्ही तयार नाहीं.

"राजकीय अवनति" हृदयांत बिंबवून देण्याचें काम राष्ट्रीय सभा करीत नाहीं काय? अन्यायाबद्दल चीड उत्पन्न होत नाहीं काय? राष्ट्रीयत्वाची कल्पना शिकलेल्यांच्या तरी डोक्यांत शिरत नाहीं काय? राष्ट्रीय सभेचे उद्देश खालच्या लोकांत फैलावण्याचें काम कांहीं लोक अंगावर घेऊं लागले नाहींत काय? "व्यावहारिकद्रव्या" वरच डोळा ठेवणाऱ्या लोभ्याला निरुपयोगी वाटणारे असोत, परंतु राजनीतिनिपुण पंडितांस अत्यंत मौल्यवान दिसणारे कांहीं हक्क राष्ट्रीय सभेमुळें आमच्या लोकांना मिळाले नाहींत काय? रुपयांच्या राशीच केवळ जवळ असल्यानें राजकीय हक्क मिळतात असें नाहीं; किंवा पुंडावा माजविणारी शारीरिक खुमखुमी नुसती जवळ असल्यानें राजकीय हक्क मिळतात असें नाहीं; किंवा शरीरयष्टि मजबूत व पिशवी गच्च भरलेली असली तरी तेवढ्यानेंच केवळ पूर्ण राजकीय हक्क मिळतात असेंही नाहीं. पूर्ण राजकीय हक्क मिळण्यास हीं सर्व साधनें अनुकूल असून एक प्रकारचें राजकीय शिक्षण लागत असतें. राष्ट्रीयत्वा-

संबंधाचे कांहीं विचार,—हक्क मिळविण्यास लायकी देणारें राजकीय शिक्षण राष्ट्रीयसभा लोकांस देत नाहीं काय ? ह्या गोष्टी प्रिन्सिपाल साहेबांस समजत नाहींत असें नाहीं. तथापि त्यांच्या लिहिण्याचा रोख असा दिसतो कीं, राजकीय चळवळीनें आंग्रज बहादुर नाखुष होऊन आम्हास उलट ज्यास्ती छळूं लागले आहेत, तेव्हां आह्मी मेंढ्यांनीं प्रथम लांडग्याची ताकद कमवावी. अशा रीतीनें आमची संपत्ति अतिशय वाढली, आम्ही धट्टेकट्टे जवान झालों, कीं मग राजकीय हक्क मागण्यास प्रारंभ करावा. औद्योगिक गोष्टींकडे व शरीराच्या उत्कृष्ट जोपासनेकडे आतां सर्व लक्ष द्यावें. मग एकदां का आमचीं अंबारें सोन्या रुप्यानें भरून गेलीं; एकदां का आमचीं शरीरें पूर्ण वाढीचीं, रुन्द छातीचीं, गलेलठ्ठ होऊन राहिलीं; म्हणजे मग खूप जलदीनें राजकीय हक्क मागण्यास सुरवात करावी. अशा स्थितींत आमच्या नवकोटी नारायणांचीं धिप्पाड शरीरें टोपीवाल्यांनीं पाहिलीं कीं आह्मी न मागितलेले देखील हक्क भीतीनेंच इंग्रज सरकार देऊं लागतील; आणि कदाचित् त्यांनीं हट्टी मूर्खपणानें नाहींच दिले, तथापि अशा औद्योगिक व शारीरिक भरभराटीचे वेळीं सरकारी नोकरींत चुकून असलेल्या एखाद दुसऱ्या ब्राह्मणाला, गोरकायांच्या चढलेल्या भिवयांचें, तिरसट व रागीट मुद्रेचें, क्षणोक्षणीं आमच्या देशमातेस ताडन करणाऱ्या बूटी पायांचें, विशेष भय वाळगण्याचें कारणच राहणार नाहीं. उदाहरणार्थ—पार्शी लोक कोठें साहेबाचीं एवढी भीति वाळगतात ? ह्या जातींत आर्जव, भक्ति, खुषामद्गीरी, साहेबाच्या शिव्या निमूटपणें खाणारा लोचटपणा, सरकारी नोकरीकरितां धडपड, नोकरी मिळविण्याकरितां घाणेड्या व कोणत्याही हिंदूस ओकारी आणणाऱ्या नीच मार्गांचें अवलंबन, असले दुर्गुण कसे चट् सारे नाहींसे झाले आहेत ! ह्या जातीनें, मुळांत फुसकट असलेल्या धर्मबुद्धीस जवळ जवळ शून्य रूप देऊन, पूर्वीचें कांहींच हट नसल्यामुळें प्रसंगानुसार घरांत पाहिजे

त्यास शिरूं देणाऱ्या गृहस्थितींत इंग्रजी चालीरीतींस पूर्ण नाचूं देऊन, सरकारविरुद्ध ब्र ही न काढितां आपली तुंबडी कशी भरेल ह्या एकाच गोष्टींचा निजध्यास घेऊन, आपली उन्नति कशी केली आहे पहा! ह्याच जातीच्या वृद्धिवैभवाचे झेंडे चोहोंकडे उभारलेले आहेत, ह्याच जातीच्या औदार्याचे पोवाडे त्यांच्या जातींतील हरएक मनुष्य गात आहे. प्रत्येक बडा साहेब ह्यांचीच पाठ थोपटीत आहे! पारसीकांच्या सुधारणेला हिंदुलोक पाहिजे तर नाकें मुरडोत; परंतु ज्या सुधारणेचे एवढे अजब परिणाम होतात त्या सुधारणेची कांस ब्राह्मणांनीं कां धरूं नये, अशी प्रिन्सिपाल साहेबांची पृच्छा आहे.

## पारसिकांच्या भरभराटीचें रहस्य

पारसीकांप्रमाणें झराझर गृहस्थिति सुधारून रुपये मोहरांच्या राशीवर बसावयास सांपडेल अशी जर कित्येकांची समजूत असली, तर त्यांचें उपाय-चिंतन थोडक्याशा अंशानें चुकलें आहे हें सुचविण्याची परवानगी घेतों. मुंबईचे भाटे व खोजे पारश्यांप्रमाणेंच श्रीमंत, धाडसी वगैरे आहेत; परंतु त्यांनीं आपली रहाण्याची खोली पारश्यांप्रमाणें सुधारलेली नाहीं—ही गोष्ट ध्यानांत ठेवून कोणचें कशाचें कार्य आहे हें समजून घेण्यांत चकून जाऊं नये. पारसीकांना जी आज स्थिति प्राप्त झाली आहे ती ते पारसी आहेत म्हणून प्राप्त झाली आहे; आपल्या साहसी स्वभावानें, सतत मेहनतीनें, व गृहसुधारणेनें त्यांनीं ह्या स्थितीचा फाजील फायदा घेतला असेल—हा भाग निराळा आहे. धर्मानें, भाषेनें, चालीरीतींनीं, हवापाण्यानें अत्यन्त भिन्न अशा राष्ट्रावर फार अंतराच्या परकी लोकांनीं राज्य करावयाचें असल्यास, लोकांत दळणवळण असणाऱ्या कांहीं लोकांना राज्यकर्ते आपले बगलबच्चे बनवीत असतात. तशांत, जिंकलेल्या लोकांशीं धर्मानें, चालीरीतींनीं, देशबांधवाच्या नात्यानें कोणत्याही रीतीनें सख्य न

वाळगणारी, अल्पसंख्येमुळें केव्हांही उपद्रवी होण्याची भीति नाहीं अशी, राज्यकर्त्यांवर सर्व भार टाकून त्यांच्याशिवाय गत्यंतर नाहीं असें समजणारी, एखादी विशेष जात जर आपण होऊन परकीयांच्या नादीं लागली तर राज्य-कर्त्यांनीं आपलें कार्य साधण्यास्तव तिला चुचकारूं नये, थोपटूं नये, पोसूं नये, वाढवूं नये, तर करावें तरी काय ? ब्राह्मणांना ही स्थिति येणें शक्य आहे काय, असें प्रिन्सिपाल साहेबांस विचारल्यास ते काय उत्तर देतील बरें ? ब्राह्मणांनीं पूर्ण खिस्ती व्हावें, इतर देशबांधवांना संकटसमयीं सोडून देऊन त्यांच्याशीं असलेल्या हरएक प्रकारच्या नात्याची काडी मोडून द्यावी, इतर लोक आपला कित्ता न वळवितां हल्लीं आहेत तसेच राहतील अशी खबरदारी घ्यावी, बायकापोरांस आपण विलायतेंत जन्मलों आहों अशा पक्क्या खात्री-बरहुकूम वर्तणूक ठेवावयास शिकवावें, व प्रसंगविशेषीं हिंदुस्थानदेशास यमाच्या दाढेंत चिरडावयास देण्याइतके आह्मी बेशरम झालों आहों-अशी राज्यकर्त्यांची खात्री करून द्यावी; मग पाहिजे तर पार्श्यांप्रमाणें आमच्याही लौकिकाच्या व औदार्याच्या दुंदुभीचा आवाज केव्हां कानीं घेऊन आदळतो, ह्याची वाट पहात कान टवकारून स्वस्थ बसावें. आम्ही वर नमूद केलेल्या गोष्टी ब्राह्मणांनीं कराव्या असा उपदेश ब्राह्मणास करण्यास जर प्रिन्सिपाल साहेब तयार असतील, तर पार्श्यांच्या भरभराटीकडे बोट दाखवून ब्राह्मणांस त्यांनीं खिजवावें; एरव्हीं ब्राह्मणांच्या सुधारणेचे व पार्श्यांच्या सुधारणेचे मार्ग भिन्न आहेत—हें त्यांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें.

राष्ट्रीय सभेसारख्या राजकीय चळवळींना दोष देतां देतां पार्श्यांची स्तुति करणारे प्रिन्सिपालसाहेब, दादाभाई नवरोजी, मेथा, वाच्छा यांसारख्या राष्ट्रीय सभेच्या पार्शी भक्तांस कसे विसरले कोण जाणें. आम्ही तर असल्या पार्शी गृहस्थांची योग्यता, ह्यूम, ब्रॅडला, वेडरबर्न ह्यांच्यासारखीच समजतों. केवळ विचारशक्तीला ही राजकीय चळवळ पसंत पडली म्हणूनच हे महात्मे राष्ट्रीय

वगर वाचनालय, सातारा.



सभेचे भक्त झाले आहेत; तेव्हां त्यांच्या सत्यप्रियतेची करावी तेवढी स्तुति अपुरीच होणारी आहे. पृथ्वीतलावर कोठेंही जुलूम होत असला तरी तो नाहींसा करण्याची खटपट करण्याकरितांच ह्या विभूति जन्मास आल्या आहेत; आतां दैववशात् हिंदुस्थानची व त्यांची गांठ पडली, हा भाग निराळा; बाकी ते 'वसुधैव कुटुंबकं' अशा कोटींतलेच महात्मे होत. हिंदुलोक निसर्गतःच राष्ट्रीय सभेसारख्या चळवळींचे भक्त असावयाला पाहिजेत; पण आमचें ब्रह्मचर्य संपण्याची अंधुक आशाही अद्याप उत्पन्न झालेली दिसत नाहीं; कारण महाराष्ट्राच्या नवीन रक्तामांसांत राष्ट्रीयत्वाचें दैदीप्यमान तेज चमकूं लावण्याची हांव धरणाऱ्या ब्राह्मणी कॉलेजाच्या मुख्य अध्यापकानें, राजकीय चळवळी गमतीखातर पाहिजे तर चालवा, असा विद्यार्थ्यांस उपदेश करावा—ह्यासारखें ब्रह्मचर्य संपण्याची आशाच नको असें सिद्ध करणारें दुसरें कोणचें उदाहरण सांपडणार ?

## भ्रामक समजुतीवर आधारलेला ग्रंथ

उद्योगधंदे करा, काय पाहिजे तें करा, "खिसा मात्र पैशानें भरलेला असूं द्या हं"—हा उपदेश एकतर्फी आहे; तथापि ह्या उपदेशांतील सात्त्विक सत्य इतर उपदेशाबरोबर असलें पाहिजे—हें आम्हास पूर्णपणें मान्य आहे. तनदुरुस्ती करा, "शरीरमाद्यं खलु सर्व साधनम्," हाही उपदेश असावयाला पाहिजे तसाच आहे. परंतु ह्या गोष्टी वाचकांस सांगत असतां, "राजकीय चळवळींत हाशील नाहीं" असें सांगण्याच्या थराला आम्ही जात नाहीं. ब्राह्मणांच्या शारीरिक ऱ्हासांचीं कारणें कोणचीं—ह्याचें विवेचन करितांना प्रिन्सिपाल साहेबांनीं "एकोदेवः केशवो वा शिवो वा" ह्या मंत्राचा ज्याप्रमाणें जप केला आहे, त्याचप्रमाणें, ब्राह्मणांनीं कोणत्या गोष्टी कराव्या हें सुचवितांना एक दोन गोष्टींचीच महती गाण्यास प्रारंभ केला आहे. टीकाविषयक पुस्तकांतील कांहीं भाग वाचीत असतां, उठल्या सुटल्या देवाचें

एखादें अर्वाचीन "पुराण" आम्ही वाचीत आहों कीं काय असें वाटतें. " ह्या देवासारखा नवसाला पावणारा देव नाहीं" असें जसें ज्या त्या पुराणांत आढळतें, त्याचप्रमाणें ह्या एक दोन गोष्टीच काय त्या आम्हांस अखेर यश देतील असें प्रिन्सिपाल साहेबांनीं ठिकठिकाणीं टांसून प्रतिपादन केलेलें सांपडतें. राजकीय चळवळीकडे फाजील लक्ष दिलें जात आहे व औद्योगिक गोष्टींची पूर्ण हेळसांड होत आहे अशा भ्रामक समजुतीनें जर हा ग्रंथ त्यांनीं लिहिला असेल, आणि हलकें झालेल्या पारड्यांत आपलें वजन टाकण्याचा " बर्क "प्रमाणें जर त्यांचा संकल्प असला, तर तनदुरुस्तीचे तर्फे व द्रव्य-दृष्टीच्या वतीनें वकीलपत्र घेऊन त्यांनीं आपल्या सोंगाची बतावणी फार चांगली केली आहे, असें प्रत्येकास म्हणावें लागेल. आमचें असें मत आहे कीं राजकीय, धार्मिक, सामाजिक, औद्योगिक, सर्व चळवळी एकसमयावच्छेदेंकरून सुरू ठेवल्या पाहिजेत. प्रत्येक चळवळीच्या संस्था निरनिराळ्या पाहिजेत, प्रत्येकीचे उद्योग वेगवेगळे असले पाहिजेत, प्रत्येकीच्या काम करण्याच्या जागा भिन्नभिन्न असल्या पाहिजेत. राजकीय चळवळ सामाजिक चळवळीहून निराळी आहे, धार्मिक चळवळीचे मार्ग सामाजिकाहून निराळे आहेत, औद्योगिक व धार्मिक ह्यांचा पंथ एकच नव्हे; तथापि प्रत्येक चळवळीपासून इतर चळवळींना पुष्टि मिळत असते—हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. एकाच गोष्टीची पिच्छा पुरविण्याची हांव धरून कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. पाश्चिमात्य राष्ट्रांची जी वाढ झाली ती सर्व दिशांनीं सारखी होत गेली. खडतरप्रसंगीं एकाच उन्नतीकडे सर्व लक्ष पोंचवावें लागल्याचीं उदाहरणें इतिहासांत सांपडतील. सांप्रतकाळीं राजकीय अवनतिसारखी दुसरी भयंकर हानि आमच्या देशाची झाली आहे, असें आम्हांस वाटत नाहीं; तेव्हां खडतर प्रसंगांचे अपवाद डोळ्यापुढें मांडले असतांहि, राजकीय शिक्षणाचा फैलाव करण्याचें ब्राह्मणांचें मुख्य कर्तव्य आहे असेंच म्हणावें लागेल. निर-

निराळ्या सवलती तुम्हांला मिळाल्या म्हणजे निरनिराळे धंदे काढण्यास तुम्हास सवड सांपडेल, व तुमची औद्योगिक चळती होऊं लागली कीं नवीन राजकीय हक्क मागण्यास उमेद येईल,—हा अन्योन्याश्रय विसरतां कामा नये.

## राष्ट्राकरितां सुशिक्षितांचा जग; सुशिक्षितांकरितां राष्ट्र नव्हे !

राजकीय शिक्षणाचा फैलाव ब्राह्मणांनीं जो करावयाचा तो आपलें कर्तव्य म्हणून करावा. हें कर्म करण्याचा त्यांचा अधिकार आहे, फलावर त्यांचा अधिकार नाहीं—हें गीतेंतील तत्त्व त्यांनीं पक्कें मनांत बिंबवून घ्यावें. असें केलें असतां राष्ट्रीय सभेपासून मोटा थोरला फायदा झाला नाहीं म्हणून निरुत्साह होण्याचा प्रसंग त्यांना खात्रीनें येणार नाहीं. देशाकरितां करावयाचीं कर्तव्यें करीत असतां आपल्या भाऊबंदांस त्रास होतो म्हणून त्यांचे हातपाय मोडकळल्यासारखे व्हावयाचे नाहींत. निरपेक्ष बुद्धीनें देशसेवा करणारांचे ठिकाणीं "निराशा" हा शब्द संभवतच नाहीं; कारण राष्ट्रोन्नतीचे कामीं योग्य तीं कर्में आचरावयाचीं, ह्यापलीकडे त्यांची आशाच जात नाहीं. फलप्राप्ति झाली तर बापडी होऊंदे; पण ती झालीच पाहिजे अशाप्रकारचा फलावर ते अधिकार सांगत नाहींत. राजकीय चळवळी जर आज आम्ही सोडून दिल्या तर राष्ट्राशीं बेइमानीपणानें वागल्यासारखें व्हावयाचें नाहीं काय ? राजकीय शिक्षण सर्व लोकांना देऊन राष्ट्रीयत्वाची ज्योत प्रत्येकाचे अंतःकरणांत पेटविण्याचे कामीं आजचे ब्राह्मण जर उदासीन राहिले तर, स्वराज्य बुडाल्या वेळच्या लोकांचीं नांवें ऐकून आम्हीं आज जसे कडाडा बोटें मोडतों, त्यावेळचे लोकांवर शिव्याशापांचा भडीमार करितों, त्याचप्रमाणें आमच्या मागाहून येणाऱ्या पिढीचे लोक आमच्या राजकीय झोंपेची हकीगत ऐकून, राजकीय अवनतीचा प्रतिकार करण्या ऐवजीं राष्ट्राला खळग्यांत अधिक खोल लोटण्यास आम्ही कारणीभूत झालों, असें म्हणणार नाहींत काय ? लोकांपुढें उदात्त कल्पना व उच्च मनोवृत्ति मांडण्याचें काम ब्राह्मणांचें

आहे. ही थोर कामगिरी सोडून देऊन ब्राह्मणच स्वार्थपरायण जर झाले, तर सर्व देश अत्यंत खंगावत जाणार ह्यांत संशय नाहीं. आमचे थोर विचार आम्हांस सोडून गेले व हीन मनोवृत्ति आमच्यांत बळावल्या म्हणून तर आम्ही स्वराज्यास मुकलों. ते थोर विचार, त्या उच्च मनोवृत्ती पुनः जागृत करून सर्व राष्ट्रभर त्यांना पसरविल्याशिवाय आम्हांस गत्यंतर नाहीं. उच्च विचाराच्या अत्युच्च जागेपासून जर आम्ही एकवार ढांसळलों, तर त्या जागेवर पुन्हां चढून जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्वार्थाच्या अकटोविकट पायावर आम्ही खूप झालों कीं उच्च विचारांच्या उच्च शिखराकडे पाहण्यास आम्हांस भोंवळ येऊं लागेल, ही मनाशीं गांठ बांधून ठेवावी. ह्या अनार्य स्वार्थपरायणंत आमच्या देशाची थोरवी नाहीं, आमच्या धर्माचें वैभव नाहीं, ब्राह्मणत्वाचीही ऐट नाहीं. राजकीय सुधारणेचा प्रयत्न करावयाचा तो शारीरिक सुख लुटावयास सांपडेल म्हणून नव्हे, किंवा आमच्या आप्तेष्टांस साहेब बढतीच्या जागा देतील म्हणून नव्हे. राष्ट्रोन्नतीचे कामीं झटणाऱ्यांच्या नशिबीं नेहमीं छळ असतो, हें प्रिन्सिपाल साहेब विसरले तरी कसे ? जिंकलेल्या लोकांनीं सुखाच्या मागें लागणें म्हणजे कर्दमांत पाय जोरजोरानें आपण होऊन रुतण्यापैकींच आहे. नोकरींतल्या ब्राह्मणांना त्रास होतो म्हणे; होत असेल; सर्व राष्ट्र कांहीं नोकरींतल्या ब्राह्मणांसाठीं किंवा नोकरीबाहेरच्या ब्राह्मणांसाठीं नाहीं. सुशिक्षितांचा वर्ग राष्ट्राकरितां आहे; राष्ट्र सुशिक्षितांकरितां नव्हे, हें डोळ्यासमोर प्रत्येक ब्राह्मणानें मोठ्या अक्षरांनीं लिहून ठेविलें पाहिजे. साहेबानें वांकडें तोंड केलें कीं चालले आमचे शिकलेले ब्राह्मण राष्ट्राशीं आपला संबंध तोडायाला ! अशा प्रकारची ब्राह्मणत्वाची ज्यांची कल्पना असेल, त्या ब्राह्मणांना फुकट फुकट उच्च शिक्षण मिळालें ! मोठमोठीं गहन पुस्तकें वाचण्यांत निष्कारण त्यांनीं शरीरक्लेश भोगले ! !

प्रिन्सिपाल साहेबांच्या पुस्तकांतील सामान्य ओघासंबंधानें आमचे विचार वाचकांपुढें मांडले आहेत. सांप्रतच्या चळवळी निर्दोष आहेत असें आमचें

म्हणणें नाहीं. "सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः" तेव्हां आरंभाला प्रत्येक बाबतींत दोष हे सांपडावयाचेच; त्यांतून प्रि. गोळ्यांसारख्या दोषैक-दृष्टि मंडळीस तर फारच दोष दृष्टीस पडावयाचे. दोष काढून टाकण्याचा प्रयत्न करणें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म आहे हें कोणीही कबूल करील. हरएक प्रकारच्या चळवळीसंबंधानें कांहीं कांहीं मार्मिक दोष प्रिन्सिपाल साहेबांनीं दाखविले आहेत, ह्याकरितां त्यांचें अभिनन्दन करणें जरूर आहे.

शेवटीं प्रिन्सिपाल साहेबांच्या पुस्तकांतील एक दोन किरकोळ मुद्यांसंबंधानें कांहीं सूचना करून "ब्राह्मण आणि त्यांची विद्या" ह्या पुस्तकाची रजा घेण्याचा आमचा विचार आहे. ज्या गोष्टी वाचकांपुढें आम्ही मांडणार आहों त्या गोष्टी मासल्याकरितां म्हणून मांडणार आहों. असल्या गोष्टी ह्या पुस्तकांत पुष्कळच आहेत; पण त्या सर्वांचा उल्लेख करण्यास आम्हापाशीं जागा नाहीं व वेळही नाहीं.

## भक्तिरसाच्या कवितेची टवाळकी

अगोदरच ओसाड पडत चाललेल्या प्रार्थनामंदिरावर आपल्या तोफांचा प्रि. गोळ्यांनीं जो भडिमार केला आहे, व मेलेल्या वाघावर वार करण्याचें शौर्य जें गाजविलें आहे, त्याच्यापूर्वी भक्तिभावाचे पोवाडे गातांना दामाजी-पंतासंबंधानें कांहीं कविता प्रिन्सिपाल साहेबांनीं नमूद केल्या आहेत; त्या अशा—

यवन जरि माझा प्राण घेता । गर्दन मारीता ।
बरवें होतें तरि, काय चिंता । हें काय अनंता ।
अनुचित करणी चक्रपाणी । काय प्रयोजन ह्या कर्माचें ।।

ह्या कविता दामाजीचे तोंडीं कवीनें घातल्या आहेत हें उघड आहे. ह्या कवितांवरून प्रिन्सिपाल साहेब असें अनुमान काढितात कीं, दामाजीपंतासही पंढरीरायानें त्यांच्या करितां जी नीच हमाली केली त्याचा अर्थ बरोबर समजला नसला पाहिजे. कारण विठोबाच्या ह्या कृतीची मुख्य मख्खी

दामाजीच्या ध्यानांत आली असती तर त्यानें भक्तिरसानें थपथपलेले वरील शब्द तोंडावाटे न काढतां असें म्हटलें असतें कीं, "बा विठोबा, महार होऊन मजकरितां ओझ्यांच्या ओझीं यवनदरबारांत वाहून नेलींस हें फार चांगलें केलेंस. ह्या योगें सामाजिक सुधारणेचा एक उत्कृष्ट धडा लोकांस त्वां घालून दिला." भक्तिरस ज्यांत ओतप्रोत भरलेला आहे अशा कवितांची वरील प्रकारानें टवाळकी केलेली पाहून, प्रि. गोळ्यांनीं भक्तिभावाचा पोकळ भपका केला आहे कीं काय, अशी जबरदस्त शंका आमच्या मनांत येते. कारण ज्यानें एकदां भक्तिरसाचा आस्वाद घेतला त्याच्या हातून वरील भक्तिभावाच्या कवितांचा, डोळ्यांत धूळ टाकणाऱ्या वकिलीच्या कामीं, उपयोग करण्याचें धाडस होईल असें आम्हास वाटत नाहीं.

## 'प्रमदावना' चे रिकामे ढंग

प्रिन्सिपालसाहेबांच्या "प्रमदावना"चें वर्णन वाचून कोणासही हसूं आल्यावांचून राहणार नाहीं. मनुष्य एकदां भांबावला कीं त्याचा बुद्धिनाश कसा होतो व तो अंधारांतच ज्यास्ती ज्यास्ती गडप कसा होतो—ह्याचें प्रमदावनाची कल्पना हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. आमचीं पूर्वीचीं देवळें नाहींत काय? मग प्रमदावन आणखी कशाला? तुळशीबाग, बेलबाग, माधवबाग, ह्यांच्या जागा विस्तृत असून त्यांच्या सभोंवती बागाही आहेत! खेड्यापाड्यांतील देवळें चांगलीं विस्तृत असून त्या ठिकाणीं फुलझाडांचीही योजना झालेली असते. ह्या ठिकाणीं पुराणें—कीर्तनें चालतात, स्त्रियांचा बराच जमावही जमत असतो. प्रमदावनांत वर्णिलेल्या सर्व गोष्टी यथासांग होत असतात. मग प्रमदावनाची एवढी आवश्यकता कां? शहरांतील देवळांत हलकट प्रकार चालतात, त्यामुळें नवऱ्यानें "ह्या देवाला जाऊं नको, त्या देवाला जाऊं नको" अशी बायकोस ताकीद दिली तर त्या वाईट स्थिती-

बद्दल जबाबदार कोण ? ज्या गावांतील लोक नवीन तऱ्हेनें शिकलेले नाहींत तेथील स्त्रीसमूहास पूर्वींच्याच देवळांपासून प्रमदावनाचे सर्व फायदे मिळतात; तर शहरांतीलच देवळें निरुपयोगी कां व्हावींत ? ह्या वाईट स्थितीबद्दल शिकलेले लोकच जबाबदार आहेत. समाजांतील सुशिक्षित वर्ग धर्मबाबींत उदासीन असल्यावर, त्यांच्या मनांत भक्तिभाव मुळींच नसल्यावर, टवाळकी करण्याशिवाय देवदर्शनास जावयाचें नाहीं असा त्यांचा पूर्ण संकल्प असल्यावर, देवालयें हीनवृत्ति अशिक्षित लोकांच्या हातीं पडावींत, व सुशिक्षितांच्या भाविक बायकांस तेथें जाणें गर्हणीय व्हावें—ह्या सर्व गोष्टी ओघाओघानेंच झालेल्या आहेत. ह्याचें पाप सुशिक्षितांच्याच माथीं मारावें लागतें. तुमच्यांत धर्मबुद्धि जर जागृत झाली असेल, भक्तिरस जर तुम्ही चाखूं लागलां असलां, तुमच्या बायकांनीं देवळांत जाऊन धर्मजागृतीचे सर्व फायदे करून घ्यावेत अशी जर तुमची खरोखर मनापासून इच्छा असेल,— तर "प्रमदावना"सारख्या रिकाम्या ढंगांत पडण्याचें तुम्हांला कांहीं कारण नाहीं. आहेत त्याच देवांना तुम्ही स्वतः जात जा, तेथील व्यवस्था आपल्या ताब्यांत घ्या; म्हणजे आहेत हींच देवळें प्रमदावनें होतील. खोलींत बसून केवळ लिहावयाचें असल्यास प्रमदावनाची कल्पना ठीक आहे. घराच्या दरवाजापुढें उभें राहूनही आंत जाण्याची वाट न सांपडल्यामुळें घरासभोंवती निष्कारण घिरट्या घालणाऱ्याची कृति जितकी वेडगळपणाची, त्याच्याहूनही अधिक खुळेपणाची "प्रमदावना"ची कल्पना आहे.

## तमासगीरांनाहि प्रिय होणारें पुस्तक

टीकाविषयक पुस्तकाच्या भाषेसंबंधानें मागें एका ठिकाणीं आम्ही उल्लेख केलाच आहे. प्रिन्सिपाल साहेबांची भाषासरणी काठेवाडी घोडीप्रमाणें डौलदार असून दक्षिणी माकणीच्या तट्टाप्रमाणें भेटेल त्यावर धुगाण्या झाडण्याचाही

गुण तिच्या अंगांत पूर्णपणें भरलेला आहे. ह्यामुळें "ब्राह्मण आणि त्यांची विद्या" हें पुस्तक तमासगीर, मौजेखातर वाचणाऱ्या मंडळीसही प्रिय होण्याजोगें उतरलें आहे.

प्रिन्सिपाल साहेबांची आज बरेच दिवस आमच्या उशागतीं वस्ती होती; ह्यामुळें आम्हास ज्याप्रमाणें सुशिक्षणाचा लाभ झाला, त्याचप्रमाणें आमचे वाचकही प्रिन्सिपाल साहेबांच्या साहचर्याची ही संधि व्यर्थ दवडणार नाहींत, अशी आम्हास आशा आहे.

नगर वाचनालय, सातारा.

# * गौतमबुद्ध.

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।

आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ भगवद्गीता अध्याय ६

आधिभौतिक उन्नतीपेक्षां पारमार्थिक उन्नतीची योग्यता ज्यास्त असें सर्व तत्त्ववेत्त्यांचें मत आहे. शरीर हें मानसिक श्रेष्ठत्वाचें आदि साधन आहे खरें; परंतु—"साधन" एवढयाचकरितां त्याला किंमत द्यावयाची; "साध्या"ची महती त्याला केव्हांही यावयाची नाहीं.

सुखोपभोगाचीं सर्व साधनें, व शरीरयष्टीस आराम देणारीं सर्व साहित्यें मनुष्यास सुलभ करून देऊन त्याची उपभोगशक्ति पूर्णावस्थेस येऊं देणें, म्हणजे पार्थिव सर्व इंद्रियांचा पूर्ण विकास होऊं देणें, हें आधिभौतिक मूलतत्त्व आहे. परंतु शरीराची वडेजावी करणें हें पारमार्थिक उन्नतीला कांहीं अंशानेंच फक्त आवश्यक आहे. आसपासच्या सर्व सृष्टिचमत्कारांचा देखावा दाखविणारा उंच महाल बांधावयाचा असल्यास ज्याप्रमाणें पाया मजबूत घालून आधारभूत कित्येक इमारती बांधाव्या लागतात, त्याचप्रमाणें मनाची अत्युत्तम जिज्ञासा तृप्त करावयाची असल्यास किंवा अमर्यादित विश्वाचें समाधानककारक रीतीनें आकलन करण्याची हाव पुरवावयाची असल्यास, मानसिक सर्व शक्तींची पूर्ण वाढ झाली पाहिजे, आणि त्याकरितां मनाचा टेका जें शरीर त्याचीही योग्य जोपासना होणें जरूर आहे. आद्य साधन शरीर; साध्य अखिल ज्ञानप्राप्ति; व त्यास पोहोंचण्याचा मार्ग मानसिक उन्नति, अथवा मनाच्या धर्मांचा पूर्ण विकास हा होय.

---

* विविधज्ञान विस्तार जानेवारी—फेब्रुवारी सन १८९६

## एकतर्फी पाश्चिमात्य सुधारणा आणि आत्मोन्नतीचे विचार

पारमार्थिक विषयाकडे होत असलेला बुद्धीचा व्यय बंद पाडून ऐहिक वस्तूंकडे विचारशक्तींचा ओघ वळविण्याचें श्रेय युरोपांत बेकननें घेतलें. आगगाड्या, तारायंत्रें, लोखंडाचे चकित करणारे कारखाने, सुखदर्शन व सुखस्पर्श कपड्यांचे पर्वतचे पर्वत उत्पन्न करणाऱ्या अचाट गिरण्या, संसारांतील लहानसहान सुखक व मोहक वस्तु उत्पन्न करणारीं यंत्रें–हीं बेकनच्या परिश्रमाचीं अंशतः फलें होत. आधिभौतिक उन्नतीनें प्राणिमात्राचें सुख वाढलें काय ?–म्हणून प्रश्न केला असतां त्या सुधारणेच्या अभिमान्यांस नकारात्मकच उत्तर देणें भाग आहे. कारण दररोज मजल दोन मजल पायीं जाण्याचे श्रम व दुःख किती आहे ह्याचा ज्यांना अनुभव असेल, त्यांनाच केवळ थोडक्या वेळांत सुखानें प्रवास करण्याच्या युक्तीनें विशेष सुखप्राप्ति होत असेल; परगांवीं गेलेल्या आप्तइष्टमित्रांची महिन्याच्या महिन्यांत बातमी कळण्याचें साधन नव्हतें त्या वेळची हालअपेष्टा ज्यांनीं प्रत्यक्ष भोगिली असेल त्यांनाच केवळ तारायंत्राचें विशेष कौतुक वाटत असेल; संसारांत जाड्याभरड्या वस्तु वापरल्यानें शरीरक्लेश कसे होतात ह्याची ज्यांना पक्की आठवण असेल त्यांनाच केवळ चैनीच्या साफसूफ दिसणाऱ्या व मऊ लागणाऱ्या जिनसांची विशेष पर्वा वाटत असेल. "सुख" व "दुःख" ह्या दोन्ही कल्पना सापेक्ष असल्यामुळें प्राणिमात्राचें सुख जरी पाश्चिमात्य सुधारणेनें वाढलें नाहीं तरी मानवी शरीरास विशेष कार्यक्षम करण्याची शक्ति त्या सुधारणेंत आहे. उपभोगजन्य सुख जरी पूर्वीप्रमाणेंच वाटतें तरी उपभोग घेणारीं पार्थिव इंद्रियें पूर्णत्व दशेस पोंहचूं लागून शरीराचा पूर्ण विकास होण्याचा संभव अधिक वाटतो. "ऐहिक सुधारणा करा" म्हणून ओरडणाऱ्या बेकनास, त्याच्या उपदेशास मान देऊन "वाफ" "विद्युत्" आदिकरून पृथ्वींतील पदार्थांचे गुणावगुण शोधून काढ-

 CW304 आभार 

णाऱ्या बाट प्रभृति आधुनिक शास्त्रज्ञांस, व आधिभौतिक शास्त्राची योग्य प्रगति होण्यापुरतीच विशेष प्रकारची मानसिक स्थिति प्राप्त व्हावी म्हणून मानसिक शास्त्रांचा ऊहापोह करणाऱ्या मिल्लसारख्या तत्त्ववेत्त्यांस, वर निर्दिष्ट केलेल्या एका फायद्याकरतांच शाबासकी देणें योग्य होईल.

शारीरिक व मानसिक सर्व इंद्रियांची पूर्ण वाढ होऊन "हवें हवें"सें करून सोडणाऱ्या सर्व इच्छांचें पूर्ण समाधान ज्यावेळीं होईल, मला करायाचें कांही राहिलें नाहीं, मला हवें असेंही कांहीं उरलें नाहीं, असें ज्यावेळीं मनुष्याला वाटेल, "सर्व योग्यता प्राप्त झाली, सर्व इच्छा पूर्ण झाल्या, सर्व जिज्ञासा तृप्त झाली" अशी ज्या वेळेला प्राणिमात्राची स्थिति होईल, त्या वेळेलाच केवळ प्राणिमात्रांची पूर्ण सुधारणा झाली असें म्हणणें तत्त्वदृष्टीनें जर सर्वथैव सत्य आहे, तर पाश्चिमात्य सुधारणा एकतर्फी आहे असें म्हणणें भाग पडतें. अनंत विश्वांच्या रहाटगाडग्यांची चलनशक्ति कोठून उत्पन्न झाली? भयानक व दुःखदायक वाटणाऱ्या जरामरणादि चमत्कारांचें गूढ कसें उकलतां येईल? "पूर्ण ज्ञानी" बनण्याची बलवत्तर जिज्ञासा कशी तृप्त करितां येईल?—वगैरे प्रश्नांस समाधानकारक उत्तर देण्याचा प्रयत्न पाश्चिमात्य सुधारणेनें केला आहे काय? "अज्ञेय" जें त्याला "ज्ञात" करण्याचा खटाटोप करणें म्हणजे व्यर्थ कालक्षेप होय—वगैरे लहान मुलास समजावण्यास योग्य अशा उत्तरानें, पारमार्थिक वादांत मुरलेल्या हिंदुमनास समाधान वाटेल काय? पाश्चिमात्य सुधारणा एकतर्फी आहे इतकेंच नव्हे तर ह्या सुधारणेनें गौण पक्षास प्राधान्य दिलें आहे. साध्यास विसरून जाऊन साधनाचीच नुसती महती गाइली आहे. यजमानास अंधःकारांत फेकून देऊन चाकराचीच रिकामी प्रतिष्ठा ह्या सुधारणेनें माजविली आहे. आत्म्याच्या उन्नतीची विशेष पर्वा न करितां शरीराची फाजील मिजास ठेवल्यानें खरी सुधारणा होईल काय?

ज्यावेळीं जें जें कांहीं पाश्चिमात्य त्याची स्तुति चालली आहे; ज्यावेळीं

युरोपिअन सुधारणेचे देव्हारे होत आहेत; इतिहास, भाषालंकारादि ऐहिक विषयांत नांव घेण्यासारख्या आमच्या पूर्वजांच्या कितीही कृति असल्या तरी ह्या विषयांचा पूर्ण उत्कर्ष पश्चिमेकडेच झाला असल्यामुळें आमच्या सुधारणेस गौण ठरवून श्रेष्ठतर जी परकीयांची सुधारणा तिचाच आम्ही अंगीकार केला पाहिजे असा दृढतर समज होण्याचा ज्यावेळीं रंग दिसत आहे; त्यावेळीं गोरकाय लोकांच्या धार्मिक विचारांहून आमचे विचार फार पुढें गेले आहेत, पारमार्थिक उन्नतीच्या कामीं हिंदु लोकांच्याच पावलांवर पावलें टाकीत इतर सर्व राष्ट्रांनीं चाललें पाहिजे, पारलौकिक तत्त्ववेत्त्यांचा उदय पूर्वेकडेच होऊन धार्मिक प्रकाश ह्याच दिशेकडून मावळतीस मिळाला, वगैरे इकडील व शार्मण्य पंडितांनीं सप्रमाण सिद्ध केलेलीं मतें आमच्या लोकांपुढें मांडून, विद्यानविद्या अंगांत खिळून गेलेल्या पारमार्थिक प्रवृत्तीस योग्य उत्तेजन देण्याची फार जरूरी आहे. हा उद्देश मनांत धरून आमचे कडील निरनिराळ्या धर्माचें संक्षिप्त पण स्पष्ट स्वरूप लोकांपुढें मांडण्याचा आमचा विचार आहे.

ज्या धर्माच्या अनुयायांची संख्या सर्वांत मोटी त्या बौद्धधर्मास प्रथम नमनाचा मान देणें प्रशस्त असल्यामुळें त्या धर्माचा आदि गुरु जो गौतम बुद्ध त्याचें चरित्र व त्याचीं धर्मतत्त्वें वाचकांस सादर करितों.

## विचारशक्तीला पंगू करणारें ‘विचार–स्वातंत्र्य’

( १ ) बुद्ध हा खरोखरी ऐतिहासिक पुरुष आहे कीं कवीच्या काव्य सृष्टींतील काल्पनिक व्यक्ति आहे ? "वाघीणीचें दूध" म्हणून ज्या शिक्षणाला मालाकारांनीं उपमा दिली त्या सांप्रतच्या इंग्रजी शिक्षणामध्यें इतकी विलक्षण कसली जादू आहे ह्याचा जर सूक्ष्म विचार केला तर "विचारस्वातंत्र्या"चा अजब धडा उत्तम रीतीनें शिकविण्याची विलक्षण हातोटी त्या शिक्षणांत

ढवर वाचनालय, सातारा.



भरली आहे म्हणूनच त्याचे एवढे पोवाडे गातात असें म्हणणें भाग पडतें. विचारशक्तीनें रुजू केल्याशिवाय कोणचीही गोष्ट सत्य मानावयाची नाहीं, असा दृढतर संस्कार ह्या विद्येनें होतो. अमका अमका म्हणतो म्हणून केवळ ह्या गोष्टीस मान द्यावयाचा असें नाहीं, तर प्रतिपादिलेल्या वस्तूच्या समर्थनार्थ त्यानें पुढें आणिलेलीं कारणें आमच्या विचारशक्तीस पसंत पडतात म्हणूनच त्याच्या बोलण्यास मान डोलवावयाची. कोणतीही गोष्ट ऐकिली कीं "तें कां? असेंच कशावरून? ह्याला आधार काय?" वगैरे झपाट्यासरशीं संशय घेण्याची मनाला ह्या शिक्षणानेंच खोड लागते. ह्याप्रमाणें स्वतंत्र विचार करण्याची संवय लागली कीं ठरीव विचारसरणीस फांटा मिळून विचारशक्तीची गुलामगिरी संपते, आदरणीय झालेल्या गुरुपरंपरेची अरेरावी संपुष्टांत येतें; आणि सत्यशोधनाच्या प्रगतीच्या पायांतील रूढ आचारविचारांच्या शृंखला तुटून जातात. पण "अति सर्वत्र वर्जयेत्" हा न्याय प्रस्तुत प्रकरणींही लागू पडतो. "विचारस्वातंत्र्य" "विचारस्वातंत्र्य" ह्या सुधेचे गोड घोट घेतांना एकाच संवयीचा अतिरेक होऊन त्या संवयीला प्रबळ मनोविकाराचें स्वरूप येतें. अशी स्थिति झाली म्हणजे विचारशक्तीस स्वातंत्र्य मिळण्याऐवजीं, आपण होऊन उत्पन्न केलेल्या स्वातंत्र्याच्या हांवेला ती बळी पडते. शंका घेणें हेंच आद्यकर्तव्य असें वाटूं लागतें; इतकेंच नव्हे तर उत्तरोत्तर असल्या विचारांच्या मुळ्या मनांत फार खोल जातात. 'रूढ' एवढ्याचसाठीं केवळ मान द्यावयाचा नाहीं असा निजध्यास घेतां घेतां "रूढ" सर्व झुगारून दिलें पाहिजे असा भ्रम झाल्यामुळें विचारशक्ति पंगु होतात आणि ह्या भ्रमरूपी रूढीचा अंमल पतकरितात. अखेरीस, जें नको नको म्हणून एवढा खटाटोप केला तेंच कपाळीं येतें. "विचारस्वातंत्र्या"च्या पाश्चिमात्य परम भक्तांनीं आमच्या इकडील श्रुतिस्मृतिपुराणादि पवित्र मानलेल्या धर्मग्रन्थांचें वाचन करण्यास आरंभ करतांना "हें सब् झूट आहे" म्हणून झपाट्यासरशीं शेरा

ठोकला; वेद हे ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांच्या वेडगळ कृतीच्या गोधडया आहेत असें प्रथमतः ठरलें; स्मृति म्हणजे क्षत्रिय राजास ताकापुरता मान देणाऱ्या ब्राह्मणांच्या कावेबाजीचें माहेरघर असा ठराव पसार झाला; "पुराण" जाणून-बुजून पुराण, खोटयानाटया गोष्टींचें भांडार, त्यांत ऐतिहासिक सत्य कोठचें असायाचें, असा पुस्तकाचें समग्र वाचन होण्यापूर्वीच किंबहुना आरंभाच्या अगोदरच ग्रह झाला. दंडकारण्यामध्यें रामरायाचा झालेला प्रवेश व तदनंतर भीमकर्म राक्षसांशीं झालेलें तुमुल युद्ध–हीं वस्तुतः खरीं नसून, दक्षिणेकडे सुधारणेचा आलेला ओघ व कृषिकर्माची दंडकारण्यांत झालेली प्रवृत्ति वगैरे प्रकार, कल्पनाशक्तीच्या जोरावर अवडंबर माजवून, रामरावणाच्या युद्धाच्या रूपानें कवीनें वर्णिले आहेत; रामायणांतील आदिमायेचें–कृत्येचें–नांव "सीता" आहे एवढयाच भक्कम पायावर एकानें वरील प्रतिपादन केलें. रामायण ग्रन्थ जगमान्य; पण तो पडला हिंदुसारख्या अडाणी लोकांचा. तेव्हां त्याबद्दल संशय घेतलाच पाहिजे, म्हणून दुसऱ्या पंडितांनीं "रामायण" होमरच्या काव्याचें प्रतिबिंब असलें पाहिजे, असें सिद्ध करण्यांत बुद्धि खर्च केली. भगवद्गीता उदात्त व सत्य विचारांनीं परिप्लुत; तेव्हां प्रथम सलामीसरसा कांहींतरी जबरदस्त आरोप ह्या ग्रन्थावर आणलाच पाहिजे, एरवीं विचार-स्वातंत्र्य कसचें व स्वधर्माभिमान कसचा! पर्वतावरील टीचभर धर्म-व्याख्यानांत, जगांतील सर्व सत्य विचार व उदात्त कल्पना ठेंचून खेचण्याचा ज्या "बाइबला"स मक्ता मिळाला आहे त्या पवित्र शास्त्रांतील विचारांची चोरी करून गीता बनविली असावी अशी कंडी पिकविण्यांत कित्येक पाश्चिमात्य पंडितांनीं आपल्या बुद्धीचे तारे तोडले आहेत. वरील विवेचनावरून पाश्चिमात्य पंडितांच्या मनाची पूर्वेकडील पुराणग्रन्थ वाचतांना कशा प्रकारची स्थिति असते हें चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. कांहींतरी विक्षिप्त कल्पना काढल्याशिवाय "विचारस्वातंत्र्य" गाजविल्यासारिखें होत नाहीं अशी

नगर वाचनालय, सातारा.



समजूत जरी नाहीं, तरी एकंदरींत परिणाम अशी समजूत असल्यासारखाच ज्यांच्या विचारसरणींत दिसतो, अशा ( Senart ) एका वडया युरोपीय विद्वानानें "बुद्ध म्हणून पूर्वी कोणी झाला होता काय ?" असा संशय प्रदर्शित केला आहे.

## बुद्धाच्या अस्तित्वावरचे भ्रामक आक्षेप

ज्या अर्थी अजून बौद्धधर्म हयात आहे त्या अर्थी त्या धर्माचा संस्थापक कोणी तरी असला पाहिजे; तेव्हां वरील संशयाचें खरें स्वरूप खालीलप्रमाणेंच धरलें पाहिजे. "दंतकथा, कविकल्पनामय वर्णनें, त्या धर्मात आदरणीय झालेलीं पुराणें, ह्यांत वर्णन केल्याप्रमाणें क्रिया चमत्कारांतीं ज्याचें चरित 'निबिडपणानें वेष्टित आहे असा बुद्ध' झाला होता काय ? प्रथम मठ स्थापन करणाऱ्या इसमाला 'बुद्ध' असें नांव देऊन हुषार अशा शिष्य-परंपरेनें ह्या कल्पनाजन्य नवीन व्यक्तीच्या अंगाशीं हल्लीं प्रमाणसिद्ध मानलेलीं अद्भुत कृत्यें डकविलीं कीं काय ?"

वेदांत सूर्यनारायणाच्या उगवण्यापासून मावळण्यापर्यंतच्या कृतींचें जें वर्णन केलें आहे तेंच वर्णन बुद्धाच्या शिष्यपरंपरेनें बुद्धाचें म्हणून दिलें असावें.– असा एक आक्षेप काढलेला आहे. वेदांतील मुख्य नायकाच्या कृतींशीं साम्य दाखविण्याची खटपट बुद्धशिष्यांनीं कां करावी ह्याचें कारण सूज्ञ वाचकांस सांगण्याची जरुरी नाहीं.

निशेच्या अंधकारमय ढगांतून सूर्य जसा बाहेर पडतोसा दिसतो त्याच-प्रमाणें बुद्ध आपली आई जी "माया" तिच्या उदरांतून बाहेर पडला. दोघांच्याही जन्माचे वेळीं जगभर उजेड पडला. मेघरूपी वृक्षाखालीं अमृताच्या सांठ्याकरितां सूर्यनारायणाचें विद्युद्राक्षसाशीं जसें तुमुल युद्ध झालें तद्वतच बुद्धाचेंही "मारा"शीं ज्ञानप्राप्तीकरितां "बोधि" वृक्षाखालीं भयंकर रण माजलें. दोघांनाही सहज यशप्राप्ति झाली. आकाशांतील मार्गावरील

शत्रू जिंकल्यावर सर्व आकाश स्वच्छ झाल्यामुळें सूर्यप्रकाश चोहोंकडे पसरतो, त्याचप्रमाणें ज्ञानप्राप्तीनंतर बुद्धाचा ज्ञानदीप चोहोंकडे चमकूं लागला. दोघांच्याही चरित्रांचा शेवट सारखाच होतो. क्रुद्ध अतएव तांबड्या लाल झालेल्या ढगांचा घेर पडल्यामुळें आपलें तेज फिकें पडलेलें पाहण्याचें संध्याकाळीं सूर्यनारायणाच्या नशिबीं येतें, तद्वत् सर्व "शाक्य" कुलाचा विध्वंस झाल्याचें अशुभ वर्तमान बुद्धास मरणापूर्वी ऐकावें लागलें. ज्या चितेवर बुद्धाच्या शवाची राख झाली त्या चितेच्या ज्वाळा आकाशांतून पडणाऱ्या जलधारांनीं विझविल्या, त्याचप्रमाणें आपल्या किरणांनीं अग्नितुल्य प्रदीप्त केलेल्या समुद्रांत सूर्यनारायणानें उडी घेतल्यावर भूतलावर रेंगाळत राहणारें त्याचें अवशेष तेज संध्याकालीन ओलसर धुक्यांत नाहींसें होतें. ह्या दोघांच्याही चरित्रांत साम्य आहे. तेव्हां आमचा कथानायक वेदांत वर्णन केलेल्या सूर्यनारायणाची प्रतिमा नव्हे काय ?

तिबेट, चीन व नेपाळ ह्या देशांत प्रचलित असलेल्या कविकल्पनाप्रधान " ललितविस्तर " नांमक बुद्धचरित्रावर विशेष जोर देऊन, गौतम बुद्ध व सूर्यनारायण ह्यांच्या कथेंत साम्य दाखवून, एकाचें चरित्र म्हणजे दुसऱ्याच्या वर्णनापासून हुषार कवीनें केलेली चोरी असें भासविण्याचा "सेनार्ट"चा वरील साम्यनिदर्शनांत हेतु दिसतो. पण ललितविस्तरसारख्या कविकाव्यास एवढें महत्त्व देण्याचें प्रयोजन नाहीं. खिस्ताचें चरित्र कथन करतांना "नवा करार" एका बाजूस गुंडाळून ठेवून "अज्ञान शतकां"तील उठल्या सुटल्या लेखकानें लिहिलेलीं खिस्तपुराणें जर आधारभूत घेतलीं तर त्या महापुरुषाचें सत्य चरित्र कोठचें वाचावयास मिळणार ? सिलोनमध्यें अद्याप बौद्ध साधू ज्या ग्रंथांचें अध्ययन करितात, त्या पाली भाषेंतील "थेरवाद" "पुराण ऋषींचे बोल" ह्या ग्रंथांकडे जर जरा लक्ष पुरविलें तर

"सेनार्ट"नें घेतलेला बुद्धाविषयींचा संशय निव्वळ भ्रामक आहे असें कोणाचेंही मत होईल.

## बुद्धकथेला ऐतिहासिक आधार

ज्याला ज्याला म्हणून बौद्ध भिक्षुगणांत शिरावयाचें असेल त्यानें खालील नमुन्याचें वाक्य शपथपूर्वक उच्चारिलें पाहिजे–"बुद्धापाशीं मी अनन्यभावें शरण होतों. बौद्धधर्म हाच काय तो माझा आसरा; 'भिक्षु'चा आश्रय हाच काय तो माझा टेंका." दर पंधरवड्यास पापक्षालनार्थ घ्यावयाच्या सर्व-प्रायश्चित्ताचे वेळीं पंधरवड्यांत घडलेल्या सर्व पापांचें नामोच्चारण करावें लागतें. ह्या विधीच्या वेळीं पुनीत करणाऱ्या भिक्षूनें करावयाचा उपदेश फार प्राचीन काळापासून कायमचा ठरलेला आहे. त्यांत खालील नमुन्याच्या वाक्यांचा उल्लेख केलेला आढळतो. "बांधवहो, जाणून बुजून खोटें बोलण्यानें सत्यनाश होतो, असें सर्वश्रेष्ठ बुद्धानें सांगितलें आहे." "सर्वश्रेष्ठ बुद्धानें उपदेशिलेल्या धर्मतत्त्वांचा अर्थ मी असा असा समजतों." अशा प्रकारचे पुष्कळ उतारे पाली भाषेतील पवित्र धर्मग्रन्थांतून देतां येतील. सत्य व धर्मसंस्थापना ह्यांचा उगम अपौरुषेय ग्रन्थापासून नाहीं, किंवा बोलणाऱ्याच्या विचारशक्तीपासूनही त्यांचा उद्भव नाहीं; तर गुरु बुद्ध व त्यानें उपदेशिलेली जी गीता ह्यापासूनच धर्मसत्यांचा उगम आहे, असें पाली भाषेतील सर्व धर्मग्रंथांचें म्हणणें आहे.

बुद्धाच्या मरणानंतर सुमारें शंभर वर्षांनंतर ( खिस्तापूर्वी ३८० वर्षें ) "वेसाली" येथें भरलेल्या सातशें धर्माध्यापकांच्या सभेत, वर निर्दिष्ट केलेले पालीभाषेतील ग्रंथ मुकरर ठरविण्यांत आले. महत्त्वाचीं धर्मतत्त्वें ज्यांत गोविलेलीं आहेत व ज्यांचा "बुद्ध" ह्या व्यक्तीशीं व त्याच्या मताशीं निकट संबंध आहे, असे ह्या ग्रंथांतील महत्त्वाचे भाग, वरील सभा भरण्याचे पूर्वीं

पुष्कळ वर्षें, लोकमान्य झाले असले पाहिजेत हें उघड आहे. तेव्हां बुद्धाच्या मरणानंतर वीस पंचवीस वर्षांतच तयार झालेल्या लेखावरून उपलब्ध असलेली माहिती खोटी कशी म्हणतां येईल ? बुद्धमूर्ति ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिली, त्याचे रसभरित शब्द ज्यांनीं प्रत्यक्ष ऐकिले, ते लोक हयात असतांना उत्पन्न झालेले ग्रंथ काल्पनिक मजकुरानें थवथवलेले व ग्रंथनायकास नसतें महत्त्व देण्याकरितां सूर्यनारायणाच्या कथेचा बुद्धया विपर्यास करून बनविलेले, असें म्हणणें धाडसाचें होणार नाहीं काय ? खिस्तास मोळे मारून मारल्यावर शंभर वर्षांचे आंत तरी "नवा करार" लिहिला होता काय ? मग खिस्त काल्पनिक व्यक्ति नसून ऐतिहासिक पुरुष कां ?

पाली भाषेंतील ग्रंथांत बुद्धाच्या वेळच्या इतर धर्मपंथांची हकीकत दिलेली सांपडते. ह्या बौद्धीय धर्मग्रंथांत बुद्धकालीन जैन धर्माचा संस्थापक "नाथपंथ" ह्याचा इतिहास जो दृष्टीस पडतो त्याचें खुद्द जैनांच्या पवित्र ग्रंथांतील मजकुराशीं "काल" व "स्थान" ह्यासंबंधीं पुरें साम्य आहे. पावा येथें जैन-गुरु मृत्यु पावले असें दोन्हीं ग्रंथांत सांपडतें. मूळ वस्तूशीं असंबद्ध अशा गोष्टीविषयींच्या निरनिराळ्या पुराव्याची एकवाक्यता पाहून ऐतिहासिक सत्यवर्णनाच्या वनांतून हिंडतों आहों अशी कोणाची खात्री होणार नाहीं ?

बुद्धकथा निवळ काल्पनिक नसून तीस बऱ्याच अंशीं ऐतिहासिक महत्त्व देतां येईल असें मानण्यास विचारणीय आणखी बरींच कारणें आहेत. पाली ग्रंथांतून बुद्धाच्या कृतीपेक्षां तत्त्वविचारांचें विशेष विवेचन केलेलें आढळतें. ऐहिक गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याची व पारमार्थिक विषयांकडे सर्व लक्ष पोंचविण्याची हिंदु लोकांची नैसर्गिक प्रवृत्ति ध्यानांत धरली म्हणजे बुद्धाच्या मतांचें इतकें विस्तृत वर्णन उपलब्ध असतां त्याचें चरित्र अल्पस्वल्प कां, ह्याचें आश्चर्य मानण्यास जागा रहात नाहीं. खिस्ताचें चरित्र लिहिण्याकडे लोकांचा

कळ लागेतों खिस्ताचीं उपदेशपर संभाषणें व ह्या संभाषणांचे विशेष प्रसंग, एवढयांचेंच वर्णन केलेले लेख प्रसिद्ध होते ना ? प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता साक्रेटीस ह्याचें सविस्तर चरित्र देण्याच्या भरीस न पडतां त्याच्या विचारांचा खल करून ते लोकांपुढें मांडण्यांतच "झेनाफन"नें आपल्या ग्रंथांचा बहुतेक भाग अडविला आहे ना ? खिस्त व साक्रेटिस ह्या जर ऐतिहासिक व्यक्ति ठरतात तर आमचा बुद्धच एवढा नावडता कां व्हावा हें आह्मांस समजत नाहीं.

कपिलवस्तूचा राजपुत्र "बुद्ध" "जागृत झालेला" "ज्ञानी" होण्यापूर्वींच्या हकीगतीशीं व त्याच्या मृत्यूच्या वर्णनाशीं वेदांतील सूर्यकथेचें इतकें साम्य कसें आहे ? ह्या प्रश्नाचा सहज उलगडा करतां येण्याजोगा आहे.

बुद्धाच्या जन्मकाळीं चोहोंकडे प्रकाश पडला इत्यादि वर्णन साहजिक आहे. एखादी क्षुल्लक शुभाशुभ गोष्ट जर घडून आली तर ती होतांना मंगलामंगल वेळ असली पाहिजे व ती होण्यापूर्वीं बरेवाईट शकुन हे झालेच पाहिजेत. अशा कल्पनांना ज्या हिंदुलोकांमध्यें पाश्चिमात्य विद्येनें सुसंस्कृत झालेल्या मनांतही अद्याप आश्रा मिळतो त्या हिंदुलोकांच्या पूर्वजांनीं त्यांच्यांतील एक परमश्रेष्ठ धर्मसंस्थापकाचें जन्मवर्णन सर्व शुभशकुनांनीं व मंगलदायक चिन्हांनीं ओतप्रोत भरलेलें असें करावें, ह्यांत सत्यविघातक हेतु आम्हास तरी दिसत नाहीं.

"बुद्ध" ह्याचा आयुष्यक्रम खिस्ताहून निराळा आहे. बुद्ध हा जन्मवेळीं इतर मानवांप्रमाणेंच होता. स्वकष्टानें ज्ञान संपादण्याची बुद्धास जरुरी पडली. आयत्या पिठावर रेघोटया ओढण्यासारखीच खिस्ताची स्थिति होती. "नर करणी करे तो नरका नारायण हो जाय" ह्या म्हणीचें प्रत्यंतर आपल्या कृतीनें व उपदेशानें लोकांस आणून देणाऱ्या व स्वावलंबनाचा उत्कृष्ट धडा घालून देणाऱ्या बुद्धाची योग्यता, "बापाचा लेक" एवढयाच वशिल्यानें प्राप्त

झालेल्या फुकाच्या ज्ञानावर घमेंड मारणाऱ्या खिस्ताहून खचीत खचीत ज्यास्त आहे, असें कोणासही कबूल करावें लागेल. स्वकष्टानें जर ज्ञान मिळवावयाचें तर ज्ञानार्जनास अडथळे घालणाऱ्या "तामसी" दुष्टांशीं दोन हात करण्याची पाळी यावयाचीच. तेव्हां "मारा"शीं युद्ध करावें लागलें हें साहजिकच आहे.

## बोधि वृक्ष, कपिल वस्तु आणि माया

वेदांतील सूर्यकथेंतल्या मेघरूपी वृक्षाचें बौद्ध कथेंतील बोधि पादपाशीं साम्य आहे ह्याची वाट काय ? ह्या साम्याची व्यवस्था कशी लावावयाची ? सूर्याचें व दैत्यांचें वेदांत जें युद्धवर्णन केलें आहे त्यांत तें युद्ध, अमृताचा सांठा जे मेघरूपी वृक्ष त्यांच्या प्राप्त्यर्थ होतें असें सांगितलें आहे. बुद्धाचें व माराचें युद्ध "बोधि" वृक्षाकरितां नव्हे तर त्या वृक्षाखालीं बुद्धास जें ज्ञान प्राप्त झालें त्या ज्ञानाकरितां होय. बुद्ध–कथेंत "वृक्ष" महत्वाची वस्तु नसून "ज्ञानप्राप्ति" ही मुख्याची गोष्ट आहे. अरण्यांत तपश्चर्येला गेलेल्या तपस्व्यानें एका वृक्षाखालीं ज्ञानप्राप्तीकरितां समाधि लावावी व ज्ञानप्राप्तीनन्तर त्या सिद्धाच्या शिष्यपरंपरेनें त्या वृक्षास पूज्य मानावें–ह्या साहजिक वर्णनांत सूर्य-कथेचा आरोप करण्यास कोठें जागा सांपडते, हें सांगणें सत्यशोधकास तरी कठीण आहे.

बुद्धाच्या मरणापूर्वीच कपिलवस्तूच्या राजघराण्याचा नायनाट झाला–हीही गोष्ट साम्यनिदर्शनांत प्राधान्यानें पुढें आणण्याजोगी नाहीं. हिंदुस्थानच्या त्या भागांतील त्यावेळच्या राजकीय स्थितीचें जर चित्र पाहिलें तर वर्णित गोष्ट केव्हां तरी घडून यावयाचीच होती असें इतिहासशास्त्रज्ञांचें मत पडेल. बुद्ध ही काल्पनिक व्यक्ति आहे हें सिद्ध करण्याकरितां सटरफटर एक दोन मुद्दे नेहमीं पुढें येतात त्यांचा विचार झाल्यावर बुद्धाची प्राणप्रतिष्ठा करून त्याला पार्थिव शरीर देण्याचें काम संपवितों.

नगर वाचनालय
ता. ८५

## गौतमबुद्ध

"बुद्ध" हें नांव, "कपिलवस्तु" नामक नगरच्या सिद्धार्थ राजपुत्राचें ज्ञानाश्रमांतलें होय. "कपिलवस्तु" नगरचा राजपुत्र—ह्याचा कांहींनीं ध्वनितार्थ असा घेतला कीं, "बुद्ध" हा ऐतिहासिक राजाचा पुत्र नसून, "कपिल" महामुनीच्या तत्त्वविचारांपासून कांहीं भाग उसनें घेऊन त्यावर आपल्या तत्त्व-विचारांची इमारत उठविणारा कोणी साधु पुरुष असावा. सांख्यांच्या मतांत व बौद्ध मतांत कांहीं मेळ दृष्टीस पडतो का पाहूं या. सर्व विश्व उत्पन्न करणारा व जगांतील सर्व घडामोडींबद्दल जबाबदार, अशा ईश्वराचें अस्तित्व सांख्य कबूल करीत नाहींत; तथापि वेदांस मान देणारे, म्हणून "नास्तिक" असेंही सांख्यवाद्यांस ह्मणतां यावयाचें नाहीं. बुद्ध हा "शून्यवादी व नास्तिक" होता. शून्यांत मिसळून जाऊन स्वतःचा नायनाट करून टाकणें, हीच इतिकर्तव्यता असें बौद्धमत आहे. सर्व दुःखांचा नाश करणाऱ्या अविनाशी स्थानाप्रत जाणें, हाच मोक्ष असें सांख्यवादी बोलतात. तेव्हां सांख्य वाद हा बौद्ध तत्त्वांचा पाया आहे असें म्हणणें युक्तिजुक्तीस जुळून दिसतें काय? कपिल महामुनीच्या शास्त्रांत "शून्यवादा"चें जें उत्कृष्ट निरसन केलें आहे त्यांत "शून्यवाद" माजविणें हें "अबुद्धा"चें अर्थात् मूढाचें काम आहे, असा बुद्धमतानुयायांस टोमणा मारला आहे. कपिलमुनि बुद्धाचीं मतें खोडून काढतात, अर्थात् ते बुद्धाहून मागचे. तेव्हां "कपिलवस्तु" ह्या नांवापासून उपस्थित झालेले तर्क शुष्कच होत.

बुद्धाच्या आईचें नांव "माया" असें होतें. "माया" ह्या नांवांतही विक्षिप्त कोटी लढविण्यांत प्रेम घेणाऱ्या लोकांस कांहीं विलक्षण खुब्या दिसत आहेत. "प्रकृति पुरुषाचा" खेळ सांख्यांनीं पुढें मांडल्यानंतर "माया"—जाल वेदांत-वाद्यांनीं पसरिलें. तेव्हां "माया" शब्दांतील जादू बुद्धावर लागू पडत नाहीं हें उघड आहे.

अतिशयोक्तीचा भाग वगळून, पाली भाषेंतील ग्रंथांत उपलब्ध असलेल्या

बुद्धचरित्रांत ऐतिहासिक विश्वसनीयता वरीच आहे, अशी वाचकांस इशारत देऊन बुद्धचरित्र सादर करितों.

(२) पूर्वचरित्र–खिस्ती शकापूर्वीच्या पांचव्या सहाव्या शतकाच्या दरम्यान, शाक्य (सर्व शक्तिमान्) कुळामध्यें व त्याच नामाभिधानाच्या देशामध्यें "सिद्धार्थ" राजपुत्राचा जन्म झाला. आप्तेष्ट मित्रांनीं ठेवलेल्या पाळण्यांतल्या ह्या नांवापेक्षां "सिद्धार्था"चीं दुसरीं नांवें अधिक प्रसिद्ध आहेत. हिंदुस्थानभर फिरून सर्व लोकांस उपदेश करणारा ह्या नात्यानें "साधु गौतम" ह्या नांवानें हा तत्कालीन लोकांत प्रसिद्ध होता सत्याला शोधून काढणारा, निर्वाणाप्रत नेणारा परमपूज्य गुरु, ह्या नात्यानें त्याच्या शिष्यपरंपरेनें त्याला दिलेलें जें नांव "बुद्ध" त्या नांवानेंच आम्हां सर्वांस तो महशूर आहे.

## बुद्धाची जन्मभूमि

हिंदुस्थानच्या नकाशावर "बुद्धा"ची जन्मभूमि साधारणतः निश्चितपणें दाखवितां येईल.

नेपाळांतील हिमालयाची मालिका, व अयोध्या प्रांतांतील वायव्येकडील प्रान्तांतून वाहत जाणारी "राप्ति" नदी, ह्यांच्या दरम्यान सुमारें तीस मैल रुन्दीचा सपाट व सुपीक असा जमिनीचा एक तुकडा आहे. हिमालयापासून निघणारे असंख्य प्रवाह ह्या प्रदेशांतून वाहत गेल्यामुळें "शाक्य" देश फार सुपीक आहे. ह्याच प्रदेशावर शाक्य कुळांतले पुरुष आपलें श्रेष्ठत्व व अधिकार मिरवीत असत. पूर्वेच्या सरहद्दीवरून "रोहिणी" नदी वाहत जाते. अद्यापपावेतों ह्या नदीस "रोहिणी" हेंच नांव आहे. दक्षिण व पश्चिम बाजूंस शाक्यांचा अधिकार राप्तीच्या तीरापर्यंत होता.

शाक्यराजे राज्य करीत असतांना ह्या प्रदेशाची स्थिति फार समाधान-

नगर वाचनालय, सातारा.



कारक होती. हिमालयापासून निघणाऱ्या अमर्यादित जलसमुदायानें सर्व देशभर त्रासदायक दलदली उत्पन्न व्हावयाच्या, त्या न होतां, सर्व जमीन लागवडीस आली होती. शाक्य कुळाचा उच्छेद झाल्यानंतर जमिनीची योग्य मशागत होऊन "शाक्य" प्रदेशास उत्तम स्थिति "अकबर"चे वेळीं पुन: एकवार प्राप्त झाली होती. ती पूर्वीची जमिनीची संपत्ति आतां तिसऱ्यांदा ब्रिटिश राज्यांत दिसूं लागली आहे.

हल्लींप्रमाणेंच शाक्यांच्या वेळीं चोहोंकडे पिवळीं भाताचीं शेतें आपल्या अपूर्व सौंदर्यात ताठ्यानें उभीं असलेलीं पहाणारास दिसत. ह्या देशांतील मुख्य पीक भाताचें. बुद्धाच्या सर्व नातलगांचीं नांवें देशांतील मुख्य पिकांस अनुसरून अन्वर्थक होतीं ह्यांत विशेष नवल नाहीं. मागील बाजूस हिमालयाचीं हिमशुभ्र शिखरें उंच गगनमंडपांत जात आहेत; त्या गिरिवराच्या पायावर संरक्षणार्थच जसूं काय पसरलेल्या, नित्य पिकानें कांचनकान्ति दिसणाऱ्या सपाट शाक्य प्रदेशांतून असंख्यात जलौघ रुप्याप्रमाणें चमकणारें आपलें शुभ्रोदक वाहून नेत आहेत, ह्या नयनानन्द देखाव्यास अधिक चित्रविचित्र भासविण्याकरितां आम्रादिक वृक्षांनीं आच्छादलेलीं लहानसहान खेड्यांतील देवालयाचीं उंच शिखरें झाडींतून वर डोकावून पहात आहेत; शाक्य प्रदेशाचा एकंदर देखावा फारच मनोहारक व चित्तवेधक होता.

शाक्य प्रदेश फारसा मोठा नव्हता हें वर सांगितलेंच आहे. आपल्या शेजारच्या कोसल ( अयोध्या ) देशाच्या बलाढ्य राजास थोडकासा करभार द्यावा, प्रसंगविशेष वेळ पाहून निवळ शाब्दिक मानावर कोसल देशच्या वकिलाची बोळवणी करावी, आसपासच्या आपल्याप्रमाणेंच छोटेखानी राजांशीं कुऱ्यानें व ताठ्यानें वागावें, अशी एकंदर शाक्य राजांची स्थिति होती. बुद्धाचा समकालीन व बुद्धाचा मोठा आश्रयदाता जो "पासेनदि" त्याच्या पुत्रानें शाक्य कुलाचा छेद केला असें म्हणतात. पण ही गोष्ट बुद्ध जिवंत असतां घडली कीं कसें ह्याविषयीं पाली ग्रंथांत सबळ पुरावा मिळत नाहीं.

## बुद्ध जन्म व बालपण

वर्णन करण्याच्या ठरीव पद्धतीप्रमाणें, बुद्धाची आई "माया" हिला बुद्ध जन्मण्यापूर्वीं पडायचीं तीं सर्व स्वप्नें पडलीं; व्हावयाचे ते सर्व शुभ शकुन झाले. जन्मकाळीं अदृश्य रीतीनें देवादिकांनीं केलेला पुष्पांचा वर्षाव दोन तीनशें वर्षांनंतर कविजनास पूर्णपणें आठवला. शाक्य देशाचा राजा बुद्धाचा बाप, शुद्धोधन, यास अत्यानंद झाला, व कोसल राजांस पादाक्रांत करणारा सुपुत्र व्हावा ह्या त्याच्या महत्त्वाकांक्षेस अनुसरूनच ज्योतिषांनीं "बुद्धा" चें जातक वर्तविलें. "सार्वभौम राजा होईल, सर्व पृथ्वीस आपल्या पराक्रमानें जिंकील" वगैरे ज्योतिष्यांचें फलवर्णन ऐकून राजाचा आनंद गगनांत मावेना. "बुद्ध" पुढें जगमान्य धर्मसंस्थापक झाला, तेव्हां सर्व गोष्टी होऊन गेल्यानंतर अमुक भाकीत सांगणाऱ्या पुढील पिढीच्या कवींनीं, "सार्वभौम राजा न होईल तर प्रख्यात धर्मगुरु होईल–" असा वरील भाकितांत शोध घातला.

बुद्धाची आई बुद्ध जन्मापासून सातव्या दिवशींच वारली. बुद्धाची मावशी व सावत्र आई, जी "महापनापति" तिनेंच त्या तान्हुल्याचें योग्य संगोपन केलें.

बुद्धास एक सावत्र भाऊ व एक बहीण अशीं दोन भावंडें होतीं; तीं रूपानें फार नांवाजलेलीं होतीं. ह्या पलीकडे बुद्धाच्या बाल्यावस्थेंतील विश्वसनीय माहिती मिळत नाहीं.

बुद्धाच्या जन्मकाळीं एक महासाधु मुद्दाम त्याच्या दर्शनास आला. बुद्धानें लहानपणींच आपल्या असामान्य ज्ञानानें आपल्या गुरूस चकित करून शिष्यवर्गांत ओढलें, वगैरे अतिशयोक्तीच्या वर्णनाचा पुढें एका ठिकाणीं आह्मांस विचार करावयाचा आहे; तेव्हां ह्या ठिकाणीं त्याचा विशेष खुलासा न करितां बुद्धाच्या शिशुदशेंतील आख्यान आटपतें घेतों.

लहानपणींच विचारीपणाचा उग्र परिणाम बुद्धाच्या सुकुमार चेहऱ्यावर झालेला होता. दरबारांत ऐन रंगांत चैन खुलत असतांना करकमळावर मस्तक ठेवून विचारांत राजपुत्रानें गढून जावें, खुशामतकारांच्या विविधचेष्टांकडे बालराजाचें लक्ष जावें म्हणून सेवकजनांनीं सिद्धार्थास बोलविण्याचा प्रयत्न केला असतां झोपेंतून उठलेल्या मनुष्याप्रमाणें स्तिमित नेत्रांनीं राजपुत्रानें त्यांच्याकडे पहावें, शुद्धोदनाच्या प्रश्नासही उत्तर न देण्याइतकें केव्हां केव्हां त्यानें ध्यानस्थ रहावें—त्यामुळें शुद्धोदनास मोठी काळजी पडली. संसार-यात्रेंतील ऐहिक सुखांत आपल्या पुत्रानें रममाण व्हावें एतदर्थ राजानें सिद्धार्थाचें "यशोधरा" नामक रूपवती युवतीशीं लग्न लावून दिलें.

## विवाह व विलासमंदिरें

" दंडपाणी " ची कन्या गोपा यशोधरा हिच्या लग्नाची हकीकत कवि-कल्पनांनीं निर्मित असावीशी वाटते. बुद्धाचें लग्न झालें व त्यास "राहुल" नामें मुलगाही झाला वगैरे गोष्टींस पुराण पाली ग्रंथांत सबळ आधार आहेत. सीता, द्रौपदी, ह्यांच्या लग्नवेळांच्या वरनिवडणुकीच्या थाटाप्रमाणें ललितविस्तरांत यशोधरेच्या लग्नाचें वर्णन आहे. जो राजपुत्र क्षत्रियास योग्य अशा हरएक प्रकारच्या मर्दुमकींत सर्वांत श्रेष्ठपणा मिळवील, त्याच्याच गळ्यांत लग्नमाळ यशोधरा घालील असें दंडपाणीनें प्रसिद्ध केलें होतें. बुद्धानें बरोबरीच्या इतर राजपुत्रांस प्रत्येक क्षात्र कलेंत लीलेनें कसें मागें हटविलें वगैरे कवींचें रसभरित वर्णन वाचून " लाविलेला पण जिंकावा मुलगी न्यावी " अशा धर्तीच्या आर्यावर्तीय स्वयंवराची, अगर " द्वंद्वयुद्धास उभे ठाकलेल्या सर्वांस जो जिंकील त्याच्या श्रमाची चीज, सम्मिलित सौंदर्यांत श्रेष्ठपद मिरवणाऱ्या युवतीच्या पाणिपीडनरूपी पारितोषिकानें होईल " अशी द्वाही फिरविल्यानंतर भरणाऱ्या पाश्चिमात्य "टूर्नामेंट"ची आठवण झाल्या-

शिवाय राहत नाहीं. "साधु गौतम" हा क्षात्र तेजांत किमपिही कमी नव्हता; हें दाखविण्याचा लेखनायकाच्या पूजेंतच गर्क होऊन जाणाऱ्या लेखकांचा हा प्रयत्न होय. सीतेनें जसा रघुशावक रामचन्द्र प्रथमपासून मनांत वर निश्चित केला होता, द्रौपदीची इच्छा जशी पांडुपुत्र धनंजय ह्यालाच केवळ मत्स्यभेद करितां यावा अशी होती, त्याचप्रमाणें "यशोधरा" व "बुद्ध" यांनीं परस्परांस प्रथमपासूनच मनानें वरिलें होतें; अशाप्रकारचा एक प्रवेश ह्या प्रेमनाटकांत घुसडून दिल्यामुळें ऐहिक–विषयैकदृष्टि जनांस रमणीय वाटणारा बुद्धचरित्रांतील एवढाच भाग विशेष रसभरित झाला आहे.

सर्व विषयवासना एकवट करून बनविलेली जी "स्त्री" तिच्याशीं जखडून टाकिलें असतां पारमार्थिक विषयांकडील आपल्या मुलाची प्रवृत्ति अजीबात नाहींशी होईल, अशी राजा "शुद्धोदन" याची खात्री होईना. निरनिराळ्या हद्दींतून उपभोगक्षम अशीं निरनिराळीं विलासमन्दिरें त्यानें राजपुत्राकरितां बांधिलीं. ऐहिक सर्व सुखोपभोगांची त्या ठिकाणीं सामग्री केली होती. ह्या मन्दिराच्या सभोंवतीं अतिशय विस्तीर्ण असा एक बगीचा होता. त्याच्या सभोंवतीच्या भक्कम तटबन्दींतून दुःखाच्या लवलेशास त्यांत प्रवेश करण्याची सक्त मनाई होती. ललितविस्तरसारखा कल्पनामय ग्रन्थ आधार धरून लिहिलेल्या आंग्लभाषेंतील "Light of Asia" नामक काव्य आपण वाचूं लागलों, म्हणजे रासेलसमधील अबिसीनियाच्या राजपुत्रास कोंडून ठेवण्याच्या सुखमय दरींची आठवण होते. पर्वतांच्या उंच रांगा, नद्या, ओहळ, गर्द झाडी, ह्यांनीं जशी ती दरी शोभिवन्त होती तद्वतच "बुद्धा"चें क्रीडाभुवन मनोहर होतें.–गायन, वादन, नाच, उत्कृष्ट वनभोजनें ह्यांच्या कधींही खळ न पडणाऱ्या परंपरेनें सुखी दरींतील लोकांचा वेळ सर्व निघून जाई, तद्वतच बुद्धाच्या महालांत देखील गातांगातांच गायकांनीं झोपी जावें, नाचतां नाचतांच कलावंतिणींस निद्रा लागावी. पार्थिवेन्द्रियाची तान्हभूक शमवून

नगर वाचनालय सातारा,
सांग्रहालीकृत

मानसिक शान्ति केव्हांही प्राप्त व्हावयाची नाहीं हें जॉनसननें प्रतिपादलेलें तत्त्व, सुखी दरींत आडरानांत एकटाच जाऊन बसणाऱ्या रासेलसची मूर्ति पाहून मनावर जसें बरोबर ठसतें, तशाच प्रकारानें क्रीडामंदिरांत आवडत्या यशोधरेस मांडीवर बसवून अधरपान करितां करितां मध्येंच विचारलहरींनीं मन कलुषित केल्यामुळें विषयपराङ्मुख झालेल्या बुद्धास पाहून वाचणाऱ्यांच्या मनाची विरक्त स्थिति होते. रासेलसप्रमाणेंच बाहेरचें जग पाहण्याची बुद्धासही इच्छा झाली.

# * बुद्ध चरित्र–लेखांक २ रा

## जरा–रोग–मृत्यूचें दर्शन व उपरति

एके दिवशीं मोठ्या लव्याजम्यासह "कपिलवस्तु" शहर पाहण्याकरितां गेलेली राजपुत्राची स्वारी, पूर्वेकडील वेशींतून आपल्या, क्रीडाभुवनाकडे परत येत असतांना वाटेंत जरेनें जर्जर झालेला एक वृद्ध पुरुष त्याच्या नज़रेस पडला. त्याचें शरीर निर्मांस होतें; सर्व दांत पडून चेहरा खप्पड झाला होता; गाल सुरकुतलेले; टक्कल पडलेलें; निवळ श्वासमात्र होत्साता, तिरकमटया-प्रमाणें वांकलेल्या शरीरास हातांतील यष्टीचा टेंका देऊन, कांपत कांपत ती स्वारी उभी होती. "कोणच्या जातीचा हा प्राणी ?"–सिद्धार्थानें सारथ्यास प्रश्न केला. 'आह्माप्रमाणेंच हा मनुष्य असावासें वाटतें."

"अरे ! हा अगदीं अशक्त दिसतो. ह्याच्या अंगांतील सर्व रक्त शोषून गेलें आहे. अस्थिपंजरावर रुक्ष चर्म मात्र शिल्लक आहे. सारथी ! ह्याच्या कुळांतीलच ही विशेष स्थिति आहे, कीं सृष्ट जीवजंतूंच्या कपाळीं ही स्थिति लिहिलेली आहे ?"

"महाराज"–सारथ्यानें उत्तर केलें–"वार्धक्यानें हा मनुष्य खचून गेला आहे; ह्याचीं इंद्रियें विकल व शून्य झालीं आहेत. दुःखभारानें शक्ति क्षीण झाल्यामुळें नातलगांना हा नकोसा झाला आहे. निरुपयोगी; ह्याला आश्रा कोण देणार ? ह्याच्या कुळांतीलच केवळ विशेष स्थिति ही नव्हे. जेवढा म्हणून जन्मास आला त्याचें यौवन वार्धक्यानें नष्ट व्हावयाचेंच. महाराजांचे आवडते बाबा, आपल्या मातुश्री, सरकारची सर्व आप्तेष्ट मंडळी–ह्यांची अखेर स्थिति अशीच व्हावयाची. सर्वांच्या नशिबीं विधीनें हें लिहिलेलेंच आहे."

---

* विविधज्ञान–विस्तार मार्च–एप्रिल १८९६

" अरेरे ! लोक कितीतरी अज्ञान ! किती तरी दुर्बल व मूढ ! धुंदी आणणाऱ्या यौवनाचा एवढा त्यांना अभिमान तरी कसा वाटतो ! आ पसरून बसलेली वार्धक्यस्थिति त्यांना दिसतच नाहीं काय ! सारथी, माझा रथ फिरीव. म्हातारपणाला मी केव्हांना केव्हां तरी बळी पडणारच, तर मला हे ऐषआराम घेऊन काय करावयाचे ? " सभोवतीं चालू असलेल्या चैनीकडे बिलकुल लक्ष न देतां राजपुत्र आपल्या खासगतच्या खोलींत एकटाच गेला.

दुसरे एकेवेळीं राजपुत्र राजधानींचें वैभव पहात पहात दक्षिण द्वारानें क्रीडाभुवनाकडे यावयास निघाला असतां, त्यानें रोगानें पीडलेला एक मनुष्य वाटेंत पाहिला. तापानें त्याच्या अंगाची ल्हाई ल्हाई झाली होती, शरीर कृश झालेलें होतें. इष्टमित्र कोणी नाहीं; घरदार कांहीं नाहीं; श्वासोच्छ्वास करण्या इतकीही शक्ति नाहीं; रस्त्यांत उघडा नागडा पडलेला असून अंगभर धूळ पसरलेली होती. त्याच्यावर मृत्यूची छाया पडल्यामुळें तो फारच भयानक दिसे. सारथ्यापासून त्याजविषयींची सर्व माहिती मिळविल्यावर, सिद्धार्थ बोलला—" अरेरे ! ! शरीर संपत्ति हीही स्वप्नांतील खेळाप्रमाणें शाश्वत नाहीं ना ! ! मनुष्यास सोसावे लागणारे हाल इतके भयंकर आहेत काय ? नरदेहाची खरी खरी स्थिति काय आहे हें कळल्यानंतर सुख व ऐषआराम ह्यांत गढून जाणें शहाणपणाचें होईल काय ? " कोणत्याही प्रकारचा सुखोपभोग न घेतां सिद्धार्थानें तो दिवस विचार करण्यांत घालविला.

तिसऱ्या खेपेस पश्चिमेकडील वेशीनें रथांत बसून चालला असतांना त्याला वाटेंत एक प्रेत भेटलें. आप्तेष्ट मंडळी त्या प्रेतासभोंवतीं मोठमोठ्यानें रडत होती; कोणी केस तडातड तोडून घेत होते, कोणी डोक्यांत धूळ उडवून घेत होते, कोणी छाती बडवीत आक्रोश करीत होते. हा उद्वेगजनक देखावा पाहून राजपुत्र सारथ्यास म्हणाला, —" धिःकार असो आमच्या ह्या

यौवनाला ! म्हातारपणानें ह्याचा हा नाश व्हावयाचाच ! आम्हाला शरीरसंपत्ति तरी आहे ? असंख्यात रोगांना हें नाशवन्त शरीर बळी पडायाचेंच ! जर म्हातारपण न येईल, रोगराई नाहींशी होईल, मृत्यु टळेल; ह्या सर्वांवर जर मनुष्याचा अधिकार चालेल—चल जाऊंया. ह्यांपासून मनुष्याची सुटका कशी होईल ह्याचा मला विचार केलाच पाहिजे. " आपल्या आयुष्यांतील प्रचंड उद्योगाविषयींचे बेत ह्या वेळीं प्रथम सिद्धार्थाच्या मुखावाटे सहज-गत्या निघाले.

चवथे वेळीं उत्तरद्वारानें स्वारी रथांत बसून चालली असतांना वाटेंत एक भिक्षु दृष्टीस पडला. त्याच्या त्या भगव्या पोषाखामुळें पाहणाऱ्याच्या मनांत त्याजविषयीं पूज्य भाव उत्पन्न होत असे. शांति, दम, व विनय हीं त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतीं. असा तो भिक्षु हातांत एक भिक्षापात्र घेऊन चालला होता.

" हा मनुष्य कोण ? " सिद्धार्थानें प्रश्न केला.

" महाराज " सारथी उत्तर करतो " हा भिक्षु आहे. ह्यानें सर्वसंग-परित्याग केला आहे; ह्यानें आपल्या इच्छा मारिल्या आहेत; हा तपश्चर्येंत सर्व वेळ घालवितो. इंद्रियांना जिंकून आपल्या ताब्यांत ठेवण्याचा त्याचा बेत आहे. मत्सर हेवा ह्यांनीं विरहित, निर्विकार हा भिक्षु भिक्षा गोळा करण्यास जात आहे, महाराज. "

" लाख मोलाची गोष्ट बोललास ! " राजपुत्रानें उत्तर केलें. " ह्या आश्रमस्थांची सर्व शहाण्यांनीं वाहवाच केली आहे. हा मार्ग मला व अवघ्या सृष्टीला तरणोपाय होईल. ह्याच मार्गानें आम्हीं शाश्वत सुखस्थानास पोहोचूं "

ज्या अन्तर्गत विचारांच्या योगानें संसारसुखाचा त्याग करून अरण्यवास स्वीकारण्याचा बुद्धानें निश्चय केला, त्या विचारांच्या मानसिक कलहकल्लोळास

नगर वाचनालय, सातारा.



जड चमत्काराचें स्वरूप देण्याचा वरील वर्णनांत प्रयत्न केला आहे हें सूज्ञ वाचकांस सुचविण्याची गरज नाहीं.

वरील साधुदर्शनानंतर परत येतांना " राहुल " पुत्राच्या जन्माची वार्ता त्यास कळली. त्यावेळीं बुद्ध ह्मणाला " मला पुत्र झाला; माझ्या पायांतील एक बिडी तुटली "

## सिद्धार्थाचा सर्वसंग-परित्याग

त्या रात्रीं एकांत वेळेला चोहोंकडे सामसूम झाल्यावर अरण्यांत जाण्याची गौतमानें तयारी केली. आपल्या निद्रालयांतून बाहेर येऊन पहातो तों त्याच्या मनोरंजनार्थ ठेवलेला सर्व सेवकगण निद्रिस्त आहे असें त्यानें पाहिलें. ज्यांचें भाषण नेहमीं मोहक असावयाचें अशा कित्येक युवती झोंपेंत बेसावध होऊन कर्कशपणानें बडबडत होत्या, ज्यांच्या रूपाचा थाटमाट पाहून मन थक्क होऊन जावें, त्यांच्या अंगावरील वस्त्रें झोंपेंत अस्ताव्यस्त झाल्यानें शरीराचें हिडिस स्वरूप पाहणाऱ्याच्या दृष्टीस पडत होतें. हा सर्व देखावा पाहून आपण स्मशान भूमींत आहोंसें गौतमास वाटलें आणि आपल्या सभोंवतालच्या राजमंदिरास आग लागून आगींचे लोट निघत आहेतसें त्यास भासलें. "अरेरे ! दुःखें व संकटें ह्यांचा हा गराडा पडला आहे ! माझ्या आयुष्यांतील मोठ्या यात्रेस निघण्याची हीच वेळ आहे. " असा मनाचा निर्धार करून त्यानें बाहेर जाण्यास आरंभ केला. कितीही विरक्त मनुष्य बनला, तरी मोह-पाश जागोजागीं त्याला अडथळा करतोच. आपल्या घरादारास शेवटचा नमस्कार करण्यापूर्वी आपल्या नूतन बालकाचें एकदां मुखावलोकन करावें, अशी बुद्धास इच्छा झाली. लग्नसंबंधाच्या सर्व बिड्या पुत्रलाभानें तुटून गेल्या असें मानणाऱ्या बुद्धास ह्या नवीन बिडीनेच क्षणभर महालांत अडकवून ठेविलें. राहुलाच्या मस्तकावर एक हात ठेवून पुष्पशय्येवर निजलेल्या

यशोधरेपाशीं बुद्ध जाऊन उभा राहिला. " माझ्या बालकास उराशीं कवटाळून धरण्याचा जर मीं आतां प्रयत्न केला, तर ही आतां जागी होईल. नको ! नको ! मी पूर्ण ज्ञानी झाल्यावर फार झालें तर यांची गांठ घेईन " ह्या विचारासरसा त्यानें विलासमंदिरांतून पाय काढला आणि विश्वासू " कंठक " नामक अश्वावर आरूढ होऊन, मुलें माणसें, आईबाप, घरदार, राज्यसुख ह्या सर्वांस सोडून वायुवेगानें तो अरण्यांत निघून गेला.

हें कविवर्णन झालें. सर्व त्याग करावयाची वेळ नेहमीं हृदयद्रावक असते; त्यांतून ज्यास राजविलासांत कांहीं कमी नव्हतें त्या सिद्धार्थाच्या सर्वसंगपरित्यागाची कथा हृदयास विशेष झोंबणारी आहे.

रुक्ष गद्यांतील जुनाट ग्रंथांतील सांपडणारें ह्या प्रसंगाचें वर्णन अशा प्रकारचें आहे. " गृहनिवास फार त्रासदायक आहे. ही पातकमय स्थिति घर सोडल्यानेंच मनुष्यास स्वातंत्र्य मिळणार आहे. असा विचार करून गौतम अरण्यांत निघून गेला. " मोहरीचा पर्वत बनविण्याची हातोटी कविजनांस उत्कृष्ट साधते.

## खडतर तपश्चर्या

प्रथमतः गौतमानें एकामागून एक असे दोन गुरु केले. योगाभ्यासाचे वेळीं शरीराचीं आसनें कोणचीं हितकारक, योग्य योगाभ्यास होण्यास इंद्रियदमन कसें केलें पाहिजे, मनाचें एकीकरण करून प्राणवायु कसा ताब्यांत ठेवावा-वगैरे गोष्टींचा त्या गुरुद्वयानें गौतमास उपदेश केला. परन्तु योगाभ्यासानें पूर्ण ज्ञानी होऊन आपण निर्वाणाप्रत जाऊं अशी त्यांची खात्री न झाल्यामुळें गौतमानें आपल्या गुरूंचा थोडक्याच दिवसांत निरोप घेतला.

नंतर " मगध " देशांतून प्रवास करीत करीत " उरुवेला " शहरास गौतमाची स्वारी आली. "उरुवेला" म्हणजे पाटणाच्या दक्षिणेकडील

" बुद्धगया " होय. ह्या प्रवासाची बुद्धाच्या तोंडची हकीकत जुन्या ग्रंथांतून अशी सांपडते:–" नंतर शिष्यहो, मीं आपल्याशींच विचार केला–खरोखर हा देश फार मोहक आहे; हें अरण्य फारच सुन्दर आहे; स्फटिकाप्रमाणें स्वच्छ प्रवाह वाहत आहे आणि अंग धुण्याच्या सोईहि सुखकारक आहेत. आसपास खेडींपाडींहि वरींच आहेत, तेथें सहज जातां येईल. निर्वाणप्राप्ती-करितां झटणाऱ्या तपस्व्यास योग्य अशी ही जागा आहे "

" उरुवेला " येथील अरण्यांत खडतर तपश्चर्या करीत गौतमानें बरीच वर्षें घालविलीं. त्यानें अन्नोदकाचा त्याग केला; आपली जीभ टाळ्यास चिकटवून ठेविली; प्राणवायूचा अवरोध करून मनाचें एकीकरण केलें. शरीराची अशा रीतीनें हालअपेष्टा करीत ज्ञानदीपाचा उजेड दिसण्याची वेळ केव्हां येते म्हणून तो वाट पहात बसला. पण ज्ञानप्राप्ति होईना. फिरून शरीरास क्लेश देण्यास त्यानें प्रारंभ केला. त्याची भयानक तपश्चर्या पाहून त्याच्या शेजारच्या दुसऱ्या पांच तपस्व्यांस मोठें आश्चर्य वाटलें. गौतमास मोक्षसाधन प्राप्त झालें तर त्यानें घालून दिलेला कित्ता आपणहि गिरवावा, ह्या हेतूनें ते गौतमापाशीं येऊन बसले. आपण होऊन आपल्यावर लादलेल्या क्लेशामुळें त्याचें शरीर पाचोळ्याप्रमाणें शुष्क झालें, तरी साध्याच्या जवळ जवळ आपण आलों असें त्यास वाटेना. शरीरयातनापासून ज्ञानप्राप्ति होत नाहीं असें अखेरीस त्याच्या मनानें घेतलें, आणि अन्नग्रहणास त्यानें पूर्ववत् प्रारंभ केला. हें पाहून त्याच्या सोबत्यांनीं त्याला सोडलें. कमकुवत व निर्बल निश्चयाचा गौतम असावा असा त्यांचा ग्रह झाला. शेवटीं बुद्ध एकटाच त्या अरण्यांत राहिला.

## बोधी वृक्षाच्या मार्गावर

ज्ञानप्राप्तीची ठरीव वेळ जवळ जवळ आली. " बोधि " वृक्षाकडे बुद्ध जाऊं लागला. जगांतून समूळ उपटून टाकिल्यावर तृषा अजिबात नाहींशी

होईल व आपलें पृथ्वीवरील साम्राज्य नष्ट होईल, ह्या भीतीनें बुद्धास ज्ञानपराङ्मुख करावयाचें असा " मारानें " निश्चय केला. सुन्दर स्त्रिया, मोहक वाद्यें, सुचक नृत्यगायन, खाद्यपेयांची मनोहारक मांडणावळ—ह्यांचा त्यानें तेथें बाजारच उत्पन्न केला. बुद्धाचें मन एकाग्र होऊं नये म्हणून—वारा सोसाट्यानें वाहूं लागला, काळ्या भोर ढगांनीं आकाशांत एकच कल्लोळ केला, व विजेच्या कडकडाटानें चारी दिशा भरून गेल्या. मांसादिक कांहीं न खातां चाळीस दिवसांचा भक्कम उपवास करण्याकरितां " किरीस्त " जेव्हां अरण्यांत गेला तेव्हां ऐहिक उपभोग व पापवासना ह्यांचा राजा जो सैतान त्यानेंहि खिस्तास विषयलोलुप करण्याचा प्रयत्न केला आहे. बौद्ध व खिस्ती विश्वसनीय जुन्या ग्रंथांतून ह्यावेळची हकीकत फार संक्षेपांत दिली आहे. " Light of Asia " मधील बुद्धचरित्रांतील ह्या भागाचें वर्णन वाचूं लागलें म्हणजे आंग्लकविश्रेष्ठ मिल्टन कृत " Paradise Regained " मधील प्रथमाध्यायांतील सैतानाच्या मोघ मोहन प्रयत्नाचा अनुवाद आपण ऐकितो कीं काय असा वाचकास भास होतो.

माराचे सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यावर गौतमास ज्ञानप्राप्ति झाली. अंतरिक्षांतील असंख्यात गोलांचें पूर्णावलोकन करण्याचें सामर्थ्य त्यास प्राप्त झालें; त्याची अंतर्दृष्टि खुली होऊन सर्व पूर्वजन्म चित्रपटावर रेखल्याप्रमाणें त्यास दिसूं लागले; जगांतील दुःखाचें आदिकारण काय, सर्व जीवजंतूंचा उद्धार कशानें होईल, वगैरे गुप्त ज्ञानाचीं कपाटें उघडीं झालीं.

सिद्धार्थ राजपुत्रानें आपला अर्थ साधिला व तो " बुद्ध " बनला. बुद्धानें कमावलेलें ज्ञान त्याच्यापाशींच रहावें, सर्व लोकांस त्याचा फायदा मिळूं नये, जगाची दुःखमय स्थिति कायम रहावी, ह्या दुष्ट हेतूनें जगदुद्धाराच्या महत्कार्यापासून बुद्धास पराङ्मुख करण्याचा मारानें अखेरीस प्रयत्न केला.

## निर्वाणाचा मोह झुगारला

नंतर मार बुद्धाजवळ गेला. बुद्धानें आपला पट्टशिष्य जो " आनंद " त्याला माराच्या ह्या प्रयत्नाची हकीकत येणेंप्रमाणें सांगितली आहे. " तो दुष्ट मार मजजवळ आला. अगदीं माझ्या शेजारीं उभा राहून तो मला म्हणाला–' सर्वश्रेष्ठा, निर्वाणाप्रत आतां गमन कर. सर्वश्रेष्ठ बुद्धाला निर्वाण-प्राप्तीची हीच वेळ आहे. ' माराचें असें भाषण झाल्यावर, आनंदा, मी त्यास उत्तर दिलें–हे चांडाळशिरोमणे, मी निर्वाणाप्रत जाणार नाहीं. मी मिळविलेलें ज्ञान सर्व लोकांस समजून देण्याइतक्या हुषार, ज्ञानी, धर्मैक-बुद्धि शिष्यांची परंपरा पाहिल्याशिवाय, मी निर्वाणलाभाचा उपभोग घेणार नाहीं.

बुद्धानें मारास योग्य तें उत्तर दिलें खरें, परन्तु गुरुपणा स्वीकारून उपदेश करीत फिरण्याचें बिकट काम अंगावर घेण्यापूर्वी, निर्वाणाप्रत जावें कीं न जावें ह्याविषयीं त्याच्या मनाची जरा डळमळीतच स्थिति होती. अमोलय ज्ञानाचा उपदेश करण्यास लोक पात्र आहेत काय ? पापाचरण फार वाढलें आहे, तेव्हां अगम्य ज्ञानाचें आकलन करण्याइतकी त्यांच्यांत योग्यता आहे काय ? कोणास कांहीं न समजल्यामुळें आपले श्रम फुकट जातील काय ?

अशा कित्येक शंका बुद्धापुढें उभ्या राहिल्या. बुद्ध निर्वाणाप्रत जाऊन जगदुद्धाराचें काम मागासतें कीं काय अशी देवादिकांसही भीति पडली. बुद्धाचें मन ज्यावेळीं जगदुद्धारार्थ निश्चित झालें नव्हतें, त्यावेळीं भूतलावर आपण होऊन येऊन करद्वय जोडून " ब्रह्मया " नें बुद्धाची प्रार्थना केली. " हे ज्ञानिश्रेष्ठा, जगाविषयीं दयार्द्र होऊन निर्वाणाप्रत आतांच जाण्याचा आपला विचार सोडून दे. दुराचारी प्राण्यांप्रमाणें सदाचारी प्राण्यांचीही भूतलावर संख्या बरीच आहे. तुजसारखा ज्ञान देणारा गुरु जर त्यांना मिळ-

णार नाहीं, तर जन्मोजन्मींची त्यांची हानि होणार आहे. ब्रह्मलोकच्या सुखाचा त्याग करून जगदुद्धारार्थ सर्वश्रेष्ठानें पृथ्वीवर आगमन केलें त्याची सार्थकता व्हावयास नको काय ? " बुद्धानें वरील प्रार्थनेस मान देऊन जगदुद्धाराचें अवजड ओझें आपल्या शिरावर घेतलें हे सांगावयास नकोच.

' बोधि ' वृक्षाखालीं विचारसागरांत बुद्ध सात दिवस निमग्न होता.

निरांजरा ( सांप्रत फल्गु ) नदीच्या कांठीं त्या ज्ञान देणाऱ्या वृक्षाखालीं बुद्धानें जी प्रथम रात्र घालविली, ती बौद्ध लोक पवित्र मानितात. बुद्धगयेंत अद्यापि तो " बोधि " वृक्ष दाखविला जातो. ह्या वटवृक्षाच्या पश्चिमेकडील तीन शाखा व मूळ बुंध्याचा सोट एवढींच काय तीं हिरवीं आहेत, बाकीचा भाग वाळून गेला आहे. सांप्रतचा वृक्ष सभोंवारच्या जमिनीहून तीस फूट उंचीच्या पाहरावर आहे. यावरून ह्या वृक्षाची पुष्कळ वेळा प्राणप्रतिष्टा करण्याचा योग आला असेल असें अनुमान निघतें.

बुद्धचरित्रांतील परममहत्त्वाच्या ह्या सात रात्री निघून गेल्यावर बुद्धाच्या उपदेशकाच्या वृत्तीस प्रारंभ होतो.

## काशी क्षेत्रांतील धर्मव्याख्यान

( १ ) गुरुबुद्ध.–काशीक्षेत्रांतील धर्मव्याख्यान.–बुद्धानें प्रथम उपदेश कोणास केला, कोठें केला, वगैरे माहिती जुन्या ग्रंथांत जशी मिळते, तशीच देण्याचा आमचा विचार आहे. काशीक्षेत्रीं बुद्धाच्या धर्मोपदेशास प्रारंभ झाला अशी सर्व बौद्धधर्मांत समजूत आहे. काशी क्षेत्रांतील धर्मव्याख्यानांत बुद्धानें स्वतः उपदेशिलेलीं धर्मतत्त्वें थोडक्यांत पण स्पष्टपणानें सांगितलेलीं असल्यामुळें त्या व्याख्यानाचें फार महत्त्व आहे.

परमश्रेष्ठ गुरुबुद्ध प्रवास करीत करीत श्रीक्षेत्र वाराणसी येथें आला. तपश्चर्येच्या वेळचे त्याच्या बरोबरीचे पांच सोबती त्यावेळीं ह्या ठिकाणीं

२।७।६२ १७३०५

होते. दुरून गुरुबुद्धास पाहून ते पांच तपस्वी एकमेकांस म्हणाले–" तो पहा गौतम बुद्ध येत आहे. ह्यानेंच ज्ञानप्राप्तीचा मार्ग सोडून देऊन इंद्रियांचे लाड पुरविण्यास आरंभ केला. तो जवळ आला असतां आह्मी असे रहाणार नाहीं; त्याला कोणत्याहि प्रकारचा विशेष मान देणार नाहीं; त्याच्या हातांतील भिक्षापात्र व अंगावरील कौपीन उचलून घेण्यास धांवणार नाहीं, ह्या जवळील आसनावर मर्जी असल्यास त्यानें येऊन बसावें."

जसजसा गुरुबुद्ध त्यांच्या जवळ गेला, तसतसा त्यांचा पूर्वोक्त निश्चय डगमगूं लागला. परमश्रेष्ठ बुद्धास ते सामोरे गेले; एकानें त्याच्या हातांतील भिक्षापात्र घेतलें, दुसऱ्यानें एक पाट बसावयास आणून दिला, पादप्रक्षालनार्थ तिसऱ्यानें उदक दिलें. आसनावर बसून बुद्धानें हातपाय धुतले.

परमश्रेष्ठ बुद्धास त्याच्या पूर्वाश्रमनामानें हाक मारून त्यांनीं त्यास मित्र असें म्हटलें. तेव्हां बुद्ध त्या पांच तपस्व्यांना म्हणाला " अहो मुनिहो, तथागतास त्याच्या पूर्वाश्रम नांवानें हाक मारून मित्र असें म्हणूं नका. तथागत हा पवित्र सर्वश्रेष्ठ बुद्ध आहे. मुनिहो, आपले डोळे उघडा; मृत्यू-पासून सुटका करून घेण्याचा मार्ग सांपडला आहे; मी तुमचा शास्ता आहें; तुह्मांस मी धर्मोपदेश करितों. जर तुह्मी माझ्या उपदेशाप्रमाणें वागाल तर ज्याकरितां थोर घराण्यांतले तरुण पुरुष घरदार सोडून अरण्यांत जातात तें धर्मोन्नतीचें अत्युत्कृष्ट फल तुह्मांस चाखावयास मिळेल. ह्या जन्मामध्येंच तुह्मांस प्रत्यक्ष सत्यज्ञान होईल."

ह्यानंतर ते पांच साधुपुरुष तथागतास ह्मणाले; " शरीराचे क्लेश करून, घोर तपश्चर्या करून, पवित्र धर्मतत्त्वांचें आकलन जर गौतमास करितां आलें नाहीं; इंद्रिय दमनानें अत्युच्च ज्ञानप्राप्ति जर साधु गौतमास झाली नाहीं; तर शरीराच्या इच्छा भागवून, शरीरास सुखांत ठेवून, पूर्ण ज्ञानिपदाप्रत साधु गौतम पोचला हें शक्य आहे काय ?"

तथागतानें ह्यावर उत्तर केलें. " साधु हो, तथागतानें आपलें शरीर सुखांत लोळत ठेविलें नाहीं. आपला प्रयत्न सोडून सुखोपभोगाकडे तथागताच्या मनानें धांव घेतली नाहीं. साधु हो, तथागत हा परमश्रेष्ठ परमपवित्र बुद्ध आहे. आपले डोळे उघडा; मृत्यूपासून सुटका करून घेण्याचा मार्ग सांपडला आहे; मी तुमचा शास्ता आहें; मी तुह्मांस धर्मोपदेश करितों. जर तुह्मीं माझ्या उपदेशाप्रमाणें वागाल तर ज्याकरितां थोर घराण्यांतील तरुण पुरुष घरदार सोडून अरण्यांत जातात तें धर्मोन्नतीचें अत्युत्कृष्ट फल तुह्मांस चाखावयास मिळेल. ह्या जन्मींच तुह्मांस प्रत्यक्ष तत्वज्ञान होईल. "

( वरील प्रकारच्या संवादाची पुनरावृत्ति एक दोन वेळा झाल्यावर खालील संभाषणास प्रारंभ होतो. )

बुद्ध--" मुनिहो, अशा प्रकारचें संभाषण मी आपल्याशीं पूर्वीं कधीं केलें आहे काय ? "

" नाहीं, पूर्वीं कधींहि नाहीं "

बुद्ध—" तथागत हा परमपवित्र इ. इ. "

## मधला धर्म-मार्ग

उपोद्घातादाखल वरील संभाषण नमूद केल्यावर, त्या पांच तपस्व्यांनीं बुद्धाचें ज्ञानमय भाषण एकाग्रचित्तानें ऐकण्यास आरंभ केला असें सांगून, जुने ग्रंथकार वाराणशी क्षेत्रांतील प्रथम धर्मव्याख्यान खालीलप्रमाणें लिहितात.

" ज्याला ह्मणून धर्माचरण करावयाचें आहे त्यानें दोन गोष्टी टाळल्या पाहिजेत. कारण धर्ममार्ग व अन्यमार्ग ह्यांमधील ह्या सीमान्तलेखा होत. ह्या दोन गोष्टी कोणत्या ? एक गोष्ट ऐषआराम करणें ही होय. ह्यामध्यें मनुष्य इच्छा व सुखोपभोग ह्याला वाहिलेला असतो. ह्यानें मनुष्य नीच, हलकट, अधर्मशील, अयोग्य व शुष्क होतो. दुसरी गोष्ट तपश्चर्येनें शरीर-

क्लेश करणें ही होय. ही स्थिति उल्लासभंजक, अयोग्य व निःसत्त्व आहे. ह्या दोन्ही सीमान्त लेखांपासून " तथागत " योग्य अन्तरावर आहे. ह्या दोन टोकांमधील जो धर्ममार्ग त्याचेंच मी अवलंबन केलें आहे. ह्या मार्गानें जाणारांचीं ज्ञानदृष्टि खुली होते; मन सुसंस्कृत बनतें; शांति, ज्ञान, विज्ञान व निर्वाण ह्यांची प्राप्ति होते. पण हा मधला धर्ममार्ग तरी कोणचा? अष्टगुणात्मक पवित्र धर्ममार्ग असा आहेः–( १ ) योग्य श्रद्धा, ( २ ) योग्य निश्चय, ( ३ ) योग्य भाषण, ( ४ ) योग्य कर्म, ( ५ ) योग्य आचरण, ( ६ ) योग्य प्रयत्न, ( ७ ) योग्य विचार, ( ८ ) योग्य वृत्तिनिरोध. ह्या गोष्टी केल्या म्हणजे मधला पवित्र मार्ग साधला असें समजावें.

" मुनिहो, प्राणिमात्रास दुःख होतें ह्यांतलें गुह्य असें आहे. जन्मास येणें म्हणजेच दुःखसागरांत पडण्यासारखें आहे. वृद्धावस्था दुःखमय, रुग्णस्थिति दुःखमय, मृत्यु केवळ दुःखाचें आगर. नावडत्याची भेट झाली असतां दुःखच होतें; आवडत्यापासून वियोग झाला कीं दुःखच; इष्टप्राप्ति न झाल्यानें दुःखच होणार; सारांश, पंचभूतात्मक देहापासून मानवास दुःखा-व्यतिरिक्त कांहीं मिळत नाहीं. ( १ )

" मुनिहो, जगांतील दुःखाचा उगम कसा होतो ह्याविषयीं धर्मरहस्य असें आहे. प्राणिमात्रास जन्ममरणाच्या भोंवऱ्यांत तृष्णा फिरविते. तृष्णेच्या सख्या बहिणी विषयवासना व इच्छा ह्या होत. ह्या जुळ्या बहिणींची तृप्ति झाल्या-सारखा भास मात्र केव्हां केव्हां होतो. सुखोपभोग, अधिकार ह्या सर्वांची तृष्णा दुःखाचें आदि बीज आहे " ( २ )

" मुनिहो, दुःखाचा नाश कशानें होईल तें परम रहस्य तुम्हांस निवेदन करितों. इच्छेचा समूळ उच्छेद केल्यानें तृष्णा नाहींशी होते. इच्छा सोडून द्यावी, तिला हद्दपार करावें, आपल्यापासून दूर हाकलावी, तिला थारा मुळींच देऊं नये. ( ३ )

" कोणत्या मार्गानें गेलें असतां आपणास दुःखाचा नाश करितां येईल तें निवेदन करितों. तो अष्टगुणात्मक उपाय असा. ( १ ) योग्य श्रद्धा, ( २ ) योग्य निश्चय, ( ३ ) योग्य भाषण, ( ४ ) योग्य कर्म, ( ५ ) योग्य आचरण, ( ६ ) योग्य प्रयत्न, ( ७ ) योग्य विचार, ( ८ ) व योग्य वृत्तिनिरोध. ( ४ )

" जगांतील दुःखाचें गूढ ह्याप्रमाणें मीं उकलिलें. पूर्वी जे विचार कोणालाहि सुचले नाहींत ते विचार माझ्या ज्ञानदृष्टीला ह्याप्रमाणें दिसले, विज्ञान, प्रज्ञान, अंतर्ज्ञान, दिव्यदृष्टि आदिकरून सर्व शक्ति ह्याप्रमाणें जागृत झाल्या. " जगांतील दुःखाच्या आदि मूलाचें ज्ञान करून घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं "—" मला हें गूढ समजलें "—ह्याप्रमाणें, मुनिहो, पूर्वी जे विचार कोणालाहि सुचले नाहीत, ते विचार माझ्या ज्ञान-दृष्टीस ह्या रीतीनें दिसले; विज्ञान, प्रज्ञान, अंतर्ज्ञान, दिव्यदृष्टि आदि करून सर्व शक्ती ह्या रीतीनें जागृत झाल्या.

( दुःखाचें आदि कारण कोणतें, दुःखनाश कसा होतो, हें साधण्यास उपाय कोणचा ? ह्या तीन तत्त्वांसंबंधानें वरील विचारांची पुनरावृत्ति आढळते तेवढा भाग गाळला आहे. )

" आणि जोंपर्यंत मुनिहो, ह्या चार सत्य तत्त्वांचें द्वादशभागात्मक* विश्वसनीय ज्ञान पूर्ण स्पष्टपणें मला झालें नव्हतें, तोंपर्यंत, ह्या लोकीं, देव-लोकीं, मारलोकीं, ब्रह्मलोकीं, सर्व सृष्ट जीवांमध्यें, तपस्व्यांमध्यें, ब्राह्मणांमध्यें, सर्वश्रेष्ट बुद्धाप्रत मी पोंचलों नव्हतों. ज्यावेळीं, मुनिहो, ह्या चार सत्य तत्त्वांचें द्वादशभागात्मक* विश्वसनीय ज्ञान पूर्णपणें मला झालें, त्यावेळीं,

---

* प्रत्येक तत्त्वाचें त्रिगुणात्मक ज्ञान—जसें " दुःखाचें गूढ असें आहे "—" मला हें समजलें पाहिजे "—" ह्या सर्वांचें मला ज्ञान झालें " चार तत्त्वांचे पुढें ( १ ) ( २ ) ( ३ ) ( ४ ) असे अनुक्रमें आकडे दिले आहेत.

नगर वाचनालय, सातारा



ह्या लोकीं, देवलोकीं, मारलोकीं, ब्रह्मलोकीं, सर्व सृष्ट जीवांमध्यें, तपस्व्यांमध्यें, देवब्राह्मणांमध्यें सर्वश्रेष्ठ अशा बुद्धपदाप्रत मी पावलों. मला हें सर्व दिसलें आणि आतांहि मी हें सर्व जाणतों; माझ्या आत्म्याची मुक्तता झाली; हा माझा शेवटचा जन्म होय. जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मी आतां सुटलों."

## दुःखांतून सुटण्याची युक्ति

ह्याप्रमाणें बुद्धाचें प्रथमचें धर्मव्याख्यान आहे. मुळांत पुष्कळ वाक्यांच्या पुनरावृत्तींची रेलचेल आहे. पुन्हां पुन्हां येणाऱ्या ह्या कांहीं वाक्यांस वरील अवतरणांत फाटा दिला आहे व कांहीं कांहींस मासल्याकरितां पुन्हां पुन्हां वाचकांच्या पुढें येऊं दिलें आहे.

वरील शब्दांनींच बुद्धानें उपदेश केला अशी हमी इतिहासास घेतां येत नाहीं. बुद्धाच्या सर्वसाधारण मतांचें एकीकरण प्राथमिक शिष्यांनीं ह्या व्याख्यानांत केलें असावें असा अन्दाज आहे. ऐतिहासिकदृष्टया ह्या व्याख्यानास किती महत्त्व द्यावयाचें ह्याविषयीं जरी बराच मतभेद असला तरी बौद्ध मतांचें विवेचन करितांना ह्या व्याख्यानाचा अतिशय उपयोग आहे हें निर्विवाद होय.

सर्व जग दुःखमय आहे व दुःखांतून सुटण्याची युक्ति शोधून काढणें हेंच मनुष्याचें आद्यकर्तव्य. सर्व व्याख्यानाचें सार एवढेंच. दुःखाशिवाय बुद्धदृष्टीस ह्या जगांत दुसरें कांहीं दिसत नाहीं. अखिल सृष्टीचा आदिकर्ता कोण ? सृष्टि निर्माण करण्याची विधात्यास एवढी पंचाईत कोणी सांगितली ? 'देव' 'देव' ह्मणून कोणी आहे कीं नाहीं ?—वगैरे आध्यात्मिक वादाच्या उंबरठ्याशीं अडकणाऱ्या कूट प्रश्नांच्या वृथा काथ्याकुटींत पडण्याची बुद्धास जरुरी दिसत नाहीं. आपण बंदीवान होऊन तुरुंगांत पडलों असतांना—आपणांस कारागृहवास कलेक्टरांच्या हुकुमानें झाला, कीं महाराणीच्या प्रतिनिधीचा तसें करण्याविषयीं गुप्त खलिता होता, कीं उच्च न्यायमंदिरांतील

न्यायमूर्तींनीं ह्या शिक्षेस संमति दिली—वगैरे भलत्या शंकांच्या भानगडींत आपण न पडतां, तुरुंगांतील कोणते दरवाजे लत्ताप्रहारानें सहज फोडण्याजोगे आहेत, कोणत्या नाक्यावर ढेचापेचा पहारा आहे, कोणत्या खिडकींतून उडी टाकिली असतां आपणांस विशेष इजा न होतां पहारेकऱ्याच्या हातावर सहज तुरी देतां येतील—वगैरे गोष्टींचें मनन करणें कैद्यास विशेष हितावह आहे, असें वृद्धमत असावेसें दिसतें.भक्कम दरवाजे जर फोडतां येतात,दांडगे गज जर वांकवितां येतात, शिपायाच्या नागव्या तरवारीची जर आह्मांस भीति वाटत नाहीं, तर राजसत्ता मिरविणारा पुरुष कोण ह्याचा शोध लावून वशिला बांधण्यांत व्यर्थ कालक्षेप कां करावा? कारागृहांतून मुक्तता झाल्यावर, ह्याचा मालक कोण ह्मणून विचारणें ह्मणजे रिकामी उठाठेव करण्यासारखें आहे. मनुष्यास जर आपल्या दुःखाचा शेवट करितां येतो, तर विश्वाचा चालक कोण ह्मणून विचारपूस करणें ह्मणजे नसत्या उपद्व्यापांत सुख मानणें नव्हे काय?

## * बुद्ध चरित्र—लेखांक तिसरा

### वाढती शिष्य-शाखा

असो. बुद्धाचे भाषण संपल्यानंतर "पवित्र बुद्धानें धर्मसंस्थापनेस आरंभ केला" अशी आरोळी पृथ्वीतलापासून देवलोकांपर्यंत गेली. "कौंडण्य" आदिकरून त्या पांच तपस्व्यांनीं आपणांस शिष्य करण्याविषयीं बुद्धास प्रार्थना केली. "मुनिहो, जवळ या, तुह्मांस धर्मतत्त्वांचा चांगला उपदेश झालेला आहे; दुःखाचा नाश करण्याकरितां पवित्र आचरण ठेवा" हा गुरुमंत्र झाल्यावर "बुद्धमठा"ची स्थापना झाली.

सृष्टपदार्थांच्या क्षणभंगुरत्वाबद्दल आणखी एकवार बुद्धानें उपदेश केल्यावर त्या तपस्व्यांच्या पातकाचा नाश झाला आणि त्यांना ज्ञानप्राप्ति झाली.

"ह्यावेळीं सर्व जगांत सहाच काय ते पूर्ण पवित्र होते" असा शेरा मारून जुन्या ग्रंथकारांनीं ह्या व्याख्यानाच्या इतिहासाची परिसमाप्ति केली आहे.

( ४ ) **शिष्यमंडळ**—वाराणसी क्षेत्रांतील एका वड्या श्रीमंत घराण्यांतील "व्यास" नामक तरुण गृहस्थ आपल्या बायकामुलांसह "बुद्धा"च्या शिष्यमंडळींत शिरला व त्याच्या घराण्यांतील सर्व मंडळी "उपासक"× झालीं.

---

* विविधज्ञान विस्तार मे—जून १८९६

× गृहस्थाश्रमींच राहून बुद्धास जे गुरु करीत ते "उपासक" होत. सर्वत्याग करून भगवीं वस्त्रें धारण करून जे "बुद्धाश्रम" स्वीकारीत ते "भिक्षु" होत. बुद्ध गुरु असूनहि दुसरा गुरु करण्यास "उपासकां"स परवानगी होती.

उरुवेला येथें निरंजरा नदीचे कांठीं वेदाज्ञेप्रमाणें यज्ञयाग करीत हजार ब्राह्मण तपस्वी राहत होते. काश्यपादिकरून तीन बंधु त्यांचे प्रमुख होते. यज्ञकुंडाचे खोलींत एक प्रचंड सर्प रहात असे. त्या सर्पास बुद्धानें आपल्या तपोबळानें हद्दपार केलें. ही अपूर्व शक्ति पाहून काश्यपाची बुद्धावर श्रद्धा बसली. आणखी बरेच चमत्कार बुद्धानें करून दाखविल्यावर काश्यपादि ते तीन बंधु आपल्या शिष्यसमूहासह " भिक्षु " झाले. ह्यायोगें बुद्धाच्या शिष्यमंडळीची संख्या हजारानें एकदम फुगली.

नंतर मगध देशाची राजधानी " राजगृह " येथें बुद्ध गेला. तेथील तरुण राजा " बिंबासर " आपल्या लव्याजम्यासह दरबारी लोकांस बरोबर घेऊन बुद्धाचीं धर्मव्याख्यानें ऐकावयास येऊं लागला. वर निर्दिष्ट केलेला काश्यप व बुद्ध, ह्यांना एके ठिकाणीं पाहून ह्या दोघांपैकीं गुरु कोण व शिष्य कोण, ह्याचा लोकांना संदेह पडू लागला. काश्यप आसनावरून उठला, बुद्धाच्या पायावर त्यानें मस्तक ठेविलें व बिंबासराकडे वळून तो म्हणाला " महाराज, तथागत हे माझे गुरु आहेत, मी त्यांचा शिष्य आहें; सरकार, तथागत हे माझे गुरु आहेत मी त्यांचा शिष्य आहे. " हें ऐकून बिंबासर आणि त्याचे पुष्कळ प्रजाजन " उपासक " झाले.

बुद्धाच्या शिष्यमंडळांत जे सर्वश्रेष्ठ पदाप्रत पोंचले ते " सारिपूत " व " मोग्गलान " ह्याच ठिकाणीं उपदेश घेऊन भिक्षुवर्गांत शिरले अशी दंतकथा आहे. बुद्धास शिष्य कसेकसे कोणकोणत्या कारणांनीं मिळत गेले ह्याचा जर इतिहास वाचला, तर शिष्य होण्याचीं कारणें व पद्धत हीं सर्वदा एकच होतीं असें म्हणावें लागतें. त्यावेळीं लोक धर्मांतर ( मतांतर हा शब्द येथें योग्य दिसतो ) कसें करीत ह्याचा मासला समजावा म्हणून वरील शिष्य-द्वयांची थोडीशी हकीकत वाचकांस सादर करितों.

## धर्मांतर ऊर्फ मतांतराचा नमुना

हे दोघे ब्राह्मणपुत्र, धिवासराच्या राजधानींत, संजय नामक ब्राह्मण तपस्व्याचे शिष्य होऊन राहिले होते. पारमार्थिक तत्त्वज्ञानाच्या शिखरास येण्याच्या मार्गाचें आक्रमण करण्यास ज्यावेळीं ह्यांनीं आरंभ केला, तेव्हां परस्परांस असें वचन दिलें होतें कीं, ज्यास म्हणून ह्या दिव्य ज्ञानाची प्राप्ति प्रथम होईल त्यानें दुसऱ्यास आपल्या श्रेष्ठत्वाचा भागीदार करावा. एके दिवशीं सारिपूतानें ' असाजी ' नामक बुद्धशिष्य रस्त्यांतून भिक्षा मागत जातांना पाहिला. त्याची मुद्रा शांत, सतेज, व गंभीर होती. खालीं बघत रस्त्यांतून तो चालला होता. " उपातिश " उर्फ " सारिपूत ह्याचे प्रश्न " ह्या नांवाचा जो लेख एकाग्र चित्तानें ऐकावयास ' अशोक ' राजानें भिक्षु, भिक्षुकिणी, व उपासक स्त्रीपुरुषांस विनंति केली, त्या लेखांत ह्यापुढील हकीकत अशी दिली आहे; " सारिपूतानें असाजीस जेव्हां पाहिलें तेव्हां तो आपल्याशींच म्हणाला—खरोखर ह्या जगांत जे पवित्र आत्मे आहेत त्यापैकींच हा असावा. मी ह्याजवळ जाईन आणि विचारीन ' मित्रा, कोणावर विसंबून तूं जगाचा त्याग केलास ? आपला गुरु कोण ? कोणाचा उपदेश आपण स्वीकारला ? ' अथवा इतक्यांतच ह्याला कांहीं विचारूं नये. हा भिक्षा गोळा करण्यांत गुन्तला आहे. भिक्षा मागून असाजी परत निघाल्यावर सारिपूतानें त्याला गांठलें, आणि त्यास प्रणिपात केला. नमस्कार चमत्कार होऊन आगतस्वागताचे ठराविक कुशल प्रश्न झाल्यावर सारिपूत बोलला— "आपली मुद्रा दैदिप्यमान दिसते,आपलें तेज निर्मल व पवित्र आहे. कोणावर विसंबून आपण सर्वत्याग केला ? आपला गुरु कोण ? कोणाचा उपदेश आपणांस मान्य आहे ?" " मित्रा " असाजी उत्तर देतो " ज्यानें सर्व ऐहिक गोष्टींचा त्याग केला आहे असा शाक्यकुळांतील राजपुत्र जो गौतमबुद्ध त्याजवर सर्व विश्वास ठेवून मीं जगाचा त्याग केला. तो माझा गुरु, त्याच्याच आज्ञा—त्याचाच उपदेश मला मान्य. "

" मित्रा, तुझ्या गुरूचा असा उपदेश तरी काय आहे ? "

" जग सोडून मला फार दिवस झाले नाहींत, नुकताच मी भिक्षु झालों. अजून मी नवशिक्याच आहें. त्या तत्त्वांचें सविस्तर विवेचन मला करितां यावयाचें नाहीं; थोडक्यांत त्यांतील रहस्य मी सांगूं शकेन. "

" थोडक्यांत सांग अगर पाल्हाळानें सांग. मला त्यांतला मुख्य मुद्दा तेवढा पाहिजे. आदितत्त्व केव्हां समजेलसें मला झालें आहे. "

" सर्व अस्तित्वांस कारणें आहेत. हीं कारणें व नाश ह्याविषयीं तथागत उपदेश करितो. त्या थोर गुरूचा हाच उपदेश आहे. "

वरील वाक्य पुष्कळ पिढयांनीं बौद्ध धर्मतत्त्वांचें सूत्रवचन होऊन बसलें. बोधि वृक्षाखालीं कार्यकारणभावांच्या मालेचें जें ज्ञान बुद्धास झालें त्याचा गोषवारा वरील सूत्रवचनांत आहे. बुद्धाच्या धर्मतत्त्वांचें थोडक्यांत विवेचन पुढील एका भागांत करावयाचें असल्यामुळें येथें जास्त लिहिणें अप्रासंगिक होणार आहे.

वरील तत्त्वरहस्य असाजीचे मुखांतून सारिपूतानें ऐकिल्याबरोबर त्याची दिव्य दृष्टि खुली झाली व सत्यज्ञानाचा निर्मल व स्वच्छ प्रकाश त्याला दिसला. "ज्यास ज्यास ह्मणून आरंभ आहे त्याचा त्याचा हा आपला शेवट झालाच पाहिजे; ज्यास आदि आहे त्यास अंतही आहे "—असें त्यास ज्ञान झालें. नंतर तो असाजीस बोलला " फक्त एवढाच जरी बुद्धाचा उपदेश असला तरी देखील दुःखविरहित स्थितीप्रत आपण पोहचूं. "

सारिपूतानें मोग्गलानास हें धर्मरहस्य सांगितलें. ते दोघे बुद्धाचा उपदेश घ्यावयास निघाले. आपल्यापाशींच राहण्याविषयीं गुरु संजयानें केलेल्या विनविण्यास त्यांनीं जुमानलें नाहीं.त्यांस लांबून येतांना पाहून बुद्धानें हे शिष्य-वर्गांत श्रेष्ठपद पावतील असें भाकीत केलें. त्या दोघांस स्वतः बुद्धानें उपदेश केला. ह्यावेळीं बिंबासराचे राज्यांत बौद्धधर्माचा फार प्रसार झाला.

बुद्धाच्या बऱ्याच मर्जीतला शिष्य म्हणजे " आनंद " होय. आनंद हा शाक्य कुळांतलाच असून त्या कुळांतील बहुतेक सर्व सरदारांबरोबर ह्यानेंही " भिक्षू "चीं वस्त्रें धारण केलीं. बुद्धाच्या शरीराची काळजी घेणें, बुद्ध निजला असतां पलंगबहाऱ्यावर असणें, नेहमीं त्याच्याजवळ असून बुद्धाच्या सुखदुःखाकडे लक्ष पोंचविणें, वगैरे सर्व कामगिऱ्या " आनंदा "वरच सोंपविलेल्या होत्या.

बुद्धपुत्र " राहुल " ह्यानेंही भिक्षुवृत्ति धारण केली. परन्तु हा पुढें नांवलौकिकास चढला असें कांहीं बौद्धीय धर्माच्या इतिहासांत आढळत नाहीं.

## बुद्धाला वांचविणारे चमत्कार

बुद्धाच्या बन्धूंपैकीं " देवदत्त " ह्यानें भिक्षूचा आश्रम स्वीकारल्यावर आपल्या शिष्यवृत्तीस पुष्कळच कलंक लाविला. बुद्ध वयोवृद्ध होऊं लागला तेव्हां त्याचें अधिकारस्थान आपणांस मिळावें म्हणून त्यानें पुष्कळ खटपट केली. " पोपांच्या " माळेप्रमाणें गुरुपरंपरा आपल्या धर्मांत असावी हें बुद्धास पसंत नव्हतें. ह्यामुळें देवदत्ताच्या सर्व खटपटी लटपटल्या. अखेरीस त्यानें एक रामबाण उपाय योजिला. आपल्या बापाचें सिंहासन केव्हां मिळेल म्हणून हापापलेल्या " अजातशत्रु " नामक " बिंबासरा "च्या पुत्राशीं त्यानें संगनमत केलें. बुद्धास ठार मारण्याचा त्यांनीं बेत केला. पण ह्यावेळीं चमत्कार असा झाला कीं, ज्याच्याखालीं सांपडून बुद्धाच्या शरीराच्या ठिकऱ्या ठिकऱ्या व्हाव्या अशी योजना केली होती तो तुटलेल्या कड्यावरील पुढें आलेला खडकाचा भाग बुद्धाच्या अंगावर न कोसळतां त्याच्या पायाजवळच पडून थबकला; दाताच्या मोहऱ्याखालीं चिरडून बुद्धानें मरावें म्हणून त्याच्या अंगावर सोडलेला मत्त गजेंद्र बुद्धास पाहतांच शांत झाला. ह्या चमत्कारानंतर देवदत्तास उपदेश करून बुद्धानें त्याची चांगली समजूत केली. ह्यानंतर निराळ्या रीतीनें वर्चस्व संपादण्याचा देवदत्तानें प्रयत्न केला. भिक्षूंनीं मनुष्य-

वस्तीजवळ राहूं नये, अरण्यांतच राहिलें पाहिजे; केवळ भिक्षान्नावर व कंदमूलावर उपजीविका करावी, पुडयांची आमंत्रणें पतकरूं नयेत; केवळ वल्कलांचीं वस्त्रें अंगावर घ्यावींत–वगैरे कडक नियम अंमलांत आणल्याशिवाय खरी धर्मोन्नति होणार नाहीं अशी त्यानें सूचना केली. विनाकारण देहदंड अतिशय करून घेण्यांत कांहीं इत्यर्थ नाहीं, असें बुद्धाचें मत होतें. ' विषयासक्त ' बुद्धास सोडून देऊन शिष्यवर्गानें आपणांस प्रमुखत्व द्यावें म्हणून त्यानें उद्योग आरंभिला. ह्या दुष्ट हेतूमुळें निंद्य मृत्यूनें त्याला घेरिलें. पृथ्वी दुभागून जिवंतपणीं नरकांत देवदत्त पडला असेंही लिहिलेलें आहे.

देवदत्तानें भिक्षुवर्गाची सुधारणा करण्याचा प्रयत्न केला ह्याविषयीं संशय घेण्यास कांहीं कारण नाहीं; परन्तु त्यानें बुद्धास मारण्याचा प्रयत्न केला वगैरे गोष्टी कल्पनामय असाव्यात.

## अनेकविध शिष्यवर्ग

बिंबासराच्या दरबारांतील प्रसिद्ध राजवैद्य " जीवक " हाही बुद्धाच्या उपासकांपैकींच एक होय. बुद्ध, भिक्षु, भिक्षुणी, ह्या सर्वांची तब्यत दुरुस्त आहे कीं नाहीं हें तपासून योग्य औषधोपचार करण्याचें काम ह्या धन्वंतऱ्याचें होतें.

मगध देशाच्या बिंबासराप्रमाणेंच कौसल देशचा राजाही बुद्धाच्या पुरस्कर्त्यांपैकींच एक होता. बुद्ध, बिंबासर व कौसलाधिपति, हे तिघेहि समवयस्क होते. ह्या नृपतिद्वयाच्या पाठबळानें बुद्धमताच्या प्रसारास चांगलाच जोम आला.

शाक्य दरबारांतला " उपालि " नांवाचा " नापिक " हाही बुद्धाच्या प्रिय शिष्यांपैकींच एक होता. प्राथमिक बौद्धधर्मनिगमांचें उत्कृष्ट रीतीनें प्रतिपादन करणाऱ्यांमध्यें ह्यालाच श्रेष्ठपद दिलेलें आढळतें.

कुबेराप्रमाणें धनाढय व्यापाऱ्यांतहि बुद्धाचे पुष्कळ अनुयायी होते. "अनाथ पिंडिक " हा सर्वांचा अग्रेसर होय. राजा बिंबासर ह्यानें जसें आपलें

" वेणूवन " नामक विहारभुवन बुद्धास व त्याच्या शिष्यवर्गास अर्पण केलें होतें त्याप्रमाणें आपणही एक बगीचा बुद्धास नजर करावा असें अनाथपिंडिकाच्या मनांत आलें. " वेणूवन " हें शोभिवन्त व शांत स्थान होतें. शहरच्या अगदीं जवळ असूनही शहरांतील त्रासाचा व दगदगीचा ह्याला संपर्क बिलकुल नव्हता. भिक्षेवर उपजीविका करणाऱ्या तपस्व्यांस ही जागा फारच सोयीची होती. वेणूवनाहून अधिक रम्य व शोभिवन्त, तसेंच अधिक शांत व सोयीचें स्थान कसेंही करून गुरूस अर्पण करायाचें, असा अनाथपिंडिकाचा संकल्प होता. राजा " जेता " ह्याच्या क्रीडोपवनाखेरीज दुसरी कोणचीच जागा अनाथपिंडिकाच्या मनास येण्याजोगी नव्हती. " जेता " ती देण्यास कबूल होईना; अखेरीस त्या उपवनावर जेवढें सोनें हांतरतां येईल तेवढें सोनें देण्याचें करून ती जागा अनाथपिंडिकानें विकत घेतली. "जेतावन" बुद्धाच्या रहाण्याच्या आवडत्या स्थानापैकीं एक झालें हें सांगायास नकोच.

## बुद्धसंप्रदाय आणि भिक्षुणि

बुद्धास जसे शिष्य होते तशा शिष्यिणीही होत्या.

बुद्धाचेवेळीं स्त्रियांस हल्लींपेक्षां स्वातंत्र्य पुष्कळ ज्यास्ती होतें. पारमार्थिक तत्त्वांच्या अनिश्चित स्थितीचा तो काळ होता. देशभर बुद्धाप्रमाणें उपदेश करीत फिरणारे धर्मगुरु पुष्कळ होते. पारमार्थिक तत्त्वांचा ऊहापोह कडाक्यानें चोहोंकडे सुरू होता. ह्या वादविवादांत उत्कृष्ट कोटिक्रम लढवितांना स्त्रियाही आढळतात. " ब्रह्म "ची ज्यास उत्कृष्ट ओळख, त्यास बक्षिसादाखल देण्याकरितां जनकराजानें यज्ञसमयीं ठेवलेल्या हजारो सुवर्णशृंग गायी याज्ञवल्क्य ऋषि हाकून नेत असतां, " ब्रह्मज्ञां "त त्यांचें श्रेष्ठत्व न मानण्याच्या इराद्यानें ब्रम्हज्ञानांतील बिकट प्रश्नांचा वर्षाव त्याच्यावर प्रथम " गार्गी "नेंच केला. पारमार्थिक दुर्गम विचारांवर शंका प्रतिशंका घेण्याची योग्यता त्यावेळीं हिंदु स्त्रियांचे अंगीं होती हें खास.

परन्तु स्त्रीजातीविषयीं बुद्धाच्या मनांत पूज्यभाव जेवढा असावा म्हणून आमची सर्वसाधारण समजूत आहे त्याहून फारच कमी होता. संसारांतील सर्व मोहक वस्तूंचा त्याग करणाऱ्या बुद्धास व त्याच्या शिष्यवर्गास स्त्रिया अतिशय भयंकर दिसत. संसारांत डांबून ठेवणारे मोहपाश स्त्रियांत एकवट झाले आहेतसें त्यांना वाटे. ह्या जगांतील प्रचंड भूल, स्त्रीजात; ऐहिक सुखांत लोळत पाडणारी जादू, स्त्रीजात; घरांत अडकावून ठेवणारी बेडी, स्त्रीजात. " गुरुमहाराज, " एकेसमयीं आनंदानें बुद्धास विचारिलें, " गुरु महाराज, स्त्रियांशीं आम्ही कशा प्रकारची वर्तणूक ठेवावी ? "

" बा आनंदा, त्यांच्या दृष्टीस होतां होईल तों तुम्हीं पडूं नये. "

" बरें, पण त्या आमच्या दृष्टीस पडल्याच तर काय करावें ? "

" त्यांच्याशीं एक शब्द देखील बोलूं नये. "

" पण, गुरुमहाराज, आम्हीं बोललों तर मग ? "

" तर मग तुम्हीं अतिशय सावधगिरी ठेवली पाहिजे. " स्त्रीजातीविषयीं बुद्धाचीं साधारण मतें काय होतीं हें वरील संवादावरून समजून येणारें आहे.

बुद्ध जरी स्त्रियांस सर्पाप्रमाणें भयंकर समजत असे तरी त्यानें आपल्या सावत्र आईच्या अति आग्रहावरून स्त्रियांस " भिक्षुणी "ची दीक्षा देण्याचा स्वतः उपक्रम केला. त्याची आई, व बायको ' यशोधरा ' ह्या त्याच्या प्रथम भिक्षुणी स्त्रियांस आपल्यांत मिसळूं दिलें असतां आपण उभारलेल्या संस्थेचा थोडक्या काळांत नाश होईल अशी बुद्धास भीति वाटे. ही भीति योग्य होती कीं अयोग्य होती हें ठरविणें बौद्धधर्माचा बुद्ध मरणानंतरचा समग्र इतिहास अवगत असणाऱ्या वाचकांवरच सोंपविणें प्रशस्त होय.

नैसर्गिक धर्मौदार्य दाखविण्यास स्त्रियांना " भिक्षु "ची संस्था फार योग्य स्थान होतें. बौद्ध उपासक श्रीमंत स्त्रियांनीं, बुद्ध व त्याचा शिष्यवर्ग ह्यांच्या केलेल्या आदरातिथ्याचीं सविस्तर वर्णनें ग्रंथांतून सांपडतात. कोसल

नगर वाचनालय ता. १५

देशच्या राजधानींतील " विशाखा " नामक धर्मशील स्त्रीनें बुद्धाला दिलेल्या मेजवानीची हकीकत मुद्दाम येथें देतों. बुद्धाविषयीं स्त्रियांतील भक्ति, भिक्षु-वर्गावर उपकार केल्यानें आपण आपल्यावर अतिशय उपकार करून घेतों, ही समजूत खालील हकीकतीनें व्यक्त होणारी आहे.

एके दिवशीं गुरु बुद्ध आपल्या शिष्यवर्गासह विशाखेच्या घरीं भोजनास गेले होते. भोजन आटोपल्यावर गुरुजवळ विशाखा आली व म्हणाली— " महाराज, माझ्या आठ इच्छा आहेत. इच्छा पुरविण्यास गुरु महाराज समर्थ आहेत. "

" विशाखे, तथागत हा सर्वश्रेष्ठपदाप्रत पोंचला आहे; स्त्रियांच्या विनंतीस त्याला मान डोलवितां येणार नाहीं. "

" माझ्या अशा इच्छा आहेत कीं, त्या पुरविण्यास कांहीं हरकत नाहीं, व त्याबद्दल गुरु महाराजांस दोषही लागणार नाहीं. "

" तर मग बोल तुझी विनंती काय आहे ती. "

" गुरु महाराज, ह्या कुडींत प्राण असे तोंपर्यंत, पावसाळ्याकरितां भिक्षुवर्गास वस्त्रें द्यावींत, ह्या ठिकाणीं येणाऱ्या परगांवच्या भिक्षूंस अन्न द्यावें, ह्या गांवावरून जाणाऱ्या भिक्षूंकरितां अन्नछत्र चालवावें, भिक्षूंचें पथ्यपाण्याचें करावें, त्यांची सेवाचाकरी करणाऱ्यांची जेवावयाची सोय लावावी, दुखणाइतांस औषधोपचार करावा, येतील तितक्या भिक्षूंस माधुकरी घालावी, भिक्षुणीस अंग धुण्याकरितां पडदण्या वगैरे द्याव्यात; अशा माझ्या आठ इच्छा आहेत. "

" विशाखे, हें सर्व करण्यांत तुझा हेतु तरी काय आहे ? "

" गुरु महाराज, परगांवाहून आलेल्या भिक्षूंस आळ्या, बोळ, कोठचे ठाऊक असणार ? पोट भरेशी भिक्षा त्यांस कशी मिळावी ? बुभुक्षितांस अन्न दिल्याचें श्रेय मला नाहीं का मिळणार ? ह्या गांवावरून जाणारा भिक्षु

जर भिक्षा गोळा करण्यांत गुन्तला तर त्याचें दुसरें सोबती पुढें नाहीं का जायाचे ? त्यास मागाहून एकटेंच रखडत जावें लागणार; गांवांत दाखल होण्याबरोबर भोजनाची सोय केल्यानें मी पुण्य नाहीं का जोडणार ? आश्रम-वेषाखेरीज दुसरीं वस्त्रें जवळ नसल्यामुळें भिक्षुणींस नग्न होऊनच नदींत स्नान करावें लागतें. वारांगना अशावेळीं त्यांची फार कुचेष्टा करितात. नग्न स्थिति स्त्रीजातीस अतिशय लज्जास्पद होय. त्यांना पडदण्या दिल्यानें माझें श्रेयच होणार आहे. गुरु महाराजांनीं सुप्रसन्न होऊन गरीब दासीच्या ह्या आठ मागण्यांस मेहेरबानीनें रुकार द्यावा. ”

इतकीं आर्जवें केल्यानंतर बुद्धानें काय उत्तर दिलें असेल याचा वाचकांनींच तर्क बांधावा.

## आठ महिने प्रचार, चार महिने विचार

आपल्या शिष्यांस लोकांस उपदेश करीत देशभर फिरावयास बुद्ध सांगत असे ह्यामुळें त्याच्या मताचा जलद प्रसार झाला. सर्वांनीं वर्षांतून आठ महिने फिरावें व चार महिने पावसाळ्यांत एके ठिकाणीं जमून असावें असा ठराव होता. बुद्ध स्वतः ह्याप्रमाणें धर्मव्याख्यानें देत फिरत असे. मगध व कोसल ह्या देशाबाहेर तो फारसा गेला नाहीं; पावसाळ्याचे दिवस तो वेणूवनांत अगर जेतावनांत घालवी. ह्यावेळीं आसपासचे सर्व भिक्षू त्याजवळ जमत; लांबवरचे भिक्षूही मुद्दाम ह्यावेळीं गुरुदर्शनास येत. आपआपली कामगिरी कशा रीतीनें बजाविली हें प्रत्येकानें गुरूस निवेदन करावें, बुद्धानें हालहवाल प्रेमानें विचारून उत्तेजनपर उपदेश करावा—अशी प्रथम भेटीची पद्धत असे. आपल्या शिष्यांना उपदेश करण्यांत, भेटावयास आलेल्या बड्याबड्या उमराव व राजेलोकांशीं धर्मसंबंधीं गोष्टी बोलण्यांत, मुद्दाम ह्मणून दर्शनलाभाकरितां आलेल्या पंडितांशीं पारमार्थिक विषयांवर शांतपणें वादविवाद करण्यांत, बुद्धाचा बहुतेक वेळ जात असे. आध्यात्मिक विषयांचा

स्वतःशींच विचार करण्यांत तो कांहीं वेळ घालवी व कांहीं वेळ ध्यानस्थ बसे. भोजनाचें आमंत्रण असल्यास शिष्यवर्गासह गांवांत भोजनास जाई. परंतु ज्याच्या पायावर मोठमोठे राजे लोळण घेत, ज्याच्या आज्ञा शिरसावंद्य मानण्यास अधिकारसंपन्न व धनाढ्य लोक नेहमीं तत्पर असत, त्या गुरु-बुद्धास हातांत भिक्षापात्र घेऊन रस्त्यांतून भिक्षा मागत जाण्यास विशेष प्रेम वाटत असे.

## सत्यज्ञान हाच देव, ज्ञानप्राप्ति हीच मुक्ति

( ५ ) " मृत्यु "–" निर्वाणगमन "–शाक्य देशचा राजपुत्र "सिद्धार्थ" हा आपल्या अठ्ठाविसाव्या वर्षी पूर्ण ज्ञानी बनला; ह्यानंतर बुद्धानें एकंदर चवेचाळीस वर्षें लोकांस धर्मशिक्षण दिलें. बुद्धाच्या मृत्यूचें वर्ष बऱ्याच वादविवादानंतर आतां बहुतेक ठाम ठरल्यासारखेंच आहे. ख्रिस्तापूर्वी ४८० व्या वर्षी बुद्धानें निर्वाणाप्रत गमन केलें असावें.

मगधदेशची राजधानी जें राजगृह शहर त्याचा अखेरचा निरोप घेऊन बुद्ध उत्तरेकडे जावयास निघाला. " पाटलीपुत्र " शहराजवळ त्यानें गंगानदी ओलांडली. ह्या शहराच्या भावी वैभवाविषयीं बुद्धानें भाकीत केलें होतें असें सांगतात. नंतर त्यानें श्रीमंत व सुबक " वेसाली " शहरांत कांहीं दिवस काढिले. त्याच्या आयुष्यांतील शेवटचा पावसाळा, वेसालीजवळील वेलूव नामक खेड्यांत, एकांतवासांत, घालविण्याचा बुद्धाचा संकल्प असल्यामुळें, त्यानें आपल्या शिष्यसमुदायास रजा दिली. ह्याठिकाणीं तो अतिशय आजारी पडला, शरीरास फार क्लेश झाले, व मृत्यु जवळ आलासें वाटलें. " माझ्या शिष्यसमुदायास शेवटचे उपदेशाचे चार शब्द सांगितल्याशिवाय मी निर्वाणा-प्रत केव्हांही जाणार नाहीं. ह्या दुखण्यास मी सहज हाणून पाडीन, ह्याचें मजवर कांहीं चालायाचें नाहीं, " असा विचार करून तपोबलानें बुद्ध बरा झाला. प्रकृती साफ बरी झाल्यावर मठीच्या बाहेर येऊन सावलींत तयार

केलेल्या एका आसनावर स्वारी बसली. प्रेमांतला शिष्य " आनंद " बुद्धाजवळ गेला आणि म्हणाला, " गुरुमहाराज, आपली प्रकृति आतां साफ दिसते. आपण आजारी होतां त्यावेळीं माझीं सर्व इंद्रियें विकल झालीं होतीं, जग शून्य दिसलें, व माझी मलाच शुद्धि नाहींशी झाली. तथापि स्थापिलेल्या धर्माच्या व्यवस्थेविषयींच्या इच्छा शिष्यवर्गास प्रदर्शित केल्याशिवाय गुरुमहाराज निर्वाणाप्रत जाणार नाहींत अशी माझी खात्री होती. "

गुरु उत्तर करितात, " या आनंदा, मी आतां काय करावें अशी शिष्य-मंडळीची अपेक्षा आहे ? धर्मरहस्य काय, हें मीं त्यांना सविस्तर सांगितलें आहे. शेलक्या मंडळीकरितां गुप्तमतांचा उपदेश, सर्वांच्या देखत बदायाचीं निराळींच तत्त्वें, असा पंक्तिप्रपंच तथागतानें केला नाहीं. मला जें कांहीं सांगायाचें होतें तें सर्व मीं शिष्यमंडळीस सांगितलेंच आहे. धर्माधिकारी बनून जगद्गुरूच्या श्रेष्ठत्वाची ज्याला मिरवणूक काढावयाची असेल त्यानें धर्मानुयायांस आपल्या अशा अशा इच्छा आहेत म्हणून सांगावें. धर्मानुयायांवर अंमल मिरविण्याचा तथागताचा उद्देशच नाहीं. या आनंदा, स्थापिलेल्या धर्माविषयींचे माझे हेतू तरी काय असणार ? आनंदा, माझें आतां वय झालें, मी अशक्त झालों, माझ्या आयुष्याची यात्रा संपली, मी आतां म्हातारा झालों आहें. माझ्या वयाला आज ऐंशी वर्षें झालीं....या आनंदा, आतां तुम्ही स्वतःवरच अवलंबून राहिलें पाहिजे. तुम्हीच तुमचे वाटाडे, तुमचाच तुम्हाला आश्रा; दुसऱ्या कोणाचा आश्रा करूं नका. सत्यावर तुम्ही विसंबून असा, सत्याच्या मार्गानें चाला; दुसऱ्या कशावरही आपली भिस्त ठेवूं नका...मी इहलोकची वस्ती सोडल्यावर जे जे म्हणून स्वतःवरच अवलंबून रहातील, दुसऱ्या कोणाच्याहि आश्रयाकरितां धावणार नाहींत, सत्यावरच सर्व भार टाकून इतर कशावरहि विश्वास ठेवणार नाहींत, तेच, तेच केवळ, माझे खरे खरे शिष्य होत."

बुद्धाचें हें भाषण फार महत्त्वाचें आहे. " महमदा " प्रमाणें एका हातांत तरवार व एका हातांत कुराण घेऊन धर्माच्या नांवाखालीं सर्व जग उजाड पाडण्याविषयीं आपल्या अनुयायांस त्यानें उपदेश केला नाहीं. माझीच एकट्याची अनन्यभावें भक्ति करणाऱ्यासच केवळ स्वर्गाचीं द्वारें उघडीं, इतर कोणत्याहि मार्गाचें अवलंबन केलें असतां स्वर्गासभोंवतीच्या भक्कम तटावरच डोकें हापटून अचानक नरकप्राप्ति, वगैरे पोकळ मतें, " बुद्धा "ची निवळ छाया एवढीच किंमत अलीकडे ज्याला कांहीं लोक देऊं लागले आहेत त्या कुमारिकेच्या पुत्राप्रमाणें, बुद्धानें शिष्यवर्गास उपदेशिलीं नाहींत. रस्त्यानें चाललेल्या धनगरास व मासेमाऱ्यास वडा जवरा आशीर्वाद देऊन, पोप महाराजांच्या दडपादडपीनें संपादलेल्या अंमलाच्या चरकांत युरोपखंडास अडकावून देण्याच्या अजब युक्तीचा बुद्धानें स्पष्टपणें निषेध केला आहे. आपल्या मठाची एक गादीच स्थापावी व गुरुपरंपरेचा अंमल जगभर पसरावा ही कल्पना बुद्धाच्या मनास शिवली देखील नाहीं. आपल्या अपूर्व ज्ञानतेजाचा फायदा घेऊन संघशक्ति उत्पन्न करावी, तिच्या घटकावयवास एकत्र जमण्यास एक आधारस्तंभ नियमित करावा, व धर्माच्या वाऱ्यानें पिसाळलेल्या वेड्या पिरांच्या साहाय्यानें परमार्थाचें ढोंग करून ऐहिक सुखाची चंगाळी उडविण्यास आपल्या शिष्यवर्गास संधि मिळावी–ह्या दिशेनें बुद्धाचे विचार वाहत होते असा होराच निघत नाहीं. " मी देवाचा मुलगा, तेव्हां निदान माझ्या बापाकडे बघून तरी माझे पाय घट्ट धरा " म्हणून काकळुत-वाणीनें लोकांची विनवणी करणाऱ्या " येसू "प्रमाणें बुद्धाची महत्त्वाकांक्षा काडीमात्रही नव्हती. आपणांस देव मानून लोकांनीं आपल्या भजनीं लागावें, त्यायोगें इहलोकींच्या यातनांतून ते मुक्त होतील, वगैरे स्वतःचीच बडेजाव वाढविणाऱ्या शुष्क थापाथापींत बुद्धास तिळमात्रही प्रेम वाटत नव्हतें. " मी मेल्यावर माझे देव्हारे माजवूं नका, माझ्या नांवाचा काथ्याकूट केल्यानें,

केव्हां माझ्या मूर्तीवर पाणी ओतल्यानें किंवा फुलें फेंकल्यानें साध्य साधावयाचें नाहीं, स्वावलंबनासारखी मजा नाहीं, सत्यज्ञान हाच देव, ज्ञानप्राप्तीची खटपट हीच भक्ति, आणि ज्ञानप्राप्ति हीच मुक्ति.–" असें आपल्या आवडत्या आनन्दास मरणसमयींचें बुद्धाचें निक्षून सांगणें आहे. आपल्या धर्माच्या ऐहिक स्थितीचा उत्कर्ष कसा व्हावा ह्या गोष्टीकडे बुद्धानें नजरच फेंकली नाहीं. पारमार्थिक तत्त्वांच्या उपदेशांत ऐहिक सुखाच्या महतीची भेसळ होऊन महमदी व खिस्ती विचार तर्कशास्त्राच्या अस्सल कसास न उतरल्यामुळें "गौग" "गौग" म्हणून तज्ज्ञ नाकें मुरडतात; तशी स्थिति बुद्धाच्या विचारसरणींत दृष्टीस पडत नाहीं. माझी जशी सर्व मदार "सत्य-ज्ञाना" वरच होती त्याप्रमाणें माझ्या शिष्यांनींहि सत्यज्ञानाचीच कांस धरावी, अशी निर्मल इच्छा बुद्धाची दिसते.

नंतर बुद्ध "वैसाली" येथें गेला. नेहमींप्रमाणें भिक्षा मागत त्यानें शहरांत फेरफटका केला. ह्या ठिकाणीं "मारा"नें त्याला गांठलें व "निर्वाणा" प्रत जाण्याविषयीं विज्ञप्ति केली. बुद्धानें उत्तर केलें "दुर्बुद्धे, रिकाम्या उठाठेवी त्वां सोडून द्याव्या हें रास्त. तथागताचें निर्वाणसाधन लवकरच होईल. त्या गोष्टीस अजून तीन महिन्यांची मुदत आहे." जीवंत असण्याविषयींच्या सर्व इच्छा त्यानें झिडकारून दिल्या. निर्वाणाप्रत जाण्याचा बुद्धाचा निश्चय होतांच भयंकर धरणीकंप झाला,असें पुराणांतरीं लिहिलें आहे.

वैसाली येथील व आसपासचे सर्व भिक्षू गोळा करून बुद्धानें सरशेवटचा एकदां त्यांना उपदेश केला.

दुसऱ्या दिवशीं वैसाली गावांत आणखी एकवार बुद्धानें भिक्षा मागितली शेवटचें त्या शहरचें दर्शन घेतलें, व मोठ्या शिष्यसमुदायासह तो "कुसिनारा"कडे जावयास निघाला. ह्याठिकाणीं "निर्वाणा"प्रत जाण्याचें बुद्धानें ठरविलें होतें. "गोरखपुराच्या" पूर्वेकडील हल्लींचें "कसिया" हेंच

नगर वाचनालय, सातारा.



तें ठिकाण होय. ज्या आजारानें "बुद्धा" च्या आयुष्याचा शेवट झाला त्या आजारानें बुद्धास मार्गांत "पावा" येथें गाठिलें. पावा येथील सोनाराच्या पुत्रानें अर्पण केलेलें "शूकरमांस" भक्षण केल्यामुळें बुद्ध आजारी पडला असें पाली ग्रंथांत नमूद केलेलें आहे.

## अखेरची शय्या

आजारीपणानें मार्गांत कष्ट सोशीत सोशीत 'बुद्ध' "कुसिनारा" येथें येऊन पोंचला. तेथें "हिरण्यवती" नदीचे कांठीं "शाल" वृक्षांची गर्द छाया होती. "जा आनंदा, जा; आणि मजकरितां दोन जवळ जवळ उगवलेल्या वृक्षांच्या मध्यें बिछाना तयार कर. माझें उसें उत्तरेकडे असूं दे; मी दमलों आहें; आनंदा, मला विश्रांति घेऊं दे"—बुद्धानें आज्ञा केली.

शालवृक्ष फुलण्याचे ते दिवस नव्हते; परंतु त्या दोन वृक्षांस बुंध्यापासून तों शेवटापर्यंत एकसारखीं फुलें ओथंबलीं. दमलेल्या भागलेल्या सिंहाप्रमाणें जेव्हां तो वृक्षाखालीं विश्रांति घेण्यास निजला, त्यावेळीं फुलांचा त्याजवर वर्षाव झाला, स्वर्गांतून पुष्पवृष्टि झाली, व स्वर्गलोकींचें गायन नभोमंडळांत सुरू झालें.

## मृत्युशय्येवरचे शेवटचे शब्द

नंतर पूज्य तथागत आनंदास म्हणाला "पुष्पित होण्याचा हा जरी समय नसला, तरी हे वृक्ष पुष्पांनीं भरून गेले आहेत, स्वर्गांतून पुष्पवृष्टि होत आहे, आणि माझ्या अभिनंदनार्थ वाजत असलेलीं स्वर्गीय वाद्यें ऐकूं येत आहेत. परंतु ह्याहून निराळाच मान, निराळीच कीर्ती, निराळेंच बक्षिस, निराळीच पूजा, निराळीच भक्ति, तथागतास मिळणें योग्य आहे. या आनंदा, माझ्या शिष्यांपैकीं जो कोणी, लहान मोठ्या हरएक गोष्टींत, सत्याचें आचरण ठेवील, माझ्या शासनाप्रमाणें वागेल, बारीक सारीक गोष्टींत देखील सत्याचेंच अवलंबन करील, त्याच्याच कृतींनीं मला सर्वांत मोठा मान दिल्या-

सारिखें होईल; म्हणून, आनंदा, विचार करण्याची संवय ठेव. लहान थोर सर्व बाबींत सत्याचरण ठेवूं या; सटरफटर कृत्यांतही सत्याला धरूनच चालूं या."

ह्यानंतर आनंद मठांत गेला व त्यानें रडण्यास आरंभ केला. " माझ्या पातकांचा अजून नाश झाला नाहीं, मी साध्य साधिलें नाहीं; असें असून मजवर कृपा करणारे माझे गुरु लवकरच निर्वाणाप्रत जाणार ! " आनंदास बुद्धानें जवळ बोलावून आणिलें. तसाच रडत रडत आनंद गुरूजवळ येऊन बसला. बुद्ध म्हणाला–" आनंदा, हें काय वेड्यासारखें ? रडूं नकोस, दुःख करूं नकोस. इहलोकची वस्ती किती क्षणभंगुर आहे हें मीं पूर्वी तुला सांगितलें नाहीं काय ? प्रत्येक प्रीतीची गोष्ट, उपभोगिलेली हरएक वस्तु, ह्या सर्वांस सोडून जाणें मनुष्यास भाग आहे; ह्या सर्वांचा त्यानें त्याग केलाच पाहिजे; ह्या सर्वांस झिडकारून देण्यास तयार झालें पाहिजे. जें जें म्हणून उत्पन्न झालें आहे, ज्याची म्हणून वाढ होते, ज्याच्या नाशास आरंभ होऊं लागतो, तें तें सर्व अजीबात नाहींसें झाल्यावांचून कसें राहील ? व्हावयाचें तें झालेंच पाहिजे. आनंदा, मनोवाक्कायकर्मांनीं त्वा प्रेमानें व उल्हासानें गुरुची शुश्रूषा केली; आनंदा, तुझी कृति चांगलीच आहे; अशा रीतीनें असाच तुझा प्रयत्न जारीनें चालूं दे; लवकरच तुझ्या पापाचा नाश होईल. "

रात्र पडूं लागली. शहरांतील वडेवडे गृहस्थ, आपल्या बायकामुलांसह त्या परमपूज्य साधूचें शेवटचें दर्शन घ्यावयास येऊं लागले. पृथ्वीवरील प्राणिमात्रांच्या सर्वांत मोठ्या समुदायास ज्याच्या धर्मानें शांति व सुख मिळतें त्या सिद्धार्थ राजपुत्राचें, साधु गौतम बुद्धाचें इहलोकचें स्वरूप ज्यांच्या नजरेस पडलें तेच खरे खरे धन्य होत ! स्वकष्टानें ज्ञानप्राप्ति करून घेतल्याशिवाय प्राण्यास गत्यंतर नाहीं म्हणून स्वावलंबनाचा उत्कृष्ट धडा शिष्यमंडळीच्या हृत्पटलावर कोरून ठेवणाऱ्या " पूर्ण ज्ञानी " बुद्धाचें दर्शन ज्यांना झालें त्यांच्याच चक्षूंचें खरें सार्थक्य झालें; ज्ञानप्राप्ति हाच मोक्ष, तदर्थ प्रयत्न हीच

भक्ति, ह्या पारमार्थिक अत्युच्च आदितत्त्वांचा प्रसार करणाऱ्या परमपूज्य गुरूस ज्यांना प्रत्यक्ष पहावयास मिळालें तेच खरे खरे नशीबवान होत ! प्राणिमात्राच्या दुःखांनीं हृदय द्रवून गेल्यामुळें ज्यानें राज्यसुखावर लाथ मारिली, व दुःखाचें निरसन करणाऱ्या ज्ञानप्राप्तीकडे लोकांचा ओढा लागावा म्हणून असंख्य शरीरक्लेश ज्यानें सोशिले, त्या परम कनवाळू गरिबांच्या वालीस ज्यांच्या डोळ्यांनीं देखिलें त्यांनीं खरोखर जिंकली म्हणायाची !

प्राणोत्क्रमणाच्या पूर्वी बुद्ध आनंदास म्हणाला–" वा आनंदा, तूं म्हणशील कीं, धर्माचा शास्ता नाहींसा झाला, आमच्या गुरूस आम्हीं मुकलों, तर आनंदा असें तूं समजूं नकोस. धर्मशिक्षण जें मी तुम्हांस दिलें आहे तेंच माझ्यानंतर तुमचा गुरु. "

नंतर शिष्यवर्गास गुरु महाराज म्हणतात,–" एकाहो, शिष्यहो, माझें शेवटचें सांगणें इतकेंच आहे. ज्यास उत्पत्ति आहे त्याचा लय झालाच पाहिजे. सतत तुमचा प्रयत्न चालूं द्या. "

धर्मरहस्य सांगणाऱ्या त्या परमपूज्य गुरुचे हेच शेवटचे शब्द होत.

## दुःखवादावर उभारलेलें बुद्ध–तत्व

### ( ६ ) धर्मतत्त्वें–तात्त्विक विचार.

बुद्धाच्या तात्त्विक विचारांची सर्व इमारत दुःखवादावर रचलेली आहे. इहलोकची वस्ती दुःखमय आहे, जीवित दुःखरूप समजण्यास विशेष बाध नाहीं–हे दुःखवादाचें प्रधान अंग होय. आमच्या जन्मापासून दुःखास आरंभ होतो. नऊ महिने भार सोसून शरीरकष्ट निमूटपणें सोसणाऱ्या आईच्या हालास जन्मापूर्वीचा गर्भवासच ना कारण ? जीव नको नकोसा करून सोडणाऱ्या मातेच्या असह्य प्रसूतिवेदनेची उत्पत्ति आपल्या जन्मापासूनच ना ? गर्भवासांत कोणत्या नरकयातना सोसाव्या लागतात ह्याचा अनुभव जर गर्भांतून बाहेर आल्यावरहि टिकला, तर गर्भावस्थेंत आत्महत्या करितां येत

नाहीं म्हणूनच केवळ पृथ्वीतल प्रजांनीं व्यापलेलें दिसतें असें प्रत्येकजण म्हणेल. यमयातना सोसूनहि कष्टानें लाभलेल्या अर्भकावर मृत्यूची झडप पडल्यामुळें रडत रडत दुःखांत दिवस कंठण्याचें जिच्या कपाळीं आलें नाहीं अशी माता सांपडेल काय ? शिशूची मूकावस्था संपल्यानंतर बहुत दिवसांच्या सहवासानें व लालन पोषणानें पुष्ट व दृढतर झालेल्या प्रेमरज्जूस निर्दयपणानें कापून काढून, चिरंजीवास ह्या वस्तींतून ओढून नेणाऱ्या यमाच्या दुष्ट कृतींनीं ज्यांचीं हृदयें होरपळलीं नाहींत अशीं मातापितरें कितीशीं आढळतील? " मुलगा करतासवरता झाला, नांवालौकिकास चढला, संसारभार ह्यावर टाकून म्हातारपणीं तरी दगदगीपासून सुटूं " म्हणून मनांत बेत करितात न करितात तों, यौवनाच्या व कार्यक्षमतेच्या ऐन भरांत निजल्याजागींच चीत मारणाऱ्या मृत्यूच्या काळ्याकूट विश्वासघातानें शांति मिळण्याच्या दिवसांत हजारों इंगळ्या डसल्याचा ताप ज्यांना सोसावा लागत नाहीं असे म्हातारे कितीसे पहावयास मिळतील ? लहानपणींच पालनकर्ते आईबाप मृत्युमुखीं पडल्यामुळें पिंपळाच्या पारावर निराश्रित टाकून दिलेल्या अर्भकांचा टाहो ऐकून ज्यांचीं हृदयें दुभागलीं नाहींत अशांची संख्या केवढीशी असेल बरें ? संसाराचा आधारस्तंभ मृत्यूच्या घावानें एकाएकीं कोसळून पडल्यामुळें मागें उरणाऱ्यास सर्व दिशा शून्य भासूं लागाव्यात; ज्याच्यावर सर्व आशा सोंपवून दुःखांत खडत रहाण्यास मनुष्य तयार होतो ते बालांकुर कोंवळेपणींच होरपळून गळावेत; प्रेमानंदांत गर्क होऊन जाणाऱ्या जोडप्यापैकीं एकाचें जीवित संपून दुसऱ्यावर दुःखाचे पर्वत अकस्मात् कोसळावेत; आईबापाकरितां मुलांनीं शोक करावा; मुलाकरितां आईबापांनीं छाती बडवावी; केस तडातड तोडावे; नवऱ्याकरितां बायकोनें ओक्सा बोक्सा रडावें; बायकोकरितां नवऱ्यानें अश्रु ढाळीत रहावें; मित्र गेला, मित्र गेला, म्हणून सर्वांनीं स्फुंदत असावें;—असा मृत्यूच्या लीलेचा येथील बाजार आहे. मृत्यूच्या

दरबारांतील प्रधानमंडळ भयंकर रोगांनीं बनविलेलें आहे. मृत्यूच्या स्थंडिलावर बळी देण्याकरितां प्राणीमात्रांस ग्रासून सोडणारे रोग खरोखर असंख्य आहेत. उखळांत अडकून पडलेल्यास मुसळाचा घाव चुकविणें जसें मुष्कील तसें आपणाकडे रोगराईस पाहूं देखील न देणें जीवन्त शरीरास कठिण आहे. कर्मधर्मसंयोगानें ह्यांच्याहि तडाख्यांतून मनुष्य सुटला तर कामक्रोधादिक मानसिक षड्रिपू शारीरिक सुखाच्या पेल्यांत विष कालविण्यास तयार असतात. कामाच्या तडाख्यानें होरपळलेले, क्रोधाच्या झटक्यानें रसातळास गेलेले, लोभाच्या ताबेदारीनें स्वतःचा उपासमार दूर करण्याकरितांच जणूकाय लोकांचे गळे तोडण्यास लुब्ध झालेले,—हे सर्व आपण होऊन दुःखाचीं ओझीच्या ओझीं वाहणारे गुलाम होत. कैचींत सांपडलेल्या हत्तीनें जराशी जरी हालचाल केली तरी अंकुशाचा मारा होतो; तद्वत् संसारांत गुरफटलेला प्राणी कसाही वागला तरी त्याच्या कपाळीं दुःख तें दुःखच. जेथें जावें तेथें आपणांपुढें दत्त म्हणून उभें रहाणाऱ्या ह्या दुःखापासून मुक्तता कशी करून घ्यावी ह्या प्रश्नाचा उलगडा करण्यांत बुद्धानें आपलें आयुष्य खर्ची घातलें.

## ब्रम्हवेत्त्यांची अविद्या व बुद्धाची अविद्या

( १ ) संसार दुःखमय आहे; ( २ ) तृष्णा दुःखाचें साक्षात् कारण होय; ( ३ ) दुःख नाहींसें करावयाचें असल्यास इच्छा समूळ हाकलली पाहिजे; ( ४ ) हें साधण्याचा सुलभ उपाय म्हणजे अष्टगुणात्मक धर्ममार्गच होय. —काशी क्षेत्रांतील धर्म-व्याख्यानांत नमूद केलेल्या ह्या चार धर्मरहस्यांचें अज्ञान सर्व दुःखाचें आदिकारण होय.ह्या अज्ञानापासून भगवद्गीतेंत वर्णिलेलें अद्वैत वादांतील " अज्ञान " फार निराळें आहे. बौद्धी " अविद्या " म्हणजे वर निर्दिष्ट केलेल्या चार धर्मरहस्यांचेंच अज्ञान समजायाचें. निराकार निरामय सद्रूपी ब्रम्हावर छायारूपानें माया असते, त्याप्रमाणें बौद्धीय तत्त्वविचारांत ब्रम्हाच्या ठायीं कल्पिलेलें जें " शून्य " त्याचाच आभास अविद्या

होय. बांकी, गोट, पाटल्या ह्या सर्व जिनसा जरी सुवर्णरूपी आहेत तरी आकारभिन्नत्वेंकरून त्या निरनिराळ्या कल्पिल्या जातात. त्याचप्रमाणें अखिल सृष्टि जरी सद्रूपी ब्रम्हस्वरूप आहे तरी ब्रह्माभास जी माया तिनें स्वकल्पित निरनिराळे गुण निरनिराळ्या प्रमाणांनीं ब्रम्हाच्या निरनिराळ्या भागावर लादल्यामुळें सद्रूपी ब्रम्हाचे ठिकाणीं भिन्न स्वरूपांचा भास होतो. अद्वैतवादांत ज्याप्रमाणें एका ब्रम्हाच्या जीवावर मायेनें हा पसारा मांडला आहे असें मानतात, त्याचप्रमाणें खरोखर शून्य असतांना–म्हणजे कांहींच नसतांना–अविद्येमुळें, कर्मानें नियमित केलेले जन्ममृत्यूमधील येरझारे व तदनुषंगिक दुःखोत्पत्ति हीं आहेतशीं वाटतात. शून्यवाद युक्तिजुक्तीस कितपत जुळून आहे ह्याचें विवरण पुढें सांगावयाचें असल्यामुळें ही घटपटांची वृथा खटपट येथें इतकीच पुरे.

अद्वैतवादांतील " ज्ञान " व " अज्ञान " हीं कशा प्रकारचीं, कोणत्या स्वरूपाचीं आहेत–हें " ज्ञानी " बनल्यावांचून सांगतां यावयाचें नाहीं व समजावयाचेंही नाहीं;–म्हणजे अखिल ज्ञानसाक्षात्कार ही गोष्ट गुरूस शिष्यांस शिकवितां यावयाची नाहीं. कारण तें ज्ञान इंद्रियशक्तींना वर्णनातीत आहे. गुरु शिष्यास ज्ञानमार्ग दाखवून देण्यास समर्थ आहे; पण शिष्यास ज्ञानशिखरावर उचलून ठेवण्यास शक्तिहीन आहे. ज्ञानाची टेकडी चढून जाण्याचें काम ज्याचें त्यानें एकट्यानेंच केलें पाहिजे; त्या कामीं दुसऱ्यास हातभार लावतां यावयाचा नाहीं. ह्यावरून इतकें सिद्ध होतें कीं, गीतेंत वारंवार येणाऱ्या " ज्ञान " व " अज्ञान " ह्या शब्दांचें गूढ प्रत्येक वाचकानें आपआपल्यापुरतेंच प्रयत्नानें उलगडलें पाहिजे. बौद्धीय " अविद्या " प्रत्येकास समजण्यासारखी व समजून देण्यासारखी आहे. काशीक्षेत्रांतील प्रथमच्या धर्मव्याख्यानांत नमूद केलेल्या चार धर्मरहस्यांचें अज्ञान,–तीच अविद्या होय.

" हीं चार पवित्र तत्त्वें पूर्णपणें न समजल्यामुळें जन्ममरणाचा लांबलचक

प्रवास मला करावा लागला. मला आतां तीं पूर्ण अवगत झालीं:–जन्ममरणाचा प्रवाह वाहण्याचा बन्द झाला; दुःखाचें आदिकरण नष्ट झालें; ह्यानंतर पुनर्जन्म म्हणून नाहीं. ”

अशाश्वत स्थितींत आत्म्यास कोण कोंडून ठेवतो, काय केलें असतां आत्म्याची मुक्तता होणार आहे, कोणता शत्रु जिंकिला असतां मुक्तिलाभ होईल–वगैरे प्रश्नांस बुद्धापूर्वी ब्रह्मतत्त्ववेत्त्यांनीं “ अज्ञान ” असें उत्तर दिलेलें आहे. “ आत्मा ” ब्रम्हस्वरूपी असून अखिल विश्वही ब्रम्हस्वरूपी आहे; व आत्मा, ब्रम्ह, अखिल सृष्टि ह्यांच्यामध्यें कोणत्याही प्रकारचा द्वैतभाव नसून तीं एकच होत, वगैरे मतांचें सामान्यतः विवेचन बुद्धाच्या पूर्वीच उपनिषदांत झालेले आहे, व बुद्धाच्या वेळीं अद्वैतवादाची भट्टी बरीच तयार झालेली होती. ब्रम्ह व आत्मा ह्यांचें तादात्म्य न समजणें–ही ब्राम्हणी ‘ अविद्या ’ होय. बुद्धानें “ अविद्या ” शब्द मात्र उचलला, पण त्याचा तत्कालीन रूढार्थ सोडून दिला. दुःख प्रधान मानणाऱ्या चार धर्मतत्त्वांचे अज्ञान असल्यामुळें जगणें दुःखस्वरूप वाटत नाहीं, व भ्रामक सुखाचा फसवा बाजार अविद्येनें मांडल्यामुळें प्राणी भुलून जाऊन जन्ममरणाच्या फेऱ्यांत दुःखें सोशीत फिरत राहतो, असें बौद्ध मत आहे.

———

# * केसरींत प्रवेश आणि लो. टिळकांचें शिष्यत्व

## माझा ‘ केसरीं ’त प्रवेश आणि त्याबद्दलची प्रेरणा

मांडुक्योपनिषदांत स्वप्नस्थानाचे देवतेविषयींचें वर्णन चौथ्या मंत्रांत केलेलें आहे. आत्म्याचें म्हणजे ब्रम्हाचें हें द्वितीयस्थान होय. ह्याचा अनुभव स्वप्नांत येतो, म्हणून या देवतेला, ‘स्वप्नस्थान’ असें संबोधिलें आहे. स्वप्नें पडत असलीं म्हणजे ह्या देवतेच्या हालचालींचें निरीक्षण करण्यास सांपडतें. स्वप्नें पडत असलीं तरी तीं लहानपणींच आठवत नाहींत, प्रौढपणीं तीं आठवूं लागतात. नजर ठेविली असतांना तीं आठवूं लागतात; आणि लक्ष ठेविलें असतां सबंधच्या सबंध आठवतात ! संसाराचे काळजीखालीं मन खचून गेल्यावर जीं स्वप्नें पडतात तीं सूचक असतात. काळजीचें ओझें मनाला असह्य वाटूं लागलें म्हणजे आत्म्याची शक्ति जागी होते; आणि असें असें कर म्हणून स्वप्नामार्फत अर्धवट मार्ग दाखविते. सेकंड एल् एल्. बी. टर्म संपल्यावर पुढें काय करावयाचें ह्याची मला काळजी लागलेली होती. परीक्षेला बसण्याइतपत अभ्यास झालेला नव्हता; कोठें लिहिण्याची सोय होईल काय ह्या विवंचनेंत मी होतों; ही विवंचना सुरू झाल्यानंतर स्वप्नांत ‘ केसरी ’ हीं अक्षरें दोनदां स्पष्ट दिसलीं. जागेपणींहि लय लाविला असतांना तोच प्रकार स्पष्टपणें अनुभवास आला. पुढें दे. नारायण बापूजी कानिटकर ह्यांची व माझी गांठ श्री. गणपतराव पागे ह्यांचेमार्फत पडली. त्यावेळीं मी लिहिलेलें ‘ सवाई माधवराव ’ हें नाटक आणि श्री. गोळयांनीं लिहिलेल्या ‘ ब्राम्हण व त्यांची विद्या ’ ह्या पुस्तकावरील माझी टीका ‘ विविधज्ञान

---

* खाडिलकरांची ॐकाराची उपासना पान २२ व ३१. सन १९४४

नगर वाचनालय, सातारा.


विस्तार ' ह्या मासिकांतून प्रसिद्ध झाली होती. ' विविधज्ञान विस्तार ' हें मासिक दे. नारायण बापुजी कानिटकर ह्यांच्या वाचण्यांत येत असे. माझे दोनहि लेख त्यांच्या वाचनांत आलेले होते. माझा अभ्यास झालेला नाहीं असें शेवटची टर्म भरीत असतांना मीं म्हटल्यावरून त्यांनीं केसरीचें नांव सुचविलें. पुढें टर्मचे दिवस पुरे होतांच शुक्रवारीं मुंबई सोडून शनिवारीं सकाळीं पुण्यास गेलों. जातांक्षणीं दे. नारायण बापुजी कानिटकर ह्यांना भेटलों. दोनप्रहरीं लो. टिळकांना भेटून काय तें सांगतों, असें उत्तर आलें. मी संध्याकाळीं पुन्हां भेटावयास गेलों तेव्हां मला ' लो. टिळकांकडे उद्यां घेऊन जातों ' असें दे. कानिटकरांनीं सांगितलें. मी कोण आहे, आणि माझे लेख कसे आहेत, ह्याविषयीं दे. कानिटकरांनीं सर्व कांहीं सांगावयाचें होतें तें सांगून टाकलेलें होतें. म्हणून रविवारीं गांठ पडली असतांना एकदम ' केसरी ' साठीं अग्रलेख लिहिण्यास लो. टिळकांनीं मला सांगितलें. तो विषय ' राष्ट्रीय महोत्सवांची आवश्यकता ' हा होता. श्रीगणपति महोत्सवाला आरंभ होण्यास १८९६ सालीं दोन आठवड्यांचा अवधि होता. मला विषय देतांना कशा तऱ्हेनें लिहिला असतां त्यांना तो पसंत पडेल हें सांगून अमुक अमुक पुस्तकांतून त्याची माहिती आलेली आहे हेंहि मला सांगून टाकलें ! रविवारचा दिवस माहिती गोळा करण्यांत मीं घालविला आणि सोमवारीं सकाळीं अग्रलेख लिहून टाकला. माझा तो लेख माझे मित्र रा. वामनराव पटवर्धन व रा. गणपतराव अभ्यंकर ह्यांना वाचावयास दिला. त्यांनीं पसंत केल्यावर लो. टिळक यांचेकडे तो लेख घेऊन गेलों. लो. टिळकांनीं तो वाचून पाहिला आणि प्रुफें तपासण्याकरितां तुम्हांस येण्याची आवश्यकता नाहीं, मीच प्रुफें तपासून देतों, असें मला सांगितलें. दुसऱ्या दिवशीं ' केसरीं 'त माझा अग्रलेख प्रसिद्ध झाला. नंतर लो. टिळकांनीं त्याच विषयावर दुसरा लेख लिहिण्यास मला सांगितलें. तोहि लेख ' राष्ट्रीय

महोत्सवाच्या वेळीं सुशिक्षितांनीं काय केलें पाहिजे ' हा मीं लिहिला आणि दुसऱ्याच दिवशीं तोहि प्रसिद्ध झाला. इतक्यांत श्रीगणपतिमहोत्सवास १८९६ सालीं प्रारंभ झाला होता आणि व्याख्यानांची झोड उठून गेली होती. त्या व्याख्यानांची हकीकत लिहून काढण्याचें काम माझ्यावरच लो. टिळकांनीं सोंपविलें होतें. त्यावेळीं माझे वडील बंधु मंगळवेढ्यास मुन्सफ होते; त्यांना समजलें कीं पुण्यास येऊन मीं ' केसरी 'त नोकरी करीत आहें. माझे दोन लेख वाचून ते खूप झाले, आणि मीं लिहिलेली व्याख्यानांची केसरींतील हकीकत वाचून त्यांनीं माझें कौतुक केलें आणि तसें पत्रीं लिहून मला कळविलेंहि. वडील बंधु काय म्हणतील ह्या काळजींतून मी मुक्त झालों. स्वप्नांत दोनदां आणि जागेपणीं एकदां ' केसरी ' हीं अक्षरें कशीं दिसलीं आणि ' केसरी ' चा व माझा संबंध कसा जुळून आला, ह्या संबंधानें हकीकत जशी घडून आली तशीं विस्तारानें येथें देण्यांत आली आहे.

## केसरीकार ह्या नात्याची उन्नति

' स्वप्नांत ' दोनदां आणि जागेपणीं एकदां ' केसरी ' हीं अक्षरें दिसून माझा व लो. टिळकांचा संबंध घडून आला आणि त्यामुळें लो. टिळक मला नावें ठेवतील असा त्यांचा धाक मला वाटूं लागला. पुढें नाटकी मंडळीचा सहवास घडल्यामुळें तेथील ठळक ठळक दोष मला लागावयाला पाहिजे होते. पण लो. टिळकांच्या दराऱ्यामुळें आणि त्यांनीं मला केसरीकार ह्या नात्यानें त्यांच्या बरोबरीच्या उन्नतीच्या मार्गाला लावल्यामुळें नाटकी मंडळीच्या अंगच्या ठळक ठळक दोषांपासून माझा बचाव झाला, हे लो. टिळकांचे माझ्यावर उपकार झाले आहेत, असें येथें मी नमूद करून ठेवीत आहें. केसरीकार म्हणून ज्या उन्नतीच्या मार्गावर मी चढलों त्या मार्गाचा हा गुण आहे. अगदीं प्रारंभापासून मला दत्त–भक्तीचा छन्द असल्यामुळें

प्राणायाम करण्याकडे माझ्या मनाची प्रवृत्ति होती. ह्यामुळें ॐकाराकडे माझें लक्ष लागलें.

## मला ऐकूं येणारा अनाहत ध्वनि

नाटकें लिहूं लागलें असतांना किंवा वर्तमानपत्रांतील मजकूर मी लिहीत असतांना केव्हां केव्हां माझें मन एकाग्र होत असे; आणि दहा पंधरा वर्षां-पूर्वीपासून मन एकाग्र होऊं लागलें म्हणजे मला अनाहत ध्वनि ऐकूं येण्याचा पाया रचला गेला. परन्तु ' बिंदू 'वर प्रयोग करण्यास मला माझ्या दुर्दैवानें सवड दिली नाहीं. सहा सात वर्षांपूर्वी माझ्या अंगीं कांहीं पातकें—उदाहरणार्थ रागीटपणाचें आणि अभिमानाचें पातक—होतीं म्हणून अर्धाङ्ग वायूनें आजारी झालों; म्हणून उपनिषदें वाचणें व ह्या वाचनामुळें सुचणारे विचार एकत्र करणें ह्याखेरीज माझ्या हातून आतां कांहीं होणारें नाहीं. सध्यां मला ऐकूं येणाऱ्या अनाहत ध्वनीचा फायदा मी असा करून घेतो कीं, रोग ओसरूं लागला म्हणजे त्या ठिकाणचा अनाहत ध्वनि मन एकाग्र करून मी ऐकूं लागतों; आणि त्यामुळें अधिक जोरानें माझा रोग ओसरूं लागतो. बिंदूवर लक्ष ठेवण्याचा मीं प्रयत्न करूं लागलों म्हणजे त्या प्रयत्नांत मला आतां यश येत नाहीं; मनाची एकाग्रता सुटते आणि कांहींच्या कांहींच मनोराज्यास सुरवात होते. वृद्धापकाळीं अजूनहि माझ्या पातकांचा जोर आहे, पण भेसळ करावयास ज्ञानेश्वर महाराज कां सांगतात हें माझ्या बुद्धीला समजतें व पटतें. हठयोगांत आणि राजयोगांत लययोगाची भेसळ केल्यावांचून दुसरा मार्ग नाहीं.

# * राष्ट्रीय महोत्सवांची आवश्यकता

राष्ट्रीय महोत्सवांचें खरें स्वरूप काय व त्यापासून काय फायदे आहेत याचा विचार अद्याप व्हावा तेवढा झालेला दिसत नाहीं, करितां आज हा विषय मुद्दाम घेतला आहे. राष्ट्रीय महोत्सवांचें खरें स्वरूप पहाणें असल्यास तें ग्रीस इतिहासांत सांपडेल. प्राचीन ग्रीशियन लोकांच्या अंगांत खिळून राहिलेल्या तेजाची त्यांच्या उत्कर्षाच्या वेळीं जोपासना कोणी केली, प्रसंग-विशेषीं तें तेज मावळूं लागलें असतां पुन्हां त्याला दैदिप्यमान कोणी केलें, रावापासून रंकापर्यंत हरएक व्यक्तीच्या मनांत योग्य अभिमानाचा अनिवार्य अग्नि कोणी पेटविला, असा प्रश्न केला असतां "ऑलिंपियन" राष्ट्रीय महोत्सवानें, असेंच उत्तर आलें पाहिजे. ऑलिंपिया येथें ग्रीशियन प्रधान–देवतांचा वार्षिक उत्सव होत असे व ह्याचें स्वरूप आमच्या इकडील महोत्सवासारिखेंच होतें. ह्या उत्सवाला ग्रीसमधील हरएक प्रकारचे लोक जमत. प्रसिद्ध सेनानायक, नामांकित मुत्सद्दी मंडळी, सदा अभ्यासांत गुंग झालेले तत्त्ववेत्ते, पूर्वजांच्या मर्दुमकी लोकांपुढें मांडून राष्ट्राला शुद्धीवर आणणारे इतिहासकार, ज्यांची मुद्रा पाहूनच सात्त्विकवृत्ति आपोआप जाग्या व्हाव्यात अशी संतमंडळी, हरएक प्रकारच्या शारीरिक खेळांत तरबेज असलेले जवान,–असे सर्व प्रकारचे लोक मोठ्या प्रेमानें ह्या ठिकाणीं जमत. आपल्या अंगांत वसत असलेले अद्भुत गुण जगापुढें मांडण्याचा प्रसंग कोणास पाहिजे असल्यास "ऑलिंपियाच्या" मैदानावर तो प्राप्त होई; व धार्मिक, राजकीय, अथवा सामाजिक प्रश्नांची चर्चा करणाऱ्या महामुनींचा वाक्प्रवाह ऐकावयाचा असल्यास "ऑलिंपियन" महोत्सवाचे वेळींच तो आपोआप

* केसरी १ सप्टेंबर १८९६

कानीं पडे. सारांश, मनोरंजन व धर्मज्ञान, हीं एकाच वेळीं करून देणाऱ्या ह्या राष्ट्रीय महोत्सवानें ग्रीसवर अतिशय उपकार केले होते. आपापसांत भांडणें झाल्यामुळें ग्रीस राष्ट्राच्या ज्या वेळीं लहान लहान चिरफळ्या पडल्या व डेरिक लोकांपैकीं निरनिराळ्या जाती एकमेकांच्या उरावर बसून एकमेकांस फाडून खाण्याच्या बेतांत होत्या, त्या वेळेला ह्याच राष्ट्रीय महोत्सवानें देशांतील सर्व लोकांचें मन आपल्याकडे वेधून घेऊन डेरिक लोकांमध्यें पुनः जूट उत्पन्न केली व ग्रीसमधील प्रत्येक व्यक्तीच्या अंगांत राष्ट्रीयत्वाचें वारें खेळविलें. ग्रीस देशांतील धार्मिक, नैतिक व राजकीय उन्नतीचें श्रेय ह्या महोत्सवाला जितकें देतां येईल तितकें फारच थोड्या दुसऱ्या कारणांना देतां येईल. ह्या महोत्सवाबद्दल ग्रीशियन लोकांत इतकी पूज्यबुद्धि होती कीं, अथेन्समधील प्रधान मुत्सद्यांना किंवा स्पार्टाच्या राजपुत्रांना "ऑलिंपिया" च्या मैदानावर बक्षिसादाखल मिळविलेली फुलाची पाकळी ही आपल्या अधिकाराहून अत्यंत प्रिय वाटे. महोत्सवाचे वेळीं उत्पन्न होणाऱ्या लोकमताचा सर्व राष्ट्रावर असा कायमचा परिणाम होत असे कीं, नीच कारस्थानांत अत्यन्त पटाईत अशा "मॅसिडोनिया"च्या "फिलिफ" राजाची सुद्धां ह्या महोत्सवांत आपला हात शिरकविण्याची जारीनें खटपट चालली होती. ऑलिंपियन शक ग्रीस राष्ट्रांत सुरू होता, ह्यावरून ते लोक ह्या महोत्सवास केवढा मान देत असत हें व्यक्त होणारें आहे. ग्रीस देशांत दुसरेहि महोत्सव होत असत, व तेहि लोकांचें मनोरंजन करून धार्मिक व नैतिक ज्ञानांचा प्रसार करण्याचे मार्ग होते. डेल्फिक देवतांच्या प्रीत्यर्थ भरणाऱ्या "पिथियन" जत्रेच्या वेळीं ललितकलांना विशेष प्रोत्साहन मिळत असे. ह्याच महोत्सवाचे वेळीं राष्ट्रांतील कविजन आपापलीं नूतन काव्यें लोकांना वाचून दाखवीत व ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें ज्याची त्याची संभावना होत असे. "निमियन" महोत्सवाला प्रारंभ झाला कीं, लष्करी वेषाचा

एकहि गृहस्थ घरांत दृष्टीस पडत नसे. युद्धकलेंतील खुब्या समजावून देणारी, हा उत्सव म्हणजे एक शाळाच होती. ह्या निरनिराळ्या महोत्सवांचे प्रसंगीं भक्तिरसानें भरलेलीं पदें भक्तमंडळी प्रेमानें म्हणत, वीरास साजणाऱ्या उदात्त मनोवृत्ति बायकापोरांच्या अंगींहि उचंबळावयास लावणारे पोवाडे गायकमंडळी उत्साहानें म्हणत, व सर्व राष्ट्रास हालवून सोडणारें वक्तृत्व ह्याच ठिकाणीं ऐकावयास मिळे. सर्व राष्ट्राला आनंद देणारी बातमी लोकांस कळवावयाची असल्यास ती ह्याच वेळीं कळवीत व राष्ट्राच्या अभ्युदया-संबंधाचीं खलबतेंहि ह्याच ठिकाणीं करीत. खिस्ती शकापूर्वी १९६ व्या वर्षी महात्मा रोमन सरदार "फ्लॅमिनियस" यानें "इस्थमियन" महोत्सवाचेच वेळीं "ग्रीस देश पुनः स्वतंत्र झाला" अशी द्वाही फिरविली. ग्रीस देशांतील पूर्वीचा हा "ऑलिंपियन"महोत्सव पुनः यंदापासून चालू करण्याचा विचार युरोपांत घाटत आहे. ग्रीशियन लोकांप्रमाणेंच रोमनलोकांतहि सांवत्सरिक राष्ट्रीय महोत्सव होते व त्या सर्वांचा उगमहि धर्मश्रद्धेपासूनच होता. "रोमन" हें बडें राष्ट्र नसून केवळ एक शहर असल्यामुळें "सर्कस" सारख्या महोत्स-वांचा उपयोग, देवतांची पूजाअर्चा व जनमनरंजन ह्यापलीकडे फारसा झाला नाहीं. परंतु रोमनशहर प्रजासत्ताक राज्य मोडून "एंपरर" चे सत्ते-खालीं रोमन राष्ट्र बनूं लागल्यावर "सर्कस" सारख्या महोत्सवाचेच वेळीं नैतिक, धार्मिक व राजकीय चळवळींचा खल जारीनें होऊं लागला. रोमच्या पूर्वीच्या चालीरीति मोडत चालल्या व हलके हलके युरोपखंड खिस्ती भटांच्या ताब्यांत जाऊं लागलें. त्यांनीं नवीन धर्म आणला खरा; पण पूर्वीच्याच महोत्सवाच्या रूपानें लोकांस नैतिक व धार्मिक शिक्षण देण्याचा क्रम सुरू ठेवला. खिस्तजयंती राष्ट्रीय महोत्सवाच्याच थाटानें करण्यांत येत होती व येत आहे. साप्ताहिक प्रार्थनेच्या प्रकारांतहि महोत्सवाचें थोडेंसें स्वरूप दृष्टीस पडतें. ह्याच महोत्सवाचे प्रसंगीं खिस्ताची कबर यवनांच्या ताब्यांत गेली

नगर वाचनालय, सातारा.



म्हणून धर्माधिकारी मंडळी लोकांपुढें रडत; व ह्याच महोत्सवाचे प्रसंगीं लोकांत उत्पन्न झालेल्या आवेशामुळें स्वधर्माकरितां रणांगणीं मरण्यास लक्षावधि खिस्ती लोक तयार झाले. खिस्तजयंतीच्या वेळीं खिस्ती पदें मेळे करून लोक गात व ह्या प्रसंगीं ज्ञान व मनोरंजन ह्यांचें योग्य संमेलन झालेलें असे. खिस्ती राष्ट्रांतहि स्थानिक जत्रा आहेत, स्थानिक महोत्सवहि आहेत. ह्या प्रसंगीं योग्य विचार व योग्य मनोवृत्ति लोकांत जागृत करण्यास तेथील लोक किमपिहि हयगय करीत नाहींत. अलीकडे अलीकडे खिस्तीराष्ट्रांत धर्मश्रद्धा हलके हलके नाहींशीच होत चालली आहे. तेव्हां अर्थातच ह्या श्रद्धेपासून उत्पन्न होणाऱ्या महोत्सवांचें माहात्म्य तिकडे पूर्वीइतकें नाहीं. आतां देवतांच्या प्रीत्यर्थ महोत्सव न होतां राजकीय अथवा औद्योगिक चळवळींच्या प्रीत्यर्थ महोत्सव होतात. ह्या महोत्सवांचा हेतु धर्मश्रद्धा असो किंवा राजकीय विशिष्ट मतांचा प्रसार असो, कांहीं असलें तरी हे महोत्सव म्हणजे लोकांना ज्ञान देऊन मनोरंजन करणाऱ्या ह्या जत्राच होत. हाइडपार्क डिमॉन्स्ट्रेशन ही लिबरल पक्षाच्या राजकीय चळवळीप्रीत्यर्थ भरणारी एक प्रकारची जत्रा आहे, किंवा लिबरल मतानुयायी लोकांचा महोत्सवाचा दिवस आहे. आयर्लंडांत ओकोनेल ह्यानें दहा लाख मानवप्राणी "टारा" येथें एका गोष्टीकडे त्यांचें मन वेधून गोळा केले ती जत्रा, किंवा त्यानें निरनिराळ्या ठिकाणीं ज्या जत्रा ( डिमॉन्स्ट्रेशन ) जमविल्या, त्या सर्व राजकीय चळवळीकरितांच होणाऱ्या महोत्सवांचीं उदाहरणें होत. अमेरिकेस ज्या दिवशीं स्वातंत्र्य मिळालें त्या दिवशीं होणारा, किंवा वाशिंग्टनच्या प्रीत्यर्थ होणारा पाताललोकींचा राष्ट्रीय महोत्सव अमेरिकन लोकांस नीट शुद्धीवर ठेवण्याचा एक उत्तम उपायच आहे असें ते लोक समजतात. पाश्चिमात्यांत धर्म हा समाजाकरितां आहे व समाज मात्र धर्माकरितां नव्हे, असें मानण्याकडे विशेष कल असल्यामुळें, राष्ट्रीय महोत्सवांतील धर्मश्रद्धेचा भाग लुप्त होत जाऊन

नवीन प्रकारचे राजकीय किंवा औद्योगिक महोत्सव उत्पन्न होऊं लागले हें त्यांच्या पालटलेल्या स्थितीला धरूनच आहे. आमच्याकडे धर्म हा नेहमीं श्रेष्ठपदावरच राहणार, तेव्हां आमचे महोत्सव पुष्कळ अंशीं धर्ममूलकच असणार. आमच्या ह्या धर्मश्रद्धेपासून उत्पन्न होणाऱ्या महोत्सवांचा फायदा आम्ही पाश्चिमात्यांप्रमाणेंच घेत होतों. ह्या महोत्सवांचे वेळीं लोकांच्या धर्मबुद्धि जागृत करून, नैतिक, सामाजिक व राजकीय शिक्षण आबालवृद्धांस सहजगत्या देण्यांत येत असे. राष्ट्रांतील उत्तमोत्तम विचार व मनोवृत्ती ह्या महोत्सवांचे वेळीं पोसल्या जात असत. वेदकाळीं महासत्रासारखे राष्ट्रीय महोत्सव होते. हे महोत्सव साजरे करण्याकरितां जमलेली ऋषि मंडळी यज्ञ-मंडपांत सर्व लोकांदेखत नैतिक व धार्मिक विषयांवर कडाक्याचे वादविवाद करीत. महाभारत असल्याच एका प्रसंगीं प्रथमतः सांगण्यांत आलें. "याज्ञ-वल्क्य" व "गार्गी" ह्यांनीं ब्रह्मस्वरूपासंबंधीं केलेला वाद, जनक राजाच्या यज्ञमहोत्सवाच्या मंडपांतच झाला. यज्ञमहोत्सवाचेच वेळीं गौतमबुद्ध आपलीं धर्ममतें लोकांस शिकविण्याचा प्रयत्न करी. बुद्धमरणानंतर जवळ जवळ एक शतक लोटल्यावर "अशोक" राजानें अशाच एका धर्ममहोत्सवाचेवेळीं गौतमबुद्धाचीं धर्ममतें मुक्रर ठरविलीं. ग्रीस देशांतील "पिथियन" जत्रेच्या नमुन्याचीच, आमची "कालप्रियनाथा"ची जत्रा होती. कालप्रियनाथाच्या ह्या राष्ट्रीय महोत्सवाचे वेळीं राष्ट्रांतील धनिक लोक, सत्ताधारी लोक एका ठिकाणीं जमत, व गुणी लोकांच्या गुणांची परीक्षा व चहा ह्याच ठिकाणीं होत असे. शेक्सपियरलाहि कांहीं कांहीं बाबतींत मागें सारणारा आमचा भवभूति "कालप्रियनाथा"च्या यात्रेंतील विद्वानमंडळीपुढें आपलें नाटक व्हावें म्हणजे मोठा मान समजत असे. ग्रीस देशांत राष्ट्रीय महोत्सवांनीं जी कामगिरी बजावली, यज्ञमहोत्सवामुळें आमच्या पूर्वजांना जो फायदा झाला, तसलीच कर्तबगारी शिवाजीच्या पूर्वी व स्वराज्याच्यावेळीं महाराष्ट्रांतहि

राष्ट्रीयमहोत्सव करून दाखवीत असत. एकनाथासारखे साधुसंत निरनिराळ्या जत्रांचे वेळीं स्वतः हजर राहून जमलेल्या लोकांस ऐहिक व पारमार्थिक गोष्टी सांगण्यास कधींहि चुकले नाहींत. भजनी मेळ्यांचीं भक्तिरसानें थबथबलेलीं पदें ऐकून पांडुरंगचरणीं लीन झालेल्या श्रोतृसमुदायास आपल्या प्रासादिक वाणीनें सामाजिक व धार्मिक विषयांवर उपदेश करण्यास तुकोबा नेहमीं तत्पर असत. अशा राष्ट्रीय महोत्सवाच्या वेळीं चैतन्यादि साधुमंडळी हिंदुस्थान सोडून गोदा व कृष्णा ह्यांनीं पुनीत केलेल्या महाराष्ट्रांत मुद्दाम येत. मग अर्थात् त्यांचे पारमार्थिक गहन विचार, नैतिक मतें व आचार आणि त्यांनीं पाहिलेल्या निरनिराळ्या लोकांचें व देशांचें वर्णन, हीं महाराष्ट्रांतील लंगोट्यापासून तों बड्या सरदारापर्यंत तहत सर्वांना सारखीं ऐकावयास मिळत असत. पाश्चिमात्य सुधारणेनें उत्पन्न केलेल्या "वर्तमानपत्रा", सारख्या संस्थांच्या हातूनहि जें काम नीटसें रेटत नाहीं, तें कार्य राष्ट्रीय महोत्सवच नीट तडीस नेऊं शकतात. वर्तमानपत्रांचा उपयोग व फायदे मर्यादित आहेत; पण लोकशिक्षणाच्या कामीं राष्ट्रीय महोत्सवांपासून अमर्यादित फायदे करून घेतां येतात. रामनवमीचे महोत्सव करणारे मठ, कमींत कमी शेंसवाशें रामदास स्वामींनीं महाराष्ट्रांत स्थापिले होते. ह्याच राष्ट्रीय महोत्सवांमुळें महाराष्ट्रांतील धर्मबुद्धि त्यावेळीं पूर्ण जागृत झाली. "शिवरायासि आठवावें" "मराठा तितुका मेळवावा," "महाराष्ट्रधर्म वाढवावा" असलीं उदात्त वाक्यें राष्ट्रीय महोत्सवामुळेंच महाराष्ट्रांतील आबालवृद्धांच्या तोंडीं त्यावेळीं बसून गेलीं तीं गेलीं व त्यांचा परिणाम असा झाला कीं, औरंगझेब दक्षिणेंत प्रचंड सैन्यासह उतरला असतां स्वधर्मरक्षणार्थ रांगणारी पोरेंहि युद्ध करण्यास तयार झालीं आहेत कीं काय, असें त्यास वाटण्याइतका महाराष्ट्रदेश तयार झाला. आमच्या देशांतील स्थानिक जत्रांचा, स्थानिक उत्सवांचा, त्या त्या प्रमाणें राष्ट्रावर कमी जास्ती परिणाम होतच असे. पूर्वीच्या जत्रा म्हणजे

राष्ट्रांतील धार्मिक, औद्योगिक व सामाजिक चळवळीचीं जंगी प्रदर्शनेंच होत. ह्याच किरकोळ जत्रांना, व ह्याच लहान उत्सवांना, चांगल्या लोकांचें पाठबळ मिळाल्यावर त्यापासून लोकांना अतिशय फायदे होणारे आहेत. हुताशनीप्रीत्यर्थ मुंबईस निघणाऱ्या वरघोड्याचें स्वरूप शहाणी मंडळी त्यांत पडल्यामुळें आतां अगदीं पालटून जाऊन ती एक लोकोपयोगी संस्था होऊं पहात आहे. हल्लीं हा वरघोडा लोकांचें मनरंजन करून त्या सालीं झालेल्या सर्व प्रकारच्या चळवळीची उजळणी करितो. सारांश, राष्ट्राची हरएक बाबतींत उन्नति करणाऱ्या प्रधान साधनांपैकीं राष्ट्रीय महोत्सव हें एक उत्तम साधन आहे.

गणपतीच्या उत्सवाला गुदस्त सालापासून राष्ट्रीय महोत्सवाचें स्वरूप येऊं लागलें आहे. यंदा तर हा महोत्सव महाराष्ट्रांत हरएक ठिकाणीं मोठ्या कडाक्यानें होईल असा अंदाज आहे. धर्मबुद्धि ज्यांच्या मनाला शिवत देखील नाहीं, जडाच्या पलीकडे ज्यांची बुद्धि जाऊंच शकत नाहीं, त्या अभागी व्यक्तींची कींव करण्यापलीकडे आम्हांस त्यांच्या संबंधानें कांहींच म्हणावयाचें नाहीं. श्रीमंगलमूर्तीच्या महोत्सवाच्या वेळीं दिवाभीताप्रमाणें ह्या दोनचार मंडळींनीं खुशाल आपल्या खोलींत दडून रहावें. परंतु आम्ही "पाषाणीपूजक" नाहीं असें केवळ लिहून दाखविणारांनीं मंदिरांत, अथवा डोळे मिटून झाल्यावर परत घरीं आल्यानंतर रामभजन करणाऱ्यांनीं, महाराष्ट्राच्या ह्या राष्ट्रीय महोत्सवाचे वेळीं आपल्या बुद्धिसामर्थ्यानें लोकांस साहाय्य करण्यास पुढें कां सरसावूं नये ? आपल्या कृतींनीं सामान्यजनांचा हे थोडक्याशा अंशीं तरी निष्कारण बुद्धिभेद करीत आहेत, हें ह्यांना उमगत नाहीं काय ? सर्व पृथ्वीतल प्रथम स्वच्छ सपाट करून मग आपणास फायदेशीर अशा पर्वतांच्या रांगा व नद्यांचे ओघ उत्पन्न करण्याच्या खटपटीला कोणी लागला तर त्याला काडीचेंहि यश यावयाचें नाहीं हें उघड आहे. पूर्वीपासून प्रवर्तित जें चक्र वें

नगर वाचनालय, सातारा.



तसेंच कालदेशावर नजर देऊन पुढें चालविणें हाच शहाण्याचा रस्ता आहे. डाव्या कानसीलास उजव्या हातानें वळसा देऊन तोंडांत घांस ढकलण्या-इतक्या हास्यास्पद "प्रमदावनां"च्या कल्पना लोकांपुढें मांडण्यापेक्षां आबाल-वृद्ध स्त्रीपुरुषांस, भक्ति, ज्ञान, मनोरंजन ह्या सर्वांपासून उत्पन्न होणारे फायदे एकदम करून देणाऱ्या राष्ट्रीय महोत्सवाचे वेळीं देह व बुद्धि जरा झिजविली असतां लेखणीद्वारेंच केवळ पंढरीनाथाचे भक्त म्हणून फडकणाऱ्या मंडळीनें आपलें थोडेंबहुत तरी कर्तव्य बजावल्यासारखें होईल. असलेले राष्ट्रीय उत्सव जागृत राखणें व नसल्यास नवे प्रचारांत आणणें हा राष्ट्रीयत्व कायम ठेवण्याचा एक उत्तम मार्ग आहे, व आमच्या सुशिक्षित मंडळीनें त्याची अनास्था करूं नये अशी त्यांस विनंति करून आजचा लेख संपवितों.

---

# * राष्ट्रीय महोत्सवांचे वेळीं सुशिक्षितांनीं काय केलें पाहिजे ?

कालिदासानें म्हटल्याप्रमाणें मनुष्य हा जात्याच उत्सवप्रिय आहे. दुःखमय संसारयात्रा जरा तरी सुखाची वाटण्यास, व ऐहिक गोष्टींत मग्न झालेल्या मनास पारमार्थिक शान्तीचा लाभ कांहीं वेळ तरी होण्यास धार्मिक महोत्सवा-सारखें दुसरें साधनच नाहीं. परकीयांनीं कैद केलेल्या राष्ट्रास उल्हासाचे व आनंदाचे दिवस दृष्टीसच पडत नाहींत. अधिकार परकीयांच्या हातांत; राज-लक्ष्मीनें मिठी मारलेली परकीयांच्या गळ्याला; तेव्हांहि आनंदोत्सव तेच करतात, सुखोपभोग तेच भोगतात. वेडगळ मुद्रा करून गटाराजवळ उभें राहून त्याच्याकडे पहावें एवढेंच काय तें आमच्या नशिबीं आलें आहे ! कैद्याप्रमाणें दिवसभर खपावें, अब्रू राखण्यापुरतेच कसलेबसले कपडे ल्यावेत, अस्थिचर्म एका ठिकाणीं राहूं देण्याइतक्याच योग्यतेचें अन्न पोटांत कोंबावें, व पुन्हां दुसरा दिवस उगवला कीं, गेल्या दिवसासारखाच तो कंठावा—अशी आमची ही राहण्याची तुरुंगांतील पद्धत आज कित्येक वर्षें चाललीच आहे. महाराष्ट्रीयांचा मोठ्या उत्साहाचा सण म्हणजे दसरा; पण तो आतां निर्माल्यवत् झाला आहे. पूर्वींच्या मर्दुमकीच्या गोष्टींची आठवण करून डोळ्यांतून दोन टिपें टाकविणारा हा सण उत्साहवर्धक होण्याऐवजीं उद्वेग-जनक मात्र होतो. दसरा हा पुष्कळ अंशीं राजकीय महोत्सव असल्यामुळें स्वातंत्र्याबरोबरच आम्हीं त्याला आंचवलों. सांप्रतच्या पालटलेल्या स्थितींत त्याचेंहि स्वरूप पालटलें पाहिजे, व ह्या दिशेनें पुणेकरांचे प्रयत्न चालू आहेत

---

* केसरी ८ सप्टेंबर १८९६

हें केसरीच्या वाचकांस सांगावयास नको. व्यापारी मंडळीची महोत्सवाची वेळ म्हटली म्हणजे दिवाळीचा सण होय. पण व्यापार बुडाल्यामुळें हाच सण महाराष्ट्रीयांस पोकळ व उदास होऊं लागला आहे. मंगलागौरीचे दिवशीं पाल्यापाचोळ्याचा मोठा ढीग करून नंतर त्यावर फुलें मांडून मोठी गौर करण्याचा पोरीबाळींचा जसा प्रघात आहे, त्याचप्रमाणें तांदुळाच्या राशीवर रुपयांची मांडणावळ केल्यानंतर फुगल्यासारख्या दिसणाऱ्या लक्ष्मीचें पूजन करण्याचेंच महाराष्ट्रीय पैसेवाल्या मंडळीचे नशिबीं येऊं पहात आहे. असो; अशा रीतीनें राजकीय व औद्योगिक बाबतींत परकीयांनीं आमच्या गळ्यांत वैराग्य बळेंच बांधल्यामुळें राजकीय व औद्योगिक महोत्सव सांप्रत स्थितींत आमच्यांत फारच थोडे होणार. तेव्हां ह्या सर्वांचा वचपा धार्मिक महोत्सवाचे वेळीं आम्हांस काढिला पाहिजे व अशा प्रसंगीं धार्मिक, नैतिक, राजकीय सर्व बाबींचा खल करण्याचा रिवाज फार पूर्वीपासूनचा आहे हें गेल्या अंकीं वाचकांस आम्हीं कळविलेंच आहे. ह्या धर्मोत्सवाचे प्रधान भाग दोन आहेत. पहिला भाग जनमनरंजन व दुसरा लोकशिक्षण होय. ज्या राष्ट्राला वर्षांतून आठ दहा दिवसहि सात्विक हौस पुरविण्याची संधि मिळत नाहीं; भक्तीनें आपल्या देवतांचीं पदें गाण्यांत व ऐकण्यांत तल्लीन होतां येत नाहीं; गुलामांच्या संसार—यात्रेंतील कष्ट घटकाभर विसरून, ईर्ष्या व आवेश उत्पन्न करणाऱ्या गोष्टी ऐकण्यास व पहाण्यास ज्या राष्ट्राला मिळत नाहींत— तें राष्ट्र सर्वांशीं धुळींत मिसळलें म्हणून समजावें. कैद्याहून आमची राहटी निराळी आहे, गुलामाहून अधिक वाईट नीच स्थितींत आम्हीं नाहीं असें दाखवावयाचें असल्यास मनुष्याच्या अंगांत स्वभावतः खिळून राहिलेल्या उत्सवभक्तीस जरा तरी उचंबळू दिलें पाहिजे. आमच्या बऱ्याच महोत्सवांना वर्षासनें ठरलेलीं आहेत. देवस्थानांना तोडून दिलेल्या उत्पन्नांतून हे महोत्सव होत असतात. उत्सवाला जमणाऱ्या हजारों यात्रेकरूंकरितां

राष्ट्रीय सभेप्रमाणें जंगी नवे सभामंडप घालावयास नकोत. अथवा मोठ-मोठ्या मेजवान्याहि उठविण्यास नकोत. हे उत्सव फार जुनाट आहेत व ह्यांचा खर्च कोठून आणावयाचा, ह्याची व्यवस्था कशी ठेवावयाची ह्याबद्दल त्रास व दगदग करण्याची कांहीं कांहीं ठिकाणीं जरूरहि नसते. स्वाभाविक उत्सवप्रियतेमुळें व हे उत्सव धार्मिक असून फार जुने असल्यामुळें, आमच्या उच्च मनोवृत्ति उत्सवाचें नांव ऐकल्याबरोबर आपोआप उसळूं लागतात. चिंचवडच्या मोरयाला मोठें उत्पन्न आहे, पर्वती संस्थानचें उत्पन्न कांहीं लहान नाहीं. चाफळ येथील रामदास स्वामींचा उत्सव कडाक्यानें होण्याइतकी चाफळच्या स्वामींना जहागीर आहे. हरएक देवळाला उत्सवाप्रीत्यर्थ कांहींना कांहीं तरी उत्पन्न असतेंच असतें. उत्सवाप्रीत्यर्थ खर्च नवीन करायचा आहे असें नाहीं. जनरंजनार्थ केलेल्या थाटमाटाच्या खर्चाचा बोजा दारिद्र्यामुळें निःसत्व झालेल्या प्रजेवर बसतो असेंहि नाहीं. अशा प्रकारची आपली पूर्वीची सर्व तयारी असूनहि सुशिक्षितांच्या धार्मिक औदासिन्यामुळें निरनिराळ्या ठिकाणीं होणाऱ्या ह्या धर्मोत्सवांपासून व्हावयाचे ते फायदे होईनातसे झाले. आमची धर्मबुद्धि जागृत रहावी, आमच्या नैतिक व राजकीय मनोवृत्ति जोमाच्या रहाव्यात, आमची राष्ट्रीयत्वाची ज्योत नेहमीं प्रकाश देणारी असावी, म्हणूनच आमच्या वाडवडिलांनीं या उत्सवांची योजना केलेली आहे. तरी आतां ह्या अत्युत्कृष्ट सार्वजनिक संस्थांची हेळसांड केल्याचें पाप सुशिक्षित मंडळींच्या माथीं बसत नाहीं काय? उत्सवांच्या थाटमाटाच्या खर्चाची सर्व तयारी पूर्वजांनीं करून ठेवल्यावरहि धर्मबुद्धि जागृत ठेवण्याचें देखील काम जर शिकलेल्या मंडळींच्या हातून पार पडत नाहीं, तर आजपर्यंत ही सुशिक्षित मंडळी निष्कारण जिवन्त होती असेंच म्हणावें लागतें. प्रथम पिढीच्या सुशिक्षित मंडळीच्या मनांत धर्मबुद्धि जागृत ठेवावी अशी इच्छा होती; पण त्यांचे विचार अतिशयच भरकटल्यामुळें त्यांचे प्रयत्न निष्फळ झाले. पूर्वीचा ओघ

नगर वाचनालय, सातारा
संगणकीकृत

सोडून निराळा ओघ निष्कारण पाडूं पहाणाऱ्यांच्या प्रयत्नांचा शेवट असाच व्हावयाचा. गहन व सत्य अशा धर्मतत्त्वांच्या पायावर एकनाथ, ज्ञानेश्वर, तुकोबा ह्यांनीं उभारलेला महाराष्ट्रधर्म सोडून सर्व लोक प्रार्थना समाजिस्ट बनतील, ही वेडगळ कल्पना शहाणे म्हणविणारांच्या डोक्यांत प्रथमतः कशी शिरली, ह्याचेंच राहून राहून आम्हांस आश्चर्य वाटतें. " क्लेशोऽधिकतरस्तेषाम-व्यक्तासक्तचेतसाम् " हें गीतेंतील कोणासहि समजणारें वचन, निराकार तत्त्वाचीं, रडक्या आवाजानें, सर्वच लोक गीतें गातील असें समजणाऱ्यांच्या लक्षांत कसें आलें नाहीं कोण जाणें ? असो; ह्यांच्या धार्मिक व सामाजिक चळवळी अगदीं चुकीच्या आहेत हें अनुभवानेंच आतां सिद्ध झालेलें आहे. करितां पूर्वी तसें केलें आतां असें कसें करावें—हा खोटा अभिमान ह्या मंडळीनें सोडून दिला पाहिजे. भक्तलीलामृतांतील सर्व गोष्टी खऱ्या समजण्यास कोणतीहि हरकत नाहीं. खऱ्या भक्तांस परमेश्वर सगुण मूर्तीनें दर्शन देण्यास चुकत नाहीं—वगैरे प्रमेयें लोकांपुढें स्पष्टपणें बोलून दाखविण्याचें जसें त्यांनीं धाडस केलें, त्याचप्रमाणें मनांतील दुर्विकार सर्व हांकलून लावून श्रीमंगलमूर्तीचा उत्सव प्रार्थना मंदिरांतहि उघडपणें करावा ह्यांतच धर्महित व राष्ट्रहित आहे, हें धर्माकरितां व देशाकरितां निरपेक्ष बुद्धीनें राबतां म्हणणाऱ्या सद्गृहस्थांस समजतच असलें पाहिजे; उमजण्याचीच काय ती मारामार आहे. पण खोटा अभिमान, नसत्या घोटाळ्यांत गरगर फिरविणारा अहंकार, हे सोडून दिले म्हणजे ह्यांच्याच हातून मोठमोठीं देशकार्यें तडीस जाणारीं आहेत. राष्ट्रीय महोत्सव फार जुने आहेत; ज्या ठिकाणीं ते अजीबात नाहींसे झाले असतील त्या ठिकाणांशिवाय इतरत्र आम्हांस नवीन उत्सव कांहीं बनवावयाचे नाहींत; करितां आमच्याच औदासिन्यामुळें मलिन झालेले हे उत्सव सतेज करण्याचें काम सुशिक्षितांनीं आपल्या शिरावर घेतलें पाहिजे. उत्सवांचे वेळीं त्या त्या ठिकाणीं ह्यांनीं हजर राहून व्यवस्थेसंबंधाचें

हरएक प्रकारचें काम अंग मोडून करण्यास तयार असलें पाहिजे. महोत्सवांतील लोकशिक्षणाचा भाग सुशिक्षित मंडळीला आपल्या ताब्यांत पाहिजे असल्यास सामान्य लोकांत मिसळून वागल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. लोकांच्या खरोखर गरजा कोणच्या आहेत, लोकांत धर्मबुद्धि कितपत जागृत आहे, लोकांच्या स्वाभाविक ओघाला कोणचें वळण दिलें असतां राष्ट्रहित सहजगत्या साधणारें आहे,—ह्या सर्व गोष्टी लोकनायक होऊं पहाणारांनीं लोकांत मिसळूनच समजावून घेतल्या पाहिजेत. समजा, उद्यां चिंचवडला अथवा नाशिकाला उत्सव आहे; सुशिक्षित मंडळीनें तेथें गेलें पाहिजे; व्यवस्थापक मंडळीची गांठ घेऊन कांहीं तरी कामाचा बोजा उचलण्यास कंबरा बांधल्या पाहिजेत. लोकशिक्षणाचीं जीं जीं त्या उत्सवांत साधनें असतील, मग तें कीर्तन असो, पुराण असो, व्याख्यान असो, सर्व साधनांचा उपयोग धार्मिक, नैतिक व राजकीय चळवळींचा लोकांत प्रसार करण्याचे कामीं केला पाहिजे. उत्सवांनिमित्त जमणाऱ्या जत्रांचा उपयोग औद्योगिक प्रदर्शनासारखा ह्यांनीं कां करूं नये ? लक्षावधि जत्रा जमली असतां निरनिराळे खेळ घेऊन आलेल्या मंडळींचे लहान लहान मंडप जसे मैदानावर दिसतात त्याचप्रमाणें ह्या नाहीं तर त्या विषयाचा ऊहापोह करणारी सुशिक्षित मंडळी पांच पन्नास व्यासपीठें उभारून लोकांपुढें अपापल्या निरनिराळ्या पोथ्या उघडतांना कां दृष्टीस पडूं नये ? राष्ट्रीय सभेइतकें हें काम दगदगीचें व खर्चाचेंहि नाहीं. असें असूनहि राष्ट्रीयसभेच्या हातून जी कामगिरी बजावणें अशक्य आहे ती कामगिरी महोत्सवांच्या द्वारें सुशिक्षित लोक सहज बजावूं शकतील. मोठ्या जत्रांना प्रचंड सभांचें स्वरूप आम्ही कां देऊं नये ? तुमच्या राजकीय चळवळीचा प्रवेश खेड्यापाड्यांतील झोंपडींतहि अशा प्रकारानें व्हावयाचा नाहीं काय ? बहुत श्रमानें तुम्ही पैदा केलेलें नैतिक व धार्मिक ज्ञान, लिहितांवाचतां न येणाऱ्या खेड्यापाड्यांतील तुमच्या बंधूस तुम्ही सुलभ उपायानें करून

...र वाचनालय, सातारा.



दिलें असें होणार नाहीं काय ? हिंदु लोक कांहीं कैदी नाहींत, हिंदु जिंकलेले असले तरी गुलाम नव्हेत; तेव्हां ते महोत्सवांचा दिवस आनंदांत घालविणारच. जत्रा असेल त्या ठिकाणीं आपोआप जमणारच. अशा वेळीं आपली खरी स्थिति काय आहे त्याचें ज्ञान लोकसमूहाला सुशिक्षितांनीं कां करून देऊं नये ? सरकार करीत असलेल्या जुलुमाची आठवण त्यावेळीं लोकांना शहाणे म्हणविणाऱ्या मंडळींनीं कां करूं नये ? अथवा सर्वांत धर्मबुद्धि जागृत करून आमच्या राष्ट्रीयत्वास कां बळकटी आणूं नये ? आमच्या पूर्वजांनीं आमच्याकरितां ह्या महोत्सवांच्या सार्वजनिक संस्था उत्पन्न करून ठेविल्या आहेत; पण वाढलेलें अन्न जेवण्याइतकेंहि आमच्यांत सामर्थ्य उरलें नाहींना ? राष्ट्रीय सभेला, आमच्या धर्मव्याख्यानांना जमावे तितके लोक जमत नाहींत म्हणून आम्हीं हांका मारतों; पण लोक जमतात त्या ठिकाणीं आम्हांला कोठें जावयाला पाहिजे ? देव देतो पण कर्म नेतें अशांतली आमची स्थिति झाली आहे. लोक एका ठिकाणीं जमण्याचे प्रसंग पूर्वजांनीं आयते तयार करून ठेविले, पण सुशिक्षित मंडळीला हे प्रसंग असून नसल्यासारखेच आहेत. आम्हीं शिकलेले ही त्यांना ऐट आहेना ? लोकांत कसें मिसळावें—ह्यांना मोठी पंचाईत पडते ती हीच. पर्वत महंमदाकडे गेला नाहीं तर महंमदानें पर्वताकडे जावें, हें तत्त्व आमच्यांतील कांहीं वृद्धतरुण मंडळी पुष्कळदां घोकून शिकून आल्यावरहि विसरतात. लोकांना "जनावरें" म्हणण्याची कांहींना हांव सुटते, समाजाला "मठ्ठ, टोणपे, दगड" अशा शिव्या देण्यास कांहीं तयार होतातच, इतकें केल्यावर समाज आमच्यावर उगाच चिथरला आहे म्हणून उलटी ओरड करण्यास हीच मंडळी तयार असते. समाजाला योग्य वळण लावण्याचा हा मार्ग नव्हे; दुसऱ्यास शिव्या दिल्या असतां तो रागावतो म्हणून रुसून बसण्यांत कोणाचेंच हित नाहीं. समाजाहून सुशिक्षित लोकांचा वर्ग निराळा समजण्याइतकें मौल्य दुसऱ्या कशांतहि नाहीं. शिकलेले

लोक समाजाचे व समाजांतलेच आहेत. समाज तरला तरच ते तरणार. समाजाला सोडून त्यांचें कांहींचेंहि चालावयाचें नाहीं. प्रार्थनासमाजांत भक्तिभावाचे पोवाडे गात बसण्यापेक्षां लोकांत मिसळून न्यायमूर्तिसारख्यांनीं श्रीमंगलमूर्तीचे मंडपांत भक्तीच्या महिम्याचें वर्णन केलें तर किती तरी फायदे होणारे आहेत. उदास भासणाऱ्या मंदिरांत " रामदासावर " व्याख्यान देण्याऐवजीं चाफळच्या उत्सवांत जर दासबोधांतील एखाद्या अध्यायाचें निरूपण केलें तर त्या उत्सवाला किती तरी निराळें स्वरूप देणारें आहे. लोकांत मिसळणारे, उत्सवाचें सामान्य धोरण ध्यानांत ठेऊन काम करण्यास झटणारे व उत्सवद्वारें लोकांना धार्मिक, नैतिक व राजकीय शिक्षण देणारे लोक, जुन्या व नव्या लोकांस अत्यंत प्रिय वाटतात. सुशिक्षित मंडळीची अशा रीतीनें काम करण्याची तयारी मात्र पाहिजे. महोत्सवांचे वेळीं लोकशिक्षणाचा उत्सवाचा भाग त्यांच्या हातीं पडण्यास कांहींहि अडचणी यावयाच्या नाहींत. श्रीमंगळमूर्तींच्या उत्सवांत सुशिक्षित मंडळी आपल्या वांटणीचा कामाचा बोजा उचलण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं अशी आमची आशा आहे. उत्सवांचे कामांत सुशिक्षित मंडळी पडल्यानें सामान्य जनांचे हातून गैरप्रकार होण्याची भीति बाळगण्यास जागाच राहणार नाहीं, व उत्सवांस एक प्रकारचें व्यवस्थेशीर स्वरूप येईल. आपलें कर्तव्यकर्म कोणतें तें नीट ओळखावें व त्याप्रमाणें वागण्यास एकदम लागावें अशी शिकलेल्या मंडळींस आमची विनंति आहे.

# लो. टिळकांवरील ९७ सालच्या खटल्याचे लेख

( लो. टिळकांवर १८९७ सालीं ज्या लेखांवरून खटला झाला ते खालीं दिले आहेत. त्यांपैकीं 'शिवाजीचे उद्‌गार' ही कविता खेरीज करून बाकीचा मजकूर श्री. कृ. प्र. खाडिलकर यांनीं लिहिलेला असून, या लेखांची व कवितेची प्रुफें लो. टिळकांनीं तपासलीं होतीं. )

## * शिवाजीचे उद्‌गार

दुष्टां संहरुनी बहूत भुविंच्या तो भार केला कमी ।
देशा उद्धरिलें स्वराज्य करुनी, तारोनि धर्मास मीं ॥
झाला शीण बहू तया दवडण्या स्वर्लोक म्यां गांठिला ।
होतो निद्रित तों तुम्हीं उठविलें कां लाडक्यांनों मला ॥
पाया शुद्ध उदात्त नीति, रणिंचें तें शौर्य कर्णासम ।
देशाचा अभिमान, धाडस खरें तें ऐक्य सर्वोत्तम ॥
ऐसे सद्‌गुण कल्पवृक्षचि जणूं भूमींत या लाविले ।
त्यांची दाखितसाल काय मजसी तीं गोड आतां फळें ॥
अरेरे ! हें काई ! दिसत पडला मोडुन गड ।
नशीबें बैसाया मिळत मज विच्छिन्न दगड ॥
तसें कां जाईना हृदय मम हें आज फुटुनी ।
पहातों देशाचा शिव शिव अतां नाश नयनीं ॥
पैसा पाउससा आम्हीं खरचिला बांधावया ते जयां ।
ताजें तापट रक्त जेथ गळलें संपादण्यातें जयां ॥

---

* केसरी, ता. १५ जून १८९७.

गेलों चालुन जेथुनी दरितुनी गर्जोनिया सिंहसा ।
किल्ले ते मम ढासळून पडले विध्वंस हा कायसा ॥
लक्ष्मीतें जुलुमें परस्थ छळुनी नेती करें ओढुनी ।
गेली ती पळुनी सवें विपुलता, आरोग्यही मागुनी ॥
दुर्भिक्षासह सर्व देश फिरते ही दुष्ट आकाश्या ।
रोगांची परसोन साथ विचरे मृत्यू न ज्यातें दया ॥

श्लोक

माझा धर्म पडे तयाक्षणि तिथें तें रक्त ज्यांचें गळे ।
माझे जीव दुजे धुरंधर वदा ते हो कुठें मावळे ॥
खाती भाकर एक वेळ परि त्यां तीही पडेना पुरी ।
कष्टें काल कठिण कंठिति घड्या बांधोनी पोटावरी ॥
शांतीच्या समयीं स्वधर्म अपुला पाळोन जे राहिले ।
त्यागोनी समयास दर्भ करिचें शस्त्रा करीं वाहिलें ॥
माझे सद्गुरु धर्मशिक्षक जया ज्या ब्राम्हणां पाळिलें ।
त्यातें कैद घडोनिया, जन तुम्हीं, क्षेत्रीं कसें साहिलें ॥
धात्रीभूत लहानग्यांस जननी सोडून जाते यदा ।
मूलाधार कृषीवलां बहु असे लोकांस जी शक्तिदा ॥
माझी माय म्हणोन गाय पुजिली प्राणांहुनी रक्षुनी ।
तीतें रोज चराचरा चिरिति कीं वध्यस्थलीं नेऊनी ॥
"आला धांवत नेमका आपणची नेमांत बंदूकिच्या !" ।
"मातें अस्वल वाटला !" "सुजति हो यांच्या प्लिहा रोजच्या" ॥
गोरा लोक सुटे निरर्थ सबबी सांगोनियां या कसा ।
न्यायाच्या अजि मंदिरीं दिसतसे अन्याय हा फारसा ! ॥
होती काय विशाद वक्रनयनें पाही परस्त्री कुणी ।
म्यानांतून हजार तीक्ष्ण असिका बाहेर ये त्या क्षणीं ॥

आतां अग्निरथांत संधि बघुनी हस्तें स्त्रिया ओढिती।
पण्डानां करितां कसें सहन हें! लावून घ्या दाद ती! ॥
" वेडा हा उचलोन यास जलदी यात्रेस द्या लावुनी"।
" चैनी तो अधिकार घ्या मुदतिनें घेतां असें सांगुनी" ॥
ऐशीं हातळती आतां नृपकुलें दुर्दैव हें ओढलें।
सारे केवळ हे दळवे बुदबळ्ये राजे कसे जाहले ॥
देखावा हृदया विदारिल असा पाहूं तरी मी कसा? ।
नेतों, दृष्टि दुजेकडे, कथुनियां संदेश वारीकसा ॥
ज्यांच्या मावळतो कधीं न रवि हा राज्यावरी थोरल्या।
सांगा त्या प्रभुनां सलाम तुमच्या दोस्तांस माझ्या भल्या ॥
सांगा त्यांस " अहो तुम्हीं विसरला कैशी जुनी रीत ती"।
जेव्हां घेऊनियां तुला, करितसां विक्री वखारींत ती ॥
होत्या होत बऱ्याच वेळ सफरी बाजूस माझ्या तया।
होतें शक्य तदा तुम्हां फिरूनही देशास लावावया! ॥
हिंदूंचे परि शील थोर म्हणुनी तुम्हांस म्यां रक्षिलें।
नाहीं का उपकार थोर तुमच्या माथीं असे जाहले, ॥
द्या, द्या, सूख तरी प्रजेस अपुल्या माझींच तीं लेंकरें।
व्हावें आज कृतज्ञ फेडुन ऋणा हें लोकिकाला बरें! ॥

निशाणी भवानी तलवार.

## * स्फुट सूचना

येथील श्रीशिवाजी–राज्याभिषेक उत्सवास ता. १२ शनिवार रोजीं सुरवात होऊन काल रात्रीं उत्सवाची समाप्ति झाली. उत्सवाकरतां लकडी पुलाजवळील विठ्ठल मंदिर उत्तम प्रकारानें शृंगारिलें होतें. घोड्यावर

* केसरी, ता. १५ जून १८९७

असलेली श्रीशिवाजीची मूर्ति स्थापन करून सभोवतीं श्रीशिवाजी महाराजांच्या निरनिराळ्या चित्रकारांनीं काढिलेल्या तसबिरा लावल्या होत्या. समर्थ रामदास स्वामी व श्रीशिवाजी महाराज यांची सज्जनगडाखालच्या रानांत गांठ पडून समर्थ श्रीशिवाजीस उपदेश देत आहेत अशा समयाची या उत्सवाकरतां मुद्रास येथील मार्मिक चित्रकार रा. पिंपळखरे यांनीं काढिलेली तसबीर, व रा. भिडे यांनीं महाराजांचा काढिलेला बस्ट हीं कामें प्रेक्षणीय होतीं. उत्सवाचे प्रारंभीं विद्यार्थ्यांनीं स्तुतिपर पदें म्हटल्यावर, प्रो. परांजपे यांचें पुराण झालें. धर्मराजाचा राजसूययज्ञ पाहून आल्यावर महत्त्वाकांक्षी सुयोधनाच्या अंगाचा झालेला संताप, तत्संबंधानें त्याचे विचार, शकुनीमामा व धृतराष्ट्र ह्यांच्याशीं त्याचा झालेला संवाद ह्या संबंधाचा महाभारतांतील कथाभाग त्यांच्या पुराणाचा विषय होता. श्रोत्यांच्या मनांत राजसूययज्ञाची कल्पना नीट यावी म्हणून डायमंड ज्युबिलीशीं राजसूययज्ञाचें साम्य दाख-विल्यावर व दुर्योधनाच्या वृत्तींचें मण्डन करण्याचा हा प्रयत्न नसून प्राणि-मात्रांस व्यापून असलेल्या महत्त्वाकांक्षेचा प्रभाव, तिचें स्वरूप, राष्ट्राचा किंवा एखाद्या पक्षाचा उत्कर्ष करण्याचा तिच्या अंगांतील जोम, ह्यांचें तात्त्विक रीतीनें महाभारतांत केलेलें विवेचन आपणांपुढें मांडण्याचा हा प्रयत्न आहे, असें पुराणिकबोवानीं उपोद्घातादाखल सांगितल्यावर पुराणास सुरवात केली. प्रो. परांजपे यांची भाषणशैली जोराची व मनोवेधक आहे. ह्यामुळें श्री व्यासांनीं महत्त्वाकांक्षी मनाचें जें उत्तम चित्र रेखाटलें आहे त्यांतील खुमारी ह्या प्रसंगीं पुराणिक बोवानीं श्रोत्यांच्या मनावर चांगल्या रीतीनें ठसविली. " असंतोषः श्रियो मूलं " । " संतोषस्तु श्रियं हन्ति । " हीं वचनें पुराणांतील मथितार्थ होतीं. खाण्यापिण्याला यथेच्छ असलें तरी आपले शत्रू आपल्यास पायाखालीं तुडवितात, ह्या अपमानाच्या जळजळाटानें मनुष्यास मृत्यु बरा कसा वाटतो, असंतोषी मनुष्य साहाय्य कसें मिळवितो,

नगर वाचनालय, सातारा.



शस्त्रास्त्रांची उणीव आपल्या कौटिल्यानें कशी भरून काढितो वगैरे प्रकरणांचें वर्णन मनावर विशेष ठसण्यासारखें होतें. पुराण संपल्यावर महाभारताचें अध्ययन करण्याविषयीं मोठ्या कळवळ्यानें प्रो. जिनसीवाले ह्यांनीं जमलेल्या मण्डळीस विनंति केली. श्रीशिवाजीमहाराज यांची सीझर नेपोलियन यांच्याहून अधिक योग्यता मानण्याचें कारण प्रो. जिनसीवाले ह्यांनीं ह्या प्रसंगीं असें सांगितलें कीं, युरोपचे थोर पुरुष दुर्योधनाप्रमाणें केवळ महत्त्वाकांक्षी होते. पण आमच्या महाराजांनीं जे एवढे अलौकिक गुण दाखविले ते महत्त्वाकांक्षा किंवा असंतोष ह्यांच्या ज्वालांचा प्रभाव नसून परकी लोकांनीं आपल्या देशाची व धर्माची धूळदाण केली, ह्यामुळें उत्पन्न झालेल्या भयंकर चिडेचे ते गुणप्रभाव होत. पुराणानन्तर रात्रीं ह. भ. प. मटंगे बुवांचें कीर्तन झालें. अभिषेकासंबंधानें बोवांनीं स्वतः केलेल्या कविता सोप्या भाषेंत रचिलेल्या असून बोवांच्या बरोबर कथेच्या उपकरणांची पूर्ण जोड असल्यामुळें कथा फारच आनंददायक झाली. या कथेकरतां वे. शा. मटंगे हे येथें साताऱ्याहून मुद्दाम आले होते.

× × × ×

दुसरे दिवशीं सकाळीं विंचूरकर यांचे वाड्यांत मर्दुमकीचे खेळ खेळण्यांत आले. न्यू इंग्लिश स्कूल, नूतन मराठी विद्यालय व इतर शाळा ह्यांतील विद्यार्थ्यांनीं जोडी व मल्लखांब हीं चांगलीं करून दाखविलीं. न्यू स्कूलमधील विद्यार्थ्यांनीं काठी, दांडपट्टा, बोथाटी वगैरे खेळण्यांत प्राविण्य दाखविलें. त्यांचें अनुकरण इतर शाळांतील विद्यार्थी करतील अशी आशा आहे. निरनिराळ्या शाळांतील विद्यार्थ्यांना व गांवांतील तालमींना मर्दानी खेळांतील आपलें प्राविण्य दाखवण्याचा प्रसंग शिवजन्मासारिखा सांपडावयाचा नाहीं. या कामीं निरनिराळ्या शाळांतील व्यवस्थापकांनीं ऐक्यमत केल्यास मुलांच्या शारीरिक व मर्दानी खेळास विशेष उत्तेजन मिळण्याचा संभव आहे. या

आमच्या सूचनेचा निरनिराळ्या शाळांतील प्रमुख मंडळी योग्य विचार करतील अशी आशा आहे. असो. त्या दिवशीं रात्रीं रा. टिळक यांच्या अध्यक्षतेखालीं प्रो. भानू यांचें "अफझुलखानाचा वध" या विषयावर व्याख्यान झालें. शिवाजीनें "खून" केला असा जो इंग्रजी ग्रंथकार श्रीशिवाजी महाराजांवर आरोप आणितात त्याचें प्रो. साहेबांनीं उत्तम रीतीनें खंडन केलें. पंतोजी गोपीनाथ हे अफझुलखानाचे नोकर नसून प्रथमपासून श्रीशिवाजी महाराजांचे नोकर होते असा प्रो. साहेबांपाशीं भक्कम पुरावा आहे. (ह्यासंबंधाचे कागदपत्र प्रसिद्ध करण्याची प्रो. भानूंना दोन वर्षें परवानगी नसल्यामुळें त्यांनीं त्यासंबंधाचा आपला पुरावा सभेपुढें मांडिला नाहीं.) पंतोजी गोपीनाथावर आलेला विश्वासघाताचा आरोप अक्षरशः खोटा आहे असें ठरतें. शिवाजीला जिवंत धरून आणण्याकरितां किंवा त्याला ठार मारून त्याचें शीर विजापुरास नेण्याकरितां प्रतिज्ञेचा विडा उचलून आलेल्या व मार्गांत तुळजापूरच्या देवीस व पंढरपूरच्या विठोबास पायाखालीं तुडविणाऱ्या अफझुलखानाच्या मनांत आपणांशीं खरा तह करण्याचें आहे असें महाराजांना वाटावें तरी कसें? आपल्या बचावाकरितां लढाईची सर्व तयारी करून महाराज प्रतापगडचे माचीवर अफझुलखानाचे भेटीस आले त्यांत त्यांनीं विश्वासघात तो कोणता केला? इंग्रजी ग्रंथकार जरी महाराजांनीं प्रथम वाघनखें खुपसलीं म्हणतात, तरी महाराजांच्या मृत्यूनंतर तीस वर्षांनीं लिहिलेल्या एका बखरींत व मृत्यूनंतर सुमारें १०० वर्षांनीं लिहिलेल्या दुसऱ्या बखरींत अफझुलखानानें प्रथम वार केला असें लिहिलेलें आढळतें. महाराजांनीं अफझुलखानास प्रथम मारिलें असें गृहीत धरून चाललें तरी, मुसलमानांच्या पादशहांपुढें केंसभरहि मस्तक वांकवावयाचें नाहीं, अशी नवव्या वर्षी ज्याच्या मनांत परमेश्वरी प्रेरणा होती, त्या पुरुषाला "खुनी" म्हणण्याचा कोणत्या लेखकाला अधिकार पोहोंचेल? स्वातंत्र्य नष्ट झालें म्हणून इटलीचा मॅझिनी जर

नवव्या वर्षापासून सुनक्याचा पोषाख धारण करतो तर चालत्या बोलत्या विद्यामंदिरांचें व आमच्या गौरूपी सजीव ऐश्वर्याचें संरक्षण करण्याकरितां भगीरथ प्रयत्न करण्याची स्फूर्ति महाराजांना लहानपणींच कां होऊं नये ? महाराजांच्या पासंगासहि पुरावयाचे नाहींत अशा क्लाइव्ह व वॉरन हेस्टिंग यांचीं चरित्रें घाणेरड्या कृत्यांनीं ओथंबलेलीं असतांना त्यांची स्तुति करण्यास इंग्रजी ग्रंथकार कसे धजतात ? वॉशिंग्टनसंबंधानें 'बंडखोर" हें विशेषण ज्या इंग्रजी नीतींतून उतरत नाहीं तीच लेखणी शिवाजीस बंडखोर म्हणते हा निर्मल सत्याचा जाणूनबुजून केलेला उपमर्द नव्हे काय ? यूरपच्या इतिहासांत शिवाजीसारखा सदाचरणाचा मनुष्यच सांपडावयाचा नाहीं. इतिहासशास्त्र शिवाजीस वाईट म्हणणार, नीतिशास्त्राच्या दृष्टीनें शिवाजीची कृती दूषणार्ह नाहीं. "सर्वांत अधिक मोठ्या संख्येचे सर्वांत अधिक सुख" हा ज्या युरोपियन नीतिशास्त्राचा मूळ सिद्धांत तें शास्त्र मोठा धर्म साधण्याकरितां क्षुल्लक धर्माचा त्याग करणाऱ्या शिवाजीस कसें दोषी ठरवील ? महाभारतांत तर अशा पुरुषास "बुद्ध" असें म्हटलें आहे. शिवाजीनें जे अपराध केले म्हणून इतिहासांत लिहिलें आहे त्यांहून अधिक भयंकर असे आणखी पन्नास अधिक अपराध महाराजांनीं जरी केले असते, तरी आजच्याप्रमाणें महाराजांचे मूर्तीपुढें शतशः शिरसाष्टांग नमस्कार घालण्यास मी तयार राहतों ! असें सांगून प्रो. साहेबांनीं मूळ विषयाचा उपसंहार केला.

× × × ×

व्याख्यानाच्या शेवटीं प्रो. भानू असें म्हणाले कीं, या उत्सवापासून प्रत्येक हिंदूस, प्रत्येक मराठ्यास, मग तो कोणत्याहि पक्षाचा असो, आनंद झालाच पाहिजे. नष्ट झालेलें स्वातंत्र्य पुन्हां मिळवण्याचा आम्हां सर्वांचा उद्योग आहे ! व हें भयंकर ओझें सर्वांनीं मिळून उचलावयाचें आहे. हें ओझें उचलण्याचा ज्याला जो मार्ग योग्य वाटेल त्या मार्गानें तो खऱ्या

मनानें जात असतां त्याला अडकाठी घालणें केव्हांहि योग्य व्हावयाचें नाहीं. आमच्यांतील एकमेकांच्या भांडणांमुळें आमच्या प्रगतीस फार अडथळा होतो. जर कोणी राष्ट्रास वरून खालीं दडपत असेल तर त्याला छाटून काढा, पण इतरांस अडकाठी करूं नका. आजपर्यंतचें झालें तें झालें, तें विसरूं या व एकमेकांस त्याची क्षमा करूं या. घुशींच्या व मांजरांच्या मारामारीइतकीच ज्या भांडणाची थोर पुरुष किंमत करतील तें भांडण पुरें नाहीं कां झालें ? सर्व राष्ट्राची एकी करणारे या उत्सवासारखे जितके प्रसंग येतील तितके चांगलेच असें सांगून प्रो. साहेबांनीं आपलें भाषण पुरें केलें. नंतर प्रो. जिनसीवाले असें म्हणाले कीं, जर नेपोलियनला युरोपांतील दोन हजार खुनांबद्दल कोणीहि दोष देत नाहीं, गॉल (फ्रान्स) मध्यें कित्येक निष्कारण कत्तली करूनहि सीझर दयाभूत जर टरतो, तर एक दोन वधाबद्दल श्रीशिवाजीमहाराजांवर एवढा गहजब कां व्हावा ? फ्रेंच रेव्होल्यूशनमधील लोक ज्याप्रमाणें आम्हीं खून करीत नाहीं तर मार्गांतील कांटे मार्गांतून दूर करितो, असें म्हणत होते, तोच न्याय महाराष्ट्रांत कां लागू करूं नये ? पक्षाभिमानाला पेटून आपली खरीं मतें एकीकडे गुंडाळून ठेविणें चांगलें नव्हे. आपलीं मतें बोलून दाखविण्यास एखादा प्रसंग राष्ट्रहिताच्या दृष्टीनें गैरवाजवी आहे असें वाटल्यास त्याप्रसंगीं आपण गप्प राहिलें पाहिजे हें खरें ! पण आपल्या खऱ्या मतांची कायमची पायमल्ली कोणीहि करूं देतां कामा नये. पुढील सालीं या उत्सवाचे प्रसंगीं पुण्यांतील निरनिराळ्या पक्षांची अधिक एकी झालेली दृष्टीस पडेल, अशी आशा करून प्रो. जिनसीवाल्यांनीं आपलें भाषण संपविलें.

× × × ×

प्रो. जिनसीवाले यांचें भाषण झाल्यावर अध्यक्ष रा. टिळक यांनीं आपल्या भाषणास सुरवात केली. अफझुलखानाच्या वधासंबंधानें ऐतिहासिक नवीन

माहिती शोधून काढण्याची आवश्यकता नाहीं. अफझुलखानाला शिवाजीनें पूर्वी बेत करून मारिला, असेंच आपण गृहीत धरून चालूं या. महाराजांची ही कृति चांगली कीं वाईट? या प्रश्नाचा जो विचार करावयाचा तो पिनल कोडचे दृष्टीनेंहि करावयाचा नाहीं, मनू किंवा याज्ञवल्क्य यांच्या स्मृतींच्या दृष्टीनेंहि करावयाचा नाहीं. समाजनियमनासंबंधाचे कायदे आम्हां तुम्हां साधारण मानवांसंबंधाचे आहेत. ऋषींचें कूळ शोधण्याचे नादीं कोणीहि लागत नाहीं किंवा राजाच्या अंगीं अपराध चिकटविण्याचा कोणीहि प्रयत्न करीत नाहीं. थोर विभूति सामान्य शास्त्रतत्त्वांच्या वर आहेत, ज्या जागीं थोर पुरुष असतात त्या जागेपर्यंत या तत्त्वांची दृष्टि पोहोंचत नाहीं. अफझुलखानाला मारण्यांत शिवाजीनें पातक केलें किंवा कसें? या प्रश्नाचें उत्तर महाभारतांतच आहे. प्रत्यक्ष आपल्या गुरूस, आपल्या बांधवांस मारण्याचा श्रीमत् कृष्णांनीं गीतेंत उपदेश केला आहे. फळाची इच्छा न ठेवितां कर्म आचरत असतां कोणचाहि दोष नाहीं, श्रीशिवाजीमहाराजांनीं स्वतःचें टीचभर पोट जाळण्याकरितां कांहीं केलें नाहीं. सात्त्विक बुद्धीनें परोपकारार्थ त्यांनीं अफझुलखानाचा वध केला. आपल्या घरांत चोर जर शिरले आणि त्यांना बाहेर हांकलून लावण्यास आमच्या मनगटांत जर शक्ति नसली तर त्यांना खुशाल कोंडून घालून उभें जाळावें. म्लेच्छांना हिंदुस्थानच्या राज्याचें ताम्रपत्र परमेश्वरानें दिलेलें नाहीं. आपल्या जन्मभूमींतून त्यांना हाकून लावण्याचा महाराजांनीं उद्योग केला, त्यांत पराभिलाषाचें पाप नाहीं. विहिरींतील बेडकाप्रमाणें आपली दृष्टि आकुंचित करूं नका; पिनल कोडांतून बाहेर पडून श्रीमद्भगवद्गीतेंतील अत्यंत उंच वातावरणांत शिरून थोर पुरुषांच्या कृतीचा विचार करा. मूळ विषयासंबंधानें इतकें भाषण झाल्यावर प्रो. भानू यांच्या उपसंहारासंबंधानें रा. टिळक असें म्हणाले कीं, ज्या राष्ट्राला कोणत्या प्रसंगीं तरी एक होतां येत नाहीं, त्या राष्ट्रानें अजिंक्यदशेस

चढण्याची आशाच करूं नये. धार्मिक व सामाजिक बाबींसंबंधानें आमरण तंटे असावयाचेच, पण तीनशें पासष्ट दिवसांत एक दिवस एका गोष्टीसंबंधानें तरी एकी होणें अत्यंत इष्ट आहे. शिवाजीसंबंधानें एक व्हावयाचें म्हणजे आपलीं इतर मतें अजिबात विसरून जावयाचें असें नव्हे. इतर दिवस तंटयाकरितां आहेतच. शंकराची आराधना करण्याचे प्रसंगीं राम रावणास एका देवळांत जमण्यास कोणचीच अडचण वाटत नव्हती, हें विसरतां कामा नये. व्याख्यानानंतर सन्मित्र समाज व महाराष्ट्र मेळा यांचीं पदें झाल्यावर दुसरा दिवस समाप्त झाला.

× × × ×

तिसऱ्या दिवशीं प्रो. जिनसीवाले ह्यांचें माहितीनें ओतप्रोत भरलेलें फारच मोठें व्याख्यान झालें. प्रो. जिनसीवाले यांचे व्याख्यानाचा थोडक्या जागीं समावेश करणें शक्यच नसल्यामुळें त्यांच्या व्याख्यानाचें सारांशहि आज देतां येत नाहीं. ह. भ. प. घमंडे ह्यांचें कीर्तन सुश्राव्य व्हावयाचें त्याप्रमाणें तें झालें हें सांगण्यास आम्हांस आनंद वाटतो. अफझुलखानाचा वध हेंच आख्यान त्यांनीं लाविलें होतें. ते जुन्या पद्धतीवर असून शिवाय त्यांत बोवांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें नवे विचार पूर्ण भरले होते.

# * प्रजापक्षाची सांप्रतची स्थिति

केसरीवरील खटल्यासंबंधानें महाराणी सरकारकडे अपील करण्याकरतां हायकोर्टाची परवानगी गेल्या शुक्रवारीं मागण्यांत आली व हायकोर्टानें ती परवानगी देण्याचें नाकबूल केलें. यासंबंधाची सविस्तर हकीकत दुसरीकडे छापिली आहे. न्या. स्ट्रॅचीसाहेब यांनीं "अप्रीती" शब्दाचा भलताच अर्थ केल्यामुळें ज्यूरींचीं मनें कलुषित झालीं व लेखकाचे मनांतील हेतु धुंडाळून काढितांना पुराव्यांत दाखल न केलेल्या अवांतर गोष्टींचें साहाय्य घेण्याचा प्रघात स्ट्रॅचीसाहेबांनीं घातल्यामुळें रँडसाहेबाच्या खुनामुळें सतावलेली युरोपियन ज्यूरी आरोपीस दोषी ठरवण्यास प्रवृत्त झाली, वगैरे मुद्यांसंबंधानें हायकोर्टाचा अखेरचा ठराव आतां झाला. १२४ अ या कलमांतील 'अप्रीति' या शब्दाच्या अर्थाचा खुलासा त्याच कलमांतील 'स्पष्टीकरणांत' केलेला नसून, 'अप्रीति' या शब्दाचा अर्थ नेहमींच्या कोशांतूनच शोधून काढावयाचा असेंच मुंबईस सरशेवटचें ठरलें. प्रेम नव्हे त्या सर्वांचा 'अप्रीति' या शब्दाच्या अर्थांत समावेश करावयाचा असें स्ट्रॅचीसाहेबांनीं आपलें मत स्पष्ट सांगितलें होतें. केसरीवरील खटला ज्यूरीस समजावून सांगतांना 'अप्रीति' शब्दाची वरीलप्रमाणें स्ट्रॅचीसाहेबांनीं व्याख्या केली असें वरवर पहाणाऱ्यास वाटतें खरें, पण सर्व संदर्भ लक्षांत घेणाऱ्यास वरील तऱ्हेची व्याख्या स्ट्रॅचीसाहेबांचे भाषणांत सांपडणार नाहीं, असें चीफ जस्टिससाहेबांचें मत आहे. 'अप्रीति' म्हणजे प्रेमाचा अभाव, हे शब्द स्ट्रॅचीसाहेबांचे भाषणांत आहेत खरे; पण 'अप्रीति' म्हणजे प्रेमाच्याविरुद्ध असलेल्या सर्व मनोवृत्ती असेंहि स्ट्रॅचीसाहेबांचे भाषणांत नमूद केलेलें आहे. हें दुसरें वाक्य

---

* केसरी, ता. २८ सप्टेंबर १८९७.

उच्चारतांना 'अप्रीति' शब्दाचा खरा अर्थ ज्यूरीस सांगण्याचा स्ट्रॅचीसाहेबांचा हेतु होता; व ज्यूरीनेंहि पहिल्या वाक्याकडे डोळेझांक करून दुसऱ्या वाक्यावर सर्व नजर लावलेली असली पाहिजे असें चीफ जस्टिससाहेबांना वाटतें. ' अप्रीति ' म्हणजे प्रेमाचा अभाव, या अर्थावर स्ट्रॅचीसाहेबांनीं लावलेल्या पाल्हाळामुळें ज्यूरीचे मनावर कांहींहि परिणाम झाला नसेल असें मानण्यास काय आधार आहे, हें कसें तें आम्हांस समजत नाहीं. चीफ जस्टिससाहेबांनीं केलेल्या विवेचनानें स्ट्रॅचीसाहेबांच्या राजद्रोहाच्या व्याख्येंत जरासा फेरफार झाला. परंतु १२४ अ या कलमाचा अर्थ जसा करावयास पाहिजे तसा त्यांनीं केलेला नाहीं; हें उघड आहे. १२४ अ या कलमांतील 'स्पष्टीकरण' खुलासादाखल नसून अपवादात्मक आहे, व या कलमांतील मुख्य भागाचा व ' स्पष्टीकरणाचा ' परस्पर विशेष संबंध नाहीं असेंच मुंबई हायकोर्टांतील त्रिमूर्तींचें ऐक्यमत झालें. ' अप्रीति ' या शब्दाचा अर्थ प्रेमाचा अभाव, असा केला काय, किंवा ' प्रेमाविरुद्ध सर्व मनोवृत्ति ' असा केला काय, दोन्हीं अर्थांचा प्रजापक्षावर बहुतेक सारखाच परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. पहिल्या अर्थापेक्षां दुसरा अर्थ प्रजापक्षास अधिक हितावह आहे हें खरें; तथापि कोणतीहि व्याख्या घेतली तरी ' अप्रीतीचा ' निश्चयात्मक अर्थबोध होत नाहीं. ' अप्रीति ' शब्दाचा अर्थ " प्रेमाविरुद्ध सर्व मनोवृत्ति " असा ठरला खरा, पण " प्रेमाविरुद्ध सर्व मनोवृत्ती " याचा मुक्रर अर्थ कोठें ठरला आहे? स्ट्रॅचीसाहेबांची व्याख्या घ्या, प्रत्येक व्याख्येचा उपयोग नेहमींच्या व्यवहारांत ' अप्रीती ' शब्दाचा अर्थ साधारणपणें समजण्यापलिकडे कांहींहि नाहीं. " प्रेमाविरुद्ध मनोवृत्ति " या शब्दांचा अर्थ ऑस्टन साहेबांसारखे जज्ज अद्वातद्वा करूं शकतील व ' अप्रीति ' या शब्दाचा अर्थ स्पष्ट व मुक्रर न ठरल्यामुळें व्याख्यात्याचें व लेखकाचें जीवित जज्ज साहेबांच्या मर्जीवर अवलंबून राहणार हें उघड आहे. सरहद्दीवर निष्कारण

लढाई माजवल्यामुळें हिंदुस्थानच्या गरीब जनतेस भयंकर करांचें ओझ सोसावें लागत आहे व त्यामुळें हिंदुस्थान देश अधिकाधिक खंगावत चालला आहे, हें वाक्य वाचल्यामुळें वाचकांच्या मनांत येणारा विचार 'प्रेमाचे विरुद्ध' आहे किंवा कसें हें ओळखण्याचें साधन काय आहे ?

जज्जसाहेबांनीं म्हटलें अमुक मजकूर 'प्रेमा' विरुद्ध मनोवृत्ति उत्पन्न करणारा आहे कीं, ठरला तो लेख राजद्रोही; वरें, हा लेख 'प्रेमाविरुद्ध मनोवृत्ति' उत्पन्न करणारा नाहीं, अशी जज्जसाहेबांची लहर लागली कीं ठरला लेख राजनिष्ठ. कोणतेंहि भाषण किंवा लेख राजद्रोही आहे किंवा कसें हें मुक्रर ठरविण्यास निश्चयात्मक साधन नसल्यामुळें सर्व गोष्टी जज्जावर अवलंबून राहाणार. १८७० सालीं १२४ अ हें कलम स्पष्टीकरणासह अभिप्रायार्थ निरनिराळ्या कायदेपंडितांकडे दाखविण्यांत आलें होतें. 'अप्रीति' या शब्दाचा अर्थ स्पष्ट व मुक्रर ठरविलेला नसल्यानें मुद्रणस्वातंत्र्यावर पाहिजे त्यावेळीं जज्जास गदा आणितां येईल, म्हणून हा कायदा पास करूं नये, अशी सूचना कांहीं प्रख्यात गृहस्थांनीं त्यावेळीं केली होती. १८७० सालीं १२४ अ या कलमास वरील प्रकारचा आक्षेप आणणाऱ्या मंडळींत चीफ जस्टिस सर लॉरेन्स पील, मद्रासचे ॲडव्होकेट जनरल मि. जी. नॉर्टन, कायद्यासंबंधाचे कायमचे सल्लामसलतगार जे. कॉन्क्रेन वगैरे मोठमोठे कायदेपंडित होते. 'अप्रीति' या शब्दाचा अर्थ कायद्यानेंच मुक्रर केलेला नाहीं असें स्ट्रॅचीसाहेबाप्रमाणेंच वरील गृहस्थांना वाटलें होतें. वरील तक्रारीस त्यावेळच्या लॉ कमिशनरांनीं असें उत्तर दिलें कीं, 'स्पष्टीकरणांत' 'अप्रीतीचा' अर्थ बऱ्याच अंशानें मुक्रर ठरविलेला आहे, तेव्हां जज्जसाहेबांचें लहरीवर मुद्रणस्वातंत्र्य अवलंबून राहील अशी भीति बाळगावयास नको. १२४ अ या कलमांतील 'स्पष्टीकरण' खुलाशादाखल असून अपवादादाखल नाहीं, व त्या 'स्पष्टीकरणांत' 'अप्रीति' या शब्दाची व्याख्या केलेली आहे अशा झोकाचें मत मि.

स्टीफन यानेंहि व्यक्त केलेलें आहे. सरकारच्या कायद्यानें स्थापिलेल्या सत्तेची उलथापालथ करण्यास वाचक प्रवृत्त होण्यासारखे किंवा कायदेशीर अंमलाचा प्रतिकार मनगटाच्या जोरानें करण्यास वाचक प्रवृत्त होण्यासारखे लेख राजद्रोही म्हणावयाचे; मि. स्टीफन यांच्या या व्याख्येस चीफ जस्टिस आदिकरून हायकोर्टांतील त्रिमूर्तींची संमति नाहीं. १२४ अ या कलमाचे ‘ स्पष्टीकरणांत ‘ अप्रीतीचा ’ अर्थ नसून ‘ अप्रीतीचा ’ अर्थ निरनिराळ्या जज्जांनीं निरनिराळ्या वेळीं पाहिजे तसा करावा व लेखकाच्या मनांतील हेतु मुक्रर ठरविण्यासाठीं पुराव्याबाहेरील हव्या तितक्या गोष्टींचें हवें तितकें साहाय्य घ्यावें असा मुंबई हायकोर्टाचा अखेरचा ठराव झालेला आहे. स्ट्रॅचीसाहेबांनीं राजद्रोहाची जी नवीन व्याख्या केली ती हायकोर्टाचे फुलबेंचनें बहुतेकांशीं कायमच केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. याप्रमाणें राजद्रोहाची नवीन, भयंकर, व वेळोवेळीं पालटणारी व्याख्या झाल्यामुळें प्रजापक्षावर सांप्रत भयंकर प्रसंग गुदरला आहे. या नवीन व्याख्येमुळें रा. टिळक यांना कारागृहवास सोसावा लागला इतकेंच नव्हे; तर ज्या तत्त्वामुळें प्रजापक्ष अस्तित्वांत आला, ज्यामुळें राष्ट्रीयसभा भरवून निरनिराळ्या दर्जाच्या लोकांच्या मनांत टोंचून राहणारीं दुःखें इंग्रज सरकारपुढें बोलून दाखविणें शक्य झालें, ज्या तत्त्वामुळें निरनिराळ्या राजकीय चळवळी करून हिंदुस्थानांत लोकमत तयार करूं अशी उमेद पुढाऱ्यांस धरितां आली, त्या तत्त्वावर स्ट्रॅचीसाहेबांच्या भाषणामुळें काळेकुट्ट डांबर फासलें गेलें असें आम्हांस वाटतें. १८५७ च्या जाहीरनाम्यानें महाराणी सरकारनें जे हक्क आम्हांस दिले “ त्या हक्कांची पायमल्ली सरकार करीत आहे ” असें म्हणण्याचीहि आतां वेळ उरली नाहीं. सरकारविरुद्ध तक्रार करण्याचा जो अधिकार महाराणी सरकारच्या प्रत्येक प्रजाजनास आहे तो अधिकार मुंबई इलाख्यांतील लोकांस लोकमत जागृत करून सांप्रतच्या राज्यव्यवस्थेंत इष्ट

नगर वाचनालय, सातारा.



फेरफार घडवून आणण्याचा जर आम्हांस नाहीं, तर ताटाखालच्या मांजराइतकीच आमच्या पुढाऱ्यांची निकृष्ट दशा होणार नाहीं काय ? कायदे कौन्सिलांत लोकनियुक्त सभासद असावेत, असा पार्लमेंटनें जो कायदा पास केला, तो कायदा हिंदुस्थान सरकारच्या त्यावेळच्या राज्यव्यवस्थेच्या तत्त्वाविरुद्ध लोकमत राष्ट्रीय सभेनें जागृत केलें म्हणूनच पसार करण्यांत आला नाहीं काय ?

वरिष्ठ प्रकारच्या अधिक जागा नेटिव्हांस मिळाल्या पहिजेत या स्तुत्य हेतूनें हिंदुस्थान सरकारविरुद्ध तक्रार करणाऱ्या महात्म्यानें हिंदुस्थानांत एक प्रकारचें लोकमत जागृत केलें म्हणूनच एकाच वेळीं हिंदुस्थानांत व इंग्लंडांत सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा व्हावी असा पार्लमेण्टनें ठराव पसार केला नाहीं काय ? हिंदुस्थान सरकारच्या उधळपट्टीमुळें प्रजा कंगाल होत आहे अशी सरकारविरूद्ध राष्ट्रीय सभेनें ओरड केल्यानेंच पार्लमेंटनें रॉयल कमिशन नेमलें नाहीं काय ? प्रजापक्षाची कोणतीहि चळवळ घ्या, त्यांत दोन प्रकारच्या तक्रारी असतात. कांहीं तक्रारी राज्यव्यवस्थेंत सरकारनें मान्य केलेल्या तत्त्वांविरुद्ध असतात व कांहीं तक्रारी सरकारच्या विवक्षित कृत्यांविरुद्ध असतात. सरकारच्या कृत्यांविरुद्ध तक्रारींचें स्वरूपहि बऱ्याच अंशीं राज्यव्यवस्थेंतील तत्त्वांविरुद्धच असतें. अधिकारारूढ असलेल्या पक्षाविरुद्ध म्हणजे त्यावेळच्या सरकारविरुद्ध तक्रार करणारा ज्याप्रमाणें इंग्लंडांत एक पक्ष असतो त्याप्रमाणें हिंदुस्थानांतहि अधिकारी वर्गाविरुद्ध प्रजापक्ष असणें अत्यंत जरुरीचें आहे. इंग्लंडांतील विरुद्ध पक्ष अधिकारी वर्गास हांकून लावून आपल्या हातांत अधिकार घेतो; त्याप्रमाणें हिंदुस्थानांत घडवून आणणें इष्ट नाहीं, हें प्रजापक्षास पूर्ण माहीत आहे. तथापि आपल्या हातांत पूर्ण अधिकार घ्यावा अशी चळवळ करणाऱ्यांची इच्छा आहे असें ऑस्टनसाहेबांसारखे जज्ज पर्यायानें म्हणूं लागले आहेत. इंग्लंडांतील विरुद्ध

पक्षाची उपमा राष्ट्रीय सभेस देण्यांत येते, याचें कारण राष्ट्रीय सभा अधिकारी वर्गाविरुद्ध प्रजेच्या गाऱ्हाण्यां सरकारचे कानांवर घालते एवढेंच असून त्या पलीकडे कांहींहि नाहीं, हें कित्येक युरोपियन न्यायाधीशांस समजेनासें झालें आहे. न्यायाधीशांचीं मतें आपल्याविरुद्ध कलुषित व्हावीत हें आमचें दुर्दैव समजलें पाहिजे. राजकीय चळवळीविरुद्ध न्यायाधीशांच्या मनांत कुजक्यानासक्या कल्पना शिरलेल्या, 'अप्रीति' शब्दाच्या अर्थाची ओढाताण करण्याचा अधिकार असल्या न्यायाधीशांस मिळालेला, न्यायाधीशांच्या मनांतील विचार सिद्ध गोष्टीदाखल वापरण्याची पूर्ण मुभा, अशा स्थितींत राजकीय चळवळींत पडणें म्हणजे आपण होऊन आपल्या पायांत बिड्या ठोकून घेणें आहे. प्रत्येक बाणेदार वर्तमानपत्रकारास कारागृहवास सोसावा लागेलच असें आमचें म्हणणें नाहीं. सरकार एकाद दुसऱ्यासच तुरुंगांत धाडण्याचा उद्योग करील. पण पाहिजे त्यास कायद्याचे तावडींत पकडण्याचा सरकारास अधिकार रिझ्लीसाहेबांनीं दिला आहे हें विसरतां कामा नाहीं. राष्ट्रीय सभेच्या सर्व सभासदांची रवानगी अंदमानाकडे करण्यांत येईल असें जरी नसलें, तरी या सभासदांपैकीं पाहिजे त्यांच्यावर फिर्याद लादण्याइतका राजद्रोहाचा कायदा रिझ्ली साहेबांनीं फिरविला आहे. राष्ट्रीय सभा, प्रांतिक सभा, यांच्यावर भयंकर प्रसंग गुदरला आहे, असें सांगितल्यानंतर किरकोळ चळवळी करण्याची स्थिति सांप्रत कशा प्रकारची झालेली आहे, हें सांगण्याची जरुरी नाहीं. गोरक्षणाचे पुढाऱ्यांचे कपाळीं कारागृहवास भोगावा लागेल, देशी कपडा वापरा म्हणणारांना साडेतीन वस्त्रांचा पोषाख करून लबाडी चोरी करणारांबरोबर काबाडकष्ट करावे लागतील, श्रीगणपती महोत्सवाचे वेळीं व्याख्यानें देणाऱ्यांना समाजांतील अति नीच बदमाषांच्या पंक्तीस बसून जाड्याभरड्या भाकरीचा तुकडा मोडण्याचा प्रसंग येईल, श्रीशिवाजी महाराजांची कीर्ति चोहोंकडे पसरावी म्हणून खटपट

नगर वाचनालय १६३ ता.

करणाऱ्यांपैकीं एकाला आज वरील सर्व यातना सोसाव्या लागत आहेतच—वर्क शिकविणाऱ्या प्रोफेसरला फरासखान्यांतील केव्हां बोलावणें येईल याचा नेम नाहीं; हॅमडन, वाशिंग्टन, क्रॉमवेल, नेपोलियन, शिवाजी, बाजीराव, माधवराव—यांचीं चरित्रें सरस भाषेनें लिहिणाऱ्या इतिहासकारांना १२४ अ या कलमाखालीं केव्हां पकडण्यांत येईल या धास्तींत दिवस कंठले पाहिजेत; स्वराज्याचा उपभोग घेणाऱ्या लोकांच्या सुखाचें वर्णन करणाऱ्या कवीनें पोलिस भेटावयास आला असतां भीतीनें गांगरून गेलें पाहिजे; शिवाजीच्या वेळचें नाटक करणाऱ्या मण्डळीनें आपला धंदा सोडून देण्याची तयारी केली पाहिजे; स्कॉटप्रमाणें ऐतिहासिक कादंबऱ्या लिहून राष्ट्रीयत्वाची ज्योत महाराष्ट्रीयांच्या मनांत पेटवूं इच्छिणाऱ्या कादंबरीकारानें पुन्हां सामाजिक विषयांकडे वळण्यापूर्वींच डोंगरीची वाट धरण्यास तयार असलें पाहिजे. आमच्या कवितेंत, आमच्या नाटकांत, आमच्या कादंबऱ्यांत, आमच्या ऐतिहासिक पुस्तकांत, आमच्या वर्तमानपत्रांत—कोठेंहि उच्च विचार किंवा उदात्त मनोविकार असतां कामा नये, कारण परसत्तेखालीं उच्च विचार व उदात्त मनोविकार यांचाहि फैलाव प्रसंगविशेषीं राजद्रोही होऊं शकतो—असें स्ट्रॅचीसाहेब यांचें मत आहे. मुंबईच्या हायकोर्टानें १२४ अ या कलमाचा जो विचित्र अर्थ केला त्यामुळें प्रजापक्षाची कशी दैना झाली आहे हें वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत येईल. प्रजापक्षाच्या पुढाऱ्यांनीं अशा प्रसंगीं कसें वागलें पाहिजे याचा विचार सवडीनुसार करण्याचें योजिलें आहे.

———

# * प्रजापक्षानें अधिक जोरानेंच पुढें पाऊल टाकलें पाहिजे

प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः
प्रारभ्य विघ्नविहिता विरमंति मध्याः ।
विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः
प्रारब्धमुत्तजना न परित्यजन्ति ॥

—भर्तृहरि

'अप्रीति' या शब्दाचा अर्थ हायकोर्टानें मुक्रर न ठरविल्यानें व लेखकाचे मनांतील हेतु ओळखण्याकरतां पुराव्याबहिरील अवांतर गोष्टींचें साह्यय घेण्याची मनाई हायकोर्टानें न केल्यामुळें प्रजापक्षाची सांप्रतची स्थिति कशा प्रकारची झाली आहे याचें वर्णन गेल्या खेपेस आम्ही केलेंच आहे. केसरीवरील खटल्यामुळें राजद्रोहाच्या व्याख्येचाहि खुलासा झाला नाहीं, किंवा ज्या लेखांवरून फिर्याद लावण्यांत आली तशा प्रकारचें लेख राजद्रोहीच असतात, असेंहि ठरलें नाहीं. कायद्यानें घातलेली मर्यादा स्पष्ट असली म्हणजे त्या मर्यादेचा अतिक्रम न होऊं देण्याची खबरदारी लेखकास घेतां येते, किंवा कायद्याचा जरी उघड उघड अर्थ करतां येत नसला तरी राजद्रोही लेखाचा नमुना लेखकाचे पुढें असल्यास नमुन्यावर लक्ष ठेवून लेखकास आपली लेखणी चालवितां येते. परंतु कोठपर्यंत धांव मारण्यास कायद्याची परवानगी आहे, हें समजण्यास केसरीवरील खटला विशेष उपयोगी पडेल, असें आम्हांस वाटत नाहीं. केसरीवरील खटल्याचा

* केसरी, ता. ५ आक्टोबर १८९७

निकाल होण्यापूर्वी १२४'अ या कलमाचा अर्थ बऱ्याच अंशीं मुक्रर ठरलेला होता. ता. १४ सप्टेंबरपूर्वी राजद्रोहाची व्याख्या अमूकच आहे, असें बहुतेक निश्चयात्मक सांगतां येत असे; पण केसरीवरील खटल्याचेवेळीं स्ट्रॅची साहेबांनीं दिलेलें व्याख्यान व चीफ जस्टिस फॅरन ह्यांनीं या व्याख्या-नांतून 'अप्रीति' चा काढलेला अर्थ, यांचा विचार केला असतां राजद्रोहाची निश्चयात्मक व्याख्या आतां कोणासहि करतां यावयाची नाहीं. 'अप्रीति' म्हणजे ' प्रीतीच्या विरुद्ध मनोविकार' एवढेंच कायतें आतां ठरलेलें आहे. 'प्रीतीच्या विरुद्ध मनोविकार ' म्हणजे काय ? असा प्रश्न विचारल्यास स्ट्रॅची साहेबांनाहि घोटाळल्यासारखें होईल. बरें, १५ जूनच्या केसरींतील लेखा-सारखे लेख लिहूं नयेत असें तरी तुम्हांस वाटतें काय ? म्हणून प्रश्न विचार-ल्यास स्ट्रॅची साहेब सांगतील कीं, २२ जून रोजीं पुण्याची जी स्थिति होती तसल्या स्थितींत मात्र १५ जूनच्या केसरींतील लेख राजद्रोही ठरतील. १५ जूनच्या केसरींतील लेख १८९५ सालीं राजद्रोही ठरले नसते, किंवा १८९६ सालींहि त्या लेखांमुळें केसरीकारास अठरा महिने कारागृहवास भोगावा लागला नसता. केसरीवर खटला भरून राजद्रोहाचीहि व्याख्या सरकारनें मुक्रर ठरवून घेतली नाहीं. इतकेंच नव्हे तर आणखीन वर्ष दीड वर्षांनीं १५ जूनचा लेख पुन्हां एखाद्यानें प्रसिद्ध केल्यास त्यास खात्रीनेंच शिक्षा होईल अशा प्रकारचाहि निकाल राजपक्षास मिळाला नाहीं. केसरी-वरील खटल्याचे निकालानें प्रजापक्षास तर वाईट वाटतच आहे. पण राजपक्षासहि वरील मुद्दे डळमळीत राहिल्यामुळें समाधान वाटणें शक्य नाहीं. अशी स्थिति असल्यामुळें प्रजापक्षाप्रमाणें राजपक्षानेंहि हा खटला प्रिव्हि कौन्सिलपुढें गेला पाहिजे, असा हट्ट धरावयास पाहिजे होता. प्रजापक्षाविरुद्ध भलत्या सलत्या कल्पनांना न्यायमंदिरांत यथेच्छ खिदळूं देणारे ॲस्टन साहेबांसारखे जज्ज राजपक्षास नेहमींच मिळतात असें नाहीं. राज्यकारभा-

राचा अवजड गाडा भयंकर प्रसंगांतून हाकून नेत असतांनाहि गाडीवानाला काडीचीहि तसदीक सोसावी लागूं नाहीं म्हणून रस्त्यांतील कायदेशीर अडथळ्याचें निव्वळ दंडेलीनें चूर्ण करणारा स्टॅची सहिबासारखा जवान मर्द राजपक्षास नेहमींच लाभतो, असेंहि नाहीं. इंग्लंडांत राजपक्षाची झालेली सरशी, लिवार्नरसारख्या सेक्रेटरीवर सर्वस्वी अवलंबून रहाणारा स्टेट सेक्रेटरी, प्रजापक्षावर तिलांजलि सोडण्यास सिद्ध झालेले टाइम्स सारखे अँग्लो-इंडियन पत्रकार, माथेफिरू अँग्लो-इंडियनांच्या वरळण्यास बळी पडण्याइतका लेचापेचा गव्हर्नर, राष्ट्रीय सभेचा नायनाट केव्हां करूं म्हणून टपून बसलेल्या स्वार्थसाधूंना हर्षवायु होण्यासारखा वरील योग पूर्वी कधींहि जुळून आला नव्हता. इंग्लंडचे लोक स्वभावतः न्यायप्रिय, दयाळू व उदार अंतःकरणाचे आहेत; तेव्हां इंग्लंडांत प्रजापक्षाची छाप आज नाहीं उद्यां पडल्यावांचून रहाणार नाहीं. लिबरलपक्ष पुरा अधिकारारूढ होऊन हिंदुस्थानाच्या हिताकडे विशेष लक्ष पुरविणारे गृहस्थ स्टेट सेक्रेटरी होतील, व टाइम्ससारख्या क्षुद्र बुद्धीचें सांप्रतचें प्रस्थ अजिबात नष्ट होऊन राष्ट्रीयसभेच्या मागण्या दिल्याच पाहिजेत असें राजपक्षास म्हणावें लागेल. नेटिव्ह वर्तमानपत्रांत खरा राजद्रोह भरलेला आहे असें जर राजपक्षास वाटत असलें तर मग ते मुस्कटदाबीच्या कायद्यास पुन्हां जिवंत करण्याचा उद्योग तरी कां करीत नाहींत ? १२४/अ या कलमाला विद्रूप करून लोकनायकांना भिवविण्यापेक्षां सरळ मार्गानें मुस्कटदाबीचा कायदा पुन्हां अंमलांत आणला असता तर न्यायमंदिराची विटंबना करणारे दिवस पहाण्याचें कोणाच्याहि नशीबीं आलें नसतें. कायदे कौन्सिलच्या यंत्रास भयंकर गति देऊन राष्ट्रीय सभेची वाढ खुंटविण्याच्या नादास राजपक्ष लागला नाहीं. याचें कारण असें आहे कीं, असल्या द्वेषमूलक कायद्यास इंग्लंडचे उदार लोक वर्ष दीड वर्षाहून अधिक वेळ कायद्याच्या पुस्तकांत नांदू द्यावयाचे नाहींत, इतकें समजण्याइतकी टाइम्ससारख्या नेटिव्ह

द्वेष्टयांस अक्कल आहे. रँडसाहेबाच्या खुनाचा फायदा घेऊन सर्व नेटिव्हां-विरुद्ध काढलेल्या भेसूर स्वरानें आकाश पाताळ दणाणून सोडणाऱ्या टाइम्स-सारख्या राजपक्षाच्या लांगूलचालकास न्यूटनशाहींतील घटिका दीड घटिकेच्या साम्राज्यापेक्षां राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांना कायमचे बुचकळयांत पाडण्याइतकी १२४/अ कलमाची मान मुरगळणें अधिक श्रेयस्कर वाटावें यांत कांहीं नवल नाहीं. नवीन कायदा करून राष्ट्रीय सभेची कायमची पिच्छेहाट कर-ण्याचें अवसान राजपक्षांत नाहीं; कारण इंग्लंडच्या लोकांची खात्री करण्या-इतकें सत्याचें पाठबळ त्यांना कोठें आहे? अशा स्थितींत १२४/अ या कलमाची मर्यादा अकुंचित करावी, हाच निर्भय मार्ग आहे, असें राजपक्षास वाटलें व राजपक्षास अनुकूल असा निकाल सांगून स्ट्रॅचीसाहेबांनीं सदरील कलमाचे हातपाय मोडून टाकले. रँडसाहेबांच्या खुनासंबंधानें टाइम्सच्या फाजील लेखामुळें राजकीय चळवळ करणारे पुण्यांतील पुढारी अँग्लो-इंडियनांच्या मेंदूंत खिळून गेले असतां, १२४/अ कलमाच्या योग्य विस्तारास स्ट्रॅचीसारख्या सामान्य पुरुषानें गवसणी घालण्याचा प्रयत्न करावा, व हा प्रयत्न निष्फळ होऊं नये म्हणून स्ट्रॅचीसाहेबांच्या अचळपघळ वक्तृत्वा-कडे मुंबई हायकोर्टानें दुर्लक्ष करावें, या गोष्टी होऊं नयेत तर व्हावें तरी काय? शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव बेकायदेशीर आहे किंवा राजपक्षास हानिकारक आहे अशा अर्थाचें एकहि वाक्य, लॅंबसाहेब, लॅंगसाहेब किंवा स्ट्रॅचीसाहेब यांच्या भाषणांत सांपडत नाहीं. इतकेंच नव्हे तर १५ जूनच्या केसरींतील लेख रँडसाहेबाचा खून झाला नसता तर राजद्रोही ठरले नसते, अशी अर्धवट कबुली स्ट्रॅची साहेबांनीं आपल्या भाषणांत पर्यायानें दिलेली आहे. पुण्यांतील पुढाऱ्यांची राजकीय चळवळ राजपक्षाच्या डोळयांत फार दिवस सलत होती. दुष्काळाचे वेळीं सार्वजनिक सभेनें बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळें टाइम्सकारास हजार नांग्या एके ठिकाणीं मारल्या असतां

होणारी वेदना होऊं लागली होती. वेल्बी कमिशनपुढें पुण्याच्या प्रो. गोखल्यांनीं मिळविलेली वाहवा ऐकून व नेटिव्हांच्या महत्त्वाकांक्षेस दडपणाऱ्या वरवंट्याचें प्रोफेसर मजकुरांनीं रेखाटलेलें हृदयद्रावक चित्र पाहून टाइम्सकाराच्या अंगाचा तर दाह होऊन गेला होता. पण नेटिव्हांचा द्रोह करणाऱ्या टाइम्ससारख्यांचा हात त्यावेळीं वर चढला नव्हता. पुण्यांतील पुढाऱ्यांच्या केसासहि धक्का लागल्याची वार्ता ऐकून उदार अंतःकरणाचे इंग्लंडचे लोक त्यावेळीं क्षणभर देखील स्वस्थ बसले नसते. पण कोणी दुष्टानें रँडसाहेबाचा खून केल्यामुळें राष्ट्रीय सभेस पाण्यांत पहाणाऱ्यांचें फावलें, व तेव्हां पासून इंग्लंडच्या लोकांचीं मनें कलुषित करण्याच्या पापकृत्यांस त्यांनीं प्रारंभ केला. पुण्यांतील पुढाऱ्यांस हतवीर्य करून महाराष्ट्रांत राष्ट्रीय चळवळ करणाऱ्यांना व महाराष्ट्रभर राष्ट्रीयत्वाच्या अत्युच्च कल्पनेचा फैलाव करूं पहाणाऱ्यांना मोवटाहून मोवट व गोगलगाईहून मऊ करून सोडण्याचा पुणेकरांच्या छळवादी अँग्लो-इंडियन पत्रांचा हेतु आहे. पुणेकरांच्या नांवलौकिकांत प्रो. गोखल्यांनीं जर वेल्बी कमिशनपुढें भर घातली नसती तर प्रो. साहेबांस सपशेलच माफी मागण्याचा प्रसंग आला नसता. सार्वजनिक सभा, श्री गणपति उत्सव, श्रीशिवाजी जन्मोत्सव, वगैरे राजकीय, धार्मिक व ऐतिहासिक चळवळींत जर रा. टिळक पडले नसते, तर १५ जूनचे केसरींतील लेखावरून त्यांच्यावर फिर्याद करावी असा टाइम्सकारांनीं सल्ला दिला नसता, व फिर्याद झाली असती तरी स्ट्रॅचीसाहेबांच्या मेंदूंत आवेशाचा एवढा पूर आला नसता. रा. टिळक यांना अठरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झालेली ऐकून वाटलेल्या आनंदाचे भरांत टाइम्सकारानें कुजक्या बुद्धीनें महाराष्ट्रीयांस जो उपदेश केला आहे त्याचें मनन केलें असतां पुणेकरांवर संकटें कोसळविणाऱ्यांचा हेतु काय होता, हें कोणासहि समजणारें आहे. महाराणी सरकारनें, पार्लमेंटनें, व निरनि-

राळ्या व्हाइसरायांनीं निरनिराळ्या प्रसंगीं आम्हां प्रजाजनांस कोणते हक्क दिले आहेत व कोणते हक्क देऊं केले आहेत, इंग्रजी राज्यांत दाद मागण्याचे कायदेशीर मार्ग कोणचे आहेत, कोणची कर्तबगारी पैदा केली असतां इंग्रज खूष होऊन आम्हांस विशेष महत्त्वाचे राजकीय हक्क खैरात करण्यास तयार होतील, वगैरे गोष्टींचें पूर्ण ज्ञान सर्व प्रजाजनांस करून देण्याच्या कामांत शिक्का घालण्याचा टाइम्सकारानें विडा उचललेला दिसतो. मॅकालेसारख्या उदार अंतःकरणाच्या महात्म्यांनीं वाघिणीचें दूध आम्हां प्रजाजनांस पाजिलें. तेव्हां इंग्रजी विद्येनें आम्हांस दिलेल्या राजकीय शिक्षणाचा पसारा सर्व हिंदुस्थानभर जर आम्हीं माजविला नाहीं, आमच्यांतील प्रत्येक इसमास हक्क मिळविण्याच्या कायदेशीर पद्धतीचें ज्ञान करून देऊन मेकॉलेसाहेबांनीं उत्पन्न केलेल्या शार्दूलविक्रीडिताची मौज आमच्या राज्यकर्त्यांस दाखवून त्यांच्या तोंडून धन्यवाद जर आम्ही काढले नाहींत, तर मेकॉलेसारख्या महात्म्यांच्या शिव्याशापास आम्हीं पात्र होऊं, हें कोणीहि विसरूं नये. राष्ट्रीय सभा केवळ सुशिक्षितांची असून सर्व प्रजाजनांचें तिला पाठबळ नाहीं, असा वेडगळपणाचा आरोप छिद्रान्वेषी टाइम्सकार राष्ट्रीय सभेवर करीत असतात; हा आरोप खोटा ठरविण्याचा उद्योग पुण्यांतील पुढारी इतर प्रांतांतील पुढाऱ्यांप्रमाणेंच करीत आहेत. जुलमाचा प्रतिकार कायदेशीर रीतीनें करण्याची इच्छा, आपल्या तक्रारी राजदरबारीं नेऊन दुःखाचें निरसन करून घेण्याची आशा, व अधिक हक्क संपादन करण्याची हांव ह्या गोष्टी सुशिक्षित व अशिक्षित लोकांत सारख्याच नजरेस पडतात. पण या दोन वर्गांत भेद एवढाच आहे कीं, पहिल्या वर्गास इंग्रजी पद्धतीचें धोरण पूर्णपणें माहीत असल्यामुळें आपले खटले राजदरबारांत शिरकविण्याचे कायदेशीर मार्ग कोणचे आहेत हें त्यांस दुसऱ्यानें शिकवावें लागत नाहीं. महाराष्ट्रांतील सर्व प्रजेला दाद मागण्याचे मार्ग टाऊक असते म्हणजे सार्वजनिक सभेला

दुष्काळाचेवेळीं एवढी यातायात करण्याची पंचाईत पडली नसती. राजकीय शिक्षणाचा फैलाव सर्व देशभर होऊं द्या, म्हणजे राष्ट्रीयसभा आज जें काम करीत आहे तेंच काम शिरावर घेण्याचें सामर्थ्य प्रत्येक खेड्यापाड्यास येईल. मग अर्थातच हल्लींच्याप्रमाणें राष्ट्रीय सभेवर खोटेनाटे आरोप करण्यास टाइम्सकारासहि लाज वाटूं लागेल. राष्ट्रीय सभेच्याद्वारें सुशिक्षितच लोक केवळ मागण्या मागत नसून सर्व राष्ट्र राष्ट्रीय सभेसारख्या राजकीय सभांनीं थथथवून गेलें आहे, अशी इंग्लंडच्या लोकांची खात्री करून दिली पाहिजे. राष्ट्रीय सभेचे उद्योग फलद्रूप होत नाहींत ह्याचें कारण असें आहे कीं, प्रजेचीं दुःखें सुशिक्षितांनीं बोलून दाखविलीं असतां इंग्लंडचे लोकांस तीं बरोबर पटत नाहींत. म्हणून प्रजेचीं दुःखें प्रजेनेंच बोलून दाखविलीं पाहिजेत, वकिलानें मध्यें बोलावयाचें कारणच राहूं नये, अशा प्रकारचें राजकीय शिक्षण सर्व राष्ट्रांत देण्याचें काम करण्यास पुढाऱ्यांनीं खऱ्या मनोभावानें प्रारंभ केला पाहिजे. हें काम जबाबदारीचें व जोखमीचें आहे खरें, तथापि हें काम केल्यावांचून, राष्ट्रीयसभेच्या मागण्या सर्व प्रजाजनांच्या हाडांमांसांत भिसळल्या आहेत असें सिद्ध करून दाखविल्यावांचून इंग्लंडांत राष्ट्रीय सभेस योग्य मान कधींहि मिळावयाचा नाहीं. यात्रा, उत्सव, पर्वणी, कोणत्याहि निमित्तानें लोकांचा जमाव जमल्यास तेथें आमचे राष्ट्रीय सभेचे मिशनरी हजर असलेच पाहिजेत. प्रत्येक गावांत, प्रत्येक खेड्यांत, प्रत्येक झोंपडींत आमचे पुढारी किंवा आमच्या पुढाऱ्यांचे चेले दृष्टीस पडले पाहिजेत. प्रजेला दुःख होत असतें, पण दुःखाचें कारण समजत नाहीं, दुःखाचें निवारण करण्याचे मार्ग कळत नाहींत, कोणत्या मार्गानें दुःखें बोलून दाखविलीं असतां आमच्या राज्यकर्त्यांच्या मनावर इष्ट परिणाम होईल, कोणाचे हातांत अर्जी दिली असतां समाधानकारक निकाल मिळेल, सर्वांनीं एके ठिकाणीं जमून केलेल्या तक्रारींत उदार अंतःकरणाचे इंग्रजांस कोणची दिव्य शक्ति दृष्टीस पडते,

नगर वाचनालय, सातारा.



नगर वाचनालय

हे सर्व खुलासेवार रयतेस समजल्याशिवाय प्रजापक्षाचें पाऊल कधींहि पुढें पडणार नाहीं. रयतेस राजकीय शिक्षण देण्याचे भानगडींत पडणारास स्ट्रेंची साहेबांसारखे न्यायाधीश अठरा महिने सक्त मजुरीची शिक्षा केव्हां देतील, याचा नेम नाहीं, हे खरें आहे. आमच्या दैवदुर्विपाकानें प्रिव्हिकौन्सिलांतहि स्ट्रेंचीसाहेबांची राजद्रोहाची व्याख्या कायम ठरली तर प्रजापक्षास अनुकूल असा नवीन कायदा करण्यास सरकारला सतत विनंति करून स्ट्रेंची साहेबांची व्याख्या सरकारकडून हाणून पाडण्याचे अविश्रांत श्रम करण्यास आम्हीं तयार असलें पाहिजे. स्ट्रेंचीसाहेबांची व्याख्या बदलेतों निदान सरकारचे कृत्यांवर तरी टीका करण्याची आम्हांस सवलत आहे व अप्रीतीचा अर्थ मुक्रर ठरलेला नाहीं, हें नीट ध्यानांत धरून आम्हीं आमचें नेहमींचें काम अधिक नेटानें करण्यास झटलें पाहिजे. सरकारचे विरुद्ध मनोविकार उत्पन्न करण्याची आपली खटपट नाहीं असें मनोदेवता आम्हांस सांगत असल्यावर, कायदेशीर हक्कांकरितां कायदेशीर पद्धतीनें आम्हीं भांडत आहों अशी स्वतःची खात्री असल्यावर, मग राजकीय शिक्षणाचा फैलाव करण्याचें काम झपाट्यानें करण्यास कशाचीहि भीति नाहीं. १२४ अ या कलमाचा अर्थ हायकोर्टाचे ठरावांत मुक्रर ठरलेला नसल्यामुळें, अंधारांतून चांचपडत जाण्याचें राजकीय चळवळ करणारांचे नशिबी आलें आहे. कर्तव्यापासून पराङ्मुख होऊन जनांत छी थू करून घेण्याची जर तुमची सोय नसेल, तर या अंधार प्रदेशांतून जाण्याच्या योग्य कायद्याच्या ज्ञानाची काठी हातांत धरा, राजकर्त्यांच्या द्रोहास मनाला शिवूंहि देऊं नका, मग अंधारांतील खांचखळग्यांत दुर्दैवानें पडण्याची पाळी आल्यास त्या प्रसंगांतून पार पडून जाण्याचें मानसिक धैर्य खात्रीनें तुमच्या अंगीं येईल. राज्यकारभारांत ढवळाढवळ करणाऱ्यांचे कपाळीं असले सोहाळे विधीनेंच लिहिलेले आहेत, तेव्हां त्यांना भिऊन काय उपयोग ? राष्ट्रीय सभेसारख्या राजकीय चळवळीच्या धंद्यांत पडणाऱ्यांनीं

तुरुंगाबाहेरील आपली स्थिति विकृति समजून कारागृहवासास प्रकृति समजल्यावांचून मनाचें केव्हांहि समाधान व्हावयाचें नाहीं. टाइम्ससारखे नेटिव्ह-द्वेष्टे प्रजापक्षाची राखरांगोळी करण्यास उद्युक्त झाले असतां तोडलेल्या तरूप्रमाणें प्रजापक्ष अधिकच जोरानें पुढें पाऊल टाकीत आहे, असे इंग्लंडच्या प्रत्ययास जर आम्हीं ह्या प्रसंगीं आणून दिलें नाहीं, तर आजपर्यंतच्या सर्व उद्योगावर पाणी ओतल्यासारखें होईल.

# * राष्ट्रीय सभा यशस्वी कशानें होणार

यंदाच्या राष्ट्रीय सभेस आतां दोन आठवडयांचा अवघा अवकाश उरला आहे. उमरावतीच्या राष्ट्रभक्तांची सर्व तयारी झाली असून मद्रास इलाख्यांत व बंगाल्यांत राष्ट्रीय सभेस प्रतिनिधि निवडून देण्याचें काम झपाट्यानें चाललें आहे. डिसेंबर महिना म्हणजे राष्ट्रीयसभेच्या धामधुमीचा महिना असल्यामुळें राष्ट्रीय सभेसंबंधाचें विचार येत्या महिन्यांत आम्हां सर्वांचे मनांत विशेष जोरानें येत असतात. गेल्या तेरा वर्षांत राष्ट्रीय सभेनें कोणची कामगिरी बजावावयास पाहिजे होती ह्याचा विचार करण्यास ह्या महिन्यासारखी योग्य वेळ दुसरी कोणचीच नाहीं. राष्ट्रीयसभेमुळें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांची परस्परांशीं ओळख झाली व एका प्रांतावर संकट ओढवलें असतां इतर प्रांत बंधुत्वाच्या नात्यानें साहाय्य करण्यास धावून येऊं लागले. महाराष्ट्राच्या सांप्रतच्या दुर्दैवाबद्दल मद्रासच्या, व कलकत्त्याच्या लोकांना फार वाईट वाटतें, हें फळ राष्ट्रीयसभेनें उत्पन्न केलेल्या एकोप्याचें आहे. आज तेरा वर्षें राष्ट्रीयसभेनें जर कोणची विशेष महत्त्वाची कामगिरी बजावली असेल तर ती हीच होय. राष्ट्रीयसभेसारख्या राजकीय चळवळीची आम्हांस अत्यंत आवश्यकता आहे, ही गोष्ट सर्व सुशिक्षितांच्या मनांवर पूर्णपणें ठसावयास तेरा वर्षें लागलीं. एकंदरींत ह्या तेरा वर्षांत राजकीय चळवळी कशा चालवाव्यात—ह्याचा पहिला धडा अर्धवट शिकण्यापलीकडे आमचें पाऊल फारसें पुढें गेलें नाहीं. कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद बसूं लागले इत्यादि कांहीं किरकोळ हक्क आम्हांस मिळाले आहेत; तथापि हे हक्क राष्ट्रीयसभेचा साक्षात् प्रभाव असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं.

---

* केसरी, १४ डिसेंबर १८९७

आमच्या सरकारची राष्ट्रीय सभेविषयीं अनास्था, कांहीं अँग्लो-इंडियनांचा राष्ट्रीय सभेविषयीं उद्दामपणाचा तिरस्कार, उदात्त विचारांच्या इंग्रजी मुत्सद्यांनीं राष्ट्रीय सभेची केलेली टाळाटाळी, इत्यादि गोष्टी मनांत आणल्या म्हणजे ह्या तेरा वर्षांत राष्ट्रसभेचें काम ज्या जोरानें व्हावयास पाहिजे होतें, तशा जोरानें झालें नाहीं, असेंच म्हणावें लागतें. आमची बाजू जर सत्याची आहे, आमच्या तक्रारी जर खऱ्या आहेत, आमच्या अर्जांतून नमूद केलेल्या दुःखांमुळें जर प्रजाजनांचा खरोखर हालअपेष्टा होत आहेत, तर राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांच्या चळवळी अर्धवट व कमजोराच्या असल्यामुळेंच आमची दाद लागावी तशी लागत नाहीं असें म्हणावयास नको काय? तेरा वर्षें सतत खटपट केल्यावरहि हिंदुस्थानसरकारचे दरबारांत आम्हांस मज्जाव होण्याचें बंद होत नाहीं, ह्याबद्दल आमची आम्हांस लाज वाटावयास नको काय? आम्हीं ज्याकरितां भांडतों, ज्याकरितां सरकारचे पायावर अर्जांचीं भिंडोळीच्या भिंडोळीं नेऊन ठेवतों, तीं आमचीं गाऱ्हाणीं खरीं आहेत, अशी आमच्या मनाची बालंबाल खात्री असल्यावर, सरकारच्या पायांनीं आमचे अर्ज झिडकारल्यास आमच्या प्रयत्नांत कोठें तरी चूक होत आहे, असें आम्हांस वाटावयास नको काय? तेरा वर्षें राष्ट्रीय सभेची हाकाटी चालली आहे, आणि सरकारास जणूं काय राष्ट्रीयसभेच्या मागण्यांची बातमी देखील नाहीं! झाडांतील नाजूक व दिखाऊ पंख्याच्या वाऱ्यासरशीं ज्याप्रमाणें प्रचंड व विस्तीर्ण वृक्षाचें लहानसें पिकलेलेंहि पान हालत नाहीं, त्याप्रमाणें गेल्या तेरा वर्षांतील आमच्या प्रयत्नामुळें हिंदुस्थान सरकारच्या अवाढव्य मनांत आमच्याविषयीं किंचितहि हालचाल उत्पन्न झालेली दिसत नाहीं. राष्ट्रीय सभेनें स्वतःकरतां आंखून ठेवलेली कामगिरी, व आपल्या प्रयत्नांत यश यावें म्हणून राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांचे चाललेले प्रयत्न, ह्यांची परस्परांशीं तुलना केली असतां स्वतःच्या प्रयत्नांचा

पोंचटपणा पाहून राष्ट्रभक्तांनीं मनच्यामनांत खजील व्हावयास नको काय ? आज तेरा वर्षें संपून गेलीं, आणि राष्ट्रभक्तांनीं एवढ्या अवधींत काय मिळविलें म्हणून विचारलें तर राजकीय चळवळींची कल्पना कांहीं सुशिक्षितांचे मनांत उत्पन्न केली ह्यापलीकडे कांहीं केलें नाहीं असें हिरमुसल्या तोंडानें उत्तर देणें राष्ट्रभक्तांस भाग नाहीं काय ? आज तेरा वर्षांत आम्ही किती मजल चालून आलों असा प्रश्न विचारल्यास आज मूळच्याच ठिकाणीं उभे आहों व गोंधळून जाऊन स्वतःचेच सभोंवतीं गरगरा फिरत आहोंत अशी कबुली राजकीय चळवळ करणारांनीं द्यावयास नको काय ? आमच्या राजकीय चळवळीसंबंधानें उडवाउडवीचीं उत्तरें देऊन राष्ट्रीय सभेची टाळाटाळी करणाऱ्या उदार अन्तःकरणाच्या इंग्रजी मुत्सद्यांनीं राष्ट्रीयसभेच्या मागण्यांस खऱ्या राजकारणाच्या टापूच्या बाहेर ( Beyond the Pale of Practical Politics ) कां हांकलून द्यावें, ह्या प्रश्नाचा राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं आतां विचार करावयास नको काय ? राष्ट्रीय सभेचीं मतें सर्व राष्ट्रांचीं मतें नसून असंतुष्ट सुशिक्षितांचीं केवळ हीं मतें आहेत, राष्ट्रीय सभेवरील ह्या भयंकर आक्षेपाचें निरसन प्रत्यक्ष पुराव्यानें करावयास जोंपर्यंत आम्हीं लागलों नाहीं तोंपर्यंत राष्ट्रीय सभेस हल्लींहून अधिक मान मिळण्याची आशाच नको. सुशिक्षितांना सर्व राष्ट्राचीं दुःखें समजतात; व त्यांनीं राष्ट्राच्या हालअपेष्टा इतक्या आहेत असें सांगितल्यावर सरकारनें प्रजेच्या अडचणी दूर करावयास लागलें पाहिजे, असला कोटिक्रम पुस्तकांत गढलेल्या विद्वानांच्या वादविवादांत चांगला शोभतो; पण राज्यकारभाराचीं सूत्रें प्रत्यक्ष हातांत धरून बसलेल्या मुत्सद्यांच्यापुढें वरील प्रकारचीं कारणें अगदीं फिकीं पडतात. उदाहरणार्थ आपण मिठावरील कर घेऊं. हा अत्यंत अनीतीचा व जुलमाचा आहे, असें आतां सर्व अधिकाऱ्यांचें मत झालें आहे; तत्त्ववेत्ते मिठावर कर नसावा असें म्हणतात, मुत्सद्दी लोक मिठावरील कर नसता

तर वरें असें म्हणतात, अधिकारी वर्ग मिठावरील कर जुलमाचा आहे अशी कबुली देतो, हिंदुस्थानांतील विचारशील लोक राष्ट्रीय सभेच्या द्वारानें तेंच मत प्रसिद्ध करतात, मग मिठावरचा कर नाहींसा कां होत नाहीं ? ह्याचें उत्तर असें आहे कीं, ज्या मुत्सद्यांचे हातीं मिठावरील कर नाहींसा करण्याचें आहे त्या मुत्सद्यांना हा कर जुलमाचा वाटत असला तरी सर्व प्रजाजनांना मनापासून ह्या कराचा तिटकारा आला आहे, अशी त्यांची खात्री होईतों असल्या जुलमांच्या करापासून उत्पन्न झालेल्या पैशानें मूर्खपणाच्या लढाया करणें व स्वकीयांस पगाराची ओझींच्या ओझीं देणें गैरशिस्त आहे, असें त्यांना वाटावयाचें नाहीं. मिठावरील कर कमी करून प्रजाजनांचें सुख वाढविण्यापेक्षां, विशेषसें वाईट न वाटतां जोंपर्यंत प्रजाजन कर देत आहेत तोंपर्यंत प्रजाजनांच्या अर्धवट कुरकुरीकडे दुर्लक्ष करून कराचे पैसे वसूल करून सनदी नोकरांस हुंडणावळीचे पैसे देण्यास व सरहद्दीवरील पर्वतांवर आमचा खजिना ओतण्यास अत्यंत थोर पुरुषांशिवाय दुसरा कोणचाहि इंग्रजी मुत्सद्दी मागें पुढें पाहाणार नाहीं. जेते व जित ह्यांचें हित कांहीं बाबींत एक असतें. इंग्रजांचा व्यावहारिक फायदा आमच्या व्यावहारिक फायद्याच्या विरुद्ध ज्या बाबीसंबंधानें असतो त्या बाबीसंबंधाचा प्रश्न उद्‌-भवला म्हणजे, इंग्रज लोक स्वतःच्या फायद्याची बाब आमच्या फायद्याच्या बाबीहून हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें अधिक महत्वाची आहे, असेंच म्हणणार व त्यांचें घोडें नेहमीं पुढें सरकणार, हें उघड आहे. अशा प्रसंगीं राष्ट्रीय सभेच्या भक्तांनीं आपली बाजू अधिक महत्वाची आहे, असें सिद्ध करून दाखविण्यास तयार असलें पाहिजे. मिठावरील कराच्या साहाय्यानें सर-हद्दीवरील लढाया मारतां येतात, ही गोष्ट जरी खरी असली तरी, सरहद्दीवरील लढाईंत मिळविलेल्या शुष्क कीर्तीपेक्षां मिठावर कर नसल्यापासून होणारें सुख प्रजाजनास अधिक आवडतें. या प्रजाजनांच्या जोराच्या मताप्रमाणें न

नगर वाचनालय, सातारा.



वागणें म्हणजे प्रजाजनांचें प्रेम आपण होऊन कमी करून घेण्यासारखें आहे, असें अधिकारी मंडळाच्या निदर्शनास राष्ट्रभक्तांनीं आणलें पाहिजे. जोराचें लोकमत उत्पन्न झाल्याशिवाय राष्ट्रीय सभेच्या मतांस किंमत यावयाची नाहीं, हें उघड आहे. आपणांस जी बाजू सरळ दिसते, आपणांस जी गोष्ट सरकारच्या व प्रजाजनांच्या हिताची दिसते, ती सूचना अधिकारी वर्गास मान्य करावयास लावण्याकरितां जोराचें लोकमत राष्ट्रभर उत्पन्न करण्याची जबाबदारी राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांवर नाहीं काय ? आपलें मत अधिकारी वर्गास कबूल करावयास लावण्याकरितां इंग्लंड, आयर्लंड, फ्रान्स, इटली, येथील पुढारी लोक ज्याप्रमाणें जोराचें लोकमत उत्पन्न करण्याची खटपट करतात त्याप्रमाणें हिंदुस्थानच्या सुशिक्षितांचेंच केवळ नव्हे तर सर्व प्रजाजनांचें लोकमत उत्पन्न करून, तें पोसून जोराचें करण्याचा प्रयत्न राष्ट्रीय सभेच्या भक्तांनीं कां करूं नये ? आयर्लंडचा ओकोनेल ठिकठिकाणीं खेड्यापाड्यांत व्याख्यानें देऊन, राजकीय हक्क आपणांस मिळावेत अशा प्रकारचे दृढ मनोविकार लोकांत उत्पन्न करून, राजकीय कायदेशीर चळवळीकरितां लाखो लोकांच्या जर जत्रा भरवूं शकतो, व आयर्लंडापासून दूर पळून जाणारी इंग्रजी मुत्सद्यांचीं मनें जर जोरानें आयर्लंडकडे वेधून आणूं शकतो, तर ओकोनेलचें उदाहरण पुढें ठेवून लोकांस राजकीय शिक्षण देण्याचा तडाखा राष्ट्रीय सभेचे भक्त कां सुरू ठेवीत नाहींत ? आयर्लंडसंबंधाच्या महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा सर्व राष्ट्रभर जारीनें सुरूं करण्याकरितां ओकोनेल व त्याचे अनुयायी सर्व राष्ट्रभर फिरत, प्रत्येक खेड्यापाड्यांत, झोंपडींत त्यांचा प्रवेश असे व हरएक ठिकाणीं व्याख्यानें देऊन, लेख लिहून ते लोकमत जागृत करीत. आयर्लंडचा प्रश्न राज्यकारभाराच्या नेहमींच्या टापूंत पार्नेलनें नेऊन टाकिला, ह्यांतील इंगित झालें तरी हेंच आहे. पार्नेलनें स्थापिलेल्या सभेचे सभासद व स्वतः पार्नेल सर्व राष्ट्रभर हिंडत असत, व राष्ट्राच्या पुढें आपला प्रश्न

नेहमीं मांडून जय्यत लोकमताचें साहाय्य ते मिळवीत. कोणत्याही वादाचा प्रश्न उद्भवला म्हणजे इंग्लंडांतील कॉन्झरव्हेटिव्ह व लिबरल पक्ष झाले तरी आपल्या बतीचे जोरदार लोकमत जागृत करण्याचा प्रारंभापासून तों अखेर-पर्यंत प्रयत्न करितात. पार्लमेंटला सुटी झाली कीं दोन्ही पक्ष आपआपलीं मतें लोकांपुढें मांडून जोराचें लोकमत उत्पन्न करण्याच्या उद्योगाला लागलेच म्हणून समजावें. प्रजापक्षाच्या व्याख्यानांचा व सभांचा हंगाम इंग्लंडांत दरवर्षी दोन तीन महिने येतो, तसा हिंदुस्थानांत कां येऊं नये? बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी सारख्यांनीं वर्षांतून दोन तीन महिने राष्ट्रीय सभेची चळवळ करण्याकरितां एखाद्या जिल्हाभर कां फिरूं नये? राष्ट्रीय सभेचे खरे भक्त शेंदोनशें जर निघाले व प्रत्येकानें एक एक प्रांत वांटून घेऊन वर्षांतून दोन तीन महिने जर त्या प्रांतांत राष्ट्रसभेची चळवळ करून जोराचें लोक-मत उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला, तर कांहीं अँग्लो-इंडियनांच्याकडून राष्ट्रीय सभेची हल्लींच्यासारखी मानखंडणा कधींहि होणार नाहीं. आयर्लंड, इंग्लंड, किंवा फ्रान्स ह्या देशांत ज्याप्रमाणें लोकांचे पुढारी पार्लमेंटचें काम करून लोकमत उत्पन्न करण्याकरितां सर्व राष्ट्रभर प्रवास करण्यास तयार असतात त्याप्रमाणें आमच्याहि पुढाऱ्यांनीं दरवर्षी राष्ट्रीय सभेचें काम करून लोकमत जागृत करण्याकरितां राजकीय चळवळीचें काम करण्यास तयार असलें पाहिजे. राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं वरील प्रकारच्या राजकीय चळवळीच्या मोहिमा ( Political Campaigns ) दरवर्षी करून इतर राष्ट्र भक्तांना लोकमत जागृत करण्याचा कित्ता घालून दिला असतां राष्ट्रीय सभेच्या उद्योगास यश येण्याचा संभव आहे.

# * कायदा आणि न्याय

आज लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांना इंग्रजांचे राज्य इतकें प्रिय झालें आहे त्याचें मुख्य कारण हें होय कीं, इंग्रजी राज्यांतील सर्व कारभार कायदेशीर रीतीनें चालत असतो. ह्या राज्यांत कायद्यावांचून इकडचें पान सुद्धां तिकडे हालावयाचें नाहीं. हिंदुस्थानांतील ग. जनरलापासून तों तहत एखाद्या आडगांवच्या अडाणी पाटलापर्यंत सर्व अधिकाऱ्यांचीं कामें कायद्यांत लिहिलें असेल त्याप्रमाणें होत आहेत. फार काय ? कायदा मोडणें झाला तर तोसुद्धां कायद्यानेंच, त्यांत अव्यवस्थितपणा, गैरकायदेशीरपणा किंवा गाफीलपणा कधींहि दिसून यावयाचा नाहीं. पूर्वीच्या आमच्या राज्यांत कायद्याचें एवढें प्रस्थ नव्हतें, त्यामुळें स्वराज्यांत किंवा बादशहाचेवेळीं चोहोंकडे घोटाळा, अंधार, अंदाधुंदी माजून राहिलेलीच असली पाहिजे, असें कायद्यांत गुरफटलेल्या हल्लींच्या कांहीं लोकांना वाटतें. ती सर्व अंदाधुंदी मोडून आपल्या आमदानींत लोकांना सुख व्हावें म्हणून दयाळू इंग्रज सरकारनें कायद्याच्या आधारावर राज्यधोरण चालवण्याचा क्रम सुरू ठेवला. इंग्रज लोकांच्या डोक्यांत त्यांच्या देशांतील परिस्थितीच्या अनुरूप कायद्याचे महत्त्व आधींच अतिशय भिनलेले होते; आणि येथील अव्यवस्था पाहिल्यावर तर कायद्याची आवश्यकता त्यांना अधिकाधिकच भासूं लागली. कधीं कधीं तर ही कायद्याची आवश्यकता इतकी भासूं लागली कीं, त्यासाठीं कांहीं कांहीं गोष्टींचा विपर्यास देखील करणें भाग पडलें. उदा. हिंदुस्थानांत तलवारीच्या जोरावर स्थापित झालेल्या इंग्रजी राज्यालाहि कायद्यानें स्थापित झालेले राज्य असें म्हणण्याची हळूंहळूं वहिवाट पाडणें भाग झालें. आतां वास्तविक पहातां

---

* केसरी, ता. १ फेब्रुवारी १८९८.

इंग्रजांचें राज्य ह्या देशांत कशानें स्थापित झालें आहे हें मराठी चौथी इयत्ता शिकणाऱ्या मुलापासून सर्वांना माहीत आहे. तरी पण तें कायद्यानें स्थापित झालें आहे असें म्हणण्याचा परिपाठ पाडण्याचा प्रयत्न व्हावा हें नवीन कायदेशीर मन्वंतरास शोभणारेंच आहे. हाडांचे तुकडे, मांसाचे गोळे, आणि रक्ताचे प्रवाह हे झांकण्यासाठीं परमेश्वरानें देखील बाहेरून रमणीय व सुंदर अशा त्वचेचा उपयोग आपल्या शरीराच्या रचनेंत केलेला आहे. एका प्राण्याच्या शरीराच्या रचनेला जर बाहेरून रमणीय आणि सुंदर अशा आच्छादनाची जरूरी आहे तर अनेक कोटि प्राण्यांनीं मिळून बनणाऱ्या राष्ट्राच्या शरीरावरील आच्छादन होतां होईल तितकें मनोवेधक करणें हें प्रत्येक राजकारस्थानी पुरुषाचें आणि तें मनोवेधक आहे असे मानणें हे प्रत्येक राजनिष्ठ पुरुषाचें कर्तव्यकर्म आहे. तेव्हां ज्या राज्याची स्थापना कायद्यानें झाली त्याचें पुढचें जीवनहि सर्वस्वीं कायद्यावरच अवलंबून असणें अगदीं साहजिकच आहे. आपला हल्लींचा काळ म्हणजे कायद्याचा बहुतेक कळस झालेला आहे. ज्याप्रमाणें पूर्वी धार्मिक बाबतींत जांभई आली तर त्याबद्दल एक पुराणोक्त मंत्र, त्याप्रमाणेंच हल्लीं राजकीय बाबतींत कोणी जरा कांहीं केलें कीं, कायदा तेथें येऊन उभा राहिलाच. ज्या त्या कामांत आपला कायदा आहेच. हे कायदे इतके झाले आहेत कीं, त्यांचा ह्या देशांतील अशिक्षित आणि मतिमंद लोकांना कंटाळा येऊं लागला आहे. कायद्याचा कंटाळा येणें म्हणजे परमेश्वरविरोधी शब्द आहेत हें खरें. तरीपण अशी गोष्ट होत आहे यांत कांहीं शंका नाहीं. असें कां होतें असा प्रश्न स्वाभाविकपणें उत्पन्न होतो. लोकांना सुख व्हावें म्हणून कायदा, पण त्यापासून तो हेतु सिद्धीस न जातां त्याच्याहून विकृतच परिणाम होऊं लागला तर तो कायदा किंवा ती कायदेशीर पद्धत कोणाला आवडणार आहे? कारण खरी सुखप्राप्ती न्यायापासून आहे, कायद्यापासून नाहीं. जोपर्यंत कायदा न्यायाला अनुसरून

चालू आहे तोंपर्यंत त्यापासून सुख होईल. पण ज्या दिवशीं कायदा आणि न्याय यांची फारकत होईल त्या दिवशीं कायद्याचें वजन पुष्कळांशीं कमी झाल्यावांचून कधींहि रहाणार नाहीं. लोक कायदा मोडीत नाहींत ह्यांतलें बीज असें आहे कीं, न्यायतत्त्वांना अनुसरूनच त्याची रचना केलेली असली पाहिजे अशी लोकांची समजूत असते. ही समजूत हीच कायद्याचा खरा जोर, हीच कायद्याचें संरक्षण करणाऱ्यांची शक्ति, आणि हेंच कायद्यानें स्थापित झालेल्या राज्याचें बळ. ही समजूत होतां होईल तो दृढ राखण्याचा प्रयत्न राज्यकर्त्यांकडून करण्यांत येत असतो व कायद्याच्या जोखडाखालीं माना वांकवून वांकवून ज्यांच्या डोक्यांतील मेंदू नष्ट होऊन गेलेला असतो अशा माणसांकडूनहि राज्यकर्त्यांना या कामांत पुष्कळ मदत करण्यांत येते. सरकारचे जुने कायदे न्यायाला धरून आहेत, तेव्हां नवीन एखादा विवक्षित कायदा न्यायाला धरूनच असला पाहिजे असा समज मनांत स्वाभाविक उत्पन्न होतो. परंतु परिणामीं नुकसान होऊं लागलें म्हणजे डोळे उघडतात. जो कायदा म्हणून समजला जातो तो दिवसा ढवळ्या जुलूम करण्याचा एक मार्ग आहे असें मानलें जातें, आणि जेथें न्यायरूपी देदिप्यमान देवता वसलेली असते तेथें अंधकारापासून दुसरें कांहींच दिसेनासें होतें. जो न्याय असेल त्याप्रमाणें कायदा करावा हें रास्त आहे. परंतु जेथें जेथें कायदा करण्यांत येत असतो तेथें तेथें न्याय असेलच असें नाहीं, ही गोष्ट दृष्टोत्पत्तीस येऊं लागते. अशा प्रकारची लोकांच्या मनाची स्थिति होत जाणें कोणत्याच प्रकारें इष्ट नाहीं. जमिनीच्या उत्पन्नांतून देशांतील राज्यकारभार चालण्यासाठीं कांहीं भाग राजाला दिला पाहिजे हा न्याय होय. परंतु जमिनीचा सारा अधिक जबर असतांना आणखी बराच वाढवणें हा कायदा होय. प्लेगनें दूषित झालेल्या माणसांना क्वारंटाईनमध्यें ठेवावें हा न्याय होय. परंतु बहुत करून नेटिव्ह लोकच क्वारंटाईनमध्यें सांपडतात हा कायद्याचा परिणाम होय.

गुन्हेगाराची चौकशी त्याच्या बरोबरीच्या ज्यूरर लोकांकडून व्हावी हा न्याय होय; आणि मराठी वाक्यांतील राजद्रोहाचा गुन्हा ठरविण्यासाठीं मराठी न जाणणारेही कांहीं ज्यूरर निवडले जातात हा कायदा होय. कलेक्टरचें काम करण्याला चांगले शिकलेले आणि एखादी विवक्षित परीक्षा पास झालेले लोक असावेत हा न्याय आहे. परंतु ती परीक्षा विलायतेंतच झाली पाहिजे हा कायदा होय. जो राजद्रोहात्मक लेख लिहील त्याला शिक्षा व्हावी हा न्याय, परंतु ना. टिळकांसारख्या राजनिष्ठ राष्ट्रभक्तास शिक्षा झाली हा कायदा. कुळानें कर्ज काढलेले रुपये सावकाराला दिले पाहिजेत, हा न्याय. परंतु तीन वर्षांनंतर सावकाराला रु. देऊं शकत नाहीं हा कायदा. कोणावर उघड अपराध शाबीत होत असल्यावांचून त्याला प्रतिबंधांत ठेवूं नये हा न्याय. परंतु नातूंना आज सहा महिने अटकेंत ठेवलें आहे हा कायदा. जो शूर, धीर आणि आपले काम बजावण्याला लायक असेल त्याला लष्करी खात्यांतीलसुद्धां वरच्या प्रतीच्या जागा मिळाव्या हा न्याय. परन्तु नेटिव्ह लोक त्या खात्यांत फार पुढें गेलेले आढळत नाहींत हा कायदा. कायदा कोणीही पास केलेला असो, त्यांत न्यायाचा अंश ज्या मानानें लोकांना कमी कमी दिसत जाईल त्यामानानें त्यांतला कायदेशीरपणाहि नाहींसा होत गेल्यावांचून रहाणार नाहीं. कोणत्याही देशांतील सरकार आणि त्या देशांतील सरकारनें सुशिक्षित केलेले लोक हे असें म्हणतील कीं ते कायदे सर्व लोकांचेतर्फे निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या सभेनें पसंत केलेले आहेत, आणि हें करतांना लोकांची आणि लोकपक्षाच्या लहान मोठ्या सभांची काय मतें आहेत ह्याचा ऊहापोह केलेला आहे. परंतु सामान्य रीतीनें सारासार विचार करून वागणारा जन-समुदाय या भानगडींत पडत नसतो. पांचशें प्रतिनिधींच्या सभेंत दोनशें एकावन मते एका बाजूला झाल्यामुळें पास होणाऱ्या कायद्यासारख्या काय-द्यांची किती किंमत आहे हें तो मनांत समजून असतो. लोकांच्या आचार-

नगर वाचनालय, सातारा



विचारांत, नफा तोट्यांत, देवधेवींत आणि अवश्य लागणाऱ्या आचरण-स्वातंत्र्यांत, जोंपर्यंत फारसा फरक पडत नाहीं तोंपर्यंत साऱ्या रात्रभर जागून किंवा सिमल्याच्या थंडीत कुडकुडत बसून कोणी दररोजचे शंभर कायदे नवीन केले आणि तितकेच मोडून टाकले तर त्यांत ते मुळींच लक्ष घालण्यास प्रवृत्त होणार नाहींत. पण त्यांस अगदींच अक्कल नाहीं असें नाहीं. लोकांनीं निवडलेले प्रतिनिधी, स्थानिक कायदे-कौन्सिलवरची सभा, वाक्, विवाक्, अनुकूल मतें, प्रतिकूल मतें, मताधिक्य इत्यादि योजनांना कोणी फारशी भीक घालतो असें नाहीं. जेव्हां सामान्य जनसमूहाच्या हक्कांना धक्का बसतो तेव्हां हीं सांगितलेली थोतांडें म्हणजे फसविण्याची नाजूक यंत्रें आहेत हे त्यांच्या तेव्हांच लक्षांत येते. एखादे सरकार प्रतिनिधींची एखादी लहानशी सभा भरवून अमुक एक गोष्ट ठरविते. परन्तु त्या लहान सभेच्या बाहेर एक मोठीं सभा असते, तीही विचार करीत असतेच. तिला तुमचे ठराव आणि कायदे पसंत पडले तर ठीक आहे, नाहींतर तुमच्या राज्याचे शिक्का मोर्तबहि त्यावर झालें तरी फुकट. कायद्याच्या नियमांप्रमाणें एखाद्या अप-राधाची चौकशी करण्याकरितां ज्यूरी नेमण्यांत येतें. कोर्टांत बसून ती ज्यूरी खटल्याची हकीकत ऐकत असते. पण हे कोणी विसरतां कामा नये कीं, कोर्टांत बसली आहे तेवढीच ज्यूरी नव्हे, कोर्टाच्या बाहेरहि एक ज्यूरी आहे. कोर्टांतल्या ज्यूरीलाच सर्व समजतें असें नाहीं. किंबहुना बाहेरच्या ज्यूरींतले लोक आंतल्याइतके शिकलेले आणि एकच भाषा जाणणारे नसले तरी एकन्दरींत बाहेरच्या ज्यूरीचेंच मत नेहमीं बरोबर असतें. कोर्टांतील ज्यूरी व कोर्टाच्या बाहेरील ज्यूरी यांचें एकमत झालें तर ठीकच आहे. पण याच्या उलट झालें तर मात्र तें कांहीं चांगलें लक्षण नव्हे. आपण सुशि-क्षित लोक आणि सरकार हा न्यायच झाला असें म्हणूं. पण ते अडाणी लोक कुरकुर करतात. मनांतल्या मनांत धुसपुसतात, आणि असंतुष्टतेची चिन्हें दाखवूं लागतात. हायकोर्ट, प्रिव्हि कौन्सिल हें त्यांना कांहीं समजत

नाहींत. साध्या गोष्टी एकानें दुसऱ्याला कळविण्यासाठीं वकील, सॉलिसिटर, आणि बॅलिस्टर कशाला पाहिजेत असें ते विचारतात. एकादा क्षुल्लक मुद्दा सिद्ध करण्यासाठीं लाखो रुपयांचा चुराडा करूं नये असें त्याचें मत असतें. पण एका दृष्टीनें पाहिलें तर त्यांचें मतहि अगदींच त्याज्य आहे असें नाहीं. कायदा म्हणजे कृत्रिम न्याय. आणि न्याय हा स्वाभाविक कायदा होय. न्याय परमेश्वराच्या घरचा; आणि कायदा मनुष्याच्या पदरचा; न्याय जगाच्या कल्याणासाठीं, आणि कायदा विवक्षित समूहाच्या फायद्यासाठीं; न्याय सर्वांत राहतो आणि कायद्याची फक्त मृत्युलोकची वस्ती. न्यायाला पातक ठाऊक नाहीं; आणि कायदा पुण्य करण्याचा आव घालीत असतो. न्यायाच्या डोळ्याला सत्य तेवढें मात्र दिसतें; परन्तु कायद्याला वर्ण, धर्म, जात इत्यादीहि दिसतात. ह्या जगांत न्यायाचा सगासोयरा इष्टमित्र, नातेवाईक कोणी नाहीं, परंतु कायद्याला आहेत. तेव्हां अशा स्थितींत सामान्य लोकांना कायद्याचें विशेष महत्त्व न वाटलें तर त्यांत मोठें नवल नाहीं. सर्व लोक अंधारांतून चालले आहेत असें पाहून देवानें आणि राजानें मिळून एक कन्दील तयार केला, राजानें चार भिंगे एका ठिकाणीं जुळवून बाहेरचा भाग तयार केला आणि त्यांत देवानें निर्माण केलेला प्रकाश ठेवून दिला. हीं भिंगें म्हणजे कायदा, आणि प्रकाश म्हणजे न्याय. ह्या कंदीलांतला प्रकाश नाहींसा झाला तर मग त्या नुसत्या भिंगांची किंमत काय होणार ? आणि कोणी एकाद्यानें त्याला अत्यंत महत्त्व दिलेंच तरी प्रकाश नष्ट झालेला असल्यामुळें काळोखांत कोठें तरी कशाचा तरी धक्का लागून केव्हां तरी भिंगे फुटल्यावांचून रहात नाहीं. तेव्हां न्याय आणि कायदा यांची सांगड होतां होईल तों तोडूं नये. ज्या दिवशीं तुटेल तो दिवस दुर्दैवाचा होय. इंग्रजी राज्यांतील कायद्यांच्या संबंधानें पाहिलें असतां ही सांगड बहुतेक ठिकाणीं बरीच मजबूत आहे आणि म्हणूनच इंग्रजी राज्य इतकें बळकट आहे.

# * सरहद्दीवरील लष्करी धोरण

सरहद्दीवरील सैन्याचे मुख्य सेनापती लोखार्टसाहेब हल्लीं खैबर घाटांत असून, उन्हाळ्यांतील लढाईची तयारी ते जोरानें करीत आहेत. तथापि गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झालेल्या बातम्यांवरून असें दिसतें कीं, आफ्रिडीज व आरकिडीज लोकांपासून थोडकासा दंड घेऊन पुन्हां लढाईस सुरवात न करतां आमचें सैन्य परत येईल अशा रीतीनें सरहद्दीवरील तंटा मिटण्याचा आज तरी रंग दिसत आहे. तरी ज्या कारणांमुळें ही लढाई जुंपली तीं कारणें अजिबात नाहींशीं होईतों सरहद्दीवर शांतता होण्याचा संभव दिसत नाहीं. सरहद्दीवर नेहमीं तंटेबखेडे उत्पन्न होतात याचीं कारणें दोन आहेत. ( १ ) सिंधु नदीपलीकडील हिंदुस्थान सरकारचे ताब्यांतील प्रदेश व अफगाणिस्तान यांच्या दरम्यान असलेल्या स्वतंत्र डोंगराळ प्रदेशांत रहाणाऱ्या रानटी पठाण जाती नेहमीं सरकारच्या ताब्यांतील प्रदेशांत लुटालूट करतात, ( २ ) मध्य एशियांत प्रचण्ड सेना जमवून हिरातचे रस्त्यानें अफगाणिस्तानांत आकस्मिक उतरून काबूल–गिझनी–कंदाहार हा पट्टा ओलांडून रशिया हिंदुस्थानवर कदाचित् स्वारी करील अशी आमच्या सरकारास भीति वाटते; व या भीतीमुळें रशियाचा मार्ग बंद करण्याकरितां हिंदुस्थान सरकार आपली सरहद्द हिरातचे दिशेनें होता होईलतों वाढवीत आहे; सरहद्दीवरील तंट्याच्या वरील दोन मूळ कारणांपैकीं पहिलें कारण क्षुल्लक असून, दुसरें अत्यंत महत्त्वाचें आहे. व ह्या दुसऱ्याच कारणामुळें आजपर्यंतचें सरहद्दीवरील सर्व युद्धप्रसंग घडून आले. वायव्य दिशेकडून हिंदुस्थानवर स्वारी करण्याची कल्पना प्रथम १८०९ सालीं रशियाचा बादशहा व फ्रान्सचा बादशहा नेपोलियन यांच्या

* केसरी, १ मार्च १८९८.

मनांत आली. परंतु कल्पनेपलीकडे त्यांचे हातून त्यावेळीं कांहीं कृती होण्याचा संभवच नव्हता. रशियाच्या स्वारीच्या भीतीचें वीं, त्यावेळीं जें रुजलें त्याला १८३६ सालीं अंकुर फुटला. पेशवाईचा पूर्ण नाश होऊन सर्व मराठे सरदार इंग्रज सरकारचे कह्यांत जाईतों इंग्रजांचे पाय हिंदुस्थानांत खरे रुतले नसल्यामुळें त्यांना सिंधु नदीपलिकडील राजकारस्थानाकडे लक्ष देण्यास सवडच नव्हती. तेव्हां प्रथम १८३६ सालीं हिंदुस्थान सरकारनें व्यापारधंद्याचे मिषानें अफगाणिस्तानांत बर्नसाहेबाला पाठविलें त्यावेळीं रशियाकडूनहि व्यापाराच्या निमित्तानेंच व्हिकोव्हिच नांवांचा वकील दोस्त महंमदास भेटावयास आला होता. ह्यावेळीं हिरातचे पलीकडे मध्य एशियांत प्रचंड सेना आली आहे अशी बातमी सरकारास लागून रशियाचे स्वारीचे दिवस जवळ येऊन ठेपले अशी त्यावेळच्या मुत्सद्यांची समजूत झाली. अफगाणिस्तानचे त्यावेळचे अमीर दोस्त महंमद ह्यांवर आपलें वर्चस्व बसविल्याशिवाय रशियाशीं झुंजतां यावयाचें नाहीं या हेतूनें बर्नसाहेबांनीं अफगाणिस्थानांत चंचुप्रवेश करण्याचा प्रयत्न केला. परंतु दोस्त महंमदाचे व त्यांचें पटलें नाहीं. या संधीला मध्य एशियांत फिरत असणारी प्रचण्ड सेना अदृश्य झाली असतांहि हिंदुस्थान सरकारनें अफगाणिस्तानवर स्वारी केली व १८४१ सालीं आमच्या सैन्याची अफगाणिस्तानांत कत्तल झाल्यानंतर ती दुःखद वार्ता परत हिंदुस्थानांत कळवावयास सैन्यापैकीं डॉ. ब्रॉयडन या नांवाचा एकच मनुष्य जिवंत राहिला. यानंतर पुढें चाळीस वर्षेपर्यंत सरहद्दीसंबंधानें लॉरेन्ससाहेबांचें मताप्रमाणेंच हिंदुस्थान सरकारचें वर्तन होतें. हिंदुस्थानांतील प्रजेला सुखी ठेऊन व्यापारधंद्याला उत्तेजन देऊन प्रजेचें प्रेम संपादन करून राज्यास बळकटी आणावी व सरहद्दीवरील रानटी जातींनीं त्रास दिला असतां तेवढ्यापुरतें त्यांचें शासन करावें हा लॉरेन्ससाहेबांचें मताचा मथितार्थ होय. भयंकर कराचें ओझें गरीब प्रजेवर

लादून कंगाल प्रजेचे पैसे सरहद्दीवरील डोंगराळ प्रदेशांत ओतल्यानें राज्यास बळकटी न येतां प्रजेचें प्रेम कमी झाल्यामुळें बाहेरच्याप्रमाणें घरांतहि शत्रू उत्पन्न होण्याचा संभव आहे या मताचा अम्मल १८४० पासून १८७८ पर्यंत चालला होता.

१८७६ सालीं हिंदुस्थानचे मुख्य प्रधान डिझरॅलीसाहेब होते. डिझरॅली-साहेबांच्या कारकीर्दींत इंग्लंडचा अंमल चोहोंकडे पसरविण्याचा क्रम एकसारखा चालला होता व यामुळें रशिया व इंग्लंड यांच्यांत केव्हां वितुष्ट उत्पन्न होईल याचा नेम नाहीं असें त्यास वाटत होतें. रशिया व इंग्लंड यांच्यामध्यें युद्धप्रसंग सुरू झाला असतां इंग्लंडाशीं दोन हात करण्यास हिंदुस्थानच्या वायव्येकडील सरहद्दीशिवाय दुसरें कोणतेंहि योग्य स्थळ रशियाला नसल्यामुळें सरहद्दीचा पक्का बंदोबस्त करण्याकडे डिझरॅलीसाहेबांचें लक्ष लागलें. काश्मीर–चित्रळ या उत्तरेकडचे बाजूस हिंदुकुश पर्वताची रांग असल्यामुळें, शिवाय हिंदुकुश पर्वतापलिकडील पामीरसारख्या खडकाळ, जंगली व बिनवस्तीच्या अफाट प्रदेशांतून प्रचंड सेना सर्व सामुग्रीसह आणणें दुरापास्त असल्यामुळें रशियाची सेना हिंदुस्थानकडे यावयास निघाली असतां हिरातच्या मार्गानें प्रथम अफगाणिस्तानांत या सेनेस आलें पाहिजे हें वाचकांच्या ध्यानांत येईल. हिरातच्या बाजूनें येणाऱ्या सेनेची पिछेहाट करावयाची असल्यास दोन ठिकाणीं या सेनेस चांगला अडथळा करतां येईल. काबूल, गिझनी, कंदाहार या पट्ट्यांतील सर्व घाट–नाकीं व किल्ले ताब्यांत ठेऊन स्वारी करून येणाऱ्या सैन्यास हा पट्टा ओलांडू न देणें, किंवा (२) काबूल, गिझनी, कंदाहार या प्रदेशांत शत्रूस अडथळा न करतां अफगाणिस्थानांतील जलालाबाद प्रांत व हिंदुस्थानांतील पेशावर प्रांत यांमधील पर्वतांतील कोहात, खैबर आदिकरून सर्व घाट रोखून ठेऊन सिंधु नदीच्या अलिकडे शत्रूस न येऊं देण्याचा प्रयत्न करणें. शत्रूस अडथळा करण्याच्या या दोन मार्गांपैकीं पहिला मार्ग

सर्व मुत्सद्यांस व सेनानायकांस पसंत पडला आहे. कारण एकदां जर का रशियाची सेना अफगाणिस्तानांत येऊन उतरली म्हणजे अफगाणिस्तानांतून हिंदुस्थानांत यावयास ह्या सेनेस शेंकडो मार्ग मिळणारे आहेत व ते सर्व रोखून ठेवणें सरकारास फार जड जाईल. शिवाय सिंधु नदीकांठच्या ज्या पट्ट्याचें सरकारास संरक्षण करीत बसावें लागेल त्या पट्ट्याचे लांबीच्या १/५ इतकी लांबी काबूल, गिझनी, कंदाहार या पट्ट्याची आहे. ह्या कारणामुळें डिझरॅलीसाहेबांनीं काबूल, गिझनी, कंदाहार या पट्ट्यावर आपलें वर्चस्व स्थापित करण्याचा निश्चय केला व १८७५ सालीं जानेवारीच्या २२ तारखेस डिझरॅलीसाहेबांच्या प्रधानमंडळाकडून हिंदुस्थान सरकारास असा खलिता लिहून आला कीं, काबूल, गिझनी, कंदाहार या पट्ट्यावर वर्चस्व स्थापित करण्यासाठीं कांहीं तरी कुसपट काढून अफगाणिस्तानाशीं युद्ध-प्रसंग करावा. त्यावेळीं हिंदुस्थानचे ग. जनरल लॉर्ड नार्थब्रुक हे होते. त्यांना विलायत सरकारचे हुकूम अन्यायाचे व जुलमाचे वाटले व त्याच-प्रमाणें त्यांनीं या हुकुमाची अंमलबजावणी न करतां विलायत सरकारशी वादविवाद करण्यांत एक वर्ष घालविलें. विलायत सरकारची कोणत्याहि प्रकारें समजूत पडत नाहीं असें दिसून आल्यावर हिंदुस्थानास कोणत्याहि प्रकारचा त्रास न देणाऱ्या शेजारच्या राष्ट्राशीं निष्कारण लढण्याचें पापकर्म आपले हातून होऊं नये म्हणून त्यांनीं १८७६ सालीं एप्रिल महिन्यांत आपल्या जागेचा राजीनामा दिला. लॉर्ड नार्थब्रुकच्या मागून डिझरॅली-साहेबांचे पट्टशिष्य लॉर्ड लिटनसाहेब ग. जनरल होऊन हिंदुस्थानांत आले, व १८७६ त अफगाणिस्तानच्या दुसऱ्या लढाईस प्रारंभ झाला. प्रारंभीं या लढाईंत हिंदुस्थान सरकारचे सैन्यास जय मिळाला, व काबूलचे तक्तावर लिटनसाहेबांनीं आपल्या वतीचा नामधारी अमीर बसवून अफगाणिस्तानांत आपलें लष्करी वर्चस्व राहील असे त्या अमीरापासून करारनामे करून

घेतले. पण कांहींतरी कुरापत काढून उपस्थित केलेल्या पापमूलक लढाईंत चिरस्थायी यश कोठून मिळणार ? हिंदुस्थान सरकारचे सैन्याचे तोंडांत पडत असलेल्या साखरेची लौकरच माती झाली व सर लुई कॅव्हॅग्निरी व त्यांच्या हाताखालची सैन्याची टोळी यांना १८४०।४१ सालाप्रमाणें अफगाणांनीं कंठस्नान घातलें. अफगाणिस्थानच्या या दुसऱ्या लढाईंत सरकारचें सत्तर हजार सैन्य गुंतलें होतें व या लढाईचा खर्च पहिल्या लढाईइतकाच म्हणजे वीस कोट रुपये झाला. या सुमारास इंग्लंडांत लिबरल पक्षाची सरशी झाली, व डिझरॅली साहेबांचा अधिकार जाऊन ग्लॅडस्टनसाहेब अधिकारारूढ झाले. हिंदुस्थानांतील प्रजेला सुखी राखून राज्यास बळकटी आणणें हाच खरा मार्ग होय, व हिंदुस्थानांतील प्रजेस असंतुष्ट ठेऊन करांच्या ओझ्याखालीं प्रजेला चिरडून टाकून उदीम धंद्याकडे दुर्लक्ष करून सर्व खजिन्याचा व्यय सरहद्दीवरील लढाईंत करून काबूल, गिझनी, कन्दाहार हा पट्टा ताब्यांत घेण्याच्या नादास लागणें हा मार्ग खरा नाहीं, अशा प्रकारचीं लिबरल पक्षाची मतें असल्यामुळें लॉर्ड लिटनच्या मागून गव्हर्नर जनरल झालेल्या लॉर्ड रिपन साहेबांनीं अफगाणिस्तानच्या अमिराच्या वाटेस न जातां प्रजेच्या सुखशांतीकडे विशेष लक्ष दिलें.

चाळीस पन्नास वर्षांपूर्वीं मध्य एशियांत जें रशियाचें प्राबल्य होतें त्याहून तें प्राबल्य अलिकडे अतिशय वाढलें आहे. कास्पियन समुद्रापासून रशियानें आगगाडी केली असून ती आगगाडी हिरातजवळच्या प्रांताला चाटून समरकन्दाकडे गेली आहे. शिवाय हिंदुकुश पर्वतापलीकडील खडकाळ व बिनवस्तीच्या पामीर प्रदेशाची वस्तुस्थिती काय आहे हें समजून घेण्याकरितां रशियाच्या कित्येक टोळ्यांनीं त्या प्रदेशाचें परीक्षण केलें आहे. इराणचा बादशहा आपल्या मुठींत असावा ह्या संबंधानेंहि रशियाचे प्रयत्न सुरूच आहेत. अफगाणिस्तान व हिंदुकुश यापलिकडे रशियाची अशा

प्रकारची एकसारखी चळवळ चालू असल्यामुळें रिपनसाहेबांच्या कारकीर्दीत अंशतः बंद पडलेल्या सरहद्द प्रकरणाची गेल्या पंधरा वर्षांत पुन्हां उठावणी झाली. हिरातच्या आसपास रशियाची आगगाडी आल्यामुळें अफगाणिस्तानांत प्रचण्ड सेना आणण्यास रशियास सोपें झालें. शिवाय समर्कंदास रशियाची राजसत्ता कायमची झाल्यामुळें पामीर प्रदेश पायाखालीं तुडवून न येतां ऑक्झस नदीच्या कांठानें येऊन बदकशान प्रांतांत उतरून डोरहा घाटानें चित्रळमध्यें सैन्य आणण्याचा संभव उत्पन्न झाला. चित्रळच्यापलीकडे रशिया काय करीत आहे याची बातमी लागावी व चित्रळमध्यें प्रवेश करण्याचा रशियानें प्रयत्न केल्यास त्यास अडथळा करतां यावा म्हणून उमरखानास जिंकून चित्रळ प्रांत सरकारनें आपल्या ताब्यांत घेतला. त्याचप्रमाणें चित्रळच्या लगत असलेल्या काश्मीरच्या सरहद्दीचा बंदोबस्त करण्याकरितां सरकारनें काश्मिरच्या महाराजांस कांहीं काळ पदच्युत केलें व सरकारास योग्य तसे काश्मिरमधून लष्करी रस्ते बनवून सरकारनें लष्करी ठाणीं बसविलीं. याप्रमाणें चित्रळच्या बाजूचा रशियाचा बंदोबस्त झाला, पण हिरातच्या दिशेनें रशिया आल्यास त्याची व्यवस्था काय करावयाची? पूर्वी हिरातच्या रस्त्यानेंच रशिया अफगाणिस्तानांत उतरण्याचा संभव होता. आतां हिरातचे रस्त्याशिवाय अफगाण–तुर्कस्तानांतून काबुलवर चाल करून रशियास सहज येतां येईल. अफगाणिस्तानच्या पहिल्या व दुसऱ्या लढाईत पुरी खोड मोडल्यामुळें काबूल, गिझनी, कंदाहार हा पट्टा जिंकून ताब्यांत घेण्याचा मार्ग सुटला. तेव्हां रशिया लढाईची तयारी करीत आहे व रशियाचें सैन्य जाग्यावरून हाललें अशी बातमी कळतांच काबूल, कंदाहार, गिझनी या पट्ट्यांत एकदम सैन्य नेऊन लढाईचे वेळीं तो पट्टा आपल्या ताब्यांत यावा अशी व्यवस्था करण्याकडे हिंदुस्थान सरकारचें व विलायतच्या मुत्सद्यांचें लक्ष लागलें. ही व्यवस्था साधण्यास तीन गोष्टींचें साहाय्य पाहिजे. (१) रशियन अंमल

नगर वाचनालय सातारा
सरहद्दीवरील लष्करी व्यवस्था
नगर वाचनालय
ता. १९१

हिंदुस्थानच्या बाजूकडे मध्य एशियांत फार वाढूं देतां कामा नये. (२) अफगाणिस्तानचे अमीर अबदुल रहिमान यांची मर्जी संपादन करून त्यांना इंग्लंडशिवाय दुसऱ्या कोणत्याही युरोपियन राष्ट्रांच्या तंत्रानें वागूं देतां कामा नये. (३) काबूल, गिझनी, कंदाहार या पट्ट्यांतील कंदाहार व काबूल या महत्वाच्या ठिकाणापासून हिंदुस्थान सरकारच्या लष्कराची ठाणीं जितकी जवळ स्थापतां येतील तितकी जवळ स्थापण्याचा प्रयत्न करणें. रशियाला हिंदुस्थानापासून होतां होईतों लांबवर ठेवण्यासाठीं मध्य एशियांतल्या अमुक देशांत रशियानें ढवळाढवळ करावी, इतर स्वतंत्र राष्ट्रांत रशियानें ढवळाढवळ करूं नये व या अटी मोडल्या असतां युद्ध करण्याची रशियाची इच्छा आहे असें समजावें, अशा प्रकारचा रशियाशीं इंग्लंडनें तह केला. या तहानें अफगाणिस्तानच्या उत्तरेकडील बराच भाग व चित्रळच्या पलिकडील बराच प्रांत यांना रशियाचा कधीं वेध लागूं नये, सवड सांपडल्यास इंग्लंडनें पाहिजे तर ते प्रांत काबीज करावेत असें रशिया व इंग्लंड यामध्यें ठरलें आहे. हिंदुस्थानकडे पुढें पुढें पडत चाललेल्या रशियाच्या पावलास आळा घालणाऱ्या या तहाची वाटाघाट चालली असतांच "डयूरनचा तहनामा" या नांवाचा अबदुल रहिमान व हिंदुस्थान सरकार यांच्यामध्यें तह झाला. या तहनाम्यान्वये अफगाणिस्थानास नियमित खंडणी देण्याचें कबूल केलें असून रशियाचें सैन्य हिरातच्या बाजूनें अफगाणिस्तानांत आलें असतां त्यांस अडथळा करण्याचे कामीं इंग्रजांचें साहाय्य घेण्याचें अमिरानें कबूल केलें असून इंग्लंडशिवाय दुसऱ्या कोणत्याहि युरोपियन राष्ट्रास अफगाणिस्थानांत कोणत्याहि प्रकारचें कारस्थान करूं न देण्याची अमीरानें हमी घेतली आहे; शिवाय अफगाणिस्थान व हिंदुस्थान यांच्या दरम्यान असलेल्या स्वतंत्र पठाणांच्या प्रांतावरचे हरएक प्रकारचे काल्पनिक व खरे हक्क अमीरानें सोडून दिले असून त्या पठाणांची पाहिजे ती विल्हेवाट लावण्यास डयूरन

साहेबांचे तहान्वयें अमीरांनीं आम्हांस परवानगी दिली आहे. सरहद्दीवरील स्वतंत्र जातींना कोणत्याहि प्रकारें न विचारतां अमीर व हिंदुस्थान सरकार यांनीं आपसांत असें ठरविलें कीं, या स्वतंत्र जातींना जर कोणी कधींकाळीं आपल्या अंमलांत आणलें तर तो अंमल हिंदुस्थान सरकारचा असावा, इतर कोणाचाहि नसावा. ड्यूरनसाहेबांच्या तहानें हिंदुस्थान सरकारास जें पाहिजे होतें तें मिळालें. रशियानें हिरातजवळ सैन्य गोळा केलें असतां काबूल, गिझनी, कंदाहार हा पट्टा आपल्या सैन्यानें एकदम व्यापून टाकण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारास मिळाला. हें लष्करी धोरण साधण्याकरितां बलुचिस्तानच्या सरदाराला आमिष दाखवून, धाकदपटशा दाखवून बलुचिस्थानावर सरकारनें आपलें वर्चस्व बसविलें व केट्टा येथें लष्करी ठाणें ठेऊन व सिंध बलुचिस्थान या आगगाडीचा रस्ता केट्टापलीकडील सरहद्दीपर्यंत नेऊन कंदाहारावर खूप जलदीनें सैन्य नेतां यावें अशी योजना केली. त्याचप्रमाणें काबूलवरहि अफगाण तुर्कस्थानांतून स्वारी करून रशिया आला असतां खूप जलदीनें सैन्य नेतां यावें म्हणून कोहात घाट, खैबर घाट व त्यांच्या आसपासचे इतर घाट हे ताब्यांत ठेऊन आफ्रिडीज, आरकिडीज, स्वात, मोहमद या जातींच्या प्रदेशांत निरनिराळी ठाणीं सरकारनें बसविलीं. काबूलच्या आसपास सैन्य असलें पाहिजे एवढयाकरतां या पठाणांच्या प्रांतांत सरकारास ढवळाढवळ करावी लागली. शिवाय पेशावराहून चित्रळास जाणारा लष्करी रस्ताहि या जातीच्या प्रांतांतूनच जातो; या दोन कारणांमुळें सरकार व रानटी जाती यांमध्यें कारस्थान उत्पन्न झालें. काबूल, गिझनी, कंदाहार हा पट्टा ताब्यांत घेऊन रशियाशीं झुंजलें असतां त्या युद्धांत यश येणें हें बहुतांशीं अफगाणिस्थानच्या लोकांच्या सरहद्दीवरील पठाणांच्या साहाय्यावर अवलंबून आहे. निदान त्या युद्धप्रसंगीं हिंदुस्थान सरकारला त्रास देण्याचें सामर्थ्य या लोकांत असतां कामा नये, म्हणून सरहद्दीवरील

पठाणांवर व अफगाणिस्तानच्या लोकांवर साधल्यास अंमल बसविण्याचा प्रयत्न करावा व हें न साधल्यास कसें बसें त्यांचें प्रेम संपादन करण्याचा प्रयत्न करावा अशा प्रकारचें दुटप्पी वर्तन सरकारचें चाललें आहे. अफगाणिस्तानचे अमीर अबदुल रहिमान ऐन प्रसंगीं कसे वागतील ह्याचा सरकारास भरंवसा नसल्यामुळें सरहद्दीवरील पठाणांना आपल्या कबजांत घेऊन अफगाणिस्तानच्या सरहद्दीपर्यंत आपली सरहद्द नेऊन अमीराचें मागें नेहमीं ससेमिरा ठेवण्याचा हिंदुस्थान सरकारचा हेतू दिसतो. अबदुल रहिमान यांचे ध्यानांत या सर्व गोष्टी आल्या आहेत. म्हणूनच ते डयूरनसाहेबांचे तहाला फारसे खूष नाहींत. कालांतरानें कां होईना आपलें स्वातंत्र्य नष्ट करण्याचा हिंदुस्थान सरकारचा हेतू आहे अशी आफ्रिडीज आदिकरून पठाण जातींची समजूत झालेली दिसते, व अशी त्यांची समजूत होण्यास बरीच सबळ कारणें आहेत हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. रशियाचे भीतीनें ठरविलेल्या लष्करी धोरणाकरितां या पठाणांवर वर्चस्व स्थापणें जरूर आहे, व कोणत्याहि प्रकारचें पारतंत्र्य कबूल करण्यास ते पठाण तयार नाहींत. अशा स्थितींत एकानें दुसऱ्यास पुरे जिंकल्याशिवाय लढाईचा खरा शेवट व्हावयाचा नाहीं हें उघड आहे. आज नाहीं उद्यां केव्हांना केव्हां तरी आफ्रिडीज पठाणांच्या टारहा प्रांतावर तांबडें निशाण फडकविण्याचा प्रयत्न झाल्यावांचून रहाणार नाहीं.

२५

# * विभूतिपूजा

आल्हादजनक किंवा भयानक, कोमल किंवा उग्र, अथवा दोहोंचेंहि योग्य मिश्रण झाल्यामुळें भव्य दिसणारें सृष्टीचें स्वरूप पाहून आणि थोर पुरुषांचीं पुण्यश्लोक चरित्रें ऐकून व त्यांचें मनन करून मनुष्यांत स्वभावतः असलेली आश्चर्यबुद्धि आपोआप जागी होते. एखाद्याच्या कृतीविषयीं किंवा एखाद्या वस्तूविषयीं आश्चर्य वाटलें म्हणजे त्या मनुष्याला किंवा वस्तूला नमस्कार करून आपली लीनता दाखवावी, त्याची पूजाअर्चा करून आपलें प्रेम प्रकट करावें हाहि मनुष्यधर्मच आहे. निर्जीव सृष्टींत कोठेंहि ईश्वराचा अंश दृष्टीस पडला असतां त्याबद्दल आश्चर्य व प्रेम वाटणें (म्हणजे हृदयांत भक्तीचा पाझर फुटणें) या सारखा मनुष्यांत अत्युत्तम गुण दुसरा कोणताच नाहीं. विभूतिपूजा जेथें नाहीं, असें राष्ट्र सांपडावयाचें नाहीं, व ज्या समाजांत ह्या गुणाचा लोप होत जातो तो समाज मरणोन्मुख झाला आहे असें समजावें. युरोपांत कित्येक राज्यक्रांत्या व धर्मक्रांत्या होऊन ख्रिस्ती धर्मावरील लोकांची श्रद्धा उडत चालल्यामुळें मोठमोठ्या राष्ट्रांच्या चिंधड्या चिंधड्या होण्याची वेळ आली असतां ह्याच विभूतिपूजेनें संकटांतून त्या राष्ट्रांना पार पाडून नेलें. समाजाच्या जीवनास व उत्कर्षास विभूतिपूजेसारखें साधन नाहीं, असें कारलाइलचें मत आहे. ज्या मनुष्यांत भक्तिभाव नाहीं त्याला कोणतेंहि शास्त्र किंवा कोणचीहि कला शिकवूं नको, असें आमच्याइकडील सर्व साधुसंतांचें व अवतारी पुरुषांचें आपल्या अनुयायांस निक्षून सांगणें आहे. कारण कोणाहि पुरुषांविषयीं अथवा कोणत्याहि वस्तूविषयीं ज्याच्या मनांत भक्तिभाव उत्पन्न होत नाहीं त्याची कृति नेहमीं समाजाला दुःखाच्या डोहांत लोटून देणारीच असावयाची. ज्या मनांत

---

* केसरी ता. १ जून १८९७.

आश्चर्यबुद्धीला कोनाकोपऱ्यांतहि थारा मिळत नाहीं तें मन सैतानानें आपलें क्रीडामंदिर करावें किंवा कामक्रोधादिक मनुष्याच्या शत्रूंनीं त्या मनांत सांवळागोंधळ घालावा, हें अगदीं साहजिक आहे. धर्माची ग्लानी झाली असतां धर्माची संस्थापना करण्याकरितां ईश्वराचे जे वारंवार अवतार झाले त्यांची जशी आम्हीं पूजा करतो, जसे उत्सव करतों त्याचप्रमाणें इतर राष्ट्रांतील लोकहि आपापल्या देशांतील ईश्वराच्या पूर्ण अवताराचे उत्सव करीत होते व करीतहि आहेत. दुष्टांचा संहार करण्याकरितांच देह धारण करणाऱ्या श्रीराम किंवा श्रीकृष्णासारख्या ईश्वरी अवतारांचे जसे आम्हीं भक्त आहोंत, त्याचप्रमाणें युरोपियन लोकांचे पूर्वज "ओडिन" व "थार" या पुरुषांना प्रत्यक्ष ईश्वरमूर्ति समजून त्यांचे भक्त बनले होते. रामावतार किंवा कृष्णावतार जसा केवळ धर्मतत्त्वें शिकविण्याकरितां नाहीं, तर दुर्जनांचा संहार करण्याकरितां आहे, त्याचप्रमाणें "ओडिन" व "थार" हे मोठे पराक्रमी पुरुष असून नवीन राष्ट्र स्थापन करून तद्वारा धर्मसंस्थापना करणारे होते. नवीन धर्माची स्थापना करणारा खिस्त किंवा महंमद ह्यांना पाश्चिमात्य किंवा मुसलमान जसा मान देतात, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतहि श्रीमत् शंकराचार्य, बुद्ध, जिन इत्यादि धर्मगुरूंची पूजाअर्चाहि आम्हीं करतो. महंमदाला पाहून अरबस्थानांतील वाळवंटांत भटकत फिरणाऱ्या अडाणी लोकांच्या अंगांत विभूतिपूजेचें जे वारें भरलें त्यायोगें शेळयांमेंढया हाकून कसा तरी उदरनिर्वाह करणाऱ्या ह्या जातीनें पश्चिमेस स्पेनच्या किनाऱ्यापर्यंत व पूर्वेस गंगा यमुनांच्या संयोगापर्यंत सर्व प्रदेश पादाक्रांत केला. अरेबियांत रेतीचे केवळ कण भरले आहेतसे जगाला वाटत होतें. परन्तु महंमदाच्या डोळ्यांतील ईश्वरी तेज त्यावर पडतांक्षणींच अरेबिया रेतीच्या कणांनीं भरलेली नसून ज्वालाग्राही दारूच्या कणांची अरेबियांतील वाळवंटें असलीं पाहिजेत, असें

सर्वांच्या प्रत्ययाला आलें. ख्रिस्ती धर्माचें संशोधन करणारे लुथर, नॉक्स् सारखे जसे साधु-पुरुष युरोपांत होऊन गेले त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत विशेषतः महाराष्ट्रांत तर किती तरी साधुपुरुष होऊन गेले. युरोपांतील लोक लूथर, नॉक्सचे देव्हारे माजवतात, त्यांच्या भजनी लागतात, त्याचप्रमाणें आम्हींहि आमच्यांतील साधु पुरुषांसंबंधानें जत्रा भरवीत असतों, उत्सव करीत असतों. महाराष्ट्रांतील संत मंडळी आम्हांस सोडून गेली तरी त्यांच्या कृति, त्यांचा उपदेश अद्याप जिवंत आहेत. पूर्वीच्या साधुसंतांची आठवण सुदैवेंकरून आम्हीं विसरलों नाहीं, म्हणून महाराष्ट्र धर्मांत कांहीं अद्याप जीव असून समर्थांच्या इच्छेप्रमाणें महाराष्ट्र धर्म वाढण्याची आशा आहे. महाराष्ट्रांतील राष्ट्रीय धर्मोत्सवांनीं आम्हां पतित मराठ्यांची व पूर्वीच्या साधुसंतांची पुरी फारकत होऊं दिली नाहीं, हें राष्ट्रीय महोत्सवाचे आम्हांवर उपकार आहेत. राष्ट्रीयत्व, समाजव्यवस्था व धर्म या सर्वांच्या मुळाशीं विभूतिपूजा आहे. महाराष्ट्रांतल्या धार्मिक विभूति महाराष्ट्रीयांच्या डोळ्या-पुढें वारंवार मांडून त्यांच्या अंतःकरणांतील विभूतिपूजा धर्मसंबंधानें निदान नाहींशी होऊं दिली नाहीं, येवढें पुण्य धर्मसंबंधीं महोत्सव करणा-रांनीं गांठीं बांधिलें यांत शंका नाहीं. परंतु राजकीय स्वातंत्र्याकरितां जिवापाड मेहनत घेणाऱ्या व तद्वारा आमच्या धर्माचें संगोपन करणाऱ्या राजकीय राष्ट्रीय विभूतींची आठवण स्वराज्य नष्ट होण्याबरोबर नाहींशींच झाली. स्वराज्य होतें त्यावेळीं राष्ट्रांतील राजकीय विभूतींच्या कृतीचें व उपदेशाचें मनन, चिंतन व पूजन आम्हीं सदैव करीत होतों. ईश्वरांश प्रत्येक मनु-ष्यांत कमी अधिक प्रमाणानें असतोच असतो, व विभूतीचें दर्शन झालें असतां विभूतिपूजेला भरती येऊन मूळचा ईश्वरांश दुणावत जातो. महा-भारतांतील पांडवांच्या कथा ऐकून श्रीशिवाजी महाराजांच्या अंगचें मूळचें तेज त्यांना स्वस्थ बसूं देईना. महाराजांसारख्या विभूतीच्या सहवासानें

दऱ्याखोऱ्यांत पडून असलेल्या मावळ्यांतच लढवय्ये सरदार चमकूं लागले. विभूतीची पूजा करा म्हणून कोणाच्चीं आर्जवें करावयास नको; विभूतींच्या आचरणाप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करा, म्हणून कोणास उपदेश करावयास नको; लोहचुंबकाच्या मागोमाग लोखंडाचा तुकडा जसा आपोआप पळत जावयाचाच, त्याचप्रमाणें विभूतिशेजारीं योग्य अंतरावर मनुष्य गेला कीं, ह्या संस्काराचें परिणाम त्याच्यावर झाल्यावांचून रहावयाचेच नाहींत. स्वराज्यांत शिवाजीसारख्या विभूति आम्हांपासून केव्हांहि फार दूर अंतरावर गेल्या नाहींत, व ज्यावेळीं आम्हीं आमच्या दुर्दैवानें त्यांच्यापासून लांब लांब पळूं लागलों, त्यांची आठवण विसरूं लागलों, तेव्हां आमचें राज्य बुडण्याची वेळ समीप येऊन ठेपली. शिवाजी महाराजांची आठवण, राजाराम महाराजांच्या कारकीर्दीतील लोक विसरले नव्हते, म्हणून औरंगजेबानें महाराष्ट्रावर आणलेल्या लाखों मुसलमान सैन्याच्या टोळधाडीचा पूर्णत्वानें प्रतिकार करण्याचें सामर्थ्य त्यावेळच्या मुत्सद्यांच्या व तलवारबहाद्दरांच्या अंगीं आलें. राजकीय विभूतींची पूजा करण्याची स्वराज्यांतील पद्धत पाश्चिमात्य पद्धतीहून व सांप्रतच्या पद्धतीहून जरा निराळी होती हें खरें आहे; परंतु बाहेरील पद्धतीवर विशेष कांहींच अवलंबून नाहीं. विभूतिपूजा असली म्हणजे त्या उत्तम गुणाची गोड फळें राष्ट्रास चाखावयास मिळालींच पाहिजेत. राजकीय पराक्रम करणाराविषयींची भक्ति दाखविण्याचे प्रकार राष्ट्राची पूर्ण वाढ होण्यापूर्वी व नंतर निरनिराळे असतात; व महाराष्ट्राची पूर्ण वाढ होण्यापूर्वीच महाराष्ट्र परसत्तेखालीं गेल्यामुळें, युरोपांत व इतर ठिकाणीं राजकीय विभूतींची पूजा करण्याचा जो जुना प्रकार दृष्टीस पडतो तोच प्रकार आमच्या स्वराज्यांतहि होता. स्वराज्यांत राजकीय पराक्रम करणारास सरदारकी व वंशपरंपरा जहागिरी देऊन राजकीय विभूतींची पूजा करीत. त्याच्या घराण्यांत चाललेली जाहागीर व सरदारकी हेंच त्या विभू-

तीचें स्मारक होई; आणि जोंपर्यंत "पूर्वज हांसतील" असा त्या घराण्यांतील पुरुषांना धाक वाटे, व जोंपर्यंत सामान्य जन त्या विभूतीस विसरत नसत, तोंपर्यंत राष्ट्रांतील विभूतिपूजा केव्हांहि अंधुक होत नसे व राष्ट्राचा जोम दिवसें दिवस वाढत जाई. शिवाजी महाराज, प्रल्हाद निराजी, धनाजी जाधव, संताजी घोरपडे वगैरे थोर पुरुषांच्या कृती ऐकून व आठवून थोरले बाजीराव यांना "महाराष्ट्र राज्य करावें। जिकडे तिकडे" ह्या समर्थांच्या उपदेशाप्रमाणें वागण्याची स्फूर्ति झाली व त्यांचेंच अनुकरण करून पुढील दोन तीन कारकीर्दीत मराठ्यांनीं सर्व हिंदुस्थान देश व्यापून टाकला. माझा पराक्रम कमी झाला तर बाजीराव रागावतील, शिवाजी महाराज हांसतील—विभूतिपूजेनें उत्पन्न केलेली ही मनाची टांचणी त्यावेळीं कायम होती; म्हणूनच फ्रान्स देशाची सरहद्द युरोप खंडाच्या सरहद्दीशीं नेऊन भिडविण्याची आपली महत्त्वाकांक्षा कांहीं वर्षें अंशतः पूर्ण करणाऱ्या नेपोलियनाप्रमाणें, महाराष्ट्र म्हणजेच सर्व हिंदुस्थान असें मुक्रर ठरविण्याचे मराठ्यांचे प्रयत्न चालू होते व जवळजवळ सिद्धीसहि त्यावेळीं गेले. राजकीय ज्ञानांत आमच्या फार पुढें गेलेल्या पाश्चिमात्य कावेबाजीशीं जर आम्हांस टक्कर देण्याचा प्रसंग आला नसता तर शिंदे—होळकरांच्या अंमलावांचून उत्तर हिंदुस्थानांत एकहि भाग शिल्लक रहाता ना व बंगाल्यांस भोसल्याच्या तावडींत सांपडल्यावांचून गत्यंतरच नव्हतें. दसऱ्याचा वार्षिक दरबार जेव्हां भरे, लढाईच्या तयारीनें महाराष्ट्र जेव्हां दणाणून जाई, खलबत करण्याकरितां मुत्सद्दी जेव्हां एका ठिकाणीं गोळा होत, रणांगणावर आमचें सैन्य जेव्हां लढण्यास उभें राही—हे सर्व प्रसंग राजकीय विभूतींची राष्ट्राला आठवण करून दिल्यावांचून रहात नसत. त्या सर्व प्रसंगीं राष्ट्रांतील विभूतिपूजा उचंबळूं लागावयाचीच लागावयाची. स्वराज्य नष्ट झालें, राजकीय थोर पुरुष आमच्यांत उत्पन्न होण्याचा मार्ग खुंटला, व

आमच्या दुर्दैवानें पूर्वींच्या विभूतींकडे आमचें लक्ष जाईनासेंच झालें. धार्मिक संबंधांत सरकारनें तटस्थवृत्ति धारण केल्यामुळें, आमच्यांतील धर्मोत्सवांचा कांहीं लोप झाला नाहीं; डांटे, शेक्सपीयर, गटे वगैरे कवींच्या प्रासादिक वाणीबद्दल जसा युरोपियनांना अभिमान वाटतो, व त्यासंबंधीं आपली भक्ति प्रकट करण्यास ते चुकत नाहींत, त्याचप्रमाणें कालीदास, भवभूति, मोरोपंत, तुकाराम इत्यादि संस्कृत व मराठी कविवर विभूतींच्याविषयींचें प्रेम व आदर आमच्या मनांतून नाहींसें झालें नाहीं, इतकेंच नव्हे तर ह्या विभूतींचें विशेष प्रकारानें पूजन करण्याची आम्हांस ह्या राज्यांत संधी मिळाली आहे. परसत्तेखालीं राजकीय उत्सव मात्र बंद पडले व हे बंद होणें हा परसत्तेचा स्वाभाविक परिणाम आहे. ह्यामुळें श्रीशिवाजी महाराजांसारख्या थोर विभूतीस आम्हीं विसरलों व राजकीय बाबतींत विभूतिपूजा नष्ट होत चालल्यामुळें महाराष्ट्राच्या इतिहासांतील थोर पुरुषांच्या सहवासानें जे राजकीय संस्कार आमच्या मनावर व्हावयाचे, ज्या ज्या मनोवृत्ती आमच्या हृदयांत प्रबळ व्हावयाच्या व जें राजकीय शिक्षण आम्हांस सहजगत्या मिळावयाचें त्या सर्वांस आम्हीं आंचवलों. श्रीशिवजयंत्युत्सव आम्हीं कां करावा ह्यासंबंधींच्या तात्त्विक कारणांचा येथपर्यंत विचार झाला. वरील उत्सवांत ज्या कोणास थोतांड दिसत असेल, यांत लफंगेगिरी ओतप्रोत भरली आहे अशी ज्यांची समजूत असेल त्यांना निरनिराळ्या राष्ट्रीय महोत्सवांत कोणचा आनंद, कोणतें सत्यप्रेम, कोणतें वैभव भरलेलें आहे हें आम्हांस व कोणासहि सांगतां यावयाचें नाहीं. महाराष्ट्र देश प्रेमानें व भक्तीनें करीत असलेल्या गणपत्युत्सवांत व श्रीशिवजयंत्युत्सवांत ज्यांना लुच्चेगिरीच दिसते त्यांच्या मनांत विभूतिपूजेला लवलेशहि जागा मिळत नसल्यामुळें, विभूतिपूजा जागृत होण्याच्या मार्गांत ते नसल्यामुळें, थोर पुरुषांच्या उत्सवांतील सरस रहस्याचें ज्ञान करून

देणारे त्यांच्यापाशीं इंद्रियच नाहीं, हें आमचें किंवा त्यांचें दुर्दैव आहे. विभूतिपूजेचा ज्यांना गंधहि नाहीं अशांनीं कितीहि उलट प्रयत्न केले तरी श्री शिवजयंत्युत्सव महाराष्ट्रांत चोहोंकडे पसरत चालला आहे, हें दुसरीकडे प्रसिद्ध केलेल्या हकीकतींवरून वाचकांच्या लक्षांत येईल. सरदार घराण्यांतील स्त्रियांना मृण्मय प्रतिमा करण्याची इच्छा व्हावी, कारागीर, कवि, वक्ते या सर्वांनीं महाराजांचे गुणानुवाद गावेत हीं सुचिन्हेंच होत. असल्या उत्सवांपासून होणारे फायदे आज प्रत्यक्ष दाखवा असा हट्ट घेऊन बसणाऱ्याची कृति क्षयरोगानें पूर्ण ग्रासलेल्या रोग्यानें एक दिवसाच्या अनुभवावरूनच धन्वंतरीचें औषध लाथाडण्याप्रमाणेंच मूर्खपणाची आहे. यंदांच्या सालीं पदवीधर व इतर सुशिक्षित लोक ह्या उत्सवांत बरेच पडले आहेत व ह्या उत्सवास त्यांनीं कोणत्या प्रकारचें स्वरूप हळूहळू दिलें पाहिजे ह्याचा विचार सवडीनुसार करण्याचें आम्हीं योजिलें आहे. दुष्काळ व प्लेग यांचा चोहोंकडून मारा असतांनाहि महाराष्ट्रांतील ठिकठिकाणच्या लोकांनीं श्रीशिवजयंत्युत्सव यथाशक्ति साजरा केला हें पाहून कोणाहि खऱ्या मराठ्यास आनंद झाल्यावांचून रहाणार नाहीं.

[ हा लेख कालानुक्रमानें मागें यावयास पाहिजे होता, पण तो आतां येथें जोडला आहे. हा लेख १८९७ सालच्या राजद्रोहाच्या खटल्यामध्यें सरकारतर्फें दाखल केलेला होता. ]

५।७।६९
८८३०५

# * श्रीशिवाजी महोत्सव

वैशाख शुद्ध द्वितीया म्हणजे छत्रपति श्रीशिवाजी महाराज यांचा जन्म-दिवस अगदीं जवळ आला आहे. जरी कांहीं ठिकाणीं श्रीशिवाजी महोत्सव महाराजांचे मृत्यूचे दिवशीं किंवा राज्याभिषेकाचे दिवशीं करण्यांत येतो-तथापि सर्व महाराष्ट्रभर व इतर बऱ्याच ठिकाणीं जन्माचे दिवशींच महोत्सव करण्याची वहिवाट पडली असल्यामुळें येती वैशाख शुद्ध द्वितीया ता. २१ एप्रिल, महाराष्ट्राकडून कोणच्या रीतीनें साजरी करण्यांत येते, याकडे सर्वांचें लक्ष लागून राहणें अगदीं साहजिकच आहे. गेल्या वर्षांत ज्या कित्येक कल्पनातीत गोष्टी घडून आल्या त्यामुळें तर यंदाचे उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. श्रीशिवाजी महोत्सवाची आवश्यकता, त्यापासून होणारे फायदे, व उत्सवावरील आक्षेपांचा पोकळपणा इत्यादि गोष्टींचें या खेपेस विवेचन करण्याचें योजिलें आहे. श्रीशिवाजी महोत्सवाला हल्लींच्या राजकीय चळवळींत सामील करून त्यासंबंधाचे कुत्सित तर्क काढण्याची कित्येक स्वार्थसाधू लोकांना लागलेली संवय किती खोडसाळपणाची व नीचपणाची आहे याचें दिग्दर्शन प्रथम येथें करणें अत्यंत जरूर होय. प्रजाजनांचीं सुखदुःखें राज्यकर्त्यांपुढें मांडून लोकांचीं गाऱ्हाणीं अधिकाऱ्यांच्या कानांवर घालून नवीन राजकीय हक्कांची मागणी वारंवार करून राज्यकर्त्यांचा जुलूम कमी करण्याच्या उद्देशानें किंवा कायदेशीर रीतीनें भांडून राज्यसत्तेचा कांहीं भाग क्रमाक्रमानें प्रजाजनांना मिळवून देण्याच्या उद्देशानें राष्ट्रांत ज्या चळवळी करण्यांत येतात त्या चळवळींनाच केवळ 'राजकीय' म्हणण्याचा प्रघात आहे. राजकीय प्रश्नांचा इतर प्रश्नांशीं निकट संबंध

---

* केसरी, १२ एप्रिल १८९८.

असतो; एवढयाचकरितां राजकीय चळवळींना अप्रत्यक्ष रीतीनें किंवा दूरच्या परंपरेनें पोषक असणाऱ्या प्रश्नांना किंवा चळवळींना राजकीय ही संज्ञा देणें केव्हांहि बरोबर होणार नाहीं. उदाहरणार्थ, आपण औद्योगिक शिक्षणाचा प्रश्न घेऊं. एखाद्यानें जर उद्यां असें म्हटलें कीं, औद्योगिक शिक्षणानें देशांतील उद्योगधंदे वाढून त्यामुळें स्वतंत्र कर्तृत्ववान व श्रीमंत असा एक वर्ग एकदां राष्ट्रांत उत्पन्न होईल व असला बलाढ्य वर्ग राजकीय चळवळींना पैशाची किंवा कर्त्या पुरुषांची कांहीं तूट पडूं देणार नाहीं व राजकर्त्यांनाहि प्रजाजनांना राजकीय हक्क दिल्यावांचून गत्यंतर रहाणार नाहीं. अशा रीतीनें औद्योगिक शिक्षणाच्या प्रश्नाचा विचार केला असतां त्या प्रश्नालाहि राजकीय चळवळींत ओढावें लागेल. राष्ट्रोन्नतीची कोणतीहि बाब घेतली तरी त्याबाबीचा सांप्रतच्या राजकीय चळवळीशीं वरील प्रकारानें दूरान्वय सहज दाखवितां येईल. सामाजिक परिषद, सनातन धर्म महामंडळ, औद्योगिक परिषद व गणपती महोत्सव इत्यादि निरनिराळ्या चळवळींचा पुष्कळसें वळसे घेऊन राष्ट्रीय सभेशीं किंवा स्थानिक राजकीय प्रश्नांशीं जरी संबंध दाखवितां येईल तरी त्याजवर राजकीय चळवळीचा छाप मारून त्यांना विजातीय चळवळीच्या पंक्तीला बसविणें केव्हांहि सयुक्तिक होणार नाहीं. औद्योगिक परिषद ज्याप्रमाणें मिठावरील कर मोडा म्हणून ओरड करीत नाहीं त्याप्रमाणें प्रजाजनांवरील मीठ-करांच्या ओझ्यांचा श्रीशिवाजी महोत्सवाशीं कोणत्याहि प्रकारचा प्रत्यक्ष संबंध नाहीं. कायदे कौन्सिलांत अधिक लोकनियुक्त सभासद निवडून देण्याचा आम्हांला अधिकार देऊन पाश्चिमात्य राज्यपद्धतीचें स्वरूप हिंदुस्थानचे राज्याला द्या अशा प्रकारची शिष्टाई इंग्रज बहाद्दरांशीं करण्याच्या भानगडींत सामाजिक परिषद् ज्याप्रमाणें पडत नाहीं त्याप्रमाणें श्रीशिवाजी महोत्सवांतहि वरील प्रकारचा ठराव पास होण्याचा बिलकुल संभव नाहीं. बर्क मिल्टनसारख्या ग्रंथकारांचे विचार

छात्रवर्गाला समजावून देणारा शिक्षक ज्याप्रमाणें राष्ट्रीय सभेच्या किंवा प्रांतिक सभेच्या कामाची उटाठेव करीत नाहीं, त्याप्रमाणें श्रीशिवाजी महोत्सवांतील पुराणांत, कथाकीर्तनांत किंवा भाषणांत स्दरील सभांच्या ठरावांना स्थान नाहीं. श्रीशिवाजी महोत्सव हा केवळ ऐतिहासिक व शिक्षणात्मक असतांना त्याला राजकीय चळवळींत नेऊन वसवून कांहींचे मनांत त्याजविषयीं गैरसमज उत्पन्न करण्याचें धाडस कित्येक आपमतलबी लोकांच्या हातून कसें होतें याचें प्रत्येक विचारी मनुष्यांस आश्चर्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं. आपल्या इतिहासाची पूर्ण ओळख, पूर्वजांच्या कृतीचा योग्य अभिमान, स्वदेशावर निष्कपट प्रेम, आपलें कर्तव्यकर्म करण्याची व आपली जबाबदारी ओळखून देशसेवेंत अंतर न पाडण्याची हौस, व पूर्ण जागृत असलेली धर्मबुद्धि इत्यादि गुण लोकांत असल्याशिवाय कोणत्याहि राष्ट्राची भरभराट किंवा मानमान्यता होणें शक्य नाहीं. ज्या शिक्षणक्रमामुळें किंवा शिक्षण-पद्धतीमुळें ज्ञानप्रसार करून शिवाय वरील गुण लोकांत अधिक प्रमाणानें उत्पन्न होतात ती पद्धत विशेष चांगली समजली जाते. विद्याखातें किंवा विश्वविद्यालयें यांचा हेतु जरी वरील गुण उत्पन्न करण्याचा असला तरी त्यांच्यावरच केवळ वरील हेतु तडीस नेण्याचें काम पूर्णपणें सोंपवून चालत नाहीं. लोकांत राष्ट्रीयत्वाचा बाणा उत्पन्न करणारें शिक्षण देणाऱ्या ऐतिहासिक महोत्सवाची विद्याखात्याशीं व विश्वविद्यालयाशीं सांगड घालून देणें कित्येक स्वतंत्र व भाग्यशाली राष्ट्रांना जरूर वाटत होतें व वाटत आहे. आपल्यां-तील थोर पुरुषांविषयीं अभिमान जागृत ठेवण्यास व त्यांच्या अमर्यादित उपकाराविषयीं आपली कृतज्ञता अंशतः तरी प्रकट करण्यास ऐतिहासिक महोत्सवावांचून दुसरा कोणताच मार्ग नाहीं. रोमन लोकांमध्यें लोकनियुक्त प्रतिनिधींच्या सभेंत राष्ट्रांतील सुप्रसिद्ध ऐतिहासिक पुरुषांचे मोठमोठाले पुतळे स्थापन करण्याची वहिवाट असे, व त्याचप्रमाणें वड्या घराण्यांतूनहि

त्या घराण्यांतील कर्त्या पुरुषांच्या मूर्ति तयार करून ठेवण्याचा प्रघात होता, विशेष प्रसंगीं या पुतळ्यांचा सन्मान करण्यांत येत असे व रोम शहराच्या विजयानंदाचे समयीं तर भव्य छबिन्यांत या पुतळ्यांची गर्दी दृष्टीस पडल्यावांचून रहावयाची नाहीं. यामुळें लोकांना सर्व पिढ्यांतील कर्त्या पुरुषांचें एकदम दर्शन होऊन स्वदेशाचा मूर्तिमंत इतिहास आपल्यापुढें उभा आहे कीं काय असें वाटे व योग्य स्वाभिमान त्यांच्यांत जागृत होऊन थोर पुरुषांचें वंशज म्हणवून घेण्यास लायक होण्याविषयीं ते नेहमीं दक्ष रहात. वेलिंग्टनचा किंवा नेल्सनचा पुतळा लंडन शहराच्या मुख्य व महत्त्वाच्या जागीं बसवून ट्रॅफलगारच्या किंवा वाटर्लूच्या लढाईचे दिवशीं त्यांचा विशेष प्रकारचा सन्मान करण्याचें कारण झालें तरी वरील प्रकारचेंच आहे. नेल्सनची मूर्ति प्रत्यक्ष डोळ्यानें देखून व ट्रॅफलगारचे लढाईचे वेळीं आपल्या देशाच्या त्यानें केलेल्या सेवेबद्दल लोकांकडून त्याचा सन्मान होत आहे असें पाहून कोणा इंग्रजाचे मनांत स्वदेशाची सेवा करीत असतांना प्रत्यक्ष मृत्यूची पर्वा करण्याचें कारण नाहीं, असे विचार आल्यावांचून राहतील? नेल्सन व वेलिंग्टन किंवा क्रॉमवेल यांची चरित्रें इंग्रजी भाषेंत काय कमी लिहिलीं आहेत? पाठशाळांतून त्यांच्या चरित्राचा अभ्यास काय थोडका चालतो? इंग्लंडच्या इतिहासांत त्यांचीं नांवें अजरामर झालीं असतांहि व इतिहासाचा अभ्यास चोहोंकडे एकसारखा चालला असतांहि पुतळे बसवून, तसबिरी काढून, त्यांच्या नांवानें मोठमोठ्या इमारती बांधून, कित्येक संस्थांना त्यांचीं नांवें देऊन, निरनिराळ्या प्रकारांनीं व निरनिराळ्या वेळीं आपल्या ऐतिहासिक थोर पुरुषाचा उत्सव करण्याचा इंग्लंडांत जारीनें उद्योग चाललेला असतो. नेल्सनचें नांव आबालवृद्धाच्या तोंडी झालें पाहिजे. नेल्सनची मूर्ति पाहून सदासर्वदा लोकांचे मनांत राष्ट्रीयत्वाचें वारें भरलें पाहिजे, स्वकर्तव्यदक्षतेचे मनोविकार उसळले पाहिजेत, असा इंग्रजांचा हेतु असल्यामुळेंच

शाळांतून व कॉलेजांतूनच केवळ नेल्सनचें नांव निघालें असतां बस्स आहे असें त्यांना वाटत नाहीं. ज्यानें स्कॉटलंडला राष्ट्रीयत्व दिलें, इंग्लंडच्या महत्त्वाकांक्षी राजाशीं टक्कर मारून स्कॉटलंडची अब्रू बचावली त्या वालेसचा उत्सव करणें स्कॉटलंडांतील मुत्सद्यांना स्कॉटलंडच्या भरभराटीच्या सुरक्षितपणाकरितां अद्यापहि जरूर वाटतें. ज्यानें अमेरिकेंतील युनायटेड स्टेटसला स्वातंत्र्य दिलें त्या वाशिंग्टनचें नांव अमेरिकेंतील लहानथोरांच्या तोंडून ऐतिहासिक महोत्सवामुळेंच पावलो पावलीं निघत आहे, व युनायटेड स्टेटसवर पसरलेल्या लक्षावधि स्मारकामुळें अमेरिकेंतील लोक वाशिंग्टनच्या वेळच्या त्याच्या देशाच्या बाण्यापासून तिळभरहि ढळले नाहींत. शेक्सपियरचें झोंपडें पहाण्यासाठीं ॲव्हन नदीच्या काठीं स्ट्रॅटफर्ड येथें साधारणपणें नेहमीं जत्रा कशी भरलेली असते, लंडन येथील कार्लाईलचे घरांत फिरून त्या तत्त्ववेत्त्याच्या पायाची धूळी ज्या दालनांत नेहमीं पडते तें दालन प्रत्यक्ष पाहून स्वतःस धन्य करून घेण्याकरितां त्या घरवाल्यापुढें बरीच मोटी दक्षिणा टेवण्यास इंग्रज लोक किती उत्सुक असतात, स्कॉट कवीनें स्वतःच्या हातानें लिहिलेल्या चार दोन ओळी आपल्या दप्तरीं असाव्यात म्हणून इंग्रजांची कशी खटपट चाललेली असते, वॉल्फोरसारख्या मुत्सद्यांपासून भाड्यादाखल हातांत पडलेली पावली किंवा चवली इंग्लंडांतील गाडीवाला घरच्या देव्हाऱ्यांत नेऊन ठेवण्यास कसा चुकत नाहीं, नेपोलियनच्या फाटक्या टोपीचा संग्रह करण्याकरितां फ्रान्समधील श्रीमंत लोक रुपयांचे तोड्याच्या तोडे खर्च करण्यास कसे तयार असतात, फ्रेडरिक दि ग्रेट सारख्याचा पुतळा बसवून त्याचा महोत्सव करून त्याचे उपकाराबद्दल उतराई होण्याविषयीं जर्मनीचे बादशहाला व लोकांना किती उत्कंठा वाटते, इत्यादि गोष्टींचा शांतपणें विचार केला असतां शिवरायाची आठवण रहाण्यास व महाराष्ट्रांतील राष्ट्रीयत्वाच्या निर्मल ज्योतीचें तेज मंद न होण्यास

श्रीशिवाजी महोत्सवाची किती आवश्यकता आहे हे वाचकांच्या ध्यानांत येईल. श्रीशिवाजी महाराज एकट्या भोसल्यांचे कुळाचे उन्नतीसाठीं जन्मास आले नाहींत तर महाराष्ट्रासाठीं त्यांचा जन्म होता. मातोश्री जिजाबाई यांचे पोटीं त्यांनीं जन्म घेतला असें म्हणण्यापेक्षां प्रत्यक्ष महाराष्ट्र भूमीच त्यांनीं प्रसवली असें म्हणणें अधिक सयुक्तिक दिसेल. महाराष्ट्राचा अभ्युदय, महाराष्ट्राची भरभराट या सर्वांचा पाया श्रीशिवाजी महाराजांनीं घातला. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांतील व अठराव्या शतकांतील महाराष्ट्राच्या कर्तबगारीचा उगम श्रीशिवाजी महाराजांपासून आहे, किंबहुना दीडशें वर्षांतील महाराष्ट्राच्या इतिहासांत चमकणारे उच्च विचार व उदात्त मनोविकार महाराजांत एकवटले होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. नांव करून गेलेल्या सर्व महाराष्ट्रीयांन्चा श्रीशिवाजी महाराजांचे पोटांत समावेश होत असल्यामुळें महाराजांची आठवण ठेवणें म्हणजे महाराष्ट्रांतील पूर्वीच्या दरोबस्त सर्व थोर पुरुषांचा सन्मानच करण्यासारखें आहे. ते आमचे दिवस निघून गेले, असें ज्या काळाविषयीं आम्हीं दुःखाचा उसासा टाकून बोलतों त्या काळांतील सर्व चांगल्या गोष्टींची श्रीशिवाजीमहाराज प्रत्यक्ष मूर्ति असल्यामुळें त्यांचा उत्सव केला असतां महाराष्ट्राचें नांव चोहोंकडे करणाऱ्या सर्व पूर्वजांचे जरा तरी उतराई झाल्यासारखें होईल व उदार इंग्रजबहादुरांच्या राज्यांत मराठयांचें नांव पुन्हां सर्वतोमुखीं करण्याचा मार्ग आक्रमितांना मनांत उल्हास व उमेद वाटेल.

श्रीशिवाजी महोत्सवावर साधारणपणें दोन प्रकारचे आक्षेप आणण्यांत येतात. (१) पहिला आक्षेप असा कीं, ह्या उत्सवामुळें आमच्या मुसलमान बांधवांना राग येईल व निष्कारण एकीची बेकी होईल. ह्या संबंधानें मुसलमान बंधूंना आमचें नम्रतापूर्वक असें सांगणें आहे कीं, आम्हीं हा जो उत्सव करितों तो श्रीशिवाजीमहाराजांनीं मारलेला अफझुलखान मुसलमान

बधर वाचनालय, सातारा.



होता म्हणून नव्हे, ज्या राज्याचा त्यांनीं पाडाव केला ते मुसलमानी होते म्हणून नव्हे, किंवा ज्या औरंगजेबापासून त्यांनीं विजापूरकरांचा बचाव केला तो औरंगझेब मुसलमानांचा कट्टा अभिमानी होता म्हणून नव्हे. त्यावेळच्या तशा स्थितीमुळें श्रीशिवाजी महाराजांना कांहीं वेळां युद्ध करावें लागलें व कांहीं वेळां त्यांच्याशीं ममतेनें वागावें लागलें. मुसलमानांचा द्वेष किंवा मुसलमानांचा स्नेह ही गोष्ट प्रसंगोपात्त होती. महाराजांनीं त्यांच्याशीं स्नेह केला एवढयाचकरितां किंवा त्यांच्याशीं द्वेष केला एवढयाचकरितां आम्हीं त्यांचा उत्सव करीत नाहीं. महाराजांच्यापूर्वी कित्येकांनीं मुसलमानांचा द्वेष किंवा स्नेह केलेला आहे. त्यांचा उत्सव करावा अशी स्वप्नांत तरी आमच्या कल्पना येते काय ? महाराष्ट्राला उच्च दशेला चढविण्याची महाराजांची पूर्ण इच्छा होती व हा हेतु तडीस नेण्यासाठीं त्यांच्यापाशीं विशाल बुद्धिवैभव, अतर्क्य धर्मनिष्ठा व विलक्षण नीतिमत्ता हे गुण होते. महाराजांचा उत्सव करितांना त्यांनीं महाराष्ट्रासाठीं काय केलें इकडे पूर्ण लक्ष द्यावयाचें, इतर सर्व गोष्टींचा विचार गौण समजावयाचा. वेलिंग्टनचा किंवा नेल्सनचा पुतळा बसविल्यानें फ्रेंच लोकांचा इंग्रजांनीं अपमान केल्यासारखें ज्याप्रमाणें होत नाहीं किंवा वॉलेसचा उत्सव केल्यानें इंग्रजांना जाणून बुजून चिड-विल्याचा आरोप ज्याप्रमाणें स्कॉटलंडावर येत नाहीं, त्याप्रमाणें महाराजांचा उत्सव केल्यानें मुसलमानांना दुखविण्याचा दोषहि महाराष्ट्रीयांस लागत नाहीं. मुसलमानांत कर्ते पुरुष होऊन गेले, मुसलमानांतील थोर पुरुषांची मालिका कांहीं लहान नाहीं. तेव्हां महमदीयांना चांगले दिवस दाखविणा-रांचा त्यांनीं खुशाल उत्सव करावा त्याबद्दल आम्हांस रोष नाहीं. एखाद्याचें चांगलें झालें आणि त्याबद्दल जर त्यानें आनंद प्रदर्शित केला तर परमेश्व-रानें त्याच्यावर मेहेरनजर केली म्हणून तो सुख मानीत आहे असें न मानितां दुसऱ्या एखाद्यावर परमेश्वराची त्याचवेळीं तितकीच कृपा झाली

नाहीं म्हणून तो सुख मानितो असा त्याजविषयींचा लोकांचे मनांत भलताच ग्रह उत्पन्न करून देणें म्हणजे हलकट वृत्तीला हार जाऊन नीचपणाची कमाल करण्यासारखें आहे. ज्या लुटपटीच्या खडकीच्या लढाईमुळें पेशवाईचा नाश झाला त्या लढाईचे स्मरणार्थ दरवर्षी पुणें मुक्कामी इंग्रज बहादूरांचे लष्कराचे छावणींत उत्सव होत असतो. ज्या पलटणीनें त्या लढाईत तलवार गाजविली त्या पलटणींतले त्यावेळचे लोक आतां असण्याचा बिलकुल संभव नाहीं. परंतु त्या नांवाच्या पलटणींतील लोकांना त्यांच्या पूर्वींच्या लोकांच्या कृती नीट समजाव्या व त्यांनीं पूर्वींच्या लोकांच्याप्रमाणें शौर्याचीं कामें करावीं या हेतूनें पेशवाईचे नाशाच्या लढाईचे दिवशीं सदरील पलटणीच्या लोकांचा बहुमान करण्यांत येतो. इंग्रजांना महाराष्ट्राचें राज्य मिळालें या गोष्टीच्या स्मरणार्थ पुण्याचे छावणींत हा वार्षिक उत्सव होतो. ह्या उत्सवासंबंधानें जर पुणेकरांनीं अशी तक्रार केली कीं, किंवा अशी शंका मनांत आणली कीं, हा उत्सव पुणेकरांच्या स्वाभिमानाला मुद्दाम डवचण्याकरितांच करण्यांत येतो तर त्यांची कृति ज्याप्रमाणें हास्यास्पद होईल त्याप्रमाणें श्रीशिवाजी महाराजांचा उत्सव मुसलमानांच्या विरुद्ध आहे असें भासविणारांचीं कृतीहि वेडगळपणाची मानिली पाहिजे. महाराजांचा उत्सव करतांना मुसलमानांच्या संबंधानें आमच्या मनांत कांहींहि वाईट येण्याचें कारण नाहीं. हा उत्सव विशेषतः आमच्याचकरितां आहे, व केवळ गुणांवर लक्ष देणाऱ्या हरएक प्रकारच्या धर्माच्या लोकांसाठीं आहे. (२) ह्या उत्सवावरील दुसरा आक्षेप म्हटला म्हणजे राजद्रोहाचा होय. ह्या संबंधानें आमचे राज्यकर्ते स्वतः या उत्सवास राजद्रोही म्हणण्यास तयार नसतांना मित्री मंडळी आगा ऊच पळून जाण्याची तयारी कां करीत आहे हें आम्हांस समजत नाहीं. उत्सव साजरा करण्यास हजर असणाऱ्या व यथाशक्ति मदत करणाऱ्या कांहीं लोकांवर राजद्रोहाच्या फिर्यादी झाल्या एवढयानें हा उत्सव राजद्रोही

नगर वाचनालय
ता. २०९

रास्त नाहीं. रायगडच्या पहिल्या उत्सवास कांहीं अधिकारी जंगलाचे सबबीवर परवानगी देत नव्हते.पण त्यावेळीं खुद् लार्ड सँढर्स्ट यांनीं व महाराजांना भीति दाखविण्याकरितां केलेल्या लँबसाहेबांचे भाषणांतहि त्या उत्सवाचे कायदेशीरपणाविषयीं कबुली दिली आहे. केसरीवरील खटल्याचे वेळीं सरकारी बॅरिस्टरनें व खुद् जज्जांनींहि ऐतिहासिक उत्सवांना हरकत घेतली नाहीं. महाराजांचें स्मरण जागृत राहिल्यानें जर महाराष्ट्रीयांच्या अंगीं विशेष गुण आले तर इंग्रजांच्या साहाय्यानें व इंग्रजांच्या अनुमोदनानें महाराष्ट्रास मोठेपणा मिळवितां येईल. स्वराज्य व पूर्ण राजकीय स्वातंत्र्य हीं स्वदेशास देणाऱ्या पुरुषाच्या उत्सवानें परकीय राज्यकर्त्यांना वाईट वाटण्याचें कारण नाहीं हें गेल्या वॉलेसच्या उत्सवाचे वेळीं लॉर्ड रोजबरी यांनीं काढलेल्या खालील उद्गारांवरून स्पष्ट होईल. वॉलेसनें तर इंग्रजांचा पराभव करून स्कॉटलंडास स्वातंत्र्य दिलें तेव्हां स्कॉटलंडच्या सांप्रतच्या स्थितींत वॉलेसचा उत्सव करणें बरोबर होणार नाहीं, ह्या आक्षेपासंबंधानें बोलतांना लॉर्ड रोजबरी म्हणाले, ज्या लढाईंत स्कॉटलंडचे पराभूत झालेले शत्रू इंग्रज होते त्या लढाईच्या जयाबद्दल एवढा उत्सव करणें हें काळास अनुरूप मुत्सद्दीपणाचें व स्थितीस साजणारें नाहीं असें त्याचें ( आक्षेपकाचें ) मत आहे. स्टॉर्लिंगच्या लढाईचा किंवा सर वुइल्यम वॉलेस याचा उत्सव केल्यानें इंग्लंडवरील आमचें प्रेम व दोस्ती यांना कलंक लागतो असें मला वाटत नाहीं × × × स्टॉर्लिंगच्या लढाईची आठवण व ह्या लढाईंत जय मिळवणाऱ्या वॉलेसची कीर्ती हीं आम्हांस प्रिय वाटतात, ह्याचें कारण आम्हीं इंग्रज सैन्याचा पराभव केला हें नव्हे तर ह्या लढाईपासून आमच्या राष्ट्राचें राजकीय स्वातंत्र्य स्पष्टपणें नमूद करण्यांत आलें; म्हणून इंग्रज-स्कॉचमन यांनीं मिळून हा उत्सव आनंदानें केला पाहिजे, व या विभूतीस मान दिला पाहिजे. कारण त्यानें स्टॉर्लिंगच्या लढाईच्यावेळीं स्कॉटलंड

२७

देशास ऊर्जित दशेस आणलें आणि स्कॉटलंडला जर चांगले दिवस दिसले नसते तर ग्रेट ब्रिटनच्या साम्राज्याला सांप्रतची स्थिती कधींहि आली नसती. लॉर्ड रोजबरीसाहेबांप्रमाणेंच असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं कीं, शिवाजी महाराजांनीं महाराष्ट्रास राष्ट्रीयत्व देऊन ऊर्जित दशेस आणिलें व त्यांच्या वेळेपासून आमच्या राष्ट्राचें जीवितास खरा प्रारंभ झाला. महाराजांनीं जर आम्हांस चांगले दिवस दाखविले नसते तर इंग्रजांच्या छत्राखालीं आमची पूर्वीच्यापेक्षांहि अधिक भरभराट होऊन आमच्याबरोबर इंग्रजांचें कल्याण होण्याची भावी आशाच राहिली नसती.

# * हिंदुस्थानचे नवीन गव्हर्नर जनरल नामदार मि. कर्झन

कलकत्त्याचे लाटसाहेब लॉर्ड एल्जिन यांची कारकीर्द लवकरच संपावयाची असून त्यांचे मागून त्यांचे जागीं कोणाची नेमणूक होणार याविषयीं आज बरेच दिवस जारीनें वाटाघाट सुरू होती. हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलचे जागीं नेमलेल्या मनुष्याचे हातीं येथील तीस कोट प्रजाजनांचें सुखदुःख असल्यामुळें आमचे नवीन ग० जनरल कोण होणार याविषयीं लोकांत विशेष वाटाघाटी सुरू होणें सहाजिक आहे. लॉर्ड रिपन यांच्यानंतर येथें झालेल्या ग. जनरलांत पुढचा मागच्यास बरा म्हणावयास लावतो, अशी स्थिति दृष्टीस पडत असल्यामुळें कोणत्या गृहस्थाची या महत्त्वाचे जागेवर नेमणूक होणार या गोष्टीकडे सर्वांचें विशेष लक्ष लागून राहिलें होतें. शिवाय दहा पंधरा वर्षांपूर्वीपेक्षां हिंदुस्थानच्या सभोंवतीं आज मितीस नवीन व महत्त्वाचे प्रश्न उद्भवले असल्यामुळें, व खुद्द हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत सरकारास व प्रजाजनांस अतर्क्य व कल्पनातीत गोष्टींनीं वेढिलेलें असल्यामुळें इंग्लंडला, किंबहुना सर्व युरोप खंडाला दिवसानुदिवस ही गोष्ट फारच महत्त्वाची होत चालली आहे. सुवर्ण भूमि म्हणून पुराणांतरीं गाजलेला देश आज कंगाल होत चालला आहे, हिंदुस्थानच्या तिजोरींत विशेष शिल्लक नाहीं इतकेंच नव्हे, तर विद्यावृद्धि, शेतकऱ्यांस योग्य सवलती व मदत, औद्योगिक सुधारणा, इत्यादि अत्यंत आवश्यक गोष्टींतहि पराकाष्ठेची काटकसर करून प्लेगसारख्या राष्ट्रीय संकटाच्या खर्चाचा बोजा उचलण्यास सरकारपाशीं विशेष दम राहिलेला नाहीं. हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीविष-

---

* केसरी १६ ऑगस्ट १८९८

यींचेच प्रश्न केवळ आमच्या नवीन ग० जनरलापुढें यावयाचे नसून राजनिष्ठ सुशिक्षितांच्या योग्य महत्त्वाकांक्षेस निष्कारण आळा घालणाऱ्या राजद्रोहाच्या नवीन कायद्याची काय वाट लावावयाची याचाहि त्यांना उलगडा करावा लागेल. सरहद्दीवरील लढाईचें प्रकरण नवीन लाटसाहेबांपुढें मूर्तिमंत उभें रहाणार व त्याबरोबरच हिंदुस्थानांत वावरत असलेल्या व सरकारचे तिजोरींतहि अलिकडे वरचेवर दिसूं लागलेल्या अक्काबाईकडे नवीन लाटसाहेबांची दृष्टि गेल्यावांचून रहाणार नाहीं. वरील प्रकारच्या अनेक कारणांमुळें हिंदुस्थानच्या राजमुकुटाच्या आंत सध्यां तीक्ष्ण टोंकांचे बरेच नवीन कांटे लाटसाहेबांचे मस्तकास टोंचण्यास सज्ज झाले आहेत; तेव्हां या सर्व काट्यांचा मार सोसून शांतपणें हिंदुस्थानचा राजमुकुट मस्तकावर धारण करणारा पुरुष शोधून काढण्यांत लॉर्ड सॅलिस्बरी साहेबांना बरेच दिवस लागावेत हें साहजिक आहे. कोणी म्हणत लॉर्ड क्रोमर ग. जनरल होणार, कोणी म्हणत प्रधान मंडळापैकीं द्रव्याच्या जाचणुकींत असलेल्या लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टनसाहेबांना हा बहुमान मिळणार, कोणी तर लॉर्ड बॉल्फर यांची या जागीं नेमणूकहि करून टाकली होती. पण अखेरीस लॉर्ड सॅलिसबरी यांनीं त्यांच्या हाताखालीं प्रधानमंडळांत काम करणारे व त्यांच्या हुकुमानें जगांतील इतर राष्ट्रांच्या सर्व व्यवहारावर नजर ठेवणारे नामदार मि. कर्झन यांच्याच हातीं हिंदुस्थानचा राजदंड दिला.

नामदार कर्झनसाहेब हे अगदीं तरुण म्हणजे एकुणचाळीस वर्षांचे आहेत. ह्यांचें घराणें इंग्लंडांतील बड्या घराण्यांपैकीं असून कालांतरानें ते लॉर्ड होऊन लॉर्ड लोकांच्या सभेंत त्यांचा प्रवेश होईल. येत्या डिसेंबर महिन्यांत ते हिंदुस्थानांत येऊन दाखल होण्यापूर्वीच त्यांना कदाचित् लॉर्ड बनविण्यांत येईल. हे चांगले विद्वान असून युनिव्हर्सिटीच्या परीक्षेंत त्यांनीं चांगला मान मिळविला आहे. फुरसतीचेवेळीं सर्व एशियाखंडाचें किंबहुना

समुद्रवलयांकित सर्व पृथ्वीचें सार्वभौम राजपद कोणत्या राष्ट्राचे हातीं जाण्याचा संभव आहे याचा नीट विचार करून मुख्यतः या राजकीय दृष्टीनेंच प्रवास करीत असतांना त्यांनीं एशिया खंडाचें नीट परीक्षण केलें आहे. त्यांनीं आपलीं मतें 'इराण' (Persia) 'मध्य एशियांतील रशिया' (Russia in Central Asia) व 'अत्यंत पूर्वेकडील देशांसंबंधाचे प्रश्न' (Problems of the Far East) या तीन पुस्तकांत दिलीं आहेत. या तीन पुस्तकांपैकीं तिसऱ्या पुस्तकाची नवीन आवृत्ति अगदीं अलीकडे म्हणजे १८९६ सालींच प्रसिद्ध झालेली असून त्यात नमूद केलेल्या मतांना बहुतेक अंशीं अनुसरूनच ना. कर्झन साहेब इंग्लंडचा इतर राष्ट्रांशीं व्यवहार चालवीत होते. इराण, रशिया, द. चीन यांसंबंधाच्या प्रश्नांना अलीकडे विलक्षण महत्व आलेलें पाहून, व इंग्लंडांत राहून ज्या गृहस्थांनीं इराण, रशिया व चीन या राष्ट्रांशीं इंग्लंडच्या व्यवहाराचा कारभार पाहिला त्याच मुत्सद्यांना हिंदुस्थानांत पाठविलेलें पाहून, ना. कर्झनसाहेबांना हिंदुस्थानांतील दुबळ्या प्रजाजनांच्या सांप्रतच्या दुःखाकडे व सांपत्तिक स्थितीकडे विशेष लक्ष पुरविण्याकरितां पाठविले नसून सर्व पृथ्वीची राज्यसत्ता आपल्या मुठींत असावी या इंग्लंडच्या रावणी महत्त्वाकांक्षेस हिंदुस्थानच्या रक्तानें व पैशानें फलद्रूप करण्याकरितां पाठविलें असावें, असें वाटतें. ना. कर्झनसाहेबांच्या पुढील पांच वर्षांत आमची सांपत्तिक स्थिति सुधारावयाची नाहीं; आमच्या शिक्षणाकडे फारसें लक्ष पोंचविलें जाणार नाहीं; औद्योगिक सुधारणेचा प्रश्न कानाकोपऱ्यांत पडून राहील; नेटिव्हांस नवीन हक्क मिळण्याचें एका बाजूस राहो, पण जुने हक्क हळूहळू काढून घेतले जातील; करांचें ओझें कमी होण्याऐवजीं जास्ती होईल; लष्करी खर्च हल्लींहूनहि अतोनात वाढेल; परशत्रूशीं लढण्यांत किंवा लढाईची तयारी करण्यांत आणि ह्या किंवा त्या राष्ट्राला दरडावून चूप बसावयास लावण्यांत हिंदु-

स्थानांतील अस्सल रक्ताचा व सर्व एशिया खंडभर इंग्लंडच्या इभ्रती-करितां, इंग्लंडच्या बडेजावीकरितां, इंग्लंडच्या हौसेकरितां सडा घालण्यांत येईल; व गरीब रयतेपासून कसेबसे गोळा केलेले कोट्यवधि रुपये हिंदुस्थानाबाहेरील प्रदेशांत पाण्याप्रमाणें खर्च करण्यांत येतील. आमची ही अटकळ कदाचित् खोटी ठरेल व ती खोटी ठरावी अशी आमची मनापासून इच्छाहि आहे. परंतु ना. कर्झन साहेबांचीं प्रसिद्ध झालेलीं मतें व आजपावेतों लोकांपुढें आलेली कृति, ही पाहिलीं म्हणजे वरील प्रकारची अटकळ करणें म्हणजे गैरशिस्त आहे असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं. हिंदुस्थानच्या प्रजाजनांच्या सुखशांतीकडे लक्ष देऊं नये, त्यांचें कांहीं का होईना आपली चंगळ चालली म्हणजे पुरे, अशा प्रकारची अप्पलपोटेपणाचीं मतें ना. कर्झन-साहेबांचीं नाहींत इतकेंच नव्हे, तर सर्व आशियाखंडाबद्दल व एशिया-खंडांतील लोकांबद्दल त्यांचे मनांत एक प्रकारची विशेष पूज्यबुद्धि आहे. परंतु इंग्लंडला एशियांतील सर्व राष्ट्रांच्या इतकेंच नव्हे तर जगांतील सर्व राष्ट्रांच्या छातीवर बसवून सार्वभौमत्वाचा झेंडा सर्व जगभर इंग्रजांना नाचवावयास सांपडणें अगदी शक्य आहे, व तसा चमत्कार दाखवून जगांतील सर्व मानवी प्राण्यांना थक्क करून सोडण्याची शक्ति आजच्या इंग्रजांच्या हातीं आहे, अशा प्रकारची फाजील व अश्लाघ्य महत्त्वाकांक्षा त्यांच्या हाडारक्तांत पूर्णपणें भिनून गेली असावी, असें त्यांच्या पुस्तकांवरून दिसत असल्यामुळें, त्यांच्या हृदयांत दणदणत असलेल्या या उत्कट इच्छेच्या नगाऱ्यापुढें आम्हां प्रजाजनांच्या सुखासमाधानाच्या टिमकीचा आवाज त्यांना ऐकूं जाणार नाहीं, अशी भीति वाटते. ना. कर्झन साहेबांच्या वरील प्रकारच्या विशिष्ट मतांचें परीक्षण करण्याचें आम्हीं योजिलें आहे, यावरून आमचीं वरील विधानें साधार कितपत आहेत हें वाचकांचे ध्यानांत येईल.

ना. कर्झन साहेबांचें कोणतेंहि पुस्तक हातीं घ्या, पुस्तकाचे अगदीं प्रारंभापासून तों अगदीं शेवटपर्यंत त्यांचें आवडतें मत ठाम व स्पष्ट

नगर वाचनालय, सातारा.



शब्दांनीं वाचकांपुढें वारंवार नाचविलेलें दृष्टीस पडेल. इराणासंबंधानें ते बोलत असोत, मध्य एशियांतील अफाट राज्यविस्तारासंबंधानें त्यांची लेखणी चाललेली असो, मोडकळीस आलेल्या कोरिआ, चीन व सयाम यांच्या डब-घाईच्या स्थितीचें ते वर्णन करीत असोत, इंग्लंडनें सर्व जगाचें सार्वभौमत्व पटकवावें ही एक कल्पना मूर्तिमंत वाचकांपुढें उभी रहाते व सारासार-विचाराचें नवें दडपण फेंकून देऊन वरील अत्युत्कट महत्वाकांक्षेनें पुस्तकां-तील प्रत्येक पानावर आपला छाप स्पष्टपणें उमटविला आहे असें वाटतें. पुस्तकाची भाषा इतकी चटकदार व जोरदार आहे कीं, राजकीय प्रश्नांचा विचार शांतपणें व निर्विकार मनानें करणाऱ्या मुत्सद्यानें हें पुस्तक लिहिलेलें नसून राष्ट्राचीं मनें खवळून सोडण्याकरितां व इंग्लंडच्या महत्त्वाकांक्षेला पूर्णपणें जागृत करण्याकरितां पुढें आलेल्या उच्छृंखल देशाभिमानाचीच ही कृति असावी असें स्पष्ट दिसतें. पुस्तकांत विचारापेक्षां मनोविकारांचें प्राबल्य आहे व त्यावरून ग्रंथकर्त्याचें मन किती उतावीळ, अधीर, व अतर्क्य महत्वाकांक्षेने पेटलेलें असावें हें नीट लक्षांत येतें. आमच्या नवीन ग. जनरल साहेबांनीं अगदीं अलीकडे केलेलें ताजें पुस्तकच घेऊं या. "Problems of the Far East" (अत्यंत पूर्वेकडील देशांचे प्रश्न) हें पुस्तक प्रथम १८९४ सालच्या जुलै महिन्यांत प्रसिद्ध केलें व १८९६ सालीं त्या पुस्तकाची चौथी आवृत्ति निघाली. १८९४ सालापासून ९६ सालापर्यंत या पुस्तकाचे कर्त्याला महाराणी सरकारचे प्रधानमंडळांत बरेंच महत्त्वाचें काम होतें, व पुस्तकांत ज्या प्रश्नांची चर्चा त्यांनीं केली आहे त्याच प्रश्नांचा उलगडा करण्याचें काम महाराणी सरकारचे सेवक या नात्यानें त्याजकडेस होतें. सर्वांत अवघड अशा राजकीय कामांचा प्रत्यक्ष अनुभव येत असतांहि ना. कर्झन साहेबांच्या तारुण्यांतील महत्वाकांक्षेचा खळखळाट नवीन आवृ-त्तींत किमपिहि कमी झालेला नसून कल्पनाशक्तीस नवीन पंखें फुटलेलीं

दिसत आहेत व तिची भरारी अधिक उंच होत चालली आहे. पूर्वी अनुमानाच्या जोरावर जीं विधानें करण्यांत आलीं तींच प्रत्यक्ष अनुभवानें खरी ठरूं पहात आहेत असें ना. कर्झन साहेबांचें आपल्या वाचकांस निक्षून सांगणें आहे. सर्व एशियाखंडाचें राज्य इंग्लंडच्या पायापाशीं लोटांगण घालीत येत आहे व घरीं चालून येत असलेल्या ह्या लक्ष्मीस इंग्लंडनें नको म्हणतां कामा नये, व पायाजवळ पडलेल्या एशिया खंडाचें राज्यमुकुटास वर उचलून घेऊन स्वतःचे मस्तकावर ठेवण्याकरितां इंग्लंडनें कंबर बांधली पाहिजे असें इंग्लंडच्या लोकांना ना. कर्झन साहेबांचे पुस्तकाच्या प्रारंभीं, शेवटीं, मध्यें, चोहोंकडे एकच सांगणें आहे. फार पूर्वेकडील देशांविषयींचे प्रश्न हें पुस्तक कर्त्यानें कोणाला अर्पण केलें आहे, एवढी गोष्ट जरी पाहिली तरी ग्रंथकर्त्याच्या मनांत उचंबळत असलेल्या मनोविकारांचा उजेड वाचकांचे डोक्यांत लख्खन पडल्यावांचून रहात नाहीं. वरील पुस्तक वाचावयास लागलें म्हणजे अगदीं प्रारंभीं खालील वाक्य दृष्टीस पडतें:—

"To those who believe that the British Empire is, under Providence, the greatest instrument for good that the worldhas seen, and who hold with the writer, that its work in the Far East is not yet accomplished, this book is inscribed"—

"परमेश्वराचे कृपाछत्राखालीं असलेलें इंग्रजांचें साम्राज्य म्हणजे पृथ्वीतलावर दृष्टीस पडणारी व जगाच्या कल्याणाकरितां उत्पन्न झालेली सर्वांत प्रचंड शक्ति होय असें ज्यांचें मत आहे, आणि फार पूर्वेकडील देशांत या शक्तीचें कार्य अद्याप संपूर्ण झालेलें नाहीं असें ग्रंथकर्त्याप्रमाणें ज्यांना वाटतें त्यांना हें पुस्तक समर्पण केलें आहे." इंग्लंडनें ज्याप्रमाणें हिंदुस्थान काबीज केलें, एशियाखंडाचें नाक आपण दाबून धरलें त्याप्रमाणें सर्व एशिया खंडावर वर्चस्व मिळविण्यास इंग्लंडनें आतां मागेंपुढें पहातां कामा नये हें ना. कर्झन साहेबांचे पुस्तकांतील सूत्रवाक्य होय, असें वरील समर्पण-लेखा-

वरूनहि वाचकांचे ध्यानांत आल्यावांचून रहाणार नाहीं. खरें राजसुख उपभोगण्याकरितां पाश्चिमात्यांना ईश्वरानें उत्पन्न केलें आहे व पौर्वात्यांनीं फार झालें तर खूप काबाडकष्ट करून सुखसमाधानांत रहावें, पण राजवैभवाचा वांटा पाश्चिमात्यांपाशीं मागण्याची हल्लीं स्वतंत्र असलेल्या चीनसारख्या राष्ट्राचीहि प्राज्ञा नाहीं, असें ना. कर्झनसाहेबांचें ठाम मत आहे. चीनची सुधारणा करण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी चीनला परतंत्र हें झालेंच पाहिजे व पाश्चिमात्यांच्या अधिकाराचें निशाण चीनच्या स्वतत्र भूमीवर रोवलें जाणारच जाणार, असें त्यांचें निश्चयात्मक मत आहे. चीन देशाचें पुनर्जीवन झालें व चीनचें नशीब विलक्षण रीतीनें उघडलें तर, फार झालें तर "फार पूर्वेकडील पिवळा पट्टा, व्यापाराच्या लुटींतील बराच भाग व काबाडकष्टाबद्दल उत्तम वेतन गौरकायांपासून हिसकावून घेईल, परतु तो पट्टा कधी काळीं एशियांतील साम्राज्याची किल्ली हातांत धरण्याकरितां खरोखर सरसावेल, किंवा पाश्चिमात्य जातींची सत्ता झुगारून देण्यास तयार होईल हें शक्य आहे, असें मला अगदीं वाटत नाहीं."

(The yellow belt in the Far East may conceivably snatch from the white the bulk of the spoils of commerce, and the best of the wages of toil. But that it will very seriously clutch at the keys of Empire or challenge the racial dominion of the West, I am quite unable to believe. Pp-411-12Problems of the Far East). हल्लीं पुढें सरसावलेल्या प्रत्येक कामांत इंग्लंडचें अनुकरण करूं पहाणाऱ्या जपाननेंहि एशियाच्या राज्याकरितां पाश्चिमात्यांशीं टक्कर देण्याचें स्वप्नींहि आणतां कामा नये. पाश्चिमात्य राष्ट्रें अंगावर टाकतील तेवढा तुकडा खाऊन जपाननें गुपचुप राहिलें पाहिजे. जपानपाशीं असावयास पाहिजे तेवढें मनुष्यबळ नाहीं व पुढेंहि कित्येक पिढ्यापर्यंत ती शक्ति जपानास येण्याचा संभव नाहीं. (The Japanese have

not, and are not likely for many generations to possess the requisite numbers. P. 412 ibid ). याप्रमाणें चीन व जपान यांची स्थिति आहे तेव्हां आशियाचें वैभव युरोपियन राष्ट्रांपैकीं कोणाच्या घशांत उतरणार हा प्रश्न साहजिकपणें पुढें येतो. त्याचें उत्तर ना. कर्झन-साहेब येणेंप्रमाणें देतात. "एशियाखंडाच्या साम्राज्याच्या तराजूचा कांटा अधिकच हिंदुस्थानच्या राजसत्तेच्या हातीं आहे असें मला वाटतें. सर्व जगाची मालकी संपादण्याची गुरुकिल्ली इंग्रजांपाशीं आहे. मात्र त्यांना ही गोष्ट समजावयास पाहिजे." ( The true fulcrum of Asiatic dominion seems to me increasingly to lie in the Empire of Hindustan. The secret of the mastery of world, is, if only they knew it, in the possession of the British people.—P. XV Preface, ibid ). एशिया खंडांत सर्व महत्त्वाच्या राष्ट्रांच्या माथ्यावर हिंदुस्थान असल्यामुळें तेथील पैशाच्या व रक्ताच्या जोरावर इंग्लंडला सर्व आशिया पादाक्रांत करतां येईल हें गुरुज्ञान ना. कर्झन साहेबांनीं आपल्या लेखांनीं इंग्रजांना शिकविलें व या दिशेनें कितपत प्रयत्न करूं पहातां येईल याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्या-करतांच हिंदुस्थानांत त्यांना पाठविण्यांत येत आहे असें वाटतें. इराण, अफगाणिस्तान, मध्य एशिया, सयाम, चीन व कोरिया या देशांशीं हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या राज्याचा कितपत संबंध आहे व त्या संबंधानें आमच्या नवीन लाटसाहेबांचीं काय मतें आहेत या विषयींचा विचार पुढील अकीं करूं.

——

# * हिंदुस्थानचे नवीन गव्हर्नर जनरल नामदार मि. कर्झन

---

### नंबर २

आजच्या जगाचे स्थितींत इंग्लंड इतर सर्व राष्ट्रांहून अधिक बलाढ्य कसें आहे, हिंदुस्थान देश इंग्लंडच्या हातांत असल्यामुळें सर्व आशिया खंडाला वेसण घालून सर्व पृथ्वी पादाक्रांत करणें इंग्लंडलाच कसें शक्य आहे,–इत्यादि विषयांसंबंधानें नामदार मि. कर्झन यांचीं मतें गेल्या खेपेस आम्हीं आमचे वाचकांपुढें मांडलीं आहेत. हिंदुस्थान देशांतील इंग्लंडचें वर्चस्व कायम राखण्याकरितां, व हिंदुस्थानासभोंवारच्या सर्व देशांस आपल्या अंमलाचे जाळयांत पकडण्याकरितां, इंग्लंडनें काय काय केलें पाहिजे, आणि समुद्रावर तरंगणाऱ्या लढाऊ किल्ल्यांच्या म्हणजे प्रचंड आरमाराच्या साहाय्यानें व हिंदुस्थानचे जिवावर इंग्लंडला काय काय करितां येईल, या संबंधानें ना. कर्झन साहेबांच्या मतांचें या खेपेस दिग्दर्शन करण्याचें योजिलें आहे. रशियानें मध्य एशियांत प्रवेश केला, व इराण, अफगाणिस्थान, पामीर, तिबेट, चीन, कोरिया या राष्ट्रांच्या उत्तर सीमेपर्यंत आपली राज्यसत्ता नेऊन भिडविली याबद्दल ना. कर्झन साहेब रशियाला दोष देत नाहींत. पश्चिमेकडील राष्ट्रें सुधारलेलीं व पूर्वेकडचीं अडाणी आणि रानटी,–तेव्हां अडाण्यांना जिंकून सुधारणेचा झेंडा त्यांच्या छातीवर रोवणें, हें सुधारणेचें आदि कर्तव्य असल्यामुळें रशियानें उत्तर आशियांत व मध्य आशियांत जे प्रकार केले ते शिष्टसंमत व प्रशंसनीयच होत–अशा प्रकारें रशियाचे ना. कर्झन साहेबांनीं प्रांजलपणानें पोवाडे गाइले आहेत. कोरिया, चीन, सयाम, अफ-

---

* केसरी, ता. २३ ऑगस्ट १८९८.

गाणिस्थान व इराण या देशांतील अडाणीपणा काढून टाकून युरोपचें पांढरे पाय त्या भूमीला लावून त्यांची सुधारणा करण्याचा रशियानें प्रयत्न चालविलेला पाहून मात्र ना. कर्झन साहेबांना रशियाची फाजील महत्वाकांक्षा, खोटीनाटी व तिरस्करणीय राजनीति व जुलमी अंमल हीं सर्व दिसूं लागलीं! सर्व आशिया खंडावर युरोपचें राज्य होणारच होणार असेंच जर पौर्वात्यांच्या फुटक्या नशिबांत लिहिलेलें असलें, तर रशियाचे अस्वलापेक्षां इंग्लंडचा सिंह फार उमदा व आदरणीय, हें कोणीहि कबूल करील; पण मध्य आशियांत सुधारणा नेण्याबद्दल रशियाची पाठ थोपटणारांनीं दक्षिण आशियाकडे रशियानें लक्ष पोंचविल्याबरोबर त्यांजवर गुरगुरावें हें जरा सयुक्तिक दिसत नाहीं; अथवा रशियाचें सुधारणेचें काम इंग्लंडच्या सुधारणेच्या जवळ जवळ येत चालल्यामुळें 'याचको याचकं दृष्ट्वा श्वानवद् गुर्गुरायते' अशांतला प्रकार दृष्टीस पडावा यांत कांहीं नवल नाहीं. असो. उत्तर इराणांत रशियाचें प्रस्थ माजत चाललें आहे, व ती आगगाडी मध्य एशियांतून पार निघून जाऊन चीनच्या उत्तर सीमेवरून मंच्यूरिया प्रांतापर्यंत थडकली असून दोन तीन वर्षांत रशियानें नवीन मिळविलेल्या चिनांतील पोर्ट ऑर्थर बंदरापर्यंत ही वाग जाऊन भिडेल. मग इराण, अफगाणिस्तान, चीन व कोरिया, यांपैकीं कोणत्याहि राष्ट्रांत कोणत्या पाहिजे त्या वेळेला रशियाला लाखों सैन्य उतरवितां येईल. द्वारकेभोंवतीं श्रीकृष्णाचें जसें सुदर्शन फिरत होतें त्याप्रमाणें एशिया खंडांतील सर्व राष्ट्रांच्या सभोंवतीं उत्तरेकडून रशियाची आगगाडी व दक्षिणेकडून समुद्रावर इंग्लंडचें आरमार ही दोन्हीं मिळून फिरत आहेत. मात्र सुदर्शन द्वारकेच्या संरक्षणाकरितां होतें आणि एकुणिसाव्या शतकांतील वर निर्दिष्ट केलेल्या प्रचंड दोन शक्ती एशिया खंडाचा स्वाहा करण्यासाठीं आपल्या भक्ष्याचे सभोंवतीं घिरट्या घालीत आहेत. आगगाडीच्या साहाय्यानें एशियांतील स्वतंत्र राष्ट्रांस जर रशियास वचक दाखवितां आला तर तीच गोष्ट आरमाराचा बाऊ दाखवून इंग्लंडला साध्य होण्याजोगी आहे.

नगर वाचनालय,



तेव्हां अर्थात् रशियाची आगगाडी व इंग्लंडचें आरमार यांमध्यें ही झुंज आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मध्य एशियांत रशियाच्या अतर्क्य तयारीचा रोंख अखेरीस सर्व जगाचें रत्नभांडार म्हणून नांवाजलेला हिंदुस्थान देश काबीज करण्याकडे आहे काय, या प्रश्नाचें उत्तर ना. कर्झन साहेब नकारात्मकच देतात. इंग्लंडपासून हिंदुस्थान हिसकावून घेणें रशियाला शक्यच नाहीं असें त्यांचें मत आहे. रशियानें जर हिंदुस्थान देश काबीज केला तर ' व्यापारी मंडळीनें हिंदुस्थान देश जिंकला ही इतिहासांत चमत्कार म्हणून समजली जाणारी गोष्ट रशियाच्या कृतीशीं तुलना करतांना लहान मुलाच्या खेळासारखी भासेल. जगानें आजपर्यंत पाहिली नाहीं अशा प्रकारची भयंकर व दिरंगाईची लढाई यामुळें उपस्थित होईल, आणि जो नाश बहुतकरून होणार नाहीं, व झाला असतां खुद्द हिंदुस्थानच्या नाशापेक्षांहि ज्याचे परिणाम मानवी प्राण्यांवर अधिक भयंकर होतील, असल्या इंग्रजांच्या सत्वाच्या नाशाशिवाय ही गोष्ट घडून येणें शक्य नाहीं '

( It would be an achievement compared with which the acquisition of India by a trading Company, in itself one of the phenomena of history,-would be reduced to child's play, it would involve the most terrible and lingering war that the world has ever seen; and it could only be effected by a loss most unlikely to occur and more serious in its effects upon the human race than that of India itself, namely the loss of the fibre of the British people.) ना. कर्झनसाहेबांच्या कुरेंबाज उद्गारांकडे वाचकांनीं विशेष लक्ष पोहोंचवावें अशी आमची सूचना आहे. हिंदुस्थान देश काबीज करणें रशियाला जर शक्यहि नाहीं तर मध्य एशियांत रशियाची एवढी खटाटोप कां चालली आहे, या प्रश्नाचें उत्तर नामदारसाहेब येणेंप्रमाणें देतात. युरोपांत सुलतानापासून कॉन्स्टॅन्टिनोपल घेऊन बॉस्फोरसच्या सामुद्र-

धुनीनें भूमध्यसमुद्रांत प्रवेश करावयास मिळावा अशी रशियाची महत्त्वाकांक्षा असल्यामुळें " एशिया खंडांत इंग्लंडला गुंतवून युरोपांत इंग्लंडला कांहीं गडबड करूं न देणें हा थोडक्यांत रशियाच्या राजनीतीचा गड्डा आहे. "

(To keep England quiet in Europe by keeping her employed in Asia, that briefly put, is the sum and substance of Russian policy—Russia in Central Asia ). म्हणजे याचा अर्थ असा कीं, हिंदुस्थान देश काबीज करून हिंदुस्थानावर कायमचें राज्य करण्याच्या इराद्यानें जरी रशिया हिंदुस्थानकडे वळलेला नसला, तथापि युरोपांत किंवा एशियांत कोठेंहि कोणत्याहि कारणामुळें रशियाची झुंज जुंपल्यास, इंग्लंडला टोला मारण्याकरितां व भीतीनें गांगरून सोडण्याकरितां, निव्वळ एवढ्या हेतूनें तरी रशिया हिंदुस्थानवर चाल करून येण्यास चुकणार नाहीं. मी म्हणतों तसें मुकाट्यानें ऐका नाहींतर हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीकडे माझें सैन्य रवाना झालेंच,अशा प्रकारच्या बागुलबोवाची भीति रशिया इंग्लंडला दाखवील च या भीतीस भीक घालण्याचें कारण राहू नये,म्हणूनच सरहद्दीवर हिंदुस्थान सरकारची एवढी जय्यत तयारी चालली आहे. अफगाणिस्तानचे सांप्रतचे हुषार व धोरणी अमीर जिवंत असेतों रशिया अफगाणिस्तानांत ढवळा-ढवळ करील अशी भीति बाळगावयास नको, पण अमीर साहेब वयोवृद्ध असून केव्हां मरतील याचा नेम नाहीं.त्यांच्या मृत्यूनंतर गादीवर कोणी बसावयाचें याचा तंटा लागेल व हा तंटा मिटविण्याचे मिषानें रशिया अफगाणिस्तानांत प्रवेश करील. युरोपांत लढाई उपस्थित झाल्यामुळें किंवा चीन देशांतील भांडणामुळें किंवा अमीरसाहेबांच्या मृत्यूमुळें, या तिन्हींपैकीं कोणत्या तरी एका कारणानें रशियाशीं इंग्लंडला टक्कर देणें भाग आहे. रशियाचें सामर्थ्य, रशियाची शक्ति, व रशियास इतर गोष्टींची अनुकूलता इतकी जबरदस्त आहे कीं, भावी युद्धाचे वेळीं रशिया अगावर चाल करून येईल, पण इंग्लंडला उलट चाल करून न जातां वाट अडवूनच बसणें भाग पडेल.

अफगाणिस्तानांत जाऊन रशियाची वाट अडवितां यावी म्हणूनच सरहद्दीवरील कडव्या पठाणांना बगलेंत मारण्याचा, निदान त्यांनीं रशियास मिळूं नये व इंग्लंडच्याविरुद्ध वागूं नये इतक्या पुरतें त्यांना दाबांत आणण्याचा, हिंदुस्थान सरकारचा प्रयत्न चालला आहे. आणि जोंपर्यंत अफगाणिस्तानांत जाऊन काबूल, गिझनी, कंदाहार हा पट्टा अडवून, अगावर चालून येणाऱ्या रशियाच्या सैन्याच्या लाटेस मागें परतविणें इंग्लंडला भाग आहे तोंपर्यंत सरहद्दीवरील पठाणांच्या भांडणाचा कायमचा सोक्षमोक्ष केल्याशिवाय हिंदुस्थान सरकारला गत्यंतर नाहीं, असेंहि ना. कर्झनसाहेबांनीं सरहद्दीवरील प्रकरणासंबंधानें पार्लमेंटांत वादविवाद चालला असतांना स्पष्टपणें बोलून दाखविलें आहे. हिंदुस्थानची खरी हद्द सोडून अटक ओलांडून अफगाणिस्तानांत जाऊन तेथें रशियास थोपवून धरण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां रशियास पुढें येऊं देऊन सिंधु नदीचें काठावर रशियाशीं दोन हात केले असतां कोठें बिघडणार आहे, या प्रश्नाचें उत्तर सदर वादविवादाचे वेळीं ना. कर्झन साहेबांनीं येणेंप्रमाणें दिलें आहे:–' लॉरेन्स साहेबांच्या पद्धतीचें पुनरुज्जीवन न करण्याचें दुसरें एक कारण आहे. त्यामुळें हिंदुस्थानवर कोणता परिणाम होईल हें पाहिलें पाहिजे. सिंधु नदीचे तीरावर आम्हीं बसून तेथें आमचा नाश करण्याकरितां चाल करून येणाऱ्या शत्रूची आम्हीं वाट पहात बसावें असें म्हणणें विरुद्ध पक्षाचें मडळांत सोपें आहे, पण असें करण्याची कोणत्या सरकारची छाती होणार आहे ? अशा स्थितींत हिंदुस्थानचे लोक शांत राहून कांहीं गडबड करणार नाहींत याबद्दल कोणतें सरकार हमी देईल ? मला असें म्हणण्यास बिलकूल दिक्कत वाटत नाहीं कीं, बाहेरून स्वारी करण्यापासून आमचें सरक्षण करणाऱ्या लॉरेन्स साहेबांच्या या धोरणाचें आश्चर्यकारक पुनरुज्जीवन करून परीक्षा पहाण्याची संधी आम्हांस येणार नाहीं. कारण हिंदुस्थानवर स्वारी करणें परशत्रूस शक्य होण्यापूर्वीच अतःस्थ धामधूमीमुळेंच हिंदुस्थान देश आमचे हातून जाईल.'

(There is another reason why the Lawrence policy can never be revived. It is the effect which would be produced in India itself. It is easy for the right Hon'ble gentleman opposite to speak of our sitting down on the banks of the Indus river and there await the enemy that was marching to destruction. But what Government would dare to do it? What Government can guarantee the peaceful acquiescence of India behind it in such a situation. + + + + I do not hesitate to say that we should never have the opportunity of testing this wonderful revival of the Lawrence policy which is to save from attacks from without; because long before such an attack was possible we should have lost India from within.) हिंदुस्थानांतील राजनिष्ठ प्रजाजनांविषयीं ना. कर्झनसाहेबांनीं दाखविलेला अविश्वास व इंग्लडनें रशियापुढें माघार घेतली असें येथील लोकांना वाटून इंग्लडच्या भित्रेपणामुळें लढवय्ये लोकांची इंग्लडवर इतराजी होईल अशा प्रकारची नामदारांची खोटी समजूत, ही नामदारांना हिंदुस्थानचा प्रत्यक्ष अनुभव चांगला आल्यावर नाहींशी होऊन हिंदुस्थानांतील राजनिष्ठा व इंग्लडवरचें प्रेम यांवर तरवारीहून इंग्लडची सत्ता अधिक अवलंबून आहे, अशी त्यांची खात्री झाल्यावांचून रहाणार नाहीं. एशिया खंडांत इंग्लडशिवाय इतर कोणत्याहि युरोपियन राष्ट्राचें माहात्म्य इंग्लडला डोईजड होईल इतकें वाढतां कामा नये, इंग्लंडच्या आरमाराच्या हिंदुस्थानच्या मार्गावर इतर राष्ट्रांचीं आरमारें दिसतां कामा नयेत व हिंदुस्थानचे सरहद्दीवर एखाद्या बलाढ्य युरोपियन राष्ट्राची सरहद्द लागून राहून त्या राष्ट्राचा व हिंदुस्थानांतील लोकांचा परस्परांशीं संपर्कहि होऊं देतां कामा नये, या धोरणानें इंग्लंडनें वागलें पाहिजे व हिंदुस्थानचें राज्य चालविलें पाहिजे. सयामकडच्या बाजूनें फ्रान्स हिंदुस्थानाजवळ येत चालला व कदाचित् फ्रान्सनें ब्रम्हदेश घेतला असता, म्हणून लॉर्ड डफरिन साहेबांना एकाएकीं थिबा राजाची उचलबांगडी करून ब्रम्हदेश

ताब्यांत येऊन फ्रान्सची राज्यसत्ता व हिंदुस्थान देश यांमध्यें ब्रम्हदेशाचा बांध घालावा लागला. उत्तर इराणांत रशिया वळावत चालला आहे हें ना. कर्झन साहेबांस खपत नाहीं, व इराणचे आखातावर व किनाऱ्यावर इंग्लंडच्या मुत्सद्यांनीं व कलकत्याच्या राज्यकर्त्यांनीं जशी कडी नजर ठेवावयास पाहिजे तशी ठेवली नाहीं अशी त्यांची तक्रार आहे. इराणांत रशियाचें पाऊल दिवसेंदिवस पुढें पडत आहे, पण इराणचे दक्षिण किनाऱ्यावर एखादें बंदर घेऊन तेथें आरमार उभारून इंग्लंडच्या व हिंदुस्थानच्या वाटेंत आडकाठी घालण्याची त्याला संधि येऊं देतां कामा नये व रशियानें तसा प्रयत्न करण्याचें जर मनांत आणलें तर सुधारलेल्या राष्ट्रांचें मत झुगारून देऊन राष्ट्रांराष्ट्रांमधील वागणुकीच्या नियमांना न जुमानून मात्र त्याला तसा प्रयत्न करतां येणें शक्य आहे आणि या प्रयत्नामुळें उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत दणदणणारी लढाई ह्या देशाशीं (इंग्लंडशीं) अखेरीस खात्रीनें करावी लागेल. "( It can only be prosecuted in the teeth of international morality, in defiance of civilized opinion and with the ultimate certainty of a war that would ring from pole to pole.—Persia ). इराणच्या आखातांत ज्याप्रमाणें रशियास बंदर मिळतां कामा नये, त्याप्रमाणें चीन व कोरियामधील पेचिली आखातावर रशियास बंदर मिळतां कामा नये. कारण 'पेचिली आखातांत रशियाचें बंदर किंवा आरमार असलें तर लढाईचेवेळीं त्यामुळें चीनच्या राजधानीला व त्या सभोंवतालच्या प्रांताला जितकें भय वाटणार लागेल तितकेंच भय पिवळ्या समुद्रांतील इंग्लंडचे गलबतांना वाटणार लागेल. लाझारेफ किंवा फयूझन या बंदरांत रशियाचें कायमचें आरमार राहिलें असतां पॅसिफिक महासागरावर रशियाची शक्ति सर्वांत मोठी होईल.'

( A Russian port and fleet in the gulf of Pechily would in the time of war constitute as formidable a danger to the British

shipping in the Yellow Sea as they would to the Metropolitan province and the capital of China. Permanent Russian squadrons at Port Lazareff and Fusan would convert her into the greatest naval power in the Pacific.—P. 213 Problems of the Far East )' रशियास अलीकडे मिळालेलीं पोर्ट आॅर्थर व टॅलियनव्हॅन हीं बंदरें पेचिलीचे आखातांवरीलच आहेत हें आमच्या वाचकांस सांगावयास नको. हिंदुस्थानची सरहद्द चीनच्या सरहद्दीशीं लागून असल्यामुळें व चीन ज्याच्या ताब्यांत जाईल तो इंग्लंडला भारी होण्याचा संभव असल्यामुळें इंग्लंडनें चीनला आपल्या छत्राचे छायेखालीं घ्यावें असें ना. कर्झनसाहेबांना वाटतें; व तसें केलें असतां रशियाला मध्य व उत्तर एशियाचे प्रांतांत कायमचें कोंडून ठेवल्यासारखें होईल व इंग्लंडच्या प्रतिस्पर्धेमुळें फ्रान्सनें सयामच्या बाजूला लावलेली टुरटुरहि बंद पडेल. एशिया खंडाचें साम्राज्य मिळविण्याची इंग्लंडनें खटपट केली असतां हिंदुस्थानचें कांहीं नुकसान होणार नाहीं—किंबहुना पुढें मागें इंग्रज पृथ्वीपति झाल्यावर 'प्रथम जिंकलेले' या नात्यानें आम्हांस विशेष सवलतीहि मिळतील व त्यामुळें आमचा फायदाहि होईल हें आम्हीं जाणून आहों. ना. कर्झन साहेबांच्या मतांतील एकाच भागासंबंधानें तक्रार करतां येण्याजोगी आहे व ती एवढीच कीं, इराण, अफगाणिस्थान, सयाम, चीन, कोरिया इत्यादि परराष्ट्रांतील इंग्लंडच्या कारस्थानांना कलकत्त्यासभोंवतीं गरगर फिरवूं पहाण्याचा त्यांचा विचार आहे. सरहद्दीवरील लष्करी धोरणामुळें हिंदुस्थानच्या तिजोरीची व त्याबरोबर हिंदुस्थानांतील अंतःस्थ झालेली दैना पाहिल्यावर मध्य एशियांतील संबंधाबरोबर एशिया खंडांतील इतर सर्व राष्ट्रांत आज दिसूं लागलेलीं भुतेंखेतें जर कलकत्त्यासभोंवतीं नाचूं लागलीं तर त्यांच्या अंगावर फेंकण्यास हिंदुस्थानच्या तिजोरींत एक शीतहि रहावयाचें नाहीं. अशी वेळ लवकरच येईल. म्हणूनच ना. कर्झन साहेबांची कारकीर्द प्रजाजनांस सुखशांतीची व

अभिवृद्धीची जाणार नाहीं असें आम्हांस वाटतें. सर्व एशिया खंडाचें कारस्थान हिंदुस्थानचे चोकांडीं ना. कर्झनसाहेब कसें बसवितात तें पहाः—"अफगाणिस्थानचें स्वातंत्र्य, निराळें स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें यापुढें इराणचे अस्तित्व, बगदाद येथें तुर्कस्थानच्या सत्तेचा चिरस्थायीपणा, हीं सर्व एकानएक कलकत्त्यावर अवलंबून आहेत, इतकेंच नव्हेतर आसमंतात पसरणाऱ्या हिंदुस्थानच्या प्रभावाचें वर्तुळ मर्यादा ओलांडून शेजारच्या खंडावरहि गेलेलें असून बास्फोरसच्या सामुद्रधुनीचा पुढील निकाल व इजिप्त देशाची पुढील दशा ह्यांनाहि त्यानें सारखेंच व्यापिलें आहे. हिंदुस्थान इंग्लंडला मिळालेलें सहन न होऊन व इंग्लंडला पूर्वेकडे मिळालेलें महत्व कमी करण्याकरितां, फ्रान्सनें पुन्हां एशिया खंडांत हालचाल सुरू केली आहे आणि वायव्य दिशेकडून रशिया जसा हिंदुस्थानाकडे येत आहे त्याप्रमाणें फ्रान्सहि आग्नेयीकडे पुढें सरकत आहे. हिंदुस्थानचें राज्य आम्हांस जमिनीवर मिळालें असल्यानें गेल्या दहा वर्षांत आम्ही चीनचे शेजारी झालों आहों, व त्यामुळें पेकिन येथील आमचें कारस्थान तिप्पट वाढलें आहे. फार दूरवर असलेल्या कोरियाचीं सुखदुःखें एक प्रकारें हिंदुस्थानच्या राजकारस्थानाशीं गुरफटलेलीं आहेत."

(The Independence of Afghanistan, the continued national existence of Persia, the Independence of Turkish Rule at Bagdad, are one and all dependent upon Calcutta. Nay, the radiating circle of her influence overlaps the adjoining continent, and affects alike the fate of the Bosporus and the destinies of Egypt, + + + + It is from jealousy of India, and to impair the position which India gave to Great Britain in the Far East that France has again embarked upon an Asiatic career and is advancing from the South East with steps that faithfully correspond with those of Russia upon the North-West. The heritage of the Indian Empire has within the last ten years made us the land neighbours of the China and has multiplied three-fold the

area of our diplomacy at Pekin. Even the fortunes of the remote Korea are in a manner bound up with the politics of Hindusthan. P. 9, Problems of the Far East ). एशिया खंडांतील सर्व राष्ट्रांच्या ग्रहमालेंत हिंदुस्थानाला ना. कर्झन साहेबांनीं मध्यस्थान म्हणजे सूर्याचें पद दिलें असून या देशाचे सभोंवतीं व त्याचे कक्षेंत सर्व ग्रहांना फिरणें भाग आहे अशी त्यांची समजूत झालेली आहे. या मध्यमणीच्या हृदयांत अधिष्ठित होऊन सभोंवारच्या सर्व ग्रहांना आपल्या इच्छेप्रमाणें भ्रमण करावयास लावण्याकरितां ना. साहेब हिंदुस्थानांत येत आहेत, असें वरील विवेचनावरून वाचकांस वाटल्यावांचून रहाणार नाहीं. एशियांतल्या लोकांविषयीं, त्यांच्या चालीरीतीविषयीं, धर्माविषयीं व त्यांच्या अंगच्या इतर गुणांविषयीं साधारणपणें युरोपियनांच्या अंगीं दृष्टीस न पडणारी पूज्यबुद्धि आमच्या नवीन लाट साहेबांच्या लेखांत दृष्टीस पडत असल्यामुळें, इंग्लंडच्या लष्करी धोरणाकरितां येथील प्रजाजनांच्या प्रगतीस अडथळा आणण्यास ते कदाचित् तयार होणार नाहींत असें आम्हांस वाटतें. या दुसऱ्या बाजूसंबंधाचा विचार सवडीनुसार करण्याचें योजिलें आहे.

# * हिंदुस्थानचे नवीन ग. जनरल नामदार मि. कर्झन

नंबर ३

एशिया खंडांतील राजकीय उलाढालींसंबंधानें आमच्या नवीन लाटसाहेबांचीं मतें कोणत्या प्रकारचीं आहेत, ह्याचें आम्हीं गेल्या दोन अंकांत दिग्दर्शन केलें. एशिया खंडांत एक दोनदां प्रवास करून तेथील स्थितीचें सूक्ष्म रीतीनें अवलोकन करून त्या खंडाच्या नकाशाला तांबडा रंग द्यावयाचा कीं दुसरा कोणता रंग द्यावयाचा, ह्याचें विवेचन कल्पना–शक्तीच्या जोरावर करणें हा भाग निराळा, व प्रत्यक्ष राज्यसूत्रें हातांत घेऊन कल्पनाशक्तीच्या उंच भरारीबरहुकूम कृति करून दाखविणें हा भाग निराळा, हें कोणीहि विसरतां कामा नये. उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत चहूंकडे दणाणून राहाणाऱ्या लढाईची धमकावणी, किंवा इंग्रजांचें अस्सल सत्व नामशेष होईतों शत्रूशीं टक्कर देण्याचा बेत, प्रत्यक्ष स्थिति अनुभवल्यावर पुस्तकांतले पुस्तकांतच राहतील, व तडजोडीचे उपाय ना. कर्झनसाहेबांना दंडेलीहून विशेष सोयीचे दिसतील असेंहि होण्याचा पुष्कळच संभव आहे. चीनच्या हल्लींच्या प्रश्नासंबंधानें लॉर्ड साल्सबरीसाहेबांनीं जें गम खाण्याचें धोरण ठेविलें आहे, त्या धोरणास नामदारसाहेबांचें पूर्ण अनुमोदन आहे, हें ध्यानांत धरलें म्हणजे ना. कर्झनसाहेबांच्या पुढील पांच वर्षांच्या कारकीर्दींत त्यांच्या पुस्तकांत स्पष्टपणें नमूद केलेल्या रक्तपाताच्या मतांना विशेष भरती येईल, असें म्हणणें वस्तुस्थितीस धरून होईल किंवा नाहीं, याविषयीं शंका उत्पन्न होते–होणार नाहीं. ना. कर्झनसाहेबांचे अंगांत

---

* केसरी ता. ३० ऑगस्ट १८९८.

कोणत्या आवेशाचें व जोमाचें रक्त वहात आहे हें त्यांच्या लेखांवरून जरी स्पष्ट दिसतें; तथापि हिंदुस्थानची गारठलेली तिजोरी व सत्वहीन झालेली प्रजा ही पाहिल्यावर त्यांच्या रक्तांतील उष्णता व जोर कायमच राहील असें म्हणतां येत नाहीं. आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, दैववशात् लढाईचा प्रसंग जुळून आल्यास ना. कर्झनसाहेबांचा आवेश पेट घेतल्यावांचून रहाव- याचा नाहीं व मग राज्यव्यवस्थेचें तारूं कोठें वहकून जाईल याचा नेम रहाणार नाहीं.

इतर राष्ट्रांशीं असलेल्या हिंदुस्थानच्या संबंधाविषयीं ना. कर्झनसाहे- बांचीं मतें कशाहि प्रकारचीं असोत, एशिया खंडांतील लोकांच्या धर्माविषयीं, सामाजिक रीतीविषयीं, कांहीं युरोपियनांचें अंगीं दिसणारा तिटकारा ह्यांचें लेखांत दिसत नाहीं इतकेंच नव्हे तर नेटिव्हांविषयीं योग्य पूज्यबुद्धि, इंग्लं- डचे साम्राज्यास धक्का लावूं न देतां त्यांचें कल्याण करण्याची सदिच्छा हीं त्यांच्या पुस्तकांत प्राधान्यें करून दृष्टीस पडतात. नेटिव्हांचे धर्मावर, नेटिव्हांचे चालीरीतींवर तुटून पडणाऱ्या बाजारबुणग्या मिशनरींचा त्यांनीं स्पष्ट शब्दांनीं आपल्या लेखांत निषेध केला आहे. जपान देशांत पाश्चि- मात्य सुधारणा फार वाढल्यामुळें तेथील लोकांचा बौद्धधर्मावरचा विश्वास अजिबात उडालेला आहे व ह्यामुळें त्या राष्ट्रांत ख्रिस्ताचे धर्माला वडी जंगी लूट खात्रीनें सांपडेल, ( The Church of Christ is sure of a magnificent spoil ) वगैरे मतांना ते बिलकूल भीक घालीत नाहींत. जपानां- मधील कांहीं लोक हिंदुस्थानांतील कांहीं सुधारकांप्रमाणें जडवादी बनत चालले आहेत हें खरें, पण जपानांतील बहुजनसमाजाचा तेथील बौद्ध धर्मावर पूर्ण भाव असून ख्रिस्ताच्या देवळाचा पाया जपानांतील खडकाशीं जाऊन भिडण्याची आशा करावयास नको. ख्रिस्ती लोकांतील नाना प्रकारचे पंथ, आपापसांतील फाटाफुट, ब्ॅपिस्ट, एपिस्कोपेलियन, प्रेस्बिटेरियन, लॅसा-

रिस्ट, बाप्टिस्ट, इव्हॅजेलिकल, युथेरन, कांग्रेशनिस्ट, चर्च ऑफ इंग्लंड, जेसुइस्ट, मेथाडिस्ट, रिफार्म, आर्थाडाक्स, क्वेकर, युनिटेरियन, युनिव्हर्सलिस्ट अशा प्रकारची नेटिव्हांच्यापुढें येणारी मिशनरीचीं निरनिराळीं सोंगें, इत्यादि गोष्टींकडे लक्ष दिलें असतां पाश्चिमात्यांच्या धर्माचें पौर्वात्यांच्या धर्मापुढें विशेष तेज पडेल असें वाटत नाहीं. वरील सर्व सोंगें एकदम लोकांपुढें आलीं व प्रत्येकानें आपल्या हातांत स्वर्गाच्या द्वाराच्या किल्लया आहेत असें लोकांना सांगितलें, तर स्वतः होऊन देवडीवाले झालेल्यांची ही लांबची लांब मालिका पाहून लोकांना आश्चर्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं. (पान ५०—फार पूर्वेकडील प्रश्न ) जपान, चीन व इतर एशियांतील राष्ट्रें ह्यांत मिशनरींची घडगत कशा प्रकारची होण्याचा संभव आहे हें नामदारसाहेब थोडक्यांत येणेप्रमाणें सांगतातः—‘ अशी कल्पना करू कीं, नवीन अवतीर्ण झालेल्या धर्माचे दूत आमच्या ( इंग्लंडच्या ) किनाऱ्यावर आलेले आहेत व त्यांच्या खिशांत परमेश्वरास संमत असा एक दिव्य धर्म आहे. आणखी अशी कल्पना करा कीं, यापुढें आलेल्या दूतांच्या मागून आणखी कांहीं येत आहेत. यांची टोळी एकच नाहीं, अर्धा डझन नाहीं, एक डझन नाहीं तर एकवीस टोळया आहेत, आणि प्रत्येक जण दुसऱ्याला भ्रामक व खोटा असें म्हणून स्वतःच्या अधिक श्रेष्ठ सत्यतेविषयीं लोकांना सांगत आहे; तर परमेश्वराचा निरोप आम्हांस सांगावयास आलेल्या असल्या दूतांना आपण काय म्हणूं ?—’ पान २९०—‘ आम्हीं ज्यांचा द्वेष करतों व तिरस्कार करतों अशा जातींतले लोक नवीन धर्माचे उपदेशक म्हणून जर इंग्लंडांत आले आणि बायबलची निर्भत्सना करून व आमच्या धर्मकारांच्या मतांना शिव्याशाप देऊन उपदेश करण्यास जर त्यांनीं प्रारंभ केला, तर त्यांची संभावना आम्हीं कोणत्या प्रकारें करूं बरें?’

( Suppose the apostles of some new manifestation to reach our shores with a creed in their pockets, that claimed a super-

natural origin and a divine authority and suppose these pioneers to be presently succeeded by others, not in one batch only or in half a dozen, or in a dozen, but in a score of detachments each proclaiming the fallibility or spuriousness of the others, and its own superior authentication—what should we say to these bearers of the heavenly message." P. 290—If the Evangelist of some new faith were to appear in England drawn from a race whom we hated and despised, and were to commence their preaching by denouncing the Bible and crying anathema upon the Apostle's Creed, what sort of reception would they meet with ?" P. 289—Problems of the Far East.).

चिनी लोकांमध्यें पितृपूजा फार आहे. चिनी लोकांच्या चालीरीति, नीतितत्त्वें यांजवर ज्याप्रमाणें मिशनरींचा हल्ला आहे, त्याप्रमाणें त्यांच्या पितृपूजेवरहि पाद्री बुवांचा विशेष कटाक्ष आहे. यासंबंधानें पितृपूजा करणारांचा पक्ष घेऊन ना. कर्झनसाहेब म्हणतात, 'विशेषें करून अशी स्थिति पितृपूजेसंबंधींची आहे; यासंबंधानें त्यांना खासें प्रत्युत्तर द्यावयाला सांपडेल.'

(Particularly is this the case with regard to ancestor-worship, with which they declined all parley; althouth a rare retort would appear to be open to a Chinaman in England, who accidently found his way to Westminster Abbey or St. Paul's.—P.288 ibid).

इंग्लंडांतील खिस्ती लोक पितृपूजा करणारे आहेत, हें सिद्ध करण्याकरितां वरील कित्येक प्रकार जरी त्यांना दाखविले, किंवा हिंदूंच्या मूर्तिपूजेला शिव्या देणाऱ्या मिशनऱ्यांच्या डोळ्यापुढें रोमन क्याथालिकसारख्या खिस्ती पंथांतील उघड मूर्तिपूजा किंवा इतर खिस्ती पंथांतील उघड मूर्तिपूजा जरी उभी केली, तरी आकाशांतील देवाला स्मरून ते कधींहि आपली चूक पदरत घ्यावयाचे नाहींत, व श्री मंगलमूर्तीच्या उत्सवामुळें प्लेग व दुष्काळ पडला असें खोडसाळपणाचें विधान करण्यास त्यांना लाजहि वाटावयाची नाहीं,

अशी लोकांची खात्री होत जाण्यास, कांहीं खिस्ती पत्रांचें प्रतिसांवत्सरिक वरळणें कारणीभूत होऊं लागलें असल्यामुळें, मिशनरींचे मतासंबंधानें ना. कर्झनसाहेबांनीं केलेलें विवेचन येथेंच थांबवून मिशनरींच्या इतर कृतीसंबंधानें नेटिव्हांचा कैवार घेऊन त्यांनीं काढलेल्या उद्‌गारांकडे वळूं. खिस्ती धर्माच्या लोकांचे हातांत सर्व जगाची राज्यसत्ता जात चालली असल्यामुळें मिशनऱ्यांचा सुळसुळाट चहूंकडे झाला आहे, मिशनऱ्यांपैकीं कांहीं लोक स्वार्थत्याग करणारे व ईशभक्त असले तरी अधिकाराच्या व वैभवाच्या जोरावरच खिस्तांचें कळपांत ते कांहीं कोंकरें ओढूं पहातात, अशाच आशयाचें ना. कर्झन साहेबांचें मत दिसतें. ‘ आणि ह्या मताला मिशनरींच्या कांहीं प्रसंगाच्या वागणुकीनें बळकटी येते. त्यांच्यापैकीं पुष्कळ जरी खिस्ताचे शिपाई म्हणून पुढें सज्ज होऊन आलेले असतात, तरी संकटसमयीं मात्र त्यांना ह्या किंवा त्या राजाचें किंवा प्रजासत्ताक राज्याचें आपण प्रजाजन आहोंत अशी आठवण होते व बायबलला लोकांना योग्य मान द्यावयास लावण्याकरितां ते लढाऊ गलबताचें साहाय्य मागतात.’—ज्याप्रमाणें ‘दक्षिण हिंदुस्थानांत एखाद्या नोकरीची किंवा कारकुनीची जागा मिळावी म्हणून नेटिव्ह लोक खिस्ती धर्माचा स्वीकार करतात, त्याप्रमाणें चीन देशांतहि असें नेहमीं होतें कीं, खिस्ती झाल्यामुळें बहुतेक मिळणाऱ्या ऐहिक फायद्याकरतां-व संरक्षणाकरितां वळलेल्या वर्तनाच्या मनुष्याला अकस्मात खिस्ती धर्मामध्यें मुक्ति दिसूं लागते.’

(‘Nor is this impression diminished by the attitude of the missionaries themselves, many of whom, though they buckle on their armour as the soldiers of Christ, remember only in times of peril that they are Citizens of this or that empire or republic, and clamour for a gunboat with which to insure a respect for the Gospel.”—“Just as in Southern India many a

native becomes a Christian in order to get a situation as a servant or a clerk, so in China it not infrequently happens that a shady character will suddenly find salvation for the sake of the material advantages or protection which it may be expected to confor upon him." P. 298 ibid.)

खिस्ती धर्माच्या लोकांची संख्या दिवसानुदिवस वाढत आहे म्हणून फुशारक्या मारणारांनीं वरील उद्गार वाचून, धर्मदृष्टीनें विचार केला असतां असल्या धर्मप्रसारांत अभिमान मानण्याजोगें एवढें काय आहे याचा मनाशीं ताळा बांधावा, अशी आमची मिशनरी लोकांना शिफारस आहे. खिस्ती धर्माचा प्रसार करण्याचें कामीं बायकांना विशेषतः तरुण मुलींना मिशनरीचें काम सांगूं नये, भर रस्त्यावर किंवा चव्हाट्यावर पांच पंचवीस तरुण बायका व एखादा पुरुष मिळून सारंगीच्या सुराला सूर मिळवून खिस्त प्रार्थना केल्यानें नेटिव्हांचे मनावर विशेषतः चांगला परिणाम होत नाहीं, उलट अविवाहित तरुण स्त्रियांचे कळपांत कांहीं पुरुष वावरतांना पहाण्याची नेटिव्हांस संवय नसल्यामुळें मिशनरींच्या नीतीमत्तेबद्दल विनाकारण भलताच ग्रह उत्पन्न होतो, व मिशनरींविषयींचा राग उगीचच्या उगीच अधिक दुणावतो. अशा प्रकारच्या कांहीं कानगोष्टी मिशनरींना सांगून बायकांनीं मिशनरीचे काम करावें कीं नाहीं याविषयीं कर्झनसाहेबांनीं एकंदरींत असें लिहिलें आहे 'तरुण अविवाहित शेंकडो परद्वीपस्थ मुलींना मिशनऱ्यांसंबंधांची कामें सांगणें जरी या चळवळीचें लोकप्रिय व सर्वांनीं अंगिकारलेलें स्वरूप असलें तथापि तें पुष्कळांशीं गर्हणीय आहे. कारण त्यामुळें मी पूर्वीं सांगितलेल्या गैरसमजुती उत्पन्न होतात व त्याबद्दल कोणास दोष देतां यावयाचा नाहीं. इंग्लंडांतील सुशिक्षित लोकांनीं असले प्रकार कमी केले पाहिजेत."

(The employment of hundreds of young unmarried foreign girls in various branches of missionary work, though the most

popular current faith of the moment, is g eatly to be depre-cated as giving rise to the very pardonable misinterpretations of which I have spoken and ought to be curtailed by educated opinion at home. P. 309—ibid ).

हे उद्गार चीनसंबंधाचे आहेत. एशियांतील राष्ट्रांच्या स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या कल्पना युरोपियनांच्या कल्पनेहून बऱ्याच अंशीं भिन्न असल्यामुळें स्त्रियांना मिशनरी बनविण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें ना. कर्झन साहेबांप्रमाणें कोणाहि विचारी पुरुषास वाटल्यावांचून रहाणार नाहीं. चीनसंबंधानें जी गोष्ट खरी आहे ती हिंदुस्थानलाहि लागू आहे हें येथें सांगावयास नकोच. राष्ट्रांना तरुण मुलींना मिशनरी बनविण्याची चटक लागल्यामुळें भरपूर द्रव्य गोळा करावयास सांपडेल या आशेवर एक लाख नेटिव्ह स्त्री–मिशनरींची सेना बनविण्याची महत्वाकांक्षा धरणाऱ्या, व गेल्या दुष्काळांत शेंकडों मुली जाळ्यांत धरावयास सांपडल्यामुळें कावलेल्या बाटग्या रमाबाईसारख्या साहसी विदुषींच्यापुढें कर्झनसाहेबांची वरील मतें, त्यांची दिशा कशी चुकत आहे हें दाखविण्या-करितां लक्ष पोंचविण्याची शिफारस करितों.

मिशनरीसंबंधाचीं ना. कर्झनसाहेबांचीं कांहीं मतें वर दिलीं आहेत. त्यांवरून आपल्या धर्माचा त्यांना योग्य अभिमान नाहीं असें अनुमान काढावयाचें नसून एशियांतील लोकांच्या चालीरीतीकडे व धर्मतत्त्वांकडे ते दोषैक दृष्टीनें पहात नाहींत असें अनुमान काढावयाचें आहे हें विसरतां कामा नये. पौर्वात्यांच्या समाजरचनेविषयीं, धर्मश्रद्धेविषयीं, व्यक्ति व समाज यांच्या परस्परसंबंधाच्या नियमांच्या घटनेविषयीं त्यांच्या मनांत चांगली आदर-बुद्धि आहे. जें जें आपल्या चालीरीतीशीं व मतांशीं जुळत नाहीं, जें आपणाला समजत नाहीं, तें आपल्याहून कमी दर्जाचें व अवनतीचें आहे असें समजण्याची चूक न करण्याविषयीं त्यांनीं अपल्या वाचकांस सावधगिरीची सूचना केली आहे. एशिया खंडांत जगांतील प्रख्यात धर्मोपदेशकांचा जन्म

झाला. धर्माचें रहस्य पौर्वात्यांनीं पाश्चिमात्यांस सांगितलें, इतिहासांतील अतिशय विद्वान व अतिशय प्रख्यात राजे एशिया खंडांतील तख्तावर बसलेले होते, किंबहुना पाश्चिमात्यांचे पूर्वज मूळचे पूर्वेकडेसच राहणारे होते, अशा प्रकारचीं मतें नामदार साहेबांचीं असल्यामुळें पौर्वात्यांच्या सांप्रतच्या दीन दशेकडे त्यांनीं दयार्द्र दृष्टीनें पहावें व त्याप्रमाणें त्यांनीं खालील आशयाचे उद्गार काढावे हें साहजिक आहे. ‘ जेव्हां त्याला (एशिया खंडांत प्रवास करणाराला) आमच्याइतकी किंबहुना आमच्याहूनहि अधिक पुरातन असलेली सुधारणा दृष्टीस पडते, सर्व काळच्या थोर पुरुषांत ज्या इतिहासांतील नरवीर गणले जातात असा इतिहास जेव्हां त्याला आढळून येतो, जगाच्या प्रगतीची दिशा बदलणाऱ्या धर्मसंस्थापकांचीं धर्ममतें जेव्हां तो ऐकतो, शेंकडों वर्षेंपर्यंत टिकलेली व आपल्या वज्रमय दाबांत कोट्यवधि लोकांना अद्याप ठेवणारीं नीतिशास्त्रें जेव्हां तो पहातो, अर्वाचीन शास्त्रवेत्त्यांचे अत्यंत अभिमानास्पद शोध आगाऊच लावून ठेवणारी विद्या जेव्हां त्यांच्यापुढें येते, आणि ज्या प्रश्नाचा उलगडा करण्याकरितां नुकतीं पंखें फुटलेल्या पाश्चिमात्य लोकसत्ताक संस्था आपलें नूतन सामर्थ्य खर्च करून धडपड करीत आहेत व त्या व्यक्तिस्वातंत्र्य व समाजाची संघशक्ति त्यांच्या परस्परांशीं असलेल्या संबंधाविषयींच्या प्रश्नाचा उलगडा कांहीं ठिकाणीं करणारी समाज-व्यवस्था जेव्हां त्याच्या नजरेस येते,तेव्हां पौर्वात्यांची निंदा करणें हा मूर्खपणा आहे व त्यांची निर्भत्सना करणें हा चढेलपणा आहे असें त्याला वाटतें. आम्हांला घालून देण्यालायक धडे अद्याप पूर्वेजवळचे संपले नाहींत आणि आपल्या वडील बहिणीच्या पायापाशीं बसून शिकण्यास युरोपास हरकत नाहीं.”

(When he meets with civilization as old as, nay older than our own, when he encounters a history whose heroes have been among the great men of all time, a religion where prophets have altered the course of the world's progress, codes

of morals which have endured for centuries and still hold millions within their adamantine grip, a learning which anticipated many of the proudest discoveries of modern science, and a social organization which has in places solved the very problem of reconciling individual liberty with collectiv' force, whereupon the new-fledged democracies of the West are expending their virgin energies-he feels that it is absured for him to condemn. The East has not yet exhausted its lessons for us, and Europe may still sit at the feet of her elder sister.' P, 6 ibid) ना. कर्झन साहेबांचे मनांत पौर्वात्यांविषयीं वागत असलेली आदरबुद्धि त्यांची कारकीर्द हिंदुस्थानांतील प्रजाजनांस सुखावह होण्यास कारणीभूत होवो, अशी प्रार्थना करून त्यांच्या लेखाचें परीक्षण येथें संपवितों.

---

# * मद्रासची राष्ट्रीय सभा

मद्रासेस भरलेल्या चौदाव्या सभेचें काम पूर्वीच्या तेरावीप्रमाणेंच मोठ्या उत्साहानें व कळकळीनें पार पडलें ह्याबद्दल प्रत्येक राष्ट्रभक्तास आनंद घाटल्यावांचून राहणार नाहीं. अधिकारी वर्गाचा राग, श्रीमंत जमीनदारांचें दुर्लक्ष, राष्ट्रीय सभेकरितां सर्वत्याग करून अंतःकरणपूर्वक जिवापाड मेहनत करणाऱ्या पुढाऱ्यांचा तुटवडा इ. गोष्टींबरोबरच गेलीं दोन सालें प्लेग-पासूनहि राष्ट्रीय सभेस त्रास सोसावा लागला. ह्या सर्व संकटांतून राष्ट्रीय सभा पार पडून अद्याप तिच्या बैठकी पूर्वीप्रमाणेंच सतेज होत आहेत, ह्यावरून आमच्या राजकीय उन्नतीकरितां खटपट करणाऱ्या गृहस्थांनीं निराश होण्याचें कारण नाहीं असें स्पष्ट दिसतें. मद्रासेस डेलिगेटांची संख्या ६०० होती व प्रेक्षक ३००० वर होते. ह्यावरून तटस्थ असलेला बहुजनसमाज राष्ट्रीयसभेच्या मागण्यांसंबंधानें हलवून सोडण्यांत आमच्या पुढाऱ्यांस फारसे आयास पडणार नाहींत, हें उघड होतें. वायव्यप्रांत, अयोध्या, बंगाल, नागपूर, वऱ्हाड, मुंबई इलाखा इ. दूरदूरच्या ठिकाणांहून, प्लेगसंबंधानें तपासणीचा व इतर त्रास असतांहि, प्रतिनिधींनीं मद्रासेस जमावें व राष्ट्रीय सभेचें काम यथामति पार पाडावें, ह्याहून अधिक दुःखदायक वार्ता राष्ट्रीय सभेचे द्वेष्ट्यांस गेल्या पंधरा दिवसांत ऐकावयास मिळाली नसेल ! राष्ट्रीय सभेकरितां जमलेल्या पाहुण्यांची चांगली बरदास्त ठेवण्या-विषयीं मद्रासकरांची ख्याती आहे, व ह्या लौकिकाला अनुसरूनच त्यांनीं आपल्या पाहुण्यांची व्यवस्था ठेविली होती, हें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो. मद्रास इलाख्यांत प्लेगाचें पाऊल पुढेंच पडत असल्यामुळें लोक

---

* केसरी, १० जानेवारी १८९९.

हवालदील झालेले होते, व त्यामुळें राष्ट्रीय सभेस वर्गणी गोळा करण्याचें काम फार अडचणीचें झालें. ज्या ठिकाणच्या लोकांना प्लेगचा अनुभव आहे, व प्रथम प्लेग झाला असतां किंवा आसपास डोकावूं लागला असतां लोकांच्या मनाची स्थिति कशा प्रकारची होऊन जाते हें ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें आहे, त्यांना मद्रासकरांच्या अडचणीची नीट अटकळ बांधतां येईल. ह्या सर्व अडचणींना एका बाजूला ठेवून मद्रासची मंडळी आपल्या कर्तव्यास जागली ह्याबद्दल त्यांची तारीफ केल्यावांचून राहवत नाहीं.

मद्रासच्या राष्ट्रीय सभेचें काम दरवर्षाप्रमाणेंच चांगलें झालें हें तर खरेंच, पण दरवर्षाहून यंदा एक विशेष गोष्ट घडून आली. आज चौदा वर्षें राष्ट्रीय सभेचें काम ज्या धोरणानें व ज्या पद्धतीनें चालत आलेलें आहे तेंच धोरण व तीच पद्धत पुढें अशीच कायम ठेवावयाची काय, ह्या प्रश्नाचा ऊहापोह राष्ट्रीय सभेचे मंडपांत व मंडपाबाहेर यंदा जसा झाला तसा पूर्वी झाला नव्हता. राष्ट्रीय सभेस कांहीं तरी नियम पाहिजेत, त्यावांचून काम झपाट्यानें व व्यवस्थेशीर चालत नाहीं, ही कल्पना तीनचार वर्षांपूर्वीच उत्पन्न झालेली असून, पुण्याच्या राष्ट्रीय सभेपासून दरवर्षी नियम बांधण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. राष्ट्रीय सभेचें हल्लीं ज्याप्रमाणें काम चाललें आहे त्याप्रमाणेंच पुढें जर चालावयाचें असेल तर, हल्लीं वहिवाटीनें मुक्रर ठरलेल्या नियमांहून अधिक नियमांची राष्ट्रीयसभेस विशेष जरुरी नाहीं. नियम पाहिजेत, नियम पाहिजेत, ह्या म्हणण्याचें खरें मर्म असें आहे कीं, राष्ट्रीय सभेच्या मुखत्यारांच्या निवडणुकीचेसंबंधानें असे कांहीं नियम पाहिजेत कीं, निवडून आलेले मुखत्यार बहुजन समाजाचे प्रतिनिधी नाहींत, असें सरकारास किंवा आमच्या द्वेष्ट्यांस म्हणतांच येऊं नये. व राष्ट्रीय सभा लोकांच्या मुखत्यारांची आहे, प्रजाजनांची गाऱ्हाणीं ही सभा सरकारचे कानावर घालते, ह्या गोष्टी जरी स्वतःसिद्ध असल्या तरी, राष्ट्रीय सभेस प्रजा-

जनांची कितपत कुलमुखत्यारी आहे हें आमच्या राज्यकर्त्यांस प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविल्याशिवाय, त्यांच्याकडून राष्ट्रीय सभेस योग्य मान देण्यांत येणार नाहीं. राष्ट्रीय सभेला नियम करा म्हणणारांचा हेतु एवढाच आहे कीं, प्रजाजनांची ह्या सभेस पूर्ण संमति आहे, हें ह्या नियमांच्या आधारें कोणासहि स्पष्टपणें दाखवितां यावें. राष्ट्रीय सभेची खटपट आज चौदा वर्षें सतत चालली असतां यावयास पाहिजे तसें यश कां येत नाहीं, आमच्या पद्धतींत कोठें चूक होते आहे, काय अशा प्रकारचे विचार मुखत्यारांच्या मनांत यावेत, व राष्ट्रीयसभा सर्व प्रजाजनांची आहे, राष्ट्रीय सभेचे चालक लोकांचे खरे पुढारी आहेत व राष्ट्रीय सभेस सर्व राष्ट्राचें अंतकरणपूर्वक पाठबळ आहे, असें अधिकारी वर्गाचे प्रत्ययास पूर्णपणें आणून दिल्याशिवाय हेतु सफळ होणार नाहींत, असें मुखत्यारांना वाटावें, हें साहजिक होय. मद्रासच्या सभेच्या स्वागत कमिटीच्या चेअरमन साहेबांनीं व अध्यक्षसाहेबांनीं, राष्ट्रीय सभेचें काम झपाट्यानें चालण्याकरितां यंदा कांहींतरी तजवीज केली पाहिजे, अशा आशयाचे उद्‌गार काढिले, व कांहींतरी नियम केल्यावांचून यंदा राष्ट्रीय सभेनें राहूं नये, अशी सूचना केली. राष्ट्रीय सभेचीं मतें सरकारास मान्य करावयास लावण्याच्या उद्योगास लागल्यावांचून गत्यंतर नाहीं, व त्या उद्योगास राष्ट्रीयसभा जितक्या लवकर लागेल तितकें चांगलें, तेव्हां अशा प्रकारें सर्व मुखत्यारांचे मनांत उत्पन्न झालेल्या प्रेरणेलाच चेअरमन साहेबांनीं व अध्यक्षसाहेबांनीं व्यक्त करून दाखविलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

मद्रासच्या राष्ट्रीय सभेस दुसरी एक अशी अनुकूल गोष्ट झाली कीं, राष्ट्रीय सभेच्या द्वेष्ट्यांनींहि राष्ट्रीय सभेवर ह्याच वेळीं वाग्बाण सोडल्यामुळें सभेला नवीन उद्योगास प्रारंभ करण्यास अधिक हुरूप आला. "निंदकाचें घर असावें शेजारी" ह्या म्हणीप्रमाणें लंडन टाइम्समधील

राष्ट्रीय सभेवरच्या टीकेनें, व मुंबई टाइम्सच्या कुत्सितपणाच्या भोंकण्यानें, राष्ट्रीय सभेस आपल्या कर्तव्यकर्मास अधिक जोमानें जागणें भाग पडलें. शत्रूच्या टोंचून बोलण्यानें आपल्या अंगचा आळस दूर पळून जातो, अंगांत नवीन ईर्ष्येचा संचार होतो,व आपल्या सर्व शक्ति एकवट करून प्रतिपक्षाचें हिणवणें खोटें ठरविण्यास आम्हीं कंबर बांधतों. रस्त्यांत पिसाळलेलीं कुत्रीं वारंवार दृष्टीस पडलीं म्हणजे हातांत सोटा कायमचा ठेऊन देण्याची स्फूर्ति उत्पन्न होते. राष्ट्रीयसभा मोडकळीस आली, एक दोन वर्षांत ती राम म्हणेल, नुसत्या वक्तृत्वानें कामें होत नसतात, बोलण्यापेक्षां कृतीची किंमत अधिक आहे, पैशांची थैली मोकळी सोडण्याचे वेळीं व अंगमेहनत करून राष्ट्रीय सभेकरतां शरीरयातना सोसण्याचे वेळीं खरी राष्ट्रभक्ति कसास लागते, व ह्या कसास राष्ट्रीय सभेचे पुढारी बिलकुल उतरलेले नाहींत, तेव्हां राष्ट्रीय सभेचा हा कुचकामाचा अवतार जितका लवकर संपेल तितका बराच, अशा प्रकारें मुंबईच्या टाइम्सनें क्षुल्लक कारणांवरून आमच्या पुढाऱ्यांस टोमणे मारणें जरी द्वेषमूलक असलें, तरी पृथ्वीस पाठ लागली असतां भीमास ज्याप्रमाणें शंभर हत्तींचें बळ अधिक येई, त्याप्रमाणें टाइम्सच्या कुशब्दांनीं राष्ट्रीयसभेस अधिक जोर आल्यावांचून राहणार नाहीं, हें उघड होय. राष्ट्रीय सभेनें लंडन येथील कांग्रेस कमिटीचें बरेंच देणें आहे, ही गोष्ट खरी असली तरी, १४ वर्षें राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं सोशिलेली झीज व लोकांनीं राष्ट्रीय सभेस द्रव्यद्वारा केलेली मदत, ह्यांकडे पाहिलें म्हणजे राष्ट्रीय सभेनें ज्या नवीन उद्योगास आरंभ करण्याचें ठरविलें आहे, त्या उद्योगासंबंधानें बहुजन समाजाकडून द्रव्यद्वारा व इतर रीतीनें भरपूर मदत मिळण्यास कधींहि अडचण येणार नाहीं, अशी मनास खात्री येते. ना. सुरेंद्रनाथ बानर्जी ह्यांजप्रमाणें आमचेंहि असें म्हणणें आहे कीं, राजकीय चळवळींना सध्यां खऱ्या कळकळीनें व अंतःकरणपूर्वक झटून काम

करणाऱ्या योग्य वकुबाच्या लोकांची फार जरुरी आहे. राष्ट्रीय सभेचे आज जे पुढारी आहेत ते अशा रीतीनें काम करावयास लागूं देत; हाल, कष्ट सोसावयास तयार होऊं देत; हरएक प्रकारची स्वतः झीज सोसून राष्ट्रीय सभेच्या कामास स्वतःस वाहून घेण्यास उद्युक्त होऊं देत; इष्ट हेतु साधण्याकरितां लागणाऱ्या पैशाची त्यांना वाण पडणार नाहीं, बहुजन समाजाची मदत नसल्यामुळें आपलें काम अर्धेमुर्धे झालें असें म्हणण्याचे त्यांना प्रसंग येणार नाहींत. खोट्या नाण्याचा ह्या कामीं मात्र बिलकुल उपयोग व्हावयाचा नाहीं. म्हातारपणीं दररोजचे तीन रंग करून एकसारखें आपलें स्वरूप पालटावयास शिकलेल्या आमच्या येथील एका व्यवसायबंधूप्रमाणें राष्ट्रीय सभा म्हणजे बडा खाना ( Feast ) असें ज्यांना वाटत असेल, व राजकीय चळवळीचे पायीं कृश होणारे गृहस्थ अस्थिपंजराप्रमाणें (skeleton) ज्यांना सर्वथैव त्याज्य वाटत असतील, त्यांनीं ह्या भानगडींत न पडतां घरीं स्वस्थ बसावें, हेंच ह्यावेळीं उत्तम. राष्ट्रीय सभेला जावयाचें किंवा राजकीय चळवळींत पडावयाचें म्हणजे वायावापड्या भोंवतीं गोळा करून चुलीपासच्या गोष्टींची उठाठेव करून गालावर रक्ताचें व मांसाचे ढीग गोळा करणें नव्हे, तर शरीरक्लेश सोसून शरीरास अस्थिपंजराचे स्थितींत नेऊन पोंचवणेंच होय, हें ज्यांना उमजत नसेल त्यांनीं राजकीय चळवळीचा नाद सोडून देऊन अधिक सुखकर, अधिक सुगम व अधिक स्तुतिमय अशा मार्गाचें संपूर्णपणें अवलंबन करावें हें बरें.

मद्रासच्या राष्ट्रीय सभेंत पास झालेल्या ठरावांमध्यें सर्वांत महत्त्वाचा ठराव म्हटला म्हणजे निरनिराळ्या कमिट्यांनीं प्रांतभर एजंट पाठवून राष्ट्रीय सभेच्या मतांचा प्रांतभर प्रसार करण्याकरितां कमिट्या स्थापाव्या हा होय. ठिकठिकाणच्या कांग्रेस कमिट्या हें सत्वर व नीटपणें करतात किंवा नाहीं, हें पहाण्याचें काम प्रांतिक कमिट्यांकडे सोंपविलें आहे. या ठरावावर

बोलतांना ना. सुरेंद्रनाथ बानर्जी ह्यांनीं जें कळकळीचें भाषण केलें व सभेचे अध्यक्ष मि. बोस ह्यांनीं अखेरीस राष्ट्रभक्तांना उद्देशून जे कळकळीचे उद्गार काढले त्याकडे आमचे वाचकांनीं अवश्य लक्ष पोंचवावें. हीं दोन्हीं भाषणें दुसरीकडे दिलेलीं आहेत. ठिकठिकाणच्या कॉंग्रेस कमिट्यांचे सेक्रेटरी व नवीन होणाऱ्या प्रांतिक कमिट्यांचे सभासद ह्यांस आमची अशी विनंति आहे कीं, राष्ट्रीय सभेस जोम आणण्याचें पुण्य अनायासें आमच्या पदरीं पडण्याची वेळ आली आहे. तेव्हां हें श्रेय संपादण्याकरतां त्यांनीं यंदांचे वर्षी मनःपूर्वक खटपट करावी. आपल्या राष्ट्राविषयीं त्यांच्या मनांत पूर्णपणें प्रेम वसत असूं द्या, ह्या प्रेमानें ओथंबलेल्या अंतःकरणानें राष्ट्रीय काम करण्यास पुढें सरसवा, तुमच्या प्रेमाचा ठसा तुमच्या राष्ट्रावर उठल्यावांचून रहाणार नाहीं, तुमच्या प्रेमामुळें बहुजनसमाजाचीं अंतःकरणें तुम्हांविषयींच्या व तुमच्या देशाच्या प्रेमानें सद्गदित झाल्यावांचून रहाणार नाहींत, व देश-भक्तीच्या दृष्टीनें तुम्हीं चोंहोंकडे पाहिल्यावर तुम्हांप्रमाणेंच देशाकरितां कळकळीनें काम करणाऱ्या लोकांच्या मूर्ती तुमच्या दृष्टीस पडतील. नंतर आपण मूठभर आहोंत ह्या विचारानें मनाची निराशा न होतां आपण एकटे नसून हजारों आहों, लाखों आहों, अशा प्रकारची धमक तुमच्या रक्तांत खेळूं लागेल. देशभक्ति तुमच्या अंतःकरणांत उचंबळूं द्या, अंग मोडून काम करण्याचा निश्चय तुम्हीं आपल्या मनाशीं करा व नंतर ह्या नवीन प्रेम-दृष्टीनें सभोंवतालच्या जगाकडे पहा, म्हणजे तुमच्या अंतःकरणांतील प्रेमाचीं झिलई सर्व विश्वावर चढलेली तुमच्या नजरेस पडेल व तुमच्या सद्हेतूचें, तुमच्या निश्चयाचें, तुमच्या कळकळीचें प्रतिबिंब सर्व ठिकाणीं तुम्हांस पहाव-यास मिळेल. अध्यक्ष साहेबांनीं सांगितलेले वरील प्रकारचें उपदेशाचे शब्द कॉंग्रेसचे सर्व भक्त आपल्या मनांत वागवतील अशी आम्हीं आशा करतों.

# * लॉर्ड कर्झन यांचीं भाषणें

हिंदुस्थानच्या ग. ज. साहेबांची जागा पत्करण्यापूर्वी लॉर्ड कर्झन यांना पार्लमेंट सभेंत लॉर्ड सालिसबरी साहेबांचे अंडरसेक्रेटरी या नात्यानें इतर राष्ट्रांशीं सुरू असलेल्या डावपेंचासंबंधानें नेहमीं बोलावें लागे, व त्यावेळीं सुश्राव्य भाषण करण्याचे कलेंत बरेंच नैपुण्य त्यांनीं मिळविलें. पुढें हिंदुस्थानच्या बादशहाच्या जागीं त्यांची नेमणूक झाल्यावर मेजवान्यांचे वेळीं हिंदुस्थान संबंधानें मनोहर संभाषण करण्याचा त्यांनीं क्रम ठेविला, तेव्हां लॉर्ड कर्झनसाहेबांच्या सर्वशक्ति बोलण्यांतच खर्च होतात किंवा कसें, अशी त्यावेळीं कांहींना भीति वाटली. शेवटीं एका भाषणांत लाटसाहेबांनीं हिंदुस्थानचा ग. ज. होणें म्हणजे नुसतीं भाषणें करीत सुटणें नव्हे तर राज्यकारभार व्यवस्थितपणानें पाहणें होय, असें आपलें स्पष्ट मत सांगितलें, व तेव्हांपासून थोडकेंचवेळां बोलतील अशी पुष्कळांनीं अटकळ केली होती. पण पार्लमेंट सभेंत बोलण्याची लागलेली खोड मनाच्या निश्चयानें कोठची नाहींशी होणार ? हिंदुस्थानांत येण्यापूर्वी बहुतकरून प्रत्येक आठवड्यांत कोठें ना कोठेंतरी एक दोन वेळां ते बोललेच व हिंदुस्थानांत आल्यावरहि त्यांनीं तोच क्रम सुरू ठेविला होता. एकंदरींत लॉर्ड कर्झन 'कर्ते' व्हाइसरॉय होवोत किंवा न होवोत 'बोलके' लॉर्डसाहेब झाल्यावांचून रहाणार नाहींत. तथापि येथें हें कबूल केलें पाहिजे कीं, गेल्या आठवड्यांतील तीन भाषणांवरून 'कर्ते' म्हणून घेण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा स्पष्ट दिसते व त्यांचीं भाषणें भाषेच्या झोकदार मांडणीनें व अलंकारांनीं सुशोभित असतात; इतकेंच नव्हे, तर त्यांच्या पुढें मांडलेल्या मुद्यांचा बरेंच श्रम घेऊन विचार केलेला भाषणांवरून दृष्टीस पडतो.

---

* केसरी, ७ फेब्रुवारी १८९९.

तारीख ३१ जानेवारी रोजीं आमच्या लाटसाहेबांना 'कलकत्ता ट्रेडस असोसिएशन' व 'महॉमेडन असोसिएशन' या दोन संस्थांनीं मानपत्रें दिलीं. व्यापारी मंडळाचे मानपत्राला उत्तर देतांना त्यांनीं प्रथम असें सांगितलें कीं, युरोपियन भांडवल हिंदुस्थानांत येऊन या देशांतील नैसर्गिक उत्पन्नाचा उपयोग करून निरनिराळे कारखाने काढण्यांत व देशाची संपत्ति वाढविण्यांत खर्च होणें अत्यंत आवश्यक आहे, व यासंबंधानें हिंदुस्थान सरकारनें युरोपियन भांडवलवाल्यांना चांगलें उत्तेजन देणें जरूर आहे. देशी भांडवल लाजाळू असल्यामुळें उघडया मैदानावर मोठमोठे कारखाने काढून हिमतीचीं व धाडसाचीं कामें त्यांचे हातून होत नाहींत. नेटिव्ह भांडवल शेतीकडे खर्च होतें, व या कामीं व्याजहि चांगलें पडतें. यामुळें युरोपियन भांडवलानें हिंदुस्थानांत येऊन हिंदुस्थानची वाढ केली पाहिजे. इंग्रजी भांडवल हिंदुस्थानांत आल्यास देश अधिक भिकेस लागेल हें मत चुकीचें आहे. इंग्रजी भांडवल अति स्वस्त दरानें मिळतें व त्याचा उपयोग अमेरिका, युरोपांतील राष्ट्रें व आशिया खंडांतील कांहीं राष्ट्रें म्हणजे बहुतेक सर्व जगभर होतो. लंडनचे पेढीवाले सर्व जगाचे सावकार आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं व त्यांच्यापाशीं रिकाम्या पडलेल्या भांडवलाचा हिंदुस्थानच्या आधिभौतिक उन्नतीकडे उपयोग व्हावा हेंहि इष्ट आहे. पण या प्रश्नाचा विचार करतांना, नुसतें इंग्रजी भांडवल हिंदुस्थानांत येणें व भांडवलाबरोबर इंग्रजी व्यापारी व इंग्रजी कारखानदार हेहि येणें या दोन गोष्टी निराळ्या आहेत हें विसरतां कामा नये. पहिली गोष्ट जशी इष्ट आहे तशी दुसरी गोष्ट इष्ट नाहीं. एखाद्यानें व्यापार करण्याकरितां किंवा कारखाना काढण्याकरतां सावकाराचें अल्प व्याजानें कर्ज काढणें ही एक गोष्ट व सावकारानेंच सुरू ठेवलेल्या व्यापारांत किंवा कारखान्यांत दररोज राबून मजुरी घेणें ही दुसरी गोष्ट. या दोन स्थितींत जसें अंतर आहे तसेंच

इंग्रजी भांडवल व इंग्रजी व्यापारी अथवा कारखानदार यांत अंतर आहे. कारखाना किंवा इतर उद्योगधंदा चालविण्याकरितां विपुल भांडवल आमच्या ह्या दरिद्री होत चाललेल्या देशांत नाहीं. तेव्हां परदेशाहून भांडवल आणलें पाहिजे. या भांडवलाचा योग्य उपयोग आमच्या लोकांना करतां येईल अशा प्रकारचें औद्योगिक शिक्षण व अनुभव मिळण्याच्या संधि सरकारनें लोकांस दिल्या पाहिजेत. पण इंग्रजी कारखानदारांनीं येथें यावें, आम्हांस राबवून पोटापुरती मजुरी आमचे अंगावर फेंकून द्यावी, व कारखान्यांत घातलेल्या भांडवलाचें व्याज, कारखान्याचा नफा, कारखान्याच्या कौशल्याच्या व जबाबदारीच्या नोकऱ्यांचा फायदा, अनुभव सर्व कांहीं परक्यांच्या पदरांत पडावें या स्थितीनें कोणत्याहि राष्ट्राचें कल्याण होण्याजोगें नाहीं. आसामांत जाऊन चहाची लागवड करणाऱ्या गव्हर युरोपियन कारखानदारानें आसामची संपत्ति वाढविली असें म्हणणें जितकें सयुक्तिक दिसेल तितकेंच सयुक्तिक युरोपियन कारखानदारांच्या सुळसुळाटानें हिंदुस्थान श्रीमंत होईल हें म्हणणें आहे. फ्रान्स किंवा रशिया असल्या राष्ट्रांनाहि लंडनांतील सावकारांकडून भांडवल घ्यावें लागतें, पण त्या राष्ट्रांना भांडवलाच्या अत्यंत अल्प व्याजापलीकडे इंग्लंडला कांहींहि मोबदला द्यावा लागत नाहीं. गेलीं चार पांच वर्षें हिंदुस्थान सरकार दरवर्षी सरासरीनें सहा कोट रुपये इंग्लंडांतील सावकाराकडून कर्ज घेऊन येथें आगगाड्या तयार करीत आहे. आतां या नवीन आगगाड्यांपैकीं बऱ्याच राजकीय कारणांकरितां बांधलेल्या असल्यामुळें त्यापासून भांडवलाचें व्याजहि निष्पन्न होत नाहीं. हा प्रकार एका बाजूस ठेवला तरी आगगाडीचा कारखाना नेहमीं चालवण्याचें काम किंवा तो कारखाना उभारण्याचें काम इतक्या अवधीनंतर सरकारनें नेटिव्हांस शिकवावयास नको होतें काय? सरकार कर्ज काढून आगगाड्या बांधूं लागून कितीतरी वर्षें झालीं. सरकारनें या धोरणानें काम

नगर वाचनालय, सातारा.



चालविलें असतें तर एव्हांना ज्यांच्यावर आगगाडी तयार करण्याचें किंवा तो कारखाना नेहमीं चालवण्याचें काम सर्वस्वी सोंपवितां येईल अशा लायकीचे कितीतरी नेटिव्ह तयार झाले असते. आगगाडी तयार करण्याकरितां फ्रान्ससारख्या एखाद्या स्वतंत्र राष्ट्रानें दरवर्षी इंग्लंडपासून दहा बारा कोटी रुपये कर्ज काढलें असें समजूं या. अशा स्थितींत इंग्लंडचें भांडवल घेतलें म्हणून तिकीट कापण्याचें क्षुल्लक कामाकरतांहि फ्रेंच लोकांना फ्रान्सनें साधारणपणें नालायक ठरवलें असतें काय ? स्वस्त दराचें बाहेरचें भांडवल आपल्या गांवांत येणें व आपल्या गांवांत मारवाड्याचें कायमचें ठाणें पडणें यांत फरक आहे हें विसरतां कामा नये. थोडक्या दिवसांपूर्वी कलकत्त्याचे चेंबर्स ऑफ कॉमर्सचे मानपत्राला उत्तर देतांना लॉर्ड कर्झन यांनीं वरील भेद स्पष्ट केला होता. व हिंदुस्थानांतील कारखाने वाढत आहेत असें असतांना कारखान्यांतून उरलेला फायदा नेटिव्हांचे पेटींत किती जातो आणि किती कारखाने नेटिव्हांनीं चालविले आहेत हेंहि पाहिलें पाहिजे असें त्यांनीं सांगितलें होतें. तेव्हां युरोपियन भांडवलास हिंदुस्थानांत येऊन पडण्यास उत्तेजन देतांना आसामांतील चहाचे लागवडीच्या कारखान्यासारखी निराळ्या स्वरूपाची स्थिती हिंदुस्थानांत चोंहोंकडे हल्लींहून अधिक दृष्टीस न पडेल अशी खबरदारी हिंदुस्थान सरकारकडून घेण्यांत येईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानांतील कारखान्यांतून तयार झालेल्या वस्तूंना सरकारनें योग्य उत्तेजन देण्यासंबंधाचा वरील भाषणांतील दुसरा महत्त्वाचा मुद्दा आहे. बऱ्याच कोटींचें सामान हिंदुस्थान सरकारला दरवर्षी खरेदी करावें लागतें. हें सामान स्टेट सेक्रेटरीसाहेब इंग्लंडांत खरेदी करून हिंदुस्थानांत पाठवून देतात. सरकारास लागणाऱ्या वस्तू हिंदुस्थानांतील कारखान्यांत तयार होतात किंवा कसें, त्या हिंदुस्थानांतच खरेदी करणें सरकारास परवडेल किंवा कसें, या गोष्टींचा योग्य विचार न करतां हिंदुस्थानांतील कारखान्यांकडे दुर्लक्ष

करून हिंदुस्थान सरकार आपली खरेदी इंग्लंडांत करतें अशी लोकांची समजूत आहे. ' कलकत्ता ट्रेडस् असोसिएशन 'नें लॉर्ड साहेबांपुढें मांडलेल्या ह्या समजुतीप्रमाणें ते म्हणाले कीं, ही समजूत आहे एवढेंच वरें. कारण तो समज दूर करतां येईल. १८८३ सालीं लॉर्ड रिपन साहेबांचे कारकीर्दीत सरकारचें लक्ष प्रथम ह्या गोष्टीकडे गेलें त्यावेळीं असा ठराव प्रसिद्ध झाला कीं, हिंदुस्थानांतील कारखान्यांत तयार होणाऱ्या वस्तू, विलायती मालाशीं तुलना करतां किंमतीच्या मानानें व गुणांनीं गैर नसल्यास हिंदुस्थान सरकारनें त्या विकत घ्याव्या. ह्यावेळीं हिंदुस्थानचे हिंदुस्थानांत खरेदी करण्यास हरकत नाहीं अशा वस्तूंची सरकारनें एक यादी तयार केली. आतां जसजसे नवीन कारखाने व नवीन व्यापार हिंदुस्थानांत उत्पन्न होत आहेत तसतसे त्या यादींत फेरबदलहि होत आहेत. आणि गेल्या वर्षाच्या जून महिन्यांत तर परदेशाहून लोखंड व पोलाद आणून त्याच्या हिंदुस्थानांतील कारखान्यांत बनविलेल्या वस्तू घेण्यासंबंधानें बराच योग्य फेरबदल ह्या यादींत झाला आहे. ९६।९७ सालीं हिंदुस्थान सरकारनें जी खरेदी केली त्यापैकीं एक तृतीयांश माल म्हणजे १५०००० रुपयांचा माल सरकारनें हिंदुस्थानांतील कारखानदारांपासून घेतला. लॉर्ड कर्झन साहेबांचें असें म्हणणें आहे कीं, जर खुद्द व्हाइसरॉयसाहेब कलकत्त्यांतील कारखान्यांत तयार झालेल्या बगींत बसून हवा खाण्यास जातात, त्यांच्या घोडयांचें सामान कलकत्त्यांतील कारखान्यांत तयार केलेलें असतें, आपल्या भाषणांचे मुद्दे जर व्हाइसरॉयसाहेब बंगाल्यांतील कागदाचे गिरणींतील कागदावर टिपतात, लढाईस किंवा कवाईत करावयास निघालेले हिंदुस्थान सरकारचे शिपाई रणभूमीवर किंवा कवायतीचे मैदानावर हिंदुस्थानांतील कारखान्यांतून बाहेर निघालेले डगले वापरतात, तर हिंदुस्थान सरकार येथील कारखान्यास उत्तेजन देण्याविषयीं उदासीन आहे असें केव्हांहि म्हणतां यावयाचें नाहीं. ना. लॉर्डसाहेबांनीं

हिंदुस्थानांतील उद्योगधंद्याला मनःपूर्वक मदत करण्याविषयीं अभिवचन दिलें. लॉर्ड कर्झनसाहेबांच्या सदिच्छा केवळ शाब्दिकच होत्या असें म्हणण्याची पाळी त्यांच्या कारकीर्दीचे अखेरीस न येवो म्हणजे झालें. शिवाय मूळ ठराव झाल्यापासून पंधरा वर्षांनीहि हिंदुस्थान सरकारला एक तृतीयांशाहून अधिक माल हिंदुस्थानांत घेतां येऊं नये, ही फुशारकी मारण्याजोगी गोष्ट निःसंशय नव्हे.

कलकत्ता महॉमेडन असोसिएशननें आपल्या मानपत्रांत मुसलमानांचे शिक्षणास विशेष उत्तेजन देण्याविषयीं विनंति केली होती. वरील विनंतीच्या धोरणानेंच वागण्याची हिंदुस्थान सरकारची कित्येक दिवसांची पद्धत आहे, असें लॉर्डसाहेबांनीं उत्तरादाखल सांगितलें. लॉर्ड मेयो यांच्या कारकीर्दीपासून द्रव्यद्वारा व इतर रीतीनें मुसलमानांच्या शिक्षणास सरकार विशेष उत्तेजन देत आहे. असें करण्यांत मुसलमानांना वाजवीहून फाजील सवलती मिळाव्यात असा सरकारचा बिलकूल हेतु नसून त्यांना इंग्रजी राज्यापासून योग्य फायदे करून घेतां येत नाहींत ते घेतां यावेत एवढाच आहे. सरकारनें एका विशिष्ट वर्गाला विशेष सवलती देण्याचें कितीहि मनांत आणलें तरी हें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, चढाओढींत जे पुढें येतील त्यांच्या गुणांची चीज करणें हें राष्ट्रास व सरकारास अत्यंत हितावह आहे. एखाद्या वर्गाला उच्च गुण संपादितां येत नाहींत, म्हणून कमी गुणांवर सरकारनें तहान भागवून घेतां कामा नये. तर त्या वर्गाचे अंगीं उच्च गुण उत्पन्न करण्याची खटपट केली पाहिजे. शिवाय लॉर्ड कर्झन साहेबांनीं असेंहि सांगितलें कीं, १८९२ सालीं हिंदुस्थानांतील लोकसंख्येपैकीं शें. २१ मुसलमान होते, व शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांतहि शें. १९ विद्यार्थी मुसलमान होते. पब्लिक सर्व्हिस कमिशननें रिपोर्ट केला त्यावेळीं हिंदुस्थानचे लोकसंख्येंत शें. ७५ हिंदु होते व शें. २० मुसलमान होते व त्यावेळीं २५८८ लोक सरकारी अंमलदारांचे व न्यायाचे जागांवर होते. त्यापैकीं १८६६ म्हणजे शें.

७२ हिंदु होते. आणि ५१४ म्हणजे शें. १९ मुसलमान होते. वरील आंकड्यांकडे पाहिलें असतां हिंदूंच्यापेक्षां मुसलमानांना ह्या कामीं तक्रार करण्यास बिलकुल जागा नाहीं. लोकलबोर्डें, म्युनिसिपालिट्या, कायदे कौन्सिलें यांजकडे पाहिलें तरी मुसलमान सभासदांचें प्रमाण गैरशिस्त दिसावयाचें नाहीं. बंगाल, मुंबई आणि पंजाब येथील कौन्सिलांत प्रत्येकीं दोन मुसलमान सभासद आहेत, व वायव्यप्रांत, मद्रास व हिंदुस्थानसरकार यांचे कौन्सिलांत एक एक मुसलमान सभासद आहे. लॉर्ड साहेबांनीं दिलेल्या वरील आंकड्यांकडे पहातां आमच्या मुसलमान बंधूंना त्यांच्या इतर देशबांधवांपेक्षां तक्रार करण्यास जागा नाहीं असें आढळून येईल.

गेल्या आठवड्यांतील लॉर्ड कर्झन साहेबांचें तिसरें भाषण म्हणजे बंगालचे जमीनदारी पंचायतीचे मानपत्राला त्यांनीं दिलेलें उत्तर होय. या मानपत्रांत एकंदर तीन गोष्टी लॉर्डसाहेबांचे पुढें मांडल्या होत्या. ( १ ) शेतकऱ्यांनाहि योग्य शिक्षण मिळत नाहीं. ( २ ) श्रीमंत जमीदारांनाहि त्यांच्या दर्जाला साजेसें व त्यांच्या स्थितींतील लोकांना उपयोगी पडेसें शिक्षण मिळत नाहीं. ( ३ ) इंग्रजी न्यायपद्धतीनें रयत अधिक कर्जबाजारी झाली आहे. तिसरा मुद्दा लॉर्डसाहेबांना बहुतेक मान्य झालाच. पहिल्या मुद्यासंबंधानें त्यांनीं असें सांगितलें आहे कीं, शेतकऱ्यांना शेतकऱ्यांचे धंद्यांत उपयोगी पडण्याजोगें शिक्षण दिलें पाहिजे हें सरकारासहि मान्य आहे व त्या दृष्टीनें सरकारनें बंगाल्यांतील शेतकऱ्यांचे शाळांतून सुरू करावयाच्या पुस्तकांत फेरफारहि केले आहेत. ह्या कामीं बंगाल्यांतील श्रीमंत जमीनदारांनीं सरकारवर विशेष अवलंबून न रहातां स्वतःच नवीन तऱ्हेनें शेतकऱ्यांस शिक्षण देण्याचा उपक्रम सुरू केला पाहिजे. शिवाय हेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, विशेष प्रकारचें धंदेशिक्षण देतांना त्या धंद्यासंबंधाच्या योग्य माहितीचें आकलन विद्यार्थ्यांस करतां येण्याइतकें सामान्य शिक्षण त्यास देणें जरूर आहे. बंगाल्यांतील श्रीमंत जमीनदार व इतर ठिकाणचे सरदार व राजेरजवाडे ह्यांच्या मुलांना योग्य शिक्षण देण्याकरितां राजकुमार कॉलेज

सारख्या संस्था आहेत. त्याचा उपयोग त्यांनीं अवश्य करून घ्यावा. सार्वजनिक शाळेंत जाऊन विद्यार्जन करण्याची पाश्चिमात्यांची चाल पौर्वात्यांच्या अंगवळणीं पडणें जरा कठीण असलें तरी राजकुमार कॉलेजसारख्या संस्थांचा उपयोग करून घेतल्याखेरीज गत्यंतर नाहीं. शिवाय बड्या लोकांच्या शिक्षणाची सोय इंग्लंडांत ज्याप्रमाणें सरकारमार्फत होत नाहीं त्याप्रमाणें हिंदुस्थानांतहि बड्या लोकांनीं आपली आपण सोय केली पाहिजे असेंहि लॉर्ड साहेबांनीं सांगितलें. बड्या लोकांच्या शिक्षणाची सोय योग्य येथें असावी तशी नाहीं हें तर खरेंच, पण त्यापेक्षांहि बड्या लोकांतील तरुण पिढीला सगळ्यांत मोठें संकट म्हणजे आयुष्यांत विशिष्ट गोष्ट साधावयाची आहे असें त्यांचेपुढें कांहींच नसतें. गरीब व मध्यम स्थितींतील लोकांना उदरनिर्वाहाकरितां व आपली स्थिति श्रीमंतीच्या व दर्जाच्या मानानें सुधारण्याकरितां सुधारणा करावी लागते. पण ज्यांना सुदैवानें वरील गोष्टी आयत्याच मिळाल्या आहेत त्यांना राष्ट्रहिताचे कामीं युक्ति प्रयुक्तीनें जुंपून राष्ट्रहित अधिक करून सरकारकडून वाहवा, किंवा लोकांकडून शाबासकी कोण मिळवितो अशी त्यांच्यांत चढाओढ उत्पन्न करून त्यांच्या महत्त्वाकांक्षेला भ्रमण करण्यास खुलें आवार दाखवून आयुष्यांत कांहीं विशेष कर्तव्य आहे अशी जागृति त्यांच्यांत उत्पन्न करण्याकडे सरकारनें विशेष लक्ष न पोंचविल्यास बड्या लोकांचा उपयुक्त वर्ग स्वतःस व राष्ट्रास फार हानिकारक होतो. शक्तीला योग्य काम दाखविलें पाहिजे, नाहीं तर ती आंतल्या आंत झुरून जाऊन शेजाऱ्याचे अंगावर कोसळल्यावांचून रहाणार नाहीं. इंग्लंडांतील बड्या लोकांचे महत्त्वाकांक्षेस मुबलक स्थळ आहे अशी स्थिति हिंदुस्थानची बिलकुल नाहीं जोंपर्यंत हिंदुस्थान सरकार बड्या लोकांचा योग्य उपयोग करण्याकडे दुर्लक्ष करील तोंपर्यंत त्यांना शिक्षण कोणत्या प्रकारचें मिळालें पाहिजे याचा विचारहि सरकारांतून होण्याचा संभव नाहीं, हें उघड होय.

# * ज्युबिलीच्या खुनांची पुरवणी : द्रविड बंधूंचे खून

एका आठवड्यापूर्वी गणेश शंकर द्रविड यांचें नांव मुंबईच्या टाइम्स, ॲडव्होकेट ऑफ इंडिया आदिकरून दैनिक इंग्रजी पत्रांतून फडकत होतें. रँड साहेबांच्या खुनाचा तपास लावण्याचे कामीं द्रविड बंधूंनीं पोलिसांस केलेल्या मदतीबद्दल सरकारनें त्यांना कैदेंतून मुक्त करून दहा हजार रुपये बक्षीस दिले, हें आमच्या वाचकांस माहीत आहेच. पण सरकारचे बक्षिसानें गणेश शंकर संतुष्ट झाला नाहीं तर उलट त्यानें सरकारविरुद्ध तक्रारीचें पत्र ॲडव्होकेट ऑफ इंडिया या पत्रांत प्रसिद्ध केलें. गणेश शंकर यांच्या तक्रारीचा मतलब बहुतेक त्यांच्याच शब्दानें गेल्या खेपेस देऊन त्यासंबंधानें आमचा अभिप्राय प्रसिद्ध केला होता. गेल्या आठवड्यांत पुण्यांत ज्या भयंकर व कल्पनातीत गोष्टी घडून आल्या त्या गोष्टींपुढें द्रविडांचे ह्या पत्रास बरेंच महत्व प्राप्त झालें आहे. यामुळें पुढील हकीकत देण्यापूर्वीं त्या पत्रांतील कांहीं भाग वाचकांपुढें प्रथम मांडणें जरूर आहे. द्रविडांच्या सदर पत्रांत एकंदर तीन तक्रारी होत्या. ( १ ) वीस हजारांचे जागीं दहा हजारच रुपये बक्षीस दिले. ( २ ) ह्या दहा हजारांपैकीं २६० रुपये इन्कमटॅक्स म्हणून कापून घेतले व ( ३ ) लोकांकडून मानकाप्या म्हणून म्हणवून घेऊन सरकारास माहिती पुरविण्याचें धाडसाचें काम केलें असतांहि द्रविडांची करावयास पाहिजे तशी चीज सरकारनें केली नाहीं. ह्यापैकीं पहिला व शेवटचा हे दोन मुद्दे महत्वाचे होत हें सांगावयास नकोच. पहिल्या मुद्यासंबंधानें गणेश शंकर द्रविड आपल्या पत्रांत येणेंप्रमाणें लिहितोः—" ज्युबिलीच्या

---

* केसरी, ता. १४ फेब्रुवारी १८९९.

रात्रींचें भयंकर कृत्य झाल्यानंतर लगेच सरकारनें जाहीरनामा प्रसिद्ध करून ज्यायोगानें खुनी मनुष्यास हुडकून काढतां येईल व त्यांजवर आरोपाची शाबिती होईल अशी माहिती पोलिसांस जो कोणी किंवा जे कोणी देतील त्यांना २० हजार रुपये बक्षीस देण्यांत येतील असें जाहीर केलें त्याची आठवण असेलच. ही माहिती कोणी दिली व त्याचा परिणाम काय झाला ह्या आतां गतगोष्टी झाल्या आहेत. मीच ही माहिती दिली असें ह्या खट-ल्याशीं संबंध असलेल्या अधिकाऱ्यांनीं स्वच्छ कबूल केलें आहे.तेव्हां अर्थात् सबंध बक्षीस मलाच दिलें पाहिजे होतें, पण तसें झालें नाहीं. अर्धीच काय ती रक्कम मी आणि माझा एक भाऊ ह्यांत वाटून देण्यांत आली." तिसऱ्या मुद्यासंबंधानें तो लिहितोः--"आपल्या एका देशबांधवाची बदनामी करून स्वतःस नानकाप्या म्हणवून घेण्याचा आरोप आपणांवर घेण्यास अमोलिक धैर्य दाखवावें लागलें. ( माझ्या या कृत्याकडे पुष्कळ वेळां लोक ह्या दृष्टीनें पहातील ह्यांत शंका नाहीं. ) तथापि मीं या सर्वांना जुमानलें नाहीं, आणि माझ्या अल्पशक्तीप्रमाणें अधिकाऱ्यांना मदत केली. तेव्हां सरकारी जाहीर-नाम्याचा पुरा फायदा आम्हांस मिळूं नये ही गोष्ट अन्यायाची व निर्दय-पणाची आहे इतकेंच नव्हे तर त्याहून जरा अधिकच होय." गणेश शंकरानें पोलिसांस कोणती माहिती दिली हें अद्याप प्रसिद्ध झालेलें नाहीं. तरी द्रवि-डांचे सहाय्यानें दामोदर हरी चापेकर पकडला गेला व त्यांच्याच मदतीनें दामोदरावर खुनाचा आरोप शाबीत झाला, या गोष्टी अधिकाऱ्यांना कबूल आहेत. दामोदर ह्यांजवरील खटल्याची चौकशी चालली असतांना गणेश शंकर तुरुंगांतच होता व दामोदराला फांसावर चढविल्यानंतर गणेश शंकराचे हातीं दहा हजार रुपये पडले. रँड साहेबांचा खून, दामोदर हरि चापेकर याची चौकशी, त्यास फांशीं देणें व द्रविड बंधू, इत्यादि व्यक्तींचा व कृत्यांचा संबंध गेल्या वर्ष दोन वर्षांत कशा प्रकारचा जडला ह्याची ह्याहून अधिक

सविस्तर हकीकत देण्याचें कारण नाहीं. एक आठवड्यापूर्वी गणेश शंकरनें प्रसिद्ध केलेल्या पत्रासंबंधानें आणखी थोडीशी हकीकत दिली म्हणजे द्रविड बंधूंच्या खुनापूर्वीच्या गोष्टींचें परीक्षण पुरेसें होईल. वरील विवेचनावरून अधिकारी व द्रविड यांजमध्यें पैशासंबंधानें बरीच वाचावाची झाली असली पाहिजे हें स्पष्ट दिसतें. द्रविड बंधूंचे खुनाचे आधीं एक दोन दिवस मि. ब्रुइनसाहेब गणेश शंकर द्रविड यांजकडे गेले होते, व दोघांची उघडपणें चांगली बोलाचाली झाली. गणेश शंकर याचा धाकटा बंधू नीलकंठ यानें दामोदरावरील खटल्यांत दामोदराचे कबुलीसंबंधानें हकीकत सांगून चाफेकरां-विरुद्ध साक्ष दिली होती. त्या नीलकंठानें हल्लीं पोलिसनें पकडून आणलेला बाळकृष्ण यांजवरील खटल्यांतहि चाफेकरांविरुद्ध साक्ष द्यावी असें मि. ब्रुइन यांचें गणेश शंकरास सांगणें होतें. द्रविड बंधूंचें व मि. ब्रुइन यांचें एकमत होईना, व शेवटीं थोडें भांडणहि झालें असें म्हणतात. शिल्लक राहिलेल्या दहा हजार रुपयांसंबंधानें एकंदर हा तंटा होता हें सांगावयास नकोच.

## खुनाची हकीकत

खुन्या मुरलीधराचे देवळासमोर द्रविडांचें घर आहे. मुरलीधरास जाण्याचे कोपऱ्यावर, मंडलिकांची चाळ असून जवळच कै. वामन रावजी मोडकांचा वाडा आहे. बुधवार ता. ८ फेब्रुवारी रोजीं रात्रीं नऊ साडेनऊ वाजण्याचे सुमारास रा. विष्णु वामन मोडक हे आपल्या घराजवळचे कोपऱ्यावर उघड्या हवेंत फिरत होते. त्यावेळीं गणेश शंकर द्रविड यांनीं मुंबई सरकार-कडून नुकतेंच आलेलें पत्र पहावयास त्यांना आपल्या घरीं बोलावलें. द्रविड-बंधूंचा पत्रव्यवहार नुकताच इंग्रजी पत्रांतून प्रसिद्ध झाला होता. त्यामुळें स्वाभाविक कुतुहलानें रा. मोडक सरकारचें उत्तर पहावयास गेले. या पत्रांत इन्कमटॅक्सचे कापून घेतलेले २६० रुपये द्रविडांना परत मिळतील असें आश्वासन दिलें होतें. शिवाय गणेश शंकर याला सरकारी नोकरी देण्याचें

पूर्वी दिलेलें आश्वासन पाळण्याचीहि हमी घेतली होती. द्रविडबंधूंची बसाव-याची माडी रस्त्यावरच आहे व त्याच माडींत बिझिकचा डाव चालला असतांना रा. मोडक गेले होते. खुन्या मुरलीधराकडचा शहरचा भाग, पर्वती-कडच्या बागांना अगदीं नजीक असून रात्रीं बहुतेक त्या बाजूला सामसूम असतें. या बाजूला नेहमीं सुरक्षितपणा नसल्यानुळें फार पूर्वी चार स्वारांचें गेट होतें व आतां ह्या भागाचे थोड्याच अंतरावर पेरुचें गेट असून शिवाय अगदीं जवळ एक जुजबी लाकडी पोलिसचें गेट आहे. असो. रा. मोडक हे द्रविड बंधूंचे माडीवर साडेनऊ ते दहा यांचे दरम्यान होते हें वर सांगितलेंच आहे. बिझिकचा डाव चालला असतांना त्यावेळीं घरांत "कोण आहे का" असा विचारलेला आवाज ऐकूं आला. गणेश खिडकीपाशीं गेला व कोण आहे म्हणून विचारलें. आम्हीं, असें दोन आसामींनीं उत्तर दिलें. हे दोन इसम भिंतीजवळ अंधेरांत उभे होते. नंतर ते दोघे घरांत शिरून जिन्यांत गेले व माडींत न जातां त्यांनीं "गणेश व रामचंद्र यांना ब्रुइन साहेबांनीं बोलावलें आहे" असें हिंदुस्थानी भाषेत सांगितलें. "बरें आहे. डाव संपला कीं आलोंच." असें गणेश–रामचंद्र यांनीं उत्तर दिलें. वाट पहात आम्हीं खालीं उभे रहातों असें त्या दोन इसमांनीं सांगितलें व ते खालीं उतरले. खालीं द्रविडांच्या आईनें तुम्हीं कोण, कोठून आला, असा प्रश्न विचारला. तीस त्यांनीं वरीलच जबाब दिला. पण ह्यावेळीं त्यांनीं हिंदुस्थानींत भाषण न करतां चारपेंशाच्या मराटीनें उत्तर दिलें. त्यांनीं आपले चेहरे अर्धवट झांकून घेतले होते. पंजाबी नोकरासारखा त्यांचा पोषाख होता व त्यांच्या हातांत काठ्या होत्या असें त्यावेळीं दिसून आलें. दाराबाहेर जाऊन ते दोघे इसम उभे राहिल्यावर लगेच गणेश शंकर व रामचंद्र शंकर हे खालीं आले व ते चार इसम मिळून मंडलिकांचे चाळीचे कोपऱ्याकडे गेले. मिनिट अर्ध मिनिटांत पिस्तुलाचा आवाज ऐकूं येऊन "खून खून" "पोलिस पोलिस" अशा आरोळ्या ऐकूं आल्या.

## भयंकर अवस्था

वरील आरोळी ऐकल्यानंतर आसपास सर्वांचे पोटांत विलक्षण भीति उत्पन्न होऊन चोहोंकडे भयंकर धांदल सुरू झाली. द्रविडांच्या माडीवरील लोक, त्यांची आई, शेजारींच रहात असलेले डॉ. सहस्रबुद्धे व इतर शेजारी पाजारी जमा झाले. गणेश व रामचंद्र या दोघांनाहि गोळ्या पाठीवर लागल्या असून गणेशाचे अंगांतून गोळी पार निघून गेली होती. जागा रक्तबंबाळ झाली असून दोघेहि बंधु त्यावेळीं शुद्धीवर होते व कण्हत, ओरडत, देवाचें नांव घेत व शिव्याशाप देत होते. त्यांच्या आईनें तर त्यावेळीं एकच कल्लोळ उडवून सोडला. दोघेंहि ह्या जखमांतून बहुधा वांचणार नाहींत असें डॉ. सहस्रबुद्ध्यांचें मत पडलें. नंतर थोडक्या वेळानें पोलिस येऊन दाखल झाले, व दोघांनाहि इस्पितळांत नेण्यांत आलें. इस्पितळांत दुसऱ्याच दिवशीं सकाळीं गणेश व सायंकाळीं रामचंद्र मृत्यु पावले. पोलिसनें त्यावेळीं पुष्कळ मदत केली. पण खून करणाराचा त्यावेळीं तपास लागला नाहीं. खून करणारे पिस्तूल झाडून पेरूचे गेटाचे बाजूनें पळून गेले, ह्यापलीकडे ह्यावेळीं कांहींच अधिक माहिती लागली नाहीं. त्या दिवशीं रात्रीं पोलिसांनीं शहराभोंवतीं नाकेबंद्या केल्या होत्या व स्टेशनवर जाणाऱ्या सर्व उतारूंना तपासून त्यांच्याजवळील सामानसुमानांत हत्यार बित्यार आहे किंवा कसें हें पाहून सोडून देण्यांत येत होतें. खून होण्याबरोबर द्रविड बंधूंपैकीं एक रस्त्यानें ओरडत फरासखान्यापर्यंत पोलिसांस वर्दी देण्यास गेला होता. एकंदरींत त्या रात्रींच शहरांतील कांहीं भागांत द्रविडबंधूंच्या खुनाची बातमी पसरली, व गुरुवारीं सकाळीं निजून उठल्याबरोबर तर सर्वांना हेंच वर्तमान ऐकावयास मिळालें. त्यावेळीं लोकांची काय स्थिति झाली याचें बरोबर वर्णन करतां येणें शक्य नाहीं. ज्युबिलीच्या रात्रींच्या खुनाची बातमी ऐकून पुणेकरांच्या मनांत ज्याप्रमाणें एकप्रकारें गोंधळ, घोटाळा व चिंता हीं उत्पन्न झाली होती तशाच

प्रकारच्या चिंतामय चकित स्थितीची पुनरावृत्ति गुरुवारीं निघाली म्हणण्यास हरकत नाहीं, व ज्युबिलीच्या खुनानंतर सरकारनें दाखविलेल्या उग्र स्वरूपाचा कोणासच विसर पडला नसल्यामुळें सापाचे शेंपटीवर फिरून पाय टाकणाऱ्या या भयंकर कृत्यानें सर्वांचीं मनें उद्विग्न होऊन गेलीं.

## गणेश शंकर ह्याचें विचित्र चरित्र

खुनाच्या दिवशीं रात्रीं, व दुसरे दिवशीं सकाळीं पोलिसांनीं जारीनें चौकशी चालविली होती. खुनाचे जागेचे आसपास पोलिसांनीं पुष्कळ तपास केला पण कांहींच थांग लागेना. दुसरे दिवशीं सकाळीं इन्स्पेक्टर मूर यांना खुनाचे जागीं एक गोळी व तिला चिकटलेला एक हाडाचा तुकडा हीं सांपडलीं. गणेश शंकर ह्याचा विचित्र पूर्व इतिहास, त्यानें निरनिराळ्या प्रसंगीं केलेले गुन्हे व संपादलेलें वैर व खुनाचे पूर्वी त्याचें व पोलिसचें झालेलें भांडण, अशा नाना तऱ्हेच्या गोष्टी लोकांच्या पुढें एकदम उभ्या राहिल्यामुळें खुनासंबंधानें लोकांमध्यें नाना प्रकारचे तर्क सुरू झाले. लोकांच्या ह्या तर्कांची बरोबर कल्पना आमचे वाचकांस करितां यावी म्हणून गणेश शंकर याच्या जुन्या गुन्ह्यांचें दिग्दर्शन करणें येथें जरूर आहे. द्रविड हे तेलंग ब्राह्मण असून गणेश शंकर याचा जन्म त्रिचनापल्ली येथें झाला. पुढें द्रविड मंडळी पुण्यास आली. गणेशानें मॅट्रिक्युलेशनपर्यंत येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्यें अभ्यास केला. पुढें त्यानें इन्स्पेक्टर जनरल कर्नल हंप्रे ह्यांच्या ऑफिसांत नोकरी धरली. गणेशाचे हुषारीबद्दल कर्नल हंप्रे ह्यांचा त्याजवर फार लोभ व विश्वास असे. पण कर्नल हंप्रे ह्यांनीं क्षुल्लक कारणावरून त्याचा १० रु. पगार कमी केला. पुढें ह्या गोष्टीचा सूड उगविण्याकरतां कर्नल हंप्रे साहेबांच्या सहीचें खोटें बिल तयार करून मुंबईच्या अकौंटंट जनरल ऑफिसमधून गणेशानें पैसे उचलले. ह्याबद्दल त्याला ३ वर्षें कैदेची शिक्षा झाली. तुरुंगांत असतांना अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करून अर्धवट कारकुनीचें

काम त्यानें आपणाकडे घेतलें. नन्तर स्वतःला व आणखी कांहीं कैद्यांना सोडून देण्याविषयीं सरकारी बनावट हुकूम तयार करून ही स्वारी तुरुंगांतून राजरोस बाहेर आली. पण हा गुन्हा कसचा चेततो ! बनावट हुकूम तयार करण्याबद्दल पोलिसनें त्याला पकडलें व १८९६ सालीं मॅजिस्ट्रेटपुढें त्याचा हा खटला चालला असतांना गणेशानें मि. ब्रुइन आदिकरून पोलिस साक्षीदारांची उलट तपासणी करून फटफजीत करण्यांत चांगलें कौशल्य दाखविलें व मॅजिस्ट्रेटचे ठरावावर हायकोर्टापुढें दाखल केलेल्या यादीवरूनहि सामान्य कारकुनाहून त्याच्या अंगीं असलेली विशेष बुद्धिमत्ता दिसून आली. या खटल्यांत गणेशास दोन वर्षांच्या पूर्वीच्या शिक्षेस जोडून अधिक शिक्षा झाली. गणेश हा हुषार व धाडसी गुन्हेगार आहे, पाहिजे त्यावेळीं पाहिजे तें करण्यास चुकावयाचा नाहीं, हें त्यावेळीं मि. ब्रुइन यांचे ध्यानांत आलें. व पुढें मि. ब्रुइन व द्रविडबंधु यांची दोस्ती जमण्यास हेंच कारण झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. नंतर ज्युबिलीच्या रात्रीचे खुनासंबंधानें मि. ब्रुइन व गणेश यांच्यामध्यें तहनामा कसा झाला, त्याच्या अटी कोणत्या होत्या, कोणी कशा अटी मोडल्या, त्यामुळें भांडण कसें झालें वगैरे हकीकत वर आलीच आहे.

## पोलिस तपास व एक कट

द्रविड बंधूंचा खून कोणी केला यासंबंधानें विलक्षण कुतर्क लोकांचे मनांत आणण्यास पूर्वग्रह कसे तयार होतात, हें वरील विवेचनावरून वाचकांचे ध्यानांत येईलच. आपल्या सोबत्याची गुप्त बातमी फोडून "मानकाप्याचा ( traitor )" धंदा करणारे लोक पूर्व देशाप्रमाणें पश्चिम देशांतहि रोमच्या अमदानीच्या पूर्वीपासूनहि तिरस्करणीय मानले जात, व अशल्या मानकाप्यांना कांहीं प्रसंगापुरतें हातांत धरणें भाग असलें तरी राज्यकर्त्यांपासून प्रजाजनांपर्यंत कोणीहि त्यांना मान देत नाहीं, असें मद्रासचे 'हिंदु' पत्रकर्त्यानें लिहिलें आहे. तथापि कोणाचाहि खून झाला तरी मनुष्यमात्रास

बरें वाटणें शक्य नाहीं, व त्याप्रमाणेंच द्रविडबंधूंच्या खुनाबद्दलहि कोणासहि बरें वाटलें नाहीं. ही दामोदराची हकीकत पोलिसांना कळवितांना स्वतःस आपण अधिक नादान करून घेत आहों हें गणेशाच्या पूर्णपणें ध्यानांत आलें होतें. व "मानकाप्या"चें कार्य करण्यांत आपण केवढी जोखम स्वतःचे शिरावर घेत आहोंत, हेंहि तो पूर्णपणें ओळखून होता. त्याच्या पत्रांतील तिसऱ्या मुद्यासंबंधानें त्यानें स्वतः काढलेले उद्गार नीट लक्ष लावून वाचले म्हणजे आमचे वाचकांचे लक्षांत येईल. मनुष्यस्वभावाच्या ज्ञानाचे धोरणानेंच मि. ब्रुइन यांनीं द्रविडबंधूंच्या खुनाचा तपास करण्यास प्रारंभ केला. दामोदर याचे खटल्याचे वेळीं शहरांतील कांहीं इसमांना द्रविडबंधूंनीं दिलेल्या माहितीवरून दामोदरचे सोबती या नात्यानें फरासखान्यांत बोलावून नेण्यांत आलें होतें. ज्युबिलीच्या रात्रीच्या खुनाशीं त्यांचा कांहीं संबंध नाहीं असें वाटल्यावरून पोलिसानें त्यांना सोडून दिलें. पण त्यांचेवर पोलिसांचें लक्ष होतेंच. चार द्रविड बंधूंपैकीं सर्वांत धाकटा भाऊ नीलकंठ शंकर द्रविड यानें दामोदरच्या सोबत्यांची हकीकत रँड साहेबांचे खुनाचे खटल्याचे वेळीं आपल्या साक्षींत दिली आहे. त्या साक्षींत दामोदरनें स्थापलेल्या क्लबाची हकीकत आहे. द्रविड हा त्या क्लबाचा मेंबर होता, व पोलिसांस जी कांहीं माहिती तुरुंगांत असतांना दिली होती ती जरी अद्याप प्रसिद्ध झाली नाहीं तरी ह्याच क्लबासंबंधीची ती असली पाहिजे असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. तेव्हां द्रविड बंधूंच्या खुनासंबंधानें सदर क्लबांतील मंडळींवर पोलिसांचा संशय येऊन खुनाचे रात्रीं शहरांत नाकेबंदी करतांना मेंबरांचे घरांवर पोलिस पहारा बसविला. या क्लबासंबंधानें नीळकंठाचे साक्षींतच काय ती हकीकत प्रसिद्ध झाली आहे. ह्याकरितां

## नीलकंठ शंकर द्रविड याची साक्ष

येथें देणें जरूर आहे. नीलकंठानें येथील सेशन कोर्टांत रँडसाहेबांचे खुनाचा खटला चालला असतांना दिलेली साक्ष येणेंप्रमाणें आहे:—"आरोपीचा

धाकटा भाऊ माझा स्नेही आहे. बाळकृष्णास बापूराव म्हणत. एक दोन वेळां मी चाफेकरांचे घरीं गेलों होतों. गेल्या शिमग्याचे वेळीं कोर्टांत असलेल्या हत्यारांसारखीं हत्यारें साफ करीत असतांना मीं आरोपीस पाहिलें. खाजगीवाल्यांचे वाड्यांतील दामोदर क्लबचा मी मेंबर आहें. मी बखरी वाचावयास जात होतों. त्याला इंग्रजींत क्लब असेंच नांव होतें मी पांचव्या इयत्तेंत आहें. त्या ठिकाणीं शारीरिक श्रम करीत असत. दहा महिने क्लब चालला होता. क्लबांत असलेलीं हत्यारें मीं पाहिलीं होतीं. हत्यारें जमिनींत पुरून ठेवीत. महादेव नारायण व हरि हे हत्यारें साफ करीत. त्यांचीं आडनांवें माहीत नाहींत. कोर्टांतील पिस्तुलासारखें पिस्तुल मीं चाफेकरांचे हातांत पाहिलें आहे. तें पांच बारी होतें. त्रिंबक मुस्कुटे क्लबचा मेंबर होता. पांच महिन्यांपूर्वी तो मेला. मी दहा महिने क्लबचा मेंबर होतो. पांचसहा मेंबर मला भेटत, क्लबचा खर्च कोण करीत असे, भाडें कोण देत असे, भाडें पडत असे किंवा नाहीं हें मला माहीत नाहीं. क्लब दामोदरचा एवढें मला माहीत आहे. मी वर्गणी देत नव्हतों. पुण्यांत असले आणखी क्लब आहेत किंवा नाहीं हें मला माहीत नाहीं. दामोदरला हत्यारें साफ करीत असतांना मीं एकदांच पाहिलें." ( * केसरी ता. ८–२–९८ )

खाजगीवाल्यांचे वाड्यांतील क्लबमेंबर म्हणून चार पांच आसामींचीं नांवें वर्ष दीड वर्षापूर्वीच द्रविडनें पोलिसांस सांगितलीं असलीं पाहिजेत हें वरील साक्षीवरून वाचकांचे ध्यानांत येईलच. खुनाच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं पोलिसनें कोणी रानडे व साठे या नांवाच्या दोन इसमांना फरासखान्यांत पोलिस तपासाकरितां नेलें. रानडे हा सायन्स कॉलेजांतील गव्हर्नमेंट वर्कशॉपमधील विद्यार्थी आहे, व साठे हा सरकारी हायस्कूलमध्यें विद्यार्थी आहे. त्यांना फरासखान्यांत बोलावलें त्यावेळीं

नगर वाचनालय

## वासुदेव हरि चाफेकर

यालाहि पोलिस तपासाकरितां फरासखान्यांत बोलावलें होतें. दामोदर ह्यास पकडल्यानंतर वासुदेव व बाळकृष्ण हे दोघे फरारी झाले होते हें आमच्या वाचकांस आठवत असेलच. ह्या दोघांनीं निजामशाहींतील डोंगरांत व झाडींत कसे दिवस काढले, अखेरीस हाल अपेष्टांचा कंटाळा येऊन वासुदेव कसा परतला वगैरे गोष्टी आमच्या वाचकांस आम्हीं कळविल्या आहेतच. वासुदेव पुढें मुंबईस परत आल्यावर पोलिसनें त्याला पुण्यास आणलें व त्याच्या संबंधानें पुष्कळ चौकशी केली. त्यावेळीं वासुदेवानें आपला भाऊ बाळकृष्ण यांजवर खुनाचा आरोप लागू होईल अशी जबानी मॅजिस्ट्रेट साहेबापुढें दिल्याविषयीं प्रसिद्ध झालें होतें. बाळकृष्ण याजवरील खटल्यास आरंभ द्रविड बंधूंचे खुनाचे दुसरे दिवशीं व्हावयाचा होता व त्यावेळीं वासुदेव चाफेकर व नीलकंठ द्रविड साक्षीदार होते. ही गोष्ट येथें नमूद करणें जरूर आहे. वासुदेवास गुरुवारीं सकाळीं फरासखान्यांतील चौकशीनंतर दोन प्रहरीं जेवणाकरितां बाहेर सोडलें व तिसऱ्या प्रहरीं पुन्हां त्याला बोलावण्यांत आलें.

## फरासखान्यांतील भयंकर प्रकार व रामजी पांडू

तिसरे प्रहरीं फरासखान्यांत गेल्यावर रानडे आदिकरून मंडळींच्या तपासणीस पुनः प्रारंभ झाला. त्यावेळीं मि. ब्रुइनसाहेब यांनीं वासुदेवास बरेच प्रश्न विचारले. निजामशाहींतून वासुदेव परत आल्यानंतर पुण्यांतील त्याचा खर्च पोलिसांकडूनच होत असे व तो मागेल ती वस्तु तावडतोब देण्यांत येई. बाळकृष्णाचे खटल्यांत त्याची साक्ष व्हावयाची असल्यामुळें त्याची एवढी बडदास्त राखण्यांत आली हें येथें निराळें सांगावयास नकोच. असो. वरील चौकशीचे वेळीं चीफ कॉन्स्टेबल रामजी पांडू वासुदेवास टाकून कांहीं मर्मभेदक बोलला असें म्हणतात. त्यावेळीं एकदम चवताळून जाऊन त्यानें

अंगरख्याखालीं खाकेंत लपवून आणलेलें सहा बारी पिस्तूल एकदम बाहेर काढलें व रामजी पांडू यांजवर झाडिलें. रामजी पांडू याचे ग्रह चांगले होते म्हणून सुदैवानें गोळी चुकली. पण तो बेसावध होऊन पडला. इतक्यांत ब्रूइनसाहेब वासुदेवाचे अंगावर चालून गेले व त्यांनीं त्याला बाजूला ओढण्याचा प्रयत्न केला. त्यावेळीं बाकीचे बार ब्रूइन साहेबांच्या अंगावर काढण्याचा वासुदेवानें प्रयत्न केला. पण कोगजे नांवाच्या ब्राम्हण जमादारानें कांहीं हातांवरचे अंतरावरून उडी मारून वासुदेवास खालीं पाडिलें व त्याचे हातांतील पिस्तूल काढून घेतलें. नंतर त्यास उघडा करून झाडा घेतांना खांद्याला अडकविलेली एक पिशवी सांपडली. तींत कांहीं छरे, गोळ्या, खंजीर, दारू व कॅप ह्या जिनसा सांपडल्या. थोडके दिवसांपूर्वी रामजी पांडू फरासखान्यांतून काळोख्या रात्रीं घरीं जात असतांना त्यांजवर गोळीबार करण्यांत आला होता. त्यावेळीं फारशी जखम न झाल्यामुळें व अंगरख्याचे आंतून कातड्यास कळे न कळेशीं गोळी लागल्यामुळें घरीं जाईतों चीफ कॉन्स्टेबल साहेबांना आपणांस गोळी लागली असें उमजलेंच नाहीं असें म्हणतात.

## खून केल्याबद्दल कबुली

वरील भयंकर कृत्य फरासखान्यांत ज्या खोलींत चाललें तेथेंच रानडे हाहि होता. नंतर वासुदेव व रानडे ह्या दोघांनीं द्रविड बंधूंचा खून केल्याबद्दल पोलिसपुढें कबुलीजबाब दिला. द्रविड बंधूंना ठार करून दामोदराचा मीं सूड उगविला व “बाळकृष्णाचे विरुद्ध साक्ष देण्यापेक्षां त्याच्याच बरोबर मरणें बरें” असें वासुदेवानें पोलिसांस सांगितलें. रानडे यानें आपले घरीं पोलिसांस नेऊन ज्या एकबारी पिस्तुलानें द्रविड बंधूंचा खून केला तें काढून दिलें. हें पिस्तूल एका पिशवींत सांपडलें, व तींत कांहीं छरे, गोळ्या, खंजीर, दारू व कॅप हीं होतींच. रानडे व वासुदेव यांचे जबाब शुक्रवारीं

येथील सिटी मॅजिस्ट्रेट मि. कॅरव्हॅलो यांचे बंगल्यावर झाले. संध्याकाळपासून मध्यरात्रीपर्यंत जबाब चालले होते. तिसरा पकडलेला इसम साठे यानेंहि द्रविडबंधूंचे खुनाचे वेळीं आपण रस्ता रोखीत होतों अशी कबुली दिली. ह्या कामीं आरोपींना मदत करणारे आणखी कांहीं इसम आहेत किंवा कसें, व असल्यास त्यांचीं नांवें काय, आरोपींनीं पिस्तूल, दारू, छरे वगैरे जिन्नस कोठून व कसे आणले, यासंबंधानें पोलिसचा तपास सध्यां चालू आहे. बाळकृष्ण हरी चाफेकर यांजवरील खटला ता. २२ फेब्रुवारीपर्यंत तहकूब झाला असल्यामुळें सर्वच खटले त्या तारखेस एकदम चालतील असा अंदाज आहे. कोर्टापुढें सर्व गोष्टी येऊन खऱ्याखोट्याचा निर्णय झाल्यावांचून एकंदर हकीकतीसंबंधानें ह्यावेळीं टीका करणें प्रशस्त नव्हे. आपण अँग्लो-इंडियन ह्या घमेंडीवर मुंबईच्या टाइम्सकारांसारखे, कटासंबंधाच्या पूर्वीच्या त्यांच्या डुरकण्या खुशाल फोडोत; त्यांची कृति, विचारी लोकांच्या दृष्टीनें असभ्यपणाची व खोडसाळपणाची ठरल्यावांचून रहाणार नाहीं.

# * बेमालूम सांधा जोडणारे खाडिलकर

[ १८९७ सालच्या खटल्यांतील शिक्षा भोगून परत आल्यावर लो. टिळकांनीं केसरीचीं संपादकीय सूत्रें हातीं घेऊन 'पुनश्च हरिः ॐ' या मथळ्याखालीं पहिला लेख लिहिला. त्या लेखांत श्री. कृ. प्र. खाडिलकरांना अनुलक्षून असलेला मजकूर पुढें दिला आहे:--]

" सांधा जितका बेमालुम जडेल, किंबहुना सांधा केला आहे किंवा नाहीं याचीच परीक्षकास भ्रांति पडेल तेव्हांच त्यांत सांधा लावणाराचें कसब दृष्टीस येतें. तशा प्रकारचा बेमालुम सांधा वरील गृहस्थांनीं जडविला होता हें केसरीच्या वाचकांस कळून आलेलेंच असेल. रा. रा. खाडिलकर यांचें नांव जबाबदार प्रकाशकांत जरी दाखल केलेलें नव्हतें तरी केसरींतील बहुतेक एडिटोरियल लेख त्यांच्याच हातचे होते हें येथें सांगणें जरूर आहे. "

---

* केसरी, ता. ४ जुलै १८९९

# * गनिमी काव्याची लढाई

नंबर १

अजमास पावणेतीन वर्षें चाललेल्या बोअरयुद्धाची समाप्ति ' त्वयार्ध मयार्ध ' या हिस्सेरशीनें कशीबशी करण्यांत येऊन तहानंतरच्या नवीन राज्य-व्यवस्थेची बाटाघाट सांप्रत दक्षिण आफ्रिकेंत चालली आहे. बोअर लोकांचें युद्ध हें युद्धकलेच्या दृष्टीनें फारच अपूर्व झालें असून प्रत्यक्ष योद्धयांच्या सुखदुःखावर याचा कसाहि परिणाम झाला तरी युरोपिअन राष्ट्रांच्या किंब-हुना जगांतील सर्व परतंत्र किंवा स्वतंत्र राष्ट्रांच्या भावी इतिहासावर या युद्धाचे विलक्षण परिणाम झाल्याबांचून रहाणार नाहींत. ट्रान्सवाल व फ्रीस्टेट यांवर सत्ता गाजवून दक्षिण आफ्रिकेच्या अफाट प्रदेशावर साम्राज्य कोणी मिरवावें, या लढयाचा निकाल करण्याकरितां दक्षिण आफ्रिकेंतील मैदानांत, दऱ्याखोऱ्यांत व डोंगरांत इंग्लंडनें आपलें सर्व शारीरिक सामर्थ्य, बुद्धिकौशल्य व धनदौलत हीं एकवट करून साध्याभोळ्या बोअर शेतकऱ्यांस चूप बसाव-यास लावण्याचा प्रयत्न केला; मोठमोठीं शहरें क्षणार्धांत बेचिराख करून सोडण्याचें ज्यांचें सामर्थ्य, अशा चोहोंकडे गाजलेल्या अवजड तोफा, सराईत कोयत्यापुढें प्रत्येक झटक्यासरशी गवताच्या हजारों काड्या ज्याप्रमाणें बळी पडतात त्याप्रमाणें हजारों शूर दरवेशी शिपाई ज्यांच्या प्रत्येक फूत्कारापुढें गतप्राण झाले त्या मशिनगन्स, सर्व इंग्रजी साम्राज्यांतील धट्टेकट्टयांचा अफाट सेनासमुद्र, अफगाणिस्तान, ब्रह्मदेश, ईजिप्त, सौडन, इत्यादि प्रदे-शांतील लढायांतून विजयाचा झेंडा घेऊन आलेले एकापरीस एक सेनानायक, अशी युद्धसामग्री गोळा झाली; तेव्हां दक्षिण आफ्रिकेंतील साम्राज्य आपण

* केसरी, ता. १७ जून १९०२.

होऊन इंग्रजांचे चरणीं लोटांगणें घालीत येईल, असें वाटलें होतें. तीन वर्षांच्या या युद्धानें साम्राज्याचा प्रश्न जरी निकालांत आला नाहीं,—दक्षिण आफ्रिकेंतील बोअर लोकांनीं तेथील इंग्रजांना आपले राज्यकर्ते समजून निरंतर त्यांच्या अंकित रहावें किंवा दक्षिण आफ्रिका बोअर लोकांची आहे व त्यांच्या सवडीला येईल त्याप्रमाणें इंग्रजांनीं पाहिजे तर तेथें आपला कालक्षेप करावा, या वादाचें मूळ जरी तीन वर्षांच्या ओढाताणींत उपटून निघालें नाहीं,—केप-कॉलनी, नाताळ, फ्रीस्टेट व ट्रान्सवाल या प्रांतांतील सत्ताधारी पार्लमेंटसभेंत व प्रधान-मंडळांत बोअर लोकांचें मताधिक्य व्हावें कीं इंग्रज लोकांचें मताधिक्य व्हावें या बखेड्याचा इनसाफ या लढाईनें अखेरचा न होतां तो जरी भिजतच पडला आहे, तथापि पाश्चिमात्य कलाकौशल्यानें पालटलेल्या सांप्रतच्या मन्वंतरांतील नवीन युद्धकलेसंबंधाच्या बऱ्याच गोष्टी या युद्धानें बहुतेक अंशीं निकालांत आणल्या आहेत. लढाईसंबंधाच्या कांहीं तत्त्वांच्या या युद्धानें केलेल्या जीर्णोद्धारामुळें या लढाईचें महत्त्व तज्ज्ञांच्या दृष्टीनें फारच मोठें आहे. बादशहा सातवे एडवर्ड यांना आपल्या राज्यारोहणाच्या समारंभाचे वेळीं महाराणीसाहेबांच्या साम्राज्याहूनहि अधिक विस्तृत साम्राज्याचे आपण बादशहा झालों म्हणून विशेष प्रौढी वाटेल; चेंबरलेन, सालिसबरी आदिकरून प्रधान पुरुषांना इंग्लंडच्या इतिहासांत केली नाहीं अशी लढाई आपण करून शेवटास नेली, म्हणून धन्यता वाटेल; लॉर्ड रॉबर्टस्, व्हायकौंट किचनेर यांचीं नांवें मार्लबरो, वेलिंगटनसारख्या प्रख्यात इंग्रजी सेनानायकांच्या मालिकेंत सांप्रत तरी गोंविलीं गेल्यामुळें इंग्रजी सेनेला कृतकृत्य वाटत असेल—तथापि बोअर युद्धाचे हे परिणाम क्षणिक व तात्पुरते अर्थात् गौण होत. राज्यारोहणाच्या समारंभाचे तमाशांत या मनोरम दिसणाऱ्या परिणामाचे पोवाडे गायले जातील, पदवीदानाचे वेळीं व नफ्याच्या वांटणीच्या प्रसंगीं बोअर युद्धाचीं हीं मोहक फळें प्रत्येक इंग्रजाचे डोळ्यापुढें वारंवार नाचविलीं

आतील, यांत शंका नाहीं; तथापि या परिणामांविषयीं कोणी कितीहि अट्टाहास केला, त्यांची कितीहि वडेजावी माजविली व त्यांचें फुगवून कोणी कितीहि वर्णन केलें, तरी ते परिणाम फारच थोडके वेळ टिकणारे आहेत, हें सर्व सूज्ञ लोकांस कबूल करावें लागेल. दक्षिण आफ्रिकेच्या राजकीय स्वरूपांत या युद्धानें केलेले फेरफारहि फार दिवस टिकणारे नाहींत. स्टीन व क्रूगर यांनीं आपलीं राज्यसत्तेचीं निशाणें खाली केलीं किंवा डीवेट, डिलारी, मेन व बोथा यांनीं आपल्या हातांतील बंदुका एका बाजूस ठेवून बटाट्यांचीं पोतीं, तराजू किंवा शेतकीचीं आउतें यांकडे लक्ष देण्यास प्रारंभ केला, तरी सांप्रतच्या तहानें दक्षिण आफ्रिकेच्या राजकीय स्वरूपांत टिकाऊ फेरबदल होणें शक्य नाहीं. वर्षा दीडवर्षांनीं इंग्रजांना तहाप्रमाणें फ्रीस्टेट व ट्रान्सवाल यांना अंतस्थ पूर्ण स्वातंत्र्य ( Self-Government ) देणें भाग आहे, व तशा प्रकारची राज्यव्यवस्था तेथें सुरू झाल्यावर लढाईच्या सुरवातीचे पूर्वीं ज्याप्रमाणें केप कॉलनींतहि बोअर व इंग्रज हे दोन तट होतेच, त्याप्रमाणें चोहोंकडे पुन्हां हे तट माजत जाऊन ' येरे माझ्या मागल्या ' अशी स्थिति आल्यावांचून रहाणार नाहीं. एकंदरींत दक्षिण आफ्रिकेंतील राजकीय वर्चस्वाचा वाद या युद्धानें भिजतच टाकला असून इंग्रजांचे तर्फे जे इष्ट म्हणून परिणाम दाखविण्यांत येत आहेत, ते बऱ्याच अंशानें नाटकी व दिखाऊ आहेत असें वाटतें. परंतु या गोष्टीचा साक्षात् संबंध इंग्रज व बोअर या दोघांशींच येत असल्यामुळें इतरांनीं त्याचा सध्यां तरी विशेष खल करण्याची जरूर नाहीं.

बोअर युद्धाची वरच्याहून निराळी अशी दुसरी एक बाजू आहे कीं, तिच्याशीं स्वतंत्र किंवा परतंत्र, युरोपियन किंवा एशिआटिक, सर्व राष्ट्रांचा सारखाच संबंध येतो. लढाई ही एक कला आहे व या कलेसंबंधाच्या कांहीं तत्त्वांवरील धुरळा बोअर युद्धानें काढून टाकला आहे. गनिमी काव्याच्या लढाईची

महती पूर्णपणें सिद्ध करून त्या पद्धतीच्या तत्त्वांचा या लढाईनें जीर्णोद्धार केला आहे. नवीन देवालय बांधण्याचें जितकें श्रेय त्याहून अधिक श्रेय जीर्णोद्धाराचें आहे. याचें कारण असें कीं, जीर्णोद्धार केल्यामुळें पूर्वापार चालत आलेल्या कल्पना बदलून नवीन प्रकार अंगवळणी पाडण्याचा खटाटोप करावा लागत नाहीं. गनिमी काव्याच्या लढाईचें महत्त्व युरोपियन राष्ट्रांच्या इतिहासांतील कांहीं प्रसंगांनीं व विशेषतः महाराष्ट्राच्या इतिहासानें पूर्वीच स्थापित झालें आहे. तें महत्त्व नित्य स्वरूपाचें नव्हे, तर तत्कालीन कांहीं विशेष व्यवस्थेमुळें गनिमी काव्याच्या लढाईची थोरवी झाली, असें गेल्या शें सवाशें वर्षांच्या युरोपियन राष्ट्रांच्या इतिहासावरून वाटण्याचा संभव होता. हा भ्रम बोअर युद्धामुळें दूर झाला असून त्यामुळें सांप्रतच्या युद्धकलेवर जे परिणाम झाले आहेत व होतील, तींच बोअर युद्धाचीं फार दिवस टिकणारीं फळें होत. जगाच्या राहटीप्रमाणें इष्ट गोष्टी घडवून आणण्याकरितां प्रत्येक देशाला केव्हां ना केव्हां तरी संग्राम–देवतेचें प्रत्यक्ष दर्शन घेणें जरूर पडतें; व त्याप्रमाणें महाराष्ट्रांतील पूर्वीच्या सेनाधिपतींनीं या देवतेचें मनमुराद दर्शन घेतलेलें आहे. परंतु पाश्चिमात्य सुधारणेमुळें युद्धप्रसंगीं दृष्टीस पडणारी यांत्रिक सामग्रीची रेलचेल व यंत्रतंत्रांच्या या चलतीबरोबरच खुद्द योद्धयांनाहि यंत्रें बनविण्याची खटपट, ही पाहून आमच्या पूर्वीच्या सेनानायकांनीं स्वानुभवावरून वर्णन केलेली संग्राम–देवता नखशिखांत बदलून गेली आहे, असें वाटूं लागलें होतें. परंतु एखाद्यानें वस्त्रें पालटलीं म्हणून तो जसा दुसरा मनुष्य होऊं शकत नाहीं, त्याप्रमाणें संग्राम–देवतेनें सहज लीलेनें धरलेला भाला फेंकून देऊन हातीं जपून काडतुसाची बंदुक धरली म्हणून त्या देवतेचें खरें स्वरूप पालटलें नाहीं, हें तत्त्व बोअर युद्धानें चांगलेपणें शिकविलें आहे. मनुष्याचा पोषाख व मनुष्य या दोहोंमध्यें पोषाख ज्याप्रमाणें गौण व मनुष्य ज्याप्रमाणें प्रधान, त्याप्रमाणें तलवार,

माल, बंदुका इत्यादि लढाईची सामग्री गौण व लढाई करणारांच्या अंगचा स्वदेशाभिमान, चपलता, सहनशीलता, तीक्ष्ण बुद्धि, दृढनिश्चय व धैर्य हीं योद्धयांचीं प्रधान अंगें समजलीं पाहिजेत. गनिमी काव्याच्या लढाईचे वेळीं योद्धयांच्या प्रधान अंगाची खरी परीक्षा होते व त्यामुळें संग्राम—देवतेचें शाश्वत स्वरूपहि नजरेस पडतें. इंग्लंडच्या अलोट संपत्तीमुळें व अमर्यादित सत्तेमुळें दोन लाख, तीन लाख पाहिजे तितकीं चालतीं बोलतीं सजीव लढाऊ यंत्रें दक्षिण आफ्रिकेंत पार्सल केल्याप्रमाणें पाठवितां आलीं. काडतुसें संपलीं, बंदुका हरवल्या, तर पाठवा जहाजेंच्या जहाजें सामग्री भरून; घोडे मेले, तर जगांत जेथें घोडा पैदा होत असेल तेथील सर्व जनावरें पाहिजे तर विकत घ्या; अशा तऱ्हेचा अचाट उपद्व्याप इंग्लंडला या युद्धाचे प्रसंगीं करतां आला. परंतु इंग्लंडनें आपल्या सर्व इंग्रजी मुलखाचें मोल देण्याची कबुली केली असती तरी देखील एखादा डीवेट, डिलारी किंवा बोथा इंग्लंडला मिळणें शक्य नव्हतें. इंग्लंडनें आपल्या मुकुटांतील हिंदुस्थानासारखा हिरा जरी दुसऱ्याच्या हातीं देण्याचा सौदा पटविला असता, तरी देखील परमेश्वरावर पूर्ण भरंवसा ठेऊन स्वातंत्र्याकरितां निश्चयानें किंवा कुशाग्रबुद्धीनें लढणाऱ्या पलटणी इंग्रजांना मिळाल्या नसत्या. कारण, योद्धयाचे प्रधानगुण आयत्या वेळीं पैशाच्या किंवा वैभवाच्या लालुचीनें बाजारांत मिळण्याजोगे नाहींत.

अत्यंत मौल्यवान व पूर्वी कधीं कोणीं न देखिलेला असा पोषाख अंगावर घातला असतां आपण निराळे मनुष्य झालों असून आपलें सर्वस्व कायतें पोषाखांत आहे, असें कांहीं काळ वाटण्याचा प्रमाद घडणें, हें मनुष्यस्वभावास कांहीं सोडून नाहीं. याच न्यायास अनुसरून लांब पल्ल्याच्या, लहान भोंकाच्या व दहा दहा बारा बारा काडतुसांची माळ आपोआप पोटांत घेणाऱ्या बंदुका, पौराणिक काळांतील अस्त्रांप्रमाणें विध्वंस करणाऱ्या तोफा, यंत्राप्रमाणें

हालचाल करावयास शिकविलेलें सैन्य व लढाईचे कांहीं बसविलेले खटके,—यांपुढें कोणाचेंहि कांहीं चालावयाचें नाहीं, असा सर्वांचा समज होता. बंदुकींची संख्या एका बाजूस जितकी असेल तितकीच दुसऱ्या बाजूस पाहिजे. तोफांचा जमाव एका बाजूस जेवढा असेल, तेवढाच दुसऱ्या बाजूस असला पाहिजे. हजारो बंदुकांची उणीव मानसिक धैर्यानें भरून यावयाची नाहीं; तोफखान्याच्या ऐवजीं बुद्धिचापल्य कुचकामाचें ठरेल, असल्या समजुतींना बोअरयुद्धाचे पूर्वी ऊत आलेला होता! परंतु आतां तीस हजार लोक तीन लाख सैन्याशीं तीन वर्षे लढूं शकतात आणि द्रव्यानें व मनुष्यसंख्येनें वरिष्ठ असलेल्या पक्षास 'हिरवा खाऊं कां भाजलेला खाऊं' अशा तऱ्हेच्या गमजाच्या गोष्टी एका बाजूस ठेवण्यास भाग पाडूं शकतात हें सिद्ध झालें आहे.

बोअर लोकांच्या हातांत इंग्रजांच्या बंदुकांसारख्या लांब पल्ल्याच्या व जलद उडणाऱ्या बंदुका नसत्या तर योद्ध्याचे खरे गुण बोअर लोकांच्या अंगीं कितीहि असते तरी त्यांच्या पदरीं पडलेल्या सांप्रतच्या यशाचा शंभरावा भागहि त्यांस मिळाला नसता, हें उघड आहे. हातांतील शस्त्र दोघांचेंहि सारखें अशी स्थिति असल्यावर खऱ्या योद्ध्याचे गुण अंगीं असतां व गनिमी काव्यानें लढण्याचा निश्चय केला असतां विरुद्ध पक्षाकडील दोन लाख सत्तर हजार सैन्यांतील बंदुका, तोफा, घोडे, खेंचरें व मनुष्यें हीं असून नसून सारखीं होऊन, एका बाजूचे तीन लाख दुसऱ्या बाजूच्या तीस हजारांच्या बरोबरीचे होतात. धैर्य, बुद्धि व परपक्षासारखीं शस्त्रें, इतकी सामग्री गोळा केल्यावर गनिमी काव्याच्या लढाईमुळें एवढा विलक्षण फायदा मिळतो. ज्या राष्ट्रांत देशाभिमान जागृत अवस्थेंत संचारत आहे, ज्या राष्ट्रांत फाजील चैन वाढली नसून प्रसंगविशेषीं हालअपेष्टा सोसण्यास लोक राजी असण्याचा संभव आहे, ज्या राष्ट्राची बुद्धिमत्ता टाकाऊ नाहीं, त्या राष्ट्रानें स्वतःचें संरक्षण करण्याकरितां शेजाऱ्याच्या इतकेंच संख्येनें व बाह्य गुणानें सामर्थ्य-

वान सैन्य राखण्याची जरुरी नाहीं, अशा प्रकारच्या राष्ट्रांतील तीस हजार लोक स्वराष्ट्रांत असतांना तीन लाख इंग्रजी सैन्याच्या किंमतीचे आहेत, हें विसरतां कामा नये. गनिमी काव्याचा आश्रय केला असतां एक दहांना भारी होतो, हा बोअर युद्धानें सिद्धांत ठरविला आहे. बोअर युद्धाच्या या गनिमी काव्याच्या सिद्धांतामुळें एक युरोपियन राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर चढाई करून जाण्याच्या वेळेस तीन वर्षांहून शंभरपट अधिक विचार करील, निदान इंग्लंड तरी निवळ लष्करी सामर्थ्याच्या घमेंडीनें दुसऱ्याचे वाजवी हक्क बुडविण्यास यापुढें पुष्कळ वर्षें धजणार नाहीं !

अशा प्रकारें सर्व जगाचे मनावर दहशत व छाप बसविणारे रणांगणावरील डीवेट, डिलारी व बोथा यांचे चमत्कार वाचीत असतां महाराष्ट्राचे इतिहासज्ञांस महाराष्ट्रवीरांनीं एका काळीं केलेले चमत्कार आपण पुनः वाचतो आहों कीं काय, असा भास होतो ! बोअर युद्धानें जीर्णोद्धार झालेल्या गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचें स्वरूप आपण नीट लक्षांत आणूं लागलों म्हणजे महाराष्ट्रांतल्या पूर्वीच्या संग्रामदेवतेचें ध्यान मनांत चांगलें ठसूं लागतें. बोअर युद्धात दृष्टीस पडणारी लढाईची पद्धत व आमच्या इतिहासांत नांवाजलेली गनिमी काव्याची लढाई हीं एकच स्वरूपाची कशी आहेत हें वाचकांच्या ध्यानांत येण्याकरितां इंग्रजी कवायतीच्या लढाईचें स्वरूप, गनिमी काव्याची पद्धत, मेक्सिको, फिलिपाइन, स्कॉटलंड, रूस इत्यादि ठिकाणीं या पद्धतीनें मिळविलेलें यश व शेवटीं इंग्रज-बोअर युद्धाचें व औरंगजेबाशीं महाराष्ट्रीयांनीं केलेल्या युद्धाचें पूर्ण साम्य, इत्यादि विषयांचें वर्णन पुढील तीन चार लेखांत करण्याचें योजिलें आहे.

# * गनिमी काव्याची लढाई

## नंबर २

इंग्रजी कवाईत व इंग्रजी बंदुक हिंदुस्थानांत आल्या दिवसापासून आज-पावेतों हिंदुस्थानांत, किंबहुना आशिया खंडांत, ह्या इंग्रजी ऊर्फ कवायतीच्या युद्धकलेला अव्याहत जयच आलेला आहे. दक्षिणेंत मद्रास इलाखा या युद्ध-कलेला सहज बळी पडला, उत्तरेस बंगाल तर कोपरानें खणण्याइतका मऊ झाला, दख्खनचे सुभेदार हैदराबादचे निजाम यांना या नवीन कलेच्या आश्रयाखालीं राज्योपभोग घेणें इष्ट वाटलें, अयोध्येच्या व लखनौच्या नबा-बांना हिंदुस्थानास दणाणून सोडणाऱ्या ह्या कवायती शिपायांच्या पायाखालीं चिरडून जाणें भाग पडलें, दक्षिणेस पेशव्यांना व उत्तरेस शिंदे–होळकरांना दिल्लीची मुसलमानी बादशाही बुडविल्यानंतर उपभोगावयाचे आनंदसोहाळे बंद ठेवावे लागून, सर्व सृष्टि बदलणाऱ्या चमत्काराच्या प्रसंगाप्रमाणें भांबावून जाऊन ह्या युद्धकलेमुळें इंग्रजांच्या वाढत्या सामर्थ्यास आळा घालतां येणें अशक्य झालें; आणि काबूलची अमिरी बुडविण्यास लायक ठरलेल्या व उद्युक्त झालेल्या शीख लोकांना स्वतःच्या हातांतील हत्यारें इंग्रजांच्या स्वाधीन करून आपलें धैर्य व काटकपणा इंग्रजांच्या फायद्याकरितां खर्च करण्यांत भूषण वाटून घेणें जरूर पडलें. अशा रीतीनें या नवीन युद्धकलेनें राहूनें चंद्रास ज्याप्रमाणें ग्रासावें त्याप्रमाणें सर्व हिंदुस्थान हलकें हलकें ग्रासून टाकलें. शीख ना रजपूत, रोहिले ना पुरभय्ये, मराठे ना मुसलमान,' कोणासच या कवायतीच्या कंपूपुढें टिकाव धरवेना ! इंग्रजी पलटणींचा हिंदुस्थानांत असा कल्पनातीत वचक बसला असल्यामुळें ज्या मूठभर इंग्रजांच्यापुढें आमच्या हजारों

---

* केसरी, ता. २४ जून १९०२.

सैन्याची धूळधाण झाली त्या हजारों इंग्रजी पलटणींना मूठभर बोअर लोकांनीं जेरीस आणलेलें वाचून 'हा काय चमत्कार, हा काय चमत्कार' असे उद्‌गार हिंदुस्थानच्या लोकांच्या तोंडून निघावे हें साहजिक आहे.

गनिमी काव्याच्या पद्धतीचा अंगिकार केल्यामुळें बोअर लोकांना हा चमत्कार कसा घडवून आणतां आला, हें वाचकांस नीट समजावें म्हणून सांप्रतच्या युद्धकलेच्या कांहीं सामान्य तत्त्वांचें येथें दिग्दर्शन करणें जरूर आहे. युद्धाचें धोरण व लढण्याचे डावपेंच (stratagem and taotics) असे युद्धकलेचे मुख्य दोन भेद आहेत. बंदुक आणि तदनुषंगानें आलेली कवाईत यांना महत्त्व येण्यापूर्वींहि वरील दोन गोष्टींकडे पूर्ण लक्ष देणाऱ्या योद्ध्यालाच विजयश्री मिळत असे. आपला शत्रु कोणत्या जागीं आहे किंवा कोणत्या जागीं उत्पन्न होण्याचा संभव आहे, त्यानें आपणावर चालून येण्याचे मार्ग कोणते, आपण त्यांजवर कोणत्या दिशेनें चालून गेलें पाहिजे, शत्रूस कोणत्या जागीं मदत होण्याचा संभव आहे व आपणांस कोठून मदत येण्याचा संभव आहे, अन्नसामग्री व दारूगोळा यांचा सांठा कोठें ठेवला असतां सुरक्षित राहील व वक्तशीर लढण्याचे जागीं सैन्याच्या हातीं पडेल, एका ठिकाणीं आपला पराभव झाला असतां मागें परतून विसांवा घेऊन शत्रूशीं पुन्हां टक्कर देण्यास सोईस्कर अशा जागा कोणत्या, शत्रूस चुकवावें कोठें, गांठावें कोठें, बगल द्यावी कोठें, कोणत्या जागीं मदतगारास अडकवून ठेवला पाहिजे, कोणत्या ठिकाणीं सहाय्य करणारास हुलकावणी दाखविली पाहिजे, व कोठें शत्रूच्या खाशा मंडळींवर एकदम उतरून अकस्मात् त्यांना गांठून स्वकीयांस वीरश्रीनें भरून शत्रूचा नाश केला पाहिजे, या सर्व गोष्टींचा विचार लष्करी धोरण या पहिल्या सदराखालीं येतो. शत्रूचें बलाबल, शत्रूच्या हालचाली, शत्रूच्या सल्लामसलती या सर्वांचें घारीच्या नजरेनें परीक्षण केल्याशिवाय व स्वतःचें सामर्थ्य एकवट करून 'वरचे

कजिये कसेबसे बुजवून टाकून ' जय्यत तयारी ठेऊन टपून बसून प्रारंभींच शत्रूवर आघाडी मारल्याशिवाय जयाची आशा करावयास नको. इष्ट हेतु साधण्याकरितां ज्या प्रांतांत दोहोंकडील सैन्यें भिडतात त्या प्रांतास रणमैदान ( theatre of war ) असें म्हणतात. ह्या रणमैदानांत शिरावयाच्या आपल्या वाटा, रणमैदानानजिक असलेलीं मजबूत ठिकाणें, ज्या जागेपर्यंत आपलें सैन्य व सामग्री शत्रूची कोणत्याहि प्रकारें भीति न बाळगतां जाऊं शकते त्या जागा या सर्वांना रणमैदानाचा पाया ( base of operations ) असें म्हणतात. रणमैदानाचा पाया हा नेहमीं सुरक्षितच असतो असें धरून चालण्यास हरकत नाहीं. कारण ज्यावेळीं या ठिकाणीं धोका उत्पन्न होतो त्यावेळीं ही जागा किंवा हा प्रांताचा पट्टा खुद्द रणमैदानांत सामील केला जातो व मैदानाचा पाया मागें तरी हटतो किंवा केव्हां अजीबात दिशा बदलतो. रणमैदानाच्या या पायापासून खुद्द रणमैदानांत ज्या ठिकाणीं आपलें सैन्य असेल त्या ठिकाणापर्यंत सैन्याला रसद व मदत पोंचवावयाच्या मार्गाला दळणवळणाचे रस्ते ( lines of communication ) असें म्हणतात. आपलें रणमैदान कोणतें, रणमैदानाचा आपला पाया कोणता व आपले दळणवळणाचे मार्ग कोणते, यासंबंधाचा मुक्रर विचार ठरविणें हें पहिल्या सदराखालील म्हणजे लष्करी धोरणाखालील काम होय. हें काम युद्धाचा प्रारंभ होण्यापूर्वी व प्रारंभ झाल्यावरहि एकसारखें करावें लागतें. हिता-नहितासंबंधानें कोणाशीं झगडा येण्याचा संभव आहे, आपल्या महत्त्वा-कांक्षेच्या आड कोण आहे, त्याची तयारी कशी चालली आहे, त्याशीं टक्कर देण्याचें ठिकाण कोणतें, त्यानें आपल्या रणमैदानाचा पाया मजबूत घातला आहे कीं काय, वगैरे शत्रूकडील बातमी शांततेच्या वेळीं देण्याचें काम दरबारी हेर ( diplomatic agency ) करीत असतात. लढाई सुरू झाल्यावर शत्रूच्या तयारीच्या पूर्वीचा अंदाज चुकल्यामुळें किंवा यशापयशाचा वारा

भलत्याच दिशेनें अवचित वाहूं लागल्यामुळें रणमैदान अकस्मात् एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतात जातें, व त्याबरोबरच रसद वगैरे पोंचविण्याचे उपाय हेहि बदलून जातात. आपापले पाये सोडून दोहोंकडील सैन्यें रण-मैदानावर प्रवेश करूं लागलीं म्हणजे आपणास अनुकूल अशा जागीं दोहो सैन्याची गांठ पडण्यासाठीं व आपल्या मुख्य सैन्याच्या हालचाली शत्रूच्या नजरेस पडूं नयेत म्हणून आपल्या मुख्य सैन्याच्या पुढें पडद्यादाखल (screen) म्हणून सैन्याचा कांहीं भाग पाठवावा लागतो. अशा रीतीनें पडदानशीन झाल्यावर मुख्य सैन्यानें कूच करावयाचा असतो. शत्रूला हुडकून काढणें, त्याच्या हालचालीवर नजर ठेवणें, व वेळप्रसंगीं आपलें सैन्य बेसावध असतांना त्यावर तुटून पडतां येणें शत्रूस अशक्य होईल अशी व्यवस्था ठेवणें, हें यापुढें धरलेल्या पडद्याचें म्हणजे बिनीचें (advance guard) व त्याबरोबर असलेल्या लष्करी हेरांचे (scouts) काम आहे. रणमैदानावर उतरलेलीं दोहीं बाजूचीं सैन्यें एकमेकांजवळ येत चाललीं असतां व एक दोन मुक्कामाचे अंतरावर येऊन एखादा दुसरा दिवस सैन्य दपटण्यानें एक बाजू दुसऱ्या बाजूशीं लगट करूं शकते, इतक्या सन्निध दोहोंकडचे तळ पडले असतां (within striking distance of each other) शेजारचें मजबुतीचें ठिकाण धरून बसण्यास व शत्रूचे हातीं तें न जाऊं देण्यास किंवा लढाई करण्याची मनांत नसल्यास हुलकावणी देऊन निसटून जाण्यास लष्कराचा सुटसुटीतपणा व चपळाई (mobility of the army) या गोष्टी उपयोगीं पडतात. दोहों बाजूंकडील शस्त्रास्त्रें साधारणपणें सारख्या तोलाचीं आहेत व खुद्द हातघाईचे प्रसंगीं सैन्याचा व्यूह रचण्यांत दोहोंकडील सेनानायक सारखेच वाकबगार आहेत, अशी समान स्थिति असल्यावर ज्या बाजूचें लष्करी धोरण बिनचूक व या धोरणांतील ठरलेल्या उपायांची तत्काळ अंमलबजावणी करण्यास ज्या बाजूची सेना सुटसुटीत व चपळ, त्यासच यशप्राप्ति व्हावयाची हें

ठरलेलें. हत्यारें कोणत्याहि प्रकारची असोत. त्याचा युद्धकलेच्या या पहिल्या भागाशीं म्हणजे धोरणाशीं कांहीं संबंध नाहीं. ज्यावेळीं राष्ट्रें मुष्टीनें परस्पराशीं लढत होतीं, ज्यावेळीं कठीण फत्तरांच्या खापऱ्या हत्याराऐवजीं वापरण्यांत येत होत्या, ज्या वेळीं परस्परांचीं डोकीं फोडण्यास सोटयाचा किंवा गदेचा प्रहार एवढीच युक्ति मनुष्यास माहीत होती, ज्यावेळीं दारूच्या साहाय्यावांचून एकटेंच लोखंड रणांगणावर मनुष्यांचा संहार करण्यास उद्युक्त होतें, व सांप्रत ज्यावेळीं लोखंडास हातचे हातांत ठेवून आंत लपून बसलेली दारू उसळून पृथ्वीस झालेला लष्कराचा भार कमी करण्याकरितां त्वेषानें शत्रूच्या अंगावर धांव घेत आहे, या सर्व वेळीं व सर्व काळीं लष्करी धोरणाची व तदंतर्गत बाबींची किंमत सारखीच मानण्यांत आली आहे.

युद्धकलेच्या पहिल्या भागांतील वरील तत्त्वें वाचकांच्या नीट ध्यानांत येण्याकरितां महाराष्ट्राचे इतिहासांतील भोपाळच्या लढाईचें उदाहरण आपण घेऊं. माळवा प्रांत पहिले बाजीरावसाहेबांना दिल्ली दरबारनें अडचणीच्या प्रसंगीं देऊं केला; पण पुढें तो मनसुबा बदलला. बाजीरावांस माळव्यांत पाऊलहि टाकूं द्यावयाचें नाहीं व दक्षिणेंतहि त्यांचा नक्षा कमी करावयाचा अशी दिल्लीस मसलत होऊन बादशहाचे वजीर व दख्खनचे सुभेदार निजाम उल्मुलूख यांचे हातीं ही मसलत देण्यांत आली. परराष्ट्राचे कारस्थानावर, हालचालीवर व मसलतीवर बारीक नजर ठेवून मिळविलेल्या बातम्यांच्या धोरणावर राज्यकारभार चालविण्याची पद्धत ( system of intelligence ) पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांनीं अंमलांत आणिली होती, व ती पुढें नाना फडणिसांचे मृत्यूपर्यंत कमजास्त मानानें अव्याहत चालली होती. लष्करी व दरबारी हेर यांची बाजीराव साहेबांचेहि कारकीर्दींत रेलचेल होती व म्हणूनच दिल्ली दरबारची मसलत त्यांना वेळेवर कळली. निजाम उल्मुलुखाचा हेतु असा होता कीं, बाजीरावाला माळव्यांत पाऊलच टाकूं

घ्यावयाचें नाहीं इतकेंच नाहीं, तर विंध्याचलाचे व सातपुड्याचे दक्षिणेस उत्तर महाराष्ट्रांत दिल्लीचें सैन्य उतरवून आणि हैदराबादेस असलेल्या आपल्या मुलाकडून महाराष्ट्रावर स्वारी करावयास लावून पुण्याच्या आजूबाजूस, मध्य महाराष्ट्रांत, निदान उत्तर महाराष्ट्रांत तरी रणमैदान (theatre of war) निश्चित करावयाचें. स्वदेशांतच रणमैदान येऊन पडलें असतां प्रजेच्या मालमत्तेची खराबी होते, असंतुष्ट लोकांना बंडावा करण्यास वेळ फावतो व थोडासा अपजय झाला असतां चोहोंकडे धांदल होण्याचा समय असतो; यामुळें स्वतःच्या घराला कुलपें लावून दुसऱ्याच्या ओटीवर भांडत बसण्याचा क्रम शहाणे लोक अंगिकारितात. असो, उत्तर हिंदुस्थानांतील किरकोळ मराठी सरदारांचा पराभव करून विंध्याचलांतील वाटा, नर्मदेचे उतार व सातपुड्यांतील घाट मुसलमानी सेनेनें एकदां अडवून धरले असते म्हणजे स्वगृहांत लढाई घेतल्याशिवाय मराठ्यांना मार्गच नव्हता. सातपुडा हा मुसलमानी बाजूचा लढाईचा पाया आणि पुणें मराठ्यांच्या बाजूचा युद्धाचा पाया (base of operations) झाला असता, व उत्तर महाराष्ट्र रणमैदान बनलें असतें. अशा स्थितींत सातपुड्यांतील घाट ताब्यांत राहिल्यामुळें उत्तर हिंदुस्थान सुरक्षित राहून मुसलमानी लढाईचा पाया भक्कम झाला असता. या लढाईची मसलत ठरली त्यावेळीं नर्मदा तटाक, सातपुड्याचा प्रांत व त्याचे घाट हीं लष्करी धोरणाचीं नाकीं (strategical points) होतीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. उत्तरेस दिल्लीहून व दक्षिणेस हैदराबादेहून मुसलमानी सैन्यें हीं नाक्याचीं ठिकाणें ताब्यांत घेण्याकरितां निघालेलीं होतीं. पण कोंकणचे स्वारींत प्रमुख मराठे सरदार गुंतले असतांहि बाजीरावसाहेबांनीं दोघांचीहि आघाडी मारून सातपुड्याचें नाकें आपल्या ताब्यांत घेतलें; व उत्तर हिंदुस्थानांत माळवा प्रांतांत निजामउल्मुल्खाचे आधीं पाऊल टाकून उत्तर महाराष्ट्रांतील रणमैदान माळवा प्रांतांत ढकलून देऊन

नर्मदातटाक जो मुसलमानांकडील रणमैदानाचा पाया व्हावयाचा होता तो मराठ्यांकडील रणमैदानाचा पाया झाला! ही गोष्ट मराठ्यांना साधतां येण्याचें कारण त्यांच्या सेनापतीची धूर्तता व दूरदृष्टि हीं तर खरींच; पण त्याबरोबरच लष्कराचा सुटसुटीतपणा व चपळाई ( mobility of the army ) हीं होत. मराठी लष्कर सुटसुटीत किंवा सडें होतें याचा अर्थ असा कीं, फाजील बुणगे त्यांच्याबरोबर नव्हते. अवजड तोफा, अवाढव्य तंबु, राहुट्या व वाजवीहून फाजील सामग्री, या सर्वांस अर्धचंद्र मिळाला होता. मराठी सैन्य अधिक चपळ होतें याचा अर्थ असा कीं, सैन्यांत रिसाल्याशिवाय पायदळालाहि बसावयास घोडे ( mounted infantry ) होते. बाजीरावाबरोबर ६०।७० हजार लोक होते, तर वाटेंत मिळेल त्या गवतावर व पाहिजे तेवढ्या दाण्यावर राहणारीं सर्व ऋतूंत सर्व दिवसांत सारखें काम करणारीं महाराष्ट्रांतील ६०।७० हजार तट्टेंहि होतीं. यामुळें लांबीच्या मजला जलद आक्रमण्याचें सामर्थ्य मुसलमानी सैन्याहून मराठी सैन्यास फारच अधिक होतें. हा लढाईचा मनसुबा दिल्लीसच झाला असल्याकारणानें दिल्लीच्या सैन्याला कांहीं मजलांचा मराठी सैन्याहून फायदा मिळाला होता. शिवाय हैदराबादकरांच्या लष्करी छावण्याही पुण्यापेक्षां सातपुड्यास अधिक जवळ होत्या. मुसलमानांना आपली मसलत जर अधिक गुप्तपणें करतां आली असती, पुण्याचें दरबार जर बातम्या काढण्यांत अधिक बेसावध असतें, व मराठी सेनेची चपळाई मुसलमानांहून अधिक नसती, तर निजाम उल्मुलुखासारख्या धोरणी, वस्ताद व कावेबाज मुत्सद्याचे सेनानायकत्वाखालीं मराठ्यांस चांगली तंबी देण्याच्या दिल्ली दरबारनें केलेल्या या प्रयत्नाचा परिणाम कांहीं निराळाच झाला असता. नांवाजलेल्या तोफा व पुष्कळ ठिकाणीं लढलेली अवजड भांडीं बरोबर घेऊन दिल्ली दरबारच्या व दखनच्या सुभेदारीच्या सर्व सामर्थ्यासह निजाम उल्मुलुखासारख्या अलौकिक बुद्धिमत्तेचा पुरुष जर महाराष्ट्रांत उतरला असता तर बनत चाललेल्या महाराष्ट्राच्या साम्राज्याची

वाढ खुंटण्याचा संभव होता. मध्यप्रांतांत असलेले भोंसले व गुजराथेंत राहिलेले गायकवाड हे जरी साम्राज्याचे घटकावयव होते तरी साम्राज्याचीं पवित्र कामें कोणतीं, साम्राज्याचा महिमा काय, व हिंदुमात्रासंबंधानें महाराष्ट्राचें कर्तव्य कशा प्रकारचें होतें, याविषयींच्या उदात्त कल्पना व योग्य महत्त्वाकांक्षा हीं त्यांना स्वप्नींहि ठाऊक नसल्यामुळें, घरचे कजिये करण्यांत त्यांनीं प्राविण्य संपादिलें होतें. यामुळें सातपुड्याखालीं मुसलमान उतरले असतां स्वगृहाशीं दळणवळण करावयाचें, त्यांचे मार्गांना धोका देण्याचें मराठ्यांच्या अंगचें सामर्थ्य ( to cut off the line of communication ) असून नसून सारखेंच होतें. अशी स्थिति असल्यामुळें रणमैदान महाराष्ट्रांत न आणतां उत्तर हिंदुस्थानांत टाकणें जरूर होतें. सर्व हिंदुमात्राच्या हितासाठीं हिंदुस्थानांत महाराष्ट्राचें साम्राज्य स्थापण्याच्या मराठ्यांच्या उलाढालींत नागपूरकरांनीं जर तटस्थ वृत्ति स्वीकारली नसती तर उत्तर महाराष्ट्रांत उतरणाऱ्या मुसलमानांस मध्यप्रांतांतील मराठी सैन्याकडून पिछाडीच्या बाजूनें ज्याप्रमाणें तंबी देतां आली असती, त्याप्रमाणें माळव्यांत उतरलेल्या मराठी सैन्याचेंहि स्वगृहाशीं असलेलें दळणवळण हैदराबादचे नबाबाला सहज तोडतां आलें असतें. ही भीति मागें राहूं नये एवढ्याचकरितां औरंगाबादेस गोळा झालेल्या मुसलमानी सैन्याच्या उरावर चिमाजी अप्पाचें दडपण बाजीरावानें ठेवलें होतें. आपलें दक्षिणेचें दळणवळण बंद होईल काय, माळव्याचे रणमैदानाचा आपण बनविलेला नर्मदेचा पाया शत्रूच्या हातीं जाईल काय, ही बाजीरावसाहेबांस काळजी असल्यामुळें ते दक्षिणेंतील मोंगलांस पायबंद देण्याविषयीं निकडीच्या ताकिदी चिमाजी अप्पांस पाठवीत असत. नागपुरकर भोंसल्याचे मदतीशिवाय निजामउल्मुल्खास माळव्यांत खेळवून आपण जेरीस आणूं अशी त्यांच्या मनास खात्री वाटत होती. तरी भोंसल्याची मनधरणी स्वतः किंवा इतरांकडून करण्यास त्यांनीं किमपीहि कमी केलें नाहीं. याचें कारण असें कीं, दक्षिणेंतून उत्तरेस जावयाचे ठरीव मार्ग

कदाचित् मोंगलांचे हातीं गेले व खालूनवरून शत्रूंच्या तडाख्यांत सापडण्याची पाळी आली, तर उत्तरेकडील आपलें तोंड पश्चिमेस वळवून भोंसल्यांचा प्रांत होतां होईल तो पाठीवर घेण्याची सवड शिल्लक रहावी. म्हणजे उत्तर महाराष्ट्र हा आपला रणमैदानाचा पाया बदलून भोंसल्यांचा प्रांत हा रण-मैदानाचा पाया करतां येण्याची संधी रहावी. लष्करी धोरणाचे कामीं बाजीरावांचें जितकें हातखंडा काम असे तितकें हातखंडा काम महाराष्ट्राचे सर्व इतिहासांत दुसऱ्या कोणत्याहि मराठी सेनापतीचें दिसत नाहीं. भोपाळचे युद्धप्रसंगीं म्हणा, किंवा बुंदेलखंडांत बुणगे टाकून सडे होऊन आग्र्याचे बाजूला मुसलमानांना झुकांडी देऊन बगल मारून दिल्ली शहरास आग लावून बादशहाचे डोळ्यापुढें मराठ्यांची कर्तबगारी उभी करण्याच्या हेतूनें दिल्ली शहरावर त्यांनीं केलेल्या स्वारीचे प्रसंगीं म्हणा, त्यांचें लष्करी धोरण अटोकाट दृष्टीस पडतें. ह्या दिल्लीच्या स्वारीचे वेळीं अकस्मात् बदललेलें रणमैदान व त्यानंतर जयपूरच्या वाटेनें खालीं उतरून रणमैदानाच्या निराळ्याच पायाचें केलेलें अवलंबन, वगैरे गोष्टींकडे पाहिलें असतां, लष्कराच्या चपळाईचे कामीं, आपणास अनुकूल अशाच जागीं शत्रूस लढाई देण्यास भाग पाडण्याचें कामीं, व वारंवार रणमैदान बदलून त्याबरोबर रणमैदानाचा पायाहि अकस्मात् एका दिशेचा दुसऱ्या दिशेस लीलेनें टाकून देऊन शत्रूस भांबावून सोडण्याचे कामीं, बाजीरावानें शिताफी दाखवून लष्करी धोरणांत पूर्ण पारंगतता संपादण्याचें ज्या प्रकारचें यश मिळविलें आहे त्या प्रकारचें यश मराठ्यांच्या किंवा मुसलमानांच्या इतिहासांत राहूं-द्याच, पण युरोपच्या इतिहासांतहि नेपोलियनशिवाय फारच थोड्यांनीं मिळविलेलें दृष्टीस पडतें. याकरितां ज्यांना युद्धकलेच्या पहिल्या भागाच्या म्हणजे लष्करी धोरणाच्या तत्त्वांचें विशेष अध्ययन करावयाचें असेल त्यांनीं बाजीरावाच्या स्वाऱ्यांतून या तत्त्वांच्या झालेल्या उद्घाटणाकडे लक्ष पुरवावें अशी शिफारस करून, युद्धकलेच्या दुसऱ्या भागाकडे म्हणजे ऐन लढण्याच्या वेळच्या डावपेचांकडे (tactics) आम्ही वळतों.

# * गनिमी काव्याची लढाई

## नंबर ३

लष्करी धोरण व लढाईचे डावपेच या दोन भागांपैकीं पहिल्या भागाचें विवेचन गेल्या अंकांत आम्हीं थोडक्यांत केलें आहे. या दोन्ही भागांच्या सामान्य तत्त्वांची वाचकांस ओळख झाल्याशिवाय गनिमी काव्याचें स्वरूप समजणें शक्य नाहीं. रणमैदानांत दोहोंबाजूंचीं सैन्यें उतरल्यानंतर दोन तऱ्हेनें ऐन लढाईस सुरवात होते. ( १ ) दोहों बाजूंला आपण एकमेकांजवळ आलों असें समजल्यावर त्यापैकीं एक सैन्य चांगली आश्रयाची जागा पाहून तळ देऊन बसतें, व दुसऱ्या सैन्यास थोडक्या अंतरावर तळ देऊन बसल्याशिवाय गत्यंतर नसून सावकाशपणें लढाईस सुरवात करावी लागते. हे दोन्ही तळ अशा रीतीनें पडतात कीं, लढाई केल्याशिवाय तळ उठवितांच येत नाहीं. कारण, लढाई न देतां बगलेनें गेलें असतां रणमैदानाच्या पायाशीं असलेला संबंध तळ धरून बसलेला शत्रु हां हां म्हणतां तोडूं शकतो, व प्रसंगविशेषीं आपला पायाहि शत्रूच्या हातीं जाण्याचा संभव असतो. कित्येक वेळां हालचाली करतां करतां अशाच ठिकाणीं तळ देणें भाग पडतें कीं, दोहों बाजूंचीं सैन्यें आपापल्या पायापासून विलग झालीं असून एकमेक एकमेकांच्या पेचांत सांपडलेलीं असतात; व या पेंचाची गांठ तरवारीच्या धारेनें तोडल्याशिवाय सोय नसते. पानपतच्या रणांगणावर तळ देऊन बसलेल्या गिलच्यांची व मराठ्यांची स्थिति वरील प्रकारची होती. अहमदशहा अबदालीला गांठण्याकरितां मराठयांचें सैन्य यमुनापार गेल्यानंतर लढाईचें तोंड लागल्यावर दोन्ही सैन्यांचा तळ अशा कांहीं चमत्कारिक रीतीनें

---

* केसरी, ता. १ जुलै १९०२



नगर वाचनालय

पडला कीं, पानिपतच्या मैदानाचे वायव्य कोपऱ्यांत मराठे राहून आग्नेय कोपऱ्याचे बाजूला गिलच्यांचा तळ पडला; व दोघांनाहि एकमेकांच्या मागें हटण्याच्या वाटा सहज अडवितां येत असल्यामुळें झुंज देऊन फळी फोडण्याशिवाय अडचणींतून मुक्त होणें मुष्किलीचें होतें. अशा रीतीनें दोन्हीं सैन्यांनीं तळ दिल्यावर किंवा एकानें तळ दिला म्हणून दुसऱ्यास तळ देणें भाग पडल्यावर सेनापतीच्या सवडीनुसार व इच्छेनुसार लढाईस सुरवात होते. ट्युगेला नदीवर बोअर जनरल बोथा व इंग्रजी जनरल बुल्लर यांच्या झालेल्या लढाया अशाच प्रकारच्या होत्या. ( २ ) दुसरा प्रकार असा आहे कीं, दोन्ही सैन्यें चलतीमध्यें (on the move) असतांना दोघांची अकस्मात् गांठ पडून किंवा एकानें दुसऱ्याच्या हालचालीवर नजर ठेवून अकस्मात् गांठून लढाईस सुरवात होते. तळ देऊन बसणें जरूर पडण्याइतकें किंवा अकस्मात् गांठ पडण्याइतकें परस्परांचें परस्परांशीं सान्निध्य झालें असतां युद्धकलेचा पहिला भाग जो लष्करी धोरण याचें काम संपून दुसऱ्या भागास म्हणजे ऐन लढाईचे डावपेंचास (Tactics) सुरवात होते. शत्रूवर हल्ला करावयाचा असेल किंवा शत्रूच्या हल्ल्यापासून आपला बचाव करावयाचा असेल त्याप्रमाणें सैन्याची रचना करणें, नदी, नाला, पर्वत, डोंगर, किल्ला, जंगल, झाडी, खेडींपाडीं, इमारत, जमिनीचा उच्च नीच भाग या सर्वांची मदत आपल्या कार्यास होईल व सैन्यास आसरा मिळेल इकडे लक्ष ठेवणें; स्वसंरक्षण करावयाचें असतां शत्रु तोंडास तोंड दिल्यासारखें करून आपल्या अगलबगलेवर हल्ला करतो आहे कीं काय किंवा अगलबगलेस वळसा देऊन पिछाडीस येऊन दळणवळणाचे मार्ग रोखून ठेवतो आहे कीं काय या गोष्टींवर लक्ष ठेवणें; उलट पक्षीं आपण हल्ला चढवीत असतां तोंडास तोंड देऊन फळी फोडण्याच्या (Frontal attack) प्रयत्नाबरोबरच शत्रूची अगलबगल विछिन्न करणें किंवा तीस वळसा देणें; पराभव झाला असतां सैन्याची

विशेष खराबी न होऊं देतां आस्ते आस्ते दमादमानें शत्रूस आवरून धरून मागें पाय काढण्याची (retreat) व्यवस्था करणें; उलटपक्षीं अशा रीतीनें शत्रूवर मागें पाय काढण्याचा प्रसंग आला असतां शत्रूच्या सैन्याची अव्यवस्था होऊन त्यांची दाणादाण होऊन जाईल अशा रीतीनें त्यांच्यावर ताज्यातवान्या रिसाल्यांची धाड पाडणें; लढाईस तोंड पडल्यावर शत्रु हल्ला चढविण्याचें सोंग कोणत्या जागीं करतो आहे, शत्रूचा खरा जोर कोणत्या जागीं आहे, हें पाहून त्याप्रमाणें आपल्या बलाबलाची त्या त्या स्थानीं वांटणी करणें; व उलटपक्षीं एका जागीं शत्रूस कोरड्या वाकुल्या (demonstration) दाखवून भलत्याच जागीं लढाई निकरास आणणें; शत्रूनें आपल्या ओळींत भगदाड पाडिलें असतां ताजेतवानें सैन्य तेथें पाठवून लिपालिप करण्याकरितां किंवा उलटपक्षीं आपल्या सैन्यानें शत्रूच्या व्यूहांत चंचुप्रवेश केला असतां नवें सैन्य पाठवून मुसलप्रवेश करण्याकरितां सेनापतीचे हातांत वेळ—प्रसंगानुसार एकंदर सैन्याचा चवथा, तिसरा किंवा अर्धा भाग शत्रूच्या माऱ्याबाहेर पण लढणाऱ्या लोकांच्या अगदीं जवळ शिल्लक (reserved) ठेवणें; सैन्याची शिस्त किंवा कैद (discipline) बिघडूं न देतां उमेदहि (morale) खचूं न देणें; ज्या योगानें सैन्याची वीरश्री पूर्ण उतास येईल अशा सर्व लहानसान जयापजयाचा पूर्ण फायदा घेणें; इत्यादि गोष्टींचा समावेश युद्धकलेच्या दुसऱ्या भागांत होतो. दोन्ही सैन्यें परस्परांजवळ तळ देऊन बसलीं असतां आसमंतात् भागाचें नीट निरीक्षण करून घाईघाईनें दिलेला तळ अधिक बंदोबस्ताचे जागीं नेण्यास किंवा खंदक खणून वगैरे उपायांनीं त्याच जागेची अधिक बळकटी करण्यास सवड मिळते. परंतु जेथें दोन्ही सैन्यें अकस्मात् चलतीमध्यें एकमेकांशीं भिडतात त्या ठिकाणीं ऐन्यावेळीं तत्क्षणीं योग्य जागेची व योग्य रचनेची निवड करणें भाग पडून सेनापतीच्या खऱ्या अकलेची पारख होते. एक सैन्य दुसऱ्या सैन्याहून संख्येनें अतिशय मोठें

आहे अशी स्थिति असल्यास मोठ्या सैन्याच्या सेनापतीस डावपेचांचें विशेष कौशल्य दाखविण्याची जरुरी पडत नसून निवळ दांडगाईनें जय मिळवितां येतो. लॉर्ड रॉबर्टस् यांनीं किंबर्लेचे जवळ क्रांजी याजवर जो जय मिळविला व पुढें पारडेबर्ग येथें क्रांजीस वेढून त्याच्या सैन्याला शरण यावयास लावलें, तो जय सेनातिशयाच्या हुमणदांडगेपणाचें फळ होय; डावपेचांच्या कौशल्याचें प्रदर्शन त्या प्रसंगीं कमी झालेलें आहे. संख्येच्या व हत्यारांच्या मानानें दोन्ही बाजू समतोलाच्या असल्यास लढाईचें तोंड लागल्यावर जयापजय सेनापतीच्या डावपेचांच्या कौशल्यावर विशेष अवलंबून नसतो. ज्या लढाईचे प्रसंगीं आपलें सैन्य शत्रूच्या सैन्याहून कमी असतें त्यावेळीं शत्रूच्या तोंडावर न जातां एका बगलेस जाऊन हल्ला करावयाचा, म्हणजे शत्रूचें सबंध सैन्यास एकाच काळीं लढतां न येऊन ज्या बाजूवर हल्ला असेल त्या बाजूच्याच लोकांना तेवढी लढण्याची संधी द्यावयाची, इतर बाजूचे लोक लढणाऱ्यांच्या मदतीस येण्यापूर्वीच त्या बाजूचा पराभव करून मदतीस येणाऱ्यांचा समाचार घेण्यास पुढें सरसावयाचें, अशा रीतीनें शत्रूच्या निरनिराळया भागांशीं एकामागून एक अशा क्रमानें लढून कमी संख्येनें अधिक संख्येचा पराभव करावयाचा अशी नेपोलियनची पद्धत होती. हातघाईची लढाई ज्या घटकेला होते त्या घटकेला आपण व सामनेवाले यांची संख्या बरोबरीची असली म्हणजे झालें. त्या घटकेनंतर सामनेवाल्यांना कितीही मदत येणार असली तरी फिकीर नाहीं. अशा रीतीनें शत्रूची कितीहि अधिक संख्या असली तरी नेपोलियन शिताफीनें आपल्या सैन्याच्या अशाच हालचाली करीत असे कीं, निकराच्या घटकेला स्वतःच्या सैन्याएवढयाच शत्रूच्या सैन्याच्या भागाशीं गांठ पडावयाची. अशा रीतीनें समान संख्येची गांठ पडल्यावर शिस्त, वीरश्री, शौर्य, यानें नेपोलियनचें सैन्य अधिक योग्यतेचें असल्यामुळें व सैन्याचा सेनापतीवर पूर्ण विश्वास पडेल अशी विलक्षण कर्तबगारी त्याचे अंगीं असल्यामुळें केवळ

बेरीज वजाबाकीच्या हिशेबाप्रमाणें तो जय हटकून मिळवीत असे. शत्रु कमकुवत कोणत्या जागीं आहे हें एकदां ध्यानांत आल्यावर त्या जागीं हल्ल्याची गर्दी उसळून द्यावयाची, व आपल्याकडील कितीहि लोक मेले तरी इतक्या धडाडीनें व आवेशानें हल्ला चढवावयाचा कीं, शत्रूनी सर्व शिस्त बिघडून त्याचें सैन्य गर्भगळितच झालें पाहिजे! अशा हल्ल्याचे प्रसंगीं शिस्त बिघडूं न देणें, व तुम्ही जितके लोक खर्ची घालाल त्याहूनहि अधिक लोक खर्ची घालण्यास आपल्यापाशीं आहेत व तुमच्या हल्ल्याच्या मुसंडीस पाहिजे तितके बळी पडल्यावरहि उलट हल्ला करण्यास आपल्यापाशीं सैन्य शिल्लक आहे असें प्रत्ययास आणणें हीच कायती नेपोलियनाचें डावपेंचावर (Tactics) उलट मात्रा होती. वाटर्लूचे लढाईचे वेळीं नेपोलियनचे हल्ल्यापुढें आपल्या सैन्याची शिस्त कशीबशी संभाळून राहिलेले वेलिंग्टनसाहेब, एक रात्र तरी येवो किंवा प्रशियन सैन्याची कुमक तरी लवकर पोचो, म्हणून काळजीनें वाट पहात बसण्याचें वर्म वरील कारणांत आहे. शत्रूच्या नाजूक व कमकुवत भागावर समुद्राच्या लाटांप्रमाणें एकामागून एक अधिक वेगाचे व तीव्रतेचे हल्ले चढविणें हाच जय संपादन करण्याचा मुख्य मार्ग मुसलमान, मराठे यांच्या लढाईतून व बोअरयुद्धापर्यंत युरोपियनांच्याहि लढायांतून समजला जात असे. रजपुतांचीहि लढाई करण्याची हीच पद्धत होती. संख्येच्या, शिस्तीच्या, उमेदीच्या किंवा दुसऱ्या कोणत्या तरी नात्यानें शत्रु आपल्याहून कमकुवत आहे, निदान डोईजड तरी नाहीं असें वाटल्याशिवाय धडकी देण्याच्या डावपेंचांचा अंगिकार नांवाजलेल्या युरोपियन व मराठे सेनानायकांनीं केलेला नाहीं. मुसलमान व रजपूत यांची मात्र मुख्य मदार कालीं अकालीं, प्रसंगीं अप्रसंगीं याच डावपेचावर अवलंबून असे. बंदुकीची लढाई असो, कीं तरवारीची लढाई असो, डावपेंचाचें मर्म एकच, व तें हें कीं, लहान घोंड्यावर मोठ्या धोंड्याची धाड आणून घालवयाची; शत्रूच्या

अंगावर आपल्या सर्वस्वाचें बळ ढकलावयाचें. मुसलमान व रजपूत यांच्या लढाया एका बाजूस ठेवल्या आणि मराठे–मुसलमानांच्या मोठमोठ्या लढाया जर ध्यानांत घेतल्या तर असें आढळून येईल कीं, रणांगणावर मुसलमानांच्या मुसंडीस प्रथम जरा हार जाऊन रानडुकराचा वेग कमी होईतोंपर्यंत शिकारी ज्याप्रमाणें बगल देतो त्याप्रमाणें या मुसंडीचें अवसान संपेतों मागें हटल्यासारखें करून उलट आपल्या घोडेस्वारांची धडकी तितक्याच जोरानें किंबहुना अधिक जोरानें देण्याचा मराठ्यांचा क्रम होता. मुसलमानांच्या मुसंडीपुढें जसा रजपुतांना टिकाव धरवला नाहीं त्याप्रमाणें मराठ्यांच्या घोडेस्वारांच्या धडकीपुढें दक्षिणेंत हैदर तर उत्तर हिंदुस्थानांत दिल्लीपति–कोणासच टिकाव धरतां आला नाहीं. हुजूरच्या बावन हजार पागेचा फिरंगी, इंग्रज, टिपू, निजाम, रोहिले व गिलचे या सर्वांचाच सारखा दरारा होता. लढाईस सुरवात झाल्यावर ज्या ठिकाणीं शत्रु कच खाण्याचा संभव आहे त्या ठिकाणीं रिसाल्याचा सारखा झोत लावून द्यावयाचा हा मराठ्यांचा मुख्य डावपेंच असे. मुसलमानांवर तर या घोडेस्वारांचा इतका वचक होता कीं, पायदळाचे सामन्यांत पुरी फजिती झाली असतांहि केवळ घोडेस्वारांच्या धडकीनें हां हां म्हणतां रणांगणाचें स्वरूप एकदम पालटून गेल्याचीं उदाहरणें आहेत! राक्षसभुवन येथें निजामाशीं झालेल्या संग्रामांत राघोबादादांनीं पराभव कबूल केला असतां व नांवाजलेले मल्हारराव होळकर हुजूरपागेजवळ उभे असलेल्या थोरले माधवरावसाहेबांना पळून जाण्याची मसलत देण्यास आले असतां, माधवरावांच्या हिंमतीवरून हुजूरपागांनीं अशा वेगानें व त्वेषानें मुसलमानांवर घालून घेतलें कीं, तुफान फुगलेल्या नदीच्या प्रचंड प्रवाहापुढें मोठमोठे वृक्ष ज्याप्रमाणें समूळ उपटून क्षणार्धात वाहून जावेत, त्याप्रमाणें मराठी घोड्यांच्या धडकीपुढें निजामचें सैन्य हां हां म्हणतां पांगलें जाऊन मराठी शिलेदाराचा घोडा खुद्द निजामच्या हत्तीच्या दातांवर पाय देऊन

नगर वाचनालय



खडा झाला व मराठी भाला निजामचे नरडीपर्यंत पोंचला! पानिपतचे लढाईचे वेळींहि मराठयांच्या या धडकीनें गिलच्यांच्या वजिरास घोडयाखालीं ओढलें होतें. पण यमुनेचा उतार कबजांत घेऊन गिलच्यांच्या पिछाडीस त्रास देण्याकरितां पाठविलेल्या गायकवाडांनीं सांगितलेल्या कामाकडे पूर्ण दुर्लक्ष करून उजू दक्षिणेचा रस्ता धरल्यामुळें व अकस्मात् कोणत्याहि तऱ्हेनें बाजू आंगलट आली नसतां मल्हारबांनीं ४० हजार सैन्यानिशीं गायकवाडी कित्ता गिरविल्यामुळें यक्षिणीच्या कांडीप्रमाणें पानिपतच्या रणमैदानावरील सर्वच देखावा बदलला. अहमदशहा अबदालीनें कांहीं सैन्य मुद्दाम शिल्लक (Reserved) ठेविलें होतें, वगैरे डावपेंचासंबंधाचीं कारणें सांगण्यांत येतात. परंतु इंग्रजी तऱ्हेच्या डावपेचांच्या शिस्तीप्रमाणें ही शिल्लक मुद्दाम ठेवलेली नसून छावणी उठविली नसल्यामुळें केवळ छावणीच्या रक्षणाकरितां जरूर तितकेंच हें सैन्य ठेविलें होतें; व गायकवाडांनीं जर आपली कामगिरी नीट बजावली असती तर हें सैन्य शिल्लक म्हणून ठेवलेलें नसून केवळ जरुरीमुळें ठेवणें भाग होतें असें सर्वांच्या निदर्शनासहि आलें असतें. शिवाय या शिलकेचा यक्षिणीच्या कांडीप्रमाणें रणांगणाचें रूपांतर होण्याचे कामीं कसा व कोठें उपयोग झाला हें इतिहासांत चांगलेंसें दृष्टीस पडत नाहीं. पानिपतच्या मैदानावर शेवटच्या लढाईचे वेळीं दोन्ही सैन्यांनीं केलेल्या हालचाली व दोहो बाजूंचे डावपेंच यांचा जर समाधानकारक खुलासा करावयाचा असेल तर साहेब–कामाची जाणून बुजून कोणाकडून तरी हेळसांड झाली किंबहुना प्रत्यक्ष नासाडी करण्यांत आली असें कबूल करणें भाग पडतें; एरव्हीं सैन्याच्या हालचाली व डावपेंच यांचा अर्थच समजत नाहीं. मराठी शिलेदारांच्या या धडकीचा वचक गिलच्यांवर पानिपतच्या लढाईनतरहि इतका बसला होता कीं, मराठी साम्राज्य लयास जाऊन इंग्रजांचें पारडें वर चढल्यावर " हिंदुस्थानवर आम्ही स्वारी करणार आहों, तर मराठयांच्या-

विरुद्ध आपण आम्हांस मदत करावी " असा निरोप अफगाणिस्थानांतून कलकत्त्याचे लाटसाहेबांना आला होता ! असो; युद्धकलेच्या दोन भागांतील सामान्य व ढोबळ तत्त्वें मुसलमान व मराठे सेनापतींस कमीजास्ती प्रमाणानें अवगत होतीं यांत संशय नाहीं. इंग्रजांनीं ज्याप्रमाणें या कलेला कांहीं अंशीं नियमबद्ध केलेली आहे त्याप्रमाणें त्यांनीं नियमबद्ध केली नव्हती ही गोष्ट खरी आहे. तथापि, इंग्रजांपुढें त्यांची अशी दीनावस्था होण्याचें कारण, धोरण व डावपेच या संबंधाचें त्यांचें परंपरागत ज्ञान अगदीं टाकाऊ होतें हें नव्हे. आजचा लेख लांबल्यामुळें त्या कारणाचें येथें विवेचन करतां येत नाहीं. तथापि पुढील खेपेस, लष्करी धोरण व डावपेंच यांच्या सामान्य तत्त्वांतून गनिमी काव्याच्या लढाईचीं तत्त्वें कशीं निघतात याचें विवेचन करण्यापूर्वी, इंग्रजी सैन्याची हिंदुस्थानी सैन्यानें इतकी दहशत कां घेतली याचें विवेचन करणार आहों.

# * गनिमी काव्याची लढाई

नंबर ४

गेल्या अंकीं कळविल्याप्रमाणें इंग्रजी राज्य तरवारीच्या म्हणजे केवळ लष्कराच्या जोरावर कितपत उभारलें गेलें तें या अंकीं प्रथम पहावयाचें आहे. टापटिपीची राज्यव्यवस्था, कुटिल पण नियमबद्ध राजनीति, धार्मिक नव्हे पण केवळ ऐहिक महत्त्वाकांक्षा, नवीन शास्त्रीय शोधांची पूर्ण मदत, व अव्यवस्थेमुळें आणि धार्मिक झगड्यांमुळें नेहमीं भांडत असलेल्या हिंदुस्थानांत दोघांचे लाभांत स्वतःचे डोक्यावर पगडी ठेवावयास मिळालेली संधि, या सर्व गोष्टी एका बाजूस ठेवून केवळ लष्करी जोर इंग्रजी राज्याची टोलेजंग इमारत चुटकेसरशीं हिंदुस्थानांत उभारण्यास किती कारणीभूत झाला आहे याचा विचार करतांना मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें कीं, लष्करी धोरण किंवा लष्करी डावपेंच यासंबंधानें इंग्रजी सेनेनें हिंदुस्थानच्या भूमीवर दाखविलेलें प्रदर्शन फारच दरिद्री आहे. त्रिचनापल्लीचा वेढा उठविण्याकरितां अर्काटवर स्वारी करून अवचित रणमैदान बदलण्याच्या क्लैवसाहेबानें केलेल्या एका लष्करी धोरणावर सर्व मद्रास इलाखा आपापाचा माल गपापास या न्यायानें खावयास सांपडला. प्लासीच्या लढाईचे वेळीं डावपेंचाचें प्रदर्शन बेताचेंच होतें; पण तेवढ्यावर बंगालभर हातपाय पसरावयास सांपडल्यामुळें पुढें चार वर्षांनीं झालेल्या पानिपतच्या लढाईत मुसलमान व मराठे या दोघांवर परमेश्वरी क्षोभाचा सारखा वरवंटा फिरून हिंदुस्थानांत निर्वीर्यमुर्वीतल झाल्यावर कोठें अयोध्येच्या नबाबाला शह दे, कोठें रोहिलखंडाला टोंच, कोठें दिल्लीच्या दरबारांत शिरकाव करून

* केसरी ता. ८ जुलै १९०२

घे, अशा फुकटच्या दिमाखयाच्या गोष्टी करण्यास त्यांस मुबलक अवकाश मिळाला. राघोबा दादाचा पक्ष घेऊन, एकवटलेल्या मराठयांच्या सत्तेशीं झुंज देण्याची अवदसा एकाकाळीं कांहीं मुत्सद्यांना आठवली होती. पण लट्ठालट्ठी करून शिखरास पोंहोचण्याचें तागडीवाल्यांचें काम नव्हे, फळ पक्क होऊन आपोआप गळून खालीं पडल्यावर ओंठानें सोलून खाणें अधिक श्रेयस्कर, असें अनुभवास आल्यावरून तो प्रयत्न सोडून देण्यांत आला. १८०३ सालीं मात्र आसई व लासवारी येथें नांव घेण्यासारख्या निकराच्या लढाया मराठयांनीं इंग्रजांशीं केल्या. यावेळीं हिंदुस्थानांतच नव्हे, इंग्लंडांत नव्हे, तर सर्व युरोपांत नांवारूपास आलेले वेलिंग्टनसाहेब इंग्रजी सेनेचे सेनापति होते. लष्करी डावपेंचासंबंधानें या लढायांतून इंग्रजांस जय मिळाला, पण युद्धाचा शेवट या लढायांमुळें इंग्रजांना पाहिजे तसा न होतां लष्करी धोरणासंबंधानें मराठयांची फजिती झाली नाहीं. शिंदे व होळकर यांच्याशीं, या लढयांत जय मिळाला असतांहि, 'त्वयार्धं मयार्धं' अशाच तऱ्हेचा तह करावा लागला. कारण मराठी शिलेदारांचा वचक इतरांप्रमाणें इंग्रजांवरहि होता. मूर्खपणाचीं अनन्वित कृत्यें करण्यास लागणारा पैसा मुबलक मिळावा म्हणून खर्च कमी करण्याकरितां ५२ हजार हुजूरपागेस रजा देण्याची सल्लामसलत देणाऱ्या रावबाजीच्या प्रभावळींतील दीडशहाण्यांना इंग्रजी वकिलाची फुसलावणी कमी होती असें नाहीं. मुंबई व पुणें यांच्या दरम्यान परमेश्वरानें सह्याद्रीची विलक्षण भिंत घालून ठेवली असतांहि व ती भिंत मराठयांचे पूर्णपणें ताब्यांत असतांहि पुणें शहर घेण्याकरितां दहा पंधरा मैलांवर इंग्रज येऊन थडकल्यानंतर शनिवार-वाडयांत लढाईच्या गोष्टी बोलण्यास आरंभ झाला,-हें इंग्रजी लष्करी धोरणासंबंधाच्या चातुर्याचें उदाहरण नसून निंद्य चैनींत धुंद झालेल्या पुण्याच्या दरबारच्या अव्यवस्थित-पणाचा व वेडगळपणाचा हा परिणाम होय. पेशवाई इंग्रजांनीं जिंकून घेतली

म्हणण्यापेक्षां अत्यंत लाजिरवाण्या स्वेच्छाचारांत मग्न होऊन भागूबाईचा पेशा स्वीकारून दिवट्या बाजीनें इंग्रजांचे हातांवर पेशवाईचें उदक सोडलें असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. ब्रम्हदेश फसगतीनें घेतल्यानंतर इंग्रजांना जितपत त्रास पडला तितपतहि त्रास महाराष्ट्र घ्यावयास इंग्रजांना पडला नाहीं; किंबहुना इंग्रजांचें निशाण शनिवार वाड्यावर स्वतःचे हातांनीं लावणारे ब्राम्हण पुणें शहरांत त्यावेळीं कमी नव्हते. जी पुण्याची दशा तीच नागपूरची दशा. १८४८ सालापर्यंत हिंदुस्थानांत इंग्रजांच्या साम्राज्याचा बस चांगला बसून गेला व या साम्राज्याच्या लाटेला केवळ धर्माच्या आवेशानें लढणारे शीख लोक बळी पडले यांत कांहीं नवल नाहीं. सत्तावन सालचे बंडाचे वेळीं इंग्रज अंमलदारांची तारांबळ उडाली होती खरी, पण त्यावेळीं सर्व प्रजाजन इंग्रजी राजसत्तेस अनुकूल असल्यामुळें व बंडखोरांत तात्या टोपी व झांशीची राणी यांखेरीज साधारण लायकीचाहि कोणी सेनापति नसल्यामुळें बंडवाल्यांचेपुढें इंग्रजी सैन्य जाऊन उभें रहाण्याबरोबर बंड आपोआप विरघळून गेलें.

इतिहासाकडे पाहिलें असतां इंग्रजांनीं हिंदुस्थान तरवारीच्या जोरावर मिळविलें नाहीं ही गोष्ट सिद्ध होते खरी, पण त्याबरोबरच इंग्रजी लष्करचा दबदबा चोहोंकडे अत्यंत असलेला दिसून येतो. म्यानांतून तरवार बाहेर निघाली नसेल, पण त्या तरवारीची भीति सर्वांना होती यांत शंका नाहीं. या तरवारीस सहाय्य कुटिल राजनीतीचें होतें म्हणून म्हणा, किंवा अव्यवस्थित प्रांतावर व्यवस्थित राजसत्तेचा प्रभाव पडणें साहजिक होतें म्हणून म्हणा, इंग्रजी सत्ता अव्याहत रीतीनें फैलावत गेली. तथापि केवळ लष्करी दृष्टीनें पाहिलें तरी इंग्रजांविषयीं भीति सर्वत्र कमी होती असें नाहीं. म्हैसूरच्या हैदरानें लष्करी धोरणांत जागजागीं इंग्रजांना चकवून थेट मद्रासचे वेशींत पाहिजे तशा तहाच्या अटीवर इंग्रजांना सही करण्यास भाग पाडलें.

पण अखेरीस टिपूस मारून श्रीरंगपट्टणावर एका इंग्रजानेंच इंग्रजी राज्याचा झेंडा रोंविला. मराठी साम्राज्यांतील संयुक्त संस्थानांची हीच दशा झाली. तेव्हां इंग्रजांच्या तलवारबहादुरकीचें भय सर्वत्र असावें हें साहजिक आहे. लढाईचें धोरण व लढाईचे डावपेंच यासंबंधानें नांव घेण्यासारखी कृति केलेली दिसत नाहीं, पण तसल्या कृतीचें फळ मात्र दिसतें. लष्करी कर्तबगारी नाहीं, पण यश मात्र आहे. व्यापाराकरितां आलेल्या मूठभर इंग्रजांनीं हजारो पटीनें असलेल्या मराठ्यांचा, रजपुतांचा, शिखांचा, सर्वांचा नक्षा उतरून आपलें निशाण सर्वांहून श्रेष्ठ केलें हें कोडें उलगडावयाचें कसें असा साहजिकच प्रश्न उत्पन्न होतो.

इंग्रजांच्या राजनीतीचा व राज्यव्यवस्थेचा प्रश्न अगदीं एका बाजूस ठेऊन केवळ लष्करी दृष्टीनें वरील प्रश्नाचा आम्हांस जबाब द्यावयाचा आहे हें ध्यानांत धरलें पाहिजे. या प्रश्नाचें थोडक्यांत उत्तर असें आहे कीं, ही सर्व करामत इंग्रजांच्या हातांतील बंदुक व तदनुषंगानें असलेली कवाईत यांची आहे. इंग्रजांचे पूर्वी हिंदुमुसलमानांना बंदुक माहीत नव्हती असें नाहीं. पण लढाईचे वेळीं सर्रास उपयोग करण्याचें हत्यार बंदूक समजली जात नव्हती. युरोपखंडाचा लष्करी इतिहास वाचला तरी असें ध्यानांत येईल कीं, ज्या वेळीं प्रथम बंदूक उपयोगांत येऊं लागली त्यावेळींहि योद्ध्याची खरी भिस्त तलवार–भाल्यावरच होती. तें अवजड चिलखत, ती भली लांब रुंद तलवार, तो भाला–हीं सर्व सांगें इकडच्याप्रमाणेंच तिकडेहि होतीं. बंदुकीचा प्रथम उपयोग व्हावयास लागला त्यावेळीं ओळीनें उभे राहिलेल्या लोकांनीं तोडयाची बंदुक एकदां कशीबशी पेटवावयाची व पहिला बार निघाल्यावर बंदूक खालीं फेकून देऊन तलवार उपसून शत्रूशीं लगट करण्याकरितां धांव टोकावयाची हाच लढण्याचा प्रकार सर्वत्र सुरू होता. म्हणजे ह्या प्रारंभीचे वेळीं युरोपखंडांत किंवा इंग्रज हिंदुस्थानांत

आले तेव्हां आम्हा लोकांत बंदुकीची स्थिति अशी होती कीं, बंदुकीच्या पल्ल्याइतक्या अंतरावर समोरासमोर उभे राहिलेल्या सैन्याला एक बार काढल्यानंतर मधील अंतर धावून गांठण्याइतक्या वेळांत दुसरा बार काढतां येत नव्हता. यामुळें लढाईच्या वेळीं प्रारंभींच्या सलामीशिवाय बंदुकीचा कांहीं उपयोग होत नसून मजलीच्या वेळां अवजड ओझें विनाकारण घ्यावें लागत असल्यामुळें किल्ल्यांच्या किंवा तटबंदीच्या गांवांच्या संरक्षणाशिवाय इतर प्रसंगीं बंदुकींचा किंवा तोफांचा उपयोग बहुतः करीत नसत. एखाद्या किल्ल्याला वेढा द्यावयाचा असला तर स्वतःच्या किल्ल्यावरील मोठमोठीं भांडीं मोर्चे लावण्याकरितां तेथपर्यंत कशींबशीं एत्या वेळीं नेण्याचा क्रम असे. फिरंग्यांशीं लढतांना मराठ्यांना, फिरंगी आगीचा पुतळा असल्यामुळें, जेजिले, तोफा आदिकरून लहानमोठ्या भांड्यांची मुद्दाम म्हणून जुळवा-जुळव करावी लागली. नेहमीं चोहोंकडे हिंदुस्थानभर फिरणाऱ्या सैन्याबरोबर ही तयारी तात्पुरतीच ठेवण्यांत येत असे. इंग्रजांनीं हिंदुस्थानचे राजकारणांत ढवळाढवळ करण्याचा प्रारंभ केला त्यावेळीं हिंदुस्थानांतील बंदुकीची स्थिति अशा प्रकारची होती. पण इंग्रजांची बंदूक अशा बाल्यावस्थेंत नव्हती. त्यांची मुख्य लढाई बंदुकीची असून तलवार किंवा संगीन ते कारणापुरती बाळगीत असत. त्यावेळीं युरोपांत बंदुकीच्या लढाईचा पूर्ण पगडा बसला असून त्यासंबंधीच्या तत्त्वांनाहि बऱ्याच अंशीं त्यांनीं नियमबद्ध करून सोडलें होतें. एक बार निघाल्यानंतर शत्रूची तलवार छातीला येऊन भिडेपर्यंत दुसरा बार निघावयाचा नाहीं, अशी त्यांच्या बंदुकीची स्थिति नव्हती. इतकेंच नव्हे, तर अंतरावरून शत्रूच्या शिरांचे फुटाणे भाजण्याची ताकद त्या बंदुकीच्या अंगीं आली होती. विरुद्ध पक्षाकडे बंदुकी नसल्यामुळें, व केवळ मुसंडीसरशी लगट करण्याच्या प्रयत्नावरच विरुद्ध पक्षाचें यशापयश अवलंबून असल्यामुळें पहिल्या रांगेनें उभें राहून तर दुसऱ्या रांगेनें गुडघे टेकून, तर तिसऱ्या

रांगेनें उभे राहून एका पाठीमागून एक कवाइतीच्या शिस्तीनें व नेहमींच्या सरावाच्या जलदीनें बार काढीत सुटल्यामुळें, हल्लींच्या पातळ एकाच रांगेच्या पण फार जलदीनें बार काढणाऱ्या बंदुकांचें श्रेय त्या वेळच्या इंग्रजी बंदुकांना तलवारी भाल्यानें लढणाऱ्या हिंदुमुसलमानांचे झगड्यांत सहज मिळत असे. आमच्या भांडणांत तुम्ही येऊन पडा, म्हणून जी फ्रेंच लोकांचीं किंवा इंग्रजांचीं आर्जवें चाललेलीं असत याचें कारण त्यांच्यापाशीं असलेल्या बंदुका व तदनुषंगाची कवाईत हें होय. कवाईत म्हणजे सैन्याची एक प्रकारची व्यवस्था असून शत्रूकडील गोळीबारापासून आपल्या सैन्याची सर्वांत कमी खराबी होईल अशा तऱ्हेची शिपायांची पातळ व अंतराअंतरावर मांडणूक लढाईचे वेळीं एकदम सहज व्यवस्थेशीरपणें करतां यावी म्हणून कांहीं नियमित रीतीनें उभे रहाण्यास व फिरण्यास लोकांना शिकविलेली कला होय. या कलेचा दररोज धडा गिरविला जात असतांना, बंदुकांचा मारा, तिचा पल्ला, त्यामुळें एकाच गोळीनें एकामागून एक बळी पडण्याचा असलेला संभव, हा नाश कमी व्हावा म्हणून पातळ अंतरावर पण परस्परांस मदत होईल इतक्या जवळ उभ्या असलेल्या शिपायांची रचना, नेहमींच्या वेळच्या भरीव रचनेपासून ही पातळ रचना ऐत्या वेळीं शिपायांना हुकमाबरोबर अभ्यासानें करतां यावी म्हणून योग्य अंतरानें योग्य स्थळीं फिरावयास त्यांना लावलेली संवय, या गोष्टींकडे कवाइतीचे वेळीं लक्ष पुरविण्यांत येत असतें.

अशा रीतीनें कवाइत शिकवून तयार झालेल्या सैन्याच्या हातांत बंदुक पडली असतां ती पूर्ण काम देते. सांप्रतच्या काळची बंदूक एका बाजूस राहूं द्याच, पण शंभरसव्वाशें वर्षांच्या पूर्वींचीहि इंग्रजी बंदूक पाव मैल अर्धामैल लांबीचा एक तऱ्हेचा भालाच होता! हा भाला मनुष्य सहज उचलून आपल्या हातांत बाळगूं शकत असे. शत्रूच्या तलवारी या भाल्याच्या टोकावर चालत नसत. भाला हातांत धरणाऱ्यापासून एक दोन हातांच्या

पलीकडे पाव मैल अर्धा मैलभर कोणासहि या भाल्यास शिवतां येत नसे. या भाल्याच्या टोंकाचें परावर्तन करण्याची शक्ति ढालेंत नव्हती. चिलखत फोडून याचें फळ हां हां म्हणतां शरीरांत शिरत असे व कित्येक प्रसंगीं एकाचे शरीरांतून निघून दुसऱ्याचे शरीरास भोंक पाडण्यास हा मागेंपुढें पहात नसे ! असा विलक्षण भाला हातांत घेऊन लढण्यास उभ्या राहिलेल्या शिपायासमोर मुसलमानांच्या मुसंडीनें, मराठी शिलेदारांच्या धडकीनें नांगी खालीं टाकावी ही ओघाओघानेंच होणारी गोष्ट आहे. अशा प्रकारचा भाला घेऊन उभा राहिलेला एक मनुष्य किती तरी वीरांना भारी होईल याची वाचकांनींच कल्पना करावी, म्हणजे थोडकेसे इंग्रज रणभूमीवर पुष्कळांना कसे जिंकीत होते हें वाचकांच्या ध्यानांत येईल. हा प्रभाव उत्कट शौर्याचा नव्हे, हें यश बिनचूक लष्करी धोरणानें मिळविलेलें नव्हे, व ही कीर्ति शिताफीच्या लष्करी डावपेचांनीं संपादिलेली नव्हे; युरोपांत शेंदीडशें वर्षें मुरून पक्क्या बनलेल्या बंदुकीनें कमावलेलें हें वैभव आहे. आपले व्यापाराचे जिन्नस ठेवावयाच्या वखारीचें संरक्षण करीत असतांना नेटिवांवर या शस्त्रांचा कसा उपयोग होतो हें इंग्रज व फ्रेंच यांच्या चांगलें लक्षांत आलें; व यामुळेंच नेटिवांच्या घरांत घुसण्याचीं नेटिवांकडून त्यांना आमंत्रणें जाऊं लागलीं ! क्लैवसाहेबांच्या बंदुकीचे रात्रीं नुसते आवाज ऐकूनच शत्रूची दाणादाण झाल्याचीं उदाहरणें आहेत. चंदासाहेबाच्या राजधानीवर क्लैवसाहेब गेले त्यावेळीं थोडकेसें सैन्य पुष्कळांच्या दाढेंत सांपडून नायनाट होण्याची वेळ आली होती. पण रात्रीं क्लैवसाहेबांच्या हुकमाविरुद्ध चुकून उडालेल्या बंदुकीनें शत्रूची धांदल होऊन क्लैवसाहेबांचें प्रस्थ माजलें. नबाबाचे लोकांत का शौर्य नव्हतें, धर्माभिमान नव्हता, लढाई कशी करावी हें त्यांना माहीत नव्हतें, का त्यांच्यापाशीं नव्हतें तरी काय ? पण बंदुकीची लाइन झडल्याबरोबर आपला शेजारी मरून पडलेला पाहून व शत्रूपर्यंत

आपली तलवार पोंचणें अशक्य आहे हें देखून हजारों लोक कंबर खचल्या-सारखे खालींच बसत. हा भित्रेपणाचा परिणाम नव्हे, हें नामर्दाचें कृत्य नव्हे, तर विलक्षण व अतर्क्य चमत्कारापुढें भांबावून गेलेल्याचा हा गोंधळ होय. प्लासीच्या लढाईची हकीकत वाचा म्हणजे आम्हीं काय म्हणतों हें ध्यानांत येईल. राघोबादादाकरितां मुंबईहून निघून घाट चढून येण्याचा इंग्रज प्रयत्न करीत असतांना परशरामभाऊ पटवर्धन, महादजी शिंदे आदिकरून मराठ्यांचे सर्व म्होरपे हजर होते. आपापसांत कलह किंवा फुटाफूट नव्हती. इंग्रज मूठभर होते व मराठे हजारों होते. शिंद्याची कंपूची लाइन गैरहजर नव्हती. इंग्रजांना मराठ्यांनीं चौगीर्द वेढलें होतें व पुढें जाणें किंवा पाठीमागें हालणें अशक्य केलें होतें. अशी स्थिति असतांहि झाडावर चढून सर्व प्रांताचें निरीक्षण करणाऱ्या इष्टुर फाकड्यास टिपून गोळी घालण्या-पलीकडे मराठी सैन्यानें विशेष मर्दुमकी केलेली दिसत नाहीं. इंग्रजांच्या ऐवजीं त्या जागीं अत्यंत शूर व जिवावर उदार झालेले निवडक मुसलमान जर असते तर त्यांची मराठ्यांनीं लांडगेतोड करून आंतडीन आंतडीं बाहेर काढलीं असतीं. पण इंग्रजांशीं लगट करण्यासच जो तो भिई! हा आगीचा पुतळा आहे व चुकून जरी याचर पाय पडला तरी तो भाजल्याशिवाय रहाणार नाहीं, असें ज्याच्या त्याच्या मनानें घेतलेलें! अशी स्थिति असल्यामुळें मुंबईच्या बाजूस इंग्रजांचा नायनाट होण्याची जी वेळ त्यावेळीं इंग्रजांना विशेष प्रतिकूल नाहीं असा सालप्याचा तह इंग्रजांशीं मराठ्यांनीं केला. एवढे शूर अफगाण कीं ज्यांच्यीं बायकामुलेंहि परकी सैन्यावर कोयता चालविण्यास मागेंपुढें पहात नाहींत, पण त्यांची स्थिति काबूल–कंदहार मुक्कामीं काय झाली? हल्लींचे लॉर्ड रॉबर्टस् पण त्यावेळचे कर्नल रॉबर्टस् यांनीं थोड्या सैन्यानिशीं काबूल शहर घेऊन अमीरसाहेबांस आपल्या कह्यांत घेतल्यावर काबूलचे आसपास अम्मल बसविण्याचा प्रारंभ केला. पण अफगाणी पठाणांचा देशाभिमान जागृत असल्यामुळें पन्नास साठ हजार पठाणांनीं

अकस्मात् चोहोंबाजूंनीं येऊन मूठभर इंग्रजी सैन्यास वेढून टाकिलें. कर्नल हॅना यांच्या म्हणण्याप्रमाणें कर्नल रॉबर्टस् यांनीं लष्करी धोरणाच्या व डावपेंचाच्या बऱ्याच चुका त्यावेळीं केल्या, व सर्व कांहीं गोष्टी पठाणांना अनुकूल होत्या. शौर्य, देशाभिमान, पंचवीस तीस पटीनें अधिक संख्या, दरीखोरीं नदीनाला झाडझुडूप ह्या सर्वांचें उत्तम ज्ञान, पण बिचारे इंग्रजांच्या जवळच जाईनात ! लांबून लांबून गुरकावण्या दाखविण्यांतच त्यांनीं कालक्षेप केला ! हे सर्व नशीबाचे खेळ झाले असें कर्नल हॅना मानतात; पण हे नशीबाचे खेळ नसून बंदुकीचे खेळ आहेत, असें आम्ही समजतों. अबदुल-रहिमान याच्या धोरणी राज्यव्यवस्थेखालीं अमीराच्या सैन्याच्या हातांतच नव्हे तर सरहद्दीवरील पठाणांच्याहि हातांत, दुय्यम दर्जाच्या का होईना, काडतुसाच्या बंदुकी पडल्यामुळें, लॉर्ड एल्जिनसाहेबांचे कारकीर्दीत टिऱ्हा प्रांतावरील स्वारीचे वेळीं इंग्रजी सैन्यास पठाणांनीं कसें मागें परतवून लाविलें, हें पाहिलें म्हणजे बंदुकीची लढाई व तलवारीची लढाई यांतील अंतर वाचकांचे ध्यानांत येईल. मोठमोठ्या शिस्तवार लढाया जिंकण्यास कवाइतीची जरुरी आहे, पण गनिमी काव्याच्या लढाईस केवळ बंदूक असली म्हणजे बस्स; कवाईतीची तितकी जरूर नाहीं, हें आफ्रिडिज लोकांनीं व बोअर लोकांनीं सिद्ध केलें आहे. असो; हिंदुस्थानांतील इंग्रजी साम्राज्य हें आफ्रिडीज लोक म्हणतात त्याप्रमाणें बंदुकीच्या नळींत बसलेल्या अल्लानें इंग्रजांस दिलेलें बक्षीस होय, हें वरील विवेचनावरून वाचकांस समजणारें आहे. इंग्रजांचें सामर्थ्य कशांत आहे, त्यांच्याजवळील अमृताची कुपी कोठें दडवून ठेवलेली आहे, याची बरोबर कल्पना झाल्याशिवाय गनिमी काव्यानें बोअर लोकांनी मिळविलेल्या यशाचें मर्म वाचकांचे ध्यानांत येणारें नसल्यामुळें हा लेख मध्येंच लिहावा लागला. पुढील खेपेस बंदुकीची लढाई असो वा तलवारीची लढाई असो, दोन्ही लढायांस सारख्याच लागू पडणाऱ्या गनिमी काव्याच्या तत्त्वांचा ऊहापोह करणार आहों.

---

# * गनिमी काव्याची लढाई

## नंबर ५

लष्करी धोरण, लढाईचे डावपेंच आणि बंदुक व कवाईत यांची महति यासंबंधाचे सामान्य विचार येथपर्यंत वाचकांपुढें मांडण्यांत आले. हीं सामान्य तत्त्वें गनिमी काव्याच्या लढाईसहि पूर्णपणें लागू आहेत; किंबहुना गनिमी काव्याच्या पद्धतीनें लढाई चालली असतां दुर्बल पक्षास युद्धकलेच्या प्रधान तत्त्वांचा जितका वारंवार व क्षणोक्षणीं उपयोग करावा लागतो, तितका उपयोग इतर ठिकाणीं क्वचितच केलेला दृष्टीस पडतो. गनिमी काव्याची लढाई असो किंवा इतर कोणत्याहि तऱ्हेची लढाई असो, शिपायांच्या हातांतील मुख्य शस्त्र जर दोहों पक्षांकडील सारखें नसेल, निदान एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाचें शस्त्र वाजवीहून फारच अधिक उपयुक्ततेचें असेल, तर शस्त्रासंबंधानें ज्या पक्षाची हीन स्थिति त्या पक्षाकडे अपजय असा ठोकळ नियम समजावा. अवजड व पल्लेदार तोफा नसल्या तरी चालतील, डायनामाइटादि अस्त्रांचें पूर्ण सहाय्य नसलें तरी चालेल, लढाऊ आगगाडया नसल्या तरी हरकत नाहीं, हातांतील बंदुक अगदींच पहिल्या प्रतीची नसली तरी अडणार नाहीं, पण दोहों पक्षांच्या हातांतील बंदुकींमध्यें पल्लयाच्या मानानें व जलद उडण्याच्या मानानें विलक्षण फरक उपयोगाचा नाहीं. बोअर युद्धामध्यें हा जर फरक असता तर प्रारंभींच्या व्यवस्थित झालेल्या लढायांमध्यें बोअर लोकांना मिळालेले जय एका बाजूस राहूं द्याच; पण पुढील अव्यवस्थित ऊर्फ गनिमी काव्याच्या लढाइतहि त्यांना मिळालें तशा प्रकारचें यश खात्रीनें मिळालें नसतें. गनिमी काव्याचे युद्धांत मोठ्या

---

* केसरी, १५ जुलै १९०२

प्रमाणावर लढाई खेळावयाची नसली तरी लहानसहान लढाया व मोठ-मोठया चकमकी यांचे प्रसंग वारंवार यावयाचेच. जेथें एका बाजूस तलवारी, भाले किंवा हलक्या दर्जाच्या बंदुका व दुसऱ्या बाजूस अत्यंत जलदी बार काढणाऱ्या व लांब पल्लयाच्या बंदुका असतील त्या ठिकाणीं लष्करी धोरण, लष्करी डावपेंच, शौर्य, धैर्य इ. संबंधानें कितीहि अप्रतिम गुण दाखविण्यांत आले, तरी रणांगणावर होणाऱ्या थोडक्याशा चकमकींतहि गोळ्यांच्या वर्षावाखालीं वरील सर्व गुण असून नसून सारखे ठरल्यावांचून रहावयाचें नाहीं. दोहोंकडील व्यक्तींच्या हातांतील शस्त्र सामान्यपणें फारच विशेष फरकाचें असतां कामा नये, हा प्रथम सिद्धांत सर्व प्रकारच्या व सर्व तऱ्हेच्या युद्धांत प्रधानभूत आहे. काळविटाचीं तीक्ष्ण शिंगें, रानडुकराची मुसंडी, हत्तीचें बळ व कोल्ह्याची लुच्चेगिरी हीं सर्व जरी एकजागीं गोळा झालीं, तरी वनराजाच्या तीव्र नखाग्रापुढें त्यांच्यानें क्षणभरहि टिकाव धरवणार नाहीं; निदान थोडका वेळ तरी जशास तसें करण्याचें सामर्थ्य असल्याशिवाय इतर सर्व गमजा व्यर्थ होत. गनिमी काव्याच्या लढाईच्या बुडाशीं असलेल्या तत्त्वाकडे पाहिलें म्हणजे आमच्या वरील विधानाचा प्रत्यय आल्यावांचून रहाणार नाहीं.

गनिमी काव्याच्या नांवानें हिंदुस्थानचे इतिहासांत प्रसिद्ध असलेल्या लढाईचे पद्धतीस इंग्रजींत ग्युरिला वॉरफेअर (Guerilla warfare) असें म्हणतात. ग्युरिला याच्या मूळ अर्थाकडे जर पाहिलें तर वॉर, क्वारल इत्यादि तंटावाचक किंवा लढाईवाचक शब्दांच्या मुळाशीं व ग्युरीला यांच्या मुळाशीं एकच शब्द आहे असें दिसून येईल. क्वेरिल, क्वारल, ग्युरिल, क्वार, वॉर अशी शब्द-परंपरा असून सर्वांचा अर्थ तंटा किंवा झगडा असा आहे. ग्युरिला या शब्दांतील शेवटचा प्रत्यय इला (Illa) हा अल्पार्थी असून त्याचा अर्थ 'छोटी लढाई' असा होतो. हा शब्द मूळचा स्पानिश भाषेंतला

आहे व युरोपियन लोकांना गनिमी काव्याच्या लढाईची ओळख प्रथम स्पेन देशानेंच दिली. हिंदुस्थानांत महाराष्ट्रानें जें कार्य बजावलें आहे तें कार्य युरोपखंडाचे इतिहासांत स्पेन देशांतील डोंगराळ प्रांतांनीं निरनिराळ्या प्रसंगीं बरेच वेळा बजावलेलें दृष्टीस पडतें. स्पॅनिश लोक ज्या पद्धतीच्या लढाईला टोलेजंग लढाईची तयारी असें म्हणत नाहींत, तर सामान्य तऱ्हेची व तयारीची लढाई असें म्हणतात ती लढाईची पद्धत व गनिमी काव्याची पद्धत एकच होय. इंग्रजींतील ह्या नावाकडे पाहिलें असतां कोणासहि ज्याप्रमाणें सहज सांगतां येईल कीं, स्पेन देशामध्यें स्पॅनिश लोकांनीं या पद्धतीचे धडे सर्व युरोप खंडास घालून दिले, त्याप्रमाणें 'गनिमी कावा' या शब्दाकडे पाहिलें असतांहि हिंदुस्थानांत या पद्धतीचा उगम कोणापासून झाला हेंहि सहज सांगता येईल. गनिमी कावा हें मुसलमानांनीं दिलेलें नांव आहे. याचा अर्थ शत्रूचा डावपेंच असा होतो. अवरंगजेबाचे कारकीर्दीचे व तदनंतर गनिम, शत्रु व मराठे हे शब्द एकाच अर्थी वापरण्यांत येत असल्यामुळें मराठी काव्याची लढाई असें म्हणण्याच्या ऐवजीं सर्व हिंदुस्थानभर गनिमी काव्याची लढाई असें म्हणण्याचा प्रघात पडला, व मराठ्यांच्या इतिहासांतूनहि तोच शब्द वापरण्यांत आल्यामुळें मराठी भाषेंत त्याचीच प्रवृत्ति झाली.

गनिमी काव्याच्या लढाईच्या उदाहरणाकडे वळण्यापूर्वी या पद्धतीचीं सामान्य तत्त्वें येथें नमूद करणें जरूर आहे. टोलेजंग लष्करानें व्यवस्थित रीतीनें आपल्या साम्राज्याच्या सर्व सामर्थ्यासह एखादा देश पादाक्रांत केल्यानंतर गनिमी काव्याच्या लढाईस सुरवात होते. तेव्हां अर्थात् या लढाईची रणभूमि म्हटली म्हणजे शत्रूनें पादाक्रांत केलेला सर्व प्रदेश व आजूबाजूचे प्रांत ही होय. लष्करी धोरणांतील एक महत्त्वाचा नियम असा मानण्यांत आला आहे कीं, होतां होईल तों रणभूमि दुसऱ्याचे प्रदेशांत

आ।४।६८
८७३०५

नेऊन टाकावी. ह्या नियमाचा फायदा दुर्बल पक्षास गनिमी काव्याच्या लढाईत पूर्णपणें मिळतो. कारण, शत्रूनें देश पादाक्रांत केला असल्यामुळें स्वतःचा देश बचावण्याची किंवा तेथील मुख्य मुख्य नाकीं ताब्यांत धरण्याची जरुरी, लाज किंवा भीति दुर्बल पक्षास मुळींच रहात नाहीं. शत्रूनें देश पादाक्रांत केला असल्यामुळें लष्कराचीं ठाणीं संभाळणें, नवीन स्थापलेल्या किंवा जुन्या जिंकलेल्या राजधान्यांचें संरक्षण करणें, सुरक्षितपणाची व व्यवस्थित स्वरूपाची नवीन राज्यव्यवस्था अमलांत आली आहे असें सर्वांचे प्रत्ययास आणून देऊन आपला अंमल दृढतर करण्याचा प्रयत्न करणें, लष्कराच्या ठिकठिकाणच्या छावण्या व राज्यव्यवस्थेचीं निरनिराळीं केंद्रे यामधील दळणवळणाचे मार्ग निर्भय ठेवणें आणि नवीन जिंकलेला प्रदेश व स्वतःचें मूळचें राष्ट्र यांमधील रहदारीचे मार्ग विरुद्ध पक्षाच्या ताब्यांत न जातील अशी खबरदारी घेणें हीं सर्व जबाबदारीचीं कामें विरुद्ध पक्षास करावीं लागतात. ह्यामुळें दुर्बल पक्षास रणभूमि व रणभूमीचा पाया या संबंधाचीं कर्तव्यें फारच कमी करावयाचीं असतात. चार लोकांचें सहाय्य मिळून जेथें एखादी टोळी उत्पन्न होते तो प्रांत त्या टोळीचा रणभूमीचा पाया असतो, व पराभव न होतां किंवा अजीबात नायनाट होण्याचा प्रसंग न येतां बलिष्ट पक्षास त्रास देण्याकरितां जेवढ्या प्रांतांत म्हणून त्यांना संचार करवेल तेवढी त्या टोळीची रणभूमि असते. ही टोळी एका भागांतून दुसऱ्या भागांत गेली असतां तिचा रणभूमीचा पाया बदलतो. कारण, प्रत्येक ठिकाणीं खाण्यापिण्याचे पदार्थ व शक्य तेवढी दारूगोळ्याची किंवा शस्त्रास्त्रांची मदत तिला मिळत असते. लांबलांबच्या व दूरदूरच्या बातम्या आणणारे हेर या टोळीस लागत नाहींत. कारण तें काम वर निर्दिष्ट केलेल्या रसीदीच्या कर्तव्याबरोबरच्च अखिल जनपदानें करावयाचें असतें. पादाक्रांत करणाऱ्या शत्रूचें केवढेंहि अवाढव्य सैन्य असलें तरी सर्व प्रदेश व्यापून

टाकणें या सैन्यास शक्य नसल्यामुळें वरील प्रकारच्या टोळीचा उगम अर्थात् शत्रूच्या लष्कराच्या छावणीपासून बऱ्याच अंतरावर झालेला असतो. फाजील युद्धसामग्रीचा सांठा कोठेंना कोठें ठेवणें भाग पडतें; व अशाकरितां एखादा डोंगर, एखादें जंगल किंवा एखादें तटबंदीचें स्थान यापैकीं एखाद्याची तरी असल्या टोळीस मदत असणें जरूर पडतें. ओढ्याचे कांठीं गेलें असतां टिटवी ज्याप्रमाणें आपल्या घरट्यापासून दूर जाऊन प्रवाशास भलत्याच ठिकाणी तिचें घरटें आहे असें मानावयास लावते, त्याप्रमाणें या टोळीसहि खजिना किंवा दारूगोळा पुरून ठेवावयाची किंवा गुप्त राखावयाची आपली जागा इतस्ततः संचार करणाऱ्या शत्रूच्या लष्करच्या कामगारास न समजेल अशा रीतीनें त्यांना हुलकावण्या दाखवाव्या लागतात. एखादे वेळीं असा प्रसंग येतो कीं, शत्रूच्या लष्करानें एखादी नाक्याची जागा अवचित पकडल्यामुळें तेथील टोळीस दूरवर पलायन करावें लागतें. अर्थात् तिला पुढें आपल्या गुप्त सांठ्याचा उपयोग होण्याचा संभव नसतो. परंतु तो सांठा व्यर्थ जात नाहीं. कारण ही टोळी ज्याप्रमाणें एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत हुसकून लावल्यामुळें गेलेली असते त्याप्रमाणें दुसरीहि एखादी टोळी लांब दूरच्या ठिकाणाहून निघून शत्रूनें हें ठिकाण निर्वीर्य समजून सोडल्याबरोबर त्या ठिकाणीं येऊन बसते व पूर्वीचा सांठा तिला उपयोगी पडतो. मात्र या सर्व कृत्यास स्थानिक लोकांची शक्य तितकी मदत असणें जरूर आहे. गनिमी काव्याची लढाई ही एका सैन्याची दुसऱ्या सैन्याशीं लढाई नसून विजयी झालेल्या राष्ट्राच्या सैन्याशीं पराभूत झालेल्या राष्ट्रांतील लोकांची ही लढाई आहे. पादाक्रांत करणाऱ्या शत्रूच्या सैन्यास एका अर्थानें सर्व जनपदाशीं लढावें लागतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. सर्व लोक याचा अर्थ खरोखर सर्व लोक असतात असा मात्र कोणी घेऊं नये. जिंकणाऱ्या लोकांच्या कच्छपी लागून त्यांचेंच कल्याण सदासर्वकाळ

चिंतणारे कांहीं लोक सर्व राष्ट्रांत असावयाचेच. तथापि सामान्यतः लोकांचा कल लढणाऱ्या स्वदेशबांधवांच्या विरुद्ध असतां कामा नये इतकेंच नव्हे, तर तत्काळ शिक्षा ज्यावेळीं होणें शक्य नाहीं अशा सर्व प्रसंगीं आपल्या पैशानें, बुद्धिसामर्थ्यानें व अंगमेहनतीनें लढणाऱ्या देशबांधवांस मदत देण्यास लोक तयार असले पाहिजेत. अशा रीतीनें मदत केल्याबद्दल तत्काळ शिक्षा होण्याचा जेथें संभव असेल किंवा शत्रूचें लष्कर त्या ठिकाणीं प्राप्त झालें असतां स्वदेशबांधवांस मदत केलेल्याची खूण ज्या ठिकाणीं नाहींशी करणें अशक्य असेल त्या ठिकाणीं स्वतः लढण्यास तयार न होणाऱ्या लोकांनीं लढणाऱ्या देशबांधवांस मदत न केली तरी चालेल. पण इतर सर्व प्रसंगीं 'गांव तेथें म्हारवडा' या न्यायानें कांहीं थोडके अत्यंत स्वार्थसाधू व देशद्रोही लोक शिवाय करून बाकीचे लोक सामान्यतः कमीजास्ती प्रमाणानें आपला तरुण मुलगा लढवय्यांत सामील झाल्याबद्दल, आपलें धनधान्य लढणाऱ्यांच्या उपयोगी पडल्याबद्दल, व स्थानावर कायम राहिल्यामुळें आपणास मिळालेली माहिती व सुचलेले विचार लढणारांच्या कार्यी लागल्याबद्दल समाधान मानणारेच असले पाहिजेत. निदानपक्षी या सर्वांचा शत्रूस उपयोग किमपीहि न होईल असा बंदोबस्त ठेवण्यांत तत्पर जनपद असल्याशिवाय गनिमी काव्याची लढाई चालणेंच शक्य नाहीं. बातम्या पोहोंचविणें, सामग्रीची मदत करणें व लढणाऱ्या देशबांधवांना मिळणाऱ्या जयाच्या वाढत्या कलेबरोबर ताज्या रक्ताच्या तरुणांची या लढवय्यांत भर घालणें हीं कामें सामान्य जनपदास व्यक्तिशः करावीं लागतात. एकानें दुसऱ्याची वाट पहाण्याची किंवा सर्वांनीं केलें तर आपण करूं असें म्हणण्याची ही वेळ नसते. थोडक्यांत बोलायचें म्हणजे लष्करी धोरण (Strategy) या सदराखालीं ज्या कर्तव्यांचें विवेचन करण्यांत आलें तीं सर्व कर्तव्यें वेळ प्रसंग पाहून जनपदाला व्यक्तिशः हरएक

प्रसंगीं करावीं लागतात. राष्ट्रांत देशाभिमान, एकप्रकारची बुद्धिमत्ता व संकटें सोसणारी सहनशीलता, हीं असल्याशिवाय वरील कार्यें घडून येत नाहींत. असो; वर वर्णन केल्याप्रमाणें पादाक्रांत केलेल्या राष्ट्रांत चोहोंकडे लहान लहान टोळया नवीन उत्पन्न झाल्यामुळें म्हणा किंवा पूर्वीचें सैन्य चोहोंकडे पांगून त्याच्या टोळया बनल्यामुळें म्हणा, सर्व राष्ट्रभर लहान लहान रणभूमि व त्यांचे पाये हीं उत्पन्न होतात. असल्या रणभूमी व त्यांचे पाये उत्पन्न करणाऱ्या टोळयांमध्यें चिरस्थायीपणा मुळींच नसल्यामुळें व त्यांचें अस्तित्व शत्रूस चुकवून पळण्यावरच अवलंबून असल्यामुळें दूरवरून पहाणारास हीं सर्व चक्रारूढ झालेलीं दिसतात. आज येथें तर उद्यां तेथें अशी रणभूमि बदलत गेल्यामुळें शत्रूचें लष्कर भांबावून जाऊन प्रत्येक टोळीस रणभूमि बदलावयाचे वेळीं बदललेल्या प्रांतांत प्रारंभीं कांहीं वेळ तरी शत्रूवर एक प्रकारचें वर्चस्व मिळतें. बदललेल्या रणभूमींत वर्चस्वाच्या या प्रारंभीचे काळीं शत्रूच्या लहानसान ठाण्यांचा विध्वंस करावयास सांपडतो. आगगाडी किंवा दुसरें कोणतेहि दळणवळणाचे मार्ग बंद करावयास मिळतात व त्या भागांतून जात असलेली शत्रूची रसीद लुटावयास मिळून दारूगोळा, अन्नसामग्री यांचा पुरवठा करावयास सांपडतो. नांवाजलेला व चपल सेनापति असल्यास स्वजनांची मदत न घेतां शत्रूच्या अन्नपाण्यावर सदोदित चरण्याची व रहाण्याची व्यवस्था करण्यास तो चुकत नाहीं. अशा रीतीनें या नवीन रणभूमींत कांहीं दिवस धुमाकूळ मांडल्यावर शत्रूचें अवजड लटांवर येऊन पोंचतें न पोंचतें तों यांनीं रणभूमि बदलण्यास आरंभ केलाच म्हणून समजावें. आंधळ्या कोशिंबिरींतील पाठशिवणीच्या डावाची ही थोरली नक्कल आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. लष्कराच्या अवाढव्य स्वरूपामुळें व अवजड सामानामुळें शत्रु एकप्रकारें आंधळा झालेला असतो व सुटसुटीत घोडेस्वारांच्या टोळयांस डोळशा खेळगड्याप्रमाणें या आंधळयास

लीलेनें झुकांडी देऊन दूर कोपऱ्यांत जाऊन आसमंतात् भागीं सर्व हातपाय पसरून आंधळ्याच्या चेष्टा करण्यास उलट सवड मिळते. अशा रीतीनें वाटोळें गरगर फिरत असतां शत्रूशीं भिडण्याचे त्यांना कांहीं प्रसंग येतात:—( १ ) रणभूमि बदलावयाचे वेळीं शत्रूनें फाजील लगट केली असतां जरा वाटेंत थबकून शत्रूस टोला मारणें जरूर पडतें. ( २ ) शत्रूनें अवचित गांठलें असतां पळून जाण्यास संधी मिळेतोंपर्यंत रणांगणावर हट्टानें उभें रहावें लागतें. ( ३ ) योग्य दिशेनें रणभूमि बदलण्याकरितां शत्रूस चुकवून पण शत्रूस चाटून जावें लागतें. ( ४ ) बदललेल्या रणभूमींतील शत्रूच्या लहानसान ठाण्यावर हल्ला करावा लागतो. ( ५ ) रसीद लुटण्याचा प्रयत्न करणें, हें तर मुख्य कर्तव्य आहे. या व इतर कारणांनीं शत्रूशीं या लहान लहान टोळयांना मोठमोठ्या चकमकी किंवा लहान लहान लढाया करणें भाग पडतें. अशा वेळीं या टोळयांनीं अंगिकारावयाचे डावपेच ( Tactics ) सामान्यतः फार महत्त्वाचे नसतात. डोंगर, किल्ला, जंगल यांचा आश्रा घेतल्याशिवाय होतां होईल तों पळतांना वाटेंत थांबावयाचें नाहीं, व तोंड फिरवून शत्रूवर उलटून पडावयाचें नाहीं, ठाण्यावर हल्ला करितांना, रसीद लुटतांना, किंवा पळतां पळतां थांबवून शत्रूस दम देतांना जे कांहीं दोन हात करावयाचे ते छाप्याच्या स्वरूपाचे असावे लागतात. अवचित, एकदम, अत्यंत वेगानें, निकरानें व फार थोडका वेळ हल्ला चढवावयाचा, व या धडकीसरशी कार्यभाग झाला तर बरें, नाहीं तर आल्या मार्गानें सुरक्षितपणें परत पाऊल घ्यावयाचें. अत्यंत चपलतेची धडकी किंवा मुसंडी हाच कायतो ह्या डावपेंचाचा मुख्य भाग आहे. जेथें शत्रूच्या हातांतील हत्यारें आपल्याहून फार वरिष्ठ प्रतीचीं असतात तेथें अशा प्रकारची मुसंडी दीपपतंगन्यायानें आत्मनाशास कारणीभूत होते, हें सांगावयास नकोच; व अशा प्रकारच्या मुसंडीनें शत्रूच्या पदरीं लहानसान पराभव व रसीदीची

पूर्ण नुकसानी हीं जर घालतां आलीं नाहींत तर गनिमी काव्याच्या लढाईतील सर्व स्वारस्य नाहींसें होऊन शत्रूस सतावून सतावून नरम करण्याचा प्रयत्न निष्फळ होतो, हें उघड आहे. एवढ्याकरितां अवचित गांठून विजलीप्रमाणें अंगावर तुटून पडण्यास शत्रूच्या हत्याराच्या तोलाचें हत्यार या टोळ्यांच्या हातांत असलें पाहिजे; नाहींतर त्यांनीं वारंवार बदललेल्या रणभूमींत त्यांची चपलाई, त्यांचें धैर्य, त्यांचा आवेश, हीं सर्व वरिष्ठ प्रकारच्या हत्यारांपुढें निरुपयोगी ठरून भणभण रिकामे फिरल्याचें श्रेय मात्र पदरांत यावयाचें. लहान लहान ठाण्यांचा पराभव करून रसीद मारणें हीं अखेरची मात करण्याचीं साधनें आहेत. कारण या योगें शत्रु खालावत जाऊन प्रत्येक टोळी फुगत जाते व शेवटीं सर्व टोळ्या एका जागीं जुळणें शक्य झाल्यावर दमांत खडलेल्या शत्रूस त्या डोईजड होतात. एकंदरीनें आश्रा घेण्यास व शत्रूस चुकवून पळण्यास योग्य असा डोंगराळ प्रदेश, शत्रूशीं लपंडाव करून स्वजनास मदत करण्यास उत्सुक असलेला जनपद, देशाभिमानी, शूर व चपल असे लढवय्ये व क्षणोक्षणीं लढाईचें धोरण बदलणारे व प्रसंगीं योग्य अशा डावपेचांनीं शत्रूस जेरीस आणणारे सेनापति, या सर्वांचें योग्य संमेलन झालें असतां गनिमी काव्याच्या लढाईस तेजी येते. महाराष्ट्राचे किंवा बोअर लोकांचे इतिहासाकडे पाहिलें असतां वरील विवेचन वाचकांचे चांगलें ध्यानांत येईल; पण या रम्य व सुंदर भागाकडे वळण्यापूर्वीं स्पेन, स्वित्सरलंड, हालंड, मेक्सिको, फिलिपाइन्स, वगैरे ठिकाणच्या गनिमी काव्याच्या युद्धाकडे पुढील अंकीं वाचकांचें लक्ष वेधण्याचा आमचा विचार आहे.

---

# * गनिमी काव्याची लढाई

## नंबर ६

१८०६–७ सालचे सुमारास नेपोलियन फ्रान्स देशाचाच बादशहा होता असें नव्हे, तर सर्व युरोपखंडभर तो म्हणेल त्या शब्दाला पूर्णपणें मान मिळत असे. समुद्रवलयांकित चिमुकल्या इंग्लंडावर मात्र त्याचा शह बरोबर लागला नव्हता व याकरितां त्याची एकसारखी धडपड चालली होती. इंग्लंडांत तयार झालेला माल युरोपांत कोठेंहि कोणीहि घेऊं नये अशी त्यानें सक्त द्वाही फिरविली होती. यामुळें नेपोलियनचा नक्षा कमी करण्याकरितां इंग्लंडनें जारीनें प्रयत्न चालविले होते. पण नेपोलियनच्या तेजानें दिपून गेल्यामुळें इंग्लंडास युरोपखंडांत कोठेंच आसरा मिळेना. पोर्तुगालनें मात्र इंग्लंडच्या बाजूनें जरा हालचाल केली व स्पेनचाहि तसाच कल दिसून आला. कोणत्याना कोणत्या तरी युरोपिअन देशांत उतरून त्या देशाच्या साह्यानें फ्रान्सच्या सीमेपर्यंत जाऊन नेपोलियनास शह द्यावयाचा हें इंग्लंडचें त्यावेळचें लष्करी धोरण होतें. स्पेन व पोर्तुगाल यांच्यामार्फत ह्या गोष्टी इंग्लंडास साध्य करून घेतां येतील अशी भीति फ्रान्सला चवदाव्या लुईपासून होती. नेपोलियनच्याहि हें धोरण पूर्णपणें ध्यानांत होतें. तेव्हां स्पेन व पोर्तुगाल यांचा वरील प्रकारचा कल दृष्टीस पडतांच, स्पेनचा दुबळा राजा चौथा चार्लस, त्याचा विषयी पण आवेशी मुलगा फरडिनंड, महत्वाकांक्षी पण रंगेल स्पेनची राणी व तिचा हुजऱ्याच्या जागेपासून मुख्य प्रधानाच्या जागेपर्यंत चढविलेला प्रेमी गोडाय, या सर्वांतील आपापसांतील कलहाच्या योगामुळें कोणास फसवून तर कोणास भूलथाप देऊन व कोणाचा

---

* केसरी, ता. २२ जुलै १९०२.

विश्वासघात करून लाख दोन लाख सैन्य एकदम राजधानीवर उतरवून नेपोलियननें सर्व राजघराण्यास एकदम हद्दपार करून दिलें, व आपला बंधु जोसेफ यास स्पेनची बादशाही अर्पण केली ! स्पेनची राजधानी माद्रिद येथें व महत्त्वाच्या किल्लयांच्या व लष्करी धोरणाच्या नाक्यांच्या ठिकाणीं मिळून यावेळीं नेपोलियनचें दीड लाख सैन्य स्पेनमध्यें होतें. फ्रान्समध्यें ५।६ लाख सैन्य १५ वर्षांच्या लढाईनें चांगलें कसलेलें व अव्याहत मिळालेल्या विजयश्रीनें लष्करी बाण्यांत पूर्ण मुरलेलें नेपोलियनच्या नोकरीस हजर होतें. नेपोलियनच्या स्वतःच्या नांवाचा महिमा युरोपखंडांत यावेळीं इतका प्रचंड झाला होता कीं, गादीवर बसविणें किंवा गादीवरून काढून टाकणें असलें चमत्कार त्याला केवळ शब्दमात्रेंकरून करितां येऊं लागले होते ! स्पेन व पोर्तुगाल अशा रीतीनें बळकावून त्या मार्गानें फ्रान्सला शह देण्याची इंग्लंडची आशा खुंटल्यामुळें इंग्लंड थंडगार पडलें, व परमेश्वरावर हवाला ठेवून नेपोलियन उद्यां काय करतो, या भीतीनें गांगरून तें गेलें.

अशा रीतीनें नेपोलियनचा चोहोंकडे जयजयकार चालला असतां व त्याच्या शत्रूंचीं अंतःकरणें भीतीनें गांगरून गेलीं असतां स्पेन देशाच्या प्रजाजनांनीं स्वतःच्या हिंमतीवर व इतर दुसऱ्या कोणाचीहि प्रारंभीं मदत न घेतां गनिमी काव्याच्या लढाईस आरंभ करून नेपोलियनच्या दराऱ्यानें भिऊन गेलेल्या सर्व युरोपियन राष्ट्रांना पुन्हां शुद्धीवर आणलें. त्यांची राजधानी गेलेली, मुख्य किल्ले फ्रेंच लोकांच्या हातांत राहिलेले, फ्रेंच सैन्यानें सर्व महत्त्वाच्या जागीं व नाक्यांच्या जागीं छावणी दिलेली, व नेपोलियनचा भाऊ जोसेफ याच्या राज्याभिषेकाचे सोहाळे त्यांच्या राजधानींत सुरू असलेले व नेपोलियनपुढें कोणीहि केव्हांहि टिकाव धरणार नाहीं अशी सर्वत्र समजूत झालेली; अशा वेळीं स्पेनच्या प्रजाजनांनीं गेल्या अंकीं वर्णन केलेल्या पद्धतीप्रमाणें प्रांतानिहाय लहानलहान टोळ्या करून नेपोलियनशीं गनिमी काव्यानें

लढण्यास प्रारंभ केला व नेपोलियनच्या चढत्या कमानीस उतरती कला आगली. युरोपखंडाच्या त्या वेळच्या इतिहासांत 'पेनिनशुलर वॉर' म्हणजे स्पेन व पोर्तुगाल ह्या द्वीपकल्पांतील लढाई ही अत्यंत महत्त्वाची असून इंग्लंडच्या व आपल्या सामन्यामध्यें हें द्वीपकल्प रणभूमि (theatre of war) होऊं नये म्हणून नेपोलियनला जी पहिल्यापासून भीति वाटत होती तेंच मरण शेवटीं त्याच्या कपाळीं आलें. स्पेनच्या प्रजाजनांनीं सुरू केलेल्या या गनिमी काव्याच्या लढाईपासून नेपोलियनच्या नशिबानें उलट खाल्ली असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्पेन देशच असा आहे कीं, त्या देशाच्या डोंगराळ दऱ्याखोऱ्यांत जगास थक्क करणारे वीरपुरुष निपजले आहेत व युरोपखंडाच्या इतिहासांत आपलें नांव चिरस्मरणीय करणाऱ्या सेनापतींनीं महत्त्वाच्या जयापजयाच्या उलाढाली स्पेन देशच्या पर्वताचे उतरणीवर केलेल्या आहेत. डोंगराळ प्रदेश, व लोकहि साहसी, शूर व पूर्ण स्वाभिमानी असून धर्मगुरूंच्या मताप्रमाणें वागणारे होते. नेपोलियनचा भाऊ जोसेफ यानें आपल्या स्पर्शानें स्पेन देशची गादी भ्रष्ट केलेली पाहून त्यांचा स्वाभिमान त्यांना क्षणभरहि स्वस्थ बसूं देईना. रोम व कार्थेजच्या प्राचीन इतिहासांतील सर्वांत प्रख्यात सेनापति हानिबाल यानें स्पेन देशच्या याच दऱ्याखोऱ्यांत प्रथम आपली लष्करी बुद्धिमत्ता प्रकट केली होती. सिपीओ आफ्रिकेनस याचा आशांकुर याच ठिकाणीं प्रथम उद्भवला. पाँपीचें बुद्धिचापल्य, सीझरची कुशाग्रता हीं सर्व याच देशांत कसास लागलीं. खिश्चानिटी व मुसलमानी धर्म यांचा शेकडों वर्षेंपर्यंत याच डोंगराळ प्रदेशांत एकसारखा झगडा चालला होता; व शेवटीं याच दऱ्याखोऱ्यांतील लोकांनीं युरोपखंडभर पसरलेल्या मुसलमानांच्या लाटेची पूर्ण पिच्छेहाट केली. त्यानंतरच्या युरोपखंडाच्या अर्वाचीन इतिहासांतहि शार्लमेननें या देशाचे खिंडींत व घाटांत आपलें निशाण फडकावलें होतें. सर्व जगास दणाणून सोडणाऱ्या रॉन्सेवेल्सचा बिगल येथेंच

पुकारला गेला. याच देशचे संरक्षणार्थ ब्लॅकप्रिन्सचें शौर्य व गॉंझल्व्होचें चातुर्य हीं प्रकट झालीं; व शेवटीं याच देशचे प्रजाजनांनीं केवळ स्वतःच्या हिंमतीवर गमिनी काव्याच्या लढाईस आरंभ करून नेपोलियनचा नक्षा उतरून, वेलिंगटन् व नेपोलियन यांची पकड बसण्याची संधि आणून दिली. गनिमी काव्याची लढाई या देशचे लोकांना अंगवळणी पडलेली होती. त्यांच्या सैन्याचा पराभव होवो, राजधानीचें शहर शत्रूच्या हातीं जावो, त्यांचे किल्ले शत्रू घेवोत; रणांगणावर पराभूत झालेले लोक लहान लहान टोळ्या करून कोठेंना कोठें तरी जमावयाचेच, डोंगरांत दऱ्यांत लपून राहून शत्रूंना त्यांनीं त्रास द्यावयाचाच, मोठें सैन्य आलें कीं त्यांनीं पळून जावयाचेंच, पुन्हां शतशा तुकडया करून प्रत्येकानें इतरांचें कांहीं झालें असलें तरी स्वतःच्या हिमतीनें लढत रहावयाचेंच, जनपदेनें पूर्ण सहानुभूति दाखवावयाचीच, प्रसंगविशेषीं तटबंदीच्या एखाद्या गांवानें अलौलिक शौर्य व धैर्य दाखवून कित्येक महिने आपल्या तटाबाहेर शत्रूस लाळ घोटत बसावयास लावावयाचेंच, व अशा रीतीनें शत्रूची हैरात पेरोसान झाल्यावर आपली सलाबत वाढवून शत्रूस नतिया द्यावयाचाच—ही स्पेनची गनिमी काव्याची पद्धत फार पुरातन काळची होती. स्पेनचे राजे कित्येक बदलून गेले, राजघराणीं निरनिराळीं झालीं, साम्राज्यें जुनीं गेलीं, नवीं आलीं, धर्माचेंहि कित्येक वेळां रूपांतर झालें, पूर्वीच्या लोकांत भेसळ होऊन नवीन नवीन प्रजाजन या दऱ्याखोऱ्यांत राहूं लागले, तथापि तेथील स्थानमहात्म्यच असें कांहीं विचित्र आहे कीं, त्या देशावर तसाच विलक्षण प्रसंग आला असतां गनिमी काव्याच्या लढाईवरच शेवटीं पर्यवसान होतें. स्कीपिओ आणि सर्टोरिअस यांच्या वेळीं हीच स्थिति दिसून आली. मूर लोकांशीं ८०० वर्षेपर्यंत याच तऱ्हेचें युद्ध तेथील लोकांनीं चालविलें होतें. नेपोलियनच्या लढाईच्या वेळीं तोच प्रकार झाला व शेवटीं अमीर उमराव व सामान्यप्रतीचे लोक यांतील

तंट्यातहि गनिमी काव्याचाच आश्रय करणें जरूर पडलें. गनिमी काव्याच्या लढाईस एक तऱ्हेची देशाची रचनाच असावी लागते. डोंगर व नद्या यांचें प्राधान्य व सपाट मैदानाची कमताई अशी देशाची रचना असल्याशिवाय या लढाईस तेजी येत नाहीं. इतर देशांच्या इतिहासांतील गनिमी काव्याकडे पाहिलें तरी वरील तऱ्हेच्याच भूमिभागांत ह्या पद्धतीचें बीज चांगलें रुजलेलें दिसतें. असो. स्पेनची राजधानी माद्रिद येथें वर लिहिल्याप्रमाणें जोसेफच्या राज्याभिषेकाचे सोहाळे चालले असतां लोकांनीं गनिमी काव्याच्या बंडास सुरवात केली; व ६०—७० हजार सैन्य जमा करून निरनिराळया टोळया चोहोंकडे वावरूं लागल्या. नेपोलियनचें लाखों सैन्य चोहोंकडे पसरलें होतें, त्यांच्या व यांच्या झटापटी सुरू झाल्या. कांहींत नेपोलियनास यश मिळालें, कांहींत बंडखोरांना यश मिळालें. सारागोसा नांवाच्या लहानशा गांवाला दहा बारा हजार फ्रेंच सैन्यानें वेढा दिला. हें गांव मैदानावर असून तटबंदीहि लेचीपेचीच होती. पण गांवांतील बायकामुलांसुद्धां सर्व लोकांनीं अशा कांहीं निकरानें युद्ध केलें कीं, फ्रेंच लोक गांवांत शिरले असतां रस्त्यारस्त्यानें, आळीआळीनें, बोळाबोळानें, दारांतून, खिडक्यांतून, झरोक्यांतून, बायकामुलें—म्हातारींकोतारीं यांनीं अशा कांहीं निश्चयानें व शौर्यानें गोळीबार चालविला कीं, कित्येक आठवडे खर्च करून फ्रेंच लोकांनीं चार पांच वेळां चढविलेले हल्ले वायफळ झाले, व शेवटीं तीन हजार प्रजाजनांची कुमक गांवास येऊन पोंचल्यावर फ्रेंच लोकांस माघार घ्यावी लागली! सारागोसाच्या या उदाहरणानें प्रजाजनांच्या टोळया फारच फुगत चालल्या; व सर्व युरोपखंड खडबडून झोपेंतून जागें झाल्यासारखें होऊन प्रजाजनांच्या या युद्धाकडे कौतुकानें पाहूं लागलें. नेपोलियन बायोनी येथें होता व तो भाग फ्रेंच लोकांच्यातर्फेचा रणभूमीचा पाया असल्यासारखा होता. तेथून माद्रिद शहराचे दळणवळणाचे मार्ग बंद करण्याचा प्रयत्न यावेळीं प्रजाजनांच्या मोठमोठ्या टोळयांनीं केला.

निरनिराळ्या टोळ्या एका ठिकाणीं जुळून २६ हजार सैन्य बंडखोरांचें झालें होतें. एवढें मोठें सैन्य जमा झाल्यावर व्यवस्थितपणें डावपेचानें लढून शत्रूवर जय मिळविण्याची हिकमत बंडखोरांच्या सेनानायकामध्यें नसल्यामुळें १५ हजार सैन्यानिशीं नेपोलियनच्या एका सरदारानें या सर्व टोळ्यांचा पुरा पराभव केला व माद्रिदचा रस्ता पूर्णपणें मोकळा केला. ह्या पराभवामुळें बंडवाल्यांचा नक्षा जरा कमी झाला व नेपोलियनास बंडवाल्यांचा आपण पुरा मोड केला असें वाटलें. अशा प्रकारच्या मोठ्या अपजयानें लढणारांची रग कांहीं काळपर्यंत नाहींशी होते, ही गोष्ट खरी; पण गनिमी काव्यानें लढणारांना समूळ उपटून काढण्यास असले अपजय पुरेसे होत नाहींत. अशा रीतीनें पराभूत झालेल्या २६ हजार लोकांपैकीं निदान दहा बारा हजार लोक तरी दूर अंतरावर जाऊन थोडा विसावा घेऊन, लहान लहान टोळ्या करून पुन्हां आपल्या स्वदेशकार्याच्या भ्रमणास आरंभ करतात, व त्यांनीं कार्यारंभ पुन्हां केला म्हणजे भिऊन गेलेल्या प्रजाजनांनाहि सहानुभूति दाखवून पुन्हां मदत करण्यास जोर येतो. नेपोलियनास मिळालेल्या जयाचाहि वरीलप्रमाणेंच परिणाम झाला. बंडाची शांतता झाली असें समजून जोसेफ साहेबांनीं माद्रिद शहरांत आपलें प्रधानमण्डळ स्थापून कार्यकारी लोकांच्या नेमणुका करण्यास प्रारंभ केला; पण इतक्यांत स्पेन देशांतील उत्तरेच्या बाजूच्या रणभूमींत गनिमी काव्यानें अशी कांहीं मौज केली कीं, नेपोलियनच्या वरील जयावर पूर्ण विरजण पडलें. डयूपॉन नांवाचा नांवाजलेला एक फ्रेंच सेनापति उत्तरेस कार्डीज बंदरावर चाल करून जात होता. त्याला वाटेंत शेतकऱ्यांच्या लहान लहान टोळ्यांनीं बराच त्रास दिला; तथापि तो कार्डोव्हा या गांवीं पोंचला. तें गांव त्याच्या स्वाधीन झालें व त्याची लुटालूट करण्यांत बरेच दिवस त्या सैन्याचे गेले. या अवकाशांत आजूबाजूच्या प्रांतांतील सर्व टोळ्या कार्डोव्हा गांवाकडे आल्या व त्यांनीं फ्रेंच सैन्याच्या

पुढील रस्त्याचीं सर्व नाकीं ताब्यांत घेतलीं. पुढें जाणें अशक्य आहे, असें दिसून आल्यावर ड्यूपॉननें हळू हळू मागें सरण्यास आरंभ केला. फ्रेंच सैन्य मागें चाललेंसें पाहून स्पॅनिश जनरल कॅस्टॅनो यानें त्याचा पाठलाग सुरू केला. दुसऱ्या एका मोठ्या टोळीनें रेडिंग या सेनापतीचे हाताखालीं फ्रेंच सैन्यास कुमकेस येणाऱ्या सेनापतीचा पराभव करून ड्यूपॉन याच्या तोंडावर चाल केली. तीस हजार शेतकरी व २५।३० हजार शिपाई असे जमा होऊन फ्रेंच लोकांना चौतर्फा कोंडण्यांत आलें. कार्डोव्हा गांवच्या लुटीनें भरलेल्या शेंकडों गाड्या व आजारी पडलेल्या लोकांचें लटांबर बरोबर, आणि शत्रूनें चारी बाजूनीं वेढलेलें; अशा स्थितींत ड्यूपॉन सांपडल्यामुळें त्यास इकडे तिकडे फिरकायलाहि अवकाश सांपडला नाहीं, व शेवटीं ज्या वेळीं स्पॅनिश लोकांनीं हल्ला चढविला त्यावेळीं सामानाच्या गाड्या, लुटीच्या गाड्या, आजारी लोकांच्या गाड्या, ह्या सर्व अवजड कारखान्यामुळें असा कांहीं गोंधळ झाला कीं, वीस हजार सैन्यानिशीं शस्त्रास्त्रें खालीं ठेवून नांवाजलेला फ्रेंच सेनापति ड्यूपॉन यास शत्रूस शरण जाणें भाग पडलें ! स्पॅनिश लोकांना मिळालेल्या या जयाची वातमी विद्युल्लतेप्रमाणें चोहोंकडे पसरली. इंग्लंडला तर स्पॅनिश शेतकऱ्यांना कोठें ठेऊं व कोठें न ठेऊं असें होऊन गेलें. या गनिमी काव्याच्या लढाईस प्रारंभ झाला त्याचवेळीं स्पॅनिश लोकांच्या शौर्याची व धैर्याची तारीफ इंग्लंड देशांत चोहोंकडे होऊं लागून नेपोलियनच्या हलकट व नीच महत्त्वाकांक्षेविषयीं जो तो शिव्याशाप वरळूं लागला. त्यावेळच्या प्रधानमंडळाच्या विरुद्ध असलेला प्रसिद्ध वक्ता शेरिडन यानें भर पार्लमेंट सभेंत स्पॅनिश लोकांचे अत्यंत देव्हारे माजवून गनिमी काव्याच्या या लढाईस उघडपणें व शक्य तितकी मदत देण्याविषयीं आग्रहपूर्वक प्रधानमंडळास विनंति केली. प्रधानमंडळालाहि ती गोष्ट रुचली; आणि तोफा, बंदुका, दारूगोळा, कुडतीं, बूट वगैरे कोट्यवधि रुपयांचें

सामान इंग्लंडांतून स्पेन देशांत रवाना झालें. इंग्लंडनें यावेळीं पाण्यासारखा पैसा खर्च केला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्पॅनिश लोकांना मिळालेल्या वरील जयामुळें स्पेनमधील फ्रेंच सैन्याला मोठी दहशत बसली. स्पॅनिश लोक अगदींच हुरळून गेले. ही विलक्षण स्थिति पाहून राजधानीचें शहर माद्रिद येथें जोसेफसाहेबांनीं खजिन्यांतील जवाहीर लांबवून 'यःपलाय स जीवति'चा रस्ता धरला. राजधानी पुन्हां लोकांच्या हातीं आली व नंतर इंग्लंड व स्पेन यांमध्यें उघड तह होऊन स्पेनचा बादशहा फर्डिनंड याच्या बचावाकरितां पूर्णपणें साह्य देण्याचें इंग्लंडनें अभिवचन दिलें. अशा रीतीनें नेपोलियनच्या सर्व कारस्थानांची उलटापालट झाल्यावर नेपोलियननें पुन्हां माद्रिद शहरावर कशी स्वारी केली, इंग्लंडनें सर जॉन मूर यांच्या हाताखालीं पाठविलेल्या सैन्याचा पराभव होऊन स्पॅनिश लोक व इंग्रज यांची समुद्रापर्यंत कशी पिछेहाट झाली, गनिमी काव्याची पद्धत सोडून विजयी झालेल्या स्पॅनिश लोकांनीं पुन्हां राजरोस लढण्यास आरंभ केल्यावर नेपोलियननें त्याच्या पदरीं पूर्ण अपजय कसे घातले, शेवटीं वेलिंगटनला पोर्तुगाल हा रणभूमीचा पाया करून स्पेनच्या रणभूमींत उतरून आपला कार्यभाग कसा साधावा लागला, वगैरे गोष्टी आमच्या प्रस्तुतच्या विषयास धरून नसल्यामुळें आम्हीं पेनिनशुलर वॉरचे या पुढील इतिहासाकडे न वळतां गनिमीकाव्याच्या लढाईचीं इतर उदाहरणें पुढील खेपेस हातीं घेणार आहों.

# * गनिमी काव्याची लढाई

नंबर ७

युरोपखंडामधील गनिमी काव्याच्या युद्धकलेचें माहेरघर जो स्पेन देश त्या ठिकाणीं या पद्धतीनें कोणकोणते पराक्रम केले याचें गेल्या खेपेस दिग्दर्शन करण्यांत आलें १८०८ सालीं नेपोलियननें आपल्या बंधूस स्पेनदेशाची बादशाही देऊन माद्रिद शहरीं त्याची स्थापना केल्यामुळें परक्याचा अंमल झुगारून देण्याकरितां व स्पेनच्या राजाची स्थापना करण्याकरितां स्पॅनिश लोकांना गनिमी काव्याच्या लढाईचा आरंभ करावा लागला. नेपोलियन बोनापार्ट याच्या या कृत्यानें दुसऱ्या एका ठिकाणींहि गनिमी काव्याच्या लढाईस आरंभ झाला, व तेथें पुष्कळ वर्षें ही लढाई चालून शेवटीं जनपदेची कायमची सरशी झाली. हा दुसरा देश म्हणजे उत्तर–अमेरिका व दक्षिण–अमेरिका यांना जोडणारा मेक्सिको देश होय. स्पॅनिश लोकांनीं ज्याप्रमाणें गनिमी काव्याची लढाई फ्रेंच लोकांविरुद्ध केली त्याप्रमाणें मेक्सिकोनें स्पेनच्याविरुद्ध याच सुमारास असल्या लढाईस प्रारंभ केला.

कोलंबसानें वेस्टइंडीज बेटाचा शोध लावून अमेरिका देशाची बातमी युरोप खंडांत आणल्यावर स्पेननें त्या बाजूस आपलें साम्राज्य स्थापण्यास आरंभ केला. दोनचारशें शिपायांनीं जावें व दोनचारशें मैल लांबीरुंदीचें बेट ताब्यांत घ्यावें अशी त्यावेळची स्थिति होती! स्पेननें क्युबा बेट आपल्या ताब्यांत घेतल्यावर स्पॅनिश अधिकाऱ्यांना मेक्सिकोच्या समृद्ध व विस्तृत राज्याची बातमी लागली; व कॉरटेक्स नांवाच्या सेनापतीनें सोळावे शतकाचे

---

* केसरी, २९ जुलै १९०२

प्रारंभीं मेक्सिकोवर थोडके लोकांनिशीं हल्ला करून तेथील दोन तटांपैकीं एका तटास आपलासा करून घेऊन मेक्सिकोचें राज्य बुडविलें. मेक्सिकोचे लोक त्यावेळीं बरेच सुधारलेले होते. त्यांच्या राज्यांत मोठमोठीं शहरें असून व्यापार उदीमहि वाखाणण्यासारखा होता. हे मूर्तिपूजक असून त्यांची भव्य व विस्तीर्ण देवालयें चोहोंकडे पसरलीं होतीं. सेनापति कॉर्टेस यानें केलेलें मेक्सिकोच्या तत्कालिन सुधारणेचें वर्णन वाचलें म्हणजे चारपांचशें लोकांनिशीं त्याला एवढें समृद्ध व विस्तीर्ण राज्य कसें जिंकतां आलें याचेंच आश्चर्य वाटतें. पण युरोपियनांच्या बंदुका व तोफा त्याचेबरोबर होत्या व त्यामुळें राजा व लोक त्यास फार भीत असत हें वाचल्यावर, एका तटानें त्याची एवढी खुशामत कां केली व त्याच्या हातून दुसऱ्या तटाचा नाश करवून अखेरीस स्वतःसहि युरोपियन अंमलाखालीं दडपून घेण्यास ते कां तयार झाले, याचा उलगडा होतो. असो; मेक्सिकोचें राष्ट्र स्पेनच्या ताब्यांत आल्यानंतर तेथील अमोल संपत्ति, जवाहीर, सोनें, रुपें, स्पेननें मनमुराद लुटून नेलें, सर्व अधिकार स्वतःचे ताब्यांत ठेविला व मिशनऱ्यांना लोकांवर सोडून दिलें. या मिशनऱ्यांनीं अधिकाराच्या जोरावर भुलथापा देऊन मेक्सिको येथील लोकांच्या धार्मिक आचारांचा ख्रिस्तीधर्मविधींत संग्रह करून ख्रिस्ती देव पूर्वी तुमच्या देवांत होताच, अशी त्यांची कशीबशी समजूत घालून थोडक्याच काळांत सर्व मेक्सिको ख्रिस्तमय केला ! ख्रिस्ती झाले तरी त्या लोकांची स्थिति सुधारली नाहींच. जित व जेते हा भेद कायमच होता. प्रथम कांहीं दिवस जरी त्यांना सक्तीनें गुलाम करून स्पॅनिश लोक काम करावयास लावीत, तरी पुढें हळूहळू ही सक्तीची गुलामगिरी बंद होऊन कायदेशीर गुलामगिरीस प्रारंभ झाला. हरएक प्रकारचा प्रतिष्ठित धंदा स्पॅनिअर्डांशिवाय इतरांना करतां येत नसे. लोकांना लागणाऱ्या जिनसा तयार करावयाच्या स्पॅनिअर्डसनींच व विकावयाच्या

स्पॅनिअर्डसनींच. मोठा व्यापार म्हणा, कारखाना म्हणा, जमीनदारी म्हणा, अधिकार म्हणा, सर्व कांहीं स्पॅनिअर्डसच्या हातीं. १८०८ सालापर्यंत मेक्सिको देशाची स्थिति साधारणपणें वरील प्रकारची होती. राज्यकर्ते स्पॅनिअर्ड लोक, सरकारी सैन्य व राज्यकर्त्यांच्या बीजापासून उत्पन्न झालेली एक लहानशी खेचरजात याशिवाय इतरांच्या हातांत सत्ता, पैसा किंवा विद्या १८०८ पर्यंत फारशी गेलेली नव्हती. १८०८ चे पूर्वी मेक्सिकोचे लोक दहा पांच वर्षांत स्वतंत्र होतील असें जर कोणीं भाकित केलें असतें, तर लोकांनीं भाकित करणारास वेडा ठरविला असता. पण परमेश्वराच्या घरच्या अगाध लीलेमुळें १८०८ सालीं मेक्सिकोच्या स्वातंत्र्याचे दिवस खरोखरच जवळ आलेले होते.

नेपोलियननें स्पेन देश पादाक्रांत करून तेथील जुनाट राजघराणें बुड-विल्याची बातमी मेक्सिकोस पोहोंचल्याबरोबर तेथील व्हाइसरॉयसाहेबांनीं एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. ह्या जाहीरनाम्यांत, लोकांनीं फ्रेंचांचे विरुद्ध राजा फरडिनंड यास मदत करावी अशी प्रजाजनांस विनंति करण्यांत आली होती. ‘ प्रजाजनांची मदत, प्रजाजनास महत्त्व ’ हे शब्द सरकारी कागद-पत्रांत त्यावेळीं प्रथमच प्रकट झाले ! स्पेनदेशांतील स्पॅनिश अधिकार नाहींसा झाल्यानंतर मेक्सिको देशांत स्पॅनिश अधिकार लोकांच्या संमतीशिवाय व मदतीशिवाय चालविणें अशक्य होतें. त्या दूरदृष्टि व्हाईसरॉयसाहेबांच्या ही गोष्ट लक्षांत आल्यामुळें त्यांनीं लोकांस घेऊन राज्यकारभार चालविण्या-करितां वरील आशयाचा जाहीरनामा काढला. हा जाहीरनामा वाचून लोकांस अत्यंत आनंद झाला; व जो तो नवीन अधिकार मिळतील या आशेनें व्हाइसरॉयसाहेबांस मदत करण्यास पुढें सरसावला. परंतु व्हाइसरॉयसाहेबांचा हा जाहीरनामा तेथील अस्सल बीजाच्या स्पॅनियर्डस् लोकांना पसंत पडला नाहीं. एखादाहि अस्सल स्पॅनिअर्ड मेक्सिकोच्या भूमीवर जिवंत असतांना-

मग तो गाडीवाला असो किंवा चांभाराचा धंदा करणारा असो, मेक्सिकोचे नेटिवांस कसलाहि अधिकार मिळणार नाहीं, असें ते म्हणूं लागले! अधिकार-मदानें धुंद होऊन गेलेल्यांचें हें चांगलें उदाहरण आहे. असो; नवीन राज्यव्यवस्था कोणत्या प्रकारची करावयाची यासंबंधानें तीन चार महिने वाटाघाट झाल्यावर नेटिवांकडे व्हाइसरॉयांचा कल आहे असें पाहून व्हाइसरॉयसाहेबासच स्पॅनिअर्डनीं एकदम कैद केलें. स्पेन देशांत नेपोलियन-विरुद्ध गनिमी काव्यानें लढणाऱ्या स्पॅनिश प्रजाजनांनीं तशा संकटसमयींहि नवीन व्हाइसरॉय मेक्सिकोस पाठवून दिला व नेटिवांस स्वतंत्रपणें कोणतेच अधिकार द्यावयाचे नाहींत अशी सक्त ताकीदहि पाठविली! स्पॅनिअर्ड लोकांच्या सत्तेचें बिंग बाहेर फुटून त्यांचें अवसान लोकांनीं जोखल्यामुळें म्हणा किंवा आपणास मिळत असलेल्या अधिकारावर स्थानिक स्पॅनिअर्डनीं विनाकारण हरताळ फासल्यामुळें म्हणून म्हणा, फिडॅलगो नांवाच्या धर्मगुरूचे हाताखालीं लोकांनीं गनिमी काव्यानें लढण्यास सुरवात केली. आपला धर्म व आपलें स्वातंत्र्य हीं राखण्याकरितां आपण लढत आहों, असें फिडॅलगोनें जाहीर केलें. मेक्सिकोची भूमि मेक्सिकोचे लोकांकरितां आहे असें तो स्पष्ट बोलूं लागला; व सर्व युरोपियनांची मालमत्ता जप्त करून जेथें जेथें त्याच्या टोळ्या जात तेथें तेथें प्रत्येक युरोपियनास देहांत शिक्षा दिल्या-वांचून त्या रहात नसत. शेवटीं फिडॅलगोची स्वारी मेक्सिको शहराच्या तटापर्यंत येऊन थडकली. यावेळीं नवीन व्हाइसरॉयसाहेबांनीं फिडॅलगोवर बहिष्कार घातला व खिस्ती देवी मेरी हिची मिरवणूक मोठ्या थाटानें काढली. ह्यामुळें अत्यंत धर्मशील फिडॅलगो याचें मन कचरलें व लढाईंत त्याचा पराजय झाला. १८११ सालीं युनायटेड स्टेटसमध्यें पळून जात असतांना तो शत्रूच्या हातीं लागला. फिडॅलगोचा असा शेवट झाला, तरी त्याच्या सैन्याच्या पुनः लहान लहान तुकड्या झाल्या व त्यांनीं पूर्वीचा

आपला क्रम सुरू केला. यानंतर त्यांना मोरे लॉस हा सेनापति मिळाला व त्यानें बऱ्याच चकमकींत जय मिळवून निरनिराळ्या टोळ्यांचें एकीकरण करण्यास सुरवात केली. स्पॅनिश जनरल कॅलेझा यानें याप्रसंगीं जीं जुलमाचीं व लुटालुटीचीं कृत्यें केलीं त्यामुळें सरकारच्या बाजूचे लोक हळू हळू मोरे लॉस यास मिळूं लागले. १८१३ पर्यंत मोरेलॉस यास सारखा जय मिळाला; पण त्यासालीं ईटरबाइड यानें त्याचा चांगला पराभव केला. १८१५ पर्यंत तो पुढें गनिमी काव्यानें लढतच होता. पण अकस्मात् शत्रूच्या एका टोळीचे हातीं सापडल्यामुळें त्यास कैद करून मेक्सिको शहरीं नेण्यांत आलें. १८१५ पासून १८१७ पर्यंत ही गनिमी काव्याची लढाई चोहोंकडे अशीच धुमसत धुमसत चालली होती. १८१७ सालीं मीना दि यंगर यानें पुन्हां भडका उसळविण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांत त्यानें उत्कृष्ट बुद्धिमत्ता व विलक्षण धैर्य दाखविलें खरें, पण शेवटीं त्याचा पराभव होऊन तो सरकारचे हातीं लागून त्यास राजद्रोही म्हणून गोळी घालण्यांत आली. १८१८ नंतर या गनिमी काव्याच्या लढाईस बरीच शिथिलता येऊं लागली. पण मध्येंच पुन्हां एक अपूर्व योग घडून आल्यामुळें मेक्सिकोचा व स्पेनचा संबंध कायमचा तुटून मेक्सिको स्वतंत्र झाला. या सालीं मेक्सिकोचे नेटिव लोकांस कायमचे जिंकण्याकरितां स्पेन देशचे कार्डीफ बंदराहून एक मोठें लष्कर मेक्सिकोकडे यावयास निघणार होतें. पण त्या लष्करानें कार्डीफ बंदरीं बंडावा केल्यामुळें सर्व बेत जिथल्या तिथेंच राहिले. स्पेन देशांत हा असा बंडावा झाल्यामुळें व्हाइसरॉय व इतर स्पॅनिअर्ड यांमध्यें पुढें काय करावें याविषयीं वाटाघाट सुरू झाली. प्रसिद्ध स्पॅनिश सेनापति ईटरबाइड याचें असें मत पडलें कीं, नेटिवांना व स्पॅनिअर्डना सारखे हक्क देऊन नवीन तऱ्हेची राज्यव्यवस्था स्थापून बादशहा फर्डिनंड यास स्पेनमधून मेक्सिकोमध्यें रहावयास बोलवावें व तो न आल्यास राजघराण्यांतील

दुसऱ्या एखाद्या पुरुषास मेक्सिकोचें राज्यपद देऊन मेक्सिकोचा व स्पेनचा कायमचा संबंध तोडावा. या मतासंबंधानें स्पॅनिअर्ड लोकांमध्येंच दुफळी झाली, व १८२१ सालीं ईटरबाइड यास सर्व नेटिव लोक मिळाल्यामुळें राजधानीचें शहर त्याचे ताब्यांत येऊन तीन चार वर्षांनीं बऱ्याच उलाढाली-नंतर मेक्सिकोमध्यें प्रजासत्तात्मक राज्याची स्थापना झाली. ह्या इतिहासांत १८०८ पासून १८१९ पर्यंत मेक्सिकोच्या नेटिवांनीं परकी राज्यकर्त्याविरुद्ध कमी जास्ती जोराची गनिमी काव्याची लढाई सुरू ठेवली होती; व पुढें ज्यावेळीं खुद्द स्पॅनिअर्डनाच स्पेनशीं संबंध ठेवणें अशक्य झालें त्यावेळीं नेटिवांच्या सर्व मागण्या राज्यकर्त्यांना कबूल करणें भाग पडलें.

नेपोलियननें युरोपच्या इतिहासांत ज्या अपूर्व उलाढाली केल्या त्यामुळें स्पेन देशांत व तदनंतर मेक्सिको देशांत गनिमी काव्याच्या लढाईस सुरवात झाली. इतकेंच नव्हे तर आणखी एका तिसऱ्या ठिकाणींहि नेपोलियनचे प्रतापामुळें प्रजाजनांना गनिमी काव्याची लढाई करणें भाग पडलें. नेपोलि-यननें केलेले असंख्य पराक्रम कालांतरानें विसरण्यांत येतील; पण स्पॅनिश लोकांनीं केलेली गनिमी काव्याची लढाई युरोपचे इतिहासांत चिरस्मरणीय राहील. या लढाईचे राजकीय परिणाम फारच मोठे झाले असल्यामुळें युरोपखंडांतील सर्व गनिमी काव्याच्या लढाईंत या युद्धास जरी अग्रस्थान प्राप्त झालें, तरी स्पॅनिश लोकांबरोबरच टायरोलच्या प्रजाजनांची आठवण करण्यास इतिहासकार विसरणार नाहींत. टायरोल हा प्रांत डोंगराळ असून जर्मनीच्या दक्षिण सरहद्दीवर आहे. नेपोलियनच्या वेळीं तेथील लोक अत्यंत धर्मशील, स्वाभिमानी व काटक होते. आस्ट्रियाच्या ड्यूकचें तेथें राज्य असून लोक स्वामिनिष्ट असत. नेपोलियनचे उलाढालींत ह्या भागाचें स्वामित्व ऑस्ट्रियाकडून बव्हेरियाकडे गेलें. बव्हेरियाकडून लोकांवर जुलूम होऊं लागला, त्यामुळें लोकांची आस्ट्रियाविषयींची भक्ति अधिकच वाढत

... ३२१ ...

चालली. आस्ट्रियाकरितां गनिमी काव्यानें लढण्याचा या लहानशा प्रांतानें जो विलक्षण हेका दाखविला त्यामुळें टायरोलचें नांव युरोपच्या इतिहासांत अजरामर झालें आहे. होफर आणि स्पेकबॅकर या सामान्य स्थितींतील लोकांच्या पुढाऱ्यांनीं बव्हेरिया व फ्रान्स यांच्या संयुक्त सामर्थ्याशीं जी टक्कर मारली तिजमुळें टेल, वॉलेस यांच्यासारख्या स्वदेशभक्तांचे मालिकेंत त्यांना प्रथमस्थान देण्यांत आलें आहे. होफर हा एक साधारण खाणावळ-वाला होता व स्पेकबॅकर हा मूळचा जरी जमीनदार असला तरी शेवटीं त्यानें सर्वसंगपरित्याग करून हातांतील क्रॉसच्या काठीनें लढण्यास सुरवात केली होती ! फ्रान्सच्या सामर्थ्यापुढें यांनीं बरीच वर्षें टिकाव धरणें शक्य नव्हतें. परंतु गनिमी काव्याचें कौशल्य जें त्यांनीं प्रदर्शित केलें त्यामुळें नेपोलियनासहि पुढें आपला हेका कमीजास्ती प्रमाणानें सोडणें भाग पडलें.

युरोप खंडाचे इतिहासांत गनिमी कावा अंगिकारलेल्या लोकांचीं आणखीहि कांहीं उदाहरणें दाखवितां येतील. वॉलेसनें स्कॉटलंडकरितां केलेली जिवापाड मेहनत, विल्यम धी सायलेंटनें एकसारखें आपलें धोरण कायम ठेवून हालंडास आणलेली महती किंवा ड्यूक ऑफ बरगंडीशीं स्वित्झर्लंडच्या फुटकळ संस्थानिकांनीं एकोप्यानें लढून स्वित्सर्लंडच्या राष्ट्राची केलेली प्राणप्रतिष्ठा, या सर्व मनोवेधक ऐतिहासिक कथानकांकडे पाहिलें असतां मोठासा पराजय झाल्यानंतर पुन्हां डोकें वर काढण्यास गनिमी काव्याच्याच पद्धतीचा अंगिकार करण्यांत आला आहे. अगदीं अलीकडे क्युबा बेटांतील लोकांनीं स्वातंत्र्य मिळविण्याकरितां स्पेनच्या सैन्याशीं दहावीस वर्षें गनिमी काव्याची कशी लढाई केली हें केसरीच्या वाचकांस माहीत आहेच. निश्चयी व देशाभिमानी असे प्रजाजन गनिमी काव्यानें लढूं लागले असतां त्यांचा पूर्ण पराभव करण्यास त्यांच्या मुलाबाळांस, म्हाताऱ्या कोताऱ्यांस, स्वजातीयांस कोंडून ठेवून त्यांचा आस्ते आस्ते समूळ निःपात केल्याशिवाय इलाज

नाहीं, असें क्युबाचे गनिमी काव्याच्या लढाईचे वेळीं स्पेनच्या निदर्शनास आलें होतें; व म्हणूनच स्पेननें क्युबांतील नेटिवांचा एक 'कोंडमारा' तयार केला होता. या निष्ठुर व निर्दयतेच्या कल्पनेची अंमलबजावणी क्युबा बेटांत होऊं लागल्यामुळें अमेरिकेस उघडपणें स्पेनच्या कारभारांत हात घालावा लागला. पण पुढें फिलिपाइन बेटांतील लोकांनींहि जेव्हां गनिमी काव्यास प्रारंभ केला त्यावेळीं अमेरिकेचें ३०–४० हजार व्हालंटिअर सैन्य थकून गेलें; व जे लोक दिवसा आपली स्तुती करण्यांत अग्रगण्य तेच रात्रीं फिलिपो लोकांना मदत करण्यास तत्पर अशी स्थिति अमेरिकेचे दृष्टीस पडली, व अमेरिकन सेनापतींनीं बायकामुलांवर अत्यंत लाजिरवाणे जुलूम केले. फिलिपाइनच्या नेटिवांनींहि, जो कोणी नेटिव अमेरिकन लोकांना मदत करील त्यास चापून देहांत शिक्षा देण्यास प्रारंभ केला. फिलिपाइन्स बेटांत अशा प्रकारची निकराची लढाई चाललेली पाहून आतां अमेरिकेचे प्रसिडेंट साहेबांचे मनांत कालांतरानें कां होईना पण फिलिपाइनला स्वातंत्र्य देण्याचें आलें आहे !

एकंदरीनें काल, देश व लोकस्थिति हीं अनुकूल असतां जेथें जेथें जनपदेनें गनिमी काव्याच्या लढाईस सुरवात केली, तेथें तेथें प्रत्येकाचे दैवानुसार जय निदान कीर्ति तरी मिळालीच आहे. या पद्धतीची महती वाचकांचे लक्षांत नीट येण्याकरितां युरोपियन लोकांचे इतिहासांतून याहून अधिक उदाहरणें देण्याची आम्हांस जरुरी दिसत नाहीं. म्हणून पुढील खेपेस अवरंगजेबाशीं लढतांना महाराष्ट्रांत गनिमी काव्यानें कोणकोणते चमत्कार केले, याचा चित्रपट वाचकांपुढें मांडणार आहों.

# * गनिमी काव्याची लढाई

## नंबर ८

अफगाणिस्तानचे डोंगराळ प्रदेशांत मोठी सेना जमवून व लढाईची जय्यत तयारी करून हिंदुस्थानावर उतरणाऱ्या मुसलमानांशीं प्रथम टक्कर रजपुतांनीं दिली. रजपूत मुसलमानांशीं तुलना केली असतां शौर्यामध्यें कमी नव्हते; पण मुसलमान हे शत्रूची वातमी घेऊन स्वारी करण्याच्याच तयारीनें अकस्मात् एखाद्या रजपूत शहरापुढें उतरत असल्यामुळें त्यांच्या मोठ्या जमावापुढें रजपुतांचें शौर्य फिकें पडे. मुसलमान एकदां परतल्यावर ते बरींच वर्षें अस्तंगत होत असल्यामुळें रजपूत पुन: आपापसांतील झगड्यांकडे लक्ष देत. कोठून तरी टोळधाड आली व कोठें तरी गेली, अशा प्रकारच्या मुसलमानांविषयींच्या कल्पना होत्या. अशा प्रकारें मुसलमानांना जय मिळाल्यामुळें एका खेपेस त्यांनीं दिल्लीस कायमचें ठाणें दिलें. बाबर व अकबर यांचे कारकीर्दीत मुसलमान व रजपूत यांचें निकराचें युद्ध झालें व कांहीं प्रसंगीं बायकामुलांची आपल्या हस्तें आपल्या देखत राखरांगोळी करून रजपूत योद्धयांनीं रणांगणावर आपले देह धारातीर्थी समर्पण केल्याचें इतिहासांत नमूद आहे. स्वार्थत्याग, शौर्य व स्वाभिमान या गुणांची परमावधि किंवा पराकाष्ठा याहून आणखी कोणती असणार ? शौर्यानें रजपूत कमी होते असें नाहीं; पण बादशाही समुद्रापुढें नुसत्या शौर्याचा टिकाव लागला नाहीं. त्यांत युक्तीची भर पाहिजे होती, ती नसल्यामुळें रजपुतांचा पराभव होऊन, अखेरीस जरी त्यांचा पुरा पाडाव झाला नाहीं तरी शेवटीं अकबराचे कारकीर्दीत रजपुतांचीं संस्थानें मुसलमानी साम्राज्याचीं घटकावयवें

---

* केसरी ता. ५ ऑगस्ट १९०२

होऊन मुख्य आधारस्तंभहि झाली होतीं. एकंदरींत मुसलमानांनीं रजपुतांस समूळ उपटून टाकलें नसून त्वयार्धं मयार्धं अशांतलाच रजपूत मुसलमानांचा संबंध होता. लष्करी धोरणाची दूरदृष्टि, डावपेंचानें कार्य साधण्याची हाव व गनिमी काव्याची पद्धत यांचा जर राजपुतान्यांत उदय झाला असता, तर मुसलमानी बादशाहीची दिल्लीस स्थापना होण्याची आशाच नको होती. समान शस्त्रें, लोकांची पूर्ण मदत व डोंगर, किल्ले आणि जंगल यांचा पाठिंबा इतकी सिद्धता असल्यावर गनिमी काव्यानें स्वराज्य स्थापितां येतें ही गोष्ट हिंदुस्थानचे इतिहासांत श्रीशिवाजीमहाराजांचे प्रथमतः लक्षांत आली! त्यांचें इतिहासांत जें एवढें महत्त्व आहे तें एवढ्याकरितांच होय. रजपूत शूर खरे, पण त्यांस ही युक्ति सुचली नाहीं किंवा ग्राह्य वाटली नाहीं हें देशाचें दुर्दैव होय; व शिवाजीमहाराजांसारखा अपूर्व धोरणी पुरुष जर यावेळीं निपजला नसता तर हें दुर्दैव तसेंच कायम रहातें. महाराजांचें राज्य-कार्यपटुत्व, स्वधर्मावर विलक्षण निष्टा, अत्यंत पवित्र आचरण इत्यादि गुण एका बाजूस ठेवले आणि केवळ त्यांच्या लष्करी पद्धतीकडे लक्ष दिलें, म्हणजे वाचकांचे असें ध्यानांत येईल कीं, रामदास आदिकरून साधुसंतांच्या आशीर्वादानें व कृपासाह्यानें एकविचारानें भरलेल्या महाराष्ट्र मंडळांतील निरनिराळ्या टोळ्यांस गनिमी काव्याच्या पद्धतीनें विजापुराविरुद्ध हलवयास लावून अखेरीस सर्वांची संघशक्ति निर्माण करून महाराजांनीं स्वराज्याची स्थापना केली. लहान लहान टोळ्या करून शत्रूस वेढणें, पराजयाचे वेळीं त्याहूनहि लहान लहान टोळ्यांनीं चोहोंकडे पळून जाऊन एखाद्या जंगलांत किंवा एखाद्या डोंगरांत पुन्हां एकत्र होणें, एका ठिकाणाहून हुसकलें तर दुसऱ्या ठिकाणीं प्रकट होणें व शेवटीं शत्रूचें अवसान जोखल्यावर अवचित शत्रूस गाठून त्यास अजिबात बुडविणें ही शिवाजीमहाराजांची पद्धत होती. शिवाजी महाराजांचे वेळीं काय किंवा तदनंतर काय, मराठी सैन्य कोठेंहि

गेलें तरी घासदाण्यासंबंधानें, अन्न-सामग्रीसंबंधानें किंवा पैशाअडक्या-संबंधानें स्वराज्यांतच असल्यासारखें होतें. चोहोंकडे वायुवेगानें फिरत असतां एखाद्या मुसलमानी ठाण्यावर जेव्हां ते ठेंचळत किंवा मुसलमानी सेनेशीं प्रत्यक्ष गांठ पडे, तेवढ्यापुरतेंच त्यांना परक्यांच्या राज्यसत्तेची आठवण होई. इतर सर्व प्रसंगीं व सर्व ठिकाणीं लोकांपाशीं जें कांहीं आहे तें आपलेंच असें गृहीत धरून मराठे शिलेदार चालत. यामुळें शस्त्रें व लोक एवढी तयारी झाली म्हणजे इतर कोणतीहि तयारी करण्याचें कारण पडत नसे. विजापूर, खानदेश, वऱ्हाड, हैदराबाद, गुजराथ, माळवा वगैरे प्रांत प्रत्यक्ष जरी मुसलमानांच्या अंमलाखालीं होते, तरी मुख्य वस्ती हिंदूंचीच असल्यामुळें व छावणीचें ठिकाण किंवा ठाण्याची जागा याशिवाय इतर जागीं मराठे प्रकट झाले असतां ते असेतों त्यांच्या अंमलास अडथळा करण्यास प्रजाजन केव्हांहि राजी नसल्यामुळें मुसलमानांचे व मराठ्यांचे युद्धांत मुसलमानांना मात्र आपल्या अंमलांतील प्रदेश कोणता, शत्रूचा प्रदेश कोणता, रणभूमि कोणती, रणभूमीचा पाया कोणता, दळणवळणाचे मार्ग सुरक्षित आहेत किंवा कसें, खजिना वेळेवर पोहोंचेल कीं नाहीं, रसीद येईल कीं नाहीं, या सर्व गोष्टींची काळजी करावी लागे. मराठ्यांची स्थिति तशी नव्हती. मराठ्यांचे शिलेदार जातील तेथें लोक ते असेपर्यंत निदान त्यांचा अमल कबूल करण्यास तयार, लढणें जेथें त्यांना सोइस्कर पडे ती त्यांची रणभूमि, थकून भागून विसावा घेण्यास ज्या ठिकाणीं ते बसतील तें ठिकाण त्यांच्या रणभूमीचा पाया! अशा प्रकारें मराठ्यांचा सर्व अंमल, सर्व तयारी व सर्व लष्करी धोरण, त्यांचा घोडा, भाला व घोंगडी यांत एकवटलेलीं होतीं. घोड्यावर एकदां ते स्वार झाले म्हणजे कोणता देश-बांधव त्यांच्या हुकमास सलाम करीत नसे? रिकिबींत पाय ठेवून एकदां त्यानें हातांत भाला धरला म्हणजे अन्नसामग्री व घासदाणा देत नाहीं असें

म्हणणारा कोण होता ? घोड्याच्या पाठीवर जिनावर बसून दिल्लीच्या तक्तावर बसलेल्या बादशहाप्रमाणें ते हुकूम सोडीत. तोबऱ्यांतले हरबरे मूठभर घोड्यास दे, मूठभर स्वतःचे तोंडांत टाक, अशा रीतीनें उपाहार करीत असतां हजारों स्त्रियांनीं वेष्टिलेल्या शहाजाद्याचें गृहसुख त्यांना मिळे. 'जीन तक्त जीन ' 'Saddle is my throne, saddle is my home' हें वर्णन मराठी शिलेदारांना पूर्णपणें लागू पडे. मराठ्यांचें लष्करच असें होतें कीं, गनिमी काव्याची लढाई लढण्याकरितांच तें जन्मास आलें असलें पाहिजे.

शिवाजी महाराजांनीं घालून दिलेल्या पद्धतीचें पूर्ण बळ, औरंगजेब विस्तीर्ण सेना—समुद्र घेऊन दक्षिणेंत ज्यावेळीं उतरला, त्यावेळीं मुसलमानांच्या पुरें प्रत्ययास आलें. काबूल, गिझनी, कंदाहार, काश्मीर, पंजाब, राजपुताना, गुजराथ, माळवा, बुंदेलखंड, बंगाल हीं सर्व राष्ट्रें औरंगजेबाचे पायीं लीन झालीं होतीं. उत्तर हिंदुस्थानांतील हिंदु लोक तर औरंगजेबास रावणासारख्या दैत्याचा पूर्ण अवतार समजत असत; व काशीविश्वेश्वर आदिकरून तेहतीस कोटी हिंदु देवतांना अटकेंत ठेवण्यास तो समर्थ आहे, अशी त्यांची बालंबाल खात्री झाली होती ! पोथ्यापुराणें खाकुटीस मारून हिमालयाचे जंगलांत व बर्फांत पळून जाण्यापेक्षां हिंदुधर्माचा बचाव करण्याचा दुसरा उपाय त्यांना सुचला नाहीं. अशाप्रकारें सर्व हिंदुस्थानभर दिग्विजय करून सर्व जगाचा बादशहा असें सर्व हिंदुमुसलमानांकडून म्हणवून घेऊन भिकार दख्खनला जातां जातां शेवटचा तडाखा मारण्याकरितां ३।४ लाख निवडक सैन्य, उत्कृष्ट रिसाला, उत्कृष्ट पायदळ बरोबर घेऊन लाख दीड लाख छावणीवाल्यांसह औरंगजेब बादशहाची धाड बऱ्हाणपूर मुक्कामीं येऊन पडली. ते शृंगारलेले हत्ती, आणि ते असंख्य कोतवाली घोडे, रानोमाळ पसरलेल्या त्या भरजरी राहुट्या, सोनेरी कळसाचे भव्य तंबू, असलें अलौकिक व दैदिप्यमान लष्करी तेज पाहून कोणत्या हिंदूचें मन

त्यावेळीं हिंदुधर्माच्या विचारानें उद्विग्न झालें नसेल? कोणत्या राजाच्या मनांत औरंगजेबाशीं लढण्याची निष्फलता बिंबली नसेल? पण औरंगजेब बादशहास मुजरा करण्याकरितां दख्खनच्या पातशहांनीं, राजेरजवाडयांनीं, मानकऱ्यांनीं, दरकदारांनीं १६८४ सालीं बऱ्हाणपुरीं पाठविलेल्या वकिलांमध्यें मराठी वकिलांनीं जरी बादशाही वैभव पूर्णपणें पाहिलें, बादशाही आदरातिथ्याचा मनमुराद उपभोग घेतला, बादशाहास वरचेवर लवून लवून मुजरा केला, तरी या थाटामाटाच्या व अवजड कारखान्याला इकडून तिकडे व तिकडून इकडे नुसती गलद करून चुरडतां येईल ही गोष्ट त्यांच्या ध्यानांत आल्यावांचून राहिली नाहीं. महाराष्ट्राचा स्वभावच असा आहे कीं, प्रथम त्याचे डोळे दिपून जातात. पण हळू हळू इतर सर्वांपेक्षां शत्रूचीं छिद्रें त्याच्या आधीं ध्यानांत येतात. दख्खनेंतील मुसलमान अमीरउमरावांनीं बादशाही सैन्य पाहून बादशाही अंमल पूर्णपणें कबूल केला, पण मराठे सरदारांच्या मनाची स्थिति याहून निराळी झाली. १६८४ सालीं औरंगजेब ज्यावेळीं दक्षिणेंत उतरला त्यावेळीं विजापूरचा दरबार आपापसांतील फुटीनें नासलेला होता. संभाजीचें क्रूरतेमुळें व घाणेरडया चैनबाजीमुळें मराठी दरबारांत जोम नव्हता. गोवळकोंडयास प्रसिद्ध मुत्सद्दी महादुअण्णा हे तेथील बादशहाचे वजीर होते. पण ब्राम्हणाच्या सल्लामसलतीनें आपण वागावें हें मुसलमान सरदारांस पसंत न पडल्यामुळें महादुअण्णाचे अटोकाट धोरण, विजापूर, मराठे व गोवळकोंडे या राज्यांची एकी करून बादशाही सैन्यास तंवी देण्याचा त्यांचा विचार व औरंगजेबास अडथळा करण्याकरितां स्वतः त्यांनीं लष्कराची केलेली जय्यत तयारी हीं सर्व फुकट गेलीं. नाशिकजवळ घाटमाथ्यावरून खालीं उतरून कोंकणांत शिरलेल्या मुसलमानी सेनेस खुष्कीनें व जलमार्गानें मराठयांनीं गनिमी काव्यानें गांजून गांजून अखेरीस त्यांना अन्नवस्त्रहीन केलेलें पाहून, विजापूरची बादशाही बुडविल्यावरोबर व गोवळ-

कोंडयाची धनदौलत हस्तगत केल्याबरोबर औरंगजेबानें मराठयांकडे लक्ष दिलें; व अवचित संभाजीस गाठून इ. स. १६८९ मध्यें तुळजापूर येथें हाल हाल करून त्याचा शिरच्छेद केला! यावेळीं मुसलमानी राज्यें बुडविण्याचें औरंगजेबाचें काम संपलें होतें व मराठयांचे किल्ले एकदां घेतले म्हणजे आपला कार्यभाग झाला असें तो समजत होता. संभाजी अवचित मारला गेल्यामुळें मराठी सैन्याची पांगापांग झाली होती; व सर्व मराठी राज्य-व्यवस्था विस्कळीत होऊन गेली होती. पन्हाळा आदिकरून गड घेण्यास औरंगजेबानें प्रारंभ केला व रायगडावरहि मुसलमानी सेनासमुद्राच्या लाटा आदळल्या. बादशाही सैन्यास एकसारखे जय येत गेल्यामुळें महाराष्ट्रांतील डोंगरी किल्ले जितक्या निकरानें लढावयास पाहिजे होते तितक्या निकरानें या वेळीं लढले नाहींत, व यामुळें सर्व महत्त्वाचीं व नाक्याचीं ठिकाणें मुसलमानांच्या ताब्यांत गेलीं. अत्यंत धोरणी, देशभक्त, धर्मनिष्ठ व खरा मुत्सद्दी प्रल्हाद निराजी हा जर यावेळीं महाराष्ट्राचा आत्मा बनला नसता, संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे जर महाराष्ट्ररूपी देहाच्या चलन-वलनाच्या मुख्य शक्ती झाले नसते, महाराष्ट्रांतील साधुसंतांनीं उत्पन्न केलेली व औरंगजेबाच्या जुलमानें यावेळीं अत्यंत प्रखर झालेली धर्मनिष्ठा जर सर्व महाराष्ट्राचे मनांत यावेळीं उचंबळून गेली नसती, तर औरंग-जेबानें जवळ जवळ आंखडत आणलेल्या महाराष्ट्राच्या नाडया खरोखरच बंद पडून सर्व देश थंड झाला असता! राजाराम, प्रल्हाद निराजी, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, निळोपंत, जनार्दनपंत, शंकराजी बल्लाळ, रामचंद्र त्रिंबक, निराजी रावजी, म्हादजी गदाधर, पोवार, थोरात, समशेर बहाद्दर वगैरे त्या वेळच्या महाराष्ट्राच्या पुढाऱ्यांनीं सल्लामसलत केली, व गनिमी काव्याचे खरे हात औरंगजेबाला दाखविल्याशिवाय गत्यंतर नाहीं असा त्यांचा ठराव झाला. राजारामाची बुद्धि व करामतीपेक्षां राजारामाचें नांव

याचेळीं महाराष्ट्रास फार उपयोगी असल्यामुळें दक्षिणेस कारोमांडल किनाऱ्याचे बाजूला जिंजीच्या अवघड डोंगरी किल्ल्यांत राजारामास नेऊन ठेवण्याचें ठरलें. हा कार्यभाग साधेतों सर्व शिलेदारांस आपआपल्या खेडेगांवीं जाण्यास विदा मिळाली; व जेथें जेथें पुढें भगवा झेंडा उभारण्यांत येईल तेथें तेथें सोयीप्रमाणें त्यांनीं आपापल्या पुढाऱ्यांस मिळावें असा हुकूम झाला. गडकिल्ल्यांनीं साधल्यास औरंगजेबाशीं लढावें, न साधल्यास आपल्या बळाची खराबी न होऊं देतां गड स्वाधीन करावा असे हुकूम होते. राजारामास जिंजीस सुरक्षित पोहोंचवून आल्यावर मराठी सेनापतींचा पहिला विचार महाराष्ट्रांतील किल्ल्यांमागें औरंगजेबानें लाविलेला भुंगा कमी कसा होईल व जिंजीकडे मुसलमानांचें लक्ष कसें लवकर जाणार नाहीं हा होता. धनाजी जाधव व संताजी घोरपडे हे महाराष्ट्रांत परत आल्यावर त्यांनीं आपलें सैन्य खेडेगांवीं आडमार्गांवर जमा करून बादशाही सैन्यास बगल मारून उत्तरेस जाऊन, वरील हेतु साधण्याकरितां औरंगजेबाची छावणी अहमदनगर येथें असतां बऱ्हाणपूर लुटण्यास आरंभ केला. हे किरकोळ लुटारू अहेत असें समजून प्रथम औरंगजेबानें त्यांच्यावर लहान लहान टोळ्या व मध्यम दर्जाचे सरदार पाठविले. हप्त्याहप्त्यानें आलेल्या या मुसलमानी सैन्यास त्यांनीं आपल्या तलवारीस बळी दिलें हें सांगावयास नकोच. तेव्हां औरंगजेबास मोठें सैन्य त्यांच्यावर पाठवावें लागलें. मोठें सैन्य वर येण्याबरोबर मराठ्यांच्या पुनः फुटकळ लहान लहान तुकड्या झाल्या व औरंगजेबाच्या ह्या मोठ्या सैन्याची व मराठ्यांच्या सैन्याची गांठच पडली नाहीं! औरंगजेबाचें मन अशा रीतीनें बऱ्हाणपुराकडे वेधल्यामुळें पंतसचिव, पंत अमात्य, थोरात, पोवार, वगैरे दुय्यम दर्जाच्या मराठे सेनापतींना पन्हाळा, रायगड आदिकरून मुसलमानांनीं घेतलेले गड एकेक परत घेण्यास व लोकांस उत्तेजन देऊन धनगरादिकरून सर्व जातींचें

सैन्य उभारण्यास यथेच्छ संधि मिळाली. लुप्तप्राय झालेले मराठे उत्तरेस व दक्षिणेस अशा रीतीनें एकदम अवतीर्ण झालेले पाहून, पंढरपुराजवळ भीमेच्या कांठीं ब्रम्हपुरींत नवीन शहर वसवून छावणी देऊन बसलेल्या औरंगजेबास अचंबा वाटला; व जिंजीला तंबी देऊन राजारामाला पकडण्याचा त्यानें निश्चय केला. पहिल्या खेपेस पाठविलेल्या सैन्याच्या सभोंवतीं धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांनीं घिरट्या घालघालून त्याला असें दमविलें कीं, तें सैन्य जिंजीच्या जवळ जाईतोंपर्यंत अशक्त होऊन गेलें व जिंजी सर करण्याचें काम आपणांस दुरापास्त आहे असें त्यांस वाटलें, व औरंगजेबा-कडून पुन्हां कुमक मागविण्यांत आली. औरंगजेबाच्या सैन्यांतील हुषार सेनापति झुलफिकारखान याचे मनांतून लांब खालीं कर्नाटकांत आपल्या नांवाची पातशाही स्थापावयाचें होतें, व त्या कामास मराठ्यांची मदत त्याला पाहिजे होती. औरंगजेबाचे मुलांनाहि अशींच कांहीं खाजगीं कामें उरकून घ्यावयाचीं असल्यामुळें मराठ्यांना जिंकण्यापेक्षां पुष्कळ सैन्य आपल्या ताब्यांत कसें येईल, या गोष्टीकडे त्यांचें लक्ष होतें. बादशहा स्वत: वार्धक्यामुळें व मराठ्यांनीं बादशाहीच्या आरंभिलेल्या थट्टेमुळें चिडून जाऊन, त्रासून जाऊन बुद्धिहीन झाला होता; यामुळें जिंजीच्या स्वारीची पुन्हां तयारी करण्यास दोन तीन वर्षांची सहज अवधी लागली. जिंजीकडे सांप्रत पेंच नाहीं, असें पाहून बादशाही सैन्यास चुकवीत चुकवीत व प्रसंगविशेषीं त्यास ठेंचकाळत ठेंचकाळत संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनीं पुन्हां एकदां गुजराथ व माळवा इकडे भरारी मारली, व बादशाही सेनेचे उत्तरे-कडील दळणवळणाचे मार्ग बंद करून बादशाही खजिना व रसीद लुटली. शेवटीं बादशहाचें मोठें सैन्य ज्यावेळीं जिंजीच्या जवळ गेलें त्यावेळीं जिंजी न लढवितां कांहीं काल थापा मारून, कांहीं काल खरेपणा दाखवून, कांहीं काल लढण्याचा आव घालून मराठ्यांनीं काढला, व उत्तरेकडील, दक्षिणे-

नगर वाचनालय

कडील, खानदेशांतील, कर्नाटकांतील त्यांच्या सर्व टोळया साताऱ्याचे आसपास गोळा होऊं लागल्या. गुजराथ माळव्याचे बाजूला मराठे धुमाकूळ करतात म्हणून त्या बाजूस एक मोठें मुसलमानी सैन्य जाऊन पडलेंच होतें. भीमेच्या कांठीं औरंगजेबाजवळ एक मोटी छावणी होतीच, व तिसरें मोठें लष्कर जिंजीस पोचून मुसलमानांची सर्व तयारी जय्यत होण्याचे सुमारास राजाराम महाराज जे तेथून निसटले ते साताऱ्यास येऊन शिवाजी महाराजांनींहि कधीं गोळा केलें नव्हतें एवढया मोठया महाराष्ट्रवीरांच्या सैन्यावर हुकमत मिळवून सर्वांसह सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यांतील बादशाही सेनेस बळसा देऊन बऱ्हाणपुरास येऊन धडकले ! महाराष्ट्र वीरांनीं यावेळीं पूर्वींची स्थिति सर्व बदलून टाकून आपल्या राजासह, आपल्या सर्व सेनेसह, आपल्या सर्व गडकिल्ल्यांसह औरंगजेबास नानाप्रकारें छळण्यास प्रारंभ केला. पुढें एके प्रसंगीं तर खुद्द औरंगजेब बादशहा मराठी छावणींत कैदी होऊन येण्याची वेळ आली होती. पण खुदानें तो प्रसंग टाळल्यामुळें औरंगजेबाची अशा प्रकारें बेअब्रू झाली नाहीं; पण तो प्रसंग औरंगजेबास आला होता व तो टळला, एवढीच काय ती आनंदाची गोष्ट मुसलमानांस दक्षिणेस शेवटीं शिल्लक राहिली ! हें सर्व पाहिलें म्हणजे गनिमी काव्यानें महाराष्ट्रास केवढया उच्च पदावर नेऊन सोडलें, हें वाचकांस समजणार आहे. पुढील खेपेस महाराष्ट्राच्या या युद्धाचें व बोअर युद्धाचें बऱ्याच अंशीं असलेलें साम्य वाचकांपुढें मांडून व नववें पुष्प मालेंत गोंवून नवपुष्पांची ही माला पूर्ण करण्याचा विचार आहे.

---

# * गनिमी काव्याची लढाई

## नंबर ९

श्री शिवाजी महाराजांनीं तोरणा किल्ला घेतला तेंव्हांपासूनच महाराष्ट्राच्या गनिमी काव्याच्या युद्धास प्रारंभ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही लढाई औरंगजेबाची पुरी फटफजिती होऊन 'बरी नशीबानें खैरात केली, नाहीं तर मराठयांनीं मला तुरुंगांत टाकलें असतें' असें म्हणण्याचा त्याचेवर प्रसंग येईपर्यंत एकसारखी महाराष्ट्रांत चालली होती. औरंगजेबाच्या मृत्यू-नंतर म्हणजे १७०७ नंतर शाहूमहाराजांची सातारच्या गादीवर स्थापना होऊन महाराष्ट्रांत चोहोंकडे स्थिरस्थावर झाल्यावर स्वराज्यस्थापनेचा पहिला भाग संपून साम्राज्यस्थापनेच्या दुसऱ्या भागास प्रारंभ होतो; व तेथून खुद्द महाराष्ट्रांत क्वचितच युद्धप्रसंग घडला असून साम्राज्याच्या लढाया अर्थात् निराळ्या धर्तीवर झालेल्या आहेत. १६८४ सालीं औरंगजेब दक्षिणेंत उतरला त्यावेळीं संभाजीच्या अनन्वित कृत्यांमुळें महाराष्ट्र मंडळ जरी नाउमेद होतें, तरी गनिमी काव्याची लढाई सर्वांच्या चांगली आंग-वळणीं खेळलेली होती. खुद्द संभाजीनेंच औरंगजेबाच्या चिरंजीवास कोंकणांत उपासमार काढावयास लावून जिंकलेला कोंकणचा भाग सोडून देणें भाग पाडून आंबेघाटानें वर येऊन कृष्णातटाकीं वाळवें मुक्कामीं अन्नपाण्याकरितां छावणी देऊन बसावयास भाग पाडलें, व आणखी एक दोन किरकोळ प्रसंगींहि संभाजीनें गनिमी काव्याचे दोन हात औरंगजेबाशीं खेळण्यास कमी केलेले नाहींत. म्हणजे हिंदूंच्या म्हणण्याप्रमाणें १० लाख, मुसलमानांच्या म्हणण्याप्रमाणें २० लाख व इंग्रजी इतिहासकारांच्या म्हणण्याप्रमाणें कमींत

---

* केसरी, २६ ऑगस्ट १९०२

कमी तीन चार लाख सैन्य घेऊन औरंगजेब ज्यावेळीं बऱ्हाणपुराहून अहमदनगरास दाखल झाला त्यावेळीं गनिमी काव्याच्या युद्धपद्धतींत महाराष्ट्र देश चांगला मुरलेला होता व संभाजीच्या मृत्यूनंतर लायक लोकांच्या पदरीं पुढारीपणा पडल्याबरोबर प्रेतवत् झालेला महाराष्ट्र एकाएकीं औरंगजेबाच्या मागें पुढें, अगलबगलेस, आंत बाहेर चोहोंकडे नाचावयास लागून 'ही काय भूत चेष्टा, कीं मांत्रिक विद्येचा प्रभाव, कीं देवगणाची अजब करणी' असें बादशाही सेनेस होऊन गेलें, व बादशाहाच्या घोड्याहत्तींसहि पाण्यांत धनाजी व संताजी दिसूं लागले! बोअर लोकांच्या गेल्या तीन वर्षांच्या युद्धांत व महाराष्ट्राच्या या अजब युद्धांत हाच मोठा फरक आहे. इंग्रजी पद्धतीनेंच इंग्रजांना जिंकूं अशी बोअर लोकांना प्रारंभीं आशा होती; व खंदकांच्या त्यांच्या सार्वत्रिक युक्तीनें आणि सेनेच्या चपळाईनें ही आशा सफल होण्याचीहि प्रारंभीं कांहीं चिन्हें दिसलीं. पण इंग्रजांनीं जेव्हां दोन अडीच लाख सैन्य दक्षिण आफ्रिकेंत उभें केलें तेव्हां तोंडास तोंड देऊन हल्ला (Frontal Attack) चढविण्याची इंग्रजांना जरुरी न राहून सेनातिशयामुळें अगलबगलेस वळसा देऊन बोअर लोकांना चौगीर्द वेढण्यास त्यांना सहज संधी मिळाली. सेनातिशयाचा हा प्रभाव किंबर्ले मुक्कामीं सेनापति क्रांजी यांचे अनुभवास येऊन पारडेबर्ग मुक्कामीं तर तोफांची चौतर्फा मिठी बसली असतां कसा भयंकर परिणाम होतो हें बोअर लोकांच्या चांगलें प्रत्ययास आलें. नंतर थोडेच दिवसांत लॉर्ड रॉबर्टस यांनीं फ्रीस्टेटची राजधानी ब्लोएमफौंटेन घेतल्यावर क्रूनस्टॅड येथें बोअर पुढाऱ्यांची सभा होऊन यापुढें गनिमी काव्यानें लढावयाचें असा त्यांचा ठराव झाला. हा ठराव जर त्यांनीं लढाईचे प्रारंभींच केला असता आणि किंबर्ले, मॅफेकिंग, लेडीस्मिथ वगैरे ठिकाणीं तीन तीन चार महिने वेढे देऊन बसून शहरें काबीज करण्याच्या ते जर नादीं लागले नसते, आणि सदर शहरांत कोंडलेल्या

इंग्रजी सैन्याच्या पाठीवर, त्यांनीं गडबड करूं नये म्हणून योग्य तेवढें सैन्य ठेवून बाकीच्या सैन्यास जर त्यांनीं केपकॉलनी व नाताळ या प्रदेशांत सोडलें असतें, तर लढाईचा रंग याहून कांहीं निराळाच झाला असता. लेडीस्मिथचे वेढयाचे वेळीं जनरल बोथा यांनीं जनरल जोबर्ट यांजपाशीं वरील तऱ्हेची विनंति केली होती. पण त्या वृद्ध सेनापतीस ताज्या रक्ताच्या या मंडळीच्या तरतरीनें कदाचित् वाईट प्रसंग ओढवेल अशी भीति वाटल्यामुळें त्यानें जनरल बोथा याच्या म्हणण्यास रुकार दिला नाहीं. किंबलें, लेडी स्मिथ, मॅफेकिंग या शहराभोंवतीं बोअर सैन्यानें जो व्यर्थ कालक्षेप केला तो जर केला नसता तर नाताळांत टयुगेला नदी व केपकॉलनींत केपकॉलनीची उत्तर सरहद्द हीं इंग्रजांच्या तर्फेच्या लढाईचा पाया न होतां दक्षिण आफ्रिकेच्या किनाऱ्यास पोहोंचणारीं इंग्रजी जहाजें यांनाच लढाईचा पाया मानणें भाग पडलें असतें! क्रून्स्टॅडच्या सभेच्या वेळीं बोअर लोकांनीं गनिमी काव्यानें लढण्याचा केलेला ठराव जर आधीं एक वर्षभर पसार करण्यांत आला असता तर झांबेझी नदीपासून केपटाऊनपर्यंत सर्व दक्षिण आफ्रिका बोअर लोकांस पादाक्रांत करण्यास फारशी अडचण पडली नसती; क्रांजीसारखा नामांकित सेनापति शत्रूस शरण गेल्यानंतर बोअर सैन्याचें जें नुकसान झालें तें नुकसान होण्याचा प्रसंग न ओढवतां केपकॉलनींतील सर्व लोकांचें त्यांना सहाय्य मिळून कदाचित् परराष्ट्रांची मदतहि त्यांना सुरक्षितपणें पोहोंचली असती. साधी राहटी, सहनशीलता, चिकटपणा व रणभूमीची धूर्तता, केव्हां पळून जावें केव्हां मिळावें या संबंधाची सहजस्फूर्ति, स्वधर्मावर पूर्ण निष्ठा, परमेश्वर आपला पाठीराखा आहे ही पक्की खात्री, व या प्रचंड शत्रूस आपण अखेर जिंकणार ही पुरी उमेद मराठयांच्याप्रमाणेंच बोअर लोकांत दृष्टीस पडली. पण त्यांनीं प्रारंभींचा कांहीं काळ फुकट दवडल्यामुळें व इंग्रजांचाहि चिकटपणा विशेष असल्यामुळें त्यांच्या कृतीस मराठयांप्रमाणें

यश आलें नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, केपकॉलनींतील बोअर लोक त्यांचे सजातीय खरे, पण औरंगजेबाच्या अंमलाप्रमाणें इंग्रजी अंमल केपकॉलनींत असह्य झालेला नसल्यामुळें, धनाजी व संताजी यांना ज्याप्रमाणें कारोमांडल किनारा असो, दक्षिण कर्नाटक असो, गुजराथ असो किंवा वऱ्हाणपूर असो, सर्वच ठिकाणीं लष्करी दृष्टीची सरबराई यथेष्ट उपभोगावयास मिळाली, तशी स्थिति केपकॉलनींत उतरलेल्या बोअर लोकांची झाली नाहीं. किंबहुना लढाई सुरू होण्यापूर्वी केपकॉलनींतील बोअर तटानें प्रे. स्टीन व प्रे. क्रूगर यांना जितकी मदत देऊं म्हणून आश्वासन दिलें होतें तितकीहि मदत प्रसंगीं पोहोंचली नाहीं. जिंजीकडे औरंगजेबाची लवकर नजर जाऊं नये व महाराष्ट्रांतील गडकोट हस्तगत करण्याच्या खटपटीस औरंगजेबास विशेष व्यत्यय आणतां येऊं नये, ह्या लष्करी धोरणानें संताजी व धनाजी यांनीं ज्याप्रमाणें वऱ्हाणपूर, गुजराथ वगैरे प्रांतांत जाऊन औरंगजेबाचे दळणवळणाचे मार्ग बंद करण्याचा व रसीद लुटण्याचा उद्योग केला, त्याप्रमाणें ट्रान्सवाल व फ्रीस्टेट येथील इंग्रजांचा मारा ढिला पडावा म्हणून गनिमी काव्याच्या लढाईस सुरवात झाल्यानंतर केपकॉलनी व नाताळ यांजवर स्वारी करण्याचा बोअर लोकांनीं एक दोन वेळ प्रयत्न केला. धनाजी व संताजी यांना निरनिराळ्या देशांतील व प्रांतांतील साह्य पूर्णपणें झालें. डीवेट, डिलारे व बोथा यांना ठिकठिकाणच्या लोकवस्तीचें साह्य तसें होणें शक्य नव्हतें. तिसरी एक गोष्ट मराठ्यांना विशेष अनुकूल अशी होती, कीं नर्मदेच्या खालीं दक्षिणेस चोहोंकडे सर्व वस्तीमध्यें हिंदूंचें वर्चस्व होतें, व एका हातांत कुराण व एका हातांत तलवार अशा धर्तीच्या औरंगजेबी हट्टवादामुळें औरंगजेबाच्या शत्रूंना प्रत्येक हिंदु मनापासून दुवा देत होता; व मराठ्यांच्या लष्कराच्या भाकऱ्या वरचें पीठ व घरची लकडी घेऊन फुकट भाजण्याचा प्रसंग आला, तरी गांवेंच्या गांवें, खेडींच्या खेडीं, प्रांतच्या

प्रांत ती जुलमाची गुलामगिरी न समजतां निमूटपणें मराठ्यांस मदत करीत; व मुसलमानांचें जितकें अकल्याण होईल तितकें मराठ्यांनीं करावें म्हणून उत्तेजन देत. ट्रान्सवाल, फ्रीस्टेट, केप कॉलनी वगैरे ठिकाणची मुख्य वस्ती ना बोअरांची ना इंग्रजांची; तिथले नेटिव जरी या युरोपियनांचे दास बनले आहेत तरी मनाच्या उत्साहानें कष्ट सोसून एका पक्षास मदत करण्याची स्फूर्ति त्यांच्यांत दृष्टीस पडणें शक्य नाहीं. जो पैसा जास्ती देईल त्याचें काम आधीं करणारे हे गुलाम तयार होते. ह्यामुळें लोकवस्तीच्या सहानुभूतीचा खरा फायदा पैसेवाल्या इंग्रजांस मिळाला, कफल्लक बोअर लोकांस मिळाला नाहीं. बातमी काढण्याच्या कामीं व अन्नसामग्री इकडून तिकडे वाहून नेण्याच्या कामीं या नेटिवांचा इंग्रजांना फार उपयोग झाला. तीच स्थिति फिलिपाइन्सची पहा, म्हणजे आमच्या म्हणण्याचें स्वारस्य लक्षांत येईल. फिलिपाइन्सचे नेटिव लोक अमेरिकन अधिकाऱ्यांची दिवसा खुशामत करण्यास तयार, पण रात्र पडली कीं माना कापण्यास त्यांनीं तलवारी हातीं घेतल्याच म्हणून समजावें. एकंदरींत खऱ्या लोकवस्तीचें पाठबळ बोअर लोकांना नव्हतें, मराठ्यांना तें पूर्णपणें होतें. चौथी गोष्ट मराठ्यांच्या बाजूला अनुकूल अशी होती कीं, औरंगजेबानें केवढेंहि प्रचंड मुसलमानी सैन्य गोळा केलें तरी त्याला गांजण्यास पुरे इतकी तरुणबांड मंडळी मराठ्यांच्या भगव्या झेंड्याभोंवतीं गोळा न होण्याची बिलकूल शक्यता नव्हती. पण पंधरा वर्षांपासून पन्नास वर्षांपर्यंत बोअर पुरुषच सर्व मिळून ४०–५० हजारांहून अधिक नव्हते. इंग्रजांना तिन्हीचे पांच लाख करतां आले असते, पण दिवसानुदिवस ओहटीस लागलेली बोअरसंख्या अधिक होण्याचा बिलकुल संभव नव्हता. गोवळकोंडा व विजापूर येथील पातशाही औरंगजेबानें बुडविल्यामुळें दोहों दरबारांतील शेंकडों मराठी मानकरी अनाथ झाले होते, व प्रसंग पडेल त्याप्रमाणें ते कधी औरंगजेबासहि आपला

मालक म्हणत, व केव्हां संभाजीसहि मुजरा करीत. वरील दोन्ही दरबारांतून सुटलेलें सैन्य, सेनापति व दरबारी लोक मराठयांच्या गनिमी काव्यास जय येतोसा दिसण्याबरोबर हजारोंच्या हजारों भगव्या झेंडयासभोंवतीं गोळा होण्यास तयार होते. पण तशी स्थिति बोअर लोकांची नव्हती. बोअर लोकांना गनिमी काव्याच्या पद्धतीनें शेवटीं पूर्ण यश आलें नाहीं हा त्या पद्धतीचा दोष नसून, त्या पद्धतीस अनुकूल अशी परिस्थिति जितकी असावयास पाहिजे तितकी बोअर लोकांसंबंधानें नव्हती. मराठयांचा तलवार–भाला औरंगजेबाच्या तलवारभाल्याहून कमी योग्यतेचा नव्हता, किंबहुना मराठे लोक तलवारीचा उपयोग अधिक शिताफीनें करीत व भाला त्यांच्या हातांत जितक्या उत्सुकतेनें नाचे तितक्या उत्सुकतेनें तो मुसलमानांच्या हातांत रहात नसे. इंग्रजांच्यापाशीं ज्याप्रमाणें लांब पल्लयांची, बारीक भोंकाची व जलद उडणारी बंदुक होती तशीच बंदूक बोअर लोकांपाशींहि होती; किंबहुना बोअर लोकांच्या हातांतील बंदूक जितका नेमका नेम मारी तितका नेमका नेम इंग्रजी बंदुकीस साध्य नसे. औरंगजेबापाशीं मोठमोठया तोफा व अवजड सामान फार होतें. मराठे लोकांनीं या सर्वांस फाटा दिला असून त्यांचा सुटसुटीतपणा व चपळाई यामुळें, आज येथें तर उद्यां तेथें, असे चमत्कार औरंगजेबास त्यांना दाखवितां आले. पारडेबर्ग येथें क्रांजीनें अवजड सामानाचे नादीं लागून अपजय पदरीं घेतल्यानंतर क्रूनस्टॅड येथें गनिमी काव्याच्या पद्धतीचा ठराव बोअर लोकांनीं केल्यावर अवजड भांडयांस त्यांनीं मूठमाती दिली होती, व यामुळें त्यांचें सैन्य चपळ होऊन डी.वेट आज केपकॉलनींत तर उद्यां फ्रीस्टेटमध्यें, आज पूर्वेस तर उद्यां पश्चिमेस, असा बिजलीप्रमाणें फिरत राहून लॉर्ड किचनेरच्या अवजड कारखान्याची त्यानें नुसती एक प्रकारची गलद चालविली होती. ज्या भागांत औरंगजेबाचा विशेष सुळसुळाट नाहीं त्या भागांत लोक गोळा करून त्याच्या पिछाडीस

जाऊन त्याची रसीद मारून त्याला भलत्याच नादीं लावावयाचें व ह्यामुळें सांपडलेल्या संधींत आपली स्थिरस्थावर करावयाची, हें मराठ्यांचें मुख्य लष्करी धोरण होतें. बोअर लोकांनाहि हेंच धोरण ठेवावें लागलें. डिलारेवर इंग्रजी सैन्याचा खरा मोर्चा सुरू झाला म्हणजे डीवेटनें उघड्या पडलेल्या भागाची रसीद मारलीच. डीवेटवर चोहोंबाजूनें काहूर उसळलें म्हणजे बोथानें नाताळच्या सरहद्दीला धोका दिलाच व बोथावर सर्वांची नजर येऊन पडली म्हणजे डिलारेनें म्याथ्युएनसारखा एखादा सेनापति खाल्लाच म्हणून समजावें! एकाचा शह आपणावर घेऊन दुसऱ्यास जुळवाजुळव करावयास अवकाश द्यावयाचा व त्याची जुळवाजुळव झाल्यावर त्यानें तिसऱ्याची तवी कमी करावयाची हें धोरण दोन्ही युद्धांत सारखेंच दृष्टीस पडतें. लांब लांब मजला विरुद्ध पक्षाला न समजतां मोठ्या शिताफीनें केलेल्या दोन्ही युद्धांत दृष्टीस पडतात. पंढरपूर, सोलापूर, अहमदनगर हे जिल्हे औरंगजेबानें कायमचे व्यापले होते, तरी मराठी सैन्य कर्नाटकांतून निघून निरनिराळ्या तुकड्या करून औरंगजेबाच्याच अगलबगलेनें मोठ्या शिताफीनें उत्तरेस गेलें आहे व औरंगजेबाचेंच सामान लुटून पुनः औरंगजेबाच्याच बाजूनें स्वगृहीं उतरलें आहे. ब्लोएमफौंटेन येथें लॉर्ड रॉबर्टस यांनीं आपला तळ देऊन केपकॉलनींतील उत्तर सरहद्दीपासून ब्लोएमफौंटेनपर्यंतचा सर्व आगगाडीचा रस्ता आपले ताब्यांत घेऊन ठिकठिकाणीं लष्करी ठाणीं बसविल्यावर, केपकॉलनींत अडकलेलें बोअर सैन्य तेथील आपला सर्व बाजार गोळा करून बॅसिटो-लँडच्या सरहद्दीनें लेडीब्रँडवरून क्रून्स्टडला सुरक्षित जाऊन पोहोंचलें. डीवेटनेंहि अशाच तऱ्हेनें हुलकावणी दाखवून केपकॉलनीवर स्वारी केली, व इंग्रजी जाळ्यांतून निसटून उत्तरेचा आपला मार्ग सुरक्षितपणानें आक्रमिला. ह्या कामीं दोन्ही लोकांना देशांतील डोंगर, दऱ्या खोरीं व जंगल यांचें साह्य चांगलें

मिळालें, व त्यांचाच यांनीं पूर्णपणें उपयोग करून घेतला. सह्याद्री पर्वताचा, त्याच्या प्रत्येक दऱ्याखोऱ्यांचा, त्याच्या लहानसान टेकडयांचा, त्याच्या घाटांचा, त्याच्यांतील किल्ल्यांचा महाराष्ट्रावर एवढा प्रचंड व अतर्क्य उपकार आहे कीं, लोकांची आराध्यदेवताच सह्याद्रीस्वरूप होऊन देशाचें रक्षण करीत आहे असें त्यांस वाटल्यास नवल नाहीं ! डोंगराळ प्रदेश व शत्रूंस त्याच्या पूर्ण माहितीचा अभाव या दोहोंचा परिणाम बोअर युद्धांत व मराठयांच्या युद्धांत सारखाच दृष्टीस पडतो. सामनेवाल्यांच्या स्थितिसंबंधानें बोअर व मराठे यांचें सारखेंच नफानुकसान झालेलें दृष्टीस पडतें. बोअरयुद्ध सुरू होण्याच्या वेळीं इंग्रजी साम्राज्याचा ज्याप्रमाणें कळस झालेला होता त्याप्रमाणें हिंदुस्थानांतहि औरंगजेबाचे साम्राज्याचा मराठयांचे युद्धाचे वेळीं कळस झालेला होता. बोअर म्हणजे काय पदार्थ, आपण त्यांना सहज जिंकूं अशी ज्याप्रमाणें इंग्रजी सेनापतींना प्रारंभीं अत्यंत घमेंड होती, त्याप्रमाणें मराठयांवर स्वारी करण्याचीहि जरूरी नाहीं, असें औरंगजेबास वाटत असे. इंग्रजांच्या या घमेंडीचा प्रारंभीं बोअर लोकांस जसा फायदा मिळाला त्याप्रमाणें १६८४ पासून १६८९ पर्यंत संभाजींचे कारकीर्दीत व नंतरहि कांहीं काळ औरंगजेबानें मराठयांच्याकडे तितपतच लक्ष दिलें, हें त्यांच्या त्यावेळीं पथ्यावर पडलें. औरंगजेब वीस बावीस वर्षें दक्षिण प्रांतीं असतांहि उत्तरेकडील त्याच्या साम्राज्यांत यत्किंचितहि कमीपणा आला नाहीं. त्याप्रमाणें तीन वर्षें भयंकर लढाई लढत असतांहि इंग्रजांच्या साम्राज्यसामर्थ्यांत बिलकुल फरक पडला नाहीं. ही साम्राज्यसामर्थ्याची बळकटी बोअर व मराठे यांना सारखीच जाचली. १७०७ नंतर दिल्लीपतीचे नोकर व अंकित म्हणवून घेणारे शाहू महाराज साताऱ्यास आल्यावर दिल्लीपतीचें वर्चस्व (Suzerainty) कबूल करणारा राजा सातारचे गादीवर बसविण्यांत मराठे सरदारांना सोयच वाटली. औरंगजेबाचे सैन्यांत लायख सेनापति नसून साम्राज्याची मिजास

छावणींत दृष्टीस पडत असे, तीच स्थिति इंग्रजी सैन्याची दक्षिण आफ्रिकेंत होती; व याचा फायदा मराठे लोकांप्रमाणें बोअर लोकांनीं घेण्यास बिलकूल मार्गें पुढें पाहिलें नाहीं. औरंगजेबाच्या मुलांची महत्त्वाकांक्षा व सरदारांची महत्त्वाकांक्षा यामुळें छावणींतील अंतःस्थ अडचणी वाढून मराठ्यांस पुष्कळ प्रसंगीं निष्कारण सवलती मिळाल्या आहेत. पंधरा पंधरा, वीस वीस वर्षे गनिमी काव्याशीं टक्कर देण्याचा प्रसंग जर इंग्रजी सेनेस आला, तर घरांतल्या घरांत इंग्लंडांत दोन पक्ष झाल्यावांचून रहावयाचे नाहींत, हें तीन वर्षांच्याच इतिहासावरून सिद्ध होणारें आहे. औरंगजेबाच्या वेळची स्थिति निराळी होती; त्यावेळच्या त्यांच्या पुढाऱ्यांचें वळण निराळ्या तऱ्हेचे होतें. पण दहा दहा वीस वीस वर्षांच्या त्रासाच्या लढाईनें घरांतील तट जोरानें माजावेत ही साहाजिक गोष्ट आहे. अमक्याच्या भाषणामुळें बोअर लोक एक वर्ष अधिक लढले, तमक्याच्या लेखामुळें बोअर लढाईचें शेपूट तीन महिने जास्ती वाढलें, असले उद्गार जबाबदार प्रधानांकडून व मुत्सद्यांकडून बोअर लोकांच्या लढाईचे वेळीं खुद्द इंग्लंडांत कमी ऐकावयास मिळाले असें नाहीं. दोन दोन चार चार वर्षें लढाई चालून अपजयाची मालिका व पैशाचें नुकसान दृष्टीस पडूं लागलें म्हणजे इंग्लंड व फ्रान्स देशांत प्रधानमंडळाची उलथापालथ, सेनापतीचे राजीनामे व त्यांच्या कृत्यांच्या लष्करी चौकशा, सैन्याची नाखुषी, लोकांचे बंडावे हीं दृष्टीस पडतात; व लढाईचा भलताच शेवट होतो अशीं उदाहरणें इतिहासांत कमी नाहींत. मुसलमानी पुढाऱ्यांतील अंतस्थ मारामारीचा औरंगजेबाच्या स्वारीच्या पहिल्या सात आठ वर्षांनंतर मराठ्यांना जो फायदा मिळाला तो फायदा बोअर युद्धाचीहि चार पांच वर्षें निघून गेल्यावर बोअर लोकांनाहि खात्रीनें मिळाला असता.

असो; बोअर युद्धानें गनिमी काव्यावर व मराठ्यांच्या इतिहासावर जो प्रकाश पाडिला आहे त्याचें विवेचन येथपर्यंत करण्यांत आलें. हा विषय

जितका लांबचा तितका लांबणार असल्यामुळें व नऊ पुष्पांच्या पलीकडे दहावें पुष्प गुंफावयाचे नाहीं असा आम्ही प्रथमच संकल्प केला असल्यामुळें हीं नऊ पुष्पांचीच माला आज वाचकांस अर्पण करीत आहों. लष्करी कला व अर्वाचीन युरोपियन इतिहास या दोहोंची योग्य सांगड घालून त्या दृष्टीनें मराठ्यांच्या इतिहासाकडे पहाण्याची जिज्ञासा आमच्या लोकांत हल्लींहून अधिक दृष्टीस पडावयास पाहिजे. आमचें सामर्थ्य तरी कशांत होतें, हें लोकांना नीट समजणें जरूर आहे. आमच्या इतिहासाचा व आमच्या पूर्वजांच्या कृतींचा शोध या दृष्टीनें जितका अधिक होईल तितका होणें अत्यंत इष्ट आहे, असें आम्हांस वाटत असल्यामुळें वाचकांस या लांबलचक लेखमालेचा आम्हीं त्रास दिला. तथापि आमच्या हेतूकडे पाहून ते आम्हांवर रागावणार नाहींत अशी आम्हांस आशा आहे. आम्हीं या नऊ लेखांत जें विवेचन केलें तें फक्त दिग्दर्शनरूप आहे, त्याचा अधिक विचार होऊन मराठ्यांच्या इतिहासाचें खरें स्वरूप जर यामुळें लोकांस अधिक चांगलें कळून येईल, तर आमचे श्रम सफल झाले असें आम्हीं समजूं.

# * सुरतची राष्ट्रीय सभा

बंगालच्या फाळणीमुळें स्वदेशी व बहिष्कार या चळवळींस प्रारंभ होण्याच्या पूर्वी राष्ट्रीय-सभेच्या संबंधानें लोकांत उदासीनता उत्पन्न झाली होती. राष्ट्रीय सभेनें अंगिकारलेले जुने मार्ग निरर्थक आहेत, सभेकरितां दरसाल करावी लागणारी मेहेनत फुकट जात आहे व खर्च करावे लागणारे लाखों रुपये अनाठायीं खर्च होत आहेत, अशी विचारी व संमजस लोकांचीहि समजूत होऊं लागली होती. पण स्वदेशी व बहिष्कार या चळवळींस सुरवात झाल्यापासून निराश झालेल्या लोकांच्या मनाला नवीन उमेद आली. अंधःकारांतून चांचपडत आपण कोणीकडे तरी चाललों आहों असें मानणाऱ्या पुढाऱ्यांच्या दृष्टीला बंगाल्यांनीं सुरू केलेल्या चळवळीमुळें अदृष्टपूर्व उजेड दिसला. ही नवीन आशा—हा नवीन मार्ग—ही नवीन चळवळ—राष्ट्रीय सभेसंबंधाची उदासीनता नाहींशी करण्यास पुरेशी झाली. वीस बावीस वर्षांच्या खटपटीनें, दीर्घोद्योगानें व लाखों रुपयांच्या खर्चानें सर्व हिंदुस्थानास व्यापून राहणारी अशी एकच राजकीय संस्था—राष्ट्रीय सभा—उत्पन्न झालेली होती व या संस्थेच्या अंतःस्थ व बाह्य व्यवस्थेचा उपयोग—तिच्या निरनिराळ्या शाखांचा उपयोग—तिच्याकरितां मेहनत करणाऱ्या निरनिराळ्या पुढाऱ्यांचा व अनुयायांचा उपयोग लांब दूरवर दिसणाऱ्या नवीन उजेडाकडे सर्व राष्ट्रास नेण्याचे कामीं कां करण्यांत येऊं नये, अशी चोहोंकडे चर्चा सुरू झाली; व कार्यहीन, निस्तेज व नाउमेद झालेल्या राष्ट्रीय सभेस जिवंत करण्याची जादू नवीन चळवळींत आहे अशी सर्व विचारी लोकांच्या मनाची खात्री झाली. राष्ट्रीयसभेवर नवीन मताची,

---

* केसरी, ता. २१ डिसेंबर १९०७.

## नवीन प्रश्नाची छाप

न बसल्यास राष्ट्रीय सभा वृद्धावस्थेत जाऊन—स्वतःच्या प्रेरणेनें न हालणारी, न बोलणारी, न चालणारी, न डोलणारी होऊन—स्तब्ध व अचल राहाणाऱ्या पाण्याप्रमाणें आपोआप कुजणारी व दुर्गंध सोडणारी होऊन,—मंदबुद्धित्वामुळें, आळसामुळें, मानसिक ईर्षेच्या अभावामुळें, व शरीरास यत्किंचितहि तसदी न देणाऱ्या सुखेच्छेमुळें सजीव प्राणी गतिहीन होऊन जसा आपोआप शून्यत्वास जातो, त्या प्रमाणें राष्ट्रीय सभा नामशेष होणार असें प्रत्येकास वाटत होतें. काळ बदलला होता व राष्ट्रीय सभेनेंहि बदलणें जरूर होतें. नवीन चळवळ सर्व राष्ट्रभर पसरत चाललेली पाहिल्यावरहि राष्ट्रीय सभेनें जुन्याच मार्गाचें अवलंबन करणें, म्हणजे आगगाडीचा प्रसार पाहिल्यानंतर वडारांच्या तिकोनी चाकांच्या गाडींतून प्रवास करण्याची इच्छा धरण्यासारखें हास्यास्पद होय ! नवीन शक्तीचीं, नवीन योजनेचीं, नवीन कलेचीं व नवीन आकाराचीं चाकें राष्ट्रीय सभेच्या गाड्यास लावणें जरूर होतें. वडारी गाड्यांचीं लांबोडीं चाकें जशीं आपोआप कालमहात्म्यामुळें नाहींशीं झालीं त्याप्रमाणें राष्ट्रीय सभेंत नवीन तत्त्वांचा व नवीन पक्षाचा जीव व जोम न घातल्यास

## राष्ट्रीय सभा मरणार

हें प्रत्येक दूरदर्शी मनुष्यास स्पष्ट दिसत होतें. बंगालची फाळणी होऊन नवीन चळवळीस सुरवात झाल्याबरोबर वरील प्रकारें राष्ट्रीय सभेस मरूं द्यावयाची का जिवंत करून ताजी तवानी व तरतरीत करावयाची, या प्रश्नाची चर्चा सुरू झाली. काशीची राष्ट्रीय सभा भरण्यापूर्वी या संबंधानें बराच वाद झाला व काशीच्या राष्ट्रसभेला पूर्वीच्या बैठकीहून जें महत्त्व आलें होतें तें याचमुळें. सांचलेल्या पाण्याला आपण कुजत आहों हें समजत नाहीं; आळसांत लोळणाऱ्या स्वास्थ्यलोलुपांना कार्यहीन व गतिहीन झाल्यामुळें आपलें

नगर वाचनालय सातारा

संगणकीकृत

शरीर क्षणोक्षणी मरत आहे हें ध्यानांत येत नाहीं; त्या प्रमाणेंच राष्ट्रीय सभेची वतनदारी प्राप्त झाल्यामुळें धन्यता मानून कर्तव्यपराङ्मुख झालेल्या मुंबईच्या मक्तेदारांना, न कळत अज्ञानतः व केवळ आपल्या मिजासी-मुळेंच आपण

## राष्ट्रीय सभेचा खून

करीत आहों हें लक्षांत आलें नाहीं. बनारसच्या राष्ट्रीय सभेला या आराम-प्रिय मक्तेदारांची सर्व टोळी हजर नव्हती; त्यामुळें काशीक्षेत्रीं राष्ट्रीय सभेंत नवीन जीवाची थोडी थोडी धुगधुगी दिसूं लागली. राष्ट्रीय सभा भरविण्याची संयुक्त प्रांताची पाळी श्री काशीक्षेत्रीं फिरल्यानंतर खरें पाहूं गेलें असतां कलकत्त्याची लगेच पाळी नव्हती. पण नवीन मतांचा व नवीन पक्षांचा उदय बंगाल्यांत झाला असल्यामुळें राष्ट्रीय सभेचें पूर्ण पाठबळ नव्या चळवळीस मिळावें म्हणून राष्ट्रीय सभा कलकत्त्यास बोलावण्यांत आली. नवीन पक्षाची छाप राष्ट्रीय सभेवर बसावी, व नवीन चळवळीला राष्ट्रीय सभेचा पूर्ण उपयोग व्हावा म्हणूनच सांगून सवरून बंगाली लोकांनीं कलकत्त्यास राष्ट्रीय सभा भरविली. मिजासखोर जुन्या पुढाऱ्यांना नवीन चळवळीचें स्वरूप समजलें होतें व या नवीन चळवळींत सामील होण्याइतकी शारीरिक व मानसिक ताकद वयोमानामुळें व परिस्थितीमुळें त्यांच्यांत शिल्लक राहिली नव्हती. नवीन चळवळीचा उघडपणें धिःकार करण्याइतकें बुद्धिमांद्य त्यांच्यांत नव्हतें व नाहीं; पण चळवळीशीं तादात्म्य पावून, सरकारच्या अवकृपेस पात्र होऊन आपली मिजास सोडण्यास ते तयार नव्हते. कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं दोन्ही पक्षांची सामान्यतः स्थिति वरील प्रकारची असल्यामुळें दोन्ही पक्ष तडजोडीस येऊन स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या संबंधाचे ठराव राष्ट्रीय सभेंत एकमतानें पास झाले. नवीन पक्षाचा सर्व कार्यक्रम कलकत्त्याच्या बैठकींत

नगर वाचनालय, सातारा. नगर वाचनालय, सातारा.


पास झाला नाहीं, पण राष्ट्रीय सभा खुंटल्यासारखी स्तब्ध व गतिहीनहि झाली नाहीं. दोन्ही पक्षांमध्यें अशा रीतीनें एकमत झाल्यामुळें

## कलकत्त्याची तडजोड

सर्व राष्ट्रांत पसंत पडली व राष्ट्रीय सभा सजीव होणार, असें वाटून सर्वांना आनंद झाला. कलकत्त्याची राष्ट्रीय सभा झाल्यानंतर नवीन पक्षास उघड-पणें छळण्यास सरकारनें सुरवात केली व त्यामुळें आरामप्रिय पुढाऱ्यांच्या टोळींत एकच धांदल उडून गेली. राष्ट्रीय सभेवर कलकत्त्यास नवीन पक्षाची छाप बसली हें आपल्या मिजाशीस—आपल्या आरामास—व अधिकारी वर्गाशीं होत असलेल्या आपल्या संघटणास हितावह नाहीं, हें मुंबईच्या वतनदारांच्या ध्यानांत आले. कै. न्या. रानडे यांच्या मृत्यूनंतर मुंबईच्या वतनदाराच्या कृपा-कटाक्षामुळें पुण्यांतील जुन्या पक्षाचें अधिकारीवर्गाशीं संघटण कायम टिकलेलें असल्यामुळें पुण्यांतील जुन्या पक्षाला नवीन मतें बुद्धिग्राह्य वाटत असलीं तरी सर फेरोजशहा मेथा यांचा कच्छ सोडतां येणें शक्य नव्हतें. लाला लजपतराय यांना हद्दपार केल्यानंतर, म्हणजे सहा महिने पूर्वीपासून नवीन पक्षाची छाप राष्ट्रीय सभेवर बसूं द्यावयाची नाहीं, मग राष्ट्रीय सभा मेली तरी पत्करली, असा वतनदारांचा संकल्प झालेला होता. अधिकारी वर्गाशीं असलेलें संघटण तोडण्याचा प्रसंग न येतां जर राष्ट्रीय सभा वर्षानुवर्ष भरवितां आली तर त्यांना ती पाहिजे होती. अधिकारी ‘ गडी फू ’ न करतील असलेंच स्वरूप राष्ट्रीय सभेचें कायम ठेवण्याचा त्यांचा दृढ निश्चय होता. अधिकारी वर्गाशीं बोलण्याचालण्यांत अधिकारी वर्गानें ठरविलेल्या तर्कशास्त्राच्या व शिष्ट—सांप्रदायाच्या दृष्टीनें कमीपणा न येईल येवढी खबरदारी घेण्यांतच

## जुन्या पक्षाचें जीवनसर्वस्व

आहे, हें वाचकांनीं ध्यानांत ठेविलें म्हणजे मवाळ व जहाल यांच्यामध्यें

नागपुरांत तंटे कां झाले; राष्ट्रीय सभेकरितां हरतऱ्हेची मेहनत करण्यास, पराकाष्ठा करून राष्ट्रीय सभेचा सर्व खर्च सोसण्यास, व जुन्या पक्षास यत्किंचितहि तकलीफ न देण्यास नागपुरास नवा पक्ष तयार झाला असतांहि नागपूरच्या मवाळ पक्षानें राष्ट्रीय पक्षाशीं संबंध ठेवून राष्ट्रीय सभेचें काम चालू देण्याचें कां नाकारलें; हें वाचकांच्या ध्यानांत येईल. नागपुराहून राष्ट्रीय सभेस सुरतेस नेण्याचेंहि इंगित हेंच होय. नव्या पक्षास राष्ट्रीय सभेवर आपली छाप दरसाल अधिकाधिक बसवावयाची होती. अशा रीतीनें दरसाल आस्ते आस्ते पुढें पाऊल टाकून कलकत्त्यास पुनः राष्ट्रीय सभा भरण्याचे सुमारास म्हणजे आणखी चार पांच वर्षांनीं राष्ट्रीय सभेच्या मतांत व नवीन पक्षाच्या मतांत अंतर उरलें नसतें. जुन्या पक्षास ह्या पुढें पडणाऱ्या पावलास मागें ओढावयाचें होतें, या चालत्या गाड्यास खीळ घालावयाची होती, इतकेंच नव्हे तर उलट दिशेनें पलायन करावयाचें होतें. गती खुण्टवावयाची नव्हती तर मागें कोलांट्या खाण्यास राष्ट्रीय सभेला जुना पक्ष सांगत होता. ही

## उलटी उडी

मारण्याच्या कामाची तयारी सुरतेस सुरू झाली. मुंबईच्या इंदुप्रकाशानें व सोशियल रिफॉर्मरनें ना. फिरोजशहा मेथा यांनीं ढोलकें वजावल्याबरोबर उलटी उडी मारण्यास सज्ज असणाऱ्या सर्व लवचिक शरीराच्या व लवचिक मनाच्या मवाळांनीं सुरतेस हजर रहावें म्हणून जाहीर केलें. सर मेथा यांच्या मजलसींत अशा प्रकाराचा नाच नाचण्यांत येणार हें कळल्याबरोबर राष्ट्रीय पक्षाचें मन उद्विग्न झालें. दादाभाई नवरोजीसारख्या वयोवृद्ध, तपोवृद्ध व ज्ञानवृद्ध पुढाऱ्यानें कमावलेल्या राष्ट्रीय सभेच्या तेवीस वर्षांच्या पुण्याईचे उदक अधिकारी वर्गाच्या हातावर सोडण्यास सर मेथा यांचें खिलाडू मंडळ सुरतेस मागें पुढें पाहणार नाहीं, हें ऐकून राष्ट्रीय पक्षांतील सर्व विचारी लोकांचा जीव हळहळला. मागें पळणाऱ्या रावबाजीनें पेशवाईच्या पुण्याईचें

उदक साहेबाचे हातावर सोडलें त्या प्रमाणें राष्ट्रीय सभेच्या बावीस वर्षांच्या तपश्चर्येचें उदक मोर्ले-मिंटो यांच्या हातावर सोडलें न जातां लोकांच्या हातावर सोडलें जावें म्हणून

## सुरतेस राष्ट्रीय पक्षाची तयारी

सुरू झाली. सुरतेस येणाऱ्या प्रतिनिधींमध्यें मवाळ पक्षाचीच संख्या अधिक असणार हें राष्ट्रीय पक्षास पूर्वीपासून माहीत होतें. मताधिक्य आपल्या बाजूचें असल्यावर राष्ट्रीय सभेस उलट्या उड्यांची पिछेहाटीची गति देऊन, स्वतःस भ्रामक स्वास्थ्याचा मोबदला मिळविण्याकरितां राष्ट्रीय सभेची पूर्वीची पुण्याई खर्च करण्यास मवाळपक्षास पंचाईत पडावी म्हणून अध्यक्षाच्या निवडणुकीपासूनच विरुद्ध ठराव सभेपुढें आणण्याचा राष्ट्रीय पक्षाचा विचार होता. राष्ट्रीय सभेच्या मतासंबंधाचे व अध्यक्षासंबंधाचें ठराव एकोप्यानें, एकविचारानें, व साधक बाधक प्रमाणांचा नीट खल करून राष्ट्रीय सभेपुढें मांडतां यावेत म्हणून

## राष्ट्रीय पक्षाची परिषद

मंगळवार व बुधवार दोन दिवस सुरतेस भरली होती. राष्ट्रीय पक्षाचे प्रतिनिधी, या परिषदेस हजर रहातां यावें म्हणून मंगळवारीं किंवा मंगळवारचे पूर्वीच, सुरतेस जमले होते. या परिषदेकरितां ठिकठिकाणचे बंगाल, मद्रास, संयुक्त प्रांत, नागपूर, वऱ्हाड, मुंबई इलाखा वगैरे प्रांतांतील सुमारे ६५०–७०० लोक आले होते. या सर्व प्रतिनिधींची उतरण्याची, जेवणाखाणाची व परिषदेंतील व्यवस्थेची जबाबदारी सुरतेंतील राष्ट्रीय पक्षाचे पुढारी मि. कसनजी कुवरजी देसाई, वकील यांनीं आपल्या अंगावर घेतली होती ना. मेथा-गोखले यांच्या सुरतेंतील अनुयायांनीं मि. देसाई यांचें काम जितकें त्रासाचें होईल तितकें करण्याचा शक्य तेवढा प्रयत्न केला. सुरतेच्या स्टेशनावर राष्ट्रीय सभेकरितां आलेल्या राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधींना 'नॅशनॅलिस्ट

कॉन्फरन्स' करितां उतरण्याची वगैरे सोय कोठें केली आहे याचा पत्ता देखील सांगण्याचा सभ्यपणा सुरतेच्या रिसेप्शन कमिटीच्या अनुचरांनीं दाखविला नाहीं. रिसेप्शन कमिटीच्या मंडपांत न उतरतां 'नॅशनॅलिस्ट कँप'मध्यें उतरणार असें सांगण्याबरोबर स्टेशनवरील मेथा–गोखले यांच्या अनुचरांच्या कपाळाला आंठ्या चढत व राष्ट्रीय पक्षाला यत्किंचितहि माहिती मिळूं नये म्हणून त्यांची जीभ जेथल्या तेथें अचल होई. इतकेंच नव्हे तर प्रतिनिधींनीं आपण होऊन गाडीवाल्यापासून पत्ता घेऊन गाडींत बसण्याची तयारी केली असतां मेथा–गोखले यांच्या स्टेशनावर असलेल्या शिष्य मंडळींनीं गाडीवाल्यापाशीं असलेलें आपलें वजन खर्च करून प्रतिनिधींना रस्तोरस्तीं ' नॅशनॅलिस्ट कँप 'चा पत्ता विचारीत, पायी भटकत आपल्या उतरण्याच्या जागेकडे रखडत जाण्यास भाग पाडल्याचींहि उदाहरणें आहेत. ' नॅशनॅलिस्ट कँप ' करितां प्रथम भाड्यानें घेतलेलीं घरें मि. देसाई यांजपाशीं घरवाल्यांनीं आयत्यावेळीं ठेवलीं नाहींत, कारण कांहींना अशी धमकावणी देण्यांत आली कीं, जे कोणी अशा रीतीनें राष्ट्रीय पक्षास मदत करतील त्यांजवर घरपट्टी किंवा इनकम टॅक्स वाढविण्याइतका अधिकारी वर्ग हलकट होण्याचा संभव आहे ! मेथा–गोखले यांच्या कंपूचे अशा तऱ्हेचे एक ना दोन कित्येक शिष्टाचार पदोपदीं प्रत्ययास येत चालले व राष्ट्रीय पक्षाचे प्रतिनिधि तीन चारशें येतील असा अन्दाज असतां नॅशनॅलिस्ट कँपमध्यें ६००।७०० लोक एकंदरीनें गोळा झाले. यामुळें मि. देसाई व सुरतेंतील राष्ट्रीय पक्ष ह्यांना अतोनात कष्ट करावे लागले. ही परिस्थिति ध्यानांत घेतां ' नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्स ' करितां आलेल्या प्रतिनिधींची रहाण्याची, जेवणखाणाची व कॉन्फरन्स भरविण्याची इतकी समाधानकारक व्यवस्था कशी ठेवण्यांत आली यांचेंच सर्वांना आश्चर्य वाटलें. आम्हीं वर सांगितलेंच आहे कीं,

## सुरतेचें लोकमत

फार पूर्वीपासून मवाळ पक्षाच्या मुठींतलें होतें. सुरतेचे लोक राष्ट्रीय पक्षाचा, राजकीय चळवळीचा, किंवा सांप्रतच्या अस्वस्थतेचा विचार करूं लागून ते मवाळ पक्षाचे झाले होते अशांतला भाग नव्हता. सुरत निजली होती व मवाळ पक्षाचे अग्रणी ना. मेथा यांच्या गुजराथवर असलेल्या साहजिक छापे-मुळें सुरतेस मवाळांच्या गोठ्यांत ढकललें जात होतें. सुरतेच्या लोकांचा मुंबईच्या व्यापाऱ्यांशीं विशेष संबंध व त्यांतल्या त्यांत जवाहिराचे–सोन्या-मोत्याचे–सराफी धंद्यांतले मुंबईतील सर्व व्यापारी सुरतेचे; हे लोक आपल्या उद्योगधंद्यांत गढून गेलेले असल्यामुळें राजकीय परिस्थितीकडे त्यांचें जितकें लक्ष जावयास पाहिजे होतें तितकें गेलेलें नव्हतें. ही स्थिति पालटावी, सुरत जागृत व्हावी व राष्ट्रीय सभेतील प्रश्नासंबंधानें सुरतच्या लोकांनीं नीट विचार करावा, म्हणून सुरत शहरांत मध्यभागीं असलेल्या खुल्या चौकांतील उर्फ

## बालाजीच्या टेकडीवरील व्याख्यानें

राष्ट्रीय पक्षाकडून सुरू करण्यांत आलीं. राष्ट्रीय सभा भरण्याचे अगोदर आठ दिवस रा. दादासाहेब खापर्डे यांनीं गुजराथी भाषेंतहि जाहीर व्याख्यान-माला सुरू करून राष्ट्रीय सभेचा इतिहास, राष्ट्रीय सभेचें धोरण, स्वदेशी, बहिष्कार वगैरे विषय सुरतेच्या लोकांना समजावून दिले. सोमवार व मंगळ-वार दोन दिवस वरील ठिकाणीं रा. टिळक यांची जाहीर व्याख्यानें झालीं. राष्ट्रीय पक्षाची सांप्रतची खटपट कशाकरितां आहे, राष्ट्रीय सभा काय मागत आहे, व राष्ट्रीय सभा मोडण्यानें दोन्ही पक्षांचें नुकसान असल्यामुळें राष्ट्रीय सभा मोडण्याचा नव्या पक्षाचा इरादा कसा नाहीं, हें रा. टिळक यांनीं आपल्या भाषणांत ५–६ हजार श्रोतृवृन्दास समजावून सांगितलें. रा. खापर्डे व रा. टिळक यांच्या व्याख्यानांमुळें सुरतेंतील लोकमत जागृत झालेलें पाहून मवाळ पक्षाकडून एक

## नीचपणाचें हस्तपत्रक

सर्व सुरतभर वाटण्यांत आलें. रा. खापर्डे यांचीं व्याख्यानें निस्तेज करण्याचा दि. ब. अंबालाल साकरलाल व मि. अली महंमद भीमजी यांनीं प्रयत्न केला होता; पण तो फसला. रा. टिळक यांचीं व्याख्यानें लोकांनीं न ऐकून ध्यावीं म्हणून या नीचपणाच्या हस्तपत्रकाचें अस्त्र सोडण्यांत आलें होतें. रा. टिळक यांचे हेतू व शब्द यांचा हलकटपणानें विपर्यास करण्याचे कामीं तयार असलेले एक पटाईत मवाळ मुंबईस आहेत. यांनीं ' केसरीं 'तील कांहीं म्हणींची व शब्दांची ओढाताण करून गुजराथच्या लोकांना असें जाहीर केलें कीं, रा. टिळक सर फेरोजशहा यांस कुत्रा म्हणतात व गुजराथी लोकांना षंढ समजतात ! सदर हस्तपत्रकांत याच विपर्यासाचा अनुवाद करून सुरतेच्या लोकांना रा. टिळक यांच्या विरुद्ध चेतविण्यांत आलें होतें. सर मेथा यांनीं सुरतेस कॉंग्रेस कां नेली, यासंबंधानें लिहितांना ' प्रत्येक कुत्रा आपल्या गल्लींत शेर होतो ' ह्या म्हणीचा उपयोग केल्यानें सर मेथा यांना, तूं कुत्रा आहेस, अशी शिवी दिल्यासारखें होत नाहीं. कारण तसें जर असतें तर कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेवर नव्या पक्षाची छाप बसली म्हणून केसरींत प्रतिपादन केल्याबद्दल ना. गोखले यांच्या पुण्याच्या दिवटीनें 'गच्छ सूकर भद्रं ते ब्रूहि सिंहो मया जितः ! ' हें सुभाषित वापरून डुक्कर म्हणून ' केसरी 'स शिवी दिली असें मवाळांनीं कबूल केलें असतें ! न्यायमूर्ति तेलंग व विष्णु-शास्त्री चिपळूणकर यांच्या संबंधानें लिहितांना ' विष्णु आणि तेलंग ' या मथळ्याखालीं वरील सुभाषिताचा ' केसरी 'नें उपयोग केलेला आहे. त्या-वेळीं न्या. तेलंग यांना डुक्कर म्हणून ' केसरी 'नें शिवी दिली, असला कोटिक्रम कोणीच केला नव्हता. म्हणींचा व सुभाषितांचा उपयोग ज्यांना समजत नाहीं ते पुच्छविषाणहीन पशूच होत व मुंबईच्या प्रतिष्ठित मवाळांत असल्या अरसिक

## पुच्छविषाणहीनांचा भरणा

विशेष असल्यामुळें वरील विपर्यास करण्यांत आला. अरसिकपणाचाच हा प्रश्न असता तर एक वेळ गोष्ट क्षम्य होती. पण बुद्धिपुरःसर विपर्यास करण्याचा हा प्रयत्न होता हें खालील हकीकतीवरून ध्यानांत येईल. सांप्रत मराठी भाषेमध्यें व मराठींतील वर्तमानपत्रांतून नव्या व जुन्या पक्षाला जहाल व मवाळ या संज्ञा वारंवार देण्यांत येतात. ' केसरी 'त वरील शब्द ठिकठिकाणीं दृष्टीस पडतात. ना.गोखले याच्या प्रकाशांत हेच शब्द चमकत असतात. सर भालचंद्र किंवा न्या. चंदावरकर यांच्या आश्रयाखालील पत्रांतून हेच शब्द वापरण्यांत येतात. अमका तमका मनुष्य किंवा पुढारी मवाळ आहे अगर जहाल आहे असें वर्णन करण्यांत येतें. पण मुंबईच्या ' गुजराथी ' पत्रांतील इंग्रजी प्रतिष्ठितांच्या चष्म्यांतून मवाळ शब्द ज्यावेळीं गुजराथींत गेला त्यावेळीं त्याचें किंचित् वक्रीभवन होऊन ' नपूंसक ' या अर्थीं गुजराथी भाषेंत जो शब्द वापरण्यांत येतो, तसलें स्वरूप ' मवाळ ' या शब्दास देण्यांत आलें ! हा जाणून बुजून पाजीपणाचा उद्योग आहे, हें मुंबईच्या कांहीं प्रतिष्ठितांना समजावयास पाहिजे होतें. ' केसरी 'नें गुजराथ्यांनाच मवाळ म्हटलें होतें असें नाहीं, तर ना. गोखले, सर भालचंद्र वगैरे पुढारी पुरुषांनाहि ' मवाळ ' ही संज्ञा दिली होती. एका भाषेंतील ' बोली ' केव्हां केव्हां दुसऱ्या भाषेंतील ' गाली ' होत असते; हें ठाऊक असतांनाहि ज्या हलकटांनीं वरील निंद्य मार्ग आक्रमिला त्यांच्या मनांतील हेतु काय होता हें वाचकांना सांगण्याची जरूरी नाहीं. सदर हस्तपत्रिकेचें खंडण पद्धतशीर व गुजराथी लोकांना समजेल अशा पद्धतीनें रा. टिळक यांनीं दुसऱ्या भाषणांत केलें व हें खंडण बरोबर आहे असें अहमदाबादचे वकील रा. संघवी यांनीं आपल्या व्याख्यानांत प्रतिपादन केलें.

## मंगळवारचीं व्याख्यानें

या एवढ्याच जाहीर पत्रकासंबंधानें नव्हतीं; तर त्या प्रसंगीं रा. टिळक

यांनीं स्वदेशी व बहिष्कार या संबंधाचीं तत्त्वें लोकांना नीट समजावून सांगून राष्ट्रीय सभेला मागें ओढण्याचा कसा उद्योग चालला आहे याचें वर्णन केलें आणि राष्ट्रीय सभा मागें ओढल्यानें राष्ट्राचें हित होत आहे अगर होणार आहे, अशी कोणाची समजूत असल्यास सुरतच्या लोकांसमोर बालाजीच्या टेकडीवर तसें सिद्ध करावें, म्हणून रा. टिळक यांनीं आव्हान केलें. त्या सात आठ हजार लोकांच्या गुजराथी समुदायाला रा. टिळक यांचें म्हणणें पटून नव्या पक्षास सुरतेचें लोकमत अनुकूल झालें. त्याचप्रसंगीं सरदार अजितसिंग, दिल्लीचे मि. हैदर रेझा व ‘ काळ ’कर्ते रा.परांजपे व कलकत्त्याच्या ‘ वन्दे-मातरम् ’ पत्राचे बाबू अरविंद घोष यांचीं व्याख्यानें झालीं. बाबू अरविंद घोष यांनीं सुरतेच्या लोकांना अशी विनंति केली कीं, ज्या राष्ट्रीय कामा-करितां बंगालचे लोक सरकारी छळ सोसण्यास तयार झाले आहेत, ज्या राष्ट्रीय जागृतीकरितां बंगालच्या तरुणांना कारागृहवास आनंदाचा वाटतो, ज्या राजकीय चळवळीकरितां बंगाल्यांतील हजारों तरुण व्याख्यानें देत व लोकांच्या अब्रूचें संरक्षण करीत स्वदेशी व बहिष्कार यांच्या पताका हातीं घेऊन फिरत आहेत, त्या राष्ट्रोन्नतीस स्वतः मदत करण्याची जर कोणाची छाती नसेल तर त्यांनीं या चळवळींत सामील होऊं नये. सामील न झालां तर निदान स्वस्थ बसा. बंगालला मागें ओढण्याचा प्रयत्न करणें म्हणजे काम करणारा हात गप्प बसणाऱ्या हातानें तोडून टाकण्याचा उद्योग करण्यासारखें आहे. तुमच्या हातून सरकारी छळ सोसवत नसेल, द्रव्यद्वारा किंवा शरीर झिजवून मदत करण्याची तुमची इच्छा नसेल, तर निदान बंगाल्याविषयीं सहानुभूति दाखवा; कष्ट करून, हालअपेष्टा सोसून व स्वार्थत्याग करून बंगालनें जर राजकीय हक्क मिळविले तर ते एकट्या बंगालपुरतेच मिळ-णारे आहेत असें नाहीं; तर सर्व हिंदुस्थानला त्याचा उपयोग होणार आहे. अशा प्रसंगीं बंगाल निराळा, गुजराथ निराळा, मुंबई इलाखा निराळा असे

भेद करणें आत्मघाताचें होय. बाबू अरविंद घोष यांच्या ह्या हृदयद्रावक भाषणाचा जमलेल्या लोकांवर चांगला परिणाम झाला व बंगाली लोकांनीं सोसलेल्या व सोशीत असलेल्या हालअपेष्टांचें वर्णन ते करीत असतांना श्रोतृवृन्द सद्गदित होऊन बंगाल्यांविषयींच्या सहानुभूतीच्या अश्रुधारा गुजराथ्यांच्या डोळ्यांतून वाहिल्या! सुरतचें लोकमत अशा रीतीनें नव्या पक्षाला अनुकूल झालें खरें, पण सर मेथा यांच्या खाकेंतील मवाळांवर त्याचा कांहीं एक परिणाम झाला नाहीं. राष्ट्रीय पक्षाचें म्हणणें काय आहे हें शांत चित्तानें ऐकून घेण्यास तेविसाव्या राष्ट्रसभेचे सूत्रधारी गुजराथी केव्हांहि तयार झाले नाहींत, ही दोन्ही पक्षाच्या दुर्दैवाची गोष्ट होय. सामान्य बहुजनसमाजाला आपलीं मतें समजावून देण्याचा राष्ट्रीय पक्षानें सुरतेस प्रयत्न केला एवढेंच नव्हे, तर राष्ट्रीय सभेच्या सूत्रधारांचे कानीं आपलें म्हणणें पडावें व दोन्ही पक्षांत कांहीं तरी तडजोड निघावी म्हणून राष्ट्रीय पक्षाकडून शक्य तितकी खटपट करण्यांत आली. या प्रसंगाची हकिकत कथा-प्रसंगानें पुढें येणार असल्यामुळें

## नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्स

मंगळवार व बुधवार रोजीं कां व कशी भरविण्यांत आली व त्यामध्यें काय ठरलें, हें वाचकांस अगोदर समजलें पाहिजे. नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्सचें अध्यक्ष-स्थान सर्व प्रसंगीं बाबू अरविंद घोष यांना देण्यांत आलें होतें. सेक्रेटरी रा. नरसिंह चिंतामण केळकर यांना नेमण्यांत आलें. राष्ट्रीय सभेमध्यें नॅशनॅलिस्ट उर्फ राष्ट्रीय पक्षानें कोणत्या धोरणानें वागावें यासंबंधानें एकमत करण्या-करितां ही परिषद भरलेली होती. राष्ट्रीय पक्षाची स्थिति काय आहे, मतें कोणचीं आहेत व राष्ट्रीय सभेंत या पक्षाचें कितपत वजन पडेल यासंबंधानें रा. टिळक यांनीं पहिले दिवशीं विवेचन केलें. स्वातंत्र्याची हांव प्रत्येक राष्ट्रानें कशी धरली पाहिजे, पूर्ण स्वातंत्र्य मनुष्यास पूर्णत्वास नेणारें कसें

असतें, वगैरेसंबंधानें मिल्ल स्पेन्सरसारख्या तत्ववेत्त्यांच्या सिद्धांतांना व विचारांना अनुसरून राष्ट्रीय सभेनें आपलें सरशेवटचें धोरण ठरविल्यास अशा तात्त्विक विचारसरणीला पीनलकोड कसें आडवें येऊं शकत नाहीं, याचा त्यांनीं प्रथम उहापोह केला. या तात्त्विक अंतिम हेतूनंतर वसाहतींतल्यासारख्या स्वराज्याला राष्ट्रीय पक्षाचे धोरणांत दुसरें पद दिलें पाहिजे, असें प्रतिपादन करून आज खरोखर आचरणांत आणावयाच्या गोष्टी म्हटल्या म्हणजे स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या होत असें त्यांनीं सांगितलें. यानंतर

## राष्ट्रीय सभेची विच्छेदाट

करण्याचा मवाळ पक्षानें कसा उद्योग चालविला आहे याचें त्यांनीं वर्णन केलें. मुंबईचा इंदुप्रकाश व सोशियल रिफॉर्मर हीं दोन्हीं पत्रें सर फेरोजशहा मेथा यांच्या अंत:पुरांतील असून त्या पत्रांनीं कलकत्त्यास पुढें पडलेलें पाऊल यंदा मागें ओढलें पाहिजे व या कामीं बिलकूल तडजोड होऊं देतां कामा नये असें स्पष्टपणें प्रसिद्ध केलें होतें; हें कॉन्फरन्सपुढें मांडण्यांत आलें. सुरतच्या रिसेप्शन कमिटीनें हातीं घ्यावयाच्या विषयांसंबंधानें ज्या तारा सर्व हिंदुस्थानभर पाठविल्या होत्या त्या तारांत स्वराज्याच्या विषयाचा नामनिर्देशहि नव्हता; बहिष्काराचा उल्लेखहि नव्हता. वंगभंगाचा प्रश्न घेणार म्हणून जाहीर केलें होतें व वंगभंगाचें शेंपूट म्हणून बहिष्काराचा ठराव नमूद करण्याचा रिसेप्शन कमिटीचा विचार असल्यास न कळे. तारेंत स्वदेशी चळवळ घेण्यांत येईल असें सांगण्यांत आलें होतें व स्वदेशी ठराव म्हणजे कलकत्त्यांतीलच स्वदेशी ठराव, असा लोकांना भास होऊन तेवढ्या पुरतें तरी बरें वाटलें होतें. राष्ट्रीय शिक्षणाच्या ऐवजीं शिक्षण येवढेच नुसते शब्द होते. ना. मेथा यांनीं सुरतेस राष्ट्रीय शिक्षणाचे ठरावास प्रांतिक सभेंतून धुडकावून लाविलें होतें. ह्या गोष्टी ध्यानांत ठेविल्या असतां कलकत्त्याच्या राष्ट्रीय

सभेनें अंगिकारलेलें धोरण सोडून देऊन मागें पलायन करण्याचा मेथा–गोखले आणि कंपनीचा कसा विचार आहे हें कोणासहि सहज समजेल, असें रा. टिळक यांनीं सर्वांस सांगितलें. यानंतर वादविवाद होऊन स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण यांसंबंधाचे गतसालचे ठराव सुरतच्या सूत्रधारांनीं घेण्याचें नाकारल्यास अध्यक्षांच्या ठरावापासून विरुद्ध मतें द्यावीं असें ठरविण्यांत आलें. असा ठराव पास झाल्यानंतर साताऱ्याचें रा. दादासाहेब करंदीकर यांनीं अध्यक्षांच्या ठरावापासूनच उलट मतें देण्यास प्रारंभ करूं नये, अशासंबंधानें लोकांपुढें आपले विचार मांडण्याचा प्रयत्न केला; अध्यक्षांनीं ठराव पास झाल्यावरचें हें भाषण आहे असें सांगितल्यामुळें त्यांस खालीं बसावें लागलें. कॉन्फरन्सचे सेक्रेटरी रा. केळकर यांनीं कान्फरन्समध्यें पास झालेल्या या ठरावाची माहिती ना. गोखले यांना देऊन अनुकूल प्रतिकूल मतें मोजण्याची तजवीज करण्याकरितां विनंति करावी, असें ठरविण्यांत आलें. कॉन्फरन्सचें त्या दिवसाचें काम संपल्यानंतर रा. केळकर यांनीं ना. गोखले यांजकडे जाऊन वरील प्रकारें प्रत्यक्ष विनंति केली. शिवाय या दिवशींच्या कान्फरन्समध्यें आम्ही राष्ट्रीय पक्षाचे आहों, अशा सह्या देऊन ना. गोखले यांच्या सर्व्हण्टांपैकीं दोन तीन सर्व्हण्ट हजर होते. तेव्हां नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्समध्यें काय झालें या संबंधानें विरुद्ध पक्ष अज्ञानांत होता, असेंहि म्हणण्यास त्या दिवशीं जागा राहिली नव्हती. दुसरे दिवशीं म्हणजे

## बुधवार

रोजीं सकाळीं, नॅशनॅलिस्ट कान्फरन्समध्यें राष्ट्रीय सभेची पीछेहाट न होऊं देण्यासंबंधाचा सर्वानुमतें जो ठराव झाला होता, त्या ठरावास राष्ट्रीय सभेच्या कँपमध्यें उतरलेल्या प्रतिनिधींपैकीं किती प्रतिनिधि अनुकूल आहेत हें पहाण्याकरितां रा. टिळक तिकडे गेले होते. या ठिकाणीं येवढें सांगितलें पाहिजे कीं, स्टेशनावर राष्ट्रीय सभेच्या कित्येक प्रतिनिधींना रिसेप्शन कमि-

टीच्या लोकांनीं कांहीं एक माहिती न देऊन अडविल्यामुळें ब-याच लोकांना—विशेषतः मद्रासी प्रतिनिधींना—इच्छा नसतांहिं विरुद्ध पक्षाचे गोटांत उतरावें लागलें होतें. म्हणून या लोकांपैकीं नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्सचे ठरावाला किती लोक अनुकूल आहेत हें पहाण्याकरितां रा. टिळकांना बुधवारी सकाळीं तिकडे जावें लागलें. तेथें रा. टिळक यांनीं नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्सच्या ठरावाची माहिती जमलेल्या प्रतिनिधींना करून दिली व आदले दिवशीं पास झालेला ठराव त्यांचें संमतीकरितां पुढें मांडला. या ठरावाविरुद्ध तेथें रा. गोविंदराव देवल, कोल्हापूरचे रा. डॉक्टर कुळकर्णी, मुंबईच्या स्वदेशी वस्तु प्रचारिणीचे बॅरिस्टर गाडगीळ व अली महंमद भीमजी यांनीं विरुद्ध भाषणें केलीं. मद्रासचे सुब्रम्हण्य अय्यर व साताऱ्चे दादासाहेब करंदीकर यांचीं अनुकूल भाषणें झालीं. तेव्हां राष्ट्रीय सभेची पिच्छेहाट होतां कामा नये या मतास विरुद्ध पक्षाच्या गोटांत उत्तरलेल्या ब-याच महाराष्ट्रीय प्रतिनिधींचें अनुकूल मत पडलें. यासंबंधानें अनुकूल प्रतिनिधींच्या सह्या घेण्याचें काम साताऱ्चें वकील रा. प्रधान यांजकडे सोंपविण्यांत आलें. याच सुमारास म्हणजे बुधवारीं सकाळीं राष्ट्रीय सभेच्या सूत्रधारांकडूनच

## दोन महत्त्वाचे कागद

प्रसिद्ध करण्यांत आले. राष्ट्रीय सभेची पिच्छेहाट होणार आहे असें नॅशनॅलिस्ट पक्षाचें असलेलें म्हणणें खोटें असल्याविषयीं ऑनररी सेक्रेटरी मि. गांधी यांच्या सहीनें एका कागदांत जाहीर करण्यांत आलें होतें. दुसऱ्या कागदांत ना. गोखले यांचा राष्ट्रीय सभेच्या रचनेच्या ठरावाचा मसुदा दिला होता. बुधवारीं दोन प्रहरीं नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्सला पुन्हां जेव्हां सुरवात झाली, त्यावेळीं रा. टिळक यांनीं गांधींचें जाहीर पत्रक प्रथम लोकांना वाचून दाखविलें. सर्व ठरावांचे मसुदे प्रसिद्ध करण्याचें सोडून एवढेंच जाहीर पत्रक वतनदारांनीं कां प्रसिद्ध केलें, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. ठरा-

यांच्या मसुद्यासंबंधानें बुधवारीं सकाळीं मागणी करण्यांत आली होती. पण हे मसुदे दुसरे दिवशीं राष्ट्रीय सभेच्या कामास सुरवात होईपर्यंत नॅशनॅलिस्ट पक्षास मिळाले नाहींत. बुधवारीं दोनप्रहरीं मुंबईस निघणाऱ्या ॲडव्होकेट पत्रामध्यें ठरावांचा मसुदा प्रसिद्ध होतो; पण सुरतेस बुधवारच्या दिवशीं इतकेंच नव्हे तर गुरुवारींहि दोन वाजेतोंपर्यंत तो मसुदा नॅशनॅलिस्ट पक्षाच्या दृष्टीस पडत नाहीं, ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट होय. असो. बुधवारच्या नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्समध्यें मि. गांधी यांच्या चिठ्ठींतील उत्तर कसें असमाधानकारक आहे हें सांगितल्यावर ना. गोखले यांच्या कॉंग्रेसच्या रचनेच्या ठरावाची चर्चा करण्यास रा. टिळक यांनीं सुरवात केली. नामदार गोखले यांच्या या कागदांत प्रारंभीं

## राष्ट्रीय सभेचा राजकीय धर्म

कोणता हें सांगितलें आहे. अमकीं अमकीं मतें ज्यांचीं आहेत ते खिस्ती, अमके तमके विचार किंवा आचार ज्यांचे आहेत ते हिंदू किंवा मुसलमान असें जसें मानण्यांत येतें, त्याचप्रमाणें ना. गोखले यांच्या कागदांत कोणत्या मताचा स्वीकार केला असतां मनुष्य कॉंग्रेसवाला होईल, हें नमूद करण्यांत आलें आहे. या मतांना कॉंग्रेसवाल्यांचा राजकीय धर्म असें थोडक्यांत म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्रजी साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांत ज्याप्रकारचें स्वराज्य आहे त्याप्रकारचें स्वराज्य हिंदुस्थानासहि असावें असें सदर कागदांत ना. गोखले यांनीं राष्ट्रीय सभेचें अंतिम साध्य दिलें आहे. कलकत्याला पास झालेल्या स्वराज्याच्या ठरावांत स्वराज्याचे हक्क ज्या इंग्रजी वसाहतींना आहेत त्या वसाहतींतल्यासारखें स्वराज्य हिंदुस्थानला पाहिजे असें स्पष्ट म्हटलें आहे. ' स्वराज्याचे हक्क उपभोगणाऱ्या वसाहतींसारखें ' हे शब्द गाळल्यानें माल्टा, सीलोन, हाँगकाँग, अंदमान वगैरे ठिकाणच्या सारखी राज्यव्यवस्था असल्यास आम्हांस बस आहे, असें कबूल

केल्यासारखें होतें. ' स्वराज्य असणाऱ्या वसाहती' यांच्यासारखें स्वराज्य ज्यांना स्पष्टपणें मागावयाचें नव्हतें, ते ना. गोखले, दादाभाई नौरोजी यांनीं पुढें ठेवलेल्या व कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेनें पास केलेल्या स्वराज्याच्या ठरावाविरुद्ध सुरतेस बुधवारीं होते असें मानण्यास कोणती हरकत आहे ? दादाभाई नौरोजी यांनीं कलकत्त्यास राष्ट्रीय सभेचे अंतिम हेतू काय आहेत हें किंवा राष्ट्रीय सभेच्या ध्येयाची व्याख्या कशी करावयाला पाहिजे हें ' स्वराज्य ' शब्दानें ठरविलें. या अंतिम हेतूला जाऊन पोहोंचण्याचे

## राष्ट्रीय सभेचे मार्ग

कोणते हेंहि कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेच्या ठरावांत नमूद झालेलें आहे. स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या ठरावांच्या रूपानें विवक्षित स्वरूपाचा अडवणुकीचा मार्ग राष्ट्रीय सभेनें कलकत्त्यास आंखून दिला आहे. तो मार्ग ना. गोखले यांना पसंत नाहीं; म्हणून राष्ट्रीय सभेचा मार्ग कोणता हें सांगतांना त्यांनीं वरील कागदांत लिहिलें आहे कीं, राज्यकर्त्यांच्या मार्फतच हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत कांहीं सुधारणा घडवून आणावयाच्या तर केवळ सनदशीर मार्गानें गेले पाहिजे. ह्या म्हणण्याचा अर्थ केवळ ' राज्यकर्त्यांच्या मार्फत व राज्यकर्त्यांच्या इच्छेनुरूप ' ह्या पलीकडे कांहीं होऊं शकत नाहीं. ना. गोखले यांनीं दिलेलें राष्ट्रीय सभेचें अंतिम साध्य व तो हेतु तडीस नेण्याकरितां त्यांनीं दाखविलेला मार्ग हीं नीट तपासून घेतलीं म्हणजे दादाभाई नवरोजी ह्यांचे स्वराज्याला धाब्यावर बसवावें लागतें; व विनंति करून, अर्जी करून, भीक मागून राज्यकर्त्यां-मार्फत करून घ्यावयाच्या सुधारणेशिवाय हिंदुस्थानांत सनदशीर राज्यपद्धत सुरू करण्याची हांव सोडून द्यावी लागेल. ना. गोखले यांच्या व्यवस्थेस कबूल व्हा, असें नॅशनॅलिस्ट पक्षाला सांगणें म्हणजे तापी नदींत जीव द्यावयास सांगण्यासारखेंच होतें ! कलकत्त्यास पास झालेल्या वरील चार ठरावांस सोडून

देण्यास नॅशनॅलिस्ट पक्षास सांगणें म्हणजे आत्महत्या करण्याचा उपदेश राष्ट्रीय पक्षास करण्यासारखें होतें ! मवाळ पक्षाकडून कांहीं विशेष सवलती मागण्याचा राष्ट्रीय पक्षाचा हेतु नव्हता. पण या मसुद्यानें राष्ट्रीय सभेला तंगडी ओढून मागें ढकलण्याचा सर मेथा व ना. गोखले यांचा स्पष्ट उद्योग होता, असें सिद्ध होत होतें; इतकेंच नव्हे तर या रचनेंतील पुढील कलमें अशा स्वरूपाचीं आहेत कीं, मागें ओढलेल्या राष्ट्रीय सभेनें पुढें कधींकाळींहि डोकें काढूं नये. जे लोक वरील तत्त्वें कबूल करणार नाहींत, त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या प्रांतिक कमिट्यांत असूं नये, त्यांनीं जिल्हा कमिटींत बसूं नये व जिल्हा कमिटीशिवाय इतर कोणीहि राष्ट्रीय सभेस प्रतिनिधी निवडून देऊं नये, असें या मसुद्यांत ना. गोखले यांनीं ठरविलें होतें ! ज्या सूत्रधारांचें म्हणणें हा मसुदा पास व्हावा असें होतें, ते सूत्रधार स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या ठरावांना अनुकूल होते असें म्हणणें म्हणजे स्वतःच स्वतःच्या मतांशीं विरुद्ध वागण्यास ते तयार होते असें म्हणण्यासारखें वेडेपणाचें होय. ना. गोखले यांच्या रचनेचा मसुदा राष्ट्रीय सभेच्या स्वराज्याच्या ठरावाविरुद्ध होता, इतकेंच नव्हे तर राष्ट्रीय सभेतून

## नव्या पक्षाची हकालपट्टी

करण्याकरितां पुढें आणलेला होता हें उघड आहे. सुरतेच्या राष्ट्रीय सभेंत कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंतील वरील चार ठरावांस शब्दशः चिकटून रहाण्याचा राष्ट्रीय पक्षानें जर निश्चय केला नसता व ना. गोखले यांचा रचनेचा ठराव जर पास होऊं दिला असता, तर राष्ट्रीय पक्षानें स्वतःच्याच हातानें स्वतःचीच मुंडी मुरगळल्यासारखें झालें असतें. वरील ठरावानें

## जगावें वा मरावें

अशा प्रकारची स्थिति मवाळांनीं राष्ट्रीय पक्षाची केलेली होती. वरील चार

ठराव नाहींत व ना. गोखले यांचा रचनेचा मसुदा आहे, असें झालें असतें तर नॅशनॅलिस्ट पक्ष मेल्यासारखाच झाला असता. राष्ट्रीयसभेचें पाऊल पुढें टाकण्याचा नॅशनॅलिस्ट पक्षाचा इरादा नव्हता; स्वतः मान्यतेनें जिवंत करें रहावें एवढयापुरतीच त्यांची खटपट चालली होती. वनवासांतून परत आल्यावर पूर्वीचें वैभव नाहीं तर नाहीं, पण निदान नुसतें मान्यतेनें चार चौघांत जिवंत रहातां यावें म्हणून पांडवांनीं केवळ पांच गांवांवर समाधान मानून घेऊन आम्हांस तुझ्याच राज्यांत

## जिवंत रहाण्याची सोय

कर, म्हणून जशी अखेरची विनंति दुर्योधनाला केली, त्याप्रमाणें दादाभाई नवरोजींनीं पास केलेले चार ठराव तेवढे तरी देऊन राष्ट्रीय सभेंत आम्हाला जिवंत ठेवा, मग पाहिजे त्यास राष्ट्रीय सभेच्या गादीवर बसवून पाहिजे तशी राष्ट्रीय सभेचीं सूत्रें चालवा, अशी अखेरची विनंति करण्याचें नॅशनॅलिस्ट पक्षानें ठरविलें. या निर्वाणीच्या विनंतीलाहि मवाळ पक्षाच्या अध्वर्यूंनीं मान न दिल्यास अध्यक्षाच्या निवडणुकीस प्रतिकूल मत देण्याचा नॅशनालिस्ट पक्षानें ठराव केला. ज्यांना नॅशनॅलिस्ट पक्षाचा ठराव पसंत असेल व त्याप्रमाणें राष्ट्रीय सभेंत वागण्यास जे तयार असतील त्यांनींच केवळ बुधवारीं सायंकाळीं भरणाऱ्या नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्सच्या तिसऱ्या बैठकीस यावें असें ठरवून मंडळी सभास्थानांतून बाहेर पडली. गोखल्याचे सर्व्हंट व त्यांच्यासारखी इतर मंडळी सभेंत येऊन बसल्यामुळें आपल्या पक्षाची बरोबर संख्या किती आहे हें समजणें कठीण पडलें; म्हणून वरील प्रकारचा ठराव पास करावा लागला. दोन प्रहरची बैठक संपून सायंकाळचे बैठकीस सुरुवात होण्यापूर्वी

## लाला लजपतराय मध्यस्थ

होऊन दोन्ही पक्षांत समेट होणार, अशीं चिन्हें दिसूं लागलीं. कारण याच

नगर वाचनालय

वेळेला लाला लजपतराय नॅशनॅलिस्ट कँपमध्यें आले होते; व नॅशनॅलिस्ट पुढारी आणि लालाजी यांचें मध्यस्थीसंबंधानेंच बरेच बोलणें झालें होतें. अध्यक्षासंबंधाचा आग्रह सोडून दिल्यास पूर्वीचे चार ठराव कायम ठेवण्याविषयीं आपण मध्यस्थी करून यश मिळवूं, अशी लालाजींची समजूत होती. गेल्या सालीं कलकत्त्यास दादाभाई नवरोजी यांचें जसें थाटाचें स्वगत झालें त्याचप्रमाणें यंदा सुरतकरांनीं लालाजींचें स्वागत केलें होतें. त्यांच्या स्वागताकरितां भव्य कमानी उभारल्या होत्या; चोहोंकडे तोरणें व निशाणें लाविलीं होतीं; नरनारींनीं रस्ते, खिडक्या व सज्जे गच्च भरून गेले होते आणि त्यांच्यावर फुलांचा व माळांचा एकसारखा वर्षाव होत होता; त्यांच्या गाडीचे घोडे सोडून स्वयंसेवकांनीं त्यांची गाडी ओढून नेली. सदर प्रसंगीं ना. गोखले यांना लालाजींनीं आपल्या गाडींत घेतले होते, पण गाडी निघावयाच्या वेळीं व मध्यें ना. गोखले यांनीं लालाजीबरोबर मिरवूं नये, असे लोकांनीं स्पष्ट उद्गार काढल्यामुळें लाला लजपतराय यांना एकट्यांनाच सुरतकरांच्या स्वागताचा स्वीकार करीत आपल्या कँपकडे जावें लागलें! डॉ. राश बिहारी घोष यांची मिरवणूक लालाजींच्या मिरवणुकीपुढें अगदीं फिकी पडली. सुरतच्या प्रांतिक सभेच्या वेळीं सर भालचंद्र यांना सर मेथा यांच्या स्वागतानें जसें ग्रासून टाकिलें होतें त्याप्रमाणें डॉ. घोष लालाजींपुढें कलाहीन व मागासल्यासारखे दिसले. सुरतकरांना अशा रीतीनें प्रिय झालेला मनुष्य मध्यस्थी करण्यास तयार झालेला पाहून आपल्या

## प्राणावरचें संकट

टळलें, असें नॅशनॅलिस्ट पक्षाला वाटून बराच आनंद झाला. कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंतील चारहि विषय घेणार आहेत अशी बातमी लालाजींनी रा. टिळक यांना दिली. मंगळवार सायंकाळीं व बुधवार दोनप्रहरीं नॅशनॅलिस्ट कान्फरन्समध्यें कोणते ठराव पास झाले व ना. गोखले यांचा राष्ट्रीय

सभेच्या रचनेचा मसुदा वरील चार ठरावांचे विरुद्ध कसा आहे हें रा. टिळक यांनीं लालाजींच्या कानावर घातलें. नॅशनॅलिस्ट पक्षाच्या पुढाऱ्यांनीं राष्ट्रीय सभेच्या सूत्रधारांना भेटून एकमेकांनीं एकमेकांच्या शंका दूर कराव्या, म्हणजे दोन्ही पक्षांत समेट होण्यास हरकत येणार नाहीं, असें या भेटींत ठरलें. लालाजींनीं या भेटीनंतर सर्व गोष्टी ना. गोखले यांना कळवावयाच्या व ना. गोखले सांगतील त्याप्रमाणें त्याच रात्रीं नॅशनॅलिस्ट पक्षानें नेमलेल्या कमिटीनें त्यांना भेटावयाचें, असें ठरवून लालाजी स्वस्थानाप्रत परत गेले. लालाजी परत गेल्यानंतर नॅशनॅलिस्ट पक्षाच्या बैठकीस पुनः सुरवात झाली. गाळलेले विषय घेण्याकडे विरुद्ध पक्षाचा कल आहे, व मध्यस्थामार्फत समेट होण्याचा रंग आहे, असें मंडळीला रा. टिळक यांनीं सांगितलें. त्यानंतर कलकत्याच्या सभेतील चार ठराव घेण्याचें आश्वासन मिळाल्यास अध्यक्षा-संबंधाचा वाद सोडून देण्याचें कबूल करण्याची परवानगी पुढाऱ्यांना देण्यांत आली व वरील चार ठरावांत थोडकासा फेरबदल करण्याचा विरुद्ध पक्षानें जर हट्ट धरला व तो फेरबदल नॅशनॅलिस्ट पक्षास प्राणघातक जर नसला तर तो मान्य करण्याचीहि परवानगी नॅशनॅलिस्ट कमिटीला देण्यांत आली. कमिटीचे अधिकार अशा रीतीनें नमूद करण्यांत आल्यानंतर बंगाल-तर्फे बाबू अरविंद घोष, मुंबईतर्फे रा. टिळक, पंजाबतर्फे डॉ. मुकर्जी, नागपूरतर्फे डॉ. मुंजे, मद्रासतर्फे मि. चिदंबरम् पिल्ले, वऱ्हाडतर्फे रा. खापर्डे व युक्त प्रांतातर्फे मि. सेन यांची कमिटी नेमण्यांत आली. या कमिटीनें वरील अधिकाराप्रमाणें विरुद्ध पक्षाशीं समेट करावा, व समेट झाल्यास अध्यक्षाच्या निवडणुकीच्या वेळीं नॅशनॅलिस्ट पक्षानें विरुद्ध मतें देण्याचें कारण नाहीं, असें ठरविण्यांत आलें. अशा रीतीनें नॅशनॅलिस्ट कान्फरन्सचें दुसऱ्या दिवशींचें काम संपून सभासद आपल्या बिऱ्हाडाकडे गेले. दोन पक्षांमध्यें वरील तत्त्वावर समेट घडवून आणण्याच्या बुद्धीनें कलकत्याहून निघालेले अमृत

बझार पत्रिकेचे वयोवृद्ध संपादक बाबू मोतिलाल घोष हेहि सुरतेस पोहोंचून नॅशनॅलिस्ट कँपमध्यें रहावयास आले. मुंबईचे कांहीं गृहस्थ मध्यस्थीच्या उद्योगांत होते; लाला लजपतराय व बाबू मोतिलाल घोष यांनीं मध्यस्थीचें काम अंगिकारल्यामुळें समेट हां हां म्हणतां घडून येईल, असें वाटून नॅशनॅलिस्ट पक्ष त्या रात्रीं आनंदांत होता. लाला लजपतराय यांनीं नॅशनॅलिस्ट पक्षाचा निरोप ना. गोखले यांजकडे नेलाच होता. त्यांजकडून उत्तर रात्रीं जरी आलें नाहीं तरी गुरुवार सकाळपर्यंत येईल असें वाटलें होतें. बंगाली पत्रांत बाबू सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनीं राष्ट्रीय सभेची पिछेहाट होऊं देतां कामा नये, असें जाहीर केलेलें असल्यामुळें त्यांचाहि मध्यस्थाप्रमाणें उपयोग करून घेण्याकरितां बाबू मोतिलाल घोष व कमिटीचे सभासद गुरुवारीं सकाळीं त्यांजकडे गेले.

## सुरेंद्रबाबूंची भेट

घेतल्यानंतर राष्ट्रीय पक्षाचें म्हणणें त्यांजपुढें मांडण्यांत आलें, व बंगाळच्या या वृद्ध भीष्मानें नॅशनॅलिस्ट पक्षाच्या म्हणण्यास आपली संमति दिली. परंतु सुरतच्या राष्ट्रीय सभेच्या सूत्रधारांच्यातर्फें आपणास आश्वासन देतां येत नाहीं—तेव्हां तुम्ही रिसेप्शन कमिटीचे चेअरमन मि. माळवी यांना भेटा, असें सांगून बाबू सुरेंद्र यांनीं त्यांजकडे बोट दाखविलें. ना. गोखले यांजकडे जाऊन मध्यस्थी करण्याचें काम लाला लजपतराय यांनीं पत्करलेंच होतें. ना. गोखले यांनीं आदल्या दिवशीं रात्रीं राष्ट्रीय सभेच्या कँपांतील प्रतिनिधींना असें व्याख्यान दिलें होतें कीं, त्यांच्याविषयीं केसरीनें उगीच खोट्यानाट्या गोष्टी प्रसिद्ध केल्या असून राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधि त्यांच्याप्रमाणें वागण्यास व मतें देण्यास जर तयार झाले नाहींत तर एका पंधरा दिवसांचे आंत दंडुकेशाही गाजविण्यास सरकार चुकणार नाहीं. ना. गोखले यांच्या या धमकावणीचा त्यांना पाहिजे होता तसा परिणाम प्रतिनिधींच्या

मनावर झाला नाहीं; कारण मि. अली महंमद भीमजी यांनीं ना. गोखले यांचा पुढारीपणा कबूल करून त्यांजवर पूर्ण विश्वास टाकण्याचा ठराव पुढें आणला असतां तो पसार झाला नाहीं! समेट घडवून आणण्यापेक्षां तंटा करण्याच्या तयारींत ना. गोखले यांनीं बुधवारची रात्र घालविली, असें वरील हकिकतीवरून वाचकांचे ध्यानांत येईल. सुरेंद्रबाबूंची भेट घेतल्यानंतर रिसेप्शन कमिटीचे चेअरमन मि. माळवी यांना भेटण्याचा कमिटींतील लोकांनीं प्रयत्न केला. पण देवपूजेच्या व जपजाप्याच्या सबबीवर त्यांनीं भेटण्याचें नाकारलें! ना. गोखले यांचीहि गांठ पडली नाहीं. लाला लजपत-राय यांचीहि भेट झाली नाहीं. दोन प्रहरीं राष्ट्रीय सभा भरण्याचे सुमारास लालाजींची गांठ पडली. त्यांनीं असें सांगितलें कीं, ना. गोखले यांजकडे त्यांनीं नॅशनॅलिस्ट पक्षाची हकीकत कळविली; पण त्यांजकडून कांहींच उत्तर न आल्यामुळें लालाजींनाहि कमिटीला अर्थात् कांहींच निरोप कळवितां आला नाहीं. समेट करण्याची मवाळ पक्षाची बुद्धि दिसत नाहीं, असाहि आपला अभिप्राय यावेळीं त्यांनीं कमिटीपाशीं सांगितला. सर मेथा, ना. गोखले वगैरे मंडळी बहिष्काराच्या ठरावासंबंधानें समेट करण्यास तयार नव्हतीच व बहिष्काराचा ठराव कबूल करून समेट करण्यापेक्षां राष्ट्रीय सभा मोडून एकीची बेकी होऊन दुही माजलेली पत्करली असा

## सर मेथा यांचा हट्ट

होता. डॉ. राशबिहारी घोष यांनाहि बेकीच पाहिजे होती. राष्ट्रीय पक्षाशीं समेट करून सरकारच्या अवकृपेस पात्र होण्यापेक्षां राष्ट्रीय पक्षास लाथाडून देण्यास ना. गोखले तयार होते. ह्याची गांठ घे, त्याला भेट, अशा रीतीनें मवाळ-पक्षाच्या पुढाऱ्यांच्या दारोदार नॅशनॅलिस्ट कमिटी फिरत असतां त्यांच्याकडे ढुंकूनहि न बघण्याइतका दोनबोटाचे अंतरावर स्वर्ग मवाळपक्षाच्या पुढा-ऱ्यांना उरला होता! अशा स्थितींत नॅशनॅलिस्ट कमिटीनें मि माळवी यांची

गांठ घेण्याचा शेवटचा प्रयत्न अध्यक्षांच्या तंबूशेजारीं केला. मंडपांत काय होईल तें होईल, समेटाची बात अगाऊ कुछ नाहीं, अशा रीतीनें वागण्याचा विरुद्ध पक्षाचा संकल्प असल्याबद्दल कमिटीस समजलें होतें-दुर्योधनानें पांडवांना अखेरीस, यावद्धि तीक्ष्णया सूच्या विध्येदग्रेण केशव । तावदपरित्याज्यं भूमेर्नः पांडवान् प्रति ॥ या श्लोकांत वर्णिल्याप्रमाणें सुईच्या अग्रावर राहण्याइतकीहि भूमि देणार नाहीं म्हणून निक्षून सांगितलें, त्या प्रकारचीच वरील प्रकारची सूचना होती. पण आपणावर बोल येऊं नये म्हणून रा. टिळक यांनीं मि. माळवी यांची गांठ घेण्याचा शेवटचा प्रयत्न केला. या वेळीं उद्दामपणाचें असें उत्तर आलें कीं, अध्यक्षसाहेबांची स्वारी मंडपाकडे जावयास आतां इतक्यांत निघणार असल्यामुळें तुमच्याशीं बोलण्यास बिलकूल फुरसत नाहीं ! हें उत्तर मिळाल्यावर कमिटींतील लोक नॅशनॅलिस्ट सभासदांना

## समेट होत नाहीं

ही बातमी कळविण्याकरितां मंडपाकडे आले. सुरतच्या राष्ट्रीयसभेचा मंडप सात आठ हजार लोकांना बसण्याइतका टोलेजंग उभारला होता; बाहेरून दिसण्यांत भव्य व आंत निरनिराळया रंगांच्या चित्रविचित्र देखाव्यांनीं व हंड्या झुंबरांनीं सुशोभित केला होता. निम्मा भाग प्रेक्षकांसाठीं राखून ठेवला होता; निम्या भागांत प्रतिनिधींची बसण्याची सोय केली होती. अध्यक्षांसाठीं सुंदर उच्चासन तयार केलें होतें व या उच्चासनाच्या दोनहि बाजूंला रिसेप्शन कमिटींतील चार पांचशें गुजराथी व मुंबईकर सभासदांना बसण्याच्या उच्च जागा मांडल्या होत्या. खालच्या जागेमध्यें एका कडेच्या कोपऱ्यांत नागपूरच्या सभासदांची सोय केली होती, व दुसऱ्या कडेच्या कोपऱ्यांत महाराष्ट्रीयांना कोंबण्यांत आलें होतें ! राष्ट्रीय पक्षाचे एकंदर प्रतिनिधि सहाशेंपासून सातशेंपर्यंत होते, व अध्यक्षांच्या ठरावालाहि प्रतिकूल मत देण्यास पांचशें पासून साडेपांचशें प्रतिनिधि तयार होते. स्वदेशी, बहिष्कार वगैरे ठरावांना

सर्व बंगाली अनुकूल होते व इतर प्रांतांतील सभासदांपैकीं निम्याहून अधिक लोक तरी राष्ट्रीय पक्षास मिळाले असते. मवाळ पक्षास कांहीं झालें तरी चिकटून असणारे असे पांच सहाशेंच सभासद होते. अध्यक्षाच्या प्रश्नासंबंधानें दोनहि पक्षांकडे ठाम नाहींत असे असलेले त्रयस्थ जरी मवाळ पक्षाकडे जाण्याचा संभव होता, तरी वादाच्या चार ठरावांसंबंधानें

## राष्ट्रीय पक्षाचें मताधिक्य

सुरतच्या राष्ट्रीय सभेंत मतेंच घेण्याचा प्रसंग आला असता तर दिसल्याविना राहिलें नसतें. राष्ट्रीयपक्षानें आपली शक्ति अशारीतीनें दाखविली असल्यामुळें सर मेथा, ना. गोखले, किंवा डॉ. घोष यांच्या दुराग्रहाच्या हट्टाशिवाय इतर कोणत्याहि कारणानें समेटाचें बोलणें फोल होणार नाहीं, अशी समजूत सभामंडपांत प्रतिनिधींचा जमाव पाहून राष्ट्रीय पक्षांतील प्रतिनिधींची व प्रेक्षकांची झालेली होती. आपल्या शक्तीविषयींचा प्रत्यक्ष पुरावा, आपल्या मागणीच्या न्यायीपणाविषयींची मनाची खात्री, व असें असतांनाहि धर्मराजाप्रमाणें निव्वळ जिवंत राहण्याची परवानगी आपण मागत असल्यामुळें उत्पन्न झालेल्या या उदारतेचा साहजिक दिलदारपणा, इत्यादि शांततेचे व समाधानाचे मनोविकार या प्रसंगीं राष्ट्रीय पक्षाचे चेहऱ्यावर खेळत होते. चांगलें काम करीत आहों, सत्कृत्यांत आपण गुन्तलों आहों, या भावनेमुळें उत्पन्न झालेली प्रसन्नता अध्यक्ष येण्यापूर्वी थोडीं मिनिटें एकदम नाहींशी झाली. नाशिकचे वकील रा. खेर यांनीं समेट होत नाहीं ही बातमी वज्राघाताप्रमाणें अकस्मात् सर्व लोकांना सांगितली व त्यामुळें प्रसन्नतेच्या ऐवजीं सर्व मंडपभर एकाएकीं

## उद्वेग व क्रोध

याची छटा दिसूं लागली. समेटाच्या समाधानांत गुंग असलेले लोक कड्यावरून लोटून दिल्याप्रमाणें निराशेच्या खड्ड्यांत पडले, व सर्व

समाजाच्या मताची एकदम चलबिचल झाली. दर्या शांत असतां एकाएकीं तुफान होऊन पर्वतप्राय लाटा उसळाव्या व चोहोंकडे कल्लोळ–कोलाहल–माजून दिशाभूल व्हावी त्याप्रमाणें पुढें काय करावें हें कोणासच समजेनासें झालें. इतक्यांत ना. गोखले व सर मेथा यांना पाठीशीं घेऊन

## अध्यक्षांची स्वारी

सभामंडपांत येऊन थडकली. अध्यक्ष डॉ. राशविहारी घोष यांना पहाण्या-बरोबर प्रेक्षकसमुदायांतील वादळास पुनः नवीन जोर आल्यासारखें झालें, व ( Shame Shame ) धिःकार, धिःकार, अशा आरोळ्यांनीं सर मेथा, ना. गोखले व डॉ. घोष यांना पहिली सलामी देण्यांत आली ! रिसेप्शन कमिटीं-तील उच्चासनावरून टाळ्यांचा लटपटीत आवाज निघाला खरा, पण चोहोंबाजूंनीं आकस्मिक पाण्याचा वर्षाव झाल्यामुळें घो घो आवाज करीत सर्व सृष्टीच्या कानठळ्या बसवीत वहात जाणाऱ्या नदीच्या प्रचंड ओघापुढें लवचिक लव्हाळ्यांनीं जसें नमून जावें त्याप्रमाणें रिसेप्शन कमिटींतील सभासदांचे प्रोत्साहनपर उद्गार सात आठ हजार लोकांनीं उद्विग्नतेच्या संतापानें उच्चारलेल्या धिःकाराच्या घोषापुढें जागच्याजागीं लयास गेले. नगाऱ्यापुढें टिमकीची दशा काय, अशा प्रकारें रिसेप्शन कमिटीची दशा होऊन गेली. धरणीकंप होतांना आपल्या पायाखालील भूमि दुभंगते आहे व आकाश आपणावर कोसळून पडतें आहे, असा प्रत्यक्ष अनुभव आला असतां मनुष्य कंपित पायांनीं, भयभीत मुद्रेनें, व शून्य दृष्टीनें जसा स्वतःचे शरीरास कोठें तरी ढकलून नेत असतो, त्याप्रमाणें अध्यक्ष व त्यांचा परिवार यांनीं अध्यक्षांचें उच्चासन गाठलें. राष्ट्रीय सभेच्या मंडपांत कधीहि न दिसणारें

## लोकमताचें विराट स्वरूप

अशा रीतीनें एकाएकीं प्रकट झाल्यावर पुढील कार्यक्रम कोणासच सुचेना व

अध्यक्षांनीं मंडपांत पाय ठेवला त्यावेळीं लोकांच्या मनांत ज्या मनोवृत्ति उसळल्या होत्या त्या क्षणाक्षणाला वृद्धिंगत होऊं लागल्या. रिसेप्शन कमिटीच्या चेअरमनचें भाषण केव्हां संपतें असें होऊन गेलें. मि. माळवी यांच्या भाषणाकडे कोणाचेंच लक्ष नव्हतें. कांहीं ठिकाणीं 'धिःकार' Shame असे उद्‌गार काढण्यापलीकडे या भाषणासंबंधानें विशेष कांहीं घडून आलें नाहीं. हें भाषण चाललें असतां लोकांनीं आपल्या मनोवृत्ति कशावशा ताब्यांत ठेवल्या होत्या. मोठ्या कष्टानें दाबांत ठेवलेल्या मनोवृत्ति–त्या मनोविकाराच्या विषयाचें प्रत्यक्ष दर्शन झालें असतां–सर्व निर्बंध तोडून दुप्पट जोरानें उसळीसरशा बाहेर येतात, असा मानसशास्त्राचा नियम आहे. या नियमाला अनुसरून दि. अंबालाल व बाबू सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनीं डॉ. राशबिहारी घोष यांना अध्यक्ष नेमण्याचा ठराव जेव्हां पुढें मांडला त्यावेळीं लोकमताच्या निषेधाचें विराट स्वरूप अधिकच अक्राळविक्राळ व भयंकर दिसूं लागलें. 'तुम्ही बोलूं नका' 'नो नो' 'शेम,' 'बोलणें चालूं द्या' 'हिस् हिस्' अशा नाना प्रकारच्या आरोळयांचा एवढा 'तुमुल' आवाज झाला कीं त्यानें मंडपाच्या आंतील आठहि दिशा व तीनहि लोक विदारून सोडले. ना. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्यासारखे अतिरथि महारथि बोलावयास उठले आहेत, लेचापेचा व गांवढळ पुढारी बोलत आहे असें नाहीं, हें सर्व लोकांना समजावें म्हणून सुरेंद्रबाबूंची वृद्ध व पूज्य मूर्ति अध्यक्षांपुढील टेबलावर खडी ठाकली. दुसरा कोणताहि प्रसंग असता तरी या मूर्तीच्या दर्शनानें खवळलेला दर्या शांत झाला असता; पण तो असा कांहीं

## चमत्कारिक प्रसंग

होता कीं, 'माझें भाषण तुम्ही ऐकलेंच पाहिजे' अशा तऱ्हेची सुरेंद्रबाबूंची आरोळी त्यावेळीं दोन्ही पक्षांच्या दुर्दैवानें वाया गेली. भवितव्यतेपुढें इलाज नसतो, असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. राष्ट्रीयपक्ष काय किंवा मवाळ

पक्ष काय, कोणालाहि विचारलें तरी सुरेंद्रबाबूंचा असा अपमान करावा असें कोणीहि म्हणणार नाहीं. किंबहुना राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सुरेंद्रबाबूंसारख्यांच्या भाषणाची अशी स्थिति होईल असें कोणाच्या स्वप्नींहि आलेलें नव्हतें. कविकल्पनेच्या भरारीला जितके चमत्कार दिसतात त्याहूनहि संसारांतील कित्येक गोष्टी अधिक चमत्कारिक असतात, असें कांहीं वेळां अनुभवास येतें. राष्ट्रसभेच्या उच्चासनावरील टेबलावर उभे ठाकून सुरेंद्रबाबू 'माझें ऐका' 'माझें ऐका' म्हणून लोकांना विनंति करीत आहेत व बहुजनसमाज त्यांच्या भाषणाचा धिकार करून रुद्रस्वरूपानें 'खालीं बसा' 'खालीं बसा' म्हणून त्यांना बजावीत आहे! हा देखावा राष्ट्राच्या हिताविषयीं काळजी वहाणारांना जितका खेदकारक तितकाच अपूर्व व आश्चर्यकारक होता. खवळलेला लोकसमुद्र शांत होत नाहीं असें पाहून कांहीं कांहीं रोग कालानेंच बरे होणारे असतात हें ध्यानांत घेऊन त्या दिवसाचें काम तहकूब ठेवण्यांत आलें. सभेमधून रा. टिळक व खापर्डे हे रिसेप्शन कमिटीच्या धिक्काराला भिऊन मध्येंच उठून निघून गेले, अशी जी बातमी प्रसिद्ध केली आहे ती सर्वथैव खोटी असून सभागृह शांत झाल्यानंतर राष्ट्रीय पक्षाचे लोक मंडपांतून बाहेर पडले. सुरेंद्रबाबूंचें भाषण लोकांनीं ऐकलें नाहीं,

## ही गोष्ट वाईट

झाली हें खरें! पण या संबंधानें जसा शान्त रीतीनें व दूरवर दृष्टि ठेवून मवाळ पक्षानें विचार करावयास पाहिजे होता तसा केला नाहीं. मिदनापूरच्या प्रसंगामुळें लोक खवळले होते असें कोणी म्हणतात. नव्या पक्षाला 'देशद्रोही' म्हणून सुरेन्द्रबाबूंनीं आपल्या पत्रांत शिवी दिली होती, त्या शिवीची सव्याज फेड करण्यांत आली, असा कोणी खुलासा करितात. पण झालेल्या गोष्टीचा खरा व सरळ अर्थ मवाळ पक्षानें त्या वेळीं आपल्या मनाशीं केला नाहीं, हें देशाचें दुर्भाग्य होय. मवाळ ज्याप्रमाणें मानतात त्यांप्रमाणें राष्ट्रीय पक्ष

शक्तिहीन नसतांना व राष्ट्रीय पक्षाच्या बाजूला न्याय व धर्म हीं पूर्णपणें असतांना, केवळ अधिकारी वर्गाच्या सावलींतील आपण आहों या घमेंडीवर समेट करण्याकरितां नुसतें बोलण्याच्याहि लायकीचा हा प्रश्न नाहीं, असा ज्या उमटांनीं धिक्कारून राष्ट्रीय प्रश्नाचा अपमान केला त्यांच्या माथीं सुरेन्द्र-नाथांच्या ह्या गर्हणीय अपमानाचें खापर फोडिलें पाहिजे. श्रीकृष्ण कौरवांच्या सभेंत शिष्टाईस गेले असतां त्यांच्याशीं शिष्टाईचें भाषण न करितां त्यांनाच जागच्या जागीं चतुर्भुज करण्याचा हलकट कौरवांनीं पुंडावा केल्यामुळें भग-वानाला खरोखर चतुर्भुज काय पण सहस्रभुज होऊन विराट स्वरूप दाखवावें लागलें! समेटाचीं बोलणीं अपमानस्पद पद्धतीनें फेटाळून देण्यांत आलीं व सभागृहांत कोणत्याना कोणत्या तरी शुष्क नियमाच्या कोटाचें लोक-मतासभोंवतीं बंधन बांधून आपलाच दुराग्रही हेका, अन्यायी पक्ष हट्टानें चालविणार आहे असें समजलें, तेव्हां न्यायी व तेजस्वी मनांत साहजिकपणें निराशा उत्पन्न झाली. ह्या निराशेच्या चिडेचें द्योतक लोकमताची सदर क्षुब्धता होय. सुरेन्द्रबाबूंचा वृद्धया अपमान करण्याचा कोणाचाच हेतु नव्हता. हा अपमान आपल्या हातून चुकून झाला असें समजल्यावर मवाळाइतकेंच राष्ट्रीय-पक्षाला वाईट वाटलें. पण राष्ट्रीय सभेच्या मंडपांत समाधिस्थ योग्याची शांतता नॅशनॅलिस्ट प्रतिनिधींनीं व प्रेक्षकांनीं दाखविली नाहीं म्हणून नांवें ठेवणारांनीं, सर मेथा-गोखले यांच्यासारख्या दुर्योधनांनीं आपला दुराग्रहाचा हेका चालविण्यासाठीं व सुईच्या अग्रावरहि राहण्याइतकी भूमि न देऊन सत्पक्षाचा नायनाट करण्यासाठीं भरमंडपांत राष्ट्रीय सभेवर बलात्कार करून तिचे केस आपल्या एका मुठींत व तिचा पदर आपल्या हातांत खेचून धर-ण्याचा कसा अरेरावी अट्टाहास केला, याकडे लक्ष द्यावयास नको काय? दुःशासनानें भरसभेंत द्रौपदीचे ओढलेले केस व पदर हीं ज्याप्रमाणें दोन्ही दलें रणसंग्रामाशिवाय इतर प्रसंगीं एकत्र न होण्यास कारणीभूत झालीं त्याचप्रमाणें सर मेथा व ना. गोखले यांचें वर्तन राष्ट्रीय सभेंत

## अत्यंत खेदजनक दुही

उत्पन्न करण्यास कारणीभूत झालें. झाला प्रकार हा वाईट तर खराच, पण मवाळ सूत्रधारांच्या उद्दामपणामुळें अपरिहार्य होता. भीष्मद्रोणांशीं युद्ध करण्यास त्यांचेच नातू पणतू व त्यांचेच शिष्य तयार होतील हें भविष्य जसें कौरव-पांडवांच्या लहानपणीं कोणासहि वर्तवून ठेवतां आलें नसतें, त्याचप्रमाणें राष्ट्रीयपक्षास ज्या सुरेन्द्रबाबूंनीं वाढविलें तोच राष्ट्रीयपक्ष त्या सुरेन्द्रबाबूंच्या विरुद्ध अशारीतीनें जाण्यास सज्ज होईल असें कोणासहि एक वर्षापूर्वी सांगतां आलें नसतें. कालाचा अपरिहार्य ओघ म्हणतात तो हाच. सुरेन्द्रांच्या स्वेच्छेनें ही गोष्ट घडून आली नाहीं, राष्ट्रीय पक्षाच्या स्वच्छेनेंहि ही गोष्ट घडून आली नाहीं; पण परेच्छेनें मवाळ पक्षाच्या दुराग्रहानें ही गोष्ट घडवून आणली-असो. त्या दिवशींच्या कामाचा अशारीतीनें

## शोचनीय विरस

झाल्यावर पुढें काय करावयाचें, या उद्योगास दोन्ही पक्ष लागले. लगेच नॅशनॅलिस्ट पक्षाची परिषद भरविण्यांत आली. व्यक्तीव्यक्तींच्या दृष्टीनें झाली ती गोष्ट वाईट झाली, इतकेंच नव्हे तर नॅशनॅलिस्ट पक्षाच्या सामर्थ्याच्या दृष्टीनें ती गोष्ट वाईट झाली; कारण त्यामुळें असल्या अश्रुत व अपूर्व गोष्टीचें बरोबर समालोचन करण्यास असमर्थ असलेले अनुयायी व मित्र विकारवश होऊन जे आज मित्र आहेत किंवा मित्र होण्याचा संभव आहे ते ऐन प्रसंगीं शत्रु झाल्यावांचून रहावयाचे नाहींत, असें रा. टिळक यांनीं शांतपणें लोकांना समजावून सांगितलें; व आदल्या दिवशींच्या कमिटीला समेटाचें बोलणें लावण्यास पूर्वीचेच अधिकार देऊन, विरुद्ध पक्षाचीं कितीहि कर्णकटू भाषणें झालीं तरी तीं विवेकानें ऐकून घेण्याचें आत्मसंयमन करण्यास नॅशनॅलिस्ट पक्ष प्रसंगावर नजर देऊन, केवळ

## राष्ट्रीय सभेचें हित

साधण्याकरितां तयार झाला. आदल्या दिवशींच्या मध्यस्थांनीं पुनः खटपट

केली. त्याशिवाय गुजराथी लोकांत विशेष वजन असलेले प्रो. गज्जर व मुंबईतील स्पिशी बँकेचे चालक मि. चुनीलाल सरैय्या यांनीं राष्ट्रीय पक्षाचें म्हणणें नीट समजावून घेऊन त्याप्रमाणें समेट करण्याचा स्वतःच्या प्रेरणेनें प्रयत्न केला. या मध्यस्थांना असें वाटत होतें कीं, दोन्ही पक्षांचे पुढारी जर एका जागीं गोळा करतां आले तर समेट होण्यास अडचण पडणार नाहीं. कलकत्त्यास होती ती स्थिति कायम ठेवा, म्हणजे आम्हीं आहोंत असेंच आम्हांस जिवन्त ठेवा, यापलीकडे बिचारा राष्ट्रीय पक्ष कांहीं एक मागत नव्हता. पण मुंबइच्या टाईम्समध्यें कबूल करण्यांत आल्याप्रमाणें एकीची बेकी करून दुही माजविण्यास डॉ. राशबिहारी घोस व सर मेथा हे उत्सुक झालेले होते व एका राष्ट्रीय सभेचे

## दोन तुकडे

झाल्यानें राष्ट्रीय पक्ष लोकांमध्यें कःपदार्थ होऊन आपोआप नामशेष होईल, या दुर्योधनी आनंदांत मेथा, गोखले आणि को. निमग्न झाले होते, हे मध्यस्थास त्यावेळीं उमजलें नाहीं. अमक्या तमक्या ठिकाणीं, अमक्या तमक्या वेळीं दोन्ही पक्षांतील पुढाऱ्यांची भेट घालून देतों तेव्हां तुम्हीं त्या ठिकाणीं याल किंवा नाहीं ? म्हणून मध्यस्थांनीं येऊन नॅशनॅलिस्ट कॉन्फरन्सच्या कमिटीस विचारावें, व रात्रीं अपरात्रीं सांगाल त्यावेळीं आम्हीं येण्यास एका पायावर तयार आहों व समेट करण्यास उत्सुक आहों, म्हणून रा. टिळक यांनीं सांगावें असा एकसारखा प्रकार चालला होता. लाला लजपतराय झाले, गज्जर झाले, चुनीलाल झाले, विदूर झाले, श्रीकृष्ण झाले, कोणाचेंच हातून शिष्टाईचें काम रेटेना. कारण

## भाऊबंदकीचें पुरें भांडण

अखेरपर्यंत भांडून वेगळें सरण्याचें कंकण हातीं बांधून सर मेथा आणि गोखले तापी नदीच्या कांठीं आसन घालून बसले होते ! हें भांडणाचें आसन

ते सोडीनात. हा कृष्ण मध्यस्थीस आला आहे खरा, पण हाच आंतून सूत्रें हालवून राष्ट्रीय पक्षाची उठावणी करतो, अशा वाटाण्याच्या अक्षता राष्ट्रीय सभेंतील कांहीं वृद्ध व लोकप्रिय मध्यस्थांच्या शिष्टाईला लावण्यांत आल्या; राजकीय प्रश्न रसायनशास्त्राच्या विद्वत्तेनें सोडविण्याची कांहीं मध्यस्थ हांव धरितात म्हणून त्यांची टर करण्यांत आली; व बँकांतील आणि सराफ कट्यावरील द्रव्यांच्या व नगदीच्या हालचाली समजत असल्या तरी राजकीय प्रश्न समजण्याची त्यांची योग्यता नाहीं, असें कांहींना तोंडावर बजावण्यांत आले! सर मेथा व ना. गोखले यांच्या राष्ट्रीय सभेला मार्गे हटविण्याच्या दुराग्रहापुढें लाला लजपतराय यांचा स्वार्थत्याग व लोकप्रियता निरुपयोगी ठरली; अमृतबझार पत्रिकेच्या मोतीबाबूंचा अनुभव व चाणाक्षपणा निरर्थक झाला; प्रो. गज्जर यांची विद्वत्ता असून नसल्यासारखी झाली; व मुंबईच्या श्रीमंत पेढीवाल्यांत मि. चुनीलाल सरैया यांचे असलेलें विशेष वजन या कामीं पाचोळयाप्रमाणें हलकें ठरलें! गुरुवारीं रात्रीं व शुक्रवारीं सकाळीं, राष्ट्रीय सभेंतील आप्तेष्टांना निदान कांहीं काळपर्यंत रामराम ठोकण्याचा प्रसंग येणार म्हणून नॅशनॅलिस्ट पक्ष शोकाकुल झाला होता. ज्या लोकांचें कल्याण व्हावें म्हणून राष्ट्रीय पक्षाचा एवढा उद्योग, जे लोक आमचे सोयरेधायरे होते, ज्या लोकांत राष्ट्रीय पक्षाच्या विवक्षित छळाच्या प्रसंगीं उपयोगीं पडलेले कट्टे मित्र होते, तेच लोक दुराग्रहाच्या अशा दुर्भेद्य आसनावर उभे राहून सामना देण्यास तयार झालेले पाहिल्यावर कुरुक्षेत्राचे युद्धाचे प्रारंभीं धनंजयाची जशी स्थिति झाली होती तशी राष्ट्रीय पक्षाची स्थिति गुरुवार सायंकाळ, गुरुवार रात्र व शुक्रवार सकाळ या वेळेला झाली. 'अपरिहार्य अर्थाचे' प्रसंगीं शोक करणें उचित नव्हे, तर आपणाला न रुचणारें कर्म असलें तरी देशहिताकडे लक्ष देऊन तें आचरिलेंच पाहिजे, या भगवतगीतेंतील उपदेशाकडे लक्ष देऊन नॅशनॅलिस्ट पक्ष आपल्या पुढील कामास लागला. दुसऱ्या दिवसाकरितां

## मवाळ पक्षाची तयारी

जारीनें चालली होती. राष्ट्रीय सभेच्या स्वयंसेवकांपैकीं जे शे दीडशे स्वयंसेवक नॅशनॅलिस्ट पक्षाविषयीं सहानुभूति दाखविणारे होते त्यांना गुरुवारीं रात्रीं रजा देण्यांत आली, व त्यांचे जागी इतर जो–हुकमांची भरती करण्यांत आली. येवढ्यावरच भागलें नाहीं, तर दोन तीनशें खलाशी व गावांतील गुंडे यांना पैसे देऊन राष्ट्रीय पक्षास चोपून काढण्यासाठीं नोकरीस ठेवण्यांत आले. सुरतेच्या रिसेप्शन कमिटींतील गुजराथी लोकांना चेव येऊन रा. टिळक यांना खाऊं कि गिळूं असें त्यांना व्हावें म्हणून विपर्यास केलेल्या विचारांची मदिरा त्यांना पाजण्यांत आली. रा. टिळक गुजराथ्यांना नपुंसक म्हणतात; शिवाजीनें दोन वेळां सुरत लुटल्यावर तिसऱ्यांदा आणखी येईन असें म्हणून वचन दिलें होतें, त्या वचनाप्रमाणें तिसऱ्यांदा शिवाजीस सुरतेस येतां आलें नाहीं; पण आतां शिवाजीच्याऐवजीं टिळक सुरतेस येऊन गुजराथ्यांचें नाक, कान कापणार आहेत; तेव्हां गुजराथ्यांनीं उठून आपण नपुंसक नाहीं असें दाखवावें; अशी रिसेप्शन कमिटीची उठावणी करण्यांत आली होती. राष्ट्रीय पक्ष शांतचित्त व समेट करण्यास पूर्वीप्रमाणेंच उत्सुक होता; व गांवांतील गुंडांना दारू पाजून व पैसे देऊन बंगाल, मद्रास, नागपूर, मुंबई, वऱ्हाड येथील नॅशनॅलिस्ट पक्षांतील प्रतिनिधींचीं डोकीं फोडावयास पर्यायानें तरी मान्यता देणारी मेथा–गोखले वगैरे मंडळी विवेकभ्रष्ट होऊन आपल्या देशबांधवांचें सहस्र मार्गानीं नुकसान करण्यास तयार झाली होती. शुक्रवारीं दोन प्रहरीं एक वाजतां

## राष्ट्रीय सभेस पुन्हां सुरवात

होण्याच्या अगोदर महाराष्ट्रांतील प्रतिनिधींच्या उजव्या बाजूस व मागच्या बाजूस खलाशी गुंडांना हातांत काठ्या घेऊन रांगेनें उभे करण्यांत आलें. ना. गोखले व सर मेथा यांच्या या उसन्या व विकत आणलेल्या बळाचें हें

नगर वाचनालय, सातारा.



प्रदर्शन कोणत्या हेतूनें करण्यांत आलें होतें, हें महाराष्ट्रांतील प्रतिनिधींच्या तेव्हांच ध्यानांत आलें; व गांवांतील दारूबाज गुंडांना राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधींवर सोडण्याइतका हलकटपणा करूं नका अशी त्यांनीं गुजराथ्यांना विनंती केली, तेव्हां तेवढ्या वेळापुरते सदर गुंड बाहेर नेण्यांत आले. इतक्यांत अध्यक्ष मंडपांत येऊन दाखल झाले. व्हालंटियर्स व आपल्या वतीचे लोक प्रबळ पक्षानें मुद्दाम म्हणून ठिकठिकाणीं ठेवले होते. रिसेप्शन कमिटी व हे मुद्दाम म्हणून पसरवून ठेवलेले लोक यांनीं टाळ्यांचा लहानसा गजर करून अध्यक्षांचें स्वागत केलें. मध्यस्थांच्या शिष्टाईनें समेट न झाल्यास दोन्हीं पक्षांतील पुढाऱ्यांनीं कमिटी नेमून या कमिटींत समेटाची वाटाघाट होईपर्यंत अध्यक्ष निवडण्याचें काम लांबणीवर टाकावें, अशी अध्यक्षांच्या निवडणुकीच्या सूचनेला उपसूचना आणण्याचें नॅशनॅलिस्ट पक्षानें ठरविलें होतें. त्याप्रमाणें डॉ. राशबिहारी घोष मंडपांत यावयाचे वेळीं दरवाजांतच रा. टिळक यांच्याकडून रिसेप्शन कमिटीचे चेअरमन मि. माळवी यांच्या हातांत वरील उपसूचनेचें पत्र देण्यांत आलें. अध्यक्षांच्या सूचनेस बाबू सुरेंद्रनाथ यांनीं अनुमोदन दिल्यावर, अध्यक्षांच्या निवडणुकीसंबंधानें मला बोलावयाचें आहे, व या कामीं मी सुचविणार असलेल्या विशिष्ट योजनेप्रमाणें सभेचें काम चालावें म्हणून त्यावेळेपर्यंत काम तहकूब ठेवण्याची मी विनंती करणार आहें, तेव्हां मला बोलण्यास परवानगी द्यावी, अशी विनंति रा. टिळक यांनीं केली होती. अध्यक्षांच्या ठरावास अनुमोदन देण्याचें सुरेंद्रनाथ बाबूंचें भाषण या दिवशीं लोक एकाग्रचित्तानें व शांततेनें ऐकत होते. हें भाषण चाललें असतांना रा. टिळकांच्या प्रश्नाला उत्तर द्या म्हणून लेखी विनंति करण्यांत आली, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. एक दोन गृहस्थांकडून तोंडीं विचारण्यांत आलें होतें तरी उत्तर येईना. तेव्हां सुरेंद्रबाबूंचें भाषण संपल्याबरोबर रा. टिळक आपली उपसूचना पुढें आणण्या-

करितां उच्चासनावर चढून जाऊं लागले. एका गृहस्थानें त्यांना हरकत केली, पण त्या हरकतीस न जुमानतां रा. टिळक उच्चासनावर गेले व मि. माळवी यांजपाशीं बोलण्याची परवानगी मागूं लागले. त्यावेळीं रा. टिळक यांना असें सांगण्यांत आलें कीं, अध्यक्षाच्या ठरावाला तिसऱ्या गृहस्थाकडून पाठिंबा मिळून अध्यक्ष निवडण्याचें काम पुरे होऊनहि गेलें. आतां तुम्हीं कसचे बोलणार ! दरसाल अध्यक्ष निवडण्याचा ठराव सभेच्या संमतीकरितां पुढें मांडण्यांत येतो; इतकेंच नव्हे तर मद्रासच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं न्या. बद्रुद्दीन तैयबजी यांची निवड होण्याच्या प्रसंगीं त्यावेळचे रिसेप्शन कमिटीचे अध्यक्ष सर टी. माधवराव यांनीं कोणाला उपसूचना आणावयाची आहे काय, असें प्रतिनिधींना निक्षून विचारलें होतें. मि. माळवी यांनीं अध्यक्षांचा ठराव सभेपुढें मांडला नाहीं, इतकेंच नव्हे तर रा. टिळक यांना बोलण्यास

## बेकायदा मनाई

केली. डॉ. राशबिहारी घोष हे यावेळीं अध्यक्षांच्या खुर्चीवर नव्हते. रा. टिळक वर जाऊन उभे राहिले त्या वेळीं अध्यक्षांची खुर्ची रिकामी होती व इंदुप्रकाशच्या बातमीदाराला असा भास झाला कीं ही रिकामी खुर्ची रा. टिळक यांनीं आपल्या ताब्यांत घेतली. यावरून रा. टिळक वर गेले त्यावेळीं अध्यक्षांची पद्धतशीर निवडणूक झाली नव्हती हेंच सिद्ध होतें. रा. टिळक यांनीं बोलण्यास सुरवात केल्याबरोबर सर मेथा, गोखले आणि कंपनीनें डॉ. राशबिहारी घोष यांची उठावणी करून अध्यक्ष म्हणून त्यांना टेबलावर उभें केलें व लगेंच

## रिसेप्शन कमिटीचा दंगा

सुरू झाला. रिसेप्शन कमिटींतील गुजराथी हुश् हुश् करून रा. टिळक यांना

नगर वाचनालय

गप्प बसविण्याचा प्रयत्न करूं लागले. ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीचे प्रतिनिधी मि. रुदरफर्ड यांनीं रा. टिळक यांना असें बजाविलें कीं, 'तुम्हीं आपलें भाषण बंद न केल्यास राष्ट्रीय सभेच्या मंडपांत रक्तपात होईल व त्या रक्तपाताकरितां तुम्हांस जबाबदार धरलें जाईल.' मी जर शांतपणानें हात स्वस्थ आवरून धरून उभा आहें तर मजवर हा दोषारोप कसा करतां येईल? असें रा. टिळकांनीं उत्तर दिलें. ज्या प्रदेशांत राष्ट्रीय सभा भरलेली असते, त्या प्रदेशांतील स्थानिक प्रतिनिधि ज्या बाजूचे असतात त्या बाजूला केव्हांहि मताधिक्य मिळतें. पार्लमेंटाचे सभासद लोकसंख्येच्या मानानें व इतर ऐपतीच्या प्रमाणें निवडून दिलेले असतात. यामुळें पार्लमेंटांतील प्रतिनिधींच्या मताधिक्यावरून राष्ट्रांतील लोकमत कळत असतें. राष्ट्रीय सभेची तशी स्थिति नाहीं. ज्या ठिकाणीं राष्ट्रीय सभा भरली असेल तेथील प्रतिनिधि व शेजारच्या प्रांतांतील प्रतिनिधि एक झाले असतां बाकीच्या सर्व हिंदुस्थानांतील प्रतिनिधींवर मताधिक्य करूं शकतात. एक दोन प्रांतांतील प्रतिनिधींचें मत म्हणजे सर्व हिंदुस्थानाचें लोकमत अशी स्थिति दरसाल होण्याचा राष्ट्रीय सभेंत संभव असतो. ही विलक्षण स्थिति राष्ट्रीय सभेस प्राप्त होऊं नये म्हणून राष्ट्रीय सभेचे ठराव

## एकमतानें पास करण्याचा प्रघात

घालण्यांत आला. कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं बंगालनें जर तसेंच मनांत आणलें असतें तर नव्या पक्षाचीं सर्व मतें हिंदुस्थानाचीं मतें म्हणून राष्ट्रीय सभेवर बंगाल्यांना लादतां आलीं असतीं. पण एकमत झालें पाहिजे याकरितां बंगाल्यांनीं तडजोड केली. स्थानिक अतएव खोट्या मताधिक्याचा फायदा घेऊन इतर प्रांतांवर आपलीं मतें कोणीहि लादूं नयेत, अशा धोरणानें एकमत करण्याकडे आजपर्यंतच्या राष्ट्रीय सभेकडून प्रयत्न करण्यांत

आले होते. कमिटींत एकमत होत नसतें व कलकत्त्यास झालेंहि नाहीं, पण दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांची लहानशी कमिटी नेमली असतां

## देवाण घेवाण

होऊन दोन्हीं पक्षांत तडजोड होत असते. कलकत्त्याचा अनुभव असाच होता. अशा प्रकारें दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांची तोंडमिळवणी करण्याचा सुरतेस मध्यस्थांनीं पुष्कळ प्रयत्न केला; पण तो सफळ झाला नाहीं. तेव्हां सर्व राष्ट्रीय सभेच्या हुकमानें ही पुढाऱ्यांची तोंडमिळवणी व्हावी म्हणून तशी उपसूचना सभेपुढें ठेवण्याकरितां रा. टिळक बोलण्यास उभे राहिले होतें; पण दोन्ही पक्षांच्या दुर्दैवामुळें व सर मेथा आणि ना. गोखले यांच्या दुराग्रहामुळें रा. टिळक यांचें भाषण ऐकून न घेण्यास रिसेप्शन कमिटीस प्रवृत्त करण्यांत आलें. रा. टिळक यांना तुम्हीं उच्चासनावरून खालीं व्हा असें डॉ. राशबिहारी घोष यांनीं सांगितलें. आपण अद्याप अध्यक्ष निवडले गेला नाहीं, तेव्हां अध्यक्षांचा अधिकार आपण गाजवूं नका; व अध्यक्षाचें भाषण वाचूंहि नका, असें डॉ. घोष यांना रा. टिळक यांनीं स्पष्ट उत्तर दिलें. रा. टिळक यांनीं अध्यक्षाच्या खुर्चीचा कब्जा घेतला ही बातमी मुंबईच्या इंदूंत प्रसिद्ध झाली आहे, ती अक्षरश: खोटी आहे. रा. टिळक यांनीं तसें कांहीं केलें नाहीं, उलट ते शांतपणानें व स्वस्थ चित्तानें प्लॅटफॉर्मवर उभे होते. 'मला जर कोणास खालीं बसवावयाचें असेल तर त्यानें बलात्कारानेंच बसविलें पाहिजे, कारण सभेपुढें उपसूचना मांडण्याचा मला हक्क आहे' असें रा. टिळक यांनीं जाहीर केलें. रा. टिळक प्लॅटफॉर्मवर उभे व डॉ. घोष टेबलावर उभे राहून आपलें भाषण वाचताहेत असा प्रकार सुरू झाला. अशी स्थिती झाल्याबरोबर रिसेप्शन कमिटीनें रा. टिळक यांना अधिक जोरानें हिस् हिस् करण्याचा प्रारंभ केला व सर्व सभामंडपांत आदल्या दिवशींप्रमाणें डॉ. घोषसंबंधाचे धिःकाराचे शब्द ऐकूं येऊं लागले. डॉ.

घोष यांचें भाषण चार हातांवरसुद्धां ऐकूं जाणें अशक्य झालें. तेव्हां त्यांनीं हात जोडून भाषण ऐकून घेण्याची विनंति केली. तरी सभागृह शांत होईना. तेव्हां श्रोत्यांना स्वस्थचित्त व शांत करण्याकरितां अध्यक्षांच्या हातांत देण्यांत येत असलेली घंटा त्यांनीं एक दोन वेळां वाजविली. वेळ चुकून गेल्यानंतर घंटा वाजविणाऱ्या मांजराला जसें नुसती घंटा वाजवून जेवण मिळालें नाहीं, त्याप्रमाणें लोकमताच्या पाठिंब्याला पारखे झालेल्या अध्यक्षाला घंटानादानें गृह शांत करतां आलें नाहीं! अध्यक्षांचें भाषण लोक ऐकून घेत नाहींत असें पाहिल्यावर रिसेप्शन कमिटीच्या बाजूनें

## प्रत्यक्ष मारामारी

सुरू करण्यांत आली. रिसेप्शन कमिटीच्या मागच्या बाजूनें रा. टिळक यांच्या अंगावर एक खुर्ची फेकण्यांत आली, व एक जोडा अध्यक्षांच्या उजव्या बाजूकडील रिसेप्शन कमिटीच्या मार्गानें प्लॅटफॉर्मकडे फेकण्यांत आला. खुर्ची रा. टिळक यांना न लागतां पलीकडे पडली व जोडाहि रा. टिळक यांना न लागतां बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांना घष्टून जाऊन सर मेथा यांच्या गाला-पर्यंत पोहोंचला! रिसेप्शन कमिटीचे लोक रा. टिळक यांजवर धाऊन आले तेव्हां नॅशनॅलिस्ट पक्षाचे कांहीं मद्रासी व महाराष्ट्रीय सभासद रा. टिळक यांच्या साहाय्यार्थ प्लॅटफॉर्मवर चढून जाऊन अध्यक्षांच्या जागेसभोंवतीं थोडा वेळ मारामारी झाली. तेव्हां

## राष्ट्रीय सभा मोडली

असें जाहीर करून राष्ट्रीय सभेच्या सूत्रधारांनीं मागच्या दरवाजानें बाहेर पलायन केलें. रिसेप्शन कमिटीनें तोच मार्ग स्वीकारला व लगेच जय्यत तयार ठेवलेले दोनशें गुंड व पोलिस नॅशनॅलिस्ट पक्षावर सोडण्यांत आले. प्लॅटफॉर्मजवळ या गुंडांची व प्रतिनिधींची थोडीशी मारामार झाली, व

पोलिस आंत घुसून दोन दोन चार चार पोलिस मिळून एकएका प्रतिनिधीस बाहेर नेत असतां, मारामारीनंतर शूर होणाऱ्या व्हालंटियरांनीं व गुंडांनीं प्रतिनिधींच्या उघडया मस्तकावर काठया मारण्याचा हलकटपणा केला. या प्रसंगीं धारवाडचे वकील व म्युनिसिपालिटीचे व्हाइस चेअरमन रा. कट्टी बी. ए. एलएल. बी., विजापूरचे वकील व म्युनिसिपालिटीचे व्हाइस चेअरमन रा. कौजलगी बी. ए. एलएल. बी., कोल्हापूरचे देशपांडे, उमरावतीचे रा. अकोलकर व पुण्याचे रा. घारपुरे, यांना पोलिसनें पोलिस ठाण्यापर्यन्त नेलें होतें; पण लगेच पोलिस सुपरिंटेंडेंटानें 'तुम्हीं निरपराधी आहां, व तुमच्या बचावाशिवाय तुम्हांला येथें आणण्यांत दुसरा कोणताहि हेतु नाहीं,' असें वरील गृहस्थांस सांगून सोडून दिलें ! या प्रसंगीं पोलिसांची वर्तणूक निःपक्षपाताची व समाधानकारक होती. रा. टिळक व खापर्डे यांना नॅशनॅलिस्ट पक्षाच्या लोकांनीं नॅशनॅलिस्ट कँपमध्यें आणलें व पोलिसनें राष्ट्रीय सभेच्या सूत्रधारांच्या इच्छेप्रमाणें मंडपाचा ताबा घेतला. अशा रीतीनें सर मेथा व ना. गोखले यांनीं

## एकीची बेकी करण्याचा प्रयत्न

राष्ट्रीय सभा मोडून सिद्धीस नेला. राष्ट्रीय सभेचें काम पुढें चालविण्याकरितां नॅशनॅलिस्ट पक्षानें दुसऱ्या दिवशीं आपल्या पक्षाची सभा भरवून पन्नास इसमांची एक कमिटी नेमली. तिचे सेक्रेटरी मुंबईचे महादेव राजाराम बोडस व कलकत्त्याचे बाबू अरविंद घोष असून या कमिटीनें मे महिन्याच्या सुमारास भरून राष्ट्रीय सभेच्या चळवळीची व राष्ट्रीय सभेच्या पुढील बैठकीची व्यवस्था लावावी, असें ठरविण्यांत आलें. जुन्या पक्षानेंहि आपल्या पक्षाची कन्व्हेशन भरविली. अधिकारी वर्गाचें संघटन कमी न व्हावें व अधिकारी वर्गाच्या प्रत्यक्ष प्रिय वर्गांत जरी जावयास सांपडलें

…र वाचनालय, …



नाहीं तरी नॅशनॅलिस्टांप्रमाणें अधिकारी वर्गाची अवकृपा न व्हावी म्हणून ना. गोखले व सर मेथा यांनीं ज्या ठिकाणीं दुराग्रहानें सुरतेस राष्ट्रीय सभेस जलसमाधि दिली त्याच ठिकाणीं खुनाच्या आवेशाच्या आनंदांत कन्व्हेन्शन भरवून राष्ट्रीय सभेच्या पूर्वीच्या पुण्याईस व पुढील कामास वारसाचा हक्क सांगण्याचा उद्योग केला. अशा रीतीनें उघड उघड दोन पक्ष झाले, व उघड उघड दोन सभा झाल्या. ही गोष्ट राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें हितावह झाली नाहीं. तथापि ती सर मेथा व ना. गोखले यांच्या हट्टामुळें अपरिहार्य होती. या गोष्टीचा राष्ट्रावर काय परिणाम होईल, व लोकांनीं या प्रसंगीं कसें वागलें पाहिजे, या विषयींचे आमचे विचार स्थल-संकोचास्तव पुढील अंकावर टाकणें भाग आहे.

---

# * धुळ्याची प्रांतिक सभा आणि मवाळांचें क्रीड

गेल्या आठवडयांत धुळयास भरलेली प्रांतिक सभा चांगल्या रीतीनें पार पडून यशस्वी झाली याबद्दल कांहीं प्रतिनिविष्ट मवाळांशिवाय इतरांना आनंद झाल्यावांचून रहाणार नाहीं. सुरतेच्या बखेडयानंतर प्रांतिक सभेची ही पहिलीच बैठक असल्यामुळें धुळयाची सभा कशी काय पार पडते अशी भीति आरंभापासूनच होती. शिवाय मध्यंतरीं ना. खरे यांनीं क्रीडच्या नादीं लागून अध्यक्ष होण्याचें नाकारल्यामुळें व अलाहाबादेस मवाळांचें क्रीड पास झाल्यामुळें, पुण्या–मुंबईचे कांहीं बेजबाबदार व उपद्व्यापी मवाळ आपल्या देशद्रोही वर्तनानें प्रांतिक सभेच्या चालत्या गाडयास अध्यक्षांचे खिळीशिवाय आणखी कोणची खीळ घालतात, इकडे सर्वांचें लक्ष वेधून गेलें होतें. अशा स्थितींत धुळयाची प्रांतिक सभा सर्वतोपरीं यशस्वी होऊन देशद्रोही कंपू फजित झाला, ही संतोषाची गोष्ट होय. ह्या यशाचें सर्व श्रेय ज्ञानवृद्ध देशभक्त व उत्साही अध्यक्ष रा. ब. जोशी, व धुळयाची कर्तव्यपरायण आणि मेहनती मंडळी यांनाच दिलें पाहिजे. धुळेकरांनीं प्रतिनिधींच्या केलेल्या स्वागताच्या दृष्टीनें, सभागृहाच्या थाटाच्या दृष्टीनें, ठरावांच्या दृष्टीनें व अध्यक्षांच्या भाषणाच्या दृष्टीनें, कोणत्याहि दृष्टीनें पंधराव्या प्रांतिक सभेकडे पाहिलें तरी ती अपूर्व वाटल्यावांचून रहात नाहीं. प्रांतिक सभेचा मंडप भव्य पण आटोपशीर आणि शोभिवन्त पण सोयिस्कर असाच होता. चार पांचशें प्रतिनिधींना व दोन तीन हजार प्रेक्षकांना बसण्याची सोय ह्या मंडपांत केलेली होती. पूर्वी कोणच्याहि प्रांतिक सभेस आले नव्हते इतके प्रतिनिधि धुळयास जमले होते. धुळें शहराबाहे-

* केसरी, ता. ५ मे १९०८

रचे अडीचशे प्रतिनिधि हजर होते. प्रतिनिधींच्या संख्येच्या दृष्टीनें विचार केला तर पूर्वीच्या सर्व प्रांतिक सभांवर धुळयाच्या सभेनें ताण केली असेंच म्हणावें लागतें. पुण्यास भरलेल्या दुसऱ्या प्रांतिक सभेच्या वेळीं ८९ प्रतिनिधी हजर होते; १८९३ सालीं अहमदाबादेस भरलेल्या सभेला १५२ प्रतिनिधी जमले होते, व ह्यापैकीं गुजराथच्या बाहेरचे २१ च प्रतिनिधी असून ह्या एकविसांतच मुंबईच्या मक्तेदारांचा समावेश झालेला होता. १८९४ सालीं मुंबईस प्रांतिक सभा भरली त्यावेळीं प्रतिनिधींची संख्या २०५ वर गेली नाहीं व बऱ्याच जिल्ह्यांचे प्रतिनिधि हजर नव्हते. कराची मुक्कामीं भरलेल्या प्रांतिक सभेच्या १२२ प्रतिनिधींपैकीं आठच प्रतिनिधी सिंध बाहेरचे होते, व तेहि मुंबईच्या अध्यक्षाचा परिवार म्हणूनच गेलेले होते. १९०० सालीं साताऱ्यास भरलेल्या प्रांतिक सभेला पुणें व सातारा ह्या जिल्ह्या बाहेरचे २२ च प्रतिनिधी आले होते, व प्रतिनिधींची संख्या २०० हून अधिक नव्हती. ना. खरे यांच्या अध्यक्षतेखालीं धारवाडास भरलेल्या प्रांतिक सभेस २५२ प्रतिनिधी म्हणजे धुळयास परगांवाहून आलेल्या प्रतिनिधींइतकेच प्रतिनिधी हजर होते. धुळयाच्या प्रांतिक सभेस अहमदाबाद, सुरत, मुंबई शहर, कुलाबा जिल्हा, ठाणें जिल्हा, नाशिक, नगर, खानदेश, पुणें, सोलापूर, सातारा, बेळगांव, विजापूर वगैरे सर्व ठिकाणचे विद्वान, कर्तव्यदक्ष, देशाभिमानी, जबाबदार व विचारी पुढारी हजर होते. धुळ्याच्या प्रांतिक सभेनें ज्या प्रदेशावर आपला अंमल बसविला तो प्रदेश पूर्वीच्या प्रांतिक सभेच्या प्रदेशाहून फारच अधिक विस्तीर्ण होता, ह्यांत संशय नाहीं. प्रतिनिधींची संख्या पूर्वीपेक्षां अधिक होती, इतकेंच नव्हे तर प्रतिनिधींमध्यें एक विशेष प्रकारची जबाबदारी, हुरूप व कळकळ दिसून येत होती. सभेंतील ठराव व भाषणें हीं वाचलीं असतां प्रांतिक सभेचें काम पूर्वीपेक्षां अधिक जोरानें, नेटानें व उत्साहानें कसें पार पडलें हें वाचकांचे

ध्यानांत येईल. प्रांतिनिधींमध्यें जर कळकळ नसती, दोन हजारांचा तो प्रेक्षक-समुदाय जर उत्साहपूर्ण नसता, तर चित्रांत रेखल्याप्रमाणें श्रोतृवृंद एकाग्र-चित्त व निश्चल झालेला बरेच वेळां प्रांतिक सभेच्या सभामंडपांत दृष्टीस पडता ना! अध्यक्ष रा ब. जोशी यांनीं आपल्या अखेरच्या समारोपाचे भाषणांत सांगितल्याप्रमाणें प्रांतिक सभेचें महत्त्व पास झालेल्या ठरावांवरून मापावयाचें नसून ठरावाबद्दल चर्चा चालली असतांना सभेच्या अंतःकरणावर उसळणाऱ्या निरनिराळया मनोविकारांच्या लाटांवरून मापावयाचें असतें, आणि अशा रीतीनें विचार केला असतां धुळयाच्या प्रांतिक सभेनें पूर्वीच्या प्रांतिक सभांना मागें टाकलें असेंच म्हणावें लागतें. प्रांतिक सभेंत नवीन दम, नवीन उत्साह, व नवीन जीव धुळें मुक्कामीं घालण्यांत आला; व प्रतिनिविष्ट मवाळांच्या फाजील कह्यांत गेल्यामुळें सुरतेस अकालीं वृद्धावस्थेंत गेलेली प्रांतिक सभा धुळें मुक्कामीं कात टाकून पुन्हां ताजीतवानी झाली. अध्यक्ष रा. ब. जोशी यांचीं प्रास्ताविक व समारोपाचीं भाषणें, सभा यशस्वी करविण्याविषयीं त्यांची कळकळ आणि एक प्रकारच्या हौसेनें, उत्साहानें सभेचें काम चालविण्याची त्यांची पद्धत, यांचा अनुभव आल्यावर धुळयास प्रत्येक प्रतिनिधीनें व प्रेक्षकानें, ना. खरे ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें नाकारल्याबद्दल व गारठलेल्या प्रेसिडेंसी ॲसोसिएशनचा सभापति न लाभल्याबद्दल प्रांतिक सभेचें अभिनंदन केलें. अध्यक्षाच्या निवडणुकीची सूचना धुळयाच्या प्रांतिक सभेपुढें मांडतांना साताऱ्याचे रा. दादासाहेब करंदीकर ह्यांनीं वर्णन केल्याप्रमाणें ना. गोखले यांनाहि ज्यापासून ज्ञान व माहिती शिकावी लागते, ते रा. ब. जोशी अध्यक्षस्थानीं असतांना ज्ञानतेजानें अध्यक्ष-पद विशेष देदिप्यमान दिसलें, ही साहजिकच गोष्ट झाली. अध्यक्ष रा. ब. जोशी ह्यांचीं दोनहि भाषणें नेहमींप्रमाणें माहितीनें भरलेलीं व निरुत्तर विचारसरणीनें सर्वांना पटणारीं अशींच झालीं. तथापि समारोपाच्या वेळचें

त्यांचें मराठी भाषण देशाभिमानाच्या ज्वलंत ज्योतीनें प्रकाशमान झालेलें होतें. एकन्दरीनें रा. ब. जोशी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेली प्रांतिक सभा प्रत्यक्ष राष्ट्रीय सभेच्या कांहीं प्रख्यात बैठकींप्रमाणें प्रगल्भ विचारांच्या दृष्टीनें चिरस्मरणीय झाली, इतकेंच नव्हे तर देशभक्तीच्या उदात्त मनोविचारांचे दृष्टीनेंहि सरस झाली.

यंदाच्या प्रांतिक सभेमध्येंहि महत्त्वाचा विचार म्हणजे मवाळांच्या क्रीड संबंधाचा होता. अलाहाबादेस मवाळांनीं आपली जात निराळी करून ह्या जातींत शिरण्याची जे शपथ घेतील तेवढ्यांना राष्ट्रीय सभेंत घेण्यांत येईल असें ठरविलें. सर्व राष्ट्राची सभा असें म्हणवून घेणाऱ्या राष्ट्रीय सभेला एखाद्या विवक्षित जातीचें स्वरूप देण्याचा अधिकार कोणालाहि नाहीं. अलाहाबादची कन्व्हेन्शन राष्ट्रीय देहाचा एक अवयव होऊं शकेल, पण एकाच अवयवानें सर्व देह मी एकटा आहें, असें म्हणणें उर्मटपणाचें व फाजील अहंमन्यतेचें लक्षण होय. निर्भेळ स्वराज्य मागणाऱ्या मंडळींस राष्ट्रीय सभेंतून हांकून द्यावें, अशा धर्तीची उपसूचना धुळयाच्या प्रांतिक सभेपुढें आली होती; पण तिला तीनशें प्रतिनिधींत तीन चार मतांहून अधिक अनुकूल मतें मिळालीं नाहींत, ही समाधानाची गोष्ट होय. निर्भेळ स्वराज्याचा अंतिम हेतु ठेवण्यांत कोणता बेकायदेशीरपणा आहे ? रा. ब. जोशी ह्यांनीं आपल्या समारोपाच्या भाषणांत सांगितल्याप्रमाणें कै. न्या. रानडे हेहि निर्भेळ स्वराज्याचेंच अंतिम साध्य आपल्या दिव्य दृष्टीनें पहात असत, व ना. गोखले यांनींहि एका भाषणांत कोणत्याहि राष्ट्राची महत्त्वाकांक्षा कोणासहि मर्यादित करतां येणें शक्य नाहीं, अशी कबुली दिली आहे. अशा रीतीनें रानड्यांचा पक्ष व विपिन बाबूंचा पक्ष एकच असतांना, जुना व नवा पक्ष असा भेद न राहून सर्वच एकाच पक्षाचे असतांना, मवाळांनीं दोन भिन्न भिन्न राष्ट्रीय सभा भरविण्याची शकल कां काढावी ? एका राष्ट्रीय सभेच्या

दोन राष्ट्रीय सभा करण्याचा मवाळांचा हा उद्योग राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेस काळिमा आणणारा असून देशद्रोहाच्या पातकामुळें आत्मविघातक होणारा आहे. प्रो. सिली यांनीं 'दि एक्सपॅन्शन ऑफ इंग्लंड' ह्या आपल्या पुस्तकांत परक्यांना हिंदुस्थान देश कां जिंकतां आला, ह्याचें कारण हिंदी लोकांत राष्ट्रीयत्वाची कल्पना नाहीं, हें मुख्यत्वेंकरून दिलें आहे. आपआपसांत भांडणें व दुही ही चालली असतांना परक्यांशीं संबंध येण्याबरोबर जे लोक एक होऊं शकतात, ते लोक 'राष्ट्र' ह्या संज्ञेस योग्य होत. राष्ट्र बनलेल्या देशांत आपआपसांत भांडणें व मारामाऱ्या नसतात असें नाहीं. अद्वैताप्रमाणें द्वैतहि सर्व जगाला व्यापून राहिलेलें आहे. पण आपसांत झगडा चालला असतां तिसऱ्याशीं टक्कर देण्याचा प्रसंग जेव्हां येतो तेव्हां सर्व द्वैतभाव विसरून सर्वांनीं एक होणें हेंच राष्ट्रीयत्वाचें प्रधान लक्षण होय. बेजबाबदार, उर्मट व स्वार्थसाधु अधिकारीवर्गाशीं झगडून हक्क संपादन करून राष्ट्रहित साधण्याकरितां राष्ट्रीय सभा निर्माण झाली आहे; व ह्या राष्ट्रीय सभेच्या कामासंबंधानें राष्ट्रीयत्वाचा पूर्ण पगडा दाखवावयाचा नाहीं तर तो कोठें दाखवावयाचा ? सर हेन्री कॉटन ह्यांनीं आपल्या न्यू इंडिया पुस्तकांत प्रतिपादन केलें आहे कीं, पाश्चिमात्य शिक्षणामुळें व अधिकारी वर्गाच्या जुलमामुळें राष्ट्रीयत्वाची कल्पना हिंदुस्थानांत वृद्धिंगत झाल्यावांचून रहाणार नाहीं. पाश्चिमात्य शिक्षणामुळें जी राष्ट्रीय सभा उत्पन्न झाली, अधिकारी वर्गाच्या जुलमामुळें जी सभा जोरदार झाली, तीच राष्ट्रीय सभा राष्ट्रीयत्वाच्या बाण्याची सर्व सामग्री एका जागीं जुळवीत असतांना, मवाळांनीं आपलें क्रीड मध्येंच ढकलून स्वतःच्या स्वार्थाकरितां देशद्रोहाचें पाप करण्यास तयार व्हावें, हें आश्चर्य नव्हे काय ? अधिकारी वर्गाचा जुलूम जेथें अव्याहत चाललेला आहे व प्रजेला महत्त्वाचा कोणताहि हक्क देण्यास जेथें अधिकारी वर्ग तयार नाहीं, तेथें राष्ट्रीय कामाकरितां सर्व मतांच्या लोकांनीं एक

नगर वाचनालय नाशिक



व्हावयास नको काय ? आमचे जेथें मतभेद आहेत तेथें ते आहेत म्हणून स्पष्ट सांगू पण अधिकाऱ्यांशीं झगडतांना आम्हीं सर्व एक होऊं असें जर परक्यांच्या अनुभवास आम्हांस आणून द्यावयाचें असेल तर राष्ट्रीय सभेचीं दारें सर्व पक्षांच्या मतांना सारखींच उघडी ठेवणें जरूर आहे ! आमच्या आपापसांतील तंटयाचा रतिभरहि फायदा आम्हीं परक्यांना घेऊं द्यावयाचा नाहीं, आमचे तंटे आमचे आम्हीं भांडूं, पण परक्याला मध्यें तोंड घालूं देणार नाहीं, हें तत्त्व लोकांच्या हाडींमाशीं खेळल्याशिवाय 'राष्ट्र' हें नांव कोणत्याच लोकांना प्राप्त होत नाहीं. आम्हांस जर राष्ट्र बनावयाचें असेल तर राष्ट्रीय सभेंत निदान राष्ट्रीयत्वाच्या भावनेच्याविरुद्ध आम्हीं वागतां कामा नये. कौरव पांडवांचा आपापसांत द्वेष होता तितका कांहीं जहाल–मवाळांचा नाहीं. चित्रसेन गंधर्वाच्याविरुद्ध कौरव–पांडव जर एक होऊं शकले, तर अधिकारी वर्गाशीं झगडण्याकरितांच जी राष्ट्रीय सभा निर्माण झाली आहे, तिच्या पोटांत जहाल–मवाळांचा समावेश व्हावयास नको काय ? दोन इसमांत मतभेद असला म्हणजे जेथें राष्ट्रीयत्वाची भावना जागृत नसते तेथें प्रतिस्पर्ध्यांचा परस्पर नायनाट झाल्यास अकुंचित दृष्टीच्या स्वार्थसाधूंनाच आनंद वाटत असतो. आपल्यापैकींच एकाचा नायनाट परक्याकडून करून घेण्याची युक्ती देशद्रोहाची व राष्ट्रविघातक आहे. कौरवांना पकडून नेल्याची वार्ता ऐकल्याबरोबर " दिष्टया लोके पुमानस्ति कश्चिदस्मत् प्रिये स्थितः । " येनास्माकं हृतो भार आसीनानां सुखावहः ॥ असले उद्गार प्रेसिडेंसी ॲसोसिएशनप्रमाणें दीर्घ द्वेषांत पटाईत असलेल्या भीमानें काढले, पण हें क्रीड युधिष्ठिराला पसंत पडलें नाहीं. त्यावेळीं राष्ट्रीयत्वाचें बीज युधिष्ठिरमुखानें श्री व्यासानीं येणेंप्रमाणें सांगितलें आहे—'भवन्ति भेदा ज्ञातीनां कलहाश्च वृकोदर । प्रसक्तानिच वैराणि कुलधर्मो न नश्यति ॥ यदा तु कश्चित् ज्ञातीनां बाह्यः प्रार्थयते कुलम् । न मर्षयति तत् सन्तो बाह्येनाभिप्रधर्षणम् ॥"

आपआपसांत कितीहि भेद किंवा कितीहि कलह असले, व त्यामुळें उत्पन्न होणारें वैर कितीहि खोल गेलेलें असलें तरी सर्वांना समान असलेला आपला धर्म नाशाप्रत पावत नाहीं. आपसांतील भेद राष्ट्रीय मर्यादा ओलांडून गेलेले नसल्यास सर्व कुलाच्या–सर्व समुदायाच्या–सर्व राष्ट्राच्या अभ्युदयाला कारणी-भूत होतात. जहाल मवाळ असे दोन भेद असले तरी एका राष्ट्रांत नांद-णारे व एका राष्ट्राच्या मर्यादेच्या आंत असलेले हे दोन मतभेद आहेत. ह्या भेदामुळें प्रत्येक पक्षाला आपल्या सद्‍गुणांची पराकाष्ठा करून राष्ट्र आपल्या बाजूचें करून घेण्याचा उद्योग सतत करावा लागेल, व ह्यामुळें जहाल व मवाळ ह्या दोघांनाहि सारखेंच लागू असणारे राष्ट्राचे कुल नाशा-प्रत न जातां उन्नतीप्रत जाईल. राष्ट्रीय मर्यादेच्या आंतील द्वैत प्रगतीला कारण होत असतें. कौरवांचा पराजय पांडवांनीं केला, किंवा पांडवांचा परा-जय कौरवांनीं केला, तरी कौरव–पांडव ह्या दोघांनाहि सारखेच मान्य अस-लेले कौरव–पांडवांच्या कुळाचे धर्म नाहींसे होत नाहींत. व्यक्ति नाहींशा होवोत किंवा त्या व्यक्तींना विशिष्ट असलेलीं मतेंहि नाहींशीं होवोत; पण भांडणाऱ्या सर्व व्यक्तींनीं विशिष्ट व्यक्तींचा किंवा विशिष्ट मतांचा पराजय करण्याच्या इच्छेनें सर्वसामान्य गोष्टी नाशाप्रत नेणें ह्यालाच कुळाचा नाश म्हणतात, ह्यालाच "कुलघ्नानाम् कुलस्यच" नरक म्हणतात, ह्यालाच एखादा देश नामशेष होऊं देणें म्हणतात, ह्यालाच देशद्रोह म्हणतात! आज मवाळांनीं जहालांना आपणापासून राष्ट्रीय सभेंत दूर लोटलें तर तें अधिकारी वर्गाला थोडेंच नको आहे? अधिकारी वर्ग जहालांना चिरडून टाकील व मागाहून मवाळांना लाथा मारील हें पक्के लक्षांत ठेवा. आपाप-सांत प्रामाणिक मतभेद असेल तर त्याबद्दल खुशाल भांडा, पण ज्या अधि-कारी वर्गाशीं दोघांना मिळून झुंजावयाचे आहे, ज्या अधिकारी वर्गापासून हक्क मिळवणें हा दोघांच्याहि कुळाचा–राष्ट्रीय सभेचा–धर्म आहे, तो अधि-

कारी वर्ग आमचें कुळ—आमची राष्ट्रीय सभा—बुडविण्यास टपलेला असतांना—कुळाच्या बाहेरच्यांचा हात—राष्ट्रीय सभेंत बळजोरीनें शिरलेला कोणाहि संताला पसंत पडणार नाहीं. राजकीय चळवळ करणारांचें कुल नाशाप्रत नेण्याकरितां मवाळांचें कीड उत्पन्न झालेलें आहे. आपापसांतील भांडणांत स्वतःच्या हिंमतीवर व उद्योगावर वर्चस्व मिळविण्याच्या प्रामाणिक महत्त्वाकांक्षेनें हें कीड पुढें आणलेलें नसून कुलधर्माचा त्याग करून कुलाच्या बाहेरच्या अधिकारी वर्गाकडून कुलाचा प्रथम एक भाग व मागाहून सर्व कुळ नाशास नेणाऱ्या देशद्रोहामुळें हें जन्मास आलेलें आहे. मवाळांच्या कीडचें हें देशद्रोही स्वरूप धुळ्याच्या प्रांतिक सभेनें पूर्णपणें ओळखून राष्ट्रीय सभेचे कुलधर्म कायम ठेवले पाहिजेत, असें आपलें स्पष्ट मत दिलें, ही संतोषाची गोष्ट होय. राष्ट्रीय सभेच्या कुलाचें नाशाकरितांच अवतरलेले प्रेसिडेंसी असोसिएशनचे कांहीं प्रतिनिविष्ट धुळ्याच्या प्रांतिक सभेच्या ठरावांमुळें व उद्योगामुळें देशद्रोहापासून पराङ्मुख होतील अशांतला भाग नाहीं. पण ह्या प्रतिनिविष्टांशिवाय सुरेंद्रबाबूंसारखे राष्ट्राभिमानी बरेच विचारी लोक क्षणैक मनोविकाराचे झटक्यानें कीडला मोहून गेलेले आहेत. राष्ट्रीय जू मानेवर घेऊन राष्ट्रीय सभेचें राष्ट्रकार्य तडीस नेण्यास लायक असलेले सुरेंद्रबाबूंसारखे पुढारी धुळ्याच्या प्रांतिक सभेनें नेमलेल्या कमिटीच्या उद्योगानें कीड सोडून देऊन गंधर्वांशीं लढत असतांना कौरव व पांडव मिळून एकशे पांच, असें अधिकारी वर्गाच्या निदर्शनास राष्ट्रीय सभेंत आणण्यास तयार होतील अशी आम्हांस आशा आहे.

# लो. टिळकांवरील १९०८ सालच्या खटल्याचे लेख

[ लो. टिळकांवर १९०८ सालीं राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना ६ वर्षांची शिक्षा झाली. सदर खटल्यास कारणीभूत झालेल्या एकूण आठ लेखांपैकीं पहिले तीन लेख लो. टिळकांनीं लिहिले होते आणि त्याच धोरणानें पुढचे लेख लिहिण्यास श्री. कृ. प्र. खाडिलकरांना सांगून लो. टिळक सिंहगडास गेले होते. त्यानंतरचे ५ लेख श्री. कृ. प्र. खाडिलकरांनीं लिहिले. त्यांवरून लो. टिळकांवर खटला होऊन त्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली. सदर खटल्यांतील श्री. कृ. प्र. खाडिलकरांचे लेख पुढें दिले आहेत. ]

## * दुहेरी इषारा !

कलकत्त्यास ज्या तरुण गृहस्थांनीं बाँब गोळे तयार केले किंवा उपयोगांत आणिले त्यांची डोकीं फिरली होतीं, यांत शंका नाहींच. परंतु माथेफिरूपणाचा रोग इतका संसर्गजन्य आहे कीं, कलकत्त्याच्या तरुण गृहस्थांनीं आपल्या डोक्यांतील विष ओकून टाकिल्यामुळें त्यांचीं डोकीं जरी थंड झालीं, तरी त्यांनीं ओकून टाकिलेल्या विषानें दुसऱ्या कांहीं गृहस्थांचीं डोकीं आतां भणाणून गेलीं आहेत, किंवा जाऊं लागलीं आहेत. हे लोक दोन प्रकारचे होत. पहिले अँग्लो इंडिअन गृहस्थ किंवा पत्रकार, आणि दुसरे आमच्यापैकीं कांहीं लब्धप्रतिष्ठित भेकड. भेद एवढाच कीं, अँग्लो इंडिअन पत्रकारांचीं डोकीं फिरून जाण्यास त्यांच्या कावेबाजपणानें त्यांस मदत केली

* केसरी, ता. १९ मे १९०८.

आहे आणि आमच्यांतील ज्यांचीं डोकीं शुद्धीवर नाहींत त्यांच्या बुद्धींत भेकडपणाचा संचार झाला आहे. कलकत्त्यांतील कांहीं पोरांनीं बाँब गोळे तयार करून एका युरोपियन मॅजिस्ट्रेटास उडवून देण्याचा प्रयत्न केला, आणि त्यांत दोन निरपराधी गोऱ्या स्त्रिया सांपडल्या एवढीच गोष्ट आमच्यांतील कांहीं आपणांसच शांतताप्रिय म्हणवून घेणाऱ्या भ्याड गृहस्थांची तारंबळ उडून जाण्यास बस्स झाली आहे. रशियांत नेहमीं होत असलेल्या असल्या भयंकर प्रकारांची बातमी या लोकांनीं वर्तमानपत्रांतून वाचली नसेल असें नाहीं. पण हिंदुस्थानांत अशा प्रकारची गोष्ट आणि तीहि गोऱ्या अधिकाऱ्यांच्या विरुद्ध घडावी, यांत भयंकरपणाची कमाल झाली, इतकेंच नव्हे, तर हिंदुस्थानचें परमावधि नुकसान झालें, असें यांच्या मनानें घेतलें आहे; आणि आपली ज्वलन्त राजनिष्ठा व्यक्त करण्याकरितां "आम्ही या गोष्टीचा तीव्रातितीव्र निषेध करीत आहों; बाँब उडविणारे आमचे कोणी नव्हत; आणि त्यांच्या अघोर कृत्यांशीं आमचा संबंध नाहीं; इतकेंच नव्हे तर हीं अघोर कृत्यें ज्या लेखांमुळें किंवा भाषणांमुळें होतात ते लेख व तीं भाषणें सरकारनें ताबडतोब बंद करावीं, आमची त्यास हरकत नाहीं; किंबहुना तशी आमची इच्छाहि आहे." अशा प्रकारच्या सूचना किंवा ठराव हे गृहस्थ सरकारकडे हल्लीं मोठ्या जारीनें पाठवीत आहेत! आमच्या मतें ही भ्याडपणाचीच नव्हे तर मूर्खपणाचीहि कमाल होय, आणि सरकारी अधिकाऱ्यांस जरी ही गोष्ट कळत असली तरी सध्यां अशा प्रकारची कबुली घेण्यांतच त्यांचा फायदा असल्यामुळें त्यांची यास पर्यायानें संमति आहे. बाँब गोळ्यांनीं किंवा अन्य साधनांनीं कोणत्याहि कारणाकरितां कोणीं कोणाचा जीव घेणें हें आम्हीहि गर्ह्य समजतों. नीतिशास्त्राचा त्यास आधार नाहीं, इतकेंच नव्हे तर अशा रीतीनें कांहीं गोऱ्या अधिकाऱ्यांचा खून झाला तर तेवढ्यानें स्वराज्य आपणांस ताबडतोब मिळेल असेंहि आमच्याप्रमाणें दुसऱ्या कोणा-

सहि वाटत नाहीं. गेल्या अंकीं आम्हीं लिहिलेंच होतें कीं, खुद्द ज्या तरुण गृहस्थांनीं बाँब टाकले त्यांचीहि अशी समजूत नाहीं. सारांश, बाँबगोळ्यानें अधिकारीवर्गापैकीं कोणाचा जीव घेणें कोणासहि नापसंत झाल्याखेरीज राहणार नाहीं; व तेवढ्यापुरती जर आपली नापसंती कोणी व्यक्त करील तर त्यांत कांहीं वावगेंहि नाहीं. परंतु अशी नापसंती व्यक्त करतांना हीं घोर कृत्यें कांहीं राजकीय चळवळ करणाऱ्या लोकांच्या लेखांनीं किंवा व्याख्यानांनीं घडून येतात, अशी आमच्यांतील कांहीं लोक जी या प्रसंगीं कबुली देऊं लागले आहेत, ती मात्र अत्यंत चुकीची आणि आत्मघातकीपणाची होय, हें त्यांसच नव्हे, तर खुद्द राज्यकर्त्यांसहि कळविणें आमचें काम आहे. अँग्लो–इंडियन लोकांस किंवा पत्रकारांस आमच्याकडून यावेळीं अशा प्रकारची कबुली जरूर पाहिजे आहे. हिंदुस्थानांतील अनियंत्रित आणि बेजबाबदार अधिकारीवर्गाच्या त्रासानें लोकांचीं डोकीं भणाणून जातात, अशी जरी वस्तुस्थिति असली तरी अँग्लो इंडियन लोकांस आपल्या स्वार्थासाठीं तिचा विपर्यास करणें इष्ट असल्यामुळें त्यांनीं अशी हूल उठविली आहे कीं, बाँब गोळे उडविण्यापर्यंत लोकांच्या संतापाची जी मजल आली ती गोऱ्या अधिकाऱ्यांच्या दुष्कृत्यामुळें नव्हे तर सदर अधिकाऱ्यांवर विनाकारण कडक टीका करणाऱ्यांच्या लेखांमुळें आणि भाषणांमुळें आली आहे. अँग्लो–इंडियन पत्रकारांचें हें म्हणणें सर्वथैव खोटें आहे. परंतु हल्लींच्या स्थितींत असें बोलल्याखेरीज त्यांस गत्यंतर नाहीं. हिंदुस्थानांतील राज्यपद्धति वाईट आहे असें त्यांनीं कबूल केलें, म्हणजे त्यांचें सर्व घर बुडालें. ते नेहमीं असेंच म्हणणार कीं, हिंदुस्थानांत गोऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध जी राजकीय चळवळ आहे ती कांहीं थोड्या उपद्व्यापी लोकांनीं आपमतलबाकरितां चालविली आहे; आणि बाँब गोळ्यापर्यंत जी मजल आली ती कांहीं गोऱ्या अधिकाऱ्यांच्या पापामुळें नसून केवळ वर सांगितलेल्या उपद्व्यापी मंडळीच्या चळवळीचाच परिणाम आहे.

नगर वाचनालय, सातारा.



किंबहुना बाँबगोळा प्रकरण म्हणजे अँग्लो-इंडियन पत्रकारांस किंवा अधिकाऱ्यांस हिंदुस्थानांत सध्यां चालू असलेली राजकीय चळवळ हाणून पाडण्यास अनायासें प्राप्त झालेली एक उत्तम संधी होय असें ते समजतात, आणि त्यांच्यांतील कांहीं धूर्त लोक याप्रमाणें सदर संधीचा उपयोगहि करून घेऊं लागले आहेत. खेदाची गोष्ट एवढीच कीं, या त्यांच्या जाळयांत आमच्यांतील कांहीं भेकड आणि स्वार्थपरायण लोक आपण होऊन उडया घालून आपल्या देशबांधवांस फशी पाडण्याच्या उद्योगास लागले आहेत! वेळ मोठी कठीण किंवा परीक्षेची आहे, हें खरें; पण म्हणूनच अशा वेळीं आमच्या लोकांनीं विशेष सावधगिरी ठेवली पाहिजे असें आम्हीं म्हणतों. ज्यांना हिंदुस्थानांतील गोऱ्या अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार व अनियंत्रित सत्तेखालीं सदैव गुलामगिरींत दिवस काढावयाचे असतील त्यांच्याबद्दल आमचें कांहीं म्हणणें नाहीं. पण ज्यांना हिंदुस्थानांतील सध्यांची राज्यपद्धति दुःसह होऊन सदर राज्यपद्धतींत केव्हांना केव्हां तरी सुधारणा व्हावी असें वाटत आहे त्या सर्वांनीं बाँबगोळयानें कांहीं निरपराधी मनुष्यें प्राणांस मुकलीं म्हणून त्याबद्दल आपली नापसंती प्रदर्शित करतांना, जाणूनबुजून किंवा म्याडपणानें आपल्या हातून भलतीसलती कबुली आयती सरकारास मिळूं नये, अशी खबरदारी घेतली पाहिजे. खुनाबद्दल नापसंती किंवा निषेध एकदां सोडून दहादां व्यक्त करा; त्याबद्दल कोणाची ना नाहीं. पण असलीं माथेफिरूपणाचीं कृत्यें राजकीय चळवळ करणाऱ्यांच्या तीव्र लेखांमुळें किंवा भाषणांमुळें होतात, असें निव्वळ खोटें आपण होऊन सरकारी अधिकाऱ्यांस कळवूं नका, एवढेंच देशाच्या हिताकरितां या लोकांजवळ आमचें मागणें आहे. हिंदुस्थानचा सर्व राज्यकारभार लोकमताची यत्किंचितहि पर्वा न धरतां केवळ गोऱ्या अधिकारी वर्गाच्याच एकमुखी तंत्रानें चालत असल्यामुळें राजकीय, औद्योगिक, नैतिक आणि सांपत्तिक दृष्टया हिंदुस्थानचें जें

नुकसान होत आहे तें सिद्ध करण्यास लागणारा पुरावा इतका भरभक्कम आहे कीं, सदर अधिकारी वर्गाच्या कैवाऱ्यांखेरीज कोणासहि हल्लींच्या राज्यपद्धतीच्या अन्यायीपणाबद्दल शंका रहाणार नाहीं. अशी राज्यपद्धति लोकांस नकोशी व्हावी, हें पाश्चिमात्य शिक्षणाचेंच फळ होय; आणि पुष्कळ वर्षे प्रयत्न करीत असतांहि सदर राज्यपद्धतींत सुधारणा होऊन लोकांस खरे स्वराज्याचे हक्क राज्यकर्त्यांच्या दुराग्रहानें अद्याप मिळत नाहींत, हें पाहून देशांतील राजकीय पुढाऱ्यांच्या मनांत संताप उत्पन्न झाल्याखेरीज रहाणार नाहीं. हा संताप सदर पुढाऱ्यांस कायदेशीर मर्यादेच्या आंत नेहमीं ठेवतां येईल खरा; पण ज्याचा संताप कायदेशीर मर्यादेचें अतिक्रमण करील, असा देशांत एकहि पुरुष निघूं नये असें मानणें म्हणजे मनुष्यस्वभावाची आपणांस ओळख नाहीं, असें जगास कळविण्यासारखें आहे. अर्थात् अनियंत्रित पद्धतीमुळें लोकांच्या मनांत जी अस्वस्थता किंवा असमाधान उत्पन्न झालेलें आहे, तें व्यक्त करणाऱ्या प्रजेच्या पुढाऱ्यांच्या लेखांशीं किंवा भाषणांशीं बाँबगोळे फेंकणाऱ्या लोकांच्या माथेफिरूपणाचा संबंध जोडणें हें अत्यंत नीचपणाचें कृत्य होय, असें आम्हीं समजतों. अँग्लो-इंडियन पत्रकारांनीं अशा तऱ्हेची हूल उठविली हें त्यांच्या आपमतलबी धोरणास अनुसरून आहे त्यांत कांहीं नवल नाहीं. आम्ही त्यानें फसून जातों, हीच कायती खरी खेदाची गोष्ट होय. कोणत्याहि देशांतील राज्यपद्धति वाईट असेल तर तेथील प्रजेंत असंतोष उत्पन्न होऊन प्रजेचे पुढारी राज्यपद्धतींतील दोष काढून टाकण्याच्या उद्योगास लागतात आणि त्याकरितां लोकमत जागृत करून सदर लोकमताच्या जोरावर आपल्या देशाचें कार्य साधून घेतात आणि ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध असून राजधर्मशास्त्रज्ञांस सर्वत्र संमत झालेली आहे. पण अशा कारणानें उद्भवलेल्या चळवळीमुळें देशांतील एखाद्या माथेफिरूचें–आणि देश आहे तेथें माथेफिरू आहेतच–संतापानें डोकें फिरून

तो जर एखाद्या अघोर कृत्यास प्रवृत्त झाला, तर त्याचा दोष वर सांगितल्याप्रमाणें राजकीय चळवळ करणाऱ्यांकडे लावणें कधींहि योग्य होणार नाहीं. अँग्लो-इंडियन वर्तमानपत्रकारांनीं हल्लीं जो बादरायण संबंध जोडण्याचा प्रयत्न चालविला आहे तो जर केवळ मूर्खपणाचा असता तर त्याबद्दल आम्हांस वाईट वाटलें नसतें; पण तो अज्ञानाचा नसून आपमतलबीपणाचा असल्यामुळें नीच आहे, असें म्हटल्यावांचून आम्हांस रहावत नाहीं. पेशवाईंत आनंदीबाईनें 'ध' चा 'मा' केला एवढयावरून स्त्रियांस शिक्षण देणें अजिबात बंद केलें पाहिजे, असें जर कोणीं प्रतिपादन करूं लागला तर तो जितका शहाणा ठरेल तितकाच एका गृहस्थानें संतापानें बाँबगोळा उडविला म्हणून सर्व राजकीय चळवळ बंद केली पाहिजे, असें म्हणणारा इसम असमंजस किंवा मूर्ख समजला जाईल. अशी कोणतीहि गोष्ट नाहीं कीं, जिचा केव्हांहि विकोप होण्याचा यत्किंचितहि संभव नाहीं. एखाद्या डॉक्टरानें एखाद्याचें गळूं फोडून तो गृहस्थ मेला म्हणून वैद्यकीची सर्व शस्त्रक्रिया उद्यां बंद करण्याचा जर सरकारनें प्रयत्न केला, तर कोणत्याहि देशांत कोणी तरी तो चालूं देईल काय ? समुद्रांत तारूं बुडून एखादा मनुष्य मरतो म्हणून खुद्द इंग्रज लोकांनीं ज्याप्रमाणें समुद्रयान सोडून दिलें नाहीं तद्वतच राजकीय चळवळीची स्थिति आहे. दादाभाई नौरोजी यांनीं कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत सांगितल्याप्रमाणें राजकीय सुधारणा करण्याच्या कामीं कितीहि निराशा झाली तरी प्रजेचे खरे पुढारी कधींहि संतापानें किंवा त्वेषानें बिथरून जात नाहींत; पण पुढाऱ्यांच्या अंगचा हा गुण देशांतील प्रत्येक मनुष्याच्या अंगीं कोठून असणार ? विशेषेंकरून ज्यावेळीं राजकीय स्थिति सुधारण्याकरितां केलेले अनेक प्रयत्न राज्यकर्त्यांच्या हट्टामुळें किंवा दुराग्रहानें निष्फळ झालेले असतात, तेव्हां देशांतील एखाद दुसऱ्या इसमाचें डोकें फिरून जाऊन तो अत्याचारास प्रवृत्त झाल्यास त्यांत कांहीं अस्वाभाविक

आहे काय ? सर्व देशांत सर्व ठिकाणीं अशा प्रकारचे अत्याचारी पुरुष असतात व आढळण्यांत येतात. मग हिंदुस्थानांतच असा प्रकार झाल्यास त्याचा एवढा बोभाट कां ? आणि त्याबद्दल राजकीय चळवळ करणाऱ्या लोकांवर आग पाखडण्याचें कारण तरी काय ? हें आम्हांस समजत नाहीं. हिंदुस्थानांत राजकीय अत्याचाराची ही पद्धत पहिल्यानेंच आली हें खरें; पण रशिया, जर्मनी, फ्रान्स, आयर्लंड वगैरे ठिकाणचा राज्यक्रांतीचा इतिहास जर आमच्या नजरेपुढें प्रत्यहीं येत आहे तर त्याचें अनुकरण करण्याची इकडे एखाद दुसऱ्यासहि बुद्धि होऊं नये हें व्हावें तरी कसें ? तात्पर्य, ज्या ज्या देशांत बेजबाबदार आणि अनियंत्रित अधिकारीवर्ग—मग तो स्वदेशी असो वा परदेशी असो—आपली सत्ता प्रजेवर निरंकुशपणानें गाजवीत आहे त्या त्या देशांत प्रजा नेहमीं असंतुष्ट रहावयाचीच, आणि सदर प्रजाजनांची विनंति किंवा मागणी अनेक वेळां दांडगाईनें अमान्य झाली तर त्यांच्यापैकीं एखाद दुसरा तरी बेफाम होऊन त्याची प्रवृत्ति कधींकधीं तरी अत्याचाराकडे व्हावयाचीच, अशी इतिहास उघड साक्ष देत आहे. हिंदुस्थानांत घडलेला प्रकार या इतिहासाच्या सरणीस सोडून नाहीं, हें आम्हीं सांगावयास नकोच. अँग्लो–इंडियन पत्रकार म्हणतात त्याप्रमाणें सरकार जर त्याचा अर्थ विपरीत समजूं लागलें तर तें आमचेंच नव्हे तर आमच्या राजकर्त्यांचेंहि दुर्दैव होय. मुलाला पुष्कळ वर्षे अविवाहित ठेविल्यानें त्याच्या हातून जर कांहीं अत्याचार घडला तर सदर अत्याचारापासून इषारा घेऊन होईल तितक्या लवकर त्या मुलाचा विवाह करून टाकणें हे जसें शहाण्या आई–बापांचें कर्तव्य, तद्वतच बॉम्बगोळ्यानें एखाद्या अधिकाऱ्याचा खून होण्यापर्यंत राजकीय असंतोषाची मजल आली हें लक्षांत आणून सदर राजकीय असंतोषाचीं जीं मूळ कारणें असतील तीं लवकर काढून टाकणें हें शहाण्या व मुत्सद्दी सरकाराचें कर्तव्य आहे. अत्याचार करणाऱ्यास शिक्षा होऊं नये किंवा

त्याच्या अत्याचाराचा निषेध होऊं नये असें आम्हीं बिलकूल म्हणत नाहीं. बाबत सामाजिक असो किंवा राजकीय असो, अत्याचार तो अत्याचारच; आणि सदर अत्याचार करण्याकडे प्रवृत्ति होण्यास मूळ कारण कांहीं असलें तरी सदर अत्याचारास कायद्यानें जें शासन व्हावयाचें तें झालेंच पाहिजे. परंतु असले अत्याचार कांहीं प्रसंगीं अपरिहार्य असतात हें लक्षांत आणून त्यापासून योग्य तो बोध घेणें हेंच खरें मुत्सद्दीपणाचें लक्षण होय; आणि कलकत्त्यास झालेल्या भयंकर बाँबगोळा प्रकरणाचा अशाच दृष्टीनें आमच्या सरकारकडून विचार होईल अशी आम्हांस उमेद आहे. बाँबगोळ्यानें स्वराज्य मिळत नाहीं, हें कोणाहि राजकीय चळवळींत पडलेल्या पुढाऱ्यास नव्यानें सांगावयास नको. प्रचलित राजकीय पद्धतींतील दोष लोकांस किती दुःसह होत चालले आहेत किंवा झाले आहेत, याचें कलकत्त्यांतील बाँब-गोळाप्रकरण हें उद्वेगजनक पण तीव्र लक्षण आहे; आणि एखादा वैद्य ज्याप्रमाणें एखादा तापकरी रोगी वायूनें बडबड करूं लागल्यास त्या लक्षणानें भांबावून न जातां त्यापासून इषारा घेऊन शांतपणानें रोगावर अधिक उत्तम औषधाची योजना करतो, तद्वत हिंदुस्थान सरकारनें हल्लींच्या प्रसंगीं आपलें वर्तन शांतपणाचें ठेवलें पाहिजे. अँग्लो-इंडियन पत्रकारांच्या आपमतलबी द्वेषानें किंवा कोटिक्रमानें भांबावून जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. प्रजेमधील राजकीय चळवळ कधींहि विनाकारण असत नाहीं. देशांतील राज्यपद्धतींत जे कांहीं दोष असतात त्यामुळें सदर चळवळ उत्पन्न झालेली असते; आणि एखाद्यानें संतापातिरेकांत एखाद्या अधिकाऱ्याचा खून केला म्हणून देशांतील राजकीय चळवळ जुलमी कायद्यानें बंद करणें म्हणजे लोकांत अधिक चीड उत्पन्न करणें होय, हें आम्हीं आमच्या सरकारास सांगावयास पाहिजे असें नाहीं. वाफेच्या बॉयलरांतील वाफ सेफ्टी व्हॉल्व्हच्या वजनास न जुमानतां एक वेळ बाहेर पडली म्हणजे इंजीनियरनें त्यापासून इषारा घेऊन वाफेचा

जोर पुढें कमी करण्याची ज्याप्रमाणें तजवीज करावी लागते, त्याप्रमाणें इतउत्तर बाँबगोळा टाकण्याइतकी प्रजेच्या संतापाची मजल न येऊं देण्या बद्दल आमच्या सरकारनें सूड उगविण्याची दुष्टबुद्धि मनांत न आणितां आपली राज्यपद्धति सुधारून तजवीज केली पाहिजे. शांतता व कायदेशीरपणा कोणासहि नको आहेत असें नाहीं; पण शांततेच्या सबबीवर बाँबगोळ्या- सारख्या घोर कृत्यांचा निषेध करतांना राज्यपद्धतींतील खऱ्या दोषांमुळें लोकांमध्यें जी चळवळ उत्पन्न झालेली आहे ती हाणून पाडणें हा सूड घेण्याचा मार्ग आहे, शहाणपणाची किंवा मुत्सद्दीपणाची गोष्ट नव्हे. अशा चुकीमुळें पद्धतशीर चळवळीसहि परिणामीं राज्यक्रांतीचें स्वरूप येतें, असा इतिहासाचा अनुभव आहे; हा अनुभव किंवा सदर अनुभवावरून शिकण्यासारखी ही सावधगिरीची सूचना आमच्या सरकारास जर मान्य होत नसेल तर आमचा नाइलाज आहे. आम्हांस जें खरें दिसतें तेंच आम्हीं सरकारास नम्रपणें कळ- वीत आहों; व आमची अशी समजूत आहे कीं, त्यांतच आमचें व आमच्या राज्यकर्त्यांचें हित आहे. बाँबगोळ्यानें खून करण्याचें अघोर कृत्य करण्यास देशांतील राजकीय चळवळ करणाऱ्या लोकांचे लेख व भाषणें कारण झालीं असें सरकारास कळविणें म्हणजे सरकारास जाणून बुजून खड्ड्यांत ढकलण्या- सारखें आहे. ज्या गोऱ्या गृहस्थांस गोऱ्या अधिकारी वर्गाचा कैवार घ्यावयाचा आहे व ज्यांची जुलमी सत्ता या देशावर अबाधित चालावी अशी इच्छा आहे, त्यांनीं सरकारास अशा प्रकारची सल्ला दिल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. पण आमच्या लोकांनीं बाँबगोळ्याचा निषेध करतांना अशा प्रकारची सल्ला देण्यास अँग्लो-इंडिअन पत्रकारांच्या एकतर्फी किंवा मायावी प्रोत्साहनानें तयार व्हावें किंवा सरकारनें अशा सूचना विचारांत घेण्याचा गैरमुत्सद्दीपणा करावा, या दोनहि गोष्टी शांत वृत्तीच्या, मुत्सद्दीपणाच्या अगर देशाच्या हिताच्या आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. एक पक्षीं भ्याड-

पणानें तर दुसऱ्या पक्षीं कावेबाजपणानें या सूचना करणाऱ्यांचीं मनें ग्रस्त झालेलीं आहेत. करितां दोघांनीं आणि विशेषतः करून सरकारनें आपलें डोकें शांत ठेऊन या गोष्टीचा विचार करावा, अशी त्यास आमची विनंति आहे. 'अति सर्वत्र वर्जयेत्' अशी एक जुनी म्हण आहे. सदोष राज्यपद्धतीमुळें उत्पन्न झालेल्या लोकांच्या मनांतील संतापाचा अतिरेक होण्याची सरकार आणखी किती वाट पहाणार ? प्रजेचा अंत पहाणें हें कांहीं सुधारलेल्या व शहाण्या सरकारास इष्ट नाहीं. शांतता अवश्य राखली पाहिजे व राखा; पण शांततेच्या सबबीवर प्रजेचे नैसर्गिक हक्क प्रजेस मिळण्याचे जे मार्ग आहेत त्यांत हितशत्रु खुषमस्कऱ्यांनीं केलेल्या सूचनांच्या सबबीवर कांटे पसरूं नका. असली राजनीति आजपर्यंत कोणासहि श्रेयस्कर झालेली नाहीं व इतिहासाचा अनुभव खरा असेल तर पुढेंहि व्हावयाची नाहीं, हें निश्चित होय. आम्हीं पुनः सांगतों कीं, उत्तरोत्तर दिवस कठीण येत चालले आहेत. अशा वेळीं सरकार व प्रजा या दोघांनींहि जर आपलीं डोकीं शांत ठेऊन अनिष्ट पण अपरिहार्य गोष्टीपासून योग्य बोध घेतला नाहीं, तर त्यामुळें देशाचें कायमचें नुकसान होईल, हें उभयतांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. खोट्या हुलीनें आजची वेळ मारून नेतां येईल; पण त्यानें कायमचा निर्वाह होणें शक्य नाहीं. त्यास सत्य शोधून काढून त्याप्रमाणें पुढें वर्तन ठेवणें हा एकच उपाय आहे; आणि तोच उपाय अंमलांत आणण्यास सरकारास बुद्धि होवो अशी परमेश्वराजवळ आमची प्रार्थना आहे.

०।४।१२
८७३०४

# बाँब गोळ्याचा खरा अर्थ*

कलकत्त्यास सांपडलेल्या बाँबगोळ्याच्या गुप्त मंडळीमुळें व मुझफरपूर येथें उडालेल्या बाँबमुळें हिंदुस्थानांतच नव्हे तर विलायतेसहि मोठी गडबड उडाली. ह्या प्रसंगीं दोन प्रकारच्या बातम्या विलायतेस एकदम जाऊन धडकल्या! एक बंगाली लोकांत बाँब गोळ्याचा अवतार झाला, व दुसरी दहा वीस हजार आफगाण लष्कर लँडी कोटाल किल्ल्यावर चाल करून आल्यामुळें अमीराशीं लढाई उपस्थित होण्याचा रंग दिसूं लागला. सरहद्दीवरील लढाईच्या बातमीमुळें विलायतेच्या लोकमतांत विशेष गडबड उडाली नाहीं इतकेंच नव्हे, तर बाँबगोळ्याच्या बातमीपुढें अमीराच्या लढाईची बातमीहि फिकी पडली. हिंदुस्थानांतील बाँबगोळा हा एकच विषय बोलण्याचा व लिहिण्याचा कांहीं दिवस विलायतेस होऊन बसला होता. चमत्कारिक बातम्या ऐकण्याकरितां नेहमींच उत्सुक असलेल्या लोकांवर, वर्तमानपत्रांतील लेखकांवर व पार्लमेंटांतील सभासदांवर ह्या बातमीचा विलक्षण परिणाम झाला; इतकेंच नव्हे तर सर्व युरोपखंडांतील द्रव्याच्या दोऱ्या हातांत धरून पैशाची हालचाल करणाऱ्या लंडनच्या धनाढ्य सावकारांनाहि ह्या बातमीनें चकित करून सोडलें व हिंदुस्थानांत पैसे पूर्वीच्याच शर्तींवर अडकवून ठेवण्याचें त्यांनीं नाकारलें! ईस्ट इंडियन रेल्वे कंपनी ह्या वेळीं लंडन शहरांत बरेंच मोठें कर्ज काढण्याच्या खटपटींत होती; पण हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची व ह्या राज्यव्यवस्थेवर अवलंबून असलेल्या प्रचंड कारखान्यांची विलायतेस बाँबगोळ्यामुळें थोडीशी नापत होऊन बरीचशी मनोती मागितल्याशिवाय कर्ज देण्याचें लंडनच्या सावकारांनीं व

---

* केसरी, ता. २६ मे १९०८.

लोकांनीं कबूल केलें नाहीं. १८९७ सालीं ज्युबिलीच्या दिवशीं रँडसाहेबांचा खून झाला, त्याप्रसंगींहि विलायतेस इतकी गडबड उडाली नव्हती. लाला लजपतराय ह्यांना हद्दपार केलें, व शिखांच्या पलटणींत फितूरी करण्याचा प्रयत्न झाला असें सरकारनें जाहीर केलें, तरी हिंदुस्थानकडे विलायतेच्या लोकांचीं मनें इतकीं वेधलीं नाहींत; तिनेवल्लीच्या दंग्यामुळेंहि विलायतेच्या लोकमतांत इतकी हालचाल झाली नाहीं. १८५७ सालानंतर हिंदुस्थानांत जर कोणची विलक्षण गोष्ट घडली असेल तर ती बाँबगोळयाचा अवतार ही होय, असें म्हणण्याकडे विलायतेच्या लोकमताचा कल स्पष्टपणें दृष्टीस पडत आहे.

बाँबगोळयाचा खरा अर्थ समजण्यास बाँबपक्ष कोणच्या कारणामुळें हिंदुस्थानांत जन्मास आला, हिंदुस्थानांत ह्या पक्षाचें कसें काय चालण्यासारखें आहे, आणि ह्या पक्षाचा परिणाम राज्यकारभारावर व लोकांवर काय होईल, ह्या तीनहि स्थितींचा शांतपणें विचार केला पाहिजे. बाँब-पक्षाचा जन्म कोणच्या कारणामुळें झाला, ह्याविषयीं सर्व विचारी लोकांत आतां एकमत झाल्यासारखें दिसत आहे. अधिकारी वर्गाच्या जुलमामुळें, जाचामुळें व लोकमताशीं बेपर्वाईनें वागण्याच्या हट्टामुळें हा बाँब-पक्ष जन्मास आला. बंगाली तरुणांचीं डोकीं फिरून जाईपर्यंत अधिकारी वर्गानें बंगाल्यांचा अंत पाहिल्यामुळें बाँबगोळा उडाला. तेव्हां या अनर्थाची जबाबदारी राजकीय चळवळीवर, लेखांवर किंवा भाषणांवर न टाकतां अधिकारी वर्गाच्या अविचारावर व हट्टावर टाकली पाहिजे. प्रजाजनांचे हक्क नाहींसे करून नवीन जुलमी कायदे अमलांत आणणें हें बाँबगोळयांवर औषध नसून प्रजेला महत्त्वाचे हक्क दिल्यानें व प्रजेची सुखसंपत्ति वाढविल्यानेंच हे बाँबगोळे बंद पडणारे आहेत, अशा तऱ्हेचा आम्ही आपला अभिप्राय गेल्या दोन अंकांत प्रसिद्ध केला होता. केसरींत प्रसिद्ध झालेल्या मतांसारखींच मतें

विलायतेसहि सर हेनरी कॉटन, सर विल्यम वेडरबर्न सारख्या सरकारी बड्या पेन्शनरांनींहि प्रसिद्ध केलीं आहेत, ही समाधानाची गोष्ट होय. सरकारचे हितशत्रु जे खोडसाळ गुप्त पोलीस त्यांच्या खोट्या रिपोर्टांवर भिस्त ठेऊन भल्या लोकांच्या सल्ल्याचा अनादर करण्याची सरकारास चटक लागली आहे आणि त्यामुळें लोकांवर वक्रदृष्टि करून करडा अंमल गाजविण्याचा सरकारचा हट्ट कमी होत नाहीं. हा हट्ट बाँबगोळयास जन्म देतो, असें सर विल्यम वेडरबर्न यांचें मत आहे. सर हेनरी कॉटन म्हणतात कीं, बंगाली तरुणांना फटके मारण्याची शिक्षा करण्यांत आली; त्यामुळें अपमानाच्या दुःखांत साहजिकपणें चवताळून जाऊन त्यांनीं बाँब–पक्षाची कांस धरली. मॅजिस्ट्रेट साहेबांच्या फटक्यांनीं तरुणांना बाँबपक्षाकडे हांकलून दिलें; हा अपराध तरुणांचा का अधिकारी वर्गाच्या हातांतील चाबुकाचा? तरुणांच्या पाठीवर कोरडे ओढओढून त्यांना खड्डयाच्या तोंडापर्यंत पिटाळावयाचें आणि यापैकीं एखाद्यानें, असेंहि करून दुःख नाहींसें होत नाहीं तसेंहि करून भोग सुटत नाहीं, अशी निराशा झाल्यावर आपण एकटेच खड्डयांत कां पडा? असा उद्वेगाच्या भरांत विचार करून, चाबूक मारणाराचा पाय धरून जर खड्डयांत उडी घेतली, तर ह्या अनर्थाबद्दल जबाबदार कोण? पाठीवर कोरडे ओढीत ओढीत निराशेच्या खड्डयापर्यंत तुम्ही तरुणांना अगोदर पिटाळतां कां? ज्यानें आपणाला उद्वेगाच्या, निराशेच्या व संतापाच्या खड्डयापर्यंत चोपीत आणलें त्याला आपणाबरोबर कड्यावरून खालीं ओढण्याचा प्रयत्न करणें हा मनुष्यस्वभाव आहे. अशा वेळीं तूं एकटाच कड्यावरून खालीं पडून मर, मलाहि खालीं कां खेंचतोस, असें म्हणणें सयुक्तिक होईल काय? पाण्यांत मनुष्य बुडत असला आणि त्याला वांचविण्याच्या सदिच्छेनें एखादा त्याच्या जवळ गेला तरी त्याच्या गळयाला मिठी मारण्यास बुडणारा चुकत नाहीं. संकटामुळें भांबावून जाऊन उपकार

करणारासहि अपकार करण्यास मनुष्य उद्युक्त होतो. मग पाण्यांत बुडत असतांना संकटाचे डोहांत सोडणारा जर आटोक्यांत आला, तर त्याला स्वतःबरोबर मृत्यु-पंथाकडे न ओढण्याइतकें उदार व शांत मन संसारी लोकांत कोठून दृष्टीस पडणार ? बंगाली लोकांनीं योग्य रीतीनें बंगभंगाविरुद्ध एकसारखी चळवळ केली; पण त्यांची दाद लागली नाहीं. बरें, दाद लागली नाहीं तर नाहीं; स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण वगैरे शिष्टसंमत व स्वावलंबनाच्या मार्गानें आपण आपली सुधारणा करून घेऊं म्हणून ते राष्ट्रीय उन्नतीच्या मार्गाला लागले; तेव्हां बंगाल्यांच्या ह्या स्वदेशाभिमानामुळें कांहीं अधिकाऱ्यांनीं आपलें डोकें फिरवून घेतलें, आणि बंगाल्यांवर कांहीं मुसलमान गुण्ड सोडून बंगाल्यांच्या मालमत्तेची व बायकांच्या अब्रूची खराबी करविली. अधिकारीवर्गाच्या कलाचे विरुद्ध गेलें म्हणजे पर्यायानें सूड उगविण्याचा हा धडा कांहीं माथेफिरू अधिकाऱ्यांनीं बंगाली तरुणांना घालून दिला. जसें पेरावें तसें उगवतें. अधिकारी माथेफिरू झाले; बंगाली तरुणहि माथेफिरू झाले. लपून छपून, खासगी किंवा धार्मिक भांडणाचा फायदा घेऊन पर्यायानें बंगाल्यांना झोडपून काढण्याचा, व भीतीनें गांगरून सोडून दरारा बसविण्याचा, खाजगी द्वेषाच्या स्वरूपाचा आततायीपणाचा मार्ग कांहीं अधिकाऱ्यांनीं कोमिल्लाचे वगैरे दंग्याचे वेळीं आक्रमिला; बंगाली तरुणांनींहि तोच आततायीपणाचा मार्ग धरला. दोघांचीहि कृति एकच स्वरूपाची व दोघेहि सारखेच अपराधी. शांत व विचारी तत्त्ववेत्ते दोघांनाहि एकाच तराजूनें जोखणार आणि दोघांचीहि एकच किंमत ठरविणार. आग्यावेताळाचे संचाराचे वेळीं मागेपुढें बॉंबगोळे उडावयाचेच, हा सृष्टीचा क्रम ठरलेला आहे. अशा वेळीं सृष्टीचे नियमन करणाऱ्या देवता बॉंबगोळे बंद कर म्हणून ब्रम्हदेवाची आराधना करीत नाहींत, तर आग्यावेताळाचा संचार बंद पाडून वेताळाला ठरवून दिलेल्या व नियमित

केलेल्या देवळाचे चतुःसीमेंत थंडपणें बशीव म्हणून ब्रम्हदेवाची आराधना करीत असतात. लहरीमुळें जागा सोडून भटकणाऱ्या वेताळाच्या भयानक बुभुःकाराचा प्रतिध्वनि बॉंबगोळा होय. कर्कश व भेसूर ओरडण्याचा प्रतिध्वनि कर्णमधुर निघावा अशी पृथ्वीची रचना जगत्स्रष्ट्यानें केलेली नाहीं. जसला पहिला ध्वनि, तसलाच प्रतिध्वनि; प्रतिध्वनीच्या लाटा सूक्ष्म व गुप्त होत जातात एवढाच फरक. मधुर ध्वनीच्या प्रतिध्वनीला आलाप म्हणतात, व हे आलाप जसजसे सूक्ष्म व अव्यक्त होत जातात तसतसें श्रोत्यांचें मन अधिक प्रसन्न होतें; पण भेसूर व भयानक राजनीतीमुळें सूक्ष्म व गुप्त मंडळयांचें जाळें सभोंवारच्या गिरिकंदरांत पसरलेलें आहे, असा प्रतिध्वनि जेव्हां उमटूं लागतो, तेव्हां अधिकारी वर्गाचा कर्कश गर्दभी सूर केव्हां बंद पडेल असें सर्वांना होऊन जातें.

'पायोनियर' 'इंग्लिशमन,' व मुंबईचा 'टाइम्स' ह्यांच्या मताला पुष्टि देणारे माथे फेरू पार्लमेंट सभेंत व लिबरल पक्षांतहि नाहींत असें नाहीं. ना. रीस साहेब हे एक लिबरल पक्षातर्फेचे पार्लमेंटचे सभासद असून बॉंबगोळाप्रकरणासंबंधानें त्यांचा अभिप्राय असा आहे कीं, नेटिवांना दाबून टाकून जितका करडा अंमल गाजवावयास पाहिजे होता तितका सक्त दरारा अधिकारी वर्गाला बसवितां आला नाहीं, म्हणून बॉंब–गोळे उद्भवले! लोकांना चांगलें भरडून काढावयाचें होतें, मग काय बॉंबगोळे करण्याची लोकांची छाती होती? बॉंबगोळे करायला थोडीशी अक्कल लागते, किंचित् द्रव्यबल लागतें, जरासें मनुष्यबळ लागतें; बॉंबगोळे करण्याइतकी अक्कल लोकांच्यापाशीं शिल्लक राहील, इतकें द्रव्यबल दिसून येईल, व एखाददुसरा तरी संतापी निपजेल, इतक्या सवलती तरी अधिकारी वर्गानें लोकांना कां दिल्या? रीस साहेबांचें असें म्हणणें दिसतें कीं, लोकांवर जितका करडा जुलूम व्हावयाला पाहिजे तितका झालेला नाहीं. दुसऱ्याच्या थोबाडीत जर

लगावयाची तर त्याला रडण्याचें व हूं का चूं करण्याचेंहि सामर्थ्य राहूं नये, अशी जालीम चपराक लगावली पाहिजे. मिळमिळीत ठोसा मारला म्हणून बाँबगोळयाचा आक्रोश ऐकूं येत आहे. तेव्हां रीस साहेब सरकारास सल्ला देतात कीं दडपशाही करावयाची तर दया माया न करतां सपाटून दडपून टाका, सर्वांचीं डोकीं सारखीं ठेचून चोहोंकडे सपाट मैदान बनवा, म्हणजे तुमच्या जुलमी कृत्यांचा प्रतिध्वनि कोठेंच उमटावयाचा नाहीं. ना. रीस सुचवितात त्याप्रमाणें सरकारनें जर सर्व मर्यादा सोडून दिल्या तर त्याचा परिणाम सरकारास व हिंदुस्थानास केव्हांहि चांगला होणार नाहीं. बाँबगोळा अल्प ज्ञानानें, अल्प किंमतीनें व थोडयाशा खटपटीनें जरी होत असला तरी सांप्रत त्यापासून अधिकारीवर्गास विशेष भीति नाहीं. बाँबगोळा युरोपांत जितका भयानक आहे तितका हिंदुस्थानांत नाहीं; त्याचें कारण मुंबईच्या 'ॲडव्होकेट'नें असें दिलें आहे कीं बाँबगोळा करणारे माथेफिरू जरी कांहीं उत्पन्न झाले तरी अधिकाऱ्यांना असल्या माथेफिरूंची माहिती देण्यास पोलिस व इतर लोक उत्सुक असल्यामुळें बाँबगोळयाच्या गुप्त मंडळ्या कलकत्त्याच्या बाँबगोळयाप्रमाणें हिंदुस्थानांत तावडतोब उघडकीस आल्यावांचून रहाणार नाहींत. हल्लीं अंमलांत असलेल्या दडपशाहीच्या धोरणानें कांहीं माथेफिरू निर्माण झाले. ना. रीस म्हणतात त्याप्रमाणें सर्व ठिकाणचे सर्वच अधिकारी सरास सर्वांना सारखेच दटावूं लागले, व एका माळेचे मणी होऊन सारखे माथेफिरू तहाहयात बनले, तर चुगल्या सांगणाऱ्या प्रतिष्ठितांची संख्या संपुष्टांत येऊन पोलिसांतहि माथेफिरू दिसूं लागणार नाहींत कशावरून? इंग्रजी शिक्षणाचा हिंदुस्थानांत झालेला फैलाव, लोकांत उत्पन्न होऊं लागलेला राष्ट्रीयत्वाचा अभिमान, व माध्यान्हीं चढत चाललेला जपानच्या भाग्याचा सूर्य, ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां रीससाहेबांचें म्हणणें सरकारनें जर जमेस धरलें तर त्याच्यापासून सरकारचें

काडीचेंहि हित होणें शक्य नाहीं. लोक शेफारून गेले आहेत म्हणून बॉंबगोळे तयार करितात, ही कल्पनाच चुकीची होय. लोकांच्या उन्मत्तपणाचें पर्यवसान बॉंबगोळयांत होतें, असें सरकारास ह्या वेळीं सांगणारा मनुष्य सरकारनें आपला शत्रु समजला पाहिजे. सरकारनें नेटिवांना व पार्लमेंटच्या कांहीं सभासदांना बेताल लिहूं दिलें, बेताल बोलूं दिलें व बेताल चळवळी चालू दिल्या, म्हणून लोकांच्या बुद्धीहि बेताल होऊन कांहीं तरुण माथेफिरू निपजले, हा कोटिक्रमच बुद्धिभ्रंशाचा निदर्शक होय. मुलगा वयांत आला, बापानें त्याच्या अवस्थेच्या स्थितीप्रमाणें लग्न करून देण्याचें नाकारलें, आणि अवस्थेचा अंमल झुगारण्याची ताकद जर त्याच्या अंगीं दिसली नाहीं तर ताळ कोणी सोडला ? बापानें का मुलानें ? अवस्थेची मर्यादा कोणी उल्लंघिली ? बापानें कां मुलानें ? इंग्रजी शिक्षणानें राष्ट्ररूपी मुलगा हिंदुस्थानांत जन्मास आला, जपान आदिकरून पौर्वात्य राष्ट्रांच्या अभ्युदयाच्या कालाच्या ओघानें आपोआप तो वयांत आला; आतां त्याला त्याच्या अवस्थेनुरूप स्वराज्याच्या हक्कांच्या संस्थांशींच संलग्न करणें योग्य होय. हा अवस्थेचा ताल संभाळण्यांत सरकार हयगय करीत असल्यामुळें कांहीं तरुणांचें वर्तन बेतालपणाचें झालें आहे. हें बेतालपणाचें वर्तन नेहमींचीच दिनचर्या होऊन बसण्यापूर्वीं अवस्थेचा ताल ओळखून स्वराज्याच्या हक्काच्या संस्थांशीं तरुणांना संलग्न करून माथेफिरूंना ताळयावर आणण्याचा उद्योग सरकारनें प्रथम केला पाहिजे. जो बाप स्वतः बाहेरख्याली असतो, स्वतःच्याच चैनीकडे व बेताल वर्तनाकडे कुटुंबाची सर्व मिळकत खर्च करण्याची ज्याची प्रवृत्ति असते, आणि स्वतःच्या ख्यालीखुशालीकरितां पुढच्या पिढीवर केवळ ऋणाचा बोजा ठेवण्यास जो चुकत नाहीं तो बाप मात्र माथेफिरू मुलाशीं माथेफिरूपणानें वागून मुलाचे हातून रोज बेतालपणाचें वर्तन होईल, असलें घोर पाप करण्यास प्रवृत्त होतो. बॉंबगोळयाचा अर्थ

लोक शेकारून सरकारच्या डोक्यावर मिरें वाटूं लागले आहेत, असा करणें म्हणजे स्वछंदी, बेताल व दुर्व्यसनी बापाचें अनुकरण करण्यास सरकारास सांगण्यासारखें आहे. लोकांच्या उन्मत्तपणाच्या कल्पनेनें बाँबगोळयाची पंक्ति नीट लागत नाहीं. सरकारच्या कृत्यामुळें प्रजाजनांत संताप किती वाढत चालला आहे, व प्रजाजनांच्या योग्य इच्छेचा ताल सरकारच्या धोरणानें कसा सोडला आहे, हें दाखविणारें यंत्र बाँबगोळा होय. प्रजेची निराशा व ह्या निराशेमुळें उत्पन्न होणारा संताप ह्यांची पराकाष्ठा मापण्याचें जर कोणचें साधन असेल तर तें बाँबगोळयासारखे अत्याचार होत. प्रिय गोष्टीचा विरह झाला असतांना आततायीपणासून जर कोण पराङ्मुख करीत असेल, तर तो आशातंतु होय, व हा आशातंतुहि ज्यावेळीं निर्दयपणानें तोडला जातो तेव्हां विरहानें पोळले जाणारे लोक माथेफिरू बनतात. सभोंवारच्या स्थितींत जेव्हां मनुष्याला कांहींच आशा दिसत नाहीं, तेव्हां त्याची बुद्धि आपोआप त्या स्थितीला विटून जाते. सभोंवारच्या स्थितीला ज्यावेळीं एखाद्या समाजाचा ताल संभाळतां येत नाहीं, किंवा एखादा समाज निराश होऊन ज्यावेळीं सभोंवारच्या स्थितीचा ताल त्याला संभाळतां येणें अशक्य होण्यास आरंभ होतो, तेव्हां बाँबगोळयासारखीं बेतालपणाचीं भेसूर कृत्यें घडून येऊं लागतात. स्पेन्सरचें असें मत आहे कीं, सरकार ज्यावेळीं हट्टानें जुलूम करूं लागतें व लोकमताला योग्य मान देण्याचें एकसारखें नाकारतें, तेव्हां भयंकर मार्गांशिवाय इतर मार्गांनें राज्यकारभारांत फेरफार घडून न येण्यासारखीच परिस्थिति उत्पन्न होते; लोकस्वभाव व ही परिस्थिति हीं एकमेकांचा ताल संभाळीतनाशीं होतात; आणि अशा वेळीं समतोलपणा राखण्याकरितां कराव्या लागणाऱ्या भयंकर गोष्टींना क्रांति असें म्हणतात. स्पेन्सरचें हें तत्त्वज्ञान सरकारनें, ह्यावेळीं आपल्या डोळयांपुढें सतत ठेवलें पाहिजे; पाश्चिमात्य शिक्षणानें, राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेच्या फैलावानें, व पौर्वात्य राष्ट्रांच्या अभ्यु-

दयानें, नेटिव लोकांचें पूर्वीचें राष्ट्रीय शील आतां पालटत चाललें आहे. हिंदुस्थानचें राष्ट्रीय शील व सरकारी संस्था ह्यांमध्यें विरोध उत्पन्न होऊन समतोलपणा राखण्याची क्रिया-क्रांतीची क्रिया-सुरू होण्याची वेळ जवळ येऊन ठेपत आहे. हें ओळखण्याचें साधन म्हटलें म्हणजे स्पेन्सरच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें बाँबगोळ्यासारखीं आततायीपणाचीं व बेतालपणाचीं कृत्यें हीं होत. ह्या क्रांतीच्या वेळेला हिंदुस्थानांत सुरवात अद्याप झाली नसून पुढें व्हावयाची आहे. तेव्हां शहाण्या माणसाप्रमाणें ह्या पुढील वेळेचीं शेंडी सरकारनें आगाऊच आपल्या हातांत घेऊन क्रांति घडवून आणण्याचें काम लोकांवर सोंपविण्यापेक्षां स्वतःच राज्यपद्धतींत योग्य फेरफार करण्यास सुरवात करावी, हें प्रजाजनांना व सरकारला दोघांनाहि अधिक हितावह होय.

# बाँबगोळ्यांचें रहस्य*

१८९७ सालीं ज्युबिलीच्या रात्रीं रँडसाहेबांचा खून झाल्यानंतर मुझफर-पुरास बाँबगोळा उडेपर्यंत अधिकारी वर्गाचें मन वेधणारें नांव घेण्यासारखें कृत्य प्रजाजनांच्या हातून झालेलें नाहीं. १८९७ सालचे खुनांत व बंगालचे बाँबगोळयांत बरेंच अंतर आहे. धाडस व काम करण्याची शिताफी ह्या दृष्टीनें विचार केला असतां बंगाल्यांची तारीफ अधिक केली पाहिजे. चाफेकरांनीं किंवा बंगाली बाँबवाल्यांनीं त्यांच्या स्वतःवर झालेल्या जुलमाचे प्रतिकारार्थ खून केले नाहींत; व्यक्तिव्यक्तींचा द्वेष किंवा खाजगी भांडणतंटे ह्या खुनांना कारणीभूत झालेले नाहींत. आपण एकप्रकारचा परोपकार करीत आहों, ह्या भावनेमुळें सामान्य खुनांहून ह्या खुनाचें स्वरूप निराळें झालें आहे. ह्या खुनाची प्रेरणा करणारीं कारणें असामान्य असलीं तरी बंगाली बाँबचीं कारणें विशेष सूक्ष्म आहेत. १८९७ सालीं प्लेगच्या वेळीं पुणेकरांवर विशेष जुलूम झाला होता, व त्या जुलमामुळें उत्पन्न झालेली चीड केवळ राजकीय स्वरूपाची नव्हती. राज्यकारभाराची पद्धतच खराब आहे व अधिकाऱ्यांना निवडून काढून व्यक्तिशः भय दाखविल्याशिवाय ही पद्धत बदलण्यास ते संमति देणार नाहींत अशा तऱ्हेचा मोठा प्रश्न चाफेकर बंधूंच्या नजरेपुढें नव्हता. प्लेगच्या जुलुमावर म्हणजे एका विशिष्ट कृत्यावर त्यांचा कटाक्ष होता. वंगभंगावर बंगाली बाँबचा तर कटाक्ष आहेच, पण वंगभंगामुळें दृष्टीस पडूं लागलेल्या अधिक विस्तृत मैदानावर बाँबगोळयाची नजर खेळत आहे. शिवाय पिस्तूल किंवा गोळीबार हें जुनें हत्यार आहे; बाँब--गोळा हा पाश्चिमात्य शास्त्रांचा अगदीं अलीकडील शोध आहे.

* केसरी, ता. २ जून १९०८.

पाश्चिमात्य शास्त्रांनीं कोणत्याहि देशांतील अधिकारी-वर्गाची सत्ता दृढ केली आहे. एक राजा दुसऱ्या राजाशीं भांडूं शकतो, पण कोणच्याहि देशांतील प्रजेला त्याच देशांतील लष्कराशीं भांडणें दुरापास्त झालें आहे. नवीन नवीन शास्त्रीय शोधांमुळें लष्करची सत्ता भयंकर वाढली असून नवीन तोफा, नवीन बंदुका व नवीन तऱ्हेचा दारूगोळा, ह्यापुढें अत्यंत शूर म्हणून नांवाजलेल्या लोकांचें शौर्य हां हां म्हणतां निरुपयोगी ठरतें. १९०५–०६ सालीं रशियन प्रजाजनांचे राज्यक्रांतीचे बेत ह्याच कारणामुळें फसले; आणि उद्यां जर इंग्लंडचें लष्कर बादशहा सप्तम एडवर्ड यांच्या मुठींत गेलें व त्यांना तशीच बुद्धि झाली, तर इंग्लंडांतील पार्लमेंटसारख्या स्वराज्याच्या संस्था, इंग्लंडांतील लोकांच्या अंगीं स्वराज्याची पात्रता कितीहि असली तरी, फारसा वेळ न लागतां धुळीस मिळवितां येतील. पाश्चिमात्य शास्त्रांनीं लष्करचें सामर्थ्य इतकें भयंकर केलें आहे. पण ज्या सूक्ष्म बीजांमध्यें प्रचंड वृक्ष उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असतें त्याच बीजांत त्या वृक्षाच्या नाश करणारा मृत्यूहि वृक्षाच्या उत्पत्तीबरोबरच उत्पन्न झालेला असतो. जन्माच्या वेळींच मरणाची सिद्धता झालेली असते. जन्म प्रथम दिसतो; मृत्यूवरील पडदा मागाहून हळूहळू दूर होऊं लागतो. परमेश्वरच विश्व उत्पन्न करतो, परमेश्वरच विश्वाचा नियंता आहे; पाश्चिमात्यांच्या शास्त्रानेंच नवीन तोफा, नवीन बंदुका व नवीन दारूगोळा उत्पन्न केला; व पाश्चिमात्यांच्या शास्त्रानेंच बॉंब-गोळा तयार केला. लोक उगीच एकसारखे जगत राहून, जगण्याचा फाजीलपणा चोंहोंकडे माजून राहील म्हणून मरणाची मात्रा परमेश्वरानें उत्पन्न केली. जगांतील जगणें अजीबात बंद पाडण्याचें सामर्थ्य ह्या रोजच्या मृत्यूच्या अंगीं नाहीं; मृत्यूचा कारभार अव्याहत चाललेला असला तरी, जगण्याच्या संसाराचा जोर कमी होत नाहीं. मृत्यु संसाराचा ओघ बदलीत नाहीं किंवा संसार नाहींसाहि करीत नाहीं.

संसाराचा दर्प हरण करण्याचें काम मृत्युकडे आहे, म्हणून जगणें अशुद्ध होऊं न देण्याची खबरदारी मृत्यु घेत असतो. बॉंबगोळयासुळें कोणत्याहि सरकारचें लष्करी सामर्थ्य नाहींसें होत नाहीं, लष्कर पंगू करण्याची ताकद बॉंबगोळयाचे अंगीं नाहीं; पण लष्करी सामर्थ्याच्या दर्पामुळें जी अव्यवस्था माजते तिजकडे बॉंबगोळयामुळें सरकारचें लक्ष वेधलें जातें.

१८९७ सालच्या खुनामुळें प्लेगच्या कारभाराचें स्वरूप बदलण्यास प्रारंभ होऊन लवकरच प्लेगची व्यवस्था अजीबात पालटली. सांप्रत असें सांगण्यांत येत आहे कीं, बंगाल्यांच्या बॉंबगोळयांना आम्ही भीक घालीत नाहीं; ह्या शब्दांचा अर्थ काय ? बॉंबगोळयानें इंग्रज सरकार उलथून पडत नाहीं, हें बंगाली बांबवाल्यांनींच कबूल केलें आहे. बॉंबगोळयाचें भयहि सरकारला वाटण्याचें कारण नाहीं; पण लष्करी सामर्थ्याच्या दर्पाला बॉंब-गोळयाचें भय वाटलेंच पाहिजे, व हें भय प्रांजल बुद्धीनें कबूल करण्यांत कोणत्याहि प्रचंड शक्तीला कमीपणा नाहीं. प्लेगची प्रारंभींची व्यवस्था लोकांना न आवडणारी, अत्यंत त्रासदायक व संतप्त करून सोडणारी होती; ही गोष्ट प्रथम सरकारास समजली नाहीं. रँडसाहेबांच्या खुनानें ही चूक सरकारचे ध्यानांत आली; व पुढें प्लेगाचे चोहोंकडे दंगेधोपे झाल्यावर सरकारनें चूक उघडपणें कबूल करण्यास कांकूंहि केलें नाहीं. रँडसाहेबांचा खून झाला म्हणून प्लेगची व्यवस्था चुकीची झाली, अशांतला भाग नाहीं; ती व्यवस्था प्रथमपासूनच चुकीची होती, मूळचीच चुकीची होती; पण शहाण-पणाच्या घमेंडीमुळें अधिकाऱ्यांना चुकीची दिसली नाहीं. कांहीं गोष्टींकडे लोकांच्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे, केवळ स्वतःच्याच डोळ्यांनीं पाहून भागत नाहीं, हा प्रकाश अधिकाऱ्यांच्या डोक्यांत पडला नव्हता. हा प्रकाश रँड-साहेबांच्या खुनामुळें पडला व शहाणपणाच्या घमेंडीला ज्ञान उत्पन्न होऊन तिनें अधिकाऱ्यांना निदान प्लेगच्या व्यवस्थेपुरतें सोडून दिलें. ह्यांत काय

वावगें झालें ? इंग्रज सरकारच्या सामर्थ्यास ह्यांत कोठें वट्टा लागला ? चालतांना डोळ्यांचा उपयोग करण्याचें विसरूं नये, हें ठेंच लागली असतां शिकावयाचें नाहीं, तर केव्हां शिकावयाचें ? कितीहि ठेंचा लागोत, मी उन्मत्ताप्रमाणें डोळे असून आंधळाच राहणार, असें म्हणणारा मनुष्य स्वतःचा शत्रु होय. बाँबगोळ्यांची ठेंच हिंदुस्थान सरकारास लागली आहे, व ह्या ठेंचीचा उपयोग राज्यकारभार सुधारण्याकडे जर सरकारनें केला नाहीं, तर सरकार स्वतःचें शत्रु ठरेल. अशा ठेंचा संसारांत राजास काय, रंकास काय लागाव्या लागतात; किंबहुना अशा ठेंचा योग्य वेळीं व योग्य स्थळीं सर्वांना आपोआप लागतील, अशी ईश्वरानें सृष्टीची रचनाच करून ठेविलेली आहे. बरेच दिवस बिनखटका जगत गेलें म्हणजे मनुष्य कर्तव्याला विसरूं लागतो व अप्रतिबंध जगण्याचा मद त्याच्या डोळ्यांवर येऊं लागतो. हा मद नाहींसा करण्याकरितां बाप मेल्याची ठेंच त्याला लागावी, अशा धोरणानें सृष्टीचें यंत्र स्वयंप्रेरणेनें फिरत असतें. बापाला मरण आलें तरी मुलगा त्याच्या जागीं येतो, मुलगा मेला तरी नातू संसार चालवितो, नातू चचला तरी पणतू पुढें येतो, हें मृत्यूला माहीत नसतें असें नाहीं. मृत्यु संसाराचा उच्छेद करूं शकत नाहीं; पण बापाचें मरण मुलग्याला शहाणपण देतें; मुलग्याचा मृत्यु नातवाला जागृतावस्थेंत ठेवतो, व नातवाचा काल पणतूला ज्ञानी बनवितो. ज्यावेळीं मृत्यूच्या ठेंचेपासून शहाणपणा शिकण्याचें मनुष्य नाकारतो, त्यावेळीं मनुष्य स्वतःच्या नाशास कारणीभूत होतो. बाँबगोळ्यास सरकारनें भीक न घालतां अधिक उन्मत्तपणानेंच वागत सुटावें अशी सरकारास सूचना करणारीं मुंबईच्या टाइम्ससारखीं पत्रें सरकारचा पूर्वजन्मीचा दावा ह्यावेळीं उगवीत आहेतसें आम्हांस वाटतें. मुलगा उच्छृंखल व बदफैली असला म्हणजे बाप मेल्यापासून शिकावयाचा धडा तो शिकत नाहीं, तर उलट असल्या ठेंचांमुळें अधिकच मदांध होतो.

नगर वाचनालय, सातारा



अशांतली स्थिति कांहीं अँग्लो-इंडियनांची झाली आहे. बदफैली मुलीचा बाप मेल्याची बातमी ऐकून गांवांतील कलालांना व विश्वयोषितांना जसा आनंद होतो, त्याप्रमाणें बाँबगोळ्याचा प्रसंग सरकारवर आलेला पाहून स्वभावतः तारवटलेला मुंबईचा 'टाइम्स' व सरकारनें पर्यायानें पोसलेल्या पत्रांत मोडणारीं पुण्यामुंबईचीं कांहीं नेटिव पत्रें, ह्यांना स्वतःची पोळी पिकणार असें वाटूं लागलें आहे. ह्या आनंदित झालेल्या चांडाळचौकडीचें सरकारास असें सांगणें आहे कीं, वर्तमानपत्रांतील लेखांमुळें व राष्ट्रीय पक्षाच्या भाषणांमुळें बाँबगोळ्याची ठेंच सरकारास लागली; तेव्हां बाँबगोळ्यास भीक न घालतां सरकारनें ह्या पत्रांच्या व वक्त्यांच्या मुसक्या बांधून टाकाव्या. १८९७ सालीं त्या चांडाळचौकडीनें असेंच काहूर माजविलें होतें, व त्या काहूराच्या अर्धवट नादीं लागून गेलीं दहा वर्षें जें दडपशाहीचें धोरण सरकारनें चालू ठेवलें त्याचीं कडू फळें बाँबगोळ्याच्या रूपानें सरकारच्या पदरांत पडलीं आहेत. यावेळीं सरकारनें जर हें धोरण बदललें नाहीं तर त्याचा परिणाम राज्यकर्त्यांना व प्रजाजनांना याहूनहि अधिक भयंकर झाल्यावांचून रहाणार नाहीं.

बाँबगोळ्यांना भीक कां घालूं नये, ह्याचें उत्तर अधिकारीवर्गाच्या खाकेंतील पत्रांनीं असें दिलें आहे कीं, हा सरकारला दरडावण्याचा प्रयत्न आहे व सरकार भितें असें एकदां लोकांच्या ध्यानांत आलें म्हणजे हरएक क्षुल्लक बाबतींतहि बाँबगोळ्याचा बाऊ दाखवून हे लोक सरकारास सळो का पळो केल्यावांचून राहणार नाहींत. सरकारला भय दाखवून भीक मागण्याची ही युक्ति आहे; अशा रीतीनें दरडावणाऱ्यांच्या तोंडावर भाकरीचा तुकडा टाकणें इष्ट नसून तोंडांत दोन लगावणें हाच शहाणपणाचा मार्ग आहे; खरखरमुंडेपणाला भिक्षा मिळते अशी समजूत यजमानानें भिक्षेकऱ्यांची केव्हांहि होऊं देतां कामा नये. ह्या यजमानानें व मवाळ भिक्षेकऱ्यांनीं

दोघांनीं मिळून ओरडाओरड करून त्रास देणाऱ्या खरखरमुंड्यांना पिटाळून लावलें पाहिजे. यजमानाची इच्छा, व आपली गरिबी हीं दोन्हीं लक्षांत घेऊन भिक्षेकऱ्यांनीं मवाळ शब्दांनीं हळूच भीक मागावी, शक्तीबाहेर बाँबगोळ्यासारखा कर्कश आवाज काढूं नये. मुंबईचा ' टाइम्स ' आदिकरून अँग्लो-इंडियन पत्रांतून, दडपशाहीचें धोरण कां जाज्ज्वल्य केलें पाहिजे, ह्यांचीं कारणें वरील तऱ्हेनें दिलीं आहेत. बाँबगोळ्याचें स्वरूप काय, बाँबगोळ्याची ताकद काय व बाँबगोळ्याचा खरा अर्थ काय हें न समजल्या-मुळें वरील तऱ्हेचा भ्रामक कोटिक्रम करण्यांत आला आहे. सरकारला दरडा-वून पाहून भीक मागण्याच्या इच्छेनें बाँबगोळे उडतात, ही कल्पनाच मुळीं चुकीची आहे; कारण बाँबगोळ्यांसारखे भयंकर व शोचनीय प्रकार कोणालाच सुखाचे व सोयीचे वाटत नाहींत. सरकारच्या दडपशाहीचें धोरण लोकांना असह्य होऊं लागलें म्हणजे बाँबगोळे उडतात, सरकारकडून प्रथम जुलूम व्हावा लागतो व बाँबगोळ्यांचा जुलूम लोकांकडून मागाहून होतो. सरकारकडे कांहीं दोष नाहीं, आणि मुरदाडपणानें किंवा उर्मटपणानें बाँब उडत आहेत, असें भासविण्याचा खोडसाळपणाचा वरील प्रयत्न आहे. लोकमताचा दाब राज्यकारभारावर बसविणारी राज्यपद्धति जर सुरू नसेल, एका बाजूला लोकमत तर सत्ताधारी विरुद्ध बाजूला अशी जर स्थिति असेल, तर ती स्थिति राष्ट्राच्या अभ्युदयाला प्रतिकूल झाल्यावांचून रहात नाहीं. लोकमत आम्हांला जाब विचारणारें आहे व लोकमताला आम्हीं जबाबदार आहों असें अधिकाऱ्यांनीं समजणें, हें इग्लंडांत भित्रेपणाचें लक्षण समजलें जात नाहीं. हिंदुस्थानांत अधिकारीवर्ग बेजबाबदार आहे, तो जबाबदार व्हावा, अर्थात् स्वराज्याचे हक्क लोकांना मिळावेत, अशी राष्ट्रीयपक्षाची खटपट आहे. स्वराज्याचे हक्क अंशतः तरी लोकांना देणें म्हणजे अधिकाऱ्यांनीं काय करावयाचें असतें ? ज्याप्रमाणानें स्वराज्याचे हक्क लोकांना मिळालेले असतात

त्याप्रमाणानें अधिकाऱ्यांनीं लोकमताच्या तंत्रानें वागावें लागतें. लोकांना पसंत असतील अशा अधिकाऱ्यांच्या हातांत सत्ता राहणें व लोकांना नापसंत अशा अधिकाऱ्यांच्या हातांतील सत्ता नाहींशी होणें, ह्यालाच स्वराज्याचे हक्क असें म्हणत असतात. स्वराज्याच्या हक्कांना लोक जसजसे पात्र होतात तसतसे जर त्यांना स्वराज्याचे हक्क मिळत गेले तर बाँबगोळ्यासारखे उद्वेगजनक प्रसंग कोणावरहि गुदरत नाहींत. स्वराज्याचे हक्कांविषयींची लोकांची पात्रता व हे हक्क देण्याचे कामांत अधिकाऱ्यांचा कंजुषपणा ह्यांचा जेव्हां झगडा सुरू होतो व लष्करी सामर्थ्याच्या मदानें धुन्द होऊन फाजिलपणानें जेव्हां अधिकारी वागूं लागतात तेव्हां खऱ्या प्रगतीला अडथळा करणाऱ्या धुन्दीकडे अधिकाऱ्यांचें लक्ष वेधण्याकरितां शोचनीय बाँबगोळ्यांना निसर्गतः मध्यें पडावें लागतें. पाश्चिमात्य शास्त्रांनीं सरकारच्या अंगीं जी भयंकर शक्ति उत्पन्न केली आहे तिचा वाजवीहून फाजिल फायदा घेऊन लोभानें किंवा मोहानें जेव्हां राष्ट्रोन्नतींत अडथळा करण्यांत येतो तेव्हां हा अडथळा दूर करण्याकरितां बाँबगोळे आपोआप उद्भवतात; अधिकाऱ्यांना दरडावून भीति दाखविण्याचे हेतूनें हे कोणी उत्पन्न करीत नाहींत. लोकांच्या अंगीं स्वराज्याच्या हक्कासंबंधानें पात्रता नाहीं, लोकांचे लाड तुम्हीं त्यांच्या योग्यतेहून अधिक केल्यानें लोक तुम्हांला बाँबच्या वाकुल्या दाखवूं लागले आहेत, असा बाँबगोळ्यासारख्या अनर्थाचा अर्थ इतिहासांत कोणत्याहि देशांत केव्हांहि करण्यांत आलेला नाहीं. लोकांना अधिकारीवर्ग जेव्हां निष्कारण दरडावूं लागतो, वाजवीहून फाजील भीति दाखवून लोकांत निराशा उत्पन्न करण्याचा जेव्हां प्रयत्न करण्यांत येतो, तेव्हां असल्या अनुदार दडपादडपीला भीक घालण्याच्या निस्सत्व स्थितीहून अधिक वरच्या दर्जास लोक पोचले आहेत, हें खरें ज्ञान अधिकाऱ्यांना करून देण्याकरितां बाँबगोळ्याचा शब्द स्वयंस्फूर्तीनें होत असतो. खरी वस्तुस्थिति काय आहे, हें

शांतपणें पहाण्याची ही संधि अधिकाऱ्यांना प्राप्त झालेली आहे. अधिकाऱ्यांच्या कृत्यांवर कांहींना कांहीं आपला दाब असावा, अशी प्रबल इच्छा लोकांत उत्पन्न झाली आहे; ही इच्छा भागविण्याचे सरळ व राजमान्य उपाय जर सरकारनें अंमलांत आणले नाहींत, म्हणजे स्वराज्याचे हक्क देण्यास जर सरकारनें सुरवात केली नाहीं, तर जी गोष्ट लोकांच्या अवस्थेला अनुसरून सरकारच्या संमतीनें व्हावयाची तीच गोष्ट लपूनछपून आडमार्गानें व अयोग्य रीतीनें करण्यास कांहीं उतावळे किंवा माथेफिरू लोक प्रवृत्त झाल्यावांचून राहावयाचे नाहींत. उतावीळपणानें व आततायीपणानें चोरट्या व भयंकर मार्गास लोकांनीं लागूं नये, अशी इच्छा असल्यास, बाँबगोळयाचें खरें रहस्य जाणून प्रजेला नाहक दुखविण्याचें सरकारनें सोडावें, स्वराज्याचे मुबलक हक्क देण्यास प्रारंभ करावा आणि ह्यामुळें सरकारचे सामर्थ्यास कमीपणा येतो, अशा खोडसाळपणाच्या कल्पनांचे नादीं अधिकारी वर्गानें लागूं नये, हें सांप्रत सर्वांस हितावह आहे.

# हे उपाय टिकाऊ नाहींत

ह्या आठवडयापासून हिंदुस्थान सरकारनें दडपशाहीच्या नवीन धोरणास पुन्हां प्रारंभ केला आहे. दडपशाहीचें भूत पांच दहा वर्षांनीं हिंदुस्थानच्या अंगांत संचार करीत असतें. अशांतलाच सांप्रतचाहि प्रसंग आहे. लॉर्ड मोर्ले हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी झाल्यावरच सभाबंदीचा कायदा पास झाला व आतां वर्तमानपत्रांसंबंधाचा कायदा पास झाला आहे. लिबरलपक्षाचे कारकीर्दीत व मोर्लेसारखा उदारमतवादी तत्त्ववेत्ता राज्यकारभाराचीं सूत्रें हालवीत असतांना दडपशाहीच्या पिशाच्चांचा चोहोंकडे सुळसुळाट व्हावा ह्यावरून खुद्द मांत्रिकच व्रतभ्रष्ट कसे झाले आहेत, हें वाचकांचे ध्यानांत येईल. दडपशाहीचें धोरण म्हणजे काय? दडपून टाकणें म्हणजे पुढील वाढ खुंटविणें इतकेंच नव्हे, तर पूर्वीचीहि वाढ कुरतडून टाकणें होय. हिंदुस्थानांत राष्ट्रास जन्म देणारीं, राष्ट्राचा विकास करणारीं व राष्ट्राच्या अभ्युदयासाठीं राष्ट्रीय तेज उत्पन्न करणारीं जीं कारणें आहेत त्यांची पुढील गति बंद पाडून त्यांची तंगडी ओढून त्यांना फरफटत मागें ओढणें, ह्याला पिछेहाटीचें किंवा दडपशाहीचें धोरण असें म्हणतात. भाषणस्वातंत्र्य व मुद्रणस्वातंत्र्य हीं राष्ट्रास जन्म देतात व पोसतात. ह्यांनीं हिंदुस्थानचें राष्ट्र बनविण्याचा उपक्रम केलेला पाहून ह्या दोहोंवर गदा आणावी, अशी अधिकारीवर्गाची फार दिवसांची इच्छा होती; आणि बंगाल्यांतील बॉंबगोळयांचा कायदा घेऊन त्यांनीं आपली हौस भागवून घेतली आहे. आतां असा प्रश्न उद्‌भवतो कीं, ह्या दडपशाहीच्या धोरणानें अधिकारीवर्गाच्या मनांत आहे तें घडून येईल काय? अधिकारीवर्गाची पहिली इच्छा अशी

---

* केसरी, ता. ९ जून १९०८

आहे कीं, बाँबगोळे हिंदुस्थानांत बंद झाले पाहिजेत; आणि बाँबगोळे करण्याकडे किंवा बाँबगोळे फेकण्याकडे कोणाचेहि मनाची प्रवृत्ति होतां कामा नये. अधिकाऱ्यांची अशी इच्छा असणें साहजिकच आहे व स्तुत्यहि आहे. पण ज्याला उत्तरेस जावयाचें आहे त्यानें दक्षिणेला जावें किंवा पूर्वेस जाणारानें पश्चिमेचा मार्ग धरावा, ह्याप्रमाणें अधिकाऱ्यांनीं रस्ता मात्र अगदीं उलट दिशेचा धरला आहे. बुद्धिभ्रंश म्हणतात तो हाच. हा मतिभ्रंश पुढील विनाश सुचवितो, आणि सरकारनें दडपशाहीचें धोरण अंगिकारलेलें पाहून प्रजाजनांना व अधिकाऱ्यांना ह्यापुढें अधिक दुःखाचे दिवस येणार म्हणून अत्यंत वाईट वाटतें. सरकारची बुद्धि कशी चळली आहे तें पहा. बंगाल्यांचे बाँब गोळे समाजाची उलथापालथ करणारे आहेत, अशी खोटी अफवा अधिकाऱ्यांनीं पिकविलेली आहे. समाजाचा विध्वंस करूं इच्छिणारे युरोपांतील बाँबगोळे व बंगाल्यांतील बाँबगोळे, ह्यांमध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे. बंगालच्या बाँबगोळ्यांच्या बुडाशीं देशभक्तीचा अतिरेक आहे, व युरोपांतील बाँबगोळे, आप्पलपोट्या श्रीमंतांच्या द्वेषामुळें उत्पन्न होतात. बंगाली अनार्किस्ट नाहींत, तर अनार्किस्टांचें हत्यार त्यांनीं उपयोगांत आणलें आहे इतकेंच. पारिस शहरांत प्रेसिडेंटाचा खून तो प्रेसिडेंट आहे एवढयाच करितां करणारा अनार्किस्ट निराळा; आणि पोर्तुगालचा राजा पार्लमेंट सभा बुडवितो म्हणून त्यावर बाँबगोळा टाकणारा पोर्तुगालचा एखादा देशभक्त माथेफिरू निराळा. अमेरिकेंत एखाद्या कोट्याधीशाचा खून तो कोट्याधीश आहे एवढयाच कारणाकरितां करणारा अनार्किस्ट निराळा आणि रशियांत झारचे अधिकारी ड्यूमा सभेचे हक्क देत नाहींत ह्यामुळें हताश होऊन बाँबगोळा फेकणारा रशियांतील वैतागलेला देशभक्त निराळा. बंगाल्यांतील बाँबगोळे पहिल्या कोटींतील नसून दुसऱ्या कोटींतले आहेत, हें कोणीहि विसरतां कामा नये. पोर्तुगालमधील बाँबगोळयानें पोर्तुगालमधील राज्यपद्धत पालटली, व

नवीन बालराजाचे प्रधानमंडळास पूर्वीचे दडपशाहीचें धोरण सोडून द्यावें लागलें. रशियांतील अत्यंत बलाढ्य झारलाहि बाँबगोळ्यांपुढें नमावेंच लागलें व डयूमा सभा मोडून टाकण्याचा प्रयत्न करतां करतां अखेरीस डयूमा सभा स्थापनच करावी लागली. पोर्तुगालमधील बाँब गोळे बंद झाले किंवा रशियांतील गोळ्यांची मालिका लांबली नाहीं, ह्याचें श्रेय दडपशाहीच्या धोरणाला कोणीहि देणार नाहीं. लोकांत नवीन इच्छा व नवीन महत्त्वाकांक्षा उद्भवल्या असून त्या रोज जोरावतात, असा बाँबगोळ्यांचा अर्थ सदर दोनीहि देशांतील मुत्सद्यांनीं केला, व त्याप्रमाणें लोकांच्या इच्छा व महत्त्वाकांक्षा अंशत: तरी भागतील आणि ते अगदींच निराश होऊन आततायी होणार नाहींत, अशा रीतीनें त्यांनीं राज्यकारभाराचें स्वरूप पालटलें.

सरकारचें सांप्रतचें दडपशाहीचें धोरण दोन प्रकारचें आहे. एक बाँब गोळे तयार करणेंच अशक्य करावयाचें व दुसरें बाँबगोळे करण्याकडे व फेंकण्याकडे लोकांची प्रवृत्तीच होऊं नये, असा बंदोबस्त करावयाचा. पोपटाला प्रथम पिंजऱ्यांत घातल्यानंतर दार बंद करून घेतात, त्याप्रमाणें सरकारनें प्रथम प्रजेला नि:शस्त्र करून सोडलें. कोंडलेल्या पोपटाला पिंजऱ्यांत रहाण्यांतच गोडी लागावी म्हणून हौशी लोक मधुर फळांची व दाण्यापाण्याची व्यवस्था करून ठेवतात. पण हिंदुस्थान सरकारनें पिंजऱ्याचें दार बंद केलें इतकेंच नव्हे तर पोपटानें बाहेर जाऊं नये म्हणून पंख उपटण्याचा व तंगडी मोडण्याचा उपक्रम चालविला आहे! युरोपांतील जुलमी राजांनींहि आपल्या प्रजेला नि:शस्त्र केलें नाहीं, मुसलमानांसारख्या कडव्या जातीनेंहि हिंदुस्थानांत बादशाही गाजवितांना हिंदूंना नि:शस्त्र केलें नाहीं. मग इंग्रजांनींच कां केलें? प्रजाजनांच्या हातांत साधारण बंदुकी व साधारण तलवारी असल्यानें लष्कराच्या सामर्थ्याची बरोबरी प्रजेच्या हातून केव्हांहि होऊं शकत नाहीं. प्रजा सशस्त्र राहूं दिल्यानेंहि जर लष्करी सत्तेस कमीपणा येत

नाहीं तर एखाद्या राष्ट्रास खच्ची करण्याचें महत्पाप तरी इंग्रजांनीं कां केलें? ह्या प्रश्नाचें असें उत्तर आहे कीं, रोजचेरोज किरकोळ अधिकाऱ्यांनींहि गाजवावयाची सत्ता अबाधित असावी व स्वराज्याचे कोणत्याहि प्रकारचे हक्क प्रजेला न देतां बिनखटका आपलपोटेपणाचा कारभार यथास्थित चालावा म्हणून राष्ट्राच्या पौरुषाचा वध हत्याराचे कायद्यानें करण्यांत आला! मोंगलांच्या इतका उदारपणाहि इंग्रजांत नाहीं व मोंगलांच्या इतकें लष्करी सामर्थ्यहि इंग्रजांत नाहीं. मोंगली बादशाहीच्या मानानें पाहिलें असतां हिंदुस्थानांतील इंग्रजी साम्राज्य लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीनें फार निर्बल व निःसत्व आहे. औरंगजेब बादशहानें संपत्तीच्या वांटणीच्या दृष्टीनें जरी नाहीं तरी–धर्मदृष्ट्या हिंदूंवर नाना प्रकारचे जुलूम केले, व त्याचें दहावीस लाख सैन्य दहावीस वर्षांच्या दक्षिणेच्या मोहिमेंत गारदहि झालें. तरी त्याच्या मरणानंतर दीडशें वर्षेंपर्यंत–रडत खडत कां होईना–दिल्लीची बादशाही टिकली होती. औरंगजेबाच्या सेनेवर जसले प्रसंग आले तसले प्रसंग जर हिंदुस्थानांतील इंग्रजी सेनेवर आले तर पुढें पांचपंचवीस वर्षेंहि इंग्रजी सत्ता हिंदुस्थानांत टिकणार नाहीं. ह्याचें मुख्य कारण इंग्रज हिंदुस्थानांत उपरी कुळासारखे किंवा वाटसरूसारखे राहतात हें होय. हिंदुस्थानांत इंग्रजांची वस्ती कायमची नसल्यामुळें व इंग्लंडची भर करण्याकडे इंग्रजी अधिकाऱ्यांचा व इंग्रजी व्यापाऱ्यांचा कटाक्ष असल्यामुळें राजकीय सत्तेचा कोणताहि भाग पृथक् वांटणी करून नेटिवांच्या हातांत देण्यास ते साहजिकपणेंच तयार नाहींत; उपरी कुळाप्रमाणें अधिकारी पाठवून मूळ वस्तीच्या ठिकाणचे भरभराटीकरितां जर मोंगलांनीं हिंदुस्थानची बादशाही चालविली असती तर मोंगलांनाहि राजेरजवाडयांशीं किंवा ग्रामसंस्थांशीं वागतांना इंग्रजांप्रमाणेंच अनुदार व्हावें लागलें असतें व प्रजाजनांना निःशस्त्र केल्याशिवाय गत्यंतर नसतें. पाश्चिमात्य शास्त्रानें दिलेलें सामर्थ्य,

व प्रजा निःशस्त्र केल्यामुळें प्रजेच्या अंगीं आलेला दुबळेपणा, ह्यांमुळें लोकांच्या इच्छेचा किंवा महत्त्वाकांक्षेचा विचारहि न करतां बेगुमानपणें बिनखटका राज्यकारभार हांकला जातो. बॉबगोळ्यामुळें ही स्थिति कायम राहिली नाहीं. प्रजा निःशस्त्र व सरकार आधुनिक अस्त्रविद्येनें बलाढ्य ठरलेलें. सरकारच्या कांहीं कृत्यांनीं लोक निराश होऊन संतापी बनून माथेफिरूहि होतात, हें सरकारला अजमावण्याला आजपर्यंत मार्गच नव्हता. सरकारच्या कृत्यांचा जुलूम प्रजेला असह्य झाला आहे, हें सरकारला समजावें तरी कसें ? सरकारनें कोणचीहि गोष्ट केली व प्रजेला ती नापसंत असली, तर आजपर्यंत काय होत असे ? लोक अर्ज करीत, विनंति करीत; अधिकारी म्हणत हा क्षणैक फेस आहे, थोड्या वेळानें आपोआप खालीं बसेल. लोकांनीं निराश व्हावें, उतावीळ झालेल्यांनीं संतापून जाऊन मनचे मनांत जळफळावें व माथेफिरूंनीं स्वतःच्या आततायीपणानें स्वतःचें शरीर पिचवून स्वतःच्या क्रोधांत आपली एकट्याचीच आहुति—सरकारच्या कानीं कोणच्याहि प्रकारची वार्ताहि न जातां—द्यावी, असातला आजपर्यंतचा प्रकार होता. बॉबगोळ्यानें निःशस्त्र माथेफिरू सशस्त्र झाले, व बॉबगोळ्यानें लष्करी सामर्थ्याचा दर्प कमी केला. मोंगलांनीं दाखविलेल्या उदारपणाहून अधिक उदारपणानें संपत्तीची व अधिकाराची वांटणी प्रजेशीं करण्यास आरंभ केल्याशिवाय उपरी अधिकाऱ्यांच्या मार्फत बिनखटका राज्यकारभार इंग्लंडास ह्यापुढें चालवितां येणार नाहीं. बॉबगोळा ही बंदुकी किंवा तोफा ह्यांच्यासारखी वस्तु नाहीं. हत्याराचे कायद्यानें, बंदुकी व तोफा प्रजेपासून काढून घेतां येतील, आणि बंदुकी व तोफा सरकारी परवान्याशिवाय तयार करण्याचेंहि बंद पाडतां येईल; पण बॉबगोळा कायद्यांनीं किंवा अधिकाऱ्यांच्या देखरेखीनें अथवा गुप्त पोलिसांच्या मुळसुळाटानें बंद पाडतां किंवा नाहींसा करतां येणें शक्य आहे काय ? बॉबगोळ्याला ज्ञानाचें स्वरूप अधिक आहे, ही एक

जादू आहे, हा एक मंत्र, तोडगा आहे. मोठ्या कारखान्यांत तयार होणाऱ्या दृश्यवस्तूचें स्वरूप ह्याला फारसें नाहीं. सरकारी लष्कराला लागणाऱ्या बाँबगोळ्याचे मोठमोठे कारखाने असावे लागतात, पण आततायी माथेफिरूंना लागणारे दहापांच बाँबगोळे तयार करण्यास विशेषशी सामग्री लागत नाहीं. वीरेंद्रचा बाँबगोळ्याचा मोठा कारखाना एक दोन घरण्यांत, व दहा पांच वाटल्यांत सांठविला होता, आणि हा कारखाना सरकारी बाँबगोळ्याचे कारखान्याप्रमाणें शास्त्रीयदृष्ट्या बिनचूक होता, अशा साक्षी सरकारी रसायनशास्त्रवेत्त्यांच्या सांप्रत होत आहेत. वीरेंद्राच्या कटाचे खटल्यांत प्रसिद्ध झालेल्या हकीकतींच्या खऱ्या अर्थाकडे सरकारनें लक्ष पोंचवावयास नको काय ? ह्या खटल्याची जी हकीकत प्रसिद्ध झाली आहे त्यावरून पाहतां बाँबगोळयाचा मंत्र कांहीं लांबलचक दिसत नाहीं, व तंत्रहि फारच अल्प आहे. जो माथेफिरू आहे त्याच्यापासून ह्या मंत्राचें ज्ञान लपवून ठेवण्याचें सामर्थ्य आतां सरकारी कायद्याचे अंगीं उरलें नाहीं. युरोप, अमेरिका, जपान वगैरे देशांत हें ज्ञान गुप्त नाहीं. हिंदुस्थानांत अद्याप हें गुप्त ज्ञान आहे पण दडपशाहीचें धोरण जोरानें अंमलांत येऊन त्यामुळें माथेफिरूंची संख्या वाढल्यावर जादूगिरी बंगालची मंत्रविद्या हिंदुस्थानांत चोहोंकडे पसरण्यास कितीसा वेळ लागणार ? जे माथेफिरू आहेत त्यांना ही विद्या संपादन करण्याचे आयास त्यांचें डोकें पुनः ताळ्यावर आणण्याइतके कठीण नाहींत; व ह्या विद्येला व्यावहारिक स्वरूप देतांनाहि गुप्त पोलिसच्या चातुर्यामुळें व दक्षतेमुळें ओंगळ होऊन मॅजिस्ट्रेटमार्फत संताप उतरण्याचाहि संभव फार कमी आहे. अतिशयोक्तीनें बोलावयाचें असल्यास हा कारखाना चुटकीसरसा अस्तित्वांत आणतां येतो व चुटकीसरशी मोडतां येतो ! तेव्हां बाँबगोळ्यांच्या ह्या माथेफिरू चेटक्यांना कायद्याची वेसण कशी घालतां येईल ? दहा पंधरा वर्षांपूर्वी इंग्लंडांत जेव्हां बाँबगोळ्यांचा कायदा झाला त्यावेळीं बाँबगोळयांना

इतकें ज्ञानमय स्वरूप आलें नव्हतें. पाश्चिमात्य शास्त्राच्या अंगच्या मळ बाँबगोळा होऊन बसला नव्हता. त्यावेळीं उपकरणेंहि फार लागत, सामग्रीहि विशेष लागे व कारखानाहि मोठा असे. असल्या गोष्टींचा प्रतिबंध कायद्यानें होण्यासारखा आहे. पण ज्यावेळीं शास्त्र चालतां चालतां, बोलतां बोलतां, निजतां निजतां, सहज लीलेनें बाँबगोळ्यासारखे चमत्कार करून दाखवूं लागतें, त्यावेळीं शास्त्राच्या ह्या सहज लीला कशा बंद पाडावयाच्या? व्यापारविषयक उन्नतीकरितां व लष्करी सामर्थ्याकरितां शास्त्रदेवता पाश्चिमात्यांनीं प्रसन्न करून घेतली. देवतेला प्रसन्न करून घेऊन वरप्रदान घ्यावयाला तेवढें पाहिजे, पण तीच देवता वरप्रदानानें कोणी उन्मत्त होऊं नये म्हणून ज्या सहज लीला करीत असते तेवढ्या मात्र नकोत, असें कसें होईल? पाश्चिमात्यांच्या शास्त्राचें ज्ञान रोजचेरोज अशारीतीनें सहज प्राप्त होत चाललें असतांना, आणि व्यवहाराला व उद्योगधंद्याला हरहमेष लागणाऱ्या रासायनिक साध्या वस्तूंपासूनच हां हां म्हणतां भयंकर शक्ति लहानशा तंत्रानेंच निर्माण करणारे शोध रोजचेरोज नवीन लागत चालले असतांना शास्त्रीय मांत्रिकांच्या लीलांचा प्रवाह कायद्याच्या बंधनानें सरकार किती दिवस थोपवून धरणार? आमच्या मतें सरकार अशक्य गोष्टींच्या नादीं लागून स्वतःचें व प्रजाजनांचें व्यर्थ नुकसान करूं पहात आहे. ज्ञानाची युरोपांत व अमेरिकेंत जी परिणत स्थिति आहे, त्या स्थितीचा विचार केला असतां अशक्य गोष्ट शक्य करण्याचा वृथा खटाटोप सरकार करूं लागलें आहे, असें म्हणावें लागतें. ह्यावेळीं रसायनशास्त्रवेत्त्यांवर, उद्योगधंदेवाल्यांवर व लहानसान कारखानदारांवर नाहक जुलूम झाल्यावांचून राहणार नाहीं. बाँबगोळ्याचे कायद्यानें सरकारचा इष्ट हेतु सिद्धीस जाणार नाहीं, तर उलट पोलिसच्या व लहान अधिकाऱ्यांच्या हातांत हें सज्जनांना छळण्याचें एक हत्यार होऊन बसेल. बाँबगोळ्यासंबंधाचें शास्त्रीय-

ज्ञान व सामग्री नाहींशी करण्याचा हा खटाटोप व्यर्थ आहे. बाँबगोळे नाहींसे करावयाचे असल्यास हा उपाय योग्य नव्हे; बाँबगोळ्यांची जरुरीच कोणत्याहि माथेफिरूला वाटूं नये, असें सरकारनें केलें पाहिजे. राजकीय चळवळींत पडलेले लोक माथेफिरू होतात केव्हां? आपल्या बुद्धीचा, शरीराचा व आपल्या स्वार्थत्यागाचा उपयोग आपल्या देशाचें कल्याण करण्याचे कामीं माथेफिरूपणाशिवाय इतर दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें होणारा नाहीं, अशी तीव्र निराशा झाल्यानंतर चळवळ करणारे तरुण माथेफिरू होतात. स्वराज्याचे हक्क संपादन करण्यासंबंधानें जागृत झालेल्या बुद्धिमंतांची तीव्र निराशा सरकारनें केव्हांहि होऊं देतां कामा नये. ज्यावेळीं जागृत झालेल्या बुद्धिमंतांच्या इच्छा व महत्वाकांक्षा सर्व राष्ट्रभर पसरतात व सर्व राष्ट्राला खडबडून जागें करूं लागतात, त्या वेळीं ही जागृतीची क्रिया बंद पाडल्यानें ही निराशा कमी न होतां अधिकच तीव्र होते, हें सरकारनें विसरतां कामा नये. जागृतीची क्रिया बंद पाडण्याकरितां वर्तमानपत्रांचा नवा कायदा सरकारनें पास केला आहे, व त्यामुळें निराशेचें स्वरूप अधिक भयंकर होऊन विचारी व शांत स्वभावाच्या लोकांतहि माथेफिरू निर्माण होण्याचा संभव आहे. बाँबगोळे नाहींसे करण्यास खरा व टिकाऊ उपाय म्हणजे स्वराज्याचे महत्त्वाचे हक्क देण्यास आरंभ करणें हा होय. दडपशाहींचे उपाय पाश्चिमात्य शास्त्रांच्या व हिंदुस्थानांतील लोकांच्या सांप्रतच्या स्थितींत टिकाऊ होणें शक्य नाहीं.

# पत्रकर्त्यांच्या स्फुट सूचना

बोलून चालून इंग्रजांचें राज्य परकीय राज्य आहे. बरें तेंहि मोंगली राज्याप्रमाणें राज्यकर्त्यांनीं हिंदी समाजांत मिसळून जाऊन चालविलेलें नसून तें नेहमीं परकीयपणानेंच चालविणार. शिवाय नुसती राज्यसत्ता हातीं ठेवूनहि त्यांचें समाधान नाहीं तर या देशाचा व्यापार व उद्योगधंदेहि त्यांस बळकावयास किंवा बुडवावयास हवेत. बरें इतकें करूनहि रयतेवरील करांचें ओझें हलकें ठेवावें, तर त्याचा उलटच प्रकार दिसून येतो ! सारांश जुन्या पद्धतीचें कां होईना, स्वराज्य गेलें, व्यापार बुडाला, उद्योगधंदे ठार झाले, वैभव संपलें, संपत्ति गेली, कर्तृत्व लोपलें व हिंमत खचली. नव्या पद्धतीचें शिक्षण नाहीं, हक्क नाहींत, लोकमतास मान नाहीं, सुबत्ता नाहीं, समाधान नाहीं, दारिद्य, दुष्काळ व द्रव्यशोष या तीन 'द' काराचा दपटशा मागें लागलेला. यांतून राष्ट्राचें डोकें वर उचलण्याचा यथाशक्ति प्रयत्न करूं लागलें कीं, इंग्रजी राज्यपद्धतीच्या वरवंटयानें डोकें ठेचलेंच ! अशा स्थितींत हिंदुस्थानांत आतां जहालपक्ष व गुप्त मंडळया उद्भवल्या, ही गोष्ट शोचनीय असली तरी बिलकुल आश्चर्याची नाहीं. उलट युरोपांतील कोणत्याहि देशांत अशी स्थिति झाली असती तर तेथील लोकांनीं हिंदी लोकांइतकी सहनशीलता व क्षमावृत्ति केव्हांहि दाखविली नसती. सर्वांस सर्व गोष्टींपेक्षां जीव प्यारा असतो, हा न्याय सामान्यत: खरा आहे. पण धर्म, नीति, परोपकार स्वाभिमान, कुटुंबाची व राष्ट्राची अब्रु, देशभक्ति इ. उच्च कल्पनांची किंमत प्राणाहूनहि अधिक आहे, असें व्यक्तीस वाटावयास लागणें, ही त्याच्या आत्मिक उन्नतीची साक्ष आहे. या मनोवृत्तींचा उदय राष्ट्रांत होऊं लागला म्हणजे

* केसरी ता. ९ जून १९०८

त्याबरोबरच या मनोवृत्तींच्या ओघासाठीं वाट करून देणें खऱ्या राज्यकर्त्यांचें कर्तव्य आहे. तें न करतां या मनोवृत्ती जेथें जेथें उद्भवतील तेथें तेथें त्या जुलमाच्या व जबरीच्या भारानें बुजवून टाकण्याचा अगर मोठमोठे बांध घालून जेथल्या तेथें अडवून टाकण्याचा प्रयत्न झाला कीं, त्या देशाचें–प्रजेचें व राज्यकर्त्यांचें–दुर्दैव ओढवलें म्हणून समजावें. जगाच्या इतिहासानें प्रस्थापित केलेल्या या सिद्धांताकडे राज्यकर्त्यांनीं आजपर्यंत दुर्लक्ष केल्याचें फळ बंगाली बाँबच्या रूपानें बाहेर पडलें आहे.

# * रा. टिळक यांजवरील खटला

मुंबई हायकोर्टांत दोन आठवडे चाललेला रा. टिळक यांजवरील राजद्रोहाचा खटला गेले बुधवारीं रात्रीं अकस्मात् जलदीनें व तांतडीनें निकालापर्यंत हाकलण्यांत येऊन न्या. दावर यांनीं रा. टिळक यांना सहा वर्षें काळेंपाणी व एक हजार रुपये दंड, अशी खुनशी शिक्षा ठोठावली! बुधवारीं सायंकाळीं साडेपांच वाजतां नेहमींप्रमाणें कोर्टाचें काम बंद होण्याचे वेळीं, रात्रीं साडेनऊ वाजेतों खटला चालून आजचे आज निकाल करण्यांत येईल, अशी आरोपीतर्फेच्या लोकांची व इतरांची बिलकुल अटकळ नव्हती. अॅडव्होकेट जनरल बॅ. ब्रॅन्सन यांचें भाषण त्यावेळीं संपलेंहि नव्हतें. मग त्याच रात्रीं सर्व काम उरकून घेण्यांत कां आलें? न्या. दावर ह्यांचे मनांत कोणता हेतु असेल तो असो, पण सामान्यपणें ह्या घाईला तीन कारणें देण्यांत येतात. पहिलें कारण असें कीं, सर्व खटला न्या. दावर यांनीं आरोपीच्या हितावर पूर्ण दृष्टि ठेऊन चालविला होता; अखेरीस ही दृष्टि आरोपीस बाधली ही गोष्ट खरी; तरी पण भावी शिक्षेचा एक एक दिवस हायकोर्टांत व्यर्थ घालविण्यापेक्षां शिक्षा भोगून तितकाच दिवस कमी करणें आरोपीच्या हिताचें आहे, असें खटल्याचीं सूत्रें चालविणारांना वाटलें असावें. शिवाय मुंबईस त्यावेळीं रा. टिळक यांजविषयीं जी सहानुभूति दाखविण्यांत येत होती ती लक्षांत घेतां, सहानुभूति दाखविणाऱ्या लोकांचा मोठा समुदाय शिक्षेच्या समयीं मुंबई शहरांत कोठेंहि जमणें मुंबईचे पोलिसला सोईचें न वाटून काळ्या पाण्याचें कृत्य काळोख्या रात्रींच उरकून घेण्याची पोलिसनें उत्सुकता दाखविली असावी, असा अंदाज आहे. ह्या दोन कारणांशिवाय

---

* केसरी, ता. २८ जुलै १९०८

तिसरें कारण असें असावेसें वाटतें कीं, दुसरे दिवशीं इंग्लंडांत पार्लमेंट सभेंत हिंदुस्थानच्या जमाखर्चावर चर्चा होती. त्या चर्चेंत रा. टिळक यांजवरील खटल्यासंबंधानें बराच वाद होईल असा सुगावा लागून म्हणा किंवा इतर उद्देशानें म्हणा, ह्या चर्चेच्या पूर्वी खटला निकालांत आणला पाहिजे, असें अधिकाऱ्यांना वाटलें असावें. ह्यांपैकीं कोणतेंहि कारण खरें असो किंवा सर्वच खोटीं असोत, खटला चालविण्याची ही पद्धत जरा चमत्कारिक होती हें खास. पण ती बेकायदेशीर होती, असें आम्हीं म्हणत नाहीं. ज्याप्रमाणें ही पद्धत बेकायदेशीर होती अशी तक्रार नाहीं त्याप्रमाणेंच बॅ. ब्रॅन्सन व न्या. दावर यांनीं

## रा. टिळक ह्यांना दिलेल्या शिव्या

बेकायदेशीर होत्या, अशीहि आमची तक्रार नाहीं. रा. टिळक ह्यांनीं हा खटला कायद्याच्या भक्कम आधारावर, पुराव्याच्या प्रमाणांवर व निरुत्तर कोटिक्रमाच्या जोरावर चालविला होता. प्रक्षुब्ध मनोविकारांच्या तडाक्यांत विरुद्ध पक्षास टाकून बोललेला एकहि शब्द त्यांचे भाषणांत नव्हता. असें असतां बॅ. ब्रॅन्सन व न्या. दावर यांच्या भाषणांत शिव्याशापांचीच गर्दी कां? बॅ. ब्रॅन्सन व न्या. दावर ह्यांना पाहिजे त्या रीतीनें आपलें भाषण सजविण्याचा किंवा भेसूर करण्याचा कायदेशीर अधिकार होता, व रा. टिळक यांच्या सज्जनपणाचें अनुकरण त्यांनीं केलेंच पाहिजे होतें असा कायदेशीर निर्बंधहि नव्हता, ही गोष्ट खरी; पण सरकारतर्फेच्या बॅरिस्टरचें काम चालवीत असतांना किंवा हायकोर्टाच्या न्यायाधीशाचे खुर्चीवर बसलें असतांना न्यायबुद्धीच्या समतोलपणाच्या देखाव्याला सभ्यपणाची जरुरी आहे, असें आम्हांस वाटतें. तुमचा मेंदू सडलेला आहे, तुमचें पत्र हें हिंदुस्थानावर मोठें अरिष्ट आहे, तुमचें मन रोगग्रस्त आहे, अशा प्रकारच्या तापलेल्या लाल डागण्या, सहा वर्षांच्या काळ्यापाण्याचें औषध पोटांत

देणाऱ्या तांबड्या पोषाखाच्या वैदूनें अजाऱ्याच्या शिरावर देणें म्हणजे औषधांतून आरोपी सुटला तरी डागण्यांच्या बदनामाच्या तावडींत कायमचा सांपडो, अशी इच्छा करण्यासारखें, क्रूरपणाचें, नामर्दपणाचें, किंबहुना भित्रेपणाचें होय! रा. टिळक यांजवर एकामागून एक दोन आरोप ठेवण्यांत आले; हायकोर्टांत सर्व आरोपांची खिचडी करण्यांत आली; रा. टिळक ह्यांना जामिनावर सोडण्यांत आलें नाहीं; जो पुरावा फिर्यादी पक्षानेंच द्यावयास पाहिजे होता तो परिस्थितीचा पुरावा आरोपीवर टाकून शेवटीं बोलण्याच्या हक्कासंबंधानें आरोपीस नागविण्यांत आलें; मराठी भाषा जाणणारी ज्यूरी असावी अशी आरोपीची आग्रहाची विनंति असतांना स्पेशल ज्यूरी देऊन सात युरोपियन रा. टिळक यांजपुढें बसविण्यांत आले; इतक्या लेखांपैकीं कोणचा भाग राजद्रोहाचा आहे तें बोट ठेवून दाखवा असें रा. टिळक ह्यांनीं विचारलें असतां सर्व लेख त्यांच्या तोंडावर फेकण्यांत आले, अशा एक ना कित्येक गोष्टी न्या. दावर ह्यांनीं आरोपीच्या अहिताच्या केल्या व करूं दिल्या. अशा रीतीनें आरोपीच्या हिताच्या विरुद्ध असलेल्या पद्धतीनें खटला चालविण्याचा फिर्यादीला किंवा न्यायाधीशाला कायद्यानें अधिकार नव्हता असें कोणाचेंच म्हणणें नाहीं; पण हा कायदेशीर काटेकोरपणा शेक्सपियरच्या 'मर्चंट ऑफ व्हेनिस' नाटकांतील शायलॉकला साजेसा आहे; भांडणाऱ्या दोन पक्षांना न्याय देण्याचें काम करणाऱ्या मुंबई हायकोर्टाला साजेसा नाहीं. वरील सर्व बाबी किरकोळ स्वरूपाच्या आहेत व त्याबद्दल पोलिस अधिकारी, सरकारी बॅरिस्टर किंवा न्या. दावर ह्यांना विशेषसा दोष देण्याचे भानगडींत आम्हीं पडूं इच्छित नाहीं. ह्या खटल्यांतील व्यक्ति व हायकोर्टाच्या चार भिंतींच्या आंतील जागा, ही डोळ्यांपुढून काढून टाकून हिंदुस्थानांत आज पंचवीस तीस वर्षें स्पष्टपणें चालू असलेल्या राजकीय चळवळींच्या दृष्टीनें ह्या खटल्याकडे पाहिलें पाहिजे. अशा रीतीनें दृष्टि फैलावल्याशिवाय

## खटल्याचें महत्त्व

ध्यानांत येत नाहीं. हायकोर्टांत कायदा कितपत पाळला गेला, कायद्याचें उल्लंघन कसें करण्यांत आलें, न्यायाचा कांटा कोणच्या बाजूला झुकला होता, वगैरे गोष्टी वरील दृष्टीनें विचार केला असतां महत्त्वाच्या वाटत नाहींत. " केसरी " वर खटला करण्याची मंजुरी देतांना मुत्सद्दी या नात्यानें मुंबई सरकारनें जशा प्रकारचा विचार केला असला पाहिजे, तशाच प्रकारचा विचार राजकीय चळवळीच्या दृष्टीनें लोकांनीं केला पाहिजे. अशा रीतीनें विचार करतांना रा. टिळक ह्यांची गेल्या २५ वर्षांतील लोकसेवा प्राधान्येंकरून पुढें येते. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांजबरोबर ' न्यू इंग्लिश स्कुलास ' आरंभ करण्यापासून तों आज तागायत रा. टिळक ह्यांचें चरित्र एकाच सदिच्छेनें व्यापिलेलें आहे, व ती सदिच्छा म्हणजे ह्या हतभागी देशाचें कल्याण व्हावें ही होय. ' न्यू इंग्लिश स्कूल ' ची स्थापना, त्यांतून निघालेलें ' फर्ग्यूसन ' कॉलेज, संमतिबिलाचे वेळचा तंटा, हिंदुमुसलमानांतील दंगा, श्री गणपति महोत्सव व श्री शिवाजी महोत्सव यांची जोपासना, पुणें सार्वजनिक सभा, राष्ट्रीय सभेची चळवळ, प्लेगची धामधूम, दुष्काळाची त्रेधा, जमीनमहसुलाचा कायदा, स्वदेशी चळवळ, बहिष्काराची चळवळ, राष्ट्रीय सभेंतील क्रांति, बर्वे प्रकरणांतील ' केसरी ' वरील फिर्याद, १८९७ सालची केसरीवरील फिर्याद व कालची राजद्रोहाची फिर्याद या सर्व प्रसंगीं खऱ्या देशभक्तानें जसें वागावयास पाहिजे तशीच वर्तणूक रा. टिळक ह्यांचे हातून होत आलेली आहे. स्वराज्याचे हक्क क्रमाक्रमानें कां होईना—कसे मिळतील व अशा प्रकारचा आरंभ आपल्याच पिढींत किंवा लगेच दुसऱ्या पिढींत झालेला पहाण्यास आपल्या पक्षाचे हातून कोणती कृती झाली पाहिजे, ह्यासंबंधाचे सिद्धांत ठरविण्यांत व त्या सिद्धांताप्रमाणें स्वतः वागण्यांत आणि आपल्या पक्षांतील लोकांस वागावयास

लावण्यांत रा. टिळक यांनीं आपल्या आयुष्यांतील गेलीं २५।३० वर्षें खर्च केलीं आहेत. राजकीय चळवळींत रा. टिळक नुसते ज्ञानमार्गी नाहींत, तर ह्या चळवळींत

## ज्ञान आणि कर्म

ह्यांचीं पूर्ण सांगड श्री भगवद्गीतेच्या उपदेशाप्रमाणें त्यांनीं आपले चरित्रांत घातलेली आहे. नेहमीं स्वराज्याच्या ध्रुवाकडे दृष्टि निश्चल ठेवावयाची व या दृष्टीच्या रोखानें त्या त्या परिस्थितींत कोणचें कर्म इष्ट आहे त्याचा सिद्धांत बांधून त्याप्रमाणें कायावाचामनेंकरून आचरीत असावयाचें, ह्या बाण्यानें रा. टिळक ह्यांनीं आजपर्यंतचें आयुष्य क्रमिलेलें आहे. एकदां सिद्धांत ठरून कर्माला आरंभ झाल्यावर त्या कृत्यास चालत्या गाड्याचें स्वरूप येईपर्यंत, अडचणीची, अडथळ्याची, संकटाची, द्रव्यहानीची किंवा शरीरक्लेशाची त्यांनीं केव्हांहि पर्वा केलेली नाहीं. तो सिद्धांत व तें कर्म ह्यांच्या अंगीं संचारल्यासारखें असें. ज्ञान व कर्म ह्यांच्या एकीकरणाचा हा संचार अंगीकृत कार्य सिद्ध होईतों केव्हांहि कमी होत नसे. परिस्थितीशीं झगडून आपणांस पुढें पाऊल टाकावयाचें आहे, ह्याविषयीं ते सावधान असल्यामुळें स्वतःच्या पावलापुढें परिस्थितीला त्यांनीं कधींहि जाऊं दिलें नाहीं. परिस्थितीनें आंखून दिलेला मार्ग नुसता साफसूफ व सुखमय करण्याकडे त्यांनीं अंगचीं शक्ति खर्च केली नाहीं, तर आपल्या कर्माची छाप परिस्थितीवर बसवून आपल्या मार्गाप्रमाणें परिस्थिति कशी बदलेल ह्याची काळजी रा. टिळक आजपर्यंत वहात आलेले आहेत. स्वार्थत्याग करून व शारीरिक क्लेश भोगून परिस्थितीशीं झगडतां झगडतां अशी स्थिति येते कीं, परिस्थिति व आपलें कर्म हीं जवळ जवळ एकच होऊन बसतात. अशा-रीतीनें त्या त्या वेळचें तें तें कर्म सिद्ध होऊं लागलें असतां त्या कर्मास अधिक व्यापक स्वरूप देण्याकरितां पुन्हां पुढें पाऊल टाकणें किंवा जुन्या

कर्मांत पाय फाजील गुंतले असतां त्या गुंतागुंतींतून स्वतःस सोडवून घेऊन नवीन कर्मास आरंभ करणें, स्वदेशभक्तास भाग पडतें. कर्मं आचरीत असतांना ह्या कर्मभूमींत कर्माच्या जोराप्रमाणें फळ मिळूं लागतें; पण शहाणे ह्या फळाच्या मोहाला बळी न पडतां अंतिम साध्यावर दृष्टि ठेऊन कर्माची गति शिथिल न करतां नवीन नवीन कर्मांची उभारणी करण्यांत पूर्वकर्माच्या फळाचा उपयोग करीत असतात. अंतिम साध्याकडे दृष्टि ठेऊन राजकीय व इतर चळवळींतील आपले सिद्धांत रा. टिळक ह्यांनीं ठरविलेले आहेत. हे सिद्धांत व हें अंतिम साध्य कायमचें व मुक्रर ठरविलेलें आहे. ह्या सिद्धांताला किंवा ह्या ज्ञानाला धरून एकसारखें कर्म आचरायचें, ह्याच तत्त्वाप्रमाणें ते वागत आले आहेत. परिस्थितींत कर्म आचरावयाचें असल्या- मुळें परिस्थितीप्रमाणें कर्माचेंहि स्वरूप बदलतें हें उघड आहे. तथापि अंतिम साध्यासंबंधानें राजकीय चळवळींतील कर्मयोग्यांत सर्वांत पुढच्या रांगेंत उभें रहाण्याची पराकाष्ठा करण्यांत त्यांनीं कमी केलेलें नाहीं. स्वदेशभक्तीच्या सूत्रानें त्यांच्या निरनिराळ्या चळवळी एके जागीं गोंवतां येतात. एखाद्या संस्थेंत त्यांनीं सामील व्हावें, त्या संस्थेस नांवारूपास आणावें आणि नंतर त्या संस्थेंत क्रांति करण्याचा किंवा नवी संस्था पुन्हां जन्मास आणण्याचा त्यांनीं खटाटोप आरंभावा, अशा तऱ्हेचीं बाह्यतः परस्परविरोधी दिसणारीं कर्मे स्वदेशभक्तीच्या दृष्टीनें सुसंगत दिसूं लागतात. शरीराप्रमाणें रा. टिळक ह्यांचीं स्वदेशभक्ति वृद्ध झालेली नाहीं, किंवा स्वदेशभक्तीनेंच काढलेल्या कांहीं कांहीं संस्थांप्रमाणें त्यांची स्वदेश- भक्ति रेंगाळणारीहि नाहीं. ते कर्मयोगी असल्यामुळें, आपल्या सिद्धांतावर त्यांचा दृढ निश्चय असल्यामुळें, आपल्या कर्मावर त्यांची अव्यभिचारिणी भक्ति असल्यामुळें, विचार करतांना, आचरण आचरतांना, संकटांशीं टक्कर देतांना, व शरीरक्लेश भोगतांना, त्यांचीं स्वदेशभक्ति नेहमीं ताजीतवानी

[illegible], सातारा.



व उज्ज्वल जोमाची राहिलेली आहे. राजकीय चळवळींत भक्तिहीनांत व कर्महीनांत रा. टिळक यांची गणना नाहीं. राजकीय चळवळीच्या अंतिम-साध्याचा त्यांचा सिद्धांत कायम ठरलेला आहे, व त्याबद्दल त्यांच्यावर कोणाचीच वक्रदृष्टि नाहीं; पण रोजच्या वर्तनाला जे नियम रा. टिळक घालून देत असत व त्याबरहुकूम अंगीकृत कार्याची, दम न खातां, मेहनतींत कुचराई न करतां, परिस्थितीकडे पूर्ण लक्ष पोंचवून व सरकारनें जितकीं म्हणून साधनें वापरण्याची परवानगी कायद्यानें दिली असेल त्यांचा पूर्ण उपयोग करून जी एकसारखी पाठ पुरवीत असत, त्यामुळें ते कांहीं अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत खुपत. अशा रीतीनें डोळ्यांत खुपल्यामुळेंच ह्या खटल्याची मंजुरी देण्यांत आली असली पाहिजे. रा. टिळक ह्यांनीं आपल्या राजकीय चळवळींत किंवा आपल्या मतांच्या जोराच्या प्रसारांत सरकारच्या कायद्याकडे केव्हांहि दुर्लक्ष केलेलें नाहीं. कायद्याच्या सीमेच्या आंत कायदेशीर साधनांचा पूर्ण उपयोग त्यांनीं केल्यामुळें व असा पूर्ण उपयोग करणें त्यांच्या अंगीकृत कार्याला जरूर असल्यामुळें सरकारच्या अवकृपेच्या टापूंत न सांपडणें त्यांना शक्य नव्हतें. लेखकांना व वक्त्यांना पिनल कोडांतील १२४/ अ व १५३/ अ ह्यांनीं ज्याप्रमाणें सीमा घालून दिलेली आहे, त्याप्रमाणें सरकारच्या अवकृपेलाहि सरकारच्याच पूर्वपरंपरेनें व विलायतच्या इतिहासानें सीमा घातलेली आहे. ह्या सीमेचा फायदा हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीला मिळाला पाहिजे, इतकेंच नव्हे तर १२४/ अ व १५३/ अ या कलमाखालीं केलेल्या खटल्यांत आरोपीनांहि हा सर्व फायदा कायद्याच्या कलमांतील भाषेमुळेंच मिळाला पाहिजे. राजकीय चळवळीच्या स्थितीसंबंधानें, मुद्रण-स्वातंत्र्यासंबंधानें व भाषण स्वातंत्र्यासंबंधानें रा. टिळक यांचीं मतें वरील प्रकारचीं असल्यामुळें

## स्वतः खटला चालविणें

त्यांच्यावरील खटल्याचे दृष्टीनें व त्यांच्या निरनिराळ्या चळवळींच्या दृष्टीनें

इष्ट होतें. रा. टिळक ह्यांनीं स्वतः खटला चालवावयाचा नव्हता व बॅरिस्टरामार्फत चालविला असता तर अधिक बरें झालें असतें असें मुंबईच्या एका पत्राचें मत आहे. पण हें मत चुकीचें आहे, असें आम्हांस वाटतें. १२४/अ कलमांतील " प्रयत्न करणें " ह्या शब्दाच्या आधारें लेखांतील नुसत्या शब्दांचा विचार नव्हे तर प्रसंग, काळवेळ, व वाचकांच्या मनाची स्थिति ह्यांचाहि पुरावा या खटल्यांत फिर्यादीनें दिला पाहिजे, किंवा लेखकाच्याच समाजांतील ज्यूरी असली पाहिजे ह्या तत्त्वाकडे रा. टिळक ह्यांनीं स्वतः खटला चालविला नसता तर लोकांचें व अधिकाऱ्यांचें मन वेधलें नसतें. ज्यूरींत सात युरोपियन व दोन नेटिव्ह होते, व सातांनीं रा. टिळक ह्यांना दोषी ठरविलें. १८९७ सालीं ज्यूरींत ६ युरोपियन व ३ नेटिव्ह होते, आणि त्यावेळींहि ६ युरोपियनांनीं रा. टिळक यांना दोषी ठरविलें. ह्यावरून केसरींतील लेख कायद्याच्या सीमेच्या बाहेरचे वस्तुतः होते असें सिद्ध होत नसून ह्या खटल्यापुरती सीमा आंखण्याचें काम आंधळ्यांकडे सरकारनें सोपविल्यामुळें व अधिकाऱ्यांच्या काठीशिवाय कांहीं कांहीं ठिकाणीं चालतां येणें ह्या आंधळ्यांना शक्य नसल्यामुळें ज्यूरीनें ह्या प्रसंगीं सीमेची रेघ भलत्याच ठिकाणीं आंखून काढली. मुद्रणस्वातंत्र्यावर दृष्टि ठेऊन रा. टिळक ह्यांनीं ज्या विद्वत्तेनें, ज्या जोरानें व ज्या एकनिष्ठेच्या करारीपणानें खटला चालविला तसा कोणच्याहि बॅरिस्टरास चालवितां येणें शक्य नव्हतें. कोणचेहि प्रसंगीं रा. टिळक आपल्या अंतिम साध्याच्या सिद्धांतावर दुर्लक्ष करीत नाहींत, आपल्या स्वेच्छेच्या किंवा परेच्छेच्या कर्मानें आपल्या चळवळीच्या तत्त्वाचा खरेपणा स्थापित करण्याचा प्रसंग व्यर्थ दवडीत नाहींत, व भयंकर दुःखाचें ओझें डोक्यावर असतांहि बारीक सारीक गोष्टींपासून मोठमोठ्या तत्त्वांपर्यंत एकसारखी नजर पोंचवून एकजात मेहनत करण्याची पराकाष्ठा करतात; या गोष्टी स्वतःच्या मनाशीं

जर कोणास पटवून घ्यावयाच्या असतील तर त्यांनीं रा. टिळक ह्यांचें हाय-कोर्टातील भाषण मनःपूर्वक अवश्य वाचावें. ह्या खटल्यांतील रा. टिळक ह्यांचें वर्तनांत त्यांच्या तीस वर्षांच्या

## चरित्राचें सार

आलें आहे. या खटल्यांत त्यांची बुद्धि ज्याप्रमाणें प्रखर स्वरूपांत दिसते त्याचप्रमाणें पूर्वीच्या हरएक प्रसंगींहि त्यांच्या बुद्धीचें तेज तीक्ष्णपणानें चमकलें आहे. ह्या खटल्यांत स्वतःच्या शरीराचे हाल चुकवण्याकडे लक्ष न देतां मुद्रणस्वातंत्र्याच्या पायांतील शृंखला तोडण्याकडे जसें त्यांचें सर्व लक्ष होतें त्याचप्रमाणें व्यक्तिविषयक सुखदुःखांकडे बिलकुल लक्ष न देतां कार्याकडेच त्यांनीं हरएक चळवळींत लक्ष पोंचविलेलें आहे, आणि या खटल्यांत सर्व तऱ्हेचें कर्म धीमेपणानें आचरण्यांत जसा त्यांनीं मनाचा समतोलपणा किंवा कर्मयोग दाखविला तसाच प्रकारचे ते ज्ञानी व कर्मयोगी निरनिराळ्या चळवळींत दृष्टीस पडत आले आहेत. स्वतःच्या कर्मावर व सिद्धांताच्या सत्यावर त्यांचा पूर्ण विश्वास असून ह्या भक्तीच्या जोरामुळें संकटें व दुःखें धिटाईनें व एकतऱ्हेच्या आनंदानें तें सोसूं शकतात, हें ह्या खटल्याचे निकालाचे वेळीं सर्वांच्या प्रत्ययास आलें आहे. दुःखें भोगावीं लागतात म्हणून आपला सिद्धांत चुकला, असें रा. टिळक ह्यांना वाटलें नव्हतें व खटल्याचा निकाल झाल्यावरहि वाटलें नाहीं; संकटें येतात म्हणून आपलें कर्म खोटें होतें असें रा. टिळक ह्यांना वाटलें नव्हतें व खटल्याचा निकाल झाल्यावरहि वाटलें नाहीं; आणि राष्ट्रीय पक्षाच्या सिद्धांतावर व कर्मावर त्यांची पूर्ण भक्ति असल्यामुळें ह्या पक्षांतील लोक सोसत असलेल्या व पुढें सोसणाऱ्या हालअपेष्टांतूनच ह्या पक्षाची कार्यसिद्धि परमेश्वर घडवून आणणार आहे, असें त्यांचें नेहमींचेंच मत होतें व खटल्याचा निकाल लागल्यावरहि त्यांनीं तोच भक्तिभाव बोलून दाखवून परमेश्वरावर सर्व भार टाकला!

एखाद्या मोठ्या कथानकाचा सारांश जसा थोडक्यांत सांगण्याचा प्रघात आहे, त्याप्रमाणें रा. टिळक ह्यांच्या तीस वर्षांच्या चळवळीची प्रतिमा या खटल्यांत दिसणारी आहे. रा. टिळक महाराष्ट्रांतच नव्हे तर सर्व हिंदुस्थानांत राष्ट्रीय पक्षाचे पुढारी आहेत. ज्या सद्गुणांच्या व सत्कार्यांच्या उत्कर्षामुळें हा पुढारीपणा त्यांचेकडे आलेला आहे ते बुद्धीचे व मनाचे सद्गुण, आणि शरीराचें तें सत्कर्म या खटल्यामुळें त्यांच्या अनुयायांपुढें व सर्व लोकांपुढें विशेषेंकरून आलें असल्यामुळें रा. टिळक यांच्या हद्दपारीचे काळांत राष्ट्रीय पक्ष ह्या स्थिरबुद्धीपासून व ह्या सत्कर्मापासून तिळभरहि पराङ्मुख होणार नाहीं, असा आम्हांस भरंवसा आहे.

# ※ टिळक आणि दावर

रा. टिळक यांजवरील खटल्यासंबंधानें ठिकठिकाणचें लोकमत आतां प्रसिद्ध झालें आहे, त्यांविषयींची सर्व हकीकत गेल्या व आजचे अंकांत प्रसिद्ध केलीच आहे. कांहीं अँग्लो-इंडियन पत्रें आणि न्या. दावर यांच्या मताचीं मेथा पक्षाचीं एकदोन नेटिव्ह पत्रें ह्यांशिवाय सर्वांना रा. टिळक ह्यांना झालेल्या शिक्षेमुळें अत्यंत दुःख वाटत आहे. कोणाला न्यायमूर्तीनें रा. टिळक ह्यांना शिव्याशाप अभिमन्यूच्या मस्तकावर लाथ मारणाऱ्या जयद्रथाप्रमाणें दिले म्हणून वाईट वाटत आहे; तर कोणी रा. टिळक यांच्या स्वदेशाभिमानाबद्दल न्यायमूर्तीनें संदेह प्रदर्शित केला म्हणून डोळ्यांतून अश्रू गाळीत आहेत. एका लेखावर खटला केला असतां लागोपाठ दुसऱ्या लेखावर दुसरा खटला करून फिर्यादीनें खुनशी नीचपणा दाखविला इतकेंच नव्हे तर पहिला लेख राजद्रोहाची शाबिती होण्यास पुरेसा नव्हता अशीच फिर्यादीनें पर्यायानें कबुली दिली आहे असें सर्व समंजस नेटिव्ह म्हणत आहेत, तर कायदे पंडित निक्षून सांगत आहेत कीं निरनिराळ्या प्रसंगांच्या निरनिराळ्या फिर्यादी निरनिराळ्या स्वरूपांत दाखल होऊन मॅजिस्ट्रेटनें निरनिराळ्या सेशन कमिट केल्यानंतर त्या सर्वांची एकच खिचडी करण्यांत न्या. दावर यांनीं कायद्याकडे दुर्लक्ष केलें आहे. ज्युरीमध्यें सात युरोपियन आले त्याच वेळीं खटल्याचा निकाल काय होणार याची खूणगांठ कांहींनीं मनाशीं बांधली, तर जामिनाच्या अर्जापासून अखेर निकाल सांगेपर्यंत घेण्यांत आलेल्या आरोपीच्या हिताच्या जपमाळेवरून पुढील कडक शिक्षेचें कपटनाटक कांहींनीं अगाऊच ताडिलें. लेख लिहिण्यांत लेखकाचा हेतु काय होता हें लेखामध्यें जाहीर केलें असतांना,

※ केसरी, ता. ४ ऑगस्ट १९०८

गुन्हा करण्याचाच हेतु आरोपीचा होता हें लेखाशिवाय इतर स्वतंत्र रीतीनें सिद्ध करण्याचा बोजा न्यायमूर्तीनें फिर्यादीवर टाकावयास पाहिजे होता, असें कांहींचें मत आहे, तर दुसरे १२४ अ ह्या कलमाला स्पष्टीकरण जोडलें आहे, अपवाद सांगितला नाहीं, ह्या गोष्टीचा फायदा रा. टिळक ह्यांना न देण्यांत व शेवटीं बोलण्याचा रा. टिळक यांचा हक्क काढून घेण्यांत न्या. दावर ह्यांनीं चूक केली, म्हणून त्यांना दोष देत आहेत. भाषांतरावर आरोप ठेवण्यांत कायद्याच्या दृष्टीनें अन्याय झाला म्हणून कायदेपंडितांची तक्रार आहे, तर अठराच शब्द कायते चुकले बाकी हजारों शब्द बरोबर आहेतना, म्हणून पोरकट फुशारकी मारणाऱ्या बॅरिस्टर ब्रॅन्सनला व मराठीचा अभ्यास न करतांहि नोकरचाकरांशीं मोडकेंतोडकें मराठी बोलण्याचा प्रसंग येतो एवढयाच लंगडया आधारावर रा. जोशी यांना मराठी भाषेच्या प्रावीण्याचें सर्टिफिकीट देण्याचें साहस करणाऱ्या न्या. दावरला सामान्य लोक हांसत आहेत. गिरणींतील मजुरांना विचारा, रा. टिळक यांजवरील खटल्यांत न्याय झाला काय ? ते उत्तर देतील, स्वदेशीची चळवळ करणाराला, रयतेच्या हक्कासाठीं भांडणाऱ्या विद्वानाला काळोखांतच शिक्षा न होतां न्याय मिळेल असें तुम्हांला वाटते तरी कसें ? दुकानदाराचें मत घ्या, ह्या खटल्यांत दोष कोणाकडे आहे ? ते जबाब देतील नफा नुकसानीच्या वेळीं न्यायान्यायाकडे कोठचें लक्ष पुरविलें जाणार ? सुशिक्षितांचें मत घ्या, ते सिद्धांतरूपानें सांगतील कीं, न्यायाचा दिवस उगवण्यापूर्वी अशीच अन्यायाची रात्र जावी लागते. ज्यांना कोणच्याहि प्रकारच्या राजकीय चळवळीबद्दल विशेषशीं सहानुभूति नाहीं, कायद्यांतील दोनचार कलमांची थोडीशी मान मुरगळली असतां विशेष अन्याय होतो असें ज्यांना वाटत नाहीं, इतकेंच नव्हे तर रा. टिळक ह्यांच्या राजकीय चळवळींच्या विरुद्ध जे सांगून सवरून आहेत, असल्या कांहीं लोकांनाहि रा. टिळक ह्यांच्या शोधक बुद्धीमुळें व जाडया विद्वत्तेमुळें, असली

सक्त मजुरीची जबर शिक्षा अशा प्रकारच्या लेखकाला व वक्त्याला देऊं नये, असें स्पष्ट म्हणणें भाग पडत आहे.

गिरणींतील मजूर, शेख मेमन स्ट्रीटमधील बनिया, कापड मार्केटांतील दलाल व गुमास्ते, मोतीबाजारांतील सराफ, शेअर बाजारांतील धनिक, खेड्यांतील शेतकरी, शहरांतील व्यापारी, शाळांतील शिक्षक व विद्यार्थी, कॉलेजांतील तरुण व प्रोफेसर, कोर्टांतील वकील, राजकीय चळवळींतील मवाळ व नेमस्त, सामाजिक सुधारणेंतील सुधारक, धर्मसुधारणेंतील समाजिस्ट, सर्वांनींच कसें कोणत्या ना कोणत्या तरी कारणांमुळें रा. टिळक यांना झालेल्या शिक्षेमुळें हळहळावें ? न्या. दावर यांच्या मतांची तळी नेटिव्हांपैकीं बहुतेक कोणींच कां उचलूं नये ? सर्वांनाच स्मृतिविभ्रम झाला आहे काय ? रा. टिळक यांच्या मनाला झालेल्या रोगानें सर्वांनाच पछाडलें आहे काय ? सर्व देशाला लागलेल्या ह्या खुळापासून ॲंग्लो–इंडियन उपजत मोकळे आहेत, ही ॲंग्लो–इंडियनांची शक्ति न्या. दावर ह्यांनीं इनॉक्युलेशनच्या कोणच्या प्रयोगानें स्वतःचे रक्तांत टोंचून घेतली ? टिळक आणि दावर ह्या दोन पक्षांत खरा कोण ? पायोनियर, टाइम्स, गॅझीट ह्यांच्या पक्षांतील ॲंग्लो-इंडियन पत्रें न्या. दावर ह्यांची पाठ–रा. टिळक यांना त्यांनीं केलेल्या बाणेदार उपदेशाबद्दल–थोपटीत आहेत, आणि नेक नामदार गव्हर्नरसाहेब सर जॉर्ज क्लार्क ह्यांच्यासारखे इलाख्याचे अधिपतीहि चांगला न्याय न्या. दावर ह्यांनीं निवडला, असें सर्टिफिकीट देत आहेत ! उलट बाजूस अन्याय झाला म्हणून तीव्र दुःखाचा कल्लोळकोलाहल माजला आहे, आणि अधिकारी वर्गाच्या अंगाला झोंबणारें टिळकांच्या मनाचें वेड उपटून काढण्याचा ‘ अव्यापारेषु व्यापार ’ करणारे न्या. दावर ‘ कीलोत्पाटी ’ वानराप्रमाणें लोकदृष्टया नादान ठरले आहेत. न्या. दावर ह्यांच्या विरुद्ध लोकमत इतकें क्षुब्ध झालेलें कां असावें ह्या प्रश्नाचें उत्तर पाहिजे असल्यास न्या. दावर

यांनीं आपल्या मतांचा प्रकाश कोणत्या ठिकाणीं पाडला हें नीट ध्यानांत घेतलें पाहिजे. ज्यूरीनें रा. टिळक ह्यांना दोषी ठरविल्यावर न्या. दावर ह्यांनीं रा. टिळक ह्यांना विचारलें तुम्हांस कांहीं बोलावयाचें आहे काय ? हा प्रसंग कोणच्या स्वरूपाचा होता ? कायद्याच्या कलमांनीं न्याय तोलण्याचें काम येथें संपतें व शिक्षा सांगतांना इतर गोष्टींचा विचार करून कायद्याची कोरडी दृष्टि दयेनें कितपत आर्द्र करावयाची हा प्रश्न ह्या प्रसंगीं न्याया-धीशापुढें असतो. रा. टिळक यांजवरील खटल्यांत कोर्टाबाहेरील पंचांचा विचार काळजीपूर्वक करून रा. टिळक ह्यांनीं हिंदुस्थानबाहेर सहा वर्षें काळेपाण्यावर काढावींत, असें न्यायमूर्तींनीं अगाऊच ठरवून ठेविलें होतें. तथापि कायद्याच्या मर्यादेबाहेरील प्रश्नासंबंधानें आरोपीला कांहीं सुचवावयाचें असल्यास त्याला संधि मिळावी म्हणून हा औपचारिक प्रश्न विचारण्यांत आला. रा. टिळक ह्यांनीं ह्यावेळीं दिलेलें उत्तर दैवी स्फूर्तीचें होतें. आपल्या उतारवयाकडे व रोगग्रस्त शरीराकडे त्यांनीं न्यायमूर्तींचें लक्ष वेधलें नाहीं. कारण त्यावेळच्या योगारूढ स्थितींत जड देहाला ते विसरले असून खट-ल्याच्या निकालाचा परिणाम त्यांच्या आवडत्या राजकीय चळवळीवर काय होईल, एवढ्या एकाच गोष्टीचा त्यांना निदिध्यास लागून राहिलेला होता. देशोन्नतीच्या कामापुढें स्वतःचें शरीर त्यांना नेहमींप्रमाणें ह्याहिवेळीं तुच्छ वाटत होतें. आपल्याला देहदंड सोसावा लागणार ह्या भीतीचा लवलेशहि त्यांच्या मनाला ह्यावेळीं शिवलेला नव्हता. तर राष्ट्रीय पक्षाची पिछेहाट ह्या खटल्यानें होईल कीं काय अशी भीति त्यांना वाटत होती. त्याच धोरणानें सरकारनें हा खटला उभारला होता, व खटल्याचा निकाल ज्यूरीनें अधि-काऱ्यांच्या बाजूनें दिल्यानें फिर्यादीचें धोरण यशस्वी होण्यास आरंभ झाला, अशी रा. टिळक ह्यांना भीति वाटली. ह्यावेळीं न्या. दावर एका खटल्याचा निकाल करीत होते व राजकीय चळवळीच्या प्रगतीविषयीं उद्भवलेल्या

शंकेचें समाधान करण्यांत रा. टिळक ह्यांची योगारूढ बुद्धि गुंतलेली होती. न्या. दावर म्हणाले तुम्हांला तुरुंगांत पाठविण्याची वेळ आली. रा.टिळक यांजपुढें शंका उभी राहिली. देवा, हा तुरुंगवास म्हणजे राष्ट्रीयपक्षाच्या चळवळीचा कोंडमारा तर नव्हे ना? राष्ट्रीयपक्षाच्या तत्त्वावर रा. टिळक यांची अव्यभि-चारिणी भक्ति आहे. राष्ट्रीय पक्षाच्या कर्मावर रा.टिळक यांचा अचल विश्वास आहे. ह्या पक्षाचें प्रत्येक तत्त्व देशाचा उद्धार करणार; ह्या पक्षाचें प्रत्येक कर्म देशोन्नतींनेंच फळाला येणार. मग ती शंका रा. टिळक यांच्या मनांत उद्भवली तरी कशी? राष्ट्रीय पक्षावरील अत्यंत प्रेमामुळें ही शंका उद्भवली. " अतिस्नेहः पापशंकी " ही शंका रा. टिळक ह्यांच्या एकटयांच्याच हृदयांत उत्पन्न झालेली असती तर त्या शंकेचें निरसन उघडपणें ह्या प्रसंगीं करण्याचें कारण नव्हतें. हिमालयापासून रामेश्वरापर्यंत व पंजाबपासून बंगालपर्यंत राष्ट्रीय पक्षाचे सर्व लोक ह्या शंकेनें पीडित होते. आपल्या पुढाऱ्याचे मार्गें आपल्या पक्षाचें काय होईल, ही भीति सर्व राष्ट्रीय पक्षाला ग्रासून राहिली होती. अधिकाऱ्यांचा कावा यशस्वी होऊन आजपर्यंतची खटपटहि निरर्थक होते कीं काय, अशी उद्विग्नता ह्या प्रसंगानें सर्व राष्ट्रीय पक्षांत उत्पन्न झाली होती. असल्या हृदयदौर्बल्यामुळें मीं मीं म्हणविणारांचीहि बुद्धि ऐनप्रसंगीं घुटमळूं लागते. सभोंवारच्या स्थितीविषयीं व पुढील मार्गाविषयीं प्रसंगविशेषीं चित्त व्यामूढ झालें असतांना कोणच्या ज्ञानाचें अंजन डोळ्यांत घालावें लागतें, हें इतिहासानें व तत्त्ववेत्त्यांनीं ठरवून ठेवलेलें आहे. पण अमक्या रोगावर अमकें औषध, असें नुसतें माहीत असून काय उपयोग? अमकाच रोग झाला आहे, ही चिकित्सा तज्ञाच पुरुषानें केली पाहिजे; शिवाय भीति दृढ विश्वासास पात्र झालेल्या लोकाग्रणीनेंच दूर करावयास पाहिजे होती. रा. टिळक सर्व लोकांचे व विशेषतः राष्ट्रीय पक्षाचे ' आप्त ' आहेत. तेव्हां अशा ' आप्ता ' नें--अशा ' यथार्थ वक्त्या ' नें--अशा मार्ग-

दर्शकानें—पुढील मार्गाविषयीं संदेह उत्पन्न झाला असतांना अमकाच मार्ग खरा असा ठांसून निकाल सांगणें जरूर होतें. न्या. दावर ह्यांनीं विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर देतांना रा. टिळक ह्यांनीं काढलेले उद्‌गार त्यांच्या स्वतःच्या मनाचें समाधान करण्याकरितां बाहेर पडलेले नाहींत; तर सांप्रतच्या चळवळीची चिकित्सा काय आहे व त्यावर औषध कोणचें, हा निर्णय स्वतः औषधाच्या स्थितीप्रत पोंचत असतांना रा. टिळक ह्यांनीं राष्ट्रीय पक्षाला दिला आहे. आपल्या देहाला सोसावें लागणारें दुःख हेंच औषध होऊन बसणार, हा विचार कारागृहवासाचे दिवस कंठीत असतांना शारीरिक दुःखाची तीव्रता कमी करण्यास व मानसिक तपश्चर्येचें तेज वाढविण्यास उपयोगीं पडेल, ह्यांत संशय नाहीं. तथापि रा. टिळक ह्यांचे हायकोर्टांतील शेवटचे उद्‌गार सर्व राष्ट्रीय पक्षाकरितां होते; हिंदुस्थानचें एकराष्ट्र होऊन राष्ट्रीयत्वाच्या सौभाग्यानें हा हतभागी देश उज्वलित दिसावा, म्हणून मनापासून खटपट करणाऱ्या सर्व देशभक्तांकरितां होते; कोणच्याहि मार्गानें व पंथानें जाणारे असोत पण अखेर देशोन्नतीकरितां आमची तपश्चर्या खर्च होवो, अशी इच्छा करणाऱ्या सर्व हिंदी लोकांकरितां ते उद्‌गार होते. रा. टिळक म्हणतात, देशोद्धाराच्या इतिहासांत कांहीं कांहीं अशांतल्या वेळा असतात कीं, देह कष्टविल्यानें व देहाला तीव्र दुःखें सोसण्याचा प्रसंग आल्यानें त्या कष्टामुळेंच व त्या दुःखामुळेंच देशोन्नतीचें काम अधिक जलद घडून येतें, आणि सांप्रतची वेळ अशाच वेळांपैकीं एक असल्यानें मला दोषी ठरविण्याची बुद्धि परमेश्वरानेंच ज्यूरीला दिली. सामान्य जनसमूहाला विशिष्ट दिशेनें जावयास लावण्याचे मार्ग दोन तऱ्हेचे आहेत. पहिला मार्ग असा कीं, त्यांना उपदेश करावयाचा, बाबांनों, ह्या मार्गानें गेलां असतां तुमचें कल्याण आहे. ही कर्मभूमि आहे, म्हणून येथें नुसत्या उपदेशाचा प्रत्यक्ष परिणाम फारसा होत नाहीं. उपदेशाचा अप्रत्यक्ष परिणाम

होतो, विचाराला एका प्रकारचें वळण लागतें, पण मनचे मनांत वळविलेले विचार आचारांत वळविण्याचे कामीं नुसता उपदेश बहुतेक पंगू ठरतो. कर्ममार्गी लोकांपुढें प्रत्यक्ष कर्मच असल्याशिवाय कळलेलें वळत नाहीं. लोकांना सांगतां आलें पाहिजे; बाबानों, ह्या मार्गानें जाण्यांत तुमचें कल्याण आहे; हा मी ह्याच मार्गानें चाललों, आणि हें पहा तुम्हाला पाहिजे तसलें माझें प्रत्यक्ष कल्याण झालेलें आहे. हायकोर्टांत उच्चासनावर बसून न्या. दावर राष्ट्रीय पक्षास सुचवीत होते कीं, बाबानों, ना. मेथा म्हणतात त्याप्रमाणें सरकारी मार्गानेंच जाऊन, पण जातां जातां कोठें दगड पडला असतां उचलून टाकून, कोठें खडी वर खालीं असतां ती दडपून बसवून, कोठें कांटा दिसत असला तर काढून टाकून व कोठें सावली नसल्यास एखादी सावली-पुरती नवीन संस्था सजवून, मार्ग आक्रमिला असतां संसार सुखावह होतो; आणि हा मी तुम्हाला पाहिजे त्याप्रमाणें सुखी झालों आहे, ह्या मार्गानेंच जाऊन सुखासनावर विराजमान झालों आहे, ह्या पक्षाचाच अभिमानी होऊन लालभडक कपडे पेहरून भालदार-चोपदारांनीं परिवेष्ठित होऊन आपल्या अधिकारानें तुम्हाला दिपवून सोडीत आहें; आमचा हा उपदेश असा आहे, म्हणून आम्ही राष्ट्रीय पक्षाला वेडेपीर समजतों, म्हणून आम्ही राष्ट्रीयपक्षाचें मन नासलें-कुजलें आहे असें जाहीर करतों, म्हणून आम्ही हा रोग इतरांच्या मनाला लागूं नये म्हणून रोगाचा हा गठ्ठा सहा वर्षें हिंदुस्थानाबाहेर हांकलून देऊन तुरुंगांत कोंडून ठेवतों. देशोन्नतीच्या ह्या जुन्या मार्गाचें हें सार न्या. दावर ह्यांच्या भाषणांत स्पष्टपणें सांगण्यांत आलें आहे; व खुद्द न्याय-मूर्तींची मूर्ति, ह्या उपदेशाप्रमाणें कर्म आचरून पूर्वीं कल्याण करून घेतलेल्यांची, आज कल्याण करून घेत असलेल्यांची, व पुढें कल्याण करून घेणारांची एक गाळीव प्रतिमाच होय. हा उपदेश आज लोकांना कडू कां वाटला, न्यायमूर्तींचा तो दैदिप्यमान तांबडा झगा विदूषकी पोषाखाप्रमाणें

हास्यास्पद कां वाटूं लागला ? हा उपदेश नवा नाहीं; हा पुरातन आहे. हा इतका पुरातन आहे कीं, इंग्रजी राज्यापूर्वींच्या सर्व राज्यांत हा उपदेश होता, किंबहुना मानवी स्वभावांतच ह्या उपदेशाचें मूळ आहे. मनुष्य स्वभावतः अर्थार्थी आहे. आपलें मोठें कल्याण व्हावें, शारीरिक सुखाचा लाभ व्हावा, ही सहज प्रवृत्ति प्राणिमात्रांत आहे. ह्या प्रवृत्तीला आचाराचें स्वरूप येण्यास फारशा उपदेशाची जरुरी नाहीं; थोड्याशा प्रत्यक्ष सुखाच्या लालुचीच्या डवचण्यानें ही प्रवृत्ति एकदम जागी होऊन कर्मरूपानें प्रकट होऊं लागते. अर्थार्थी स्वभावाला चेतना मिळूनच इंग्रजी राज्य झाल्यापासून आजपर्यंत झालेल्या बऱ्याच चळवळी उपस्थित झाल्या, व अर्थार्थी वर्गापैकीं थोडे थोडे लोक पूर्वींच्याच ह्या चळवळी जशाच्या तशाच पुढेंहि चालवितील ह्यांत संशय नाहीं. पण ह्या पक्षाचें तेज हिंदुस्थानांत पडण्याचे दिवस सांप्रत तरी उरलेले नाहींत. पाश्चिमात्य शिक्षणाच्या फैलावामुळें व जपानच्या उदयामुळें, नवीन ‘ अर्थ ’ लोकांच्या दृष्टीपुढें दिसूं लागले आहेत. पूर्वींच्या चळवळी-मुळें पूर्वींचेहि ‘ अर्थ ’ साध्य होत नाहींत अशी जेथें निराशा झालेली आहे, एखादा दुसरा न्यायमूर्ति झाला म्हणून त्यांत काय ‘ अर्थ ’ आहे असे जेथें उद्गार चोहोंकडून ऐकूं येऊं लागले आहेत, तांदूळ धुण्याच्या पांढऱ्या पाण्यानें दुधाची तहान भागणें शक्य नाहीं, असें ‘ ज्ञान ’ जेथें उपजलें आहे, तेथें पूर्वींच्या मार्गाच्या उपदेशानें व पूर्वींच्या मार्गाच्या न्यायासना-वरील मूर्तिमंत फळाच्या प्रदर्शनानें काय परिणाम होणार ? देशोन्नतीचा पहिला मार्ग सांप्रतच्या स्थितींत जीर्ण झाला आहे. ह्या म्हाताऱ्याला तरुण करण्याचें औषध एकट्या सरकारापाशीं आहे. न्या. दावर यांजपाशीं नाहीं, ना. मेथा यांजपाशीं नाहीं, सर्व नेमस्त पक्षापाशीं नाहीं. इंग्लंडांतल्याप्रमाणें किंवा जपानप्रमाणें किंवा इतर युरोपियन राष्ट्रांप्रमाणें सनदशीर राज्यपद्धत सुरू केल्याशिवाय हा पहिला मार्ग मरणोन्मुख असाच रहाणार. हा जुना

...धर वाचनालय, ...



मार्ग कांहीं अर्थार्थ्यांची अल्प तहानभूक भागविणारा आहे व बऱ्याच अंशानें इतर सर्व अर्थार्थींचीहि निराशा करून त्यांनाहि आर्त बनविणारा आहे असें ठरल्यानंतर, ह्या राजमार्गानेंच आर्त, जिज्ञासू व ज्ञानी ह्यानींहि जावें असें कोण म्हणेल? ह्या ठिकाणीं राष्ट्रीय पक्षाचा मार्ग लोकांना दिसूं लागला, ह्या जागीं राष्ट्रीय पक्षाच्या मतांचा फैलाव झाला, ह्या प्रसंगीं राष्ट्रीय पक्षानें लोकांचीं मनें व्यापलीं, राष्ट्रीय पक्षाचा उपदेश लोकांना पटला खरा, पण आचारांत कसा वळवावयाचा? स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य, ह्यासंबंधाचीं तत्त्वें समजलीं खरीं पण अहर्निश आचारांत कशीं उतरावयाचीं? स्वदेशीकरतां प्रत्येकानें रोजचे व्यवहारांत थोडीशी तरी झीज सोशिली पाहिजे, बहिष्काराकरितां प्रत्येकानें रोजचे आचरणांत थोडासा तरी त्रास सोसला पाहिजे, राष्ट्रीय शिक्षणाकरितां नेहमीं प्रत्येकानें थोडीशी तरी पदरमोड केली पाहिजे व स्वराज्याचे हक्काकरितां देह रोजचे रोज थोडा तरी कष्टविला पाहिजे, अशा तऱ्हेचा उपदेश लोकांना पटला आहे. पण मी एकट्यानें एवढेंसेंच केल्यानें काय होणार आहे, एवढें लहानसें रोजचें कार्य मी टाळलें म्हणून कोठें बिघडणार आहे, कोठें राष्ट्र, कोठें मी, एवढ्या मोठ्या समुद्रांत माझ्या एकट्याच्या तपश्चर्येचा बिंदु नसला म्हणून काय झालें, अशा प्रकारचा भ्रम उत्पन्न होऊन रोजचीं तपश्चर्येचीं राष्ट्रीय कर्में आचरण्याचें मनुष्य टाळतो. तोबऱ्याला पुढें व लगामाला मागें असा मानवी प्राणी स्वभावतः चुकारतट्टू आहे. नवीन पक्षाची गति मंदावते व यावें तसें यश या पक्षाला येत नाहीं, याचें मुख्य कारण हा चुकारपणा. ही कुचराई मोठ्या कार्याचा विघाड करते. हें अंग चोरणें स्वाराला खालीं आणतें. ही बगल देणें स्वस्थ पडून रहावयास शिकवितें. हा शरीराचा रोग, ही मनाची लबाडी, ही बुद्धीची झोंप, बहुजन समाजांतून हांकलल्याशिवाय राष्ट्रीय पक्ष यशस्वी होणें शक्य नाहीं. ही तपश्चर्या अशी आचरावी लागते,

हे शरीरकष्ट असे करावे लागतात, हीं दुःखें अशीं सोसावीं लागतात, अशी टोंचणी रात्रंदिवस सर्वांच्या मनापुढें ठेवणारें प्रत्यक्ष उदाहरण राष्ट्राच्या असल्या अवस्थेंत लोकांपुढें असावें लागतें. हें तपश्चर्येचें कर्म कित्येक लोक त्यांच्या अज्ञात स्थितींत नेहमींच आचरीत असतात व राष्ट्रीय हितावर त्यांचा परिणाम होत असतोच. पण बहुजनसमाजाला स्वकर्तव्याविषयीं जागृत करण्याचे कामीं त्याचें अप्रत्यक्ष उदाहरण उपयोगीं पडत नाहीं. लोकांना माहीत असलेल्या, लोकांचा विश्वास असलेल्या व योग्यतेविषयीं लोकांना तिळमात्र संदेह नसलेल्या अशा लोकाग्रणीनें राष्ट्रीय पक्षाकरितां सोसलेलीं दुःखेंच वरील जागृति उत्पन्न करून बहुजनसमाजाकडून रोजच्या तपश्चर्येचीं कर्में आचरविण्याचे कामीं उपयोगीं पडतात. हेंच कार्य घडवून आणण्याकरितां परमेश्वरानें रा. टिळक ह्यांना तुरुंगांत पाठविलें आहे, व हें कार्य घडून आलें असें आपल्या रोजच्या राष्ट्रीय तपश्चर्येच्या कर्मानें लोक राष्ट्रीय पक्षाच्या निदर्शनास आणण्यास चुकणार नाहींत, अशी आम्हांला आशा आहे.

नगर वाचनालय, सातारा

# * श्रीगजानन महोत्सव

येत्या रविवारपासून चोहोंकडे सुरू होणाऱ्या श्रीगजानन महोत्सवाकडे सांप्रत सर्वांचे डोळे लागून राहिले आहेत. यंदाचें साल या उत्सवाला अनेक कारणांनीं प्रतिकूल झालें असल्यामुळें गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशी-अखेरचे दहा दिवस महाराष्ट्रीयांच्या परीक्षेची वेळ होणार आहेत. या उत्सवाला नवीन वळण देऊन राष्ट्रसंवर्धनाची व धर्मोत्कर्षाची सांगड घालून देण्याचें श्रेय संपादन करणारे व ह्या उत्सवाचे प्रवर्तक रा. टिळक ह्या प्रसंगीं तुरुंगांत आहेत. रा. टिळक ह्यांना सांप्रत भोगाव्या लागणाऱ्या कैदेच्या शिक्षेचें निमित्तकारण ज्या लेखांवरून खटला करण्यांत आला ते दोन लेख होत. ह्या दोन लेखांचा उपयोग तुरुंगांत टाकण्यास कांहीं तरी सबब पाहिजे म्हणून करण्यांत आला, पण खरें कारण हे लेख नव्हत. खरें कारण ' लंडन टाइम्स ' नें सांगितलें आहे. रा. टिळक हे राष्ट्रीय पक्षाचे पुढारी आहेत म्हणून त्यांना तुरुंगांत पाठविण्यांत आलें. सुरतच्या कॉंग्रेसच्या वेळीं रा. टिळक राष्ट्रीय पक्षाचे पुढारी समजले गेले. त्यांना कोणीं राष्ट्रीय पक्षाचे सेक्रेटरी नेमलें नाहीं, त्यांच्या हातांत राष्ट्रीय पक्षाचीं सूत्रें असावींत असा कोणीहि ठराव पास केला नाहीं. मग रा. टिळक राष्ट्रीय पक्षाचे पुढारी कसे झाले ? याचें उत्तर असें आहे कीं, रा. टिळक हे राष्ट्रीय पक्षाचे स्वयंभू पुढारी आहेत. स्वयंभू पुढारी म्हणजे काय ? कांहीं वर्षांपूर्वी ज्यावेळीं राष्ट्रीय पक्ष उत्पन्न झाला नव्हता त्यावेळीं ह्या पक्षाच्या मतांची ज्योत रा. टिळक ह्यांच्या हृदयांत पेटत होती; ज्यावेळीं राष्ट्रीय पक्षाचें महत्त्व व जरुरी लोकांना पटली नव्हती त्या वेळेलाहि ज्या संस्थांमुळें हा पक्ष जन्मास

---

* केसरी, ता. २५ ऑगस्ट १९०८

येतो व वाढीस लागतो अशा संस्था उत्पन्न करण्याचे कामीं व जोरावर आणण्याचें कामीं रा. टिळक आपली बुद्धि व वेळ खर्च करीत होते; ज्यावेळीं सुरतेस ठरल्याप्रमाणें कलकत्त्याचे कॉंग्रेसचे मुख्य चार ठराव म्हणजे राष्ट्रीय पक्षाचीं मतें असें मुक्रर ठरलेंहि नव्हतें, त्यावेळीं राष्ट्रीय पक्षाच्या मताचा प्रकार ओळखून त्या प्रकाराचे चतुःसीमेंत सर्व जुन्या संस्थांच्या शक्ति एकवटण्याचा रा. टिळक ह्यांचा दीर्घोद्योग चालला होता! सांप्रतप्रमाणें स्पष्ट स्वरूपानें राष्ट्रीय पक्ष ज्यावेळीं हिंदुस्थानभर वावरत नव्हता त्यावेळींहि तो अमूर्त पक्ष रा. टिळक ह्यांचे अंगीं पूर्ण संचारलेला असून कांहीं पुरातन चळवळींच्या स्वरूपानें व्यक्त होऊं लागला होता. ह्या चळवळींचे प्रवर्तक व पुरस्कर्ते रा. टिळक असल्यामुळें राष्ट्रीय पक्षाचाहि पुढारीपणा सहाजिकपणें त्यांजकडेच आला. राष्ट्रीय पक्ष जन्मास येण्यापूर्वीच त्या पक्षाला पोषक असलेल्या ज्या कित्येक संस्था व चळवळी रा. टिळक ह्यांनीं महाराष्ट्रांत व हिंदुस्थानांत सुरू केल्या होत्या त्या चळवळींत श्रीगजानन महोत्सवाला अग्रस्थान दिलें पाहिजे. महाराष्ट्रांत राष्ट्रीय पक्ष हां हां म्हणतां पसरला, ह्याचें कारण श्रीगजानन महोत्सव व श्रीशिवाजी महोत्सव ह्यांनीं महाराष्ट्रीयांच्या विचारांना दिलेलें नवीन वळण होय. कोणचेहि लोकांना किंवा समाजाला त्यांचा धर्म व इतिहास हीं अत्यंत महत्त्वाचीं असतात. एखाद्या समाजाचें राष्ट्र बनविण्याचे कामीं जर त्याच्या धर्माचा व इतिहासाचा उपयोग करून घेतां येत असला तर धर्म व इतिहास या जोडीच्या पायावरच नवीन राष्ट्र उभारण्याचा प्रयत्न केला पाहिजे, इतकेंच नव्हे तर ज्या समाजाला राष्ट्र बनण्याचे कामीं आपल्या धर्माचा व इतिहासाचा उपयोग करून घेतां येत नाहीं तो समाज राष्ट्रीयत्वाला निरंतरचा मुकलेला म्हणून पृथ्वीतलावर अजागलस्तनाप्रमाणें अत्यंत निरुपयोगी व नादान समजावा. श्रीगजानन महोत्सव व श्रीशिवाजी महोत्सव ह्या दोन प्रचंड संस्थांमुळें महाराष्ट्रांत

कोणचीहि राष्ट्रीय चळवळ आतां सुलभ झाली आहे. राष्ट्रीय पक्षाचा विचार करणारे, राष्ट्राकरितां थोडीफार झीज सोसणारे व राष्ट्रीय पक्षाच्या मतांचा फैलाव व्हावा म्हणून मनापासून खटपट करणारे गृहस्थ ह्या चळवळीमुळें महाराष्ट्रभर उत्पन्न केले आहेत. निरनिराळ्या दृष्टींनीं व राष्ट्रीयत्वाच्या एका धोरणानें काम करणाऱ्या ह्या निरनिराळ्या गृहस्थांच्या कमिट्या राष्ट्रीय पक्षाचे घटकावयव आपोआप होऊन बसल्या असून महाराष्ट्रांत राष्ट्रीय पक्ष अंतस्थ वाढीनें उदयास आला आहे. ज्या चळवळींमुळें महाराष्ट्रांत राष्ट्रीय पक्ष स्वयंभूच उदयास आला व ज्या चळवळींमुळें रा. टिळक राष्ट्रीय पक्षाचे पुढारी झाले, त्या चळवळींत श्रीगजानन महोत्सवाला अग्रस्थान प्राप्त झालें असल्यामुळें रा. टिळक यांच्या कारागृहवासाचा प्रसंग म्हणजे ह्या उत्सवावरील एक संकटच होय. अशा प्रकारचें संकट ह्या उत्सवास १८९७ सालीं आलें होतें, पण त्यावेळच्या संकटाहून हल्लींचें संकट अधिक भयंकर आहे. पत्रकारांवरील फिर्यादी, रा. टिळक ह्यांना झालेली क्रूरपणाची शिक्षा, कोल्हापूर संस्थानाकडून राष्ट्रीय शिक्षणाच्या पाठींत घालण्यांत आलेला बडगा, नागपुरास होत असलेला राष्ट्रीय पक्षाचा छळ व मद्रास इलाख्यांतहि महाराष्ट्राच्या छळाची काढण्यांत येत असलेली आवृत्ति ह्या सर्व गोष्टींकडे नजर फेंकली म्हणजे १८९७ सालाहून आजचा प्रसंग अधिक भयंकर आहे, असें कबूल करावें लागतें. पण गेल्या दहा वर्षांत श्रीगजानन महोत्सवाचें पूर्ण स्वरूप महाराष्ट्रीयांस समजून चुकलेलें असून असल्या संकटांमुळें ह्यापुढें ह्या उत्सवासंबंधानें महाराष्ट्रीयांच्या हातून हयगय होणें शक्य नाहीं.

श्रीगजानन महोत्सवाला सांप्रत मिळालेल्या नवीन स्वरूपाचा प्रारंभ १८९३ सालच्या हिंदुमुसलमानांच्या दंग्यानंतर झाला. ह्या प्रसंगामुळें मुसलमानांच्या विरुद्ध हा उत्सव सुरू करण्यांत आला असा कांहींचा ग्रह

प्रारंभीं प्रारंभीं झाला; पण अलीकडे हा ग्रह समूळ नाहींसा झाला असून हा उत्सव शांतता राखण्यास मदत करणारा, निरनिराळ्या समाजांतील प्रेम वाढविणारा व उत्सवाचे भक्तांत राष्ट्रीयत्व वाढविणारा आहे, अशी आतां सर्वांची खात्री झाली आहे. कांहीं दंग्याधोप्याचे प्रसंग 'वाइटांतून चांगलें' ह्या म्हणीप्रमाणें केव्हां केव्हां फार उपयोगी पडतात, तशांतलीच स्थिति हिंदुमुसलमानांच्या दंग्याची झाली. ह्या दंग्यामुळें आमच्या धार्मिक उत्सवास राष्ट्रीय वळण देण्यास पुढाऱ्यांना संधि मिळाली. असल्या भयंकर प्रकारामुळें समाज खडबडून जागा होत असतो व संकटाला टक्कर देण्याची शक्ति आपल्या अंगीं कशाचे योगानें येईल त्याचा विचार तो करूं लागत असतो. शरीरांत आजार शिरला असतांना शरीराच्या सर्व शक्ति ह्या आजाराचें बिऱ्हाड बाहेर हांकलण्याकडे आपोआप खर्च होऊं लागतात; मात्र तो आजार व्यक्त होऊन शरीराला टोंचूं लागला पाहिजे. ह्या आजारानें शरीराच्या शक्तीचें एकीकरण होतें, फाजील ढंगांत होणारा शरीरशक्तीचा व्यय आपोआप बंद पडतो; आणि नवीन पथ्य स्वीकारण्याकडे व नवीन कसरत करण्याकडे ओढा लागतो. एखाद्या राष्ट्राचा आजार परराष्ट्रांशीं चाललेल्या लढाईच्या वेळीं दृष्टीस पडतो. एखाद्या समाजाचा रोग दुसऱ्या समाजाशीं चाललेल्या झटापटींत बाहेर पडतो, व एखाद्या व्यक्तींतला अवगुण प्रतिस्पर्धेच्या शर्यतींत उघडकीस येतो. १८९३ सालच्या हिंदु मुसलमानांच्या दंग्यानें दोनहि समाजांचें कल्याण केलें. एकाच गोठ्यांत बांधलेल्या व एकाच दावणीला असलेल्या जनावरांनीं एकमेकांना लाथा मारण्यानें गव्हाणींत अधिक चारा मालक टाकीत नसतो, हें त्यांच्या ध्यानांत आलें; व तिसऱ्याचे चिथावणीवरून एकमेकांचीं घरें बुडविण्यांत कांहींच पुरुषार्थ नाहीं, हें दोनहि जाती या प्रसंगीं शिकल्या. ह्या धर्मवैमनस्याचा फायदा कांहीं लोक घेतात. ह्याचा बंदोबस्त कसा करावा, असा प्रश्न त्यावेळीं

उपस्थित झाला. कांहींचें म्हणणें पडलें कीं, दोनहि जातींची आपआपल्या धर्मावरील श्रद्धा कमी केली म्हणजे आपोआप हें वैमनस्य नाहींसें होईल; व त्या उद्देशानें धर्माच्या खुळाचें मूळ उपटून काढण्याचा त्यांनीं उद्योग आरंभिला. उलट पक्षाचें असें म्हणणें पडलें कीं, धर्मावरील श्रद्धा कमी करण्यांत कोणाहि मानवी प्राण्याचें कल्याण नाहीं. धर्मश्रद्धा जितकी अधिक वाढेल व परमेश्वराच्या भक्तीचा प्रसाद चोहोंकडे जितका अधिक होईल तितकें मनुष्यमात्राला अधिक श्रेयस्कर आहे. मानवी प्राण्याला प्रत्यक्ष परमेश्वर बनविण्याची शक्ति जर धर्मांत आहे, तर निरनिराळ्या समाजांचा प्रपंच नीट रीतीनें एका देशांत होईल असला राष्ट्रीयपणा ह्या कल्पतरूपासून मिळण्यास कितीसा अवकाश ? ज्या धर्मामुळें देवांतल्याहि परमपदाला पोंचविणारे साधुसंत निर्माण होतात त्याच धर्मामुळें मानवांत श्रेष्ठ स्थितीला नेऊन पोंचविणारे राष्ट्रभक्त निर्माण होणें कसें कठीण होईल ? परोपकाराचे शिडींत साधुसंतांच्या खालची पायरी राष्ट्रभक्तांची आहे. नराचा नारायण होत असतांना मनुष्य प्रथम राष्ट्रभक्त होतो, मागाहून साधुसंतांच्या पायरीला पोंचतो व शेवटीं नारायणस्वरूपांत मिसळून जातो. राष्ट्रभक्त झाल्याशिवाय कोणासहि साधुसंत होतां यावयाचें नाहीं. पूर्वी राष्ट्रभक्ताच्या पायरीला धर्मपरायण मनुष्य चढला असतांना ह्या पायरीचें पुण्य--ह्या तपश्चर्येचें फळ--समाजाचे पदरांत टाकण्याचें कारण नव्हतें. त्यावेळीं हल्लींच्या-प्रमाणें धर्मकार्याहून राष्ट्रकार्याची मर्यादा आकुंचित करण्यांत आलेली नव्हती. धर्माहून राष्ट्रकार्याची मर्यादा आकुंचित करण्याची युरोपांतील जरूरी इंग्रजी राज्यानें हिंदुस्थानांत आणली आहे, व त्यामुळें साधुसंतांच्या मार्गांत असलेल्या लोकांना जनतेच्या हिताकरितां मध्यंतरीं मुक्काम करून आपलें राष्ट्रभक्ताचें स्वरूप प्रकट करावें लागत आहे. स्वतः परमेश्वर होणार, अशी महत्त्वाकांक्षा धरणारा तपस्वी ज्याप्रमाणें भूतदयेच्या जोरानें

साधुसंतांच्या स्वरूपानें प्रकट होण्यास कबूल होतो, त्याप्रमाणें धर्मश्रद्धेच्या प्रभावानें साधुसंतांच्या पायरीला चढूं लागलेला मनुष्य राष्ट्रीय परोपकाराच्या बुद्धीनें राष्ट्रभक्तीचीं कर्में आचरण्यास तयार होतो. राष्ट्रभक्त तयार करण्याचें काम धर्मसंस्थांच्या हातून जितक्या सुलभ रीतीनें होणें शक्य आहे तितक्या सुलभ रीतीनें राष्ट्रभक्ति दुसऱ्या कोणच्याहि प्रक्रियेनें उत्पन्न होऊं शकत नाहीं, किंबहुना देशभक्ति धर्माच्या हातचा मळ होय कारण राष्ट्रभक्तीचें फळ देतांना धर्माच्या कल्पवृक्षाला जितका आनंद होतो तितका आनंद इतर इच्छा पुरवितांना होत नाहीं. स्वधर्मश्रद्धा व स्वदेश-भक्ति ह्यांचा परस्परांमधील संबंध अशा प्रकारचा असल्यामुळें श्रीगजानन महोत्सवाचे वेळीं पूर्वपरंपरागत होत असलेल्या उपासनेला व उत्सवाला 'ज्ञानसत्र' जोडून देण्यांत आलें. अशा प्रकारच्या धार्मिक उत्सवाचे वेळीं त्या त्या वेळीं आवश्यक असलेल्या निरनिराळ्या विषयांचें ज्ञान जमलेल्या समूहाला देण्याची चाल फार पुरातन आहे. 'महाभारत' हा राष्ट्रीय ग्रंथ अशाच एका यज्ञोत्सवाचें वेळीं वाचून दाखविण्यांत आला, हें महशूर आहेच. पूर्वी एखाद्या महायज्ञाचें महोत्सवाचे प्रसंगीं ठिकठिकाणच्या पंडितांना मुद्दाम म्हणून बोलावून आणीत असत, व रोज उत्सवांतील धार्मिक कर्म आटोपल्यावर निरनिराळ्या विषयांवर ह्या विद्वानांचीं मतें ऐकण्याची संधि ह्या प्रसंगीं लोकांना मिळत असे. विद्वानांची विद्वत्ता धर्मोत्सवाचे ठिकाणीं स्फुरण पावत असे व निरनिराळ्या यात्रेंतील जनसमूहाचा देखावा पाहून कालिदास-भवभूतीसारख्या कवींची प्रतिभा प्रज्वलित होत असे. मल्लांचा उदय येथूनच होई, चित्रकारांच्या हातांतील कलम ह्याच ठिकाणीं चित्रविचित्र गतीनें फिरूं लागे, कारखानदार येथेंच आपला माल जनतेला दाखवीत, कसबी लोक आपलें कसब येथेंच प्रकट करीत, व राजे आणि मुत्सद्दी लोकांना कलागतयाच्या निरोपाची ग्वाही ह्याच ठिकाणीं फिरवीत.

ही चाल हिंदुस्थानांतच होती असें नाहीं, तर ग्रीस, रोम वगैरे इतर पुरातन राष्ट्रांतहि हाच प्रकार असे. महाराष्ट्राच्या भरभराटीच्या वेळीं धर्मोत्सव वरील प्रकारचेच होत होते. हरिदास, पुराणिक व साधुसंत ह्यांच्यावांचून तर कोणचाच धार्मिक उत्सव येथें पार पडत नसे. पुराणिकानें पूर्वीच्या कथा सांगून सांप्रतच्या काळाला त्यापासून कोणचा बोध घेण्यासारखा आहे हें शिकवावें; हरिदासानें जुन्या नव्याचें मिश्रण करून वक्तृत्वपूर्ण वाणीनें व संगीताच्या साहाय्यानें स्वकर्तव्याविषयीं लोकांना जागृत करावें; आणि साधुसंतांनीं हजर राहून सर्व उत्सवाला आशीर्वाद देऊन राष्ट्राच्या विचाराला व आचाराला आपल्या उपदेशानें योग्य दिशा दाखवावी, असा पूर्वीचा क्रम होता. इंग्रजी राज्य झाल्यापासून हरिदास व पुराणिक यांजकडील विचारांचे व आचारांचे प्रवर्तक हा मान निघून गेला. पुराण किंवा कीर्तन हें उपासनेच्या ठरीव कृत्यांतील एक कृत्य होऊन बसलें; पण विचारांचा खळ होऊन त्या वादविवादानुरूप विचारांचें व आचारांचें नियमन करण्याची ह्या वर्गाची सत्ता नाहींशी झाली. स्थिर व सांठलेल्या पाण्याच्या तलावासारखी त्यांची स्थिति झाली. महाराष्ट्राची साधुसंतांनीं केलेली जागृती ज्या हरिदासांच्या व पुराणिकांच्या वर्गानें एकेकाळीं कायम ठेविली व चोहोंकडे तिचा फैलाव केला, तोच वर्ग नवीन इंग्रजी परिस्थितीविषयीं अज्ञानी राहिल्यामुळें नवीन संकटाला तोंड देण्यास असमर्थ ठरला. आपल्यापाशीं काय आहे तेवढेंच माहीत असून कोणच्याहि युद्धांत चालत नाहीं. स्वतःच्या पक्षाविषयींची जशी पूर्ण माहिती असावी लागते, त्याप्रमाणें शत्रूच्या बलाबलाविषयींहि पूर्ण ज्ञान असावें लागतें; एरव्हीं नेतेपणाचा मान टिकत नाहीं. आमचे हरिदास व पुराणिक पालटलेल्या स्थितीच्या बलाबलाविषयीं माहीतगार नसल्यामुळें त्यांचीं कामें कार्यक्षम राहिलीं नाहींत, ह्यामुळें देशांतील निरनिराळ्या चळवळींची व धर्मकृत्यांची फारकत होऊं लागली.

ही स्थिति बदलून निरनिराळ्या चळवळींना धर्माचा पाठिंबा मिळविण्याचा उद्योग गेलीं पंधरा वर्षे श्रीगजानन महोत्सवानें आपल्या अंगावर घेतला. ह्या कामीं ह्या उत्सवास मोठें यश प्राप्त झालें असून गेल्या पंधरा वर्षांत ह्यासंबंधाचें महाराष्ट्राचें औदासिन्य नाहींसें झालें आहे. इंग्रजी शिकलेल्या वक्त्यांची विचारसरणी व माहिती आतां हरिदास-पुराणिकांनीं उचललेली आहे, व पूर्वीची धर्मश्रद्धा नवीन मंडळींत दिसूं लागली आहे. नवरात्र, दसरा, दिवाळी, कृष्णाष्टमी, रामनवमी, दासनवमी, आषाढी-कार्तिकेच्या पंढरपूरच्या यात्रा, श्रीशंकराचार्य-महोत्सव वगैरे सर्व धर्मोत्सव व सण आतां नवीन राष्ट्रीय प्रेरणेनें व्यापून टाकलेले आहेत. ' आदौ गणपतिपूजन ' अशा रीतीनें झाल्यानंतर इतर देवतांच्या पूजेअर्चेच्या प्रसंगींहि धर्मश्रद्धेनें आपली धाकटी बहीण स्वदेशभक्ती ही जर सदोदित बरोबर ठेविली, तर त्यांत नवल काय ? जो प्रकार पूर्वी होत होता, जो प्रकार मध्यंतरीं बंद पडला होता, व जो प्रकार हल्लीं व्हावयास पाहिजे होता, तोच प्रकार श्रीगजानन महोत्सवानें घडवून आणला. हा प्रकार योग्य होता व आहे. ह्याविषयीं कोणास पुरावा पाहिजे असल्यास हा प्रकार इतर सर्व तऱ्हेच्या धार्मिक प्रसंगीं त्या प्रसंगांच्या चालकांनीं आपण होऊन आतां सुरू केलेला आहे, ह्या गोष्टीकडे त्यानें लक्ष पुरवावें. धर्म व राष्ट्र ह्यांची सांगड घालण्याचे हे प्रसंग राजकाजाचे ( Political ) बिलकूल नसल्यामुळें राज-पुरुष किंवा कायदा ह्या उत्सवाच्या आड येऊं शकत नाहीं. धर्माच्या सूक्ष्म तत्त्वांचा, भगवद्भक्तीचा व राष्ट्रीय जागृतीच्या निरनिराळ्या स्वरूपांतील सामान्य विचारांचा खल असल्या उत्सवांतील मेळ्यांतून, पुराणांतून, कीर्तनांतून किंवा व्याख्यानांतून होत असल्यामुळें राजकीय चळवळीवरील अधिकाऱ्यांच्या नजरेची भीति असल्या उत्सवांनीं बाळगण्याचें कारण नाहीं. हे उत्सव धार्मिक व राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळाच होत; ह्या शाळांतून शिकून

तयार झालेल्यांपैकीं कांहींवर सरकारची जरी गैरमर्जी झालेली असली, तरी सांप्रतच्या कायद्यांनीं ह्या शाळा बंद करतां येत नाहींत व सरकारची तशी इच्छाहि नाहीं. अशा स्थितींत मुंबई व पुणें येथील सार्वजनिक उत्सव-वाल्यांनीं व मेळेवाल्यांनीं सालाबादप्रमाणें मेळे, व्याख्यानें, मिरवणूक वगैरे सर्व तऱ्हांनीं उत्सव साजरा करण्याचा ठराव केला आहे, हें आमच्या वाचकांस कळविण्यास आम्हांस संतोष वाटतो. पुणें-मुंबईप्रमाणें इतर ठिकाणींहि हा उत्सव दरसालप्रमाणें पार पाडण्यांत हयगय होणार नाहीं, अशी आम्हांस उमेद आहे.

# * सर्वांत पुढें मुंबईच कां ?

## नंबर १

लो. टिळक ह्यांना शिक्षा झाल्यानंतर त्यांजविषयीं चोहोंकडे सहानुभूति प्रदर्शित करण्यांत आली. पण ह्या बाबींत विशेष कळकळ मुंबई शहरानेंच दाखविली, व सर्वांत मागासलेले लोक पुण्यांत रहातात, असें ठरलें. लो. टिळक यांजवरील खटल्याचा विचार पिनल कोडाचे दृष्टीनें करावयाचा नसून मुत्सद्यांचे दृष्टीनें करावयाचा आहे. अशा दृष्टीनें विचार करून सामान्य जनसमूहाचें मत असें झालें आहे कीं, स्वराज्याचे (Constitutional) हक्क मागण्याविषयीं जी चळवळ हिंदुस्थानभर चालली आहे तिला आळा घालण्याकरितां हा खटला करण्यांत आला. तशी स्थिति असल्यामुळें ह्या खटल्यांत झालेल्या शिक्षेबद्दल जितक्या तीव्रपणानें निषेध प्रदर्शित करतां येईल तितक्या तीव्रपणानें आपला संताप व्यक्त करणें लोकांचें कर्तव्य होतें. लोकांची ही चळवळ आहे, एका व्यक्तीची नव्हे. एका व्यक्तीवरील खटल्याचे रूपानें ती विकोपास गेली, इतकेंच. अशा रीतीनें लोकांच्या चळवळीला, गैरसमजानें म्हणा किंवा इतर कारणानें म्हणा, अडथळा झाला असतांना त्या अडथळ्यामुळें लोकांना येणाऱ्या रागावरून चळवळीवरील लोकांच्या श्रद्धेची किंमत ठरविण्यांत येते. प्रेमाला अडथळा आला असतांना विरहाग्नि कितपत पेटतो ह्यावरून प्रेमाची पारख करितात. लो. टिळक ह्यांना शिक्षा झाल्यानंतर त्यांनीं चालविलेल्या चळवळीवरील लोकांचें प्रेम कसोटीस लागण्याची वेळ आली. ह्यावेळीं मुंबईच्या लोकांनीं निषेध प्रदर्शित करण्याचे कामीं जितका हट्ट दाखविला तितका दुसरे कोणीहि दाखविला

---

* केसरी, ता. २२ सप्टेंबर १९०८

नाहीं. दंगा करण्याचा हेतु मुंबईच्या लोकांचा बिल्कुल नव्हता, त्यांच्या संतापाच्या तीव्रतेस पोलिसकडून अडथळा झाल्यामुळें दंगा झाला. स्वराज्याचे हक्काबद्दलच्या चळवळीवर प्रेम दाखवितांना दंगाधोपा करण्याचा हेतु असणें बिलकुल जरूर नाहीं. अशा प्रकारचा हेतु मुंबईचाच नव्हे तर दुसऱ्या कोणाचाहि नव्हता. कांहीं लोकांच्या चिथावणीवरून मुंबईकरांनीं हा दंगा केला, असें कोणी खुशाल म्हणोत. वस्तुस्थिति तशी नव्हती. मुंबईच्या लोकांना कोणी चिथावलें नाहीं; मुंबईच्या लोकांनीं जें काय केलें तें सहज-स्फूर्तीनें केलें. ही स्फूर्ति मुंबईस कोठून आली ? लो. टिळक ह्यांच्या शेवटच्या उद्गारांची प्रतीति मुंबई शहरानेंच ताबडतोब कां दाखवावी ? मुंबईचा दंगा होऊन आतां बरेच आठवडे झाले आहेत, व शांत रीतीनें वरील गोष्टीकडे लक्ष पोंचवण्याचा आतां समय झाला आहे. म्हणून 'सर्वांत पुढें मुंबईच कां?' ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याचें आम्हीं योजिलें आहे. लो. टिळक यांजवर खटला चालला असतांना व खटल्याचा निकाल लागल्यावर मुंबई शहरानें जें वर्तन केलें त्यावरून एवढी गोष्ट सिद्ध होते कीं, अधिकाऱ्यांच्या वेसणींत मुंबई सांपडलेली नाहीं. मुंबईकरांनीं दंगा केला असतांना तो दंगा शमविण्याचें सामर्थ्य सरकारांत नाहीं किंवा सरकारच्या सत्तेच्या विरुद्ध मुंबईकर जाऊं शकतात, अशांतला अर्थ नाहीं. सरकारची सत्ता व सरकारचें सामर्थ्य ह्याबद्दल वाद नाहीं; पण अधिकाऱ्यांच्या केवळ इच्छेप्रमाणें मुंबई शहराच्या हालचाली होत नाहींत ह्या स्थितीचा अधिक स्पष्ट खुलासा आपण करूं या. आतां अशी कल्पना करूं कीं, लो. टिळक ह्यांना शिक्षा झाली ही बातमी ऐकल्यावर लोक हळहळणार हें एका जिल्ह्याचें अधिकाऱ्यांना माहीत होतें, व हें दुःख अमुक सीमेच्या पलीकडे जाऊं द्यावयाचें नाहीं असा त्यांनीं मनाशीं संकल्प केला होता. हा त्यांचा संकल्प कायदेशीर असेल; किंवा बेकायदेशीर असेल, मुत्सद्दीपणाचा असेल किंवा गैरमुत्सद्दीपणाचा असेल,

व्यवहारदृष्ट्या योग्य असेल किंवा अयोग्य असेल; कसाहि असला तरी केवळ इच्छामात्रेंकरून म्हणजे खटले न करतां, किंवा लोकांच्या अंगावर पोलिस न सोडतां, किंवा लष्कराचा उपयोग न करतां प्रत्यक्ष सत्ता एका बाजूस ठेऊन केवळ इभ्रतीच्या व वजनाच्या जोरावर जर त्यांना आपल्या संकल्पाप्रमाणें लोकांना वागवितां आलें, तर त्या अधिकाऱ्यांच्या लगामी लोक आहेत, असें समजावें. हा प्रश्न अधिकाराचा नाहीं, सत्तेच्या कसोटीचा हा वाद नव्हे, किंवा सामर्थ्य कोणाचें आहे हेंहि ह्या लगामानें ठरवावयाचें नाहीं. हा प्रश्न अधिकाऱ्यांच्या वजनाचा आहे. मुंबई शहर अधिकाऱ्यांच्या वेसणींत नाहीं, ह्याचा अर्थ इतकाच कीं शहराच्या स्थानिक अधिकाऱ्यांचें वजन लोकांवर जितकें आहेसें वाटत होतें तितकें नाहीं. मुंबईच्या करारी स्वभावानें सरकारच्या सत्तेला ओहोटी लागली नाहीं किंवा लष्करी सामर्थ्यालाहि कमीपणा आला नाहीं, पण मुंबईच्या पोलिस कमिशनरच्या इभ्रतीला बट्टा लागला. नेक ना. गव्हर्नरसाहेब तावडतोब मुंबईस गेले, जखमी झालेल्या कामकऱ्यांबद्दल त्यांनीं सहानुभूति दाखविली, गोळी लागलेल्या मुलीस साडी दिली व बऱ्याच लोकांच्या शिक्षा कमी करून मुंबईच्या मॅजिस्ट्रेटांना व जज्जांना तारतम्यज्ञान त्यांनीं शिकविलें. ह्या सर्व गोष्टी गव्हर्नरसाहेबांच्या चांगुलपणाच्या आहेत. पण स्थानिक अधिकाऱ्यांची किंमत लोकांत फारशी नाहीं, हें सिद्ध होण्यास त्यामुळें बाध येत नाहीं. या ठिकाणीं असा प्रश्न उपस्थित होतो कीं, स्थानिक अधिकाऱ्यांना असावी तशी बुद्धि नाहीं म्हणून अशी स्थिति झाली, का त्यांच्या हातांत भरपूर अधिकार नव्हता म्हणून त्यांची अशी दुर्दशा झाली, का फाजील मिजास व आळस वाढल्यामुळें ते आपल्या कामाची हेळसांड करूं लागले, किंवा एवढ्या मोठ्या शहरांत थयथय एकसारखें नाचण्याइतकी तडफ त्यांच्या अंगीं नाहीं म्हणून मुंबई शहर त्यांना आवरेना, का ह्या

लोकांना रुचतील व सरकारला पचतील अशा लहान लहान गोष्टी तत्काळ लक्षांत घेऊन त्या लोकांना देऊन प्रजाजनांच्या मनोवृत्ति तेवढ्यापुरत्या तरी खुलविण्याची हातोटी मुंबईच्या अधिकाऱ्यांच्या जवळ नसल्यामुळें लोकांवर त्यांचा दाब बसेना, झालें तरी काय ? मुंबई शहरांत अधिकारी फिके पडण्याचें कारण वरीलपैकीं एकहि नाहीं हें आम्हीं प्रांजलपणें कबूल करतों. बुद्धिमत्तेंत, हुषारींत, तडफेंत व सहानुभूतींत मुंबईचे पोलिस कमिशनर इतर ठिकाणच्या नामांकित अधिकाऱ्यांहून किमपीहि कमी दर्जाचे नाहींत. मग मुंबईस ते निस्तेज कां पडले, काळवंडल्यासारखी त्यांची इभ्रत कां झाली ? लो. टिळक ह्यांजवर जसा खटला झाला त्याप्रमाणें पंजाबांत लाला लजपतराय ह्यांजवरहि आपत्ति आली. त्यावेळीं रावळपिंडीस खटल्यांची मालिकाच लागली होती. अधिकाऱ्यांचें हें उग्र स्वरूप पाहिल्याबरोबर सर्व पंजाब भयभीत होऊन गेलें व लाहोरास तर, माझ्या नाकांत वेसण घाला म्हणून प्रतिष्ठित लोक अधिकाऱ्यांच्या बंगल्यावर हेलपाटे घालूं लागले ! लाहोरच्या लोकांच्या नाकांना भोकें कशीं पडलीं व प्रतिष्ठित नेमस्तांत नाक टोंचलेले पुरुष कसे पहावयास सांपडतात, ह्यासंबंधाची दुःखदायक कहाणी लालाजींनीं आपल्या पत्रांत लिहिलीच आहे. दडपशाहीचा पंजाबांत परिणाम व्हावा व मुंबईस दडपशाही गैरमुत्सद्दीपणाची आहे हें अधिकाऱ्यांच्या निदर्शनास यावें, असा फरक कां ? बिहारच्या लोकांनीं राजनिष्ठेचा जाहीर-नामा काढावा, कलकत्त्याच्या काली—घाटाच्या पुजाऱ्यांनीं कालीच्या पूजेऐवजीं अधिकाऱ्यांच्या सत्तेची पूजा करण्याचें निमूटपणें कबूल करावें, पंजाबच्या हिंदूंनीं, मुसलमानांनीं राजनिष्ठेचीं जाहीर पत्रकें अधिक जलद कोण काढतो ह्याबाबतींत शर्यत लावावी, आणि राजनिष्ठा दाखविण्याबद्दल मुंबई शहराला चुचकारतां चुचकारतां अँग्लो—इंडियन पत्रकारांना पुरेवाट व्हावी, असा फरक कां ? पिंड देणाऱ्यांपुढें 'मदनोदर' दाखविणाऱ्या

कुत्र्यासारखी लाहोरची स्थिति पंजाबच्या नेमस्तांनीं करावी आणि 'हां हां' 'धीरे धीरे' अशी हांजी हांजी करून घेऊन एक एक घांस गंभीरपणें खाणाऱ्या 'गजपुंगवा'प्रमाणें मुंबई शहरानें धीरोदात्त वर्तन ह्या प्रसंगीं करावें, असा भेद कां झाला? लो. टिळक पुण्याचे रहाणारे, त्यांचें 'केसरी' पत्र पुण्यास निघतें व लोकमान्यांच्या इष्टमित्रांचा मोठा समूह पुण्यासच; असें असून इतर जिल्हा–शहरांइतकेंहि दुःख पुण्यास प्रदर्शित करतां आलें नाहीं. लाहोरच्या इतकी नाहीं तरी लाहोरच्या जवळ जवळच चहाडखोरांची चळवळ पुण्यास सुरू होऊन प्रत्येकाच्या मनाला अत्यंत वाईट वाटत होतें तरी आपलें दुःख मनच्येमनांत गिळून अधिकाऱ्यांच्या रोषाचे भीतीनें जो तो घरच्याघरीं स्वस्थ बसला व 'पुणें गप्प कां' असें अँग्लो–इंडियन समाजाला एक मोठें कोडें पडलें! ज्वालामुखीचा स्फोट होण्यापूर्वी जशी तेथें शांतता नांदत असते, तशाच प्रकारची ही स्तब्धता आहे अशी चहाडखोरांनीं अधिकाऱ्यांची समजूत करून दिली व ह्या ज्वालामुखींत आमचें अंग नाहीं अशी अधिकाऱ्यांची खात्री पटविण्याच्या उद्योगाला जो तो लागला! पुणें कांहीं भयंकर गोष्ट गुप्तपणानें करीत आहे, असा ग्रह इंग्लंडांतील अँग्लो–इंडियनांनींहि आपल्या मनाचा करून घेतला; व परवां कलकत्त्यास अलिपूरचे तुरुंगांत नरेंद्र गोस्वामींचा खून दत्त व बोस ह्यांनीं केल्याची बातमी जेव्हां इंग्लंडांत पसरली तेव्हां पुण्यानें आपलें एकदांचें भयंकर कृत्य उरकून घेतलें, असें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करून इंग्लंडांतील कांहीं अँग्लो–इंडियनांनीं आपलीं मनें शांत करून घेतलीं! कांहींचें म्हणणें असें पडलें कीं ज्यांच्या योगानें पुण्याच्या करारी स्वभावाचा बाहेर एवढा गवगवा, त्यांनाच तुरुंगांत कोंडून ठेवले असल्यामुळें लो. टिळकांबरोबरच पुण्याचा करारीपणा तुरुंगांत गेला. कसेंहि असो, राजकीय चळवळीसंबंधाचा पुण्याचा हट्ट लो. टिळक व इतर पत्रकार ह्यांना शिक्षा झाल्याबरोबर ढिला पडला, ह्यांत संशय नाहीं. हा हट्ट पुन्हां जोमाचा होऊं नये म्हणून गुप्त भयंकर कृत्यांची धडपड

...सार्वजनिक वाचनालय, सातारा.



पुण्याचे गळयांत घालण्यांत आली आहे. चहाडखोरांवर विश्वास ठेऊन अधिकारी कसे चुकले गेले आहेत, वगैरे वादाचा ह्या लेखाशीं संबंध नाहीं. एवढी गोष्ट खरी कीं, सभेचें नांव ऐकलें म्हणजे कांहीं लोक आजारी पडूं लागले असून कांहीं नाक धरून परमेश्वराची आराधना करूं लागले आहेत. राजकीय चळवळीची लोकांना अलीकडे पुणें शहरांत धास्तीच वाटते. कोणाला तरुणपणीं सुखसंपत्तीपासून कसा विन्मुख होऊं, ह्या वयांत सुख नाहीं भोगावयाचें तर भोगावयाचें केव्हां, असें होऊन जातें; तर कोणाला म्हातारपणीं इतकीं वर्षे आरामांत काढलीं आतां शेवटचे दोन दिवस कसे कमी आरामांत काढूं अशी भीति वाटते; कोणी आप्तेष्टांच्या नोकरीसाठीं, कोणी काका मामाच्या पेन्शनसाठीं, कोणी शेजाऱ्याच्या इनामासाठीं तर कोणी आळींतील सरदाराच्या सरदारकीसाठीं, अशा रीतीनें प्रत्येक मनुष्य अधिकाऱ्यांच्या गैरमर्जीचा बाऊ करून पुण्यास बसला आहे. आपल्याच पावलाच्या आवाजानें भिऊन अधिकाऱ्यांचें भूत मागें लागलें म्हणणाऱ्या ह्या बहुजनसमाजाशिवाय अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष मर्जी संपादण्याकरितां लाहोरप्रमाणें अधिकाऱ्यांच्या बंगल्यावर हेलपाटे घालणाऱ्यांचा येथेंहि एक मोठा वर्ग आहेच. पुणें शहर महाराष्ट्राचें विद्यापीठ, पुणें शहर सर्व महाराष्ट्राला नवीन विचार व नवीन वळण लावण्याकरितां निर्माण झालेलें, पुणें शहरापासून सर्व चळवळींचा उगम, अशी पुण्याची ख्याती असतांना पुण्याचेहि पुढें मुंबई शहर कां ? पंजाबच्या कणखरपणाबद्दल केवढा बाहेर दबदबा, पण पाऊस पडतांच शेगामातींचीं घरें वाहून जाऊन लहान मुलांच्या गोष्टींतील चिमण्यांच्या मऊ मेणाच्या घराशिवाय आश्रयाची जागा पंजाबांत राहूं नये व पंजाबला भिऊन लालाजींस परदेशीं जावें लागावें हें आश्चर्य नव्हे काय ? हा नेमस्तांचा काळ आहे, व ह्या काळाचा महिमा असाच असावयाचा. मद्रासेस पहा, कलकत्त्यास जा, लाहोरास निरीक्षण करा किंवा पुण्याची परीक्षा घ्या, लालाजींनीं वर्णिलेल्या काळाचा महिमा चोहोंकडे

पहावयास मिळतो. ह्या महिन्याचे तडाख्यांतून कोणचेंच शहर सुटलेलें नाहीं. जिंकलेल्या देशाचा हा सहज दुर्गुण आहे ! नेमस्तांचे पांघरुणाखालीं चहाडखोरांचा धंदा आज नव्यानें सुरू झालेला नाहीं. "रिप्रेझेंटेटिव्ह इंडियन्स" ह्या पुस्तकाला प्रस्तावना लिहितांना सर रिचर्ड टेंपल ह्यांनीं आपला अनुभव असा दिला आहे कीं, सरकारच्या मेहेरनजरेंतील कांहीं पुढारी खातम्या सांगण्यांत धन्यता मानतात ! अधिकाऱ्यांची मेहेरनजर संपादण्याकरितां जेथें अशी अहमहमिका चालू असते तेथें अधिकाऱ्यांच्या वक्र दृष्टींतून सुटून जाण्याकरतां विशेष खटपट करण्यांत आल्यास नवल नाहीं. जी अधोगति मद्रासेस दृष्टीस पडते, जी अधोगति पुण्यास वावरते, जी अधोगति लाहोरास नाचते ती अधोगति मुंबईस कां नसावी ? राजकीय चळवळीच्या जोमासंबंधानें मुंबईतील कामकऱ्यांनीं, मुंबईतील गुजराथी व्यापाऱ्यांनीं व उद्योगधंदेवाल्यांनीं इतरांच्या पुढें कां असावें ? अधिकारी म्हणतात, मुंबई शहर खरोखर पुढें गेलेलें नाहीं, कांहीं उपद्व्यापी लोकांच्या चिथावणीनें मुंबईनें हट्ट दाखविला इतकेंच. इतर शहरांसंबंधानें अधिकाऱ्यांचें मत पडतें, खरी चळवळ ह्या शहरांत नव्हतीच; तेव्हां चळवळखोर पुढाऱ्यांना दूर करण्यावरोबर ह्या शहरांचें मिळमिळीत स्वरूप दृष्टीस पडल्यास नवल नाहीं. सर्वांच्यापुढें मुंबई शहर गेलें तें कांहीं चळवळ्यांच्या चिथावणीनें गेलें, ह्या कार्यकारणभावानें मनाचें समाधान होत नाहीं. इतर ठिकाणची चळवळ तुरुंगांत गेलेल्या पुढाऱ्यांखेरीज इतर लोकांत नव्हती, हेंहि मत आम्हांस संमत नाहीं. लो. टिळक यांनीं सुरू केलेल्या चळवळींची पाळेंमुळें मुंबईपेक्षां इतर ठिकाणीं अधिक खोल गेलेलीं आहेत, व मुंबईस आतां कोठें ह्या चळवळींना आश्रय मिळाला आहे, असें आमचें मत आहे. मग इतरांच्या पुढें मुंबई कां ? ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यास पुढील खेपेस प्रारंभ करूं.

# * सर्वांत पुढें मुंबईच कां ?

नंबर २

दोन तीन वर्षांपूर्वी स्वदेशी चळवळीच्या नवीन अवतारास जेव्हां सुरवात झाली तेव्हां स्वदेशीच्या निरनिराळ्या स्वरूपांची चर्चा पुण्यास जितकी झाली तितकी दुसऱ्या कोणच्याहि ठिकाणीं झाली नाहीं आणि आज मितीसहि स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ह्यांसंबंधाच्या कलकत्त्याच्या कॉंग्रेसच्या चार ठरावांचें महत्त्व पुण्यास जितकें समजतें तितकें दुसरे कोणासहि समजत नाहीं. द्रव्यार्जनासाठीं सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत नखशिखांत घामाच्या धारा वाहविणाऱ्या कष्टांत रुतलेल्या मुंबईच्या बंदरांतील घाटी मोठमोठीं ओझीं उचलत असतांना अभंगाच्या रूपानें वेदांतील अत्यंत श्रेष्ठ प्रमेयें उच्चारतांना पाहून जसें कित्येकांना अत्यंत आश्चर्य वाटतें, त्याप्रमाणें पुण्यांतहि पोलिसच्या राजकीय गुप्त खात्यांत गुंतलेला डिटेक्टिव्ह अधिकाऱ्यांना रुचेल व लोकाग्रणी पैचांत येतील असा रिपोर्ट प्रसवत असतांना टिळकांचें धोरण चांगलें का, मेथाजींची विचार-सरणी विशेष पसन्त का, ह्यासंबंधाचा कडाक्याचा वाद करून राष्ट्रीय पक्षाचीं उच्चतम तत्त्वें खवळलेल्या मनोविकारांच्या जोरदार व स्पष्ट भाषेंत मांडीत असतो ! स्वदेशीचीं सर्वांगें पुण्यांतील हरएक दर्जाच्या व प्रकारच्या नोकरांस माहीत आहेत. लो. टिळक ह्यांनीं कोणच्या वेळीं कोणची कोटी केली, राष्ट्रीय पक्षाच्या वर्तमानपत्रांतून कोणच्या प्रसंगीं कोणत्या मतांचें खंडन किंवा मंडन करण्यांत आलें, राष्ट्रीय पक्षांतील लोक कशा कशा हालअपेष्टा सोशीत आहेत याचा साद्यंत वृत्तांत जर ऐकावयाचा असला

* केसरी—२९ सप्टेंबर १९०८

तर लोकांच्याविरुद्ध समजल्या गेलेल्या एखाद्या खात्यांतील सर्वांत खालच्या चपराशाची किंवा कारकुनाची गांठ अवश्य घ्यावी. पुण्यास विचारक्रांति फारच झपाट्यानें झाली आहे, पण ते विचार आचारांत अद्याप उतरावयास पाहिजेत तितके उतरलेले नाहींत. नाशीकचा मनुष्य पुण्यास आला म्हणजे म्हणतो, अहो, स्वदेशी चळवळींत नाशीक पुण्याचे पुढें फार गेलेलें, पुण्यास आहे काय? नाशीकच्यासारखा स्वदेशीसंबंधानें उत्साह पुण्यास नाहीं, परदेशी कपड्यास उत्तेजन देणारा गृहस्थ नाशकास मिळावयाचा नाहीं व परदेशी साखर खाणारा भिक्षुक नाशकास आढळावयाचा नाहीं. स्वदेशीचीं मूळ तत्त्वें नीट समजल्यामुळें सैय्यद हैदर रेझा ह्यांच्यासारख्या मुसलमानांनाहि श्रीगणेशोत्सवांत श्रीगजाननापुढें व्याख्यानास उत्सुकतेनें आमंत्रण देणारे क्षेत्रस्थ धर्माभिमानी जर कोठें असतील तर ते श्रीप्रभू रामचंद्राच्या व सीतादेवीच्या पदचिन्हांनीं सुशोभित झालेल्या आणि श्रीगोदावरीच्या पुण्योदकानें पवित्र झालेल्या नाशीकच्या पुण्य भूमींतच. वाईचे लोक म्हणतात, निर्भीड स्पष्टवक्तेपणा जर कोठें असेल तर वाईसच. हरएक राष्ट्रीय चळवळीला वाईनें जितका पाठिंबा दिला आहे तितका दुसऱ्या कोणच्याहि गांवानें दिला नाहीं. चळवळीच्या कामांत वाई सातारा जिल्ह्याचें नाक असून वाईनें जर आपली चळवळ बंद पाडली तर सातारा जिल्हा तेव्हांच नकटा दिसेल! बेळगांवकर म्हणतात, वाईची कसली चळवळ घेऊन बसलां आहांत? स्वदेशी व मद्यपान-निषेध यासंबंधानें जर कोणी आघाडी मारली असेल तर ती बेळगांवनेंच. सोलापूरचें ह्यावर उत्तर पडतें, "स्वराज्य" पत्राचे रो. लिमये व रो. सायन्न ह्यांच्यासारखे आनंदानें तुरुंगांत जाणारे देशभक्त बेळगांवानें कोठें निर्माण केले आहेत? स्थानिक अधिकाऱ्यांच्या वेसणींत गोवून न घेणारे असेसर्स जर कोठें असतील तर ते सोलापुरास. इतर ठिकाणचे शहाणे-सुर्ते लोक अमक्या तमक्या खटल्यांत

आम्ही ज्युरर्स किंवा असेसर्स असतों तर आरोपी दोषी आहे असाच निकाल दिला असता, अशाच प्रकारचीं आपलीं मतें अधिकाऱ्यांच्या कानांवर जाऊन आपोआप आदळतील इतक्या मोठयानें बोलण्याची जर काळजी घेत असतात तर निस्पृह व निर्भीड असेसर्स सोलापुरांत आहेत म्हणून सोलापूरची वाहवा नको का करावयाला ? मध्यप्रांत म्हणतो, वऱ्हाड-नागपूर ह्या कामीं मागासलेला प्रांत आहे, असें समजूं नका. अकोला, उमरावती, यवतमाळ व नागपूर ह्यांसारखीं कमिशनरी अमलांतहि राष्ट्रीय चळवळींना एक प्रकारच्या चिकाटीनें चिकटून रहाणारीं शहरें महाराष्ट्रांत इतर ठिकाणीं आहेत काय ? वाई व नाशीक ह्यांसारखीं पुण्य क्षेत्रें इतरांच्या पुढें कां ? बेळगांव व सोलापूर हीं शहरें इतर जिल्ह्यांच्या ठिकाणांइतकीं कां मागासलेलीं नाहींत ? वऱ्हाड व नागपूर ह्या प्रदेशांत विशेष चिकाटी ह्याप्रसंगीं कां दिसावी ? आणि सर्वांच्या पुढें मुंबईच कां ?

मुंबईतल्या मुंबईतच पुष्कळ प्रकार आहेत. गुजराथी समाजानें जें तेज दाखविलें तें इतरांनीं दाखविलें नाहीं; गिरणींतील कामकऱ्यांनीं जो हट्ट दाखविला तो इतरांनीं दाखविला नाहीं, व गिरगांवांतील पांढरपेशांचा वर्ग पुण्याप्रमाणेंच मागासलेला ! यांनीं दंग्याचें अनुकरण करावयाचें होतें, असें आमचें बिलकूल म्हणणें नाहीं. दंग्याचा गर्हणीय भाग एका बाजूस ठेवा, पण कामकऱ्यांचा हट्ट व गुजराथ्यांची कळकळ ह्या पांढरपेशांनीं कां दाखवूं नये ? ह्या राजकीय चळवळीच्या पंक्तींतलेच हे नव्हेत असें म्हणावें, तर त्यांच्याच बायका लो. टिळक यांजविषयींची सहानुभूतीची सभा भरवितात. सौ. सरलादेवी ह्यांच्या आगमनानें मुंबईच्या बायकांत विचारक्रांति झाली, असें समजावयाचें कीं काय ? मुंबईच्या आमच्या भगिनींसंबंधानें आमचें इतकें अनुदार मत नाहीं कीं, बंगालच्याच एका विदुषीनें शिकविल्याशिवाय त्यांना ह्या गोष्टी समजत नाहींत. तेव्हां मुंबईच्या मागासलेल्या

भागासंबंधानें विचार करतांना हीहि गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं, मुंबईच्या पुरुषांहून मुंबईच्या बायका स्वदेशीसंबंधानें व राजकीय चळवळी-संबंधानें अधिक हट्टी आहेत. पुण्या–मुंबईच्या ह्या मागासलेल्या लोकांच्या बुद्धीची तरतरी व त्यांच्या बायकांची ही विचारसरणी, त्यांच्यांत प्रचलित असलेली ती विचारक्रांति आणि त्यांनीं पत्करलेलें हें मौनव्रत, ह्या सर्वांचा विचार करून अधिकाऱ्यांनीं असें अनुमान काढलें आहे कीं, "न धरीं शस्त्र करीं मी, गोष्टी सांगेन युक्तिच्या चार" अशा तऱ्हेची कृष्णवृत्ति ह्या शिकल्या सवरलेल्या महाराष्ट्रीयांनीं स्वीकारून अडाणी कामकऱ्यांना व दयाळू गुजराथ्यांना भयंकर अन्यायाच्या कहाणीनें चिथवून सोडलें! मागासलेल्या सुशिक्षितांवर असला आरोप करण्यास अधिकाऱ्यांजवळ चांगला पुरावा आहे असें कांहीं लोक म्हणतात, पण तसाच पुरावा असता तर तो एव्हांना पुढें आला असता. कसेंहि असो, पुढें न करण्यासारखा तो पुरावा असला पाहिजे, एवढें खास. प्रत्यक्ष पुरावा जरी एका बाजूला ठेवला तरी एक तऱ्हेच्या अनुमानानें स्थापिलेल्या कृष्णवृत्तीची विल्हेवाट कशी लावायची? असें कोणालाहि म्हणतां यावयाचें नाहीं, कीं सांप्रतच्या निरनिराळ्या चळवळींसंबंधाच्या विचारांचे आवारांत पुण्यामुंबईच्या महाराष्ट्रीय पांढरपेशांचा समाज मागासलेला आहे. हा समाज विचारांत मुंबई इलाख्यांत सर्वांच्या पुढें गेलेला, पण कृतींत मात्र अशिक्षित कामकऱ्यांहून व मागें पडलेले म्हणून समजल्या जाणाऱ्या गुजराथ्यांहूनहि फार मागासलेला आहे. असें जर आहे तर ह्या भित्र्यांनीं इतर साळसूद माणसांना चिथविलें असें अधिकाऱ्यांनीं कां म्हणूं नये? अधिकाऱ्यांचें हें अनुमान वरवर विचार करणारास ठीक दिसतें, पण जरा खोल विचार केला म्हणजे त्यांतील खोलपणा तेव्हांच लक्षांत येतो. स्वराज्याच्या (Constitution) हक्कासंबंधाच्या चळवळीचें एक मुख्य तत्त्व असें आहे

कीं, यासंबंधाचे विचार राष्ट्रांत कोठून व कसेहि आलेले असोत समाजाची त्यासंबंधाची उत्कट इच्छा, ज्या ठिकाणीं अधिकाऱ्यांना सर्वांत कमी अडथळा करतां येत असेल, अशाच ठिकाणीं प्रथम प्रकट व्हावयाची. स्वदेशी व बहिष्कार ह्या चळवळीचा गेल्या दोन चार वर्षांचा जर इतिहास पाहिला तर आमच्या वरील विधानाची सत्यता वाचकांचें ध्यानांत येईल. स्वदेशी चळवळीच्या प्रारंभीं विरुद्ध पक्ष कंठरवानें सांगत असे कीं, ही पोरासोरांची चळवळ आहे. शाळांतील विद्यार्थ्यांची ही चळवळ, उनाड मुलांचा हा एक खेळ, शिक्षकांच्या शिस्तीला कंटाळलेल्या उडाणटप्पूंची ही करमणूक–स्वदेशीच्या पुढाऱ्यांच्या मागें विद्यार्थ्यांचा हा घोळका पाहून असलें शेपूट आपणांस नाहीं, म्हणून प्रो. सेल्बीसाहेब एका रिपोर्टांत पर्यायानें हळहळलेहि ! ही पोरासोरांची चळवळ, या शब्दाचा अर्थ काय ? गुप्तपणानें कोणी विद्यार्थ्यांना चेतविलें म्हणून स्वदेशी चळवळ विद्यार्थ्यांत संचारली असा का ह्याचा अर्थ करावयाचा ? अधिकाऱ्यांनीं असा अर्थ केलेला नाहीं. ज्यांच्या माथीं संसाराचा भार पडलेला नाहीं व त्यामुळें ज्यांच्या पोटाला चिमटा काढून मस्तकांतील विचारांना अधिकाऱ्यांना पसंत असलेलें वळण देतां येत नाहीं, अशाच तरुणांच्या अंतःकरणावर स्वदेशीसारख्या उदात्त कल्पनेचा पगडा बसत असतो व हेच तरुण आपआपल्या शक्तीप्रमाणें योग्य ती कृती करण्यास प्रारंभ करतात. दैत्यांत "हरिनामा"ची कृति प्रथम प्रल्हादानेंच केली. हरिनाम–संकीर्तनाचा महिमा जर परमेश्वरी प्रेरणेनें कोठें प्रकट व्हावयाचा होता तर तो प्रल्हादासारख्या विद्यार्थ्यांत कां ? वयोवृद्ध हिरण्यकश्यपूंत कां प्रकट झाला नाहीं ? प्रल्हादांत हा महिमा प्रकट होणें सुगम होतें. कठोर वृत्तीच्या बनलेल्या हिरण्यकश्यपूंत असल्या प्रादुर्भावास तामसी दुर्गुणांचा फार मोठा अडथळा होता. सुलभ मार्गानें जाण्याची प्रवृत्ति देवादिकांपासूनच मनुष्यप्राणी शिकला आहे. तामसी दुर्गुणांविरुद्ध

चळवळ करणें जेथें सर्वांत सोपें आहे तेथेंच देव प्रथम काम करण्यास सुरवात करतो. स्वदेशी चळवळ ही प्रारंभीं प्रारंभीं पोरासोरांची चळवळ होती, ह्याचा अर्थ काय? ह्याचा अर्थ असा आहे कीं, ज्या समाजांत ही चळवळ प्रथम सुरू झाली त्या समाजांत अधिकाऱ्यांच्या वेसणींत नसलेले लोक तरुण विद्यार्थ्यांशिवाय फार थोडे होते; आणि ज्या ठिकाणीं दुर्गुणांचा सर्वांत कमी अडथळा त्या ठिकाणीं सद्गुण प्रथम उदयास येतो, ह्या न्यायानें विद्यार्थी वर्गांत ह्या चळवळीची कृति प्रथम प्रकट झाली. अधिकाऱ्यांना ह्या गोष्टी समजत नाहींत असें नाहीं. अधिकाऱ्यांनीं असाच अर्थ ह्या चळवळीचा केला व रिस्ले सर्क्युलरसारखीं सर्क्युलरें काढून शाळामास्तरें मुलांवर सोडण्यांत आलीं!

विद्यार्थ्यांना आळा घालण्याचा प्रयत्न सांप्रत जोरावला असून समाजाच्या मनोवृत्ति दुसऱ्या मार्गानें प्रकट होऊं लागल्या आहेत. आतां विद्यार्थ्यांच्या सभा मागें पडून बायकांच्या सभा पुढें येऊं लागल्या आहेत. मुंबईतील बायकांच्या सभेचा अर्थ काय? पुढें न येऊं इच्छिणाऱ्या भ्याड पुरुषांच्या चिथावणीनें ही सभा भरली, असा का ह्या सभेचा अर्थ करावयाचा? अधिकारी कदाचित् म्हणतील, अंधारांत राहून इतरांना चिथविणाऱ्या लुच्च्या लोकांचें हें कार्य आहे. म्हणणारे खुशाल म्हणोत, पण आम्हांस हें म्हणणें खरें वाटत नाहीं. लो. टिळक यांजविषयींच्या सहानुभूतीची सभा मुंबईस पुरुषांनीं भरविली नाहीं व बायकांनीं भरविली ही गोष्ट खरी आहे; पण त्यामुळें पुरुषांच्या पदरीं लफंगेगिरी व बायकांच्या पदरीं अज्ञान बांधणें बरोबर होणार नाहीं. मग पुरुषांची सभा कां झाली नाहीं व बायकांचीच सभा कां झाली? लो. टिळक यांजवरील खटल्यासंबंधानें मुंबईतील पुरुषांच्या व बायकांच्या मनांत एवढें मोठें अंतर आहे काय, कीं पुरुषांना सभा नकोशी वाटावी व बायकांना सभा हवीशी वाटावी? हा मतभेदाचा प्रश्न

बिलकूल नाहीं. दोघांचींहि मतें सारखींच, किंबहुना मतासंबंधानें दोघांत गुरुशिष्याचें नातें. कोणच्याहि समाजांतील बायका त्या त्या समाजांतील पुरुषांचींच मतें उचलत असतात. मग पुरुषांची सभा कां झाली नाहीं ? अधिकारी रागावतील कीं काय, व ह्या क्रोधामुळें पोट भरण्याचे व्यवसायाला अडथळा होईल कीं काय, अशा प्रकारच्या शंकाकुशंकांच्या जाळ्यांत पुरुषांसारखे बायकांचे पाय अडकले नसल्यामुळें त्यांच्या हातून ह्या चळवळीचीं कर्मे अधिक दक्षतेनें व उत्सुकतेनें आचरलीं जाण्याचा विशेष संभव आहे. रिस्ले सर्क्युलर काढून विद्यार्थ्यांना कह्यांत ठेवण्याचा जसा प्रयत्न झाला व होत आहे, त्याप्रमाणें बायकांसंबंधानें एखादें नवीन सर्क्युलर काढून कांहीं वर्षांनीं चळवळ प्रकट होण्याचा हाहि मार्ग बंद करण्याचा उद्योग करण्यांत येईल; नाहीं कोणी म्हणावें ? पण तो प्रश्न आजचा नव्हे; कांहीं वर्षांनंतरचा आहे. ह्या गोष्टीवरून आम्हांस एवढाच सिद्धांत स्थापित करावयाचा आहे कीं, ज्या वर्गाची उदरभरणाचीं सूत्रें अधिकाऱ्यांना आपल्या मर्जीप्रमाणें हालवितां येणें नानाप्रकारच्या कारणांमुळें अशक्य असतें, तेथें स्वराज्याच्या हक्कांची चळवळ इतरांपेक्षां अधिक जोमानें प्रकट होते. वाई क्षेत्र व नाशीक क्षेत्र येथील चळवळींची मीमांसाहि ह्या तत्त्वाच्या अनुरोधानें सहज करतां येते. सामान्य अधिकाऱ्यांनीं मनांत आणलें तरी विशेष कायदा पास करवून नाशीक व वाई येथील बहुजन समाजाचा वृत्तिच्छेद ते करूं शकणार नाहींत, ही गोष्ट खरी आहे. कारण मोठ्या सरकारानें मनांत आणल्याशिवाय ह्या गोष्टी होऊं शकत नाहींत. स्थानिक अधिकाऱ्यांच्या मर्जीचा किंवा वजनाचा अथवा लौकिकाचा ह्या वृत्तिच्छेदाशीं फारसा संबंध नसतो. अशा रीतीनें वृत्तिपरंपरा बऱ्याच अंशानें अबाधित असल्यामुळें वाई–नाशीकसारख्या पुण्यक्षेत्रांतील वेदशास्त्रसंपन्न शास्त्री, पुराणिक, हरदास, पुजारी, तीर्थोपाध्याय वगैरे समाज, त्या समाजांत दृढ

झालेली कोणचीहि चळवळ प्रकट करण्यास डगमगत नाहीं. तीर्थस्थानें हीं निरनिराळ्या चळवळींचे खजिने आहेत. खजिन्यांत प्रत्येक खेड्यांतील लहान लहान रक्कम प्रथम जमते व खजिना एकदां फुगला म्हणजे सर्व देशभर तेच पैसे लोकोपयोगी कामाकरितां विशेष अधिकारानें फैलावले जातात. चळवळीचे लहान लहान भाग प्रथम क्षेत्रांत एकवटतात; चळवळ प्रथम व्यक्तिशः क्षेत्रांत प्रवेश करते; यजमानामुळें उपाध्याय प्रथम चळवळ्या होतो; आणि एकदां ह्या बहुजनसमाजाच्या चळवळीनें क्षेत्रस्थ धर्माभिमान्यांच्या मनांत पक्कें ठाणें दिलें म्हणजे क्षेत्राच्या धर्ममाहात्म्याच्या अधिकारानें ती चळवळ सर्व देशभर देशोद्धारार्थ फैलावते. क्षेत्रस्थानांनीं पदरांत घेऊन पवित्र केलेली ही चळवळ लयास जाणें शक्य नाहीं. स्वदेशी-सारख्या चळवळी वाईत व नाशकांत घुसून ठाणें देऊन बसल्या त्याचें कारण हीं क्षेत्रें चळवळीच्या जवळ असून तेथील चळवळ्यांचें उदरपोषण अधिकाऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून नाहीं, हेंच होय. ह्या सिद्धांताची सत्यता पहावयाची असल्यास श्रीक्षेत्र काशी, कलकत्त्याचा कालीघाट व पंढरपूर ह्या क्षेत्रांकडे पहावें. श्रीक्षेत्र काशी चळवळीपासून दूर आहे. संयुक्त प्रांतांत बंगाल व महाराष्ट्र ह्यांसारखी चळवळ जर सुरू होईल तर स्वदेशी चळवळींत काशी क्षेत्र दुसरें नाशीक झाल्यावांचून रहाणार नाहीं. कलकत्त्यास स्वदेशी व बहिष्कार ह्यांची चळवळ फार जोरावर असल्यामुळें पहिल्या धडकीसरशी ती चळवळ कालीच्या मंदिरांत शिरली; पण एका मंदिरावर ज्या क्षेत्राचें महत्त्व अवलंबून असतें त्या क्षेत्रांना अधिकाऱ्यांच्या मर्जीकडे न पाहून चालत नाहीं. श्रीगंगेच्या किंवा श्रीगोदावरीच्या किंवा श्रीकृष्णेच्या विस्तीर्ण प्रवाहावरच जेथें स्थान माहात्म्य अवलंबून असतें तेथें क्षेत्रस्थ विद्वानांवर किंवा तीर्थोपाध्यायांवर स्थानिक अधिकाऱ्यांची आकर्षणशक्ति फारशी चालत नाहीं. लांबलचक नदीवर आकर्षण–शक्तीचा ताबा अधि-

कार्‍यांनीं कसा चालवावा ? पण श्रीविठोबाच्या मंदिरावर उदरपोषक करणारे बडवे व पुजारी ह्यांना थोड्या अंशानें तरी अधिकार्‍यांना आपल्या कक्षेंत फिरवितां येतें. पंढरपुरास वाळवंटावर भजनी मेळ्यांत स्वदेशी चळवळ प्रकट होऊं शकते; पण बडव्यांत आणि पुजार्‍यांत ती पाय धरत नाहीं; ह्याचें कारण झालें तरी उदरपोषणाचें एके ठिकाणीं स्वातंत्र्य व दुसर्‍या ठिकाणीं उदरपोषणाला येऊं शकणारा अडथळा हेंच होय. ह्या कारणावरील दृष्टि हालविली नाहीं म्हणजे अमक्या ठिकाणीं चळवळ मागसलेली कां व तमक्या ठिकाणीं चळवळ पुढें गेलेली कां, ह्या प्रश्नाचा उलगडा नीट करतां येतो. विद्यार्थी, स्त्रीसमूह व क्षेत्रस्थानें ह्यांसंबंधाचा विचार ह्या खेपेस झाला. पुढील अंकीं बेळगांव–सोलापुरावरून जाऊन व कपाशीच्या मुलखांत थोडासा संचार करून कपाशीचें रूपांतर करणार्‍या मुंबईस पोंचण्याचा प्रयत्न करूं.

# * सर्वांत पुढें मुंबईच कां ?

## नंबर ३

अधिकाऱ्यांच्या मेहेरबानीखेरीज पोटाला मिळविण्याची धमक समाजांत नांदत असल्याशिवाय तो समाज राजकीय चळवळींत कार्यक्षम होत नाहीं. बेळगांव व सोलापूर येथील चळवळीचें स्वरूप पाहिलें म्हणजे हाच सिद्धांत मनांत ठसतो. इतर जिल्ह्यांतील चळवळीप्रमाणें स्वदेशी चळवळ वरील दोन जिल्ह्यांतहि प्रथम वकील वर्गांत व शाळा मास्तरांत होती. नवीन विचारांचा उगम नेहमीं सुशिक्षित वर्गापासूनच व्हावयाचा व ह्या सुशिक्षित वर्गांतहि जे आपल्या किंवा आपल्या संस्थेच्या रोजचे संगोपनार्थ बहुजन समाजाचे अल्पस्वल्प मदतीवरच अवलंबून आहेत, अर्थात् श्रीसमर्थांचे वचनाप्रमाणें जे 'भिक्षांदेही पक्षाचे' असून अधिकाऱ्यांच्या कह्यांत ज्यांचीं उदरनिर्वाहाचीं साधनें असूं शकत नाहींत, तेच नवीन काळाचे प्रवर्तक नेहमीं असतात. मठाधिपति भिक्षा मागून मठाचा संसार चालवीत असतो तोंपर्यंत स्वतंत्र मतांचा तेथें वास असतो. आपल्या विद्वत्तेच्या व स्वार्थ-त्यागाचे जोरावर अधिकार व संपत्ति ह्यांच्या आकर्षणाचें काम पुरें झालें म्हणजे राजा, धनाढ्य लोक व विद्वानांचा समूह ह्या तीनहि वर्गांची तोंड-मिळवणी मठांत होत असते व मठास 'भिक्षांदेही'चें प्रयोजन रहात नाहीं. जहागिरी, वर्षासनें, इनामें व देणग्या ह्यांचा वर्षाव सत्ताधिकाऱ्यांकडून मठावर होऊं लागला म्हणजे समाजाचें नवीन काळाच्या स्थापनेचें काम संपलें, आणि सत्ताधारी व मठाधिपति ह्यांमध्यें भेद उरत नाहीं. अशा-रीतीनें एकदां जहागिरी संपादन करून बसलेले मठ पुन्हां नवीन काळाची

---

* केसरी, ता. ६ ऑक्टोबर १९०८.

स्थापना करण्याचा समय प्राप्त झाला असतां निरुपयोगी होतात. जहागिरीची वेसण तोडून स्वैरसंचारानें मठाचा संसार व इभ्रत चालविण्याची धमक अंगीं असलेला कर्ता विद्वान मठाचे गादीवर बसेतों असल्या मठांचें पुनरुज्जीवन होऊं शकत नाहीं. श्रीशंकराचार्यांच्या संकेश्वराच्या मठाची झालेली तेजोहीनता व संमत असलेल्या नवीन चळवळींचा पुढाकार घेण्यासंबंधानें इतर जुन्या मठांनीं दाखविलेलें औदासिन्य, यांचा उलगडा कसा करावयाचा ? पोटाला मिळविण्याची धमक नाहीं म्हणून अशी हीन परिस्थिति होते. व्यक्ति किंवा संस्था ह्यांचा पूर्वेतिहास, सांप्रतची स्थिति व पुढील उद्देश, ह्या तीन स्थितींवर त्या त्या व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या पोटाचा घेर अवलंबून असतो व घेराप्रमाणें प्रत्येक पोटाला कमीजास्ती खाद्यपेयांची जरुरी असते. ज्या राजांनीं ह्या मठांना जहागिरी दिल्या, त्या राजांचें व ह्या मठांचें कार्य एकच असल्यामुळें ते राजे असेंपर्यन्त राजा-इतकाच बहुमान ह्या मठांना मिळत असे. मठांनीं उत्पन्न केलेला तो काळ गेला, मठांचा सन्मान करणारे ते राजे गेले; पण जहागिरी तेवढया शिल्लक राहिल्या. सद्‌गुणांचें खत म्हणून परमेश्वरानें संपत्ति उत्पन्न केली आहे. सद्‌गुण व पैसा ह्यांची एकी झाली म्हणजे नवीन काळाची स्थापना होते. एखाद्या शेतांत उत्कृष्ट बी पेरलेलें नसलें व नुसतें खत त्याठिकाणीं असलें, तर वर्षाकाळ प्राप्त झाला असतांना खताचा विनियोग पृथ्वी शस्यवती करण्याकडे न होतां मातींत लोपून असलेल्या दुर्गंधी किडयांचा सुळसुळाट चोहोंकडे करण्याकडे होतो; त्याप्रमाणें पूर्वीची कर्तबगारी नाहींशीं झाल्यावर शिल्लक राहिलेल्या जहागिरी तंटेबखेडयांचा ऊत होण्यास कारणीभूत होत असतात. जुन्या संस्थांचें असें मातेरें झाल्यामुळें नवीन तऱ्हेच्या सुशिक्षित वर्गाला नवीन चळवळी हातांत घ्याव्या लागल्या. जुन्या कर्त्या लोकांचा दम नवीन सुशिक्षितांत अद्याप उत्पन्न झालेला नाहीं. तथापि ह्या नवीन वर्गांतहि

नगर वाचनालय सातारा

 संगणकीकृत

ज्यांचा धंदा थोडयाशा अंशानें तरी स्वतंत्रपणाचा होता किंवा ज्यांनीं जाणूनबुजून नवीन तऱ्हेची 'भिक्षांदेही' पत्करली त्यांनींच देशाभिमानाच्या नवीन चळवळींना सुरवात केली. वकील व खाजगी शाळांचे मास्तर यांच्याकडे चळवळ्यांचें काम प्रथम आलें. प्रत्येक जिल्ह्यांत स्वदेशी चळवळीचें पुढारीपण प्रायः एखादा वकील किंवा एखादा डॉक्टर अगर खाजगी शाळेचा मास्तर यांचेकडेच असतें. सर्व जिल्ह्यांत ही स्थिति सारखीच असते.सर्वांची जर अशी स्थिति तर बेळगांव, सोलापूर,किंवा वऱ्हाड–नागपूरचीं कांहीं शहरें हींच इतरांच्या पुढें कां ? नवीन चळवळीसंबंधानें पुण्यास प्रथम पेन्शनर्स पुढे आले. त्यांच्या चळवळी व अधिकाऱ्यांचें धोरण ह्यांमध्यें जोंपर्यंत फारसा मतभेद नव्हता तोंपर्यंत पेन्शनरांचें ठीक चाललें. पण हा मतभेद जसजसा वाढत चालला तसतसें घरीं बसून कालक्रमणाचें व्रत बऱ्याच पेन्शनरांना अंगिकारावें लागलें. पेन्शनरांनंतर वकील व शाळामास्तर पुढें आले. व त्यांतल्या त्यांत पुणें शहर एक तऱ्हेचें विद्यापीठ असल्यामुळें स्वार्थत्याग करणाऱ्या शाळामास्तरांनीं पुण्याचीं गेलीं वीस वर्षें व्यापून टाकिलीं. कांहीं वर्षांपूर्वी असा एक काळ होता कीं, एम्. ए. झाल्यावर अमक्या तमक्या शिक्षण–संस्थेचा लाइफ मेंबर होण्याचा माझा इरादा आहे असें कॉलेजांतील एखाद्या तरतरीत तरुणानें उद्‌गार काढले म्हणजे त्याच्या देशाभिमानाबद्दल इतरांनीं त्याचें कौतुक करावें. तो काळ स्वार्थत्याग करणाऱ्या एका शिक्षणात्मक संस्थेच्या इभ्रतीच्या चढत्या कमानीचा होता. तो काळ आज बदलला असून पूर्वींचेच उद्‌गार आज जर कॉलेजांत ऐकावयास मिळाले तर 'ही औदसा ह्याला कोठून आठवली' असा शेरा मारण्यास ऐकणारे चुकत नाहींत. ह्याचा अर्थ असा आहे कीं, पुण्याच्या जुन्या संस्था नवीन काळाबरोबर पाऊल टाकण्यास आतां असमर्थ झाल्या आहेत. खाजगी शाळांचे मास्तर येथें ज्याप्रमाणें अधिकाऱ्यांच्या आहारीं पडले आहेत,

त्याप्रमाणें येथील वकीलवर्गहि निरनिराळ्या चळवळींसंबंधानें अधिकाऱ्यांच्या आहारीं पडलेला आहे. बेळगांव, सोलापूर ह्या जिल्ह्यांतील किंवा कराडीच्या प्रांतांतील वकिलांचा समुदाय इतर ठिकाणांच्याप्रमाणेंच गर्भगळीत कां होऊं नये ? शाळामास्तर म्हणा, वकील म्हणा, किंवा इतर सुशिक्षित वर्ग म्हणा, चोहोंकडे सारखाच; मग फलासंबंधानें मतभेद कां ? बीज जरी एकच असलें तरी फलप्राप्तीसंबंधानें भेद होण्याचें कारण भूमीचें निरनिराळें स्वरूप हें होय. बेळगांव व सोलापूर हीं उद्योगधंद्यांचीं शहरें आहेत; हातमागाचे मोठे कारखाने बेळगांव–शहापुरास आहेत व सोलापूर येथें कोष्टयांचा धंदा मोठा असून नवीन गिरण्यांची स्थापना तेथें झाली आहे. उद्योगधंद्यांचे शहरांत लोकांच्या अंगांत–श्रीमंत गरीब सर्वांचे अंगांत–स्वतःच्या हिंमतीवर पोटाला मिळविण्याची धमक असते. तेथील लोक मेलेलें अन्न खात नाहींत. पुण्यांतील बराच मोठा लोकसमाज मेलेलें अन्न खातो, व कित्येक लोकोपयोगी संस्था मेलेल्या अन्नाच्या भिक्षेवर चालतात. मेलेल्या अन्नापासून मेलेलें रक्त उत्पन्न होतें व मेलेल्या रक्तापासून निर्माण झालेली सृष्टि मेलेलीच असते. पुण्यासारख्या शहरांत सरदारांचा, पेन्शनरांचा व जमीनदारांचा मोठा वर्ग असतो. ह्या वर्गाचें उत्पन्न त्यांना इनाम किंवा त्यांनीं खरेदी केलेल्या जमिनीचें असतें. स्वराज्याच्या (Constitution) हक्कांच्या चळवळींचा दुसरा सिद्धांत असा आहे कीं, कुळांना जमिनी लावून लागणीच्या पैशावर चरितार्थ चालविणाऱ्या श्रीमंत जमीनदारांच्याबरोबर जर एखाद्या शहरांत कारखानदारांचा तेवढाच किंवा त्याहून अधिक मोठा श्रीमंत वर्ग नसेल तर त्या शहरांतील श्रीमंत लोक चळवळीला मदत करणारे न होतां चळवळीच्या गळ्यांतील एक जड लोढणें होऊन बसतात. राज्यकर्ते कोणीहि असोत, स्वकीय असोत वा परकीय असोत, जमिनीच्या खंडाचे पैशावर पोसला गेलेला श्रीमंत वर्ग

स्वराज्याचे हक्क (Constitution) संपादण्याचे कामीं तितक्याच लायकीच्या व श्रीमंतीच्या कारखानदारांचे व व्यापाऱ्यांचे वर्गाशिवाय कार्यक्षम होत नाहीं, इतकेंच नव्हे तर कार्यविघातक होतो. पुण्यांतील श्रीमंतांची यादी करा, बेळगांवच्या श्रीमंतांची यादी करा व सोलापूरच्या श्रीमंतांची यादी करा, आणि त्या तीनहि याद्या नीट तपासून पहा. पुण्याच्या यादींत जमीनवाल्या सुखवस्तु श्रीमंतांचा मोठा भरणा सांपडेल, व ह्या सुखवस्तूंना लागणाऱ्या चैनीच्या जिनसांचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांचा भरणा सांपडेल. सरकारी नोकर व हे असले सुखवस्तू ह्यांनाच लागणाऱ्या वस्तू पुरविणारे व्यापारी श्रीमंत व्यापाऱ्यांत येथें विशेष आहेत. थोडेसे कारखानदार आहेत; पण त्यांचा संबंध पेन्शनर्स, नोकर किंवा जमीनदार सुखवस्तु ह्यांच्याशींच फार येतो. सामान्य बहुजनसमाजाच्या गिऱ्हाइकीवर अवलंबून असलेले श्रीमंत व्यापारी किंवा सामान्य बहुजन समाजाला लागणाऱ्या जिन्नसा पैदा करणारे श्रीमंत कारखानदार पुण्यास हाताचे बोटावर मोजण्याइतकेहि नाहींत. बेळगांव, शहापूर किंवा सोलापूर ह्या शहरांची स्थिति अशी नाहीं. बहुजन समाजाच्या गिऱ्हाइकीवर अवलंबून असलेले धनाढ्य व्यापारी व कारखानदार तेथें बरेच आहेत. ह्यामुळें सरकारी नोकर व श्रीमंत जमीनदार ह्यांनाहि स्वतःच्या संसाराचे फायद्याकरितां ह्या श्रीमंत व्यापाऱ्यांच्या व कारखानदारांच्या छंदानें बऱ्याच अंशीं वागावें लागतें. श्रीमंत जमीनदाराच्यापुढें श्रीमंत कारखानदाराचें उदाहरण असल्यामुळें आणि श्रीमंत सरकारी नोकरांपुढें किंवा पेन्शनरांपुढें श्रीमंत व्यापाऱ्याचें उदाहरण असल्यामुळें, आपणहि व्यापार करून किंवा कारखाने काढून—जहागीर, सरंजाम, पेन्शन किंवा जमीन नाहींशी करण्यांत आल्यास—हल्लींच्या थाटानें पोटास मिळवूं अशा धमकेचें सजीव रक्त परावलंबी सुखवस्तूंच्याहि शरीरांतून वाहूं लागतें, व त्यांच्या अन्नाचा मृतपणा ह्या संजीवनी धमकेच्या सिंचनानें नाहींसा

होतो. 'भिक्षांदेही'चें अन्न शुद्ध व सजीव मानतात. कारण हें अन्न अमका तमका केव्हां हिसकावून घेईल अशी धास्ती बाळगत रहावें लागत नाहीं. बहुजन समाजाचे गिऱ्हाईकीवर अवलंबून असणाऱ्या धनाढ्य व्यापाऱ्यांचें व कारखानदारांचें अन्नहि सजीव असतें; कारण अमका तमका नाराज होऊन माझ्या हातांतील अन्नाचा घास तोंडांत पडावयाचे आंत काढून घेतो कीं काय, अशा चिंतेनें तें अन्न तोंडांत कोंबावें लागत नाहीं. स्वराज्याच्या हक्काकरितां ( Constitution ) चळवळ होण्यास जेव्हां सुरवात होते, तेव्हां सजीव व शुद्ध अन्न खाणाऱ्यांकडूनच जिवंतपणाची हालचाल होऊं शकते. इनामदार, तैनातदार व सरंजामदार, ह्यांचें उत्पन्न वस्तुतः स्वतंत्र प्रकारचें असतें, पण ह्या स्वतंत्रपणाचा त्यांना विश्वास नसतो. हा विश्वास उत्पन्न होण्यास श्रीमंती पैदा करणाऱ्या कारखान्यांचें जाळें ह्या वर्गाच्या सभोंवतीं असावें लागतें. प्रत्यक्ष व्यापार व कारखाना ह्यांत गुंतलेल्या लोकांना फुरसत नसते. पण सुखवस्तूंना फुरसत लागेल तितकी असते. रेलचेल फुरसत मिळणाऱ्या व स्वतःच्या श्रीमंतीच्या शाश्वतीबद्दल एकप्रकारचा विश्वास मनाला पटल्यामुळें सजीव अन्न खाणाऱ्या सुखवस्तूंना उद्योग शास्त्र, कला, साहित्य व इतर हरएक प्रकारची विद्वत्ता ह्यांना उत्तेजन देण्याकडे होऊन लोकोपयोगी कामांत व हरएक राष्ट्रीय चळवळींत पुढारीपणाची जोखीम अंगावर घेण्याकडे होतो. पण जेथें अशाप्रकारचा विश्वास मनास पटत नाहीं व बहुजन समाजाकडून मिळविलेला सन्मान अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत खुपत असतो, तेथें सत्कीर्तीची हांव उत्पन्न न होतां ख्याली खुशालींत, हलकट चैनींत व दुराचाराच्या बदफैलीपणांत पैसा उडविण्याकडे सुखवस्तूंचा ओढा असतो. स्वदेशीसारख्या चळवळींना बेळगांव–सोलापुरास अधिक धारा मिळतो व इतर ठिकाणीं मिळत नाहीं ह्याचें कारण त्या त्या ठिकाणच्या श्रीमंतीच्या सजीवपणांत किंवा निर्जीवपणांतच शोधून काढलें पाहिजे.

# *सर्वांत पुढें मुंबईच कां ?

## नंबर ४

स्वराज्याचे हक्क ( Constitution ) व उद्योगधंद्यांची शक्ति ह्यांमधील परस्परांचें विवेचन करतांना अर्थशास्त्रावरील प्रसिद्ध जर्मन लेखक लिस्ट ह्यानें असें सिद्ध केलें आहे कीं, ह्या हक्कासंबंधाच्या सर्व चळवळींचा उगम प्रत्येक राष्ट्रांत उद्योगधंद्यांच्या शहरांपासूनच झालेला आहे. ग्रीस व इटली ह्या देशांच्या पुरातनकाळचें स्वातंत्र्य अथेन्स व रोम ह्या शहरांपासूनच बाहेर पडलें, सांप्रतच्या स्वराज्याचे कालास प्रारंभ होण्याचे वेळींहि ग्रीस व रोम ह्या राष्ट्रांच्या प्राचीन स्वातंत्र्यास व्यवहारांत ओढण्याची सुरवात इटली, बेल्जम, जर्मनी व हॉलंड ह्या राष्ट्रांतील व्यापाराच्या व उद्योगधंद्यांच्या शहरांनींच केली; युरोपांत ज्या वेळेला पारतंत्र्य माजून राहिलें होतें आणि राजे किंवा बादशहा प्रत्यक्ष परमेश्वरी अवतार समजले जात होते त्यावेळींहि 'स्वराज्याचे हक्क' बाल्टिक व भूमध्य समुद्र ह्यांच्या किनारीं असलेल्या 'स्वतंत्र शहरां'तच नांदत होते; लंडन व मँचेस्टर ह्यांसारख्या वाढत्या व्यापाराच्या व उद्योगधंद्यांच्या शहरांनींच इंग्लंडच्या सिंहासनाच्या सत्तेला आळा घातला; बोरबोन घराण्याची सत्ता ज्यावेळीं अबाधित वाटत होती त्यावेळीं स्वातंत्र्याचें तेज चोहोंकडे फांकणाऱ्या ज्वालेचा स्फोट 'पारिस' शहरांतच आकस्मिक झाला; अमेरिकेंत 'बोस्टन' बंदरानेंच स्वराज्याच्या हक्कांची स्थापना प्रथम केली; रशियांत सेंट पिटर्सबर्ग शहराला, मास्कोच्या उद्योगधंद्यांना व आगगाडी–तारायंत्र ह्यांसारख्या अवाढव्य कारखान्यांना हेलखावे देण्यांत आल्यानंतरच 'ड्यूमा' सभा

* केसरी, ता. १३ आक्टोबर १९०८

स्थिर झाली; आणि अगदीं परवां परवां तुर्कस्थानांत 'सॅलिनोको' व कॉन्स्टँटिनोपल ह्या बंदरांतील लोकांनींच पुढाकार घेऊन–खेड्यापाड्यांत पूर्ण अज्ञान असतांहि–तुर्की साम्राज्यांत स्वराज्य सुरू केलें! व्यापार व उद्योगधंदा ह्यांत गुंतलेल्या लोकांना स्वराज्याची चळवळ जितकी समजते व व्यवहारांत आणतां येते तितकी इतर लोकांना आणतां येत नाहीं.

व्यापारामुळें व उद्योगधंद्यामुळें समूहांत रहाण्याची, समूहांत उठण्या-बसण्याची, समूहानें वागण्याची व समूहाचे सुखदुःखावर आपलें सुखदुःख अवलंबून आहे हें ओळखण्याची लोकांना जितकी संवय लागते तितकी संवय इतर व्यवसायानें लागत नाहीं. शेतकी व कारकुनी एकलकोंडेपणा व परावलंबन शिकवितात. कारकुनाची नजर मालकाच्या चेहेऱ्यावर असते, शेजारच्या कारकुनावर नसते. शेजारीं बसणारा कारकून नोकरींतून बडतर्फ झाला, किंवा त्याच्या हक्काची पायमल्ली झाली, अगर त्याच्या मेहनतीप्रमाणें व बुद्धिमत्तेप्रमाणें त्याला मुशाहिरा मिळाला नसला तरी त्या दुःखिताचे दुःखांचा कांहीं संबंध आपल्या नोकरीशीं येतो किंवा कारकुनीच्या धंद्याशीं येतो हें मनांत न आणतां धन्याची मर्जी संपादन करण्याकडे कारकुनींत मुरलेला प्राणी व्यक्तिशः खटपट करीत असतो. कारकुनी म्हणजे प्रतिष्ठित गुलामगिरी होय; आणि ज्या समाजांत वजनदार वर्ग प्रतिष्ठित गुलामांचा बनलेला असतो तो समाज प्रतिष्ठितपणामुळें स्वराज्याच्या हक्कांचा ऊहापोह करण्यास लायक कदाचित् झाला असला तरी ह्या ऊहापोहाची अंमल-बजावणी करण्यास समर्थ होत नाहीं. कारकुनांना नेत्यांशिवाय वागण्याची संवयच नसते. ज्या गोष्टीला पूर्वीचा दाखला नाहीं अशी गोष्ट पुढें आली असतांना परावलंबी झालें पाहिजे, असलें बाळकडू ह्यांना नोकरीच्या प्रारंभीं रोज पाजण्यांत येतें. ह्यांच्या पेशाचा जन्म दुसऱ्यानें लिहिलेल्या मजकुराची वारनिशी खरडण्यांत होतो व ह्या धंद्याचा अंत तरुणवांड मालकापुढें

म्हातारपणीं जुने दाखले मांडणाऱ्या शिरस्तेदारींत होतो. पूर्वीचा शिरस्ता माहीत करून घेण्यांत तारुण्याची सर्व शक्ति हे खर्च करतात व म्हातारपणीं शिरस्ता सांगण्याचा हक्क प्राप्त झाला असतांना गंगेंत घोडे न्हाले असें त्यांना वाटून, आपल्या मुलाची महत्त्वाकांक्षा—पुढील पिढीची कर्तव्यसीमा—'अक्षता टाकण्याला रावबहादूरहि आले आणि अमक्या तमक्या साहेबांच्या कचेरींत पाहिले' अशा उखाण्यांनीं आपल्या सुनेनें प्रदर्शित केलेली पाहून आपलें व आपल्या पुढील पिढीचें या कारकुनांना साभिमान कौतुक वाटतें! गुलामगिरीचे सर्व दुर्गुण प्रतिष्ठितपणाचे पांघरुणाखालीं कारकुनांच्या समाजांत वावरत असतात. ह्यांचा रोजचा संबंध दौतलेखणीशीं व धन्याच्या हुकमाशीं. 'मालक' ह्या शब्दाचा अर्थ त्यांना चांगला समजतो, व गुलामांचें रूप कोणचें हें त्यांना पक्कें माहीत असतें. मालक कसें व्हावें हें त्यांना माहीत असतें, व गुलामाप्रमाणें कसें रहावें हेंहि त्यांच्या अंगवळणीं पडलेलें असतें. एक मालकीची स्थिति किंवा एक गुलामाची स्थिति, त्याहून तिसऱ्या अवस्थेची ह्यांना आयुष्यांत केव्हांहि ओळख पटत नाहीं. स्वतंत्र मनुष्याचा चेहरा त्यांनीं पाहिलेला नसतो; बरोबरीचें नातें ह्यांच्या रक्तांत नसतें; व सारख्या दर्जाच्या लोकांची जूट बरोबरीच्या बळकट दोरीनें तयार करणें त्यांना अशक्य वाटतें. हा मनाचा दोष नव्हे; ही बुद्धीची कमतरता नव्हे; हा व्यवसायाचा दुर्गुण आहे! खात असलेल्या अन्नाचें हें पाप आहे. जसलें अन्न तसलें मन, जसला व्यवसाय तसली बुद्धि! करडा मालक (Despot) व गुलाम, हीं एकाच मनोवृत्तीचीं दोन स्वरूपें आहेत. उत्तम गुलाम करडा मालक होऊं शकतो, व मालक प्रसंग येतांच केव्हांच दीन गुलाम होतो. तेंच शरीर, तेंच मन, तीच बुद्धि, प्रसंगानुसार मालक व गुलाम ह्या नात्यानें प्रकट होत असते. नोकरीचीं कित्येक वर्षें गुलामाप्रमाणें वरिष्ठांची हांजी हांजी करण्यांत ज्यांचीं गेलीं तेच अधिकारारूढ होण्याबरोबर

हाताखालच्या नोकरांवर एकदम गुरगुरूं लागतात. हें स्थित्यंतर एकदम कसें होतें ? खालच्यांना लाथा मारणें व वरच्यांचे पाय धरणें हें रूपांतर हां हां म्हणतां कसें होतें ? खरोखर विचार केला असतांना, ह्या अवस्था मुळींच दोन नाहींत. एकच मनोवृत्ति, पण परिस्थिति बदलली कीं इतरांना निराळी दिसूं लागते. मोंगल बादशहाजवळचे गुलाम जोरदार पातशाही स्थापणारे एकेकाळीं झाले व कृष्णा कांठच्या घोडा अटकेपलिकडे तोऱ्यानें नाचवणाऱ्या लोकांचे वंशज आज उत्तम कारकून बनले आहेत. वरवर पहाणाराला हा चमत्कार भासतो पण वस्तुतः हा चमत्कार नव्हे. गुलामांचें रूपांतर रावांत व रावांचें रूपांतर गुलामांत तेव्हांच होऊं शकतें. कारण दोघांची मूळ प्रकृती एकच आहे. गेल्या पंधरा वीस वर्षांचा असा अनुभव सांगण्यांत येतो कीं, गुजराथ्यांना कंपन्या काढून मोठमोठे कारखाने चांगल्या रीतीनें चालवितां येतात. पण दक्षिणी लोकांना ऊर्फ महाराष्ट्रीयांना ती अक्कल नाहीं. महाराष्ट्रीयांचा एकसूत्री मालकीचा (Despotic) कारखाना चांगला चालतो, पण दहा पांच महाराष्ट्रीय भागीदार एक जागीं जुळले कीं कारखाना बुडालाच. हा प्रकृतिदोष आहे, रक्तावर झालेला कारकुनी अन्नाचा हा वाईट परिणाम आहे, व स्वातंत्र्याची लालसा ज्या व्यापारामुळें व कारखान्यांमुळें होते त्या व्यापाराचा व त्या कारखान्यांचा उपमर्द केल्याबद्दल हा दंड आहे ! आम्ही एकसूत्री मालक (Despot) सर्वमान्य होऊं किंवा आमच्या पूर्ण परवशतेनें शत्रूंनाहि डोलवायास लावूं. स्वराज्याच्या हक्कासंबंधानें (Constitution) चळवळ करीत असतांनाहि हा प्रकृतिदोष आम्हांस सोडीत नाहीं. राष्ट्रीय सभेसारख्या सभेंतहि एकसूत्री मालकी गाजविण्याचा हट्ट दक्षिणी लोकांत फार. ह्या हट्टाच्या विरुद्ध कोणी ओरड केल्यास राष्ट्रीय सभेंतून त्यांना हांकून देण्यास हे तयार ! 'सर्व्हंट ऑफ इंडिया 'सारखी स्वराज्याचे हक्क संपादन करण्याकरतां संस्था स्थापावी व

यांतहि एकसूत्री मालकी (Dispotism) स्थापण्यास चुकूं नये. असा हा आम्हांस कोठेंहि न सोडणारा रक्तदोष आहे. अलाहाबादच्या कन्व्हेन्शननें तयार केलेला कॉंग्रेसच्या रचनेचा खर्डा वाचा,—कारकुनांच्या जातीची ही कृती आहे, हें कांहीं केल्या झांकलें जात नाहीं. राष्ट्रीय सभेच्या मंडपांतहि गुलाम व मालक ह्यांशिवाय तिसरा वर्ग ह्यांना दिसत नाहीं. रचनेचा खर्डा तयार करून कांहीं लोक मवाळांच्या कॉंग्रेसचे एकदम मालक झाले. व इतरांनीं सह्या करून—गुलामगिरी जाहीर करून—पाहिजे तर मंडपांत यावें असा यांनीं निर्बंध केला. रचनेचा खर्डा तयार करणारे हे गुलामांचें मालक व सह्या करणारे हे मालकांचे गुलाम, ह्या तत्वावर कन्व्हेन्शनची रचना कशी करण्यांत आली ह्याबद्दल आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. कारण कारकुनी समाजाच्या हातांत कन्व्हेनशन गेलेलें आहे व कारकुनी पेशांत धन्यता मानणाऱ्या सर्व मवाळांचा पाठिंबा ह्या कन्व्हेन्शनला आहे.

मनुष्य जसलें अन्न खात असतो, तसला त्याचा पिंड बनत असतो. एखाद्या समाजांतील श्रीमंत व वजनदार लोकांचा व्यवसाय पाहिला म्हणजे स्वराज्याच्या हक्कांची चळवळ करण्याचा जोम त्या समाजाचे पिंडांत कितपत असूं शकेल, हें तेव्हांच सांगतां येतें. महाराष्ट्रांतील पांढरपेशे ह्या कारकुनी व्यवसायांतून सुटल्याशिवाय महाराष्ट्राचें डोकें स्वराज्याच्या हक्कांच्या नव्या युगांत कधींहि वर निघावयाचें नाहीं. नानाप्रकारचे उपदेश ऐकून व निरनिराळे निबंध वाचून महाराष्ट्रांतील पांढरपेशांना स्वराज्याच्या हक्कांची महति वाटेल; पण त्यांच्या शरीरांतील निरनिराळे रस कारकुनी पेशाच्या मेलेल्या अन्नापासून उत्पन्न झालेले असल्यामुळें त्यांचे मनोविकार नोकरीकरतां त्यांना गरगर फिरावयास लावतील. मनोविकारांचें स्वरूप अन्नाच्या प्रकारावर अवलंबून असतें! महाराष्ट्रीय पांढरपेशांचें कारकुनी अन्न सुटल्याशिवाय त्यांच्या मनोविकारांवर स्वावलंबी छाप केव्हांहि बसावयाची नाहीं. कारकुनी अन्नाचा रस परावलंबी मनोविकार उत्पन्न करतात. ह्या अन्नाच्या

रक्तांत पोसलेलें मन गुलामगिरींत किंवा एकसूत्री मालकींत सुख मानीत असतें, व स्वराज्याचे हक्कांच्या आनंदाचा आस्वाद घेण्यास लायक वृत्तीच ह्या पांढरपेशांत उत्पन्न होत नाहींत. मनुष्य आंतून जशा प्रकारचा रसिक असतो तशाच प्रकारच्या रसाशीं संबंध असल्याशिवाय त्याला रसास्वाद घेतां येत नाहीं. ज्याला राजसी रसाचा आस्वाद घ्यावयाचा असेल त्यानें राजसी अन्न खावें, तामसी अन्न खाणारा तामसी चैनींतच गुंग होऊं शकतो, सात्विक गुणांचा उत्कर्ष करूं इच्छिणारानें सात्विक अन्नच खाल्लें पाहिजे व रसवर्ज असलेलें 'पर' पाहूं इच्छिणारानें आपले रस परत फिरविण्यास शिकलें पाहिजे. जसल्या आनंदावर दृष्टि असेल तसल्या आनंदाला साजेसाच अन्नरस पोटांत उत्पन्न झाला पाहिजे. तेव्हां कारकुनीच्या अन्नापासून उत्पन्न झालेला रस गुलामगिरींत सुख मानण्यास भाग पाडणार हें उघड आहे. स्वराज्याच्या हक्काकरतां करावयाचे चळवळींत नुसत्या बुद्धीची तेवढी तयारी करून भागत नाहीं. अन्नरस बदलून शरीराची व मनोविकाराचीहि बुद्धीला अनुकूल अशी तयारी केल्याशिवाय कार्यसिद्धि होत नाहीं. महाराष्ट्रीय पांढरपेशांतील व वजनदार लोकांचा कारकुनी पेशा नष्ट होण्याची आवश्यकता स्वराज्याच्या हक्काच्या चळवळीच्या दृष्टीनें किती आहे, हें वरील विवेचनावरून वाचकांचे ध्यानांत येईलच. जगांत कोणचीहि गोष्ट स्वेच्छेनें घडत नसते. स्वेच्छा व परेच्छा ह्यांच्या मिलाफानें कार्य घडतें. राष्ट्रीय पक्षाची चळवळ सुरू झाल्यापासून ह्या कारकुनी पेशांतून सुटून जाण्याची धडपड महाराष्ट्रांत एकसारखी चालू आहे, पण खाल्लेल्या व खात असलेल्या अन्नाच्या रसापुढें बुद्धि पंगू पडते, व पुन्हां पुन्हां कारकुनी पेशाला मन लटकतें. स्वेच्छेचा जोर अशा रीतीनें पंगू पडला असतांना परेच्छेनें लाथा मारून ह्या मनाला भलत्या रसापासून हाकून लावल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ह्या दृष्टीनें विचार करीत असतांना महाराष्ट्रीय पांढरपेशा वर्गाला जबाबदारीच्या

नोकऱ्या न देण्याकडे किंवा लहान सहान कारणांवरून नोकरींतून बडतर्फ करण्याकडे जो कल दिसत आहे, त्याबद्दल संतोष वाटल्यावांचून रहात नाहीं. व्यक्तीच्या वृत्तिच्छेदाबद्दल कुसुमाहूनहि मृदुमान होऊन वाईट वाटणें सहाजिक आहे. पण महाराष्ट्रीयांच्या शरीरांत स्वराज्याच्या लायक असे रस उत्पन्न करण्याकरितां ठिकठिकाणच्या व्यक्तींच्या दुःखाकडे वज्राहून कठिण असलेल्या राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें पहावयास शिकलें पाहिजे. कारण कारकुनी पेशाच्या फाजील लालुचीमुळें महाराष्ट्रांतील उत्तम बुद्धि व कर्तृत्वशक्ति स्वराज्याच्या हक्कांच्या (Constitution) चळवळीला निरुपयोगी होऊं पहात आहे. कारकुनी पेशांतून सुटण्याची धडपड आज नवीन सुरु झालेली आहे असें नाहीं, आज पूर्वीच्या धडपडीला नवीन वळण लागत आहे! स्वकीयांच्या पूर्वीच्या जुलमी राज्यांतहि सेवाधर्माला शहाणे कंटाळत असत. त्यावेळीं सेवाधर्म लष्करी व कारकुनी दोनहि पेशांचा असे; आतां कारकुनी पेशाचा तेवढा सेवाधर्म उरला आहे, एवढाच फरक! सेवाधर्माच्या तडाख्यांतून सुटण्याचा पूर्वीचा मार्ग एकच होता, व तो शेतकींत पैसे गुन्तवून शेतकीच्या उत्पन्नावर उदरनिर्वाह करणें हा होय. मोठ्या जमिनदारीची मालकी आपणांकडे घेऊन सुखवस्तु झालेले लोक प्रत्यक्ष सेवाधर्माच्या कांचणींतून सुटलेले असतात, पण स्वराज्याच्या हक्काच्या चळवळीच्या प्रसंगीं त्यांच्याच इतका श्रीमान व वजनदार कारखानदारांचा वर्ग त्यांच्या शेजारीं असल्याशिवाय ते कार्यविघातक कसे होतात, हें गेल्या अंकीं सांगितलेंच आहे. पांढरपेशा वर्गांतील कारकुनी पगारांचे पैसे गाठीं टाकून द्रव्यसंचय केला असतांना जमीनदार होण्याकडे त्यांची हाव असते. हे सुखवस्तु जमीनदार व त्यांच्या ताब्यांतील कुळें हीं कारखानदारांच्या व कारखान्यांतील कामकऱ्यांच्या अभावीं, स्वराज्याच्या चळवळीच्या गळ्यांतील लोढणें होऊन बसतात. शेतकरी व गिरणींतील कामकरी, कारकून व व्यापारी, जमीनदार व कारखानदार ह्या जोडींतील व्यवसायभेदामुळें उत्पन्न होणारा स्वभावभेद लक्षांत घेऊन पुढील खेपेस मुंबईचें निरीक्षण करूं.

वाचनालय,

# * सर्वांत पुढें मुंबईच कां?

नंबर ५

व्यवसायभेदामुळें स्वभावभेद उत्पन्न होतो. गिरणींत काम करणाऱ्या कामकऱ्याचा स्वभाव निराळा व शेतांत राबणाऱ्या शेतकऱ्याचा स्वभाव निराळा. सर्व दुनियेशीं संबंध पावलेल्या व्यापाऱ्याचा स्वभाव निराळा व मालकाच्या तंत्रानें काम करावयास शिकलेल्या कारकुनाचा स्वभाव निराळा. आधुनिक समाज व आधुनिक सरकार ज्या जिनसांशिवाय चालणें शक्य नाहीं त्या जिनसा तयार करणाऱ्या कारखानदारांचा स्वभाव निराळा व हर्दम अधिकाऱ्यांच्या घेसणींत सांपडलेल्या जमीनदारांचा स्वभाव निराळा. या स्वभावभेदामुळें स्वराज्याच्या चळवळीचें बीज गिरणींतील कामकरी, व्यापारी व कारखानदार यांच्या हातून जसें होतें तसें इतरांच्या हातून होत नाहीं. आपल्या लहानशा वतनवाडींत राबून उदरनिर्वाह करणारा शेतकरी समाजापासून अलग असतो. राज्यव्यवस्थेवर त्याचीं रोजचीं सुखदुःखें फारशीं अवलंबून नसतात. सरकारसारा भरावयाचे वेळेला तो राज्यव्यवस्थेचा विचार करितो, पण सरकारसारा भरावयाचे प्रसंग वर्षांतून एक किंवा दोन. पीकपाणी व्यवस्थेशीर झालेलें असलें म्हणजे सारा जबर आहे कीं माफक आहे, जगाच्या एकंदर रहाटीच्या मानानें आपणाजवळ द्रव्यसंचय राहतो किंवा नाहीं, या गोष्टींचा शेतकरी विचार करीत नाहीं. दुष्काळाची परंपरा व जंगलखात्याची रोजची टोचणी, यामुळें महाराष्ट्रांतील कांहीं कांहीं ठिकाणचे शेतकरी सांप्रत थोडेसे जागृतावस्थेंत आहेत; पण स्वराज्याच्या हक्कांच्या दृष्टीनें शेतकऱ्यांचा धंदाच निद्रावस्थेचा. जर्मन

---

* केसरी, ता. २० आक्टोबर १९०८

अर्थशास्त्रकार लिस्ट यानें असा सिद्धांत स्थापिलेला आहे कीं ज्या देशांत शेतकीशिवाय इतर मुख्य धंदा लोकांना नाहीं तेथें स्वराज्याची किंमत लोकांना समजणार नाहीं. तुमचा मुख्य धंदा जर शेतकीचा तर तुमच्यावर राज्य जुलमी पद्धतीचें (Despotic). जसले लोक तसलें राज्य, आणि जसला धंदा तसले लोक. महाराष्ट्रांतील मनुष्य शेतकरी असतो व लिहून वाचून त्याचें मन सुसंस्कृत झालें म्हणजे तावडतोब कारकून बनतो. शेतकीच्या परावलंबनांतून प्रतिष्ठित गुलामगिरींत त्याची बढती होते. विद्या संपादन केल्याचा उपयोग एवढाच. एवढी गोष्ट खरी आहे कीं, शेतकी व सरकारी नोकरी ह्यांत गुन्तलेल्या लोकांना फुरसत चांगली मिळते, व तत्त्वज्ञानाला भरती आणणारा विद्याव्यासंगी वर्ग या परावलंबी समाजांत निर्माण होऊं शकतो. धर्मश्रद्धा, तत्वज्ञान, धार्मिक व नैतिक आचारविचारांचा खल आणि साहित्यचर्चा, यांचा परामर्ष शेतकऱ्यांच्या व कारकुनांच्या समाजांत थोडयाबहुत प्रमाणानें होत असतो. व्यापाराला, यंत्रकलेला व कारखान्याला लागणारें शास्त्रीय ज्ञान यांना माहीत नसतें; आणि यांच्या विद्याव्यासंगामुळें व तत्त्वज्ञानामुळें राजकीय गोष्टींचा ऊहापोह करून राज्यव्यवस्थेंत मन घालावयास शिकविणारे—स्वराज्याच्या हक्कांची महति गाणारे—शाहीर यांच्यांत निपजले म्हणजे प्रथम या राजकीय पुढाऱ्यांचें ह्यांना कौतुक वाटतें व मागाहून हें आपल्या पिंडाला विपसदृश्य प्रकरण आपण कोठून उपस्थित केलें असें यांना होऊन जातें! विद्याव्यासंग व धर्मचर्चा यांना राजकीय तत्त्वांच्या जवळ जवळ नेऊन सोडतात. यांची सुसंस्कृत बुद्धि राजकीय तत्त्वानुवेषणांत जोरजोरानें उडया मारते; पण शेटें मन तेथून तावडतोब निसटण्याच्या खटपटींत असतें. शेतकरी व कारकून धर्मश्रद्धेला व विद्याव्यासंगाला पोसतात, स्वराज्याच्या जवळ जवळ येतात; आणि मग "स्वभावो दुरतिक्रमः" या न्यायानें "स्वराज्याचें" दर्शन लांबूनच

घेऊन परततात. हा स्वभाव जर बदलावयाचा असेल तर शेतकांत राबणाऱ्यां-इतकेच कारखान्यांतून काम करणारे निर्माण झाले पाहिजेत, कारकुनांइतकेच व्यापारी महाराष्ट्रांत दिसूं लागले पाहिजेत, व जमीनदारांइतकेच कारखानदार पुण्यासारख्या शहरांतून नांदावयास लागले पाहिजेत. कारकून व पेन्शनर्स आतांपर्यंतच्या मार्गाला बरेच उपयोगी पडले, पण पुढील मार्ग आक्रमण्यास व्यापारी व कारखानदार यांचा पेशा स्वीकारल्याशिवाय कारकून व पेन्शनर्स पंगू आहेत. कारकून व शेतांत राबणारा मजूर यांचा स्वभाव एकच; थोडयाशा संस्कृतीचा मात्र फरक. शेतकऱ्यांचा विशेष संबंध जड सृष्टीशीं, कारकुनाचाहि संबंध जड कागद–दौतीशीं. वाक्यांतील सचेतन अर्थाशीं कारकुनांचा कांहींच संबंध नसतो, अक्षरांचें अचेतन वळण कारकुनांचें पहावयाचें असतें; व नांगर कसा हाकतो ही शेतकऱ्यांची परीक्षा घेतात. कारकून धन्याच्या चेहऱ्यावरील स्मित हास्याकडे किंवा चढलेल्या भुवईकडे जशी नजर पोंचवितो, त्याप्रमाणें आकाशांतील मेघराजाच्या हालचालीकडे शेतकरी आतुरतेनें पहात असतो. आपल्या कृतीचें फळ सर्वस्वीं दुसऱ्याच्या मर्जीवर अवलंबून आहे, ही परावलंबी भावना शेतकऱ्यांत व कारकुनांत जितकी वाणेल तितकी गिरणींतील कामकऱ्यांत व कारखानदारांत वाणत नाहीं. राजानें मारलें तर कारकून हूं का चूं करीत नाहीं व मेघांनीं चकविलें तर अनन्यगतिक होऊन हालअपेष्टा सोसण्यास शेतकरी मुकाट्यानें तयार होतो. इंग्लंडांत आज दोन चार आठवडे लंकाशायरचे मजुरांनीं बेकार होण्याबरोबर पार्लमेंटाला व प्रधानमंडळाला "त्राही" "त्राही" करून सोडलें. आणि हिंदुस्थानांत आज बारा वर्षें कोठेंना कोठें एकसारखा दुष्काळ पडत आहे तरी शेतकरी दैवावर हवाला देऊन विनतक्रार तडफडत मरण्यास तयार आहे! अशा प्रसंगीं व्यवसायभेदामुळें हातून घडणाऱ्या भिन्न कृतींतील महदंतर तेव्हांच दृष्टीस पडतें. आपणाला कांहीं हक्क आहेत,

हे कारकुनाला व शेतकऱ्याला समजतच नाहीं. सर्व गोष्टी मेहेरबानीनें मिळाल्या आहेत, असें शेतकऱ्यांना व कारकुनांना वाटतें. शेतकरी परमेश्वराची करुणा भाकतात आणि सरकारी नोकर देव्हाऱ्यांत बसविलेल्या वरिष्ठाची थुंकी झेलतात. शेतकीसारख्या परावलंबी धंद्यांत भक्तिभाव तरी दुणावतो; पण कारकुनींत परावलंबनामुळें हांजीहांजीचें स्वरूप प्राप्त होतें. व्यापाऱ्यांचा व कारखानदारांचा संबंध सर्व समाजाशीं येतो, यंत्रें व समाज या दोहोंकडे त्यांना लक्ष पोहोंचवावें लागतें. यंत्राशेजारीं काम करणारा कामकरी यंत्राइतकीच स्वतःला किंमत देत असतो. मी नाहीं तर यंत्र नाहीं व यंत्र नाहीं तर मी नाहीं, या दोनहि भावना त्याच्या ठिकाणीं सारख्याच जोराच्या असतात. समाजाच्या गिऱ्हाईकीवर व्यापारी व कारखानदार अवलंबून असतात, पण बहुजनसमाज नेहमीं अव्यक्त स्वरूपाचा असल्यामुळें व अधिकारी वर्गाप्रमाणें व्यक्त रूपाचा होत नसल्यामुळें बहुजनसमाजावरील परावलंबनाचें पर्यवसान भक्तिभावांत होऊं शकतें, हांजी हांजींत होत नाहीं. व्यापाऱ्याला व कारखानदाराला गिऱ्हाइकाइतकीच स्वतःची किंमत वाटते. गिरणींतील कामकऱ्यांना मी आहें म्हणून यंत्र पुरें काम देतें असें वाटतें. व्यापारी स्वतःच्या दक्षतेची व चलाखीची तारीफ करीत असतो, कारखानदार प्रतिसृष्टि निर्माण करण्याच्या अहंकारांत मग्न असतो. हे तीनहि वर्ग जितके परावलंबी तितकेच स्वावलंबी असतात. यांचें परावलंबन अव्यक्तासंबंधाचें असल्यामुळें परमेश्वरासंबंधींचा भक्तिभाव या लोकांत चांगला असतो; व यांच्या स्वावलंबनांत स्वराज्याचे हक्क चांगले रुजतात. कारखान्यांतील कामकरी, व्यापारी व कारखानदार हे परमेश्वराचे भक्त असून स्वराज्याचेहि भोक्ते असतात ! शेतकऱ्यांत भक्तिभाव असतो, पण परावलंबन फार असल्यामुळें शेतकीला यंत्रकलेची जोड मिळून कारखान्याचें थोडेसें तरी स्वरूप प्राप्त होईतों शेतकीचा धंदा जुलमी राज्यपद्धतीला

( Despotic Government ) पोहोंचतो; आणि कारकून धर्मदृष्ट्या भक्तिहीन व हांजी हांजीखोर होऊन धर्म व स्वराज्य या दोहोंनाहि बुडविणारे होतात. कारखाने व यंत्रप्रधान शेतकी सर्वांत उत्तमांची, साधी शेतकी मध्यमांची व स्वराज्याव्यतिरिक्त अशा राज्यपद्धतींतील सरकारी नोकरी अधमांची, अशी वाटणी स्वराज्याच्या हक्काच्या दृष्टीनें करावी लागते. मुंबई शहर गिरण्यांतील कामकरी, व्यापारी व कारखानदार या उत्तम वर्गानें बऱ्याच अंशीं व्यापलेलें असल्यामुळें स्वराज्याच्या हक्काकरितां मेहनत करणाऱ्या लोकमान्य टिळकांसारख्या पुढाऱ्याबद्दल सहानुभूति विशेष कळकळीनें व प्राणहानीसारख्या स्वार्थत्यागानें दाखविण्यास मुंबईनें तयार व्हावें, ही ओघाओघानेंच होणारी गोष्ट होय.

ह्या ठिकाणीं असा प्रश्न उद्भवतो कीं, स्वराज्याच्या हक्काबद्दल खटपट करणाऱ्या पुढाऱ्यांबद्दल मुंबईनें ह्यापूर्वी विशेष सहानुभूति कां दाखविली नाहीं ? अधिकाऱ्यांच्या वजनाचें विशेष ठिकाण जर कोणतें असेल तर ती मुंबई, अशी समजूत इतक्या दिवस कां असावी ? कन्व्हेन्शनच्या क्रीडची तळी जर कोण उचलून धरील तर ती मुंबई, अशी नामदार गोखले यांची समजूत परवां परवांपर्यंत कां असावी ? दोन दिवसांपूर्वी मुंबई कन्व्हेन्शनच्या मताची व आज खऱ्या राष्ट्रीय सभेच्या मताची, असें स्थित्यंतर लो. टिळक यांजवरील खटल्यानें मुंबईचें कसें व्हावें ? ही जादूची कांडी फिरविली कोणी व फिरली कशी ? ह्या प्रश्नांचें उत्तर असें आहे कीं, स्वदेशी व बहिष्कार या चळवळीनें मुंबईचें रूपांतर केलें आहे. ह्या चळवळीच्या पूर्वी मुंबईचा व्यापार व मुंबईचे कारखाने बहिर्मुख होते. मुंबईतल्या गिरण्यांतला माल परदेशांत विशेष खपत असे; त्यामुळें स्वदेशाशीं आपणास कांहीं कर्तव्य आहे, हा विचार कारखानदारांत व व्यापाऱ्यांत उत्पन्न झालेला नव्हता. कारखानदार परकीय गिऱ्हाईकांवर अवलंबून व व्यापारी परकीय

कारखानदारांचे गुमास्ते, अशी सरास स्थिति थोड्या वर्षांपूर्वी मुंबईची होती. जर्मन अर्थशास्त्रपंडित लिस्ट यांचें असें मत आहे कीं, ज्या वेळीं एखाद्या बंदरांतील लोक स्थानमाहात्म्यामुळें परकीय कारखानदारांशीं व व्यापाऱ्यांशीं विशेष संलग्न होतात आणि त्यामुळें स्थानिक व्यापारी व स्थानिक कारखानदार उत्पन्न होऊन स्थानिक व्यापार व कारखाने बहिर्मुख असतात– म्हणजे मोठे व्यापारी परकीय कारखानदारांचा माल खपविणारे व मोठे कारखानदार परकीय गिऱ्हाइकाला माल पुरविणारे बनतात–त्यावेळीं त्या व्यापाऱ्यांचा व कारखानदारांचा वर्ग स्वकीयांच्या उद्धाराविषयींच्या हरएक चळवळीविषयीं स्वभावतःच उदासीन असतो. दोन तीन वर्षांपूर्वी स्वदेशी चळवळीला सुरवात झाली आणि मुंबईचा व्यापार व उद्योगधंदा अंतर्मुख होण्यास प्रारंभ झाला, त्यावेळीं ही उदासीनता नष्ट होऊं लागली. अंतर्मुख व्यापाऱ्यांची व अंतर्मुख कारखानदारांची सरशीं अद्याप झालेली नाहीं. अंतर्मुख कामकरी, अंतर्मुख व्यापारी व अंतर्मुख कारखानदार मुंबईस आतां बरेच झाले आहेत व या अंतर्मुखतेमुळें उत्पन्न होणाऱ्या स्वराज्याचे (Constitution) चळवळीस अनकूल अशी व्यक्त शक्ति दृग्गोचर झाली आहे. पाणी थंडगार होत चाललें म्हणजे त्याचें पांढरें शुभ्र बर्फ बनण्यास पाण्यांत बाहेरून कोठून तरी हालचाल सुरू करण्यांत यावी लागते. एरवी बर्फ बनत नाहीं. त्याचप्रमाणें स्वदेशी व बहिष्कार चळवळीमुळें मुंबईस आस्ते आस्ते जमत चाललेल्या शक्तीचे कण एका ठिकाणीं जमून घनीभूत होण्यास लो. टिळक यांजवरील खटल्याची हालचाल कारणीभूत झाली. स्वदेशी व बहिष्कार चळवळीमुळें अंतर्मुख झालेले, होत असलेले किंवा होऊं घातलेले कामकरी, व्यापारी व कारखानदार बहिर्मुख व्यापारी व कारखानदार यांचेप्रमाणें अजागळ व शेळपट वृत्तीनें वागत होते. शेळ्या-मेंढ्यांत लहानपणापासून वावरणाऱ्या इसापनीतींतील वाघाच्या बच्चांना

स्वमुख पाण्यांत पाहिल्याशिवाय आपण डोळ्यामेंढ्या नाहीं हें समजलें नाहीं; त्याप्रमाणेंच लो. टिळक यांचेवरील खटल्यामुळें उद्भवलेल्या नानाप्रकारच्या स्वदेशी विचारांचे प्रवाहांत मुंबईकर स्वमुख पाहीतां व्यापार व कारखाने अंतर्मुख झाल्यानें कोणतें स्थित्यंतर झालें आहे, हें मुंबईस समजलें नाहीं. लो. टिळक यांना झालेल्या शिक्षेनें स्वदेशी विचारांच्या प्रवाहांत स्वमुख पाहण्याची मुंबईकरांना प्रेरणा केली आणि गिरणींतील कामकरी, स्वदेशी व्यापारी व कारखानदार यांची महती स्वदेशीच्या व स्वराज्याच्या चळवळीच्या दृष्टीनें किती आहे, हें महाराष्ट्रांतील पांढरपेशा वर्गांचे मनावर बिंबविलें. लो. टिळक यांजवरील खटल्याचे मुंबईवर व महाराष्ट्रावर हे मोठे उपकार आहेत आणि गुजराथ व महाराष्ट्र एक होऊन या स्थित्यंतरापासून शिकावयाचे धडे शिकण्यास चुकणार नाहींत, अशी आम्हास आशा आहे.

# * शिष्टाई लाथाडली गेली !

गेल्या वर्षापासून राष्ट्रीय-सभेसंबंधीची हकीकत ज्यांनीं लक्षपूर्वक वाचली आहे त्यांच्या ध्यानांत असेलच कीं, सुरतची राष्ट्रीयसभा मोडल्यानंतर आमच्याकडे शिष्टाई करण्यासच कोणी सुरतेस आले नव्हतें असा मवाळांनीं कांगावा केला होता. दोनहि पक्षांत समेट करण्यास आम्ही राजी होतों, कलकत्त्याच्या चार ठरावांसंबंधानें आमचें भांडणच नव्हतें, राष्ट्रीय पक्षाचे मनांत कांहीं तरी कुसपट काढून सभा मोडावयाची होती म्हणून त्यांनीं हा प्रसंग आणला, अशा सामोपचाराचे बोलण्यानें मवाळपक्ष आपली लंगडी बाजू सावरून धरीत होता. शिष्टाई केली कोणी व केव्हां, असा त्यांचा बेशरमपणाचा प्रश्न त्यावेळीं होता. सुरतेस करण्यांत आलेल्या शिष्टाईला साक्षीदार होते; शिष्टाईची सर्व जुळवाजुळव कशी झाली या संबंधाच्या हकीकती रोजच्यारोज राष्ट्रीयपक्षाच्या परिषदेंत सांगण्यांत येत होत्या; लाला लजपतराय, बाबू मोतिलाल घोस, प्रो. गज्जरसारखे पंजाब, कलकत्ता व मुंबई येथील प्रतिष्ठित गृहस्थ शिष्टाईच्या उद्योगांत गुन्तलेले होते; म्हणून त्यावेळीं राष्ट्रीयपक्षाची सत्यता लोकांच्या निदर्शनास आणतां आली. नाहीं तर आपल्या श्रीमंतीनें व अधिकाऱ्यांपाशीं असलेल्या वजनानें मवाळांनीं राष्ट्रीय-पक्षास खोटा ठरविण्यास कमी केलें नसतें ! मवाळांचा लपंडाव अशा रीतीनें चव्हाट्यावर आल्यानंतर योग्य अटींवर समेट करण्यास मवाळपक्ष तयार होईल अशी सर्वांना आशा वाटत होती. ध्येय व उद्देश यांत अंतर असलें म्हणून काय झालें; फूल व फळ यासंबंधाचा भेद महत्वाचा कां मानावा; मोहोर काय अंबा काय, दोहोंसंबंधाचा विचार कोय रुजत

---

* केसरी, २४ नोव्हेंबर १९०८

घोळत असतांना निरर्थक होय; या समजुतीनें बंगालच्या प्रांतिक सभेचे वेळीं बाबू अरविंद घोष यांनीं मवाळांचें "स्वराज्य" कबूल केलें. ध्येय नेहमीं पिनलकोडाच्या वरचें असतें; ध्येयाला परिसीमा इहलोकचा कोणताहि कायदा घालूं शकत नाहीं; रोजच्या व्यवहारांशीं व प्रासंगिक वर्तनाशीं ध्येयाचा संबंध येऊन पोचण्याची वेळ येईतों ध्येयासंबंधाचा वाद केवळ शब्दसृष्टींतला आहे; या गोष्टी विलायतेंतील व हिंदुस्थानांतील विचारी लोकांच्या ध्यानांत आतां येऊन चुकल्या आहेत. ध्येयासंबंधानें वरील तऱ्हेचींच मतें लॉर्ड मोर्ले यांचीं आहेत. तेव्हां राजकीय व्यवहाराच्या दृष्टीनें विचार केला असतांना, लो. टिळक किंवा नामदार गोखले ह्यांमध्यें उद्देशासंबंधानें भेद नाहींत असेंच म्हणावें लागतें. मि. लेव्हीनसन व मुंबईचा टाइम्स यांनींहि अशाच रीतीनें आपला अभिप्राय दिलेला आहे. अशी स्थिति असल्यावर समेट होण्यास अडचण कोणती ? आजपर्यंतची

## समेटाची वाटाघाट

वाचल्यावर समेट कां होत नाहीं, हें सर्वांना गूढ होऊन बसतें ! सुरतेस समेटासंबंधानें झालेले प्रयत्न एक बाजूस ठेवले तरी त्यानंतरचे प्रयत्न कांहीं मवाळांनीं फेटाळून देण्यासारखे नव्हते. सुरतेनंतरचा पहिला प्रयत्न पबना येथील प्रांतिक सभेंतील एकी होय. त्या सभेच्यावेळीं "अमृत बझार पत्रिकेचे" संपादक बाबू मोतीलाल घोस ह्यांनीं बाबू सुरेंद्रनाथ बॅनर्जी व बाबू अरविंद घोस यांमध्यें जिल्हा सभा, प्रांतिक सभा व राष्ट्रीय सभा, यासंबंधानें पूर्ण एकी केली. मवाळांचें "स्वराज्य" राष्ट्रीय पक्षानें कबूल केलें; आणि स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण, या राष्ट्रीय ठरावाला सुरेंद्रबाबूंनीं पूर्ण पाठिंबा दिला. पबनाचे प्रांतिक सभेनंतर पुण्याचे जिल्हा सभेंत नामदार गोखले यांचे सर्व्हंटाचें संमतीनें राष्ट्रीय सभेंतील समेटाच्या संबंधाचा ठराव पास झाला. हा ठराव सर्व पक्षांच्या संमतीनेंच झाला होता; इतकेंच नव्हे तर

ठरावाची भाषा नामदार गोखले यांच्या अनुचरांनींच आपापसांत खल करून स्वतः लिहिली होती. तिसरा प्रयत्न धुळ्याच्या प्रांतिक सभेच्या वेळीं झाला. इंग्रजी साम्राज्य हिंदुस्थानांतून हाकून देण्याच्या उद्देशानें ह्या राजकीय चळवळी करण्यांत येत नसतात, यासंबंधानें संशयी मवाळांच्या मनांत किंतु राहूं नये म्हणून वसाहतीच्या वरचें "स्वराज्य" कोणीहि मागितलें नाहीं. ह्या वेळींहि दादाभाईच्याच "स्वराज्या"चा उद्देश डोळ्यांपुढें ठेवून आम्ही काम करीत आहों असें एक तऱ्हेनें जाहीर करण्यांत आलें. सर्व पक्षांची मिळून एकच काँग्रेस असावी असें ह्याहि प्रसंगीं ठरलें. यानंतर मवाळांच्या कन्व्हेन्शनवाल्यांशीं समेटाचें बोलणें लावण्याचा पुष्कळांनीं प्रयत्न केला; पण रा. ब. जोशी यांच्यासारख्यांच्या पत्रांना औपचारिक उत्तर पाठविण्याचाहि शिष्टसांप्रदाय कन्व्हेन्शनवाल्यांनीं सोडून दिला ! साताऱ्याच्या लोकांनीं जाहीर सभा भरवून एक तडजोड सुचविली; पण आतां कोणाचेंहि कांहींहि आम्ही ऐकणार नाहीं, अशा अर्थाचें उद्दाम-पणाचें उत्तर नामदार खरे यांनीं रा. ब. पाठक यांच्यासारख्या वयोवृद्ध गृहस्थाला दिलें व मुंबईच्या "दिवटीनें" रा. ब. पाठक यांच्या मास्तरकीची कुचेष्टा आरंभिली ! राष्ट्रीय पक्षानें समेटाकरितां केलेले प्रयत्न अशा रीतीनें व्यर्थ गेल्यानंतर कन्व्हेन्शनवाल्यांचा हट्ट लोकांना स्पष्ट दिसूं लागला. इतक्यांत

## भूपेंद्रबाबूंची तडजोड

गेल्या पंधरवड्यांत लोकांचे पुढें आली. या तडजोडीचा पूर्ववृत्तांत ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. सुरतेस बंगालचे बरेच प्रतिनिधि कलकत्त्याचे चार ठरावांना अनुकूल होते. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी या चार ठरावांच्या बाजूचेच होते; व सुरेन्द्रबाबूंचे मार्फत बाबू मोतिलाल घोस यांनीं समेटाचें

बोलणें लावलें होतें. सुरतेच्या राष्ट्रीय सभेच्या पहिल्या दिवशीं समेट होण्याचीं पूर्ण चिन्हें दिसत असतांहि ऐत्यावेळीं समेट लाथाडला गेल्यामुळें एकाएकीं साहजिकपणें क्षुब्ध झालेल्या लोकमताच्या विराट स्वरूपांत सुरेंद्रबाबूंचें भाषण कोणासहि ऐकूं आलें नाहीं, व दुसरे दिवशीं लो. टिळक भाषण करण्याकरितां उभे राहिले असतांना मारण्यांत आलेला जोडा लो. टिळक यांना न लागतां सुरेन्द्रबाबूंना चाटून नामदार मेथा बसले होते तेथपर्यंत पोहोंचला ! या दोनहि प्रसंगांचा पूर्ण फायदा घेऊन राष्ट्रीय पक्षाविरुद्ध सुरेन्द्रबाबूंचे मनांत मवाळांनीं खोटयानाटया गोष्टी भरविल्या. सुरेन्द्रबाबू हाडाचे राष्ट्रीय पक्षाचे असल्यामुळें मवाळांचा या बाबतींतील खोडसाळपणा थोडयाच अवकाशांत त्यांच्या ध्यानांत आला व पबनाचे प्रांतिक सभेचे वेळेला ते खरी स्थिति समजून चुकले. यानंतरचे अलाहाबादचे कन्व्हेन्शन कमिटीचे बैठकीच्या वेळीं सर्व पक्षांची मिळून राष्ट्रीय सभा व्हावी, या धोरणानें त्यांनीं बहुत प्रयत्न केला; पण त्यावेळींहि मुंबईच्या मवाळांनीं त्यांच्या शहाणपणाच्या उपदेशाचा उपमर्द केला ! पुढें जसें व्हावयाचें असतें त्याप्रमाणें अगोदर दुष्टबुद्धि निपजते म्हणून म्हणतात; तें खोटें नाहीं. बंगालच्या मतांना फेटाळून लावून मुंबईच्या मवाळांनीं अलाहाबादेस आपलाच हेका चालविला, या

## दुष्ट कृत्यांचीं कडू फळें

एप्रिल व मे महिन्यापासून दिसण्यास सुरवात झाली. बंगालच्या फाळणी-पासून बंगाल्यांत राजकीय चळवळीकडे सर्व लोकांचें विशेष लक्ष गेलें; आणि स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या त्रयीच्या चरणीं स्वतःला वाहणारे तरुण बंगाल्यांत चोहींकडे दृष्टीस पडूं लागले. स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण, या कायदेशीर, सनदशीर व इंग्लंडच्या इतिहासाला संमत असलेल्या चळवळींना सर्व हिंदुस्थानांतील सर्व विचारी लोकांचा

पाठिंबा असावयास पाहिजे होता. कन्व्हेन्शनवाल्यांनीं हा पाठिंबा देण्याचें नाकारल्यामुळें तरुणांच्या मनाची चलबिचल झाली. निरनिराळ्या प्रसंगीं हिंदुस्थानांतील आजकालच्या राजकीय चळवळीला कोणतें स्वरूप असावें, याचा निर्णय कॉंग्रेस दरसाल एकमतानें करीत असते. कॉंग्रेसचें अशा प्रकारचें एकमत म्हणजे राजकीय चळवळींतील एकतऱ्हेची शास्त्राज्ञाच होय. राजकीय चळवळींत कार्य कोणचें व अकार्य कोणचें, यासंबंधानें मनांत संदेह उत्पन्न झाला असतां कॉंग्रेसची शास्त्राज्ञा कोणती आहे हें पाहून त्याप्रमाणें वर्तन करण्याची तरुणांना संवय लागली आहे. "तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ" अशी भगवद्गीतेची आज्ञा असल्यामुळें कॉंग्रेसच्या ठरावाकडे संशयमग्न लोक निर्णयाकरितां पहात असतात. पूर्वीची अर्जांची चळवळ निष्फळ झालेली पाहून उदास व "धर्मसंमूढ" झालेल्या तरुणांना काशी व कलकत्ता येथील राष्ट्रीय सभांनीं स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण, हा स्वावलंबनाचा मार्ग अर्जांच्या मार्गाबरोबरच आक्रमण्यास सांगितलें. जुन्या नव्या मार्गांच्या या संमिश्रणावर राष्ट्रांतील सर्व पुढाऱ्यांनीं जर सर्व भिस्त ठेवली असती तर राजकीय चळवळीच्या ह्या कायदेशीर, सनदशीर व इतरांस संमत मार्गाबद्दल कांहीं बंगाल्यांचीं मनें बिलकूल संशयग्रस्त झालीं नसतीं. बॉंब प्रकरणासंबंधानें लिहितांना "रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यू"चे संपादक मि. स्टेड यांनीं असें मत दिलें आहे कीं, स्वदेशी-बहिष्कारासारख्या चळवळीचा ओनामा होण्याचे वेळींच बॉंबसारख्या आततायीपणाच्या (Felonous) मार्गास कांहीं बंगाल्यांनीं लागण्याची जरुरी नव्हती. निराशेच्या व माथेफिरूच्या वेडेपणाचे हे अत्याचार असतात. स्वदेशी व बहिष्कार या मार्गासंबंधानें तरुणांचीं मनें नाहक संशयग्रस्त करून निराशा उत्पन्न करण्यास अलाहाबादची कन्व्हेन्शन बऱ्याच अंशीं कारणीभूत झाली. अलाहाबादची कन्व्हेन्शन म्हणजे स्वदेशी, बहिष्कार

नगर वाचनालय, सातारा.



व राष्ट्रीय शिक्षण या त्रयीच्या पक्षाचा लपंडावानें केलेला पराभव होय. केवळ अर्जांच्या मार्गावरचा विश्वास अनुभवानें व कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेनें उडविलेला व त्रयीच्या स्वावलंबनाच्या मार्गाची विटंबना कन्व्हेन्शननें आरंभिलेली. अशा वेळीं बंगाल्यांतील कांहीं तरुणांनीं "धर्मसंमूढ" व्हावें यांत कोणतें नवल? अर्जांच्या सभा "जेवूं घालीत" नाहींत, व स्वावलंबनानेंहि उपाशी रहाल अशी मवाळ पुढारी धमकी देतात; अशा पेंचांत असतांना आततायीपणाचा भलताच मार्ग बंगाल्यांना सुचलेला असला पाहिजे. कॉंग्रेसच्या शास्त्राज्ञेचें छत्र सर्व तरुण उत्साही व मेहनती राष्ट्रभक्तांच्या डोक्यावरून काढून घेण्याचा प्रयत्न कन्व्हेन्शनवाल्यांनीं सुरतेस करून त्या प्रयत्नांतील हद्द अलाहाबादेस कायम केल्यानें बंगाल्यांत कांहीं तरुण कायदेशीर, सनदशीर व इतिहाससंमत बंधनाच्या बाहेर कसे बहकले याची कहाणी येथें सांगण्याची जरुरी नाहीं. बंगाल्यांतील अत्याचारांना सुरवात झाली; कांहीं अंशानें "कार्य" झालेल्या गोष्टींना स्वतःच्या कृतींच्या "कारणा"च्या ठिकाणीं अप्रत्यक्ष रीतीनें ठेवण्यास कन्व्हेन्शनवाल्यांनीं आरंभ केला; आणि लो. टिळक यांच्यासारख्या कायदेशीर, सनदशीर व इतिहाससंमत मार्गानें जाणाऱ्या पुढाऱ्यांना कारागृहवास भोगावा लागला. कन्व्हेन्शनच्या दुहीचीं हीं कडू फळें देशाला सोसावीं लागल्यानंतर तरी कन्व्हेन्शनवाले शुद्धीवर येतील व बेकीची एकी करतील, असें सर्व विचारी लोकांना वाटलें. यावेळीं राष्ट्रीय सभेच्या लोकांनीं केलेले प्रयत्न मुंबई इलाख्यांत निष्फळ झाले; पण

## स्वकीयांचा सल्ला

कन्व्हेन्शनवाले झुगारून देतील असें कोणास वाटलें नव्हतें. पंधरा दिवसांपूर्वी कलकत्त्यास "कॉंग्रेस कंटिन्युएशन कमिटी" ची बैठक व्हावयाचे प्रसंगीं भूपेंद्रबाबूंनीं जेव्हां पुन्हां समेटाचें बोलणें लावलें, तेव्हां कॉंग्रेसवाल्यांनीं

त्यांच्या गैरशिस्त अटी एकी व्हावी या एकाच सद्बुद्धीनें कबूल केल्या. सुरेन्द्रबाबू कॉंग्रेसवाल्यांपैकीं नसून कन्व्हेन्शनवाल्यांपैकीं आहेत; सुरेन्द्रबाबू कॉंग्रेसवाल्यांचे पक्षपाती आहेत, व कलकत्त्याचे चार ठरावांकडे त्यांचा सहज ओढा आहे; तेव्हां त्यांनीं केलेली मध्यस्थी एक वेळ कन्व्हेन्शनवाल्यांना तितकी सुखाची वाटली नसती. पण भूपेन्द्रबाबूंची तशी गोष्ट नाहीं. सुरेन्द्रबाबूंचे अनुयायांत सर मेथा यांचा पक्का कैवारी जर कोणी असेल तर तो भूपेन्द्रबाबू होय. सुरेन्द्रांची मध्यस्थी कृष्णशिष्टाईसारखी झाली असती; पण भूपेन्द्रांची मध्यस्थी म्हणजे खुद्द धृतराष्ट्रानें किंवा गांधारीनें दुर्योधनास सल्लामसलत देण्यासारखें होतें. सर मेथा व सर भूपेन्द्रनाथ यांचा परस्परसंबंध राजकीय चळवळींत एका कुटुंबांतील माणसांसारखा आहे. कलकत्त्यास गेलेल्या महाराष्ट्रांतील व इतर ठिकाणच्या कॉंग्रेसवाल्यांनीं भूपेन्द्रांचे समेटास आपली संमति मोकळ्या मनानें दिली, यांतील इंगीत झालें तरी हेंच होय. सुरेन्द्रबाबूंचा समेट कन्व्हेन्शनवाले ऐकतील न ऐकतील, तेव्हां कॉंग्रेससंबंधानें व्यर्थ कालक्षेप करण्यांत अर्थ नाहीं, असें परवां कलकत्त्यास कॉंग्रेसवाल्यांना वाटलें असतें; पण भूपेन्द्रबाबू स्वतः समेट करण्यास आल्यामुळें केवळ एकीकरणाचे बुद्धीनें सर्वांनीं स्वच्छ व निर्मळ अंतकरणानें समेटास संमति दिली. कॉंग्रेसवाल्यांनीं दिलेली संमति बिलकूल खोटेपणाची नव्हती; कारण भूपेन्द्रबाबू सद्हेतूनें प्रेरित होते, हें सर्वांना माहीत होतें. कन्व्हेन्शन राष्ट्रीय सभेला बुडविणारी असली तरी तिचें राजकीय चळवळीच्या उद्देशासंबंधाचें मूलतत्त्व सर्वांनीं कायमचें कबूल करावें व इतर नियम एक वर्षापुरते कबूल करावेत, अशी कन्व्हेन्शनवाल्यांना अनुकूल पहिली अट होती. कन्व्हेन्शननें राष्ट्रीय सभेचे नियम कसे उधळून दिले आहेत व पूर्वपरंपरा मोडून टाकून मूठभर लोकांची अरेरावीची सत्ता स्थापन करण्याचा कसा प्रयत्न केला आहे,

ह्याचें विवरण गेल्या तीन लेखांत आम्हीं केलेंच आहे. आज दुसरीकडे राष्ट्रीय सभेच्या जुन्या स्वरूपाची तुलना कन्व्हेन्शनच्या स्वरूपाशीं करून दोहोंतील भेद स्पष्ट दाखविणारा एक महत्त्वाचा लेख प्रसिद्ध केलेला आहे; तो वाचला म्हणजे कन्व्हेन्शनच्या रचनेच्या नादानपणाविषयीं कोणासच शंका रहाणार नाहीं. ज्या कन्व्हेन्शनच्या बाजूला पूर्वपरंपरा नाहीं, लोकमताला मान देणारी व्यवस्था नाहीं व कॉंग्रेसकरितां रचना तयार करण्याचा हक्कहि नाहीं, त्या कन्व्हेन्शनचें म्हणणें एक वर्षापुरतें तरी सही करून कबूल कां करावें? हा कोटिक्रम सयुक्तिक असतांनाहि केवळ एकीच्या सद्बुद्धीनें कॉंग्रेसवाल्यांनीं भूपेन्द्रबाबूंचें म्हणणें कबूल केलें. विरुद्ध पक्षापुढें अशा रीतीनें नमण्याचें कबूल करण्याबद्दल विरुद्ध पक्षास–म्हणजे खुद्द जुन्या कॉंग्रेस सभेस–कॉंग्रेसचेच पूर्वीचे चार ठराव कायम करण्याची पुढाऱ्यांपुरती हमी व रचनेचे नियम सर्व हिंदुस्थानच्या नवीन कमिटीकडून फिरवून घेण्याबद्दलची खात्री देवविण्याचें आश्वासन भूपेन्द्रबाबूंनीं दिलें. पण हे चार गांव तरी युधिष्ठिराला द्या, म्हणून सांगणाऱ्या भूपेन्द्रांचे मार्गांत सर

## मेथाजींचा हट्ट

आडवा आला; भूपेन्द्रांचा समेट गेल्या आठवड्यांत मुंबईच्या कन्व्हेन्शनवाल्यांनीं लाथाडून टाकला! खुशाल दोन पक्ष होऊं देत, एका कॉंग्रेसच्या दोन सभा झाल्या तरी बेहेत्तर, असा सर मेथा ह्यांचा हेका असल्यामुळें मुंबईच्या अग्रावरील कणहि देण्यास कन्व्हेन्शनच्या सेक्रेटरींना अधिकार नाहीं, असें कलकत्त्यांतील कन्व्हेन्शनवाल्यांना चक्क बेपर्वाईचें व उद्धटपणाचें उत्तर देण्यांत आलें! सर मेथा यांचा हा अहंकार 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' ह्या म्हणीप्रमाणें राजकीय चळवळींत नवीन दुही उत्पन्न करण्यास कारणीभूत झाला आहे. चांगुलपणानें वागणाराशीं सर मेथा खोटेपणानें वागत आहेत; व ह्या वर्तनाचा परिणाम कन्व्हेन्शनवाल्यांना

आ।१।६२ १०३०४

अपायकारक झाल्यावांचून रहाणार नाहीं. शिष्टाईचे वेळीं श्रीकृष्णानें दुर्योधनास सांगितलें कीं, ( आत्मानं तक्षति ह्येष वनं परशुना यथा। यः सम्यग्वर्तमानेषु मिथ्या राजन् प्रवर्तते ॥ ) सज्जनाशीं असलेलें तुझें खोटें वर्तन कुऱ्हाडीच्या दांड्याप्रमाणें तुझ्या स्वतःचे पक्षाचे नाशास कारणीभूत होईल. श्रीकृष्णाची ही उक्ति सांप्रतच्या प्रसंगीं कन्व्हेन्शनवाल्यांना बरोबर लागू पडते. कन्व्हेन्शनवाले कॉंग्रेसच्या सज्जनांशीं दुर्वर्तन करीत आहेत, ह्याबद्दल जर कोणास शंका असेल तर त्यानें सर फेरोजशहा मेथा यांनीं समेटाच्या कामांत बाबू भूपेन्द्रनाथ यांना लिहिलेलें पत्र वाचावें. ह्या पत्रांत

## कॉंग्रेसवाल्यांची नालस्ती

निःशंकपणें केली असून कन्व्हेन्शनवाल्यांनीं आपली जुन्या धर्तीची कॉंग्रेस खुशाल भरवावी, असें सर्व कॉंग्रेसवाल्यांना एक तऱ्हेचें आव्हानहि केलें आहे ! एकी न करण्याचें एक प्रधान कारण सर मेथा येणेंप्रमाणें म्हणतातः— " मुंबई इलाख्यांतील नव्या पक्षाच्या पुढारी म्हणविणाऱ्या लोकांसंबंधानें मी हें खात्रीपूर्वक सांगूं शकतों कीं बेकायदेशीर अशा हेतूकरितां व मार्गाकरितां कॉंग्रेसचा उपयोग घ्यावा अशी कांहींची गुप्त इच्छा आहे. " ( I can speak with authority as regards extremist leaders in the Bombay Presidency that some secretly cherish the idea of using the Congress for aims and methods not altogether constitutional. ) हें वाक्य लिहितांना नव्या पक्षाचे कोणते पुढारी सर मेथा यांच्या डोळ्यांपुढें असले पाहिजेत, हें ' केसरी 'चे वाचकांना सांगण्याची जरुरी नाहीं. लो. टिळक राजकीय चळवळीच्या मैदानावर सामने उभे असतांना जीं वाक्यें लिहिण्याची कन्व्हेन्शनवाल्यांना छाती झाली नसती तीं वाक्यें लोकमान्यांच्या तुरुंगवासाचे प्रसंगीं दिमाखानें व तोऱ्यानें कन्व्हेन्शनच्या पुढाऱ्यांनीं लिहावीं हें त्यांच्या दुर्वर्तनास साजेसेंच आहे.

सर मेथा ह्यांच्या ह्या वाक्याचा मथितार्थ इतकाच आहे कीं, बाँब गोळा फेकणाऱ्यांसारख्या बेकायदेशीर मार्येफिरूंचीं कामें काँग्रेसच्या मदतीनें पार पाडून नेण्याचा लो. टिळक व इतर काँग्रेसवाले ह्यांचा गुप्त उद्देश असल्यामुळें आम्ही त्यांच्याशीं संबंध ठेवूं इच्छित नाहीं. 'केसरी'वर खटला करण्याची इच्छा सरकारास कशी झाली, ह्याचा उलगडा इतक्या दिवस आम्हांस बरोबर करतां येत नव्हता; पण सर मेथा ह्यांचें हें पत्र वाचल्यापासून कांहीं कन्व्हेन्शनवाल्यांच्या अस्पष्ट चुगल्या ह्या कामीं खर्चीं पडल्या असाव्यात, असा अंदाज बांधण्यास बराच भक्कम आधार मिळाल्यासारखें आम्हास वाटत आहे. सर फेरोझशहा मेथा यांना स्पष्टपणें आम्हीं येथें असें कळवितों कीं, ह्या संबंधाची तुमची बातमी सपशेल खोटी असून पुणेमुंबईच्या कोणातरी खुनशी मनुष्यानें लो. टिळक ह्यांचा उत्कर्ष सहन न होऊन भलतीच हकीकत सांगून तुम्हाला फशीं पाडलें आहे. सर मेथा हे इतक्या हलक्या कानाचे असतील असें आम्हांस वाटलें नव्हतें. सर मेथांसारखे पुढारी जर ह्या कामीं फसले जातात, तर परकीय सरकारचे अधिकारी कांहीं चुगलखोर मवाळांच्या जाळ्यांत गुरफटले गेल्यास आश्चर्य कोणचें ? पुण्यांत कांहीं लोक अमके तमके बाँबच्या बाजूचे आहेत, तेव्हां त्यांचा काँग्रेसशीं संबंध ठेऊं नका, असें प्रतिष्ठितपणें सांगत असतात, ही गोष्ट खरी आहे. पण असल्या खोडसाळ गप्पांचा सर मेथांसारख्या पुढाऱ्यांवर असला परिणाम होईल, अशी आमची मनोदेवता आम्हास सांगत नव्हती. सर मेथा किंवा कन्व्हेन्शनवाले यांनीं हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं काँग्रेसचा पक्ष कोणत्याहि मार्येफिरूपणाच्या किंवा आततायीपणाच्या कृत्यास संमति देणारा नाहीं; इतकेंच नव्हे तर असल्या कृत्यांचा स्पष्टपणें निषेध करणारा आहे. काँग्रेसला कोणतेंहि बेकायदेशीर, बेसनदशीर व इतिहासाला संमत नसलेलें कृत्य नको आहे व असल्या कृत्यांनाहि काँग्रेसच्या संमतीची अपेक्षा नाहीं.

दोघांचे रस्ते विरुद्ध; तेथें कोण कोणाच्या मदतीची अगर संमतीची इच्छा धरणार ? ही साधी गोष्ट सर मेथा यांना समजूं नये हें कॉंग्रेसचें दुर्दैव होय. राजकीय चळवळींत पडलेल्या तरुणांना

## कॉंग्रेसचें छत्र

आपल्या मस्तकावर पाहिजे आहे; ह्यांतील हेतु दुर्वर्तनावर चांगुलपणाचें पांघरूण पडावें असा बिलकूल नसून एक सत्कार्य सुलभ व्हावें, एवढाच आहे. कॉंग्रेसच्या छत्राखालीं स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण यांचा फैलाव प्रत्येक शहरांत, प्रत्येक गांवांत, प्रत्येक खेडयांत व प्रत्येक झोंपडींत करावयास सांपडावा, ही सात्विक महत्त्वाकांक्षा दुष्ट हेतूची आहे काय ? सुरतेची राष्ट्रीय सभा मोडल्यानंतर सर मेथा व डॉ. राशबिहारी घोस यांचीं पत्रें मुंबईच्या टाइम्समध्यें प्रसिद्ध झालीं होतीं. सर मेथा यांनीं आपल्या पत्रांत बहिष्काराच्या चळवळीविरुद्ध आपलें मत स्पष्ट दिलें होतें. कलकत्त्याचे कॉंग्रेसचे वेळींहि स्वदेशीच्या ठरावांत "झीज सोसूनहि" ( Even at a sacrifice ) हे शब्द घालण्यास ते तयार नव्हते. स्वदेशीवाल्यांनीं सर मेथा यांच्याकरितां काय कॉंग्रेसमध्यें आपलीं मतें सोडून द्यावींत ? या स्वदेशीच्या पक्षास कॉंग्रेस पूर्णपणें अनुकूल आहे, असें श्रीक्षेत्र काशी येथें व कलकत्ता येथें मुक्रर ठरलेलें आहे. मग सर मेथा यांच्या हट्टाकरितां कॉंग्रेसची फिरेहाट कां ? स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या ठरावांवरहि कॉंग्रेसचें छत्र कायम रहावें, अशी सूचना सभेचे वेळीं भूपेंद्रबाबूंनीं केली; पण अशी सूचना करणें हें भयंकर उद्दामपणाचें ( Impudent ) लक्षण आहे, असा सक्क जबाब कलकत्त्याचे कन्व्हेन्शनवाल्यांना सर मेथा यांनीं दिला. त्यावरून कन्व्हेन्शनवाल्यांच्या मनांत कॉंग्रेसचें छत्र वरील तीन ठरावांवरून काढून घेण्याचें पाप वसत आहे, यांत संशय नाहीं. कन्व्हेन्शनवाले अशा रीतीनें सदर तीन ठरावांनी पोसलेल्या निरनिराळया चळवळींना हाणून

नगर वाचनालय, सातारा.



पाडावयास सज्ज झाले आहेत. इतकेंच नव्हे तर जे कोणी आपल्या माना त्यांच्या अरेरावी जुवाखालीं देण्यास निमूटपणें तयार होणार नाहींत, ते बाँबच्या पक्षाचे आहेत अशी त्यांची नालस्ती करण्यास ते मागेंपुढें पहाणारे नाहींत ! भूपेंद्रबाबूंचा समेट अशा दुर्वर्तनानें लाथाडला गेला असल्या कारणानें लोकांचें

## काँग्रेससंबंधानें कर्तव्य

कोणतें, याविषयीं आतां विचारी लोकांत मतभेद होण्याचें कारणच उरलें नाहीं. काँग्रेसवाले जर यंदा गप्प बसले तर कनव्हेन्शननें सर मेथा यांच्या पत्राचे मार्गानें अंगावर टाकलेला बाँब अंगावरीच चिकटून बसेल. तेव्हां दुसऱ्या कोणत्याहि कारणाकरितां नाहीं तरी आपलें कायदेशीर, सनदशीर व इतिहाससंमत स्वरूप उज्ज्वल राखण्याकरितां काँग्रेस कन्टिन्यूएशन कमिटी यंदा भरविली पाहिजे असें आमचें मत आहे. कनव्हेन्शनमध्यें सामील न होणाऱ्या लोकांची सर मेथा यांनीं नालस्ती केली आहे; अशा नालस्तीच्या वेळीं काँग्रेसला तिच्या शत्रूंच्या दाराकडे लोटणें केव्हांहि न्यायाचें व सज्जनपणाचें होणार नाहीं. समेट होत नाहीं असें ठरल्यानंतर कुंतीनें श्रीकृष्णाबरोबर युधिष्ठिराला जो निरोप पाठविला होता तोच निरोप कलकत्त्याची राष्ट्रीयसभा सर्व राष्ट्रभक्तांना आज पाठवीत आहे. "इतो दुःखतरं किं नु यदहं दीनबांधवा। परपिंडमुदिक्षे वै त्वां सूत्वाऽमित्रनंदन॥ युद्धस्व राजधर्मेण मा निमज्जीः पितामहान्। मा गमः क्षीणपुण्यस्त्वं सानुजः पापिकां गतिम्॥" कलकत्त्यास राष्ट्रीय सभेचे इतके कैवारी राष्ट्रीयसभा प्रसविली असतां ह्या राष्ट्रभक्तांनीं राष्ट्रीय सभेला स्वावलंबनाचे मार्गावरून काढून परपिंड खाणाऱ्यांत ढकलावें हें सर्व राष्ट्रभक्तांना लांछनास्पद आहे. सर मेथा यांनीं राष्ट्रीय सभेवर अराजकत्वाचा ठपका पर्यायानें ठेवलेला आहे; व म्हातारपणीं दुसरें लग्न करणारा पूर्वीच्या कुटुंबीयांना बाहेर ठेवून

घरांत खुशाल मौज करितो, त्याप्रमाणें सर मेथा कलकत्त्याचे जुन्या ठरावांना गचांडी मारून रस्त्यांत हाकून लावण्याची इच्छा करीत आहेत. या ठरावांवरचें काँग्रेसचें छत्र काढून घेऊन जर यांना उन्हांत सोडण्यांत आलें तर यांच्या चळवळीचा फैलाव केव्हांहि सुगम होणार नाहीं. कारण राष्ट्रीय सभेच्या शास्त्राज्ञेचा पाठिंबा या ठरावांपासून काढून घेतल्यासारखा होतो, व सामान्य लोकांच्या दृष्टीनें हे ठराव एक तऱ्हेनें निराधार होतात. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां वरील दोन कार्याकरितां जुन्या पद्धतीची राष्ट्रीय सभा यंदा पुढील महिन्याचे शेवटचे आठवड्यांत नागपुरास भरणें अत्यंत अवश्य आहे. ह्या गोष्टींचा कायम निर्णय करण्याकरितां काँग्रेस कंटिन्युएशन कमिटीचे कलकत्त्यास नेमले गेलेले सेक्रेटरी रा. ब. चिंतामणराव वैद्य यांनीं येते शनिवारीं सायंकाळीं मुंबईस "राष्ट्रमत" कचेरींत काँग्रेस कंटिन्युएशन कमिटीची सभा बोलाविली आहे. या सभेचे वेळीं नागपुरास काँग्रेस भरविण्याचें ठरल्यावांचून रहाणार नाहीं, अशी आम्हांस उमेद आहे. ह्या कार्यास आतां अवकाश फार उरला नाहीं व एकट्या मध्यप्रांताचे हातून योग्य वेळांत हें कार्य पार पडणें शक्य नाहीं. तेव्हां महाराष्ट्रांतील काँग्रेसभक्तांनीं कंटिन्युएशन कमिटीच्या सभेच्यावेळीं हजर राहून किंवा पत्र पाठवून अगर तार करून यंदाच्या राष्ट्रीय सभेच्या बैठकीस द्रव्यद्वारा किंवा इतर रीतीनें कोणती मदत करण्यास आपण तयार आहोंत, हें रा. ब. चिंतामणराव वैद्य यांना कळविण्यास चुकूं नये, इतकी राष्ट्रभक्तांना आमची विनंति आहे.

# नागपुरची राष्ट्रीय सभा

गेल्या खेपेस जाहीर केल्याप्रमाणें शनिवार तारीख २८ नोव्हेंबर रोजीं मुंबईस "राष्ट्रमत" कचेरींत "कॉंग्रेस कंटिन्युएशन कमिटी"ची सभा भरली होती. त्यावेळीं चालू महिन्यांत नाताळचे सुट्टींत नागपूर येथें पूर्वीच्या वहिवाटीप्रमाणें राष्ट्रीय सभा भरविण्याचा ठराव पास झाला, व त्याप्रमाणें नागपूरच्या राष्ट्रीय सभेची तयारी करण्यास तावडतोब सुरवात झाली, हें कळविण्यास आम्हास संतोष वाटतो. वीस पंचवीस दिवसांत मंडपाची वगैरे सर्व व्यवस्था करण्याचा बोजा नागपूरचे डॉ. मुंजे वगैरे "राष्ट्रीय मंडळा"च्या उत्साही, मेहनती व कर्तव्यदक्ष सभासदांनीं आपले मस्तकावर घेतला असून नागपूरची राष्ट्रीय सभा या महिन्यांत यथासांग, यथाविधि पार पाडून देण्याची जबाबदारी मुंबई, गुजराथ, महाराष्ट्र, वऱ्हाड व मध्यप्रांत या प्रांतांवर येऊन पडली आहे. राष्ट्रीय सभेचें काम जुन्या पद्धतीवर चालविण्याचा हुरूप बाळगणाऱ्यांच्या परीक्षेची ही वेळ असून सर्व ठिकाणच्या कॉंग्रेसवाल्यांच्या मेहनतीमुळें "सर्वारंभाहि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः" या न्यायानें लहानसहान दोषांशिवाय इतर कोणत्याहि कारणानें नागपूरच्या राष्ट्रीय सभेस नांव ठेवण्यास जागा राहणार नाहीं, अशी आम्हांस आशा आहे. नागपुरास राष्ट्रीय सभा भरणार व मद्रासेंतहि कनव्हेन्शनवाले आपली मजलस भरविणार ही बातमी ऐकल्याबरोबर राजकीय चळवळींत असल्या

## दोन सभा

कशा उत्पन्न झाल्या असा पहिला प्रश्न उपस्थित होतो. या संबंधानें हें निरंतर ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, नागपूरची राष्ट्रीय सभा कनव्हेन्शनच्या

---

* केसरी ता. १ डिसेंबर १९०८.

सभेशीं स्पर्धा करण्याकरितां भरविण्यांत येत नसून राष्ट्रीय सभेची बैठक यंदा या महिन्यांत राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें भरविणें अवश्य असल्या-मुळें केवळ कर्तव्य म्हणून "काँग्रेस कंटिन्युएशन कमिटी" भरवीत आहे. कनव्हेन्शनची सभा कनव्हेन्शनवाल्यांच्या दृष्टीनें टोलेजंग झाल्यास किंवा विशेष भपकेदार दिसल्यास काँग्रेसवाल्यांना किमपिहि विषाद वाटणार नाहीं. कारण नागपूरच्या राष्ट्रीय सभेला कोणत्याहि सभेशीं वैर करण्याचें कारण नसून कोणाबद्दलहि मत्सर किंवा हेवा वाटत नाहीं. स्वदेशाच्या ऊर्जितावस्थेसंबंधानें पूर्वपरंपरेला धरून शिष्टांनीं आखून दिलेला मार्ग आक्रमीत असतांना इतरांशीं स्पर्धा करण्यास "काँग्रेस कंटिन्युएशन कमिटी"ला फुरसत कोठून मिळणार ? वैर, स्पर्धा, मत्सर, ह्या गोष्टी श्रीमंत, मिजासखोर व अरेरावी कनव्हेन्शनवाल्यांच्या ठिकाणीं एक वेळ संभवतात, पण कर्तव्यपरायण काँग्रेसवाल्यांच्या ठिकाणीं संभवतच नाहींत. सुरतेस राष्ट्रीय सभेची बैठक मोडल्यानंतर कनव्हेन्शनची ज्यावेळेस स्थापना झाली त्यावेळीं एकीची बेकी करण्याचा दुराग्रह "मेथा–गोखले आणि को" च्या ठिकाणीं पुरा भरलेला आहे, हें स्पष्ट दिसून आलें. हा दुराग्रह जर कायम राहिला, बेकीची एकी करण्याची आवश्यकता जर सर मेथा यांना दिसली नाहीं, समेटाचे सर्व उपाय जर वाया गेले, तर राष्ट्रीय सभेस कनव्हेन्शन गिळून टाकील, अशी भीति वाटली; म्हणून राष्ट्रीय सभा भर-विण्याची सर्व व्यवस्था करण्याकरितां "काँग्रेस कंटिन्युएशन कमिटी" स्थापण्यांत आली. गेल्या आठ दहा महिन्यांत समेट करण्याबद्दल ठिक-ठिकाणच्या पुढाऱ्यांनीं कोणकोणते प्रयत्न केले, शेवटीं कलकत्त्यास "अमृतबझार पत्रिके"च्या कचेरींत भरलेल्या सभेंत एक वर्षभर कनव्हे-न्शनची मजलस झाल्यावर पुढील सालापासून राष्ट्रीय सभा पुन्हां जशीच्या तशी भरेल या आशेवर काँग्रेसवाल्यांनीं यंदा काँग्रेस न भरवितां मद्रासचीच

मौज पाहण्याच्या अपायकारक अटीहि कशा कबूल केल्या, आणि शेवटीं सर मेथा यांनीं शिष्टाईचें बोलणें उद्दामपणें कसें लाथाडलें, यासंबंधीची हकीकत गेल्या अंकीं आम्ही दिलीच आहे. समेटाच्या हकिकती वाचल्या-नंतर काँग्रेसवाल्यांचा पक्ष ह्या वादांत सत्पक्ष आहे, ह्याबद्दल सर्वांची खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं. काँग्रेसचा पक्ष निर्दोषी जरी ठरला, राष्ट्रीय सभा भरविण्याचें कर्तव्य 'काँग्रेस कंटिन्युएशन कमिटी'पुढें जरी स्पष्टपणें येऊन पडलें, तरी देखील सर मेथा यांनीं काँग्रेसची गाय मार-ण्याचा निर्घृण उद्योग आरंभिला म्हणून

## समेटाचें वांसरूं

नाहींसें करण्याचा उद्योग 'काँग्रेस कंटिन्युएशन' कमिटीनें करूं नये, असा एक आक्षेप नागपूरच्या राष्ट्रीय सभेवर येण्याचा संभव आहे. सर मेथा समेटाला लाथाडतात, वारंवार शिष्टाईचे कागद फेकून देण्यांत येतात, माझ्या शिष्टाईंत दुर्दैवानें मला यश मिळालें नाहीं म्हणून भूपेन्द्रबाबू आर्तस्वरानें कळवितात, अशा स्थितींत आणखी एक वर्षभर "समेटा"च्या तान्हुल्याकडे पाहून दयार्द्र होऊन भीक घाला म्हणून 'समेटा'च्या अंगा-वरची सर मेथा यांची लाथ दाखवीत दारोदार हिंडण्यांत काय हाशिल आहे ? ह्या महिन्यांत नागपुरास राष्ट्रीय सभा भरली म्हणून पुढें एक दोन वर्षांत एकी होणार नाहीं, असें नाहीं. दोन सभा एक होतील किंवा निरनिराळ्या अशाच्या अशा राहतील. प्रत्येक पक्षाला परमेश्वर ज्या मानानें यशापयश देईल त्या मानानें पुढील तडजोडीचा प्रकार होणार असल्यामुळें, आहे या स्थितींत सर मेथा तडजोड करण्यास एक वर्षानें राजीखुषीनें कबूल होतील असें स्वप्नींहि आणावयास नको. कालानें जे रोग आपोआप शमतात, तशांतला रोग सर मेथा यांना झालेला नाहीं. मग आणखी एक वर्षभर तरी 'काँग्रेस कंटिन्युएशन कमिटी'नें कर्तव्यपराङ्मुख कां व्हावें ? कर्तव्यकर्म

करीत असतांना जर राष्ट्रीय सभेचे दरवाजे सर्वांना सारखेच उघडे ठेव-ण्यांत येत आहेत, तर मग कन्व्हेन्शनवाल्यांच्या ठिकाणीं 'समेटा'ची इच्छा योग्य रीतीची जरी दिसली तरी कॉंग्रेसवाले पुन्हां तडजोड करण्यास तयार होणार नाहींत असें कसें म्हणतां येईल? कॉंग्रेसला देशहित साधावयाचें आहे; दुही घडवून आणणें हा कॉंग्रेसचा उद्देश नाहीं. तडजोड केव्हां होत असते? दोन्ही पक्षांना एकीचें महत्त्व इतकें पटलें पाहिजे कीं, एकी राखण्या-करितां आपलीं मतें थोड्या अंशानें एका बाजूस ठेवण्यास हरकत वाटतां कामा नये. कलकत्त्याच्या चार ठरावांसंबंधानें सर मेथा यांचें असें मत आहे कीं, जुन्या तऱ्हेवर कॉंग्रेस भरविण्याकरितां स्वदेशीवाल्यांना सवलत दाखविण्याची जरुरी नाहीं. एका राष्ट्रीय सभेच्या दोन राष्ट्रीय सभा झाल्या तरी हरकत नाहीं, पण या चार ठरावांसंबंधानें तडजोड कशाला करा, अशी इच्छा कन्व्हेन्शनवाल्यांची जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत समेट कसा होणार? तडजोड म्हणजे प्रत्येक पक्षानें कांहीं तोडलें पाहिजे व कांहीं जोडलें पाहिजे. कन्व्हेन्शनवाले कांहींच देण्यास तयार नाहींत, मग त्यांचें म्हणणें सर्वस्वीं कबूल करून एकी राखावयाची काय? कांहीं देण्याघेण्यास आम्ही नेहमीं तयार असतों. हट्टाचा मार्ग आम्हीं कधींहि स्वीकारलेला नसून तडजोडीचाच सल्ला "केसरी"नें दिलेला आहे. पण समेटाची टाळी एका हातानें वाजूं शकत नाहीं व सर मेथा आपला हात मागें घेतात ह्याला कोणीं काय करावें? अशा स्थितींत कन्व्हेन्शनवाले मद्रासेंत 'कॉंग्रेस'च्या नांवाखालीं सभा भरवीत असतां नागपुरास राष्ट्रीयसभा भरविण्याचा 'कॉंग्रेस कॉंटिट्यूएशन कमिटी'चा ठराव सर्व विचारी लोकांना पसंत पडल्यावांचून राहणार नाहीं. कसेंहि असो, ह्या महिन्यांत मद्रासेस कन्व्हेन्शनवाले कन्व्हेन्शनची कॉंग्रेस भरविणार व कॉंग्रेसवाले नागपुरास राष्ट्रीय सभा भरविणार, अशा एक सभेच्या दोन सभा होणार यांत शंका नाहीं. ह्याचे

परिणाम काय होतील, कोणच्या सभेच्या हातून देशहित अधिक होईल व लोकांनीं कोणत्या सभेला उत्तेजन दिलें पाहिजे, ह्या मुद्यांचा विचार येथें करणें जरूर आहे. दोन सभा व दोन पक्ष ही जोडी एका दृष्टीनें कायम-चीच राहणार, असें सर मेथा यांच्या पत्रावरून म्हणणें भाग पडतें. या दोनहि पक्षांना एका ठिकाणीं जमण्यास व दोघांनाहि सम्मत असलेल्या तेवढयाच गोष्टींचा खल करण्यास कॉंग्रेसचा मंडप खुला असावा असें मत आम्हीं प्रतिपादन करीत आलों आहोंत. पण एका पक्षानें आपल्या मंडपाचे दरवाजे खुले ठेवले नाहींत, व दुसऱ्या पक्षानें दरवाजे खुले ठेवूनहि पहिला पक्ष हट्टानें आंत आला नाहीं, तर तत्त्वतः जरी नाहीं तरी व्यवहारदृष्टया सर्व पक्षांचा अंतर्भाव करणारी पार्लमेंटसारखी सभा भरत नाहीं, हें खरें आहे. सर मेथा जर हट्टी नसते व अशी संस्था व्यवहारदृष्टयाहि जर कायम राहिली असती तर चांगलें झालें असतें. पण जोंपर्यंत सर्वांना संमत असलेल्या गोष्टींचें महत्त्व कॉंग्रेसवाले किंवा कन्व्हेन्शनवाले विसरलेले नाहींत, तोंपर्यंत या दुहीचा दुष्परिणाम न होतां राष्ट्राच्या अभ्युदयास, हे पक्ष इंग्लंडांतील निरनिराळ्या पक्षांप्रमाणें कारणी-भूत होतील यांत संशय नाहीं. एकींत बेकी व

## बेकींत एकी

ओळखण्याची संवय हिंदुस्थानला लागणें जरूर आहे. इंग्लंडच्या इतिहासा-कडे नजर फेंकली असतां एकी न विसरतां आपल्या दृष्टीनें राष्ट्रहित साधणारे दोन पक्ष झाले म्हणून वाईट वाटण्याचें कारण रहात नाहीं. इंग्लंडमध्यें राष्ट्रीय चळवळींत स्वराज्याचे हक्क (Constitution) संपादण्या-करितां दोन पक्ष जन्मास आले त्यावेळीं आजच्या आमच्या स्थितीसारखीच त्यांचीहि स्थिति होती. सांप्रत आपण कन्व्हेन्शनच्या पक्षास ‘ भिक्षांदेहीचा पक्ष ’ ‘ अर्ज करणाऱ्यांचा पक्ष ’ असें म्हणतों; इंग्लंडांतहि ‘ कॉंझरव्हेटिव्ह ’

म्हणून जो पक्ष चालत आला आहे त्याचें अगदीं प्रारंभीचें नांव अर्ज करणारे ' Petitioners ' असें होतें. कनव्हेन्शनचा ' भिक्षांदेही 'चा पक्ष येथें सांप्रत असें सांगत असतो कीं, राष्ट्रीय पक्ष अधिकाऱ्यांबद्दल तिरस्कार दाखवितो तेव्हां हा राजद्रोह्यांचा पक्ष आहे. इंग्लंडच्या ' पिटिशनरां 'नींहि हीच युक्ति विरुद्ध पक्षास हाणून पाडण्यास उपयोगीं आणली होती; त्यावेळच्या इंग्लंडच्या लिबरल पक्षास ऊर्फ राष्ट्रीय पक्षास ' अधिकाऱ्यांचा तिरस्कार करणारा पक्ष ' ऊर्फ ' बहिष्कारवादी पक्ष ' ऊर्फ ॲभरर्स ( Abhorers) असें म्हणत. ' पिटिशनर्स ' व ' ॲभरर्स ' हीं कान्झरव्हेटिव व लिबरल पक्षांची अगदीं पहिलीं नांवें होत. यानंतर ' टोरीज ' व ' व्हिग्ज ' अशीं नांवें पडलीं. एकमेकांनीं एकमेकांची टवाळकी करण्याकरितां ज्याप्रमाणें येथें प्रारंभीं ' मवाळ ' व ' जहाल ' या नांवांचा उपयोग करण्यांत आला त्याप्रमाणें ' टोरीज ' व ' व्हिग्ज ' हे शब्द इंग्लंडांत प्रथम निंदाव्यंजक म्हणून उपयोगांत आले. कालांतरानें हे शब्द रूढ होऊन प्रत्येक पक्ष विरुद्ध पक्षानें निंदा करण्याकरितां दिलेलीं नांवें आपण होऊन वापरूं लागला. इंग्लंडांत या दोन पक्षांचीं सांप्रतचीं रूपांतरें " कॉन्झरव्हेटिव " व " लिबरल " या दोन नांवांनीं प्रसिद्ध आहेत. इंग्लंडांतील पक्षासंबंधाची ही माहिती कॉंग्रेस-वाल्यांना उत्साहजनक आहे. इंग्लंडच्या राजकीय प्रगतीच्या इतिहासांत कॉंझरव्हेटिव पक्ष निरुपयोगी जरी नसला तरी जुलमी ( Despotic) राज्य-कर्त्यांकडून स्वराज्याचे हक्क संपादन करण्याचें पुण्य लिबरल पक्षानेंच कमावलेलें आहे. राष्ट्रीय पक्ष किंवा कॉंग्रेसचा पक्ष हेंच पुण्य संपादण्या-करितां श्रम करीत आहे. इंग्लंडांत लिबरल पक्षाची तारांबळ प्रारंभीं प्रारंभीं ज्याप्रमाणें कांहीं ' पिटिशनर्स 'नीं आरंभिली व जुलमी ( Despotic) अधि-काऱ्यांच्या कानाशीं लागून ' लिबरल ' लोकांना ' ॲभरर्स ' ठरवून इंग्लंडांतील हायकोर्टाच्या जज्जांना लिबरल पक्षाची वाताहात करण्यांत आनंद मानाव-

नगर वाचनालय, सातारा



यास शिकविले, तशाच प्रकारचा उपद्व्याप 'मेथा, गोखले आणि को.' नें कन्व्हेन्शनच्या नांवाखालीं आरंभिला आहे. इंग्लंडांतील 'कॉंझरवेटिव्ह' प्रारंभीं प्रारंभीं वेकींत एकीवर लक्ष ठेवण्याचें विसरले व विरुद्ध पक्षास तुरुंगाचा रस्ता दाखविण्यास पर्यायानें अधिकाऱ्यांच्या उपयोगी पडले. इतिहासाची पुनरावृत्ति नेहमीं होत असते म्हणून म्हणतात तें खोटें नाहीं; व लो. टिळक यांना तुरुंगांत धाडण्यांत किंवा माथेफिरू तरुणांच्या हातून आततायीपणाची (Felonous) कृत्यें घडविण्यांत इंग्लंडांतील 'पिटिशनर्स' प्रमाणें हिंदुस्थानांतील 'कन्व्हेन्शनिस्ट' अज्ञानतः मदतगार झाले असल्यास त्यांत आश्चर्यहि नाहीं. इंग्लंडांत पिटिशनरांचा पक्ष जोरावर येण्याबरोबर हायकोर्टानें 'लिबरलां'ना भराभर तुरुंग दाखविले आहेत व इंग्लंडच्या राजकीय प्रगतीच्या इतिहासांतील प्रसंगोपात्त घडून आलेल्या त्याज्य अत्याचारांच्या गोष्टीहि त्याच सुमारास नमूद करण्यांत आल्या आहेत. मनुष्यांतील दुर्गुण नेहमीं निरनिराळीं नांवें समाजांत धारण करीत असतात; एका पोषाखांत त्या दुर्गुणाला ओळखतात तों त्यानें दुसरेंच नांव व तिसराच पक्ष धारण केला म्हणून समजावें! 'भिक्षांदेही' म्हणून नीट ओळखावें तों

## कन्व्हेन्शनचें कातडें

ह्यानें पांघरलेंच. स्वार्थबुद्धि व स्वार्थबुद्धीला चिकटून असलेली दुसऱ्याचा तोटा ज्ञानतः अगर अज्ञानतः करण्याची प्रवृत्ति सामान्य मनुष्यांत नेहमींच असते. कन्व्हेन्शनवाल्यांनीं सर मेथा यांच्यासारखीं विरुद्ध पक्षाच्या पुढाऱ्यांच्या बेकायदेशीर वर्तनाविषयींचीं मतें अधिकाऱ्यांच्या कानांत कोणत्याहि उपायानें कोंबल्यास त्याबद्दल तक्रार करीत बसण्यांत अर्थ नाहीं. इंग्लंडांत ह्याच गोष्टी एकेकाळीं झाल्या, हिंदुस्थानांत ह्याच गोष्टी आजमितीस होत आहेत, व स्वराज्याच्या हक्काकरितां धडपड करणाऱ्या प्रत्येक देशांत

ह्याच गोष्टी निःसंशय होतील. मनुष्यस्वभाव येथून तेथून सारखाच ! तथापि सांप्रतच्या आमच्या स्थितीबद्दल विशेष वाईट वाटतें, ह्याचें कारण इतकेंच कीं, आमच्या राजकीय चळवळींत 'लिबरल पक्षा'चें काम करणाऱ्या कॉंग्रेसमध्येंच खऱ्या लिबरलांना—राष्ट्रीय पक्षाला—'ॲभरर्स' म्हणणारे उत्पन्न झाले आणि त्यांच्यावर विश्वास टाकून बसलेल्या राष्ट्रीय सभेला उद्देशून 'श्रितासि चंदनभ्रांत्या दुर्विपाकं विषद्रुमम्' असें म्हणण्याची पाळी त्यांनीं सर्व सज्जनांवर आणली ! 'मेथा, गोखले आणि को' ह्यांचा कॉंग्रेसशीं व राजकीय चळवळींतील लिबरल पक्षाशीं जर कांहीं पूर्वीपासूनच संबंध नसता तर सर्व गोष्ट निराळी होती; पण इंग्लंडांत लिबरल पक्ष अधिकारारूढ असतांहि व लिबरल तत्त्वांचे म्होरके लॉर्ड मोर्ले हिंदुस्थानच्या वांटणीस आले असतांहि, लिबरल पक्षानें ज्या गोष्टी पूर्वी एकदां इंग्लंडांत केल्या व ज्याबद्दल आजमितीसहि लिबरल पक्षास धन्यता वाटत आहे त्याच गोष्टी हिंदुस्थानांत आज करणाऱ्या लिबरलांचा छळ करण्यास सर मेथाजींचा कॉंग्रेसशीं असलेला दृढ संबंध व त्यांची उलट्या गतीची कन्व्हेन्शन येथील कांहीं 'कॉंझरव्हेटिव्ह' अधिकाऱ्यांना उपयोगी पडत आहे, ही गोष्ट सर्व विचारी लोकांच्या मनांत शल्याप्रमाणें बोचल्यावांचून राहणार नाहीं. हिंदुस्थानांतील बरेच अधिकारी कॉंझरव्हेटिव पक्षाचे आहेत, व इंग्लंडांतील सत्ता आज लिबरल पक्षाचे हातांत आहे. हिंदुस्थानांतील लिबरलांना कांहीं विशेष परिस्थिति आल्याशिवाय इंग्लंडांतील लिबरल झाले तरी महत्त्वाचे हक्क देतील अशांतला भाग नाहीं. तथापि साधूंना साधूच ओळखूं शकत असल्यामुळें इंग्लंडांतील लिबरल आम्हां कॉंग्रेसवाल्यांना 'राजद्रोही' किंवा "ॲभरर्स" असलीं दूषणें देण्यास केव्हांहि धजणार नाहींत. मग आमचा छळ येथील कान्झरव्हेटिव्ह अधिकारी कसा करितात ह्याचें उत्तर असें आहे कीं, कॉंग्रेसशीं दृढ संबंध असलेले

'मेथा–गोखले आणि को' या ढोंगी लिबरलांच्या बेजबाबदार वर्तनामुळें इंग्लंडांतील

## लिबरल पक्षाचा गैरसमज

होऊन लिबरल प्रधानमंडळ सत्ताधारी असतांहि कॉंग्रेसवाल्यांचा हिंदुस्थानांत आजमितीस छळ होत आहे. नागपुरास यंदा कॉंग्रेस न भरवितां जर 'कॉंग्रेस कंटिन्युएशन कमिटी' गप्प बसली असती तर आमच्या लिबरल पक्षाची नालस्ती येथें व विलायतेस आणखी एक वर्षपर्यंत करण्याची मुभा आम्ही 'मेथा–गोखले आणि को.' ला दिल्यासारखें झालें असतें. दुसऱ्या कोणत्याहि कारणाकरितां नाहीं तरी हा गैरसमज दूर करण्याकरितां नागपुरास यंदा राष्ट्रीय सभा भरविणें जरूर होतें. त्याप्रमाणें कॉंग्रेस भरविण्याची व्यवस्था 'कॉंग्रेस कंटिन्युएशन कमिटी'नें केली व नागपूरच्या राष्ट्रीय मंडळानें ह्याकामीं पुढाकार घेतला, ह्याबद्दल कॉंग्रेस कंटिन्युएशन कमिटीचें व नागपुरकरांचें अभिनंदन केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. राष्ट्रीय-पक्षाच्या सर्व लोकांस व कॉंग्रेसबद्दल तळमळ वाटणाऱ्या सर्व सज्जनांस आमची अशी विनंति आहे कीं, ह्या महिन्यांतील नागपूरची कॉंग्रेस सर्वतोपरी यशस्वी झाली नाहीं, तर हिंदुस्थानच्या राजकीय चळवळींतील लिबरल पक्षाचीं हाडें दहावीस वर्षें तरी मोडून पाडण्याचें पातक तुम्हांस लागल्यावांचून राहणार नाहीं. स्वस्थ बसल्यानें किंवा कन्व्हेन्शनवाल्यांना मदत करण्यानें कॉंग्रेस आततायी कृत्यास मदत करणारी आहे हा खोटा ग्रह लिबरल अधिकाऱ्यांच्या मनांत पक्का बिंबविण्यास तुम्ही मदत कराल आणि येथील कांझरव्हेटिव्ह अधिकारी व त्यांच्या पंखाखालीं स्वार्थ साधूं पहाणारे कन्व्हेन्शनवाले यांचा हट्ट पुरा होऊन राष्ट्राच्या प्रगतीला धक्का पोहोचवाल. एवढयाकरितां कॉंग्रेसचा व राष्ट्रीय पक्षाचा ज्यांना म्हणून यत्किंचित् अभिमान असेल, स्वराज्याचे हक्क अंशतः तरी या हतभागी देशास आपल्या

डोळ्यादेखत मिळालेलें पाहण्याच्या सात्विक महत्वाकांक्षेचा लवलेश निदान ज्यांच्या अंतःकरणांत असेल त्यांनीं यंदा नागपुरास अवश्य चलावें व सर मेथा यांनीं आपल्या पत्रानें कॉंग्रेसच्या तोंडास काळें फासण्याचा जो उद्योग केला आहे तो स्वतःच्या एकमताच्या ठरावानें फोल ठरवावा. राष्ट्रीय सभा पूर्वपरंपरेला धरून सनदशीर रीतीनें व कायदेशीर मार्गानें काम करणारी आहे ह्याबद्दल कोणाचेंच मनांत संदेह राहूं नये म्हणून प्रत्येक राष्ट्रभक्तानें यंदाच्या नागपूरच्या कॉंग्रेसचा मंडप साजरा करणें अत्यंत जरूर आहे. नागपूरच्या

## राष्ट्रीय सभेची व्यवस्था

डॉ. मुंजे आदिकरून राष्ट्रीय मंडळाच्या पुढाऱ्यांनीं अंगावर घेतलेली असल्यामुळें मंडप वगैरेच्या व्यवस्थेसंबंधानें ज्यांना मदत करावयाची असेल त्यांनीं डॉ. मुंजे यांजला अगर "कॉंग्रेस कंटिन्युएशन कमिटी"चे सेक्रेटरी रा. ब. चिंतामणराव वैद्य यांजला प्रत्यक्ष भेटावें अगर त्यांजशीं पत्रव्यवहार करावा. गेले शनिवारीं मुंबईस 'वर्किंग कमिटी' स्थापण्यांत आली आहे. कॉंग्रेसच्या बुडीत खर्चास मदत म्हणून पांच हजार रुपये मुंबई इलाख्यानें नागपुरास द्यावयाचे आहेत. ह्या पांच हजार रुपयांची निरनिराळ्या जिल्ह्यांनीं आपापसांत वाटणीं करून घेतली आहे व हे रुपये तारीख १५ डिसेंबरचे आंत नागपुरास पोहोंचतील अशी आम्हांस आशा आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणच्या लोकांनीं, प्रत्येक तालुक्याच्या लोकांनीं, प्रत्येक गांवच्या लोकांनीं आतां जाहीर सभा भरवून सर मेथा यांनीं दिलेला बेकायदेशीरपणाचा ठपका निराधार आहे, समेट होत नाहीं ही दिलगिरीची गोष्ट असून कन्व्हेन्शनची मजलस आम्हास संमत नाहीं, कलकत्त्याचे चार ठराव नागपूरच्या कॉंग्रेसनें अवश्य पास करावेत, वगैरे ठराव विलंब न लावतां पास करावेत व नागपूरच्या कॉंग्रेसकरितां प्रतिनिधी निवडावेत. आपल्या गांवांतून किती

प्रतिनिधी व किती प्रेक्षक नागपुरास जाण्याचा संभव आहे याचा अंदाज प्रत्येक ठिकाणच्या लोकांनीं तावडतोब नागपुरास 'राष्ट्रीय सभे'च्या कार्य-कारी मंडळाला व सेक्रेटरींना कळविणें जरूर आहे. यंदा नागपुरास प्रदर्शन असल्यामुळें प्रदर्शनाचें आठ आण्याचें तिकिट व आगगाडीचे निम्म्या दराचें, दहा दिवसांच्या मुदतीचें 'रिटर्न' तिकीट जी. आय. पी. व बी. एन. आर. यांच्या स्टेशनांवर मिळण्याची व्यवस्था प्रदर्शनामार्फत पूर्वींच झाली आहे. शिवाय कॉंग्रेसच्या वीस रुपयांच्या फीशिवाय रहाण्याबद्दल व जेवणाबद्दल नागपूरच्या रिसेप्शन कमिटीकडून निराळे पैसे मागण्यांत येणार नाहींत. ह्या दृष्टीनें विचार केला असतांना सुरतच्या राष्ट्रीय सभेहून किंबहुना पूर्वींच्या राष्ट्रीय सभांहून यंदाच्या नागपूरच्या कॉंग्रेसचा खर्च प्रत्येक प्रतिनिधीला व प्रेक्षकाला फार कमी येईल, यांत संशय नाहीं. लोकांचा राष्ट्रीय चळवळीविषयींचा उत्साह, कलकत्याच्या चार ठरावांवरील लोकांची भक्ति, कॉंग्रेसच्या व्यवस्थेंतील यंदाची काटकसर, राजकीय चळ-वळींवर सर मेथा यांनीं आणलेलें बावटळ दूर करण्याची आवश्यकता, इत्यादि कारणांमुळें यंदाची नागपूरची राष्ट्रीय सभा आमच्या राजकीय चळवळीच्या इतिहासांत फारच महत्वाची झाल्यावांचून राहणार नाहीं. हें महत्व लक्षांत ठेऊन कॉंग्रेस संबंधाचें आपलें कर्तव्य करण्यास लोक तावड-तोब लागतील, अशी आम्हांस उमेद आहे.

# * नागपूर कीं मद्रास ?

जुन्या पद्धतीनें व पूर्वीच्याच सनदशीर रीतीनें नागपुरास राष्ट्रीय सभा भरविण्याचें नक्की ठरल्यासंबंधानें कॉंग्रेस कंटिन्युएशन कमिटीचे सेक्रेटरी रा. ब. चिंतामणराव वैद्य यांनीं कमिटीतर्फे प्रसिद्ध केलेलें जाहीर पत्रक आज दुसरीकडे छापलें आहे. हें जाहीर पत्रक वाचल्यानंतर नागपूरच्या कॉंग्रेससंबंधानें शंका कुशंका कोणाचेहि—कन्व्हेन्शनवाल्यांचेहि—मनांत राहणार नाहींत असा आमचा भरंवसा आहे. हें जाहीर पत्रक प्रसिद्ध झाल्यापासून मद्रासचे बाजूलाहि नागपूरच्या कॉंग्रेससंबंधानें अनुकूल ग्रह होऊं लागला आहे. एकपक्षीय 'कन्व्हेन्शन' मद्रासेस नको, मद्रासचे तरुण असल्या मजलसीला मदत करणार नाहींत, इतकेंच नव्हे तर गुप्तपणें किंवा उघडपणें पोलिसच्या पंखाखालीं सभेचें काम उरकण्याचें लांछनया सभेला लागेल, असें म्हणणाऱ्यांचा मोठा वर्ग मद्रासेस आहे. "फॅक्टरी कमिशन "चे सभासद डॉ. नायर यांच्यासारख्या पुढाऱ्यांचा समावेश या वर्गात होतो. मद्रासच्या कन्व्हेन्शनच्या विरुद्ध असलेला मद्रास इलाख्यांतील दुसरा मोठा वर्ग म्हणजे "कन्व्हेन्शनवाल्यां"चे नियम नापसंत असलेल्यांचा होय. मद्रासच्या 'हिंदु' पत्रांत कन्व्हेन्शनच्या रचनेच्या विरुद्ध आजपर्यंत शेंपन्नास पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत. तीं सर्व वाचलीं म्हणजे मद्रास इलाख्यांतील सुशिक्षितांपैकीं निम्याहून अधिक लोक मजलसीच्या विरुद्ध आहेत, असें अनुमान काढणें भाग पडतें. अशा स्थितींत रा. ब. वैद्य यांच्या जाहीर पत्रकाचा मद्रासकरांवर सुपरिणाम व्हावा यांत कांहीं नवल नाहीं. मद्रासच्या मजलसीला सवत म्हणून राष्ट्रीय सभा भरविण्यांत

* केसरी, ता. ८ डिसेंबर १९०८

येत नसून सर्व मतांचा, सर्व पक्षांचा व सर्व सांप्रदायांचा समावेश करणारी व जुना कायदेशीर मार्ग कायम ठेवणारी कॉंग्रेस यावेळीं भरविणें हें कर्तव्य-कर्म असल्यामुळें नाइलाजास्तव हा बोजा कॉंग्रेस कंटिन्युएशन कमिटीनें आपल्या अंगावर घेतला आहे. या जाहीरपत्रकांत स्पष्ट करण्यांत आलेलीं मतें, लोकांपुढें मांडण्यांत आलेली विचारसरणी, उत्कट दिसून येत असलेली कर्तव्यपरायणता—हीं पाहिलीं म्हणजे मजलसीस सही देणाऱ्या विचारी लोकांचीं मुखें दक्षिण मार्ग सोडून नागपुराकडे वळतील, यांत संशय नाहीं. हें जाहीर पत्रक प्रसिद्ध झाल्यापासून कन्व्हेन्शनवाल्यांनाहि आपल्या मज-लसीची सकारण शिफारस करणें मुष्किलीचें होऊन बसलें आहे. सर मेथा यांच्या पत्रामुळें कन्व्हेन्शनच्या विरुद्ध बंगाल्यांत उठलेलें काहूर, नागपूरनें दाखविलेली सांप्रतची कर्तव्यदक्षता, व समंजस लोकांना राष्ट्रीय सभेकडे ओढून घेण्याची जाहीर पत्रकाची आकर्षणशक्ति, या गोष्टींमुळें मजलसवाले भांबावून गेले असून स्वपक्षीयांचे समर्थनार्थ निंद्य कारणें पुढें आणूं लागले आहेत. सर मेथा यांच्या एका ठेंगू अनुयायानें गेल्या आठवडयांत मजलसीचें मंडन करण्याकरितां लेख प्रसिद्ध करून "प्रांशुलभ्ये फले लोभादुद्बाहुरिव वामनः" या रीतीनें मंडणाऱ्या ऐवजीं बिचाऱ्या मजलसीचें मुंडण केलें आहे ! 'विनायकं प्रकुर्वाणः रचयामास वानरम्' अशी हास्यास्पद स्थिति मंदमेंदू ठेंगूची नेहमींच होत असते. मद्रासच्या मजलशीस सर्वांनीं जमलेंच पाहिजे, याचें मुख्य कारण कन्व्हेन्शनवाल्यांच्या ह्या दैनिकांत असें देण्यांत आलें आहे कीं, मजलसीस जर पुष्कळ सभासद जमले नाहींत तर सुरतेच्या प्रकरणाबद्दल

## राष्ट्रीय पक्षावर सूड

पुरा उगवल्यासारखा होणार नाहीं. सर मेथा यांच्या पत्रांत अरेरावीनिष्ठ वासना तेवढया प्रमुखत्वेंकरून दृष्टीस पडतात. सूड उगविण्याकरितांच

मद्रासचा हा खटाटोप आपण आरंभिला आहे हा गुप्त हेतु निदान जाहीर करणें योग्य नव्हे, हें समजण्याइतकी धूर्तता त्यांच्या मंदमेंदूंत नसल्यामुळें लिहिण्याच्या भरांत त्यांनीं खरें इंगित बाहेर फोडलें आहे. मद्रासची मजलस देशकार्याकरितां भरावयाची नाहीं; स्वदेशभक्तीनें प्रतिनिधि मद्रासला जाणार नाहींत; व्यक्तिशः तरी एखादी पदवी मिळविण्याकरितां अगर बढती मिळविण्याकरितां किंवा अधिकाऱ्यांची मेहेरनजर होऊन कांहीं इतर लाभ मिळावा म्हणून मद्रासेस गर्दी व्हावयाची नाहीं; तर राष्ट्रभक्तांवर सूड उगविण्याकरितां मद्रासचा हा जंगी जलसा व्हावयाचा आहे! सर मेथा यांच्या पत्रांतील गूढ अर्थ उलगडून सांगण्याची खटपट करणाऱ्या मुंबईच्या भाष्यकारांनीं ही सूडाची कल्पना लोकांपुढें मांडली आहे. पवना, पुणें, धुळें, कलकत्ता वगैरे सर्व ठिकाणीं समेटाचे दीर्घोद्योग करण्यांत आले, पण ते सर्व कन्व्हेन्शनवाल्यांनीं लाथाडले. हे एकीचे उद्योग अशा रीतीनें कां लाथाडले जावेत, हें इतक्या दिवस मोठें गूढ होतें; पण सर मेथा यांच्या पत्रावरील भाष्यकारांनीं 'सूडा'चें कीड बाहेर काढल्यापासून सर्व गूढांचा उलगडा झाला आहे. कलकत्त्याच्या चार ठरावांचा सूड घेण्याकरितां, सुरतेस 'कीड'ची डाळ शिजली नाहीं म्हणून अलहाबादेस कन्व्हेन्शनची रचना झाली; व इतकें करूनहि राष्ट्रीय सभेचा कैवारी राष्ट्रीय पक्ष समूळ नाहींसा होत नाहीं असें पाहून आतां सर मेथा यांच्या मागें पुढें चालणाऱ्या हलगेकऱ्यांनीं "सूडा"चें शिंग फुंकून मद्रासेस सर्वांना बोलावलें आहे. कन्व्हेन्शनचे सेक्रेटरी ना. खरे व मि. वाच्छा यांना आमचा प्रश्न असा आहे कीं, लो. टिळक यांना सहा वर्षांची काळ्यापाण्याची शिक्षा झाली, एवढयानें कन्व्हेन्शनवाल्यांची "सूडा"ची इच्छा तृप्त व्हावयास नको काय? सूड उगविण्याची कल्पना नेहमींच गोड असते. कामाइतकीच "क्रोधा"चीहि तृप्ति मनुष्याला

प्रिय वाटते; आणि लोभामुळें कांहीं कांहीं कृत्यें करण्यास मनुष्य जात्या प्रवृत्त होतो, त्याप्रमाणें क्रोधहि अद्‍भुत पराक्रमास कारणीभूत होत असतो. पण लोभाप्रमाणेंच क्रोधालाहि आळा घालणें इष्ट नाहीं काय? आपला अरेरावी हट्ट सुरतेस चालला नाहीं, याबद्दल तुम्हाला क्रोध येणें बाजवी आहे व ह्या संतापाबद्दल संसारी मनुष्य तुम्हाला दोष देणार नाहीं. पण या संतापाला तुम्ही बळी घेतले आहेत. हे बळी घेतल्यानंतर तुमचा राग शांत व्हावयास नको काय? कामेच्छेला जसजसे बळी द्यावेत तसतशी कामेच्छा वाढत जावी; किंवा क्रोधाग्नींत जसजशा आहुती पडाव्यात तसतशी रागाची ज्वाला भडकतच जावी हा शहाण्यांचा मार्ग खास नव्हे. तुमच्या अरेरावी मतांचा प्रतिकार करण्याचें धाडस लो. टिळक यांनीं केलें त्याबद्दलचें प्रायश्चित्त मुंबईचे हायकोर्टांत तुम्ही दिलें; झालें, फिटांफीट होऊन गेली. आतां पुन्हां सुरतेचा सूड कोणता शिल्लक राहिला? तुम्हीं विजयी झालां, कांहीं अधिकाऱ्यांचे गळ्यांतले ताईत झालांत, तुमच्या नांवाची दहशत सर्व नॅशनॅलिस्टांना बसली! अशा वैभवाच्या शिखरावर तुमची कन्व्हेन्शन असतांना विरुद्ध पक्षाचीं पाळेंमुळें खणून काढण्याकरितां

## अश्वत्थाम्याचा छापा

घालण्याचा हेतु मद्रासची मजलस भरवितांना तुम्हाला कशाला पुकारावयास पाहिजे? सूडाची भावना वैभव नष्ट झाल्यानंतर शोभते. स्वार्थपरायण दुर्योधनानेंहि भीमाच्या लाथेमुळें राजमुकुट मस्तकावरून निघून जाऊन धूळ खात पडण्याचा प्रसंग येईपर्यंत केवळ सूड उगविण्याकरितां हपापलेल्या अश्वत्थाम्याला सेनापतीचा अधिकार दिला नाहीं, हें तत्त्व कन्व्हेन्शनवाल्यांनीं विसरतां कामा नये. कॉंग्रेसला केवळ देशभक्तीचा पाया आहे; कन्व्हेन्शनला देशभक्तीपेक्षां स्वार्थाचा आधार अधिक आहे. हा स्वार्थ साधला जात असतांना देशभक्तांवर सूड उगविण्याची हाव मद्रासच्या मजलसीनें कशाला

करावी ? तुम्हीं आपला स्वार्थ साधलात तर त्याबद्दल तुम्हाला कोण दोष देईल ? स्वार्थ साधणें हें संसारी मनुष्याचें कामच आहे, व जसजसा स्वार्थ अधिक साधला जाईल तसतशी तुमची तारीफ संसारांत अधिकच होईल. पण स्वार्थ साधीत असतांना राष्ट्रभक्तांवर सूड कशाला उगवावयाला पाहिजे ? राष्ट्रभक्तांच्या मतांच्या भरभराटीनें तुमचा स्वार्थ अधिक नाहीं काय साधला जाणार ? राष्ट्रभक्तांचीं व कन्व्हेन्शनवाल्यांचीं मतें जुळत नसतील तर त्यांनीं आपली एकपक्षीय मजलस मद्रासेस खुशाल भरवावी. कन्व्हेन्शनवाल्यांचा स्वार्थ साधल्यास त्यांत आम्हांस आनंदच आहे; कारण या हतभागी देशांतील कोणताहि पक्ष कोणत्याहि उपायानें अधिकार-संपन्न व वैभवसंपन्न झाला तरी पुढें कधींकाळीं राष्ट्रभक्तांच्या कार्याला जोड ह्या अधिकारसंपन्न व वैभवसंपन्न नेटिव्हांच्यामुळें खात्रीनें येईल, असा आमचा पक्का भरंवसा आहे. जसें ज्याला सुचेल व फावेल तसें त्यानें सांप्रतच्या काळीं गबर व अधिकारी होऊन बसावें, अशी सांप्रतची वेळ आहे. आमचें कन्व्हेन्शनवाल्यांपाशीं एवढेंच मागणें आहे कीं, स्वार्थ साधीत असतांना राष्ट्रभक्तांविषयीं सूडाची भावना मनांत धरूं नका. राष्ट्रभक्तांच्या दृष्टीनें तुमचा आचार कितीहि 'दुराचार' असला तरी जोंपर्यंत या सूडाच्या दुष्ट पिशाच्यानें तुमच्या मनांत बिऱ्हाड ठेवलें नाहीं व जोंपर्यंत स्वदेशाविषयीं कांहींना कांहीं सदोदित विचार करण्याचें तुम्हीं सोडलें नाहींत तोंपर्यंत 'साधुरेव स मंतव्यः' या भगवद्वचनावर विश्वास ठेऊन तुम्हीं लवकरच "क्षिप्रं भवति धर्मात्मा" ह्या नात्यानें राष्ट्रभक्त व्हाल, असें प्रतिपादन करणारे आम्हीं आहों. असो; मजलसवाल्यांची ही सूडाची भावना फार झालें तर आणखी एखादें वर्ष टिकेल. मनुष्य स्वभावतः सत्पक्षाचा असल्यामुळें 'सूडा'चें शिंग फुंकण्यानें एखाद दुसरें वर्ष चुकून मद्रासची वाट धरील; पण अखेरीस सूडाच्या आरोळ्यांनीं चेतण्याचे दिवस

निघून गेल्यावर कन्व्हेन्शनवाल्यांपैकीं बराच मोठा वर्ग राष्ट्रीय सभेस पुन्हां मिळाल्यावांचून रहाणार नाहीं, कारण 'सूड' वगैरे आगांतुक बाबी एका बाजूस ठेऊन ह्या दोन सभांचीं प्रधान तत्वें कोणतीं आहेत याचें जर पृथक्करण केलें, तर

## स्वार्थ व देशभक्ति

यांच्या झगड्यामुळें हे पक्ष उद्भवले आहेत, असें प्रत्येक विचारी मनुष्यास म्हणावें लागतें. सर विल्यम वेडरबर्न यांनीं मद्रासच्या कन्व्हेन्शनसंबंधानें नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या तत्त्वांत कन्व्हेन्शनवाल्यांचें प्रधान तत्त्व सांगितलें आहे; व सुरतची राष्ट्रीय सभा मोडल्यावर ह्याच तत्त्वाचा उल्लेख सर मेथा यांनीं मुंबईच्या टाइम्सच्या मुलाखतींत निराळ्या शब्दानें केला होता. सर वेडरबर्न कन्व्हेन्शनवाल्यांना उपदेश करितात, सरकार जें कांहीं पदरांत टाकील तें आनंदानें ग्रहण करा व नंतर आणखी कांहीं पोटास पाहिजे असेल तर अदबीनें मागा. सर मेथा म्हणतात, सरकार दाखवील त्याच मार्गानें आम्हांस जावयाचें आहे, पण वाटेंत एखादा सराटा बोचत असल्यास तेवढा दूर करण्याविषयीं सरकारला आम्हीं हात जोडणार, इतकेंच. हा मार्ग उघड स्वार्थाचा झाला. सरकार देईल तें राष्ट्रीय सभेस नको आहे असें नाहीं. सरकार देईल तें पदरांत तर घ्यावयाचेंच, पण तेवढ्याचकरितां राष्ट्रीय सभेची चळवळ नाहीं. सरकार घालीत असलेल्या फळावर दृष्टि ठेवून 'फलहेतू'नें कन्व्हेन्शनवाले कर्में आचरीत आहेत. सरकारच्या भिकेवर राष्ट्रीय सभा हक्क सांगत नाहीं, तर स्वराज्याच्या हक्काकरितां ( Constitution ) मेहनत करणें आपलें कर्तव्य आहे, असें राष्ट्रीय सभा समजते. स्वराज्याच्या हक्कासंबंधानें 'राजयोगा'चें अवलंबन करून हट्टवादीपणा सोडून देण्यास कॉंग्रेस तयार असल्यावर कांहीं कांहीं सवलती सरकार आपण होऊन लोकांना देईल, ह्या सवलतींत दंग न होतां ह्या

सवलतींचा उपयोग पुढील कर्मे आचरण्यांत राष्ट्रीय सभा करील. कर्मफल-त्याग किंवा स्वार्थत्याग म्हणून म्हणतात तो हाच. जेथें असला स्वार्थत्याग नाहीं तेथें देशभक्तीहि नाहीं, हें उघड आहे. स्वार्थ व देशभक्ति यांच्या या तंटयांत स्वार्थाच्या बाजूला 'सूडा'ची भर जेव्हां कांहीं विघ्नसंतोषी घाल-तात तेव्हां देशभक्तांचा मार्ग कठिण होतो हें सांगावयास नकोच. असल्या विघ्नसंतोषी लोकांच्या हुल्लडीमुळेंच लो. टिळक यांचेवर संकट आलेलें आहे. अधिकाऱ्यांच्या कानाला लागण्याचा मान मिळाला म्हणजे स्वप-क्षाच्या भरतीबरोबरच विरुद्ध पक्ष हाणून पाडण्याची दुष्ट इच्छा कांहीं विघ्नसंतोष्यांना होत असते. 'स्वार्था'ची दिडकी 'देशभक्ती'च्या रुपायाच्या ऐवजीं बाजारांत चालावी, असला अहंकार 'सूडा'ला नेहमीं प्रसवीत असतो. इंग्लंडच्या इतिहासांतहि 'कॉन्झर्व्हेटिव्ह' पक्षानें 'लिबरल' पक्षाचा सूड अशा रीतीनें उगविल्याचीं उदाहरणें आहेत. पिटसाहेबांच्या कारकीर्दीत व दुसऱ्या एक दोन प्रसंगीं 'कॉन्झर्व्हेटिव्ह' पक्ष अधिकारारूढ अस-तांना इंग्लंडांत

## देशभक्तांचा मार्ग

जाणून बुजून संकटांचा करण्यांत आला होता. तशा प्रकारचा सूड, मुंबईच्या कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षानें—खरा अधिकार नेटिव्हापैकीं कोणाच्याच हातांत असणें शक्य नाहीं, हें ध्यानांत ठेऊन—तशा प्रकारचा सूड उगवूं पहाणें म्हणजे आमच्या दुर्दैवाचा खरा दुर्विपाक होय. नागपुराला प्रतिनिधि जमूं नयेत म्हणून सांप्रत कांहीं विघ्नसंतोष्यांकडून असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे कीं, मद्रासला जाणारे तेवढे राजनिष्ठ व नागपुरला जाणारे तेवढे राजद्रोही! राजनिष्ठ व राजद्रोही यांची ही फाळणी केवळ द्वेषबुद्धीनें कर-ण्यांत आली आहे, हें केसरीचे वाचकांस सांगावयास नकोच. मद्रासला जाणें म्हणजे राजनिष्ठा व नागपुरला जाणें म्हणजे राजद्रोह असला लपंडाव

मत्सरविगाऱ्या क्षुद्रबुद्धीचें कृष्णकारस्थान कलकत्त्याच्या 'अमृतबझार पत्रिके'नें चांगल्या रीतीनें चव्हाठ्यावर आणलें आहे. नागपूरच्या अधिकाऱ्यांचीं मनें मात्र अशा प्रकारचीं नसल्यामुळें त्या बाबींत कन्व्हेन्शनवाल्यांचा बराच हिरमोड होईल यांत शंका नाहीं. सांप्रत इंग्लंडांत लिबरल पक्ष अधिकारारूढ असल्यामुळें येथील कांहीं कॉन्झर्व्हेटिव्ह अधिकारी मुंबईच्या सूडवाल्यांच्या नादीं लागून राष्ट्रीय सभेचा उर्फ हिंदुस्थानांतील लिबरल पक्षाचा छळ वेळीअवेळीं करतील, असें आम्हांस वाटत नाहीं. इंग्लंडांत एकेकाळीं सर्व लिबरलांना 'जाकोबिन्स' उर्फ राजद्रोही समजण्यांत येत असे; लिबरलांची दोस्ती कोणास आवडत नसे; लिबरल वकील असला म्हणजे सोलापूरचे रा. सामंत यांच्याप्रमाणें त्याला पेचांत आणीत आणि सभांतून बोलतांना किंवा वर्तमानपत्रांतून लिहितांना थोडीशी चूक झाली कीं निर्दयपणें त्या देशभक्तांना शिक्षा करण्यांत येत असे. ( All Whigs were denounced as Jackobins, shunned in society, intimidated at the bar, and ruthlessly punished for every indiscretion as public speakers or writers in the Press. P. 172 Erskine May Vol. II ) हिंदुस्थानांत राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांवरहि गेल्या चार सहा महिन्यांत अशा प्रकारचीं संकटें आलेलीं आहेत; पण अलीकडे सूडवाल्यांच्या नादीं लागण्यांत परकीय अधिकाऱ्यांचा कांहींच फायदा नाहीं, हें अधिकारी वर्गाच्या ध्यानांत येऊं लागल्यामुळें सूडवाल्यांचे सर्व बेत यशस्वी होतील असें आम्हांस वाटत नाहीं. नागपुरासच सर्व देशभक्तांनीं यंदा अवश्य जमावें, याचें मुख्य कारण हें आहे कीं, योग्य ठराव पास करून विचारानें व शांततेनें सभेचें काम पार पाडून नागपुरास जाणारे तेवढे राजद्रोही हा चुगलखोरांचा आरोप नागपूरच्या राष्ट्रीय सभेच्याच ठरावांनीं नाहींसा करून टाकला पाहिजे. नागपुरास जाणारे राजद्रोही नसून देशहिताशिवाय

दुसरा तिसरा धंदा ते जाणीत नाहींत, हें जरी खरें असलें व नागपूरच्या राष्ट्रीय सभेच्या ठरावांनीं हेंच जरी पुन्हां एकवार सिद्ध केलें, तरी

### मानमरातबांची लालूच

ज्यांना लागली आहे ते मद्रासेसच जाणार, हें उघड होय. कांहीं अधिकाऱ्यांनीं कन्व्हेन्शनच्या पक्षाला आपल्या पंखाखालीं घेतलें असल्यामुळें अधिकारी वर्गाकडून मिळणारें लहानसहान मानमरातब व किरकोळ खिरापत कन्व्हेन्शनवाल्यांनाच मिळणार, ही गोष्ट खरी आहे. नागपूरच्या राष्ट्रीय सभेला अनुकूल असलेला वकील कितीहि विद्वान असो, कसल्याहि वक्ता असो, त्याच्या तोडीचा दुसरा कोणीहि नसो, कुळांची त्याच्याकडे कितीहि गर्दी होत असो, ज्युरीचीं मनें तो कितीहि वळवो, आपल्या बुद्धिमत्तेनें व पांडित्यानें न्यायाधीशावर त्याची कितीहि छाप बसो, त्याच्या धंद्याला मिळणाऱ्या मानमरातबाच्या जागा कन्व्हेन्शनच्या सर्व क्रीडावर सही केल्याशिवाय मिळणें शक्य नाहीं. ( At the bar, an advocate might be learned and eloquent, beyond all rivalry–eagerly sought out by the clients–persuasive with juries—and over-mastering judges by his intellect and erudition, but all the prizes of his noble profession were beyond his reach, unless he enrolled himself a member of Dominion Party, P. 17 · Erskine May Vol. II.) लो. टिळक ह्यांच्या कांहीं प्रख्यात स्नेह्यांपैकीं विद्वान वकील कन्व्हेन्शनचाच हट्ट कां धरून बसले आहेत, ह्याचा उलगडा वरील स्थिति लक्षांत घेतली असतां सहज होतो. राजा निग्रहानुग्रहाचा अधिकारी आहे. राजा दंड करूं शकतो व राजा कृपाहि करितो. कन्व्हेन्शनवाल्यांनीं त्यांच्या सूडाला अनुकूल असें वळण दिल्यामुळें, राजाचा अनुग्रह क्रीडवर सह्या करणाऱ्यांवरच होणार असा सर्वांचा समज करून देण्यांत आल्यामुळें, मद्रासेस पुण्या-

मुंबईहून जाणाऱ्यांची बरीच गर्दी होईल. नागपूरची राष्ट्रीय सभा बिलकुल राजद्रोही नसल्यामुळें सूडवाल्यांच्या 'राजनिग्रहा'च्या बागुलबुवामुळें नागपुरापासून लोक पराङ्मुख होणार नाहींत, ही गोष्ट खरी; तथापि मानमरातबाच्या लालुचीनें बरेच प्रतिनिधी मद्रासकडे धांवतील. ह्या कामी नागपूरच्या

## राष्ट्रीय सभेचें सुदैव

एवढेंच आहे कीं, सूडवाल्यांच्या तंत्रानें वागणाऱ्या कांहीं अधिकाऱ्यांच्या हातांत नेटिव्हांना द्यावयाचे मानमरातब फारच कमी आहेत. ह्या मानमरातबांची संख्या जोंपर्यंत फार वाढलेली नाहीं, मोठमोठ्या जागा बहुतेक सर्व युरोपियनांकरितां राखून ठेवण्याची पद्धत जोंपर्यंत सरकारनें सोडली नाहीं, तोंपर्यंत कन्व्हेन्शनवाल्यांना भरपूर प्रतिनिधी मिळण्याची आशा नको. म्युनिसिपालिटया व डिस्ट्रिक्ट बोर्डें सांप्रतहून अधिक स्वतंत्र झाल्यावर लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद होऊं पहाणाऱ्यांनाहि कन्व्हेन्शनची कास धरण्याचें कारण नाहीं. सांप्रतच्या कलेक्टरांच्या किंवा कमिशनरांच्या चिठ्ठ्या चपाट्यांशिवाय कायदेकौन्सिलांत शिरणें मुष्किलीचें होतें, ही गोष्ट खरी आहे. पण ही स्थिति आणखी एक दोन वर्षेंच फार झाली तर टिकेल. मग मोठमोठ्या मरातबाकरितां हापापलेल्या बड्या श्रीमंतांशिवाय इतरांना कन्व्हेन्शनच्या मजलशीची जरूरीच राहाणार नाहीं. मानमरातबांच्या लालुचीनें फसलेल्या वर्गाशिवाय दुसरा एक संख्येनें बराच मोठा वर्ग कन्व्हेन्शनच्या बाजूचा आहे. ह्या वर्गाचे दोन पोटभेद आहेत. पहिला—बड्या धेंडांवर अवलंबून असलेला वर्ग. ज्या बाजूला हीं बडीं धेंडें जाणार त्या बाजूला त्यांचे हे अनुचर किंवा अवशिष्ट खाद्यपेयावर खूष होणारी मंडळी जाणार, हें निर्विवाद आहे. दुसरा पोटभेद म्हणजे पूर्वी राष्ट्रीय सभेला जाणारे पण आज गैरसमजानें कौडवर सह्या करणारे मध्यम स्थितींतील कांहीं लोक. नागपूरच्या राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमाचा ह्यांनीं शांतपणें विचार

केला किंवा कॉंग्रेस होऊन गेल्यानंतर ह्यांनीं राष्ट्रीय सभेची हकीकत वाचली म्हणजे हे आपोआप राष्ट्रीय सभेच्या बाजूला येतील. कारण हे स्वभावतः कन्व्हेन्शनच्या बड्या धेंडांच्या बाजूचे नसून नागपूरच्या राष्ट्रीय सभेच्या बाजूचे आहेत. एक दोन वर्षांनीं कन्व्हेन्शनची सभा म्हणजे विन जहागिरीच्या लॉर्डांची सभा होऊन बसेल, व राष्ट्रीय सभेचे कैवारी पुन्हां राष्ट्रीय सभेला मिळतील. कारण सर मेथासारख्या अरेरावी लार्डांत व या मध्यम स्थितींतील त्यांच्या अनुयायांत कांहींच साम्य नाहीं. पूर्वी सर मेथा-सारखे लॉर्डहि राष्ट्रीय सभेंतच होते; तेव्हां पुढारी व अनुचर ह्यांच्या ह्या स्थितींतील वैषम्य झांकून जाण्यासारखें होतें. पण राष्ट्रीय सभेंतून फुटून सर मेथा बाहेर पडल्यानंतर सामान्य लोकांना सर मेथा यांचे “ लॉर्डी ” स्वरूप उमगल्यावांचून रहाणार नाहीं. इंग्लंडांतहि एकेवेळीं पार्लमेंट सभेंत फसगमतीनें सामान्य लोकांचे प्रतिनिधी लॉर्डांच्या पक्षाला मिळाले होते. ह्या प्रतिनिधींच्या ज्या हालअपेष्टा झाल्या, त्या हालअपेष्टा लॉर्डांच्या ह्या कन्व्हेन्शनला जाणाऱ्या सर्व मध्यम स्थितींतील सभासदांच्या झाल्या-वाचून राहणार नाहींत. सर मेथा थोडेंच या प्रतिनिधींशीं मिळूनमिसळून वागणार आहेत? सर मेथा तोंड धुवीत असतांना दोन दोन तास सुरतेच्या स्टेशनावर वाट पहात उभें रहावें व मंडपांत त्यांचेसारखें मत देऊन त्यांच्याच प्रतिष्ठेला भर घालावी, हा क्रम किती दिवस टिकणार? इंग्लंडांत लिबरल पक्ष जेव्हां हळू हळू पुढें येऊं लागला तेव्हां पूर्वीच्या व्हिग लॉर्डांनीं लिबरल पक्षाला सर मेथा मध्यमस्थितींतील तरुणांना सांप्रत जसें कन्व्हेन्शन-मध्यें वागवितात, तसेंच वागविलें. नवीन लिबरल पक्षीय लँकेशायर किंवा वेस्टरायडिंग येथील स्थानिक भाषा वापरीत, गिरण्यांतील व दुकानांतील अडदांड चालीरीती त्यांना माहीत, जिल्ह्यांतील फॅशनेबल नसलेला पेहेराव त्यांनीं घातलेला, असे सभासद फार फॅशनेबल, सुसंस्कृत पुढाऱ्यांचे सोबती

कोठून होणार ? ह्या फॅशनेबल पुढाऱ्यांना इतर सभासदांनीं त्यांच्याप्रमाणें हात वर करावयास पाहिजे होते, त्यांची संगत त्यांना नको होती. ( The new men speaking the dialect of Lancashire and the West Riding, with the rough manners of the mill and the County-house, and wearing the unfashionable garb of the provinces, were not congenial associates for the high-bred politicians, who sought their votes, but not their company. P. 200-Erskine May Vol. II ) नागपूर-वऱ्हाडच्या मंडळींवर मुंबईच्या सूडवाल्यांचा जसा हल्लीं राग आहे, तसाच राग 'कन्व्हेन्शन'मध्यें गैरसमजानें गेलेल्या मध्यम स्थितींतील लोकांवर एकदोन वर्षांत झाल्यावांचून रहाणार नाहीं. "समानशीले व्यसनेषु सख्यम्" हें तत्त्व चोहोंकडे सारखेंच लागू आहे. हात वर करणारे एक व मानमरातबाचा फायदा लुटणारे दुसरेच, असें सख्य गरीब-श्रीमंतांचें किती दिवस टिकणार ? खरा विचार केला असतां मध्यम स्थितींतील सर्व लोकांनीं यंदाच नागपुरास जाणें योग्य होय; कारण त्यांनीं आगाऊ सही दिली एवढ्याच हक्काच्या सबबीवर स्वतःच्या देशभक्तीचा फायदा स्वतःप्रमाणें रावणाऱ्या खऱ्या अंतःकरणाच्या इतर देशभक्तांना न देतां आपणांस तुच्छ लेखणाऱ्या लॉर्डांना कां द्यावा ?

---

# * " सुराराध्य " आणि " दुराराध्य "

लांगूलचालनमधश्चरणावपातम् ।
भूमौ निपत्य वदनोदरदर्शनं च ।
श्वा पिंडदस्य कुरुते गजपुंगवस्तु ।
धीरं विलोकयति चाटुशतैश्च भुंक्ते ॥

—भर्तृहरि.

मद्रासच्या कन्व्हेन्शनची सभा गेल्या आठवड्यांत सुखरूपपणानें पार पडली. सभेस पहिल्या दिवशीं सातशेंपर्यंतहि प्रतिनिधी हजर नव्हते आणि दुसऱ्या तिसऱ्या दिवशीं तर बऱ्याच प्रतिनिधींना सर्व वेळ सभेस हजर राहण्यापेक्षां मद्रास शहर पहाणें किंवा इष्टमित्रांना भेटणें अधिक महत्वाचें वाटलें. दुसऱ्या तिसऱ्या दिवशीं या मजलशीच्या तिकिटाचे दर कमी करण्यांत आले होते, पण याहि उपायानें पहिल्या दिवसाचे सुमारें हजार प्रेक्षक दुसऱ्या व तिसऱ्या दिवशीं मंडपांत दृष्टीस पडले नाहींत. लोकांत व प्रतिनिधींत निरुत्साह जरी चोहोंकडे दिसत होता, तरी सभेचे चालक " मेथा गोखले आणि को. " आनंदित होते व आपण कृतकृत्य झालों असें त्यांना वाटत होतें. सांप्रत मद्रासचे 'हिंदु' पत्रांत या सभेस हजर असलेल्या मद्रास प्रतिनिधींच्या तक्रारींचीं पत्रें एकसारखीं प्रसिद्ध होत आहेत; यावरून मद्रासचे वरचे थोडे लोक शिवाय करून बाकी सर्व हिरमुसल्या तोंडानें आपापल्या घराकडे परतले, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सर मेथा व ना. गोखले यांच्या ठराविक अनुयायांशिवाय मुंबई

* केसरी, ५ जानेवारी १९०९

इलाखा व नागपूर–वऱ्हाड येथील लोकांनीं मद्रासच्या कन्व्हेन्शनवर बहिष्कार घातलेला होता; तेव्हां या प्रांतांतील लोकमतावर सभेचा कांहीं परिणाम होणार नाहीं हें सांगणें नकोच. सभेस सात पंजाबी हजर होते. पैकीं तीन कुणास माहीत नसलेले व बाकींच्या चारांतले दोन खासगी कामास गेलेले! मद्रासच्या खालोखाल नेमस्तांना अनुकूल असलेलें मुख्य ठिकाण म्हणजे 'संयुक्त प्रांतां'तील लखनौ शहर होय. पण कन्व्हेन्शनसंबंधानें गंगा–यमुनांचा आशीर्वाद इतक्या बेताचाच दिसतो कीं, पंजाबांतील एखाद दुसऱ्या प्रतिनिधीवरच भिस्त ठेवून कन्व्हेन्शनला पंजाबच्या पांच पुण्योदकांनीं पुनीत करून घेण्याची आगांतुकी करावी लागली. अध्यक्ष ना. बोसबाबू व सुरेंद्रबाबू यांजबरोबर कांहीं बंगाली प्रतिनिधी मद्रासेस गेले होते, पण त्यांचे चेहेरे पहिल्यापासूनच म्लान दिसत होते, असें मुंबईच्या ॲंग्लो–इंडियन पत्रांनीं वर्णन केलें आहे. हे बंगालचे रडतराऊ कन्व्हेन्शनसंबंधानें बंगाल्यांत नवीन उमेद चालू झाली कसची उत्पन्न करणार? मद्रासला गेलेली खोगीरभरती मंडळी रामेश्वरच्या यात्रेंत गुंतली आहेत; देशहिताच्या कळकळीनें गेलेले कांहीं मि. रामस्वामी आय्यरसारखे खिन्न होऊन परतले आहेत; आणि ना. कृष्णस्वामी आय्यर, सर मेथा किंवा ना. गोखले यांच्या गोटांत मात्र आनंदीआनंद दुमदुमत आहे. मद्रासच्या कन्व्हेन्शनचें बाह्य स्वरूप आणि प्रतिनिधींवर किंवा प्रतिनिधींच्या मार्फत राष्ट्रांतील लोकमतावर कांहीं ना कांहीं छाप तत्काळ बसविण्याची या कन्व्हेन्शनची शक्ति, ह्या संबंधाचें हें वर्णन झालें. कन्व्हेन्शनमध्यें दिसून येणाऱ्या विचारांचा ओघ व राष्ट्रावर कालांतरानें ह्या विचारांचा घडणारा परिणाम यासंबंधानें आतां विचार करूं.

मद्रासच्या कन्व्हेन्शनच्या विचारांची दिशा दोन रीतीनें दिसून आली. प्रमुख भाषणांवरून व सभेंत पास झालेल्या ठरावांवरून. सभेंत पास

झालेल्या ठरावांत लॉर्ड मोर्ले व लॉर्ड मिंटो यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानण्याचा मुख्य ठराव होता; व इतर ठराव औपचारिक किंवा मारून मुटकून पुढें आणलेले होते. औपचारिक ठरावांत बादशहाचे आभार, अत्याचारांची निर्भत्सना, दक्षिण आफ्रिकेंतील दुःखें वगैरे कंटाळी ठरावांतील मंडळी होती, आणि नागपुरांत खरी राष्ट्रीय सभा भरली असती तरी ह्या एकान्यांतील सर्व ठराव नागपुरांतहि पास झाले असते; तेव्हां त्यासंबंधानें विवेचन येथें करीत बसण्याचें कारण नाहीं. कन्व्हेन्शनच्या मारूनमुटकून मांडलेल्या ठरावांत खालील ठराव दृष्टीस पडत होते; स्वदेशी, वंगभंग, प्राथमिक शिक्षण व हद्पान्यांचा निषेध! स्वदेशीचा ठराव दुय्यम किंवा तिय्यम प्रतीच्या वक्त्यांच्या तोंडांत घालण्यांत आला होता. 'व झीज सोसूनहि' हे शब्द वाईट तोंड करून आळेंवळें कन्व्हेन्शननें गिळल्यावर, स्वदेशीचे खरे पुरस्कर्ते सर मेथासारखे पुढारी असून स्वदेशीवाल्यांनीं त्यांचीच पूजाअर्चा केली पाहिजे हें सिद्ध करण्याकरितांच हा ठराव होता असें दिसलें. शब्दांनीं नाहीं पण कृतीनें कन्व्हेन्शनच्या चालकांनीं स्वदेशीस निरुत्साह केलें. वंगभंगाचा ठराव तर गुळमुळीतच होता; व बहिष्काराच्या ठरावाचा तिलक 'वंगभंगा'च्या भालप्रदेशावरून जाणून बुजून काढून घेण्यांत आल्यामुळें हा ठराव निस्तेज व सुतकी दिसत होता!

बहिष्कारावरोबर याहि ठरावास गचांडी मिळावयाची, पण जनलज्जेस्तव वंगभंगाचा ठराव गाळतां आला नाहीं. प्राथमिक शिक्षणाला जागा औपचारिक किंवा कंटाळी स्वरूपाच्या ठरावांतच मिळावयाची! पण राष्ट्रीय शिक्षणाची समजूत निमसरकारी शाळांवर करावयाची असल्यामुळें आणि खोगीरभरती प्रतिनिधींत बिनसरकारी शाळांतील शिक्षक व प्रोफेसर ह्यांचा भरणा मोठा असल्यामुळें शिक्षणाला इतकें गौणत्व दिसून आलें नाहीं. डॉ. रासबिहारी घोस ह्यांच्या भाषणाकडे पाहिलें तर हद्पान्यांच्या प्रश्ना-

त्याहि कन्व्हेन्शननें महत्त्व दिलें नसतें; पण ज्या शर्तीवर ना. गोखले व ना. खरे यांनीं सुरेंद्रबाबू व भूपेंद्रबाबू यांच्या कांहीं अनुयायांना मद्रासेस बोलावून नेलें, त्या शर्तीचें उल्लंघन होईल अशी भीति वाटल्यामुळें हद्दपाऱ्यांवर भूपेंद्रबाबूंना बोलण्याची परवानगी मिळाली. तथापि हद्दपाऱ्यांबद्दल सरकारला विशेष दोष देण्यापेक्षां हद्दपार झालेल्या गृहस्थांबद्दल गयावया करण्याकडेच कन्व्हेन्शनचें विशेष लक्ष दिसत होतें. हद्दपारीसारख्या महत्त्वाच्या प्रश्नाच्या नगाऱ्याची कन्व्हेन्शननें ही वाट लावली; मग वर्तमानपत्रांवरील खटल्यांच्या टिमकीला कोण पुसतो ?

कन्व्हेन्शनची मद्रासची सभा राष्ट्रीय सभेच्या नांवाखालीं भरविण्यांत आली होती, पण चोरून घेतलेल्या नांवाप्रमाणें कन्व्हेन्शनला ठरावांचीहि बतावणी मद्रासेस करतां आली नाहीं हें वरील हकीकतीवरून वाचकांच्या ध्यानांत येईल. बतावणी करतां आली नाहीं इतकेंच नव्हे तर ज्या थोर व पूज्य संस्थेचें नांव या कन्व्हेन्शननें धारण केलें त्या संस्थेला काळिमा आणण्यासारखीं भाषणें मद्रासेस झालीं, ही गोष्ट शिकल्यासवरलेल्या वर्गास लाजेनें खालीं मान घालावयास लावणारी आहे. डॉ. घोस यांच्या भाषणासंबंधानें व कन्व्हेन्शनमधील इतर उद्गारांसंबंधानें मद्रास, पंजाब व बंगाल येथील लोकमत आज दुसरीकडे दिलें आहे, त्यावरून वरील विधानाची सत्यता वाचकांचे ध्यानांत येईल. कन्व्हेन्शनमध्यें मद्रासेस महत्त्वाचीं भाषणें तीन झालीं. प्रारंभीं अध्यक्ष डॉ. रासबिहारी घोस यांचें अध्यक्ष या नात्याचें भाषण, मध्यंतरीं बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांचें लॉर्ड मोर्ले यांच्या देणग्यावरील भाषण व ह्याच विषयावर ना. गोखले यांनीं कन्व्हेन्शनच्या अखेरीस औपचारिक ठरावाचे निमित्तानें केलेलें शेवटचें भाषण, अशीं हीं तीन भाषणें आहेत. या तीन भाषणांपैकीं आद्यंत झालेल्या दोन भाषणांवरून कन्व्हेन्शनचें मतांतर लोकांना समजणार आहे. सुरतेस नेम-

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

स्तांनीं राष्ट्रीय सभेची परंपरा लाथाडली, नवीन 'क्रीड'नें मतांतर करण्यास संधी मिळाली, व अखेरीस मद्रासेस या मतांतराची दीक्षा डॉ. घोस व ना. गोखले यांनीं कन्व्हेन्शनला दिली. तें नवीन मतांतर कोणतें? हा नवीन राजकीय धर्माचीं सर्व सूत्रें 'सुराराध्य' या एका शब्दांत एकवटलीं आहेत. डॉ. घोस व ना. गोखले यांचा सर्व हिंदी राष्ट्राला असा निरोप आहे कीं, बाबांनो, तुम्हीं अधिकाऱ्यांच्या कृपेनें वागा, ते देतील त्यांत आनंद मानून कृतज्ञ व्हा, व त्यांचें कल्याण तेंच तुमचें कल्याण असें समजून ते तुम्हांस 'सुराराध्य' म्हणतील असें आपलें वर्तन ठेवा. इंग्रजींतील 'Irreconcilable' ह्या शब्दाकरितां मराठींत 'दुराराध्य' हा शब्द अलिकडे वापरण्यांत येतो. राष्ट्रीय पक्ष हा राजद्रोही असून कांहीं केल्या खूप न होणारा पक्ष आहे; ह्या राजद्रोही पक्षाशीं आपला कांहीं संबंध नसून आपण सहज किंवा थोडक्यांत खूष होणारे आहोंत, असें आपल्या रोजच्या वर्तनानें अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्या असा हा नेमस्तांचा नवा धर्म मद्रपुरींत डॉ. घोस व ना. गोखले ह्यांनीं पुकारला आहे! ह्या धर्माला हिंदी राष्ट्रांत किती चेले मिळतात, हें ह्या पुढील वर्षांच्या इतिहासावरून सिद्ध होणारें आहे. तथापि ह्या नवीन राजकीय धर्माचा विचार शांतपणें करणें आज जरूर आहे. 'सुराराध्य' ह्या शब्दानें ह्या धर्माचीं तत्त्वें चांगलीं व्यक्त होतात. 'दुराराध्य'चे विरुद्ध असलेला अर्थ 'सुराराध्य' या शब्दाच्या अक्षररचनेवरून—व्याकरणाची हरकत असली तरी—चांगला व्यक्त होतो; इतकेंच नव्हे तर व्याकरणरीत्या जरी अर्थ केला तरी क्षणिक उत्तेजित करणाऱ्या क्षुल्लक पदार्थानें संतुष्ट होण्याचा नेमस्तांचा धर्म व्यक्त करण्याचें सामर्थ्य ह्या शब्दांतहि चांगलें आहे. राष्ट्रीय पक्ष म्हणजे 'दुराराध्य' व नेमस्तांचा पक्ष म्हणजे 'सुराराध्य' असें मानण्यास हरकत नाहीं. ह्या सुराराध्य धर्मांचीं तत्त्वें डॉ. घोस ह्यांनीं आपल्या भाषणांत येणेंप्रमाणें सांगितलीं:—

( १ ) दुराराज्य किंवा राष्ट्रीय पक्ष राजद्रोही असल्यामुळें सुरतेस सुराराज्यांची एकी ह्या पक्षाशीं झाली नाहीं हें ठीकच झालें. मद्रासेसहि झाली नाहीं हें चांगलेंच झालें, कारण ह्या एकीनें 'सुराराज्यां'च्या राजनिष्ठेस बट्टा लागला असता. राष्ट्रीय पक्षाशीं ह्यापुढें एकी करतां कामा नये, व करण्यांत येणारहि नाहीं. ( २ ) लॉर्ड मोर्ले यांच्या देणग्या अंदाजाहूनहि अधिक भरीव आहेत. राष्ट्रीय सभेच्या मागणीपलिकडेहि ह्या देणग्या गेल्या आहेत. तेव्हां आज आम्हीं कृतकृत्य झालों असून 'सुराराज्यां'च्या मन्वंतरास आतां आरंभ केला पाहिजे. ह्या नवीन कालाचे अध्वर्यू ना. गोखले असले तरी आपण सर्वांनीं ह्या युगाचे 'मनू' मला नेमलें, ह्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. (३) हे सार्वत्रिक आनंदोत्सवाचे (Univer.al rejoi.ings) दिवस असल्यामुळें अधिकाऱ्यांच्या उग्र स्वरूपाचीहि वाटाघाट करणें योग्य नाहीं. सरकारनें पत्रकारांवर फिर्यादी केल्या व कांहीं वर्तमानपत्रें धुळीस मिळविलीं, ह्याबद्दल सरकारास दोष देतां येत नाहीं. कारण बॉम्बसारख्या अत्याचारांची प्रत्यक्ष स्तुति करणें व ह्या अत्याचारांच्या बुडाशीं असलेल्या तत्त्वज्ञानाची मीमांसा चालविणें ह्या दोन गोष्टींत विशेषसा फरक नसून, तत्त्वज्ञानाची मीमांसा करणारांना राजद्रोही ठरवून अधिकाऱ्यांनीं जर शिक्षा दिली तर त्याचा दोष अधिकाऱ्यांवर येऊं शकत नाहीं. जुलमी कायदे व हद्दपाऱ्या यांचीहि कास सरकारनें धरली आहे; पण सरकारनें तरी काय करावें? हें भयंकर स्वरूप अधिकाऱ्यांनीं उठल्या बसल्या उगीचचेउगीच धारण केलेलें नाहीं, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. नवीन मतांचे कित्येक वर्षें गुरु असलेले टिळकहि इंग्रजी राज्य नेटिवांच्या हातून उलथून पडण्यासारखें नाहीं असें म्हणतात, मग अत्याचारांचा निषेध करून अत्याचाराच्या अनुषंगानें शिक्षा झालेल्यांच्या दुःखद स्थितीबद्दल सरकारवर जबाबदारी टाकतां येत नाहीं, हें उघड नव्हे

का मानावयाला ? ( ४ ) अशा ह्या आनंदाच्या मन्वंतरांत 'स्वराज्या'च्या ध्येयाला विशेषसें महत्त्व रहात नाहीं; तथापि उगीच कांहीं तरी ध्येय पाहिजे म्हणून 'स्वराज्याची' कल्पना डोळयांपुढें असूं द्यावी, बाकी आतां कांहीं मागावयाचें उरलें नाहीं. किरकोळ मागण्या आहेत, पण त्या मागितल्या असतां आपोआप पुढें मिळतील. पुढील सालचा अध्यक्ष मिठावरचा कर अजिबात उठला म्हणून जाहीर करील ! त्याच्या पुढील सालचा वड्या नोकऱ्यांची खैरात वाटील. असें होतां होतां कोणच्या तरी एका वर्षाचा अध्यक्ष 'स्वराज्या'चे शिंग फुंकील ! पुढील अध्यक्षांचे वांटणीला कोणचीं सुखें येतील, ह्या गोष्टीचें कल्पनामय चित्र रेखाटण्याचें कारण नाहीं; पण ह्या सर्व आनंदी मन्वंतराचा प्रसार करण्याचें मुख्य काम आज मी करीत असल्यामुळें माझ्याइतका भाग्यशाली पुढील कोणचाहि अध्यक्ष होणें शक्य नाहीं ! डॉ. रासबिहारी घोस ह्यांच्या भाषणाचा सारांश वरील चार सुत्रांत आला आहे. दुराराध्यांची निंदा करून त्यांजवर राजद्रोहाचा छाप मारणें व अधिकाऱ्यांच्याभोंवती गोळा होऊन अधिकाऱ्यांची तळी उचलावयास सुराराध्यांना सांगणें, हीं दोन कामें डॉ. घोस ह्यांनीं चोख रीतीनें बजावलीं; व त्याबद्दल सर्व अँग्लो–इंडियन पत्रें त्यांची व त्यांच्याबरोबरच्च कन्व्हेन्शनवाल्यांची पाठ थोपटीत आहेत ! दुसरें महत्वाचें भाषण बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी ह्यांचें झालें. त्यांनीं लॉर्ड मोर्ले यांची स्तुती केली; पण लोकांना ह्यावेळीं जरूर पाहिजे होतें तितकें मिळालें नाहीं, असें आपलें मत जाहीर केलें. देणग्यांबद्दल लॉर्ड मिंटो यांचे त्यांनीं आभार मानले; पण वंगभंग रद्द झालाच पाहिजे, एरवीं चळवळ बंद पडावयाची नाहीं, असा पर्यायानें हट्ट धरून लोकांच्या नानाप्रकारच्या गाऱ्हाण्यांचें व दुःखांचें चित्र रेखाटून अधिकाऱ्यांच्या दडपशाही धोरणानें लोक कसे चिडून गेले आहेत याचें त्यांनीं वर्णन केलें. डॉ. घोष ह्यांच्या भाषणावर कन्व्हेन्शनमध्यें एक

प्रकारचें अर्धवट विरजण घालणारें भाषण सुरेंद्रबाबूंचें झालें; पण बहिष्काराचा त्याग करण्यास सुरेंद्रबाबू तयार झालेले असल्यामुळें त्यावेळचे त्यावेळेला सुरेंद्रांचे भाषणावर पुनः विरजण घालण्याचें धाडस कन्व्हेन्शनचे चालकांनीं केलें नाहीं. पण तिसरे दिवशीं अखेरीस एका औपचारिक ठरावाचा फायदा घेऊन ना. गोखले ह्यांनीं 'सुराराध्यां'चा धर्म पुनः सांगितला. दुराराध्यांची निंदा डॉ. घोष ह्यांनीं पूर्णपणें केलेली असल्यामुळें दुराराध्यांच्या वाटेस नामदार गेले नाहींत. लॉर्ड मोर्ले यांनीं पायांच्या ठिकाणीं म्युनिसिपालिट्यांच्या खराट्यांचें स्वातंत्र्य, पोटाचे जागीं अन्नाऐवजीं जिभेची नुसती बडबड व डोक्याच्या जागीं नेमस्तांच्या योग्यतेप्रमाणें एक भपकेदार शून्य दिलेलें असल्यामुळें 'सुराराध्यां'नीं अधिकाऱ्यांची काठी हातांत धरून आंधळ्यांप्रमाणें अधिकाऱ्यांच्या मागें जाण्यांत कसें राष्ट्रहित आहे, ह्याचें वर्णन नामदारांनीं वक्तृत्वपूर्ण भाषेनें केलें. नामदारांचें हें भाषण म्हणजे मद्रासच्या कन्व्हेन्शनमधील मुख्य भाषण होय, अशी ह्या भाषणाची तारीफ अँग्लो–इंडियन पत्रें करीत आहेत. अधिकाऱ्यांच्या तंत्रानें वागणें व अधिकाऱ्यांची मर्जी पाहून आपलीं कामें करून घेणें, हा नेमस्तांचा आतां मुख्य धर्म झाला आहे. डॉ. घोष विद्वान आहेत, बहुश्रुत आहेत, कायदेपंडित आहेत; व आपलें भाषण मार्मिक उताऱ्यांनीं सजविण्याची हातोटी त्यांना चांगली साधलेली आहे. त्याचप्रमाणें ना. गोखले विद्वान आहेत, वक्ते आहेत व देशहिताच्या कळकळीनें झीज सोसणारे आहेत. पण हा प्रश्न विद्वत्तेचा नाहीं, बहुश्रुतपणाचा नाहीं, मार्मिकतेचा नाहीं, किंवा स्वार्थत्यागाचाहि नाहीं. हा प्रश्न मुत्सद्दीपणाचा आहे; प्रजाजनांच्या राजकीय धोरणाचा आहे; दुबळ्या प्रजेनें प्रबळ अधिकाऱ्यांपासून हक्क कसे संपादन करावेत ह्या राजकीय मार्गाचा आहे. सहानुभूतीनें सहानुभूति वाढते, व प्रेमानें प्रेम वाढतें, ह्या गोष्टी खऱ्या आहेत; आणि सहानुभूतीनें व प्रेमानें अधिकाऱ्यांनीं पुढें केलेला

हात रागानें झिडकारून द्या, असें आमचेंहि म्हणणें नाहीं. जितक्या राजकीय येतायाताची (Politic) एक पक्षाची सहानुभूति असेल तितपतच येतायाताची दुसऱ्या पक्षाची सहानुभूति असली पाहिजे. अशा प्रसंगीं फाजील प्रेम दाखवून आपलें गाठोडें दुसऱ्याच्या स्वाधीन करणें हें मुत्सद्दी किंवा राजकारणी पुरुषाचें लक्षण खात्रीनें नव्हे. लॉर्ड मोर्ले म्हणतात, लष्करी शक्तींत-हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्य अमर्याद आहे, आधिभौतिक वैभवांत इंग्रजांना हिंदुस्थानांत कांहीं कमी नाहीं, पण लष्कर किंवा संपत्ति एवढ्यानेंच भागत नाहीं. प्रजाजनांचे प्रेमानें उत्पन्न होणाऱ्या अदृश्य शक्तीचीहि जरुरी सर्व अधिकाऱ्यांना असते. ह्या अदृश्य शक्तीचा उगम प्रजाजनांशिवाय इतर दुसऱ्या कोणच्याहि ठिकाणापासून होणें शक्य नसल्यामुळें ही शक्ति कमावण्याकरितां अधिकाऱ्यांना नेहमीं प्रजाजनांच्या तोंडाकडे पहावें लागतें. अरेरावी अधिकाऱ्यांवर केव्हां केव्हां असे प्रसंग येतात कीं, अशा रीतीच्या प्रेमोद्भव अदृश्य शक्तीकरितां त्यांना प्रजारंजन करणें भाग पडते. ज्या प्रजेला आपल्या हातच्या या शक्तीची बरोबर किंमत समजते व योग्य मोबदल्याशिवाय आपल्या हातची ही शक्ति अधिकाऱ्यांच्या हातांत जाऊं देण्यास जी प्रजा तयार नसते, ती प्रजा—कितीहि दुबळी असली, निर्धन असली किंवा निःशस्त्र असली तरी—ह्या स्वभावसिद्ध शक्तीचा योग्य बाजार किंवा देवघेव करण्यानेंच सबल, श्रीमंत व सशस्त्र होऊं शकते. ह्या शक्तीचा योग्य उपयोग हिंदी राष्ट्राच्या हातून करवून घेणें, एवढाच काय तो मुत्सद्दीपणा नेटिव मुत्सद्यांना सांप्रत उरलेला आहे; व स्वावलंबनानें ही शक्ति स्वजनांच्या उद्धारार्थ खर्च करणें, एवढेंच काय तें राजकीय धोरण हिंदुस्थानांतील प्रजेस शिल्लक आहे. प्रत्यक्ष राज्यकारभाराची कोणतीहि बाब पुढाऱ्यांकडे किंवा अनुयायांकडे नाहीं. कितपत खूष व्हावयाचें व कितपत नाखूष व्हावयाचें, हें ठरवून त्याप्रमाणें प्रजेच्या संतोषापासून उत्पन्न

होणाऱ्या अदृश्य शक्तीची विक्री योग्य किंमतीस अधिकाऱ्यांजवळ करावयाची आहे. प्रजेंत राजद्रोह माजवून त्या राजद्रोहाची तरफ लावून अधिकाऱ्यांचें पारडें हलकें केलें पाहिजे, असें प्रतिपादन आम्हीं करीत नाहीं. पण राजकीय धोरणाला सोडून ( Impolitic ) प्रेम दाखविणें हें दुबळ्या व निःशस्त्र प्रजेस सर्वस्वीं आत्मघातकीपणाचें असल्यामुळें व वरील अदृश्य शक्तीच्या विक्रीशिवाय दुसरा कोणचाहि उपाय आम्हां प्रजाजनांत नसल्यामुळें, सांप्रतच्या प्रसंगीं 'सुराराध्यां'चें व्रत लोकांना शिकवणें म्हणजे अज्ञानी जनसमूहास सर्वस्वीं नागवून अवतरणांतील श्वानांचा मुत्सद्दीपणा अंगिकारण्यासारखें आहे. प्रेमास उलट प्रेम दाखवूं नका, असें आमचें म्हणणें नाहीं; पण ह्या कामीं धीरोदात्त गजपुंगवाचा गंभीरपणा स्वीकारला पाहिजे. 'वदनोदर' दाखविणाऱ्या श्वानाची सुराराध्य वृत्ति दाखवून देशकार्य तडीस जाणें शक्य नाहीं.

---

# * आह्माला पार्लमेंट पाहिजे

नवीन देणग्यांचें विवेचन पार्लमेंट सभेंत करतांना लॉर्ड मोर्ले यांनीं हिंदुस्थानसारखा देश पार्लमेंटसारख्या संस्थांचा उपभोग घेण्यास नालायक आहे व पुढेंहि लायक होण्याची आशा नाहीं, अशा आशयाचें विधान केलें. हें विधान हिंदुस्थान सरकारनें आपल्या ता. १ आक्टोबर १९०८ चें खलित्यांत नमूद केलेल्या आधारावर केलेलें आहे. 'हिंदुस्थान' देशास किंवा त्यांतील प्रमुख प्रांतांना राष्ट्र हें नांव देतां यावयाचें नाहीं व पुढें मागेंहि हें नांव ह्या देशाला किंवा प्रांतांना मिळणें शक्य नाहीं, असें सिद्ध करण्याचा अँग्लो-इंडियन लेखकांचा नेहमीं प्रयत्न असतो; व ह्या प्रयत्नास अनुसरूनच मोठमोठ्या मुत्सद्यांचीं मतें हिंदुस्थान सरकारनें आपल्या खलित्यांत दिलीं आहेत. हिंदुस्थान राष्ट्र नसल्यामुळें हिंदी लोकांनींच हिंदी लोकांना जिंकून हिंदुस्थानचें राज्य इंग्रजांच्या हवालीं केलें, असा प्रो. शिली यांचा सिद्धांत आहे. हिंदुस्थानास इंग्रजांनीं जिंकलें असें म्हणण्यापेक्षां राष्ट्रविघातक अंतःस्थ अव्यवस्थेची क्रांति इंग्रजी सत्ता स्थापून व्यवस्था लावण्यांत झाली असें म्हणणें अधिक योग्य होय, असें प्रतिपादन 'इंग्लंडचा विस्तार' या पुस्तकांत करण्यांत आलें आहे. सर स्ट्रॅचीसाहेबांनीं 'इंडिया' नांवाच्या त्यांच्या पुस्तकांत हींच मतें विशेष ताणलीं असून हिंदुस्थानांत इंग्रजाला परकेच समजतां कामा नये, असें ठासून सांगितलें आहे. पंजाबांत रणजितसिंगानें नवीनच राज्य स्थापलें व तेथील मुसलमानांच्या दृष्टीनें शीख परकेच, दिल्लीचे मोंगल हिंदूंच्या दृष्टीनें परकेच, ग्वाल्हेरीस शिंदे परकेच, इंदुरास होळकर परके, बडोद्यास गायकवाड परके, हैदराबादेस

---

* केसरी, ता. २ फेब्रुवारी १९०९

निजाम परके, पुण्यास पेशवे कोंकणचे अर्थात् परके, कोल्हापुरास मराठे उत्तरेकडून दक्षिणेस घसरलेले अर्थात् परके, म्हैसूरास रजपुत राजे परकेच; अशा परकी राज्यकर्त्यांनीं गजबजलेल्या देशांत इंग्रज परके असले म्हणून काय झालें? किंबहुना वरील नानाप्रकारच्या परकीय संस्थानांच्या अमलाखालीं चिरडून गेलेल्या सामान्य बहुजन समाजाचा उद्धार करण्याकडे त्या परकी इंग्रजांचा उपयोग होत असल्यामुळें ह्या नवीन परकी लोकांना अगांतुक न समजतां हिंदुस्थानांतील खरे 'नेटिव्ह'च समजलें पाहिजे. "विषस्य विषमौषधम्" या न्यायानें इंग्रज परके नसून इतर परकीयांवरचें औषधच होत, अर्थात् हिंदुस्थानचें खरें कल्याण करणारे होत, असा स्ट्रॅची आदिकरून लेखकांचा कोटिक्रम आहे. अमेरिकेचे प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं ह्याच कोटिक्रमाचा प्रतिध्वनि परवां अमेरिकेंत काढला! हा कोटिक्रम अर्धवट खरा आहे व अर्धवट खोटा आहे. हत्तीच्या नुसत्या पायांवरून हात फिरविणारा आंधळा ज्याप्रमाणें हत्ती खांबासारखा आहे असें वर्णन करतो, त्याप्रमाणें राष्ट्रांतील सांपत्तिक व व्यापारविषयक स्वरूपांवरच सर्व लक्ष पोंचविणाऱ्या लोकांच्या कडून "हिंदुस्थान राष्ट्र नव्हतें, नाहीं व होणेंहि शक्य नाहीं." अशा प्रकारचा सिद्धांत ठाम नमूद करण्यांत आला आहे. आचारविचारांची एकवाक्यता, भाषेची व धर्म-कल्पनांची पूर्वपरंपरा, हवापाण्याचा सारखेपणा व देशाची ठेवण, वगैरे गोष्टींमुळें हिंदुस्थानांतील कित्येक प्रांत युरोपांतील देशांप्रमाणेंच राष्ट्र होण्यास लायक आहेत, व इंग्रजांनीं तसेंच मनांत आणलें असतें तर एव्हांना हे प्रांत जगांतील जिवन्त राष्ट्रांच्या मालिकेंत गोवलें गेले असते, ह्या दुसऱ्या सिद्धांताकडे त्यांचें लक्षच जात नाहीं. शिवाय पहिलें विष शमविण्याकरितां दुसरें विष जरूर तितकें दिलें पाहिजे. नवीन विष ग्रहण करण्यास शरीर उत्सुक आहे एवढ्याच सबबीवर जर फाजील विष शरीरांत घुसलें तर तें दुसरें विष शरी-

रावर उठल्याशिवाय रहात नाहीं ! आणि हा दुसरा रोग शमविण्याकरितां तिसरेंच विष ग्रहण करण्यास शरीर पुन्हां उत्सुक होतें. शरीरांत फाजील भिनलेलें विष पौष्टिक अन्नाच्या रेलचेलीनें पचतें, ही रेलचेल नसल्यास बाहेर पडतें, असा शरीरधर्म आहे. फाजील विष पचविण्याकरितां पौष्टिक खाण्यापिण्याची रेलचेल शरीर मागत असतांना पहिल्या विषाची आठवण करून देऊन कसें भागणार? स्ट्रॅचीसाहेबांनीं नवीन राजकीय चळवळीच्या प्रारंभींच्या आमदानींत केलेलीं विधानें पहिल्या विषाची आठवण करून देण्याइतकीच सांप्रतच्या नवीन औषधोपचारासंबंधानें निरुपयोगी आहेत. दुसरें विष अंगावर उतूं लागलें आहे, व ह्यावर औषध "पार्लमेंट हिंदुस्थानाला देणें" हें असून पथ्य "स्वदेशी चळवळ" होय.

हिंदुस्थानांत येणारे अधिकारी पूर्वी मेकॉलेचे निबंध वाचून नेटिव्हांविषयीं आपलें मत तयार करीत असत; सांप्रतचे अधिकारी स्ट्रॅचीसाहेबांचें पुस्तक वाचून लोकस्थितीविषयीं आपला अभिप्राय देतात. हिंदुस्थानच्या लोकस्थितीविषयीं व सरकार आणि प्रजाजन ह्यांमधील परस्परसंबंधाविषयीं सर स्ट्रॅची यांचें पुस्तक प्रमाणभूत समजलें जातें, व हिंदुस्थान-सरकारच्या रचनेविषयीं सर इल्बर्ट ह्यांचें पुस्तक प्रमाणभूत समजलें जातें. हिंदुस्थान हें राष्ट्र नाहीं किंवा होऊं शकणार नाहीं, ह्यासंबंधानें निरनिराळ्या प्रांतिक सरकारांचें मतांबरोबरच इतर मुत्सद्यांचीं मतें हिंदुस्थान सरकारनें आपल्या खलित्यांत दिलीं आहेत. हीं सर्व मतें स्ट्रॅचीसाहेबांच्या पुस्तकांतील उपदेशाच्या निरनिराळ्या स्वरूपाचा अनुवाद होत. सर जॉर्ज चेस्ने, लॉर्ड मॅकडोनेल, लॉर्ड डफरिन, ना. आगाखान, लॉर्ड रिपन, लॉर्ड नार्थब्रुक, लॉर्ड किंबलें, मि. ग्लॅडस्टन, मि. स्मिथ, सर विल्यम फौडेन, सर रिचर्ड टेंपल, लॉर्ड लॅन्सडाऊन वगैरे सर्वांचीं मतें एक सांचाचीं आहेत. मुंबई सरकारनें असें प्रतिपादन केलें आहे कीं, ज्यांच्याकडे लॉर्ड

साहेबांचा खर्डा अभिप्रायार्थ पाठविण्यांत आला त्यांनीं एकन्दर राष्ट्राच्या दृष्टीनें विचार न करतां स्वतःची जात, जमात किंवा समाज कोणच्या उपायानें पुढें येईल याचा विचार करून तो उपाय अमलांत आणण्याविषयीं सरकारास विनंति केली आहे. ह्यावरून राष्ट्रीय विचारांची जागृति लोकांत अद्याप झाली नाहीं, असें सरकारचें अनुमान आहे. अधिकारी वर्गाचें व मुत्सद्यांचें सर्वसाधारण मत अशा प्रकारचें असल्यावर लॉर्ड मोर्ले यांनीं हिंदुस्थानास पार्लमेंट कधीं काळीं मिळेल असें आपल्या स्वप्नींहि येत नाहीं म्हणून निक्षून सांगितलें असल्यास नवल काय? आम्हीं स्वराज्याचे हक्कास लायक झालों आहों, असें इंग्लंडांतील लिबरल मुत्सद्यांशीं वादविवादानें सिद्ध करीत बसण्यांत विशेष तथ्यांश नाहीं; येथील अधिकाऱ्यांच्या प्रत्ययास आपली लायकी नेहमींच्या व्यवहारांत आणून दिली म्हणजे विलायतेंतील मुत्सद्यांवर तेव्हांच परिणाम होतो. गेल्या दोन तीन वर्षांत स्वदेशीसारख्या चळवळींत लोक मनोभावानें पडल्यामुळें आमच्या राष्ट्रीयत्वास चांगला प्रारंभ झाला आहे; जपान व तुर्कस्थान यांचीं उदाहरणें सांप्रत हिंदुस्थानांतील लोकांपुढें असल्यामुळें राष्ट्रीय पक्षाचा जोम रोजच्या रोज वाढत आहे; आणि गेल्या तीन चार वर्षांच्या इतिहासानें स्ट्रॅचीसाहेबांच्या विधानांस बऱ्याच अंशानें हरताळ फासला आहे. मग लॉर्ड मोर्ले यांनीं देऊं केलेल्या देणग्यांत खऱ्या सत्तेचा अल्पांशहि कां नाहीं? तक्रारी पुढें मांडण्यास, नवीन सूचना आणून त्यांवर मुबलक वादविवाद करण्यास व बजेटांतील कांहीं किरकोळ बाबी बदलून घेण्यास नवीन कायदे–कौन्सिलांत बरीच सवड ठेवण्यांत आली आहे; पण खरी सत्ता कायदे–कौन्सिलांतील लोकनियुक्त सभासदांच्या हातीं अंशतः निदान जाईल, अशी योजना बिलकूल केलेली नाहीं. अशी योजना न करण्याचें कारण लॉर्ड लॅन्सडाऊन ह्यांनीं लॉर्ड मोर्ले यांजवर टीका

करतांना असें सांगितलें कीं, कायदे–कौन्सिलांतील तक्रारी पक्ष अधिकारारूढ होण्याचा मुळींच संभव नसल्यामुळें लोकनियुक्त सभासदांना भलतेच हक्क देणें इष्ट नाहीं. कौन्सिलांत दोन पक्ष असतात. एक सरकारचा पक्ष व दुसरा लोकांचा पक्ष. सांप्रत लोकांचे पक्षाला तक्रारी पक्ष किंवा विरुद्ध पक्ष असें म्हणतात. कायदे–कौन्सिलांतील विरुद्ध पक्ष किंवा तक्रारी पक्ष वादविवादांत बहुमतानें शहाणा किंवा सत्याचा जरी ठरला, तरी अधिकारांचीं सूत्रें त्यांच्या हातांत जात नाहींत. शहाणपणाच्या दोन गोष्टी सांगाव्यात व शहाण्या न ठरलेल्या लोकांच्या हातांतील कायमच्या अधिकाराला सदोदित दंडवत घालीत स्वस्थ बसावें, अशी लोकनियुक्त सभासदांची स्थिति कायदे–कौन्सिलांत आज आहे. मद्रासचे सर भाष्यम आय्यंगार आपल्या मतांत म्हणतात कीं, लोकनियुक्त सभासदांत तरतरीत वकील व इतर चांगले शहाणे यांचा समावेश होतो. यांचें वाचन बरेंच असतें. हे बोलण्यांत पटाईत असतात व त्यामुळें ह्यांच्यापुढें अधिकारी निर्माल्यासारखे होतात. पण अधिकारी ते अधिकारी व सत्तेवीण शहाणे ते रिकामे शहाणे, अशी खरीखुरी स्थिति असल्यामुळें अधिकारी वर्गांत व प्रजाजनांनीं निवडलेल्या सभासदांत नेहमीं धुसफुस चाललेली असते. लॉर्ड लॅन्सडाऊन म्हणतात, अशी धुसफुस करण्याशिवाय ज्यांना गत्यंतर नाहीं, त्यांना भलतेच हक्क देऊन लोकांतील असंतोष वाढवूं नका. ज्या शहाण्यांच्या सल्ल्याप्रमाणें आपणांस वागावयाचें नाहीं, त्या शहाण्यांचा सल्ला उठल्याबसल्या विचारणें ठीक नव्हे. सल्ला विचारावयाचा आणि तो पायाखालीं तुडवावयाचा, असा प्रकार रोज झाल्यावर शहाणे चिडणार नाहींत काय? ही स्थिति बदलावी म्हणून सर भाष्यम आय्यंगार ह्यांनीं लोकांना एक स्वतंत्र पार्लमेंट देऊन टाकावें अशी सूचना आपल्या लेखांत केली.

सर भाष्यम आय्यंगार ह्यांनीं आपल्या लेखांत मागितलेलें पार्लमेंट इंग्लंडच्या पार्लमेन्टहून फार निराळें आहे. म्हैसूर किंवा त्रावणकोर येथील

लोकसभेच्या धर्तीवर हें पार्लमेंट असावें असें मद्रासकडील सुशिक्षित समाजाचें म्हणणें आहे. प्रांतिक कायदे-कौन्सिलांत १५।२० लोकनियुक्त सभासदांचा समावेश होण्यापेक्षां शें सवाशें लोकनियुक्त प्रतिनिधींचें स्वतंत्र पार्लमेंट असलेलें चांगलें. या शें-सव्वाशेंत सरकारनें नेमलेल्या शेंकडा २५।३० सभासदांची भर टाकण्यास हरकत नाहीं. ह्या तऱ्हेनें सर्व तऱ्हेच्या, सर्व मतांच्या व सर्व दर्जाच्या लोकांना आपले प्रतिनिधी निवडून देण्यास ठीक पडेल, व निराळी सभा केल्यानें वादविवादांत नालायक असलेल्या अधिकाऱ्यांची व लोकनियुक्त चलाख वक्त्यांची उघडया आखाडयांत प्रत्यक्ष कुस्ती होणार नाहीं. दोघांच्याहि तालमी निरनिराळया केल्या, व दोहों बाजूंचे पहिलवान प्रत्यक्ष लढविले नाहींत म्हणजे जयापजयाची चरस वाढणार नाहीं. हल्लीं चुरस जास्त वाढते याचें कारण सरकारी पडया पहिलवानासच अखेर पागोटें बांधावें लागतें, व पडयाच्याच नांवाचा जयजयकार करीत वाजत गाजत मिरवणूक काढावी लागते! ह्यामुळें लोकपक्षाच्या पहिलवानापेक्षां लोक अधिक चिडतात. लोकांच्या प्रतिनिधींचें पार्लमेंट स्वतंत्र केल्यास प्रतिनिधींची संख्याहि पाहिजे तितकी वाढविण्यास हरकत येणार नाहीं; व प्रत्यक्ष होणारें वाग्युद्ध परोक्ष झाल्यामुळें चुरशीचा वाद कमी होईल. सर भाष्यम आय्यंगार म्हणतात कीं, नवीन कायदे कौन्सिलांतील लोकनियुक्त सभासदांना जेवढे अधिकार मिळावयाचे आहेत, तेवढेच अधिकार ह्या स्वतंत्र पार्लमेंटला द्या. लॉर्ड मोर्ले यांनीं वादविवादाला, पोकळ ठराव पुढें आणण्याला, सूचना करण्याला लोकनियुक्त प्रतिनिधींना चांगली सवलत ठेवली आहे. त्याप्रमाणें पार्लमेंटला वादविवादाची पूर्ण मुभा द्या. पार्लमेंटनें एखादा ठराव पुढें आणावा, रगड चर्चा करावी व बहुमतानें पास झाल्यास तो सरकारकडे पाठवावा. सरकारनें पाहिजे तर अंमलबजावणी करावी, पाहिजे तर करूं नये. ह्या पार्लमेंटनें कायद्याचें बिल

पुढें आणावें, पण सरकारच्या कायदे-कौन्सिलानें पास केल्याशिवाय त्या बिलाला कायद्याचें स्वरूप येऊं नये. सरकारचे कायदे-कौन्सिलानें उर्फ सरकारी लॉर्डांच्या सभेनें पास करावयाचे कायदे ह्या पार्लमेंटपुढें चर्चे-करितां आलेच पाहिजेत, व जे कायदे तांतडीमुळें ह्या पार्लमेंटपुढें यावयाचे नाहींत, ते एक वर्षापुरतेच अंमलांत आहेत असें मानावें. म्हणजे निक-डीच्या प्रसंगापुरते कायदे सरकारास पाहिजे तेव्हां करतां यावेत. सरकारी लॉर्डांच्या सभेंत जे एक दोन, चार पांच, लोकांचें प्रतिनिधि पाहिजेत ते ह्या पार्लमेंटनें निवडून द्यावेत. ह्या व्यवस्थेनें सरकारी पहिलवान व लोकांचे पहिलवान यांमधील कुस्ती सोडविल्यासारखी होईल; सरकारी सभासद सांप्रत कवायतीप्रमाणें सरकारच्याच बाजूचें भाषण नेहमीं करतात व इशारतीवरहुकूम सरकारचे बाजूनें हात वर उचलतात, ही हीन स्थिति बदलून १८६१ च्या कायदे-कौन्सिलांतील सरकारी सभासदांप्रमाणें ते खुल्या मनानें आपले विचार प्रकट करूं लागतील व त्यामुळें १८९२ पासून सरकारी पक्ष व लोकांचा पक्ष ही कायदे-कौन्सिलांत माजलेली दुही मोडेल व सरकारची सत्ताहि कमी होणार नाहीं. सर भाष्यम आय्यंगार ह्यांची ही सूचना मद्रास सरकारला पसंत नाहीं. रोमन साम्राज्यांत 'ट्रिब्यू-नेट' नांवाची लोकनियुक्त प्रतिनिधींची सभा होती. ह्या सभेची रचना वरील प्रकारचीच होती, पण अखेरीस सरकारचें व ह्या सभेचें वांकडें येऊन सरकारास 'ट्रिब्यूनेट' जबरदस्तीनें मोडावें लागलें. मद्रास सरकार म्हणतें कीं, या पार्लमेंटांत थोड्याच अवधींत राष्ट्रीय पक्षाचें वर्चस्व होईल आणि पार्लमेंटचें व सरकारचें बिघडून जाऊन ट्रिब्यूनेटप्रमाणें ह्याहि पार्लमेंटला हांकून लावण्याची पाळी हिंदुस्थानांत इंग्रज सरकारावर येईल. मद्रास सरकारचें म्हणणें एक अर्थानें खरें आहे. देशांत राष्ट्रीय पक्षाचेच विचार सर्वसंमत होत चालले असल्यानें सर्व हिंदू दोनचार वर्षांच्या

अवधींत राष्ट्रीय पक्षाचे होतील हा अन्दाज चुकीचा नाहीं. कांहीं लोक "मी मवाळ" "मी मवाळ" म्हणून अधिकाऱ्यांपुढें नाचतील, पण बहुजन समाजाला जर स्वतंत्रपणें–कोणाहि अधिकाऱ्यानें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष डिवचाडिवच न करतां–प्रतिनिधि निवडून देण्याचा हक्क मिळाला, तर म्युनिसिपालिटयांत काय, लोकल बोर्डांत काय, कायदे कौन्सिलांत काय, किंवा पार्लमेंटांत काय, मवाळ म्हणून मिरवणाऱ्यांना मताधिक्य मिळणें शक्य नाहीं. मग हल्लीं दहा पांच समंध कायदे कौंसिलांत आहेत ते पार्ल-मेंट करून शें सव्वाशें करा व मागाहून प्रत्येकाला गाडीत बसा, हा उप-द्व्याप सरकारला कोणीं सांगितला आहे? सरकारची सांप्रत अशी समजूत आहे कीं, हिंदूंच्याविरुद्ध मुसलमान, मुसलमानांच्याविरुद्ध जमीनदार, व जमीनदारांच्याविरुद्ध युरोपियन व्यापारी, अशीं कोंबडीं कायदे–कौन्सिलांतच झुंजविल्यानें सरकारी पक्ष व बिनसरकारी पक्ष ह्यांमधील सामना कमी होईल व त्यामुळें कायदे–कौन्सिलांतील नवीन शाब्दिक "केशाकेशी" युद्ध सरकारची इज्जत वाढविण्यास कारणीभूत होईल. सरकारची ही कल्पना चुकीची आहे. तुर्कस्थानचे पार्लमेंटचा विलक्षण परिणाम हिंदुस्थानांतील मुसलमानांवर दोन चार वर्षांत होईल व कोंबडी झुंजविण्याचा अधिका-ऱ्यांचा बेत मनोराज्यांत गुंगलेल्या शेख महंमदाच्या लाथेप्रमाणें सरकारी इज्जतीच्या कांचेचे तुकडे तुकडे करील. आज नाहीं उद्यां–पांच दहा वर्षांचे आंत–कायदे कौन्सिलांतील ही झोंबाझोंबी सरकारास टाळावी लागेल. मग लोकनियुक्त प्रतिनिधींचें निराळेंच पार्लमेंट आज बनवून कुस्तीच न लावणें इष्ट नाहीं काय? दोन निराळे आखाडे केल्यानें प्रत्येकाला कसला संकोच न वाळगतां कुस्ती आपल्या मनाप्रमाणें करतां येईल खरी; पण सरकार म्हणतें, राष्ट्रीय पक्षानें पार्लमेंट व्यापून टाकल्यास ही अंतरावरची झोंबाझोंबी कायदे-कौन्सिलांतील प्रत्यक्ष " केशाकेशी " इतकीच त्रासदायक होईल. मवाळांना खूप करून ४।।' वर्षें मागचा लकडा थोडासा कमी होईल; पण राष्ट्रीय

पक्षास अंशतः तरी खूष केल्यावांचून सरकारास हिंदुस्थानांत गत्यंतर नाहीं. स्वतंत्र पार्लमेंट दिलें व पार्लमेंटच्या हातांत खरी सत्ता कांहींच ठेवली नाहीं, तर राष्ट्रीय पक्ष अंशतःहि खूष होणें शक्य नाहीं. ह्या हिंदी प्रांतिक पार्लमेंटांना इंग्रजी पार्लमेंटचे अधिकार इंग्रजी राज्यांत मिळणें हेंहि कधीं शक्य नाहीं. मग ह्या दोन परस्परविरूद्ध टोकांमध्यें तडजोड कशी करावयाची? हिंदुस्थानांतील इंग्रजी साम्राज्यासारखें साम्राज्य पूर्वी हिंदुस्थानांत मोंगलांचें होतें व युरोपांत रोमचें होतें. या पूर्वीच्या साम्राज्यांतून जिंकलेल्या लोकांच्या हातीं मोटमोठीं शहरें व सैन्याच्या छावणीचीं ठिकाणें शिवाय करून इतर प्रांताचा प्रत्यक्ष कारभार होता; व जिंकलेल्यांना असा प्रत्यक्ष कारभार तोडून दिलेला असल्यामुळें अखेरच्या ताटातुटीचे परमेश्वरी योगायोगाचे दिवस येईतों जिंकणाराचे व जिंकलेल्यांचे दोघांचेहि दिवस गुण्यागोविंदानें गेले. आगगाड्या व तारायंत्रें जर इंग्रजांपाशीं नसतीं तर हिंदुस्थानांतहि व्यापाराचीं शहरें, राजधानीचीं शहरें व सैन्याच्या छावणीचीं ठिकाणें, ह्यांशिवाय इतर ठिकाणांचा कारभार इंग्रजांनीं नेटिव्हांच्याच हातीं ठेवला असता. शास्त्रीय नवीन शोधांमुळें चाटूनपुसून सर्व खाण्याची हांव साहजिकपणें उत्पन्न झाली व सर्व प्रांतांची गुंतागुंत होऊन प्रमुख ठिकाणांखेरीजचे प्रांत नेटिव्हांच्या कारभाराला राखून ठेवण्यांत आले नाहींत. शास्त्रीय शोधांमुळें जें पोटाच्या शक्तीबाहेर फाजील हावरेपणानें खाण्यांत आलें, तें परत ओकण्याची वेळ आतां आली आहे. पूर्वी मोठमोठीं नाकेबंदीचीं शहरें व सैन्याचीं ठिकाणें हिंदुस्थानांत मोंगलांच्या हातांत व युरोपांत रोमच्या हातांत असत; ह्या स्थितीला अनुसरून असणारीं राजकीय स्वरूपाचीं खातीं इंग्रजांनीं आपल्या हातांत ठेवावीत, व निरुपद्रवी खातीं नेटिव्हांच्या पार्लमेंटच्या हातीं द्यावींत. ह्या निरुपद्रवी खात्यांचें बजेट व व धोरण पार्लमेंटनें व अधिकाऱ्यांच्या कायदे-कौंसिलनें मिळून ठरवावें व या खात्यांचा सदर धोरणाला धरून चालावयाचा कारभार पार्लमेंटनें मता-

धिक्यानें निवडलेल्या नेटिव्ह अधिकाऱ्यांचे मार्फत चालावा. अशा रीतीनें इंग्रजी सत्तेस कमीपणा न येतां पार्लमेंटच्या हातांत कारभार जाईल व अधिकाऱ्यांच्या धोरणाशीं झोंबाझोंबी करण्याशिवाय स्वतःच्या देखरेखी-खालील खात्यांच्या अंमलबजावणीचें काम पार्लमेंटला मिळाल्यामुळें पार्ल-मेंटमध्यें व सरकारमध्यें चुरस उत्पन्न होणार नाहीं. अशा रीतीनें कारभार पार्लमेंटच्या हातीं पडल्यास सरकारी पक्ष व सरकारच्या विरोधी तक्रारी पक्ष असे भेद पार्लमेंटमध्यें न होतां कारभार कोणत्या तऱ्हेवर चालवावा, ह्यासंबंधी पक्ष पार्लमेंटमध्यें होतील; व सरकारच्या मागील लकडा आपोआप कमी होईल. सर भाष्यम आय्यंगार यांनीं सुचविलेल्या पार्लमेंटच्या स्वाधीन बऱ्याच निरुपद्रवी खात्यांचा कारभार केल्यास, कायदे करतांना पार्लमेंटचा सल्ला सरकारास मिळेल, कायदे कर-ण्याची व सामान्य बजेटाची सत्ता सरकारच्या हातांत राहील, व पार्लमेंटां-तील सरकारनें नेमावयाचे सभासद शेंकडा २५।३० असल्यामुळें पार्लमेंटांत मताधिक्य करून कारभार हातीं घेऊं पहाणाऱ्या पुढाऱ्यांना पोकळ 'ठरावां'-वरील चर्चेंत सरकारशीं तितक्या बेपर्वाईनें वागून चालावयाचें नाहीं. पूर्वींच्या विनआगगाडीच्या व विनतारायंत्रांच्या काळांत मोंगलांनीं व रोमन लोकांनीं जिंकलेल्यांशीं वागतांना सत्तेचीं सूत्रें हातांत ठेवून कार-भाराची वांटणी करण्याचा मार्ग स्वीकारला; हल्लींच्या आगगाडीच्या, तारा-यंत्रांच्या व लोकनियुक्त सभांच्या काळांत लोकांच्या पार्लमेंटला—सत्तेच्या सूत्रांची जरी नाहीं तरी—कारभाराची वांटणी दिल्यावांचून इंग्रजांचें चाला-वयाचें नाहीं. ही वांटणी इतिहासाला संमत आहे, व्यवहाराला धरून आहे,—व साम्राज्यसत्तेच्या आडहि येणारी नाहीं. अशी वांटणी मिळाल्याशिवाय राष्ट्रीय पक्ष अंशतःहि खूष होणें शक्य नाहीं.

# ❀ तरी हें भयंकरच !

बाबू अरविंद घोष निर्दोषी ठरल्यानंतर विलायतेस 'डेली क्रॉनिकल' पत्रामध्यें थिऑसॉफिकल सोसायटीच्या बिझांट बाईंच्या मुलाखतीची हकीकत प्रसिद्ध झाली आहे. हिंदुस्थानच्या एकन्दर परिस्थितीसंबंधानें आपला अभिप्राय दिल्यानंतर बिझांट बाईनीं अरविंद बाबूंसंबंधानें खालील आशयाचे उद्गार काढले आहेत.

" फार मोठया वजनाचे व शक्तीचे दोन तीन पुरुष जरी राष्ट्रीय पक्षांत असले तरी हा पक्ष संख्येनें लहान आहे. ज्यांना नुकतेंच निर्दोषी ठरविण्यांत आलें आहे, ते अरविंद बाबू मॅझिनीच्या धर्तीचें पुरुष आहेत. फरक इतकाच कीं, अरविंद बाबू माथेफिरू आहेत, आणि मॅझिनी तसा नव्हता. इंग्रजांच्या विरुद्ध चाललेल्या चळवळीचें हें हृदय आहेत. पूर्णपणें निर्मळ हेतूनें हे वागत असून त्यांनीं स्वार्थ अजिबात सोडला आहे. स्वतःचें प्राबल्य वाढविण्याची त्यांची इच्छा नाहीं तरी ते भयंकर आहेत, कारण ज्यांच्या योगानें इंग्रजी राज्य उलथून पडेल असे कोणचेहि उपाय योजण्यास ते मार्गेपुढें पहाणार नाहींत. "

मे व जून महिन्यांत व्याख्यानें देण्याकरितां बिझांट बाई विलायतेस गेल्या असून ना. गोखले यांच्या 'सर्व्हंटां'च्या समाजाप्रमाणें स्थापावयाच्या आपल्या "सन्स अँड डॉटर्स" यांच्या समाजाला लोकाश्रय व राजाश्रय संपादण्याच्या दृष्टीनें सदर मुलाखतींत तत्त्वें त्यांनीं सांगितलीं आहेत. लाटसाहेब लॉर्ड मिंटो, मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क व मद्रासचे गव्हर्नर सर लॉले, या त्रिमूर्तीची स्तुति त्यांनीं आतोनात केली आहे, आणि लॉर्ड मिंटो यांची खरी किंमत विलायतेच्या लोकांना अद्याप समजली नाहीं,

---

❀ केसरी ता. १ जून १९०९

असेंहि त्यांचें मत आहे. लॉर्ड मोर्ले यांच्या कायदे–कौन्सिलाच्या बिलानें हिंदुस्थान शांत होईल किंवा कसें, हा प्रश्न सांप्रत विलायतच्या लोकांपुढें असून त्यासंबंधानें बिझांट बाईचें म्हणणें असें आहे कीं, मूठभर राष्ट्रीय पक्षाशिवाय इतर सर्व खूष आहेत. तथापि कांहीं किरकोळ गोष्टींपासून लोकांना दुःख होत असून ह्या दुःखाचे भांडवलावर राष्ट्रीय पक्षाचा व्यापार चालला आहे. हा व्यापार बंद कसा पाडावयाचा ? व्यापार तीन रीतींनें बंद पडतो. पहिला प्रकार असा कीं, दुकानदारच नाहींसा करावयाचा, म्हणजे दुकान बंद झालेंच. दुसरा प्रकार असा कीं, भांडवल खेंचावयाचें म्हणजे व्यापाऱ्यांच्या नाडया आंखडल्या. तिसरा प्रकार असा कीं, गिऱ्हाईकच नवीन दुकानदाराकडे ओढावयाचें, म्हणजे जुनें दुकान आपोआपच शून्य दिसूं लागतें. बिझांट बाईच्या मुलाखतींत हे तीनहि मार्ग सुचविण्यांत आले आहेत. लॉर्ड मोर्ले यांच्या सुधारणांनीं व लॉर्ड मिंटो यांच्या सौजन्यानें लोकांचीं गाऱ्हाणीं कमी होतील व राष्ट्रीय पक्षाच्या राजकीय व्यापाऱ्यांचें भांडवल संपुष्टांत येईल; पण एवढयानें भागावयाचें नाहीं. बिझांट बाई म्हणतात कीं, राष्ट्रीय पक्षाच्या शेजारीं नवीन दुकानें थाटविण्यास अधिकाऱ्यांनीं व इंग्रजांनीं मदत केली पाहिजे. मवाळांचें कन्व्हेन्शन हें एक अशाच प्रकारचें दुकान असून ना. गोखले व मुंबईचे मवाळ हे ह्या दुकानांतील शेटजी होत. बिझांट बाईचें म्हणणें असें होतें कीं, मवाळ दुकानांनीं काम भागावयाचें नाहीं. मवाळांच्या हातून न उरकणारें कार्य बिझांट बाई उरकूं पहात आहेत, व हें कार्य साधण्याकरितां 'सन्स अँड डॉटर्स' ह्या नांवाची संस्था स्थापण्याचा त्यांचा विचार आहे. ह्या विचाराला लॉर्ड मिंटो, सर जॉर्ज क्लार्क वगैरे मुख्य अधिकाऱ्यांची संमति मिळाली आहे, पण खालचे अधिकारी किंवा सामान्य अँग्लो–इंडियन हे अनुकूल नाहींत. ह्या अधिकाऱ्यांचें मत असें पडतें कीं, कोणच्याहि संस्थेच्या निमित्तानें हिंदी लोकांचीं मनें एकविचारानें भरून आपलें कार्य तडीस नेण्याकरितां सुव्यवस्थित व कार्यक्षम मार्गाला त्यांना लावणें इष्ट नाहीं.

एका कामाकरितां जूट करावी व जूट झाल्यानंतर त्यांनीं तिसरेंच कार्य हातीं घ्यावें व नवीनच संकट उत्पन्न व्हावें हें ठीक नाहीं. हें संकट तर खरेंच; पण बिझांट बाई म्हणतात, ह्या संकटाशीं टक्कर देण्याशिवाय गत्यंतर नाहीं. थिऑसॉफीच्या तीनशें शाखा हिंदुस्थानांत आहेत व ह्या शाखांच्या सामर्थ्यामुळें हिंदुस्थानचे "मुलगे व मुली" राष्ट्रीय चळवळीचा विचार, राजकीय चळवळीचा विटाळ आपणांस होऊं देणार नाहींत, अशी बिझांट बाई खातरनामा देत आहेत. बिझांट बाईच्या 'मुलामुलीं'चीं दुकानें थाटामाटाचीं व चित्ताकर्षक करण्यांतच राज्यकर्त्यांचें व सामान्य इंग्रजांचें हित आहे हा विचार बिलायतच्या लोकांच्या नीट गळीं उतरावा म्हणून, मोर्लेसाहेबांच्या सुधारणांनीं भागणारें नसून अरविंद बाबूंसारखे पुढारी भयंकर आहेत, असें टुमणें बाईनीं बिलायतच्या लोकांच्या मागें लावलें आहे. राज्यकर्त्यांच्या मागें कांहींना कांहीं ससेमिरा असल्याशिवाय सभोंवार गोळा होणाऱ्या भुतांचीं पोळी पिकत नाहीं, व ह्या सामान्य नियमाला अनुसरूनच मवाळांनीं राष्ट्रीय पक्षाविषयीं राज्यकर्त्यांच्या मनांत द्वेष उत्पन्न केला. कर्त्यां पण क्षुद्र दृष्टीच्या हातून अशा चुका होतात. बाबू अरविंद इंग्रजांचे द्वेष्टे असून राष्ट्रीय पक्ष केव्हां काय करील ह्याचा नेम नाहीं, अशी भीति इंग्रजांना घालण्याचा बाईचा डाव आहे. ज्यांच्यापासून आपलें काम करून घ्यावयाचें असतें त्यांच्या प्रेमाला खुलवून किंवा द्वेषाला चिथवून धूर्त लोक आपलें घोडें पुढें ढकलीत असतात. कार्यवश बिझांट बाईनीं किंवा अदूरदर्शी मवाळांनीं असें केलें नसतें तर मात्र आश्चर्य होतें. मवाळांपुरता व बिझांट बाईपुरता हा डाव ठीक आहे; पण सरकारला ह्यापासून काय फायदा?

राष्ट्रीय पक्षाला आपल्या सभोंवतीं गोळा करण्याच्या इराद्यानें लॉर्ड मोर्ले किंवा लॉर्ड मिंटो ह्यांनीं देणग्या दिलेल्या नाहींत, व मवाळांप्रमाणें राष्ट्रीय पक्ष ह्या देणग्यांनीं हुरळूनहि गेलेला नाहीं. दोघांचाहि एकमेकां-

विषयीं ह्या प्रकरणीं गैरसमज नाहीं. राष्ट्रीय पक्षाचे लोक ह्या सुधारणांमुळें आपला धंदा सोडून देतील अशी सरकारची अपेक्षा नाहीं, पण मुत्सद्यांची अशी अटकळ आहे कीं, ह्या सुधारणांमुळें राष्ट्रीय पक्षाचे मालाला गिऱ्हाईकच मिळणार नाहीं. ही अटकळ खोटी ठरल्यावांचून रहाणार नाहीं, असा आमचा दृढ विश्वास आहे. मवाळाला नाचविण्याचें सामर्थ्य नवीन बिलाच्या अंगीं असलें तरी राष्ट्रीयांचा धंदा बसविण्याची ताकद या बिलाच्या अंगीं खास नाहीं. नवीन बिल पार्लमेंटांत पास होऊन बादशहा सप्तम एडवर्ड यांचीहि मंजुरी ह्या बिलास गेल्या आठवड्यांत मिळाली आहे. ह्या बिलाला अनुसरून निवडणुकीसंबंधानें नियम तयार होऊन अंमलबजावणीस हिंदुस्थान-सरकारकडून लवकरच सुरवात व्हावयाची आहे. नवीन बिल थोड्या अवकाशांत मैदानावर यावयाचें असल्यामुळें बिलाचे कार्याविषयीं आज अधिक विवेचन करणें नलगे. घोडामैदान जवळ आहे. आखाड्यांत उतरल्यावर प्रत्येकाची परीक्षा होईलच. पण आजचा प्रश्न असा आहे कीं, सरकार कोणच्या भावनेनें आखाड्यांत उतरणार ? विझांट बाई किंवा मवाळपक्ष ह्यांनीं कालविलेलें विष जसेंच्या तसें मनांत ठेऊन बिलाचे अंमलबजावणीस सरकार आरंभ करणार का स्वतःच्या कृतीवर विश्वास ठेवून शुद्ध मनानें बिलाची अंमलबजावणी करणार ? राष्ट्रीय पक्षाकडे सरकारी अधिकाऱ्यांनीं दोन दृष्टीनीं पहावयाचें असतें. पहिली दृष्टि अशी कीं राष्ट्रीय पक्षाचे पुढारी विचारानें कसे आहेत, व दुसरी दृष्टी अशी कीं राष्ट्रीय पक्षाचे पुढारी आचारानें कसे आहेत ? लोकमान्य टिळक घ्या, अरविंदबाबू घ्या, किंवा हद्दपार केलेले बंगाली गृहस्थ घ्या. त्यापैकीं कोणींहि आपले विचार गुप्त ठेवलेले नाहींत. ह्यांच्या विचारांत चोरटा प्रकार कोणचाहि नाहीं. बाहेर एक आंत एक, अशांतला भाग नाहीं. लेख लिहून व व्याख्यानें देऊन ह्यांनीं आपल्या मतांचा प्रसार केला आहे. बरें, हीं स्वराज्यासंबंधाचीं मतें युरो-

पियन मुत्सद्यांना नवीन आहेत, असें म्हणावें तर तशीहि गोष्ट नाहीं. पोलिस खात्यांतील अधिकाऱ्यांना हीं मतें नवीन असतात, व तशीं तीं भासल्यास नवलहि नाहीं. कारण त्यांचें शिक्षणच बेताचें असतें. राष्ट्रीय तत्त्वज्ञान कशाशीं खातात याची वार्ता त्यांना नसते. सिव्हिलियनांना हा विषय माहीत असतो; पण कलेक्टर झालेल्या सिव्हिलियनांची व पुस्तकांची फारकत होऊन फार दिवस निघून जातात, म्हणून कलेक्टरांपैकीं बरेच कलेक्टर राष्ट्रीय पुढाऱ्यांचे विचार ऐकून कान टवकारतात. पण विलायतच्या मुत्सद्यांची किंवा विलायतेहून हिंदुस्थानच्या गव्हर्नरांच्या किंवा गव्हर्नर जनरलांच्या जागीं आलेल्या मुत्सद्यांची स्थिती अशी नसते. स्वराज्याचे विचार त्यांच्या रोजच्या उजळणींतले आहेत. आज जपानांत स्वराज्य ऊर्जितावस्थेस आलें तर उद्यां रशियांत स्वराज्याकरितां धामधूम उडाली, आज तुर्कस्तानांत स्वराज्य स्थापलें तर उद्यां इराणांत पार्लमेंट स्थापण्याचा हुकूम सुटला, ही चर्चा त्यांच्या नित्य पाठांतली आहे. ह्या चर्चेला, ह्या उदात्त कल्पनेला, स्वराज्याच्या उच्च साध्याला, लॉर्ड मोर्ले किंवा लॉर्ड मिंटो भिणारे नाहींत. उदात्त कल्पना व उच्च विचार ज्या योगानें उत्पन्न होतात व फैलावले जातात त्या विचार-स्वातंत्र्याची भाषण-स्वातंत्र्याची व मुद्रण-स्वातंत्र्याची महति युरोपियन मुत्सद्यांना समजते. आज खुद्द इंग्लंडांत काय चाललें आहे ? इंग्लंडांत जा, फ्रान्सांत जा, किंवा जर्मनींत जा; चालू राज्यपद्धति मोडून टाकून नवी—अगदीं निराळ्या स्वरूपाची—राज्यपद्धति अंमलांत आली पाहिजे, असें म्हणणारा "सोशियालिस्ट" पक्ष काय लहान वाद घालून राहिला आहे ? राज्यकर्त्यांना न रुचणारीं मतें निर्भीडपणें प्रजेपुढें मांडणारे लोक आज प्रत्येक देशांत आहेतच; पण हिंदुस्थानाप्रमाणें असल्या मतांचे व्यापारी चौकशीशिवाय कैदेंत उचलून टाकण्याची किंवा बॉंबच्या वहिमावरून १२४ अ कलमाखालीं चिरडण्याची वहिवाट तेथें नाहीं. मनांत किंतु

बॉबच्या आणि बाहेर प्रदर्शन १२४ अ किंवा १५३ अ या कलमांचा, असा प्रकार हिंदुस्थानांत कां चालूं द्यावा ? हिंदुस्थानांत ज्या जुलमी खट-ल्यास किंवा ज्या हद्दपाऱ्या करण्यास संमति देण्यांत आली, तशाच प्रका-रचे खटले व तशाच प्रकारच्या हद्दपाऱ्या आयर्लंडांतहि प्रधान-मंडळानें कराव्यात, अशी सूचना मुख्य प्रधान मि. आस्क्विथ ह्यांना मि. बाल्फोर ह्यांनीं केली असतां ती सूचना कां स्वीकारण्यांत आली नाहीं ? हिंदुस्थानां-तील खटल्यांची व हद्दपाऱ्यांची पद्धत मि. आस्क्विथ ह्यांना पसंत नाहीं, असें ह्यावरून सिद्ध होत नाहीं काय ? ह्या सर्व आक्षेपांना अधिकाऱ्यांकडून असें उत्तर मिळण्याचा संभव आजपर्यंत होता कीं, अरविंद बाबूंवर आम्हीं प्रत्यक्ष बॉबचीच फिर्याद लावली आहे, आणि राष्ट्रीय पक्षाचीं उदात्त तत्त्वें व बॉबचीं माथेफिरू कृत्यें ह्यांचा संबंध कसा आहे तें आम्हीं या खटल्यांत दाखविणार आहों. बंगाल्यांत नऊ पुढाऱ्यांना अकस्मात् उचलून विन-चौकशीनें तुरुंगांत टाकलें; हें जुलमी कृत्य झालें तरी बॉबच्याच संशयानें सरकारनें केलें. पार्लमेंटच्या १४६ सभासदांनीं थोडे दिवसांपूर्वी मुख्य प्रधान मि. आस्क्विथ ह्यांना अर्ज करून अशी विनंति केली कीं, हद्दपार केलेले लोक सुस्वभावाचे व चांगल्या लौकिकाचे असून त्यांना १८१८ चे रेग्युलेशनखालीं कैद करण्यांत आले हा अन्याय झाला, तेव्हां त्यांच्यावर कांहीं प्रत्यक्ष आरोप तरी ठेवा किंवा त्यांना सोडून तरी द्या. ह्या विनंतीस उत्तर देतांना मि. आस्क्विथ ह्यांनीं असें सांगितलें कीं, सांप्रतच्या बॉबच्या वेळीं असला अधिकार हिंदुस्थान सरकारास असणें जरूर आहे. ह्या उत्तराचा अर्थ इतकाच कीं, बॉबच्या संशयावरून ह्यांना हद्दपार करण्यांत आलें आहे व ह्या संशयाचें निराकरण होईतों त्यांना सोडण्यांत येणार नाहीं. अरविंद बाबूंचे खटल्यांत असला संशय राष्ट्रीय पक्षावर घेण्यास कांहींच आधार नाहीं, हें सिद्ध झालें आहे. राष्ट्रीय पक्षाचे पुढारी विद्वान आहेत अशी खात्री सरकारची व लोकांची झाली आहे. अरविंदबाबू, लो. टिळक ह्यांचें खाजगी वर्तन साधें व सर्वांनीं कित्ता घेण्यासारखें आहे ह्याविषयीं कोणा-

चाच वाद नाहीं. स्वार्थत्याग करणारे हे पुढारी असून खाजगी डाव ह्यांना साधावयाचे नाहींत, अशी साक्ष विझांट बाईचीहि आहे. ह्या सर्व गोष्टी राष्ट्रीय पक्षास अनुकूल आहेत; व एकसारख्या एक वर्षभर बाँबच्या खटल्याच्या कीस काढून जर राष्ट्रीय पक्षाचा बाँबशीं संबंध जोडतां येत नाहीं, तर राष्ट्रीय पक्षाचे पुढारी 'भयंकर' नाहींत असें सरकारनें कृतीनें जाहीर करावयास नको काय? अलीपुरच्या बाँबच्या खटल्यांत बंगालचे राष्ट्रीय पक्षाचे पुढारी गुंतविण्याचा उद्योग करण्यांत आला, व कोल्हापूरचे 'बाँबच्या' खटल्यांत महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांवर बाँब शेकविण्याचा प्रयत्न झाला. दोन्ही ठिकाणीं ओम् फस् झालें! राष्ट्रीय पक्षाच्या अंगाला बाँब बिलकुल चिकटवितां येत नाहीं, असें कायद्याच्या कोर्टांत ठरल्यानंतर, उदात्त विचाराचे व निर्मळ आचाराचे, अनुकरणीय स्वार्थत्यागाचे व आदरणीय विद्वत्तेचे पुढारी भयंकर व पाहिजे तीं कर्मे करणारे असतात, ह्या कल्पनेला सरकारनें एकसारखें कवटाळून धरणें इष्ट आहे काय? पुराव्याच्या कसास लावतांना सरकारची कल्पना खोटी ठरली आहे; इतर देशांचीं उदाहरणें पहातां अधिकाऱ्यांना न आवडणाऱ्या मतांचा प्रसार करण्यास लॉर्ड मोर्लेसारख्या मुत्सद्यांची अडकाठी नसते असा अनुभव आहे. उदात्त विचारहि भयंकर वाटण्यास जी दुःखाची परंपरा आवश्यक असते ती लॉर्ड मोर्ले खुंटवूं पहात आहेत; अशावेळीं पुरावा नसतांना, ॲंग्लो-इंडियन समाजापैकीं कांहींना राष्ट्रीय पक्षाचे पुढारी विझांट बाईच्या किंवा कांहीं मवाळांच्या मताप्रमाणें 'भयंकर' वाटतात एवढ्याच सबबीवर, लॉर्ड मिंटो किंवा लॉर्ड मोर्ले ह्यांनीं राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांना कैदेंत अधिक दिवस ठेवण्यास तयार होणें म्हणजे युरोपच्या इतिहासांतील 'स्वराज्या'च्या उदात्त ध्येयाकरतां झगडलेल्या सर्व वीरपुरुषांचे शिव्याशाप माथी घेण्यास तयार होण्यासारखें आहे.

---

# * निमकहराम सरकारी नोकर

व्यक्तीप्रमाणें राष्ट्रहि अंशतः पराधीन व अंशतः स्वाधीन असतें. ह्या पराधीनतेचा व स्वाधीनतेचा साक्षात् अनुभव प्रत्येकास पदोपदीं यावयास मिळतो. राष्ट्र पराधीन कोणत्या वेळीं व कोणत्या बाबतींत आहे, आणि राष्ट्र स्वाधीन कोणत्या वेळीं व कोणत्या बाबतींत आहे, यासंबंधाच्या विचारांत दक्षता ठेवली नाहीं म्हणजे सर्वच कोटिक्रम चुकीचा होतो. सरकारी नोकरी करणाऱ्या मध्यम स्थितींतील सुशिक्षित वर्गानें सकाळ संध्याकाळ स्वराज्याच्या विचारांत मग्न असावें व माध्यान्हकाळाचीं दुःखें टाळण्याकरितां पगार देणाऱ्या साहेबाची आठवण करावी ही गोष्ट प्रथमदर्शनीं विसंगत वाटते खरी; पण शांतपणें विचार केला म्हणजे हा विसंगतपणा सुसंगत आहे, हें ध्यानीं येतें. व्यक्ति, वर्ग किंवा राष्ट्र यांचें स्वातंत्र्य व पारतंत्र्य यांमधील धागे नीट जुळवितां आले नाहींत म्हणजे स्वतःचेंच मन घोटाळ्यांत पडतें व दुसऱ्याच्या कृतींत विसंगतता दिसूं लागते. ज्या वर्गावर प्रथम विसंगततेचा व नंतर निमकहरामीचा आरोप लादण्यांत येत आहे, त्या वर्गाची स्थिति कशी आहे तें आपण आतां पाहूं. कॉलेजांतील शिक्षण पुरें झाल्यावर सरकारी नोकरींत शिरलेल्या सुशिक्षित कारकुनाचें उदाहरण आपण घेऊं. नोकरींत शिरण्यापूर्वी कॉलेजांत असतांना इंग्लंडच्या व युरोपच्या इतिहासांतील स्वातंत्र्याकरितां जिवापाड मेहनत करणाऱ्या विभूतींच्या अलौकिक गोष्टी ह्यानें वाचलेल्या असतात; देहभान नाहींसें झाल्यामुळें संसाराची कांहीं काळ विस्मृति पाडणारे स्वराज्याचे युद्धाचे प्रसंगांत गढून जाण्याची दीक्षा ह्याला देण्यांत आलेली असते; व संसाराचा बोजा स्वतःचे शिरावर घेण्यास प्रारंभ करावयाचे वेळीं पुस्तकी ज्ञान

---

* केसरी, ता. २७ जुलै १९०९

व सभोंवारची लढतर वस्तुस्थिति यांचा मेळ बसविण्यांत तो गुंतलेला असतो. नोकरींत शिरतांना तो म्हणतो, परकी सरकारची नोकरी मी कां पत्करली ? हें सरकार परकी नसतें व स्वदेशी असतें तरी त्यानें म्हटलें असतें, माझ्या देशाला 'स्वराज्य' न देणारें हें सरकार; आणि त्याचीन नोकरी मी पत्करल्यानें—नोकरीपुरत्या अंशानें तरी माझ्या देशाच्या 'स्वराज्या'च्या आड मी येत नाहीं काय ? मधमाशीनें बागेतील नानाप्रकारच्या फुलांतून मध गोळा करून मधाचें पोवळें जसें बनविलेलें असतें त्याप्रमाणें ह्याच्या मनानें निरनिराळ्या देशांच्या इतिहासांतील 'स्वराज्या'च्या नळकांडीतलें ज्ञान गोळा करून आपल्या देशाच्या भावी 'स्वराज्या'चें पोवळें बनविलेलें असतें, व ह्या पोवळ्याभोंवतीं गुंगत राहून कित्येक सुखाचे दिवस ह्यानें घालविलेले असतात. मधाचें पोवळें झाडावरून खाली पाडून प्हाणारावर मधमाशा जशा चालून जातात, त्याप्रमाणें 'स्वराज्या'च्या विरुद्ध असलेल्या सरकारची नोकरी कर म्हणून सांगणाऱ्यांवर ह्याच्या कपाळाला आठ्या पडतात ! निरनिराळ्या राष्ट्रांच्या इतिहासांतील 'स्वराज्या'वरील प्रकरणांच्या गगनचुंबी वृक्षांचा आसरा घेऊन ह्याच्या बुद्धीची लता संसाराची भूमि सोडून आकाशगामी झालेली असते; ही वरची गति मोडून संसाराच्या तप्त भूमीवर उतरण्याचें ह्याच्या नशिबावर येतें ! मग हा सरकारी नोकरी तरी कां पत्करतो ? पराधीन स्थितींत सापडल्यामुळें ह्याला ही नोकरी करावी लागते. पारतंत्र्याच्या अडचणींना व दुःखांना निमूटपणें सहन करण्याइतकें ह्याचें 'स्वराज्या'वरील प्रेम नाहीसें झालेलें नसतें. रोजच्या निर्वाहाला अमके तमके जिन्नस, असलीं असलीं साधनें पाहिजेत, अशा प्रकारच्या कल्पनांचीं व विचारांचीं मुळें 'स्वराज्या'च्या कल्पनेहून व विचाराहून मनुष्यांत देहस्वभावामुळें अधिक खोल गेलेलीं असतात. ह्या देहस्वभावाच्या प्रवृत्तीशीं स्वराज्याच्या विचारांचा झगडा सुरू होतो. देहस्वभाव

म्हणतो, इतके इतके जिन्नस मला पाहिजेत. 'स्वराज्य' म्हणतें, देहस्वभाव मागत असेल तितके जिन्नस किंबहुना अधिक जिन्नस त्याला दे. देहस्वभावाशीं माझें वांकडें नाहीं. देहाला पाहिजे तर नाहूं घाल, पाहिजे तर जेवूं घाल, पाहिजे तर तुझ्या लाडक्या शरीराला पाळण्यांत घालू. गार्गी म्हण; नाहूं घालण्याच्या पद्धतींत माझा चोळामोळा करूं नको, जेवूं घालण्याच्या पक्वान्नांत मला रांधून ठेवूं नको व पाळण्यांतील झोपेच्या धुंदींत माझा खून करूं नको. देहस्वभाव व स्वराज्य हीं मूळचीं परस्परविरुद्ध नाहींत; किंबहुना देहस्वभावाच्या मा.ण्या व्यवस्थित रीतीनें भागवितां याव्यात म्हणूनच 'स्वराज्य' प्रत्येक राष्ट्राला हवें असतें.

'स्वराज्या'चें पालनपोषण न करणाऱ्या किंबहुना 'स्वराज्या'चें कल्पनेला व विचाराला बहिष्कार घालावयास पर्यायानें सांगणाऱ्या अधिकाऱ्याची नोकरी करण्याइतका हा स्वराज्यवादी परतंत्र कसा होतो? अधिकारी जाहीर करतो, तुझ्या देहस्वभावाला लागणारे इतके इतके जिन्नस दरमहा मी तुला देतों माझी सेवा कर; 'स्वराज्या'चा उपदेश असतो, बाबारे, ते जिन्नस माझ्याविरुद्ध नाहींत, पण कोणतीहि गोष्ट वारंवार केल्यानें–त्या गोष्टीचा अभ्यास केल्यानें–त्या गोष्टीची संगती घडल्यानें–त्या गोष्टीवर प्रेम जडतें, तसें तुझें प्रेम सरकारी नोकरीवर जडण्याचा संभव आहे. जेथें प्रेम जडतें तेथें श्रद्धा उत्पन्न होते, आणि "यो यत् श्रद्धः स एव सः" ह्या न्यायानें ज्यावर श्रद्धा बसते त्यानेंच शरीर, मन व बुद्धि हीं भरून जातात. सरकारी नोकरी तुला लागणाऱ्या जिनसासाठीं करीत आहेस हें विसरून जाऊन कालांतरानें सरकारी नोकरीवरच तुझें प्रेम बसेल, जिनसांसाठीं नव्हे–पगारासाठीं नव्हे–तर सरकारी नोकरीसाठीं तूं सरकारी नोकरी करूं लागशील. 'स्वराज्य' सांगतें, सरकारी नोकरीनें मिळणारा पगार माझ्या आड येत नाहीं, ह्या पगारामुळें मिळणारे व देहस्वभावाला लागणारे

जिन्नस मांझ्या आड येत नाहींत, मग ह्या स्वराज्याच्या आड येतें तरी काय ? नोकरीशीं तादात्म्य पावणें आड येतें. देहस्वभावाच्या गरजा भागविण्याकरितां ज्यांची सेवा करीत असतोस त्यांचीच मतें व त्यांचीच कृती तेवढी खरी, अशी हाडीमासांत भिनणारी भावना स्वराज्याच्या आड येते; संवयीमुळें नोकरांचा निराळाच देहस्वभाव असा बनतो कीं, स्वराज्याच्या विरुद्ध असलेले अधिकारी व नोकर ह्यांमधील भेद नाहींसा होऊन नोकरीचें पर्यवसान 'स्वराज्या'वर बहिष्कार घालण्यांत होतें कीं काय अशी भीति उत्पन्न होते. 'स्वराज्या'ला उत्तेजन देणारें सरकार असलें म्हणजे सरकारी नोकरी व 'स्वराज्या'चे विचार यांमध्यें विरोध नसतो; पण स्वराज्याला प्रतिकूल अधिकारी असले म्हणजे नोकरीच्या संवयीचे परिणाम स्वराज्याला घातक होण्याची भीति असते. कॉलेजांतील अभ्यास संपवून सरकारी नोकरी पत्करतांना ह्या भीतीनें स्वराज्यवादी कांपत असतो; आणि देहस्वभावाला लागणारे जिन्नस व साधनें सरकारी नोकरीशिवाय इतर रीतीनें प्राप्त होतात किंवा कसें याचा तो प्रथम शोध करतो. स्वदेशी व बहिष्कार यांसारख्या स्वावलंबनाच्या चळवळीनें कांहींची सोय सांप्रत होते; पण शिकलेल्या मंडळींत सरकारी नोकरीवर अवलंबून रहाणें ज्यांना जरूर आहे, अशांचा समुदाय फार मोठा. स्वदेशी व बहिष्कार या चळवळींनीं हा समुदाय आकुंचित होत चालला आहे, पण अद्याप नोकरांचा शोध करीत सरकारनें हिंडण्याची वेळ बरीच दूर आहे. नेटानें व निश्चयानें स्वदेशी चळवळ चालल्यास सुशिक्षित व लायक नोकरांचा शोध करीत फिरणारे अधिकारी पांच दहा वर्षांत दिसूं लागतील, पण हल्लीं सरकारी नोकरीशिवाय गत्यंतर नसणारांचा सुशिक्षितांत बराच मोठा वर्ग आहे, हें खरें. हा वर्ग आर्तस्वरानें राष्ट्रास सांगतो, आम्हांस दुसरा मार्ग दिसत नाहीं. म्हणून आम्हीं ही नोकरी पत्करतों. औद्योगिक बाबतींतलें शास्त्रीय ज्ञान

आम्हांस नाहीं म्हणून आम्हांवर हा प्रसंग गुदरला आहे असें म्हणा, किंवा व्यापारांत पडून दोन पैसे कमावण्यास लागणारे सद्‌गुण, परिस्थिति व पूर्वपरंपरा अनुकूल नसल्यामुळें, आमच्या अंगीं अद्याप उदयास आले नाहीत, म्हणून सरकारी नोकरीशिवाय इतर मार्गानें पोटापाण्याची व्यवस्था लावतां येत नाहीं असें म्हणा; कारण कोणतेंहि असो, इच्छा नसतांहि 'स्वराज्य'वाद्यांना सरकारी नोकरी करावी लागत आहे. " अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः " अशांतला हा प्रकार आहे. असा प्रसंग गुदरला असतांना स्वराज्याचे विचारांना व कल्पनांना विरोध करण्याची बुद्धि आपल्या अंगीं उत्पन्न होऊं नये म्हणून पगाराचा मोबदला प्रामाणिकपणाच्या सेवेनें सरकारला दिल्यावर फावल्यावेळीं—फावल्या म्हणजे सरकारास विकलेल्या नाहीं अशा वेळीं—विननोकरीच्या समयीं—स्वराज्याविषयींच्या वादाचा खल सरकारी नोकरांनीं केला तर त्यांत निमकहरामी कोणती ? चोवीस तास अमक्या तऱ्हेचे विचार किंवा कल्पना मनांत घोळत ठेवूं, अशा प्रकारची शर्त गुलामांवर देखील लादतां येत नाहीं; मग इंग्रज सरकारचे नोकरांवर असली शर्त लादण्यांत आली आहे, असें मवाळ पक्ष कां गृहीत धरून चालतो कोण जाणें ! तुमची नोकरी इमानें-इतबारें बजावली जाते आहे किंवा नाहीं तें नीट तपासून घ्या, नोकरांच्या प्रामाणिकपणाची व लायकीची पारख डोळ्यांत तेल घालून करा. पण अमका तमका स्वराज्यवादी आहे म्हणून तो निमकहराम ठरतो, अशीं खोट्या नीतिशास्त्राचीं फसवीं मतें लोकांत पसरूं नका. स्वराज्याच्या विरुद्ध असलेल्या सरकारनें स्वराज्यवाद्यांना नोकऱ्या न दिल्यास त्यांत सरकारास नवीन दूषण लागत नाहीं; कारण सरकार स्वराज्याच्या विरुद्ध आहे ह्या मोठ्या दूषणांत बारीकसारीक सर्व दोषांचा अंतर्भाव होतो. नोकरी पाहिजे तर देऊं नका. हा सरळ मार्ग आहे. पण ज्या बाबींत

मनुष्य प्राणी निसर्गतः स्वतंत्र आहे त्या विचारांच्या व कल्पनांच्या बाबींत निमकहरामीचा बाऊ दाखविणें म्हणजे नीतिशास्त्र व धर्मशास्त्र ह्यांनाहि लोभामुळें आम्हीं पायाखालीं तुडविण्यास तयार झालों आहोंत, असें जाहीर करण्यासारखें नाहीं काय? सरकारी नोकरांनीं देशांत चाल-लेल्या निरनिराळ्या चळवळींतील वादांची छाननी करण्यांत फावलेला वेळ घालविणें ही आमच्या मतें निमकहरामी नसून बद्ध स्थितींतून मुक्त होण्याचा हा एक धर्मसंमत मार्ग आहे. सरकारी नोकरींत असलेल्या सुशिक्षित नेटिव्हांना आमचें आग्रहाचें सांगणें आहे कीं, तुम्हीं सरकारची नोकरी पत्करली असली म्हणून सरकारचे तुम्हीं बंदे गुलाम झालां आहांत असें समजूं नका. सरकारी पगार तुम्हीं खातां म्हणून अधिकाऱ्यांचीं मतें जशीच्या तशीं तुम्हीं उचललीं पाहिजेत, असा निर्बंध नाहीं. बिनपगारी सरकारी हमालाला हा नियम लागू आहे; पगारी नोकराला हा नियम लागू नाहीं. बिनपगाऱ्यांवर मतें स्वीकारण्याबद्दल अधिकाऱ्यांची मेहेरबानी होत असते; तुमची तशी स्थिति नाहीं. ठरीव कामाला ठरीव पगार तुम्हांला मिळतो, तें काम प्रामाणिकपणानें व ईश्वराला स्मरून तुम्हीं केलेंत म्हणजे सरकारच्या ऋणांतून तुम्हीं मुक्त झालात. प्रत्येक मनुष्यास त्याला आवडतेंच काम जगांत मिळत असतें, असें नाहीं. किंबहुना बहुतेक सर्वांचें नशीब असें खडतर असतें कीं, नावडतेंच काम करून पोटापाण्यास मिळवावें लागतें. देहस्वभावाला अनुसरून सर्वांच्याच मागें पोटापाण्याचा प्रश्न आहे; व हा प्रश्न सोडविण्याकरितां दररोज प्रत्येकाला आठ दहा तास—इतके तास नाहीं तर थोडा तरी वेळ—राबावें हें लागतेंच; व अशा रीतीनें राबण्यास मनुष्य नाखूपहि असतो. पण आवडत्या मार्गानें राबण्याचें नशीब हजारांत फारच थोड्यांचे वांट्यास येतें. सरकारच्या नोकरीबाहेरचा अफाट जनसमूह राबल्याशिवाय थोडाच रहातो? इतकेंच नाहीं, तर सरकारी नोकरीहून ह्या

[library stamp]

समूहास अधिक रावावें लागतें. ह्यांना तरी आवडती नोकरी कुठें मिळते ? नावडती नोकरी करून देहस्वभावाचें ऋण फेडण्याची कटकट सर्वांच्या मागें सारखीच आहे. ह्या कटकटीसंबंधानें मनुष्य बद्ध आहे. परिस्थितीचा तो गुलाम आहे. हा देहस्वभाव शांत करून फावल्यावेळीं देहस्वभावालाच आपला गुलाम बनविणें हें इहलोकीं मनुष्याचें मुख्य कर्म आहे. नाइलाज म्हणून जर सरकारी नोकरी तुम्हांला करावी लागली, नाइलाज म्हणून जर नावडत्या दिशेनें रावून तुम्हांला संसार चालवावा लागला, तर आपला पंगूपणा स्वतःच्या मनाशीं, आप्तेष्टांशीं व विचारी संभावितांशीं कबूल करण्यांतच तुमचें हित अधिक आहे. ज्याला आपण शक्तिहीन आहोंत हें समजतें तो पुरुष बलवान पुरुषाच्या खालोखाल शक्तीचा संग्रह करूं शकतो; हें विसरूं नका. स्वराज्याच्या ध्येयाचें नित्य चिंतन व मनन केल्यानें मनाच्या ज्या कमकुवतपणामुळें तुम्हाला नावडती नोकरीहि करावी लागली तो कमकुवतपणा आस्ते आस्ते नाहींसा होईल. रोजच्या रोज मनुष्य कांहीं काळ बद्ध असतो व कांहीं काळ मुक्त असतो. स्वतंत्र स्थितीचा हा काळ निद्रित अवस्थेंत घालवूं नका ! स्वतंत्र स्थितीचीं फळें सरकारी नोकरांच्या वांट्यास कमी आलेलीं असतात; हा काळ जर 'स्वराज्या'च्या चरणीं त्यांनीं वाहिला नाहीं आणि ख्यालीखुशालींतच हाहि वेळ गमावला तर नावडती सरकारी नोकरी—स्वराज्य न देणाऱ्या अधिकाऱ्यांची नोकरी—करण्यापलीकडे त्यांनीं ह्या संसारांत कांहींच केलें नाहीं, असें होऊन स्वतःची फसवणूक त्यांनीं केली असें ठरणार नाहीं काय ? बरें, हा फावलेला वेळ व उरलेला पैसा अधिकाऱ्यांचींच स्वराज्याविरुद्ध असलेलीं मतें झेलून धरण्यांत व त्यांचा फैलाव करण्यांत जर त्यांनीं खर्च केला तर स्वतःच्या बुद्धीशीं, स्वतःच्या शिक्षणाशीं, स्वतःच्या माणुसकीशीं, ज्या हेतूनें परमेश्वर फावलेला वेळ व शिल्लक राहिलेला पैसा मनुष्याला देतो त्या हेतूशीं, हरामखोराप्रमाणें

वागण्याचें पातक सरकारी नोकरांच्या माथीं बसत नाहीं काय ? स्वतंत्र काळाचा योग्य उपयोग केला व उरलेल्या द्रव्याचा योग्य विनियोग झाला म्हणजे सरकारी नोकरींत कांहीं काळ घालविण्याच्या पापापासून कमळाचे पानांवर लोळणाऱ्या जलबिंदूप्रमाणें सरकारी नोकर अलिप्त रहातो. स्वराज्याला प्रतिकूल अशा स्थितीबद्दल परमेश्वर त्याचेवर कोणतीहि जबाबदारी ठेवीत नाहीं; 'स्वराज्या'चे विचार बुद्धीला पसंत पडत असतांहि स्वराज्याच्या विरुद्ध असलेल्या सरकारची नोकरी करूनच देहस्वभावाला अनुकूल अशा रीतीनें पोटापाण्याचा बंदोबस्त करणें त्याला भाग पडावें—ह्या परिस्थितीबद्दलहि परमेश्वर सुशिक्षित सरकारी नोकरांना जबाबदार धरणार नाहीं; पण फावलेल्या वेळांत जर मवाळांचा उपदेश ऐकून ते उरलेला पैसा अधिकाऱ्यांचें क्रीड फैलावण्यांत खर्च करूं लागले तर मात्र परमेश्वराच्या घरीं ते निमकहराम ठरून स्वतःच्या व देशाच्या अधःपतनास कारणीभूत समजले जातील.

# * श्रीगणपति-महोत्सव

" गणशब्दः समूहस्य वाचकः परिकीर्तितः ।
समूहा योगरूपाश्च बाह्यान्तरैक्यभावतः ॥

चालू पंधरवडा निघून गेल्यानंतर महाराष्ट्रांत चोहोंकडे श्रीगणपति-महोत्सवास सुरवात होईल. हा महोत्सव पुरातन तर खराच, पण गेलीं पंधरा वर्षें ह्या उत्सवास निराळें वळण प्राप्त झाल्यामुळें ह्या उत्सवानें महाराष्ट्रांतील इतर ठिकाणच्या हिंदूंचें लक्ष विशेष वेधून घेतलें आहे. गेल्या पंधरा वर्षांत महाराष्ट्रांत ह्या उत्सवानें एक विशेष कार्य घडवून आणलें आहे व त्या कार्यामुळेंच ह्या उत्सवास महाराष्ट्राबाहेरहि विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. हें विशेष कार्य कोणचें ?

महाराष्ट्रांतील त्या उत्सवाचें अनुकरण सांप्रत बंगाल्यांत होत आहे, व लवकरच पंजाबांत होऊं लागेल अशीं चिन्हें दिसत आहेत. बंगाल्यांत श्रीगणपति-महोत्सव महाराष्ट्राप्रमाणें साजरा करण्यांत येतो, असें आमचें म्हणणें नाहीं. बंगालची आराध्य देवता महाकाली; हा नवरात्राचा महोत्सव राष्ट्रीय पद्धतीनें साजरा करण्याची सुरवात बंगालनें केली आहे. श्रीशिवाजी-महोत्सवाचेंहि अशाच तऱ्हेचें अनुकरण बंगाल्यांत होत आहे. हिंदु राष्ट्राच्या विस्कळित व कलाहीन अवयवांना धर्माच्या व पूर्वेतिहासाच्या रज्जूनें एका देहांत—एका भाऱ्यांत बांधून ठेवलें आहे. धर्माची दोरी तोडा, पूर्वीचें वाङ्मय बुडवून टाका, व आपला इतिहास विसरा, म्हणजे प्रत्येक अवयव तेव्हांच निरनिराळा होऊन राष्ट्रदेहास मरण आलेंच म्हणून समजा. पूर्वीचीं बंधनें अद्याप तुटलेलीं नाहींत व ह्यापुढें तोडलीं जाणें शक्य नाहीं. ह्या

---

* केसरी, ता. ३१ ऑगस्ट १९०९

बंधनांत एकीचा जीव कोठें आहे, त्या जागा नीट तपासून त्या अधिक बळकटीच्या केल्या पाहिजेत. जेव्हां जेव्हां बंधनाचा करकोचा एखाद्या अवयवास त्रासदायक होतो व त्यामुळें तो रोडत चालला म्हणजे त्याचा रोग सर्व देहाला त्रास देऊं लागतो; व अखेरीस देह संतप्त होऊन करकोच्याचे जागीं बंधनें शिथिल करूं लागतो. अशावेळीं बंधनें तुटणार नाहींत व करकोच्यापासून रोग उत्पन्न होणार नाहीं, अशी व्यवस्था समाजाकडून व्हावी लागते. अशारीतीनें शक्ति द्विगुणित करण्यास व रोग हटविण्यास प्रत्येकानें स्वतःच्या देहावर लक्ष पोंचवावें लागतें. ज्याला स्वतःच्या देहांतील शक्तीच्या जागा कोणच्या व रोगाच्या जागा कोणच्या ह्याचें ज्ञान नसतें त्याचे हातून शरीरजोपासना चांगल्या रीतीनें होणें शक्य नाहीं. जो न्याय एका व्यक्तीला लागू तोच न्याय मोठ्या समूहाला लागू. आमचें बळ अमक्या गोष्टींत आहे, आमचें मृत्युस्थान अमक्या जागीं आहे,—आम्ही जिंकतों ह्या बाबतींत, आम्ही हरतों ह्या बाबतींत—अशा प्रकारचें ज्ञान समूहाला असावें लागतें, एरवीं अवनतीच्या जागा टाकून उन्नतीच्या मार्गाला राष्ट्राला लागतां येत नाहीं.स्वतःच्या सुखदुःखाची चिकित्सा समाजानें करावयाची केव्हां ? जेव्हां समाजाला सुख फार होतें—जेव्हां हर्ष होतो—तेव्हां त्या हर्षाचे भरांत सर्व लोक एका जागीं जुळतात, व त्या हर्षाच्या कारणांचें अभिनंदन करूं लागतात. ह्यावेळीं सहजगत्या समूहाच्या शक्तीचें ज्ञान समूहाला होतें. बरें, एखादें तसेंच मोठें दुःख येऊन कोसळलें तर त्यावेळींहि आपण एका जागीं जुळतों, व त्या दुःखांच्या कारणांचा विचार करून दुःखनिवारणाचा मार्ग शोधूं लागतो. विवक्षित सुखाच्या वेळीं किंवा विवक्षित दुःखाच्यावेळीं समुदाय जमतो त्यावेळीं एका कार्या-करतां समुदाय जमत असल्यामुळें सर्वांचा विचार एक असतो. एकविचारानें सर्व भारलेले असल्यामुळें, आंतून बाहेरून अमुक एक कार्य

घडवून आणावयाचेंच अशा करारीपणामुळेंच ते 'योगरूप' बनले असल्या-मुळें, देशाला 'समूहा' चें स्वरूप प्राप्त होतें. उदाहरणें घेऊन हा मुद्दा अधिक स्पष्ट करूं या. 'समूहा' ला हर्ष झालेल्या प्रसंगाचीं उदाहरणें आमच्या ह्या हतभागी देशांत आजकाल कमी आहेत. तेव्हां अशा प्रसंगांकरतां आपण परदेशाकडेच पाहिलें पाहिजे. बोअर युद्धाचे वेळीं प्लुटोरिया राजधानी लॉर्ड किचनेर यांच्या हातीं लागली त्यावेळीं इंग्रज साम्राज्यांत चोहोंकडे त्या विजयाच्या हर्षाचा महोत्सव झाला. त्याप्रसंगीं साम्राज्याच्या इभ्रतीच्या एका विचारानें सर्व इंग्रज आंतून भरून गेले होते; त्याप्रसंगीं इंग्रजी लष्कराच्या इज्जतीच्या एका विकारानें सर्व इंग्रज बाहेरून नटलेले होते, आणि त्या प्रसंगीं 'एकी' च्या संचारानें 'समूह' बनलेल्या इंग्रजांनीं इंग्रजी पराक्रमाच्या कारणांचा–इंग्रजी हट्ट, इंग्रजी धिमेपणा, विवक्षित कार्याकरितां मुर्दाडपणानें पाण्यासारखा पैसा खर्च करण्याची इंग्रजी चिकाटी, इत्यादि इंग्रजी सद्गुणांचा–जयजयकार केला. एकीशिवाय समूह होत नाहीं व एका विवक्षित कार्याच्या दोरीनें सर्व बांधले गेल्याशिवाय एकी होत नाहीं. कार्याच्या बंधनासारखें बंधन जगांत दुसरें कोणचेंहि नाहीं. कार्य एकी निर्माण करतें व एकी हें समूहाचें उत्तम साधन आहे. एकी म्हणजे कार्य नव्हे, कार्य एकीहून निराळें असतें. कार्यावर निष्ठा उत्पन्न करणारे पुढारी समाजाची एकी वाढविणारे होत. कार्यावर निष्ठा बसवितांना कार्यविरोधी प्रकारापासून समाजाला पराङ्मुख करावें लागतें व त्यामुळें कार्यवश पुढाऱ्याची कृति प्रारंभीं 'बेकीस'स कारणीभूत होतें. पण प्रत्येक कार्याला बेकीची उपाधि असतेच असते. ह्या उपाधीवर प्रथम विजय मिळवावा लागतो, मग एकीचें साधन हातीं येतें. कार्याचा जय झाला म्हणजे–कार्य सिद्धीस गेलें म्हणजे–कार्याच्या मागें असलेल्या सर्व जनाला हर्ष होतो. ह्या नियमाला अनुसरून इंग्रजांनीं प्लुटोरिया शहर घेतलें, त्यावेळेला साम्राज्य-

वादाच्या कार्याचे भजनीं लागलेल्या सर्व इंग्रजांना हर्ष झाला व त्या हर्षाचे उत्सव (Demonstration) त्यांनीं ठिकठिकाणीं केले. साम्राज्याचें बळ कशांत आहे ह्या विचाराचें हें एक प्रदर्शनच होतें. हर्षामुळें साम्राज्यवादी इंग्रज ' समूहा 'चे स्थितीप्रत गेले, व ह्या समूहाचे स्थितींत ह्या उत्सवाचे प्रसंगीं स्वतःच्या बलाबलाचे विचार त्यांनीं जाहीर केले. आतां दुःखाचें उदाहरण घेऊं. असल्या उदाहरणाकरितां परदेशाकडे धांव मारावयास नको. बंगाळची फाळणी झाली व बंगाल्यांना अत्यंत दुःख झालें. ही फाळणी रद्द करण्याचें कार्य सर्वांनीं डोळयापुढें ठेवलें. ह्या कार्यामुळें बंगाल्यांची एकदम एकी झाली. ही एकी जेवढ्या प्रमाणानें झाली तेवढ्या प्रमाणानें बंगालला ' समूहा ' चें—' राष्ट्रा ' चें—स्वरूप प्राप्त झालें. ह्या कार्यामुळें बंगाल आंतून बाहेरून ' राष्ट्र ' बनलें. अंगीकृत कार्यावरील निष्ठेच्या प्रदर्शनाची (Dem on tration) बंगालला जरुरी वाटली. दुःख निवारण्याचें कार्य डोळयापुढें असलें म्हणजे दुःख निवारण्याचे उपायांना सतेज करण्याकरितां असली निष्ठा-प्रदर्शनें भरवावीं लागतात. बहिष्काराचा दिवस व बंगभंगाचा दिवस हे बंगालच्या नवीन जागृतीचे उत्सवच होत. अशा उत्सवांमुळें स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण वगैरे उपायांची ओळख सर्व हिंदुस्थानला बंगालनें करून दिली. कार्यानें एकी होते, एकीनें समूह निर्माण होतो व समूहच काय तो समूहाच्या दुःखाचीं कारणें शोधून काढण्यास व उपायांची अंमलबजावणी करण्यास समर्थ असतो; हीं तत्वें बंगाल्यांतील गेल्या चार वर्षांच्या चळवळीनें सिद्ध झालीं आहेत.

दुःख निवारण्याच्या कार्यामुळें एकी होते व एकीमुळें ' समूह ' होतो, ह्या गोष्टी खऱ्या आहेत. पण अशा सर्वांना चटका लावणाऱ्या दुःखाचे वेळींहि राष्ट्र जन्मास येतेंच असें नाहीं. दुःख होतें, दुःखानें एकी होते, एकीनें समूह बनतो, पण अखेरीस रोगाची चिकित्सा चुकून भलताच परिणाम

होतो. ही चिकित्सा कां चुकते ? दुःखाची ओळख समूहाला बरोबर होत नाहीं; दुःखाचा आरंभ कोठें होतो व दुःख वाढीस कोठें लागतें, ह्यावर नजर समूहाकडून ठेवली जात नाहीं; स्वतःचें बळ कशांत आहे ह्याचें ज्ञान समूहाला नसतें; ह्या कारणांमुळें दुःखोद्वेगांत 'समूहा'च्या हातून स्वतःवर ओढवलेल्या प्रसंगाची भलतीच परीक्षा होते. जो देश नेहमीं 'समूहा'चे स्थितींत असतो, अमुक कार्य मला करावयाचें आहे व तें मी करीत आहें अशी ज्या देशाची भावना जिवंत असते, तो देश जिवंत राष्ट्र आहे म्हणून समजावें. अशा जिवंत राष्ट्राची दुःखाची चिकित्सा चुकीची नसते. पण इतरांच्या हातून चुका होतात—ह्या चुका न होण्यास कोणचा उपाय ? तीव्र दुःखाचेच प्रसंगीं काय ती राष्ट्रीय दृष्टीची चर्चा न चालवितां इतर ज्या ज्या प्रसंगीं ' समूह ' जमत असेल—एका कार्यानें बद्ध होऊन लोक जमत असतील—त्या त्या प्रसंगांचा फायदा घेऊन सामान्य सुखदुःखांची चर्चा करण्याची संवय देशाला लावणें, हा एवढाच उपाय ह्या चुका न होण्यास आहे. कित्येक शतकें अंगांत खिळून राहिलेल्या कांहीं गोष्टींनीं समाज बद्ध झालेला असतो; ह्या स्थितीमुळें समाजांत एकी झालेली असते; ह्या कार्यामुळें समाजाला अस्पष्ट ' राष्ट्रा 'चें स्वरूप प्राप्त झालेलें असतें. ह्या सनातन व पुरातन गोष्टींचा प्रवाह जिवंत करून ह्या प्रवाहांतील पाणी आजकाल आवश्यक वाटत असलेल्या कार्यांच्या वृक्षाला घातल्याशिवाय राष्ट्राचें ' अस्पष्ट ' स्वरूप ' स्पष्ट ' होणार नाहीं. हिंदु धर्मामुळें धार्मिक कार्याकरितां ' समूह ' बनण्याची संवय हिंदूंना आज कित्येक शतकें लागलेली आहे; आणि मुसलमानांच्या अमदानींत धार्मिक कार्याकरितां ' समूह ' बनण्याची—राष्ट्र बनण्याची—संवय हिंदूंना लागावी म्हणून सर्व हिंदुस्थानभर साधुसंतांनीं हाडांचीं काडें केलीं आहेत. ही संवय आजमितीसहि कायम आहे; मात्र त्यावेळच्या तीव्र दुःखाच्या निवारणाचें कार्य नष्ट झाल्यामुळें

एकीचा हद्द कायम नाहीं. तथापि समूहानें धार्मिक उत्सव करण्याची पद्धत हिंदुस्थानभर चोहोंकडे कायम आहे. आजपर्यंत टिकलेली ही पद्धत म्हणजे जागे झालेल्या हिंदूंच्या हातांतील एक प्रबळ साधन आहे; व ह्या साधनाचा कसा उपयोग करून घ्यावा हें महाराष्ट्रीयांतील श्रीगणपतीचे सार्वजनिक मंडळांनीं, सार्वजनिक मेळ्यांनीं व उत्सवांतील राष्ट्रीय चर्चेनें सर्व हिंदुस्थानास शिकविलें आहे. धार्मिक महोत्सवाचे प्रसंगीं कोणत्याहि बाबी-संबंधानें ठराव पास करावयाचे नसतात, किंवा अमुक बाबीसंबंधानें अमक्याच धोरणानें वागावें असेंहि ठरवावयाचें नसतें. धार्मिक उत्सवांतील धार्मिक कृत्य आटोपल्यावर सामान्य सुखदुःखांची चर्चा सर्वांनीं मिळून करावयाची असते. ह्या पद्धतीनें 'समूहा'कडून चर्चा झाल्यानें प्रासंगिक विषयाचें ज्ञान समाजांत पसरतें. अशा रीतीनें समूहांत समूहाकडून राष्ट्रीय व धार्मिक ज्ञान फैलावण्याच्या सर्व प्रसंगांची अधिष्ठात्री देवता श्रीगणपती होय. जेथें 'समूहा'-कडून कोणचेंहि काम करावयाचें असतें तेथें समूह कायम रहाण्याकरितां व इष्ट बुद्धीचा संचार समुदायांत होण्याकरितां या गण-पतीचे, समूह-पतीचें, आवाहन प्रथम करावें लागतें असा हिंदु धर्माचा सिद्धांत आहे. भक्तिभावाचे प्रसंग असोत, लग्नकार्य असो, सत्यनारायणाची पूजा असो, यज्ञयाग असो, एकापेक्षां अधिक व्यक्तींनीं मिळून समारंभानें—उत्सव पद्धतीनें (Demonstration)--समूहानें—कोणतेंहि मंगलकार्य जेव्हां करावयाचें असतें तेव्हां तें कार्य सर्व समूहांत भरून रहावें म्हणून ' आदौ गणपति-पूजनं ' करावें लागतें. श्रीविष्णु, श्रीशंकर, श्रीकाली कोणत्याहि देवतेचा महोत्सव असो, तेथें 'समूहा'चे—गणाचे रक्षणार्थ व उत्तेजनार्थ श्रीगणपतीची स्थापना प्रथम करावी लागते. ही देवताच समूहस्वरूपी आहे. ज्यांना समुदायाचें मार्फत—समूहाचे मार्फत—राष्ट्राचे मार्फत—कोणतेंहि कार्य करून घ्यावयाचें असेल त्यांनीं त्या कार्यावर व त्या लोकसमुदायावर प्रथम ह्या

देवतेची कृपा संपादिली पाहिजे, अशी वेदांची आज्ञा आहे. 'समूहां'त कार्याचा संचार करणाऱ्या वक्त्याचें रक्षण ही देवता करते; कार्यवश होऊन ज्ञानसंचय करणाऱ्या श्रोत्याचें रक्षण ही देवता करते; कर्माला लागणाऱ्या साधनांचें दान कार्याच्या पायापाशीं करणाऱ्या दात्याच्या दातृत्वाचें रक्षण ही देवता करते; कर्माची रचना करणाऱ्यांच्या कल्पक बुद्धीचें रक्षण ही देवता करते; दिशाभूल होऊन भलताच उच्चार करणाऱ्यांचें रक्षण ही देवता करते; व ज्ञान संपादन करणाऱ्या सर्व शिष्यांना ही देवता योग्य मार्ग दाखविते! 'समूहा' चें–' गणा ' चें–संरक्षण करून लोकांचीं विघ्नें नाहींशी करण्याचें काम ह्या देवतेचें असल्यामुळें ह्या देवतेची प्रार्थना येणेंप्रमाणें करण्यांत येते. "अव त्वं माम् । अव वक्तारं । अव श्रोतारम् अव दातारम् । अव धातारम् । अवानुच्चारमव शिष्यम् ।" ह्या देवतेची भक्ति समूह-स्वरूपाची, ह्या देवतेची प्रार्थना समूह-स्वरूपाची व ह्या देवतेचें हिंदुधर्मातील कार्यहि समूह स्वरूपाचें,–श्रीगणपतीचा धार्मिक उत्सवच समूह स्वरूपाचा असल्यामुळें धर्माबरोबरच करावयाच्या इतर चर्चेची भर ह्या उत्सवांत प्रथम पडावी हें साहजिकच आहे. ' समूह ' म्हटला म्हणजे तेथें गणपतीची स्थापना झालीच; व ह्या देवतेला आवाहन झालें कीं वक्ता आणि श्रोता ही मंडळी हजर होऊन ज्ञानसत्रास सुरवात झालीच. पूर्वीच्या सर्व धार्मिक उत्सवांचें स्वरूप अशा प्रकारचें होतें. धर्मोत्सवाचे वेळीं 'समूहां' त चर्चा करण्याच्या ह्या पद्धतीनें पूर्वीचें वाङ्मय कायमचें टिकलें व हरिदास आणि पुराणिक ह्यांचा वर्ग महाराष्ट्रांत निर्माण झाला. धार्मिक उत्सवांतील चर्चेसंबंधानें व हरिदास आणि पुराणिक ह्यांच्या कार्यासंबंधानें परिस्थिति पालटल्यामुळें मध्यंतरीं दिशाभूल झाली. महाराष्ट्रांतील श्रीगणपति महोत्सवांत पुन्हां पूर्वीचा रंग भरविण्याचा प्रयत्न आज पंधरा वर्षें करण्यांत आला आहे. ह्या प्रयत्नाला यश येत चाललें आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

श्रीगणपति महोत्सवांत सुरू झालेलें राष्ट्रीय चर्चेचें ज्ञानसत्र आतां सर्व ठिकाणच्या व सर्व देवतांच्या उत्सवांत कमी अधिक प्रमाणानें शिरलें आहे. हरिदास व पुराणिक ह्यांना आपल्या चर्चेला नवीन वळण द्यावें लागत आहे; आणि 'समूहा' च्या देवालयांतील किंवा धार्मिक उत्सवांतील ज्ञानसत्रांतील अध्वर्यूचा मान पूर्वीप्रमाणें सर्व प्रसंगींहि त्याना लवकरच मिळूं लागेल, अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. ह्या ज्ञानसत्रामुळें सर्व धार्मिक उत्सवांना राष्ट्रीयत्वाचें वळण प्राप्त झालें आहे, व हे उत्सव धर्माची व राष्ट्राची एक गांठ घालीत आहेत. ह्या असल्या उत्सवामुळें महाराष्ट्रांत राष्ट्रीय कल्पनांचा फैलाव जलद झाला, हें बाबू अरविंद घोषसारख्या बंगाली पुढाऱ्याच्या ध्यानीं आलें आहे; व बंगाल्यांतील धार्मिक उत्सवांना ज्ञानसत्र जोडण्याचा बंगाली पुढाऱ्यांचा उद्योग सुरू आहे. विशिष्ट प्रकारची चर्चा त्या त्या विशेष प्रसंगीं होत असते; पण मूळ धार्मिक कार्य संभाळून शिक्षणात्मक सामान्य चर्चा करण्यास धार्मिक उत्सवांतील धर्मकल्पनेची कोणतीहि हरकत नसते. राजकीय तुफानांतील ढगांनीं असली चर्चा झांकून जाण्याचें कांहींच कारण नाहीं, कारण राजकारणाशीं असल्या चर्चेचा प्रत्यक्ष संबंध कांहींच नसतो. ही चर्चा शिक्षणात्मक असल्यामुळें राजकीय सभांवर अधिकाऱ्यांची वक्रदृष्टि असण्याचा जसा संभव असतो तसा संभव असल्या चर्चेसंबंधानें असणें शक्य नाहीं. धार्मिक महोत्सव धर्मतेजाच्या आशीर्वादानें व असल्या शिक्षणात्मक राष्ट्रीय चर्चेच्या फैलावानें वृद्ध राष्ट्रास तरुण करतात—किंवा नवीन राष्ट्रास जन्मास घालतात. धर्माचे हातांत राष्ट्रीय जागृतीचा हात देण्याचें पुण्य कार्य हे महोत्सव करीत असल्यामुळें,श्रीगणपति महोत्सवाचें अनुकरण करण्याची बुद्धि पंजाबांत व बंगाल्यांत उत्पन्न झाली आहे. पंजाबांत लाहोर येथें ता. २१ व २२ ऑक्टोबर रोजीं हिंदु परिषद भरावयाची आहे. पंजाबांतील हिंदूंनीं मवाळांच्या कन्व्हेन्शनला—

काँग्रेसला–कटाळून "हिंदु–काँग्रेस" च प्रथम बोलावली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या परिषदेपुढें येणाऱ्या विषयांत बरेच असे विषय आहेत कीं, त्या विषयावरील ठरावांची जर अंमलबजावणी पंजाबां-तील हिंदूंनीं केली तर श्रीगणपति-महोत्सवासारखे धार्मिक उत्सव व शिवाजी महोत्सवासारखे ऐतिहासिक उत्सव पंजाबांत व इतर ठिकाणीं लवकर सुरू झाल्यावांचून रहाणार नाहींत. 'हिंदूंचें राष्ट्रीयत्व व ऐक्य वाढविण्याची आवश्यकता'–'खेड्यांपाड्यांतून व शहरांतून हिंदु शास्त्रांतील व वाङ्मयांतील कथांना उत्तेजन'–'राष्ट्रीय उत्सवाची जोपासना'– 'हिंदूंचा खरा इतिहास लिहिण्याची आवश्यकता'–वगैरे परिषदेचे विषय पाहिल्यावर आमच्या म्हणण्याची सत्यता तेव्हांच वाचकांचे लक्षांत येणारी आहे. श्रीगणपति उत्सव व शिवाजी महोत्सव ह्यांनीं घालून दिलेला कित्ता महाराष्ट्राबाहेरहि हिंदूंकडून गिरविला जात आहे ही समाधानाची गोष्ट होय. इतर लोक आमचें अनुकरण करूं लागले असल्यामुळें ह्या उत्सवा-संबंधानें महाराष्ट्रावर यंदा विशेष जबाबदारी येऊन पडली आहे व ही जबाबदारी ओळखून यंदाचा श्रीगणपति महोत्सव सालाबादप्रमाणें उत्साहानें व थाटानें साजरा करण्यांत येईल, अशी आम्हास आशा आहे.

# *‘ तुम्ही ’ काय करणार तें सांगा

हिंदु लोक घरकोंबडे किंवा उंबरांतले किडे आहेत, हिंदुस्थानबाहेरचें जग त्यांस माहीत नाहीं, त्यांनीं समुद्रयान व परदेशगमन यांस पातकांत गणलें यामुळें त्यांची अवनति झाली, अशा प्रकारचा दोषारोप सर्व जगांत धांगडधिंगा घालण्यास सोकावलेले युरोपियन—विशेषतः इंग्रजी लोक—हिंदी लोकांवर करीत असतात. परंतु हें समुद्रयान व परदेशगमनच केवळ नव्हे, तर परदेशांतून प्रत्यक्ष वसाहत करणाऱ्या हिंदी लोकांशीं गोरे लोकांचें जें अमानुषपणाचें व रानटी वर्तन आजपावेतों होत आहे, ते पाहिलें म्हणजे वरील आरोप मानभावीपणाचा आहे, हें कोणाचेंहि ध्यानांत येईल. युरोपाबाहेरच्या चारी खंडांत युरोपियनांस अनिरुद्ध संचार करण्याची सदर परवानगी पाहिजे, अशी परवानगी जो राजा न देईल तो रानटी. पण यांच्या युरोपांत एक मुसलमानी राज्य आहे तें यांच्या डोळ्यांत एकसारखें सलत असतें. एवढेंच नव्हे तर तीन खंडांत यांनीं जे प्रदेश बळकावले तेथें इतर लोकांना मज्जाव करून तें केवळ ‘ गोऱ्या लोकांचे देश ’ बनविण्याचा यांचा भगिरथ प्रयत्न चाललेला असतो. अशाप्रकारची नैतिक दृष्ट्या निंद्य व तिरस्करणीय रेटारेटी भिन्नभिन्न देशांतील लोकांमध्यें चालावी यांत एका दृष्टीनें फारसें नवल नाहीं. पण एकाच साम्राज्यांत, एकाच राजाचे राज्यांत, एकाच छत्राचे व निशाणाचे खालीं असणाऱ्या लोकांमध्येंहि शिरजोरांनीं दुर्बलांवर जुलूम करावा व त्याची दाद लागूं नये, असा चमत्कार इंग्रजी साम्राज्यांत मात्र घडत आहे. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी रहिवाश्यांसंबंधानें होणाऱ्या अन्यायाचा व जुलमाचा काळाकुट्ट अंधार तेथें अजून नांदत

---

* केसरी—२१ सप्टेंबर १९०९

असतां, इंग्रजी राज्यावर आकाशांतील सूर्य कधींहि मावळत नाहीं किंवा हिंदुस्थान देश हा बादशाही मुकुटांतील देदिप्यमान हिरा आहे, अशी पोकळ फुशारकी मारण्यांत मुळींच पुरुषार्थ नाहीं.

ट्रान्सवाल, नाताळ, ऑरेंज आणि केप कॉलनी, ह्या दक्षिण आफ्रिकेंतील चार वसाहतींचें एकीकरण करून दक्षिण आफ्रिकेची एकच मोटी संयुक्त वसाहत करण्याचा कायदा ब्रिटिश पार्लमेंटानें पास केला, तेव्हां हिंदी रहिवाश्यांचा वनवास संपेल असें कित्येकांस वाटत होतें. पण तसें कांहीं न घडतां हिंदी रहिवाश्यांच्या प्रश्नाचा वाटेल तो निकाल करण्याची मुभा संयुक्त आफ्रिकेस देऊन ब्रि. पार्लमेंट मोकळें झालें आहे. ट्रान्सवालचे निष्ठुर बोअरलोक व इंग्लंडचे स्वार्थपरायण इंग्रज यांपैकीं कोणींहि दाद घेईना, असें पहातांच द. आफ्रिकेंतील हिंदी रहिवासी स्वाभाविकपणेंच आपल्या मातृभूमीकडे व देशबांधवांकडे वळले. त्यांनीं चार पुढाऱ्यांचें एक डेप्युटेशन हिंदुस्थान देशांत पाठविण्याचें ठरविलें, पण हें डेप्युटेशन निघण्यापूर्वीच त्यांतील तिघां हिंदी गृहस्थांस ट्रान्सवाल सरकारनें पकडून तुरुंगांत धाडलें ! अर्थात् राहिलेले चौथे इंग्रज गृहस्थ मि. पोलक हे इकडे आले असून गेले दोन महिने ते मुंबई शहरांत हिंदी लोकांच्या दुःखाची हृदयद्रावक व हृदयभेदक कहाणी सांगत आहेत. या कहाणीमुळें लोकांत जो चित्तक्षोभ उत्पन्न झाला त्याचें गेल्या मंगळवारच्या मुंबईच्या टाऊन हॉलांतील प्रचंड जाहीर सभेंत पर्यवसान झालें. सभेचें अध्यक्षस्थान करीमभाई इब्राहीम यानीं मंडित केलें असून सर फेरोजशहा मेथा, ना. गोखले, मि. जहांगिर बोमनजी पेटिट, मि. एच. ए. वाडिया, मि. पोलक वगैरेंचीं बऱ्याच आवेशाचीं भाषणें झालीं. सभेंत मुख्य दोन ठराव पास झाले. ट्रान्सवालांतील हिंदी रहिवाश्यांचा जो एकसारखा छळ होत आहे त्यामुळें हिंदुस्थानांत सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांत अत्यंत संताप उत्पन्न झाला आहे, आणि

हिंदी व इतर प्रजा यांना समानतेनें वागविण्याबद्दल राजानें दिलेलें अभिवचन यामुळें तुडविलें जात आहे, यासाठीं हा अन्याय प्रधानमंडळानें दूर करावा; तसेंच या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागेपर्यंत हिंदी मजुरांस द. आफ्रिकेंत येऊं देण्याची हिंदुस्थान सरकारनें बंदी करावी; अशा आशयाचा पहिला ठराव आहे. ट्रान्सवालांतील हिंदी रहिवाश्यांनीं गोऱ्या वसाहतवाल्यांशीं चालविलेल्या झटापटींत, जें शौर्य, धैर्य, देशभक्ति, स्वार्थत्याग व आत्मसंयमन दाखविलें त्याची तारीफ दुसऱ्या ठरावांत केली आहे.

ट्रान्सवालांतील हिंदी रहिवाशांचा आज पंचवीस वर्षें जो छळ चालला आहे त्याच्या इतिहासाचें निरीक्षण करणें हृदयद्रावक असलें तरी तें अनेक प्रकारें बोधप्रद, उपयुक्त व महत्त्वाचें आहे. सन १८८८ सालीं बोअर सरकारनें सरसकट सर्व हिंदी रहिवाश्यांस ' कुली ' ठरवून असा कायदा केला कीं, या सर्वांनीं आपलीं नांवें सरकारांत नोंदून दर माणशीं सालीना पंचेचाळीस रुपयांची डोईपट्टी दिली पाहिजे व त्यांनीं गांवाबाहेर आपला निराळा ' कुली वाडा ' करून राहिलें पाहिजे. या कायद्यापासून हिंदी लोकांच्या छळास सुरवात झाली. हिंदी लोकांस--इंग्रजी राज्यांतील प्रजाजनांस--हे बोअर लोक छळतात, याचा त्यावेळीं इंग्रजांना अति राग येत असे; व आम्हीं तुमचे कैवारी आहों, आमचेकडे दाद मागा, असें ते हिंदी रहिवाश्यांस उत्तेजनहि देत असत ! बोअर लोकांशीं युद्ध सुरू करतांनाहि युद्धाच्या अनेक कारणांपैकीं ' हिंदी रहिवाश्यांचा छळ ' हें एक मुख्य कारण आहे, असें मि. चेंबर्लेन प्रभृति प्रधानांनीं त्यावेळीं स्पष्टपणें जाहीर केलें होतें. युद्ध सुरू होण्याचेवेळीं ट्रान्सवालांत मुलें व बायका वगळून नुसते पुरुष पंधरा हजार होते. लढाईस प्रारंभ होतांच ते ट्रान्सवाल सोडून नाताळांत येऊन राहिले व युद्ध संपल्यावर परत ट्रान्सवालांत येऊन राहण्याची त्यांस परवानगी मिळाली. १९०२ मध्यें बोअर युद्ध संपून तह

झाला व ट्रान्सव्हालांत खुद्द ब्रि. सरकारचाच अंमल सुरू झाला; परंतु हिंदी रहिवाश्यांचा छळ बंद न पडतां उलटा तो दुणावला! पूर्वींचे बोअर कायदे कडक असले तरी त्यांची अंमलबजावणी सौम्यपणें होत असे; पण ब्रिटिश सरकार येतांच कडक व जुलमी कायद्यांची सक्त अंमलबजावणी सुरू झाली. टोकळा राजा जाऊन बगळा राजा आल्यावर बेडकांची जी स्थिति झाली तीच हिंदी रहिवाश्यांची या प्रसंगीं झाली! खोकड आणि बोका यांचा पूर्वीचा अहिंसा धर्म कोंबडा व उंदीर पहातांच जसा लटपटला, त्याप्रमाणेंच इंग्रजांस बोअर युद्धापूर्वीं हिंदी लोकांविषयीं वाटणारी कळकळ व दया युद्ध संपतांच नष्ट होऊन गेली. ह्या निष्ठुर वर्तनाचे समर्थनार्थ अशी हूल उठविण्यांत आली कीं, हजारों हिंदी लोकांची लाट गोऱ्या ट्रान्सवालांत घुसून आमचा हा देश दुसरा काळा हिंदुस्थानच करूं पहात आहे! पण वस्तुस्थिति अशी होती कीं, युद्धापूर्वीं ट्रान्सवालांत नुसते हिंदी पुरुषच पंधरा हजार होते, तर एकंदर हिंदी लोकवस्ती युद्धानंतर एकसारखी उतरत उतरत आतां फक्त सहा हजारांवर आली आहे. १९०२ पासून चार वर्षें हा प्रकार चालून १९०६ मध्यें ट्रान्सवालच्या कायदे-कौन्सिलानें 'आशियाटिकांचा कायदा' पास केला. युद्धापूर्वीं ट्रान्सवालांतून नाताळांत गेलेल्या ज्या हिंदी लोकांस परत ट्रान्सवालांत यावयाचें असेल त्यांनीं—पुरुष, बायकापोरांनीं सुद्धां—पुन्हां नांवें नोंदलीं पाहिजेत; एवढेंच नव्हे तर गुन्हेगार बदमाषांप्रमाणें आंगठ्याचे ठसेहि दिले पाहिजेत असा या कायद्याचा निर्बंध होता. येथपासून ट्रान्सवालांतील अडवणुकीच्या—निःशस्त्र प्रतिकाराच्या—चळवळीस प्रारंभ झाला. या अन्यायाची व जुलमाची दाद इंग्लंडांत लागली नाहीं तर हा कायदा न मानतां तो जाणून बुजून मोडावयाचा व त्यासाठीं होईल ती शिक्षा भोगावयाची, अशी प्रतिज्ञा ब. गांधी व इतर हिंदी लोक यांनीं जोहान्सबर्गच्या जाहीर सभेंत केली. हा कायदा

इंग्लंडांत राजाचे मंजुरीसाठीं गेला, पण राजेसाहेबांनीं त्यास मंजुरी दिली नाहीं. तथापि त्याचवेळीं ट्रान्सवालास स्वराज्याचे हक्क देण्यांत आले, आणि मि. बोथा हे ट्रान्सवालचे पहिले मुख्य प्रधान झाले. ट्रान्सवालास आशियाटिक लोकरूपी महारोग जडला आहे, तो शरिरांत खोल भिडण्यापूर्वीच हा अवयव कायमचाच छाटून टाकला पाहिजे, असें जनरल स्मट्स म्हणूं लागले! मी प्रधान झालों तर या ' कुलीं ' ना ट्रान्सवालांतून चार वर्षांत नाहींसें करून टाकीन, अशी सेनापति बोथानें तर भीष्मप्रतिज्ञाच केली! या प्रतिज्ञेप्रमाणें बोथाचे प्रधानमंडळानें पहिल्याच पार्लमेंटमध्यें राजेसाहेबांनीं नामंजूर केलेला ' आशियाटिकांचा कायदा ' पुन्हां पास केला; व यावेळीं यास बादशहांनीं मंजुरीहि दिली. या कायद्याप्रमाणें हिंदी रहिवाश्यांचीं नांवें नोंदून व ठसे देऊन नवे परवाने काढण्याची मुदत मार्चपासून नोव्हेंबरपर्यंत ठेवली होती. परंतु पिकेटिंग वगैरेची चळवळ केल्यामुळें आठ हजार हिंदी लोकांपैकीं फक्त ५०० नीं मात्र नांवें नोंदून परवाने घेतले. ह्यानंतर दोन महिने हिंदी रहिवाश्यांचा निःशस्त्र प्रतिकार निकरानें सुरू होऊन बॅ. गांधी व इतर शेंकडों लोक कायदा मोडून तुरुंगांत गेले. १९०८ चे जानेवारी अखेर उभय पक्षांत तडजोड झाली. हिंदी रहिवाश्यांनीं तीन महिन्यांत ठसे न देतां आपखुशीनें नुसतीं नांवें नोंदवावीं व बोअर सरकारनें " आशियाटिकांचा कायदा " रद्द करावा अशी ही तडजोड होती, तीप्रमाणें सर्व हिंदी रहिवाश्यांनीं नांवें नोंदलीं. पण बोअर सरकार विश्वासघात करून 'आशियाटिकांचा कायदा" रद्द करीना! हिंदी लोकांस ट्रान्सवालांत येण्याची यापुढें कायमची बंदी आम्ही करूं, त्यांस तुम्हीं कबूल असाल तरच वरील कायदा रद्द करूं, असें बोअर प्रधानमंडळ म्हणूं लागलें. बॅ. गांधी वगैरेंचें म्हणणें असें पडलें कीं, नवीन लोक ट्रान्सवालांत घेण्यासंबंधानें जे तुम्हीं नियम ठरवाल ते सर्वांस—युरोपियनांस व आशियाटिकांस—सारखे लागू कराल तर

आम्ही कबूल आहों; पण हे नियम नुसत्या आशियाटिकांस-हिंदी लोकांस-मात्र लागू करणार असाल तर असला अपमानास्पद व उपमर्दकारक कायदा आम्हीं बिलकूल मानणार नाहीं. अखेर तडजोड न होतां सर्व हिंदी लोकांनीं आपखुशीनें नांवें नोंदून घेतलेल्या आठ हजार परवान्यांची भरसभेंत होळी केली; आणि निःशस्त्र प्रतिकाराची ही लढाई १९०८ चे सप्टेंबरांत दुप्पट नेटानें व निश्चयानें पुन्हां सुरू केली.

याप्रमाणें सुरू झालेली झटापट हिंदी लोकांनीं मोठ्या निर्धारानें व निकरानें आज वर्षभर एकसारखी चालविली आहे. या झटापटींत हिंदु, मुसलमान, पारशी, खिस्ती, शीख अशा सर्व जातींचे हिंदी स्त्रीपुरुष सामील झाले असून त्यांचें धैर्य व निश्चय पाहून जितका आदर व अभिमान उत्पन्न होतो तितकाच बोअर सरकारची निष्ठुरता व विलायत सरकारच्या पोकळ बढाया ऐकून संताप व उद्वेग आल्यावांचून रहात नाहीं. बोअर सरकारच्या या निर्दय हट्टास बळी पडून आजपर्यंत सुमारें पंचवीसशें हिंदी लोकांनीं तुरुंगवास-कित्येकांनीं तर चारचारदां-भोगला आहे; व कित्येकांस बायका-पोरांतून उचलून हिंदुस्थानांत हद्दपार केलें आहे. पती, पुत्र, बाप, भाऊ अशांची ही स्थिति पाहून हिंदी स्त्रियांचीं अंतःकरणें विदीर्ण होत असलीं तरी या बाबतींत त्या पुरुषांस उलटें उत्तेजन देत आहेत. प्लुटोरिया शहरांतील सर्व तामीळ पुरुष तुरुंगांत गेले असून त्यांच्या बायका रस्त्यांत भाजीपाला व फळफळावळ विकून मुलाबाळांचें पालनपोषण करीत आहेत. गांधींसारखे बॅरिस्टर व मोठ्या लक्षाधीश व्यापाऱ्यांपासून फेरीवाल्यांपर्यंत सर्वजण तुरुंगांत हालअपेष्टा आनंदानें सोशीत आहेत; एवढेंच नव्हे तर तुरुंगामध्यें मृत्यु आला तरी बेहत्तर, पण या अमानुष कायद्याखालीं आपली मान कालत्रयींहि वांकवावयाची नाहीं, अशी हिंदी बांधवांनीं प्रतिज्ञा केली आहे ! काफर गुन्हेगार व बदमाशांबरोबर राबविणें, बिड्या घालून

व दोर बांधून रस्त्यांतून धिंड काढणें, रस्त्यांतील खडी फोडून घेणें, घाणीच्या पाट्या उचलावयास लावणें व धर्मानें अपवित्र मानलेले पदार्थ खावयास देणें, अशा प्रकारचा या देशभक्तांचा तुरुंगांत छळ चालल्याचें मि. पोलक व मि. वाडिया यांनीं सांगितलें आहे.

ब्रिटिश साम्राज्यांतील एका ब्रिटिश वसाहतींतच सहा हजार ब्रिटिश प्रजाजनांचा–हिंदी देशबांधवांचा–असा अनन्वित छळ होतो व त्याची दाद विलायत सरकार घेत नाहीं, हें पाहून हिंदुस्थानांतील प्रत्येक व्यक्तीचें अंतःकरण दुःखानें, संतापानें व लज्जेनें भरून येईल यांत संशय नाहीं. मुंबईच्या टाऊन हॉलांतील सभेंत निरनिराळ्या वक्त्यांनीं लोकांच्या ह्या मनोवृत्ति शक्य तितक्या आवेशानें प्रकट केल्या. असल्या प्रकरणांमुळें इंग्रजी राज्याच्या न्यायीपणावरील विश्वास उडेल; एवढेंच नव्हे तर हिंदी लोकांच्या राजनिष्ठेसहि मोठा धक्का बसेल; किंबहुना ह्या अन्यायाची त्वरित दाद लागली नाहीं तर इंग्रज सरकारास मागून पश्चात्ताप करावयास लागेल अशी भयंकर परिस्थिति उत्पन्न झाल्यावांचून रहाणार नाहीं, असें मि. पेटिट व मि. वाडिया यांनीं राज्यकर्त्यांस बजाविलें आहे. ना. गोखले यांनीं तर यांचेहि पुढें जाऊन 'निःशस्त्र प्रतिकारा'चें तात्त्विक व व्यावहारिक दृष्ट्या समर्थन केलें आहे ही विशेष आनंदाची व समाधानाची गोष्ट होय. अमुक एक कायदा किंवा कृत्य रद्द करण्याचे इतर सर्व उपाय निष्फळ झाले, तर ज्यांना ज्यांना आपल्या संकुचित स्वार्थापेक्षां सदसद्विवेकबुद्धि व स्वाभिमान यांची किंमत जास्त वाटते त्यांनीं त्यांनीं तो कायदा बेलाशक मोडावा व त्याबद्दल कैदेसारख्या ज्या हालअपेष्टा वांट्यास येतील त्या सोसाव्या यासच निःशस्त्र प्रतिकार असें म्हणतात व त्याचा ट्रान्सवालसारख्या परिस्थितींत अवलंब करणें हें योग्यच नव्हे तर तें पवित्र कर्तव्यच आहे, असें ना. गोखले यांनीं सदर सभेंत प्रतिपादन केलें आहे. निःशस्त्र प्रति-

काराच्या चळवळीची ही मीमांसा ठीक व बरोबर आहे. पण अशी मीमांसा केवळ भाषणांत करणें आणि अशी चळवळ करणाऱ्या हिंदी रहिवाश्यांची —बोअर व इंग्रज ह्यांस दोन सभ्य शिव्या हांसडून—स्तुती करणें, याचे पलीकडे आम्हांस कांहींच करावयास नको काय? आम्हीं जर ट्रान्सवालांत असतों तर गांधींच्या झेंड्याखालीं व त्यांच्या खांद्यास खांदा भिडवून त्यांच्यासारखेंच लढलों असतों, असेंहि ना. गोखले म्हणतात. पण ट्रान्सवालांतील देशबांधवांस या निःशस्त्र युद्धांत कुमक करण्यास आम्हीं ट्रान्सवालांत असावयास पाहिजे काय? वंगभंग बंगाल्याला आवडत नाहीं तर त्यांनीं बहिष्काराची चळवळ करावी, आम्हांस तिचा वाराहि नको, आम्हीं आपले दूरून फक्त 'शाबास बंगाल्यांनों' एवढेंच म्हणणार; हें तें मवाळी धोरण व त्याची छटा नामदारांच्या वरील उद्गारांत दिसत आहे. प्राण कंठांत आले तरी ते ओठाबाहेर येण्याची वाट पहाण्यासारखेंच हें नव्हे काय? हिंदी रहिवाश्यांची दाद ट्रान्सवाल सरकारनें घेतली नाहीं; विलायत सरकारनें घेतली नाहीं आणि हिंदुस्थान सरकार त्यांचें बाहुलें असल्यामुळें त्यानें घेणें शक्य नाहीं. तर आतां आणखी अर्ज व विनंत्या करण्याचें स्थळ कोणतें उरलें? इंग्रजी प्रधान आमच्या स्थितीकडे पाहून दिलगिरी प्रदर्शित करतात, उसासे टाकतात, रडतात व सहानुभूति दाखवितात; पण एकिल्थाचे बिलाची संधि आली असतां आमची दाद लावीत नाहींत. कारण काय म्हणे, तर आम्हीं हट्ट धरला तर वसाहतवालेहि निकरावर येऊन लढाईचा प्रसंग येईल! पण इंग्रजी प्रधान लढाईस कां भितात? बोअर लोकांशीं याच हिंदी लोकांकरितां लढाई करणारे तुम्हींच ते इंग्रज आहां ना? द. आफ्रिकेंतील थोड्या लोकांचे मुर्वतीस्तव तीस कोटी राजनिष्ठ लोकांच्या हिताची अशी हेळसांड करणें घातुक नाहीं काय? कानडियन किंवा ऑस्ट्रेलियन लोकांचा असा छळ होत असता तर अशी सबब पुढें आली असती

काय ? पण हा कोटिक्रम त्यांस रुचत नाहीं व पचतहि नाहीं. त्यांनीं हिंदी रहिवाश्यांच्या नशिबाचीं सूत्रें संयुक्त दक्षिण आफ्रिकेच्या सरकारचेच हातीं पुन्हां दिलीं आहेत. हिंदुस्थान सरकार व अधिकारीहि पुष्कळ सहानुभूति दाखवितात; पण 'जशास तसें' हें धोरण धरून द. आफ्रिकेस ताळ्यावर आणण्याची तजवीज करीत नाहींत ! अशा स्थितींत 'पुनरपि जननं पुनरपि मरणं' या न्यायानें पुन्हां अर्ज, पुन्हां सभा, पुन्हां डेप्युटेशनें; पुन्हां जोराचा अर्ज, पुन्हां प्रचंड सभा, पुन्हां निकराची विनंति, हें आम्हीं किती दिवस करीत राहणार ? द. आफ्रिकेंतील हिंदी रहिवाश्यांच्या छळानें जर सर्व हिंदुस्थान देश खरोखरच क्षुब्ध झाला आहे तर इकडेहि सर्व देशभर–निःशस्त्र प्रतिकार तूर्त राहो–पण त्याचें साधें स्वरूप जो बहिष्कार तो तरी सुरू करावयास नको काय ? पण राष्ट्रीय सभेंतून बहिष्काराला गचांडी देणारे पुणें–मुंबईकर मवाळ निःशस्त्र प्रतिकाराचा नुसता तोंडानेंच गौरव करणार ! म्हणतात अजून वेळ आली नाहीं, जरा दमानें घ्या. ट्रान्सवालातले सर्व हिंदी लोकांस हिंदी महासागराच्या आफ्रिकन किनाऱ्यानजीक जलसमाधि दिल्यावर ही वेळ येणार आहे कीं काय, कोण जाणें ? ट्रान्सवालांतील हिंदी रहिवाश्यांच्या प्रश्नांचा समाधानकारक निकाल लागेपर्यंत हिंदुस्थान सरकारनें मजूर पाठविण्याची बंदी करावी, असें मुंबईकर म्हणतात. सरकार ही विनंति ऐकेल वा न ऐकेल; त्यांनीं न ऐकली तर मुंबईकर काय करणार याचा स्पष्ट निर्देश सभेचे वेळीं व्हावयास नको होता काय ? सरकार न ऐकेल तर मोठी बिकट परिस्थिति आम्हीं निर्माण करूं व मग सरकार पस्तावेल अशा मोघम धमक्यांनीं सरकार तर भिणार नाहींच पण लोकांसहि यांत कांहीं मार्ग दाखविला असें होत नाहीं. याबाबतींत मुंबई आतां पुढारीपण स्वीकारणार व तिचे मागोमाग सर्व हिंदुस्थाननें यावें, असा मुंबईच्या एका पत्रानें नगारा वाजविला होता. पण मुंबईनें पुन्हां सभा, विनंत्या

ठराव, यापलीकडे अजूनहि कांहीं केलेलें दिसत नाहीं. सहानुभूतिवाल्या युरोपियनांतहि इतका पीळ आहे कीं, परवांच्या टाऊन-हॉलांतील सभेंत एका हाताचे बोटापलीकडे युरोपियन श्रोते मुळींच आले नव्हते; आणि आम्ही इतके ढिले कीं, ट्रान्सवालांत इतका हाहाःकार झाला तरी, 'शेरीफ होऊं नये झालें' असें भीत भीत म्हणण्यापलीकडे आमचा पराक्रम जात नाहीं! विस्तृत कौन्सिलाच्या बैठकी चार पांच महिन्यांत भरतील व कौन्सिलापुढें ठराव आणण्याचा हक्कहि मोर्लेसाहेबांनीं आम्हास दिला आहे. तर या कौन्सिलाच्या पहिल्याच बैठकींत याबद्दलचा ठराव पुढें आणून या हक्काच्या अंमलबजावणीचा 'श्रीगणेशा' करण्याची आमच्या नामदार मंडळींची तयारी आहे काय? अशी जर कांहीं तयारी नसेल, वंगभंग नसो पण ट्रान्सवाल प्रकरणहि सर्व हिंदुस्थानभर बहिष्कार जाहीर करण्यास योग्य कारण नाहीं असें मुंबईकरांस वाटत असेल, तर मुंबई शहराला फुकाचें व पोकळ पुढारीपण देऊन त्यांच्या ठरावांच्या मागें आपल्या ठरावांची व अर्जांची मालिका लावण्यास इतर प्रांत व शहरें तयार होणार नाहींत. विलायत सरकारनें किंवा हिंदुस्थान सरकारनें काय करावें हें सांगण्यास मुंबईकर नको आहेत. या दोनहि सरकारांनीं दाद घेतली नाहीं तर आपण काय करणार व इतर लोकांनीं काय करावें, हें मुंबईकरांनीं आगाऊ सांगावें. हें सांगणें नसेल तर 'आम्हाला देशाचे पुढारी म्हणा' हें मुंबईकरांचें म्हणणें कोण ऐकेल?

---

# * दे. भ. शिवराम महादेव परांजपे

गेल्या मंगळवारीं अहमदाबादच्या साबरमतीच्या तुरुंगांतून दे. भ. परांजपे यांची सुटका झाली. अहमदाबादच्या स्नेहीमंडळींनीं त्यांचें स्वागत चांगल्या प्रकारें केलें. अहमदाबादेहून मुंबईस येत असतांना वाटेंत वडोदें, सुरत, नडियाद वगैरे ठिकाणीं स्टेशनवर त्यांना पानसुपाऱ्या झाल्या. मुंबईकरांनीं तर त्यांचें स्वागत थाटाचें केलें. त्यासंबंधाची हकीकत मुंबईच्या बातमीपत्रांत आज दुसरीकडे दिली आहे. मुंबईहून पुण्यास येत असतांना वाटेंत ठाणें, कल्याण वगैरे ठिकाणीं अपरात्र झाली असतांहि बरेच लोक या देशभक्ताचा सन्मान करण्यास हजर होते. पुणें स्टेशनवर तर त्यांचें स्वागत करण्याकरितां निरनिराळ्या दर्जाचे व पेशांचे लोक हजर होते, आणि सन्मानार्थ आणलेल्या त्यांचे हातांतील हारांनीं स्टेशन खरोखरच फुलल्यासारखें भासत होतें. दे. भ. परांजपे गाडींतून उतरल्यानंतर त्यांच्यासह हजार दोन हजार लोकांचा तो समुदाय स्टेशनजवळच्या धर्मशाळेच्या पटांगणांत दाखल झाला. तेथें रा. रा. अण्णासाहेब पटवर्धन यांनीं परमेश्वराचे धन्यवाद गाऊन देशभक्ताच्या सुटकेबद्दल आनंद प्रदर्शित केला. नंतर दे. भ. परांजपे यांनीं पुणेकरांच्या खऱ्या आनंदाचा दिवस म्हणजे लो. टिळक यांच्या सुटकेचा होय असें सांगून सर्वांचे आभार मानले. या प्रसंगीं स्टेशनपासून निघालेली मिरवणूक तर फारच प्रेक्षणीय होती. तीन चार हजार लोक देशभक्तांच्या बरोबर चालले होते, आणि देशभक्तीला उचंबळया आणणाऱ्या नाना प्रकारच्या जयशब्दांनीं मिरवणूक दणाणून गेली होती. रविवारांत, बुधवारांत तर हा समुदाय फारच मोठा

---

* केसरी, ता. १२ आक्टोबर १९०९

झाला आणि ठिकठिकाणीं दे. भ. परांजपे यांना हार अर्पण करण्यांत आले. अशा रीतीनें स्वदेशाविषयीं कळकळ वाळगणारांच्या सप्रेम स्वागतांतील देशभक्तीचा आस्वाद घेत श्रीजोगेश्वरी व श्रीगणपति यांचे दर्शनोत्तर आशीर्वाद घेऊन दे. भ. परांजपे ' काळ ' ऑफिसांत दाखल झाले. गेले शनिवारीं सायंकाळीं राष्ट्रीय क्लबमार्फत दे. भ. परांजपे यांना पानसुपारीस बोलावलें होतें. त्यावेळीं सेक्रेटरी, राष्ट्रीय क्लब, यांनीं काढलेली आमंत्रण-चिठी अशी होती-" शनिवार ता. ९ आक्टोबर १९०९ रोजीं सायंकाळीं बरोबर ६ वाजतां ' पुणें राष्ट्रीय क्लब ' या व इतर संस्थांमार्फत दे. भ. शिवराम महादेव परांजपे यांना किर्लोस्कर संगीत नाटक-गृहांत जाहीर पानसुपारी होणार आहे; तरी सदर प्रसंगीं आपल्या मित्रमंडळींसह हजर रहावें अशी विनंति आहे. " ह्या आमंत्रणाला मान देऊन शनिवारीं सायंकाळीं किर्लोस्कर नाटक-गृहापुढें लोकांच्या झुंडीच्या झुंडी जमल्या होत्या; पण डि. पोलिस ॲक्टाच्या बेचाळीस कलमाप्रमाणें नोटीस काढून डि. मॅजिस्ट्रेट मि. स्विफ्ट यांनीं

## पानसुपारीस बंदी

केल्यामुळें निराश होऊन उद्विग्न चित्तानें लोकांस परत जावें लागलें. ही नोटीस आज दुसरीकडे आम्ही प्रसिद्ध केली आहे. पुण्याच्या अधिकारी वर्गानें विरोधी भक्तीनें देशभक्तांचा हा असा सन्मान केला, हें एक प्रकारें ठीकच झालें. कारण एक वेळ विरोध पत्करतो, पण हेळसांडीचा अपमान सहन करणें तेजस्वी लोकांना अधिक त्रासदायक होतें. असो. अशाप्रकारच्या पानसुपारीस पोलिस ॲक्टाच्या ४२ कलमाखालींहि डि. मॅजिस्ट्रेटास बंदी करतां येत नाहीं. अनीतिकारक प्रकार बंद करतां यावेत, धर्मद्वेष भडकूं नये, दोन तटांमधील भांडण विकोपास जाऊं नये, अपराध करण्यास, शांततेचा भंग करण्यास, . कायदा किंवा कायदेशीर अधिकारी ह्यांचा

हुकूम तोडण्यास किंवा त्यांच्याविषयीं तिरस्कार उत्पन्न करण्यास चिथावणी मिळूं नये म्हणून, दगड गोळा करण्याची, हत्यारें गोळा करण्याची, चित्रें वगैरे दाखविण्याची, आरोळ्या ठोकण्याची, वाद्यें वाजविण्याची, खुणा-खाणा व हावभाव करण्याची, चिथावणारीं भाषणें करण्याची बंदी करण्याचा अधिकार ह्या कलमाखालीं डि. मॅजिस्ट्रेटला आहे. हें कलम वाचलें असतां कोणाचेहि ध्यानांत येईल कीं, शांततेचा किरकोळ भंग, नीतीचा भंग, अपराध करण्यास किंवा हुकूम तोडण्यास अगर हुकमाची बेअदबी करण्यास चिथावणी, असल्या प्रसंगीं हें कलम लावावयाचें असतें. पण सांप्रत हें कलम म्हणजे

## मॅजिस्ट्रेटी गारुड्याची पोतडी

झालें असून पाहिजे तो हुकूम पोलिसी हाडूक फिरविल्यानंतर या कलमांतून बाहेर पडूं लागला आहे. कोंकणांत तर या कलमाचा सुळसुळाट फार झाला आहे. देशभक्तांचीं चित्रें विकण्यांत येतात, लाव हें बेचाळिसावें कलम आणि कर बंदी; श्रीशिवाजी महाराज की जय म्हणून कोणी ओरडतो, लाव हें बेचाळिसावें कलम आणि कर आरोळ्यांना बंदी; श्रीगणपतीपुढें कोणाचें प्रवचन होतें, लाव हें बेचाळिसावें कलम आणि कर त्याचें प्रवचन बंद ! रत्नागिरीच्या डि. मॅजिस्ट्रेटानें हें बेचाळिसाव्या कलमाचें भूत प्रथम जागतें केलें; आणि आतां कोंकणच्या सर्व जत्रिणी व लायसटी या कलमांत शिरल्या असल्यामुळें हायकोर्टानें हीं भुतें लवकर तरी गाडिलीं पाहिजेत किंवा सरकारनें हें भुताटकीचें बिऱ्हाडच पोलिस ॲक्टांतून अजिबात हुसकावून लावलें पाहिजे. एरव्हीं ' सभाबंदी ' च्या कायद्याइतकेंच हें कलम लोकांत असंतोष उत्पन्न केल्यावांचून रहाणार नाहीं. कोंकणांतून हें भूत घाटावर चढल्यापासूनहि ह्यानें बऱ्याच लीला केल्या आहेत. जुन्नरास एका पुराणिकाचीं पुराणें बंद केलीं. नाशिकास श्रीगणपति महोत्सवास

दे. भ. दामले यांचें प्रवचन या कलमानें बंद केलें. काल तर दे. परांजपे यांजकरतां तयार केलेली पानसुपारी ह्या कलमानें मधल्यामध्येंच खाऊन टाकली. नागपूरच्या डि. मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं क्रिमिनल प्रोसिजर १४४ कलमांतील सभाबंदीच्या अपूर्व शक्तीचा शोध लावला, तर कोकणांत मॅजिस्ट्रेटी जादूनें मॅजिस्ट्रेटी परंपरेच्या बेचाळीस पिढ्यांच्याहि स्वप्नीं आले नसतील इतक्या

## अधिकारांची खाण

एकट्या बेचाळिसावे कलमांत हुडकून काढली. पानसुपारीच्या बंदीच्या हुकमांत पुण्याचे डि. मॅजिस्ट्रेट सुचवितात कीं, पानसुपारी ही अशा प्रकारची वस्तू आहे कीं, तिच्या प्रदर्शनानें किंवा फैलावानें कायदा तोडण्यास किंवा कायदेशीर हुकमाची अवज्ञा करण्यास लोक चिथावले जातील. पानसुपारीचे अंगीं हे गुण कसे उत्पन्न होतात तें आम्हांस समजत नाहीं. अगोदर पानसुपारी म्हणजे कांहीं एखादें मत नव्हे किंवा विचारहि नव्हे किंवा एखाद्या रोगाची सांथहि नव्हे कीं त्या गोष्टीचा ' फैलाव ' करतां येईल ! सुपाऱ्या म्हणजे बंदुकींत घालून उडवावयाच्या गोळ्या का गोफणींत घालून फेंकावयाचे धोंडे ? ह्या पानसुपारीवर एवढी वक्र दृष्टि कां व्हावी ? आनंद, प्रेम, आदर, स्वागत किंवा शिष्टाचार, ह्यांपैकीं कोणच्या ना कोणच्या तरी कारणामुळें एकानें दुसऱ्यास पानसुपारी देण्याचा हिंदुस्थानांत प्रघात आहे; आणि अशा कोणच्याहि प्रसंगीं पानांचा ' फैलाव ' करण्याची चाल महाराष्ट्रांत नाहीं. अर्थात् किर्लोस्कर नाटक-गृहांत गेले शनिवारीं सुपारीचें प्रदर्शन करून कोणास भयहि दाखविण्यांत येणार नव्हतें; किंवा पानें उधळून आनंदाचा समय अमंगल करण्याचाहि कोणाचा हेतु नव्हता. शब्दच्छल एका बाजूला ठेवला तर हुकमांतील मथितार्थ थोडक्यांत असा दृष्टीस पडतो कीं, दे. परांजपे यांना हायकोर्टानें १२४ अ कलमाखालीं शिक्षा केली, तेव्हां

७४

त्यांच्या सुटकेसंबंधानें आनंद प्रदर्शित करणें, त्यांचें स्वागत करणें किंवा शिष्टाचाराप्रमाणें त्यांच्या भेटीस जाणें ह्या गोष्टीमुळें सरकारविषयीं तिरस्कार उत्पन्न होतो; कैदेंत जाऊन आलेल्यांचा सन्मान तुम्हीं करतां, त्यामुळें सरकारचा अपमान होतो; तुरुंगांत जाऊन आलेल्याला तुम्ही मोठा समजतां, त्यामुळें सरकारच्या पदरांत कमीपणा येतो. राष्ट्रीय क्लबचे सेक्रेटरी दे. दामले यांना डि. मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं ४२ कलमाखालील हुकमाची अशाच धर्तीची फोड करून सांगितली. ह्यावरून कोणत्या गैरसमजाची व

## तेःहीची सांथ

सांप्रत मॅजिस्ट्रेटांत पसरूं पहात आहे, हें वाचकांचे ध्यानांत येईल. तुरुंगांतून सुटून आलेल्या देशभक्ताचें सुटकेबद्दल अभिनंदन केल्यानें सरकाराविषयीं तिरस्कार उत्पन्न केल्याचा अपराध घडतो काय ? एकाचा मान केल्यानें दुसऱ्याचा अपमान झालाच पाहिजे, असा नियम इंग्रजी कायद्यांना संमत नाहीं, व्यवहारालाहि कबूल नाहीं, आणि सरकारच्या पदरच्या ' मवाळ ' पक्षाच्या लेखकांनींहि परवांच एका प्रसंगीं हा नियम चुकीचा आहे, असें जाहीर केलें आहे. एकाचा आदर म्हणजे दुसऱ्याचा अनादर ही व्याप्तीच बरोबर नाहीं; विलायत, युरोप, जपान, अमेरिका वगैरे देशांतील शिष्टांनाहि हें तत्त्व संमत होणार नाहीं. कारण हें व्याप्तीचें तत्त्व एकदां कबूल केलें म्हणजे सरकारला किंवा अधिकाऱ्यांना न आवडणारें एखाद्यास आवडूं लागलें म्हणजे चटदिशीं सरकारविषयीं तिरस्कार उत्पन्न होईल; आणि राजद्रोहाच्या पेंचांत मनुष्य सांपडेल. सरकारला कर्णमधुर लागेल तेंच आमच्या कानांना गोड लागलें पाहिजे, नाहीं तर अधिकाऱ्यांविषयीं तिरस्कार उत्पन्न व्हावयाचा. सरकारच्या जिभेला चवदार लागेल तेंच आम्हीं खाल्लें पाहिजे, नाहींतर अधिकाऱ्यांविषयीं तिरस्कार उत्पन्न व्हावयाचा. सरकारचें

डोळयांना जें सुंदर दिसेल, तेंच आपल्या डोळयांना रम्य भासलें पाहिजे, डोळयांतून हा धर्म उत्पन्न न झाल्यास अधिकाऱ्यांविषयीं तिरस्कार उत्पन्न व्हावयाचा ! कायदा व अधिकारी ह्यांविषयीं तिरस्कार उत्पन्न होऊं नये म्हणून जेव्हां मॅजिस्ट्रेट एखाद्या जय शब्दाचा उच्चार करण्याची बंदी करतात, एखादी तसबीर विकण्याची किंवा स्वतःच्या घरांत व दुकानांत लावण्याची मनाई करतात, प्रवचनाचे किंवा पुराणाचे वेळीं एखाद्याची मुस्कटदाबी करतात किंवा पानसुपारीचा उच्छेद करतात, तेव्हां वरील तऱ्हेची विचारसरणी त्यांच्या मनांत असते. खुषमस्कऱ्यांना ही विचारसरणी बरोबर लागू पडते; पण प्रजाजन—आणि ते राष्ट्रीय पक्षाचे प्रजाजन—म्हणजे खुषमस्करे नव्हत, हें अधिकाऱ्यांनीं विसरतां कामा नये. दे. परांजपे यांचा सन्मान केल्यानें कोणच्या कायद्याचा किंवा अधिकाऱ्यांचे हुकमाचा तिरस्कार होऊं शकतो ? हायकोर्टानें १२४ अ ह्या कलमाप्रमाणें त्यांना तुरुंगांत टाकिलें, दे. परांजपे यांनीं ती शिक्षा अधिकारी जसें सांगतील त्याप्रमाणें भोगली. आणखी हायकोर्टाच्या हुकमाची व १२४ अ ह्या कलमाची चोळवणी ती कोणची करावयाची ? हिंदू लोक ‘ पटकी ’ चेंहि देऊळ बांधतात; त्याप्रमाणें हायकोर्टाचा तो ठराव व १२४ अ हें कलम ह्यांचें देऊळ बांधून पूजाअर्चा करीत दे. परांजपे यांनीं बसावें असें मॅजिस्ट्रेटांचें म्हणणें आहे काय ? चोरीच्या अपराधाबद्दल शिक्षा भोगल्यानंतर ‘ चोर चोर’ म्हणून मागें लागलें असतां ‘ बेअब्रू ’ होत असते. शिक्षेच्या प्रायश्चित्तानंतर पूर्वीचा दोष रहात नाहीं. तुरुंगांत जर आम्ही पानसुपारी द्यावयास गेलों असतों तर कायद्याचा व अधिकाऱ्यांचा उपमर्द करणारी ही गोष्ट आहे असें वाटणें ठीक होतें. एखादा देशभक्त शिक्षा भोगून परत आल्यानंतर त्याचे इष्टमित्रांना व त्याचे पक्षाचे लोकांना आनंद व्हावा, हें साहजिक आहे; आणि असले आनंदाचे व अभिनंदनाचे समारंभ करण्याचा

रिवाज इंग्लंडांत तर आजमितीसहि सुरू आहे. ह्या असल्या सन्मानांचा हेतु सरकारचा तिरस्कार करणें हा बिलकुल नसतो. ह्या

### सन्मानाचें मूळ

कोठें आहे, हें बरोबर न समजल्यामुळें असले दडपशाहीचे हुकूम सोडण्यांत येतात. सरकाराबद्दल तिरस्कार दाखवावयाचा हाच जर हेतु असता तर तुरुंगांतून सुटणाऱ्या प्रत्येक कैद्याची मिरवणूक निघाली असती ! अहमदाबादेहून पुण्यास पोहोंचेपर्यंत दे. परांजपे ह्यांना प्रत्येक महत्त्वाचे ठिकाणीं पानसुपारी कां व्हावी ? मुंबईस त्यांचे पानसुपारीचे समारंभास हजारों लोक कां जमावेत ? पुण्यास त्यांची मिरवणूक एवढी थाटाची कां निघावी ? पंधरा दिवस एकसारखे हेलपाटे घालून सह्या जमविण्याचा अट्टाहास करून येथील मेळयांतील एका पदाचें दळण दळण्यास शेंपन्नास लोकांहून अधिक सभासद फडक्यांचे वाडयांत जमूं नयेत, व याचवेळीं पानसुपारीच्या ठिकाणाहून लोकांच्या झुंडीच्याझुंडी जमून परत जाव्यात, ह्या फरकांतील इंगित काय ? अधिकाऱ्यांनीं शांतपणें ह्या दोन चित्रांतील फरकाचा विचार करावयास नको काय ? अधिकाऱ्यांना आम्हीं पुनः पुन्हां विनंति करतों कीं, शांतपणानें ह्या गोष्टीचा विचार करा. हा असा सन्मान कां व्हावा ? तुमच्या पदरच्या बिनपगारी लोकांचा, तुम्ही ज्यांना आपल्या सभोंवतीं गोळा करण्याचा सपाटा चालविला आहे त्यांचा बुडबुडा समाजापुढें येताक्षणींच असा कां फुटावा ? ह्याचा शांतपणें विचार करण्याची वेळ आज आली आहे. सव्वा दीड वर्षापूर्वी तुम्हीं दे. परांजपे व लो. टिळक यांना कैदेंत टाकलेंत; तेव्हांपासून आतांपर्यंत बिनपगारी अनुयायांचा जम बसविण्याचे नानाप्रकारचे उद्योग झाले; पण गेले शनिवारीं काय दिसून आलें ? एका पक्षावर लोकांची पूर्ववत् श्रद्धा व प्रेम, आणि दुसरा पक्ष स्वतःस श्रीमंत म्हणवून घेणाऱ्या दुबळयांचा पांजरापोळ ! ही अशी स्थिति कां असावी, ह्याचा

अधिकाऱ्यांनीं स्वतःच्या मनाशीं शांतपणें विचार करण्याची वेळ आतां दीड वर्षानंतर आली नाहीं काय ? कोणतेंहि सरकार श्रीविष्णूचा अंश असल्या-मुळें ' लक्ष्मी ' नेहमीं अधिकाऱ्यांच्या बाजूची असणार हें उघड आहे. तेव्हां अधिकाऱ्यांनीं ' लक्ष्मी ' आमच्या बाजूची आहे म्हणून दिमाख दाखविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. लोकांच्या मनावर एकट्या लक्ष्मीचा अंमल केव्हांहि बसत नाहीं. तर

## लक्ष्मी व सरस्वती

ह्या दोघींनीं मिळून समाजाचीं मनें आकर्षण करून ठेविलेलीं असतात. संपत्ति, दर्जा, मानमरातब इत्यादि मार्गांनीं ' लक्ष्मी ' चा अंमल बसतो, आणि विद्वत्ताप्रचुर ग्रंथ व प्रतिभासंपन्न लेख ह्यांच्याद्वारें सरस्वतीचा अंमल बसत असतो. आपल्या विद्वत्तेनें व प्रतिभेनें लोकांचीं मनें आकर्षण करून घेणारे लेखक ' लक्ष्मी ' च्या हुकमानें निर्माण होत नसतात. सरस्वतीच्या प्रभावाचा हा टापू परमेश्वरानें राजे लोकांच्या हातीं ठेवलेला नसून असले लेखक त्याच्याच प्रसादानें निर्माण होतात, त्याच्याच कृपाछत्राखालीं वाढतात व त्याच्याच आज्ञेनें अंगीकृत कार्य शेवटास नेतात. निःशस्त्र, दुबळे, आपापसांत भांडणारे व जुटीच्या शिस्तीला पारखे झालेले असे जेव्हां प्रजाजन असतात तेव्हां त्यांच्या उद्धाराचें काम परमेश्वर प्रथमतः आपल्या प्रतिभासंपन्न अतएव लाडक्या लेखकांच्या मार्फत करीत असतो. प्रतिभासंपन्न लेखकांच्या पुढारीपणाखालून निघून व्यवहारचतुर, कर्त्या व युक्तिप्रयुक्तीनें आपल्या ताब्यांत लक्ष्मीला खेंचून आणणाऱ्या समर्थ मुत्सद्यांच्या पुढारीपणाखालीं अद्याप आमची चळवळ गेलेली नाहीं. अशावेळीं चळवळीचा जोम जर अजमावयाचा असेल तर प्रतिभासंपन्न विद्वान लेखक–भाषेचें वाङ्मय निर्माण करणारे ग्रंथकार–कोणच्या बाजूचे आहेत, ह्यावरूनच अजमावयाला पाहिजे. ' मवाळ, मवाळ ' म्हणवून घेण्यांत फुशारकी मारणारा लेखक आपल्या

प्रतिभेचा उपयोग करूं लागला कीं एकदम राष्ट्रीय पक्षाला अनुकूल असे ग्रंथ निर्माण करतो व अधिकाऱ्यांची तळी उचलून धरण्याचेवेळीं दळपिणीच्या गाण्याहून अधिक योग्यतेचे शब्द त्यांच्या लेखणींतून खालींच उतरत नाहींत; असा चमत्कार कां व्हावा, ह्याचा विचार शांतपणें अधिकाऱ्यांनीं करावयास नको काय ? अधिकाऱ्यांनीं आपल्या सभोंवतीं गोळा केलेल्या दळपिणींमुळें राष्ट्रीय पक्षाची पहाटेस जरा झोंपमोड होते, ही गोष्ट खरी आहे; पण ह्यांचीं दळणाचीं गाणीं दोनप्रहरीं लागणाऱ्या पिठाला उपयोगी पडणारीं असल्यामुळें राष्ट्रीय पक्षास त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यास कोणचीच हरकत वाटत नाहीं. अधिकाऱ्यांच्या बाजूला दीड वर्षाच्या सतत प्रयत्नानेंहि प्रतिभासंपन्न विद्वान लेखक व वक्ता महाराष्ट्रांत मिळूं नये, यापासून अधिकाऱ्यांनीं योग्य तें अनुमान काढावयास नको काय ? दे. परांजपे व लो. टिळक यांच्यासारखे महाराष्ट्रांतील प्रतिभासंपन्न व विद्वान लेखक व वक्ते आपल्या कारागृहवासाचे दिवस कंठून, चांगल्या खंबीर प्रतिस्पर्ध्याशीं गांठ आहे असें समजत जेव्हां आखाड्यांत उतरतील व तसल्या रडतरावांचा सूर त्यांच्या कानीं जाईल, तेव्हां अधिकाऱ्यांच्या बाजूच्या लेचेपेचेपणाबद्दल त्यांना काय वाटेल, ह्या वस्तुस्थितीची छाननी अधिकाऱ्यांनीं आपल्या मनाशीं करावयास नको काय ? ‘ दिगंते श्रूयंते मदमलिनगंडाः करिटिनः । करिण्यः कारुण्यास्पदमसमशीलाः खलु मृगाः । इदानीं लोकेऽस्मिन्ननुपमशिखानाम् पुनरयम् । नखानां पांडित्यं प्रगटयतु कस्मिन् मृगपतिः ॥ ’ अशा प्रकारची गर्वोक्ति, इच्छा नसतांहि, दे. परांजपे किंवा लो. टिळक यांच्या तोंडून सहजगत्या बाहेर पडण्यासारखी सांप्रतची स्थिति नाहीं काय ? ज्या लेखकांच्या प्रतिभासंपन्न लेखांनीं राष्ट्रीय पक्षास एवढें महत्व प्राप्त झालें आहे त्या लेखकांच्या मालेंत दे. परांजपे ह्यांनीं महत्त्वाचें स्थान आपल्या दहा वर्षांच्या लोकसेवेनें संपादिलें आहे; दे.

परांजपे हे मराठी भाषेंतील एक प्रकारच्या चटकदार भाषापद्धतीचे प्रवर्तक असून परमेश्वरानें त्यांच्या हवालीं केलेली मराठी भाषेवरील ही एकप्रकारची सत्ता मोठ्या प्रेमानें, कळकळीनें व एकनिष्ठेनें गेलीं दहा वर्षें राष्ट्रीय पक्षाच्या चरणीं त्यानीं वाहिली आहे. सव्वा वर्ष कारागृहवास सोसून, कारागृहांतील एकांतवासांत, तूं दिलेली सत्ता तुझ्याच कार्याकरितां मीं खर्च केली अशी वर्दी परमेश्वराचे पायापाशीं ह्या सव्वा वर्षाचें सुटीच्या काळांत स्वतः पोंचवून दे. परांजपे परत आले असतांना त्यांच्या ह्या देशसेवेबद्दल लोकांना प्रेमा व आदर कां वाटूं नये ? परवांची पानसुपारी तिरस्कारदर्शक नसून प्रेममूलक होती. व्यक्त मार्ग बंद झाले तरी अव्यक्त व गूढ मार्गांनीं प्रेमाचा प्रवाह वाहूं शकतो, हें दे. परांजपे यांना माहीत आहे. तेव्हां जाहीर पानसुपारीचे ऐवजीं सर्व महाराष्ट्राचेतर्फे आम्हीं दे. परांजपे यांचें आनंदानें स्वागत करतों; आणि मुंबईच्या आपल्या भाषणांत सांगितल्याप्रमाणें त्यांनीं देशसेवेचा आपला पूर्वक्रम गेल्या आठवड्यांतच पुन्हां सुरू केला ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन करितों.

# * मराठी भाषेचा उत्सव

बडोदें येथें गेल्या आठवड्यांत महाराष्ट्र साहित्य संमेलन भरलें होतें. ह्या संमेलनाची हकीकत गेल्या अंकीं 'अनंता' चे बातमीपत्रांत प्रसिद्ध झालीच आहे. वार्षिक संमेलनाच्या रूपानें मराठी भाषेचा उत्सव करण्याची कल्पना कै. न्या. रानडे, प्रि. आगरकर वगैरे मंडळींनीं वीस वर्षांपूर्वी काढ ी व त्यावेळीं पहिलें संमेलन भरलेंहि; पण पुढें हा उत्सव बंद पडला. स्वदेशी चळवळीची लाट सर्व हिंदुस्थानभर पसरण्याचे सुमारास महाराष्ट्राच्या इतिहासाचे अभिमानी शेठ पुरुषोत्तम विश्राम मावजी व रा. पारसनीस ह्यांनीं साताऱ्यास ह्या कार्याला पुन्हां सुरवात केली, व पुढें तीन वर्षें पुण्यास हा उत्सव साजरा करण्यांत येऊन चालू सालचा पांचवा उत्सव बडोदें मुक्कामीं झाला. मराठी भाषेकडे विद्वानांचें लक्ष वेधणें व विद्वानांनीं स्वदेशी भाषेची सेवा भक्तिभावानें केली असतां लोककल्याणाचे कामीं ती सेवा खर्ची पडावी म्हणून धनिकांकडून ह्या सेवेचें चीज करविणें, असे दोन प्रकारचे फायदे असल्या उत्सवापासून होतात. विद्वानांची नेहमीं तक्रार असते कीं श्रीमंतांचा वर्ग स्वदेशी भाषेस प्रोत्साहन देत नाहीं, धनिकांची कुरकुर असते कीं लेखकांचा वर्ग उगीच कांहीं तरी खरडीत असतो व प्रोत्साहन मिळालें नाहीं म्हणजे आमच्या नांवानें खडे फोडतो. आपल्या शिरावरील जबाबदारी दुसऱ्याच्या माथीं फोडण्याची ही संवय सार्वत्रिक असते; हा चुकारतट्टूपणाचा दोष सर्व काळीं दृष्टीस पडतो; कार्याविषयींची कळकळ स्वतःच्या अंगीं कमी असतांना दुसऱ्याचें अवसान उसनें मागण्याची ही प्रवृत्ति जन्मसिद्ध असते. दोष काढण्यास व कर्ज मागण्यास जो तो तयार;

---

* केसरी, २ नोव्हेंबर १९०९

दोष भरून काढण्यास व भांडवल पुरविण्यास मात्र कोणीच तयार नाहीं ! अशावेळीं जनसमूहाच्या बोलण्याचालण्याच्या नेहमींच्या विषयांत महत्वाचें स्थान स्वभाषेच्या उत्कर्षाला मिळाल्याशिवाय सरस्वतीची व लक्ष्मीची तोंडमिळवणीं होत नाहीं. असलें लोकमत उत्पन्न करण्याचीं जीं प्रमुख साधनें आहेत त्यांत अग्रस्थान उत्सवांना देण्यांत येत असतें. धार्मिक उत्सव तर आमच्या देशांत इतके आहेत कीं, इतर सर्व उत्सवांचा समावेश धार्मिक उत्सवांत आम्हांस सहज करतां येतो. राजकीय वाव असो, शिक्षणाचा विषय असो, उद्योगधंद्यांची चळवळ असो, वा वाङ्मयाची पूजा असो, सर्व कार्यांचें परिपालन हिंदु धर्मानें केलें आहे. धर्माचें आवारांत सर्वांचें एकीकरण करण्याच्या ह्या पद्धतीला इंग्रजी राज्यापासून ओहटी लागली, व इतर बाबी धर्मापासून अलग करून त्यांचे पृथक उत्सव करण्याचा प्रघात कॉंग्रेसनें पाडला. राजकीय चळवळीचा उत्सव कॉंग्रेसचे मंडपांत होतो, ऐतिहासिक परंपरेचा उत्सव श्रीशिवाजी महाराजांच्या जन्माचे व राज्याभिषेकाच्या दिवशीं होतो, श्रीगणपति महोत्सवाचे प्रसंगीं धर्मबुद्धीस प्राधान्य मिळून पूर्वीच्या पद्धतीस अनुसरून इतर चळवळींच्या देवतांनाहि यथावकाश आमंत्रण देण्यांत येतें, व साहित्य संमेलनाचे वेळीं मराठी भाषेची पूजाअर्चा होते. गेल्या चार वर्षांच्या संमेलनांमुळें विद्वानांचें लक्ष स्वभाषेकडे अधिक वेधलें गेलें. प्रतिभासंपन्न लेखक संमेलनांनीं व लोकमताच्या उचलीनें उत्पन्न होत नसतात, ही गोष्ट खरी आहे. ज्ञानभांडार हें परमेश्वरी कृपेचें फळ होय. तथापि संमेलनांनीं, उत्सवांनीं व लोकांच्या जागृतीनें ज्ञानभांडारास व्यवस्थित स्वरूप प्राप्त होतें, विद्वानांना धनिकांचा व धनिकांना विद्वानांचा आश्रय मिळतो, आणि सरस्वती व लक्ष्मी ह्या दोनहि देवतांना शक्तीचें स्वरूप प्राप्त होतें. विद्वत्ता व संपत्ति यांचा मिलाफ होतो, तेव्हां शक्ति उत्पन्न होते; एकांतांतील एकएकट्याची

तपश्चर्या गुणसंवर्धक होते, समूहाची तपश्चर्या शक्तिदायक असते. समूह म्हणजेच अधिकार, समूह म्हणजेच वैभव, व समूह म्हणजेच लक्ष्मी. निरनिराळया व्यक्तींचें एकीकरण म्हणजेच लक्ष्मीचें अधिष्टान. एकी व्हावयाला लागली म्हणजे लक्ष्मी दिसूं लागते; व लक्ष्मी असली म्हणजे एकी करण्याचें काम सुलभ होतें. मराठी भाषेची सेवा विद्वान लोक व्यक्तिशः आजपर्यंत करीत आलेले आहेत. परमेश्वरी कृपेनें अशा भक्तांची वाण पूर्वी नव्हती व आजहि नाहीं. महाराष्ट्राचें पूर्वीचें वाङ्मय जितकें तेजस्वी, प्रतापी व ज्ञानमय आहे तितकीच धमक सांप्रतच्या वाङ्मयांत आहे. मराठी भाषेच्या दृष्टीनें सांप्रतचा काळ निराशेचा नसून उलट उत्साहवर्धक आहे. चिपळूणकर, आगरकर, टिळक, परांजपे यांच्यासारखे प्रतिभासंपन्न निबंधलेखक मराठींत उत्पन्न झाले आहेत; कल्पनासृष्टींत आधुनिक कवी, कादंबरीकार, नाटककार, प्राचीनांच्या तेजाला सांप्रतच्या कालांतून गतकालांत मार्ग रेटूं लागले आहेत; मोरोपंत, रामदास, वगैरे कवींचे व साधुवर्गाचे ग्रंथांचें अध्ययन दहा दहा बारा बारा वर्षें करून कष्टानें सर्व माहिती गोळा करून, प्रेमपूर्वक व विद्वत्तेच्या अधिकारानें चरित्रें लिहिणारे पांगारकर व देव यांच्यासारखे शोधक चरित्रकार आमच्यांत आजकालच चमकूं लागले आहेत; इलाखाधिपतींचें व शेठ मावजी यांच्यासारख्या धनाढ्यांचें लक्ष महाराष्ट्राच्या इतिहासाकडे वेधणारे पारसनिसांसारखे इतिहाससंशोधक आज आहेत; केवळ स्वावलंबनानें व स्वकष्टानें इतिहासाच्या भक्तीचा प्रसार महाराष्ट्रांत करणारे व पॅरिस येथील मासिकांतून ज्यूलस ब्लॅचसारख्या फ्रेंच विद्वानासहि आपल्या ज्ञानेश्वरी-संबंधाच्या मराठी कृतीचें गौरवयुक्त निरीक्षण फ्रेंच भाषेंत करावयास भाग पाडणारे राजवाड्यांसारखे इतिहासाभिमानी आपल्यांत आज आहेत; निरनिराळया दरबारांत असलेले जुने कागदपत्र पद्धतशीर रीतीनें छापून

मराठी ग्रंथ संग्रहालय वाचनालय

काढून सुलभ भाषेनें इतिहासाकडे लोकांचें मन आकर्षण करून घेणारे खरे आपलें प्रकाशनाचें काम अव्याहत चालवीत आहेत; नामजोशी यांचा प्रसिद्ध झालेला कोष, प्रो. रानडे यांचा प्रसिद्ध होत असलेला कोष, हीं आजऱ्याच सिद्धीचीं कामें आहेत; जुने कवी आज आम्ही प्रसिद्ध करीत आहोंत व नव्या कवींची संभावना करण्याकडे आज आमची प्रवृत्ति आहे; व्यायाम-शास्त्र, वैद्यशास्त्र, ज्योतिषशास्त्र, रसायनशास्त्र इत्यादि शास्त्रांसंबंधाचे लहान थोर ग्रंथ आजकाल निर्माण होत आहेत; वेद, शास्त्रें व पुराणें यांचीं भाषांतरें मराठींत करण्याकडे तर विद्वानांचा ओढा आजकाल विशेष लागला आहे. हा सर्व कथाभाग उत्साहवर्धक आहे! पण लोकाश्रय किंवा धनाढ्यांचा आश्रय मिळावा तितका मिळत नाहीं, असे दैन्याचे उद्गार विद्वज्जन-समूहाचे तोंडून ऐकण्याचा प्रसंग वारंवार येतो. हा रडकथेचा छाप विद्वानांच्या जिभेवर विधात्यानें जरी कायमचा उठवलेला असला तरी अंगीकृत कार्यापासून विद्वानाला पराङ्मुख करण्याइतकें हें दैन्य तीव्र न होऊं देण्याची खबरदारी स्वभाषेच्या अभिमानानें घेणें जरूर आहे. हें दैन्य दूर करण्याची उत्कट इच्छा बडोदें येथील सहविचारिणी सभेच्या मेहनतीनें व श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या आश्रयानें पांचव्या संमेलनांत दृष्टीस पडली. महाराष्ट्र साहित्य परिषदेस नियमबद्ध व पद्धतशीर स्वरूप देण्याचा ठराव ह्या संमेलनांत पास झाला. ह्या कामाचे खर्चाकरितां २२०० रुपयांची वर्गणी एक दिवसांत जमली, व श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्यातर्फे दिवाण रमेशचंद्र दत्त ह्यानीं साहित्य परिषदेचें पद्धतशीर काम सुरू होण्याबरोबर महाराजांकडून भरपूर आश्रय देण्यांत येईल, असें जाहीर केलें. बडोद्याच्या साहित्य संमेलनाचें महत्व याच गोष्टींत आहे. राजकीय म्हणा किंवा धार्मिक म्हणा, इतर बाबतींतले मतभेद एका बाजूस ठेऊन, श्रीमंत व गरीब अशा दर्जाचे भेद विसरून जाऊन मातृभाषेवरील प्रेमानें मराठीच्या उत्सवाच्या

कार्यैकदृष्टीनें सर्वांना एका मंडपांत गोळा करून, बडोदेकरांनीं साहित्य परिषदेस व्यवस्थित स्वरूप देण्याचा उपक्रम केला, याबद्दल बडोद्यास भरलेल्या पांचव्या संमेलनाचें अभिनंदन केल्यावांचून राहवत नाहीं. झीज सोसून स्वदेशी जिन्नस घेणें ज्याप्रमाणें राष्ट्राच्या अभ्युदयास कारणीभूत होतें त्याप्रमाणें झीज सोसूनच स्वदेशी भाषेचा उत्कर्ष करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. व्यावहारिक फायद्याच्या किंवा मोबदल्याच्या दृष्टीनें श्रीमंतांनीं किंवा विद्वानांनीं भाषेची सेवा करूं नये. भाषेच्या राज्यांतले कारखानदार विद्वान ग्रंथकार होत व ह्या कारखान्यांतील माल खरेदी करणारे गिऱ्हाईक म्हणजे भाषाभिमानी धनिक लोक होत. गिऱ्हाइकाची ज्या मालाबद्दल विशेष मागणी तसला माल कारखानदार करीत असतात. सांप्रत इंग्रजी भाषेला राजदरबारीं व सरकारी शिक्षण खात्याच्या सर्व संस्थांत मान असल्यामुळें इंग्रजी विद्वत्तेलाच प्रजाजनांतहि विशेष मागणी आहे. जसा स्वदेशी माल गिऱ्हाइकांच्या विशेष मेहेरबानीशिवाय परदेशी मालाशीं टक्कर मारूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें व्यवहारांत व सरस्वती मंदिरांतहि स्वदेशी भाषा परदेशी भाषेपुढें आजकाल टिकाव धरूं शकत नाहीं. राजाश्रय नाहीं म्हणजे वनवासाच्या यातना प्राप्त होतात. ह्या वनवासांतहि मायभाषेची सेवा करणारे निःस्सीम भक्त आहेत; पण बहुजन समाजांत या भक्तीचा फैलाव होण्यास राजाश्रयाचे अभावीं झीज सोसणाऱ्या धनिकांचा आश्रय या भाषेस मिळाला पाहिजे. मराठी भाषेची सेवा इमानेंइतबारें अमका तमका करीत आहे, असें ठरल्यानंतर तो दीन स्थितींत आढळणें दुरापास्त झालें पाहिजे. विद्वानांनीं आदरपूर्वक त्याच्या ग्रंथांचें निरीक्षण केलें पाहिजे. कारण द्रव्याभावामुळें होणाऱ्या हालअपेष्टांपेक्षांहि विद्वज्जनांकडून होणारी हेळसांड पंडितांना अधिक तापदायक होत असते. मराठी भाषेविषयीं अभिमान बाळगणाऱ्या सर्व विचारी लोकांना आमची अशी विनंति आहे कीं, तुम्ही

श्रीमंत असा वा गरीब असा, मराठी भाषेची सेवा आजकाल कोठें व कशी होत आहे ह्यावर नजर ठेवा, ह्या सेवेसंबंधानें चर्चा करण्याचा प्रसंग वाया जाऊं देऊं नका, व तुमच्या पैशानें नाहीं तर निदान तुमच्या शब्दानें या सेवेचा फैलाव करण्यास चुकूं नका. स्वभाषेच्या भक्तांविषयीं समाजाचे मनांत आदर व पूज्यबुद्धि उत्पन्न करण्याचा हा मुख्य मार्ग आहे; आणि आळस सोडून परदेशी भाषेचा मनावरील आगंतुक अंमल उठविण्याचा तुम्ही जरासा जर प्रयत्न केला, गतानुगतिकत्व सोडण्याची थोडीशी जरी तुम्ही झीज सोसलीत, तरी स्वदेशी भाषेविषयीं समाजांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्यावांचून रहाणार नाहीं. एखादा जज्ज किंवा कलेक्टर मराठींत र, ट, फ करूं लागला कीं लागले त्याची हांजी हांजी करायला, आणि अधिकाऱ्याची ज्या स्वदेशी लेखकावर गैरमर्जी त्या लेखकाला 'नीतिभ्रष्ट' 'तमासगीर' असल्या शेलक्या शिव्या देण्यास एका पायावर तयार, असला मातृभाषेशीं विरोध करूं नका. मराठी लेखकांसंबंधानें बहुजन समाजांत जर आदर व विश्वासबुद्धि उत्पन्न करण्यांत आली नाहीं तर समाजाचा पाठिंबा मराठी ग्रंथांना केव्हांहि मिळणार नाहीं. ग्रंथ लिहिण्याशिवाय इतर व्याप ग्रंथकारांच्या मागें असतां कामा नये. अनादर, द्रव्याभाव व अविश्वास हें तापत्रय सांप्रत लेखकांच्या मागें लागलें आहे. अधिकाऱ्यांची वक्रदृष्टि म्हणून कित्येक बांधवांचा रोष नांवाजलेल्या व प्रतिभासंपन्न लेखकांवर असावा, हें चांगलें लक्षण नव्हे. राष्ट्रीय पक्षाचे लेखकांबद्दल सरकारनें अविश्वास दाखविला म्हणून आमच्या लोकांनीं मराठी भाषेचे सेवक या नात्यानें त्यांविषयीं अविश्वास दाखवावा व त्यास दूर लोटण्यास तयार व्हावें याहून श्ववृत्तीचें लक्षण तें कोणतें ? अशा प्रकारच्या श्ववृत्तीला बडोद्याचे संमेलनांत थारा मिळाला नाहीं याबद्दल बडोद्याचें अभिनंदन करणें जरूर आहे. श्री. सयाजीराव महाराज यांच्या विद्याभिरुचीमुळें बडोद्याचें संमेलन दरबारी थाटाचें झालें;

व हा असला दरबारी थाटाचा योग अविश्वास दूर करण्यास बऱ्याच अंशीं उपयोगीं पडत असतो. भांडवलवाले ज्या धंद्यांत पडतात त्या धंद्यांत धोका नाहीं, अशी समाजाची खात्री होण्यास फारसा वेळ लागत नाहीं. श्री. सयाजीराव महाराजांसारखे संस्थानिक ज्या उत्सवांस आश्रय देतात त्या उत्सवांत इतर सामान्य धनिकांनीं सामील होण्यास कोणतीच हरकत नाहीं, हें उघड आहे. भाषेच्या उत्सवासारखें पवित्र काम; पण असल्या कामींहि अविश्वास, हें आपलें दुर्दैव समजलें पाहिजे. या दुर्दैवाचा जोर कमी करण्याचा प्रयत्न बडोदेकरांनीं केला व त्यांत त्यांना चांगलें यश मिळालें ही संतोषाची गोष्ट होय. भाषेचा अभ्युदय व्हावा अशी जर महाराष्ट्राची इच्छा असेल तर मराठी भाषेची सेवा करणाऱ्या विद्वानांचा आदर करण्यास लोकांनीं शिकणें जरूर आहे. अधिकाऱ्यांच्या रोषास भीक न घालतां असल्या विद्वानांचा लेख वाचण्यास, विकत घेण्यास व संग्रहीं ठेवण्यास मागेंपुढें पाहूं नका. पैशाची अडचण असेल तर शेजाऱ्यापाजाऱ्याकडे जाऊन लेख वाचा; कारण ह्या असल्या भक्तियुक्त वाचनानें लेखकाला जितकी धन्यता वाटते तितकी दुसरी कशानेंहि वाटत नाहीं. द्रव्याची ज्या मानानें अनुकूलता असेल त्या मानानें वृत्तपत्रें, मासिक पुस्तकें व इतर ग्रंथ विकत घेण्याची संवय महाराष्ट्रानें झीज सोसूनहि सांप्रतचे काळीं लावून घेतली पाहिजे. राजाश्रयाचे ऐवजीं राजावक्रृपेचेच हे दिवस आहेत हें महाराष्ट्रानें ध्यानांत ठेवलें पाहिजे. तेव्हां द्रव्यद्वारां जितका आश्रय देतां येईल तितका देण्याचा बाणा स्वीकारल्याशिवाय बाणेदार लेखकांच्या शब्दसृष्टीनें नवीन धमकेचें रक्त महाराष्ट्राचे मनगटांत खेळण्याची आशा करूं नका. महाराष्ट्रांतील धनिकांनीं तर, स्वदेशी विद्वानांचें पालनपोषण करण्याचा बोजा आपणांवर आहे, हें विसरतां कामा नये. या विद्वानांचीं मतें तुमच्या स्वार्थाशीं जुळणारीं असोत वा नसोत, ह्या विद्वानांचे उद्योग तुम्हाला

पसंत पडोत वा न पडोत, ह्या विद्वानांचे ग्रंथ तुमच्या समजुतीप्रमाणें आज आवश्यक असोत वा नसोत, विद्वत्तेविषयीं व स्वभाषेच्या आस्थेविषयीं तुमची खात्री झाल्यानंतर जर तुम्ही हात आंखडून धरले व दैन्यावस्थेमुळें स्वभाषेच्या सेवेपासून जर त्यांना तुम्ही पराङ्मुख होऊं दिलें, तर मातृ-भाषेच्या वधाचें पाप तुम्हांस लागल्यावांचून रहाणार नाहीं. स्वभाषेच्या विद्वानांचा गौरव करण्याचें उदाहरण श्री. सयाजीराव महाराज यांनीं बडोद्याचे संमेलनाचे वेळीं घालून दिलें आहे; व हा कित्ता महाराष्ट्रांतील धनिकांनीं जर गिरविला तर पांचव्या साहित्य संमेलनाचे हातून एक महत्कार्य घडलें, असें सिद्ध होईल. मराठी भाषेच्या अभिमानाबद्दल मराठी ग्रंथकारांना देण्यांत अलेल्या आश्रयाबद्दल व सर्व धनिकांना घालून दिलेल्या या धडयाबद्दल श्री. सयाजीराव महाराज यांचे आम्ही आभारी आहोंच; तथापि या संमेलनांत त्यांना देण्यांत आलेल्या ‘ राजा भोज ’ या पदवीस साजेशी मातृभाषेची सेवा करून, उत्सवाचे भरांत विद्वानांनीं अतिशयोक्ति केली नाहीं असा शेरा मारण्यास त्यांनीं इतिहासास भाग पाडावें, अशी त्यांना बडोदे येथील मराठी भाषेच्या उत्सवावरील ह्या लेखाचे शेवटीं विनंति केल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं.

२।७।६२
८७३०७

# * वर्षाचे आंत पारडें फिरलें

गेल्या सालचा डिसेंबर व यंदाचा डिसेंबर या दोन महिन्यांतील हिंदुस्थानच्या राजकीय वातावरणाची तुलना करणारांस अनेक अपूर्व व विलक्षण चमत्कार दिसतील. गेल्या डिसेंबरांत, राष्ट्रीय सभेंतून राष्ट्रीयांस क्रीडच्या दंडुक्यानें हांकून देऊन मवाळ पक्ष आपली पहिली कन्व्हेन्शन मद्रास येथें भरविण्यांत दंग झाला होता; आपल्या उपदेशाप्रमाणें मवाळ पक्षानें आपल्या झेंडयाभोंवतीं नाचण्याची तयारी केलेली पाहून मोर्लेसाहेबांस आनंद होऊन ह्या 'राष्ट्रीय सभे'च्या आधीं आपल्या सुधारणांची टिमकी नाचण्यास ताल म्हणून लॉर्ड मोर्ले यांनीं वाजविली होती. मद्रासेंत सर्व मवाळ पुढाऱ्यांनीं रासविहारींसह जमून मोर्लेसाहेबांनीं निर्मिलेल्या 'नव्या मन्वंतराचें'—'वसंत समयाचें'—कोकिलकूजितांनीं अभिनंदन चालविलें होतें; व याबरोबरच जे सांप्रत आम्हांत नाहींत ते पूर्वीहि कधींच आमच्यापैकीं नव्हते अशा-प्रकारें राष्ट्रीय पक्षावर मृदु पुष्पांजलि उधळण्याची ही रासक्रीडा चालली होती. मद्रासेंतील हा नाच पाहून अँग्लो—इंडियन लेखक व अधिकारीवर्ग खूष होऊन, 'वाहवा ! बहुत खाशी !' अशा उद्गारांनीं मवाळ पक्षास शाबासकी व उत्तेजन देत होता. पण मद्रपुरींतील ही रासक्रीडा होऊन एक वर्ष सरण्यापूर्वीच मवाळ पक्षाचे मनोवृत्तींत केवढा तरी फरक पडला आहे ! आनंदाचा नाच संपून अधिकारी वर्गाशीं आतां मर्दानी झोंबी करण्यासाठीं त्याच रासविहारी वगैरेंनीं अस्तन्या वर सारण्याचा विचार चालविला आहे; कोकिलकूजितें जाऊन असंतुष्टतेचें, व संतापाचें गुरगुरणें सुरू झालें आहे; व राष्ट्रीय पक्षास जमीनदोस्त करण्यासाठीं उगारलेले

---

* केसरी, ता. २१ डिसेंबर १९०९.

हातहि ढिले पडून खालीं यावयास लागले आहेत ! बारा महिन्याचे आंत चमत्कार कसा घडून आला, हें पहावयाचें असेल तर गेल्या आठवडयांत डॉ. रासबिहारी घोष, दोघे चौधरी बंधु, सुरेंद्रनाथ बानर्जी, बॅ. रसुल वगैरे तेरा बंगाली नेमस्त पुढाऱ्यांनीं काढलेला जाहीरनामा पहावा; म्हणजे वरील चमत्काराची उत्पत्ति कशी झाली तें कोणासहि स्पष्ट दिसून येईल.

मोर्ले-मिंटो यांनीं दिलेल्या व नवें मन्वंतर सुरू करणाऱ्या देणग्यांनींहि राष्ट्रीयांचें समाधान कां होत नाहीं व ते मद्रासेंतील क्रीड-सभेंत सामील होऊन आनंदीआनंदाचे वांटेकरी कां होत नाहींत, याची मवाळ पक्षास तेव्हां कल्पनाहि होईना. पण राष्ट्रीय सभा संपतांच राष्ट्रीयांच्या मनोवृत्तीचा मवाळ पक्षास हळूहळू उलगडा होऊं लागला. या उलगडयांतील एकेक पायरी बंगाली पुढाऱ्यांच्या जाहीरनाम्यांत स्पष्टपणें नमूद केलेली आहे. निवडणुकीच्या रचनेंत बडे जमीनदार व मुसलमान यांच्या वर्णभेदाचें व जातिभेदाचें तत्त्व घुसडलेलें आहे, व तें देशहितास विघातक आहे, हें मवाळ पक्ष जाणून होता; परंतु सुधारणांच्या देणग्यांनीं बेविश्वासाचें व दडपशाहीचें युग संपून विश्वासाचें व सलोख्याचें नवें मन्वंतर आतां सुरू केलें आहे, लवकरच बंगभंग रद्द-निदान दुरुस्त तरी-होईल, ह्या आशेवर-रासबिहारी प्रभृति म्हणतात-आम्ही या देणग्यांचें अभिनंदन केलें. पण राष्ट्रीय सभेनंतर लवकरच मोर्लेसाहेबांनीं जाहीर केलें कीं, बंगभंग दुरुस्त करण्याचें कामांत आपण कालत्रयींहि पडणार नाहीं! मोर्लेसाहेबांचा हा वज्रलेप म्हणजे मवाळांचे डोळ्यांत फिरलेलें पहिलें अंजनाचें बोट होय ! जातिभेदाचे व वर्गभेदाचे राज्यपद्धतींत राजरोस घुसडविलेलें तत्त्व मागें हटेना, व बंगभंगहि वज्रलेप होऊन बसला; पण एवढयानेंच पुरें न होतां निवडणुकीचे नियम व कानू प्रसिद्ध होऊन अंजनाचा अधिक तीव्र झटका बसला. मुसलमानांकरितां निवडणुकीची निराळी व स्वतंत्र व्यवस्था झाली,

एवढेंच नव्हे तर मतदाराची पात्रता ठरवितांनाहि या वर्गावर फाजील मेहेरनजर झाली. कोठें राजकीय महत्वासाठीं, तर कोठें अशिक्षित व अज्ञान म्हणून, कोठें अल्पसंख्यांक म्हणून तर कोठें वजनदार म्हणून, दरेक प्रांतांत निवडणुकींत वडया जमीनदारांचा व मुसलमानांचा वरचष्मा होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. किंवहुना बहुसंख्याक असणें हीच जास्त हक्क मिळविण्याची नालायकी, असें जगांत कोठेंहि नसलेलें विपरीत राजनीति-तत्व या देशांत मूर्तिमंत अवतरल्याचा चोख अनुभवहि आला. ज्याच्या प्रयत्नानें सुधारणांच्या देणग्या मिळाल्या त्या राजकीय चळवळींत निष्णात अशा सुशिक्षित समाजास निवडणुकीच्या हक्कांतून वगळलें, किंवहुना त्या वर्गाचे सुरेंद्रनाथसारखे प्रमुख पुढारी निवडून येऊंच नयेत अशाच दृष्टीनें नियमांची व कानूंची रचना झाली ! या नियमांत राहिलेली कूस काढून टाकण्यासाठीं मनाईच्या कलमाचे पाशुपतास्त्रहि सरकारनें आपल्या भात्यांत जय्यत तयार करून ठेविलें होतें; व त्याचा पहिल्याच सालीं अन्यायानें व धर्मयुद्धाचे नियम गुंडाळून ठेऊन उपयोगहि करण्यांत आला ! बंगाली पुढारी म्हणतात, आम्ही ज्या सलोख्याच्या नव्या मन्वंतराची चातकाप्रमाणें उत्कंठेनें वाट पहात होतों त्याच्या आरंभींच इतके दुष्ट अपशकून झाले असून ह्या मन्वंतरास अमंगल व हिडिस स्वरूप येतें कीं काय अशी आम्हांस भीति वाटत आहे. रासबिहारी घोससारखे मवाळाग्रणी आतां जें बोलत आहेत, त्याचीं स्पष्ट स्वप्नें राष्ट्रीयांस वर्षापूर्वीच पडावयास लागल्यामुळें मोर्लेसाहेबांच्या देणग्यांनीं राष्ट्रीय पक्ष मवाळांप्रमाणें हुरळून जाऊन भाटपणा करण्यास कबूल झाला नाहीं. अखेर राष्ट्रीयांच्याच या मनोवृत्तीची सत्यता मवाळ पक्षास इतक्या उशिरानें कां होईना—पटली ही समाधानाची गोष्ट होय.

सुधारणांच्या देणग्यासंबंधाच्या मवाळांच्या रंगपालटाची ही हकीकत झाली. इकडे राष्ट्रीय-नामधारी कन्व्हेन्शनच्या बाबींतहि झालेला पालट व

फरक राष्ट्रीयांचा सत्पक्ष आहे असें सिद्ध करीत आहे. मद्रासची कन्व्हेन्शन सभा आटपल्यावर बंगाल्यांचे डोळे उघडून ह्या सात कोटी लोकांनीं संयुक्त काँग्रेसची खटपट चालविली; पण ती यंदा फलद्रूप होत नाहीं, असें पाहून या मजलसींतून त्यांनीं बहुतेक अंगच काढून घेतलें. नुकताच सामील झालेला ब्रह्मदेशहि निसटून गेला आहे. मुसलमानांस दिलेल्या फाजील सवलतींमुळें संयुक्तप्रांत व पंजाब यांतील हिंदू लोकहि उदासीन होऊन फुटूं पहात आहेत; मध्यप्रांत-वऱ्हाड आणि महाराष्ट्र–स्वयंदत्त ‘ पुढारी ’ पदवींत आनंद मानणारे चारपांच मूठभर सद्गृहस्थ खेरीज करून–मेथा-मजलसींस केव्हांहि अनुकूल नव्हता व नाहीं. अशी फाटाफूट व पळापळ चालली असतां मजलसीचे नेहमीं अंतस्थ रीतीनें असलेले पण यंदा उघडपणें झालेले सूत्रधार दर्शनी पडदा उचलण्याचे ऐनवेळीं रुसून अंत:पुरांत जाऊन बसल्यामुळें मजलसवाल्यांची जी तारांबळ उडाली आहे ती कांहीं पुसूंच नये ! सर मेथा ऐनवेळीं रुसले एवढेंच नव्हे तर या रुसण्याचीं कारणेंहि सांगण्यास तूर्त आपण तयार नाहीं, असेंहि त्यांनीं पर्यायानें जाहीर केलें आहे. ‘ अनेक अनपेक्षित गोष्टी एकाएकीं घडून आल्यामुळें मी अध्यक्ष-पदाचा राजीनामा देत आहें, याहून आपल्या ह्या कृत्याचा जास्त खुलासा करण्याची सर फेरोजशहा यांची तूर्त मर्जी लागत नाहीं’ असें ‘ मुंबई समाचार ’ पत्रानें पर्यायानें ध्वनित केलें आहे. पुढारी कितीहि विद्वान, बुद्धिमान व देशभक्त असो, अशा आणीबाणीच्या वेळीं आपण केलेल्या आपल्या सार्वजनिक कृत्याचा त्यानें उघड खुलासा अगर समर्थन करणें देशाच्या व लोकमताच्या दृष्टीनें आवश्यक आहे, असें सर्व सुधारलेल्या देशांत मानण्यांत येतें. पण हिंदुस्थानची सगळीच गोष्ट निराळी किंवा उलटी असावयाची. अध्यक्षांचे हातीं सुलतानी अधिकार देऊन बसलेल्या कन्व्हेन्शनवाल्यांस आतां पश्चात्ताप करण्याची खास पाळी आली असेल.

ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें एकदां अध्यक्षाची निवडणूक केली कीं, ती सर्व प्रांतिक कमिटयांनीं, किंबहुना खुद्द कॉंग्रेसनेंहि वेदाज्ञेप्रमाणें शिरसावंद्य मानली पाहिजे, असा कन्व्हेन्शनवाल्यांचा नियम आहे. पण सगळया राष्ट्राला बांधून टाकूं पहाणारा हा सर्वव्यापी नियम खुद्द निवडलेल्या अध्यक्षानें आयत्यावेळीं कस्पटाप्रमाणें मानून पायाखालीं तुडविला तर त्याचा मजलसवाल्यांस कांहींच बंदोबस्त करतां येत नाहीं ! सर फेरोझशहा मेथा यांनीं गुरुवारीं तारेनें लाहोरास स्वागत कमिटीकडे राजीनामा पाठविला; परंतु सरांच्या गळयांतील ताईत असलेले कन्व्हेन्शनचे जनरल सेक्रेटरी मि. वाच्छा यांस त्याची सोमवारपर्यंत वार्ताहि नव्हती, असें प्रसिद्ध झालें आहे ! लाहोरची स्वागत कमिटी व सर फेरोझशहा यांचेमध्यें अध्यक्षांचे भाषणांतील कांहीं भागासंबंधानें मतभेद झाल्यामुळें राजीनाम्यापर्यंत मजल आली अशी एक वदंता आहे. ती खरी असल्यास मतभेदाचा हा भाग कोणता असावा, याबद्दल तर्क करणें फारसें कठीण नाहीं. सुधारणा अमलांत आणण्यासाठीं केलेल्या नियमांशीं व कानूंशीं या भानगडीचा संबंध असावा, अशीं कित्येकांनीं आपलीं अनुमानें प्रसिद्ध केलीं आहेत.

सर फेरोजशहांच्या या राजीनाम्यानें कन्व्हेन्शनच्या रचनेंतील दोषांचें पाप पदरांत पडूं लागलें व कॉंग्रेसमध्यें अलीकडे धुमाकूळ घालूं लागलेल्या सुलतानशाहीचा—मवाळांसहि पटेल असा—स्फोट झाला. सुरतेची राष्ट्रीय सभा मोडल्यानंतर माजलेल्या वादांत सर मेथांचे पूर्ण अनुयायी असलेल्या मुंबईच्या ' ओरिएंटल रिव्ह्यू ' पत्रानें गेल्या अंकांत राष्ट्रीयांच्या वरील तक्रारीची सत्यता मान्य केली आहे. सर फेरोजशहांची योग्यता कितीहि मोठी व देशभक्ति कितीहि श्रेष्ठ दर्जाची असली तरी हिंदुस्थान देश—किंबहुना ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी यांचा अधिकार त्यांचेहूनहि मोटा आहे; या अधिकारास न जुमानतां आपल्या राजीनाम्याचीं कारणें मर्जीस येईल तोंपर्यंत

आपण गुप्तच ठेवणार असा सर मेथा यांचा हट्ट असेल तर ही सवाई झारशाहीच झाली असें म्हटलें पाहिजे. कारण खुद्द झारलाहि आपल्या मुख्य मंत्र्यास आपल्या राजकीय कृत्यांचीं कारणें सांगावीं लागतात. ब्रिटिश लोकांपाशीं स्वराज्याचे व प्रजास्वातंत्र्याचे हक्क मागणाऱ्या कॉंग्रेसमध्येंच जर दुर्दैवानें अशी सुलतानी माजेल तर ह्या कॉंग्रेसचें एक सनदशीर संस्था या नात्याचें अस्तित्वच नाहींसें होईल, अशा आशयाचें विवेचन ' ओरिएंटल रिव्ह्यू ' पत्रानें आपल्या गेल्या अंकांत केलें आहे !

सारांश, १९०८ च्या डिसेंबरापासून १९०९ चा डिसेंबर संपण्यापूर्वीच मोर्लेसाहेबांच्या झेंडयाभोंवतीं सुरू झालेलें मवाळांचें नृत्यगायन थांबलें; निवडणुकीचे नियम व कानू यांजवर शीतल इन्दुप्रकाशांतूनहि अग्निकणांचा वर्षाव होऊं लागला; इंडिया कौंसिलचे सभासद मि. गुप्त व सुप्रसिद्ध ज. दावर यांसहि सुधारणा पुरेशा वाटत नसून या देणग्यांनीं हुरळून जाणारा मी नव्हतों व नाहीं, असें वरील न्यायमूर्ती ' इंडियन रिव्ह्यू ' चे ताज्या अंकांत स्पष्टपणें जाहीर करीत आहेत. सुधारणांचें अभिनंदन करून त्याबद्दल जाहीर रीतीनें हर्ष मानण्यांत आणि राष्ट्रीय सभेंत सुलतानी चालविण्याचे कामांत अग्रगण्य व अत्यंत मानी अशा सर फेरोज-शहा मेथांसहि मागें पाऊल घेऊन राजिनामा द्यावा लागून त्याबद्दल आपल्या अनुयायांचा उघड वा गुप्त धिःक्कार सहन करावा लागत आहे. हा राष्ट्रीय पक्षाचा विजयारंभच आहे, असें सर्व समंजस व विचारी लोकांस वाटेल यांत शंका नाहीं. एका वर्षांत मवाळ पक्षाच्या राष्ट्रीयांकडे झुकूं लागलेल्या या पारडयाची गति पुरी होण्यास आतां एकच गोष्ट व्हावयाची राहिली आहे; ती अशी कीं, मोर्लेसाहेबांच्या देणग्यांचें गाठोडें आपल्या डोईवरून इकडे आणणारे ना. गोखले यांनीं तें खालीं झुगारून देऊन मोर्लेसाहेबांस सीझरप्रमाणें ' तूंसुद्धां गोखले ' (' Thou too Brutus ! ') म्हणावयास

लावलें, आणि यंदा नाहीं तर पुढील सालीं तरी संयुक्त कॉंग्रेस भरून कलकत्त्याचे चार ठराव पास झाले, किंबहुना मि. गांधी यानीं कॉंग्रेसला पाठवलेल्या निरोपांत सुचविल्याप्रमाणें हिंदुस्थानांतील कायदेशीर राजकीय चळवळ शरीरबलापेक्षां आत्मबलावर अवलंबून असलेल्या व हिंदुस्थानच्या राष्ट्रीय शीलास अनुरूप अशा अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या अढळ पायावर प्रत्यक्ष व कृतींत नेऊन ठेवली, म्हणजे सुरत येथील बखेडा व मारामारी यांपासूनहि एक मोठेंच देशकार्य झालें असें ठरेल.

**भाग पहिला समाप्त**

# श्री. कृ. प्र. खाडिलकरांचीं नाटकें

**संगीत माला**

मेनका—किंमत १२ आणे.
द्रौपदी—किंमत १२ आणे.
स्वयंवर—किंमत १२ आणे.
विद्याहरण—किंमत १ रुपया.
मानापमान—किंमत १२आणे.
सावित्री—किंमत १२ आणे
बायकांचें बंड—कि. १२ आ.
त्रिदंडी संन्यास—किं. १२ आ.

**गद्यमाला**

कीचकवध—किं. १ रु.
कांचनगडची मोहना—
किंमत १२ आ.
सवाई माधवराव—
यांचा मृत्यु—किंमत १२ आणे.
भाऊबंदकी—किंमत १२ आणे.
प्रेमध्वज—किंमत १२ आणे.
सत्त्वपरीक्षा—किंमत १२ आणे.
सवती-मत्सर—किं. १२ आणे.

सर्व नाटकें सचित्र छापलीं असून संगीत 'बायकांचें बंड' व 'त्रिदंडी संन्यास' नाटकांतील फोटो सुलोचना संगीत मंडळीच्या नटनटींचे, त्याखेरीज बाकीच्या सर्व संगीत नाटकांतील फोटो गंधर्व नाटक मंडळींतील नटांचे, आणि गद्य नाटकांतील फोटो महाराष्ट्र नाटक मंडळींतील नटांचे आहेत.

## नवाकाळ ऑफिसमध्यें मिळणारीं पुस्तकें—

श्री. कृ. प्र. खाडिलकरकृत पहिलें महायुद्ध भाग १ ते ५; सर्व भाग एकदम घेणारास किं. रु. ५-४-०.

श्री. य. कृ. खाडिलकरकृत कादंबऱ्याः—
संसार शकट, सदानंद, आजकाल; प्रत्येकीं किं. १॥ रु.

श्री. के. रा. पुरोहितकृतः—शून्यजगत्, आकाशपुष्प; प्रत्येकीं किं. २ रु.

श्री. भा. रा. धुरंधरकृतः—९० रुपयांचा चेक किं. १॥ रु.
गीता बोध किं. ६ आणे.

मॅनेजर—नवाकाळ, मुंबई ४.

नगर वाचन